सर्वाधिक लोकप्रिय

NITIN PRAKASHAN

# सुगम मराठी व्याकरण व लेखन

मो. रा. वाळंबे

५४वी सुधारित आवृत्ती

शब्दरत्न या प्रोत्साहन भेट पुस्तकासह

एम पी एस सी, यू पी एस सी, इतर स्पर्धा परीक्षा तसेच माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन परीक्षांच्या सुधारित अभ्यासक्रमांवर आधारित

# सुगम मराठी व्याकरण व लेखन


लेखक

**मो. रा. वाळंबे**

बी ए. बी टी

सेवानिवृत्त प्रमुख, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, पुणे


किंमत : ₹ २२५/-

Price : ₹ 225/-


NITIN PRAKASHAN

www.nitinprakashan.com

NITIN PRAKASHAN
www.nitinprakashan.com

संस्थापक
कै. वसंतराव गोगटे

नितीन प्रकाशन
१४७, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर लेन, आप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ००२.
✆ (०२०) २४४८३५१६/२४४८३५१७.
✉ info@nitinprakashan.com

* सुगम मराठी व्याकरण व लेखन
  (Sugam Marathi Vyakaran va Lekhan)
* © नितीन प्रकाशन
* ISBN : 81-86169-80-6
* लेखक : मो. रा. वाळंबे
* प्रथम आवृत्ती : १९८९
* नवीन मजकुरासह पन्नासावी सुधारित आवृत्ती : २०१५
* *बावन्नावी आवृत्ती : अक्षय्य तृतीया, २८ एप्रिल, २०१७*
* मुखपृष्ठ : ONE ZERO EIGHT Brand and Design
* मुद्रणस्थळ : सॅप प्रिंटर्स प्रा. लि., मुंबई
* किंमत : ₹ २२५/-

सदर पुस्तकातील संपूर्ण अथवा अंशतः मजकूर पूर्ण अथवा संक्षिप्त स्वरूपात प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रसिद्ध करता येणार नाही अथवा कोणत्याही पद्धतीने किंवा कोणत्याही उपकरणात संग्रहित करता येणार नाही. पुस्तकातील संपूर्ण अथवा अंशतः मजकूर अशा प्रकारे साठवून त्याचे वितरण वा प्रक्षेपण करता येणार नाही. तसेच या पुस्तकातील मजकूराचे इतर कुठल्याही भाषेत रूपांतर अथवा त्याचा अनुवाद करता येणार नाही. असे करण्यापूर्वी पुस्तकाचा स्वामित्व हक्कधारक आणि प्रकाशक या दोघांची परवानगी घेणे आवश्यक आहे. या अटी व नियमांचा भंग केल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्था कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

**अस्वीकृती** – प्रकाशक या पुस्तकातील मजकुराच्या अचूकतेची आणि सर्वसमावेशकतेची हमी घेऊ शकत नाही. काही तांत्रिक किंवा अन्य काही कारणामुळे जर दोष आढळला तर त्यासाठी प्रकाशकाला जबाबदार धरता येणार नाही.

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना

अनेक वर्षे मनाशी बाळगलेला संकल्प या पुस्तकरूपाने सिद्धीस जात आहे, याबद्दल वाटणारे समाधान प्रारंभीच व्यक्त करतो. १९७२ सालापासून महाराष्ट्रातील सर्व माध्यमिक शाळांतून सुधारित अभ्यासक्रम अमलात आला. व्याकरण व लेखन या विभागाला ५० गुण देण्यात येऊन त्यात नवीन सदरे व वाङ्मयप्रकार समाविष्ट करण्यात आले. वाक्यपृथक्करण, वाक्यसंश्लेषण, वाक्यरूपांतर ही सदरे व्याकरणात व बातमीपत्रे, इतिवृत्ते, पुस्तकपरिचय ही प्रकरणे लेखनविभागात नव्याने समाविष्ट करण्यात आली. वृत्ते, अलंकार, शब्दसिद्धी यांचा अभ्यास वाढवण्यात आला. 'शब्दांची शक्ती, रस, काव्यगुण व सारांशलेखन' ही सदरे पुन्हा समाविष्ट झाली. त्यामुळे या अभ्यासक्रमावर आधारित अशा अद्ययावत पाठ्यपुस्तकाची गरज तीव्रतेने भासू लागली. ही उणीव दूर करण्यासाठी आम्ही ८वी व ९वी इयत्तांसाठी पाठ्यपुस्तकांवर आधारित अशी 'सुगम मराठी व्याकरण व लेखन' या नावाची दोन पुस्तके प्रकाशित केली व त्यांचे स्वागतही चांगले झाले. केवळ १०वीच्या अभ्यासक्रमावरच वेगळे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार होता, पण अभ्यासक्रमाला अनुसरून तेवढ्याच विषयांचे विवेचन करताना विवेचनाची व उजळणीची पुनरावृत्ती होते व विषयांचे तुकडे पडल्यामुळे तुटकपणा तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे अभ्यासक व लेखक यांपैकी कोणाचेच समाधान होत नाही. शिवाय 'व्याकरण-लेखनविषयक सर्व विषयांचे विवेचन एकत्र असलेले असे स्वयंपूर्ण एकच पुस्तक आम्हांस हवे आहे.' अशी मागणी अनेक शिक्षक बंधुभगिनींनी केल्यामुळे प्रारंभीचा बेत बदलून व्याकरण व लेखनाच्या सर्वच विभागांवर सुटसुटीत व अद्ययावत असे एक पुस्तक विगामी पद्धतीने लिहून सादर करण्याचे मी ठरविले. या संकल्पाला आलेले हे फळ मी आपणांस नम्रपणे सादर करीत आहे.

हे पुस्तक केवळ माध्यमिक शाळांसाठीच मर्यादित न ठेवता उच्च माध्यमिक, पदवीपूर्व, पदविका तसेच विविध स्पर्धा परीक्षा या अभ्यासक्रमांनुसार विद्यार्थ्यांना सोयीचे जावे यासाठी थोडा अधिक अभ्यास यातच समाविष्ट केला आहे. सर्वच अभ्यासक्रमांवरील एकच व सलग पुस्तक असल्यास विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांची व व्याकरणाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंची सोय व्हावी, हाही हेतू अशा प्रकारचे पुस्तक तयार करण्यामागे आहे. या पुस्तकाचे विवेचन विगामी पद्धतीने केले असून रोजच्या व्यवहारातील भरपूर 'उदाहरणे' व 'अभ्यास' हे त्याचे वैशिष्ट्य होय. विद्यार्थ्यांना व्याकरण या विषयाची गोडी वाटावी व शिक्षकांनाही अध्यापनाच्या दृष्टीने उपयुक्त व्हावे अशीच या पुस्तकाची रचना केली आहे.

१९३७ च्या जून महिन्यात शाळेत व्याकरण शिकवण्याचा प्रसंग माझ्यावर प्रथम आला. तेव्हापासून ३६ वर्षे माध्यमिक शाळांत मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांच्या व्याकरणाचे अध्यापन करण्याची संधी मला मिळाली. हे अध्यापन करीत असतानाच व्याकरण या विषयाचे खरे अध्ययन मला करायला मिळाले, या विषयाची गोडी लागली व ती वाढतच गेली.

मराठी व्याकरण पुस्तकरूपाने मांडण्याची प्रथम संधी मला महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने दिली व ५वी, ६वी व ७वी या इयत्तांकरिता मराठी व्याकरणाची तीन छोटी क्रमिक

पुस्तके माझ्याकडून लिहून घेतली. विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक या सर्वांनीच त्यांचे प्रेमाने व उत्स्फूर्त स्वागत केले व ही सुधारलेली आवृत्ती अल्पावधीत प्रसिद्ध करण्याचा योग आणून दिला. याबद्दल मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

ही आवृत्ती सिद्ध करताना पूर्वीच्या आवृत्तीतील जो-जो भाग मला त्रोटक वाटला व जिथे अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता वाटली, तिथे नव्याने भर घातली आहे. 'देवनागरी लिपी', 'वर्णांची उच्चारस्थाने', 'संधी' ही प्रकरणे चाळल्यास त्याचा प्रत्यय येईलच. या आवृत्तीत 'वाक्प्रचार व म्हणी' हे प्रकरण सुधारून लिहिले आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे हे पुस्तक अधिक सुगम, उपयुक्त व आकर्षक करण्याचा प्रयत्न केला आहे. आधीच्या आवृत्तीप्रमाणेच याही आवृत्तीचे स्वागत विद्यार्थी, शिक्षक व मराठी भाषेचे अभ्यासक रसिकतेने करतील, असा दृढ विश्वास वाटतो.

कागद व मुद्रणविषयक बाबींचे दर फार मोठ्या प्रमाणात वाढलेले असताना याही पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी नितीन प्रकाशनाच्या सौ. सुधा गोगटे यांनी स्वीकारली, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

१ एप्रिल १९८८ — - मो. रा. वाळंबे

# सुधारित आवृत्तीच्या निमित्ताने

गेली अनेक दशके मराठी व्याकरणातील सर्वोत्तम संदर्भ म्हणून नावाजलेल्या मो. रा. वाळंबे यांच्या 'सुगम मराठी व्याकरण व लेखन' या पुस्तकाची स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त अशी नवीन आवृत्ती प्रसिद्ध करताना आम्हाला विशेष आनंद होतो आहे.

व्याकरणातील मूळ संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून देणारा विश्वासार्ह स्रोत म्हणून 'सुगम मराठी व्याकरण व लेखन' या पुस्तकाचे महत्त्व आहे. दैनंदिन वापरातील सोपी उदाहरणे देऊन विगामी पद्धतीने नियम समजावून दिल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मदतीशिवाय व्याकरणाचा अभ्यास करण्याचा आत्मविश्वास या पुस्तकाने दिला आहे.

**या आवृत्तीची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे -**

- ***स्वयंअध्ययनासाठी प्रत्येक घटकाखाली दिलेले एकूण ६५० पेक्षा जास्त नवीन प्रश्न.***
- ***वर्ष २०१४, १५ व १६ मधील स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका उत्तरांसह.***

लेखन विभागामध्ये निबंधलेखन (६ प्रकार) पत्रलेखन (५ प्रकार), भाषांतर, सारांशलेखन व गद्य आकलन आणि संकीर्ण विभाग (भाषण, संवाद, मुलाखत, गटचर्चा, प्रसार माध्यमांसाठी निवेदन, अहवाल, इ.) असे विभाग करण्यात आले आहेत. या प्रत्येक विभागात, त्याच्या उपविभागात सुरुवातीला त्या त्या लेखन प्रकाराच्या तंत्राची, मांडणी पद्धतीची, आवश्यक कौशल्यांची सविस्तर, मार्गदर्शनपर चर्चा केली आहे. सुरुवातीला मुद्दे देऊन मग नमुना निबंध, पत्र दिले आहे. सरावासाठी विषय देतानाही त्यातल्या काही विषयांवरचे मुद्दे निबंधात दिले आहेत. निबंध विषय, त्याला अनुसरून मुद्दे व त्यातून निबंध कसा आकाराला येईल याचे तंत्र विद्यार्थ्यांना यातून आत्मसात करता येईल असा विश्वास आहे.

परीक्षेसाठी व पुढील उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा!

## + सुधारित आवृत्ती लेखक परिचय +

लेखन विभागातील लेखन - शैलजा देशमुख (एम ए ,एम एड)
नामवंत अध्यापिका व लेखिका

जयश्री काटीकर (एम ए)
नामवंत अध्यापिका व लेखिका

व्याकरण घटकांवरील प्रश्नरचना - सुजाता शेटे (एम ए)
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक

आवृत्ती संपादन सहाय्य - मनोज पऱ्हाड
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक

# अनुक्रमणिका

## व्याकरण विभाग


१. आपली भाषा, लिपी व व्याकरण . १ ते ७
- भाषा - संवादाचे साधन ............... ०१
- भाषेची अभिव्यक्ती ..................... ०१
- भाषेचे महत्त्व .............................. ०१
- मातृभाषा मराठी ........................ ०२
- मराठीविषयी काही ...................... ०२
- 'मराठी असे आमुची मायबोली' ....... ०२
- आपली भाषा आपली लिपी ............ ०३
- आपण भाषा कशी शिकतो ? .......... ०४
- गौरव मराठीचा ............................ ०४

२. व्याकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व ...८ ते १०
- व्याकरण व त्याची आवश्यकता ....... ०८
- भाषा व व्याकरण परस्परसंबंध ........ ०९
- व्याकरणाचा अभ्यासविषय ......... १०

३. वर्णविचार - १ .....................११ ते १६
- वर्णमाला ................................ ११
- वर्णांचे प्रकार ............................ १२
- स्वरांचे प्रकार ............................ १३
- व्यंजनांचे प्रकार ........................ १३

४. वर्णविचार - २ .....................१७ ते २१
- मराठीची वर्णमाला आणि वर्णांचे प्रकार ..१७
- महाप्राणविषयक स्पष्टीकरण ........... १७
- क्ष् व ज्ञ् यांच्याविषयी स्पष्टीकरण ...... १८
- वर्णांची उच्चारस्थाने ..................... १८

५. जोडाक्षरांचे लेखन .............. २२ ते २८
- जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धती ......... २२
- जोडाक्षरांचे प्रकार ....................... २३
- काही विशेष लेखनपद्धती ............. २५
- 'ऋ' आणि 'ऌ' या स्वरांनी होणारी अक्षरे .. २५
- मराठीतील स्वरांची उच्चारपद्धती ....... २५
- 'अ' चे उच्चार ........................... २६
- इतर स्वरांचे उच्चार .................... २६
- अनुस्वाराचे उच्चार ...................... २७
- विसर्गाचा उच्चार ........................ २७

६. संधी - स्वरसंधी .............. २९ ते ३४
- शब्दाची घडण व संधी ................ २९
- संधींचे प्रकार ........................... २९

७. संधी - व्यंजनसंधी, विसर्गसंधी . ३५ ते ४३
- व्यंजनसंधी ................................ ३५
- विसर्गसंधी ................................ ३७
- मराठीच्या विशेष संधी ....................४०

८. शब्दविचार ..................... ४४ ते ४७
- शब्द आणि पद ...........................४४
- शब्दांच्या जाती ........................... ४४

९. नामे ................................ ४८ ते ५३
- नाम ........................................ ४८
- सामान्यनाम ............................. ४८
- विशेषनाम ................................ ४९

- भाववाचकनाम ........................ ४९
- नामांचे कार्य करणारे इतर शब्द .... ५०

१०. लिंगविचार ........................ ५४ ते ५८

- लिंग ........................................ ५४
- लिंगभेदामुळे नामांच्या रूपांत होणारा बदल ........................................ ५६

११. वचनविचार ........................ ५९ ते ६२

- वचनभेदामुळे नामांच्या रूपांत होणारा बदल ........................................ ५९
- पुल्लिंगी नामांची अनेकवचने ......... ५९
- स्त्रीलिंगी नामांची अनेकवचने ........ ६०
- नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने ... ६०
- वचनासंबंधी विशेष गोष्टी ............. ६१

१२. विभक्तीविचार .................... ६३ ते ६५

- विभक्ती ........................................ ६३
- विभक्तीची व्याख्या .................... ६३
- प्रत्यय आणि सामान्यरूप ............. ६३
- विभक्तीचे प्रकार ........................ ६४

१३. सामान्यरूप ...................... ६६ ते ७०

- विभक्ती, प्रत्यय, सामान्यरूप ......... ६६
- सामान्यरूपाचे विविध प्रकार ........... ६७
- सामान्यरूप केव्हा होत नाही? ........ ६९
- विशेषणांचे सामान्यरूप .................. ६९

१४. सर्वनामे ........................ ७१ ते ७७

- सर्वनामांचे प्रकार ........................ ७१
- पुरुषवाचक सर्वनाम व आत्मवाचक सर्वनाम यांतील फरक ........................ ७२
- सर्वनामांचा लिंगविचार ................ ७२
- सर्वनामांचा वचनविचार ............... ७२
- सर्वनामांचा विभक्तिविचार ............ ७३
- सर्वनामांचे उपयोग ..................... ७३
- सर्वनामांचे काही विशेष ............... ७४

१५. विशेषणे ........................ ७८ ते ८४

- विशेषण आणि विशेष्य .............. ७८
- विशेषणांचे प्रकार ..................... ७८
- विधिविशेषण ........................ ८१
- क्रियाविशेषण ........................ ८१
- विशेषणांचे कार्य व उपयोग ........ ८२

१६. क्रियापदविचार ................. ८५ ते ९१

- धातुसाधिते किंवा कृदन्ते ............ ८५
- कर्ता व कर्म ............................ ८६
- वाक्यातील कर्ता व कर्म कसे शोधतात? ................................ ८६
- क्रियापदांचे प्रकार ..................... ८७
- द्विकर्मक क्रियापदे ..................... ८८
- उभयविध क्रियापदे ..................... ८८
- काही अकर्मक धातू .................. ८९

१७. क्रियापदविचार - क्रियापदांचे अन्य प्रकार ................................ ९२ ते ९८

- संयुक्त व सहायक क्रियापदे .......... ९२
- सिद्ध व साधित क्रियापदे ............ ९३
- प्रयोजक क्रियापदे ..................... ९३
- शक्य क्रियापदे ........................ ९४
- अनियमित क्रियापदे ................... ९५

◆ भावकर्तृक क्रियापदे ................ ९६
◆ करणरूप आणि अकरणरूप .......... ९६
◆ धातुसाधिते (कृदन्ते) ................ ९६
१८. क्रियापदविचार - काळ व अर्थ
(आख्यातविचार) ............ ९९ ते १०२
◆ काळ .................................... ९९
◆ काळांचे उपप्रकार ..................... १००
◆ अपूर्ण काळ ............................ १००
◆ पूर्ण काळ .............................. १००
◆ रीति काळ .............................. १००
१९. क्रियापदविचार-क्रियापदाचे अर्थ व
आख्यातविकार ...............१०३ ते १०८
◆ काळांचे विशेष उपयोग ........... १०३
◆ क्रियापदाचा अर्थ .................... १०४
◆ आख्यातविकार ....................... १०५
◆ धातूंची आख्यातरूपे ................ १०५
२०. क्रियाविशेषण अव्यये ........ १०९ ते ११४
◆ अविकारी आणि विकारी शब्दप्रकार-उजळणी
.............................. १०९
◆ क्रियाविशेषण ......................... १०९
◆ क्रियाविशेषण आणि क्रियाविशेषण अव्यय
यातील फरक .......................... १०९
◆ अर्थमूलक प्रकार ...................... ११०
◆ स्वरूपमूलक प्रकार .................. १११
२१. शब्दयोगी अव्यये ............ ११५ ते ११९
◆ शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये
............................................ ११५
◆ शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये
यातील फरक .......................... ११५
◆ शब्दयोगी अव्ययांचे प्रकार ............ ११६
◆ सामान्यरूपांचा विचार .................. ११७
◆ शुद्ध शब्दयोगी अव्यये ................ ११७
◆ विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यये ..११७
२२. उभयान्वयी अव्यये .......... १२० ते १२४
◆ उभयान्वयी अव्ययांचे प्रकार .......... १२०
◆ प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांचे
पोटप्रकार .............................. १२०
◆ एकच अव्यय, प्रकार मात्र वेगळे ...... १२३
२३. केवलप्रयोगी अव्यये ....... १२५ ते १२७
◆ केवलप्रयोगी अव्ययांचे स्थूल प्रकार .. १२५
◆ व्यर्थ उद्‍गारवाची अव्यय ............ १२६
२४. वाक्यविचार-विभक्तींचे अर्थ
(कारकार्थ व उपपदार्थ) ... १२८ ते १३३
◆ विभक्तींचे अर्थ ............................ १२८
◆ विभक्ती अर्थावरून मानावी की
प्रत्ययावरून? ........................ १२९
◆ उपपदार्थ .................................. १३०
◆ विभक्तीचे अर्थ व शब्दयोगी अव्यये ....१३२
२५. प्रयोग ........................ १३४ ते १४१
◆ 'प्रयोग' म्हणजे काय? ................ १३४
◆ वाक्याचे मूलाधार आणि प्रयोग ....... १३४
◆ कर्ता आणि कर्म ....................... १३४
◆ सकर्मक क्रियापद आणि अकर्मक
क्रियापद .......... १३५
◆ प्रयोगाचे प्रकार ....................... १३५
◆ कर्तरी प्रयोगाची खूण .............. १३६

- कर्मणी प्रयोगाची खूण ............ १३७
- कर्मकर्तरी प्रयोग .......... १३७
- भावकर्तरी प्रयोग .............. १३८

२६. शब्दांचे व्याकरण चालविणे (पदपरिस्फोट) ............. १४२ ते १४७

२७. समास ...................... १४८ ते १५८

- समासाचे प्रकार ........................ १४८
- अव्ययीभाव समास .................. १४८
- तत्पुरुष समास ........................ १४९
- द्वंद्व समास ............................ १५३
- बहुव्रीही समास ...................... १५४

२८. शब्दसिद्धी .................. १५९ ते १६७

- आपल्या भाषेतील शब्दसंपत्ती ........ १५९
- सिद्ध, साधित, उपसर्ग, प्रत्यय ....... १६१
- उपसर्गघटित शब्द .................... १६२
- प्रत्ययघटित शब्द ................. १६३
- शब्दसाधिते किंवा तद्धिते ............ १६४

२९. वाक्यपृथक्करण ............. १६८ ते १७७

- वाक्यांचे विभाग ..................... १६८
- वाक्यांचे प्रकार ...................... १६८
- वाक्यपृथक्करण म्हणजे काय ....... १७०
- केवलवाक्याचे घटक .............. १७१
- केवलवाक्याचे पृथक्करण .......... १७१
- मिश्रवाक्याचे विभाग .............. १७२
- गौणवाक्यांचे प्रकार ............... १७२
- मिश्रवाक्याचे पृथक्करण ........... १७३
- संयुक्त वाक्याचे पृथक्करण ......... १७४

३०. वाक्यसंश्लेषण ............. १७८ ते १८४

- वाक्यसंश्लेषण किंवा वाक्यसंकलन .. १७८
- केवलवाक्य बनविणे .................. १८०
- संयुक्तवाक्य बनविणे ................ १८०
- मिश्रवाक्य बनविणे .................. १८१

३१. वाक्यरूपांतर .............. १८५ ते १९२

३२. वृत्ते .......................... १९३ ते २१२

- गद्य व पद्य यांतील फरक ............ १९३
- गणलेखनाची पद्धत .................. १९७
- वृत्ते ........................................ १९८
- मात्रावृत्ते (जाती) ..................... २०२
- मात्रावृत्ते (जाती) उदाहरणे व लक्षणे ...२०४
  - पद्मावर्तनी समजाती .............. २०४
  - पद्मावर्तनी अर्ध समजाती ........ २०६
  - पद्मावर्तनी विषमजाती ........... २०७
  - भृंगावर्तनी समजाती ............ २०८
- छंद ........................................ २०८
- मुक्तछंद ................................ २१०

३३. भाषेचे अलंकार ............ २१३ ते २२६

- शब्दालंकार ........................ २१३
  - अनुप्रास ........................ २१३
  - यमक ............................ २१४
  - श्लेष ............................ २१४
- अर्थालंकार ........................... २१५
  - उपमा ........................... २१६
  - उत्प्रेक्षा ........................ २१७
  - अपन्हुती ....................... २१७
  - रूपक ........................... २१७
  - व्यतिरेक ....................... २१८
  - अनन्वय ........................ २१८

- भ्रांतिमान ...................... २१९
- ससंदेह ...................... २१९
- अतिशयोक्ती ............... २१९
- दृष्टान्त ...................... २२०
- अर्थान्तरन्यास ............. २२१
- स्वभावोक्ती ................ २२१
- अन्योक्ती .................. २२२
- पर्यायोक्त .................. २२३
- विरोध किंवा विरोधाभास ... २२३
- असंगती .................... २२३
- सार ........................ २२४
- व्याजस्तुती ............... २२४
- व्याजोक्ती ................. २२४
- चेतनगुणोक्ती .............. २२४

३४. शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण .... ............................... २२७ ते २३२

- अभिधा-लक्षणा-व्यंजना ............. २२७
- रस ........................................ २२८
- काव्याचे गुण ........................ २३०

३५. कवितेचे रसग्रहण ........... २३३ ते २४२

- औदुंबर .......................... २३८
- लक्ष्मी .......................... २३९
- माहेरची आठवणं .............. २४०

३६. वाक्प्रचार व म्हणी .......... २४३ ते २५७

- वाक्प्रचार .......................... २४३
- समानार्थी शब्द ..................... २४६
- विरुद्धार्थी शब्द ..................... २४७
- जोडशब्द .......................... २४८
- शब्दसमूहाबद्दल एक शब्द .......... २४९
- म्हणी .................................. २५२

३७. विरामचिन्हे ................. २५८ ते २६२

३८. लेखनविषयक नियमावली .. २६३ ते २७१

- अनुस्वार ................................ २६४
- ऱ्हस्व-दीर्घ .............................. २६४
- सामान्यरूप ............................ २६६
- शब्दलेखनातील सामान्य चुका ....... २६७
- अनुलेखन व श्रुतलेखन ................. २६९

३९. भाषाविषयक कौशल्ये ...... २७२ ते २७८

- श्रवणकौशल्य ......................... २७३
- भाषण-संभाषण कौशल्य ........... २७३
- संभाषण व भाषण ..................... २७४
- वाचनकौशल्य ........................ २७५
- लेखनकौशल्य ........................ २७५
- लेखनकौशल्याची पूर्वतयारी .......... २७६
- प्राथमिक लिपिज्ञान, अंकज्ञान, अक्षरसौंदर्य .......................... २७६
- अन्य महत्त्वपूर्ण कौशल्ये ............. २७६
- अन्य भाषा - परिचय व लेखन ....... २७७
- अनुभवग्रहणाचे महत्त्व ................ २७७
- वाचनाचे महत्त्व ........................ २७७
- लेखनप्रकार परिचय .................... २७७
- पत्रलेखनाचे महत्त्व .................... २७८

# लेखन विभाग


**१. निबंधलेखन ................. २७९ ते ३१९**

- समस्याप्रधान/वैचारिक निबंध ........ २८१
- आत्मवृत्त/मनोगत ........................ २९२
- चरित्रात्मक निबंध ...................... २९८
- कल्पनाविस्तारात्मक निबंध .......... ३०४
- वर्णनात्मक निबंध ...................... ३११
- कल्पनाप्रधानात्मक निबंध ........... ३१५

**२. पत्रलेखन ..................... ३२० ते ३३९**

- तक्रारपत्र ................................ ३२१
- चौकशीपत्र ............................... ३२२
- मागणीपत्र ................................ ३२३
- विनंतीपत्र ................................ ३२४
- अभिनंदन/शुभेच्छापत्र.................. ३२५
- मानपत्र .................................... ३२७
- निमंत्रणपत्र ............................... ३२८
- आभारपत्र ................................. ३२९
- अर्जलेखन ................................. ३३२
- अनौपचारिक पत्र......................... ३३३
- निमंत्रण पत्रिका ........................ ३३४
- कार्यक्रम पत्रिका ....................... ३३७

**३. भाषांतर विभाग ............ ३४० ते ३४५**

- मराठी उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर - नमुना .................................... ३४१
- सरावासाठी उतारे (२) ............... ३४२
- इंग्रजी उताऱ्याचे मराठी भाषांतर - नमुना .................................... ३४४
- सरावासाठी उतारे (२) ............... ३४५

**४. गद्य आकलन (उताऱ्यावरील प्रश्न), सारांश लेखन ३४६ ते ३५५**

- उताऱ्याचे सारांशलेखन, गद्य आकलन .. ३४६
- गद्य आकलन सरावासाठी उतारे (२).. ३५२
- सारांश लेखन (सरावासाठी उतारे २) .. ३५४

**५. संकीर्ण विभाग .............. ३५६ ते ३६५**

- भाषण .................................... ३५६
- संवाद .................................... ३५७
- वृत्तान्तलेखन ............................ ३५८
- मुलाखत ................................. ३५९
- गटचर्चा ................................. ३६१
- प्रसारमाध्यमांसाठी निवेदन .......... ३६३
- अहवाल लेखन ......................... ३६३

**प्रश्नसंग्रह (२०१४, १५ व १६ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारलेल्या प्रश्नांसह).......... ३६४ ते ४३५**

**प्रश्नसंग्रह उत्तरपत्रिका ............. ४३६ ते ४४३**


✦✦✦

# १. आपली भाषा, लिपी व व्याकरण

## भाषा - संवादाचे साधन

आपल्याला एखादी गोष्ट हवी असेल, तर ती गोष्ट आपण मागतो. 'मला पाणी पाहिजे.', 'मला पुस्तक हवे आहे.' असे आपण सांगतो. आपण बोलून दाखवतो किंवा खुणा करून दाखवतो. आपल्या हातांची ओंजळ करून ती ओठांजवळ नेऊन दाखवतो. त्यावरून 'पाणी हवे आहे.' असे आपण सांगतो. मित्राचा निरोप घेताना आपण हात हलवतो. आपल्या मनात अनेक विचार येतात, ते आपण शब्दांनी बोलून दाखवतो. आपल्या मनात अनेक भावना येतात. कधी आपण आपुलकी दाखवतो. कधी आपण रागावतो. अशा भावना आपण शब्दांनी बोलून दाखवतो. आपल्या मनात अनेक कल्पना येतात. त्याही आपण शब्दांतून व्यक्त करतो. आपण एकमेकांशी बोलतो. कधीतरी एखादी व्यक्ती समूहाला उद्देशून बोलते. अशा बोलण्यातून आपल्याला मन मोकळे केल्याचे समाधान मिळते.

पशुपक्ष्यांच्या जगात डोकावले तर काय दिसेल? चिमणी चिवचिव करते. कावळा कावकाव करतो. गाय हंबरते. सिंह गर्जना करतो. घोडा खिंकाळतो. हे पशुपक्षीसुद्धा आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी विविध आवाज काढतात. ती पशुपक्ष्यांची भाषाच असते.

भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन असते.

## भाषेची अभिव्यक्ती

आपल्या मनात विचार येतात, भावना जागृत होतात. त्या दुसऱ्या व्यक्तीला आपण कळवतो, सांगतो. आपल्याला आश्चर्य वाटते, तेव्हा आपण भुवया उंचावतो. आपल्याला नापसंती दाखवायची असते, तेव्हा मान आडवी हलवतो किंवा हात हलवतो. आपल्याला रागवायचे असते, तेव्हा डोळे वटारतो. अशी आपली ही 'हावभावांची भाषा' असते.

भाषा मुख्यतः दोन प्रकारची आहे -

(१) स्वाभाविक किंवा नैसर्गिक.

(२) कृत्रिम किंवा सांकेतिक.

मनुष्यप्राण्याची बोलण्याची भाषा किंवा हावभावाची भाषा यांची गणना नैसर्गिक भाषेत होते. 'भाषा' हा शब्द 'भाष्' या संस्कृत धातूपासून आला असून त्याचा अर्थ 'बोलणे' किंवा 'बोलण्याचा व्यवहार करणे' असा आहे. आपल्या मनातील विचार 'बोलून दाखवणे' हे भाषेचे महत्त्वाचे स्वरूप आहे. तसेच, आपले विचार आपण लिहूनही दाखवतो. 'लिहिण्यासाठी' आपण 'लिपी' वापरतो. लिपीचा शोध लागल्यामुळे 'लेखन' शक्य झाले आहे.

## भाषेचे महत्त्व

भाषा हे संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणारा पूल म्हणजे भाषा होय. आपले विचार, भावना, कल्पना, अर्थच्छटा नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व

आवश्यक असते. हे आपले बोलणे, विचार करणे हे भाषेच्या माध्यमातूनच घडत असते. भाषेचे महत्त्व आपण लक्षात घेतले पाहिजे. भाषेमुळे आपले सर्व जीवनव्यवहार सुरळीत होत असतात. भाजीमंडईतून भाजी आणण्यापासून एखाद्या ग्रंथाच्या अभ्यासापर्यंत भाषा आपल्याला साथ करते. आपल्या विकासासाठी भाषा आपल्याला आयुष्यभर मदत करते. व्यक्तीच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासातही भाषेचे योगदान मोठे आहे. समाजाच्या विकासात अनेक विचारवंत, तत्त्वज्ञ, कवी, लेखक यांचा सहभाग असतो. त्यांचे विचार जतन करण्याचे काम भाषा करते. विविध लहानमोठी कामे करणारी माणसे समाजात असतात. अशा असंख्य माणसांच्या जडणघडणीत भाषेचे योगदान असते. आपली संस्कृती भाषेच्या माध्यमातून विकसित होत असते.

शालेय अभ्यासात किंवा महाविद्यालयीन अभ्यासात विद्यार्थी अनेक विषयांचा अभ्यास करतात. गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, जमाखर्च, पत्रव्यवहार, स्थापत्यशास्त्र, कायदा, न्यायव्यवस्था, औषधशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास भाषेच्याच माध्यमातून आपण करतो. म्हणून भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन भाषेच्या अभ्यासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## मातृभाषा मराठी

आपल्या घरात बोलली जाणारी भाषा म्हणजे मातृभाषा होय. बालपणापासून आई, वडील, आजी, आजोबा, शेजारी यांचे बोलणे आपल्या कानांवर पडत असते. अनेक शब्द, वाक्ये आपण ऐकत असतो. आजूबाजूच्या जगाची ओळख मातृभाषेतून आपल्याला होते. लहान मूल हजारो शब्दांतून या जगाची ओळख करून घेते. आईच्या सहवासातून, आईच्या शब्दोच्चारांतून, तिने म्हटलेल्या गाण्यांतून, संस्कारांतून मुलाची जडणघडण होते. या अर्थाने मातृभाषा आणि बालपण यांचे नाते महत्त्वपूर्ण आहे. हे नाते हळुवार आहे, कोमल आहे, तसेच विचार, भावना, कल्पना यांचे भरणपोषण करणारेही आहे. मराठी आपली मातृभाषा आहे. लहानपणापासून मराठी या आपल्या मातृभाषेचे संस्कार आपल्या कानांवर व मनावर होतात.

महाराष्ट्रात मराठी या मातृभाषेचा वारसा आपल्याला लाभलेला आहे. महाराष्ट्रातील हजारो खेड्यांमधून व शहरांतून मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्राची आणि मराठीची परंपरा समृद्ध आहे. अनेक शेतकरी, कामकरी, आणि व्यावसायिक बांधवांनी ही परंपरा समृद्ध केली आहे. भाषेचे हे महान वैभव आपल्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. यासाठी महाराष्ट्राबद्दल व मराठीबद्दल आपण मनापासून कृतज्ञता बाळगली पाहिजे.

मातृभाषा मराठी व मराठी भाषेचे व्याकरण हा आपला अभ्यासाचा विषय आहे. मराठीवर प्रभुत्व मिळविणे, बिनचूक वाक्यरचना करणे, डोळसपणाने भाषेचा उपयोग करणे हे आवश्यक आहे. तसेच या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासात मराठी या विषयाच्या अभ्यासाबरोबरच मराठी वाङ्मयाच्या वाचनाकडेही लक्ष दिले पाहिजे.

## मराठीविषयी काही...

मराठी भाषा समृद्ध आहे. संस्कृत भाषा ही मराठीची जननी होय. मराठी भाषेतील पहिला शिलालेख कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील श्रीगोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. 'श्री चामुण्डरायें करवियलें' ही शिलालेखातील ओळ म्हणजे मराठीतील पहिले उपलब्ध वाक्य होय. इ. स. ९८३ च्या सुमारास हे वाक्य तिथे कोरले गेले असावे.

मराठी भाषेतील वाङ्मयाला प्रदीर्घ परंपरा आहे. लिखित वाङ्मयाबरोबरच लोकवाङ्मयाचीही परंपरा आहे.

**''माझा मऱ्हाटाचि बोलू कवतिके । परी अमृतातेंही पैजेसी जींके ।**
**ऐसी अक्षरेंची रसिके । मेळवीन ।।''**

अशी प्रतिज्ञा ज्ञानदेवांनी केली आणि ती तडीस नेली. 'विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज, 'श्री ज्ञानदेवी' आणि 'अमृतानुभव' हे अलौकिक ग्रंथ लिहिणारे श्री ज्ञानदेव यांनी मराठी भाषा संपन्न केली. 'लीळाचरित्र' हा आद्य गद्यग्रंथ लिहिणारे म्हाइंभट मराठीतील प्रारंभीच्या काळातील प्रसिद्ध ग्रंथकार होत.

## 'मराठी असे आमुची मायबोली'

असे प्रत्येक मराठीभाषकाने अभिमानाने म्हटले पाहिजे. मराठीतून बोलणे, मराठीतून पत्रव्यवहार करणे, मराठीतून व्यवहार करण्याचा आग्रह धरणे, मराठी वृत्तपत्रे व मराठी ग्रंथ यांचे वाचन करणे, मराठी माध्यमातून शिक्षण घेणे हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. २७ फेब्रुवारी हा ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपली मराठी भाषा आपण बिनचूक बोलणे आवश्यक आहे. तसेच मराठीतून बिनचूक लिहिताही आले पाहिजे. शास्त्रीय ग्रंथ, वैचारिक वाङ्मय, शासकीय पत्रव्यवहार, वृत्तपत्रे, सभासंमेलने, व्याख्याने, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी ठिकाणी जी मराठी भाषा सामान्यपणे वापरली जाते, ती प्रमाणभाषा मानली जाते. मराठी मातृभाषा असलेले आपले बांधव मराठीची कोणतीतरी बोली बोलत असतात. आदिवासी किंवा डोंगराळ भागांत बोलली जाणारी मराठीची बोली खूपच निराळी असते. त्या सर्व मराठी भाषेच्याच बोली आहेत. या बोलीभाषाही प्रमाणभाषेइतक्याच महत्त्वाच्या आहेत. त्या प्रमाणभाषेपेक्षा वेगळ्या आहेत, मात्र त्या कमी प्रतीच्या नाहीत. आपण त्याही बोली ऐकल्या पाहिजेत, समजूनही घेतल्या पाहिजेत. अशा बोलीभाषांचा उपयोग करून निर्माण झालेले साहित्यही वाचले पाहिजे.

## आपली भाषा आपली लिपी

आपल्या मनातील विचार आपण बोलून दाखवतो, तसेच लिहूनही दाखवतो. लिपीचा शोध लागल्याने आपल्याला लेखन शक्य झाले आहे. त्यामुळेच महान ग्रंथ वाचणे आज आपल्याला शक्य होत आहे. मराठी ही आपली भाषा आहे. आपण जी लिपी वापरतो, तिचे नाव 'देवनागरी लिपी' आहे. 'बाळबोध लिपी' असेही तिला म्हणतात.

आपली ही देवनागरी लिपी उभ्या, आडव्या, तिरप्या, गोलसर अशा रेषांनी बनलेली आहे. लिहिणाऱ्याच्या डावीकडून उजवीकडे तिचे लेखन होते. आपण ओळ लिहितो. तिचा प्रारंभ डावीकडे होतो आणि अखेर उजवीकडे होते. एक ओळ लिहून झाली की दुसरी ओळ आपण त्या ओळीच्या खाली लिहितो. शब्द लिहून झाल्यावर त्यावर शिरोरेघा देण्याची पद्धत आहे.

ज्या लिपीत प्रत्येक ध्वनी स्वतंत्र चिन्हाने म्हणजे वर्णाने दाखविला जातो व कोणत्याही वर्णाला एकापेक्षा जास्त ध्वनी नसतात, ती आदर्श लिपी. त्या दृष्टीने पाहता इतर लिपींपेक्षा आपली देवनागरी लिपी पुष्कळशी पूर्ण आहे. पुष्कळशी म्हणण्याचे कारण यातील 'इ' व 'उ' हे दोन स्वर सोडले, तर इतर स्वरांचे दीर्घ उच्चार दाखविण्याची सोय नाही. शिवाय च, ज, झ हे वर्ण दोन तऱ्हांनी उच्चारले जातात. हे दोष सोडले, तर देवनागरी लिपीत बहुतेक ध्वनींना स्वतंत्र वर्ण आहेत.

आपण देवनागरी लिपीचा चांगला सराव केला पाहिजे. तसेच देवनागरी लिपीचे सौंदर्य आत्मसात केले पाहिजे. आपण मराठीत जे लिहितो, ते चांगले वाचता आले पाहिजे. आपले अक्षर सुंदर असले पाहिजे. आपल्याला वेगाने वाचता आले पाहिजे. वाचलेले समजले पाहिजे. वेगाने व सुंदर अक्षरात लिहिता आले

पाहिजे. आपले लेखन बिनचूक असले पाहिजे. दोन शब्दांत अंतर ठेवणे, विरामचिन्हांचा योग्य रितीने उपयोग करणे, परिच्छेदरचना करणे या गोष्टींचे भान ठेवून लेखन करता आले पाहिजे.

## आपण भाषा कशी शिकतो?

आपण भाषा शिकतो तरी कशी? आपल्या कानांवर लहानपणापासून अनेक शब्द, वाक्ये पडत असतात. ते आपण ऐकतो. त्या शब्दांचे आणि वाक्यांचे अनुकरण करून आपण बोलतो. तसेच आपण एकमेकांशी बोलतो. काही अक्षरे, शब्द, वाक्ये पाहतो. त्यांचे आकार, अर्थ लक्षात घेऊन त्यांचा उच्चार करू लागतो. आपले वाचन असे सुरू होते. त्या अक्षरांप्रमाणे आपण लिहू लागतो. आपल्या मनातील विचार लिहू लागतो. अशा साऱ्या कौशल्यांवर आपण प्रभुत्व मिळवीत जातो. श्रवणकौशल्य म्हणजे ऐकणे, भाषण-संभाषणकौशल्य म्हणजे बोलणे, वाचनकौशल्य म्हणजे आपल्यासमोरील मजकूर वाचणे, लेखनकौशल्य म्हणजे सुंदर, सुवाच्य अक्षरात लिहिणे. अशा कौशल्यांवर प्रभुत्व मिळवीत आपले भाषाशिक्षण सुरू असते.

## गौरव मराठीचा

मराठी असे आमुची मायबोली
जरी आज ती राजभाषा नसे
नसो आज ऐश्वर्य या माऊलीला
यशाची पुढे दिव्य आशा असे
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू
वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरी
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे
हिला बैसवू वैभवाच्या शिरी.
हिच्या लक्तरांची असे लाज आम्हा,
नका फक्त पाहू हिच्या लक्तरा
प्रभावी फिकी ज्यापुढे अप्सरा
न घालू जरी वाङ्मयातील जुन्यी
हिरेमोतियांचे हिला दागिने
'मराठी असे आमुची मायबोली' वृथा ही
बढाई सुकार्याविणे

- माधव जूलियन

गीत मराठ्यांचे हे श्रवणी मुखी असो
स्फूर्ती दीप्ति धृतिही देत अंतरी ठसो
वचनिं लेखनीहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र धर्म मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणि ही असे स्पृह ।

- श्री. कृ. कोल्हटकर

माझी मराठी असे मायभाषा
हिच्या किर्तीचे तेज लोकी चढे
गोडी न राहे सुधेमाजि आता,
पळाली [illegible] स्वर्गलोकांकडे
[illegible] कळी कोवळी ही
[illegible] होतील हेमाद्रिला
[illegible] प्रीति निर्मिल माझी
मराठीच [illegible]नि क्रांतिला
आम्ही मराठे हिचे पुत्र लोकी
[illegible], मुळी ना कुणा
आकंठ प्यालो हिचे दुध
अंगी पहा रोमरोमांतुनी या खुणा
[illegible] येती
[illegible] शरीरातुनी
माझी मराठी [illegible]
असे [illegible]

- नारायण गोविंद नांदापूरकर

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

- सुरेश भट

परभाषेतही व्हा पारंगत
ज्ञानसाधना करा, तरी।
माय मराठी मरते इकडे परकीचे
पद चेपु नका।।
भाषा मरता देशही मरतो
संस्कृतिचाही दिवा विझे।
गुलाम भाषक होऊनि
अपुल्या प्रगतीचे शिर कापु नका।।

- कुसुमाग्रज

**मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या काही कविता व उतारे पुढे दिले आहेत. ते वाचा आणि त्यांचा अभ्यास करा.**

''पृथ्वीवरील संपन्न व समर्थ भाषांपैकी मराठी ही एक आहे. तिची प्राचीन काव्यसंपत्ती अलौकिक आहे व हेच तिच्या श्रीमंतीचे आद्य कारण आहे. गद्य संपत्ती तिची यथातथाच आहे. संतमंडळींनी वैराग्याचा धगधगीत अग्नी पेटवून धर्मबुद्धी जागृत केली. हे महत्कार्य त्यांनी मायभाषेच्या आश्रयाने केले. लोकव्यवहाराचा बहुतेक प्रांत यवनाक्रांत झाल्यावर ही धर्मसंरक्षणार्थ 'आटी' करणाऱ्या संतमहंतांनी 'मराठी बोला'चे अमृत वर्षून मराठी घरांचे, भाषेचे व राष्ट्राचे परिरक्षण केले. तेच ते आम्हा मराठ्यांचे अलौकिक पद्य सारस्वत!''

**- महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार (१९२२)**

''आता भाषा अनेक आहेत, परंतु ज्या भाषेत आपला जन्म झाला, जी आपली आई-बाप, इष्टमित्र आदी हजारो वर्षे बोलत आले व जिच्याद्वारे आपण आपले नित्यव्यवहार चालवतो, त्या महाराष्ट्र भाषेचा द्वेष करता कामा नये. तिचे भाषण आपणाला सहज समजते. प्रसंगानुरोधाने ती प्रौढ, कठोर, कोमल, कठीण, भारदस्त व चंचल स्वरूप धारण करण्यासारखी आहे. इतर भाषांप्रमाणे तिलाही आपले विचार यथास्थित प्रकट करता येतात. तेव्हा आपले एकमेकांचे विचार ह्या आपल्या मायभाषेच्या द्वारे आपल्याला सर्वोत्कृष्ट समजतील, हे निर्विवाद आहे. देशाचा, धर्माचा व आचारांचा खरा अभिमान जागृत राहण्यास बोलणे, चालणे, लिहिणे, शिकणे व विचार करणे मराठीत झाले पाहिजे. त्याशिवाय कर्तव्याचा पक्का व कायमचा ठसा आपल्या मनावर उमटावयाचा नाही.''

**- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे (१८९४)**

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **भाषा म्हणजे .................. चे साधन होय.** ①②③④
   1) वागण्या  2) संवादा
   3) खाणाखुणा  4) माध्यमा

2) **भाष् या संस्कृत धातूचा अर्थ कोणता?** ①②③④
   1) भाषा  2) भाषण
   3) बोलणे  4) भाष्

3) **मातृभाषा म्हणजे काय?** ①②③④
   1) आपल्या कुटुंबात बोलली जाणारी भाषा
   2) आपल्या गावात बोलली जाणारी भाषा
   3) आपल्या शहरात बोलली जाणारी भाषा
   4) बाहेर बोलली जाणारी भाषा

4) **म्हाइंभटांनी कोणता ग्रंथ लिहिला?** ①②③④
   1) लीळाचरित्र  2) ज्ञानेश्वरी
   3) विवेकसिंधू  4) ज्ञानदेवी

5) **आद्यकवी मुकुंदराज यांचा पुढीलपैकी कोणता ग्रंथ आहे?** ①②③④
   1) लीळाचरित्र  2) विवेकसिंधु
   3) दृष्टांतपाठ  4) ज्ञानेश्वरी

6) **महाराष्ट्राची राजभाषा कोणती आहे?** ①②③④
   1) कानडी  2) कोकणी
   3) संस्कृत  4) मराठी

7) **वि. वा. शिरवाडकरांचे टोपणनाव कोणते?** ①②③④
   1) कुसुमाग्रज  2) गोविंदाग्रज
   3) यशवंत  4) विंदा

8) **कोणता दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो?** ①②③④
   1) १२ डिसेंबर  2) ८ नोव्हेंबर
   3) २७ फेब्रुवारी  4) १२ मार्च

9) **मराठी भाषेत कोणती लिपी वापरली जाते?** ①②③④
   1) प्राकृत  2) देवनागरी

3) बंगाली 4) हिंदी

**10) मराठी भाषेत वापरल्या जाणाऱ्या..........** ①②③④

अ) देवनागरी लिपीलाच 'बाळबोध लिपी' असे म्हणतात

ब) देवनागरी लिपी ही उभ्या, आडव्या, तिरप्या, गोलसर रेषांनी बनली आहे.

क) देवनागरी लिपीचे लेखन डावीकडून उजवीकडे होते

ड) देवनागरी आदर्श लिपी आहे

1) १, २ विधान बरोबर 2) ३, ४ विधान बरोबर

3) १, ४ विधान बरोबर 4) सर्व विधाने बरोबर

**11) देवनागरी लिपीत शब्दाच्या वरती रेषा मारतात त्यांना ..... म्हणतात?** ①②③④

1) शिरोरेघा 2) रेषा

3) रेफ 4) रेषाबिंदू

**12) 'मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे....' हे गौरव बोल शब्दबद्ध करणारे कोण?** ①②③④

1) मोरोपंत 2) संत ज्ञानेश्वर

3) व्यासमुनी 4) माधव जूलियन

**13) 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गौरव उद्गार काढणारे कवी कोण?** ①②③④

1) प्र. के. अत्रे 2) सुरेश भट

3) बा. भ. बोरकर 4) संत एकनाथ

**14) खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?** ①②③④

अ) देवनागरी लिपी डावीकडून उजवीकडे लिहितात

ब) लिपीच्या शोधामुळे लेखन शक्य झाले आहे

क) काही काळ देवनागरी लिपी मुरड घालून लिहिण्याची पद्धत होती.

ड) आपण ज्या खुणांनी लेखन करतो त्यांना लिपी असे म्हणतात.

1) विधान 'अ' व 'ब' बरोबर

2) विधान 'क' व 'ड' बरोबर

3) विधान 'अ','ब''क' बरोबर

4) सर्व बरोबर

**15) देवनागरी लिपी आदर्श मानण्याचे कारण.....** ①②③④

अ) देवनागरी लिपीत वर्णाला स्वतंत्र चिन्हाने दाखवता येत नाही

ब) देवनागरी लिपीत एका वर्णाला दोन स्वतंत्र चिन्हे नसतात

क) देवनागरी लिपीत उच्चारण्यात येणारा प्रत्येक ध्वनी स्वतंत्र चिन्हाने दाखविता येतो

ड) देवनागरी लिपीत चांगली लिहिली जाते

1) विधान 'ड' 2) विधान 'क'

3) विधान 'ब' 4) विधान 'अ'

**16) देवनागरी लिपीत आपण पुढीलपैकी कोणत्या भाषांचे लेखन करू शकतो?** ①②③④

1) मराठी, हिंदी, उर्दू 2) इंग्रजी, संस्कृत

3) मराठी, हिंदी, संस्कृत 4) उर्दू

**17) 'लिप' या धातूचा अर्थ होतो .......?** ①②③④

1) लिप 2) लिंपणे

3) लिपा 4) कोणताच नाही

**18) आदर्श लिपी कोणती मानतात?** ①②③④

**1) प्रत्येक ध्वनी स्वतंत्र चिन्हाने (वर्णाने दाखवितात.)**

**2) कोणत्याही वर्णाला एकापेक्षा जास्त ध्वनी नसतात.**

**3) ज्या लिपीत स्वर जास्त असतात.**

**4) ज्या लिपीत व्यंजने असतात.**

1) विधान ४ बरोबर 2) विधान १,२ बरोबर

3) विधान ३ बरोबर 4) सर्व बरोबर

▶▶ सराव प्रश्नसंग्रह 1 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 3 | 3) 1 | 4) 1 | 5) 2 |
| 6) 4 | 7) 1 | 8) 3 | 9) 2 | 10) 4 |
| 11) 1 | 12) 4 | 13) 2 | 14) 4 | 15) 2 |
| 16) 3 | 17) 2 | 18) 2 | | |

# २. व्याकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व

आपले विचार, भावना इतरांना कळावेत म्हणून आपण ते भाषेच्या माध्यमातून सांगतो किंवा लिहून कळवतो. आपले विचार इतरांना जसे कळले पाहिजेत, तसेच इतरांचेही विचार आपल्याला कळले पाहिजेत. त्यासाठी आपली भाषा विशिष्ट पद्धतीने बोलली गेली पाहिजे, तशीच ती लिहिली गेली पाहिजे. त्यासाठीच भाषेचा उपयोग बिनचूक होणे आवश्यक आहे.

भाषेचे महत्त्व समजून घेतले की, भाषेच्या बिनचूकपणाचे महत्त्वही लक्षात येते. 'मराठी- घटना, रचना, परंपरा' या ग्रंथात भाषेचे महत्त्व सांगताना म्हटले आहे, 'भाषा ही मानवाची निर्मिती आहे. माती निर्मिली देवाने; पण तीतून घडा निर्मिला तो मानवाने. कापूस ही दैवी सृष्टी; पण कापड ही मानवी सृष्टी होय. शिला ही निसर्गाची करणी; पण मूर्ती ही मानवाची. तद्वतच निसर्गदत्त ध्वनीला स्वरेंद्रियांच्या विविध संयोगांनी व क्रियांनी नियमित आणि वैविध्यमय असे स्वरूप देऊन मानवाने प्रथम वर्णमय रचनासामग्री मांडिली, आणि शतकानुशतकांच्या प्रयत्नांनी तीतून भाषेचे मंदिर उभारिले. मनातील भाव मुखावाटे प्रकट करण्याचे भाषा हे अत्यंत प्रभावी साधन होय. ते हाती येताच मानवी जीवन इतर प्राणिवर्गाच्या अपेक्षेने कमालीचे सुधारले, पुढारले, परिणत झाले, वैचित्र्याने विनटले, समृद्ध झाले. भाषा ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक बनली, म्हणूनच मनू म्हणतो, 'वाच्यर्था नियताः सर्वे' - आपल्या जीवनातील सारे व्यवहार भाषेवर अवलंबून आहेत.' (**'मराठी - घटना, रचना, परंपरा' - अरविंद मंगरूळकर, कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर - पृष्ठ १**)

## व्याकरण व त्याची आवश्यकता

भाषेचा उपयोग करताना जर चुका झाल्या, तर त्या आपल्याला खटकतात. उदा. 'त्याने ग्रंथ वाचला.', 'त्याने पुस्तक वाचले.', अशा ठरावीक पद्धतीनेच आपण बोलायला हवे. त्याऐवजी 'तो पुस्तक वाचला.', 'त्याने ग्रंथ वाचतो.' अशा पद्धतीने जर आपण बोललो, तर ते चुकीचे ठरते.

भाषेची देवाणघेवाण म्हणजे भाषेचा व्यवहार व्यवस्थित रीतीने चालावा, यासाठी काही नियम ठरविण्यात आले आहेत. या नियमांनाच **व्याकरण** असे म्हणतात.

भाषेच्या रचनेचे नियम आपल्या अगदी अंगवळणी पडलेले असतात. भाषा आपण लहानपणापासून सहजपणे बोलायला शिकतो. भाषेच्या रचनेचे नियम लक्षात ठेवून बोलायचे असते, हेही आपल्याला जाणवत नाही. जर कोणी बोलण्यात व्याकरणाच्या दृष्टीने चूक केली, तर आपण दुरुस्त करतो. याचाच अर्थ आपल्याला नियम माहिती असतात. 'नियम' हा शब्द माहिती नसेल, तरी आपण अशी दुरुस्ती करतो. उदा. ती म्हणाली, ''मी जातो.'', तर आपण दुरुस्ती करून सांगू की, ती म्हणाली, ''मी जाते.'' भाषेच्या अंगभूत नियमांची अशी व्यवस्था म्हणजेच भाषेचे **व्याकरण** होय.

'व्याकरण म्हणजे भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र होय.' व्याकरण हा शब्द 'वि + आ + कृ (= करण)' यांपासून बनला आहे. याचा शब्दशः अर्थ 'स्पष्टीकरण' असा आहे. 'भाषेचे व्यवहार ज्या नियमांनी ठरविले जातात, ते नियम स्पष्ट करणारे शास्त्र म्हणजे **व्याकरण** होय.' असे श्रीपाद भागवत यांनी म्हटले आहे.

भाषेचे नियम अंगवळणी पडलेले असतात, हे जितके खरे आहे; तितकेच त्या नियमांची माहिती करून घेणे, त्या नियमांनुसार भाषेचा उपयोग करणे हेही आवश्यक आहे.

आपल्याला जे विचार व्यक्त करावयाचे आहेत, ते नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास आवश्यक आहे. सामान्यपणे, नियम, व्याख्या, उदाहरणे, स्पष्टीकरण इत्यादी भाग आपल्याला कंटाळवाणा वाटतो, नकोसा वाटतो. तरीही व्याकरणाचा अभ्यास हा आपल्या दैनंदिन वापरात असलेल्या भाषेचा अभ्यास असतो. आपल्याला दुसरी भाषा शिकावयाची असेल, तर आपली भाषा म्हणजे मातृभाषा चांगली यावी लागते. आपल्या भाषेचे व्याकरण व आपली भाषा चांगली असली की दुसरी भाषा समजून घेणे सोपे जाते.

आपल्या भाषेवर जसे आपले प्रेम असावे, तसेच आपल्या भाषेच्या व्याकरणावरही आपले प्रेम असावे.

व्याकरणाचा अभ्यास म्हणजे 'लेखी भाषेचा' किंवा 'लेखन-स्वरूपातील भाषेचा' व त्या भाषेच्या नियमांचा अभ्यास नाही; तर आपले बोलणे, आपले स्पष्टीकरण कौशल्य, भाषण कौशल्य यासाठीही व्याकरण आपल्याला उपयुक्त ठरते. उच्चारांतील बिनचूकपणा, नेमकेपणा, वाक्यातील शब्दांचा बिनचूक क्रम हे व्याकरणाच्या अभ्यासामुळे आपल्याला येऊ लागतात; म्हणून 'व्याकरण' हा विषय विद्यार्थिदशेतच नव्हे, तर आजीवन आपल्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय होणे आवश्यक आहे.

## भाषा व व्याकरण परस्परसंबंध

भाषा ही प्रथम माणसांच्या बोलण्यातून, व्यवहारांतून विकसित झाली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तिचा प्रवास झाला. शब्दसंपत्तीची भर पडत गेली. अनेक वर्षांच्या उपयोगाने तिला एक व्यवस्थित रूप प्राप्त झाले. व्याकरण हे भाषेच्या विकासानंतर साकार होत गेले.

व्याकरणकारांनी शब्दांची रूपे पाहिली. त्या शब्दांची वाक्यांतील बदलती रूपे पाहिली. शब्दांची वर्गीकरणे केली. अनेक वाक्यांच्या निरीक्षणांतून काही महत्त्वपूर्ण नियम निर्माण केले. व्याकरणकारांनी नियमांनी युक्त अशा व्यवस्थेचे स्वरूप भाषेला प्राप्त करून दिले. त्या नियमांची शास्त्रीयदृष्ट्या सुव्यवस्थित मांडणी केली. भाषा विकसित होत असताना व्याकरण विकसित होते; हे लक्षात घेऊन भाषेच्या नियमांची रचना केली. महर्षी पतंजलींनी व्याकरणाला 'शब्दानुशासन' असे नाव दिलेले आहे. अनुशासन म्हणजे नियमन, शिस्त. आपल्या भाषेतील शब्दांतील वर्ण, त्यांचे उच्चार, शब्दसिद्धी, वाक्यरचना, वाक्यातील पदांचे-शब्दांचे परस्परसंबंध इत्यादी बाबतींत नियम घालून देणारे शास्त्र म्हणजे व्याकरण. व्याकरण हे भाषेचे रचनास्वरूप आदर्श कसे असावेत, हे प्रतिपादन करणारे शास्त्र आहे.

भाषा आधी आणि व्याकरण नंतर असा याचा अर्थ नाही. कारण भाषा ही तिच्या नियमांसह निर्माण होते, विकसित होत असते. त्या नियमांना व्यवस्थेचे स्वरूप व्याकरणाने प्राप्त होते.

भाषा आणि व्याकरण हे परस्परांपासून वेगळे करता येतच नाहीत. ते 'परस्परांमध्ये' व 'परस्परांवर अवलंबून असणारे' असतात.

भाषा एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे असते. भाषेचा प्रवाह अखंड चालू असतो. नदी ज्याप्रमाणे अनेक वळणांनी वाहत असते, त्याप्रमाणे भाषेच्या प्रवाहातही अशी वळणे असतात. भाषेमध्ये बदल होत जातात. भाषास्वरूपात बदल होत जाणे हे भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण असते. भाषा ही स्थलकालानुरूप बदलत जाते. त्यातूनच भाषेच्या विकासाचे टप्पे किंवा प्रदेशानुसार बोलींचे स्वरूप प्रकट होत जाते. त्यानुसार व्याकरणशास्त्र भाषारूपांचा अभ्यास करते. भाषेच्या या विविध बदलांपुढे व्याकरणाला शरणागती पत्करावी लागते, नियमांना मुरड घालावी लागते.

आपण जे बोलतो किंवा लिहितो ते नीटनेटके, व्यवस्थित, आकर्षक व बिनचूक असायला हवे. त्यासाठी व्याकरणाचा अभ्यास आवश्यक आहे.

## व्याकरणाचा अभ्यासविषय

भाषेची घडण समजून घेताना प्रथम लक्षात येते की, भाषा वाक्यांनी बनते, वाक्ये शब्दांनी बनतात आणि शब्द वर्णांनी बनतात.

स्वाभाविकपणे व्याकरणाच्या अभ्यासाचे : (१) वर्णविचार, (२) शब्दविचार व (३) वाक्यविचार असे घटक आहेत.

गद्याप्रमाणे पद्य हेही भाषेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. पद्याच्या संदर्भात वृत्ते, अलंकार, शब्दशक्ती, कवितेचे रसग्रहण हे घटक महत्त्वपूर्ण ठरतात. तसेच, वाक्प्रचार व म्हणी हाही भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण अलंकार आहे. त्याही घटकांचा समावेश आपल्या अभ्यासात आहे.

व्याकरणाचा अभ्यास ज्याप्रमाणे महत्त्वाचा असतो, तसाच लेखनाचाही! लेखनविभागात आपण निबंधलेखन, पत्रलेखन, भाषांतर, सारांशलेखन याचबरोबर संवादलेखन, मुलाखत अशा काही लेखनप्रकारांचाही अभ्यास करणार आहोत.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **भाषेचे नियम म्हणजेच भाषेचे ............ होय?** ①②③④

1) वर्ण 2) लिपी
3) व्याकरण 4) वर्णमाला

2) **व्याकरणाच्या बाबतीत अयोग्य विधान ओळखा.** ①②③④

अ) भाषेचे नियम म्हणजे व्याकरण
ब) भाषेचे नियम स्पष्ट करणारे शास्त्र म्हणजे व्याकरण
क) व्याकरण म्हणजे शब्दानुशासन
ड) व्याकरण म्हणजे भाषा

1) विधान 'अ' व 'क' 2) विधान 'अ' व 'ब'
3) विधान 'अ' व 'ड' 4) विधान 'ड'

3) **भाषेच्या बाबतीत योग्य विधाने ओळखा:** ①②③④

अ) भाषा नदीच्या प्रवाहासारखी असते
ब) भाषेच्या प्रवाहातही अनेक वळणे असतात
क) भाषेत बदल होत जातात
ड) भाषा ही स्थलकालानुरूप बदलत आहे

1) विधान 'अ' व 'ब' 2) विधान 'ब' व 'क'
3) विधान 'अ' व 'क' 4) सर्व विधाने

4) **गद्याप्रमाणेच दुसरे भाषेचे महत्त्वपूर्ण अंग कोणते?** ①②③④

1) भाषांतर 2) पद्य
3) लिपी 4) संवाद

5) **भाषा हे विचार व्यक्त करण्याचे ...... आहे?** ①②③④

1) व्याकरण 2) माध्यम 3) वर्णन 4) पद्धती

6) **भाषा ही ......... असावी?** ①②③④

1) अशुद्ध 2) चुकीची
3) आदर्श 4) अविकसित

7) **'बोली भाषेला स्वतंत्र लिपी नसते व मोठ्या समूहाचा व्यवहार प्रमाणभाषेत चालतो.' हे विधान बरोबर की चूक आहे.** ①②③④

1) पूर्ण विधान बरोबर 2) पूर्ण विधान चूक
3) पूर्वार्ध बरोबर 4) उत्तरार्ध बरोबर

▸▸ **सराव प्रश्नसंग्रह 2 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 4 | 3) 4 | 4) 2 | 5) 2 |
| 6) 3 | 7) 1 | | | |

# ३. वर्णविचार - १

खालील वाक्य वाचा.

मुलांनी खरे बोलावे.

हे एक वाक्य आहे. कोणताही विचार पूर्ण अर्थाचा असला की त्याला 'वाक्य' असे म्हणतात. एका किंवा अनेक शब्दांच्या समुच्चयाने आपला विचार आपण पूर्ण करतो. **वाक्य म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे** होय.

वरील वाक्यात तीन शब्द आहेत - (१) मुलांनी (२) खरे (३) बोलावे असे हे तीन शब्द आहेत. वाक्यातील शब्दांना **पद** असे म्हणतात. वाक्य असे शब्दांनी किंवा पदांनी बनलेले असते.

'मुलांनी' या शब्दात तीन अक्षरे आहेत - (१) मु (२) लां (२) नी अशी ही तीन अक्षरे आहेत. विशिष्ट क्रमाने असलेल्या तीन अक्षरांच्या या समूहाला काही अर्थ आहे. **ठरावीक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहाला काही अर्थ प्राप्त झाला, तर त्याला शब्द असे म्हणतात.** शब्द हे अक्षरांनी बनलेले असतात.

'मुलांनी' या शब्दाचा उच्चार करताना (१) मु, (२) लां, (३) नी हे तीन ध्वनी आपल्या तोंडून बाहेर पडतात. हे तीन ध्वनी 'मु, लां, नी' अशा तीन खुणांनी आपण लिहून दाखवतो. त्यांना आपण अक्षरे असे म्हणतो. **अक्षरे या आपल्या ध्वनीच्या किंवा आवाजाच्या खुणा आहेत,** म्हणून अक्षरांना **ध्वनिचिन्हे** असे म्हणतात.

'मुलांनी' या शब्दात 'मु' हे अक्षर आहे. ते एक ध्वनिचिन्ह आहे. 'मु' हा एक ध्वनी वाटत असला, तरी तो मूलध्वनी नाही. 'म्' व 'उ' असे दोन मूलध्वनी एकत्र आलेले आपल्याला आढळतील. 'म्' व 'उ' हे दोन मूलध्वनी आहेत.

**आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण वर्ण असे म्हणतो.** हे ध्वनी हवेत विरतात व नाहीसे होतात. ते नष्ट होऊ नयेत म्हणून आपण लिहून ठेवतो. (आपण ते 'रंगाने' म्हणजे 'वर्णाने' लिहून ठेवतो, म्हणून त्यांना **वर्ण** असे म्हणतो.) लिहून ठेवल्यामुळे हे ध्वनी नाश पावत नाहीत. ते कायम राहतात, म्हणून त्यांना **अक्षर (अ - क्षर म्हणजे नाश न पावणारे) असे म्हणतात.**

## वर्णमाला

मराठी भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे आहे -

| | |
|---|---|
| स्वर : - | अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ ए ॲ ऐ ओ ऑ औ |
| स्वरादी : - | ं (अं) ः (अः) |
| व्यंजने :- | क् ख् ग् घ् ङ् |
| | च् छ् ज् झ् ञ् |
| | ट् ठ् ड् ढ् ण् |
| | त् थ् द् ध् न् |
| | प् फ् ब् भ् म् |
| | य् र् ल् व् |
| | श् ष् स् |
| | ह् ळ् |
| संयुक्त व्यंजने :- | क्ष् ज्ञ् |

* इंग्रजी भाषेचा संपर्क आल्यानंतर त्या भाषेचा प्रभाव आपल्या भाषेवर पडला. काही इंग्रजी शब्द मराठी भाषेत आले आणि रुळून गेले. उदा. बॅट, बॉल, ऑफिस, बॅग, ऑगस्ट, ऑक्टोबर, फॅशन इत्यादी. वर्ष २००९च्या शासन निर्णयानुसार 'अॅ' व 'ऑ' हे दोन स्वर वर्णमालेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

## वर्णांचे प्रकार

**(१) स्वर -** स्वृ - म्हणजे उच्चार करणे, ध्वनी करणे. या वर्णमालेतील 'अ'पासून 'औ'पर्यंतच्या बारा वर्णांना स्वर असे म्हणतात.

स्वरांचा उच्चार करताना ओठांच्या किंवा जिभेच्या विविध हालचाली होत असतात. पण ओठांचा एकमेकांशी किंवा जिभेच्या कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात, त्यांना 'स्वर' असे म्हणतात. स्वरांचा उच्चार आपल्या तोंडावाटे सहज व स्वतंत्रपणे होतो. स्वतंत्रपणे म्हणजे दुसऱ्या कोणत्याही वर्णाच्या साहाय्यावाचून होतो. स्वरांचा उच्चार करताना आपले तोंड उघडे व पसरलेले (म्हणजेच विवृत असते, म्हणजे स्वरोच्चाराच्या वेळी हवेचा मार्ग अडवलेला नसतो. स्वर म्हणजे नुसते सूर.

**(२) स्वरादी -** 'अं' व 'अः' या दोन वर्णांना स्वरादी असे म्हणतात. यात अनुस्वार (ं) व विसर्ग (:) असे दोन उच्चार आहेत. अनुस्वार व विसर्ग यांचा उच्चार करताना या वर्णांच्या अगोदर स्वर येतो, म्हणून त्यांना **स्वरादी** असे म्हणतात.

स्वरादी म्हणजे 'स्वर आहे आदी म्हणजे आरंभी ज्याच्या असा' वर्ण.

**उदा. -** 'अंगण' या शब्दात अ + अनुस्वार = अं

'शंकर' या शब्दात श् + अ + अनुस्वार = शं

'किंकर' या शब्दात क् + इ + अनुस्वार = किं

'मनःस्थिती' या शब्दात न् + अ + विसर्ग = नः

'दुःख' या शब्दात द् + उ + विसर्ग = दुः

**अनुस्वार -** अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट व खणखणीत होतो असे काही शब्द आहेत. उदा. गंगा, घंटा, आंबा, उंट, इंधन इत्यादी. काही वेळा अनुस्वाराचा उच्चार अस्पष्ट, ओझरता होतो. उदा. हं, देवांनी, घरांमध्ये. स्पष्ट व खणखणीत उच्चारांना अनुस्वार असे म्हणतात, तर ओझरत्या, अन् अस्पष्ट उच्चारांना अनुनासिक असे म्हणतात.

**विसर्ग -** विसर्ग याचा अर्थ श्वास सोडणे होय. विसर्गाचा उच्चार 'ह्' या वर्णाला थोडा हिसडा देऊन केलेल्या उच्चारासारखा आहे.

**(३) व्यंजन -** मराठी वर्णमालेतील 'क्, ख्....पासून ह्, ळ्' पर्यंतचे वर्ण व्यंजने आहेत. ज्यांचा स्वतंत्रपणे उच्चार करता येत नाही, त्यांना व्यंजने म्हणतात. व्यंजने अपूर्ण उच्चाराची आहेत, हे दाखविण्यासाठी त्यांचा पाय मोडून लिहितात. आपण जेव्हा क, ख, ग असा उच्चार करतो, तेव्हा त्यात 'अ' हा स्वर मिसळून आपण त्यांचा उच्चार करतो. उदा. क् + अ = क. याचा अर्थ ज्या वर्णांचा उच्चार स्वरांच्या साहाय्यावाचून पूर्ण होत नाही, त्यांना व्यंजने म्हणतात.

**अक्षरे -** अक्षरे म्हणजे पूर्ण उच्चारलेले वर्ण. अ, आ, इ, ई वगैरे स्वर पूर्ण उच्चारांचे आहेत.

क्, ख्, ग्, घ् ही व्यंजने अपूर्ण उच्चारांची आहेत. त्यात अ मिसळून क, ख, ग, घ ही अक्षरे होतात. सर्व स्वर व स्वरयुक्त व्यंजने यांना अक्षरे म्हणतात.

**बाराखडी -** व्यंजनात स्वर मिळवून अक्षर बनते. प्रत्येक व्यंजनात अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ हे दहा स्वर व अं, अः यांची चिन्हे मिळवून आपण बारा अक्षरे तयार करतो. त्यांना आपण 'बाराक्षरी' किंवा 'बाराखडी' असे म्हणतो. उदा.

| वर्ण | अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चिन्ह | | ा | ि | ी | ु | ू | े | ै | ो | ौ | ं | ः |
| बाराखडी | क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | कः |

## स्वरांचे प्रकार

**(१) ऱ्हस्व स्वर व दीर्घ स्वर -** स्वरांचा उच्चार करताना लक्षात येते की, अ, इ, उ, ऋ, ऌ या स्वरांचा उच्चार आखूड होतो. त्यांचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो, म्हणून त्यांना **ऱ्हस्व स्वर** असे म्हणतात. आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ या स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ लागतो. त्यांचा उच्चार लांबट होतो, म्हणून त्यांना **दीर्घ स्वर** असे म्हणतात.

**(२) संयुक्त स्वर -** दोन स्वर एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना **संयुक्त स्वर** असे म्हणतात. ए, ऐ, ओ, औ हे संयुक्त स्वर आहेत. ते पुढीलप्रमाणे तयार झाले आहेत -

ए = अ + इ किंवा ई　　　　ऐ = आ + इ किंवा ई

ओ = अ + उ किंवा ऊ　　　　औ = आ + उ किंवा ऊ

उच्चार करण्यास लागणाऱ्या कालावधीवरून एखादा स्वर हा ऱ्हस्व स्वर आहे की दीर्घ स्वर आहे हे ठरवितात, त्यांना **मात्रा** असे म्हणतात. ऱ्हस्व स्वरांचा उच्चार करण्यास जो वेळ लागतो, त्याला एक मात्रा मानतात. दीर्घ स्वर व संयुक्त स्वर यांचा उच्चार करण्यास दोन मात्रा मानतात.

**(३) सजातीय स्वर व विजातीय स्वर -** एकाच उच्चारस्थानातून निघणाऱ्या स्वरांना **सजातीय स्वर** म्हणतात. उदा.

अ - आ　　इ - ई　　उ - ऊ

भिन्न उच्चारस्थानांतून निघणाऱ्या स्वरांना विजातीय स्वर असे म्हणतात. उदा.

अ - इ　　अ - उ　　इ - ए　　उ - ए.　　अ - ऋ

**नवे स्वर 'ॲ' आणि 'ऑ' हे परभाषेतून मराठीत आले असल्याने त्यांचा समावेश स्वरांच्या वरीलपैकी कोणत्याही प्रकारात करण्यात आलेला नाही.**

## व्यंजनांचे प्रकार

**(१) स्पर्श व्यंजने -** 'क्, ख्'पासून 'भ्, म्' पर्यंतच्या व्यंजनांना स्पर्श व्यंजने असे म्हणतात. त्यांचा उच्चार करताना फुफ्फुसांतील हवा तोंडावाटे बाहेर पडताना जीभ, कंठ, ताल, दात, ओठ यांच्याशी तिचा स्पर्श होऊन हे वर्ण उच्चारले जातात, म्हणून त्यांना **स्पर्श व्यंजने** म्हणतात.

**(२) अनुनासिक -** ङ्, ञ्, ण्, न्, म् या वर्णांचा उच्चार त्या-त्या वर्णांच्या उच्चारस्थानाबरोबरच नासिकेतून म्हणजे नाकातूनही होतो, म्हणून त्यांना **'अनुनासिक'** वर्ण असे म्हणतात.

**(३) कठोर व मृदू व्यंजने -** ज्या व्यंजनांत उच्चाराची तीव्रता दिसून येते, ती **कठोर व्यंजने** समजली जातात. तुलनेने ज्यांचा उच्चार सौम्य, कोमल किंवा मृदू होतो, त्यांना **मृदू व्यंजने** म्हणतात. कठोर व्यंजने, मृदू व्यंजने व अनुनासिके यांचा तक्ता पुढीलप्रमाणे देता येईल.

| वर्ग | कठोर व्यंजने | मृदू व्यंजने | अनुनासिके |
|---|---|---|---|
| 'क' वर्ग | क्, ख् | ग्, घ् | ङ् |
| 'च' वर्ग | च्, छ् | ज्, झ् | ञ् |
| 'ट' वर्ग | ट्, ठ् | ड्, ढ् | ण् |
| 'त' वर्ग | त्, थ् | द्, ध् | न् |
| 'प' वर्ग | प्, फ् | ब्, भ् | म् |

**(४) अर्धस्वर -** य्, र्, ल्, व् यांची उच्चारस्थाने अनुक्रमे इ, ऋ, लृ, उ या स्वरांच्या उच्चारस्थानांसारखीच आहेत. संधी होताना या स्वरांच्या जागी वरील व्यंजने किंवा व्यंजनांच्या जागी हे स्वर येतात.

(१) इ + अ = य् + अ - (उदा. अति + अंत = अत्यंत)

(२) ऋ + अ = र् + अ - (उदा. पितृ + अर्थ = पित्रर्थ)

(३) लृ + आ = ल् + आ

(उदा. लृ + आकृती = लाकृती) ('लृ' हा वर्ण अभावानेच आढळतो.)

(४) उ + अ = व् + अ - (उदा. सु + अल्प = स्वल्प)

**(५) उष्मे - घर्षक -** श्, ष्, स् यांना उष्मे किंवा घर्षक असे म्हणतात. उष्मन् = वायू. मुखावाटे जोराने उसासा बाहेर टाकल्याप्रमाणे या वर्णाचा उच्चार होतो. यात घर्षण आहे. घर्षणामुळे उष्णता निर्माण होते, म्हणून त्यांना उष्मे म्हणतात.

**(६) महाप्राण व अल्पप्राण व्यंजने -** 'ह' या वर्णाचा उच्चार करताना फुफ्फुसातील हवा तोंडावाटे जोराने बाहेर फेकली जाते, म्हणून त्याला **महाप्राण** असे म्हणतात. अशा 'ह्' मिसळून झालेल्या वर्णांना **महाप्राण** वर्ण म्हणतात. उरलेल्या वर्णांना **अल्पप्राण** वर्ण म्हणतात.

| अल्पप्राण | महाप्राण | अल्पप्राण | महाप्राण |
|---|---|---|---|
| क् | ख् (क् + ह्) | ग् | घ् (ग् + ह) |
| च् | छ् (च् + ह्) | ज् | झ् (ज् + ह) |
| ट् | ठ् (ट् + ह्) | ड् | ढ् (ड् + ह) |
| त् | थ् (त् + ह्) | द् | ध् (द् + ह) |
| प् | फ् (प् + ह्) | ब् | भ् (ब् + ह) |

श्, ष्, स्, ह् यांचा उच्चारही वायूच्या घर्षणाने होतो, म्हणून त्यांनाही **महाप्राण वर्ण** असे म्हणतात. अशा रीतीने वरीलप्रमाणे **१४ वर्ण** महाप्राण मानले जातात व उरलेले अल्पप्राण मानले जातात.

'ळ' हा स्वतंत्र वर्ण मानला जातो.

'क्ष्' व 'ज्ञ्' ही संयुक्त व्यंजने आहेत.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) **वर्ण म्हणजे ........................** ①②③④
अ) तोंडावाटे निघणारे मूलध्वनी
ब) रंगाने लिहून ठेवले जाणारे
क) वाक्य पूर्ण होणे
ड) बोलण्यात थांबणे
1) विधान 'अ' व 'ब' 2) विधान 'ब' व 'क'
3) विधान 'क' व 'ड' 4) विधान 'अ''ब''क'

2) **वर्ष २००९ च्या शासन निर्णयानुसार कोणते दोन स्वर वर्णमालेत समाविष्ट करण्यात आले आहेत?** ①②③④
1) अं, अः 2) अ, आ
3) ॲ, ऑ 4) ऋ, ऌ

3) **अं व अः हे पुढीलपैकी .......... आहेत?** ①②③④
1) स्वरादी 2) स्वर
3) व्यंजने 4) परसवर्ण

4) **मराठी भाषेत नवीन स्वर वगळता एकूण वर्ण किती?** ①②③④
1) ५० 2) ४०
3) १२ 4) ४८

5) **'स्वृ' म्हणजे काय?** ①②③④
1) उच्चार करणे, ध्वनी करणे
2) ओरडणे
3) उसासा टाकणे 4) बोलणे

6) **स्वरांच्या बाबतीत अयोग्य विधान ओळखा.** ①②③④
अ) स्वर म्हणजे उच्चार करणे
ब) स्वर म्हणजे नुसतेच सूर
क) स्वरोच्चाराच्या वेळी हवेचा मार्ग अडवलेला असतो
ड) स्वर म्हणजे ध्वनी करणे
1) विधान 'अ' व 'ब' 2) विधान 'ब'
3) विधान 'क' 4) विधान 'अ''ब''क'

7) **स्वरादी म्हणजे काय?** ①②③④
अ) स्वर आहे प्रारंभी असे
ब) अनुस्वार व विसर्ग
क) स्वर आहे आदी असे
ड) स्वर आहे नंतर असे
1) विधान 'अ''ब''क' बरोबर
2) विधान 'अ''ब''क''ड' बरोबर
3) विधान 'अ' व 'ड' बरोबर
4) विधान 'अ' व 'क' बरोबर

8) **'दुःख या शब्दात द् +....+ विसर्ग = दुः होय.'** ①②③④
1) ऊ 2) उ
3) इ 4) ई

9) **'स्पष्ट व खणखणीत उच्चारांना अनुस्वार म्हणतात, तर ओझरत्या अस्पष्ट उच्चाराला विसर्ग म्हणतात'** ①②③④
1) पूर्ण विधान बरोबर 2) पूर्ण विधान चूक
3) पूर्वार्ध बरोबर 4) उत्तरार्ध बरोबर

10) **'स्वर हे पूर्ण उच्चारांचे असतात तर व्यंजने ही स्वर मिसळून पूर्ण उच्चारांची होतात.'** ①②③④
1) संपूर्ण वाक्य चूक 2) संपूर्ण वाक्य बरोबर
3) पूर्वार्ध बरोबर 4) उत्तरार्ध बरोबर

11) **पुढीलपैकी बाराखडीत 'ए' स्वराचे चिन्ह कोणते?** ①②③④
1) ` 2) ˆ
3) ा 4) ि

12) **मराठी भाषेत एकूण संयुक्त स्वर किती आहेत?** ①②③④
1) पाच 2) चार
3) एक 4) सहा

13) **पुढीलपैकी ऱ्हस्व स्वर ओळखा.** ①②③④
1) ऋ 2) आ
3) ई 4) ऐ

14) पुढीलपैकी दीर्घ स्वर कोणते? ①②③④

1) अ, ऋ 2) ऋ, ऌ

3) अ, इ 4) ई, ऊ

15) भिन्न उच्चारस्थानांतून निघणाऱ्या स्वरांना ........... म्हणतात. ①②③④

1) ऱ्हस्व 2) दीर्घ

3) विजातीय 4) संयुक्त

16) पुढील वर्ण गटाला ............... असे म्हणतात.

ङ्, ञ्, ण्, न्, म् ①②③④

1) स्वर 2) संयुक्त स्वर

3) अनुनासिके 4) कठोर व्यंजने

17) क्, ख्, ग्, घ् या व्यंजनांचा उच्चार 'अ' हा स्वर मिसळून .......... होईल? ①②③④

1) क्, ख्, ग्, घ्

2) कअ, खअ, गअ, घअ

3) क्अ, ख्अ, ग्अ, घ्अ

4) क, ख, ग, घ

18) अनुनासिक वर्णांचा पर्याय ओळखा. ①②③④

1) क्, ख्, ग्, 2) ङ्, ञ्, ण्

3) च्, छ्, ज्, न् 4) य्, र्, ल्,

19) ...... हा स्वर मराठी भाषेतून लुप्त होत चालला आहे. ①②③④

1) ऌ 2) ऋ

3) ए 4) उ

20) कोणता वर्ण महाप्राण आहे? ①②③④

1) ग् 2) ङ्

3) ह् 4) ब्

21) मराठी भाषेत कोणता वर्ण 'स्वतंत्र' वर्ण मानला जातो? ①②③④

1) प् 2) ळ्

3) स् 4) ह्

22) मराठी भाषेत संयुक्त व्यंजने कोणती? ①②③④

1) ए, ऐ 2) क, ख

3) य, र, 4) क्ष, ज्ञ

23) 'श्र' या जोडशब्दाचे लेखन कसे कराल? ①②③④

1) स्+र्+अ 2) ष्+र्+अ

3) श्+अ+र् 4) श्+र्+अ

24) एकाच व्यंजनात तेच व्यंजन मिसळल्यास त्याला ....... असे म्हणतात. ①②③④

1) कठोर वर्ण 2) द्वित्त

3) घर्षक 4) अक्षर


## ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 3 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 1 | 2) 3 | 3) 1 | 4) 4 | 5) 1 |
| 6) 3 | 7) 1 | 8) 2 | 9) 3 | 10) 2 |
| 11) 1 | 12) 2 | 13) 1 | 14) 4 | 15) 3 |
| 16) 3 | 17) 4 | 18) 2 | 19) 1 | 20) 3 |
| 21) 2 | 22) 4 | 23) 4 | 24) 2 | |

# ४. वर्णविचार - २

## मराठीची वर्णमाला आणि वर्णांचे प्रकार

मागील प्रकरणात आपण वर्णांचा जो विचार केला तो थोडक्यात पाहू.




* नवे स्वर अॅ, ऑ (२००९ च्या शासननिर्णयानुसार)

## महाप्राणविषयक स्पष्टीकरण

क् + ह = ख्, ग् + ह = घ, अशी 'ह' च्या उच्चाराची छटा असलेली व्यंजने 'महाप्राण' म्हणून ओळखली जातात. आपण इंग्रजीमध्ये अशा वर्णांचे स्पेलिंग करताना त्यात 'ह' (एच) येतो. त्याचेही कारण हेच आहे असे लक्षात येईल. उदा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क् - K | ख् - Kh | ग् - G | घ् - Gh | च् - Ch |
| छ् - Chh | ज् - J | झ् - Jh | ट् - T | ठ् - Th |
| ड् - D | ढ् - Dh | त् - T | थ् - Th | द् - D |
| ध् - Dh | प् - P | फ् - Ph | ब् - B | भ् - Bh |

## क्ष् व ज्ञ् यांच्याविषयी स्पष्टीकरण


क्ष् व ज्ञ् मूलध्वनी आहेत असे वाटते. प्रत्यक्षात ती संयुक्त व्यंजने आहेत. म्हणून त्यांचा समावेश वर्णमालेत करीत नाहीत. क्ष = क् + ष् + अ अशी 'क्ष'ची फोड करता येईल. तर ज्ञ = द् + न् + य् + अ अशी 'ज्ञ'ची फोड करता येईल. हिंदीमध्ये 'ज्ञ'चा उच्चार 'ग्य' असा केला जातो.

देवनागरी लिपीमध्ये (मराठी) उच्चारांतील बिनचूकपणा लक्षात येतो. सामान्यतः आपण जे-जे उच्चार करतो त्यांना स्वतंत्र व बिनचूक अशी लिखित चिन्हे आपल्या देवनागरी लिपीत आहेत असे लक्षात येते.

## वर्णांची उच्चारस्थाने

मराठी वर्णमालेत एकंदर ५० वर्ण आहेत. या वर्णांचा उच्चार कोठून व कसा होतो हे पाहू -

(१) जीभ, (२) पडजीभ, (३) कोमल तालू (कंठ), (४) मूर्धा, (५) कठोर तालू (तालू),
(६) वर्त्स (दंततालू), (७) दात, (८) ओठ, (९) नाक,
(म) तोंडाची पोकळी (मुखविवर)
(न) नाकाची पोकळी (नासिकाविवर)
(अ) अन्ननलिका
(श्व) श्वासनलिका



सोबतच्या चित्रात तोंडाची रचना पाहा. तोंडातील विविध भागांना कंठ, मूर्धा, तालू, दात, ओठ व जीभ अशी नावे आहेत.

ध्वनीचा संबंध या भागांशी येतो. तोंडावाटे ध्वनी बाहेर पडताना तोंडातील ज्या भागाचा विशेष उपयोग होतो त्याचे नाव त्या भागास दिले जाते.

**(१) कंठ्य वर्ण** - कंठ म्हणजे गळा. जिभेचा मागील भाग हा वर उचलून पडजिभेच्या पुढील भागाला म्हणजे कंठाला स्पर्श करताना ज्या वर्णांचा उच्चार होतो, त्यांना कंठातून निघणारे म्हणून 'कंठ्य वर्ण' असे म्हणतात. अ, आ हे स्वर व क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् ही व्यंजने कंठ्य वर्ण आहेत.

**(२) तालव्य वर्ण** - वरच्या दातांच्या मागील बाजूच्या भागापासून कंठापर्यंत जिभेच्या वरच्या बाजूस जो घुमटाकार भाग आहे त्याला 'तालू' असे म्हणतात. या तालूचे दोन भाग आहेत - (१) कठोर तालू (२) मृदू तालू. पडजिभेच्या पुढील कोमल तालूचा जो भाग आहे त्याला कंठ असे म्हणतात. तालूच्या पुढील भागाला 'कठोर तालू' किंवा 'तालू' असे म्हणतात. जिभेचे पाते कठोर तालूला लावून ज्या वर्णांचे उच्चार होतात, त्यांना 'तालव्य वर्ण' असे म्हणतात.

इ, ई हे स्वर तालव्य वर्ण आहेत. च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् हे तालव्य वर्ण आहेत. मात्र त्यांचा उच्चार 'य' ने युक्त होतो. उदा. च्य, छ्य, ज्य, झ्य.

**(३) दंततालव्य वर्ण -** कठोर तालूचा दातांकडील फुगीर व खरबरीत असा जो भाग आहे, त्याला 'वर्त्स' म्हणतात. हा दात व तालू यांच्यामधील भाग होय. इथे उच्चारल्या जाणाऱ्या ध्वनींना 'वर्त्स्य ध्वनी' असे म्हणतात. यांनाच 'दंततालव्य वर्ण' असे म्हणतात. च्, छ्, ज्, झ् या वर्णांना 'अ' लावून (पण 'य' न लावता) जो उच्चार होतो त्याला दंततालव्य असे म्हणतात.

| तालव्य उच्चार | दंततालव्य उच्चार |
|---|---|
| जग (ज्यग) - सृष्टी<br>जप (ज्यप) - देवाचे नाव घेणे<br>चाप (च्याप) - धनुष्य | जग (जग) - जिवंत राहा<br>जप (जप) - काळजी घे<br>चाप (चाप) - चिमटा<br>चमचा, झरा, चारा, चाकर<br>झोप, जावई, झाड इत्यादी. |

**(४) मूर्धन्य वर्ण -** कठोर तालू व कोमल तालू (किंवा तालू व कंठ) यांच्या मधल्या भागाला 'मूर्धा' असे म्हणतात. जे वर्ण उच्चारताना आपल्या जिभेचा शेंडा या मूर्धेला जाऊन भिडतो, त्यांना मूर्धन्य वर्ण असे म्हणतात. 'ऋ' हा स्वर आणि ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, यांना मूर्धन्य वर्ण असे म्हणतात.

**(५) दंत्य वर्ण -** जे वर्ण उच्चारताना आपल्या जिभेचे टोक वरच्या दातांच्या मागच्या बाजूस टेकते, त्यांना 'दंत्य' वर्ण असे म्हणतात. 'ऌ' हा स्वर व त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् ही व्यंजने 'दंत्य वर्ण' आहेत.

**(६) ओष्ठ्य वर्ण -** ओष्ठ म्हणजे ओठ. खालच्या व वरच्या ओठांचा उपयोग करून जे वर्ण आपण उच्चारतो, त्यांना 'ओष्ठ्य वर्ण' असे म्हणतात. 'उ, ऊ' हे स्वर व 'प्, फ्, ब्, भ्, म्' हे ओष्ठ्य वर्ण आहेत.

उच्चारस्थानांवरून वर्णांचे हे वर्गीकरण महत्त्वाचे आहे. आपले उच्चार स्वच्छ व स्पष्ट व्हावेत, यासाठीही या विवेचनाचा उपयोग होऊ शकतो.

मराठी वर्णमालेतील वर्णांची नावे व त्यांचे उच्चार सामान्यतः एकच असतात. पण त्याला अपवाद आहे तो 'च' या वर्गातील 'च्, छ्, ज्, झ्' या वर्णांचा. त्यांचा उच्चार तालव्य व दंततालव्य असा दुहेरी होतो.

## उच्चारस्थानांनुसार वर्णांचे वर्गीकरण

| स्वर | व्यंजने | मुखाचा भाग | वर्णांचे नाव |
|---|---|---|---|
| अ, आ | क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् | कंठ | कंठ्य |
| इ, ई | च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् | तालू | तालव्य |
| ऋ | ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ् | मूर्धा | मूर्धन्य |
| ऌ | त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् | दंत | दंत्य |
| उ, ऊ | प्, फ्, ब्, भ्, म् | ओष्ठ | ओष्ठ्य |
| ए, ऐ | - | कंठ + तालू | कंठतालव्य |
| ओ, औ | - | कंठ + ओष्ठ | कंठौष्ठ्य |
| - | व | दंत + ओष्ठ | दंतौष्ठ्य |
| - | च्, छ्, ज्, झ् | दंत + तालू | दंततालव्य |

व्याकरणातील वर्णविचारांचा उपयोग लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्या उच्चारांत स्पष्टता, स्वच्छता

व बिनचूकपणा येण्याच्या दृष्टीने हा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. तसेच जोडाक्षर लेखनातील बिनचूकपणा व जोडाक्षरांच्या उच्चारांतील स्वच्छपणा व स्पष्टपणा यांसाठी वर्णविचाराचा अभ्यास उपयुक्त ठरतो. तसेच आपल्या अभ्यासातील 'संधी' या घटकाचा अभ्यास करताना वर्णविचाराचा अभ्यास उपयुक्त ठरतो. हे घटक अभ्यासासाठी पुढे येणारच आहेत.

कोशातील शब्दांचा शोध घेण्यासाठी वर्णमालेचा उपयोग होतो. संदर्भग्रंथांचा आपल्याला नेहमीच उपयोग करावा लागतो. तसा तो करणे ही अभ्यासाची एक उत्तम सवयही आहे. प्रत्येक कोशाच्या प्रारंभी वर्णानुक्रमे विषयांची मांडणी कशी केली आहे, याची माहिती दिलेली असते. त्याचा उपयोग करून संदर्भशोधन करावे. मात्र वर्णानुक्रम हा विषय त्या दृष्टीने उपयुक्त ठरतो यात शंका नाही.

ज्या आद्याक्षराने वर्ण सुरू होतात त्यांनुसार शब्दकोशातील शब्दांचा क्रम ठरविलेला असतो.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **मराठी भाषेत एकूण किती व्यंजने आहेत?** ①②③④

1) बारा 2) दोन
3) चौतीस 4) सहा

2) **'क्ष्' व 'ज्ञ्' यांना काय म्हणता येईल?** ①②③④

1) संयुक्त व्यंजने 2) स्वर
3) स्वरादी 4) व्यंजने

3) **मराठी वर्णमालेतील नवीन स्वर विचारात धरून एकूण वर्ण किती?** ①②③④

1) ३४ 2) ४८
3) १२ 4) ५०

4) **कोमल तालू म्हणजे ...........** ①②③④

1) मूर्धा 2) जीभ
3) तालू 4) कंठ

5) **पुढीलपैकी कोणते स्वर 'कंठ्य वर्ण' आहेत?** ①②③④

1) इ, ई 2) उ, ऊ
3) ए, ऐ 4) अ, आ

6) **कोणत्या वर्णाचा उच्चार दंततालव्य व तालव्य असा दुहेरी होतो?** ①②③④

1) क्, ख्, ग्, घ् 2) च्, छ्, ज्, झ्
3) प्, फ्, ब्, भ् 4) ट्, ठ्, ड्, ढ्

7) **झोप ['झ'] वर्णाचे उच्चार स्थान ओळखा.** ①②③④

1) तालव्य 2) ओष्ठ्य
3) कंठ्य 4) दंततालव्य

8) **'लृ' हा स्वर कोणत्या वर्ण उच्चार स्थानात मोडतो?** ①②③④

1) तालव्य वर्ण 2) ओष्ठ्य वर्ण
3) दंत्य वर्ण 4) कंठ्य वर्ण

9) **ओष्ठ्य वर्ण ओळखा.** ①②③④

1) क्, ख्, ग्, घ् 2) च्, छ्, ज्, झ्
3) ट्, ठ्, ड्, ढ् 4) प्, फ्, ब्, भ्, म्

10) **पुढीलपैकी 'मूर्धन्य वर्ण' गट ओळखा.** ①②③④

1) ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ्
2) प्, फ्, ब्, भ्, म्
3) क्, ख्, ग्, घ्
4) त्, थ्, द्, ध्

11) **च्, छ्, ज्, झ् यांचा उच्चार 'य' युक्त झाल्यास ते ........ वर्ण असतात.** ①②③④

1) दंत तालव्य वर्ण 2) तालव्य वर्ण
3) कंठ्य वर्ण 4) दंत्य वर्ण

12) 'ज' या वर्णाचा उच्चार 'अ' युक्त झाल्यास त्याचा उच्चार ............... होतो. ①②③④

1) दंत्य 2) ओष्ठ्य
3) दंत तालव्य 4) कंठ्य

13) 'व' हा ............... वर्ण आहे. ①②③④

1) कंठतालव्य 2) कंठौष्ठ्य
3) दंतौष्ठ्य 4) दंततालव्य

14) 'कंठौष्ठ्य' उच्चार स्थान असणारे स्वर .......... ①②③④

1) ऋ 2) अ, आ
3) ओ, औ 4) इ, ई

15) तालू म्हणजेच ............... ①②③④

1) कठोर तालू 2) जीभ
3) पडजीभ 4) मूर्धा

16) जग (ज्यग)-सृष्टी उच्चारस्थान ओळखा.['ज' वर्णाचे] ①②③④

1) दंत्य 2) कंठ्य
3) तालव्य 4) दंततालव्य

17) दंत्य वर्णाचा पर्याय शोधा. ①②③④

1) क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् 2) त्, थ्, न्, ल्, स्
3) प्, फ्, ब्, भ्, म् 4) च्, छ्, ज्, झ्

18) 'उ, ऊ' या स्वरांचे उच्चार स्थान .............. आहे. ①②③④

1) कंठ्य वर्ण 2) ओष्ठ्य वर्ण
3) तालव्य वर्ण 4) दंत तालव्य वर्ण

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 4 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 1 | 3) 4 | 4) 4 | 5) 4 |
| 6) 2 | 7) 4 | 8) 3 | 9) 4 | 10) 1 |
| 11) 2 | 12) 3 | 13) 3 | 14) 3 | 15) 1 |
| 16) 3 | 17) 2 | 18) 2 | | |

# ५. जोडाक्षरांचे लेखन

मराठीच्या वर्णमालेचा अभ्यास आपण केला. स्वर, व्यंजन म्हणजे काय ते आपण पाहिले. त्यांचा उच्चार कसा करावयाचा, वर्णांची उच्चारस्थाने, वर्णांचे प्रकार यांचाही अभ्यास केला.

स्वर हे पूर्ण उच्चाराचे वर्ण आहेत. उदा. अ, आ इत्यादी.

व्यंजने ही अपूर्ण उच्चारांची आहेत. उदा. क्, ख्, ट् इत्यादी.

दोन विजातीय स्वर एकत्र येऊन एक **संयुक्त स्वर** निर्माण होतो, हे आपण स्वरांच्या अभ्यासाच्या वेळी पाहिले. उदा. अ + इ = ए.

दोन व्यंजने एकत्र आली की त्याला **संयुक्त व्यंजन** असे म्हणतात. उदा. म् + ह् = म्ह्, त् + य् = त्य्,

एकच व्यंजन दोन वेळा जोडले गेले की त्या संयुक्त व्यंजनाला **द्वित्त** असे म्हणतात. उदा. क् + क् = क्क्, त् + त् = त्त् अशा संयुक्त व्यंजनाच्या शेवटी स्वर मिसळला की जोडाक्षर तयार होते.

म् + ह् = म्ह्, द् + य् = द्य्, श् + च = श्च् ही संयुक्त व्यंजने आहेत. त्यामध्ये स्वर मिसळला की जोडाक्षर तयार होते. म् + ह् + अ = म्ह, द् + य् + अ = द्य, श् + च् + अ = श्च.

**ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने प्रथम एकत्र येऊन शेवटी त्यांत एक स्वर मिसळतो, त्यास जोडाक्षर असे म्हणतात.**

ज्या क्रमाने व्यंजने व स्वर एकत्र येतात त्याप्रमाणे त्यांचा आपण उच्चार करावयाचा असतो.

पुढील शब्दांत आलेली जोडाक्षरे पाहा व त्यांची फोड पाहा.

| शब्द | जोडाक्षर | फोड |
|---|---|---|
| विद्यालय | द्या | द् + य् + आ |
| पश्चिम | श्चि | श् + च् + इ |
| आम्ही | म्ही | म् + ह् + ई |
| शत्रू | त्रू | त् + र + ऊ |

जोडाक्षरात क्रमाने प्रथम येणारे व्यंजन हे अपूर्ण उच्चारले जाते. हे लक्षात घेऊन जोडाक्षराचे लेखन केले जाते. उदा. 'विघ्न' या शब्दात 'घ्न' हे जोडाक्षर आहे. त्यातील 'घ्' चा उच्चार अपूर्ण होतो. त्याचे लेखन अर्धा घ् (६) असे केले जाते.

## जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धती

जोडाक्षरे लिहिण्याच्या दोन पद्धती आहेत.

**(१) आडवी जोडणी** - एकापुढे एक वर्ण लिहून जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धतीला आडवी जोडणी असे म्हणतात.

उदा. क् + क् + अ = क्क, क् + त् + ई = क्ती.

**(२) उभी जोडणी** - एका खाली एक वर्ण लिहून जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धतीला उभी जोडणी असे म्हणतात. उदा. क् + क् + अ = क्क

| जोडाक्षरे | आडवी जोडणी | उभी जोडणी |
|---|---|---|
| क् + क् + अ = क्क<br>क् + व् + अ = क्व<br>ल् + ल् + अ = ल्ल | बक्कल, अक्कल<br>क्वचित, पक्व<br>गल्ली | बक्कल, अक्कल<br>क्वचित, पक्व<br>गल्ली |

## जोडाक्षरांचे प्रकार

व्यंजनांच्या लेखनपद्धतीनुसार जोडाक्षरांचे प्रकार दिसून येतात. पुढे काही उदाहरणे दिली आहेत.

### मध्ये उभा दंड असणारी व्यंजने

क्, फ्

क् (क) - रक्त, मक्ता, क्लेश फ् (फ) - फ्लॉवर, चाफ्याचे

### शेवटी उभा दंड असणारी व्यंजने

ख्, घ्, च्, ज्, झ्, ञ्, त्, थ्, ध्, न्, प्, ब्, भ्, म्, य्, व्, ष्, स्

| | |
|---|---|
| ख् (ख) - ख्यातनाम, ख्याती, | घ् (घ) - वाघ्या, विघ्न |
| च् (च) - कच्चा, उच्चार, परिच्छेद | ज् (ज) - ज्येष्ठ, ज्वर |
| झ् (झ) - ओझ्याने, माझ्या | त् (त) - उत्तर, उत्थान, प्रयत्न, तत्पर, वत्सल |
| थ् (थ) - तथ्य, पृथ्वी | ध् (ध) - ध्वनी, उद्धव |
| न् (न) - अन्न, अन्वय, गुन्हा | प् (प) - दप्तर, स्वप्न |
| ब् (ब) - अब्ज, उपलब्ध, शब्द | भ् (भ) - अभ्यास, भ्याड |
| म् (म) - म्हण, निम्मा | य् (य) - शय्या, हिय्या |
| व् (व) - व्यर्थ, नव्वद | ष् (ष) - कष्ट, घनिष्ट |
| स् (स) - अस्त, स्नान | |

### शेवटी स्वतंत्र उभा दंड असणारी व्यंजने

ग्, ण्, श्

ग् (ग) - रुग्ण, ग्लानी

ण् (ण) - मृण्मयी, अरण्य

श् (श) - प्रश्न, अश्व, श्याम, पश्चात

**टीप** - 'श' हे अक्षर 'श' या चिन्हानेही दाखविले जाते. जोडाक्षरामध्ये ते 'श्' असे येते. उदा. अश्व, पश्चात

## अर्धा दंड असणारी आणि अर्धी होऊ शकणारी व्यंजने

छ्, ल्, ळ्

छ् (छ) - उच्छ्वास (च् + छ् + व् + आ = च्छ्वा)

ल् (ल) - अल्प, वल्गना

ळ् (ळ) - मळ्यात, कळ्या

## अर्धा दंड असणारी पण अर्धी होऊ न शकणारी व्यंजने

ट्, ठ्, ड्, ढ्, द्, ह्

उदा. ट् - घट्ट, कट्टी, कोट्यवधी

ठ् - विठ्ठल, मोठ्याने

ड् - अड्डा, वड्या, खड्ग, वाड्यात

ढ् - काढ्यात, दुढ्ढाचार्य

द् - बद्दल/बद्दल/, मुद्दल/मुद्दल, आद्य/आद्य

ह् - सह्य, सह्याद्री

## दंड नसलेले व्यंजन - र्

(अ) (१) 'र्' या व्यंजनानंतर दुसरे एखादे व्यंजन येते, तेव्हा 'र' या व्यंजनाचा उच्चार अपूर्ण असतो. तो पुढील व्यंजनावर (र्) रफार किंवा रेफ देऊन त्याचे लेखन केले जाते.

र् + क् + अ = र्क - अर्क, तर्क

र् + ग् + अ = र्ग - स्वर्ग

र् + च् + आ/ई = र्च - चर्चा, खुर्ची

र् + ज् + अ/आ = र्ज - अर्ज, दर्जा

र् + त् + अ = र्त - कीर्तन

र् + प् + अ = र्प - अर्पण, सर्प

र् + ब् + अं/ई = र्ब - निर्बंध, दुर्बीण

र् + श् + अ = र्श - स्पर्श

र् + व् + अ = र्व - सर्व

(२) 'र' या व्यंजनानंतर 'य्' किंवा 'ह्' ही व्यंजने येतात आणि जेव्हा 'र'च्या मागील व्यंजनावर आघात येत नसेल, तेव्हा 'र'चे लेखन ( ़ ) असे केले जाते.

र् + य् + आ = ऱ्य - कैऱ्या, सुऱ्या (सुरीचे अनेकवचन)

र् + ह् + आ = ऱ्ह - गुऱ्हाळ, कुऱ्हाड

(ब) जोडाक्षरात जेव्हा पहिल्या व्यंजनानंतर किंवा पहिल्या व्यंजनापुढे 'र' हा वर्ण येतो, तेव्हा पहिल्या व्यंजनाचा उच्चार अपूर्ण व 'र'चा उच्चार पूर्ण होतो. उदा. 'क्रम' या शब्दात 'क्र' हे जोडाक्षर आहे. त्यात 'क्+र्+अ' किंवा 'क्+र' अशी त्याची फोड आहे. जोडाक्षरात अशा वेळी 'र'च्या अगोदर असणाऱ्या किंवा 'र'च्या मागे असणाऱ्या व्यंजनानुसार 'र'चे लेखन विविध पद्धतींनी होते.

(१) मध्ये दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आले, तर त्याचे लेखन (्र) असे केले जाते.

उदा. क् + र = क्र - तक्रार, क्रियापद, क्रोध

फ् + र = फ्र - फ्रान्स, फ्रेंच

(२) शेवटी जोडून दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आले, तर त्याचे लेखन (्र) असे केले जाते.

उदा. ख् + र = ख्र - ख्रिस्त, ख्रिश्चन

घ् + र = घ्र - व्याघ्रज् + र = ज्र - वज्र

त् + र = त्र - पत्र, छत्री

ध् + र = ध्र - ध्रुव

प् + र = प्र - प्रमाणे

ब् + र = ब्र - ब्रीद, ब्रिटिश

व् + र = व्र - व्रजभूमी

(३) शेवटी स्वतंत्र दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर असल्यास त्याचे लेखन (्र) असे करतात.
उदा. ग् + र = ग्र - अग्रज, ग्रंथ

(४) अर्धा दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आल्यास त्याचे लेखन (्र) किंवा (्र) या चिन्हाने होते.

उदा. ट् + र = ट्र - ट्रक, राष्ट्र (ष्ट्र = ष् + ट् + र)

ड् + र = ड्र - ड्रम

द् + र = द्र - द्रुत, द्रोह

जोडाक्षरलेखनात प्रथम स्थानावर 'र्' हा वर्ण आल्यास (र् + व्यंजन) किंवा द्वितीय स्थानावर 'र' हा वर्ण आल्यास (व्यंजन + र्) होणारे लेखन काळजीपूर्वक करावे.

## काही विशेष लेखनपद्धती

(१) संस्कृतमध्ये 'ह्' युक्त सर्व जोडाक्षरांत 'ह्' हा वर्ण प्रथम येतो. उदा. ब्रह्म, प्रह्लाद, परंतु मराठीत ब्रम्ह, ऱ्हस्व, जिव्हा असे लिहिण्याचा प्रघात आहे.

(२) काही जोडाक्षरे भिन्न रीतीनेही लिहिली जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | क् + त = क्त | तसेच 'क्त' | - उदा. रक्त, रक्त |
| | द् + म = द्‌म | तसेच द्म | - उदा. पद्‌म, पद्म |
| | द् + व = द्‌व | तसेच द्व | - द्‌वितीया, द्वितीया |

## 'ऋ' आणि 'लृ' या स्वरांनी होणारी अक्षरे

हे दोन्हीही स्वर आहेत, हे लक्षात घ्यावे. उदा. ऋषी, ऋतू, ऋण. हे शब्द 'ऋ' या स्वराने सुरू झाले आहेत. 'ऋ' या स्वरांनी युक्त असे काही शब्द आहेत.

उदा. गृहपाठ, नृप, पृथ्वी, सृष्टी, हृदय इत्यादी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इथे | ग् + ऋ = गृ | - उदा. गृहपाठ | न् + ऋ = नृ | - | उदा. नृप |
| | प् + ऋ = पृ | - उदा. पृथ्वी | स् + ऋ = सृ | - | उदा. सृष्टी |
| | ह् + ऋ = हृ | - उदा. हृदय | | | |

'लृ' या स्वराने युक्त असा एकच शब्द मराठीत आहे, तो 'क्लृप्ती' होय.

गृहपाठ, नृप इत्यादी. शब्दांत असलेले 'गृ', 'नृ' ही जोडाक्षरे नाहीत. कारण इथे व्यंजन + स्वर = अक्षर (ग् + ऋ = गृ) अशी रचना आहे. इथे दोन व्यंजने नाहीत म्हणून हे जोडाक्षर नाही.

## मराठीतील स्वरांची उच्चारपद्धती

मराठीतील मूलध्वनी (वर्ण) व त्यांची उच्चारस्थाने यांचा अभ्यास केला आहे. एका वर्णाला एकच चिन्ह व एकच उच्चारस्थान आहे. असे असले तरीही त्याला काही अपवाद आहेत.

मराठीत प्रत्येक वर्णाचा पूर्णोच्चार होतो. त्याशिवाय त्याचे लांबट व तोकडा (निभृत) असेही उच्चार होतात. उदा. 'गवत' या शब्दात तीन 'अ' कार आहेत. पण तीनही 'अ'चे उच्चार भिन्न आहेत. 'ग' (ग् + अ) मधील 'अ' हा पूर्ण उच्चाराचा वर्ण आहे. त्याला 'ऱ्हस्व उच्चार' असेही म्हणतात 'व्' (व् + अ) मधील 'अ' हा लांबट उच्चाराचा आहे. पण तो 'दीर्घ उच्चार' नव्हे. 'त'मधील (त् + अ) 'अ'चा उच्चार तोकडा किंवा निसरडा आहे. त्याला अपूर्णोच्चारित असे किंवा 'निभृत' असे म्हणतात. 'गवत' या शब्दाचा उच्चार करून पाहिल्यावर हे लक्षात येईल. 'सहल' या शब्दाच्या उच्चारातही हा अनुभव येईल. स (ऱ्हस्व उच्चार), ह (लांबट उच्चार), ल् (तोकडा किंवा निभृत).

## अ चे उच्चार

(१) मराठी शब्दातील अन्त्य (शेवटचा वर्ण) 'अ' हा निभृत म्हणजे अर्धवट किंवा अपूर्ण उच्चारला जातो. उदा. कपाट (ट्), पान (न्), जवळ (ळ्) इत्यादी.

(२) अकारान्ताखेरीज इतर शब्दांतील उपान्त्य अक्षर (शेवटून दुसरे अक्षर) 'अ' युक्त असेल, तर ते अपूर्ण उच्चारले जाते. उदा. नकटा (क्), पोचले (च्), बोलणी (ल्) इत्यादी.

(३) चार अक्षरी शब्दांतील दुसऱ्या अक्षरातील 'अ' हा अपूर्ण उच्चारला जातो. उदा. करवत (र्), सरकार (र्), चालवत (ल्) इत्यादी.

(४) व, ग, ढ या एकाक्षरी शब्दांतील 'अ'चा उच्चार लांबट होतो.

उदा. (१) राम व सीता (२) त्याला 'ग'ची बाधा झाली. (३) हा मुलगा 'ढ' आहे.

## इतर स्वरांचे उच्चार

(१) प्रत्येक स्वराचे ऱ्हस्व (जलद) व लांबट असे दोन उच्चार आहेत. उदा.

| स्वर | लांबट उच्चार | ऱ्हस्व उच्चार | स्वर | लांबट उच्चार | ऱ्हस्व उच्चार |
|---|---|---|---|---|---|
| अ | अट<br>— | अडका<br>U | ए | एक<br>— | एकटा<br>U |
| आ | आड<br>— | आमचा<br>U | ऐ | ऐक<br>— | ऐकून<br>U |
| इ | ईश<br>— | इहलोक<br>U | ओ | ओठ<br>— | ओठात<br>U |
| उ | ऊस<br>— | उसाचा<br>U | औ | औत<br>— | औषध<br>U |

(२) अकारान्तापूर्वीचे स्वर मराठीत लांबट उच्चारले जातात. उदा. मन, गात, विष, मेघ, म्हैस, मोर, कौल इत्यादी.

(३) दीर्घान्तापूर्वीचे स्वर ऱ्हस्व उच्चारले जातात. उदा. मुळा, मासा, विटी, कुह्, खेडी, पैसा, नौका इत्यादी.

(४) संस्कृतमधून मराठीत जसेच्या तसे आलेल्या (तत्सम) शब्दांतील अन्त्य 'अ' हा पूर्णोच्चारित असतो. उदा. गुण, विषय, मंदिर, सुर, गृह, नृप, निर्झर इत्यादी.

(५) जोडाक्षर, अनुस्वार व विसर्ग यानंतरचा 'अ' तोकडा किंवा निभृत नसतो. उदा. डिंक, चिंच, भिंत, शिस्त, गुच्छ, शिल्लक, दुःख, निःसंशय इत्यादी.

## अनुस्वाराचे उच्चार

अनुस्वाराचे किंवा शीर्षबिंदूचे उच्चार दोन आहेत - (१) खणखणीत व (२) ओझरता. खणखणीत उच्चारास 'अनुस्वार' असे म्हणतात आणि ओझरत्या उच्चारास 'अनुनासिक' असे म्हणतात.

(१) मराठीत अनुस्वाराचा उच्चार खणखणीत होतो. उदा. घंटा, तंटा, आंबा, चिंच, गुंड इत्यादी.

(२) अनुस्वार - पुढे पहिल्या पाच वर्गांतील व्यंजन आल्यास त्याचा उच्चार त्याच वर्गातील शेवटच्या अनुनासिकासारखा (ङ्, ञ्, ण्, न्, म्) म्हणजे पंचमवर्णासारखा होतो इत्यादी. उदा. शंकर (शङ्कर), चंचल (चञ्चल), घंटा (घण्टा), भिंत (भिन्त), शिंपला (शिम्पला) इत्यादी.

(३) अनुस्वारापुढे 'य' व 'ल' आल्यास त्याचा उच्चार अनुनासिक य (यं) किंवा अनुनासिक ल (लं) किंवा व (वं) सारखा होतो. संयम (सय्यम), संलग्न (सल्लग्न किंवा सव्लग्न) इत्यादी.

(४) अनुस्वारापुढे 'र', 'व', 'श', 'ष', 'स', 'ह' ही अक्षरे आल्यास ते अनुनासिक 'व' युक्त वं बनते. उदा. संरक्षण (संव्रक्षण), संवाद (संव्वाद), संशय (संव्शय), संसार (संव्सार), सिंह (सिंव्ह), संज्ञा (संव्ज्ञा) इत्यादी.

## विसर्गाचा उच्चार

विसर्गाचा उच्चार त्याच्या मागील स्वरामागोमाग ह्कार युक्त होतो. उदा. दुःख (दुह्ख), अंतःकरण (अंतह्करण)

इतर - जोडाक्षरापूर्वी ऱ्हस्व स्वरावर आघात आल्यास तो स्वर दीर्घ उच्चारला जातो. उदा. शिष्य, रस्ता, मुद्दा, विठ्ठल इत्यादी. परंतु तसा आघात येत नसल्यास तो ऱ्हस्वच उच्चारला जातो. उदा. वऱ्हाड, उद्या, तुझ्या, पुणे + स = पुण्यास इत्यादी.

आपले उच्चार बिनचूक यावेत यासाठी विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी. आपल्या अध्यापकांकडून ते समजून घ्यावेत. वर्णांचे शुद्ध उच्चार करण्यासाठी, ते शिकण्यासाठी अवधानपूर्वक श्रवण, अनुकरण व अध्यापकांकडून ते प्रत्यक्ष समजून घेणे आवश्यक आहे. श्रवणाच्या प्रत्यक्ष अनुभवासाठी आकाशवाणीवरील कार्यक्रम ऐकणे, थोर व्यक्तींच्या अभिवाचनाच्या व भाषणाच्या ध्वनिफिती ऐकणे या गोष्टी सहेतुक केल्या पाहिजेत.

ऱ्हस्व स्वराऐवजी दीर्घ स्वराचा उच्चार केल्यास शब्दांच्या अर्थात फरक पडण्याचा संभव असतो. अशा काही शब्दांची सूची पुढीलप्रमाणे आहे -

| | |
|---|---|
| दिन (दिवस), दीन (गरीब) | सुत (मुलगा), सूत (धागा) |
| सलिल (पाणी), सलील (लीलेने) | सुर (देव), सूर (आवाज) |
| शिर (डोके), शीर (रक्तवाहिनी) | मिलन (भेट), मीलन (मिटणे) |

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) **दोन व्यंजने एकत्र येऊन संयुक्त व्यंजन तयार होते तर दोन विजातीय स्वर एकत्र येऊन संयुक्त स्वर तयार होतो.** ①②③④

1) विधान पूर्ण चूक 2) विधान पूर्ण बरोबर
3) विधानाचा पूर्वार्ध चूक 4) विधानाचा उत्तरार्ध चूक

2) **एकच व्यंजन दोन वेळा जोडले गेले की त्याला........ असे म्हणतात.** ①②③④

1) द्वित्त 2) संयुक्त स्वर
3) संयुक्त 4) अनुनासिक

3) जोडाक्षर म्हणजे काय? ①②③④
1) स्वर + स्वर 2) स्वर + व्यंजन
3) व्यंजन + स्वर 4) व्यंजन + व्यंजन + स्वर

4) जोडाक्षर पाहा व फोड करा. (आम्ही) ①②③④
1) म् + ह् + इ 2) म् + ह् + ई
3) म् + ह् + अ 4) म् + इ + ह्

5) पुढील आडव्या जोडणीचा पर्याय ओळखा. ①②③④
1) बक्कल 2) गह्नी 3) बुक्का 4) अक्का

6) शेवटी उभा दंड असणारी व्यंजने ओळखा. ①②③④
1) ख्, घ्, च्, प्, ध् 2) क्, फ्
3) छ्, ल्, ळ् 4) ग्, ण्, श्

7) पुढीलपैकी दंड नसलेले व्यंजन कोणते? ①②③④
1) ऱ् 2) य् 3) स् 4) प्

8) 'व्याघ्र' या शब्दात 'र'चे लेखन कसे केले आहे? ①②③④
1) ( ॅ ) 2) ( ़ )
3) ( ्र ) 4) ( ॅ )

9) 'हृदय' या शब्दाची फोड सांगा. ①②③④
1) ह् + अ + द् + अ + य् + अ
2) ह् + ऋ + द् + अ + य् + अ
3) ह् + द् + अ + य्
4) ह् + य् + अ

10) 'ऌ' या स्वराने युक्त एकच मराठीतील शब्द कोणता? ①②③④
1) कल्लुप्ती 2) लुप्ती
3) क्लृप्ती 4) कलूप्ती

11) 'सहल' या शब्दात 'ह' चा उच्चार कसा आहे? ①②③④
1) लांबट उच्चार 2) तोकडा
3) निभृत 4) ऱ्हस्व उच्चार

12) खणखणीत उच्चाराला 'अनुस्वार' म्हणतात आणि ओझरत्या उच्चारास 'अनुनासिक' असे म्हणतात. ①②③④
1) उत्तरार्ध बरोबर 2) वाक्याचा पूर्वार्ध चूक
3) पूर्ण वाक्य चूक 4) पूर्ण वाक्य बरोबर

13) 'शंकर' या शब्दात अनुनासिकाचा वापर केल्यास ते ........... असे होईल? ①②③④
1) शंङ्कर 2) शडकर
3) शङ्कर 4) शण्कर

14) 'सृष्टी' शब्दाची फोड कशी होईल? ①②③④
1) स् + इ + ष् + ट् + ई
2) स् + ऋ + ष् + ट् + ई
3) स् + ऊ + ष् + ट् + अ
4) स् + उ + श् + ष् + ट् + इ

15) शब्दात अनुनासिकांचा वापर करणे यालाच ...... असे म्हणतात. ①②③④
1) अनुस्वार 2) पर-सवर्ण रूप
3) व्यंजन 4) स्वर

16) एकूण स्पर्श व्यंजनांमध्ये अनुनासिके किती येतात? ①②③④
1) पाच 2) चार 3) दहा 4) बारा

17) 'दंड' हा शब्द पर-सवर्ण रूपात असा होईल ......... ①②③④
1) दंन्ड 2) दन्ड 3) दंण्ड 4) दण्ड

18) जोडाक्षरात शेवटी ...... मिसळला जातो. ①②③④
1) व्यंजन 2) स्वर
3) अनुनासिक 4) अनुस्वार

19) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. ①②③④
पृथ्वी = प् + .......... + थ + व + ई
1) लृ 2) ऋ 3) ऊ 4) उ

20) 'गल्ली' या शब्दात 'ल' चे .... झाले आहे. ①②③④
1) द्वित्त 2) अनुनासिक
3) पर-सवर्ण 4) व्यंजन

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 5 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 1 | 3) 4 | 4) 2 | 5) 4 |
| 6) 1 | 7) 1 | 8) 3 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 1 | 12) 4 | 13) 3 | 14) 2 | 15) 2 |
| 16) 1 | 17) 4 | 18) 2 | 19) 2 | 20) 1 |

# ६. संधी - स्वरसंधी

आपण बोलत असताना अनेक शब्द एकापुढे एक असे उच्चारतो. त्या वेळी एकमेकांशेजारी येणारे दोन वर्ण एकमेकांमध्ये मिसळतात व त्यांचा एक जोडशब्द तयार होतो. उदा. 'सूर्य उदय झाला.' असे न म्हणता 'सूर्योदय झाला.' असे आपण सहज बोलून जातो. 'इति आदी' न म्हणता आपण 'इत्यादी' असा शब्द बनवतो. 'वाक् मय' याच्याऐवजी 'वाङ्मय' असा एक शब्द तयार करून आपण बोलतो.

अशा प्रकारचे जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात व त्या दोहोंबद्दल एक वर्ण तयार होतो. वर्णांच्या अशा एकत्र होण्याच्या प्रकारास संधी असे म्हणतात.

'संधी' म्हणजे सांधणे, जोडणे होय.

## शब्दाची घडण व संधी

शब्दाची घडण कशी होते हे आपण पाहिले आहे. 'ईश्वर' या शब्दाची फोड पुढीलप्रमाणे होईल.

ई + श् + व् + अ + र् + अ

'इच्छा' या शब्दाची फोड पुढीलप्रमाणे होईल.

इ + च् + छ् + आ

ईश्वर या शब्दाचा शेवटचा वर्ण 'अ' आहे. 'इच्छा' या शब्दाचा पहिला वर्ण 'इ' आहे.

ईश्वर + इच्छा असे दोन शब्द शेजारी आल्यावर ईश्वर या शब्दातील शेवटचा वर्ण 'अ' आणि इच्छा या शब्दातील पहिला वर्ण 'इ' एकमेकांमध्ये मिसळतात व जोडशब्द तयार होतो 'ईश्वरेच्छा'. इथे अ + इ = ए असा संधी झाला. सूर्य + अस्त = सूर्यास्त, विद्या + अर्थी = विद्यार्थी अशी आणखी काही उदाहरणे देता येतील.

## संधींचे प्रकार

**स्वरसंधी :-** एकमेकांशेजारी येणारे वर्ण हे जर स्वराने जोडले असतील, तर त्यांना **स्वरसंधी** असे म्हणतात.

स्वर + स्वर असे त्यांचे स्वरूप असते.

उदा. कवि + ईश्वर = (इ + ई = ई) कवीश्वर.

**व्यंजनसंधी :-** जवळजवळ येणाऱ्या या दोन वर्णांपैकी दोन्ही वर्ण व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल, तर त्याला **व्यंजनसंधी** असे म्हणतात. व्यंजन + व्यंजन किंवा व्यंजन + स्वर असे त्याचे स्वरूप असते.

उदा. सत् + जन = (त् + ज) = सज्जन,

चित् + आनंद = (त् + आ) = चिदानंद

**विसर्गसंधी :-** एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असेल, तेव्हा त्यास

**विसर्गसंधी** असे म्हणतात. विसर्ग + व्यंजन किंवा विसर्ग + स्वर असे त्याचे स्वरूप असते.

उदा. तपः + धन = तपोधन = (विसर्ग + ध)

दुः + आत्मा = दुरात्मा = (विसर्ग + आ)

**स्वरसंधी** - आता आपण स्वरसंधींचा अभ्यास करू.

**(१) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| सूर्य + अस्त | अ + अ = आ | सूर्यास्त |
| देव + आलय | अ + आ = आ | देवालय |
| विद्या + अर्थी | आ + अ = आ | विद्यार्थी |
| महिला + आश्रम | आ + आ = आ | महिलाश्रम |
| मुनि + इच्छा | इ + इ = ई | मुनीच्छा |
| गिरि + ईश | इ + ई = ई | गिरीश |
| मही + ईश | ई + ई = ई | महीश |
| गुरु + उपदेश | उ + उ = ऊ | गुरूपदेश |
| भू + उद्धार | ऊ + उ = ऊ | भूद्धार |

**निरीक्षण** :- वरील शब्दांत पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण ऱ्हस्व स्वर किंवा दीर्घ स्वर असून दुसऱ्या शब्दांतील पहिला वर्ण ऱ्हस्व स्वर किंवा दीर्घ स्वर आहे. या दोहोंबद्दल तयार झालेला स्वर हा त्याच प्रकारातील दीर्घ स्वर आहे.

यावरून निघणारा नियम असा :-

**नियम :- ऱ्हस्व स्वरापुढे किंवा दीर्घ स्वरापुढे तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ आल्यास म्हणजेच दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास त्या दोहोंबद्दल त्याच जातीतील एकच दीर्घ स्वर येतो. यालाच सजातीय स्वरसंधी असे म्हणतात.**

**(२) आता आपण पुढील शब्दांचे संधी पाहू या.**

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| ईश्वर + इच्छा | अ + इ = ए | ईश्वरेच्छा |
| गण + ईश | अ + ई = ए | गणेश |
| उमा + ईश | आ + ई = ए | उमेश |
| चंद्र + उदय | अ + उ = ओ | चंद्रोदय |
| महा + उत्सव | आ + उ = ओ | महोत्सव |
| देव + ऋषि | अ + ऋ = अर् | देवर्षि |
| महा + ऋषि | आ + ऋ = अर् | महर्षि |

**निरीक्षण** :- वरील शब्दांत, पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण ऱ्हस्व स्वर किंवा दीर्घ स्वर असून दुसऱ्या शब्दाचा पहिला स्वर हा दुसऱ्या प्रकारच्या स्वरांचा ऱ्हस्व स्वर किंवा दीर्घ स्वर आहे. त्यातून त्या दोहोंबद्दल येणारा स्वर पुढीलप्रमाणे आहे.

अ + इ = ए, अ + ई = ए, आ + ई = ए, अ + उ = ओ, आ + उ = ओ, अ + ऋ = अर्, आ + ऋ = अर्

यावरून निघणारा नियम असा -

**नियम :- अ किंवा आ यांच्यापुढे इ किंवा ई आल्यास त्या दोहोंऐवजी 'ए' येतो, अ किंवा आ यांच्यापुढे उ किंवा ऊ आल्यास 'ओ' येतो, आणि अ किंवा आ यांच्यापुढे 'ऋ' आल्यास त्या दोहोंऐवजी अर् येतो.**

**टीप :** याला संस्कृतमध्ये गुण असे म्हणतात. तसेच एका वर्णाच्या जागी दुसरा वर्ण येणे याला आदेश असे म्हणतात. अ किंवा आ या स्वरांपुढे इ, उ, ऋ (ऱ्हस्व किंवा दीर्घ) आल्यास त्या वर्णांबद्दल अनुक्रमे ए, ओ, अर् असे वर्ण येणे याला गुणादेश असे म्हणतात.

**(३) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| एक + एक | अ + ए = ऐ | एकैक |
| मत + ऐक्य | अ + ऐ = ऐ | मतैक्य |
| सदा + एव | आ + ए = ऐ | सदैव |
| प्रजा + ऐक्य | आ + ऐ = ऐ | प्रजैक्य |
| जल + ओघ | अ + ओ = औ | जलौघ |
| गंगा + ओघ | आ + ओ = औ | गंगौघ |
| वृक्ष + औदार्य | अ + औ = औ | वृक्षौदार्य |

**निरीक्षण :-** वरील शब्दांत अ किंवा आ यांच्यापुढे ए, ऐ असे वर्ण आले असता ऐ हा स्वर तयार झाला आहे; तर अ किंवा आ या स्वरांपुढे ओ, औ असे स्वर आले असता औ असा स्वर तयार झाला आहे. थोडक्यात, अ + ए = ऐ

अ + ऐ = ऐ

अ + ओ = औ

आ + ए = ऐ　　　　आ + ऐ = ऐ

आ + ओ = औ　　　　अ + औ = औ

यावरून पुढील नियम निघतो.

**नियम :- अ किंवा आ यांच्यापुढे ए किंवा ऐ हे स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल ऐ येतो आणि अ किंवा आ या स्वरांपुढे ओ किंवा औ हे स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल औ हा स्वर येतो.**

**टीप :-** याला 'वृद्ध्यादेश' (वृद्धि + आदेश) असे म्हणतात.

(४) पुढील शब्दांचे संधी पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| प्रीति + अर्थ | इ + अ = य् + अ = य | प्रीत्यर्थ |
| इति + आदी | इ + आ = य् + आ = या | इत्यादी |
| अति + उत्तम | इ + उ = य् + उ = यु | अत्युत्तम |
| प्रति + एक | इ + ए = य् + ए = ये | प्रत्येक |
| मनु + अंतर | उ + अ = व् + अ = व | मन्वंतर |
| सु + अल्प | उ + अ = व् + अ = व | स्वल्प |
| पितृ + आज्ञा | ऋ + आ = र् + आ = रा | पित्राज्ञा |

**निरीक्षण :-** वरील शब्दांत इ, उ, ऋ यांच्यापुढे किंवा त्याच प्रकारच्या दीर्घ स्वरांपुढे अ, उ, ए असे विजातीय स्वर आले आहेत व त्या दोहोंबद्दल म्हणजे इ, ई बद्दल 'य्' हा वर्ण आला व त्यात पुढील स्वर मिसळला, तसेच उ, ऊ बद्दल 'व्' हा वर्ण आला व त्यात पुढील स्वर मिसळला आणि ऋ बद्दल र् हा वर्ण येऊन त्यात पुढील स्वर मिसळला आहे.

**थोडक्यात,** इ + अ = य् + अ = य
इ + आ = य् + आ = या
इ + उ = य् + उ = यु
इ + ए = य् + ए = ये
उ + अ = व् + अ = व
ऋ + अ = र् + अ = र

यावरून पुढील नियम निघतो.

**नियम :- इ, उ, ऋ (ऱ्हस्व किंवा दीर्घ) यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास इ - ई बद्दल 'य्' हा वर्ण येऊन पुढील स्वर त्यात मिसळतो, उ - ऊ बद्दल 'व्' हा वर्ण येऊन पुढील स्वर त्यात मिसळतो आणि ऋ बद्दल 'र्' हा वर्ण येऊन त्यात पुढील स्वर मिसळतो व संधी होतो.**

**टीप :-** इ, उ, ऋ यांबद्दल अनुक्रमे य्, व्, र् असे आदेश होतात. त्यांना **यणादेश** (यण् + आदेश) असे म्हणतात. य्, व्, र् यांच्याबद्दल अनुक्रमे इ, उ, ऋ आल्यास **संप्रसारण** म्हणतात.

**उदा.** येथे - इथे, नव - नऊ, गायी - गाई, सोयी - सोई.

पुढील शब्द पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| ने + अन | ए + अ = अय् + अ = अय | नयन |
| गै + अन | ऐ + अ = आय् + अ = आय | गायन |
| गो + ईश्वर | ओ + ई = अव् + ई = अवी | गवीश्वर |
| नौ + इक | औ + इ = आव् + इ = आवि | नाविक |

**नियम :- इथे शब्दाच्या अखेरीस ए, ऐ, ओ, औ हे स्वर आहेत. दुसऱ्या शब्दाच्या प्रारंभीचे स्वर अ, ई हे आहेत. त्याबद्दल 'अय्', 'आय्', 'अवी', 'आवि' असे वर्ण येतात. उच्चार आणि संधिनियम यांचा परस्परसंबंध लक्षात घेतला, तर हे बदल किती नैसर्गिक आहेत, हे लक्षात येईल.**

**थोडक्यात,** ए + अ = अय् + अ = अय

ऐ + अ = आय् + अ = आय

ओ + इ = अव् + ई = अवी

औ + इ = आव् + इ = आवि

**याबद्दलचा नियम असा -**

१) ए, ऐ, ओ, औ या स्वरांपुढे कोणताही स्वर आला, तर त्यांबद्दल अनुक्रमे अय्, आय्, अव्, आव् असे आदेश होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

२) इ, उ, ऋ (ऱ्हस्व किंवा दीर्घ) यांना होणारे आदेश थोडक्यात पुढील तक्त्यात दिले आहेत.

| स्वर | दीर्घादेश | गुणादेश | वृद्ध्यादेश | यणादेश |
|---|---|---|---|---|
| अ, आ | - | - | आ | - |
| इ, ई | ई | ए | ऐ | य् |
| उ, ऊ | ऊ | ओ | औ | व् |
| ऋ | - | अर् | आर् | र् |

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **संधींचे मुख्य किती प्रकार पडतात?** ①②③④

1) चार 2) दोन 3) तीन 4) पाच

2) **पुढीलपैकी स्वरसंधी झालेला शब्द ओळखा.** ①②③④

1) राजाज्ञा 2) षट्शास्त्र
3) यशोधन 4) तेजोनिधी

3) **पुढीलपैकी स्वरसंधी झालेला शब्द ओळखा.** ①②③④

1) गवीश्वर 2) नाविक
3) नयन 4) सर्व पर्याय

4) **पुढीलपैकी स्वरसंधी झालेला शब्द ओळखा.** ①②③④

1) अधोवदन 2) वाक्पति
3) गायन 4) सर्व पर्याय

5) **संधी करा.** ①②③④

**महिला + आश्रम**

1) महिलाश्रम 2) महीलाआश्रम
3) महिलाआश्रम 4) महिलोश्रम

6) **संधी करा.** ①②③④

**नौ + इक**

1) नावीक 2) नौइक 3) नौका 4) नाविक

7) **संधी करा.** ①②③④

**सदा + ऐव**

1) सदाऐव 2) सदैव 3) सदौएव 4) सदौव

8) **'भूद्धार' या संधीचा विग्रह करा.** ①②③④

1) भु + द्धार 2) भू + द्धार

3) भू + उद्धार　　4) भू + उद्धार

9) पुढीलपैकी 'सजातीय स्वरसंधीचे' उदाहरण शोधा. ①②③④

1) गुरूपदेश　　2) चंद्रोदय

3) नाविक　　4) नयन

10) पुढीलपैकी 'यणादेश' झालेले स्वरसंधीचे उदाहरण कोणते? ①②③④

1) सदैव　　2) वृक्षौदार्य

3) प्रीत्यर्थ　　4) एकैक

11) पुढीलपैकी 'गुणादेश स्वरसंधी' झालेला पर्याय निवडा. ①②③④

1) मन्वंतर　2) सूर्यास्त　3) भूध्दार　4) उमेश

12) पुढीलपैकी पर्यायांपैकी 'वृध्द्यादेश स्वरसंधी'चा पर्याय ओळखा. ①②③④

1) सदैव　2) गायन　3) गवीश्वर　4) सर्व

13) पुढील संधीविग्रहावरून शब्द ओळखा.

गंगा + ओघ ①②③④

1) गंगेओघ　　2) गंगाओघ

3) गंगौघ　　4) गंगाऔघ

14) पुढील संधीविग्रहावरून शब्द ओळखा.

गण + ईश ①②③④

1) गणइश　　2) गणाश

3) गणीश　　4) गणेश

15) पुढील संधीविग्रहावरून शब्द ओळखा.

अन्य + उक्ती ①②③④

1) अन्यउक्ती　　2) अन्योक्ती

3) अन्यऊक्ती　　4) अन्यौक्ती

16) पुढील संधीविग्रहावरून शब्द ओळखा.

स्वभाव + अनुसार ①②③④

1) स्वभावनुसार　　2) स्वभावआनुसार

3) स्वभावानुसार　　4) स्वभावाअनूसार

17) पुढील संधीविग्रहावरून शब्द ओळखा.

किती + एक ①②③④

1) कितीएक　　2) कीतीएक

3) कित्येक　　4) कीत्येक

18) 'मदांध' संधी शब्दाचा विग्रह काय होईल? ①②③④

1) मंद + आग्रह　　2) मंद + अंध

3) मद + अंध　　4) मंदः + अंधः

19) 'अति + उत्तम' विग्रहावरून संधी ओळखा. ①②③④

1) अतिउत्तम　　2) अतीउत्तम

3) अत्युत्तम　　4) अतितम

20) संधी करताना 'इच्छा' या शब्दाची फोड कशी होईल? ①②③④

1) इ + अ + च् + अ् + छ् + अ

2) ई + च् + अ + छ् + अ

3) इ + च् + छ् + आ

4) ई + च् + छ् + अ

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 6 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 1 | 3) 4 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 4 | 7) 2 | 8) 3 | 9) 1 | 10) 3 |
| 11) 4 | 12) 1 | 13) 3 | 14) 4 | 15) 2 |
| 16) 3 | 17) 3 | 18) 3 | 19) 3 | 20) 3 |

# ७. संधी-व्यंजनसंधी-विसर्गसंधी

## व्यंजनसंधी

आपण मागील पाठात संधी म्हणजे काय याचा अभ्यास केला. आपण बोलताना अनेक शब्द एकापुढे एक असे उच्चारतो. त्या वेळी एकमेकांशेजारी येणारे दोन वर्ण एकमेकांमध्ये मिसळतात व त्यांचा एक जोडशब्द तयार होतो. वर्णांच्या अशा एकत्र होण्याच्या प्रकारास **संधी** असे म्हणतात. संधी होताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात व त्या दोहोंबद्दल एक वर्ण तयार होतो. संधी म्हणजे सांधणे, जोडणे होय.

जवळ जवळ येणाऱ्या दोन वर्णांपैकी दोन्ही व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल, तेव्हा त्याला **व्यंजनसंधी** असे म्हणतात. व्यंजन + व्यंजन किंवा व्यंजन + स्वर असे त्याचे स्वरूप असते.

### व्यंजनसंधी - आपण व्यंजनसंधी या प्रकाराचा अभ्यास करू या.

(१) पुढील शब्दांचे संधी पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| विपद् + काल | द् + क् = त् + क् = त्क् | विपत्काल |
| वाग् + पति | ग् + प् = क् + प् = क्प् | वाक्पति |
| वाग् + ताडन | ग् + त् = क् + त् = क्त् | वाक्ताडन |
| षड् + शास्त्र | ड् + श् = ट् + श् = ट्श् | षट्शास्त्र |
| क्षुध् + पिपासा | ध् + प् = त् + प् = त्प् | क्षुत्पिपासा |

**निरीक्षण :-** वरील शब्दांमध्ये, पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण हा पहिल्या पाच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय असणारे व्यंजन आहे. दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण कठोर व्यंजन आहे. संधी होताना पहिल्या व्यंजनाच्या ठिकाणी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी झाला आहे.

याबाबतचा नियम असा -

**नियम :- पहिल्या पाच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो. याला प्रथम-व्यंजन-संधी असे म्हणतात.**

**(२) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| वाक् + ईश्वरी | क् + ई = ग् + ई = गी | वागीश्वरी |
| वाक् + विहार | क् + व् = ग् + व् = ग्व् | वाग्विहार |
| षट् + रिपू | ट् + र् = ड् + र् = ड्र | षड्रिपू |
| सत् + आचार | त् + आ = द् + आ = दा | सदाचार |
| अच् + आदी | च् + आ = ज् + आ = जा | अजादी |
| अप् + ज | प् + ज् = ब् + ज् = ब्ज् | अब्ज |

**निरीक्षण :-** वरील शब्दांमध्ये पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण पहिल्या पाच वर्गातील कठोर वर्ण आहे. त्याच्यापुढे पुढील शब्दातील पहिला वर्ण स्वर किंवा अनुनासिकाशिवाय मृदू व्यंजन आले आहे. संधी होताना पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी झाला आहे.

याबाबतचा नियम असा -

**नियम :- पहिल्या पाच वर्गातील कठोर व्यंजनापुढे स्वर किंवा अनुनासिकाखेरीज मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो. याला तृतीय-व्यंजन-संधी असे म्हणतात.**

**(३) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| वाक् + निश्चय | क् + न् = ङ् + न् | वाङ्निश्चय |
| षट् + मास | ट् + म् = ण् + म् | षण्मास |
| जगत् + नाथ | त् + न् = न् + न् | जगन्नाथ |
| सत् + मती | त् + म् = न् + म् | सन्मती |

**निरीक्षण :-** वरील शब्दांमध्ये पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण हा व्यंजन आहे आणि दुसऱ्या शब्दाचा पहिला वर्ण हा अनुनासिक आहे. संधी होताना पहिले व्यंजन ज्या वर्गातील आहे, त्या वर्गातील अनुनासिक हे त्या व्यंजनाबद्दल येते.

याबाबतचा नियम असा -

**नियम :- पहिल्या पाच वर्गातील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो. याला 'अनुनासिक संधी' असे म्हणतात.**

(४) पुढील शब्दांतील संधी पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| सत् + चरित्र | त् + च् = च् + च् | सच्चरित्र |
| उत् + छेद | त् + छ् = च् + छ् | उच्छेद |
| सत् + जन | त् + ज् = ज् + ज् | सज्जन |
| तत् + टीका | त् + ट् = ट् + ट् | तट्टिका |
| उत् + लंघन | त् + ल् = ल् + ल् | उल्लंघन |
| सत् + शिष्य | त् + श् = च् + छ् | सच्छिष्य |

**याबाबतचा नियम असा -**

त् या व्यंजनापुढे -

(१) च् छ् आल्यास त् बद्दल च् होतो.

(२) ज् झ् आल्यास त् बद्दल ज् होतो.

(३) ट् ठ् आल्यास त् बद्दल ट् होतो.

(४) ल् आल्यास त् बद्दल ल् होतो.

(५) श् आल्यास त् बद्दल च् होतो व श् बद्दल छ् होतो.

**(५) नियम :- 'म्' पुढे स्वर आल्यास तो स्वर मागील 'म्' मध्ये मिसळून जातो. व्यंजन आल्यास 'म्' बद्दल मागील अक्षरावर अनुस्वार किंवा शीर्षबिंदू येतो.**

**जसे -** सम् + आचार = समाचार

सम् + गती = संगती

**(६) नियम :- 'छ्' पूर्वी ऱ्हस्व स्वर आला, तर त्या दोहोंमध्ये 'च्' हा वर्ण येतो.**

**जसे -** रत्न + छाया = रत्नच्छाया

शब्द + छल = शब्दच्छल

## विसर्गसंधी

आता आपण विसर्गसंधी या संधीच्या प्रकाराचा अभ्यास करू या.

विसर्ग हा स्वतंत्र स्वर नसून तो स्वरादी आहे, हे आपण पाहिले. त्यामुळे कोणत्यातरी स्वरानंतर तो येतो. जसे अ + विसर्ग = अः

विसर्गसंधीमध्ये एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो, तेव्हा त्याला विसर्गसंधी असे म्हणतात.

उदा. - मनः + रंजन = मनोरंजन

नः + रं

न् + अ + विसर्ग + र् + अ+ अनुस्वार

म्हणजे विसर्ग + र् असे वर्ण इथे एकत्र आले व मनोरंजन असा जोडशब्द तयार झाला.

(१) पुढील शब्दांचे संधी पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर, विसर्ग व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| यशः + धन | श् + अ + विसर्ग + धन = श् + ओ + धन | यशोधन |
| मनः + रंजन | न् + अ + विसर्ग + रंजन = न् + ओ + रंजन | मनोरंजन |
| अधः + वदन | ध् + अ + विसर्ग + वदन = ध् + ओ + वदन | अधोवदन |
| तेजः + निधी | ज् + अ + विसर्ग + निधी = ज् + ओ + निधी | तेजोनिधी |

**निरीक्षण :-** वरील शब्दांमध्ये शेवटी विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर आला आहे. (अ + विसर्ग = अः) दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण मृदू व्यंजन आले आहे. त्यामुळे विसर्गाचा 'उ' झाला व तो मागील 'अ'मध्ये मिसळला. (अ + उ = ओ) व त्याचा ओ स्वर होऊन तो त्यातील व्यंजनामध्ये मिसळला. उदा. यशः या शब्दातील 'श + अ + विसर्ग' असा पहिल्या शब्दातील अखेरचा वर्ण आहे. त्यातील 'श्'मध्ये ओ (अ + उ = ओ) मिसळला व 'शो' असे त्याचे रूप झाले.

जसे, यश + उ + धन = यशोधन

मन + उ + रंजन = मनोरंजन

**नियम :- विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा 'उ' होतो व तो मागील 'अ'मध्ये मिसळून त्याचा 'ओ' होतो. याला 'विसर्ग-उकार-संधी' असे म्हणतात.**

(२) पुढील शब्दांचे संधी पाहा.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर, विसर्ग व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| निः + अंतर | (न्) + इ + विसर्ग + अं = (नि) रं | निरंतर |
| दुः + जन | (द्) + उ + विसर्ग + जन = (दु) र्ज | दुर्जन |
| बहिः + अंग | (ह्) + इ + विसर्ग + अं = (हि) रं | बहिरंग |

**निरीक्षण :-** वरील शब्दांमध्ये शेवटी विसर्गाच्या मागे अ, आ यांच्याखेरीज कोणताही स्वर आला आहे व पुढे मृदू वर्ण आहे. या ठिकाणी विसर्गाचा 'र' होऊन तो पुढील वर्णात मिसळून संधी झाला आहे.

जसे, दुः + जन = दुर्जन, बहिः + अंग = बहिरंग

याबाबतीत आपल्याला नियम असा सांगता येईल.

**नियम :- विसर्गाच्या मागे अ आणि आ यांच्याखेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा 'र्' होऊन संधी होतो. या संधीच्या प्रकाराला 'विसर्ग-र्-संधी' असे म्हणतात.**

आता पुढील शब्दांचे संधी पाहा.

निः + रस = नि + र् + रस = नीरस

निः + रव = नि + र् + रव = नीरव

इथे मागील नियमाप्रमाणे विसर्गाचा र् झाला. पण अशा 'र्'च्या पुढे 'र' हा वर्ण आल्यास 'र'चा लोप

होतो व त्याच्यामागील स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो. इथे नि + र् + रस यातील 'र्'चा लोप होऊन त्याचा 'नि' दीर्घ झाला आहे.

**(३) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

मनस् + पटल = मनःपटल　　तेजस् + कण = तेजःकण

**नियम :- पदाच्या शेवटी 'स' येऊन त्याच्यापुढे कोणतेही व्यंजन आल्यास 'स्'चा विसर्ग होतो.**

**(४) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

अंतर् + करण = अंतःकरण　　चतुर् + सूत्री = चतुःसूत्री

**नियम :- पदाच्या शेवटी 'र्' येऊन त्याच्यापुढे कठोर व्यंजन आल्यास त्या 'र्'चा विसर्ग होतो.**

**(५) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

पुनर् + जन्म = पुनर्जन्म　　अंतर् + आत्मा = अंतरात्मा

**नियम :- विसर्गाच्या ऐवजी येणाऱ्या 'र्'च्या मागे 'अ' व पुढे मृदू वर्ण आल्यास तो 'र्' तसाच राहून संधी होतो.**

**(६) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

प्रातः + काल = प्रातःकाल　　तेजः + पुंज = तेजःपुंज

इतः + उत्तर = इतउत्तर　　अतः + एव = अतएव

**नियम :- विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर असून पुढे क्, ख्, प्, फ् यांपैकी एखादे व्यंजन आले, तर विसर्ग कायम राहतो. मात्र पुढे अन्य स्वर आला, तर विसर्ग लोप पावतो.**

**(७) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

निः + कारण = निष्कारण　　निः + पाप = निष्पाप

दुः + परिणाम = दुष्परिणाम　　दुः + कृत्य = दुष्कृत्य

**नियम :- विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून पुढे क्, ख्, प्, फ यांपैकी कोणताही वर्ण आल्यास विसर्गाचा ष् होतो.**

जसे, निष्कर्ष, निष्पत्र, दुष्कीर्ती, आयुष्क्रम, चतुष्कोण, बहिष्कृत

(अपवाद - दुः + ख = दुःख, निः + पक्ष = निःपक्ष)

**(८) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

निः + चल = निश्चल　　दुः + चिन्ह = दुश्चिन्ह

मनः + ताप = मनस्ताप　　निः + तेज = निस्तेज

**नियम :- विसर्गाच्या पुढे च्, छ् आल्यास विसर्गाचा 'श्' होतो आणि त्, थ् आल्यास विसर्गाचा 'स्' होतो.**

**(९) पुढील शब्दांचे संधी पाहा.**

दुः + शासन = दुःशासन

निः + संदेह = निःसंदेह

**नियम :- विसर्गाच्या पुढे श्, स् आल्यास विसर्ग विकल्पाने कायम राहतो किंवा लोप पावतो. जसे - चतुःशृंगी, पुरःसर, प्रातःस्मरण, अंतस्थ.**

## मराठीचे विशेष संधी

वाक्यात येणाऱ्या शब्दाशब्दांत संधी करण्याकडे संस्कृत भाषेची प्रवृत्ती अधिक आहे. मराठीचा कल संधी करण्याकडे नाही. मराठीत संस्कृत भाषेतून जसेच्या तसे आलेले (म्हणजे तत्सम) शब्द बरेच आहेत. ते एकत्र आले की त्यांचा संधी होतो. संस्कृतप्रमाणे वाक्यांतर्गत संधी मराठीत करत नाहीत. उदा. हिराच्या आईने उत्तमला एक आंबा दिला. या वाक्यात अनेक स्वर एकमेकांपुढे आलेले असूनही त्यांचा संधी झाल्याचे आढळत नाही. मात्र

(१) मराठीत कधी-कधी दोन स्वर एकापुढे एक आले असता त्यांतील पहिला स्वर (= पूर्व स्वर) न बदलता तसाच राहतो व दुसरा स्वर लोप पावतो.

उदा. काही + असा = काहीसा, केले + असे = केलेसे, खिडकी + आत = खिडकीत, नदी + आत = नदीत, किती + एक = कितीक, लाडू + आत = लाडूत

अशा प्रकारच्या संधीला **पूर्वरूप संधी** असे म्हणतात.

(२) कधी-कधी मराठी शब्दांचा संधी होताना पहिल्या पदातील शेवटचा स्वर लोप पावतो व दुसरा स्वर (= पर स्वर) कायम राहून संधी होतो. याला **पररूप संधी** असे म्हणतात.

उदा. घर + ई = घरी, न + उमजे = नुमजे,
घाम + ओळे = घामोळे, कर + ऊन = करून
एक + एक = एकेक, सांग + एन = सांगेन

(३) दीर्घ स्वरापुढे येणाऱ्या स्वराचा मागील स्वराशी बहुतकरून संधी होत नाही.

उदा. जा + ऊन = जाऊन, घे + ईल = घेईल, हो + ऊ = होऊ

(४) 'ही' या शब्दयोगी अव्ययाचा संख्याविशेषणाशी दोन प्रकारांनी संधी होतो.

(अ) 'ह'चा लोप न होता जसे - दोन + ही = दोन्ही (तिन्ही, चाऱ्ही)

(ब) 'ह'चा लोप होऊन जसे - दोन + ही = दोनी, (तिनी, चारी)

(५) अनुरूप, अनुसार यांसारखे शब्द जोडताना मागील शब्दाचे सामान्यरूप होऊन मग पूर्वरूप संधी होतो.

जसे - गरज + अनुरूप = गरजेनुरूप, पद्धती + अनुसार = पद्धतीनुसार

(६) शब्दांचा उच्चार करताना गडबडीमुळे काही वर्ण एकमेकांत मिसळतात. यातूनच संधीचा जन्म होतो. संधी हे मुख्यतः तत्सम शब्दांच्या बाबतीत होतात. तरीही बोलण्याच्या ओघात मराठीत काही शब्द एकमेकांत मिसळून नवीन रूपे तयार होतात.

जसे - येतो + आहे = येतोहे, येतोय
गेली + आहे = गेलीहे, गेलीय
बसला + आहात = बसलाहात = बसलात,
मी + होऊन तुझ्याकडे आलो + आहे = मी हून तुझ्याकडे आलोय.

एका अर्थाने हे मराठीतील संधीच आहेत. बोल भाषेत ते प्रामुख्याने पाहायला मिळतात.

पुढे काही संधींची उदाहरणे दिलेली आहेत, त्यांचा अभ्यास करा. कोणत्या नियमांनी ते झाले आहेत ते शोधा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ज्ञान + ईश्वर | = | ज्ञानेश्वर | अन्य + उक्ती | = | अन्योक्ती |
| सूर्य + उदय | = | सूर्योदय | चंद्र + अस्त | = | चंद्रास्त |
| मनुष्य + इतर | = | मनुष्येतर | अल्प + आहार | = | अल्पाहार |
| सह + अनुभूती | = | सहानुभूती | परि + ईक्षा | = | परीक्षा |
| प्रश्न + उत्तर | = | प्रश्नोत्तर | दीर्घ + उत्तरी | = | दीर्घोत्तरी |
| लघू + उत्तरी | = | लघूत्तरी | वन + औषधी | = | वनौषधी |
| पर + उपकार | = | परोपकार | प्रति + अंतर | = | प्रत्यंतर |
| हर + एक | = | हरेक | चिंता + आतुर | = | चिंतातुर |
| प्रति + अक्ष | = | प्रत्यक्ष | नील + आकाश | = | नीलाकाश |
| धारा + उष्ण | = | धारोष्ण | लंका + अधिपती | = | लंकाधिपती |
| अयोध्या + ईश | = | अयोध्येश | गुरू + आज्ञा | = | गुर्वाज्ञा |
| जगत् + ईश्वर | = | जगदीश्वर | वि + आसंग | = | व्यासंग |
| जगत् + जीवन | = | जगज्जीवन | भगवत् + भक्ती | = | भगवद्भक्ती |
| भगवत् + गीता | = | भगवद्गीता | भगवत् + नाम | = | भगवन्नाम |
| भाषा + अंतर | = | भाषांतर | हेतु + आभास | = | हेत्वाभास |
| मत् + माता | = | मन्माता | सम् + आलोचन | = | समालोचन |
| दिक् + अंतर | = | दिगंतर | पुन्र + आगमन | = | पुनरागमन |
| यथा + इष्ट | = | यथेष्ट | आयुः + वेद | = | आयुर्वेद |
| निः + इच्छ | = | निरिच्छ | धनुः + वात | = | धनुर्वात |
| अंतः + गत | = | अंतर्गत | उत् + ज्वल | = | उज्ज्वल |
| सत् + मती | = | सन्मती | सत् + चित् + आनंद | = | सच्चिदानंद |
| गण + ईश + उत्सव | = | गणेशोत्सव | | | |

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) व्यंजनसंधी केव्हा होतो? ①②③④

1) व्यंजन + स्वर 2) व्यंजन + व्यंजन
3) स्वर + व्यंजन 4) पर्याय 1 व 2

2) पुढीलपैकी 'पूर्वरूप संधी'चे उदाहरण ओळखा. ①②③④

1) काहीसा 2) खिडकीत
3) केलेसे 4) सर्व पर्याय

3) पुढीलपैकी 'पररूप संधी'चे उदाहरण ओळखा. ①②③④

1) करून 2) लाडूत
3) होऊ 4) गरजेनुरूप

4) पुढीलपैकी प्रथम-व्यंजन-संधीचे उदाहरण शोधा. ①②③④

1) सन्मती 2) अजादी
3) षट्शास्त्र 4) सर्व पर्याय

5) 'व्यंजन संधी' करताना 'छ' पूर्वी ऱ्हस्व स्वर आला, तर त्या दोहोंमध्ये '...............' हा वर्ण येतो. ①②③④

1) च् 2) ज् 3) झ् 4) ञ्

6) पुढीलपैकी 'व्यंजनसंधी' चा पर्याय ओळखा. ①②③④

1) महोत्सव 2) मतैक्य
3) वाक्ताडन 4) राजेश

7) पुढीलपैकी 'व्यंजनसंधी' चा पर्याय ओळखा. ①②③④

1) सूर्यास्त 2) सदाचार
3) मनोरंजन 4) विद्यामृत

8) पुढीलपैकी 'व्यंजनसंधी' चा पर्याय ओळखा. ①②③④

1) चंद्रोदय 2) अधोवदन
3) वाचनालय 4) अब्ज

9) पुढीलपैकी 'विसर्गसंधी'चा पर्याय शोधा. ①②③④

1) भूद्वार 2) शब्दच्छल
3) निस्तेज 4) सन्मती

10) पुढीलपैकी 'विसर्गसंधी'चा पर्याय शोधा. ①②③④

1) गिरीश 2) निरंतर
3) रत्नच्छाया 4) उच्छेद

11) संधी करा. ①②③④

निः + चल

1) नी:श्चल 2) निश्चल
3) नीश्चल 4) नि:श्चल

12) संधी करा. ①②③④

अंतर् + करण

1) अंतराकरण 2) अतं:करण
3) अंत:करण 4) अंतरकरण

13) संधी करा. ①②③④

यशः + धन

1) यशोधन 2) यश:धन
3) यशो:धन 4) यशधन

14) पुढील शब्दांचा विग्रह सांगा. ①②③④

अब्ज

1) अब+ज 2) अब् + ज्
3) अप् + ज 4) अबज्+अ

15) 'संतोष' या शब्दाचा संधी विग्रह सांगा. ①②③④

1) सम् + तोष 2) समा् + तोष
3) सम + आतोष 4) सम + तोष

16) पुढीलपैकी संधींच्या नियमानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

1) प्रात:काल 2) अतएव
3) इतउत्तर 4) सांगेन

17) पुढीलपैकी 'विसर्ग-उकार-संधी' चे उदाहरण कोणते? ①②③④

1) उल्लंघन 2) षण्मास

3) सदाचार 4) यशोधन

18) 'सम्+गती' संधी ओळखा. ①②③④

1) स्वरसधी 2) व्यंजनसंधी

3) विशेषसंधी 4) विसर्गसंधी

19) 'मनोरंजन' शब्दाचा संधी विग्रह कोणता होईल? ①②③④

1) मनोः + रंजन 2) मन + रंजन

3) मनः + रंजन 4) मनो + रंजन

20) 'दुः + शासन' संधी झालेला शब्द ओळखा. ①②③④

1) दूःशास्यन 2) दुशासन

3) दुःशासन 4) दुःशास्श्न

21) पुढीलपैकी 'व्यंजनसंधी' चा पर्याय ओळखा. ①②③④

1) निरंतर 2) अधोवदन

3) षट्शास्त्र 4) गणेश

22) संधी करा. शब्द + छल ①②③④

1) शब्दछल 2) शब्दोच्छल

3) शब्दच्छल 4) शब्दोउच्छल

23) 'बहिरंग' हा कोणता संधी प्रकार आहे? ①②③④

1) विसर्गसंधी 2) व्यंजनसंधी

3) स्वरसंधी 4) विशेषसंधी

24) 'षण्मास' हा कोणता संधी प्रकार आहे? ①②③④

1) स्वरसंधी 2) विशेषसंधी

3) व्यंजनसंधी 4) विसर्गसंधी

▶▶ सराव प्रश्नसंग्रह 7 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 4 | 2) 4 | 3) 1 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 3 | 7) 2 | 8) 4 | 9) 3 | 10) 2 |
| 11) 2 | 12) 3 | 13) 1 | 14) 3 | 15) 1 |
| 16) 4 | 17) 4 | 18) 2 | 19) 3 | 20) 3 |
| 21) 3 | 22) 3 | 23) 1 | 24) 3 | |

# ८. शब्दविचार

## शब्द आणि पद

आता आपण शब्दांचा अभ्यास करू या. तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण वर्ण असे म्हणतो. हे ध्वनी कागदावर लिहून दाखविताना आपण विशिष्ट चिन्हे वापरतो. ध्वनींच्या चिन्हांना आपण अक्षरे असे म्हणतो. ब, द, क ही तीन अक्षरे आहेत. ही अक्षरे विशिष्ट क्रमाने आल्यामुळे त्यांना अर्थ प्राप्त झाला आहे, म्हणून 'बदक' हा शब्द तयार झाला.

एखाद्या शब्दाला किंवा शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाला, तर त्याला आपण वाक्य असे म्हणतो. 'बदक पाण्यात पोहते.' हे वाक्य आहे. या वाक्यात तीन पदे आहेत. पद व शब्द यांत थोडा फरक आहे. 'पाणी' हा शब्द आहे. 'पाण्यात' हे पद आहे. वाक्यात वापरताना शब्दाच्या मूळ स्वरूपात बदल करून त्या शब्दाचे जे रूप तयार होते, त्यास **पद** असे म्हणतात, पण व्याकरणात पदांनादेखील स्थूलमानाने **शब्द** असे म्हटले जाते. 'स्वातीने' हे पद आहे. यात मूळ शब्द 'स्वाती' आहे. मूळ शब्दाला व्याकरणात 'प्रकृती' असे म्हणतात. 'ने' हा प्रत्यय आहे. इथे शब्दाच्या मूळ रूपाला म्हणजे प्रकृतीला 'ने' हा प्रत्यय लागून 'स्वातीने' हे जे रूप झाले त्याला 'विकृती' असे म्हणतात. विकृती म्हणजे शब्दाच्या मूळ रूपाचे बदललेले रूप. यालाच 'पद' असे म्हणतात. वाक्य हे शब्दांचे किंवा पदांचे बनलेले असते. या शब्दांची वाक्यात कोणकोणती कार्ये असतात, त्यांचा आपण अभ्यास करू या.

## शब्दांच्या जाती

शब्दांच्या जाती म्हणजे शब्दांचे प्रकार. वाक्यात वर उल्लेख केल्यासारखे जे शब्द येतात त्यांची कार्ये विविध प्रकारची असतात. त्या शब्दांच्या वाक्यातील कार्यावरून त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आलेली आहेत.

(१) वाक्यात येणाऱ्या शब्दांपैकी जे शब्द प्रत्यक्षात असलेल्या किंवा काल्पनिक वस्तूंची किंवा त्यांच्या गुणांची नावे असतात, त्यांना **नामे** असे म्हणतात. उदा. फूल, हरी, गोडी इत्यादी.

(२) जे शब्द कोणत्याही प्रकारच्या नामांच्या ऐवजी येतात, त्यांना **सर्वनामे** असे म्हणतात. उदा. मी, तू, हा, जो, कोण इत्यादी.

(३) जे शब्द नामाबद्दल अधिक माहिती सांगतात व त्यांचे क्षेत्र मर्यादित करतात, त्यांना **विशेषणे** असे म्हणतात. उदा. कडू, गोड, दहा, त्याचा इत्यादी.

(४) जे शब्द क्रिया दाखवून वाक्याचा अर्थ पूर्ण करतात त्यांना **क्रियापदे** असे म्हणतात. उदा. बसतो, जाईल, आहे इत्यादी.

(५) जे शब्द क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगतात त्यांना **क्रियाविशेषणे** असे म्हणतात. उदा. आज, काल, तिथे, फार इत्यादी.

(६) जे शब्द नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात व वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवितात त्यांना **शब्दयोगी अव्यय** म्हणतात. उदा. झाडाखाली, तिच्याकरिता, त्यासाठी इत्यादी.

(७) जे शब्द दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडतात, त्यांना **उभयान्वयी अव्यय** असे म्हणतात.

उदा. व, आणि, परंतु, म्हणून इत्यादी.

(८) जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना **केवलप्रयोगी अव्यय** असे म्हणतात. उदा. शाब्बास, अबब, अरेरे इत्यादी.

वाक्यात येणाऱ्या शब्दांचे असे **आठ प्रकार** आहेत. त्यांनाच शब्दांच्या आठ जाती असे म्हणतात. शब्दांच्या आठ जाती म्हणजे शब्दांची आठ कार्ये. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी ही दिलेली नावे त्या-त्या शब्दाच्या वाक्यातील कार्याला अनुलक्षून दिलेली आहेत.

एक शब्द निरनिराळ्या वाक्यांत निरनिराळी कार्ये करताना आढळतो

जसे,

(१) दशरथाने कैकयीला दोन वर दिले. (नाम)

(२) तू त्या राजपुत्राला वर. (क्रियापद)

(३) पक्षी झाडावर बसतो. (शब्दयोगी अव्यय)

(४) वरपिता मुलाच्या लग्नात तोऱ्यात वावरत होता. (विशेषण)

वरील वाक्यात 'वर' हा एकच शब्द विविध कार्ये करतो म्हणून त्या शब्दाला नाम, क्रियापद, शब्दयोगी अव्यय, विशेषण अशी नावे दिलेली आहेत. क्रिकेटच्या खेळात तुम्ही पाहता ना? एकच खेळाडू क्रीडांगणावर वेगवेगळी कामे करताना आढळतो. कधी तो 'फलंदाज' असतो, तर कधी तो 'गोलंदाज' असतो. कधी तो 'क्षेत्ररक्षकाचे' काम करताना दिसतो. क्वचित तोच 'यष्टिरक्षक' ही होतो. ही जी नावे आपण खेळाडूला देतो ती त्याच्या क्रीडांगणावरील वेगवेगळ्या वेळच्या कार्याला उद्देशून असतात. त्याचप्रमाणे व्याकरणातील ही आठ नावे त्या-त्या वाक्यांतील शब्दाच्या कार्याला उद्देशून असतात.

वाक्य हे शब्दांनी बनलेले असते हे खरे. पण, वाक्यात हे जे शब्द येतात ते त्यांच्या मूळ स्वरूपात जसेच्या तसे ठेवले जात नाहीत. वाक्य होण्यासाठी त्यांच्या रूपात आपण कधी-कधी बदल करतो.

असा बदल सर्वच शब्दांच्या रूपात होत नाही. काही शब्दांच्या रूपात बदल होतो, तर काही शब्द मुळीच बदलत नाहीत. शब्दांच्या रूपात बदल होतो केव्हा? तर शब्दांचे लिंग किंवा वचन बदलते तेव्हा किंवा विभक्तीचे प्रत्यय लागतात तेव्हा. शब्दांच्या कोणत्या जातीत असा बदल होतो ते आपण पाहू.

| शब्दाची जात | पुल्लिंग | स्त्रीलिंग | अनेकवचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १) नाम | मुलगा | मुलगी | मुलगे. | मुलांना |
| २) सर्वनाम | तो | ती | ते | त्यांना |
| ३) विशेषण | चांगला | चांगली | चांगले | चांगल्यांना |
| ४) क्रियापद | गातो | गाते | गातात | गाण्याने |

नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या शब्दांच्या चार जातींत लिंग, वचन व विभक्ती यांच्यामुळे बदल होतो; पण पुढील शब्द पाहा.

(१) आता, उद्या, इथे, इकडे (क्रियाविशेषणे)

(२) मागे, पुढे, करिता, साठी (शब्दयोगी)

(३) आणि, अथवा, परंतु, म्हणून (उभयान्वयी)


(४) अरेरे, शाब्बास, अबब, ओहो (केवलप्रयोगी)

शब्दांच्या या चार जातींत लिंग, वचन किंवा विभक्ती यांमुळे बदल होत नाही.

बदल होणे याला व्याकरणात 'विकार' असे म्हणतात. शब्दांच्या आठ जातींपैकी नाम, सर्वनाम,

विशेषण व क्रियापद ही चार 'विकारी' आहेत म्हणजे बदलणारी आहेत. क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी ही चार 'अविकारी' आहेत म्हणजे त्यांच्या रूपांत बदल होत नाही. विकारी व अविकारी यांना अनुक्रमे 'सव्यय' व 'अव्यय' असे म्हणतात. (व्यय = खर्च, बदल)

शब्दांच्या आठ जाती पुढीलप्रमाणे आहेत -




✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

**1)** तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना ...... असे म्हणतात. ①②③④

1) शब्द 2) अक्षर

3) वर्ण 4) वाक्य

**2)** 'पाणी' हा शब्द आहे तर 'पाण्यात' हे .... आहे. ①②③④

1) वाक्य 2) अक्षर

3) शब्द 4) पद

**3)** वाक्यात येणारे जे शब्द प्रत्यक्षात किंवा काल्पनिक वस्तूंची, गुणांची नावे असतात त्यांना ...... असे म्हणतात. ①②③④

1) पद 2) नामे

3) शब्द 4) वाक्य

4) नामाबद्दल अधिक माहिती सांगणाऱ्या व त्याचे क्षेत्र मर्यादित करणाऱ्या शब्दांना ....... असे म्हणतात. ①②③④

1) विशेषण 2) क्रियापद

3) नाम 4) सर्वनाम

5) क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगणारे शब्द म्हणजे ...... ①②③④

1) नाम 2) विशेषण

3) क्रियापद 4) क्रियाविशेषण

6) जे शब्द ...... किंवा ....... यांना जोडून येतात व शब्दांचा संबंध दाखवितात त्यांना शब्दयोगी अव्यय म्हणतात. ①②③④

1) विशेषण, क्रियापद 2) नाम, विशेषण

3) नाम, सर्वनाम 4) सर्वनाम, क्रियापद

7) दोन शब्द किंवा वाक्ये यांना जोडणारे ........ ①②③④

1) उभयान्वयी अव्यय 2) क्रियापद
3) शब्दयोगी अव्यय 4) क्रियाविशेषण

8) शब्दांच्या जातींची नावे त्यांच्या वाक्यातील ....... अनुलक्षून दिली आहेत. ①②③④

1) कार्याला 2) स्थानाला
3) वेळेला 4) ठिकाणाला

9) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा. ①②③④

दशरथाने कैकयीला दोन <u>वर</u> दिले.

1) क्रियापद 2) सर्वनाम
3) नाम 4) शब्दयोगी अव्यय

10) शब्दांच्या किती जातीत लिंग, वचन, विभक्तीमुळे बदल होतो. ①②③④

1) पाच 2) चार 3) दोन 4) तीन

11) बदल होणे यालाच व्याकरणात ...... असे म्हणतात. ①②③④

1) विकार 2) आजार 3) विकृती 4) प्रकृती

12) अविकारी म्हणजेच लिंग, वचन, विभक्तीमुळे बदल .......... ①②③④

1) पावणारी 2) होणारी
3) न होणारी 4) असणारी

13) पुढीलपैकी शब्दांची विकारी जात ओळखा. ①②③④

1) केवलप्रयोगी 2) उभयान्वयी अव्यय
3) शब्दयोगी अव्यय 4) विशेषण

14) पुढील वाक्यातील अव्यय ओळखा. ①②③④

अरेरे! खूप वाईट झाले.

1) केवलप्रयोगी अव्यय 2) उभयान्वयी अव्यय
3) क्रियाविशेषण अव्यय 4) शब्दयोगी अव्यय

15) पुढील वाक्यातील अव्यय ओळखा. ①②③④

मी <u>तुझ्याकरिता</u> घरी खाऊ घेऊन आलो.

1) क्रियाविशेषण अव्यय 2) केवलप्रयोगी अव्यय
3) शब्दयोगी अव्यय 4) उभयान्वयी अव्यय

16) वाक्यातील अधोरेखित सव्यय ओळखा. ①②③④

<u>त्या</u> मुलीचे केस काळेभोर आहेत.

1) क्रियापद 2) विशेषण 3) सर्वनाम 4) नाम

17) वाक्यातील अधोरेखित शब्दाचा सव्यय ओळखा.

पक्षी आकाशात <u>उडतात</u>. ①②③④

1) क्रियापद 2) सर्वनाम
3) विशेषण 4) नाम

18) 'तो मुलगा जोरात पळाला.' या वाक्यातील अव्यय प्रकार ओळखा. ①②③④

1) शब्दयोगी अव्यय 2) केवलप्रयोगी अव्यय
3) क्रियाविशेषण अव्यय 4) उभयान्वयी अव्यय

19) संयुक्त वाक्यात कोणते अव्यय वापरले जाते? ①②③④

1) केवलप्रयोगी अव्यय 2) शब्दयोगी अव्यय
3) क्रियाविशेषण अव्यय 4) उभयान्वयी अव्यय

20) सर्वनामांनाच ........ असेही म्हणतात. ①②③④

1) प्रतिशब्द 2) प्रतिअक्षर
3) प्रतिनामे 4) प्रतिकात्मक

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 8 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 4 | 3) 2 | 4) 1 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 1 | 8) 1 | 9) 3 | 10) 2 |
| 11) 1 | 12) 3 | 13) 4 | 14) 1 | 15) 3 |
| 16) 3 | 17) 1 | 18) 3 | 19) 4 | 20) 3 |

# १. नामे

शब्दांच्या जाती आठ आहेत, हे मागील पाठामध्ये आपण पाहिले. विकारी आणि अविकारी अशा दोन गटांत त्यांची विभागणी होते. विकारी शब्द म्हणजे ज्या शब्दांवर लिंग, वचन, विभक्ती यांचा परिणाम होऊन त्यांच्यात बदल होतो.

नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद या शब्दांच्या प्रकारांना विकारी शब्द असे म्हणतात. अविकारी शब्द म्हणजे ज्या शब्दांवर लिंग, वचन, विभक्ती यांचा परिणाम होत नाही. क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय हे शब्दांचे प्रकार अविकारी शब्दप्रकारात मोडतात.

## नाम

**पुढील वाक्ये वाचा.**

(१) तो झाड लावतो.

(२) आरोही, फळा पाहा.

(३) अनुराग गोष्ट ऐकतो.

(४) नदीला पूर आला.

(५) मला पुस्तक आवडते.

वरील वाक्यांतील झाड, आरोही, फळा, अनुराग, गोष्ट, नदी, पुस्तक हे शब्द पाहा. हे शब्द वाचले की आपल्या डोळ्यांसमोर काही वस्तू येतात, व्यक्ती येतात. सामान्यतः 'वस्तू' हा शब्द डोळ्याने दिसणाऱ्या पदार्थाला उद्देशून वापरतो, पण व्याकरणात त्याचा अर्थ व्यापक आहे.

'वस्तू' या शब्दाच्या अर्थामध्ये सर्व प्रकारचे पदार्थ, प्राणी व त्यांच्या अंगी वास करणारे गुण व धर्म यांचा अंतर्भाव होतो.

**प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना दिलेली जी नावे, त्यांना व्याकरणात नामे असे म्हणतात.** उदा. पुस्तक, चेंडू, कागद, मुलगा, हरी, वामन, साखर, देव, स्वर्ग, अप्सरा, नंदनवन, गोडी, धैर्य, खरेपणा, औदार्य, विद्वत्ता इत्यादी.

निरनिराळ्या वस्तूंच्या, पदार्थांच्या, व्यक्तींच्या नावांना नाम असे म्हणतात. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर असे म्हणता येईल की, ज्यावरून एखादा प्रत्यक्ष किंवा काल्पनिक पदार्थ, प्राणी किंवा त्याचा गुणधर्म यांचा आपल्याला बोध होतो, त्याला **नाम** असे म्हणतात.

'मराठी - घटना, रचना, परंपरा' या ग्रंथात (लेखक - अरविंद मंगरूळकर व कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी) नामाची व्याख्या करताना म्हटले आहे, 'वास्तव अथवा मानस सृष्टीतील इंद्रियगम्य आणि मनोगम्य वस्तू ज्या शब्दांनी बोधित होतात, त्या शब्दांना **नामे** असे म्हणतात.'

**नामांचे मुख्य प्रकार तीन आहेत :- सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचक नाम.**

**१) सामान्यनाम :-** एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला सर्वसामान्य नाव

दिले जाते, त्याला **सामान्यनाम** असे म्हणतात. सामान्यनाम हे त्या वस्तूच्या जातीला दिलेले नाम आहे. उदा. मुलगा, लेखणी, घर, शाळा, नदी इत्यादी.

(कळप, वर्ग, सैन्य, घड, समिती ही समूहाला दिलेली नामे आहेत. यांना कोणी 'समुदायवाचक नामे' म्हणतात. तसेच सोने, तांबे, दूध, साखर, कापड हे संख्येशिवाय इतर परिमाणांनी मोजण्याचे पदार्थ म्हणून त्यांना कोणी **पदार्थवाचक नामे** असे म्हणतात. पण मराठीत या सर्वांची गणना सामान्यनामातच होते.)

**२) विशेषनाम :-** ज्या नामाने जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो, त्यास **विशेषनाम** असे म्हणतात.

उदा. रामा, हरी, आशा, हिमालय, गंगा, भारत. विशेषनाम हे व्यक्तिवाचक असते, सामान्यनाम हे जातिवाचक असते. विशेषनाम हे त्या व्यक्तीचे अथवा वस्तूचे स्वतःचे नाव असते; ते केवळ खुणेकरिता ठेवलेले नाव असते. सामान्यनाम हे त्या जातीतील सर्व वस्तूंत असलेल्या सामान्यपणाला दिलेले नाव असते. सामान्यनाम हे त्या जातीतील सर्व वस्तूंना लागू पडते. विशेषनाम हे एकट्याचे असते.

**पुढील तक्ता पाहा.**

| सामान्यनाम | विशेषनाम |
|---|---|
| नदी | गंगा, सिंधू, तापी, चंद्रभागा, नर्मदा |
| पर्वत | हिमालय, सह्याद्री, सातपुडा |
| मुलगा | स्वाधीन, हिमांशू, लक्ष्मण, राम, हरी |
| मुलगी | मधुरिमा, स्वागता, तारा, आशा, नलिनी |
| शहर | नगर, पुणे, दिल्ली, मुंबई, कोल्हापूर |

**३) भाववाचक नाम :-** ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेल्या गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध होतो त्याला 'भाववाचक नाम' किंवा 'धर्मवाचक नाम' असे म्हणतात.

उदा. धैर्य, कीर्ती, चांगुलपणा, वात्सल्य, गुलामगिरी, आनंद इत्यादी.

पदार्थाचा गुण किंवा धर्म हा स्वतंत्र किंवा वेगळा असत नाही. तो कोणत्यातरी जड वस्तूच्या अथवा व्यक्तीच्या आश्रयाने राहतो. भाववाचक नामांना वेगळे अस्तित्व नसते. मात्र कल्पनेने ते आहे असे मानून त्याला नाव दिले जाते.

पदार्थाच्या गुणाबरोबरच स्थिती किंवा क्रिया दाखविणाऱ्या नामांना भाववाचक नामे असेच म्हणतात. उदा. वार्धक्य, बाल्य, तारुण्य, मरण हे शब्द पदार्थाची स्थिती दाखवितात. धाव, हास्य, चोरी, उड्डाण, नृत्य ही क्रियेला दिलेली नावे आहेत.

सामान्यनाम किंवा विशेषनाम यांनी प्रत्यक्ष किंवा काल्पनिक प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होतो. भाववाचक नामाने प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होत नसून त्यांच्यातील गुणांचा किंवा धर्माचा बोध होतो. सामान्यनामाचे अनेकवचन होऊ शकते, पण विशेषनामे आणि भाववाचक नामे ही एकवचनीच असतात.

सामान्यनामे आणि विशेषनामे यांना **धर्मिवाचक** नामे म्हणतात. 'धर्मी' म्हणजे ज्यात धर्म किंवा गुण वास करतात ते.

## भाववाचक नामे साधण्याचे प्रकार

सामान्यनामे व विशेषनामे यांना आई, ई, की, गिरी, ता, त्व, पण, पणा, य, वा यांसारखे प्रत्यय लावून भाववाचक नामे कशी तयार करतात, ते खालील तक्त्यात पाहा.

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| नवल | आई | नवलाई | खोदाई,चपळाई, दांडगाई, धुलाई |
| श्रीमंत | ई | श्रीमंती | गरिबी, गोडी, लबाडी, वकिली |
| पाटील | की | पाटीलकी | आपुलकी, भिक्षुकी |
| गुलाम | गिरी | गुलामगिरी | फसवेगिरी, लुच्चेगिरी |
| शांत | ता | शांतता | क्रूरता, नम्रता, समता |
| मनुष्य | त्व | मनुष्यत्व | प्रौढत्व, मित्रत्व, शत्रुत्व |
| शहाणा | पण, पणा | शहाणपण, शहाणपणा | देवपण, प्रामाणिकपणा, मोठेपण |
| सुंदर | य | सौंदर्य | गांभीर्य, धैर्य, माधुर्य, शौर्य |
| गोड | वा | गोडवा | ओलावा, गारवा |

## नामांचे कार्य करणारे इतर शब्द

नाम, सर्वनाम, विशेषण ही जी नावे शब्दांच्या जातीला दिली जातात, ती त्यांच्या त्या-त्या वाक्यातील कार्यावरून दिली जातात, हे आपण यापूर्वी पाहिले. तीच गोष्ट इथेही लक्षात ठेवावयास हवी. सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचक नाम ही नावेदेखील नामांच्या विशिष्ट कार्यावरून दिली गेली आहेत. सामान्यनाम हे कधी कधी विशेषनामाचे कार्य करते, तर विशेषनाम हे कधी कधी सामान्यनामाचे कार्य करते.

**(१) पुढील उदाहरणे पाहा.**

(अ) मी आत्ताच नगरहून आलो.

(आ) शेजारची तारा यंदा बी. ए. झाली.

वरील वाक्यात नगर, तारा ही मूळची सामान्यनामे आहेत. नगर - कोणतेही शहर, तारा - नक्षत्र. वरील वाक्यांत ती विशेषनामे म्हणून वापरली आहेत.

**(२) पुढील उदाहरणे पाहा.**

(अ) तुमचा मुलगा कुंभकर्णच दिसतो.

(आ) आमचे वडील म्हणजे जमदग्नी आहेत.

(इ) आम्हांला आजच्या विद्यार्थ्यांत भीम हवेत.

वरील वाक्यांत कुंभकर्ण, जमदग्नी, भीम ही मूळची विशेषनामे आहेत. पण इथे कुंभकर्ण = अतिशय

झोपाळू, जमदग्नी = अतिशय रागीट मनुष्य व भीम = सशक्त मुलगे या अर्थाने वापरली आहेत. म्हणजे मूळची विशेषनामे वरील वाक्यांत सामान्यनामांचे कार्य करतात.

**(३) पुढील वाक्ये पाहा.**

(अ) शांती ही माझ्या बहिणीची मुलगी.

(आ) विश्वास परीक्षेत उत्तीर्ण झाला.

(इ) माधुरी उद्या मुंबईला जाईल.

वरील वाक्यांतील शांती, विश्वास, माधुरी ही गुणांना दिलेली नावे म्हणून ती मूळची भाववाचक नामे; पण वरील वाक्यांत त्यांचा उपयोग विशेषनामांसारखा केला आहे.

भाववाचक नामे ही कधी कधी विशेषनामांचे कार्य करतात.

**(४) पुढील वाक्ये पाहा.**

(अ) आमच्या वर्गात तीन पाटील आहेत.

(आ) या गावात बरेच नारद आहेत.

(इ) माझ्या आईने सोळा सोमवार केले.

विशेषनामांचे अनेकवचन होत नाही, पण वरील वाक्यांत विशेषनामे अनेकवचनी वापरलेली दिसतील. या वाक्यांतील विशेषनामे सामान्यनामे म्हणून वापरली आहेत.

**(५) पुढील वाक्ये पाहा.**

(अ) शहाण्याला शब्दाचा मार.

(आ) श्रीमंतांना गर्व असतो.

(इ) जातीच्या सुंदरांना काहीही शोभते.

(ई) जगात गरिबांना मान मिळत नाही.

वरील वाक्यांत शहाणा, श्रीमंत, सुंदर, गरीब ही मूळची विशेषणे, पण इथे ती नामांसारखी वापरली आहेत.

**(६) पुढील वाक्ये पाहा.**

(अ) आमच्या क्रिकेटपटूंची वाहवा झाली.

(आ) त्याच्या बोलण्यात परंतुचा वापर फार होतो.

(इ) हरी नापास झाल्यामुळे त्याची छी-थू झाली.

वाहवा, परंतु, छी-थू ही मूळची अव्यये, पण वरील वाक्यांत ती नामाचे कार्य करतात.

**(७) पुढील वाक्ये पाहा.**

(अ) ज्याला कर नाही त्याला डर कसली.

(आ) गुरूजींचे वागणे मोठे प्रेमळ असते.

(इ) ते ध्यान पाहून मला हसू आले.

(ई) देणाऱ्याने देत जावे.

वरील वाक्यांतील कर, डर, वागणे, हसणे, देणारा हे शब्द; कर, डर, वाग, हस, दे या धातूंपासून तयार झालेले आहेत. त्यांना **धातुसाधित नामे** असे म्हणतात. धातूला णे, ऊ, अ, ण हे प्रत्यय लागून नामे तयार होतात. जसे हसणे, रडू, धाव, दळण हे धातुसाधित शब्द नामांसारखे योजता येतात.

वरील उदाहरणांवरून असे दिसून येईल की, सामान्यनामे, विशेषनामे व भाववाचक नामे ही एकमेकांचे कार्य करतात. तसेच विशेषणे, अव्यये, धातुसाधिते यांचा वापर नामांसारखा करण्यात येतो.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **नामांच्या बाबतीत पुढील विधाने पाहा व अचूक पर्याय निवडा:** ①②③④
अ) नाम म्हणजे वस्तूचे किंवा पदार्थाचे नाव होय
ब) नाम म्हणजे वास्तव अथवा काल्पनिक वस्तूचे नाव होय.
क) नाम म्हणजे प्राणी, व्यक्ती यांची नावे व त्यांच्या अंगी वास करणारे गुण व धर्म होय.
ड) नाम म्हणजे वस्तूंविषयी विशेष माहिती सांगणारा शब्द होय
1) विधान 'अ' 'ब' बरोबर
2) विधान 'अ' 'ब' 'क' बरोबर
3) विधान 'ब' बरोबर
4) विधान 'ड' बरोबर

2) **जी नामे प्राणी किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेल्या गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध करतात ती ...... किंवा ...... होय.** ①②③④
1) सामान्य, धर्मिवाचक 2) भाववाचक, धर्मिवाचक
3) विशेष, धर्मिवाचक 4) समूह, धर्मिवाचक

3) **विशेषनामे व भाववाचक नामे नेहमी ............ वचनात असतात.** ①②③④
1) द्विवचन 2) अनेकवचन
3) एकवचन 4) बहुवचन

4) **पुढीलपैकी भाववाचक नामाचा पर्याय ओळखा.** ①②③④
1) नगर 2) हिमालय 3) गोडवा 4) गंगा

5) **पुढीलपैकी भाववाचक नामाचा पर्याय ओळखा.** ①②③④
1) लक्ष्मण 2) भरत 3) कमळ 4) प्रौढत्व

6) **पुढीलपैकी भाववाचक नामाचा पर्याय ओळखा.** ①②③④
1) मामा 2) मुलगी 3) गरिबी 4) तारा

7) **पुढीलपैकी भाववाचक नामाचा पर्याय ओळखा.** ①②③④
1) नवलाई 2) भीम 3) राम 4) पुस्तक

8) **पुढीलपैकी सामान्यनाम ओळखा.** ①②③④
1) दिल्ली 2) गांभीर्य 3) नर्मदा 4) मुलगी

9) **पुढीलपैकी सामान्यनाम ओळखा.** ①②③④
1) अनुराग 2) पक्षी 3) नलिनी 4) भीमा

10) **पुढीलपैकी सामान्यनाम ओळखा.** ①②③④
1) पृथ्वीराज 2) वही
3) शिवाजी 4) संताजी

11) **पुढीलपैकी सामान्यनाम ओळखा.** ①②③④
1) यमुना 2) लक्ष्मी 3) विष्णू 4) झाड

12) **पुढीलपैकी विशेषनाम ओळखा.** ①②③④
1) कोल्हापूर 2) गारवा
3) मुनी 4) पुस्तक

13) **पुढीलपैकी विशेषनाम ओळखा.** ①②③④
1) तुच्छेगिरी 2) खोदाई 3) सुंदर 4) मदन

14) **पुढीलपैकी विशेषनाम ओळखा.** ①②③④
1) अर्जुन 2) वारा 3) सुंदर 4) भिक्षुकी

15) **पुढीलपैकी विशेषनाम ओळखा.** ①②③④
1) कवी 2) चपळाई

3) अरबी समुद्र 4) रस्ता

16) पुढीलपैकी विशेषनाम ओळखा. ①②③④

1) गट 2) विजय 3) उंट 4) मुलगा

17) मी कालच नगरहून आलो. ①②③④

1) विशेषनाम 2) सामान्यनाम

3) भाववाचक नाम 4) समुदायवाचक नाम

18) हसणारा मुलगा छान दिसतो. ①②③④

1) धातुसाधित नाम 2) सामान्यनाम

3) विशेषनाम 4) समुदायवाचक नाम

19) या गावात बरेच देशपांडे आहेत. ①②③④

1) विशेषनाम 2) धातुसाधित नाम

3) सामान्यनाम 4) भाववाचक नाम

20) शांती माझी मैत्रीण आहे. ①②③④

1) धातुसाधित नाम 2) सामान्यनाम

3) भाववाचक नाम 4) विशेषनाम

21) त्याचे वडील म्हणजे भीमच आहेत. ①②③④

1) धातूसाधित नाम 2) भाववाचक नाम

3) सामान्य नाम 4) विशेषनाम

22) मूळचे विशेषण वापरून त्यांचा नामांसारखा वापर केलेली वाक्ये ओळखा. ①②③④

अ) आमच्या क्रिकेटपटूंची वाहवा झाली

ब) जातीच्या सुंदरांना काहीही शोभते

क) हरी नापास झाल्याने त्याची छी-थू झाली

ड) श्रीमंतांना गर्व असतो

1) विधान 'अ' 2) विधान 'ब' व 'ड'

3) विधान 'अ' व 'क' 4) विधान 'क'

23) मूळचे अव्यय वापरून त्यांचा नामांसारखा वापर केलेले वाक्य ओळखा. ①②③④

अ) देणाऱ्याने देत जावे

ब) माझ्या ताईने सोळा गुरूवार केले

क) शहाण्याला शब्दांचा मार

ड) त्याच्या बोलण्यात परंतुचा वापर असतो.

1) विधान 'ड' 2) विधान 'क'

3) विधान 'ब' 4) विधान 'अ'

24) विशेषनाम असलेले वाक्य ओळखा. ①②③④

अ) गरिबांना गर्व नसतो

ब) या गावात बरेच पाटील आहेत

क) मुळा-मुठा नदी पुण्यातून वाहते

ड) तो मुलगा म्हणजे कुंभकर्णच आहे

1) पर्याय 'अ' 2) पर्याय 'ब'

3) विधान 'क' 4) विधान 'ड'

25) 'सुंदर' या शब्दाचे भाववाचक नाम होईल ....... ①②③④

1) कुरूप 2) सौंदर्य

3) सुंदर 4) सुंदरहून

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 9 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 3 | 4) 3 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 1 | 8) 4 | 9) 2 | 10) 2 |
| 11) 4 | 12) 1 | 13) 4 | 14) 1 | 15) 3 |
| 16) 2 | 17) 1 | 18) 1 | 19) 3 | 20) 4 |
| 21) 3 | 22) 2 | 23) 1 | 24) 3 | 25) 2 |

# १०. लिंगविचार

नाम म्हणजे काय ते आपण पाहिले. ही नामे वाक्यात वापरताना त्यांच्या रूपांत कधी कधी बदल होतो.

जसे - (१) मुलगा पुस्तक वाचतो. (२) मुलगे खेळ खेळतात.
(३) मुलगी गाणे गाते. (४) मुलांना खाऊ आवडतो.

वरील वाक्यांत 'मुलगा' या शब्दाची 'मुलगी, मुलगे, मुलांना' अशी रूपे झालेली आहेत. नामांच्या रूपांत हा जो बदल होतो किंवा विकार होतो त्यास 'विकरण' असे म्हणतात. हा बदल केव्हा व कसा होतो ते आपण पाहू. 'मुलगा' याचे 'मुलगी' असे जे रूप बदलले ते त्याचे 'लिंग' बदलल्यामुळे, 'मुलगे' असे जे रूप झाले ते वचन बदलल्यामुळे, व 'मुलांना' असे जे रूप झाले ते विभक्ती बदलल्यामुळे.

लिंग, वचन व विभक्ती यांमुळे नामाच्या रूपांत बदल होतो. त्याला **नामांचे विकरण** असे म्हणतात. यांचा आपण क्रमाने विचार करू.

## लिंग

नाम म्हणजे प्रत्यक्ष किंवा काल्पनिक अशा कोणत्याही वस्तूला दिलेले नाव होय. वस्तूंमध्ये आपण (१) सजीव व (२) निर्जीव असे दोन भाग करतो.

सजीवांमध्ये (१) मनुष्यप्राणी व (२) मनुष्येतर (पशू, पक्षी, कृमी, कीटक वगैरे) असे भाग पडतात. मनुष्यप्राण्यांत काही पुरुष असतात, तर काही स्त्रिया असतात. इतर प्राण्यांमध्ये हा फरक आपण 'नर' व 'मादी' अशा शब्दांनी करतो. प्राणिमात्रांत पुरुष-स्त्री, नर-मादी असा भेद आपण करतो तो त्यांच्या लिंगांवरून. लिंग याचा अर्थ 'खूण' किंवा 'चिन्ह' असा आहे. प्राणिवाचक नामांतील पुरुष किंवा नरजातीचा बोध करून देणाऱ्या शब्दाला पुरुषलिंगी, पुंलिंगी किंवा पुल्लिंगी असे म्हणतात. जसे- चुलता, शिक्षक, घोडा, चिमणा, मुंगळा इत्यादी. स्त्री किंवा मादी जातीचा बोध करून देणाऱ्या शब्दांना स्त्रीलिंगी असे म्हणतात. जसे- चुलती, शिक्षिका, घोडी, चिमणी, मुंगी इत्यादी. निर्जीव वस्तुवाचक शब्दांवरून पुरुष किंवा स्त्री यांपैकी कोणत्याच जातीचा बोध होत नाही. जसे- पुस्तक, दगड, शहर, शाई, कागद वगैरे. अशा शब्दांना खरेतर नपुंसकलिंगी असे म्हणावयास पाहिजे. पण मराठी भाषेच्या व्यवहारात प्रत्यक्ष तसे होत नाही. यातील 'दगड, कागद' हे पुल्लिंगी, 'दौत, शाई' हे शब्द आपण स्त्रीलिंगी मानतो. प्राणिमात्रांचे लिंग हे वास्तविक असे असते, तर निर्जीव वस्तूंचे लिंग हे 'काल्पनिक' असते.

**नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे की स्त्रीजातीची आहे की दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे लिंग असे म्हणतात.**

**मराठीत तीन लिंगे मानतात :-** (१) पुल्लिंग, (२) स्त्रीलिंग व (३) नपुंसकलिंग.

काही निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून आपण कधी-कधी बोलतो. जसे- (१) सूर्य ढगाआड लपला. (२) सागर एकदम खवळला. (३) वनश्री हसू लागली. (४) झरे नृत्य करीत

होते. अशा वाक्यांत निर्जीव वस्तूंवरही काल्पनिक पुरुषत्व किंवा स्त्रीत्व लादून आपण बोलत असतो. कधी-कधी आकार, शक्ती, कठोरपणा, राकटपणा, यांसारखे पुरुषप्राण्यांचे सर्वसामान्य गुणधर्म ज्या वस्तूंत आपणांस आढळतात, त्यांना आपण पुल्लिंगी मानतो. लहान आकार, कोमलपणा, देखणेपणा, सौम्यपणा, चांचल्य यांसारखे स्त्रीप्राण्यांत आढळून येणारे सामान्य गुणधर्म ज्या वस्तूंत आढळतात, त्यांना स्त्रीलिंगी मानतो. उदा. लोटा = पुल्लिंगी, तर लोटी स्त्रीलिंगी; वारा पुल्लिंगी, तर झुळूक स्त्रीलिंगी; वृक्ष पुल्लिंगी, तर वेल स्त्रीलिंगी. सूर्य, सागर, मृत्यू हे पुल्लिंगी तर वनश्री, वीज हे शब्द आपण स्त्रीलिंगी मानतो. पण हा नियम संपूर्णपणे पाळला जात नाही. त्याला पुष्कळ अपवाद आढळतात. दोरा हा दोरीपेक्षा आकाराने लहान असूनही तो पुल्लिंगी, तर दोरी स्त्रीलिंगी. ओढा हा नदीपेक्षा लहान असूनही तो पुल्लिंगी व नदी स्त्रीलिंगी.

मराठीत एकाच अर्थाचे शब्द तीन वेगवेगळ्या लिंगांत आढळतात. जसे-

(१) रुमाल (पु.), पगडी (स्त्री.), तर पागोटे (नपुं.) (२) ग्रंथ (पु.), पोथी (स्त्री.) तर पुस्तक (नपुं.) (३) देह (पु.), काया (स्त्री.), तर शरीर (नपुं.).

संस्कृत, इंग्रजी यांसारख्या भाषांतून घेतलेल्या काही शब्दांचे लिंग बदललेले दिसते. जसे -

| शब्द | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| स्वप्न | पु. | नपुं. |
| खड्ग | पु. | नपुं. |
| अश्रू | नपुं. | पु. |
| मित्र | नपुं. | पु. |

| शब्द | इंग्रजी | मराठी |
|---|---|---|
| नदी | पु. | स्त्री. |
| देश | स्त्री. | पु. |
| चंद्र | स्त्री. | पु. |
| निसर्ग | स्त्री. | पु. |

मराठीतील लिंगव्यवस्था ही अत्यंत अनियमित व धरसोडीची आहे. त्याप्रमाणे काही विशिष्ट तत्त्व असे दिसत नाही. एखादा नियम सांगावा तर त्याला अपवादच जास्त.

मग मराठीतील लिंग ओळखण्याची पद्धत कोणती? प्राणिमात्रांतील पुरुष किंवा नर यांचा उल्लेख आपण 'तो' या शब्दाने करतो व स्त्री किंवा मादी यांचा उल्लेख आपण 'ती' या शब्दाने करतो. जसे- तो बाप, ती आई, तो घोडा, ती घोडी, तो पोपट, ती मैना इत्यादी. सजीव प्राण्यांतील एखादा नर आहे किंवा मादी आहे, हे निश्चित सांगता येत नसेल, तर त्याला नपुंसकलिंगी मानून त्याचा उल्लेख 'ते' या शब्दाने करतो. जसे- ते कुत्रे, ते वासरू, ते पाखरू.

निर्जीव वस्तूंच्या बाबतीत काही वेळेस काल्पनिक पुरुषत्व व स्त्रीत्व लादून त्या वस्तूंच्या मागे तो-ती-ते हे शब्द वापरून आपण लिंग ठरवतो. उदा.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| तो वाडा | ती इमारत | ते घर |
| तो भात | ती भाकरी | ते वरण |
| तो टाक | ती लेखणी | ते पेन |
| तो दिवा | ती पणती | ते तेज |

वरील पद्धत मराठी भाषा जाणणाऱ्यांना ठीक आहे; पण अ-मराठी भाषकांना मराठी शब्दांचे लिंग

ओळखणे कठीण जाते. अमक्या शब्दामागे 'तो' का लावायचा? 'ती' का नाही? याचे उत्तर देणे व निश्चित नियम सांगणे कठीण आहे. पुल्लिंगी शब्दाच्या मागे 'तो' लावायचा व 'तो' लागतो म्हणून त्या शब्दाला पुल्लिंगी म्हणावयाचे हा मोठा विचित्र प्रकार आहे. मराठीत अमका शब्द पुल्लिंगी का व अमका शब्द स्त्रीलिंगी का, हे सांगणे कठीण आहे. केवळ रूढी किंवा परंपरा हेच त्याचे उत्तर. मराठी भाषा ही ऐकून व बोलण्यात तिचा वारंवार वापर करून तिच्यातील लिंगव्यवस्था समजून घेता येते. केवळ नियमाने ती ठरविता येत नाही.

## लिंगभेदामुळे नामांच्या रूपांत होणारा बदल

(१) 'आकारान्त' पुल्लिंगी प्राणिवाचक नामाचे स्त्रीलिंगी रूप 'ईकारान्त' होते व त्याचे नपुंसकलिंगी रूप 'एकारान्त' होते. उदा.

| पु. | स्त्री. | नपुं. |
|---|---|---|
| मुलगा | मुलगी | मुलगे |
| पोरगा | पोरगी | पोरगे |

| पु. | स्त्री. | नपुं. |
|---|---|---|
| कुत्रा | कुत्री | कुत्रे |
| घोडा | घोडी | घोडे |

(२) काही प्राणिवाचक पुल्लिंगी शब्दांस 'ईण' प्रत्यय लागून त्यांची स्त्रीलिंगी रूपे होतात. उदा.

सुतार - सुतारीण    माळी - माळीण    वाघ - वाघीण

कुंभार - कुंभारीण    पाटील - पाटलीण    तेली - तेलीण

(३) काही प्राणिवाचक 'अकारान्त' पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे 'ईकारान्त' होतात. उदा.

हंस - हंसी    वानर - वानरी    गोप - गोपी

दास - दासी    बेडूक - बेडकी    तरुण - तरुणी

(४) काही 'आकारान्त' पुल्लिंगी पदार्थवाचक नामांना 'ई' प्रत्यय लागून त्यांची लघुत्वदर्शक स्त्रीलिंगी रूपे बनतात. उदा.

लोटा - लोटी    खडा - खडी    सुरा - सुरी

गाडा - गाडी    दांडा - दांडी    आरसा - आरशी

(५) संस्कृतातून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे ई-प्रत्यय लागून होतात.

राजा - राज्ञी    श्रीमान - श्रीमती    भगवान - भगवती

युवा - युवती    विद्वान - विदुषी    ग्रंथकर्ता - ग्रंथकर्ती

(६) काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्र रीतीने होतात. जसे -

बाप - आई    नवरा - बायको    बोकड - शेळी

वर - वधू    मुलगा - सून    रेडा - म्हैस

राजा - राणी    दीर - जाऊ    मोर - लांडोर

पती - पत्नी    पुत्र - कन्या    बैल - गाय

भाऊ - बहीण    सासू - सासरा    बोका - भाटी

पिता - माता पुरुष - स्त्री खोंड - कालवड

(७) मराठीतील काही शब्द निरनिराळ्या लिंगांतही आढळतात. उदा.

बाग (पु. स्त्री.) ढेकर (पु. स्त्री.) पोर (पु. स्त्री. न. पुं.)
वेळ (पु. स्त्री.) हरिण (पु. न. पुं.) संधी (पु. स्त्री.)
वीणा (पु. स्त्री.) तंबाखू (पु. स्त्री.) मूल (पु. स्त्री. न. पुं.)
मजा (पु. स्त्री.) व्याधी (पु. स्त्री.) नेत्र (पु. न. पुं.)

(८) परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून सामान्यतः ठरवितात. उदा.

बूट (जोडा) पु. पेन्सिल (लेखणी) स्त्री. क्लास (वर्ग) पु.
बुक (पुस्तक) नपुं. कंपनी (मंडळी) स्त्री. ट्रंक (पेटी) स्त्री.

(९) सामासिक शब्दाचे लिंग हे शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते. उदा.

साखरभात (पु.) मीठभाकरी (स्त्री.) गायरान (नपुं.)
भाजीपाला (पु.) भाऊबहीण (स्त्री.) देवघर (नपुं.)

(१०) गरुड, टोळ, पोपट, मासा, साप, सुरवंट हे शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असूनही त्यांचा उल्लेख पुल्लिंगीच करतात. तर ऊ, घार, घूस, जळू, पिसू, मैना, सुसर हे शब्ददेखील पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असूनही त्यांचा उल्लेख केवळ स्त्रीलिंगीच करतात.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**1) नामांच्या रूपात होणाऱ्या बदलास किंवा नामाला होणाऱ्या विकारास ........... असे म्हणतात.** ①②③④

1) लिंग 2) विकरण
3) वचन 4) सामान्य रूप

**2) व्याकरणामध्ये 'लिंग' याचा अर्थ काय होतो.** ①②③④

1) सामान्यरूप 2) खूण/चिन्ह
3) रूप 4) विभक्ती

**3) मराठी भाषेत व्याकरणात किती लिंग मानतात?** ①②③④

1) तीन 2) दोन 3) चार 4) पाच

**4) पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) इमारत 2) भाकरी 3) लेखणी 4) टाक

**5) पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) दोरी 2) घोडी 3) मित्र 4) कुत्री

**6) पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) भाजी 2) डाळ 3) वरण 4) भात

**7) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) घोडी 2) झरा 3) समुद्र 4) कुंड

**8) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) देवघर 2) झुडूप 3) कवी 4) कन्या

**9) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द ओळखा.** ①②③④

1) नर 2) माळी 3) वधू 4) वर

10) पुढीलपैकी नपुंसकलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) सूर्य 2) चांदणी 3) चंद्र 4) खड्ग

11) पुढीलपैकी नपुंसकलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) पाय 2) मान 3) झाड 4) डोळा

12) पुढीलपैकी नपुंसकलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) मूल 2) सून 3) मुलगा 4) जावई

13) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा. ①②③④

1) युवा-युवती 2) गोप-गोपी
3) बेडूक-बेडकी 4) विद्वान-विद्वाणी

14) पुढील सामासिक शब्दाचे लिंग ओळखा.
साखरभात ①②③④

1) स्त्रीलिंगी 2) पुल्लिंगी
3) नपुंसकलिंगी 4) उभयलिंगी

15) पुढील सामासिक शब्दाचे लिंग ओळखा.
मीठभाकरी ①②③④

1) नपुंसकलिंगी 2) स्त्रीलिंगी
3) पुल्लिंगी 4) कोणतेही नाही

16) पुढील सामासिक शब्दाचे लिंग ओळखा.
भाजीपाला ①②③④

1) उभयलिंगी 2) नपुंसकलिंगी
3) स्त्रीलिंगी 4) पुल्लिंगी

17) 'श्रीमान' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा. ①②③④

1) श्रीमानी 2) श्रीमती
3) श्रीमानीन 4) श्रीमतीत

18) पुढीलपैकी कोणता शब्द स्त्रीलिंगी व पुल्लिंगी दोन्ही लिंगात आढळतो. ①②③④

1) बाग 2) वेळ
3) मजा 4) सर्व पर्याय

19) खालीलपैकी स्त्रीलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) वारा 2) पाऊस 3) शाळा 4) पाखरू

20) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) घार 2) झोपडी 3) ससा 4) सवय

21) 'सांडणी' चे पुल्लिंगी रूप होते ...... ①②③④

1) उंट 2) उंटणी 3) सांडा 4) सांड

22) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द ओळखा. ①②③④

1) मोर 2) लांडोर 3) वनराज 4) डबा

23) पुढील सामासिक शब्दांचे लिंग ओळखा.
देवघर ①②③④

1) स्त्रीलिंगी 2) पुल्लिंगी
3) नपुंसकलिंगी 4) सांगता येत नाही.

24) 'जाऊ' या शब्दाचे पुल्लिंगी रूप कोणते ? ①②③④

1) जावया 2) जावई 3) दीर 4) जावा

25) 'खोंड' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप कोणते? ①②③④

1) म्हैस 2) बैल
3) गाय 4) कालवड

26) 'उचकी' या शब्दाचे लिंग ओळखा. ①②③④

1) पुल्लिंग 2) स्त्रीलिंग
3) नपुंसकलिंग 4) उभयलिंग

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 10 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 1 | 4) 4 | 5) 3 |
| 6) 4 | 7) 1 | 8) 4 | 9) 3 | 10) 4 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 4 | 14) 2 | 15) 2 |
| 16) 4 | 17) 2 | 18) 4 | 19) 3 | 20) 3 |
| 21) 1 | 22) 2 | 23) 3 | 24) 3 | 25) 4 |
| 26) 2 | | | | |

# ११. वचनविचार

नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद यांच्या रूपांमध्ये बदल होण्यास कारणीभूत असणारा एक घटक आपण पाहिला. तो म्हणजे लिंग. 'वचना' मुळेही त्यांच्या रूपात बदल होतो. आपण आता 'वचन' या घटकाबद्दल विचार करणार आहोत.

नामावरून जसे त्याचे लिंग समजते; तसे त्या नामाने निर्देशित केलेली वस्तू एक आहे की त्या वस्तू एकापेक्षा अधिक आहेत हेही कळते. नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा जो एक धर्म आहे त्याला वचन असे म्हणतात. 'वचन' या शब्दाचा अर्थ बोलणे. आपण एका वस्तूबद्दल बोलू लागलो की ते एकवचन व अनेकांबद्दल बोलू लागलो की अनेकवचन. मराठीत दोन वचने मानतात - (१) एकवचन (२) अनेकवचन.

नामाच्या रूपावरून जेव्हा एका वस्तूचा बोध होतो, तेव्हा त्याचे एकवचन असते. जसे मुलगा, गाय, पाटी, पुस्तक, इमारत. नामाच्या रूपावरून जेव्हा एकापेक्षा अधिक संख्येचा बोध होतो, तेव्हा त्याचे अनेकवचन असते. अनेकवचनाला 'बहुवचन' असेही काही लोक म्हणतात. संस्कृतात तीन वचने मानतात- (१) एकवचन, (२) द्विवचन, (३) अनेकवचन. मराठीत द्विवचन नसल्यामुळे बहुवचनाऐवजी अनेकवचन हाच शब्द अधिक वापरला जातो. लिंगामुळे नामाच्या रूपात बदल होतो. तसाच वचनामुळेही नामाच्या रूपात बदल होतो. हा बदल कोणकोणत्या प्रकारे होतो ते आपण पाहू.

## वचनभेदामुळे नामांच्या रूपांत होणारा बदल

नामाचे जे मूळ रूप असते, तेच त्याचे एकवचन असते. नामांची अनेकवचनाची रूपे बनविताना काही नामांना प्रत्यय लागतात, तर काहींची रूपे एकवचनासारखीच राहतात.

## पुल्लिंगी नामांची अनेकवचने

**(१) पुढील नामांची रूपे पाहा.**

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुत्रा | - | कुत्रे | आंबा | - | आंबे | घोडा | - | घोडे |
| ससा | - | ससे | रस्ता | - | रस्ते | लांडगा | - | लांडगे |
| मुलगा | - | मुलगे | फळा | - | फळे | राजा | - | राजे |

**नियम :- आकारान्त पुल्लिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते.**

**(२) पुढील नामांची रूपे पाहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| देव | - | देव | शत्रू | - | शत्रू | तेली | - | तेली |
| उंदीर | - | उंदीर | लाडू | - | लाडू | गहू | - | गहू |
| कवी | - | कवी | कागद | - | कागद | मध | - | मध |

**नियम :- आकारान्ताशिवाय इतर सर्व पुल्लिंगी नामांची रूपे दोन्ही वचनांत सारखीच असतात.**

पुल्लिंगी नामांमध्ये आकारान्त नामांचे अनेकवचन वेगळे असते. मराठी ए, ऐ व औ इत्यादी अन्तांची पुल्लिंगी नामे नाहीत.

## स्त्रीलिंगी नामांची अनेकवचने

**(१) पुढील नामांची अनेकवचने पाहा.**

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेळ | - | वेळा | केळ | - | केळी | विहीर | - | विहिरी |
| वीट | - | विटा | भिंत | - | भिंती | म्हैस | - | म्हशी |
| चूक | - | चुका | तारीख | - | तारखा | सून | - | सुना |

**नियम :- अकारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन केव्हा आकारान्त होते, तर केव्हा ईकारान्त होते. 'य' नंतर ई आल्यास उच्चारात 'य' चा लोप होतो. उदा. गाय-गायी-गाई, सोय-सोयी-सोई इत्यादी.**

**(२) पुढील नामांची अनेकवचनांची रूपे पाहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भाषा | - | भाषा | पूजा | - | पूजा | सभा | - | सभा |
| दिशा | - | दिशा | आज्ञा | - | आज्ञा | विद्या | - | विद्या |

**नियम :- आकारान्त स्त्रीलिंगी तत्सम नामाचे अनेकवचन एकवचनासारखेच राहते.**

**(३) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नदी | - | नद्या | बी | - | बिया | स्त्री | - | स्त्रिया |
| काठी | - | काठ्या | भाकरी | - | भाकऱ्या | लेखणी | - | लेखण्या |

**नियम :- ईकारान्त नामाचे अनेकवचन याकारान्त होते. (अपवाद - दासी, दृष्टी इत्यादी.)**

**(४) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

सासू - सासवा जाऊ - जावा पिसू - पिसवा जळू - जळवा ऊ - ऊवा

**नियम :- उकारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन वाकारान्त होते. (अपवाद - वाळू, वस्तू, बाजू)**

**(५) पुढील शब्दाचे रूप पाहा.**

पै - पया

एकारान्त आणि ऐकारान्त स्त्रीलिंगी शब्दांची रूपे आ- या कारान्त होतात. (पै- हे पूर्वी एक जुने नाणे होते.)

(६) प्रचारात असलेला ओकारान्त स्त्रीलिंगी शब्द बायको असून त्याचे अनेकवचन बायका असे होते.

## नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने

**(१) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घर | - | घरे | फूल | - | फुले | माणूस | - | माणसे |
| दार | - | दारे | शेत | - | शेते | घड्याळ | - | घड्याळे |

**नियम :- अकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते.**

**(२) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

मोती - मोत्ये मिरी - मिऱ्ये

**नियम :- ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते व विकल्पाने 'य' हा आदेश होतो. (अपवाद - पाणी, लोणी, दही, अस्थी)**

**(३) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

पाखरू - पाखरे लिंबू - लिंबे गळू - गळवे

वासरू - वासरे पिलू - पिले आसू - आसवे

**नियम - उकारान्त आणि ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते. क्वचित प्रसंगी ते वेकारान्त होते.**

**(४) पुढील शब्दांची रूपे पाहा.**

केळे - केळी गाणे - गाणी मडके - मडकी

कुत्रे - कुत्री खेडे - खेडी रताळे - रताळी

**नियम :- एकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन ईकारान्त होते. (अपवाद - सोने, रुपे, तांबे, शिसे यांची अनेकवचने एकवचनाप्रमाणे राहतात.)**

**आ-कारान्त, ऐ-कारान्त व ओ-कारान्त नपुंसकलिंगी नामे मराठीत नाहीत.**

## वचनासंबंधी विशेष गोष्टी

(१) नामांच्या तीन प्रकारांपैकी सामान्यनामांची अनेकवचने होतात. विशेषनामांची व भाववाचक नामांची अनेकवचने होत नाहीत. विशेषनामांचा व भाववाचकनामांचा अनेकवचनी प्रयोग जिथे होतो, तिथे सामान्यनामेच असतात. विशेषनाम हे एकाच व्यक्तीचे नाम असते. त्यामुळे त्याचे अनेकवचन होत नाही. भाववाचक नामे ही गुणधर्मांना दिलेली नामे असल्यामुळे गुणधर्म हे सर्वत्र एकच असतात, म्हणून भाववाचक नामे एकवचनी असतात.

(२) कधी-कधी व्यक्ती एक असूनही त्या व्यक्तीबद्दल आदर दाखविण्यासाठी आपण त्या व्यक्तीबद्दल अनेकवचनी प्रयोग करतो. जसे - (१) गुरुजी शाळेत आत्ताच आले. (२) मुख्यमंत्री शाळेस भेट देणार आहेत. अशा वेळी त्यास आदरार्थी अनेकवचन किंवा आदरार्थी बहुवचन असे म्हणतात. असा आदर दाखविण्यासाठी राव, जी, पंत, साहेब, महाराज यासारखे शब्द जोडतात. उदा. गोविंदराव, विष्णुपंत, गोखलेसाहेब इत्यादी. स्त्रियांच्या नावांसमोर बाई, ताई, माई, आई, काकू इत्यादी शब्द येतात. उदा. राधाबाई, शांताबाई, जानकीकाकू इत्यादी.

(३) काही नामे नेहमी अनेकवचनी आढळतात. उदा. डोहाळे, कांजिण्या, शहारे, क्लेश, हाल, रोमांच इत्यादी.

(४) विपुलता दाखविण्यासाठी काही शब्दांचे एकवचन वापरतात. जसे - (१) यंदा खूप आंबा पिकला. (२) शेटजींच्या जवळ खूप पैसा आहे. (३) पंढरपुरात यंदा लाख माणूस जमले होते.

(५) जोडपे, त्रिकूट, आठवडा, पंचक, डझन, शत, सहस्र, लक्ष, कोटी हे शब्द असे आहेत, की त्यातून अनेकत्वाचा बोध होतो. तरीही तेवढ्या संख्येचा एक गट मानून ते एकवचनी वापरले जातात. अनेक गट मानले, तर मात्र अनेकवचनी वापरतात. तसेच ढीग, रास, समिती, मंडळ, सैन्य वगैरे शब्दांतील समूह हा एकच मानला जात असल्यामुळे ती एकवचनी ठरतात. मात्र समूह अनेक मानले तर ते अनेकवचनी ठरतात.

(६) अधिक सलगी किंवा जवळीक दाखवायची असेल, तेव्हा मोठ्या व्यक्तींबाबतही एकवचन वापरण्यात येते. उदा. (१) दादा शाळेतून आला. (२) वहिनी उद्या येणार आहे. (३) बाबा गावाला गेला.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) मराठी भाषेत एकूण किती वचने मानतात? ①②③④
1) एक 2) चार 3) दोन 4) पाच

2) आकारान्त पुल्लिंगी नामाचे अनेकवचन ................... होते. ①②③④
1) अकारान्त 2) एकारान्त
3) याकारान्त 4) ऊकारान्त

3) आदरार्थी म्हणून सुद्धा या वचनाचा वापर केला जातो. ①②③④
1) एकवचन 2) अनेकवचन
3) द्विवचन 4) उभयवचन

4) खालीलपैकी एकवचन व अनेकवचन सारखेच असणारा पर्याय कोणता? ①②③④
1) उंदीर 2) कवी
3) मध 4) सर्व पर्याय

5) पुढीलपैकी एकवचनी शब्द ओळखा. ①②③④
1) रस्ता 2) लिंबे 3) घड्याळे 4) फुले

6) पुढीलपैकी एकवचनी शब्द ओळखा. ①②③④
1) विहिरी 2) लांडगा 3) घरे 4) सासवा

7) पुढीलपैकी अनेकवचनी शब्द ओळखा. ①②③④
1) झरा 2) पान 3) चांदण्या 4) माळ

8) पुढीलपैकी अनेकवचनी शब्द ओळखा. ①②③④
1) खडा 2) मासा 3) वह्या 4) पिशवी

9) पुढीलपैकी अनेकवचनी शब्द ओळखा. ①②③④
1) कांजिण्या 2) कुत्रा
3) लांडगा 4) वाग

10) नेहमीच अनेकवचनात असणारे शब्द कोणते? ①②③④
1) क्लेश 2) हाल
3) रोमांच 4) सर्व पर्याय

11) आ कारान्त, ऐ करान्त, ओ कारान्त ............ नामे मराठीत नाहीत. ①②③④
1) नपुंसकलिंगी 2) पुल्लिंगी
3) स्त्रीलिंगी 4) उभयलिंगी

12) वचनाच्या बाबतीत चुकीची जोडी ओळखा. ①②③④
1) पत्र - पत्रे 2) शाळा - शाळी
3) खारीक - खारका 4) केळे - केळी

13) 'शेळी' या शब्दाचे अनेकवचन ............... आहे. ①②③④
1) शेळी 2) शेळ्या
3) शेळ्यांना 4) शेळ्यां

14) 'सासवा' या शब्दाचे एकवचन ............... आहे. ①②③④
1) सासू 2) रुसू 3) सासु 4) सासवा

15) 'मशाल' या शब्दाचे वचन बदला. ①②③④
1) मशाला 2) मशाली
3) मश्याला 4) मशाळ्या

16) पुढीलपैकी कोणत्या नामाचे अनेकवचन 'ए' करान्त होत नाही. ①②③④
1) बाबा 2) राजा 3) आंबा 4) महिना

17) 'हार' या शब्दाचे अनेकवचन ओळखा. ①②③④
1) हारी 2) हाऱ्या 3) हारे 4) हार

18) 'गाई' या शब्दाचे एकवचन काय होईल? ①②③④
1) गाय 2) बैल 3) गाई 4) गाइ

19) अधोरेखित शब्दाचे वचन ओळखा.
घरात लाकडाच्या मोळ्या आणल्या आहेत. ①②③④
1) एकवचन 2) द्विवचन
3) उभयवचन 4) अनेकवचन

20) 'बी' या नामाचे अनेकवचन ओळखा. ①②③④
1) बि 2) बिया
3) बीया 4) यांपैकी नाही

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 11 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 2 | 3) 2 | 4) 4 | 5) 1 |
| 6) 2 | 7) 3 | 8) 3 | 9) 1 | 10) 4 |
| 11) 1 | 12) 2 | 13) 2 | 14) 1 | 15) 2 |
| 16) 1 | 17) 4 | 18) 1 | 19) 4 | 20) 2 |

# १२. विभक्तीविचार

नामाच्या रूपामध्ये बदल होतो, त्याची दोन कारणे आपण पाहिली.

(१) लिंगभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो व (२) वचनभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो. त्याचप्रमाणे (३) विभक्तीमुळेही नामाच्या रूपात बदल होतो; त्याचा आपण अभ्यास करू.

## विभक्ती

प्रत्येक वाक्य हे एखाद्या कुटुंबासारखे आहे. कुटुंबात आई, वडील, भाऊ, बहीण, पती, पत्नी, मुलगा, मुलगी अशा विविध नात्यांची काही माणसे एकत्र येतात. कुटुंबात एक व्यक्ती प्रमुख असते. या प्रमुख व्यक्तीशी त्या कुटुंबातील इतर व्यक्तींचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असे नाते असते. हीच गोष्ट वाक्यातही पाहावयास मिळते. वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दांशी म्हणजे क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी काही ना काही संबंध असतो. या संबंधाला व्याकरणात **कारक** असे म्हणतात.

वाक्यात जे शब्द येतात, ते त्यांच्या मूळ स्वरूपात जसेच्या तसे सामान्यतः येत नाहीत. वाक्यात वापरताना त्यांच्या स्वरूपात बदल करावा लागतो. उदा. - 'शेजारी, मधू, रस्ता, कुत्रा, काठी, मार' असे शब्द एकापुढे एक ठेवल्याने काहीच बोध होत नाही. या शब्दसमूहाला वाक्य म्हणता येत नाही. ते वाक्य होण्यासाठी 'शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले.' अशा स्वरूपात शब्दरचना करायला हवी. वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात जो बदल किंवा विकार होतो, त्याला व्याकरणात **विभक्ती** असे म्हणतात.

## विभक्तीची व्याख्या

**नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.**

## प्रत्यय आणि सामान्यरूप

नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यास त्याला जी अक्षरे जोडतात त्यांस **प्रत्यय** असे म्हणतात. 'शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले.' या वाक्यात 'च्या, ने, त, ला' हे विभक्तीचे प्रत्यय होत. हे विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो, त्याला **सामान्यरूप** असे म्हणतात. 'रस्त्या' व 'कुत्र्या' ही रस्ता व कुत्रा या नामांची सामान्यरूपे होत व 'रस्त्यात', 'कुत्र्याला' ही विभक्तीची रूपे होत.

पुढील तक्त्यात मूळ शब्दात कसा बदल होतो, तसेच सामान्यरूप व विभक्तीचे प्रत्यय दिसून येतील.

| विभक्तीची रूपे | मूळ शब्द | सामान्यरूप | विभक्तीचे प्रत्यय |
|---|---|---|---|
| भावाला | भाऊ | भावा | ला |
| रामाला | राम | रामा | ला |
| शाळेतून | शाळा | शाळे | तून |
| उंदराशी | उंदीर | उंदरा | शी |

## विभक्तीचे प्रकार

प्रत्येक वाक्य म्हणजे एक विधान असते. यात क्रियापद हा प्रमुख शब्द होय. ही क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो. त्याला **कर्ता** असे म्हणतात. ही क्रिया कोणावर घडली? कोणी केली? कशाने केली? कोणासाठी केली? कोठून घडली? कोठे किंवा केव्हा घडली? हे सांगणारे शब्द वाक्यात असतात. नामांचा क्रियापदांशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध अशा आठ प्रकारचा असतो; म्हणून विभक्तीचे एकंदर आठ प्रकार मानले जातात. ते असे-

(१) प्रथमा, (२) द्वितीया, (३) तृतीया, (४) चतुर्थी, (५) पंचमी,

(६) षष्ठी, (७) सप्तमी, (८) संबोधन. यांतील पहिल्या सातांना संस्कृतातील नावे दिली आहेत. आठव्या संबंधाच्या वेळी हाक मारली जाते म्हणून त्याला 'अष्टमी' असे न म्हणता 'संबोधन' असे नाव दिले आहे. (संबोधन = हाक मारणे, बोलावणे.)

या विभक्तींचे प्रत्यय कोणते व त्यामुळे नामाच्या स्वरूपात कोणते बदल होतात, हे पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

### विभक्तीचे प्रत्यय व 'फूल' या नामाची होणारी रूपे

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रूपे | प्रत्यय | शब्दांची रूपे |
| प्रथमा | - | फूल | - | फुले |
| द्वितीया | स, ला, ते | फुलास, फुलाला | स, ला, ना, ते | फुलांस, फुलांना |
| तृतीया | ने, ए, शी | फुलाने, फुलाशी | नी, शी, ई, ही | फुलांनी, फुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते | फुलास, फुलाला | स, ला, ना, ते | फुलांस, फुलांना |
| पंचमी | ऊन, हून | फुलाहून | ऊन, हून | फुलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे | फुलाचा-ची-चे | चा, ची, चे | फुलांचा-ची-चे |
| सप्तमी | त, ई, आ | फुलात | त, ई, आ | फुलांत |
| संबोधन | - | फुला | नो | फुलांनो |

(१) यातील काही प्रत्ययांचा उपयोग केवळ पद्यात होतो.

(२) वरीलप्रमाणे सर्वनामांनाही प्रत्यय लागून रूपे तयार करता येतात.

(३) नामांची किंवा सर्वनामांची विभक्ती प्रत्ययावरून ओळखतात.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) नामाच्या रुपात बदल कशामुळे होतो? ①②③④

1) लिंग 2) वचन 3) विभक्ती 4) सर्व

2) वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरुपात जो बदल किंवा विकार होतो. त्याला व्याकरणात .................... म्हणतात. ①②③④

1) विभक्ती 2) कारक 3) वचन 4) लिंग

3) नाम किंवा सर्वनाम यांचे विभक्तीचे रुप तयार करण्यास त्यांना जी अक्षरे जोडतात त्यांनाच .................... म्हणतात. ①②③④

1) सामान्यरुप 2) वचन
3) प्रत्यय 4) विभक्ती

4) विभक्ती प्रत्यय लागण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरुपात जो बदल होतो, त्याला .................... म्हणतात. ①②③④

1) विभक्ती 2) सामान्यरुप
3) कारक 4) वचन

5) वाक्यातील क्रिया ज्याच्यावर घडते तो घटक म्हणजे .................... होय. ①②③④

1) कर्ता 2) क्रियापद 3) विभक्ती 4) कर्म

6) 'संबोधन' याचा अर्थ काय? ①②③④

1) पाहणे 2) हाक मारणे
3) हसणे 4) बोलणे

7) 'संबोधन' विभक्तीचे एकवचनातले प्रत्यय कोणते? ①②③④

1) स, ला, ते 2) चा, चा, चे
3) त, ई, आ 4) प्रत्यय नाही

8) प्रथमा विभक्तीचे प्रत्यय .................... आहेत. ①②③④

1) त, ई, आ 2) चा, ची, चे
3) प्रत्यय नाही 4) स, ला, ते

9) 'मुलांनो' यातील 'नो' हा प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे? ①②③④

1) संबोधन 2) प्रथमा 3) चतुर्थी 4) षष्ठी

10) पुढील प्रत्ययांवरून विभक्ती ओळखा.
ऊन, हून ①②③④

1) प्रथमा 2) चतुर्थी 3) पंचमी 4) षष्ठी

11) पुढील विभक्तीचे प्रत्यय ओळखा.
चतुर्थी ①②③④

1) ने 2) त 3) ला 4) शी

12) अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.
आजीने नातीला गोष्ट सांगितली. ①②③④

1) पंचमी 2) चतुर्थी 3) द्वितीया 4) प्रथमा

13) अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.
गावात हत्ती आला. ①②③④

1) सप्तमी 2) पंचमी 3) षष्ठी 4) प्रथमा

14) अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.
मी गाडीने शाळेत गेलो. ①②③④

1) प्रथमा 2) चतुर्थी
3) तृतीया 4) पंचमी

15) 'तो' या सर्वनामाला 'ला' हा विभक्ती प्रत्यय लावून शब्द तयार होतो .............. ①②③④

1) तोला 2) तोओला
3) त्याला 4) तिला

16) 'मला साखर आवडते.' या वाक्यातील कोणत्या सर्वनामाला कोणत्या विभक्तीचा कोणता प्रत्यय लागलेला आहे. ①②③④

1) मी, चतुर्थी, ला 2) मला, चतुर्थी, ला
3) मी, द्वितीया, ले 4) मला, द्वितीया, ला

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 12 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 4 | 2) 1 | 3) 3 | 4) 2 | 5) 4 |
| 6) 2 | 7) 4 | 8) 3 | 9) 1 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 2 | 13) 1 | 14) 3 | 15) 3 |
| 16) 1 | | | | |

# १३. सामान्यरूप

## विभक्ती, प्रत्यय, सामान्यरूप

**पुढील वाक्ये वाचा.**

(१) शिक्षकांनी मुलांना शाबासकी दिली.
(२) घराजवळच विटांचा कारखाना आहे.
(३) मासे तळ्यामध्ये राहतात.
(४) त्याने अभ्यास केला.

अधोरेखित शब्दाचे मूळ रूप, सामान्यरूप व त्याला लागलेला विभक्तीचा प्रत्यय पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

| प्रत्यययुक्त शब्द | मूळ शब्द | सामान्यरूपे | विभक्तीचे प्रत्यय |
|---|---|---|---|
| शिक्षकांनी | शिक्षक | शिक्षकां | नी |
| मुलांना | मूल | मुलां | ना |
| घराजवळ | घर | घरा | जवळ (शब्दयोगी अव्यय) |
| विटांचा | वीट | विटां | चा |
| तळ्यामध्ये | तळे | तळ्या | मध्ये (शब्दयोगी अव्यय) |
| त्याने | तो | त्या | ने |

वाक्यात जे शब्द येतात त्यांतील विशेषतः नामे व सर्वनामे ही जशीच्या तशी त्यांच्या मूळ स्वरूपात येत नाहीत. वाक्यात वापरताना त्यांच्या रूपात कधी-कधी बदल करावा लागतो. वरील वाक्यांमध्ये 'शिक्षक' - 'शिक्षकांना', 'मूल' - 'मुलांना' इत्यादी बदल झाले आहेत. 'शिक्षकां-ना' 'मुलां-ना', 'तळ्या-त' असे बदल झालेले दिसतात.

'शिक्षकांनी गोविंदाला वर्गात शाबासकी दिली', या वाक्यातील 'शिक्षक, गोविंद, वर्ग' ही नामे जशीच्या तशी वाक्यात न ठेवता 'शिक्षकां-नी', 'गोविंदा-ला', 'वर्गा-त' असा त्यांच्या रूपात बदल केला आहे.

नामांच्या किंवा सर्वनामांच्या रूपांत हा जो बदल किंवा विकार होतो त्याला **विभक्ती** असे म्हणतात. 'शिक्षकांनी', 'गोविंदाला', 'वर्गात', 'तळ्यात' ही विभक्तींची रूपे आहेत. ही रूपे तयार करताना 'नी', 'ला', 'त' ही अक्षरे जोडली आहेत. अशा अक्षरांना विभक्तीचे प्रत्यय असे म्हणतात. हे प्रत्यय लागताना शब्दांच्या मूळ रूपात बदल होतो. 'गोविंद' या शब्दाचे 'गोविंदा', 'वर्ग' या शब्दाचे 'वर्गा', असे जे रूप होते त्याला **सामान्यरूप** असे म्हणतात. हा बदल शब्दाच्या शेवटच्या अक्षरातील स्वरात होतो. जसे - बाळ-बाळाला, घोडा-घोड्याचा, तळे-तळ्यात, पाणी-पाण्यात, फडके-फडक्यांचा इत्यादी.

या विकाराला 'सामान्यरूप' असे म्हणण्याचे कारण असे की, विभक्तीचा प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाचे बदलणारे रूप सर्व विभक्तीत सारखेच म्हणजे सर्वसामान्य असते.

जसे, तळे = तळ्यास, तळ्याशी, तळ्याचा, तळ्यात.

**१) मूळ शब्दातील अन्त्य स्वर ऱ्हस्व असला, तर सामान्यरूपाच्या वेळी तो दीर्घ होतो.**

जसे, कवि-कवीस, कवीने किंवा गुरू - गुरूचा.

**२) अनेकवचनी शब्दाच्या सामान्यरूपावर नेहमी अनुस्वार येतो.** जसे, मुलांना, पर्यंत, घोड्यांना, शहरांतून इत्यादी.

**३) विभक्तीप्रत्यय लागण्यापूर्वी जसे शब्दाचे सामान्यरूप होते, तसेच शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वीही सामान्यरूप होते.** जसे, घर-घराजवळ, तळे-तळ्यामध्ये, घोडा-घोड्यासाठी, शाळा-शाळेविषयी, घर-घरापुढे.

सामान्यरूपांच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. मातृभाषा मराठी असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या संभाषणात येणाऱ्या शब्दांतील सामान्यरूपांचे निरीक्षण केले पाहिजे. अमराठी भाषक विद्यार्थ्यांनी संभाषणात भाग घेऊन बिनचूकपणे शब्दांचा उपयोग करून सराव केला पाहिजे. पुस्तकवाचनातून डोळसपणाने शब्दांची सामान्यरूपे पाहिली पाहिजेत. सामान्यरूपांचा अभ्यास सुलभ व्हावा, त्यांत बिनचूकपणा व शास्त्रीयता यावी, यासाठी 'मराठी शब्दलेखन कोश' - प्रा. यास्मिन शेख या कोशाचा उपयोग करावा.

## सामान्यरूपाचे विविध प्रकार

नामाच्या लिंगाप्रमाणे व त्याच्या शेवटी असणाऱ्या स्वराप्रमाणे सामान्यरूप निरनिराळ्या प्रकारे होते. ही सामान्यरूपे कशी होतात. याबाबतचे काही नियम पुढे दिले आहेत.

### (१) पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप

(१) खांब-खांबास, निर्णय-निर्णयास, काळ-काळाने, वर्ग- वर्गात.
**अकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.**

(२) घोडा- घोड्याला, कोयता-कोयत्याने, दोरा-दोऱ्याचा.
**आकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.**
(अपवाद- आजोबा, दादा, काका, मामा, नाना, चहा, राजा इत्यादी.)

(३) धोबी-धोब्याला, तेली-तेल्याने, माळी-माळ्याचा.
**ईकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.**
(अपवाद- हत्ती, नंदी, काजी, पंतोजी, मुनी, ऋषी, भटजी इत्यादी.)

(४) कवी- कवीला, गुरू-गुरूला, साधू-साधूचा, नीती-नीतीला.
**इकारान्त व उकारान्त तत्सम शब्द दीर्घान्त लिहावयाचे असल्यामुळे त्यांचे सामान्यरूप दीर्घान्तच राहते.**

(५) भाऊ-भावांनी, विंचू-विंचवांनी, नातू-नातवांचा.
**ऊकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप वाकारान्त होते.**
(अपवाद- पेरू, चाकू, खड्डू, शत्रू, खेळाडू, पशू.)

(६) फडके- फडक्यांचा, गोखले- गोखल्यांचा, पोरे- पोऱ्यांनी.
**एकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.**

(७) किलो-किलोस, धनको-धनकोचा, बिटको-बिटकोने.
**ओकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप ओकारान्तच राहते.**

**(२) स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरूप**

(१) (अ) वीट-विटेचा, विटांचा, जीभ-जिभेला, जिभांनी.

**अकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात एकारान्त व अनेकवचनात आकारान्त होते.**

(ब) भिंत-भिंतीला, विहीर-विहिरीत.

**काही अकारान्त स्त्रीलिंगी नामांची सामान्यरूपे ईकारान्त होतात.**

(२) शाळा-शाळेत, भाषा-भाषेचा, माता-मातेला, विद्या-विद्येने

**आकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकारान्त होते.**

(३) भक्ती-भक्तीने, नदी-नदीचा, नद्यांचा, बी-बियांचा, पेटी-पेटीत,
दासी-दासीला, दासींचा, स्त्री-स्त्रियांना.

**ईकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात ईकारान्त व अनेकवचनात ईकारान्त किंवा याकारान्त होते.**

(४) काकू-काकूला, वधू-वधूचा, सासू-सासूला, सासवांना.
**ऊकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप होत नाही. क्वचित ते वाकारान्त होते.**

(५) बायको-बायकोला, बायकांना.

**ओकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात होत नाही व अनेकवचनात आकारान्त होते.**

**(३) नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप**

(१) मूल-मुलाने, पान-पानाचा, दुकान-दुकानात, फूल-फुलात.
**अकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.**
अशा वेळी उपान्त्य अक्षर (शेवटून दुसरे अक्षर) दीर्घ असल्यास ऱ्हस्व होते.

(२) पाणी-पाण्यात, मोती-मोत्याचा, लोणी-लोण्याचा.
**ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.**

(३) (अ) लिंबू-लिंबाचे, कोकरू-कोकराचे, लेकरू-लेकराला.
**ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.**
(ब) कुंकू-कुंकवाचा, गळू-गळवाचा, आसू-आसवाने.
**काही ऊकारान्त नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप वाकारान्त होते.**

(४) तळे-तळ्यात, केळे-केळ्यांची, खोके-खोक्यात, नाणे-नाण्यात.
**एकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.**

## काही **महत्त्वाचे**

सामान्यरूपात दंततालव्याचा शुद्धदंततालव्य व स-काराचा श-कार होतो. जसे - चोच-चोचीने, ससा-सशाला, राजा-राजाने इत्यादी.

शुद्धतालव्य, य आणि श तसेच राहतात. 'श' या तालव्यात 'य' या तालव्याची भर घालत नाहीत. जसे- बाजा-बाजाने, पाया-पायात, माशी-माशीचा इत्यादी.

वचनविकारात च-वर्ग (च, छ, ज, झ) स, श यांस 'य'च्या बाराखडीतील अक्षर जोडण्याचा प्रसंग आल्यास तो य-रहित जोडावा. जसे- टाच-टाचांना, सोय-सोईने, जोशी-जोशांना इत्यादी.

**सामान्यरूप केव्हा होत नाही?**

(१) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.
जसे- '**श**'ला सुटा काना असतो. '**अ**'ने '**ब**'ला मारले.

(२) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप कधी-कधी होत नाही.
जसे- **शेक्सपिअरची** नाटके अद्यापही लोकांना आवडतात.
राजेसाहेबांनी **गव्हर्नरला** मेजवानी दिली.

(३) ग्राम किंवा देशवाचक विशेषनामांचे कधी-कधी सामान्यरूप होत नाही.
जसे- पंधरा ऑगस्टला **हिंदुस्थानला** स्वातंत्र्य मिळाले.
मी **बनारसला** शिक्षणासाठी गेलो.
ही वस्तू मी **इंग्लंडहून** आणली.

पण चतुर्थीचा 'स' आणि सप्तमीचा 'त' प्रत्यय लागताना सामान्यरूप होते. जसे- नागपूर-नागपुरास, हिंदुस्थान-हिंदुस्थानात, पंजाब-पंजाबात इत्यादी.

## विशेषणांचे सामान्यरूप

(१) **अकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.**
जसे- जगात **गरीब** माणसांना कोणी विचारीत नाही.
त्याचे **लोकरी** कपड्यांचे दुकान आहे.
मला **कडू** कारल्याची भाजी आवडते.

(२) **विभक्तिप्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारान्त विशेषणांचे सामान्यरूप याकारान्त होते.**
जसे- **भल्या** माणसाने, **ह्या** मुलाचा, **वेड्या** मुलीने, **खऱ्या** गोष्टीस इत्यादी.

वरील उदाहरणांतील विशेषण व विशेषणाचे सामान्यरूप पुढील तक्त्यात दाखविले आहे.

| विशेषण | नाम | विशेषणाचे सामान्यरूप | विभक्तिप्रत्यययुक्त नाम |
|---|---|---|---|
| भला | माणूस | भल्या | माणसाने |
| हा | मुलगा | ह्या | मुलाचा |
| वेडी | मुलगी | वेड्या | मुलीने |
| खरी | गोष्ट | खऱ्या | गोष्टीस |

## स्वयंअध्ययन

1) शब्दांना (नामांना व सर्वनामांना) विभक्ती प्रत्यय लागताना शब्दांच्या मूळ रूपात जो बदल होतो ते रूप म्हणजेच ......... होय. ①②③④
1) विभक्ती रूप 2) सामान्यरूप
3) कारकरूप 4) लिंगरूप

2) सामान्यरूप करताना कोणत्या अक्षरातील स्वरात बदल होतो. ①②③④
1) शेवटच्या 2) पहिल्या
3) दुसऱ्या 4) तिसऱ्या

3) कोणत्या वचनाच्या शब्दाच्या सामान्यरूपावर नेहमी अनुस्वार येतो. ①②③④
1) बहुवचनी 2) द्विवचनी
3) अनेकवचनी 4) एकवचनी

4) ईकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप ............... होते. ①②③④
1) आकारान्त 2) एकारान्त
3) याकारान्त 4) उकारान्त

5) ............... शब्दांचे सामान्यरूप होत नाही. ①②③④
1) अनेकवचनी 2) एकाक्षरी
3) एकवचनी 4) बहुवचनी

6) 'भिंत' या नामाचे सामान्यरूप कोणते? ①②③④
1) भिंत 2) भिंती 3) भिंता 4) भिंत्या

7) 'ग्रंथ' या नामाचे सामान्यरूप कोणते ①②③④
1) ग्रंथ 2) ग्रंथू 3) ग्रंथा 4) ग्रंथाला

8) खालील शब्दांच्या सामान्यरूपाचा पर्याय ओळखा
I) बाग ①②③④
1) बागु 2) बागा 3) बागी 4) बागे
II) गल्ली
1) गल्लीत 2) गल्ली 3) गल्लि 4) गल्ल्या
III) कुंकू
1) कुंकवा 2) कुंकूवा 3) कुंकुवा 4) कुंकू
IV) कबूतर
1) कबूतरा 2) कबुतरा
3) कबुतराने 4) काबुतरे

9) 'तो' या सर्वनामाचे सामान्यरूप काय होईल? ①②③④
1) तोने 2) त्याने 3) तिने 4) तीने

10) 'चिमण्यांचा चिवचिवाट ऐकून मी प्रसन्न झालो.' या वाक्यातील सामान्यरूप झालेला शब्द ओळखा. ①②③④
1) ऐकून 2) प्रसन्न
3) चिवचिवाट 4) चिमण्यांचा

11) 'मी पक्षिमित्रांना, पक्ष्यांना वाचवताना पाहिले.' दिलेल्या वाक्यात सामान्यरूप झालेल्या शब्दाचा मूळ शब्द ओळखा. ①②③④
1) पक्षी 2) पक्षिमित्र
3) वाचव 4) पर्याय १ व २

12) सामान्यरूप होताना कोणत्या शब्दातील शेवटचा शब्द बदलणार नाही. ①②③④
1) किल्ले 2) नंदी
3) हत्ती 4) सर्व पर्याय

13) 'तो आमच्या माळ्याचा मुलगा आहे.' सामान्यरूप ओळखा? ①②③④
1) तो 2) आमच्या
3) माळ्या 4) मुलगा

14) 'दिव्याखाली अंधार' या म्हणीत झालेले सामान्यरूप ओळखा. ①②③④
1) दिवा 2) दिव्या 3) खाली 4) अंधार

15) 'मुलगा अंगणात खेळत आहे.' सामान्यरूप ओळखा? ①②③④
1) अंगणा 2) खेळत 3) मुलगा 4) आहे

16) 'विषय' या शब्दाचे सामान्यरूप पुढीलपैकी कोणते होईल? ①②③④
1) विषया 2) वीषय 3) वीषया 4) विष

17) 'भाऊ' या नामाचे सामान्यरूप .......... होईल? ①②③④
1) आकारान्त 2) वाकारान्त
3) ऊकारान्त 4) एकारान्त

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 13 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 1 | 3) 3 | 4) 3 | 5) 2 |
| 6) 2 | 7) 3 | 8 I) 4 | 8 II) 2 | 8 III) 1 |
| 8 IV) 2 | 9) 2 | 10) 4 | 11) 4 | 12) 4 |
| 13) 3 | 14) 2 | 15) 1 | 16) 1 | 17) 2 |

# १४. सर्वनामे

**पुढील परिच्छेद वाचा.**

पंतप्रधानांचे विमान विमानतळावर उतरले. पंतप्रधान विमानातून उत्साहाने खाली उतरले. पंतप्रधानांनी सर्वांना हसून अभिवादन केले. जवळच लहान मुले उभी होती. पंतप्रधान लहान मुलांकडे गेले. पंतप्रधानांना एका मुलाने गुलाबाचे फूल दिले. पंतप्रधानांना आनंद झाला.

वरील परिच्छेदात थोडा बदल करून तो पुन्हा लिहूया. आता वाचा.

पंतप्रधानांचे विमान विमानतळावर उतरले. **ते** विमानातून उत्साहाने खाली उतरले. **त्यांनी** सर्वांना हसून अभिवादन केले. जवळच लहान मुले होती. ते लहान मुलांकडे गेले. एका लहान मुलाने **त्यांना** गुलाबाचे फूल दिले. **त्यांना** आनंद झाला.

वरील दोन्ही परिच्छेदांचे वाचन केल्यावर लक्षात येईल की, प्रारंभी 'पंतप्रधान' या नामाचा उल्लेख केल्यावर पहिल्या परिच्छेदात त्याच नामाचा उल्लेख पुनःपुन्हा अयोग्य वाटतो. दुसऱ्या परिच्छेदात, प्रारंभी 'पंतप्रधान' या नामाचा उल्लेख केल्यानंतर, त्या नामाऐवजी 'ते', 'त्यांना' असा उल्लेख योग्य वाटतो. नामाचा पुनःपुन्हा येणारा उल्लेख कानाला खटकतो. दुसऱ्या परिच्छेदात नामाचा पुनरुच्चार टाळण्यासाठी 'ते', 'त्यांना' असा उल्लेख आला आहे. अशा नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला **सर्वनाम** असे म्हणतात.

**सर्वनाम म्हणजे वाक्यात नामाच्या ऐवजी येणारा शब्द.** नाम वाक्यात वारंवार आले, तर ते कानाला बरे वाटत नाही. नामाचा हा पुनरुच्चार टाळण्यासाठी नामाच्या ऐवजी 'मी, तू, तो, हा, जो, आपण, कोण, काय' यांसारखे शब्द आपण वापरतो. या सर्वनामांना स्वतःचा अर्थ नसतो. ते ज्या नामांबद्दल येतात, त्यांचाच अर्थ त्यांना प्राप्त होतो. वाक्यात एखादे नाम येऊन गेल्याशिवाय सर्वनाम येत नाही. नामाचा तो प्रतिनिधी असून नामाचे सर्व प्रकारचे कार्य सर्वनाम करते. 'तो' हा शब्द रामा, वाडा, कळप, धवा, आळस अशा कोणत्याही प्रकारच्या नामाबद्दल वापरता येतो. अशा शब्दाचा उपयोग सर्व (प्रकारच्या) नामांसाठी होतो, म्हणून त्यांस **सर्वनाम** असे म्हणतात.

**नामांचा पुनरुच्चार किंवा पुनर्वापर टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या नामांच्या जागी येणाऱ्या विकारी शब्दाला सर्वनाम असे म्हणतात.**

## सर्वनामांचे प्रकार

**सर्वनामांचे पुढीलप्रमाणे एकूण सहा प्रकार मानतात-** (१) पुरुषवाचक सर्वनाम, (२) दर्शक सर्वनाम, (३) संबंधी सर्वनाम, (४) प्रश्नार्थक सर्वनाम, (५) सामान्य सर्वनाम किंवा अनिश्चित सर्वनाम व (६) आत्मवाचक सर्वनाम.

**(१) पुरुषवाचक सर्वनामे :-** बोलणाऱ्याच्या किंवा लिहिणाऱ्याच्या दृष्टीने जगातील सर्व वस्तूंचे तीन वर्ग पडतात- (१) बोलणाऱ्यांचा (२) ज्यांच्याशी आपण बोलतो किंवा लिहितो त्यांचा व (३) ज्यांच्याविषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा व वस्तूंचा. व्याकरणात यांना **'पुरुष'** असे म्हणतात. या तीनही वर्गांतील नामांबद्दल येणाऱ्या सर्वनामांना **पुरुषवाचक सर्वनामे** असे म्हणतात. (१) बोलणारा स्वतःचा उल्लेख

करताना जी सर्वनामे वापरतो ती **प्रथम पुरुषवाचक सर्वनामे.** उदा. मी, आम्ही, आपण स्वतः इत्यादी. (२) ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे आपण वापरतो ती **द्वितीय पुरुषवाचक सर्वनामे.** उदा. तू, तुम्ही, आपण, स्वतः. (३) ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो, ती **तृतीय पुरुषवाचक सर्वनामे.** उदा. तो, ती, ते, त्या.

**(२) दर्शक सर्वनामे :-** जवळची किंवा दूरची वस्तू दाखविण्यासाठी जे सर्वनाम येते, त्यास **'दर्शक सर्वनाम'** असे म्हणतात. उदा. हा, ही, हे, तो, ती, ते.

**(३) संबंधी सर्वनामे :-** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखविणाऱ्या सर्वनामांना **'संबंधी सर्वनामे'** असे म्हणतात. उदा. जो-जी-जे, जे-ज्या.

**(४) प्रश्नार्थक सर्वनामे :-** ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी होतो, त्यांना **'प्रश्नार्थक सर्वनामे'** म्हणतात. उदा. कोण, काय, कोणास, कोणाला, कोणी इत्यादी.

**(५) सामान्य सर्वनामे किंवा अनिश्चित सर्वनामे :-** कोण, काय ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत हे निश्चितपणे सांगता येत नाही, तेव्हा त्यांना **अनिश्चित सर्वनामे** असे म्हणतात. उदा. (१) **कोणी कोणास** हसू नये. (२) त्या **पेटीत** काय आहे ते सांगा. या सर्वनामांना कोणी **सामान्य सर्वनामे** असेही म्हणतात.

**(६) आत्मवाचक सर्वनामे**

पुढील वाक्ये पाहा.

(१) मी स्वतः त्याला पाहिले.

(२) तू स्वतः मोटार हाकशील का?

(३) तो आपण होऊन माझ्याकडे आला.

(४) तुम्ही स्वतःला काय समजता?

आपण या सर्वनामाचा अर्थ जेव्हा 'स्वतः' असा होतो, तेव्हा ते **आत्मवाचक सर्वनाम** असते. यालाच कोणी 'स्वतःवाचक सर्वनाम' असेही म्हणतात.

**पुरुषवाचक सर्वनाम व आत्मवाचक सर्वनाम यांतील फरक (आपण व स्वतः)**

आपण व स्वतः ही दोन्ही सर्वनामे पुरुषवाचकही असतात. तेव्हा या दोहोंमध्ये फरक इतकाच की, पुरुषवाचक 'आपण' हे केवळ अनेकवचनात येते. आत्मवाचक 'आपण' हे दोन्ही वचनात येते. पुरुषवाचक 'आपण' हे वाक्याच्या आरंभी येऊ शकते. आत्मवाचक 'आपण' तसे येत नाही. 'आपण' हे 'आम्ही' व 'तुम्ही' या अर्थाने येते, तेव्हा ते पुरुषवाचक असते व 'स्वतः' या अर्थाने येते, तेव्हा ते आत्मवाचक असते.

## सर्वनामांचा लिंगविचार

मराठीत मूळ सर्वनामे नऊ आहेत. ती पुढीलप्रमाणे - मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, आपण, स्वतः इत्यादी. यांतील लिंगानुसार बदलणारी तीनच -

(१) तो, (२) हा, (३) जो. जसे तो-ती-ते, हा-ही-हे, जो-जी-जे. याशिवाय इतर सर्व सर्वनामांची तीनही लिंगांतील रूपे सारखीच राहतात; ती बदलत नाहीत.

## सर्वनामांचा वचनविचार

मराठीतील मूळ नऊ सर्वनामांपैकी 'मी, तू, तो, हा, जो' ही पाच सर्वनामे वचनभेदाप्रमाणे बदलतात. जसे मी- आम्ही; तू- तुम्ही; तो, ती, ते - ते, त्या, ती; हा, ही, हे - हे, ह्या, ही; जो, जी, जे - जे, ज्या, जी.

बाकीच्या सर्वनामांची (कोण, काय, आपण, स्वतः) रूपे दोन्ही वचनांत सारखीच राहतात.

सर्वनामाचे लिंग व वचन ते ज्या नामाकरिता सर्वनाम आले असेल, त्यावर अवलंबून असते.

## सर्वनामांचा विभक्तिविचार

सर्वनामे ही नामांच्या ऐवजी येत असल्यामुळे नामांना जे विभक्तीचे प्रत्यय लागतात, तेच बहुधा सर्वनामांना लागतात. नामाप्रमाणेच सर्वनामाची विभक्तिरूपे अनियमित होतात. नमुन्यादाखल 'तू' या सर्वनामाची सर्व विभक्तिरूपे पुढील तक्त्यात दिली आहेत. सर्वनामांची संबोधन विभक्ती नसते. कारण सर्वनामे ही प्राणी किंवा वस्तू नसल्यामुळे त्यांची हाक मारण्यासाठी योजना होत नाही.

### 'तू' या सर्वनामाची विभक्तीची रूपे

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | तू | तुम्ही |
| द्वितीया | तुला, तुजला, तूते | तुम्हांस, तुम्हांला, तुम्हांते |
| तृतीया | तू, त्वा, तुशी, तुजशी | तुम्ही, तुम्हांशी |
| चतुर्थी | तुला, तुजला, तूते | तुम्हांस, तुम्हांला, तुम्हांते |
| पंचमी | तुजहून | तुम्हांहून |
| षष्ठी | तुझा, तुझी, तुझे | तुमचा, तुमची, तुमचे |
| सप्तमी | तूत, तुझ्यात* | तुम्हांत, तुमच्यात* |

* मूळ शब्द व प्रत्यय यांच्यामध्ये आणखी एक अक्षर येऊन तुझ्याने, तुमच्यांशी, तुझ्याहून, तुमच्याहून, तुझ्यात, तुमच्यात अशी जी रूपे होतात, त्यांस **विकरण** असे म्हणतात. ही शुद्ध विभक्तीची रूपे नसून यांना **सविकरणी विभक्ती** असे म्हणतात.

## सर्वनामांचे उपयोग

विविध सर्वनामांचा सामान्यतः कसा उपयोग होतो, ते पुढील तक्त्यात पाहू या.

| सर्वनामे | | उपयोग | | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| मी | (१) | बोलणारा स्वतः एकट्याबद्दल बोलताना | (१) | **मी** शाळेतून आलो. |
| आम्ही | (१) | स्वतःबरोबर इतरांच्या वतीने बोलताना | (१) | **आम्ही** उद्या सहलीला जाऊ. |
| | (२) | स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी एखादी व्यक्ती, तसेच संपादक, राजा, वरिष्ठ अधिकारी, हे स्वतःबद्दल 'आम्ही' वापरतात. | (१) | काल **आमच्या** मुलीचे लग्न झाले. |
| | | | (२) | जनतेला जागृत करणे हे **आमचे** कर्तव्य आहे, असे **आम्ही** मानतो. |
| | | | (३) | **आम्ही** हा किताब तुम्हांस देतो. |
| तू | (१) | एका व्यक्तीशी बोलताना | (१) | **तू** आता घरी जा. |

| सर्वनामे | | उपयोग | | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| | (२) | प्रेमाने, भक्तीने, सलगीने बोलताना | (१) | आई, **तू** कुठे गेली होतीस? |
| | | | (२) | देवा, **तू** मला क्षमा कर. |
| तुम्ही | (१) | अनेकांशी बोलताना | (१) | **तुम्ही** आता सर्व जण घरी जा. |
| | (२) | एखाद्या व्यक्तीबद्दल आदर दाखवताना | (२) | गुरुजी, **तुम्ही** उद्या आमच्याकडे या. |

| सर्वनामे | | उपयोग | | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| तो-ती-ते | (१) | ज्याच्याबद्दल बोलायचे त्याचा उल्लेख करताना | (१) | **तो** उद्या शाळेत येणार नाही. |
| जो-जी-जे | (१) | वाक्यात पुढे येणाऱ्या 'तो' या सर्वनामाशी संबंध दाखविताना | (१) | **जो** चढतो तोच पडतो. |
| | | | (२) | **जे** चकाकते ते सोने नव्हे. |
| हा-ही-हे | (१) | पुढे असलेली वा जवळची वस्तू दाखवावयाची असल्यास | (१) | **ही** माझी टोपी आहे. |
| कोण | (१) | प्रश्नार्थक कोण (प्राणिवाचक) | (१) | **कोण** बोलतो तिकडे? |
| | (२) | प्रश्नार्थक काय (वस्तुवाचक) | (२) | तुला **काय** हवे? |
| | (३) | सामान्य (अनिश्चित) | (३) | **कोणी** यावे कोणी जावे. |
| | (४) | आश्चर्यकारक उद्‌गार. | (४) | **कोण** ही गर्दी! |
| आपण | (१) | पुरुषवाचक या अर्थी | (१) | **आपण** आमच्याकडे उद्या याल का? |
| | (२) | स्वतःबद्दल मोठेपणा घेताना | (२) | **आपण** हे कबूल करणार नाही. |
| | (३) | आत्मवाचक स्वतः या अर्थी | (३) | तो **आपणहून** माझ्याकडे आला. |

## सर्वनामांचे काही विशेष

(१) सर्वसाधारणपणे नामाचा वापर अगोदर होतो, तेव्हाच व त्यानंतर सर्वनामाचा वापर होतो.

(२) सर्वनामाला स्वतःची वेगळी लिंग, वचन अशी ओळख नसते, सर्वनामाचे लिंग अथवा वचनातील रूप ते ज्या नामाच्या जागी येते त्यावरून निश्चित होते.

(३) लिंगानुसार बदलणारी सर्वनामे - 'हा, तो, जो' आहेत. इतर सर्वनामांची तिन्ही लिंगांतील रूपे सारखीच असतात.

**प्रश्नार्थक सर्वनाम व सामान्य सर्वनाम (अनिश्चित सर्वनाम) यांतील फरक**

'कोण', 'काय' ही सर्वनामे वरील दोन्ही प्रकारांत आहेत. वाक्यातील उपयोगानुसार, अर्थानुसार त्याचा प्रकार लक्षात येतो.

**(अ) प्रश्नार्थक सर्वनाम - कोण, काय.**

पुढील वाक्ये वाचा.

(१) कोण रे तू? (२) तुला काय हवे?

पहिल्या वाक्यात अनोळखी व्यक्तीबद्दल 'कोण' हे सर्वनाम आले आहे. तसेच दुसऱ्या वाक्यात जे हवे आहे त्या वस्तूबद्दल 'काय' हे सर्वनाम आले आहे. दोन्ही ठिकाणी माहिती विचारण्यासाठी हे प्रश्न आहेत. म्हणून ती **प्रश्नार्थक सर्वनामे** आहेत.

**(आ) सामान्य सर्वनाम (अनिश्चित सर्वनाम) - कोण, काय.**

पुढील वाक्ये वाचा.

(१) तिकडे **कोण** आहे, ते मला माहीत नाही.

(२) त्या दुकानात **काय** वाटेल ते मिळते.

(३) गुणेश म्हणजे सर्वज्ञ. त्याला **काय** माहीत नसते!

पहिल्या वाक्यात 'तिकडे जो कोणी आहे' त्याच्याबद्दल 'कोण' हे सर्वनाम आले आहे. हे वाक्य प्रश्नार्थक नाही. या वाक्यातील 'कोण' हे सर्वनाम कोणत्या नामाबद्दल आले आहे, हे निश्चित सांगता येत नाही.

दुसऱ्या वाक्यात 'दुकानात जे काही मिळते' त्याच्याबद्दल 'काय' हे सर्वनाम आले आहे. हे वाक्य प्रश्नार्थक नाही. 'काय' हे सर्वनाम कोणत्या नामाबद्दल आले आहे, ते निश्चित सांगता येत नाही. असेच तिसऱ्या वाक्याबद्दलही म्हणता येईल.

'कोण', 'काय' या सर्वनामांचा उपयोग प्रश्न विचारण्यासाठी न करता सामान्यपणे केलेला आहे; आणि ती सर्वनामे कोणत्या नामांबद्दल येतात ते निश्चितपणे सांगता येत नाही, म्हणून त्या सर्वनामांना **सामान्य सर्वनामे** किंवा **अनिश्चित सर्वनामे** असे म्हणतात.

**आत्मवाचक सर्वनामे - आपण, स्वतः इत्यादी.**

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) मी आपणहून सहलीला जाण्याची तयारी दाखविली.

(२) नागरिकाने आपणाला राष्ट्रभक्त मानले पाहिजे.

पहिल्या वाक्यात 'मी' या सर्वनामाबरोबर 'आपणहून' हे सर्वनाम आले आहे. दुसऱ्या वाक्यात 'नागरिकाने' या नामानंतर 'आपणाला' हे सर्वनाम आले आहे. इथे 'स्वतःहून', 'स्वतःला' ही सर्वनामांची रूपे बिनचूकपणे वापरणे शक्य होते. अशा वाक्यात येणाऱ्या 'आपण' व 'स्वतः' या सर्वनामांना **आत्मवाचक सर्वनामे** म्हणतात.

स्वतः हे आत्मवाचक सर्वनाम नामाच्या किंवा सर्वनामाच्या सोबतीशिवाय सहसा वापरले जात नाही. (अपवाद - 'स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.') आपण हे सर्वनाम आत्मवाचक म्हणून वापरले, तर ते देखील नामाच्या किंवा सर्वनामाच्या आधाराने येते.

(६) 'आपण' या आत्मवाचक सर्वनामाचा पुरुषवाचक सर्वनाम म्हणूनही उपयोग केला जातो आणि ते तीनही पुरुषांत व दोन्ही वचनांत चालते.

**उदाहरणासाठी काही वाक्ये पाहू.**

(१) तुझ्या सांगण्यावरून आपण त्याच्याशी भांडणार नाही.

- आपण = मी. प्रथम पुरुष, एकवचन.

(२) आम्ही ठरवले आहे की, आपण सहलीला जाऊ.

- आपण = आम्ही. प्रथम पुरुष, अनेकवचन.

(३) शिक्षक विद्यार्थिनीला उपरोधाने म्हणाले,''आपण रडणे थांबवून बोलाल का?''

- आपण = तू. द्वितीय पुरुष, एकवचन.

(४) मी देवळात गेलो तेव्हा आपण इकडे घरी आलात का?

- आपण = तुम्ही. द्वितीय पुरुष, अनेकवचन.

(५) सुरेशने मला शाळेत बोलावले आणि आपण आलाच नाही.

- आपण = तो. तृतीय पुरुष, एकवचन.

(६) नेत्यांनी कामगारांना बाहेर थांबविले आणि आपण चर्चेसाठी मालकांकडे गेले.

- आपण = ते - नेते. तृतीय पुरुष, अनेकवचन.

## थोडक्यात - सर्वनामांचे प्रकार व सर्वनामे

(१) **पुरुषवाचक सर्वनामे** - मी, आम्ही, तू, तुम्ही, तो, ती, ते, ते, त्या, ती.

(२) **दर्शक सर्वनामे** - हा, ही, हे; हे, ह्या, ही; तो, ती, ते; ते, त्या, ती.

(३) **संबंधी सर्वनामे** - जो, जी, जे; जे, ज्या, जी.

(४) **प्रश्नार्थक सर्वनामे** - कोण, काय.

(५) **सामान्य सर्वनामे किंवा अनिश्चित सर्वनामे** - कोण, काय.

(६) **आत्मवाचक सर्वनामे** - आपण, स्वतः.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**1) नामाच्याऐवजी येणारा शब्द म्हणजे .............** ①②③④

1) विशेषनाम 2) सर्वनाम

3) सामान्यनाम 4) भाववाचक नाम

**2) सर्वनामांना स्वतःचा अर्थ असतो, ते ज्या नामांबद्दल वापरले जातात, त्यांचाच अर्थ ते घेत नाहीत.** ①②③④

1) पूर्ण विधान बरोबर 2) पूर्ण विधान चूक

3) पूर्वार्ध बरोबर 4) उत्तरार्ध बरोबर

**3) सर्वनाम हे .................. असते.** ①②③④

1) विकारी 2) अविकारी

3) अव्यय 4) सर्व पर्याय

**4) मराठी भाषेत एकूण सर्वनामे किती?** ①②③④

1) चार 2) सहा 3) नऊ 4) दोन

**5) लिंगानुसार बदलणारी सर्वनामे किती?** ①②③④

1) तीन 2) दोन 3) नऊ 4) सहा

**6) सर्वनामांचे लिंग व वचन ............. वर अवलंबून असते.** ①②③④

1) नामां 2) सर्वनामां

3) क्रियापदां 4) विभक्ती

7) पुढीलपैकी वचनानुसार बदलणारे सर्वनाम ओळखा. ①②③④

1) कोण 2) मी 3) आपण 4) स्वतः

8) ............ च्या वापरानंतरच सर्वनामांचा वापर होतो. ①②③④

1) नामां 2) विशेषणां 3) विभक्तीं 4) लिंगां

9) सर्वनाम नसलेला पर्याय ओळखा. ①②③④

1) मी 2) आपण 3) किंवा 4) स्वतः

10) पुढील वाक्यांतील सर्वनामे ओळखा (अचूक पर्याय)

I) तुम्ही काळजी करू नका. ①②③④

1) नका 2) काळजी 3) करू 4) तुम्ही

II) जो करेल तो भरेल.

1) करेल, तो 2) करेल

3) जो, तो 4) भरेल

III) तो त्याच्या घरून निघाला. ①②③④

1) निघाला 2) घरून

3) तो, त्याच्या 4) तो

11) पुढील वाक्यातील सर्वनामांचा प्रकार ओळखा

I) मी आता घरी जातो. ①②③④

1) प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

2) दर्शक सर्वनाम

3) संबंधी सर्वनाम

4) आत्मवाचक सर्वनाम

II) तू आज घरी येऊ नकोस. ①②③④

1) दर्शक सर्वनाम

2) प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

3) द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम

4) प्रश्नार्थक सर्वनाम

III) कोण आहे तिकडे? ①②③④

1) प्रश्नार्थक सर्वनाम 2) सामान्य सर्वनाम

3) संबंधी सर्वनाम 4) दर्शक सर्वनाम

IV) मी आपण होऊन त्याच्याकडे गेले. ①②③④

1) प्रश्नार्थक सर्वनाम 2) दर्शक सर्वनाम

3) आत्मवाचक सर्वनाम 4) पुरुषवाचक सर्वनाम

V) जो येईल तोच येईल. ①②③④

1) आत्मवाचक सर्वनाम 2) दर्शक सर्वनाम

3) संबंधी सर्वनाम 4) प्रश्नार्थक सर्वनाम

12) दिलेल्या पर्यायांतून सर्वनाम ओळखा. ①②③④

1) जो 2) तो

3) हा 4) सर्व पर्याय

13) खालीलपैकी प्रश्नार्थक सर्वनामाचे पर्याय निवडा. ①②③④

1) तू 2) कोण 3) आपण 4) जो

14) भाजी कोणी आणली? या वाक्यातील कोणी हे ............ सर्वनाम आहे. ①②③④

1) सामान्य सर्वनाम 2) दर्शक सर्वनाम

3) संबंधी सर्वनाम 4) प्रश्नार्थक सर्वनाम

15) स्वतःचा उल्लेख करणारी वाक्यातील सर्वनामे ............ म्हणून ओळखली जातात. ①②③④

1) प्रश्नार्थक सर्वनामे 2) अनिश्चित सर्वनामे

3) आत्मवाचक सर्वनामे

4) तृतीय पुरुषवाचक सर्वनामे

16) कोण, काय ही सर्वनामे वाक्यात असूनही वाक्याच्या शेवटी पूर्णविराम येतो तेव्हा ही ............ सर्वनामे असतात. ①②③④

1) प्रश्नार्थक 2) आत्मवाचक

3) अनिश्चित 4) दर्शक

### ▶▶ सराव प्रश्नसंग्रह 14 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 1 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 1 | 7) 2 | 8) 1 | 9) 3 | 10 I) 4 |
| 10 II) 3 | 10 III) 3 | 11 I) 1 | 11 II) 3 | 11 III) 1 |
| 11 IV) 3 | 11 V) 3 | 12) 4 | 13) 2 | 14) 4 |
| 15) 3 | 16) 3 | | | |

# १५. विशेषणे

**पुढील शब्दसमूह पाहा.**

| | | |
|---|---|---|
| चांगली मुले | काळा कुत्रा | हिरवे रान |
| पाच टोप्या | त्याची पिशवी | खूप लोक |

वरील शब्दसमूहांत 'चांगली, काळा, हिरवे, पाच, त्याची, खूप' हे शब्द त्यांच्यापुढे येणाऱ्या नामांविषयी विशेष माहिती सांगतात.

ही विशेष माहिती सांगणारे शब्द त्या नामांची विशेषणे आहेत.

**विशेषण - नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दास विशेषण असे म्हणतात.**

विशेषणाचे वैशिष्ट्य हे की, ते नामाबद्दल अधिक माहिती सांगते व नामाची व्याप्ती मर्यादित करते व ते साधारणपणे नामापूर्वी येते. उदा. 'टोपी' हे नाम आहे. आपल्याला टोप्यांविषयी बोलावयाचे आहे. त्या टोप्यांची संख्या 'पाच' असे सांगून आपण संख्या सांगितली व 'पाच' टोप्यांविषयी आपल्याला काही सांगावयाचे आहे, हे सुचविले. 'काळ्या पाच टोप्या' असे म्हटले, तर टोप्यांविषयी माहिती सांगून आपण ती मर्यादित केली. 'लोकरीच्या काळ्या पाच टोप्या आम्ही बाजारातून आणल्या.' या वाक्यात ज्या टोप्यांविषयी आपल्याला बोलावयाचे आहे ते अधिक मर्यादित केले म्हणजे अधिक निश्चित केले असे म्हटले तरी चालेल.

**विशेषण आणि विशेष्य**

ज्या नामांबद्दल विशेषण अधिक माहिती सांगते त्या नामाला **विशेष्य** असे म्हणतात. वरील शब्दसमूहातील विशेषण-विशेष्य संबंध पुढीलप्रमाणे तक्त्यात मांडता येतील.

| विशेषण | विशेष्य | विशेषण | विशेष्य |
|---|---|---|---|
| चांगली | मुले | पाच | टोप्या |
| काळा | कुत्रा | त्याची | पिशवी |
| हिरवे | रान | खूप | लोक |

## विशेषणांचे प्रकार

विशेषणांचे मुख्य प्रकार तीन आहेत -

(१) गुणविशेषण, (२) संख्याविशेषण व (३) सार्वनामिक विशेषण.

त्या शिवायही विशेषणांचे पुढील तीन प्रकार आहेत - (१) नामसाधित विशेषण, (२) धातुसाधित विशेषण व (३) अव्ययसाधित विशेषण.

**१. गुणविशेषण :-** ज्या विशेषणाच्या योगाने नामाचा कोणत्याही प्रकारचा गुण किंवा विशेष दाखविला जातो त्यास **गुणविशेषण** असे म्हणतात. जसे - मोठी मुले, आंबट बोरे, शुभ्र ससा, शूर सरदार, रेखीव चित्र, निळासावळा झरा.

**२. संख्याविशेषण :-** ज्या विशेषणाच्या योगाने नामाची संख्या दाखविली जाते त्यास **संख्याविशेषण** असे म्हणतात.

**संख्याविशेषणाचे पुढील पोटप्रकार आहेत -**

- गणनावाचक संख्याविशेषण
- क्रमवाचक संख्याविशेषण
- आवृत्तिवाचक संख्याविशेषण
- पृथकत्ववाचक संख्याविशेषण
- अनिश्चित संख्याविशेषण.

**▸ गणनावाचक संख्याविशेषण**

पुढील शब्द पाहा.

दहा मुली, चौदा भाषा, साठ रुपये, सहस्र किरणे, अर्धा तास, दोघे मुलगे इत्यादी.

वरील शब्दांतील दहा, चौदा, साठ, सहस्र, अर्धा, दोघे या विशेषणांचा उपयोग केवळ गणती किंवा गणना करण्यासाठी होतो. त्यांस **गणनावाचक संख्याविशेषणे** म्हणतात.

गणनावाचक विशेषणे दोन प्रकारांनी लिहितात- (१) अक्षरांनी व (२) अंकांनी.

गणनावाचक संख्याविशेषणाचे तीन उपप्रकार मानतात.

(अ) पूर्णांक वाचक - (एक, दोन.... शंभर) १, २, १००.

(ब) अपूर्णांक वाचक - ( पाव, अर्धा, पाऊण, तीन पंचमांश).

$\frac{१}{४}$ $\frac{१}{२}$ $\frac{३}{४}$ $\frac{३}{५}$

(क) साकल्यवाचक - (तितक्या वस्तूंपैकी सर्व)

दोन्ही भाऊ, पाची पांडव, चारी बहिणी इत्यादी.

**▸ क्रमवाचक संख्याविशेषण**

पुढील शब्द पाहा.

पहिला वर्ग, चौथा बंगला, आठवी इयत्ता, साठावे वर्ष.

वरील शब्दांतील 'पहिला, चौथा, आठवी, साठावे' ही विशेषणे वस्तूंचा क्रम दाखवितात. अशा विशेषणांना **'क्रमवाचक संख्या विशेषणे'** असे म्हणतात. प्रथमा, द्वितीया... सप्तमी ही संस्कृतातील क्रमवाचक संख्याविशेषणे मराठीतही वापरतात.

**▸ आवृत्तिवाचक संख्याविशेषणे**

पुढील शब्द पाहा.

चौपट मुले, दसपट रुपये, दुहेरी रंग, द्विगुणित आनंद.

वरील शब्दांतील 'चौपट, दसपट, दुहेरी, द्विगुणित' ही विशेषणे संख्येची किती वेळा आवृत्ती झाली हे दाखवितात. त्यांना **'आवृत्तिवाचक संख्याविशेषणे'** असे म्हणतात.

**▸ पृथकत्ववाचक संख्याविशेषण**

पुढील शब्द पाहा.

एकेक मुलगा, दहा-दहांचा गट.

यातील 'एकेक, दहा-दहा' ही विशेषणे वेगवेगळा (किंवा पृथक) असा बोध करून देतात. अशा विशेषणांना **पृथकत्ववाचक संख्याविशेषणे** असे म्हणतात.

▸ **अनिश्चित संख्याविशेषण**

सर्व रस्ते, थोडी मुले, काही पक्षी, इतर लोक, इत्यादी देश.

वरील शब्दांतील 'सर्व, थोडी, काही, इतर, इत्यादी' ही संख्याविशेषणे निश्चित अशी संख्या दाखवीत नाहीत, म्हणून त्यांना '**अनिश्चित संख्याविशेषणे**' असे म्हणतात. जसे- अन्य, अल्प, एकंदर.

**३. सार्वनामिक विशेषण** - पुढील शब्दसमूह पाहा.

| | | |
|---|---|---|
| हा मनुष्य | तो पक्षी | माझे पुस्तक |
| तिच्या साड्या | असल्या झोपड्या | कोणता गाव |

वरील शब्दांतील 'हा, तो, मी, ती, असा, कोण' ही मूळची सर्वनामे आहेत. सर्वनाम हे नामाऐवजी येत असते. पण वरील शब्दांत सर्वनामांच्यापुढे नामे आली आहेत. ती आता सर्वनामे राहिली नसून ती त्यांच्यापुढे आलेल्या नामांबद्दल विशेष माहिती सांगतात म्हणजे ती विशेषणांचे कार्य करतात. **सर्वनामांपासून बनलेल्या अशा विशेषणांना सार्वनामिक विशेषणे किंवा सर्वनामसाधित विशेषणे असे म्हणतात.**

मी, तू, तो, हा, जो, कोण, काय ही सर्वनामे अशा वेळी नेहमीच त्यांच्या मूळ रूपात न येता त्यांच्या रूपात पुढीलप्रमाणे बदल होतो.

मी - माझा, तू - तुझा, तो - त्याचा.

आम्ही - आमचा, तुम्ही - तुमचा, ती - तिचा.

हा - असा, असला, इतका, एवढा, अमका.

तो - तसा, तसला, तितका, तेवढा, तमका.

जो - जसा, जितका, जेवढा.

कोण - कोणता, केवढा.

काय - कसा, कसला.

**नामे, सर्वनामे, धातुसाधिते व अव्ययसाधिते यांचा विशेषणांसारखा उपयोग**

**(१) नामसाधित विशेषणे**

पुढील वाक्ये पाहा.

(१) माझ्या भावाचे कापड-दुकान आहे.

(२) मी आज साखर-काकडी खाल्ली.

(३) त्याचा मित्र पुस्तक-विक्रेता होता.

(४) रामाला फळ-भाजी फार आवडते.

वरील वाक्यांतील 'कापड, साखर, पुस्तक, फळ' ही मूळची नामे आहेत. पण वरील वाक्यात ती त्यांच्यापुढे आलेल्या नामांबद्दल अधिक माहिती सांगतात म्हणजे ती विशेषणांची कार्ये करतात. अशा प्रकारचे विशेषण व विशेष्य मिळून सामासिक शब्द तयार होतो.

सातारी पेढे, बनारसी बोरे अशा शब्दांत 'सातारी', 'बनारसी' ही अनुक्रमे सातारा, बनारस या नामांपासून साधलेली विशेषणे आहेत. नामांपासून तयार केलेल्या विशेषणांना **नामसाधित विशेषण** असे म्हणतात.

**(२) सार्वनामिक विशेषणे**

याचे विवेचन यापूर्वी आपण पाहिले आहे.

**(३) धातुसाधित विशेषणे**

पुढील शब्द पाहा.

पिकलेला आंबा रांगणारे मूल वाहती नदी

हसरी मुलगी बोलकी बाहुली पेटती ज्योत

वरील शब्दांतील 'पिकलेला, रांगणारे, वाहती, हसरी, बोलकी, पेटती' हे शब्द त्यांच्यापुढे क्रमाने येणाऱ्या नामांची विशेषणे आहेत. पण ही विशेषणे 'पिक, रांग, वाह, हस, बोल, पेट' या धातूंपासून बनलेली आहेत. अशा विशेषणांना **धातुसाधित विशेषणे** असे म्हणतात.

**(४) अव्ययसाधित विशेषणे**

पुढील शब्द पाहा.

वरचा मजला, खालची माडी, मागील दार, पुढची गल्ली.

वरील शब्दांतील 'वरचा, खालची, मागील, पुढची' हे शब्द त्यांच्यापुढे आलेल्या 'मजला, माडी, दार, गल्ली' या नामांची विशेषणे आहेत. पण ही विशेषणे 'वर, खाली, मागे, पुढे' या अव्ययांपासून तयार झालेली आहेत, म्हणून त्यांना **अव्ययसाधित विशेषणे** असे म्हणतात. वर, खाली, मागे, पुढे या मूळ अव्ययांना 'चा, च, ई, ल' हे प्रत्यय लागून ही विशेषणे झालेली आहेत.

## अधिविशेषण व विधिविशेषण

विशेषण हे सामान्यतः विशेष्याच्या पूर्वी येते. जसे- 'चांगला मुलगा सर्वांना आवडतो.' इथे चांगला हे **अधिविशेषण** किंवा **पूर्वविशेषण** होय. पण कधी-कधी विशेषण विशेष्याच्या नंतर येऊन विधेयात विशेष्याबद्दलचे विधान पूर्ण करते. जसे- 'तो मुलगा आहे चांगला.' अशा विशेषणाला **विधिविशेषण** किंवा **उत्तरविशेषण** असे म्हणतात. पुढील वाक्यांचा अभ्यास करू या.

(१) मुलगा हुशार आहे.

(२) गणेशचे अक्षर सुंदर आहे.

(३) आजची पूजा चांगली झाली.

वरील वाक्यांतील 'हुशार' हे विशेषण 'मुलगा' या नामाबद्दल अधिक माहिती देते व ते नामानंतर आले आहे. 'सुंदर' हे विशेषण 'अक्षर' या नामाबद्दल अधिक माहिती सांगते व नामानंतर आले आहे. 'चांगली' हे विशेषण 'पूजा' या नामाबद्दल अधिक माहिती सांगते व ते नामानंतर आले आहे. 'हुशार, सुंदर, चांगले' ही विधिविशेषणे आहेत.

नामापूर्वी येणाऱ्या विशेषणाला **अधिविशेषण** म्हणतात, तर नामानंतर येणाऱ्या विशेषणाला **विधिविशेषण** असे म्हणतात.

## क्रियाविशेषण

**पुढील वाक्य वाचा.**

मुलगा चांगला खेळतो. मुलगी चांगली खेळते. ते चांगले खेळतात.

वरील वाक्यांतील 'चांगला, चांगली, चांगले' हे शब्द विशेषणे आहेत. परंतु ती विशेषणे क्रियापदाबद्दल

अधिक माहिती देणारी आहेत. क्रियाविशेषण हे विकारी असते. त्यामुळे ही क्रियाविशेषणे आहेत, पण क्रियाविशेषण अव्यये नाहीत.

विशेषणाचे लिंग, वचन व विभक्ती.

विशेषण हे विशेष्यावर अवलंबून असते. त्याला स्वतंत्र असे स्थान नसते, म्हणून विशेष्याचे जे लिंग, वचन असते, तेच विशेषणाचेही असते. जसे-

शहाणा मुलगा (पुल्लिंगी, एकवचन)

शहाणी मुलगी (स्त्रीलिंगी, एकवचन)

शहाणे मुलगे (पुल्लिंगी, अनेकवचन)

शहाण्या मुली (स्त्रीलिंगी, अनेकवचन)

शहाणी मुले (नपुंसकलिंगी, अनेकवचन)

विशेषण हा विकारी शब्द आहे म्हणजे विशेष्याच्या लिंगवचनानुसार विशेषणाच्या रूपात बदल होतो. जसे- मोठा ग्रंथ, मोठी पोथी, मोठ्या पोथ्या. हा बदल आकारान्त विशेषणांत होतो. याला अपवाद आहे तो आकारान्त संख्याविशेषणांचा. उदा. सहा मुली, अकरा मुलगे, बारा स्त्रिया, तेरा मुले.

**आकारान्त विशेषणाखेरीज इत्तर अन्ती विशेषणांत लिंग-वचनाप्रमाणे बदल होत नाही.** जसे -

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग | अनेकवचन |
|---|---|---|---|
| सुंदर पक्षी | सुंदर मुलगी | सुंदर फूल | सुंदर फुले |
| रानटी मनुष्य | रानटी स्त्री | रानटी गवत | रानटी माणसे |
| कडू बदाम | कडू काकडी | कडू कारले | कडू कारली |

शब्दांचे व्याकरण चालवताना विशेषणाचे लिंग वा वचन सांगण्याची पद्धती नाही. कारण ते विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे असते. विशेषणास विभक्तिप्रत्यय लावण्याची पद्धती नाही.

## विशेषणांचे कार्य व उपयोग

विशेषणाचे मुख्य कार्य हे की, ते नामाबद्दल विशेष माहिती सांगते व नामाची व्याप्ती मर्यादित करते. विशेषण हे नेहमी नामासह येते. वाक्यात नाम नसेल, तर विशेषण असणार नाही. विशेषणाच्या पुढे नाम नसते, तेव्हा ते विशेषण नामाचे कार्य करते. उदा.

(१) नामसदृश विशेषणे - (१) श्रीमंत माणसांना गर्व असतो. (विशेषण)
(२) श्रीमंतांना गर्व असतो. (नाम)

(२) दर्शक विशेषणे - ही मुलगी चलाख आहे.

(३) संबंधी विशेषणे - जो मुलगा व्यायाम करतो, तो सशक्त होतो.

(४) प्रश्नार्थक विशेषणे - कोण मनुष्य येऊन गेला?
त्याने काय पदार्थ आणले?

(५) सार्वनामिक विशेषणे - आम्हां मुलांना कोण विचारतो?

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या व नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दाला ............ असे म्हणतात. ①②③④

1) सर्वनाम 2) विशेषण
3) क्रियापद 4) प्रकृती

2) विशेषणांचे प्रमुख प्रकार किती? ①②③④

1) पाच 2) तीन 3) दोन 4) चार

3) वस्तूंचा क्रम दाखविण्याचे काम ............ करतात. ①②③④

1) क्रमवाचक संख्याविशेषणे
2) साकल्यवाचक संख्याविशेषणे
3) गणनावाचक संख्याविशेषणे
4) गुणवाचक विशेषणे

4) सर्वनामांपासून ............ विशेषण बनते. ①②③④

1) सार्वत्रिक 2) सार्वनामिक
3) सार्वजनिक 4) साकल्य

5) नामांच्या नंतर येणारे विशेषण म्हणजे ................ ①②③④

1) दक्षिण विशेषण 2) पूर्वविशेषण
3) अधिविशेषण 4) विधिविशेषण

6) विशेषणांना विभक्ती प्रत्यय .............. ①②③④

1) लावतात 2) असतात
3) लावत नाही 4) सांगता येत नाही

7) खालील वाक्यातील विशेषण ओळखा.
ती सुंदर मुलगी आहे. ①②③④

1) ती 2) सुंदर 3) मुलगी 4) आहे

8) विशेषण असलेला शब्द ओळखा. ①②③④

1) पर्वत 2) उंच 3) नदी 4) हवा

9) विशेषण असलेला शब्द ओळखा. ①②③④

1) भरत 2) झाडावर
3) हळू 4) विनायक

10) विशेषण नसलेला शब्द ओळखा. ①②③④

1) श्रावण 2) हिरवागार
3) पाच 4) नववा

11) विशेषण नसलेला शब्द ओळखा. ①②③④

1) लालभडक 2) शरद
3) शंभरावा 4) काळा

12) 'आज वर्गात पस्तीस मुले हजर आहेत.' विशेषणाचा प्रकार ओळखा. ①②③④

1) अव्ययसाधित विशेषण 2) क्रमवाचक विशेषण
3) गणनावाचक विशेषण 4) गुणविशेषण

13) पुढील विशेषणाचा प्रकार ओळखा.
तो पक्षी ①②③④

1) गणनावाचक विशेषण 2) गुणवाचक विशेषण
3) सार्वनामिक विशेषण 4) संख्याविशेषण

14) 'आमचा आनंद चौपटीने वाढला.' विशेषणाचा प्रकार ओळखा. ①②③④

1) आवृत्तीवाचक विशेषण 2) गणनावाचक विशेषण
3) सार्वनामिक विशेषण 4) धातुसाधित विशेषण

15) खालीलपैकी सार्वनामिक विशेषण ओळखा. ①②③④

1) फळभाजी 2) कडू कारले
3) कोणता गाव 4) पाच-पाच

16) अव्ययसाधित विशेषण ओळखा. ①②③④

1) वरचा मजला 2) खालची माडी
3) मागील दार 4) सर्व

17) अधिविशेषण ओळखा. ①②③④

1) चांगला मुलगा 2) कडू कारले
3) गोड बोरे 4) सर्व

18) **विधिविशेषण कोणते ते शोधा.** ①②③④

1) हुषार मुलगी 2) सुंदर केस
3) उंच उडी 4) अक्षर सुंदर

19) **'दहा लीटर दूध त्यात दुप्पट पाणी' विशेषणे ओळखा.** ①②③④

1) संख्याविशेषण, गुणवाचक विशेषण
2) गुणवाचक विशेषण, संख्याविशेषण
3) गणनावाचक विशेषण, आवृत्तीवाचक विशेषण
4) आवृत्तीवाचक विशेषण, पृथकत्ववाचक विशेषण

20) **पुढीलपैकी धातुसाधित विशेषणे ओळखा.** ①②③④

1) बोलकी बाहुली 2) पेटती ज्योत
3) कोणतेही नाही 4) पर्याय १, २

21) **क्रमवाचक संख्याविशेषण कोणते?** ①②③④

1) पावशेर साखर 2) दहावा पक्षी
3) दुहेरी रंग 4) पाच-पाचांचा गट

22) **विशेष्य म्हणजेच .............. होय.** ①②③④

1) विशेषण 2) क्रियापद
3) सर्वनाम 4) नाम

23) **संख्याविशेषणे नामांची ............. दाखवितात.** ①②③④

1) संख्या 2) चिन्ह 3) स्थाने 4) जागा

24) **विशेषण असलेला शब्द ओळखा?** ①②③④

1) बैठक 2) पक्षी 3) घोडा 4) उंच

25) **पुढील विशेषणांचा प्रकार ओळखा.** ①②③④
**दुहेरी**

1) गुणविशेषण
2) आवृत्तीवाचक विशेषण
3) साकल्यवाचक विशेषण
4) गणनावाचक विशेषण

26) **त्याने ................ संपत्ती मिळविली. (विशेषणाचा योग्य पर्याय निवडा)** ①②③④

1) अविरत 2) आवर्जून
3) गडगंज 4) अपरिहार्य

27) **शूर सरदार यात सरदार काय आहे?** ①②③④

1) विशेषण 2) नाम
3) विशेष्य 4) पर्याय २, ३

## ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 15 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 1 | 4) 2 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 2 | 8) 2 | 9) 3 | 10) 1 |
| 11) 2 | 12) 3 | 13) 3 | 14) 1 | 15) 3 |
| 16) 4 | 17) 4 | 18) 4 | 19) 3 | 20) 4 |
| 21) 2 | 22) 4 | 23) 1 | 24) 4 | 25) 2 |
| 26) 3 | 27) 4 | | | |

# १६. क्रियापदविचार

**पुढील वाक्ये वाचा.**

(१) गाय दूध देते. (२) आम्ही परमेश्वराची प्रार्थना करतो. (३) मुलांनी खरे बोलावे. (४) आमच्या संघाने ढाल जिंकली.

वरील वाक्यात रंगीत अक्षरात छापलेले शब्द पाहा. 'देते, करतो, बोलावे, जिंकली' हे शब्द त्या-त्या क्रिया दाखवितात. 'देते' या शब्दात देण्याची क्रिया आहे. इतर वाक्यांमध्ये 'करण्याची, बोलण्याची, जिंकण्याची' क्रिया आहे. शिवाय हे शब्द त्या-त्या वाक्यांचे अर्थ पूर्ण करतात. अशा शब्दांना **क्रियापदे** असे म्हणतात.

**क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द होय.**

क्रियापद या शब्दातील **पद** या शब्दाचा अर्थ **शब्द** असा आहे. मग क्रियापद या शब्दाचा अर्थ 'क्रिया दाखविणारा शब्द' असा होईल.

उदा. 'आई रोज देवाला जाऊन येते.' या वाक्यात क्रिया दाखविणारे दोन शब्द आहेत. (१) जाऊन व (२) येते. हे शब्द 'जाण्याची' व 'येण्याची' क्रिया दाखवितात. पण 'जाऊन' या क्रियावाचक शब्दाने त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. इथे 'येते' या क्रियावाचक शब्दाने तो अर्थ पूर्ण होतो. म्हणून इथे 'जाऊन' हे क्रियापद नसून या वाक्यात 'येते' हे क्रियापद आहे.

धातू - 'येते' या क्रियापदात मूळ शब्द 'ये' हा असून त्याला 'ते' हा प्रत्यय लागलेला आहे आणि 'येते' हे क्रियापदाचे रूप बनलेले आहे. **'क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्दाला धातू असे म्हणतात.'**

वरील क्रियापदांमध्ये 'करतो, बोलावे, जिंकली' या क्रियापदांत अनुक्रमे 'कर, बोल, जिंक' हे धातू आहेत.

(कोशामध्ये धातूची मूळ रूपे न देता 'णे' हा प्रत्यय लावून 'देणे, करणे, बोलणे, जिंकणे' अशी रूपे देण्याची प्रथा आहे. 'देणे, करणे' ही क्रियापदे नसून क्रियावाचक नामे आहेत.)

## धातुसाधिते किंवा कृदन्ते

धातूला प्रत्यय लागून क्रियापदाची विविध रूपे बनतात. जसे- बस-तो, बस-ला, बस-तात, वगैरे. धातूपासून बनलेली ही रूपे वाक्याचा अर्थ पूर्ण करतात.

'गा-णे, गा-ऊन, गा-ताना' हीदेखील धातूपासून तयार झालेली रूपे आहेत. ती वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाहीत. **धातूला विविध प्रत्यय लागून क्रिया अपुरी दाखविणाऱ्या शब्दांना धातुसाधिते किंवा कृदन्ते असे म्हणतात.**

पुढील वाक्ये पाहा.

(१) ह्या मुली पूर्वी फार चांगल्या गात. (२) त्या आता गात नाहीत.

वरील वाक्यात 'गा' या धातूला 'त' हा प्रत्यय लागून 'गात' अशी क्रियावाचक रूपे आली आहेत.

पहिल्या वाक्यात 'गात' हे वाक्याचा अर्थ पूर्ण करते, म्हणून ते क्रियापद आहे. दुसऱ्या वाक्यात 'गात' हे केवळ धातुसाधित आहे.

क्रियापदाची व्याख्या करताना आपण 'वाक्यातील क्रिया दाखविणारा व वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द' अशी केलेली आहे. यातील **'वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा'** हे शब्द महत्त्वाचे आहेत. कारण वाक्यात क्रिया दाखविणारे आणखी काही शब्द असू शकतात; पण ते वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाहीत.

पुढील वाक्ये पाहा.

(१) हसणाऱ्याकडे आपण लक्ष देऊ नये.

(२) त्याच्या घरात खाणारी माणसे पुष्कळ आहेत.

(३) जहाज समुद्रात बुडताना मी पाहिले.

वरील वाक्यात 'हसणारा, खाणारी, बुडताना' हे शब्द त्या-त्या वाक्यात क्रिया दाखवितात, पण वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाहीत. म्हणून ती क्रियापदे नाहीत. वाक्यातील त्यांच्या कार्यावरून 'हसणारा' हे नाम आहे, 'खाणारी' हे विशेषण आहे व 'बुडताना' हे क्रियाविशेषण आहे.

क्रियापद हा क्रिया दाखविणारा शब्द खरा. पण सर्वच क्रियापदे क्रिया दाखवितात असे नाही. 'त्याने मुलाला मारले.' या वाक्यातील 'मारले' हा शब्द मारण्याची क्रिया दाखवितो. पण 'रावण दुष्ट होता.', 'मी विद्यार्थी आहे.', 'राम राजा झाला.' या वाक्यांतील 'होता, आहे, झाला' हे शब्द कोणतीही क्रिया दाखवीत नाहीत. ते कर्त्याची स्थिती दाखवितात किंवा स्थित्यंतर (दुसरी स्थिती) दाखवितात. 'अस' या धातूने स्थिती दाखविली जाते, तर 'हो' ह्या धातूने स्थित्यंतर दाखविले जाते. अशा शब्दांनाही व्याकरणात 'क्रियापदे' असे म्हणतात.

## कर्ता व कर्म

क्रियापद हा वाक्यातील मुख्य शब्द होय. क्रियापदाखेरीज वाक्याचा अर्थ सहसा पूर्ण होत नाही, म्हणून प्रत्येक वाक्यात क्रियापद हे असावेच लागते. काही म्हणीवजा वाक्यांत तो शब्द गाळलेला असतो किंवा गुप्त (अध्याहृत) असतो. जसे-

(१) एकी हेच बळ (आहे). (२) सगळे मुसळ केरात (गेले). (३) शितावरून भाताची परीक्षा (होते).

वाक्यात क्रियापदाने दाखविलेली **क्रिया करणारा** जो कोणी असतो, त्यास **कर्ता** असे म्हणतात. 'कर्ता म्हणजे (क्रिया) करणारा.' हा कर्ता क्रियापदाने दाखविलेली क्रिया ज्याच्यावर करतो, ते त्याचे कर्म. वाक्यातील क्रियापदाने दाखविलेली क्रिया कर्त्यापासून निघते व ती दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तरी घडते. त्या क्रियेचा परिणाम ज्याच्यावर घडतो किंवा ज्याच्याकडे त्या क्रियेचा रोख किंवा कल असतो, ते त्याचे **कर्म**.

### वाक्यातील कर्ता व कर्म कसे शोधतात?

कित्येक जण क्रियापदाला 'कोण' व 'काय' असे प्रश्न विचारून अनुक्रमे कर्ता व कर्म शोधून काढतात. जसे (१) रामा आंबा खातो. या वाक्यात 'कोण खातो?' - रामा व 'काय खातो?' - आंबा. म्हणून 'राम' हा कर्ता व 'आंबा' हे कर्म. पण युक्ती किंवा पद्धती सगळीकडे लागू पडत नाही. (२) 'मी बैलाला मारले.' या वाक्यात 'कोण मारतो?' - मी. 'काय मारतो?' असा प्रश्न करता येत नाही. म्हणून 'कोणाला मारतो?' असा प्रश्न करून 'कोणाला'चे उत्तर 'बैलाला' हे कर्म ठरवितात. (३) 'विद्यार्थी प्रामाणिक आहे.' या वाक्यात 'कोण आहे?' - विद्यार्थी. 'काय आहे?' - प्रामाणिक असे म्हणून 'प्रामाणिक' हे कर्म ठरवितात. पण 'आहे' हे क्रियापद तर अकर्मक असते. तसेच (४) 'मला दूध आवडते.' - अशा वाक्यात 'कोण आवडते?' असा प्रश्न करता येत नाही; म्हणून 'कोणाला आवडते?' असा प्रश्न करून या 'कोणाचे' उत्तर 'मला' हा कर्ता ठरवितात, व 'काय आवडते?' याचे उत्तर 'दूध' हे कर्म

ठरवितात. हे चुकीचे आहे. 'आवडते' हे मराठीत अकर्मक क्रियापद असून 'दूध' हा त्याचा कर्ता आहे. एकदा 'काय'चे उत्तर कर्म येते, तर काही वेळा ते कर्म नसते. एकदा 'कोणाला?' याचे उत्तर कर्म होते, तर कधी कर्ता ठरते. त्यामुळे विद्यार्थी गोंधळून जातो, म्हणून 'कोणाला' 'काय' हे प्रश्नार्थक शब्द वापरून कर्ता व कर्म शोधण्याचा प्रयत्न करू नये.

**तर मग मराठीत कर्ता व कर्म कसे शोधून काढावेत?**

कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा व त्याला - 'णारा' हा प्रत्यय लावून 'कोण?' असा प्रश्न करावा म्हणजे कर्ता मिळतो.

**आता मागील उदाहरणे घेऊन आपण कर्ते शोधू.**

(१) 'रामा आंबा खातो.' या वाक्यात 'खातो' हे क्रियापद असून त्यात 'खा' हा मूळ धातू आहे. त्याला '-णारा' हा प्रत्यय लावून 'खाणारा कोण?' असा प्रश्न विचारला की 'रामा' हे उत्तर मिळते, म्हणून 'रामा' हा कर्ता होय. वाक्यातील कर्म शोधताना मुख्य क्रियापदाने दाखविलेली क्रिया 'कोणावर घडते?' असा प्रश्न करावा. ती क्रिया ज्या वस्तूवर किंवा प्राण्यावर घडते, ते त्याचे कर्म. वरील उदाहरण पुन्हा घेऊ. 'रामा आंबा खातो.' खाण्याची क्रिया कोणावर घडते? - आंब्यावर, म्हणून 'आंबा' हे या वाक्यातील कर्म होय.

(२) 'मी बैलाला मारतो.' या वाक्यात 'मारणारा कोण?' - मी. म्हणून 'मी' हा या वाक्यातील कर्ता. 'मारण्याची क्रिया कोणावर घडते?' - बैलावर, म्हणून 'बैलाला' हे कर्म.

(३) 'विद्यार्थी प्रामाणिक आहे.' या वाक्यात 'आहे' हे क्रियापद व 'अस' हा मूळ धातू आहे. 'असणारा कोण?' - विद्यार्थी, म्हणून 'विद्यार्थी' हा या वाक्यातील कर्ता. आता असण्याची क्रिया कोणावर घडते? - 'विद्यार्थ्यावरच' म्हणजे इथे क्रिया कर्त्यापासून पुढे जात नाही, म्हणून या वाक्यात कर्म नाही. 'आहे' हे क्रियापद अकर्मक आहे.

(४) 'मला दूध आवडते.' या वाक्यात 'आवडते' हे क्रियापद आहे. 'आवड' हा मूळ धातू आहे. आता आपण प्रश्न विचारू - 'आवडणारे कोण?' - पण 'कोण' हा प्रश्न व्यक्तीशी संबंधित असतो. 'दूध' हा पदार्थ असल्यामुळे आपण प्रश्न विचारू या- 'आवडणारे काय?'- उत्तर 'दूध' येते, म्हणून या वाक्यात 'दूध' हा कर्ता आहे. ('मला' हा कर्ता नव्हे).

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) त्याला थंडी वाजते - वाजणारी कोण? - थंडी. 'थंडी' हा कर्ता.

(२) राजाला मुकुट शोभतो - शोभणारा कोण? - मुकुट. 'मुकुट' हा कर्ता.

(३) मला चंद्र दिसतो. - दिसणारा कोण? - चंद्र. 'चंद्र' हा कर्ता.

वरील वाक्यांमध्ये 'त्याला, राजाला, मला' हे कर्ते नव्हेत.

आता तुमच्या लक्षात आले असेल की, **क्रिया करणारा तो कर्ता व ती क्रिया भोगणारे किंवा सोसणारे ते कर्म.**

## क्रियापदांचे प्रकार

**क्रियापदांचे मुख्य प्रकार दोन आहेत :- (१) सकर्मक क्रियापदे (२) अकर्मक क्रियापदे.**

### सकर्मक क्रियापद

पुढील वाक्ये पाहा.

(१) गवळी धार काढतो.

(२) अनुराग निबंध लिहितो.

(३) आरोही लाडू खाते.

वरील वाक्यांना पूर्ण अर्थ आहे. जर 'गवळी काढतो.', 'अनुराग लिहितो.', 'आरोही खाते.' एवढीच वाक्ये दिली, तर त्यांचे अर्थ पूर्ण होत नाहीत. म्हणजेच 'काढतो' या क्रियापदाला 'धार' या कर्माची जरुरी आहे, म्हणून 'काढतो' हे क्रियापद सकर्मक आहे. तसेच 'लिहितो', 'खातो' या क्रियापदांच्या बाबतीतही आहे. यावरून असे दिसते की, **ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी असते, त्यास सकर्मक क्रियापद असे म्हणतात.**

## अकर्मक क्रियापदे

पुढील वाक्ये पाहा.

(१) मी रस्त्यात पडलो.

(२) आज भाऊबीज आहे.

(३) सुनील उद्या पुण्याला जाईल.

वरील वाक्यातील 'मी रस्त्यात पडलो.' या वाक्यात पडण्याची क्रिया कर्त्यावरच घडते. ती क्रिया कर्त्यापासून पुढे जात नाही. 'मी पडलो.' यात पुरा अर्थ आहे. 'पडला' या क्रियापदाला कर्माची जरुरी नाही; म्हणून 'पडलो' हे क्रियापद अकर्मक आहे. उरलेल्या वाक्यांच्या बाबतीत तसेच म्हणता येईल.

यावरून असे दिसते की,

**कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल, तर ते क्रियापद अकर्मक असते.**

## द्विकर्मक क्रियापदे

**पुढील वाक्ये वाचा.**

(१) गुरुजी विद्यार्थ्यांना व्याकरण शिकवितात.

(२) आजीने नातीला गोष्ट सांगितली.

(३) तिने भिकाऱ्याला पैसा दिला.

वरील वाक्यांत 'शिकवितात, सांगितली, दिला' ही क्रियापदे सकर्मक असून त्यांना दोन कर्मे आहेत. पहिले वाक्य पाहा. शिकविणारे कोण? - गुरुजी. गुरुजी हा कर्ता. शिकविण्याची क्रिया कोणावर घडते? - 'व्याकरण' व 'विद्यार्थी' या दोहोंवर. तीच गोष्ट 'सांगितली' व 'दिला' या क्रियापदांच्या बाबतीतही आहे. या क्रियापदांना दोन कर्मे लागतात. अशा क्रियापदांना **द्विकर्मक क्रियापदे** असे म्हणतात. यांतील वस्तुवाचक कर्मांना प्रत्यक्ष कर्मे असे म्हणतात आणि व्यक्तिवाचक कर्मांना 'अप्रत्यक्ष कर्मे' असे म्हणतात. वरील वाक्यांतील 'व्याकरण, गोष्ट, पैसा' ही प्रत्यक्ष कर्मे व विद्यार्थ्यांना, नातीला व भिकाऱ्याला' ही अप्रत्यक्ष कर्मे होत. प्रत्यक्ष कर्माची विभक्ती द्वितीया असते, तर अप्रत्यक्ष कर्माची विभक्ती संप्रदानी चतुर्थी असते.

## उभयविध क्रियापदे

**पुढील वाक्ये पाहा.**

(अ) (१) त्याने घराचे दार उघडले. (२) त्याच्या घराचे दार उघडले.

(आ) (१) रामाने धनुष्य मोडले. (२) ते लाकडी धनुष्य मोडले.

(अ) गटातील दोन्ही वाक्यात 'उघडले' हे क्रियापद आहे. पहिल्या वाक्यात ते सकर्मक वापरले आहे. या वाक्यात 'त्याने' कर्ता असून 'दार' हे कर्म आहे. 'उघडले' क्रियापद सकर्मक आहे.

दुसऱ्या वाक्यात 'उघडले' हेच क्रियापद आहे. इथे 'उघडणारे कोण' या प्रश्नाचे उत्तर 'दार' येते. तर 'उघडण्याची क्रिया कोणावर घडली?' या प्रश्नाचे उत्तरही 'दार' येते. याचा अर्थ 'उघडले' क्रियापद इथे 'अकर्मक' आहे.

(आ) गटातील वाक्यांत 'मोडले' हे क्रियापद आहे. त्यापैकी पहिल्या वाक्यात 'मोडले' हे क्रियापद सकर्मक आहे, तर दुसऱ्या वाक्यात ते अकर्मक आहे.

यावरून असे दिसते की, एकच क्रियापद दोन वेगळ्या वाक्यात सकर्मक व अकर्मक असे दोन्ही तऱ्हांनी वापरता येते; अशा क्रियापदांना **उभयविध क्रियापदे** असे म्हणतात. काप, आठव, स्मर, लोट हे धातू या प्रकारचे होत.

**विधानपूरक :-** सकर्मक क्रियापदाला कर्माची आवश्यकता असते. कर्म दिल्याशिवाय सकर्मक धातूसंबंधीचे विधान पूर्ण होत नाही. अकर्मक क्रियापदांना कर्माची आवश्यकता नसते. केवळ कर्ता व क्रियापद एवढ्यानेच सकर्मक धातूच्या बाबतीत विधान बहुधा पूर्ण होते. जसे- त्याने बैलास मारले. (सकर्मक). तो गेला, ती धावते. (अकर्मक).

पण काही अकर्मक धातू असे आहेत, की कर्ता व क्रियापद असूनही त्यांचा वाक्यार्थ अपुरा असतो. उदा. (१) राम झाला. (२) मुलगा आहे. (३) आंबा निघाला. (४) गुरुजी दिसतात. 'झाला, आहे, निघाला, दिसतात' ही क्रियापदे अपुऱ्या विधानांची आहेत. अशा प्रकारच्या क्रियापदांना **अपूर्ण विधान क्रियापदे** म्हणतात. ती विधाने पूर्ण करण्यासाठी काही शब्दांची जरुरी असते. जसे-

(१) राम राजा झाला.

(३) आंबा नासका निघाला.

(२) मुलगा हुशार आहे.

(४) गुरुजी रागावलेले दिसतात.

वरील वाक्यांतील 'राजा, हुशार, नासका, रागावलेले' हे शब्द अपुरी विधाने पूर्ण करतात. अशा शब्दांना 'विधानपूरक' किंवा 'पूरक' असे म्हणतात.

## काही अकर्मक धातू

अकर्मक धातूंविषयी अधिक अभ्यास केला, तर असे दिसते की, स्थितिवाचक, गतिवाचक, वस्तुस्थितिदर्शक, स्थित्यंतरवाचक धातू अकर्मक असतात, तर कृतिवाचक धातू सकर्मक असतात. काही अकर्मक धातू-

(१) अस, नस, हो, नहो, ऊठ, बस, नीज, झोप, थरथर, कुडकूड, रड, पड, सड, मर, सर, ऊड, धाव, थांब, शक, थक, जाग, झीज, वाढ, झड, जळ, किंचाळ, तूट, सूट, पहूड, उजळ, प्रकाश, ओरड, घोर, सळसळ, खळखळ, धडपड, चुरचूर, भुकेज, कीड, राह, वाह,

फूल, उमत, उपज, निपज, जन्म, पीक, लोळ, वाज, भीज, शीज, सूज, वीझ, रूज, बिघड इत्यादी.

(२) आवड, वाट, रूच, दीस, परवड, मीळ, कळ, शोभ, लाज, भी, घाबर, हस या धातूंच्या प्रयोगात संप्रदान, अपादान किंवा अधिकरण अशा अर्थाचे एखादे चतुर्थ्यन्त पद येते.

क्रियापदाच्या प्रकारांमध्ये सकर्मक क्रियापद आणि अकर्मक क्रियापद या प्रकारांचे महत्त्व फार मोठे आहे. या प्रकारांच्या अभ्यासाचा उपयोग पुढील अनेक घटकांमध्ये होतो. उदा. वाक्यांचे प्रयोग, प्रयोग ओळखणे, वाक्यांचे प्रकार, व्याकरण चालविणे, वाक्य पृथक्करण इत्यादी. या पुढील अभ्यासात क्रियापदाकडे पायाभूत महत्त्वाचा घटक म्हणून पाहिले पाहिजे.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्दाला .................... असे म्हणतात.** ①②③④

1) विकार 2) सिद्ध
3) धातुसाधित 4) धातू

2) **धातूला विविध प्रत्यय लागून अपुरी क्रिया दाखविणाऱ्या शब्दांना .................... असे म्हणतात.** ①②③④

1) क्रियापदे 2) धातू
3) धातुप्रत्यय 4) धातुसाधिते

3) **वाक्यात क्रिया करणारा कोण?** ①②③④

1) क्रियापद 2) क्रियाकारक
3) कर्ता 4) कर्म

4) **क्रिया सोसणारे ....................** ①②③④

1) क्रियापद 2) धातुसाधित
3) कर्म 4) लिंग

5) **क्रियेचा परिणाम कोणावर होतो?** ①②③④

1) कर्मावर 2) कर्त्यावर
3) क्रियापदावर 4) कृदन्तावर

6) **मूळ धातूला 'णारा' प्रत्यय लावून मराठीत .................... शोधता येतो.** ①②③④

1) विकार 2) कर्ता 3) कर्मणी 4) अव्यय

7) **कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यावर येऊन थांबत असेल तर त्या वाक्यात .................... नसते.** ①②③④

1) कर्ता 2) कर्म
3) क्रियापद 4) कृदन्त

8) **'त्याला थंडी वाजते' या वाक्यातील 'कर्ता' ओळखा.** ①②③④

1) थंडी 2) त्याला 3) वाजते 4) वाज

9) **'गवळी धार काढतो' या वाक्यात कर्म ओळखा?** ①②③④

1) गवळी 2) धार 3) काढतो 4) काढ

10) **ज्या क्रियापदांना दोन कर्म लागतात त्यांना .................... म्हणतात.** ①②③④

1) सकर्मक क्रियापदे 2) अकर्मक क्रियापदे
3) द्विकर्मक क्रियापदे 4) उभयकर्मक क्रियापदे

11) **द्विकर्मक क्रियापदात प्रत्यक्ष कर्म हे .................... असते.** ①②③④

1) प्राणीवाचक 2) व्यक्तिवाचक
3) वस्तुवाचक 4) गुप्त

12) **प्रत्यक्ष कर्माची विभक्ती .................... असते.** ①②③④

1) प्रथमा 2) द्वितीया 3) चतुर्थी 4) षष्ठी

13) अप्रत्यक्ष कर्माची विभक्ती ही होय. ①②③④
1) पंचमी 2) चतुर्थी 3) प्रथमा 4) सप्तमी

14) 'हसताना, रडताना, पडताना' ही शब्दरुपे मराठीत .................. आहेत. ①②③④
1) सर्वनामे 2) विशेषणे
3) धातुसाधिते 4) नामे

15) खालीलपैकी कोणता शब्द क्रियापद आहे. ①②③④
1) आपण 2) पाखरू 3) रडणारा 4) बोलतो

16) कृदन्ते म्हणजे .................. ①②③④
1) वाक्याचा अर्थ पूर्ण करणारे
2) क्रियापदाचे प्रत्ययरहित रुप
3) क्रियावाचक व अर्थ पूर्ण करणारे
4) धातूला प्रत्यय लागून तयार झालेले रुप

17) त्याने बैलाला मारले. (क्रियापदाचा प्रकार कोणता?) ①②③④
1) अकर्मक क्रियापद 2) सकर्मक क्रियापद
3) अपूर्ण विधान 4) अविकारी

18) 'मी भावाला चित्रपट दाखवला' या वाक्यातील प्रत्यक्ष कर्म कोणते? ①②③④
1) मी 2) चित्रपट
3) भावाला 4) दाखवला

19) 'सुरेश भिकाऱ्याला कापड देतो.' या वाक्यात 'ला' प्रत्यय लागलेले कर्म .................. कर्म आहे. ①②③④
1) व्यक्तिवाचक 2) अप्रत्यक्ष
3) यापैकी नाही 4) पर्याय १ व २ दोन्ही

20) अकर्मक क्रियापदात क्रिया करणारा व क्रिया सोसणारा .................. च असतो. ①②③④
1) क्रियापद 2) कर्ता
3) कर्म 4) विभक्ती

21) पुढील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. पोपट पेरू खातो. ①②③④
1) उभयविध 2) सकर्मक
3) अकर्मक 4) द्विकर्मक

22) पुढील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. तू जोरात धाव. ①②③④
1) सकर्मक 2) अकर्मक
3) संयुक्त 4) द्विकर्मक

23) पुढील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. तू पटकन आठव. ①②③④
1) सकर्मक क्रियापद 2) अकर्मक क्रियापद
3) द्विकर्मक क्रियापद 4) उभयविध क्रियापद

24) 'मला पपई आवडते' (वाक्यातील कर्ता ओळखा). ①②③④
1) मला 2) पपई
3) आवडते 4) पपई आवडते

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 16 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 4 | 2) 4 | 3) 3 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 1 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 2 | 14) 3 | 15) 4 |
| 16) 4 | 17) 2 | 18) 2 | 19) 4 | 20) 2 |
| 21) 2 | 22) 2 | 23) 4 | 24) 2 | |

# १७. क्रियापदविचार-क्रियापदांचे अन्य प्रकार

क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द होय, हे आपण पाहिले. क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्दाला धातू म्हणतात, हेही आपण पाहिले. खेळतो या शब्दात 'खेळ' हा धातू आहे. 'तो' हा प्रत्यय लागून 'खेळतो' हे क्रियापदाचे रूप बनते. त्याचप्रमाणे 'खेळ' या धातूला प्रत्यय लागून 'खेळणे, खेळताना, खेळणारा' अशा प्रकारची क्रियादर्शक रूपेही तयार होतात. पण ती वाक्याचा अर्थ पूर्ण करण्याचे काम करीत नाहीत. धातूपासून बनलेल्या, धातूपासून साधलेल्या अशा रूपांना **धातुसाधिते** असे म्हणतात.

आपण गेल्या पाठात क्रियापदाचे दोन मुख्य प्रकार अभ्यासले. सकर्मक क्रियापदे आणि अकर्मक क्रियापदे. आपण क्रियापदांच्या अन्य प्रकारांचा अभ्यास या पाठात करणार आहोत.

## संयुक्त व सहायक क्रियापदे

खालील वाक्ये पाहा.

(१) क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

(२) आपणही आता खेळू.

पहिल्या वाक्यातील 'खेळू' हा शब्द खेळण्याची क्रिया दाखवितो, पण तो वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाही. दुसऱ्या वाक्यातील 'खेळू' या क्रियावाचक शब्दाने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो, म्हणून ते क्रियापद होय. मग पहिल्या वाक्यात क्रियापद कोणते? 'खेळू लागली' या दोन शब्दांनी ती क्रिया पूर्ण होते. नुसते लागली या शब्दाने क्रियेचा अर्थ पूर्ण होत नाही. 'खेळू लागली' या संयुक्त शब्दांत 'खेळू' हे धातुसाधित असून 'लागली' या क्रियावाचक शब्दाने खेळण्याची क्रिया पूर्ण करण्यास म्हणजे क्रियापदाचे रूप बनविण्यास साहाय्य केले म्हणून 'लागली' हे सहायक क्रियापद होय. 'खेळू लागली' हे क्रियापद धातुसाधित व सहायक क्रियापद यांच्या संयोगाने बनले आहे, म्हणून अशा क्रियापदाला **संयुक्त क्रियापद** असे म्हणतात.

धातुसाधित व सहायक क्रियापद मिळून संयुक्त क्रियापद होते, हे आपण पाहिले. पण त्याला एक अट असते. ती म्हणजे या संयुक्त क्रियापदाने दर्शविलेली क्रिया एकच असायला हवी. त्या दोन वेगवेगळ्या क्रिया असून चालणार नाहीत.

पुढील वाक्ये पाहा.

(१) बाळ, एवढा लाडू खाऊन टाक.

(२) बाळ, एवढा लाडू खाऊन जा.

पहिल्या वाक्यात 'खाऊन टाक' हे संयुक्त क्रियापद आहे. इथे खाण्याची क्रिया व टाकण्याची क्रिया अशा दोन क्रिया नसून 'खाऊन टाक' याचा अर्थ 'खा'. यातील दोन शब्दांनी एकाच क्रियेचा बोध होतो.

दुसऱ्या वाक्यातील 'खाऊन जा' या शब्दांत खाण्याची व नंतर जाण्याची अशा दोन वेगळ्या क्रिया आहेत. म्हणून 'खाऊन जा' हे संयुक्त क्रियापद नाही. 'जा' हे मुख्य क्रियापद असून 'खाऊन' हे धातुसाधित आहे.

संयुक्त क्रियापदातील धातुसाधितावरून मुख्य क्रियेचा बोध होतो, तर विधानाला केवळ पूर्णता आणण्याचे काम सहायक क्रियापद करते. जेव्हा धातुसाधित व क्रियापद हे दोन्ही मिळून एकाच क्रियेचा बोध होतो, तेव्हा धातुसाधिताला मदत करणाऱ्या क्रियापदाला 'सहायक क्रियापद' असे म्हणतात. 'अस, नस, हो, ये, जा, दे, लाग, टाक, शक, पाहिजे, नको' वगैरे ठरावीक धातूंवरून सहायक क्रियापदे बनतात. यांतील 'अस, हो, नस' हे धातू काळाचे प्रकार दाखवितात. 'पाहिजे, नको, नये, नलगे' हे अर्थाचे प्रकार दाखवितात. सहायक क्रियापदे सर्व काळी, सर्व पुरुषी चालत नाहीत, म्हणून त्यांना **गौण क्रियापदे** असेही म्हणतात.

इथे आणखीही एक बाब लक्षात ठेवली पाहिजे की, 'मार देणे, अभ्यास करणे, प्रेम करणे, पाणी घालणे, विचार करणे' अशा नाम व क्रियापद मिळून होणाऱ्या शब्दांना संयुक्त क्रियापद मानू नये. इंग्रजीत त्यांना "to beat, to study, to love, to water, to think' असे एकेरी प्रतिशब्द असल्यामुळे त्यांवरून बनलेल्या मराठीतील क्रियापदांना कित्येक जण चुकून संयुक्त क्रियापदे मानतात. अशा ठिकाणी 'देणे, करणे, मारणे' ही मुख्य क्रियापदे मानून 'मार, अभ्यास, प्रेम, पाणी, विचार' ही त्यांची कर्मे मानावीत.

## सिद्ध व साधित क्रियापदे

मूळ धातूंना प्रत्यय लावून क्रियापदे बनवितात, हे आपण पाहिले.

आता पुढील वाक्ये पाहा.

(१) माझ्या कपाटातील पुस्तके तो नेहमी हाताळतो.

(२) आईच्या आठवणीने त्याचे डोळे पाणावले.

(३) तो शिक्षकाच्या व्यवसायात स्थिरावला.

(४) आम्ही ही पुस्तके मुंबईहून आणवली.

(५) खेड्यातील माणसे आता बरीच पुढारली.

वरील पहिल्या दोन वाक्यातील क्रियापदे अनुक्रमे हात व पाणी या दोन नामांपासून बनविलेली क्रिया साधणारी आहेत. तिसऱ्या वाक्यातील 'स्थिरावली' हे क्रियापद 'स्थिर' या विशेषणापासून बनविलेले आहे. चौथ्या वाक्यातील 'आणवली' हे क्रियापद 'आण' या धातूपासून बनविलेले आहे. पाचव्या वाक्यातील 'पुढारली' हे क्रियापद 'पुढे' या अव्ययापासून साधलेले आहे. अशा रीतीने 'हाताळ, पाणाव, स्थिराव, आणव, पुढार' हे धातू नामे, विशेषणे, क्रियापदे व अव्यये यांना प्रत्यय लागून बनले आहेत. अशा विविध प्रकारच्या शब्दांपासून तयार होणाऱ्या धातूंना **साधित धातू** म्हणतात व या साधित धातूंपासून बनलेल्या क्रियापदांना **साधित क्रियापदे** असे म्हणतात. 'जा, ये, कर, ऊठ, बस' असे जे मूळचे धातू आहेत, त्यांना **सिद्ध धातू** म्हणतात, व या सिद्ध धातूंना प्रत्यय लावून बनविलेल्या क्रियापदांना **सिद्ध क्रियापदे** असे म्हणतात.

## प्रयोजक व शक्य क्रियापदे

### प्रयोजक क्रियापदे

साधित धातूवरून दोन प्रकारची क्रियापदे बनतात.

(१) प्रयोजक क्रियापदे व (२) शक्य क्रियापदे

पुढील वाक्ये वाचा.

(१) ते मूल हसते. (२) आई त्या मुलाला हसविते.

पहिल्या वाक्यात 'हसते' क्रियापद आहे; तर दुसऱ्या वाक्यात 'हसविते' क्रियापद आहे. दोन्ही क्रियापदांतील मूळ धातू 'हस' हाच आहे. हसण्याची क्रिया दोन्ही वाक्यात मुलाकडूनच होते. पहिल्या वाक्यात हसण्याची क्रिया मुलाकडून स्वाभाविकपणे किंवा आपणहून केली गेली. पण दुसऱ्या वाक्यात 'हसविते' या शब्दाने आईने ती त्याला करायला लावली असा अर्थ व्यक्त होतो.

यावरून असे दिसते की,

**मूळ धातूच्या क्रियेचा कर्ता, ती क्रिया स्वतः करीत नसून, ती क्रिया तो दुसऱ्या कोणाला तरी करावयास लावीत आहे, असा अर्थ व्यक्त होत असेल तर त्या क्रियापदाला प्रयोजक क्रियापद असे म्हणतात.**

उदा. झाड पडले. या वाक्यात पडण्याची क्रिया कर्त्याकडून स्वाभाविकपणे घडली. 'झाड पाडले' या वाक्यात पाडण्याची क्रिया दुसऱ्याकडून झाली, म्हणून 'पाडले' हे प्रयोजक क्रियापद आहे. तसेच देतो - देववितो, चालतो - चालवितो, बसतो - बसवितो. (प्रयोजक म्हणजे प्रेरणा देणारा. कर्ता मूळ धातूतील क्रिया स्वतः करीत नसून ती क्रिया करण्यासाठी दुसऱ्याला प्रवृत्त करतो.)

प्रयोजक क्रियापदे दोन प्रकारांनी तयार होतात.

(१) मूळ धातूला 'व' हा प्रत्यय लागून ('व', 'वे', 'वि' असेही रूप होते.)

हसतो - हसवतो - हसवितो.
बसतो - बसवतो - बसवितो.
चालतो - चालवतो - चालवितो.
निजतो - निजवतो - निजवितो.

वरील शब्दांत 'व'च्या पुढे 'इ' हा आगम म्हणजे नवीन वर्ण येतो. याला संस्कृतात **इडागम** (इट् + आगम) असे म्हणतात.

'खा, पी, दे, घे, ये, ने' यांसारख्या एकाक्षरी धातूंना 'व'च्या ऐवजी 'ववि' हे प्रत्यय लागतात.
जसे - खातो - खाववितो, देतो - देववितो, घेतो - घेववितो. (अपवाद - पी - पितो - पाजतो, ये - येतो - आणतो.)

(२) मूळ धातूतील आद्याक्षरात वृद्धी किंवा गुण होतो.
(अ बद्दल आ, इ बद्दल ए, उ बद्दल ओ)
गळणे - गाळणे, चरणे - चारणे, मरणे - मारणे.
फिटणे - फेडणे, तुटणे - तोडणे, फुटणे - फोडणे ('ट' च्या जागी 'ड' येतो.)
काही धातूंच्या बाबतीत पुन्हा प्रयोजक रूपे झालेली आढळतात.
जसे - मरणे - मारणे - मारविणे, सुटणे - सोडणे - सोडविणे
पडणे - पाडणे - पाडविणे, पिणे - पाजणे - पाजविणे

**शक्य क्रियापदे**

पुढील वाक्ये वाचा.

(१) मला आता काम करवते.

(२) त्या आजारी माणसाला आता थोडे बसवते.

(३) मला दररोज वीस किलोमीटर चालवते.

वरील वाक्यात 'करवते, बसवते, चालवते' या क्रियापदांत 'करव, बसव, चालव' हे साधित धातू आहेत. पण वरील वाक्यात कर्ता या क्रिया दुसऱ्याकडून करवतो असा प्रयोजकाचा अर्थ नसून त्या क्रिया करण्याची कर्त्याला शक्यता आहे, असा अर्थ व्यक्त होतो (ती क्रिया कर्त्याला करणे शक्य आहे, असा अर्थ व्यक्त होतो.) अशा वेळी त्यांना **शक्य क्रियापदे** असे म्हणतात.

यावरून असे दिसते की,

**जे साधित धातू कर्त्याला ती क्रिया करण्याची शक्यता किंवा सामर्थ्य आहे असे दाखवितात, त्यांना शक्य क्रियापदे असे म्हणतात.**

'शक्य क्रियापद' व 'प्रयोजक क्रियापद' यांच्या रूपात साम्य असले, तरी त्यांच्या उपयोगावरून व त्यावरून व्यक्त होणाऱ्या अर्थावरून त्यातील फरक लक्षात येईल. तो पुढीलप्रमाणे-

| सिद्ध क्रियापदे | शक्य क्रियापदे | प्रयोजक क्रियापदे |
|---|---|---|
| (१) मी खेळतो. | (१) आजारानंतर मला आता खेळवते. | (१) आई मुलाला खेळवते. |
| (२) मी चालतो. | (२) त्या मुलाला आता एक किलो मीटर चालवते. | (२) आई मुलाला चालवते. |
| (३) बाईंनी वह्या आणल्या. | (३) बाईंना वह्या वर्गात आणवतात. | (३) बाईंनी शिपायाकडून वह्या वर्गात आणवल्या. |

## अनियमित क्रियापदे

धातूला काळ व अर्थ दाखविणारे प्रत्यय लागून क्रियापदांची रूपे बनतात. 'बस' या धातूची रूपे पुढीलप्रमाणे होतात-

| | |
|---|---|
| बसतो (वर्तमानकाळ) | बस (आज्ञार्थ) |
| बसला (भूतकाळ) | बसावा (विध्यर्थ) |
| बसेल (भविष्यकाळ) | बसता (संकेतार्थ) |

परंतु मराठीमध्ये काही धातू असे आहेत की, त्यांना काळांचे व अर्थाचे (आख्यातांचे) सर्व प्रत्यय न लागता ते थोड्या वेगळ्याच प्रकारे चालतात. त्यांना **गौण क्रियापदे** किंवा **अनियमित क्रियापदे** असे म्हणतात. 'आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नलगे, नये' या क्रियापदांची रूपे अशा प्रकारची आहेत. त्यांची मूळ रूपे क्रियापदेच असून त्यांत अमुक एक धातू आहे, असे निश्चितपणे सांगता येत नाही.

उदा. (१) मुलांनी सतत खेळू नये. (२) सुज्ञास अधिक सांगणे नलगे

(३) या दरवाजाने जाऊ नको. (४) परमेश्वर सर्वत्र आहे.

(५) मला कॉफी पाहिजे. (६) असे वागणे बरे नव्हे.

(७) आई घरी नाही.

## भावकर्तृक क्रियापदे

क्रियापद म्हटले, की त्यात क्रिया आली व ती क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी कर्ता असावाच लागतो.

पण पुढील वाक्ये पाहा.

(१) मी घरी पोहोचण्यापूर्वीच सांजावले.

(२) पित्त झाल्यामुळे त्याला आज मळमळते.

(३) उजाडले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते.

(४) आज दिवसभर सारखे गडगडते.

वरील वाक्यांतील 'सांजावले, मळमळते, उजाडले, गडगडते' ही क्रियापदे अशी आहेत, की त्यांचे कर्ते वाक्यात स्वतंत्रपणे दिसत नाहीत. वरील वाक्यांतील 'सांजावले' याचा अर्थ 'सांज झाली', 'मळमळते' म्हणजे 'मळमळ होते' वगैरे. या शब्दांतील क्रियेचा मूळ अर्थ किंवा भाव हाच त्याचा कर्ता मानावा लागतो. अशा क्रियापदांना **भावकर्तृक क्रियापदे** असे म्हणतात. या क्रियापदांचा कर्ता वाक्यात स्पष्ट नसतो म्हणून काही व्याकरणकार त्यांना **अकर्तृक क्रियापदे** असे म्हणतात.

## करणरूप आणि अकरणरूप

वाक्यातील क्रियापदाने केलेले विधान होकारार्थी असते, तेव्हा क्रियापदाच्या रूपाला **करणरूप** असे म्हणतात व हे विधान जेव्हा नकारार्थी असते, तेव्हा क्रियापदाच्या त्या रूपाला **अकरणरूप** असे म्हणतात.

उदा. (१) मुलांनी खरे बोलावे. (करणरूप)

(२) मुलांनी खोटे बोलू नये. (अकरणरूप)

हे अकरणरूप करताना 'न, ना, नये, नाही, नको' अशा सारख्या शब्दांचा वापर करतात.

## धातुसाधिते (कृदन्ते)

धातूला प्रत्यय लागून क्रियावाचक शब्द वाक्याचा अर्थ पूर्ण करीत असतील, तर त्यांना आपण 'क्रियापदे' असे म्हणतो. उदा. जेव-तो, जेव-ला, जेव-तात. तसेच, धातूला 'णे, ते, ता, ताना, ऊ, ऊन, ला, वे' हे प्रत्यय लागून क्रियावाचक शब्द बनतात. जसे - जेव-णे, जेव-त, जेव-ता, जेव-ताना, जे-वून, वगैरे. पण हे शब्द वाक्याचा अर्थ पूर्ण न करता ते वाक्यात नामे, विशेषणे किंवा क्रियाविशेषणे यांची कार्ये करतात. धातूपासून तयार झालेल्या अशा शब्दांना **धातुसाधिते** किंवा **कृदन्ते** असे म्हणतात. धातूंना जोडल्या जाणाऱ्या प्रत्ययांना संस्कृतात 'कृत् प्रत्यय' म्हणतात. कृत (= करीत). कृदन्त (= कृत् + अन्त) म्हणजे ज्याच्या अंती केवळ कृत् (= क्रियादर्शक) प्रत्यय आहे, असा शब्द. ही कृदन्ते वाक्यांत कोणकोणत्या प्रकारची कार्ये करतात, ती पुढील तक्त्यात थोडक्यात दिलेली आहेत.

**कृदन्तांचे प्रकार व त्यांची कार्ये**

| क्रम | प्रकार | उदाहरण | धातू | प्रत्यय | कार्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | णे-कृदन्त | त्याचे वागणे मला आवडते. | वाग | णे | नाम |
| २ | त- कृदन्त | तो रस्त्याने खात जातो. | खा | त | क्रियाविशेषण |
| ३ | ता-कृदन्त | सत्य संकल्पाचा दाता भगवान. | दा | ता | नाम |
| | | तो घरी चालता झाला. | चाल | ता | विशेषण |
| | | मी पहाटे पाच वाजता उठतो. | वाज | ता | क्रियाविशेषण |
| ४ | ताना-कृदन्त | तो धावताना रस्त्यात पडला. | धाव | ताना | क्रियाविशेषण |
| ५ | ऊ-कृदन्त | मुलांना खाऊ आवडतो. | खा | ऊ | नाम |
| ६ | ऊन-कृदन्त | खुर्चीत बसून तो बोलला. | बस | ऊन | क्रियाविशेषण |
| ७ | ला-कृदन्त | केल्याने होत आहे रे. | कर | ला | नाम |
| | | झाकली मूठ सव्वालाखाची. | झाक | ली | विशेषण |
| ८ | वे-कृदन्त | मला आता घरी जावयास हवे. | जा | वे | नाम |
| | | त्याचे चेंडू फसवे असतात. | फस | वे | विशेषण |

एका अर्थाने कृदन्ते किंवा धातुसाधिते हे क्रियापदाच्या घराण्यातून नाम, विशेषण किंवा क्रियाविशेषण यांपैकी एका घराण्यात आलेले 'दत्तक शब्द' होत. यांच्यावर दोन्ही घराण्यांचे संस्कार झालेले असतात, घडलेले असतात. क्रियापद या नात्याने यांना कर्ता, कर्म, पूरक, क्रियाविशेषणे असू शकतात तर नाम या नात्याने त्यांना लिंग, वचन व विभक्ती यांचे प्रत्यय लागतात. जसे-

(१) तुमचे बोलणे सौम्य आहे. (कर्ता, नपुंसकलिंगी, एकवचन)

(२) त्याने माझी सर्व देणी दिली. (कर्म, नपुंसकलिंगी, अनेकवचन)

(३) माझ्या बोलण्याचा त्याला राग आला. (षष्ठी विभक्ती)

(४) त्याचे चेंडू फसवे होते. (विशेषण, पूरक)

## स्वयंअध्ययन

1) **संयुक्त क्रियापद = धातुसाधित + ............** ①②③④

1) सहायक क्रियापद 2) कृदन्त
3) सकर्मक क्रियापद 4) नाम

2) **संयुक्त क्रियापदावरून ............ क्रियेचा बोध होतो.** ①②③④

1) दोन 2) चार
3) एकच 4) कोणतीच नाही

3) **'अस, हो, नस' हे धातू ............ चे प्रकार दाखवितात. तर 'पाहिजे, नको, नये, नलगे' हे धातू ............ चे प्रकार दाखवितात.** ①②③④

1) काळाचे, अर्थाचे 2) अर्थाचे, काळाचे
3) क्रियापद, नाम 4) नाम, सर्वनाम

4) **सहायक क्रियापदांनाच ......... असेही म्हणतात.** ①②③④

1) मुख्य क्रियापदे 2) उपक्रियापदे
3) प्रमुख क्रियापद 4) गौण क्रियापदे

5) **सिद्ध धातूंना प्रत्यय लागून ............ क्रियापदे तयार होतात.** ①②③④

1) साधित 2) धातूसाधित
3) सिद्ध 4) संयुक्त

6) कर्त्याला क्रिया करणे जेव्हा शक्य असते तेव्हा ............. क्रियापदे होतात. ①②③④
1) प्रयोजक 2) शक्य
3) अकर्मक 4) द्विकर्मक

7) कोणत्या क्रियापदातील धातू निश्चितपणे सांगता येत नाही. ①②③④
1) शक्य क्रियापदे 2) अनियमित क्रियापदे
3) प्रयोजक क्रियापदे 4) द्विकर्मक क्रियापदे

8) पुढील क्रियापदातील अनियमित क्रियापद ओळखा. ①②③④
1) हसावे 2) रडावे 3) पाहतो 4) नलगे

9) संयुक्त क्रियापदाचे वाक्य ओळखा. ①②③④
1) तो मुलगा आहे. 2) तो लाडू खाऊन टाक
3) जेवण करून जा 4) राम राजा झाला.

10) मुले शाळेत जातात. या वाक्यात कर्ता ओळखण्यासाठी कोणता प्रश्न विचाराल? ①②③④
1) जातात ते कोण? 2) शाळेत कोण जाते?
3) जाणारे कोण? 4) कोण कोठे जातो?

11) शक्य क्रियापदाचे वाक्य ओळखा. ①②③④
1) माधुरी गावाला जाण्याची शक्यता आहे.
2) हे तू करच
3) आईला आता चालवते
4) गाईने वासराला पळवले

12) 'मामा घरात नाही.' क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) गौण क्रियापद 2) संयुक्त क्रियापद
3) सकर्मक क्रियापद 4) उभयविध क्रियापद

13) 'सविता तू आता उठ' या वाक्यातील क्रियापद प्रकार ओळखा. ①②③④
1) सिद्ध क्रियापद 2) साधित क्रियापद
3) शक्य क्रियापद 4) द्विकर्मक क्रियापद

14) 'शिक्षकांनी मुलांना हसविले.' क्रियापद प्रकार ओळखा. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) प्रयोजक क्रियापद
3) सिद्ध क्रियापद 4) साधित क्रियापद

15) 'विमान आकाशात घरघरते.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) भावकर्तुक क्रियापद 2) शक्य क्रियापद
3) प्रयोजक क्रियापद 4) संयुक्त क्रियापद

16) 'तो पुण्यात स्थिरावला.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) साधित क्रियापद
3) भावकर्तुक क्रियापद 4) प्रयोजक क्रियापद

17) 'विनायक घरी लवकर ये.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) साधित क्रियापद 2) शक्य क्रियापद
3) सिद्ध क्रियापद 4) प्रयोजक क्रियापद

18) 'ही गाडी आम्ही पुण्याहून मागवली.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) सिद्ध क्रियापद 2) साधित क्रियापद
3) शक्य क्रियापद 4) भावकर्तुक क्रियापद

19) 'मावशीने मुलीला खेळवले.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) प्रयोजक क्रियापद
3) संयुक्त क्रियापद 4) भावकर्तुक क्रियापद

20) सिद्ध क्रियापदे ओळखा. ①②③④
1) ये 2) बस 3) उठ 4) सर्व

21) अमिता, एवढा लाडू खाऊन जा. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) संयुक्त क्रियापद
3) प्रयोजक क्रियापद 4) सिद्ध क्रियापद

22) आईने बाळाला निजविले. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) संयुक्त क्रियापद
3) उभयविध क्रियापद 4) प्रयोजक क्रियापद

23) सूर्य उगवल्याबरोबर सगळीकडे उजाडले. ①②③④
1) शक्य क्रियापद 2) प्रयोजक क्रियापद
3) भावकर्तुक क्रियापद 4) अकरणरूप क्रियापद

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 17 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 1 | 2) 3 | 3) 1 | 4) 4 | 5) 3 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 4 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 1 | 14) 2 | 15) 1 |
| 16) 2 | 17) 3 | 18) 2 | 19) 2 | 20) 4 |
| 21) 4 | 22) 4 | 23) 3 | | |

# १८. क्रियापदविचार-काळ व अर्थ (आख्यातविचार)

## काळ

वाक्यात दिलेल्या क्रियापदावरून जसा क्रियेचा बोध होतो, तसेच ती क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो, त्याला **काळ** असे म्हणतात.

**मुख्य काळ तीन आहेत :-** (१) वर्तमानकाळ, (२) भूतकाळ व (३) भविष्यकाळ.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया **आता** घडते असे जेव्हा समजते, तेव्हा तो वर्तमानकाळ असतो. उदा. मी अभ्यास करतो.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया **पूर्वी** घडली असे जेव्हा कळते, तेव्हा तो भूतकाळ असतो. उदा. मी अभ्यास केला.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया **पुढे** घडेल असे जेव्हा कळते, तेव्हा तो भविष्यकाळ असतो. उदा. मी अभ्यास करीन.

एकाच धातूची सर्वपुरुषी व सर्ववचनी क्रियापदाची रूपे कशी बनतात ते पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

**खेळ या धातूची सर्वपुरुषी व सर्ववचनी तीन काळातील रूपे**

| | सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|---|
| प्र. पु. ए. व. | मी | खेळतो | खेळलो | खेळेन |
| प्र. पु. अ. व. | आम्ही | खेळतो | खेळलो | खेळू |
| द्वि. पु. ए. व. | तू | खेळतोस | खेळलास | खेळशील |
| द्वि. पु. अ. व. | तुम्ही | खेळता | खेळला | खेळाल |
| तृ. पु. ए. व. पु. | तो | खेळतो | खेळला | खेळेल |
| तृ. पु. ए. व. स्त्री | ती | खेळते | खेळली | खेळेल |

| | सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|---|
| तृ. पु. ए. व. नपु. | ते | खेळते | खेळले | खेळेल |
| तृ. पु. अ. व. नपु. | ते | खेळतात | खेळले | खेळतील |
| तृ. पु. ए. व. स्त्री | त्या | खेळतात | खेळल्या | खेळतील |
| तृ. पु. अ. व. नपु. | ती | खेळतात | खेळली | खेळतील |

## काळांचे उपप्रकार

काळाच्या उपप्रकारांचा किंवा पोट प्रकारांचा आपण अभ्यास करू.

### अपूर्ण काळ

पुढील वाक्ये वाचा.

(१) तो मुलगा खेळत आहे.

(२) तो मुलगा खेळत होता.

(३) तो मुलगा खेळत असेल.

वरील वाक्यात 'खेळ' धातूच्या 'खेळत' या धातुसाधिताचे अपूर्ण क्रियादर्शक रूप आले आहे व त्याच्यापुढे 'अस' या धातूची वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळांतील रूपे आली आहेत. यांतील पहिल्या वाक्यात खेळण्याची क्रिया वर्तमानकाळात चालू आहे किंवा ती अपूर्ण असल्याचे समजते; हा अपूर्ण वर्तमानकाळ होय.

दुसऱ्या वाक्यात खेळण्याची क्रिया भूतकाळात चालू किंवा अपूर्ण असल्याचे आपल्याला समजते; हा अपूर्ण भूतकाळ होय.

तिसऱ्या वाक्यात खेळण्याची क्रिया भविष्यकाळात चालू किंवा अपूर्ण असल्याचे आढळून येते; हा अपूर्ण भविष्यकाळ होय.

म्हणजे अनुक्रमे वर्तमानकाळात, भूतकाळात, भविष्यकाळात अशा तीनही काळात त्या क्रियेची अपूर्णता दाखविलेली आहे, म्हणून याला अपूर्ण काळ असे म्हणतात. अपूर्ण काळात क्रियापदाची रूपे बनविताना क्रिया अपुरी दर्शविणारे धातुसाधित व त्यापुढे 'अस' या सहायक क्रियापदाची त्या-त्या काळातील रूपे येतात.

### पूर्ण काळ

पुढील वाक्ये वाचा.

(१) मधूने लाडू खाल्ला आहे.

(२) मधूने लाडू खाल्ला होता.

(३) मधूने लाडू खाल्ला असेल.

वरील तीनही वाक्यात क्रियापदांची रूपे बनविताना 'खा' या धातूची पूर्ण क्रिया दर्शविणारी धातुसाधिते आली आहेत व त्यांच्यापुढे 'अस' या धातूची तीनही काळातील सहायक क्रियापदे आली आहेत. पहिल्या वाक्यात 'खाल्ला आहे.' या संयुक्त क्रियापदावरून खाण्याची क्रिया ही वर्तमानकाळात पूर्ण झाली आहे, असे समजते. हा **पूर्ण वर्तमानकाळ** होय. दुसऱ्या वाक्यातील 'खाल्ला होता.' या संयुक्त क्रियापदावरून खाण्याची क्रिया भूतकाळात पूर्ण झाली होती असे समजते; हा **पूर्ण भूतकाळ** होय. तिसऱ्या वाक्यातील 'खाल्ला असेल.' या संयुक्त क्रियापदावरून खाण्याची क्रिया भविष्यकाळात पूर्ण झाली असेल असे समजते म्हणून हा पूर्ण भविष्यकाळ होय.

### रीति काळ

पुढील वाक्ये वाचा.

(१) मुलगा पुस्तक वाचत असतो.

(२) मुलगा पुस्तक वाचत असे किंवा वाची.

(३) मुलगा पुस्तक वाचत जाईल.

वरील वाक्यातील 'वाचत असतो.', 'वाचीत असे.' व 'वाचत जाईल.' या संयुक्त क्रियापदांच्या

रूपांवरून वाचण्याची रीत किंवा वहिवाट समजते, म्हणून त्याला **'रीति काळ'** असे म्हणतात. वर्तमानकाळात एखादी क्रिया सतत करीत असण्याची रीत समजली, तर त्याला **'रीति वर्तमानकाळ'** असे म्हणतात. एखादी क्रिया भूतकाळात सतत करण्याची कर्त्याची रीत असेल, तर तो रीति भूतकाळ असतो, आणि जेव्हा एखादी क्रिया भविष्यकाळात सतत करण्याची कर्त्याची रीत समजते, तेव्हा त्याला **'रीति भविष्यकाळ'** असे म्हणतात.

'खाणे' या क्रियापदाची रीति काळातील रूपे पुढीलप्रमाणे होतील.

(१) मधू लाडू खात असतो. (रीति वर्तमानकाळ)

(२) मधू लाडू खात असे. (रीति भूतकाळ)

(३) मधू लाडू खात जाईल. (रीति भविष्यकाळ)

यावरून प्रत्येक काळात क्रियापदाचे पुढील चार उपप्रकार किंवा पोटप्रकार बनतात.

(१) साधा काळ, (२) अपूर्ण काळ, (३) पूर्ण काळ, (४) रीति काळ

आता एकच क्रियापद सर्व काळांच्या उपप्रकारात कसे चालते, ते पुढील तक्त्यात पाहा.

**'लिह' या धातूची सर्व काळांतील रूपे**

| प्रकार | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| साधा | मी निबंध लिहितो. | मी निबंध लिहिला. | मी निबंध लिहीन. |
| अपूर्ण | मी निबंध लिहीत आहे. | मी निबंध लिहीत होतो. | मी निबंध लिहीत असेन. |
| पूर्ण | मी निबंध लिहिला आहे. | मी निबंध लिहिला होता. | मी निबंध लिहिला असेन. |
| रीति | मी निबंध लिहीत असतो. | मी निबंध लिहीत असे. | मी निबंध लिहीत जाईन. |

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) **अपूर्ण काळ दर्शविण्यासाठी धातुसाधित + .................. वापरले जाते.** ①②③④

1) शक्य क्रियापद  2) सहायक क्रियापद
3) प्रयोजक क्रियापद  4) धातू

2) **काळाचे मुख्य प्रकार तीन व त्यांचे उपप्रकार .................. होय.** ①②③④

1) दोन  2) तीन  3) चार  4) पाच

3) **पुढील वाक्यातील क्रियापदाचा अचूक काळ पोटप्रकारासह ओळखा.**

**तो मुलगा खेळतो.** ①②③④

1) साधा भविष्यकाळ  2) साधा वर्तमानकाळ
3) अपूर्ण भूतकाळ  4) रीति वर्तमान काळ

4) **पुढील वाक्यातील क्रियापदाचा अचूक काळ ओळखा.**

**'मी निबंध लिहीत जाईन.'** ①②③④

1) रीति भविष्यकाळ  2) साधा भूतकाळ
3) अपूर्ण भविष्यकाळ  4) साधा भूतकाळ

5) **पुढील वाक्यातील क्रियापदाचा अचूक काळ पोटप्रकारासह ओळखा.**

**माझी बहीण पुस्तक वाचत आहे.** ①②③④

1) पूर्ण वर्तमानकाळ  2) पूर्ण भूतकाळ
3) अपूर्ण वर्तमानकाळ  4) रीति भूतकाळ

6) **पुढील वाक्याचा काळ ओळखा.**

**तो नेहमीच गात असतो.** ①②③④

1) रीति भूतकाळ 2) रीति वर्तमानकाळ
3) पूर्ण भूतकाळ 4) अपूर्ण भूतकाळ

**7) पुढील काळाचे वाक्य ओळखा.**
**अपूर्ण भूतकाळ** ①②③④
1) राज शाळेत सायकलने येत असे.
2) शिक्षिका वर्गात येणार.
3) अमिता गाणे गात होती.
4) त्यांनी आपले काम संपवले आहे.

**8) पुढील काळाचे वाक्य ओळखा.**
**पूर्ण भूतकाळ** ①②③④
1) आपण चित्रपट पाहिला होता.
2) सुरेश गाणे गात असेल.
3) ती चांगले वाचत जाईल.
4) तुम्ही घरी येणार.

**9) पुढील काळाचे वाक्य ओळखा.**
**साधा भविष्यकाळ** ①②③④
1) तो हसणार असेल. 2) मी त्याला पाडीन.
3) तुम्ही जाणार असाल. 4) तो येत आहे.

**10) पुढील काळाचे वाक्य ओळखा.**
**अपूर्ण भविष्यकाळ** ①②③④
1) मी गप्पा मारतो.
2) तुम्ही घरी जाऊन आला आहात.
3) तो रडत असेल.
4) तो येईल..

**11) वाक्याचा काळ ओळखा.**
**शिवाजी महाराजांसाठी मावळे लढले होते.** ①②③④
1) पूर्ण वर्तमानकाळ 2) रीति भूतकाळ
3) पूर्ण भूतकाळ 4) भविष्यकाळ

**12) पूर्ण भूतकाळ करा.**
**सुमनच्या डोळ्यात पाणी आले.** ①②③④
1) सुमनच्या डोळ्यात पाणी आले होते.
2) सुमनच्या डोळ्यात पाणी असे.
3) सुमनच्या डोळ्यात पाणी येत आहे.
4) सुमनच्या डोळ्यात पाणी असते.

**13) पूर्ण वर्तमानकाळ करा.**
**आम्ही येथेच भेटत असू.** ①②③④
1) आम्ही येथेच भेटलो आहे.
2) आम्ही येथेच भेटत आहोत.
3) आम्ही येथेच भेटणार.
4) आम्ही येथेच भेटत असू.

**14) वाक्याचा काळ ओळखा.**
**सुनिता आजारी पडली.** ①②③④
1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ
3) भविष्यकाळ 4) रीति काळ

**15) वाक्याचा काळ ओळखा.**
**अजिंक्य परीक्षेत पास झाला होता.** ①②③④
1) रीति भूतकाळ 2) पूर्ण भविष्यकाळ
3) पूर्ण भूतकाळ 4) रीति वर्तमानकाळ

**16) भविष्यकाळ करा**
**ती बाग सुंदर आहे.** ①②③④
1) ती बाग सुंदर आहे. 2) ती बाग सुंदर होती.
3) ती बाग सुंदर असेल. 4) ती बाग सुंदर असते.

**17) पुढील वाक्याचा अचूक काळ ओळखा.**
**सुनिता काम करत असते.** ①②③④
1) पूर्ण वर्तमानकाळ 2) रीति भविष्यकाळ
3) अपूर्ण भूतकाळ 4) रीति वर्तमानकाळ

**18) रीति भूतकाळ करा.**
**विनायक माळीकाम करीत आहे.** ①②③④
1) विनायक माळीकाम करीत होता.
2) विनायक माळीकाम करत असतो.
3) विनायक माळीकाम करत.
4) विनायक माळीकाम करीत असे.

**19) साधा वर्तमानकाळ करा.**
**त्याने फुगा उडवला.** ①②③④
1) त्याने फुगा उडविला. 2) तो फुगा उडवेल.
3) तो फुगा उडवतो. 4) तो फुगा उडवत असे.

**20) पुढील वाक्याचा काळ ओळखा.**
**रमेश दुकानात जाईल.** ①②③④
1) साधा भूतकाळ 2) साधा भविष्यकाळ
3) पूर्ण भविष्यकाळ 4) अपूर्ण भूतकाळ

**▸▸ सराव प्रश्नसंग्रह 18 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 3 | 3) 2 | 4) 1 | 5) 3 |
| 6) 2 | 7) 3 | 8) 1 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 1 | 14) 2 | 15) 3 |
| 16) 3 | 17) 4 | 18) 4 | 19) 3 | 20) 2 |

# १९. क्रियापदविचार-क्रियापदाचे अर्थ व आख्यातविकार

## काळांचे विशेष उपयोग

**मराठीत एकंदर तीन काळ आहेत :- (१) वर्तमानकाळ, (२) भूतकाळ व (३) भविष्यकाळ.** त्यांचा आपण अभ्यास केला आहे. तसेच त्यांच्या पोटप्रकारांचाही अभ्यास आपण केला.

भाषेचा व्यवहार करताना काळांचे बंधन काटेकोरपणे पाळले जात नाही. एखाद्या काळाचा वापर दुसऱ्याच काळातील क्रियेबद्दल केलेला आढळून येतो. शिवाय त्यांतही विविध सूक्ष्म छटा आढळतात. भाषेचा अभ्यास करताना काळाचे हे विशेष उपयोग माहीत असणे आवश्यक आहे.

**(अ) वर्तमानकाळ**

(१) सर्व काळी व सर्वत्र सत्य असलेले विधान करताना. (स्थिर सत्य).
उदा. सूर्य पूर्वेस उगवतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

(२) भूतकाळातील घटना वर्तमानात सांगताना. (ऐतिहासिक वर्तमानकाळ)
उदा. अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो. (म्हणाला)

(३) लवकरच सुरू होणारी क्रिया दर्शविताना. (संनिहित भविष्यकाळ)
उदा. तुम्ही पुढे व्हा, मी येतोच. (मी येईन)

(४) अवतरण देताना. उदा. समर्थ रामदास म्हणतात, 'जगी सर्व सूखी असा कोण आहे?'

(५) लगतचा भूतकाळ सांगताना. (संनिहित भूतकाळ)
मी बसतो (बसलो), तोच तुम्ही हजर !

(६) एखादी क्रिया सतत घडते अशा अर्थी. (रीति वर्तमानकाळ)
उदा. तो नेहमीच उशिरा येतो. (येत असतो.)

**(आ) भूतकाळ**

(१) ताबडतोब घडणाऱ्या क्रियेबाबत. (संनिहित भविष्यकाळ).
उदा. तुम्ही पुढे व्हा, मी आलोच. (येईन).

(२) एखादी क्रिया भविष्यकाळी खात्रीने होणार या अर्थी. (निःसंशय भविष्यकाळ).
उदा. जवळ ये, की मार बसलाच म्हणून समज. (खात्री).

(३) संकेतार्थ असल्यास. (संभव).
पाऊस आला, (येईल) तर ठीक.

(४) वर्तमानकाळातील अपूर्ण क्रिया संपण्याच्या बेतात आहे, अशा अर्थी. तो पाहा तुझा मित्र आला. (येत आहे).

**(इ) भविष्यकाळ**

(१) संकेतार्थ असल्यास - तू मदत देशील, तर मी आभारी होईन.

(२) अशक्यता दर्शविताना - सगळेच मूर्ख कसे असतील? (अशक्यता).

(३) संभव असताना - गुरुजी आत शाळेत असतील. (असण्याचा संभव).

(४) इच्छा व्यक्त करताना - मला दोन रुपये हवे होते. (आहेत).

## क्रियापदाचा अर्थ

क्रियापदाच्या रूपांवरून निरनिराळ्या काळांचा बोध होतो, हे आपण पाहिले; पण कधी-कधी क्रियापदाच्या रूपावरून काळाचा बोध न होता आज्ञा, उपदेश, विनंती, कर्तव्य, इच्छा, संकेत वगैरे बोलणाऱ्याच्या मनातील हेतू, उद्देश किंवा प्रयोजन समजते. ह्यालाच व्याकरणात **क्रियापदाचा अर्थ** असे म्हणतात.

**हे अर्थ चार मानतात -** (१) स्वार्थ, (२) आज्ञार्थ, (३) विध्यर्थ व (४) संकेतार्थ.

## अर्थ व त्यांचे विविध उपयोग

**(१) स्वार्थ**

स्वार्थ म्हणजे स्वतःचा किंवा मूळचा अर्थ होय. क्रियेचे विधान तोच त्याचा अर्थ होय. ज्या वाक्यातील क्रियापदावरून केवळ काळाचा बोध होतो व आज्ञा, विधी, किंवा संकेत वगैरे अर्थाचा बोध न होता क्रियापदाचा केवळ स्वतःचा अर्थ तेवढाच समजतो, तेव्हा त्याला **स्वार्थी क्रियापद** असे म्हणतात. क्रियापदाची सर्व काळांतील रूपे ही 'स्वार्थी' होत. जसे-

(१) मुले अभ्यास करतात.

(२) तो घरी गेला.

(३) मी खात्रीने पास होईन.

**(२) आज्ञार्थ**

क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा करणे किंवा मागणे, आशीर्वाद देणे, प्रार्थना, विनंती किंवा उपदेश करणे या गोष्टींचा बोध होतो, तेव्हा त्यास **आज्ञार्थी क्रियापद** असे म्हणतात. जसे-

(१) मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा. (आज्ञा).

(२) देवा, सर्वांना सुखी ठेव. (प्रार्थना).

(३) एवढे आमचे काम कराच. (विनंती).

(४) मी हे काम करू? (अनुमोदन प्रश्न).

(५) तेवढी खिडकी लाव पाहू. (सौम्य आज्ञा).

**(३) विध्यर्थ**

जेव्हा वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून विधी म्हणजे कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा यांचा बोध होतो, तेव्हा यास **विध्यर्थी क्रियापद** असे म्हणतात. जसे-

(१) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी. (कर्तव्य).

(२) अंगी धैर्य असणाऱ्यांनीच हे कार्य करावे. (योग्यता).

(३) परीक्षेत मला पहिला वर्ग मिळावा. (शक्यता).

(४) आता पाऊस थांबावा. (इच्छा).

(५) कृपया, उत्तर पाठवावे. (विनंती).

(६) तो बहुधा घरी असावा. (शक्यता).

**(४) संकेतार्थ**

संकेत म्हणजे अट. जेव्हा वाक्यातील क्रियापदावरून संकेताचा अर्थ निघतो म्हणजे अमुक केले असते, तर अमुक झाले असते असे समजते, तेव्हा त्यास **संकेतार्थी क्रियापद** असे म्हणतात. जसे-

(१) मला जर बरे असते, तर मी भाग घेतला असता.

(२) निमंत्रण आले, तर मी येईन.

(३) पाऊस आला, तरी सहल जाणारच.
(४) तू आला नसतास, तरी चालले असते.

## आख्यातविकार

संस्कृतात क्रियापदाला 'आख्यात' असे म्हणतात. लिंग, वचन व विभक्ती यांमुळे नामाच्या रूपात जसा बदल होतो, तसाच लिंग, वचन व पुरुष यांमुळे क्रियापदाच्या रूपातही बदल (=विकार) होतो. उदा. बसतो (पुल्लिंगी), बसते (स्त्रीलिंगी), बसतात (अनेकवचन), बसतोस (द्वितीय पुरुष). धातूला प्रत्यय लागून क्रियापदांची रूपे बनतात हे आपण पाहिले. उदा. बस-तो, बस-ला, बसे, बसेल, बसू, बसा-वा, बस-ता. ही रूपे म्हणजे काळांची व अर्थांची रूपे आहेत. क्रियापदांना म्हणजेच आख्यातांना 'तो, ला, ई, ईल, ऊ, वा' वगैरे प्रत्यय लागून विविध काळ व अर्थ यांची रूपे तयार होतात. त्यांना **आख्यात प्रत्यय** असे म्हणतात. काळ व अर्थ क्रियापदांना होणारे हे विकार असल्यामुळे यांनाच **आख्यातविकार** असे म्हणतात. 'आख्यात' या शब्दाऐवजी **काळ व अर्थ** हे शब्द अधिक सोपे व रूढ आहेत. त्याच शब्दांचा वापर सर्वत्र व या पुस्तकात केलेला आहे.

तरीपण चार काळ व तीन अर्थ यांना आख्यातांची जी नावे देण्यात आली आहेत, ती अधिक सूक्ष्म व शास्त्रीय असल्यामुळे त्या नावांचा परिचय पुढे थोडक्यात करून देण्यात येत आहे.

| काळ/अर्थ | क्रियापदाचे रूप | आख्याताचे नाव |
|---|---|---|
| वर्तमानकाळ | बसतो | प्रथम-ताख्यात |
| भूतकाळ | बसला | लाख्यात |
| रीति भूतकाळ | बसे | ई-आख्यात |
| भविष्यकाळ | बसेल | ईलाख्यात |
| आज्ञार्थ | बसू | ऊ-आख्यात |
| विध्यर्थ | बसावा | वाख्यात |
| संकेतार्थ | बसता | द्वितीय-ताख्यात |

आख्यातांना दिलेली ही नावे अधिक चांगली व शास्त्रीय आहेत, असे म्हणायचे कारण वर्तमान, भूत, भविष्य ही काळांची नावे तितकीशी काटेकोर नाहीत. वर्तमानकाळाच्या रूपावरून कधी भविष्यकाळाचा (मी येतोच = येईन) व भूतकाळाच्या रूपावरून कधी भविष्यकाळाचा (मी आलोच = येईन) वगैरे आशय व्यक्त होत असतो. हे आपण 'काळांचे विशेष उपयोग' या मुद्द्याचे स्पष्टीकरण समजून घेताना पाहिले आहे.

## धातूंची आख्यातरूपे

धातूंना वेगवेगळे प्रत्यय लागून त्यांची तिन्ही लिंगी, तिन्ही पुरुषी व दोन्ही वचनी आख्यातरूपे म्हणजे क्रियापदाची रूपे तयार होतात. नमुन्यादाखल काही धातूंची सर्व आख्यातांतील रूपे दिली आहेत.

**वर्तमानकाळ (प्रथम ताख्यात)**

**'बस'** धातू (अकर्मक) **'कर'** धातू (सकर्मक)

| | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| प्र. पु. | मी बसतो-ते | आम्ही बसतो | मी करतो-ते | आम्ही करतो |
| द्वि. पु. | तू बसतोस-तीस-तेस | तुम्ही बसता | तू करतोस-तीस-तेस | तुम्ही करता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तृ. पु. | तो बसतो | ते बसतात | तो करतो | ते करतात |
| | ती बसते | त्या बसतात | ती करते-ती | त्या करतात |
| | ते बसते | ती बसतात | ते करते | ती करतात |

### भूतकाळ (लाख्यात)

| | | | |
|---|---|---|---|
| मी बसलो-ले | आम्ही बसलो | मी केला-ली-ले | आम्ही केला-ली-ले |
| तू बसलास-लीस | तुम्ही बसला-ल्यात | तू केला-ली-ले | तुम्ही केला-ल्या-ली |
| तो बसला | ते बसले | त्याने केला-ली-ले | |
| ती बसली | त्या बसल्या | तिने केला-ली-ले | त्यांनी केले-ल्या-ली |
| ते बसले | ती बसली | त्याने केला-ली-ले | |

### रीति भूतकाळ (ई-आख्यात) (पद्यरूपे)

| | | | |
|---|---|---|---|
| मी बसे | आम्ही बसू | मी करी | आम्ही करू |
| तू बस | तुम्ही बसत | तू करीस | तुम्ही करा |
| तो-ती-ते बसे | ते-त्या-ती बसत | तो-ती-ते करी | ते-त्या-ती करीत |

### भविष्यकाळ (ईलाख्यात)

| | | | |
|---|---|---|---|
| मी बसेन | आम्ही बसू | मी करीन | आम्ही करू |
| तू बसशील | तुम्ही बसाल | तू करशील | तुम्ही कराल |
| तो-ती-ते बसेल | ते-त्या-ती बसतील | तो-ती-ते करील | ते-त्या-ती करतील |

### आज्ञार्थ (ऊ-आख्यात)

| | | | |
|---|---|---|---|
| मी बसू? | आम्ही बसू? | मी करू? | आम्ही करू? |
| तू बस | तुम्ही बसत | तू कर | तुम्ही करा |
| तो-ती-ते बसो | ते-त्या-ती बसोत | तो-ती-ते करो | ते-त्या-ती करोत |

### विध्यर्थ (वाख्यात)

| | | | |
|---|---|---|---|
| मी बसावा- वी-वे | आम्ही बसावे- व्या-वी | मी करावा- वी-वे | आम्ही करावे- व्या-वी |
| तू बसावास- वीस-वेस | तुम्ही बसावेत- व्यात-वीत | तू करावास- वीस-वेस | तुम्ही करावेत- व्यात-वीत |
| तो बसावा | ते बसावे(त) | तो करावा | ते करावेत |
| ती बसावी | त्या बसाव्या(त) | ती करावी | त्या कराव्यात |
| ते बसावे | ती बसावी(त) | ते करावे | ती करावीत |

### संकेतार्थ (द्वितीय ताख्यात)

| | | | |
|---|---|---|---|
| जर मी बसतो-ते | जर आम्ही बसतो | जर मी करतो-ते | जर आम्ही करतो |
| जर तू बसतोस तीस-तेस | जर तुम्ही बसता | जर तू करतास- तीस-तेस | जर तुम्ही करता |
| जर तो बसता | जर ते बसते | जर तो करता | जर ते करते |
| जर ती बसती | जर त्या बसत्या | जर ती करती | जर त्या करत्या |
| जर ते बसते | जर ती बसती | जर ते करते | जर ते करती |

**अकर्मक 'हो' धातू**

| **वर्तमानकाळ (प्रथम ताख्यात)** | | **भूतकाळ (लाख्यात)** | |
|---|---|---|---|
| मी होतो-ते | आम्ही होतो | मी झालो-ले | आम्ही झालो |
| तू होतोस-तेस | तुम्ही होता(त) | तू झालास-लीस -लेस | तुम्ही झाला(त) |
| तो होतो | ते होतात | तो झाला | ते झाले |
| ती होते | त्या होतात | ती झाली | त्या झाल्या |
| ते होते | ती होतात | ते झाले | ती झाली |

| **अकर्मक 'पाहिजे' धातू** | | **अकर्मक 'नको' धातू** | |
|---|---|---|---|
| मी पाहिजे | आम्ही पाहिजे | मी नको | आम्ही नको |
| तू पाहिजे(स) | तुम्ही पाहिजे(त) | तू नको(स) | तुम्ही नको-का |
| तो-ती-ते पाहिजे | ते-त्या-ती पाहिजे(त) | तो-ती-ते- नको | ते-त्या-ती- नकोत |

काही धातूंना भूतकाळाचे प्रत्यय लागताना त्यांच्या रूपांत बदल होतो. उदा. कर (केला), जा (गेला), मर (मेला), दे (दिला), ये (आला), धू (धुतला), हो (झाला), घे (घेतला), घाल (घातला), म्हण (म्हटले), सांग (सांगितला) वगैरे.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) **क्रियापदाची सर्व काळातील रुपे ही ......... होत.** ①②③④
1) स्वार्थी 2) आज्ञार्थी
3) विध्यर्थी 4) संकेतार्थी

2) **'संकेतार्थी' क्रियापदात ......... असते.** ①②③④
1) आज्ञा 2) विनंती 3) अट 4) मागणी

3) **आज्ञार्थी क्रियापदावरून कोणता आख्यातविकार ओळखला जातो?** ①②③④
1) ई - लाख्यात 2) ऊ - आख्यात
3) ई - आख्यात 4) वाख्यात

4) **विध्यर्थी क्रियापदावरून कोणता आख्यातविकार ओळखता येतो?** ①②③④
1) लाख्यात 2) वाख्यात
3) ई-लाख्यात 4) ऊ-आख्यात

5) **पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).**
**तुमचा वरदहस्त असावा.** ①②③④
1) स्वार्थी 2) विध्यर्थी
3) आज्ञार्थी 4) संकेतार्थी

6) **पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).**
**आपले वागणे सर्वांशी चांगलेच असावे.** ①②③④
1) आज्ञार्थी 2) संकेतार्थी 3) विध्यर्थी 4) स्वार्थी

7) **पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).**
**तो बहुधा घरी अभ्यास करत असावा.** ①②③④
1) आज्ञार्थी 2) विध्यर्थी
3) स्वार्थी 4) संकेतार्थी

8) **पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).**
**तुम्ही लवकर घरी जा.** ①②③④
1) स्वार्थी 2) संकेतार्थी
3) आज्ञार्थी 4) विध्यर्थी

9) **पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा**

(क्रियापदाचा अर्थ).
वसंत ऋतूचा आनंद साजरा करा. ①②③④
1) आज्ञार्थी 2) स्वार्थी
3) विध्यर्थी 4) संकेतार्थी

10) पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).
आपण सुंदर चित्र जरूर रेखाटा. ①②③④
1) आज्ञार्थी 2) स्वार्थी
3) संकेतार्थी 4) विध्यर्थी

11) पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).
तुमचे बाळ गोंडस आहे. ①②③④
1) संकेतार्थी 2) स्वार्थी
3) विध्यर्थी 4) आज्ञार्थी

12) पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).
तुम्ही बाहेर जाऊन दंगा कराल, असे मला वाटते. ①②③④
1) स्वार्थी 2) विध्यर्थी
3) संकेतार्थी 4) आज्ञार्थी

13) पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).
कार्यक्रम असता, तर मी आले असते. ①②③④
1) विध्यर्थी 2) संकेतार्थी
3) स्वार्थी 4) आज्ञार्थी

14) पुढील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते ओळखा (क्रियापदाचा अर्थ).
अभ्यास केला असता, तर बरे झाले असते. ①②③④
1) संकेतार्थी 2) आज्ञार्थी
3) विध्यर्थी 4) स्वार्थी

15) संकेतार्थी वाक्य ओळखा. ①②③④
1) परीक्षा दिली, तर पास होणार.
2) तुम्ही लवकर यावे.
3) आम्ही वाट पाहतो.
4) मुलगी नेहमी खेळते.

16) पुढीलपैकी कोणत्या क्रियापदावरून पुढील अर्थ निघतो ते ओळखा.
आज्ञार्थी ①②③④
1) जातात 2) करा 3) उठावे 4) जगावे

17) पुढीलपैकी कोणत्या क्रियापदावरून पुढील अर्थ निघतो ते ओळखा.
स्वार्थी ①②③④
1) उडा 2) नसावे 3) हसावे 4) आहे

18) पुढीलपैकी कोणत्या क्रियापदावरून पुढील अर्थ निघतो ते ओळखा.
विध्यर्थी ①②③④
1) रडतो 2) या 3) यावे 4) राहितो

19) पुढीलपैकी आज्ञार्थी वाक्य ओळखा. ①②③④
1) विजयी भव.
2) लवकर यावे.
3) काम करता-करता खावे.
4) तसेच जा.

20) पुढीलपैकी स्वार्थी वाक्य ओळखा. ①②③④
1) ते आले, तर आपण जाऊ.
2) सज्जन माणूस ओळखावा.
3) तुम्ही हळूहळू चाला.
4) गावात हत्ती आला.

21) पुढीलपैकी विध्यर्थी वाक्य ओळखा. ①②③④
1) तुम्ही शेतात काम करा.
2) बागेतील फुले बघून प्रसन्न वाटावे.
3) हे काम छान आहे.
4) आपण मुंबईला जाऊ.

22) पुढीलपैकी संकेतार्थी वाक्य ओळखा. ①②③④
1) तू घरी काम कर
2) पाऊस पडला, तर धान्य उगवेल
3) आपण विमानात जाऊ.
4) तुम्ही शाळेत जावे.

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 19 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 1 | 2) 3 | 3) 2 | 4) 2 | 5) 2 |
| 6) 3 | 7) 2 | 8) 3 | 9) 1 | 10) 1 |
| 11) 2 | 12) 1 | 13) 2 | 14) 1 | 15) 1 |
| 16) 2 | 17) 4 | 18) 3 | 19) 4 | 20) 4 |
| 21) 2 | 22) 2 | | | |

# २०. क्रियाविशेषण अव्यये

## अविकारी आणि विकारी शब्दप्रकार - उजळणी

आतापर्यंत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या चार शब्दप्रकारांचा अभ्यास केला. या चार शब्दप्रकारांवर लिंग, वचन, विभक्ती किंवा काळ व अर्थ यांचा परिणाम होऊन या प्रकारांतील शब्दांच्या रूपात कसा बदल होतो, हे आपण पाहिले. शब्दांच्या आठ प्रकारांपैकी नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या प्रकारांना **विकारी** असे म्हणतात. कारण वाक्यात त्यांचा उपयोग होत असताना, लिंग, वचन, विभक्ती इत्यादींचा त्यांच्यावर परिणाम होऊन या प्रकारातील शब्दांच्या रूपात बदल होतो.

आता आपण अविकारी शब्दप्रकारांचा अभ्यास करणार आहोत. क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय या शब्दप्रकारांना **अविकारी** असे म्हणतात. कारण लिंग, वचन, विभक्ती इत्यादींचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्या शब्दप्रकारांतील शब्दांच्या रूपांमध्ये काही बदल होत नाही.

## क्रियाविशेषण

नामाबद्दल अधिक माहिती देणाऱ्या शब्दाला 'नाम विशेषण' किंवा 'विशेषण' असे म्हणतात, हे आपण पाहिले. त्याचप्रमाणे क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणाऱ्या शब्दाला **क्रियाविशेषण** असे म्हणतात. क्रियापदाने जी क्रिया दर्शविली जाते ती केव्हा घडली, कोठे घडली, कशी घडली, किती वेळा किंवा किती प्रमाणात घडली अशा प्रकारची अधिक माहिती देणारे शब्द वाक्यात येतात. त्यांना आपण **क्रियाविशेषण** असे म्हणतो.

**क्रियाविशेषण आणि क्रियाविशेषण अव्यय यातील फरक**

क्रियाविशेषण हे क्रियापदाचे विशेषण असते. पण ते विकारी असते म्हणजे लिंग, वचन इत्यादींचा त्याच्या रूपावर परिणाम होतो. त्यानुसार ते बदलते. उदा. 'ती मुलगी चांगली गाते.' या वाक्यात 'चांगली' हे 'गाते' या क्रियापदाचे विशेषण आहे. जर या वाक्यातील कर्ता पुल्लिंगी ठेवला, तर हे वाक्य 'तो मुलगा चांगला गातो.' असे होईल. मूळ वाक्यातील कर्ता अनेकवचनी ठेवला, तर 'त्या मुली चांगल्या गातात.' असे ते वाक्य होईल म्हणजे ही क्रियाविशेषणे विकारी आहेत.

**आता पुढील वाक्ये पाहा.**

(१) मुलगी जलद चालते. (२) मुलगा जलद चालतो.

(३) मुली जलद चालतात. (४) मुले जलद चालतात.

वरील वाक्यांतील 'जलद' हे क्रियाविशेषण 'चालणे' या क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगते. तसेच, लिंग, वचन यांमध्ये बदल केला, तरी 'जलद' या क्रियाविशेषणावर काही परिणाम होत नाही. त्यात बदल होत नाही. ते तसेच राहते. म्हणून त्याला **क्रियाविशेषण अव्यय** असे म्हणतात.

यावरून असे दिसते की, क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगून जी अविकारी राहतात, त्यांना **क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

कोणत्याही शब्दाचा प्रकार हा त्याच्या रूपावरून न ठरता वाक्यातील त्याच्या कार्यावरून ठरतो, हे आपण पाहिले आहे. तीच गोष्ट क्रियाविशेषणाच्या बाबतीतही खरी आहे. उदा. 'मोठा' हा शब्द विशेषण म्हणून वापरला जातो. तो मुळात विकारी किंवा सव्यय आहे; कारण लिंगवचनांतील बदलाप्रमाणे त्याची रूपे 'मोठा-मोठी-मोठे' अशी होतात. पण त्याला तृतीयेचा 'ने' हा प्रत्यय लागून 'मोठ्याने' असे रूप तयार होते. तो लिंगवचनाप्रमाणे बदलत नाही, म्हणून तो शब्द अविकारी किंवा अव्यय, तर 'मोठा' हा शब्द विकारी किंवा सव्यय आहे.

तसेच म्हण (क्रि.) सव्यय, तर 'म्हणून' अव्यय. 'जोर' (नाम) सव्यय, तर 'जोरात' अव्यय. शब्दाला विभक्तीचा प्रत्यय लागून ते अव्यय झाले की मग त्याला पुन्हा विभक्तीचे प्रत्यय लागत नाहीत.

## क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार

क्रियाविशेषण अव्ययांचे वर्गीकरण दोन प्रकारे करतात- **(१) त्यांच्या अर्थावरून (अर्थमूलक प्रकार) (२) त्यांच्या स्वरूपावरून (स्वरूपमूलक प्रकार).**

## अर्थमूलक प्रकार

क्रियाविशेषण अव्ययाचे 'अर्थमूलक प्रकार' पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) कालवाचक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) काल शाळेला सुट्टी होती. (२) मी दररोज व्यायाम करतो.

(३) पूर्वी शिक्षक पागोटे घालत. (४) तो वारंवार आजारी पडतो.

वरील वाक्यातील 'काल, दररोज, पूर्वी, वारंवार' हे शब्द त्या-त्या वाक्यांतील क्रिया केव्हा, किती वेळ किंवा किती वेळा घडली हे दाखवितात. ही अव्यये क्रिया घडण्याची वेळ किंवा काळ दाखवितात; म्हणून त्यांना **कालवाचक क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

**कालवाचक क्रियाविशेषण अव्ययांचे पुढील तीन प्रकार पडतात.**

**(अ) कालदर्शक :-** आता, आधी, सध्या, तूर्त, हल्ली, सांप्रत, उद्या, परवा, लगेच, केव्हा, जेव्हा, पूर्वी, मागे, दिवसाचा, रात्रीस इत्यादी.

**(आ) सातत्यदर्शक :-** नित्य, सदा, सर्वदा, सतत, नेहमी, अद्यापि, दिवसभर, आजकाल इत्यादी.

**(इ) आवृत्तिदर्शक :-** वारंवार, फिरून, पुनःपुन्हा, दररोज, सालोसाल, क्षणोक्षणी इत्यादी.

**(२) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) परमेश्वर सर्वत्र असतो. (२) साप माझ्या समोरून गेला.

(३) तिथे कर माझे जुळती. (४) येथून नदी जवळ आहे.

वरील वाक्यांतील 'सर्वत्र, समोरून, तिथे, येथून' हे शब्द वाक्यांतील क्रिया घडण्याचे स्थळ किंवा ठिकाण दाखवितात; म्हणून त्यांना **स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

याचे दोन प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे-

**(अ) स्थितिदर्शक :-** इथे, तिथे, जिथे, खाली, वर, कोठे, मध्ये, अलीकडे, पलीकडे, मागे, पुढे, जिकडे, तिकडे, सभोवार इत्यादी.

**(आ) गतिदर्शक :-** इकडून, तिकडून, दूर, लांब, तिथून, मागून, पुढून, वरून, खालून इत्यादी.

**(३) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) रस्त्यातून जाताना सावकाश व जपून चालावे.

(२) तो मुलगा उभ्याने पाणी गटागटा पितो.

वरील वाक्यांतील 'सावकाश, जपून, उभ्याने, गटागटा' हे शब्द क्रिया घडण्याची रीत किंवा क्रिया कशी घडते ते दाखवितात, म्हणून त्यांना **रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

त्यांचे पुढील तीन प्रकार आहेत.

**(अ) प्रकारदर्शक :-** असे, तसे, जसे, कसे, उगीच, व्यर्थ, फुकट, आपोआप, मुद्दाम, जेवी, तेवी, हळू, सावकाश, जलद इत्यादी.

**(आ) अनुकरणदर्शक :-** झटकन, पटकन, पटपट, टपटप, चमचम, बदाबद इत्यादी.

**(इ) निश्चयार्थक :-** खचित, खरोखर इत्यादी.

**(४) संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) मी मुलीला अनेकदा बजावले आहे.

(२) ते गृहस्थ वाचताना नेहमी अडखळतात.

(३) सहलीस गेल्यावर आम्ही भरपूर पाणी प्यालो.

वरील वाक्यातील 'अनेकदा, नेहमी, भरपूर' हे शब्द क्रिया किती वेळा घडली हे किंवा क्रियेचे परिमाण दाखवितात. अशा शब्दांना **संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात. अशा प्रकारचे आणखी काही शब्द पुढीलप्रमाणे-

किंचित, जरा, काहीसा, थोडा, क्वचित, अत्यंत, अगदी, बिलकूल, मुळीच, भरपूर, बहुत, अतिशय, मोजके, पूर्ण.

**(५) प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) तुम्ही आमच्याकडे याल का?

(२) आपण मला आपल्या घरी न्याल ना?

वरील वाक्यातील 'का, ना' हे शब्द त्या-त्या वाक्यांतील विधानांना प्रश्नाचे स्वरूप देतात. अशा शब्दांना प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यये असे म्हणतात.

**(६) निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) तो न चुकता येतो. (२) तो तोंड उघडेल तर ना.

वरील वाक्यातील 'न, ना' हे शब्द त्या-त्या वाक्यांतील क्रियेचा नकार किंवा निषेध दर्शवितात. अशा शब्दांना **निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

## स्वरूपमूलक प्रकार

**सिद्ध, साधित व स्थानिक क्रियाविशेषण अव्यये**

**सिद्ध क्रियाविशेषण अव्यये :-**

'इथे, तिथे, आज, पुढे, मागे' इत्यादी शब्द मूलतः क्रियाविशेषण अव्ययेच आहेत. त्यांना **सिद्ध क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

**साधित क्रियाविशेषण अव्यये :-** 'मोठ्याने, वस्तुतः, एकदा, हसताना, कोठून' वगैरेंसारखे शब्द मूळ शब्दांना प्रत्यय लागून बनले आहेत. अशांना **साधित क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

**(अ) प्रत्यय साधित**

(१) नामसाधित - दिवसा, रात्री, वस्तुतः, व्यक्तिशः, अर्थात.

(२) सर्वनामसाधित - त्यामुळे, ह्यावरून, कित्येकदा.

(३) विशेषणसाधित - मोठ्याने, एकदा, इतक्यात, एकत्र.

(४) धातुसाधित - हसू, हसत, हसता, हसताना, हसून.

(५) अव्ययसाधित - कोठून, इकडून, खालून, वरून, येथपर्यंत.

(६) प्रत्ययसाधित - शास्त्रदृष्ट्या, मनःपूर्वक, कालानुसार, बुद्धिपुरस्सर.

**(आ) सामासिक**

संस्कृत किंवा फारसी उपसर्ग, शब्दांच्या द्विरुक्तीने होणारे काही जोडशब्द किंवा सामासिक शब्द क्रियाविशेषणांचे कार्य करीत असतात. जसे- आजन्म, यथाशक्ती, निःसंशय, यावज्जीव, प्रतिदिन, घरोघर, गावोगाव, गल्लोगल्ली, दररोज, समोरासमोर, हरघडी, गैरहजर.

**(इ) स्थानिक क्रियाविशेषण अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) ती काय माती गाते ! (नाम)

(२) तो इंग्रजी चांगले बोलतो. (विशेषण)

(३) तो हसत बोलतो. (कृदन्त)

(४) तू जिन्यावर ये. (शब्दयोगी)

(५) मी तर गरीब. (उभयान्वयी)

(६) दहा रुपये तरी लागतील. (उभयान्वयी)

वरील वाक्यांतील 'माती, चांगले, हसत, वर, तर (खरोखर याअर्थी), तरी (निदान या अर्थी)' हे इतर प्रकारचे शब्द आहेत. यांना कोणी **स्थानिक क्रियाविशेषण अव्यये** असेही म्हणतात.

## क्रियाविशेषणे व विशेषणे

**(अ) पुढील वाक्ये पाहा.**

(१) गोगलगाय फार हळू चालते. (२) काळवीट अतिशय जलद धावतो.

वरील वाक्यातील फार व अतिशय हे शब्द क्रियाविशेषणांबद्दल विशेष माहिती सांगतात. त्यांचा संबंध अंतिमतः क्रियापदांशीच पोहोचत असल्याने त्या शब्दांना **क्रियाविशेषण अव्यये** म्हणावे.

**(आ) पुढील वाक्ये पाहा.**

(१) तो फार अशक्त मुलगा आहे.

(२) बागेत पेरूचे खूप उंच झाड आहे.

वरील वाक्यांतील फार, खूप हे शब्द विशेषणे आहेत व त्यांचा संबंध नामांशीच आहे, म्हणून त्यांना **विशेषणे** म्हणावे.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) क्रियाविशेषण अव्यय ही शब्दाची ............. जात आहे. ①②③④
1) सव्यय 2) यापैकी नाही
3) अविकारी 4) पर्याय १, ३

2) 'ती मुलगी चांगली आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा. ①②③④
1) क्रियापद 2) विशेषण
3) क्रियाविशेषण 4) क्रियाविशेषण अव्यय

3) 'घोडा जलद पळतो.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची शब्दजाती ओळखा. ①②③④
1) क्रियाविशेषण 2) उभयान्वयी अव्यय
3) क्रियापद 4) क्रियाविशेषण अव्यय

4) 'मोठा' या शब्दाची जात विशेषण आहे तर 'मोठ्याने' हे .............. आहे. ①②③④
1) क्रियापद 2) क्रियाविशेषण अव्यय
3) क्रियाविशेषण 4) विशेषण

5) 'जोर' हे नाम सव्यय व जोर पासून तयार होणारे 'जोरात' हे .............. होय. ①②③④
1) अव्यय 2) सव्यय 3) विकारी 4) सर्व

6) पुढीलपैकी कोणता पर्याय कालवाचक क्रियाविशेषण अव्ययाचा पोट प्रकार आहे? ①②③④
1) गतिदर्शक 2) स्थितीदर्शक
3) प्रकारदर्शक 4) सातत्यदर्शक

7) 'इथे, तिथे, आज, पुढे, मागे' ही ............. क्रियाविशेषण अव्यये आहेत. ①②③④
1) सिद्ध 2) साधित
3) प्रत्यय साधित 4) स्थानिक

8) पुढीलपैकी क्रियाविशेषण अव्ययाचा पर्याय निवडा. ①②③④
1) फिरत 2) विजय 3) नेहमी 4) त्यांनी

9) पुढीलपैकी क्रियाविशेषण अव्ययाचा पर्याय निवडा. ①②③④
1) परंतु 2) घरासाठी 3) मागे 4) आणि

10) पुढीलपैकी क्रियाविशेषण अव्यय नसलेला पर्याय निवडा. ①②③④
1) किंवा 2) खरोखर 3) अनेकदा 4) भरपूर

11) पुढीलपैकी क्रियाविशेषण अव्यय नसलेला पर्याय निवडा. ①②③④
1) विजय 2) सुमन
3) आणि 4) सर्व पर्याय

12) पुढील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळखा आपण उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यायला हवे. ①②③④
1) आपण 2) भरपूर 3) पाणी 4) प्यायला

13) पुढील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळखा सुरेश नेहमी खोटे बोलतो. ①②③④
1) सुरेश 2) नेहमी 3) खोटे 4) बोलतो

14) वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययांचा पोटप्रकार ओळखा.
सविता अनेकदा सायकलवरून पडली आहे. ①②③④
1) परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय
2) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय
3) साधित क्रियाविशेषण अव्यय
4) गतिदर्शक क्रियाविशेषण अव्यय

15) वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययांचा पोटप्रकार ओळखा.
तिथे दरवर्षी जत्रा भरत असे. ①②③④
1) साधित क्रियाविशेषण अव्यय
2) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय
3) कालदर्शक क्रियाविशेषण अव्यय
4) गतिदर्शक क्रियाविशेषण अव्यय

16) वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययांचा पोटप्रकार ओळखा.
घोडा वारंवार मालकाकडेच पाहत होता. ①②③④
1) आवृत्तिदर्शक क्रियाविशेषण अव्यय
2) कालदर्शक क्रियाविशेषण अव्यय

3) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

4) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

**17) वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययांचा पोटप्रकार ओळखा.**

**तो फक्त एकदा आला.** ①②③④

1) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

2) स्थितिदर्शक क्रियाविशेषण अव्यय

3) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

4) प्रत्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

**18) वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययांचा पोटप्रकार ओळखा.**

**गणेश गटागटा दूध पितो.** ①②③④

1) प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय

2) साधित क्रियाविशेषण अव्यय

3) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

4) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

**19) 'बदाबद' हे क्रियाविशेषण अव्यय ............. या प्रकारचे आहे.** ①②③④

1) अनुकरणदर्शक 2) निश्चयार्थक

3) प्रकारदर्शक 4) रीतिवाचक

**20) 'सुनिता पुनःपुन्हा आर्जवे करीत होती'. या वाक्यातील क्रियाविशेषण अव्ययाचा मुख्य व पोटप्रकार ओळखा.** ①②③④

1) अर्थमूलक, स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

2) स्वरूपमूलक, सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

3) स्वरूपमूलक, साधित क्रियाविशेषण अव्यय

4) अर्थमूलक, आवृत्तिदर्शक क्रियाविशेषण अव्यय

**▸▸ सराव प्रश्नसंग्रह 20 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 3 | 3) 4 | 4) 2 | 5) 1 |
| 6) 4 | 7) 1 | 8) 3 | 9) 3 | 10) 1 |
| 11) 4 | 12) 2 | 13) 2 | 14) 1 | 15) 2 |
| 16) 1 | 17) 4 | 18) 3 | 19) 1 | 20) 4 |

# २१. शब्दयोगी अव्यये

**पुढील उतारा वाचा.**

''जाईच्या मांडवावर सूर्याची सोनेरी किरणे पसरली. साळुंकीने घरट्याबाहेर झेप घेतली. तिच्या मागोमाग तिचा जोडीदारही बाहेर पडला. याच संधीची तो मुलगा मघापासून वाट पाहत होता. त्याची आई जाईच्या मांडवाखाली फुले वेचीत होती. साळुंकी दूर हिरवळीवर पिलांसाठी चारा टिपत होती.''

वरील उताऱ्यातील 'वर, बाहेर, ही, पासून, खाली, साठी' हे रंगीत टाइपात छापलेले शब्द त्यांच्यामागे असलेल्या शब्दांना जोडून आलेले दिसतात. ते ज्या शब्दांना जोडून आलेले आहेत, त्यांचा त्याच वाक्यातील दुसऱ्या एखाद्या शब्दाशी संबंध जोडण्याचे काम ते करतात. उदा. पहिल्या वाक्यातील 'वर' हा शब्द 'मांडव' या शब्दाला जोडून आला आहे आणि तो 'मांडव व पसरली' या शब्दांचा संबंध जोडण्याचे काम करतो. **हे शब्दाला जोडून येतात म्हणून त्यांना 'शब्दयोगी अव्यय'** असे म्हणतात. लिहितानादेखील हे शब्द मागील शब्दांना जोडूनच लिहावयास हवेत.

## शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये

तसे पाहिले, तर शब्दयोगी अव्यये स्वतंत्र असे शब्द नाहीत. 'वर, खाली, मागे, पुढे, बाहेर, पूर्वी, समोर' यांसारखे शब्द मूळची क्रियाविशेषण अव्यये आहेत. पण वर उताऱ्यातील 'वर, खाली, बाहेर' हे शब्द स्वतंत्रपणे येऊन क्रियापदाबद्दल विशेष अशी माहिती सांगत नाहीत, म्हणून ती क्रियाविशेषणे नाहीत. वरील वाक्यांत त्यांचे कार्य त्याहून वेगळे आहे. ते शब्दांना (सामान्यतः नामांना किंवा नामाचे कार्य करणाऱ्या इतर शब्दांना) जोडून येऊन त्यांचा त्याच वाक्यातील दुसऱ्या एखाद्या शब्दाशी संबंध जोडतात. ही शब्दयोगी अव्यये नसती, तर त्या वाक्याचा अर्थ नीट लागला नसता. शब्दयोगी अव्ययांच्या रूपांमध्ये लिंग, वचन, विभक्ती, पुरुष, यांमुळे बदल किंवा विकार होत नाही म्हणून त्यांना अविकारी किंवा अव्यये असे म्हणतात.

**शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक**

पुढील दोन गटांतील वाक्ये पाहा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| (१) पतंग झाडावर अडकला. | (१) पतंग वर जात होता. |
| (२) टेबलाखाली पुस्तक पडले. | (२) मला खाली बसणे आवडते. |
| (३) सूर्य ढगामागे लपला. | (३) मागे या ठिकाणी विहीर होती. |

वरील दोन्ही गटांत 'वर, खाली, मागे' हे शब्द दिसतात. पहिल्या गटातील शब्द शब्दयोगी अव्ययांचे काम करतात. कारण ते शब्द अगोदरच्या शब्दाला जोडून आले आहेत. दुसऱ्या गटातील तेच शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. कारण ते क्रियापदाबद्दल अधिक माहिती देऊन 'अव्यये' राहतात.

**महत्त्वाचे :-** शब्दयोगी अव्यये सामान्यतः नामांना जोडून येतात. असे असले, तरी शब्दयोगी अव्यये

क्रियापदे आणि क्रियाविशेषणे यांनाही कधी-कधी जोडून येतात. जसे- येईपर्यंत, बसल्यावर, जाण्यापेक्षा, बोलण्यामुळे, परवापासून, यंदापेक्षा, केव्हाच, थोडासुद्धा इत्यादी.

## शब्दयोगी अव्ययांचे प्रकार

शब्दयोगी अव्ययांचे त्यांच्या अर्थावरून पुढील प्रकार पडतात.

**शब्दयोगी अव्ययांचे प्रकार**

| क्रम | प्रकार | काही शब्दयोगी अव्यये |
|---|---|---|
| (१) | कालवाचक | (अ) आता, पूर्वी, पुढे, आधी, नंतर, पर्यंत, पावेतो. |
| | | (आ) गतिवाचक- आतून, खालून, मधून, पर्यंत, पासून. |
| (२) | स्थलवाचक | आत, बाहेर, मागे, पुढे, मध्ये, अलीकडे, समोर, जवळ, ठायी, पाशी, नजीक, समीप, समक्ष. |
| (३) | करणवाचक | मुळे, योगे, करून, कडून, द्वारा, करवी, हाती. |
| (४) | हेतुवाचक | साठी, कारणे, करिता, अर्थी, प्रीत्यर्थ, निमित्त, स्तव. |
| (५) | व्यतिरेकवाचक | शिवाय, खेरीज, विना, वाचून, व्यतिरिक्त, परता. |
| (६) | तुलनावाचक | पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस. |
| (७) | योग्यतावाचक | योग्य, सारखा, जोगा, सम, समान, प्रमाणे, बरहुकूम. |
| (८) | कैवल्यवाचक | च, मात्र, ना, पण, फक्त, केवळ. |
| (९) | संग्रहवाचक | सुद्धा, देखील, ही, पण, बरीक, केवळ, फक्त. |
| (१०) | संबंधवाचक | विशी, विषयी, संबंधी. |
| (११) | साहचर्यवाचक | बरोबर, सह, संगे, सकट, सहित, सवे, निशी, समवेत. |
| (१२) | भागवाचक | पैकी, पोटी, आतून. |
| (१३) | विनिमयवाचक | बद्दल, ऐवजी, जागी, बदली. |
| (१४) | दिक्वाचक | प्रत, प्रति, कडे, लागी. |
| (१५) | विरोधवाचक | विरुद्ध, वीण, उलटे, उलट. |
| (१६) | परिमाणवाचक | भर. |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, बहुतेक शब्दयोगी अव्यये साधित म्हणजे दुसऱ्या शब्दप्रकारांपासून तयार झालेली आहेत. जसे -

(१) **नामसाधित शब्दयोगी अव्यये :-** (कड) कडे, (मध्य) मध्ये, (प्रमाण) प्रमाणे, पूर्वी, अंती, मुळे, विषयी.

(२) **विशेषणसाधित शब्दयोगी अव्यये :-** सम, सारखा, सहित, समान, योग्य, विरुद्ध.

(३) **धातुसाधित शब्दयोगी अव्यये :-** (कर) करिता, (देख) देखील, (पाव) पावेतो, (लाग) लागी, लागून.

(४) **क्रियाविशेषणसाधित शब्दयोगी अव्यये :-** खालून, मागून, वरून, आतून, जवळून.

(५) **संस्कृत शब्दसाधित :-** पर्यंत, विना, समक्ष, समीप, परोक्ष.

## सामान्यरूपांचा विचार

विभक्तिप्रत्यय लागताना ज्याप्रमाणे नामांचे किंवा सर्वनामांचे **सामान्यरूप** होते, त्याचप्रमाणे शब्दयोगी अव्यय जोडताना मागील शब्दाचे सामान्यरूप होते. जसे-

मांडव - मांडवाखाली, घरटे - घरट्याबाहेर, घर - घरापुढे

मात्र काही स्थलवाचक, कालवाचक व परभाषेतील विशेषनामे यांचे सामान्यरूप विकल्पाने होते. जसे,

**कोल्हापूर** :- कोल्हापूरपासून, कोल्हापुरापासून.

**इंग्लंड** :- इंग्लंडमध्ये, इंग्लंडामध्ये.

## शुद्ध शब्दयोगी अव्यये

'च, देखील, ना, पण, मात्र, सुद्धा, ही' ही अशी शब्दयोगी अव्यये आहेत की, ती शब्दाला जोडून येताना मागील शब्दांची सामान्यरूपे होत नाहीत. उदा.

तूच, आईमात्र, आम्हीदेखील, चंदूही, कुत्रासुद्धा, तुम्हीपण, तोना?

अशा शब्दयोगी अव्ययांना **शुद्ध शब्दयोगी अव्यये** असे म्हणतात. या शुद्ध शब्दयोगी अव्ययांमुळे मागील शब्दांच्या अर्थास विशेष जोर येतो.

## विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यये

पुढील वाक्ये पाहा.

(१) त्याच्याकडून हे काम होणार नाही. (तृतीया)

(२) सरला माधुरीपेक्षा उंच आहे. (पंचमी)

(३) देशासाठी महात्माजींनी प्राणार्पण केले. (चतुर्थी)

(४) आम्ही क्रीडांगणावर खेळतो. (सप्तमी)

वरील वाक्यांतील 'कडून, पेक्षा, साठी, वर' ही शब्दयोगी अव्यये अनुक्रमे तृतीया, पंचमी, चतुर्थी, सप्तमी या विभक्तिप्रत्ययांची कार्ये करतात. विभक्तिप्रत्ययांची कार्ये करणाऱ्या शब्दयोगी अव्ययांना **विभक्ती प्रतिरूपक** अव्यये असे म्हणतात. ही अव्यये विभक्तीचा अर्थही दर्शवितात. इतकेच नव्हे तर जे अर्थ विभक्तिप्रत्ययांनी प्रकट करता येत नाहीत, असे अनेक बारीकसारीक अर्थ या शब्दयोगी अव्ययांनी व्यक्त करता येतात. या दृष्टीने ही अव्यये भाषेत फारच उपयुक्त ठरतात. ही विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यये कोणती ती क्रमाने त्या-त्या विभक्तींच्या पुढे दिली आहेत.

## विभक्ती प्रतिरूपक अव्यये

| विभक्ती | विभक्ती प्रतिरूपक अव्यये |
| --- | --- |
| द्वितीया | प्रत, लागी. |
| तृतीया | कडून, करवी, द्वारा, मुळे, योगे, प्रमाणे, सह, बरोबर, वतीने. |
| चतुर्थी | करिता, साठी, कडे, प्रत, प्रीत्यर्थ, बद्दल, प्रति, ऐवजी, स्तव. |
| पंचमी | पासून, पेक्षा, शिवाय, खेरीज, कडून, वाचून. |
| षष्ठी | संबंधी, विषयी. |
| सप्तमी | आत, मध्ये, खाली, ठायी, विषयी, समोर, भोवती, ऐवजी. |

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) जे अव्यय शब्दाला जोडून येते, त्यास .............. असे म्हणतात. ①②③④
   1) उभयान्वयी अव्यय 2) शब्दयोगी अव्यय
   3) केवलप्रयोगी अव्यय 4) क्रियाविशेषण अव्यय

2) शब्दयोगी अव्यये ही .............. असतात. ①②③④
   1) अविकारी 2) विकारी
   3) सव्यय 4) सर्व

3) पुढील वाक्यांतील शब्दयोगी अव्यय असणारे वाक्य ओळखा. ①②③④
   1) सूर्य ढगात लपला.
   2) मला वर बघणे आवडते.
   3) पतंग झाडावर आहे. 4) सीतेने रामाला वरले

4) 'च, देखील, ना, पण, माग, सुद्धा, ही' सर्व .............. शब्दयोगी अव्ययांची उदाहरणे आहेत. ①②③④
   1) शुद्ध शब्दयोगी अव्यय
   2) धातुसाधित शब्दयोगी अव्यय
   3) संस्कृत शब्दसाधित
   4) संबंधवाचक शब्दयोगी अव्यय

5) पुढील शब्दयोगी अव्ययांचा अर्थावरून प्रकार ओळखा.
   कालवाचक. ①②③④
   1) उलट 2) समान 3) नंतर 4) सुद्धा

6) पुढील शब्दयोगी अव्ययांचा अर्थावरून प्रकार ओळखा.
   तुलनावाचक. ①②③④
   1) पेक्षा 2) मध्ये 3) तम 4) सर्व

7) दिलेल्या शब्दयोगी अव्ययांचा प्रकार ओळखा.
   विना. ①②③④
   1) संस्कृत शब्दसाधित 2) संबंधवाचक
   3) स्थलवाचक 4) भर

8) पुढीलपैकी व्यतिरेकवाचक शब्दयोगी अव्ययांच्या प्रकाराचा पर्याय निवडा. ①②③④
   1) शिवाय 2) वाचून 3) परता 4) सर्व

9) पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
   बंडूही असा एक वात्रट मुलगा आहे. ①②③④
   1) ही 2) एक 3) वात्रट 4) बंडू

10) पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
   मला तुझ्यावाचून करमणार नाही. ①②③④
   1) तुझ्या 2) मला 3) वाचून 4) नाही

11) पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
   मजुराकडून दगड उचलले जाईना. ①②③④

1) कडून 2) दगड 3) मजूर 4) जाईना

12) पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
**सुरेश माझ्या घरापर्यंत सोबत होता.** ①②③④
1) पर्यंत 2) सोबत 3) घर 4) होता

13) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दयोगी अव्ययाच्या प्रकाराचा पर्याय निवडा.
**सुरेश रमेशऐवजी तुला कुणी दुसरा मित्र हवा का?** ①②③④
1) शुद्ध शब्दयोगी अव्यय
2) विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यय
3) नामसाधित शब्दयोगी अव्यय
4) कालवाचक शब्दयोगी अव्यय

14) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दयोगी अव्ययाच्या प्रकाराचा पर्याय निवडा.
**तुझ्यामुळे माझे काम झाले.** ①②③④
1) हेतुवाचक शब्दयोगी अव्यय
2) साहचर्यवाचक शब्दयोगी अव्यय
3) शुद्ध शब्दयोगी अव्यय
4) करणवाचक शब्दयोगी अव्यय

15) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दयोगी अव्ययाच्या प्रकाराचा पर्याय निवडा.
**माधुरी आपल्या मुलांकरिता एवढे कष्ट करते.** ①②③④
1) शुद्ध शब्दयोगी अव्यय
2) धातुसाधित शब्दयोगी अव्यय
3) संस्कृत शब्दसाधित
4) कालवाचक शब्दयोगी अव्यय

16) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दयोगी अव्ययाच्या प्रकाराचा पर्याय निवडा.
**अन्नात साखरेपेक्षा गूळ वापरणेच अधिक चांगले असते.** ①②③④
1) साधित शब्दयोगी अव्यय
2) तुलनावाचक शब्दयोगी अव्यय
3) स्थलवाचक शब्दयोगी अव्यय
4) संग्रहवाचक शब्दयोगी अव्यय

17) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दयोगी अव्ययाच्या प्रकाराचा पर्याय निवडा.
**सुरेश मुंबईला राहण्यापूर्वी पुण्यात राहत होता.** ①②③④
1) कालवाचक शब्दयोगी अव्यय
2) शुद्ध शब्दयोगी अव्यय
3) धातुसाधित शब्दयोगी अव्यय
4) करणवाचक शब्दयोगी अव्यय

18) पुढीलपैकी शब्दयोगी अव्यय नसलेला पर्याय ओळखा. ①②③④
1) रमेशसुद्धा 2) शाळेपुढे
3) वनात 4) सोईसाठी

19) सुकन्या जुईपेक्षा उंच आहे. (विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यय) ①②③④
1) सप्तमी 2) पंचमी 3) षष्ठी 4) चतुर्थी

20) शब्दयोगी अव्ययाचा पर्याय ओळखा. ①②③④
1) बापरे 2) आणि
3) गावाबाहेर 4) देशात

21) शब्दयोगी अव्ययाचा पर्याय ओळखा. ①②③④
1) आहाहा 2) देशासाठी
3) सुगम 4) मी

22) शब्दयोगी अव्ययाचा पर्याय ओळखा. ①②③④
1) तुझ्याबरोबर 2) तू
3) मी 4) आपण

23) शब्दयोगी अव्ययाचा पर्याय ओळखा. ①②③④
1) भरदुपारी 2) सैन्यात
3) गाडीला 4) मातेसमान

**▸▸ सराव प्रश्नसंग्रह 21 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 1 | 3) 3 | 4) 1 | 5) 3 |
| 6) 4 | 7) 1 | 8) 4 | 9) 1 | 10) 3 |
| 11) 1 | 12) 1 | 13) 2 | 14) 4 | 15) 2 |
| 16) 2 | 17) 1 | 18) 3 | 19) 2 | 20) 3 |
| 21) 2 | 22) 1 | 23) 4 | | |

# २२. उभयान्वयी अव्यये

**उभयान्वयी अव्यय** हा अव्ययांचा तिसरा प्रकार होय. अव्ययांचा अभ्यास करताना आपण यापूर्वी क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय यांचा अभ्यास केला. आता आपण उभयान्वयी अव्ययांचा अभ्यास करू या.

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) आईने मंडईतून कांदे व बटाटे आणले.

(२) मी शाळेच्या इमारतीत पाऊल टाकले आणि पावसाला सुरुवात झाली.

(३) शिक्षणात त्याचे विशेष लक्ष नसे, पण व्यायामाची त्याला चांगली आवड होती.

(४) शिरीष दंगा करतो, म्हणून शेवटी मार खातो.

वरील वाक्यांपैकी पहिल्या वाक्यात 'व' हा शब्द 'बटाटे' नि 'कांदे' या शब्दांना जोडण्याचे काम करतो. पुढील वाक्यांतील 'आणि, पण, म्हणून' हे शब्द दोन वाक्यांना जोडण्याचे काम करतात. अशा तऱ्हेने **दोन किंवा अधिक शब्द, अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यये असे म्हणतात.** ('उभय' म्हणजे दोन, तर 'अन्वय' म्हणजे संबंध असा या शब्दाचा अर्थ आहे.)

(उभयान्वयी अव्ययांचे प्रमुख कार्य म्हणजे दोन शब्द किंवा वाक्ये यांना जोडणे हे आहे. ती अव्यये असतात. वाक्यात इतर कोणतेही कार्य ती करत नाहीत. काही शब्द दोन वाक्ये जोडण्याचे काम करतात. उदा. जो-जी-जे-ज्या ही सर्वनामे जसा-तसा, जितका-तितका ही संबंधी विशेषणे दोन वाक्यांना जोडतात. पण ती विकारी आहेत; ती अव्यये नाहीत. जिथे-तिथे, जेव्हा-तेव्हा यांसारखी संबंधी क्रियाविशेषणे दोन वाक्ये ज़ोडण्याचे कार्य करतात; पण त्यांचे प्रमुख कार्य क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगण्याचे असते, म्हणून त्यांना उभयान्वयी अव्यये म्हणता येणार नाही.)

## उभयान्वयी अव्ययांचे प्रकार

**उभयान्वयी अव्ययांचे दोन मुख्य प्रकार आहेत :-** (१) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये व (२) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये. उभयान्वयी अव्ययांनी जोडली गेलेली वाक्ये स्वतंत्र किंवा एकमेकांवर अवलंबून नसणारी म्हणजे ती सारख्या दर्जाची असतील, तर अशा प्रकारच्या उभयान्वयी अव्ययांना **प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात. पण हीच अव्यये जेव्हा एक प्रधान वाक्य व दुसरे गौण वाक्य (म्हणजे अर्थाच्या दृष्टीने प्रधान वाक्यावर अवलंबून असलेले वाक्य) असेल, तर अशी असमान दर्जाची वाक्ये जोडतात, तेव्हा त्यांना गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये असे म्हणतात.

**प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांचे पोटप्रकार**

**(१) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये**

पुढील वाक्ये पाहा.

(१) विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.

(२) आता संध्याकाळ होत आली होती आणि आईला घरची ओढ लागली होती.

(३) पिलाने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला.

(४) भिकाऱ्याला मी एक सदरा दिला; शिवाय त्याला जेवू घातले.

वरील वाक्यांतील 'आणि, व, शिवाय' यांसारखी उभयान्वयी अव्यये दोन प्रधान वाक्यांना जोडताना त्यांचा मिलाफ किंवा समुच्चय (समुच्चय म्हणजे बेरीज) करतात. ही अव्यये पहिल्या विधानात अधिक भर घालतात; म्हणून अशा उभयान्वयी अव्ययांना **समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय** असे म्हणतात.

'अन्, आणखी, आणि, आणिक, न्, नि, व' ही या प्रकारांतील अव्यये आहेत.

**(२) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये**

पुढील वाक्ये वाचा.

(१) देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।।

(२) पाऊस पडो वा न पडो, तुला आज गावी गेलेच पाहिजे.

(३) तुला ज्ञान हवे की धन हवे?

(४) तू ये किंवा न ये, मी जाणारच.

वरील वाक्यांतील 'अथवा, वा, की, किंवा' ही उभयान्वयी अव्यये दोन किंवा अनेक गोष्टींपैकी एका गोष्टीची अपेक्षा दाखवितात. म्हणजे ती 'हे किंवा ते' 'कोणते तरी एक' असा अर्थ सुचवितात. अशा उभयान्वयी अव्ययांना **विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात. (विकल्प म्हणजे दोहोंतील एकाची निवड)

'अगर, अथवा, किंवा, की, वा' ही अव्यये विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये आहेत.

**(३) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये**

पुढील वाक्ये वाचा.

(१) शेतकऱ्यांनी शेते नांगरली; पण पाऊस पडलाच नाही.

(२) पुष्कळ मुले उत्तीर्ण झाली; परंतु पहिल्या वर्गात कोणीच आले नाही.

(३) मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।

(४) आईला थोडे बरे नाही, बाकी सर्व ठीक.

वरील वाक्यांतील 'पण, परंतु, परी, बाकी' ही अव्यये पहिल्या वाक्यातील काही उणीव, कमीपणा, दोष असल्याचे दाखवितात. अशा अव्ययांना **न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये** म्हणतात. (न्यूनत्व म्हणजे कमीपणा.) ही अव्यये दोन वाक्यांतील विरोध दाखवितात म्हणून त्यांना विरोधदर्शक असेही म्हणतात.

'किंवा, पण, परंतु, बाकी, तरी' ही अव्यये न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये आहेत.

**(४) परिणामबोधक उभयान्वयी अव्यये**

(१) मधूने उत्तम भाषण केले; म्हणून त्याला बक्षीस मिळाले.

(२) सायकल वाटेत नादुरुस्त झाली; सबब मला उशीर झाला.

(३) तुम्ही त्याचा अपमान केला; याकरिता तो तुमच्याकडे येत नाही.

वरील वाक्यांतील 'म्हणून, सबब, याकरिता' ही अव्यये पहिल्या वाक्यात जे घडले त्याचा परिणाम पुढील वाक्यात सुचवितात, म्हणून अशांना **परिणामबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

'अतएव, तस्मात, त्यामुळे, म्हणून, यास्तव, सबब' ही या प्रकारची अव्यये आहेत.

**आता आपण गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्ययांचे प्रकार पाहू या.**

### (१) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यये

पुढील वाक्ये पाहा.

(१) एक रुपया म्हणजे शंभर पैसे.

(२) तो म्हणाला, की मी हरलो.

(३) दशरथ म्हणून एक राजा होऊन गेला.

(४) विनंती अर्ज ऐसा जे -

वरील वाक्यांतील 'म्हणजे, की, म्हणून, जे' या उभयान्वयी अव्ययांनी दोन शब्दांचा किंवा वाक्यांचा संबंध जोडलेला आहे. तसेच या अव्ययांनी मागील शब्दाचे किंवा वाक्याचे स्वरूप उलगडून सांगितलेले असते. ज्या उभयान्वयी अव्ययांमुळे प्रधान वाक्याचे स्वरूप किंवा खुलासा गौण वाक्याने कळतो त्यांस **स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

### (२) कारणबोधक उभयान्वयी अव्यये

पुढील वाक्ये पाहा.

(१) त्याला बढती मिळाली, कारण त्याने चोख कामगिरी बजावली.

(२) आम्हांला हेच कापड आवडते, का की ते आपल्या देशात तयार झाले आहे.

वरील वाक्यातील 'कारण, का की' ही उभयान्वयी अव्यये एक प्रधानवाक्य व एक गौणवाक्य यांना जोडतात. यातील दुसरे गौणवाक्य हे पहिल्या प्रधान वाक्याचे कारण आहे. 'कारण का, की, कारण की, की' अशा प्रकारच्या कारण दाखविणाऱ्या अव्ययांना **कारणबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

### (३) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये

पुढील वाक्ये पाहा.

(१) चांगला औषधोपचार लाभावा म्हणून तो मुंबईस गेला.

(२) विजेतेपद मिळावे यास्तव त्यांनी खूप प्रयत्न केले.

'म्हणून, सबब, यास्तव, कारण, की' यासारख्या अव्ययांनी जेव्हा गौण वाक्य हे प्रधानवाक्याचा उद्देश किंवा हेतू आहे असे दर्शविले जाते, तेव्हा त्यास **उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

### (४) संकेतबोधक उभयान्वयी अव्यये

पुढील वाक्ये पाहा.

(१) जर शाळेस सुट्टी मिळाली, तर मी तुमच्याकडे येईन.

(२) जरी त्याला समजावून सांगितले, तरी त्याने ऐकले नाही.

(३) तू लवकर घरी आलास, म्हणजे आपण बागेत जाऊ.

(४) तू माझ्याकडे आलास, की मी येईन.

(५) प्रयत्न केला, तर फायदाच होईल.

'जर-तर, जरी-तरी, म्हणजे, की, तर' या उभयान्वयी अव्ययांमुळे पहिल्या वाक्यातील अटीवर दुसऱ्या वाक्यातील गोष्ट अवलंबून असते. 'जर'ने अट दाखविली जाते आणि 'तर'ने त्याचा परिणाम दर्शविला जातो. 'जरी'ने अट दाखविली जाते आणि 'तरी'ने अनपेक्षित किंवा विरुद्ध असे कार्य दर्शविले जाते. अशा वेळी सामान्यतः पहिले वाक्य गौण व दुसरे प्रधान असते. ही अव्यये संकेत किंवा अट दाखवितात. अशा अव्ययांना **संकेतबोधक उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

**एकच अव्यय, प्रकार मात्र वेगळे**

उभयान्वयी अव्ययांच्या एकंदर आठ प्रकारात एकच अव्यय पुनःपुन्हा आलेले दिसेल. याचा अर्थ त्या-त्या वाक्यात त्याचे कार्य वेगळे आहे. उदा.

(१) यश मिळो की न मिळो आम्ही प्रयत्न करणार. (विकल्पबोधक)

(२) लो. टिळक म्हणत, की 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' (स्वरूपदर्शक)

(३) तो इतका खेळला, की त्याचे अंग दुखू लागले. (परिणामबोधक)

(४) माझा पहिला क्रमांक आला, की मी पेढे वाटीन. (संकेतबोधक)

वरील वाक्यांवरून 'की' हे अव्यय वरील वेगवेगळ्या चार प्रकारांत संभवते.

वाक्यातील त्याचे कार्य लक्षात घेऊन त्याचा प्रकार ठरवायचा असतो.

## स्वयंअध्ययन

1) **उभयान्वयी अव्यय वाक्याला .............** ①②③④

1) अर्थ प्राप्त करून देते. 2) जोडते.
3) संदर्भ देते. 4) सर्व पर्याय.

2) **'अथवा, वा, की, किंवा' अशा उभयान्वयी अव्ययांनी ............. दर्शवितात.** ①②③④

1) उद्देश 2) विकल्प 3) परिणाम 4) स्वरूप

3) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय ओळखा.** ①②③④

1) शाबास 2) किंवा
3) मागे 4) वा! वा!

4) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय ओळखा.** ①②③④

1) अबब 2) साठी 3) परंतु 4) खेरीज

5) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय नसलेला पर्याय ओळखा.** ①②③④

1) अन् 2) शिवाय 3) म्हणून 4) अबब

6) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय नसलेला पर्याय ओळखा.** ①②③④

1) की 2) कारण 3) यासाठी 4) यास्तव

7) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय असणारे वाक्य निवडा.** ①②③④

1) आम्ही झाडे व फुलझाडे आणली.
2) रामने अभ्यास केला, म्हणून पास झाला.
3) अभ्यास तो करीत नाही, पण व्यायाम मात्र रोज करतो.
4) सर्व पर्याय

8) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय असणारे वाक्य निवडा.** ①②③④

1) आम्ही गावाबाहेर गेलो
2) तुम्ही घरात येणार आहात का?
3) तो आमचा मित्र यास्तव आम्ही प्रयत्न करू
4) सर्व पर्याय

9) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय असणारे वाक्य निवडा.** ①②③④

1) त्याला नोकरी मिळाल्याने तो आनंदी आहे
2) तुम्ही येणार का?
3) तो आला, पण काहीच उपयोग झाला नाही
4) सर्व पर्याय

10) **पुढीलपैकी उभयान्वयी अव्यय असणारे वाक्य निवडा.** ①②③④

1) माझी गाडी घेतली, की मी मेजवानी देईन
2) शाळेत चांगले संस्कार होतात
3) मुले घरात दंगा करीत होती
4) तुम्ही चांगली गाडी चालवता

11) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**तो शाळेत गेला आणि पाऊस सुरु झाला.** ①②③④
1) कारणबोधक उभयान्वयी अव्यय
2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
3) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय
4) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय

12) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**जर मला वेळ झाला, तर मी तुम्हाला भेटेन.** ①②③④
1) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय
2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
3) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
4) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

13) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**रमेश हवापालट म्हणून महाबळेश्वरला गेला.** ①②③④
1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
2) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय
3) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय
4) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय

14) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**तो उत्तीर्ण झाला, कारण त्याने रात्रीचा दिवस केला.** ①②③④
1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
3) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
4) कारणबोधक उभयान्वयी अव्यय

15) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**तुम्हाला संपत्ती हवी की संस्कार हवे?** ①②③④
1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
2) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
3) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय
4) कारणबोधक उभयान्वयी अव्यय

16) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**तो एकटा अथवा मित्रांबरोबर येईल.** ①②③④
1) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय
2) कारणबोधक उभयान्वयी अव्यय
3) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
4) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

17) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**मुलांनी अभ्यास केला; पण परीक्षा झालीच नाही.** ①②③④
1) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय
2) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
3) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय
4) कारणबोधक उभयान्वयी अव्यय

18) **पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
**तुम्ही त्याला रागवणार याकरिता तो तुम्हाला भेटत नाही.** ①②③④
1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
2) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
3) कारणबोधक उभयान्वयी अव्यय
4) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

19) **पुढीलपैकी प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांचा पर्याय निवडा.** ①②③④
1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
3) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
4) सर्व पर्याय

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 13 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 2 | 4) 3 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 4 | 8) 3 | 9) 3 | 10) 1 |
| 11) 2 | 12) 1 | 13) 2 | 14) 4 | 15) 2 |
| 16) 4 | 17) 2 | 18) 2 | 19) 4 | |

# २३. केवलप्रयोगी अव्यये

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) अरेरे! सचिन तेंडुलकर आऊट झाला!

(२) शाब्बास! आरोही, चांगले यश मिळविलेस!

(३) अबब! केवढी गर्दी ही!

(४) बाप रे! तो पाहा वाघ!

(५) शी! मला नाही आवडलं ते!

वरील वाक्यांमध्ये आपल्या मनात दाटून आलेल्या भावनांचा स्फोट व्यक्त झाला आहे. आपल्या मनातील विचार आपण शब्दांच्या किंवा वाक्यांच्या द्वारे व्यक्त करतो. पण कधी-कधी हे विचार व्यक्त करण्यापूर्वी आपण मनात दाटून आलेल्या भावना एखाद्या उद्‌गारावाटे व्यक्त करतो. हे उद्‌गार दाखविणारे शब्द वाक्यांच्या आरंभी येतात. ते वाक्याचा भाग नसतात. ते स्वतंत्र उद्‌गार असतात. व्याकरणाच्या दृष्टीने त्यांचा त्यांच्यापुढे येणाऱ्या वाक्यांशी संबंध नसतो. वाक्यात केवळ वापरावयाचे किंवा त्यांचा केवळ प्रयोग (उपयोग) करायचा म्हणून ते उच्चारले जातात, म्हणून त्यांना **केवलप्रयोगी अव्यय** असे म्हणतात किंवा ते उद्‌गार व्यक्त करणारे म्हणून त्यांना **उद्‌गारवाची** शब्द असेही म्हणतात. हे शब्द वाक्याच्या बाहेर असतात. ते वाक्याचा भाग नसल्यामुळे त्यांना विभक्तिप्रत्यय नसतो.

तसे पाहिले, तर एकेक उद्‌गार म्हणजे एक स्वतंत्र वाक्यच असते. 'ओहो!' या उद्‌गाराने 'मला आश्चर्य वाटते.' 'शाब्बास!' म्हटले की, 'फार चांगले केलेस.' किंवा 'तू उत्कृष्ट कामगिरी केलीस.' या वाक्यांचा त्यात अर्थ येतो; पण या वाक्यांतील विचार शब्दांनी व्यक्त होण्यापूर्वी त्या भावनेचा उद्‌गार प्रथम आपल्या तोंडातून बाहेर पडतो. वाक्याच्या अर्थाच्या दृष्टीने केवलप्रयोगी अव्यये निरर्थक वाटत असली, तरी भावना व्यक्त करण्याच्या दृष्टीने ती प्रभावी असतात. ती वाक्यांना डौल किंवा शोभा आणतात; व भाषाशैलीत भर टाकतात म्हणून शब्दांच्या प्रकारांत त्यांना स्थान लाभले आहे.

केवलप्रयोगी अव्ययांचे वर्गीकरण त्यांच्या स्वरूपावरून न ठरता ती अव्यये कोणती भावना व्यक्त करतात, त्यावरून ठरते. जितक्या भावना तितके त्यांचे प्रकार ठरतात. प्रमुख भावना लक्षात घेता केवलप्रयोगी अव्ययांचे पुढील स्थूल प्रकार मानतात.

(१) **हर्षदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- वा, वावा, आहा, ओहो, आ-हा, अहाहा.

(२) **शोकदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- ऊं, ऑः, अरेरे, अयाई, अगाई, हायहाय, हाय.

(३) **आश्चर्यकारक केवलप्रयोगी अव्यये** :- आँ, ओहो, अबब, बापरे, अहाहा, चक्‌चक्, अरेच्या.

(४) **प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- शाबास, भले, वाहवा, यंव, छान, ठीक, फक्कड, खाशी.

(५) **संमतिदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- हां, जी, जीहां, ठीक, बराय, हाँ, अच्छा.

(६) **विरोधीदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- छे, छट्, हॅट, ऊः, उंहू, च, अंहं, छे छे.

(७) **तिरस्कारदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- धिक्, थुः, शीऽ, इश्श, हुडुत, हुड, फुस्, हत्, छत, छी.

(८) **संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- अगे, अरे, अहो, ए, अगा, अगो, बा, रे.

(९) **मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- चुप, चिप, गप, गुपचित.

मागील उदाहरणांवरून आपल्या सहज लक्षात आले असेल की, एकच उद्‌गारवाचक शब्द विविध भावना

व्यक्त करण्यासाठी वापरला गेला आहे. अमुक एक शब्द अमुक भावना व्यक्त करण्यासाठी वापरला जातो, असे होत नाही. भावनांचा अंतःकरणात स्फोट होऊन हे शब्द आपोआप तोंडावाटे बाहेर येतात. **उद्‌गारवाची अव्ययापुढे नेहमी उद्‌गारवाचक चिन्ह हवे.**

## व्यर्थ उद्‌गारवाची अव्यय

केवलप्रयोगी अव्यये ही सामान्यतः वाक्याच्या आरंभी येतात व भावना व्यक्त करतात. हे आपण पाहिले. पण काहीसे उद्‌गारासारखे वाटणारे शब्द वाक्यांच्या मध्येही येताना आढळतात.

पुढील वाक्ये पाहा.

(१) पण मन बेटे स्वस्थ राहीना.

(२) मी आपला काय बोलणार?

(३) काल म्हणे मुलांनी गडबड केली.

(४) येणार असेल तर येईना बापडा!

वरील वाक्यांतील 'बेटे, आपला, म्हणे, बापडा' हे शब्द कोणतीही भावना व्यक्त करीत नाहीत किंवा त्यांच्यामुळे अर्थातदेखील काही विशेष भर पडते, असे नाही. उलट वाक्याच्या अर्थाच्या दृष्टीने निरर्थक किंवा व्यर्थ असे हे शब्द येत असल्यामुळे अशा शब्दांना **व्यर्थ उद्‌गारवाची अव्यय** असे म्हणतात.

बोलताना केवळ लकब म्हणून किंवा आठवेनासे झाले म्हणजे काही व्यक्तींच्या बोलण्यात पालुपदासारखे काही शब्द पुनःपुन्हा येताना आढळतात. जसे-

आता, बरं का, जळलं मेलं, आणखीन, कळलं इतकं, जेहेत्ते, बरीक, वगैरे. अशा शब्दांना **पादपूरणार्थक केवलप्रयोगी अव्यये** किंवा **पालुपदे** असे म्हणतात.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

**1) केवलप्रयोगी अव्यये ही ............. दाखविण्याचे काम करतात.** ①②③④

1) लिंग 2) वचन 3) भावना 4) विभक्ती

**2) पुढील पर्यायांपैकी केवलप्रयोगी अव्यय ओळखा.** ①②③④

1) परंतु 2) वा वा 3) पूर्वी 4) सुमित्रा

**3) पुढील पर्यायांपैकी केवलप्रयोगी अव्यय ओळखा.** ①②③④

1) अरेच्या 2) झाडाखाली 3) मागे 4) आता

**4) पुढील पर्यायांपैकी केवलप्रयोगी अव्यय ओळखा.** ①②③④

1) पक्षी 2) तो 3) छी 4) व

**5) केवलप्रयोगी अव्यय नसलेला पर्याय ओळखा.** ①②③④

1) खिशात 2) ऑं 3) छट् 4) छे छे

**6) केवलप्रयोगी अव्यय असलेले वाक्य ओळखा.** ①②③④

1) तुम्ही घरी जाणार का?

2) वा! फार छान झाले.

3) राजा-राणी सुखाने नांदू लागले.

4) तो रडतच घरी परतला.

**7) केवलप्रयोगी अव्यय असलेले वाक्य ओळखा.** ①②③④

1) हातातील ज्ञानाचा दिवा सांभाळा.

2) फक्कड! छान बेत आहे.

3) मुख्य कार्यक्रम भव्य-दिव्य झाला.

4) 'घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलांपाशी.'

8) **पुढीलपैकी केवलप्रयोगी अव्यये ओळखा.** ①②③④

1) शाळा 2) हुश्श। 3) फार 4) मांजर

9) **पुढीलपैकी रिकाम्या जागी कोणते केवलप्रयोगी अव्यय वापराल?**

**..............! त्याचे खूप वाईट झाले** ①②③④

1) अरे वा 2) वाहवा

3) शाबास 4) अरेरे

10) **पुढीलपैकी रिकाम्या जागी कोणते केवलप्रयोगी अव्यय वापराल?**

**..............! किती घाण वास येतोय.** ①②③④

1) जी हा 2) खाशी 3) फक्कड 4) छी

11) **पुढील केवलप्रयोगी अव्ययांवरून व्यक्त होणारी भावना ओळखा.**

**अरेच्या! तुम्ही बाजारात कसे?** ①②③④

1) आश्चर्यदर्शक 2) शोकदर्शक

3) संबोधनदर्शक 4) प्रशंसादर्शक

12) **पुढील केवलप्रयोगी अव्ययांवरून व्यक्त होणारी भावना ओळखा.**

**शाबास! तुझा पहिला क्रमांक आला.** ①②③④

1) आश्चर्यदर्शक 2) तिरस्कारदर्शक

3) प्रशंसादर्शक 4) विरोधदर्शक

13) **पुढील केवलप्रयोगी अव्ययांवरून व्यक्त होणारी भावना ओळखा.**

**गप! आता निघा.** ①②③④

1) तिरस्कारदर्शक 2) मौनदर्शक

3) हर्षदर्शक 4) संबोधनदर्शक

14) **जळलं मेलं लक्षण त्याचं ते! (अव्ययाचा प्रकार ओळखा)** ①②③④

1) व्यर्थ उद्गारवाची अव्यय

2) पादपूरणार्थक केवलप्रयोगी अव्यय

3) हर्षदर्शक केवलप्रयोगी अव्यय

4) मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यय

15) **मन बेटे काहीच करू देईना. (अव्ययाचा प्रकार ओळखा).** ①②③④

1) व्यर्थ उद्गारवाची अव्यय

2) पालुपदे

3) प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यय

4) संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यय

**▸▸ सराव प्रश्नसंग्रह 23 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 2 | 3) 1 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 2 | 9) .4 | 10) 4 |
| 11) 1 | 12) 3 | 13) 2 | 14) 2 | 15) 1 |

# २४. वाक्यविचार-विभक्तींचे अर्थ (कारकार्थ व उपपदार्थ)

विभक्ती व सामान्यरूप यांचा अभ्यास आपण यापूर्वी केला आहे. प्रत्येक विभक्तीचा एक प्रमुख अर्थ मानला जातो, त्याचा अभ्यास आपण या पाठात करू या.

वाक्यात नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो, त्याला **कारकसंबंध** असे म्हणतात आणि त्या विभक्तीला **कारकविभक्ती** असे म्हणतात.

पुढील वाक्य पाहा.

'आमच्या वर्गातील मधूने शाळेचे सुवर्णपदक जिंकले.'

या वाक्यात 'जिंकले' हे क्रियापद आहे. हा या वाक्यातील प्रमुख शब्द होय. 'मधूने' व 'सुवर्णपदक' या शब्दांचा 'जिंकले' या क्रियापदाशी प्रत्यक्ष संबंध आहे. कारण जिंकणारा कोण? तर 'मधू' या वाक्यातील कर्ता आहे. जिंकण्याची क्रिया कोणावर घडते? 'सुवर्णपदक' या शब्दावर, म्हणून 'सुवर्णपदक' हे 'जिंकणे' या क्रियापदाचे कर्म आहे. या वाक्यात 'मधूने' व 'सुवर्णपदक' यांची कारकविभक्ती आहे. कारण, या नामांचा संबंध क्रियापदाशी आहे.

आता या वाक्यातील 'आमच्या' व 'वर्गातील' या दोन पदांचा संबंध 'मधूने' या शब्दाशी आहे. तसेच 'शाळेचे' या शब्दाचा संबंध 'सुवर्णपदक' या नामाशी आहे, म्हणजे 'आमच्या, वर्गातील, शाळेचे' या तीन शब्दांचा संबंध या वाक्यातील 'जिंकले' या मुख्य पदाशी म्हणजे क्रियापदाशी नसून, 'मधूने' व 'सुवर्णपदक' या दोन उपपदांशी आहे. अशा संबंधाला **उपपदसंबंध** किंवा **उपपदविभक्ती** असे म्हणतात. विभक्तीच्या रूपांमुळे वाक्यातील शब्दा-शब्दांमधील हे जे संबंध किंवा नाती जोडली जातात, त्यांना **विभक्तीचे अर्थ** असे म्हणतात.

**वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात, त्यांना कारकार्थ असे म्हणतात आणि क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेले जे संबंध असतात, त्या संबंधांना 'उपपदार्थ' असे म्हणतात.**

आपण विभक्ती व उपपदार्थ यांची माहिती करून घेऊ.

## विभक्तींचे अर्थ

नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील मुख्य क्रियेशी असणारे संबंध प्रमुख आहेत. वाक्यातील क्रियापद हा प्रमुख शब्द होय. क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो. त्याला **कर्ता** असे म्हणतात. कर्त्याची विभक्ती कधी-कधी प्रथमा असते. प्रथमेचा प्रमुख कारकार्थ **कर्ता** होय.

कर्त्याने केलेली क्रिया कोणावर घडली हे सांगणारा शब्द म्हणजे कर्म. कर्माची विभक्ती द्वितीया म्हणजेच द्वितीयेचा कारकार्थ **कर्म** होय.

वाक्यातील क्रिया ज्या साधनाने घडते किंवा ज्याच्या साधनाने घडते त्याला 'करण' असे म्हणतात. 'करण' म्हणजे साधन. 'मी सुरीने सफरचंद कापले.' या वाक्यात कापण्याची क्रिया 'सुरी' या साधनाने केली, म्हणून 'सुरीने' शब्दाची विभक्ती तृतीया असून तृतीयेचा मुख्य कारकार्थ **करण** आहे.

जेव्हा क्रिया दानाचा अर्थ व्यक्त करते, तेव्हा ते दान ज्याला करण्यात येते त्याच्या वाचक शब्दाला

किंवा देणे, बोलणे, सांगणे इत्यादी अर्थाच्या क्रिया ज्याला उद्देशून घडतात त्या वस्तूला वा स्थानाला **संप्रदान** असे म्हणतात. 'मी गुरूजींना दक्षिणा दिली.' या वाक्यात गुरूजींना याची विभक्ती चतुर्थी व चतुर्थीचा मुख्य कारकार्थ संप्रदान आहे. (संप्रदान - दान)

क्रिया जिथून सुरू होते, तिथून ती व्यक्ती वा वस्तू दूर जाते म्हणजे क्रियेच्या संबंधाने ज्याच्यापासून एखाद्या वस्तूचा वियोग दाखवावयाचा असतो, त्यास **अपादान** असे म्हणतात. उदा. 'मी शाळेतून आत्ताच घरी आलो.' या वाक्यातील 'शाळेतून' या शब्दाची विभक्ती पंचमी व पंचमीचा मुख्य कारकार्थ **अपादान** आहे. (अपादान = वियोग)

वाक्यातील क्रिया कोठे किंवा केव्हा घडली, हे सांगणाऱ्या म्हणजेच क्रियेचे स्थान किंवा काळ दर्शविणाऱ्या शब्दाच्या संबंधास **अधिकरण** असे म्हणतात. 'दररोज सकाळी मी शाळेत जातो.' या वाक्यातील 'सकाळी' व 'शाळेत' हे शब्द अनुक्रमे क्रियेचा काळ व स्थल दाखवितात. त्यांची विभक्ती सप्तमी व सप्तमीचा मुख्य कारकार्थ **अधिकरण** आहे. (अधिकरण - आश्रय, स्थान)

**विभक्तीचे मुख्य कारकार्थ सहा आहेत.**

(१) कर्ता, (२) कर्म, (३) करण, (४) संप्रदान, (५) अपादान, (६) अधिकरण

षष्ठी विभक्तींत शब्दाचा संबंध सामान्यतः क्रियापदाशी येत नाही, दुसऱ्या नामाशी येतो. षष्ठीचा अर्थ संबंध. कधी-कधी षष्ठीलाही कारकार्थ असलेला आढळतो.

संबोधनाचा उपयोग हाक मारताना करतात. जे नाम संबोधन म्हणून वापरले जाते त्याला विकार होतो व प्रत्ययही लागतात, म्हणून **संबोधन** ही आठवी विभक्ती मानतात.

**विभक्तीचे प्रत्यय, विभक्ती व प्रमुख कारकार्थ पुढीलप्रमाणे आहेत.**

| विभक्ती | प्रत्यय | कारकार्थ |
|---|---|---|
| (१) प्रथमा | प्रत्यय नाहीत | कर्ता |
| (२) द्वितीया | स, ला, ते, ना | कर्म |
| (३) तृतीया | ने, ए, शी, नी | करण |
| (४) चतुर्थी | स, ला, ते, ना | संप्रदान |
| (५) पंचमी | ऊन, हून | अपादान |
| (६) षष्ठी | चा, ची, चे, च्या, ची | संबंध |
| (७) सप्तमी | त, ई, आ | अधिकरण |
| (८) संबोधन | -, नो | हाक |

**विभक्ती अर्थावरून मानावी की प्रत्ययावरून?**

वाक्यात शब्दाशब्दांतील संबंध (म्हणजेच विभक्तींचे अर्थ) प्रत्ययांनी दाखविले जातात. विभक्ती ही या संबंधावरून (म्हणजे अर्थावरून) मानावी की हा अर्थ व्यक्त करणारे जे प्रत्यय त्यांवरून मानावी? असा वाद नेहमी केला जातो. तसे पाहिले, तर अर्थाशिवाय प्रत्यय नाहीत आणि प्रत्ययाशिवाय अर्थ व्यक्त करता येत नाही. विविध अर्थ (म्हणजे संबंध) व्यक्त होतात म्हणून आपण वेगवेगळ्या विभक्ती मानतो, व हा अर्थ दाखविण्याचे कार्य करतात ते प्रत्यय. अर्थ व प्रत्यय हे परस्परांवर अवलंबून असल्यामुळे विभक्ती या प्रत्ययावरून मानाव्या की अर्थावरून, असा वाद करणे योग्य नव्हे. विभक्ती, विभक्तीमधील फरक प्रत्ययांमुळे सहज ओळखता येतो, म्हणून **विभक्ती ही कारकार्थावरून मानण्यापेक्षा प्रत्ययांवरून मानावी.**

## उपपदार्थ

सामान्यतः एका विभक्तीचा एकच प्रमुख कारकार्थ सांगितला जातो. परंतु तेवढाच तो त्या विभक्तीला असतो असे नाही. एकाच विभक्तिप्रत्ययाने वेगवेगळे कारकार्थ आपण व्यक्त करू शकतो. कारकार्थ सहाच असले, तरी उपपदार्थ बरेच आहेत. उपपदार्थात उद्देश्य, विधान, परिमाण, मूल्य, कारण, हेतू, तुलना, संबंध वगैरे महत्त्वाचे उपपदार्थ आहेत. प्रत्येक विभक्तीचे काही कारकार्थ व काही उपपदार्थ तक्त्याच्या स्वरूपात पुढे दिलेले आहेत.

**सर्व विभक्तींचे काही महत्त्वाचे कारकार्थ व उपपदार्थ**

| विभक्ती व प्रत्यय | कारकार्थ | वाक्य | उपपदार्थ | वाक्य |
|---|---|---|---|---|
| **प्रथमा** (प्रत्यय नाही.) | १. कर्ता<br>२. कर्म<br>३. अधिकरण | **पक्षी** उडतो.<br>मुलगा **पुस्तक** वाचतो.<br>आम्ही दोन **दिवस** खेळतो. | १. उद्देश्य<br>२. विधान<br>३. परिमाण<br>४. अंतर<br>५. मूल्य | तानाजी **हा** शूर होता.<br>राम **राजा** झाला.<br>त्याने पाच **तोळे** सोने घेतले.<br>तो दहा **कि.मी.** चालतो.<br>केळी चाळीस **रुपये** डझन. |
| **द्वितीया** (स, ला, ना, ते) | १. कर्म<br>(अप्रत्ययी)<br>(सप्रत्ययी) | राम **आंबा** खातो.<br>त्याने **चोरास** पकडले. | | (उपपदार्थ नाही.) |
| **तृतीया** (ने, ए, शी, नी) | १. करण<br>२. कर्ता<br>३. अधिकरण | **चाकूने** बोरू करतात.<br>**मुलाने** कुत्र्यास मारले.<br>मी नदीच्या **काठाने** गेलो. | १. रीत<br>२. निमित्त<br>३. न्यूनत्व<br>४. परिमाण<br>५. प्रमाण<br>६. सान्निध्य<br>७. अवधी<br>८. नौविका | तो **ऐटीने** चालतो.<br>तो **गर्वाने** फुललेला होता.<br>तो **कानाने** बहिरा आहे.<br>भोपळा **किलोने** विकतात.<br>मी दोन **इंचांनी** उंच आहे.<br>तो **भिंतीशी** बसला.<br>तो चार **वर्षांनी** आला.<br>तो **रागाने** बोलला. |

| विभक्ती व प्रत्यय | कारकार्थ | वाक्य | उपपदार्थ | वाक्य |
|---|---|---|---|---|
| **चतुर्थी** (स, ला, ना, ते) | १. संप्रदान | तू **रामाला** पुस्तक दे. | १.उद्देश, हेतू | मी **अभ्यासाला** जातो. |
| | २. कर्ता | **मला** आता चालवते. | २. परिमाण | गहू **किलोला** तीस रुपये. |
| | ३. कर्म | त्याने **मला** ओळखले. | ३. मूल्य | **रुपयाला** चार गोळ्या. |
| | ४. करण | मी एका **घावास** दोन तुकडे केले. | ४. विषय | आंबा **रुचीला** गोड होता. |
| | ५. अपादान | त्याच्या **नाकाला** धार लागली आहे. | ५. स्वामित्व | **त्याला** घरदार नाही. |
| | ६. अधिकरण | तो **मुंबईस** गेला. | ६. योग्यता | मुलगी **लग्नाला** आली. |
| | | | ७. नाते | **मला** बहीण नाही. |
| | | | ८. वियोग | तो **नोकरीस** मुकला. |
| **पंचमी** (ऊन, हून) | १. अपादान | तो **घरातून** बाहेर पडला. | १. अंतर | **घराहून** स्टेशन दोन कि.मी. आहे. |
| | २. करण | तुझ्या **हातून** हे काम होणार नाही. | २. तुलना | संत **मेणाहून** मऊ असतात. |
| | | | ३. भेद | **जांबाहून** पेरू वेगळा आहे. |
| **षष्ठी** (चा, ची, चे) | १. कर्ता | **त्याचे** लिहून झाले. | १. प्रयोजन | **बसावयाची** खोली. |
| | २. करण | त्याच्या **वागण्याचा** मला राग आला. | २. स्थित्यंतर | **काळ्याचे** पांढरे झाले. |
| | ३. अपादान | **शिंक्याचे** सुटले. | ३. मूल्यमाल | **रुपयाची** भाजी. |
| | ४. अधिकरण | तो **दिवसाचा** झोपतो. | ४. कार्य-कारण | **दगडाची** मूर्ती. |
| | | | ५. जन्य - जनक | **मुलाची** आई. |
| | | | ६. मालकी | **गोविंदाची** सायकल. |
| | | | ७. योग्यता | **लग्नाची** मुलगी. |
| | | | ८. संबंध | **त्याची** बायको. |
| | | | ९. वाह्य-वाहक | **घोड्याची** गाडी. |
| | | | १०. आधार आधेय | **गाडीचे** उतारू. |
| | | | ११. धर्मधर्मी | **योग्यतेचा** माणूस. |
| | | | १२. साकल्य | **गावचा** गाव. |

| विभक्ती व प्रत्यय | कारकार्थ | वाक्य | उपपदार्थ | वाक्य |
|---|---|---|---|---|
| **सप्तमी** त, ई, आ | १. अधिकरण | मी **रात्री घरी** परतेन. | १. हेतू | मी **तुझ्यापायी** बुडालो. |
| | | | २. विषय | तो **इंग्रजीत** कच्चा आहे. |
| | २. करण | तो शाळेस **पायी** गेला. | ३. सहितत्व | टाळ्यांच्या **गजरात** ठराव मान्य झाला. |
| | | | ४. सर्वोत्तमत्व | **शहाण्यांत** शहाणा |
| **संबोधन** | हाक मारणे | **रामा,** इकडे ये. | -- | -- |

वरील तक्त्यावरून आता तुमच्या सहज लक्षात आले असेल की, विभक्तीमुळे किती विविध अर्थ आपण व्यक्त करू शकतो.

**प्रथमेचा अर्थ कर्ता, द्वितीयेचा अर्थ कर्म,** असे आपण सर्वसामान्यपणे म्हणत असलो, तरी एका विभक्तीने दुसऱ्या विभक्तीचे अर्थही आपण व्यक्त करतो, म्हणून विभक्ती ओळखताना त्या शब्दाला कोणता प्रत्यय लागला आहे, हे पाहून प्रत्ययावरून विभक्ती सांगावी; मग विभक्तीचा अर्थ वेगळा असला, तरी चालेल.

## विभक्तीचे अर्थ व शब्दयोगी अव्यये

काही शब्दयोगी अव्यये विभक्तीप्रत्ययांची कामे करतात. निरनिराळ्या विभक्तींच्या अर्थाने निरनिराळी **शब्दयोगी अव्यये** नामांस लागतात व ती लागण्यापूर्वी त्यांचे बहुधा सामान्यरूप होते. त्यांना **'विभक्तीप्रतिरूपक अव्यये'** असे म्हणतात. ही अव्यये विभक्तींचा अर्थही दर्शवितात. या विषयाचा अभ्यास यापूर्वी आपण 'शब्दयोगी अव्यये' या पाठात केलेला आहे.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

**1) तृतीया विभक्तीचा कारकार्थ ............. आहे.** ①②③④

1) कर्ता 2) करण 3) कर्म 4) हाक

**2) प्रथमा विभक्तीचा कारकार्थ कोणता?** ①②③④

1) कर्म 2) कर्ता
3) संबंध 4) अधिकरण

**3) 'करण' या कारकार्थाचा अर्थ होतो .............** ①②③④

1) साधन 2) द्रव
3) घनपदार्थ 4) ठिकाण

**4) 'दुरावा' किंवा 'वियोग' दाखविणारा कारकार्थ व विभक्ती कोणती?** ①②③④

1) द्वितीया - कर्म 2) अपादान - पंचमी
3) तृतीया - करण 4) प्रथमा - कर्ता

**5) कारकार्थावरून विभक्ती ओळखा.**
**संबंध** ①②③④

1) प्रथमा 2) षष्ठी
3) पंचमी 4) संबोधन

6) कारकार्थावरून विभक्ती ओळखा. ①②③④
कर्ता
1) षष्ठी 2) प्रथमा 3) तृतीया 4) चतुर्थी

7) अधोरेखित शब्दाच्या विभक्तीचा कारकार्थ ओळखा.
तळ्यात कमळे आहेत. ①②③④
1) कर्म 2) संबंध
3) अधिकरण 4) संप्रदान

8) अधोरेखित शब्दाच्या विभक्तीचा कारकार्थ ओळखा.
माधव, इकडे ये. ①②③④
1) संबोधन 2) करण
3) अधिकरण 4) कर्म

9) वाक्यात नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला ............. असे म्हणतात. ①②③④
1) विभक्ती 2) कारकसंबंध
3) सामान्यरूप 4) उपपदार्थ

10) विभक्तीचे मुख्य कारकार्थ किती आहेत? ①②③④
1) दहा 2) सहा 3) पाच 4) आठ

11) विभक्ती ही कशावरून मानावी. ①②③④
1) लिंग 2) वचन
3) कारकार्थ 4) प्रत्यय

12) काही शब्दयोगी अव्यये विभक्ती प्रत्ययांची कामे करतात. ती नामांना लागण्यापूर्वी त्यांचे बहुधा सामान्यरूप होते. त्यांना ............. असे म्हणतात. ①②③④
1) विभक्तीप्रतिरूपक अव्यये
2) कारकार्थ अव्यये
3) उपपदार्थ अव्यये
4) विभक्ती अव्यये

13) कोणत्या विभक्तीला उपपदार्थ नाही. ①②③④
1) प्रथमा 2) पर्याय ३ व ४
3) द्वितीया 4) संबोधन

14) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
सुरेखा पंधरा कि.मी. चालते. ①②③④
1) प्रमाण 2) विधान
3) अंतर 4) परिमाण

15) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
दिशा अहंकाराने फुललेली होती. ①②③④
1) अवधी 2) प्रमाण 3) परिमाण 4) निमित्त

16) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
मुलगा लग्नाला आला. ①②③④
1) अंतर 2) तुलना
3) योग्यता 4) मालकी

17) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
गावाहून स्टेशन दोन कि.मी. आहे. ①②③④
1) अंतर 2) तुलना
3) प्रयोजन 4) मालकी

18) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
त्याचे केस काळ्याचे पांढरे झाले. ①②③④
1) प्रयोजन 2) मालकी
3) स्थित्यंतर 4) वियोग

19) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
ही जेवणासाठीची खोली आहे. ①②③④
1) प्रयोजन 2) मालकी
3) अंतर 4) परिमाण

20) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे उपपदार्थ ओळखा.
हे रामचे घर आहे. ①②③④
1) प्रयोजन 2) मालकी
3) साकल्य 4) हेतू

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 24 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 1 | 4) 2 | 5) 2 |
| 6) 2 | 7) 3 | 8) 1 | 9) 2 | 10) 2 |
| 11) 4 | 12) 1 | 13) 2 | 14) 3 | 15) 4 |
| 16) 3 | 17) 1 | 18) 3 | 19) 1 | 20) 2 |

# २५. प्रयोग

'वाक्यविचार' करताना आपण बरीच माहिती मिळविली. वाक्य म्हणजे पूर्ण विधान करणारा एक किंवा अनेक शब्दांचा समूह होय. वाक्यातील सर्वांत महत्त्वाचा शब्द म्हणजे **क्रियापद** होय. वाक्यरूपी कुटुंबाचा तो प्रमुख असतो. क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणारा वाक्यात जो कोणी असतो, त्यास **कर्ता** असे म्हणतात. वाक्यात निर्देशिलेली क्रिया कर्त्याशीच न थांबता ती कधी-कधी पुढे जाते व ती ज्याच्यावर घडते, ते त्या वाक्यातील **कर्म** होय. **कर्ता, कर्म, क्रियापद** हे वाक्यातील महत्त्वाचे घटक असतात.

**'प्रयोग' म्हणजे काय?**

वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रूप त्याच्याप्रमाणे बदलत असते. **वाक्यातील कर्ता-कर्म-क्रियापद यांच्या परस्परसंबंधाला प्रयोग असे म्हणतात.** 'प्रयोग' हा शब्द संस्कृत 'प्र+युज' (= योग) यावरून तयार झाला असून त्याचा अर्थ 'जुळणी' किंवा 'रचना' असा आहे. प्रत्येक वाक्यात जे क्रियापद असते त्याच्या रूपाची ठेवण किंवा रचनाच अशी असते की, ते क्रियापद कधी कर्त्याचे किंवा कर्माचे लिंग, वचन किंवा पुरुष याप्रमाणे बदलते, तर कधी ते क्रियापद मुळीच बदलत नाही. **कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी अशी जी जुळणी, ठेवण किंवा रचना असते, तिलाच व्याकरणात प्रयोग असे म्हणतात.**

## वाक्याचे मूलाधार आणि प्रयोग

''वाक्यातील रचना मुख्यतः ज्यांच्या आधाराने होते ते वाक्याचे घटक कर्ता, कर्म आणि क्रियापद होत. स्थिती किंवा कृती यांचा बोध करून वाक्यार्थाला पूर्णता आणणारा, वाक्यातील सर्वप्रधान शब्द म्हणजे क्रियापद. या क्रियापदाने सांगितली जाणारी स्थिती किंवा कृती जो अनुभवतो किंवा करतो तो कर्ता आणि त्याच्या कृतीचा परिणाम ज्याच्यावर होतो किंवा जे त्याच्या कृतीचा विषय बनते, ते कर्म. या घटकांपैकी ज्याला प्राधान्य द्यावे लागते, त्याच्या अनुरोधाने वाक्याची ठेवण बदलते. मुख्य घटकांच्या अनुरोधाने बदलणारी वाक्याची ही ठेवण म्हणजेच प्रयोग.'' हे 'मराठी - घटना, रचना, परंपरा' (लेखक - श्री. अरविंद मंगरूळकर व कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर) या ग्रंथातील विवेचन 'प्रयोग' या संदर्भात अधिक मदत करणारे ठरते.

## कर्ता आणि कर्म

क्रियापदांचा विचार करताना कर्ता व कर्म यांचा शोध कसा घ्यावा याचा विचार आपण केला आहे. त्याची उजळणी आपण थोडक्यात करू या.

**कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा व त्याला '- णारा' प्रत्यय लावून 'कोण?' असा प्रश्न करावा म्हणजे कर्ता मिळतो.**

उदा. (१) 'रामा आंबा खातो.' या वाक्यात 'खा' हा धातू आहे. त्याला '-णारा' हा प्रत्यय लावून 'खाणारा कोण?' असा प्रश्न विचारला की, 'रामा' हे उत्तर मिळते. 'रामा' हा या वाक्यातील कर्ता आहे.

(२) 'विद्यार्थी प्रामाणिक आहे.' या वाक्यात 'आहे' हे क्रियापद आहे. 'अस' हा धातू आहे. 'असणारा कोण?' असा प्रश्न विचारल्यावर 'विद्यार्थी' हे उत्तर मिळाले. म्हणून 'विद्यार्थी' हा कर्ता होय.

(३) 'मला दूध आवडते.' या वाक्यात 'आवडते' हे क्रियापद आहे. आवड हा धातू आहे. 'आवडणारे कोण?' असा प्रश्न विचारल्यावर 'दूध' हे उत्तर आले म्हणून 'दूध' हा शब्द या वाक्यातील कर्ता होय.

**वाक्यातील क्रियापदाने दाखविलेली क्रिया कर्त्यापासून निघते व ती दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तरी घडते. त्या क्रियेचा परिणाम ज्याच्यावर घडतो किंवा ज्याच्याकडे क्रियेचा रोख किंवा कल असतो ते त्या क्रियेचे कर्म असते.**

वरील वाक्यांपैकी 'रामा आंबा खातो.' या वाक्यातील कर्म शोधताना 'खाण्याची क्रिया कोणावर घडते?' या प्रश्नाचे उत्तर 'आंब्यावर' असे येते, म्हणून 'आंबा' हे या वाक्यातील 'कर्म' होय.

## सकर्मक क्रियापद आणि अकर्मक क्रियापद

प्रयोगाचा अभ्यास करताना 'सकर्मक क्रियापद' व 'अकर्मक क्रियापद' या क्रियापद प्रकारांची थोडक्यात उजळणी आवश्यक ठरते.

**ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी लागते, त्यास सकर्मक क्रियापद असे म्हणतात. ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी लागत नाही. त्यास अकर्मक क्रियापद असे म्हणतात.**

कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्मापाशी थांबते, तेव्हा त्या क्रियापदाला सकर्मक क्रियापद असे म्हणतात.

कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल, तर ते क्रियापद 'अकर्मक' असते.

सामान्यतः कृतिवाचक धातू सकर्मक असतात, तर स्थितिवाचक व स्थित्यंतरवाचक धातू अकर्मक असतात.

**काही अकर्मक धातू -**

(१) अस, नस, हो, नहो, ऊठ, बस, नीज, झोप, थरथर, रड, पड, सर, मर, धाव, थांब, थक, शक, जाग, झीज, जळ, किंचाळ, तूट, सूट, उजळ, प्रकाश, ओरड, घोर, सळसळ, कीड, राह, वाह, फूल, उमल, उपज, जन्म, पीक, लोळ, पोळ, वाज, भीज इत्यादी.

(२) हव, पाहिजे, आवड, वाट, रूच, दीस, परवड, मीळ, कळ, शोभ, लाज, भी, घाबर, हस या दुसऱ्या गटातील धातूंच्या प्रयोगात संप्रदान, अपादान किंवा अधिकरण अशा अर्थाने एखादे चतुर्थ्यन्त पद येते.

## प्रयोगाचे प्रकार

**प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत :** (१) कर्तरी प्रयोग (२) कर्मणी प्रयोग (३) भावे प्रयोग

## कर्तरी प्रयोग

पुढील वाक्ये पाहा.

(१) तो गाणे गातो. (२) ती गाणे गाते.

(३) ते गाणे गातात. (४) तू गाणे गातोस.

यातील पहिल्या वाक्यात 'तो' हा कर्ता आहे, 'गाणे' हे कर्म आहे आणि 'गातो' हे क्रियापद आहे. या वाक्यातील प्रयोग ओळखण्यासाठी 'गातो' हे क्रियापद कोणाप्रमाणे बदलते हे पाहणे आवश्यक

आहे. ते कर्त्याप्रमाणे बदलते की कर्माप्रमाणे बदलते, हे आपण शोधू या. त्यासाठी क्रमाने लिंग, वचन व पुरुष बदलून पाहू. असा बदल करताना एका वेळी एकच प्रकारचा बदल करणे आवश्यक आहे, हे लक्षात ठेवा.

वाक्य क्र. २ पाहा. 'तो' या पुल्लिंगी कर्त्याच्या ठिकाणी 'ती' हा स्त्रीलिंगी कर्ता ठेवला. त्याबरोबर 'गातो', हे क्रियापदाचे रूप बदलले व ते 'गाते' असे झाले म्हणजे या वाक्यातील क्रियापद हे कर्त्याच्या लिंगाप्रमाणे बदलते, असे ठरले.

वाक्य क्र. ३ पाहा. 'तो' या कर्त्याचे अनेकवचनी रूप 'ते' ठेवले. त्याबरोबर क्रियापदाचे रूप 'गातात' असे झाले.

वाक्य क्र. ४ पाहा. कर्त्याचा पुरुष बदलून 'तू' हा द्वितीय पुरुषी कर्ता ठेवताच क्रियापदाचे रूप 'गातोस' असे झाले.

याचा अर्थ असा की, 'तो गाणे गातो.' या वाक्यातील 'गातो' हे क्रियापद कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष यांप्रमाणे बदलले आहे म्हणजेच इथे क्रियापद हे कर्त्याच्या तंत्राप्रमाणे चालते, म्हणून हा कर्तरी प्रयोग आहे. कर्तरी प्रयोगात कर्ता हा आपली हुकमत चालवितो. कर्तरी प्रयोगात कर्ता हा धातुरूपेश (क्रियापदाच्या रूपावर अधिकार चालविणारा) असतो.

कर्तरी प्रयोगातील क्रियापद सकर्मक असले, तर त्यास **सकर्मक कर्तरी प्रयोग** म्हणतात व क्रियापद हे अकर्मक असल्यास त्यास **अकर्मक कर्तरी प्रयोग** असे म्हणतात. उदा.

ती गाणे गाते. (सकर्मक कर्तरी प्रयोग)

ती घरी जाते. (अकर्मक कर्तरी प्रयोग)

**कर्तरी प्रयोगाची खूण**

**कर्तरी प्रयोगात कर्ता हा नेहमी प्रथमान्तच असतो व कर्म हे प्रथमान्त किंवा द्वितीयान्त असते.**

उदा. (१) **मी** शाळेतून आत्ताच आलो. (प्रथमान्त कर्ता)

(२) पोपट **पेरू** खातो. (प्रथमान्त कर्म)

(३) शिक्षक **मुलांना** शिकवितात. (द्वितीयान्त कर्म)

## कर्मणी प्रयोग

पुढील वाक्ये पाहा.

(१) मुलाने आंबा **खाल्ला**. (२) मुलीने आंबा **खाल्ला**. (३) मुलांनी आंबा **खाल्ला**.

(४) मुलाने चिंच **खाल्ली**. (५) मुलाने आंबे **खाल्ले**.

वरील वाक्यात 'मुलाने' हा कर्ता आहे. (वाक्य क्र. १) आता या वाक्यातील प्रयोग ओळखण्यासाठी कर्त्याचे लिंग व वचन बदलून पाहा. 'मुलाने' याच्याऐवजी 'मुलीने' किंवा 'मुलांनी' असा कर्ता बदलला, तरी क्रियापदाचे रूप 'खाल्ला' असेच राहते. (वाक्य क्र. २ व ३ पाहा) कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलत नाही, म्हणून हा कर्तरी प्रयोग नव्हे.

आता कर्माचे लिंग बदलून पाहा. 'आंबा' ऐवजी 'चिंच' हे स्त्रीलिंगी कर्म ठेवले, तर क्रियापदाचे रूप 'खाल्ली' असे होईल. आता वचन (वाक्य ४ व ५) बदलून पाहा. 'आंबे' हे कर्म झाले, तर 'मुलाने आंबे खाल्ले.' असे वाक्य होईल व त्यात क्रियापद 'खाल्ले' असे होईल म्हणजे या वाक्यात कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते, म्हणून हा **कर्मणी प्रयोग** आहे. कर्मणी प्रयोगात क्रियापद कर्माच्या तंत्राप्रमाणे चालते, म्हणजेच कर्म हा धातुरूपेश आहे.

**कर्मणी प्रयोगात सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकार असणार नाहीत. कारण कर्म असल्याशिवाय कर्मणी प्रयोग होणार नाही. या प्रयोगातील क्रियापद सकर्मक हवे.**

**कर्मणी प्रयोगाची खूण**

कर्मणी प्रयोगात कर्म प्रथमान्त असते. कर्ता प्रथमान्त कधीच नसतो. कर्ता तृतीयान्त, चतुर्थ्यन्त, सविकरणी तृतीयान्त किंवा शब्दयोगी अव्ययान्त असतो.

उदा.

(१) **तिने** गाणे म्हटले. (तृतीयान्त कर्ता व प्रथमान्त कर्म)

(२) **मला** हा डोंगर चढवतो. (चतुर्थ्यन्त कर्ता)

(३) **रामाच्याने** काम करवते. (सविकरणी तृतीयान्त कर्ता)

(४) **मांजराकडून** उंदीर मारला गेला. (शब्दयोगी अव्ययान्त कर्ता)

वरील चारही वाक्यांत प्रयोग कर्मणी असला, तरी त्याचेही विविध प्रकार आहेत.

**(१) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग** :- या प्रयोगात क्रियापद हे लिंगवचनानुसार बदलत असले, तरी बहुतेक कर्ताच प्रधान असतो. त्यास **प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग** असे म्हणतात. वरील वाक्ये क्र. १ व २ ही याची उदाहरणे आहेत.

**(२) शक्य कर्मणी प्रयोग** :- वाक्य क्र. ३ मध्ये शक्यता सुचविलेली आहे. यातील क्रियापद 'शक्य क्रियापद' आहे. त्यास **शक्य कर्मणी प्रयोग** असे म्हणतात.

**(३)** प्राचीन मराठी काव्यात सकर्मक धातूला 'ज' हा प्रत्यय लावून 'करिजे, बोलिजे, कीजे, देईजे,' अशी कर्मणी प्रयोगाची उदाहरणे पाहावयास मिळतात, उदा.

(१) त्वां काय कर्म **करिजे** लघू लेकराने ।

(२) नळें इंद्रासी असे **बोलिजेलें**

(३) जो-जो **कीजे** परमार्थ लाहो.

(४) द्विजी निषिधापासाव **म्हणीजेलो**.

या प्रकाराच्या प्रयोगास प्राचीन किंवा **पुराण कर्मणी** असे म्हणतात.

**(४)** 'त्याची गोष्ट लिहून झाली.' या प्रकारच्या वाक्यात 'त्याची' हा कर्ता षष्ठी विभक्तीत आहे. 'लिहून झाली.' या संयुक्त क्रियापदाने क्रियापदाच्या समाप्तीचा अर्थ सूचित केलेला असतो. अशा प्रकारच्या प्रयोगाला **समापन कर्मणी** असे म्हणतात.

**(५)** कर्मणी प्रयोगातील कर्त्याला 'कडून' हे शब्दयोगी अव्यय लावून इंग्रजी भाषेतील पद्धतीप्रमाणे रचना करण्याचा जो नवीन प्रकार आहे, त्यास **नवीन कर्मणी** किंवा **कर्मकर्तरी** असे म्हणतात. उदा. 'शिपायाकडून चोर पकडला गेला.'

**कर्मकर्तरी प्रयोग**

पुढील वाक्ये पाहा.

(१) राम रावणास मारतो. (२) रावण रामाकडून मारला जातो.

दोन्ही वाक्यांचा अर्थ जवळजवळ एकच आहे. पहिल्या वाक्यात 'मारतो' या क्रियापदाचा कर्ता 'राम' हा असून 'रावण' हे कर्म आहे. दुसऱ्या वाक्यात 'रावण' हा कर्ता आहे म्हणजे पहिल्या वाक्यातील कर्म हे दुसऱ्या वाक्यात कर्ता बनले आहे व मूळच्या वाक्यातील कर्त्याला 'कडून' हे शब्दयोगी अव्यय जोडले असून मूळ धातूच्या भूतकाळी रूपापुढे 'जा' या धातूचे मूळच्या काळातील रूप ठेवले आहे. पहिल्या वाक्यात 'राम' या शब्दास प्राधान्य आहे व त्याचा प्रयोग 'कर्तरी' आहे, तर दुसऱ्या वाक्यात 'रावण' या शब्दाला म्हणजे मूळच्या वाक्यातील कर्माला प्राधान्य दिल्यामुळे जो प्रयोग बनला आहे, त्यास **कर्मकर्तरी प्रयोग** असे

म्हणतात. अशी वाक्यरचना इंग्रजीत करीत असल्याने इंग्रजीतील **पॅसिव्ह व्हॉइस**ला मराठीत **कर्मकर्तरी** असे म्हणतात. सकर्मक धातूच्या भूतकालवाचक कृदन्ताला 'जा' या सहाय धातूची मदत देऊन हा प्रयोग करतात. कर्मकर्तरीला काही जण **नवीन कर्मणी** असे म्हणतात. जेव्हा वाक्यातील कर्माला प्राधान्य देऊन विधान करावयाचे असते किंवा कर्ता स्पष्ट नसतो, किंवा कर्त्याचा उल्लेख टाळावयाचा असतो, त्या वेळी हा कर्मकर्तरी प्रयोग विशेष सोयीचा वाटतो.

**कर्मकर्तरी प्रयोगाची काही उदाहरणे**

(१) गाय गुराख्याकडून बांधली जाते. (२) न्यायाधीशाकडून दंड आकारण्यात आला.

(३) सभेत पत्रके वाटली गेली. (४) सर्वांना समज दिली जाईल.

## भावे प्रयोग

पुढील वाक्य पाहा.

मुलाने बैलास मारले.

या वाक्यातील कर्त्याचे किंवा कर्माचे लिंग व वचन बदलून पाहू. 'मुलाने' या ऐवजी 'मुलीने' किंवा 'मुलांनी' असा कर्ता ठेवला, तरी क्रियापदाचे रूप 'मारले' असेच राहते. 'बैलास' या कर्माऐवजी 'गाईस' असे स्त्रीलिंगी रूप किंवा 'बैलांना' असे अनेकवचनी रूप ठेवले, तरी क्रियापदाचे रूप 'मारले' असेच राहते.

**जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते, तेव्हा अशा प्रकारच्या वाक्यरचनेस भावे प्रयोग असे म्हणतात.**

भावे प्रयोगात क्रियापदाचा जो भाव किंवा आशय त्याला प्राधान्य असते व त्या मानाने कर्ता किंवा कर्म ही दोन्ही गौण असतात.

या प्रयोगाची आणखी काही उदाहरणे पाहा.

(१) रामाने रावणास मारले. (२) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.

(३) त्याने आता घरी जावे. (४) त्याला घरी जाववते.

यांतील पहिली दोन वाक्ये सकर्मक आहेत व पुढील दोन वाक्ये अकर्मक आहेत. भावे प्रयोगाचे (१) सकर्मक भावे प्रयोग व (२) अकर्मक भावे प्रयोग असे दोन प्रकार आहेत.

**भावे प्रयोगाची खूण**

(१) कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो.
(वरील वाक्ये क्र. १ व ४)

(२) कर्म असल्यास त्याची सप्रत्ययी द्वितीया विभक्ती असते.
(वाक्ये क्र. १ व २)

(३) अकर्मक भावे प्रयोगात क्रियापद विध्यर्थी असते.
(वाक्य क्र. ३)

(४) शक्यार्थक क्रियापदांचा नेहमीच भावे प्रयोग होतो.
(वाक्य क्र. ४)

**भावकर्तरी प्रयोग**

पुढील वाक्य पाहा.

(१) मला आज मळमळते. (२) तो घरी पोहोचण्यापूर्वीच सांजावले.
(३) आज सतत गडगडते. (४) सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले.

वरील वाक्यांतील क्रियापदांना कर्ते असे नाहीत. सर्वच वाक्यांतील क्रियापदे तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी आहेत म्हणजे ती भावेप्रयोगी आहेत. पण त्यांना कर्ते नसल्यामुळे हा **अकर्तृक भावे प्रयोग** होय. अशा वाक्यांत **क्रियेचा भाव किंवा अर्थ हाच वाक्यातील कर्ता असल्यामुळे यास भावकर्तरी प्रयोग असेही म्हणतात.**

**४. मिश्र किंवा संकर प्रयोग**

मराठीत मुख्य प्रयोग तीन आहेत. (१) कर्तरी, (२) कर्मणी व (३) भावे. पण बोलताना आपण असा काही वाक्यप्रयोग करतो, की तो म्हटला तर कर्तरी असतो व म्हटला तर कर्मणी किंवा भावे असतो म्हणजे एकाच वाक्यात दोन प्रयोगांचे मिश्रण झालेले आढळते. यालाच **संकर** असेही म्हणतात. अशा मिश्र प्रयोगांना **संकर प्रयोग** असेही म्हणतात.

**(१) कर्तृ-कर्म संकर**

पुढील वाक्य पाहा.

(१) तू मला पुस्तक दिले. (कर्मणी प्रयोग) (२) तू मला पुस्तक दिलेस. (कर्तरी व कर्मणी)

वरील वाक्यात 'दिले' हे क्रियापद 'पुस्तक' या कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे बदलते. जसे- पुस्तके दिली, ग्रंथ दिला म्हणजे पहिल्या वाक्यात कर्मणी प्रयोग आहे. आता दुसरे वाक्य पाहा. 'पुस्तक' या कर्माचे वचन बदलताच (पुस्तके) 'दिलीस' असे रूप होते म्हणजे हा कर्मणी प्रयोग झाला. आता या वाक्यातील 'तू' या कर्त्याचे वचन बदलून पाहा. 'तुम्ही मला पुस्तक दिलेत.' असे वाक्य होईल म्हणजे ''क्रियापद' 'दिलेस' हे कर्त्याप्रमाणेही बदलते. हा कर्तरी प्रयोगही होतो. 'तू मला पुस्तक दिलेस.' या वाक्यात कर्तरी व कर्मणी या दोन्ही प्रयोगांच्या छटा आढळतात, म्हणून याला **कर्तृ-कर्मसंकर प्रयोग** असे म्हणतात.

या प्रयोगाची आणखी काही उदाहरणे पाहा.

(१) तू कविता म्हटलीस.

(२) तुम्ही कामे केलीत.

(३) तू लाडू खाल्लास.

**(२) कर्म-भाव संकर प्रयोग**

पुढील वाक्य पाहा.

(१) वडिलांनी मुलाला शाळेत घातला. (कर्मणी)

(२) वडिलांनी मुलाला शाळेत घातले. (कर्तरी व भावे)

वरील पहिल्या वाक्यात कर्ता तृतीयान्त आहे, म्हणून हा कर्तरी प्रयोग नव्हे. आता 'मुलाला' या कर्माचे लिंग व वचन बदलून पाहा. 'मुलीला शाळेत घातली.' 'मुलांना शाळेत घातले.' अशी रूपे होतील म्हणजे कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते, म्हणून हा कर्मणी प्रयोग आहे.

दुसऱ्या वाक्यात 'घातले' क्रियापद कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे बदलते, म्हणून हाही कर्मणी प्रयोग आहे. शिवाय कर्ता तृतीयान्त आहे, कर्म द्वितीयान्त आहे व क्रियापद तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी आहे म्हणजे त्यात भावे प्रयोगाची छटा आहे. 'वडिलांनी मुलाला शाळेत घातले.' या वाक्यात कर्मणी व भावे या दोन्ही प्रयोगांच्या छटा आहेत, म्हणून त्याला **कर्म-भाव-संकर प्रयोग** असे म्हणतात. आणखी काही उदाहरणे पाहू.

(१) आईने मुलीला निजविले. (२) मी त्याला मुंबईस धाडले.

**(३) कर्तृ-भाव संकर प्रयोग**

पुढील वाक्य पाहा.

(१) तू घरी जायचे होते. (भावे प्रयोग) (२) तू घरी जायचे होतेस. (कर्तरी व भावे)

पहिल्या वाक्यातील प्रयोग भावे आहे. कारण कर्त्याचे लिंग-वचन-पुरुष बदलून पाहा. 'त्याने जायचे होते, तिने जायचे होते, त्यांनी जायचे होते.' या वाक्यांवरून क्रियापदाचे रूप न बदलता ते तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी राहते. पण 'तू घरी जायचे होतेस.' या वाक्यात भावे प्रयोगाची छटा असून कर्त्याच्या वचनाप्रमाणे ते 'तुम्ही घरी जायचे होतेत.' असे बदलताना आढळते म्हणजे या वाक्यातील क्रियापद अंशतः कर्तरी आहे. इथे **कर्तरी व भावे या दोन प्रयोगांच्या छटा एकत्र आढळतात, म्हणून यास कर्तृ-भाव संकर प्रयोग** म्हणतात. आणखी काही उदाहरणे पाहू.

(१) तू गाईला घालविलेस. (२) तू मला वाचविलेस.

(कर्तृ-कर्म-संकर प्रयोग व कर्तृ-भाव-संकर प्रयोग हे बहुधा द्वितीयपुरुषी कर्ता असताना होतात. कर्ता प्रथमपुरुषी असताना संकरप्रयोग आढळत नाहीत.)

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**1) वाक्यातील कर्ता-कर्म-क्रियापद यांच्या परस्परसंबंधाला ........... असे म्हणतात.** ①②③④

1) उपपद 2) प्रयोग
3) विभक्ती 4) कारकार्थ

**2) पुढील धातू ........... आहेत.** ①②③④
**ऊठ, बस, रड, पड, जळ**

1) साधित 2) सकर्मक
3) अकर्मक 4) सर्व पर्याय

**3) कर्तरी प्रयोगात कर्ता नेहमी .......... असतो.** ①②③④

1) द्वितीयान्त 2) प्रथमान्त
3) तृतीयान्त 4) माहित नाही.

**4) क्रियापदाचे रूप जेव्हा कर्ता किंवा कर्मानुसार न बदलता ते नेहमी तृतीयपुरूषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते तेव्हा ....... असे म्हणतात.** ①②③④

1) कर्मणी प्रयोग 2) कर्तरी प्रयोग
3) भावे प्रयोग 4) शक्य कर्मणी प्रयोग

**5) भावकर्तरी प्रयोगालाच ........ असेही म्हणतात.** ①②③④

1) कर्तृ-कर्म-संकर प्रयोग 2) अकर्तृक भावे प्रयोग
3) कर्मणी प्रयोग 4) कर्तरी प्रयोग

**6) पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**अनुराधाने गोष्टीचे पुस्तक वाचले.**

1) कर्तरी प्रयोग
2) प्रधान कर्तृक कर्मणी प्रयोग
3) भावे प्रयोग
4) अकर्मक कर्तरी प्रयोग

**7) पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**बाबांची कादंबरी वाचून झाली.**

1) कर्तरी प्रयोग 2) समापन कर्मणी प्रयोग
3) अकर्मक भावे प्रयोग 4) भावे प्रयोग

8) **पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**सुनिता खो-खो खेळते.**
1) भावे प्रयोग 2) कर्मणी प्रयोग
3) पुराण कर्मणी प्रयोग 4) कर्तरी प्रयोग

9) **पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.**
1) भावे प्रयोग
2) कर्म कर्तरी प्रयोग
3) समापन कर्मणी प्रयोग
4) पुराण कर्मणी प्रयोग

10) **पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**त्याचा निबंध लिहून झाला.**
1) कर्तरी प्रयोग 2) कर्मणी प्रयोग
3) भावे प्रयोग 4) समापन कर्मणी प्रयोग

11) **पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**तू घरी जायचे होतेस.**
1) भावे प्रयोग
2) कर्म-भाव-संकर प्रयोग
3) कर्तृ-भाव-संकर प्रयोग
4) कर्तरी प्रयोग

12) **पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④
**सभेत पत्रके वाटली गेली.**
1) कर्म कर्तरी प्रयोग 2) भावे प्रयोग
3) कर्मणी प्रयोग 4) कर्तरी प्रयोग

13) **कर्मणी प्रयोगाचे वाक्य ओळखा.** ①②③④
1) अनिताने गाणे म्हटले
2) आम्ही त्याला पाहिले
3) तो वाचन करतो 4) मोर नाचला

14) **भावे प्रयोगाचे वाक्य ओळखा.** ①②③④
1) सर्वांना समज दिली जाईल
2) तो गाणे गातो
3) सभेत पत्रके वाटली गेली
4) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे

**▸▸ सराव प्रश्नसंग्रह 25 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 3 | 3) 2 | 4) 3 | 5) 2 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 4 | 9) 1 | 10) 4 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 1 | 14) 4 | |

# २६. शब्दांचे व्याकरण चालविणे (पदपरिस्फोट)

**शब्दाचे व्याकरण चालविणे** म्हणजे वाक्यातील प्रत्येक शब्दाची व्याकरणविषयक संपूर्ण माहिती सांगणे होय. आपण आतापर्यंत शब्दांचे आठ प्रकार, प्रत्येकाचे पोट प्रकार, नाम किंवा सर्वनाम यांना होणाऱ्या लिंग- वचन- विभक्ती या विकारांची, क्रियापदांचे काळ- अर्थ- प्रयोग यांची संपूर्ण माहिती मिळविली. या माहितीचा 'शब्दांचे व्याकरण चालविणे' यासाठी उपयोग होतो. यालाच **पदपरिस्फोट** असेही म्हणतात.

'शब्दांचे व्याकरण चालविणे' ही एक प्रकारे व्याकरणाच्या अभ्यासाची चाचणीच आहे. वाक्यात येणाऱ्या शब्दाची पूर्ण माहिती बिनचूकपणे सांगता येते की नाही, हे या चाचणीतून कळते. आपण वाक्यात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक शब्दप्रकाराचा वेगळा, स्वतंत्र असा अभ्यास केला. त्यांचा एकत्रित अभ्यास करण्यासाठी 'शब्दांचे व्याकरण चालविणे' या घटकाचाही अभ्यास आवश्यक आहे. वाक्यातील प्रत्येक शब्दाचा प्रकार, त्याचे कार्य यांचा जो अभ्यास आपण केला, त्याचा प्रत्यक्ष उपयोग या चाचणीत होतो. शिवाय त्या शब्दाचा क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी असलेला संबंधही सांगता यावा हा हेतू 'व्याकरण चालविणे' या अभ्यासाच्या मागे असतो. त्या निमित्ताने व्याकरणविषयक सर्व अभ्यास एकत्रितपणे करता येतो. व्याकरणाच्या अभ्यासात प्रत्येक शब्दाचा स्वतंत्र, सखोल, सूक्ष्म अभ्यास व वाक्याचा व वाक्यातील घटकांचा एकत्रित अभ्यास होत असतो. एका अर्थाने संपूर्ण व्याकरणविषयक माहितीची ही चाचणी असते.

'पदपरिस्फोट' या शब्दाचा अर्थ समजून घेऊ या. **पद** म्हणजे वाक्यात येणारा शब्द. त्याचा परिस्फोट म्हणजे त्या शब्दाचे व्याकरणातील स्वरूप उकलून दाखविणे, स्पष्ट करून दाखविणे. वाक्यातील शब्दांचा परस्परांशी असणारा व्याकरणविषयक संबंध काय आहे ते स्पष्ट करून सांगणे, त्या शब्दाचे वाक्यातील स्थान व कार्य आणि त्याचे स्वरूप सांगणे हे **पदपरिस्फोट** किंवा **शब्दांचे व्याकरण चालविणे** या अभ्यासात अपेक्षित असते.

व्याकरण चालविताना वाक्यातील शब्दाची कोणकोणती माहिती द्यावी लागते, ती पुढे दिली आहे.

| वाक्यातील शब्द | कोणती माहिती द्यावी ? |
|---|---|
| (१) नाम | मूळ शब्द, पोटप्रकार (सामान्य नाम, विशेषनाम इत्यादी.) लिंग, वचन, विभक्ती, विभक्तीचा अर्थ - (कारकार्थ किंवा उपपदार्थ). |
| (२) सर्वनाम | मूळ शब्द, पोटप्रकार (पुरुषवाचक, प्रश्नार्थक इत्यादी.) लिंग, वचन, विभक्ती, विभक्तीचा अर्थ. |

(अ) कर्ता

वाक्यातील नाम/सर्वनाम कर्त्याचे कार्य करीत असल्यास त्याचा उल्लेख, क्रियापदाशी संबंधित आहे, हे सांगणे.

(ब) कर्म

वाक्यातील नाम/सर्वनाम जर कर्म असेल, क्रियापद सकर्मक असेल, तर त्याचा उल्लेख, प्रधान कर्म आहे की गौण कर्म आहे ते स्पष्ट करणे, कर्माचा क्रियापदाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.

| वाक्यातील शब्द | कोणती माहिती द्यावी ? |
|---|---|
| (३) विशेषण | मूळ शब्द, त्याचा पोटप्रकार, कोणत्या नामाबद्दल विशेष माहिती ते विशेषण सांगते, त्या नामाचा (विशेष्य) उल्लेख. |
| (४) क्रियापद | मूळ धातू, क्रियापदाचा प्रकार, सकर्मक की अकर्मक रूप (करण किंवा अकरण), क्रियापदाचा अर्थ (स्वार्थ, आज्ञार्थ इत्यादी.) काळ, लिंग, पुरुष, वचन तसेच कर्ता, कर्म किंवा वाक्यातील अन्य विशिष्ट पदे यांचा क्रियापदाशी असणारा संबंध स्पष्ट करून वाक्याचा प्रयोग (कर्तरी, कर्मणी, भावे इत्यादी.) सांगणे. |
| (५) क्रियाविशेषण अव्यय | मुख्य प्रकार, पोटप्रकार (स्थलवाचक, कालवाचक इत्यादी.) सांगणे, कोणत्या शब्दाबद्दल/ क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगते, याचा उल्लेख. |
| (६) शब्दयोगी अव्यय | ज्या शब्दाला जोडून आले त्याचे व्याकरण सांगणे, पोटप्रकार जर विभक्तीचा अर्थ व्यक्त करीत असेल, तर तो अर्थ सांगणे. |
| (७) उभयान्वयी अव्यय | पोटप्रकार सांगून कोणते दोन शब्द किंवा वाक्ये जोडते, त्याचा उल्लेख करणे. |
| (८) केवलप्रयोगी अव्यय | अव्ययाचे पोटप्रकार/कोणती भावना व्यक्त करते ते स्पष्ट करणे. |

शब्दाचे व्याकरण कसे चालवितात, याची काही उदाहरणे पाहू.

खालील वाक्यांतील जाड ठशातील शब्दांचे व्याकरण चालवा.

**(१) रामाने परीक्षेत पहिले बक्षीस मिळविले.**

**रामाने** - मूळ शब्द 'राम', शब्दाचा प्रकार नाम, पोटप्रकार विशेषनाम, पुल्लिंगी, तृतीयेचे एकवचन, तृतीयेचा अर्थ कर्ता- वाक्यातील 'मिळविले' या क्रियापदाचा.

**परीक्षेत** - मूळ शब्द 'परीक्षा', नाम, सामान्यनाम, स्त्रीलिंगी, सप्तमीचे एकवचन, सप्तमीचा अर्थ अधिकरण.

**मिळविले** - मूळ धातू 'मिळव', सकर्मक, स्वार्थी, भूतकाळी, नपुंसकलिंगी, तृतीयपुरुषाचे

एकवचन, या वाक्यात 'रामाने' हा कर्ता, 'बक्षीस' हे कर्म 'मिळविले' हे क्रियापद, हा कर्मणी प्रयोग.

**(२) भावशून्य डांबरी रस्ते मला आवडत नाहीत.**

**भावशून्य** - विशेषण, गुणविशेषण, 'रस्ते' या विशेष्याचे विशेषण.

**डांबरी** - विशेषण, नामसाधित गुणविशेषण, 'रस्ते' या विशेष्याचे विशेषण.

**रस्ते** - मूळ शब्द 'रस्ता', नाम, सामान्यनाम, पुल्लिंगी, प्रथमेचे एकवचन, प्रथमेचा अर्थ 'कर्ता', 'आवडत नाही' या क्रियापदाचा कर्ता.

**मला** - मूळ शब्द 'मी', सर्वनाम, प्रथमपुरुषवाचक सर्वनाम, पुल्लिंगी, चतुर्थीचे एकवचन, चतुर्थीचा अर्थ संप्रदान.

**आवडत नाहीत** - मूळ धातू 'आवड', अकर्मक, अकरणरूपी स्वार्थी, वर्तमानकाळी, तृतीय पुरुषाचे अनेकवचन, या वाक्यात 'रस्ता' हा कर्ता, 'आवडत नाहीत' हे संयुक्त क्रियापद, हा अकर्मक कर्तरी प्रयोग.

**(३) मी उद्या** मुंबईला जाईन **व ताईला घेऊन येईन.**

**मी** - मूळ शब्द 'मी', सर्वनाम, प्रथमपुरुषवाचक सर्वनाम, पुल्लिंगी, प्रथमेचे एकवचन, प्रथमेचा अर्थ कर्ता, 'जाईन' या क्रियापदाचा.

**उद्या** - क्रियाविशेषण अव्यय, कालवाचक क्रियाविशेषण अव्यय, 'येईन' या क्रियापदाशी संबंध.

**व** - समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय. दोन वाक्यांना जोडते.

**ताईला** - मूळ शब्द 'ताई', नाम, सामान्यनाम, स्त्रीलिंगी, द्वितीयेचे एकवचन, द्वितीयेचा अर्थ कर्म, 'घेऊन' या धातुसाधिताचे.

**घेऊन** - 'घे' या धातूचे ऊन-प्रत्ययान्त धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय. 'येईन' या क्रियापदाशी संबंध.

**येईन** - मूळ धातू 'ये', अकर्मक, स्वार्थी, भविष्यकाळी, पुल्लिंगी, प्रथम पुरुषाचे एकवचन. या वाक्यात 'मी' हा कर्ता, 'येईन' हे क्रियापद, हा अकर्मक कर्तरी प्रयोग.

**(४) पावसाळ्यात** आभाळात **ढगांचा** पिसारा **फुलतो.**

**पावसाळ्यात** - मूळ शब्द 'पावसाळा', नाम, सामान्यनाम, पुल्लिंगी, सप्तमी, एकवचन, सप्तमीचा कारकार्थ अधिकारण.

**ढगांचा** - मूळ शब्द 'ढग', नाम, सामान्यनाम, पुल्लिंगी, षष्ठी, अनेकवचनी, षष्ठीचा कारकार्थ संबंध, वाक्यातील 'पिसारा' या शब्दाशी अन्वित.

**फुलतो** - मूळ धातू 'फूल', क्रियापद-फुलणे, अकर्मक क्रियापद, करण रूप, क्रियापदाचा अर्थ स्वार्थ, साधा वर्तमानकाळ, पुल्लिंगी, तृतीय पुरुषी, एकवचन. वाक्यातील 'पिसारा' कर्ता, कर्म नाही. अकर्मक कर्तरी प्रयोग.

**(५) सीता पूजा करते.**

**सीता** - मूळ शब्द 'सीता', नाम, विशेषनाम, स्त्रीलिंगी, प्रथमा एकवचन, या वाक्यातील

'करते' या क्रियापदाचा कर्ता.

**पूजा** - मूळ शब्द 'पूजा', नाम, सामान्यनाम, स्त्रीलिंगी, विभक्ती - प्रथमा (काही व्याकरणकारांच्या मते कर्मस्थानी असणाऱ्या प्रत्ययरहित शब्दाची विभक्ती अप्रत्ययी द्वितीया मानतात.) अप्रत्ययी द्वितीया, एकवचन, वाक्यातील 'करते' या क्रियापदाचे कर्म.

**करते** - मूळ धातू 'कर', क्रियापदाचे रूप करणे - सकर्मक क्रियापद, करणरूप, वर्तमानकाळ, तृतीय पुरुष, स्त्रीलिंगी, एकवचन, कर्ता-सीता, कर्म-पूजा, प्रयोग सकर्मक कर्तरी प्रयोग.

**(६) श्रीकृष्णाने सांदीपनींना गुरूदक्षिणा दिली.**

**श्रीकृष्णाने** - मूळ शब्द 'श्रीकृष्ण', नाम, विशेषनाम, पुल्लिंग, तृतीया, एकवचन वाक्यातील 'दिली' या क्रियापदाचा कर्ता.

**सांदीपनींना** - मूळ शब्द 'सांदीपनी', नाम, विशेषनाम, पुल्लिंग, चतुर्थी, आदरार्थी अनेकवचन, या वाक्यातील 'दिली' या क्रियापदाचे गौण कर्म.

**गुरूदक्षिणा** - मूळ शब्द 'गुरूदक्षिणा', नाम, सामान्यनाम, स्त्रीलिंगी, प्रथमा, (प्रत्ययरहित द्वितीया) या वाक्यातील 'दिली' या क्रियापदाचे कर्म.

**दिली** - मूळ धातू 'दे', क्रियापद 'देणे', सकर्मक क्रियापद, करणरूप, भूतकाळ, तृतीय पुरुष, एकवचन, कर्ता- श्रीकृष्णाने, कर्म - गुरूदक्षिणा, क्रियापद - 'दिली', प्रयोग - कर्मणी प्रयोग.

**(७) आम्ही दोघेही** भक्तिभावनेने थरथरून उठलो.

**आम्ही** - मूळ शब्द 'आम्ही', सर्वनाम, पुरुषवाचक सर्वनाम, प्रथमपुरुष, उभयलिंग - इथे पुल्लिंग, विभक्ती - प्रथमा, वचन- अनेकवचन, वाक्यातील 'उठलो' या क्रियापदाचा कर्ता.

**दोघेही** - दोघे- मूळ शब्द 'दोन', ('दोन्ही एकत्र' या अर्थाने दोघे), विशेषण, संख्याविशेषण, पुल्लिंगी, अनेकवचन, ही शब्दयोगी अव्यय, 'दोघे' या शब्दाला जोडून आले आहे. 'दोघेही' या शब्दाचा वाक्यातील संबंध 'आम्ही' या सर्वनामाशी संबंधित.

**(८) मी मंत्रालय पाहिले.**

**मी** - मूळ शब्द 'मी', सर्वनाम, पुरुषवाचक सर्वनाम, प्रथम पुरुषवाचक सर्वनाम, प्रथमा एकवचन, विभक्तीचा अर्थ कर्ता, या वाक्यातील 'पाहिले' या क्रियापदाचा कर्ता.

**मंत्रालय** - मूळ शब्द 'मंत्रालय', नाम, सामान्यनाम, नपुंसकलिंगी, प्रथमा, प्रथमेचा अर्थ कर्म, 'पाहिले' या क्रियापदाचे कर्म.

**पाहिले** - मूळ धातू 'पाह' . क्रियापद 'पाहणे', सकर्मक, करणरूप, स्वार्थी, भूतकाळी, नपुंसकलिंगी, प्रथम पुरुषाचे एकवचन, या वाक्यात 'मी' हा कर्ता, 'मंत्रालय' हे कर्म, 'पाहिले' हे क्रियापद, कर्मणी प्रयोग.

**(९) त्याने सुरीने आंबा कापला.**

**त्याने** - मूळ शब्द 'तो', सर्वनाम, तृतीय पुरुषवाचक सर्वनाम, पुल्लिंगी, तृतीयेचे एकवचन, तृतीय विभक्तीचा अर्थ कर्ता, 'कापला' या क्रियापदाचा कर्ता.

**सुरीने** - मूळ शब्द 'सुरी', नाम, सामान्यनाम, स्त्रीलिंगी, तृतीयेचे एकवचन, तृतीया विभक्तीचा अर्थ 'करण'.

**आंबा** - मूळ शब्द 'आंबा', नाम, सामान्यनाम, पुल्लिंगी, प्रथमा, एकवचन, विभक्ती प्रथमा, विभक्तीचा अर्थ 'कर्म', या वाक्यातील क्रियापद 'कापला'चे कर्म.

**कापला** - मूळ धातू 'काप', क्रियापद 'कापणे', सकर्मक, करणरूप, स्वार्थी, भूतकाळ, पुल्लिंगी, तृतीय पुरुषाचे एकवचन, या वाक्यात 'त्याने' कर्ता, 'आंबा' कर्म, 'कापला' क्रियापद, प्रयोग - कर्मणी प्रयोग.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) **पद म्हणजे वाक्यातील ..............** ①②③④
   1) लिंग 2) शब्द
   3) वचन 4) विभक्ती

2) **रामाने परीक्षेत पहिले बक्षीस मिळविले.**
   **(अधोरेखित शब्दातील मूळ शब्द ओळखा.)** ①②③④
   1) रामा 2) राम 3) रामाने 4) रामु

3) **रामाने परीक्षेत पहिले बक्षीस मिळविले.**
   **(विभक्ती व अर्थ ओळखा.)** ①②③④
   1) तृतीयेचा अर्थ कर्ता 2) तृतीयेचा अर्थ करण
   3) प्रथमेचा अर्थ कर्ता 4) तृतीयेचा अर्थ कर्म

4) **रामाने परीक्षेत पहिले बक्षीस मिळविले.**
   **(अधोरेखित शब्दातील मूळ धातू ओळखा.)** ①②③④
   1) मिळविले 2) मिळवला
   3) मिळव 4) मिळतो

5) **भावशून्य डांबरी रस्ते मला आवडत नाहीत.**
   **(अधोरेखित शब्दाचे लिंग, वचन, विभक्ती व अर्थ ओळखा.)** ①②③④
   1) नपुंसकलिंगी, अनेकवचन, प्रथमा, कर्ता
   2) स्त्रीलिंगी, अनेकवचन, प्रथमा, कर्म
   3) पुल्लिंगी, अनेकवचन, द्वितीया, कर्म
   4) पुल्लिंगी, एकवचन, प्रथमा, कर्ता

6) **त्याने सुरीने आंबा कापला.**
   **(अधोरेखित शब्दाचा मूळ शब्द व पोटप्रकार ओळखा.)** ①②③④
   1) सुरी, सामान्यनाम 2) सुरीने, विशेषनाम
   3) सुरी, भाववाचकनाम 4) सुरीने, सामान्यनाम

7) **त्याने सुरीने आंबा कापला.**
   **(अधोरेखित शब्दाचे लिंग, वचन, विभक्ती व कारकार्थ ओळखा.)** ①②③④
   1) पुल्लिंगी, अनेकवचनी, चतुर्थी, संप्रदान
   2) नपुंसकलिंगी, अनेकवचनी, प्रथमा, कर्ता
   3) स्त्रीलिंगी, एकवचनी, तृतीया, करण
   4) पुल्लिंगी, एकवचनी, प्रथमा, कर्म

8) **मी मंत्रालय पाहिले.**
   **(अधोरेखित शब्दाचा मूळ धातू, पोटप्रकार ओळखा.)** ①②③④
   1) मूळ धातू पाहिले, सकर्मक
   2) मूळ धातू 'पाह', क्रियापद पाहणे, सकर्मक
   3) मूळ शब्द पाहणे, अकर्मक
   4) मूळ धातू पाहणे, अकर्मक

9) **मी मंत्रालय पाहिले.**
   **(अधोरेखित शब्दाच्या क्रियापदाचा अर्थ, काळ, लिंग, वचन ओळखा.)** ①②③④
   1) करणरूप, आज्ञार्थी, भविष्यकाळ, पुल्लिंगी
   2) अकरणरूप, विध्यर्थी, वर्तमानकाळ, स्त्रीलिंगी

3) अकरणरूप, विद्यार्थी, वर्तमानकाळ, स्त्रीलिंगी
4) करणरूप, स्वार्थी, भूतकाळी, नपुंसकलिंगी, प्रथम पुरूषाचे एकवचन

10) पावसाळ्यात बगांचा पिसारा फुलतो.
**(अधोरेखित शब्दाचे मूळ शब्द/धातू, पोटप्रकार ओळखा.)** ①②③④
1) मूळ धातू 'पावसाळ्या', सकर्मक
2) मूळ शब्द 'पावसाळा', सामान्यनाम
3) मूळ शब्द पाऊस, विशेषनाम
4) मूळ शब्द 'पाऊस', सामान्यनाम

11) पावसाळ्यात बगांचा पिसारा फुलतो.
**(अधोरेखित शब्दाचे लिंग, वचन, विभक्ती व अर्थ सांगा.)** ①②③④
1) पुल्लिंग, एकवचन, सप्तमी, अधिकरण
2) स्त्रीलिंग, अनेकवचन, प्रथमा, कर्ता
3) पुल्लिंग, एकवचन, पंचमी, अपादान
4) नपुंसकलिंग, एकवचन, द्वितीया, कर्म

12) मी उद्या मुंबईला जाईन व ताईला घेऊन येईन.
**(अधोरेखित शब्दाची जात, कार्य सांगा.)** ①②③④
1) शब्दयोगी अव्यय, शब्दाला जोडून
2) क्रियाविशेषण अव्यय, माहिती सांगणे
3) उभयान्वयी अव्यय, दोन वाक्य जोडणे
4) केवलप्रयोगी अव्यय, भावना सांगणे

13) सीता पूजा करते.
**(अधोरेखित शब्दाचा मूळ धातू/शब्द, पोटप्रकार ओळखा.)** ①②③④
1) मूळ शब्द 'पूजेला', विशेषनाम
2) मूळ धातू 'पुज', अकर्मक
3) मूळ धातू 'पुज', सकर्मक
4) मूळ शब्द 'पूजा', सामान्यनाम

14) सीता पूजा करते.
**(अधोरेखित शब्दाची विभक्ती, वचन ओळखा.)** ①②③④
1) प्रथमा, एकवचन 2) द्वितीया, अनेकवचन
3) तृतीया, एकवचन 4) चतुर्थी, अनेकवचन

15) श्रीकृष्णाने सांदीपनींना गुरुदक्षिणा दिली.
**(अधोरेखित शब्दाचा मूळ शब्द/धातू व पोटप्रकार ओळखा.)** ①②③④
1) मूळ धातू 'श्रीकृष्ण', अकर्मक
2) मूळ शब्द 'श्रीकृष्ण', विशेषनाम
3) मूळ धातू 'कृष्ण', सकर्मक
4) मूळ शब्द 'कृष्ण', सामान्यनाम

**▶▶ सराव प्रश्नसंग्रह 26 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 1 | 4) 3 | 5) 4 |
| 6) 1 | 7) 3 | 8) 2 | 9) 4 | 10) 2 |
| 11) 1 | 12) 3 | 13) 4 | 14) 1 | 15) 2 |

# २७. समास

भाषेचा उपयोग करताना आपण शब्दांची काटकसर करतो. दोन किंवा अधिक शब्दांऐवजी आपण एकाच शब्दाचा उपयोग करतो. उदा. 'चंद्राचा उदय' असे न म्हणता आपण 'चंद्रोदय' असे म्हणतो. 'पोळीसाठी पाट' असे न म्हणता आपण 'पोळपाट' असे म्हणतो. 'बटाटे घालून तयार केलेला वडा' असे न म्हणता आपण 'बटाटेवडा' असे म्हणतो.

शब्दांच्या अशा एकत्रीकरणास **समास** असे म्हणतात. 'सम्+अस्' या संस्कृत धातूपासून 'समास' हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ 'एकत्र करणे' असा आहे. समासात एक जोडशब्द तयार करताना त्या शब्दांतील परस्परसंबंध दाखविताना त्यातील विभक्तीप्रत्यय किंवा शब्द आपण गाळतो. समास हीदेखील भाषेतील काटकसर आहे.

शब्दांच्या एकत्रीकरणाने जो एक जोडशब्द तयार होतो, त्याला **सामासिक शब्द** असे म्हणतात. हा सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आपण फोड करून सांगतो. फोड करून दाखविण्याच्या पद्धतीला **विग्रह** असे म्हणतात. विग्रह म्हणजे कमीत कमी शब्दांत सामासिक शब्दाचे केलेले स्पष्टीकरण होय. उदा. 'वनभोजन' हा सामासिक शब्द असून 'वनातील भोजन' हा त्याचा विग्रह होय.

## समासाचे प्रकार

**समासात कमीत कमी दोन शब्द किंवा पदे एकत्र येतात. दोन शब्दांपैकी कोणत्या पदाला वाक्यात अधिक महत्त्व, म्हणजे कोणत्या पदाबद्दल आपल्याला अधिक बोलावयाचे असते, यावरून समासाचे प्रकार ठरविण्यात आलेले आहेत;** ते असे.

(१) पहिले पद प्रमुख असेल, तर **अव्ययीभाव समास.**

(२) दुसरे पद प्रमुख असेल, तर **तत्पुरुष समास.**

(३) दोन्ही पदे महत्त्वाची असतील, तर **द्वंद्व समास.**

(४) दोन्ही पदे महत्त्वाची नसून त्यावरून तिसऱ्याच पदाचा बोध होत असेल, तर **बहुव्रीही समास.**

## अव्ययीभाव समास

**जेव्हा समासातील पहिले पद बहुधा महत्त्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणासारखा केलेला असतो, तेव्हा अव्ययीभाव समास होतो.**

उदा. आजन्म - जन्मापासून यथाशक्ती - शक्तीप्रमाणे
प्रतिदिन - प्रत्येक दिवशी प्रतिक्षण - प्रत्येक क्षणाला

वरील उदाहरणांत 'आ, यथा, प्रति' हे संस्कृतमधील उपसर्ग आहेत. संस्कृतमध्ये उपसर्गांना अव्ययेच मानतात. हे उपसर्ग प्रारंभी लागून बनलेले वरील शब्द हे सामासिक शब्द आहेत. त्यांचा वर दिल्याप्रमाणे विग्रह करताना या उपसर्गांच्या अर्थांना या सामासिक शब्दांत अधिक महत्त्व आहे, म्हणून या समासाला प्रथमपदप्रधान समास असे म्हणतात. शिवाय एकूण सामासिक शब्द हे क्रियाविशेषण अव्यय आहे; म्हणून त्याला अव्ययीभाव समास असे म्हणतात.

अ) संस्कृतप्रमाणे फारसी भाषेतील उपसर्ग प्रारंभी येऊन अव्ययीभाव समासाची मराठीत पुष्कळ उदाहरणे आहेत.

उदा. दररोज, हरहमेश, बिनधोक, बेलाशक, गैरशिस्त,

बरहुकूम, दरमजल, बिनशर्त, बेमालूम, गैरहजर इत्यादी.

ब) मराठीत शब्दांची द्विरुक्ती होऊन बनलेले जोडशब्द क्रियाविशेषणाप्रमाणे वापरले जातात.

उदा. गावोगाव, जागोजाग, गल्लोगल्ली, पदोपदी, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, दिवसेंदिवस, पावलोपावली इत्यादी.

या शब्दांत संस्कृत किंवा फारसी अव्ययीभाव समासाप्रमाणे प्रारंभीचा शब्द अव्यय नाही. काही शब्दांतील प्रथमपदाच्या अंती 'ओ' कार आलेला आहे, तरी एकंदरीत त्याचे स्वरूप क्रियाविशेषण अव्ययाचे असल्यामुळे ही मराठीतील अव्ययीभाव समासाची उदाहरणे आहेत.

## तत्पुरुष समास

**ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो. त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.**

उदा. तोंडपाठ (तोंडाने पाठ), कंबरपट्टा (कंबरेसाठी पट्टा),
महादेव (महान असा देव), अनिष्ट (नाही इष्ट ते).

तत्पुरुष समासातील दोन्ही पदे कधी-कधी विग्रहाच्या वेळी एकाच विभक्तीत असतात.

उदा. काळमांजर (काळे असे मांजर) यास **समानाधिकरण तत्पुरुष समास** असे म्हणतात.

कधी-कधी दोन्ही पदे भिन्न अशा विभक्तीत असतात. जसे - देवपूजा (देवाची पूजा) या प्रकारास **व्यधिकरण तत्पुरुष** असे म्हणतात.

तत्पुरुष समासाचे प्रकार पाहू या.

### (अ) विभक्ती-तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडली जातात. त्यास **विभक्ती-तत्पुरुष समास** असे म्हणतात. या समासाचा विग्रह करताना एका पदाचा दुसऱ्या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्तीप्रत्ययाने दाखविला जातो, त्याच विभक्तीचे नाव त्या समासाला दिले जाते. या समासाचे पोटप्रकार पुढीलप्रमाणे.

| सामासिक | विग्रह | समास | आणखी उदाहरणे |
|---|---|---|---|
| दुःखप्राप्त | दुःखाला प्राप्त | द्वितीया तत्पुरुष | कृष्णाश्रित, देशागत. |
| भक्तिवश | भक्तीने वश | तृतीया तत्पुरुष | तोंडपाठ, दयार्द्र, गुणहीन, चौपट, ईश्वरनिर्मित, बुद्धिजड. |
| क्रीडांगण | क्रीडेसाठी अंगण | चतुर्थी तत्पुरुष | गायरान, पोळपाट, वाटखर्च, मेंढवाडा, पूजाद्रव्य, बाइलवेडा, व्याहीभोजन. |
| ऋणमुक्त | ऋणातून मुक्त | पंचमी तत्पुरुष | सेनानिवृत्त, गर्भश्रीमंत, जातिभ्रष्ट, चोरभय, जन्मखोड, लंगोटीमित्र. |
| सामासिक | विग्रह | समास | आणखी उदाहरणे |
| राजपुत्र | राजाचा पुत्र | षष्ठी तत्पुरुष | देवपूजा, राजवाडा, घोडदौड, लक्ष्मीकांत, धर्मवेड, आंबराई, भूपती, विद्याभ्यास. |
| घरजावई | घरातील जावई | सप्तमी तत्पुरुष | स्वर्गवास, पोटशूळ, वनभोजन, कूपमंडूक, घरधंदा, कलाकुशल, पाणकोंबडा. |

विग्रहाला अनुसरून समासाची नावे बदलणे शक्य आहे. उदा. गावदेवी (गावची देवी - षष्ठी तत्पुरुष समास), (गावातील देवी-सप्तमी तत्पुरुष.)

चोरभय - (चोरापासून भय - पंचमी तत्पुरुष), (चोराचे भय- षष्ठी तत्पुरुष).

**(आ) अलुक् तत्पुरुष समास**

पुढील सामासिक शब्द पाहा.

अग्रेसर, युधिष्ठिर, पंकेरूह, सरसिज या शब्दांच्या पहिल्या पदातील 'अग्रे, युधि, पंके, कर्तरी, कर्मणी, सरसि' ही त्या-त्या शब्दांची संस्कृतमधील सप्तमीची रूपे न गाळता तशीच राहिली आहेत. (लुक् = लोप होणे. अलुक् = लोप न होणारे) म्हणून 'ज्या विभक्तीतत्पुरुष समासात पूर्वपदाच्या विभक्तीप्रत्ययाचा लोप होत नाही, त्यास **अलुक् तत्पुरुष समास** असे म्हणतात.' ही सर्व उदाहरणे संस्कृत शब्दांची आहेत. 'तोंडीलावणे' हे या समासाचे मराठी उदाहरण होय.

**(इ) उपपद तत्पुरुष समास**

पुढील काव्यपंक्ती पाहा.

(१) शैवाले गुंतले तरि **पंकज** हे शोभते ।

(२) गडद निळे, गडद निळे, **जलद** भरुनि आले ।

वरील कवितेच्या ओळींतील पुढील शब्दांची फोड आपण कशी करतो ते पाहा.

(१) पंकज = पंकात (= चिखलात) जन्मणारे ते.

(२) जलद = जल देणारे.

या समासातील दुसरे पद प्रधान आहे, म्हणून हा तत्पुरुष समासाचा प्रकार आहे. शिवाय यांतील दुसरी पदे धातुसाधिते किंवा कृदन्ते आहेत; व ही कृदन्ते अशी आहेत की, त्यांचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही. अशा समासास **उपपद** किंवा **कृदन्त तत्पुरुष समास** असे म्हणतात. जसे-

ग्रंथकार, कुंभकार, पांथस्थ, मार्गस्थ, द्विज, विहग, शेषशायी इत्यादी.

यांतील कार (करणारा), स्थ (राहणारा), ज (जन्मणारा), ग (जाणारा), शायी (निजणारा) ही त्या-त्या संस्कृत धातूपासून झालेली रूपे असून सामासिक शब्दांशिवाय त्यांचा अन्यत्र स्वतंत्रपणे उपयोग होत नाही. या समासाची आणखी काही उदाहरणे पाहा.

देशस्थ, मनुज, नृप, सुखद, पयोद, खग, नग, सुज्ञ, कृतघ्न इत्यादी.

मराठी शब्दांची उदाहरणे पाहा.

शेतकरी, कामकरी, आगलाव्या, भाजीविक्या, वाटसरू इत्यादी.

पंकेरूह, सरसिज यांसारखे संस्कृत सामासिक शब्द व मळेकरी, पहारेकरी, पाखरेविक्या, गळेकापू यांसारखे मराठी सामासिक शब्द हे अलुक् व उपपद तत्पुरुष अशा दोन्ही प्रकारची उदाहरणे आहेत. यातील पहिल्या पदातील विभक्तीचा लोप झाला नाही, म्हणून ते अलुक् व त्यांतील दुसरी पदे धातुसाधिते आहेत, म्हणून ते **उपपद तत्पुरुष**. अशा समासांना **उभय-तत्पुरुष** असेही म्हणतात.

**(ई) नञ् तत्पुरुष समास**

पुढील वाक्ये पाहा.

(१) माझा निबंध अपुरा राहिला.

(२) अजामिळ हा नास्तिक होता.

या वाक्यातील रंगीत शब्द लक्षपूर्वक पाहा. यातील दुसरी पदे महत्त्वाची आहेत, म्हणून ती तत्पुरुष समासाची उदाहरणे आहेत. मात्र अशा पदातील पहिली पदे 'अ, अन्, न, ना, बे, नि, गैर' यांसारखी अभाव किंवा निषेध दर्शविणारी आहेत. अशा रीतीने ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद नकारार्थी असते, त्यास **नञ् तत्पुरुष समास** असे म्हणतात. आणखी उदाहरणे पाहू.

अयोग्य (योग्य नव्हे ते), अनादर (आदर नसलेला), नापसंत (पसंत नसलेला).

अनाचार, अन्याय, अहिंसा, निरोगी, नाइलाज, नाउमेद, बेडर, गैरहजर इत्यादी.

**(उ) कर्मधारय समास**

ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजे प्रथमा विभक्तीत असतात, तेव्हा त्यास **कर्मधारय समास** असे म्हणतात.

उदा. महादेव (महान असा देव), घनश्याम (घनासारखा श्याम).

यातील पहिले पद विशेषण असून दुसरे पद नाम असते. यांतील दोन्ही पदांतील संबंध विशेषण-विशेष्य किंवा उपमान-उपमेय अशा स्वरूपाचा असतो. उदा. रक्तचंदन (रक्तासारखे चंदन), मुखकमल (मुख हेच कमल) इत्यादी.

**यातील पोटप्रकार पुढीलप्रमाणे.**

**(१) विशेषण-पूर्वपद** सामासिक शब्दातील पहिले पद (पूर्व) विशेषण असते. जसे - रक्तचंदन, नीलकमल, पीतांबर (पिवळे असे वस्त्र).

**(२) विशेषण-उत्तरपद** सामासिक शब्दातील दुसरे पद विशेषण असते. उदा. घननील (निळा असा

घन), पुरुषोत्तम (उत्तम असा पुरुष), भाषांतर (अन्य भाषा), देशांतर (अन्य देश).

(३) विशेषण-उभयपद — सामासिक शब्दातील दोन्ही पदे विशेषणे असतात. जसे- पांढराशुभ्र, श्यामसुंदर, लालभडक, हिरवागार, काळाभोर.

(४) उपमान-पूर्वपद — सामासिक शब्दातील पहिले पद (पूर्व) उपमान असते. उदा. कमलनयन (कमळासारखे डोळे), मेघश्याम (मेघासारखा काळा), चंद्रमुख (चंद्रासारखे मुख).

(५) उपमान-उत्तरपद — सामासिक शब्दातील दुसरे पद (उत्तर) उपमान असते. जसे- मुखचंद्र, चरणकमल, नरसिंह, (सिंहासारखा नर).

(६) रूपक-उभयपद — सामासिक शब्दातील दोन्ही (उभय) पदे एकरूप असतात. जसे विद्याधन (विद्या हेच धन), काव्यामृत (काव्यरूपी अमृत), भवसागर, विद्युल्लता, चरणकमल.

**(ऊ) द्विगू समास**

पुढील वाक्ये वाचा.

(१) रामचंद्र पंचवटीत राहत होते. (२) नवरात्रात देवीचा उत्सव असतो.

(३) चातुर्मासात व्रते करतात. (४) अशी माणसे त्रिभुवनात नसणार.

वरील वाक्यांतील रंगीत अक्षरांत छापलेले सामासिक शब्द पाहा. त्यांचा विग्रह पुढीलप्रमाणे.

(१) पंचवटी (पाच वडांचा समूह). (२) नवरात्र (नऊ रात्रींचा समूह).

(३) चातुर्मास (चार मासांचा समूह). (४) त्रिभुवन (तीन भुवनांचा समूह).

या विग्रहावरून तुमच्या लक्षात आले असेल, की या प्रत्येक सामासिक शब्दातील दुसरे पद महत्त्वाचे आहे. या पदांचा परस्परसंबंध विशेषण, विशेष्य असाच आहे म्हणजे हा कर्मधारय समासाचाच प्रकार आहे. या सामासिक शब्दांतील पहिली पदे संख्याविशेषणे आहेत व सामासिक शब्दांवरून एक समूह सुचविला जातो. अशा प्रकारे ज्या कर्मधारय समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो, तेव्हा त्यास **द्विगू समास** असे म्हणतात. हा समास नेहमी एकवचनात असतो.

या समासाची आणखी काही उदाहरणे - सप्ताह, त्रिदल, पंचपाळे, चौघडी, त्रैलोक्य, बारभाई, पंचारती इत्यादी.

द्विगू समासाला 'संख्यापूर्वपद कर्मधारय समास' असेही म्हणतात.

**(ए) मध्यमपदलोपी समास**

पुढील सामासिक शब्द पाहा.

कांदेपोहे, साखरभात, चुलतसासरा.

या सामासिक शब्दांचा विग्रह अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहे.

कांदे घालून केलेले पोहे - कांदेपोहे.

साखर घालून केलेला भात - साखरभात.

नवऱ्याचा चुलता या नात्याने सासरा - चुलतसासरा.

अशा सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी मधली काही पदे लोप करावी लागतात. म्हणून या समासाला **मध्यमपदलोपी समास** असे म्हणतात.

या सामासिक शब्दाचा विग्रह करताना युक्त, द्वारा, पुरता, असलेला अशांसारखी गाळली गेलेली पदे घालावी लागतात; म्हणून या समासाला **लुप्तपद कर्मधारय समास** असेही म्हणतात.

या समासाची आणखी काही उदाहरणे पाहू.

डाळवांगे (वांगेयुक्त डाळ), पुरणपोळी (पुरण भरून तयार केलेली पोळी), लंगोटीमित्र (लंगोटी घालत असल्यावेळेपासूनचा मित्र), भोजनभाऊ (भोजनापुरता भाऊ), घोडेस्वार (घोडा असलेला स्वार), मावसभाऊ (मावशीचा मुलगा या नात्याने झालेला भाऊ), बालमित्र, गुळांबा, मामेभाऊ, बटाटेभात, नातसून इत्यादी.

## द्वंद्व समास

**ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान म्हणजे समान दर्जाची असतात, त्यास द्वंद्व समास असे म्हणतात. 'आणि, व, अथवा, किंवा' या उभयान्वयी अव्ययांनी ही पदे जोडलेली असतात.**

उदा. रामलक्ष्मण (राम आणि लक्ष्मण),
पापपुण्य (पाप किंवा पुण्य),
विटीदांडू (विटी आणि दांडू)

**द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत.**

(अ) इतरेतर द्वंद्व समास,

(आ) वैकल्पिक द्वंद्व समास,

(इ) समाहार द्वंद्व समास.

### (अ) इतरेतर द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि' 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास **इतरेतर द्वंद्व समास** असे म्हणतात.

जसे- आईबाप (आई आणि बाप), हरिहर (हरि आणि हर), तसेच स्त्रीपुरुष, अहिनकुल, एकवीस, कृष्णार्जुन, बहीणभाऊ इत्यादी.

### (आ) वैकल्पिक द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना 'किंवा' 'अथवा', 'वा' या विकल्प दाखविणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास **वैकल्पिक द्वंद्व समास** असे म्हणतात. जसे- खरेखोटे (खरे किंवा खोटे), तीनचार (तीन किंवा चार), बरेवाईट (बरे किंवा वाईट), पासनापास (पास किंवा नापास).

तसेच पापपुण्य, धर्माधर्म, न्यायान्याय, सत्यासत्य इत्यादी.

### (इ) समाहार द्वंद्व समास

ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो, त्यास **समाहार द्वंद्व समास** असे म्हणतात. जसे- मीठभाकर (मीठ, भाकरी व साधे खाद्यपदार्थ),

- चहापाणी (चहा, पाणी व फराळाचे इतर पदार्थ)
- भाजीपाला (भाजी, पाला, व मिरची, कोथिंबीर यांसारख्या इतर वस्तू)

- अंथरूणपांघरूण (अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे)

तसेच बाजारहाट, पालापाचोळा, केरकचरा, कपडालत्ता, पानपत्रावळ, घरदार इत्यादी.

समासाच्या या प्रकारात समासात आलेल्या आणि त्या जातीच्या इतर वस्तूंच्या समुदायास महत्त्व असते, म्हणून हा समास एकवचनी असतो.

## बहुव्रीही समास

'बहुव्रीही' या शब्दाचा अर्थ 'शेतकरी' किंवा 'धान्यसंपन्न गृहस्थ' असा आहे. (बहु म्हणजे पुष्कळ, व्रीही म्हणजे तांदूळ, धान्य.) 'माझे कोकणातील मामा बहुव्रीही आहेत.' असा जेव्हा मी शब्दप्रयोग करतो, तेव्हा बहुव्रीही या जोडशब्दातील 'बहु' बद्दल मी बोलत नाही किंवा 'व्रीही' म्हणजे धान्याबद्दल मी बोलत नाही. पुष्कळ धान्य ज्यांच्याजवळ आहे अशा मामांच्याबद्दल मी बोलतो.

म्हणजे, **'बहुव्रीही' या सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्त्वाची नसून या दोन पदांशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो. हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असते.**

पुढील वाक्ये वाचा.

(१) पार्वतीने नीलकंठास वरले. (२) समुद्राने पीतांबराला आपली कन्या दिली.

वरील पहिल्या वाक्यात 'नीलकंठ' हा सामासिक शब्द आहे. 'निळा आहे कंठ ज्याचा असा तो' असा त्याचा विग्रह करता येईल. अशा वेळी आपण 'कंठ' या पदाबद्दल प्राधान्याने बोलत असून 'निळा' हे त्याचे विशेषण होईल. इथे विशेषण-विशेष्य असा संबंध असल्यामुळे 'कर्मधारय' समास होईल. पण वरील वाक्यात निळा असा 'कंठ' म्हणजे 'गळा' या शब्दाबद्दल बोलायचे नसून 'निळा आहे कंठ ज्याचा' अशा 'शंकराबद्दल' बोलायचे आहे म्हणजे या सामासिक शब्दातील दोन्ही पदांवरून तिसऱ्या पदाचा बोध होत आहे व 'नीलकंठ' हे 'शंकर' या तिसऱ्याच नामाचे विशेषण आहे.

'पीतांबर' या दुसऱ्या वाक्यातील शब्दाची तीच गोष्ट आहे. पीतांबर म्हणजे पीत (पिवळे) असे वस्त्र. यातील वस्त्राबद्दल फक्त बोलायचे असल्यास हा कर्मधारय समास होईल. पण 'समुद्राने पीतांबराला आपली मुलगी दिली.' या वाक्यातील पीतांबर – पिवळे वस्त्र असा अर्थ घ्यावयाचा नसून 'पीतांबर म्हणजे विष्णू' असा अर्थ घ्यावयाचा आहे म्हणजे पीतांबर या शब्दातील पीत व अंबर या दोन्ही शब्दांना इथे प्राधान्य नसून या दोन शब्दांवरून पिवळे आहे अंबर (वस्त्र) ज्याचे असा 'विष्णू' या तिसऱ्याच पदाला महत्त्व आहे आणि 'पीतांबर' हे 'विष्णू' या निराळ्याच पदाचे विशेषण आहे.

म्हणून ज्या समासातील दोन्ही पदांना प्राधान्य नसून या दोन्हीवरून सूचित होणाऱ्या तिसऱ्याच पदाचा ज्या वेळी बोध होतो, त्यास 'बहुव्रीही समास' असे म्हणतात.

**बहुव्रीही समासाचे मुख्य चार प्रकार आहेत.**

(अ) विभक्ती बहुव्रीही समास (आ) नञ् बहुव्रीही समास

(इ) सह बहुव्रीही समास (ई) प्रादि बहुव्रीही समास

### (अ) विभक्ती बहुव्रीही समास

बहुव्रीही समासाचा विग्रह करताना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते. जसे-

- **लक्ष्मीकांत** - लक्ष्मीचा जो कान्त तो (षष्ठी)
- **गजानन** - गजाचे आहे आनन ज्याला तो (चतुर्थी)

- **जितेंद्रिय** - जित् (जिंकली) आहेत इंद्रिये ज्याने तो (तृतीया)

वरील विग्रहात 'जो, ज्याला, ज्याने' अशी संबंधी सर्वनामांची रूपे आली आहेत. हे संबंधी सर्वनाम ज्या विभक्तीत असते, तिचेच नाव या समासाला देतात, म्हणून वरील तीनही सामासिक शब्द अनुक्रमे षष्ठी, चतुर्थी व तृतीया बहुव्रीही समासाची उदाहरणे आहेत.

विभक्ती बहुव्रीहीचे प्रकार, त्यांचे विग्रह व उदाहरणे पुढील तक्त्यात दिली आहेत.

**विभक्ती बहुव्रीहीचे प्रकार**

| प्रकार | सामासिक शब्द | विग्रह | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| द्वितीया | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो. | प्राप्तोदक, लब्धदृष्टी. |
| तृतीया | कृतकार्य | कृत आहे कार्य ज्याने तो. | जितेंद्रिय, कृतकृत्य, दत्तधन. |
| चतुर्थी | चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो. | दशमुख, गजानन, दुतोंडा |
| पंचमी | निर्धन | निर्गत (गेले) आहे धन ज्याच्यापासून तो | निर्बल, गलितपर्ण, गतवैभव. |
| षष्ठी | लंबोदर | लंब (मोठे) आहे उदर ज्याचे तो | चक्रपाणि, चंद्रशेखर, मूषकवाहन, गरुडध्वज. |
| सप्तमी | भीमादी | भीम आदी आहे ज्यांत तो (पांडव) | कृपादी, नाक [नाही अक (दुःख) ज्यात तो म्हणजे स्वर्ग], पूर्णजल |

या विभक्ती बहुव्रीही समासाचे दोन प्रकार आहेत- (अ) समानाधिकरण बहुव्रीही व (आ) व्यधिकरण बहुव्रीही.

(अ) बहुव्रीही समासाचा विग्रह करताना त्यातील दोन्ही पदे जेव्हा एकाच विभक्तीत असतात, तेव्हा त्याला **समानाधिकरण बहुव्रीही** असे म्हणतात. उदा. भक्तप्रिय - भक्त आहे प्रिय ज्याला तो (देव).

- **जितेंद्रिय** - जित (जिंकलेली) आहेत इंद्रिये ज्याने तो (मारुती).

(आ) ज्या बहुव्रीही समासाचा विग्रह करताना यातील दोन्ही पदे जेव्हा भिन्न किंवा वेगवेगळ्या विभक्तींत असतात तेव्हा त्यास **व्यधिकरण बहुव्रीही** असे म्हणतात. उदा.

- **पद्मनाभ** - पद्म आहे नाभीत (म्हणजे बेंबीत) ज्याच्या तो (विष्णू).
- **चक्रपाणि** - चक्र आहे पाणित (म्हणजे हातात) ज्याच्या तो (विष्णू).

**(आ) नञ् बहुव्रीही समास**

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह पाहा.

- **अनंत** - नाही अंत ज्याला तो (परमेश्वर).
- **नीरस** - नाही रस ज्यात ते (काव्य).

वरील उदाहरणे बहुव्रीही समासाची आहेत, पण या सामासिक शब्दांचे पहिले पद नकारदर्शक आहे. बहुव्रीही समासाचे पहिले पद 'अ, अन, न, नि' असे नकारदर्शक असेल, तर त्यास **नञ्बहुव्रीही समास** असे म्हणतात. उदा. अव्यय, अनेक, नपुंसक, अनादी, निर्धन, निःशब्द, निरोगी इत्यादी.

**(इ) सहबहुव्रीही समास**

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह पाहा.

- **सादर** - आदराने सहित असा जो (नमस्कार).
- **सहकुटुंब** - कुटुंबाने सहित असा जो (गृहस्थ).

वरील उदाहरणे बहुव्रीही समासाची आहेत, पण या सामासिक शब्दांचे पहिले पद 'सह' असे अव्यय आहे. मात्र हा सामासिक शब्द विशेषण असला, तर त्याला **सहबहुव्रीही समास** असे म्हणतात.

(हा शब्द क्रियाविशेषणासारखा वापरला, तर अव्ययीभाव समास होतो.) उदा. सनाथ, सहपरिवार, सुपुत्र, सफल, सरूप, सुवर्ण, सचैल, सानंद, सबल इत्यादी.

**(ई) प्रादिबहुव्रीही समास**

बहुव्रीही समासाचे पहिले पद जर 'प्र, परा, अप, दुर, सु, वि' अशा उपसर्गांनी युक्त असेल, तर त्यास **प्रादिबहुव्रीही समास** असे म्हणतात. (प्रादि = प्र आदि उपसर्ग असलेले) उदा. सुलोचना, निर्धन, विरागी, दुर्गुणी, प्राज्ञ इत्यादी.

**समासविषयक काही महत्त्वाच्या गोष्टी -**

(१) एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येतात. अशा वेळी अर्थास अनुसरून विग्रह करावा व समास ठरवावा. उदा.

- **असत्य** - नाही सत्य ते, सत्य नसलेला (नञ् तत्पुरुष).
- **असत्य** - नाही सत्य ज्यात असे (भाषण) - (नञ् बहुव्रीही).

(२) समासातील पदे संस्कृतमधून आलेली (तत्सम) असतील, तर त्यांचा संधी करावा. जसे-
विद्या+अभ्यास = विद्याभ्यास तसेच जितेंद्रिय, लंबोदर. मराठीत शब्दांचा संधी करण्याकडे कल नसतो. जसे तोंड + ओळख = तोंडओळख, तसेच नाउमेद, पैसाअडका इत्यादी.

(३) भिन्न भाषांतील समास टाळावा. उदा. हेडशिक्षक, डाकगृह, गृहजावई, स्कूलगाडी इत्यादी.

(४) सामासिक शब्दाचे लिंग व वचन हे शेवटच्या शब्दावरून ठरवितात व विभक्तीचे प्रत्यय शेवटच्या शब्दाला लावतात.

साखरभात (पुल्लिंग), पुरणपोळी (स्त्रीलिंग), डाळवांगे (नपुंसकलिंग), मावसबहिणी (अनेकवचन) मामेभावाचा (षष्ठी विभक्ती) इत्यादी.

(५) (१) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द **नामे** किंवा **विशेषण** असतात.
(२) अव्ययीभाव समास असलेला शब्द **क्रियाविशेषण** असतो.
(३) बहुव्रीही समास असलेला शब्द **विशेषण** असतो.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) शब्दांच्या एकत्रीकरणातून जो जोडशब्द तयार होतो, त्याला ............. असे म्हणतात. ①②③④

1) समास 2) सामासिक शब्द
3) जोडाक्षर 4) सर्व पर्याय

2) पहिले पद प्रमुख हे लक्षण ............. समासाचे असते. ①②③④

1) द्वंद्व 2) अव्ययीभाव
3) तत्पुरुष 4) बहुव्रीही

3) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
सुधारणा ①②③④

1) द्विगू समास 2) मध्यमपदलोपी समास
3) बहुव्रीही समास 4) कर्मधारय समास

4) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
पाणकोंबडा ①②③④

1) तत्पुरुष समास 2) द्वंद्व समास
3) अव्ययीभाव समास 4) बहुव्रीही समास

5) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
न्यायान्याय ①②③④

1) मध्यमपद लोपी समास 2) इतरेतर द्वंद्व समास
3) बहुव्रीही समास 4) वैकल्पिक द्वंद्व समास

6) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
दिवाळीदसरा ①②③④

1) अव्ययीभाव समास 2) विभक्ति तत्पुरुष समास
3) इतरेतर द्वंद्व समास 4) नञ बहुव्रीही समास

7) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
सर्वज्ञ ①②③④

1) द्वंद्व समास 2) अव्ययीभाव समास
3) तत्पुरुष समास 4) बहुव्रीही समास

8) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
यथाशास्त्र ①②③④

1) अव्ययीभाव समास 2) तत्पुरुष समास
3) बहुव्रीही समास 4) कर्मधारय समास

9) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
सरसिज ①②③④

1) अलुक् तत्पुरुष समास 2) नञ तत्पुरुष समास
3) विभक्ती तत्पुरुष समास 4) कर्मधारय समास

10) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
शेषशायी ①②③④

1) वैकल्पिक द्वंद्व समास 2) कर्मधारय समास
3) उपपद तत्पुरुष समास 4) नञ बहुव्रीही समास

11) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
निरोगी ①②③④

1) कर्मधारय समास 2) द्वंद्व समास
3) नञ बहुव्रीही समास 4) द्विगू समास

12) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा.
दुर्गुणी ①②③④

1) सहबहुव्रीही समास
2) विभक्ती बहुव्रीही समास
3) प्रादिबहुव्रीही समास
4) नञ बहुव्रीही समास

13) पुढील सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा.
चराचर ①②③④

1) चर आणि अचर
2) चरणात चरण असलेला
3) चरत असलेला
4) चर व अचर असणारा

14) पुढील सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा.
सुवर्ण ①②③④

1) सु जातीचा 2) सु अक्षराचा
3) सु असा वर्ण 4) सर्व पर्याय

15) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

1) प्रादि 2) सह 3) नञ 4) द्विगू

16) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

1) आईवडील 2) गुरुशिष्य

3) खरेखोटे 4) पतिपत्नी

17) 'सप्तरंग' शब्दाचा योग्य समास ओळखा. ①②③④

1) द्वंद्व समास 2) अव्ययीभाव समास

3) तत्पुरुष समास 4) द्विगू समास

18) 'अजरामर' या शब्दातील समास ओळखा. ①②③④

1) अव्ययीभाव समास 2) द्वंद्व समास

3) अलुक् तत्पुरुष समास 4) बहुव्रीही समास

19) 'तथ्याप्रमाणे' असा विग्रह असणारा सामासिक शब्द ओळखा. ①②③④

1) तथ्ययथा 2) यथातथ्य

3) तथ्यातथ्य 4) सर्व पर्याय

20) 'ब्राह्मणवाडा' या शब्दातील समास ओळखा. ①②③④

1) अव्ययीभाव समास 2) द्वंद्व समास

3) बहुव्रीही समास 4) तत्पुरुष समास

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 27 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 2 | 3) 4 | 4) 1 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 3 | 8) 1 | 9) 1 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 3 | 13) 1 | 14) 3 | 15) 4 |
| 16) 3 | 17) 4 | 18) 2 | 19) 2 | 20) 4 |

# २८. शब्दसिद्धी

## आपल्या भाषेतील शब्दसंपत्ती

आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना व्यक्त करण्यासाठी जे शब्द आपण वाक्यात वापरतो, ती आपली मूळ मराठी भाषा. आपण आपल्या भाषेचा व्यवहार शब्दांच्या साहाय्याने करतो. भाषेत प्रथम थोडेच शब्द असतात. तेवढ्या शब्दांनी भागत नाही, म्हणून आपण नवनवीन शब्द बनवितो. इतर भाषांमधूनही आपण शब्द घेऊन आपला व्यवहार साधतो. शेजारच्या प्रांतातील लोकांशी आपले दळणवळण झाले की एकमेकांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. काही काळानंतर त्या भाषेतील शब्द आपल्या भाषेतील शब्द म्हणूनच गणले जातात.

आपल्या भाषेतील मूळ शब्द कोणते, कोणते शब्द आपण इतर भाषांतून जसेच्या तसे घेतले, काहीत बदल कोणता केला व शब्द कसा बनविला, हे पाहणे मोठे मनोरंजक ठरेल. **शब्द कसा बनतो म्हणजेच सिद्ध होतो याला शब्दसिद्धी असे म्हणतात.**

आपली भाषा संस्कृत-प्राकृत या भाषांपासून निर्माण झालेली असल्यामुळे त्या भाषांतील शब्दांचा मोठा ठेवा मराठीत असणे साहजिक आहे.

**(१) तत्सम शब्द :-** 'कवि, मधु, गुरू, पिता, पुत्र, कन्या, वृक्ष, पुरुष, धर्म, सत्कार, समर्थन, उत्सव' वगैरेसारखे शेकडो शब्द संस्कृत भाषेतले असून ते जसेच्या तसे म्हणजे शब्दांच्या रूपांत काही फरक न होता मराठी भाषेत आले आहेत. अशा शब्दांना **तत्सम** (त्यासारखे म्हणजे संस्कृत शब्दासारखे) असे म्हणतात. आणखी काही तत्सम शब्द पाहा.

पुष्प, जल, प्रीति, कर, ग्रंथ, पृथ्वी, भूगोल, विद्‌वान, भगवान, परंतु, यद्यपि, यथामति, कर्ण, पर्ण, अरण्य, हस्त, मस्तक, कर्म, अग्नि, नदी, कमल इत्यादी.

**(२) तद्‌भव शब्द :-** पण कितीतरी संस्कृत शब्द मराठीत येताना त्यांच्या मूळ रूपांत बदल होतो. उदा. कर्ण (कान), चक्र (चाक), अग्नी (आग), पर्ण (पान), विनति (विनंती) वगैरे. अशा ज्या संस्कृत शब्दांच्या मूळ रूपांत बदल होऊन ते मराठीत आलेले आहेत, त्या शब्दांना **तद्‌भव शब्द** असे म्हणतात. आणखी काही तद्‌भव शब्द पाहा.

घर (गृह), पाय (पद), भाऊ (भ्रातृ), सासू (श्वश्रू), सासरा (श्वशुर), गाव (ग्राम), दूध (दुग्ध), घास (ग्रास), कोवळा (कोमल), ओठ (ओष्ठ), काम (कर्म), घाम (घर्म) इत्यादी. (कंसातील शब्द संस्कृत आहेत.)

विशेष म्हणजे एकाच वेळी वरील दोन्ही प्रकारचे शब्द मराठीत वापरले जातात.

तत्सम शब्द व त्याच्यापासून झालेले तद्‌भव शब्द यांत अनेकदा अर्थबदलही होतो.

उदा. कलश - तांब्या (तत्सम शब्द)

कळस - देवळाच्या वरचा भाग (तद्‌भव शब्द)

क्लेश - कष्ट (तत्सम शब्द)

किळस - घाण (तद्भव शब्द)

**(३) देशी किंवा देशज :-** मराठीत असे काही शब्द आढळतात, की ते तत्सम किंवा तद्भव किंवा परभाषीय नाहीत. उदा. झाड, दगड, धोंडा, घोडा, डोळा, डोके, हाड वगैरे. पूर्वी जे आपल्या महाराष्ट्रातील रहिवासी होते, त्यांच्या बोली भाषेतील ते शब्द असावेत. अशा शब्दांची सरळ व्युत्पत्ती मिळत नाही. अशा शब्दांना **देशी, देश्य** किंवा **देशज** शब्द असे म्हणतात. असे आणखी काही शब्द पाहू.

पोट, गुडघा, बोका, रेडा, बाजरी, वांगे, तुगडे, झोप, खुळा, चिमणी, ढेकूण, कंबर इत्यादी.

**(४) परभाषीय शब्द :-** हा शब्दसिद्धीचा एक प्रकार आहे. त्याचे दोन उपप्रकार आहेत. **(अ) परकीय किंवा विदेशी शब्द (ब) स्वदेशी- भारतीय भाषेतील शब्द, परप्रांतीय भारतीय शब्द.**

**(अ) परकीय किंवा विदेशी शब्द -** परकीय किंवा विदेशी शब्दांना काही ऐतिहासिक संदर्भही आहेत. शेकडो वर्षे आपल्या देशावर मुसलमानांची सत्ता होती. महाराष्ट्रातही ती होती. त्यामुळे उर्दू, फारशी, अरबी या भाषांचा प्रभाव अन्य भारतीय भाषांवर पडला, तसा मराठीवरही पडला. त्या भाषांमधील असंख्य शब्द मराठीत आले. जनसामान्यांच्या व्यवहारात ते रुळले.

पुढे इंग्रजांची सत्ता आली. ब्रिटिश राजवटीत इंग्रजी भाषेचा प्रभाव मराठी भाषेवर, लेखनावरही पडला. ब्रिटिशांबरोबरच फ्रेंच, पोर्तुगीज, डचही व्यापारासाठी आले. गोव्यात पोर्तुगिजांची, तर पाँडेचेरीत फ्रेंचांची सत्ता होती. त्यांच्या भाषांमधूनही अनेक शब्द मराठीत आले. असे शब्द हे **विदेशी** किंवा **परभाषीय** किंवा **परदेशी** शब्द होत. आपल्या दैनंदिन व्यवहारात असे कितीतरी शब्द मोठ्या प्रमाणात रुळलेले दिसतात. अशा शब्दांची काही उदाहरणे पाहू.

(१) **इंग्रजी -** टेबल, पेपर, मार्क, नंबर, टीचर, सर, मॅडम, ऑफिस, ट्रेन, रेल्वे, बस, तिकीट, ड्रायव्हर, मोटर, कंडक्टर, स्टेशन, पोस्ट, कार्ड, पार्सल, नर्स, डॉक्टर, पेशंट, इंजेक्शन, हॉस्पिटल, शर्ट, पँट, बटन, बॅट, बॉल, ड्रेस, ग्लास इत्यादी.

(२) **पोर्तुगीज -** बटाटा, तंबाखू, पगार, बिजागरे, कोबी, हापूस, फणस इत्यादी.

(३) **फारसी -** खाना, सामान, हकीकत, अत्तर, अब्रू, पेशवा, पोशाख, सौदागर, कामगार, गुन्हेगार, फडनवीस इत्यादी.

(४) **अरबी -** अर्ज, इनाम, हुकूम, मेहनत, जाहीर, मंजूर, शाहीर, साहेब, मालक इत्यादी.

(**विशेष :-** परभाषेतून मराठीत आलेले जे शब्द आहेत, ते जसेच्या तसे आलेले नाहीत. त्यांच्याही रूपात काही बदल होऊन आलेले आहेत. त्यांच्या रूपांमधील बदल हा अभ्यासाचा एक स्वतंत्र असा विषय आहे.)

**(ब) स्वदेशी शब्द (परप्रांतीय भारतीय शब्द) :-** महाराष्ट्राची जशी मराठी भाषा आहे, तशी गुजरातची गुजराती, मध्यप्रांताची हिंदी, कर्नाटकची कानडी, आंध्रची तेलुगु, तमीळनाडूची तामिळी अशा त्या-त्या प्रांतांच्या भाषा आहेत. मराठीच्या सीमांवर असलेल्या भाषांची व भाषकांची देवाणघेवाण, दळणवळण वर्षानुवर्षे चालू आहे. स्वाभाविकपणे या अन्यप्रांतीय भारतीय (म्हणजे स्वदेशी) भाषांमधील अनेक शब्द मराठीत रूढ झालेले आहेत. त्यांना **स्वदेशी शब्द** किंवा **परप्रांतीय भारतीय शब्द** असे म्हणता येईल. अशा काही शब्दांची उदाहरणे पाहू.

(१) **कानडी :-** अण्णा, अक्का, ताई, अडकित्ता, भाकरी, तूप, कुंची, कांबळे, खलबत्ता, विळी, गुढी, किल्ली, गुंडी, शिकेकाई इत्यादी.

(२) **गुजराती :-** घी, दादर, शेट, दलाल, डबा, रिकामटेकडा इत्यादी.

(३) **तामिळी :-** चिल्लीपिल्ली, सार, मठ्ठा इत्यादी.

(४) **तेलुगु :-** ताळा, अनरसा, किडूकमिडूक इत्यादी.

(५) **हिंदी :-** भाई, बेटा, बच्चा, मिलाप, तपास, दिल, और, बात, दाम, करोड इत्यादी.

या शब्दांमुळे मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीत भर पडली आहे असे आपल्याला दिसते. या शब्दांचे हे तत्सम, तद्भव, देशी व परभाषीय असे चार प्रकार आहेत.

**सिद्ध, साधित, उपसर्ग, प्रत्यय**

आपल्या भाषेचा व्यवहार नीट चालण्यासाठी आपण इतर भाषांमधून शब्द घेतले, हे आपण पाहिले.

आपल्या भाषेच्या माध्यमातून विविध अर्थ व त्यांच्या छटा व्यक्त करणारे शब्द आपल्याला तयार करावे लागतात. भाषेतील शब्दांचे दोन प्रकार असतात. 'जा, ये, कर, बस, बोल, पी' यांसारखे मूळ धातू किंवा शब्द भाषेत असतात. त्यांना **सिद्ध शब्द** असे म्हणतात. 'कर' यांसारख्या सिद्ध शब्दापासून 'करू, करून, कर्ता, करणारा, होकार, प्रतिकार' यांसारखे शब्द बनवितात, त्यांना **साधित शब्द** असे म्हणतात.

मूळ शब्दाच्या किंवा धातूच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही 'साधित शब्द' बनवितात. या अक्षरांना **उपसर्ग** असे म्हणतात. ही अक्षरे अव्ययरूप असतात व ती कधी-कधी त्या मूळ धातूचा अर्थ फिरवितात. उदा. ह्र (हर) या धातूचा मूळ अर्थ 'हरण करणे' किंवा 'नेणे' असा आहे. पण मागे उपसर्ग लागल्यामुळे त्याच्या मूळ अर्थात कसा फरक पडला आहे ते पाहा.

| | |
|---|---|
| आ + हार = आहार = भोजन, | परि + हार = परिहार = निवारण, |
| वि + हार = विहार = क्रीडा, | अप + हार = अपहार = चोरी, |
| सं + हार = संहार = कत्तल, | उप + हार = उपहार = नजराणा, भेट, |
| प्र + हार = प्रहार = घाव, | उप + आ + हार = उपाहार = फराळ. |

हीच गोष्ट इतर धातूंच्या बाबतीतही होते. वरील शब्दांत 'आ, वि, सं, प्र, परि, अप, उप' हे उपसर्ग आहेत. उपसर्ग हे स्वतंत्रपणे येत नाहीत. शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात, त्यांना **उपसर्गघटित शब्द** असे म्हणतात.

शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही शब्द तयार होतात, अशा अक्षरांना **प्रत्यय** असे म्हणतात. जन् (जन्मणे) या धातूला प्रत्यय लागून 'जनन, जनक, जननी, जनता, जन्य' वगैरे शब्द बनतात. या शब्दांत 'न, क, ता, नी, य' हे प्रत्यय होत. अशा तऱ्हेचे प्रत्यय लागून बनलेल्या शब्दांना **प्रत्ययघटित** शब्द असे म्हणतात.

अशा प्रकारे भाषेत दोन प्रकारचे शब्द असतात.

(१) सिद्ध, (२) साधित.

सिद्ध शब्दांचे तीन प्रकार आहेत.

(१) तत्सम, (२) तद्भव, (३) देशी.

साधित शब्दांचे दोन प्रकार- (१) उपसर्गघटित व (२) प्रत्ययघटित.

मराठीतील उपसर्ग व प्रत्यय तीन प्रकारचे आहेत.

(१) संस्कृतमधील, (२) मराठीतील, (३) फारसी-अरबी भाषेतील.

या सर्व उपसर्ग आणि प्रत्ययांचा आपण क्रमाने विचार करू.

## उपसर्गघटित शब्द

**(१) संस्कृतमधील उपसर्ग व त्यांनी युक्त असे काही शब्द खाली दिले आहेत.** (उपसर्गाचा स्थूल अर्थ कंसात दिला आहे.)

| | | | |
|---|---|---|---|
| **अति** | - | (फार, पलीकडे) | अतिशय, अत्यंत, अतिक्रम, अतिरेक, अतिप्रसंग. |
| **अधि** | - | (मुख्य, श्रेष्ठ) | अधिपती, अध्यक्ष, अधिकार, अधिकरण, अध्ययन, अधिदैवत. |
| **अनु** | - | (मागून, सारखे) | अनुकरण, अनुक्रम, अनुभव, अनुवाद, अनुमती, अनुस्वार. |
| **अप** | - | (विरुद्ध, हीन) | अपयश, अपमान, अपकार, अपशब्द, अपशकुन, अपराध. |
| **अभि** | - | (पूर्वी, जवळ) | अभिनंदन, अभिमुख, अभिनय, अभ्युदय, अभिरुची, अभ्यास. |
| **अव** | - | (खाली, विरुद्ध) | अवतरण, अवमान, अवकृपा, अवगुण, अवनत. |
| **आ** | - | (पासून, पर्यंत, पलीकडे) | आजन्म, आमरण, आक्रमण, आकर्ण, आक्रोश. |
| **उत्** | - | (श्रेष्ठ, उंच) | उत्कर्ष, उत्पत्ती, उन्नती, उत्तीर्ण, उद्योग, उत्तम, उत्प्रेक्षा. |
| **उप** | - | (जवळ, गौण) | उपवास, उपनेत्र, उपाध्यक्ष, उपप्रमुख, उपकार, उपपद. |
| **दुस्** | - | (वाईट, दुष्ट) | दुर्गुण, दुर्दशा, दुष्कृत्य, दुर्जन, दुर्लभ. |
| **निर्, नि** | - | (बाहेर, नसलेला) | निर्गत, निर्धन, निर्लज्ज, निरंतर, निकामी, निरोगी. |
| **परा** | - | (उलट, परत) | पराजय, पराक्रम, पराकाष्ठा, पराभव. |
| **परि** | - | (पूर्ण, वाटोळा) | परिपाक, परिपूर्ण, परिणाम, परिवार, परिपाठ, परिश्रम. |
| **प्र** | - | (अधिक, पुढे) | प्रबल, प्रगती, प्रवाह, प्रदोष, प्रकोप, प्रसिद्ध, प्रस्थान. |
| **प्रति** | - | (उलट फिरून) | प्रतिकार, प्रतिबिंब, प्रतिदिन, प्रतिध्वनी, प्रत्येक, प्रतिकूल. |
| **वि** | - | (विशेष, शिवाय) | विख्यात, विज्ञान, विधवा, विसंगती, विपत्ती, विशेष. |
| **सम्** | - | (चांगले, बरोबर) | संस्कार, संस्कृत, संयोग, संगम, संगीत, संतोष, संकल्प. |
| **सु** | - | (चांगले, सोपे) | सुग्रास, सुभाषित, सुकर, सुगम, सुशिक्षित, सुगंध. |

**(२) मराठी उपसर्ग**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ-अन्** | - | (अभाव) | अजाण, अबोल, अनोळखी. |
| **आड** | - | (लहान, गौण) | आडनाव, आडवाट, आडकाठी, आडवळण. |
| **अद** | - | (अर्धा, निम्मा) | अदपाव, अदशेर (अच्छेर), अदकोस. |
| **अव** | - | (हीन, कमी) | अवजड, अवघड, अवदसा, अवकळा, अवलक्षण. |
| **नि** | - | (नसलेला) | निरोगी, निनावी, निकोप, निलाजरा, निकामी. |
| **पड** | - | (दुसरा, गौण) | पडजीभ, पडसाद, पडछाया, पडताळा. |
| **फट** | - | (फार, उघड) | फटफजिती, फटकळ. |
| **भर** | - | (मुख्य, पूर्ण) | भरजरी, भरधाव, भरदिवसा, भरचौकात. |

**(३) फारसी व अरबी उपसर्ग**

| | | | |
|---|---|---|---|
| **ऐन** | - | (मुख्य, पूर्ण) | ऐनहंगाम, ऐनखर्च, ऐनदौलत. |

कम - (अपुरा, कमी) कमनशीब, कमजोर, कमकुवत.

गैर - (वाचून, विना) गैरहजर, गैरशिस्त, गैरसमज, गैरसावध, गैरसोय, गैरहिशेबी.

दर - (प्रत्येक) दररोज, दरसाल, दरशेकडा, दरमहा, दरमजल.

ना - (अभाव) नाउमेद, नाराज, नापसंत, नालायक, नाकबूल.

बद - (वाईट) बदनाम, बदसूर, बदलौकिक, बदफैल, बदअंमल.

बिन - (शिवाय, वाचून) बिनचूक, बिनतक्रार, बिनधोक, बिनहरकत.

बे - (वाचून, शिवाय, रहित) बेडर, बेइनाम, बेअब्रू, बेदम, बेअदबी, बेफिकीर, बेपर्वा, बेगुमान, बेकायदा, बेकार.

सर - (मुख्य) सरकार, सरदार, सरहद्द, सरचिटणीस.

हर - (प्रत्येक) हररोज, हरघडी, हरवख्त, हरसाल, हरकामी.

## प्रत्ययघटित शब्द

प्रत्यय दोन प्रकारचे असतात.

**(१) कृत् किंवा धातुसाधित** :- धातूंना जोडले जातात ते 'कृत्' प्रत्यय. कृत्-प्रत्यय जोडल्याने जे शब्द तयार होतात, त्यांना 'कृदन्त' असे म्हणतात.

**(२) तद्धित किंवा नामसाधित** :- नामे, सर्वनामे, विशेषणे आणि अव्यये यांना काही प्रत्यय लागून त्यांच्यापासून बनलेल्या शब्दांना 'तद्धिते' म्हणतात.

**(१) संस्कृत प्रत्यय व त्यांपासून बनलेली धातुसाधिते (कृदन्ते)**

अ - (कर्तृवाचक) चोर, देव, सर्प, भाव, लाभ.

अक - (कर्तृवाचक) लेखक, रक्षक, पाचक, तारक, मारक, गायक, जनक.

अन - (साधनार्थक) नयन, चरण, वदन, नंदन, पालन.

अना - (स्त्रीलिंगी नामे) प्रार्थना, वेदना, कल्पना, तुलना, वंदना.

अनीय - (योग्यार्थक) श्रवणीय, मननीय, रमणीय, पूजनीय, वंदनीय.

आ - (क्रियावाचक नामे) इच्छा, कथा, गुहा, चिंता.

इ-ई - (कर्तृवाचक) हरि (हरण करणारा), त्यागी, भाषी.

इक - (विशेषणे) रसिक (रस घेणारा), पथिक.

त - (भूतकालवाचक) कृत, मृत, त्यक्त, हत, नत, रत, भूत (झालेले).

तृ (ता) - (कर्तृवाचक) त्राता, भर्ता, श्रोता, वक्ता, दाता, नेता, शास्ता.

तव्य - (योग्यार्थक) कर्तव्य, श्रोतव्य, गन्तव्य, भवितव्य.

ति - (स्त्रीलिंगी नामे) कृति, स्तुति, नीति, युक्ति, शक्ति.

य - (योग्यार्थक) कार्य (करण्यास योग्य), देय, पेय, त्याज्य, भोग्य.

**(२) मराठी प्रत्यय व त्यांपासून बनलेली धातुसाधिते**

अ - (क्रियावाचक नामे) कर, डर, लूट, फूट, खोट, तूट, मेळ, फोड.

आ - (क्रियावाचक नामे) ओढा, ठेवा, झगडा, ठेचा, वेढा, पुकारा.

आई - (क्रियेची मजुरी) खोदाई, चराई, घडाई, उजळाई, शिलाई.

| | | | |
|---|---|---|---|
| आऊ | - | (योग्यतादर्शक) | टाकाऊ, जळाऊ, लढाऊ, विकाऊ, शिकाऊ. |
| आरी | - | (कर्तृवाचक) | पुजारी, पिंजारी, रंगारी. |
| आळू | - | (विशेषणे) | झोपाळू, विसराळू, लाजाळू, कनवाळू |
| ई | - | (क्रियावाचक नामे) | कढी, मोडी, उडी, बुडी, रडी, थुंकी, बोली. |
| ईक | - | (विशेषणे) | सडीक, पडीक, पढीक. |
| ईत | - | (विशेषणे) | लखलखीत, चकचकीत. |
| ईव | - | (विशेषणे) | रेखीव, जाणीव, कोरीव, घोटीव, पाळीव, आटीव. |
| ऊ | - | (विशेषणे, नामे) | चालू, लागू, झाडू, उतारू. |
| ऊन | - | (अव्यये) | करून, देऊन, बसून, उडून, रडून, हसून. |
| खोर | - | (विशेषणे) | भांडखोर, चिडखोर. |
| णावळ | - | (क्रियेचे मोल) | धुणावळ, लिहिणावळ, दळणावळ. |
| प | - | (क्रियावाचक) | दळप, कांडप, वाढप. |
| पी | - | (कर्तृवाचक) | वाढपी, दळपी, कांडपी. |
| णारा | - | (कर्तृवाचक विशेषण) | लिहिणारा, बोलणारा. |
| रा | - | (युक्तार्थक) | हसरा, नाचरा, बुजरा, दुखरा, कापरा, धावरा. |

## शब्दसाधिते किंवा तद्धिते

वर दिलेले प्रत्यय हे धातूंना लागून त्यापासून नवीन शब्द तयार होतात. धातूखेरीज इतर शब्दांना प्रत्यय लागून जे नवीन शब्द तयार होतात, त्यांना शब्दसाधिते किंवा तद्धिते असे म्हणतात. असे काही शब्द पुढे दिले आहेत.

**(१) संस्कृत प्रत्यय लागून तयार झालेले तद्धित शब्द**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | - | (अपत्यार्थक) | (यदु+अ) यादव, राघव, पांडव, भार्गव, सौभद्र. |
| इक | - | (संबंधार्थक) | कायिक, वाचिक, मानसिक, मासिक, लौकिक, धार्मिक. |
| इत | - | (युक्तार्थक) | आनंदित, दुःखित, मूर्च्छित, उत्कंठित. |
| ईन | - | (युक्तार्थक) | कुलीन, शालीन, नवीन. |
| कीय | - | (संबंधार्थक) | परकीय, राजकीय, स्वकीय. |
| त्व | - | (भावार्थक) | महत्त्व, विद्वत्व, जडत्व, मूर्खत्व, गुरूत्व. |
| मान-वान | - | (युक्तार्थक) | बुद्धिमान, धनवान, विद्वान, श्रीमान. |

**(२) मराठी प्रत्यय लागून झालेली शब्दसाधिते (तद्धिते)**

| | | | |
|---|---|---|---|
| आ | - | (नामे) | वेडा, ठेवा, ठेचा, भरडा, गारठा, ओढा. |
| आई | - | (भाववाचक) | शिलाई, लढाई, विटाई, दांडगाई, शिष्टाई, खोदाई. |
| ई | - | (नामे) | उडी, बुडी, बोली, चोरी, सावकारी. |
| ई | - | (विशेषणे) | मापी, वजनी, लाकडी, पितळी. |
| कर | - | (विशेषणे) | सुखकर, खेळकर, खोडकर, दिनकर, प्रभाकर. |

| | | |
|---|---|---|
| करी - | (नामे) | शेतकरी, देणेकरी, भाडेकरी, वारकरी, पहारेकरी. |
| कट - | (युक्तार्थक) | तेलकट, मातकट, धुरकट, मळकट, पोरकट. |
| की - | (भाववाचक) | माणुसकी, उनाडकी, पाटीलकी, शेतकी, गावकी. |
| खोर - | (युक्तार्थक) | भांडखोर, चिडखोर, चहाडखोर, चेष्टेखोर. |
| वाईक - | (नामे) | नातेवाईक, आस्थेवाईक, तन्हेवाईक, मासलेवाईक. |
| सर - | (सारखा) | गोडसर, वेडसर, काळसर, ओलसर, भोळसर |

**(३) फारसी प्रत्यय लागून झालेले काही तद्धित शब्द**

| | | |
|---|---|---|
| गर, गार - | (कर्तृवाचक) | सौदागर, जादूगार, जिनगर, गुन्हेगार, माहीतगार, कामगार. |
| वान - | | बागवान. |
| ई - | (भाववाचक) | खुशी, मजुरी, नेकी, हमाली, फकिरी. |
| स्तान - | (स्थानदर्शक) | अरबस्तान, तुर्कस्तान, कबरस्तान. |
| गिरी - | (भाववाचक) | गुलामगिरी, मुलुखगिरी, कारागिरी. |
| दार - | (राखणारा) | दुकानदार, फौजदार, जमीनदार, पोतदार. |
| | (असलेला) | इमानदार, अब्रूदार, धारदार, घाटदार, डौलदार. |
| दान - | (स्थानदर्शक) | कलमदान, शामदान |
| दाणी - | | अत्तरदाणी, पिकदाणी, चहादाणी. |
| बाज - | (खेळणारा, रमणारा) | दारूबाज, नखरेबाज, कुर्रेबाज, नफेबाज, दगलबाज. |
| बंद - | (बांधणारा) | नालबंद, पगडबंद, हत्यारबंद, चिरेबंद. |
| खाना - | (ठिकाण, गृह) | कारखाना, तोफखाना, दवाखाना, हत्तीखाना, दारुखाना. |
| नवीस - | (लिहिणारा) | चिटनवीस, फडनवीस, कारखानवीस, |
| णीस - | | चिटणीस, फडणीस. |
| आबाद - | (स्थानदर्शक) | औरंगाबाद, हैदराबाद, अहमदाबाद. |
| नामा - | (पत्र, ग्रंथ) | हुकुमनामा, करारनामा, पंचनामा, जाहीरनामा. |

आतापर्यंत आपण साधित शब्दांचे दोन प्रकार पाहिले- **(१) उपसर्गघटित व (२) प्रत्ययघटित.** साधित शब्दांचा तिसरा प्रकार म्हणजे **सामासिक शब्दांचा.**

देवघर, पोळपाट, घरजावई, नीळकंठ, दारोदार यांसारखे जोडशब्द दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊनच बनलेले असतात. समासाचा विचार आपण स्वतंत्र पाठात केलाच आहे.

**अभ्यस्त शब्द -** साधित शब्दांचा चौथा प्रकार म्हणजे अभ्यस्त शब्दांचा. घरघर, हळूहळू, शेजारीपाजारी, दगडबिगड यांसारख्या शब्दांत एकाच शब्दाचा किंवा काही अक्षरांचा अभ्यास (पुनरावृत्ती किंवा द्वित्व) होऊन हे शब्द बनलेले असतात. अभ्यस्त म्हणजे द्वित्व किंवा दुप्पट करणे. अभ्यस्त शब्दांचे तीन प्रकार मानतात.

(१) पूर्णाभ्यस्त, (२) अंशाभ्यस्त, (३) अनुकरणवाचक.

**(१) पूर्णाभ्यस्त शब्द**

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) मदत मिळविण्यासाठी तो घर घर फिरला. (नामे)

(२) जे-जे चकाकते ते-ते सोने नसते. (सर्वनामे)

(३) बाजारातून मी लाललाल टोमॅटो आणले. (विशेषण)

(४) घेईघेई माझे वाचे, गोड नाम विठोबाचे. (क्रियापद)

(५) मधूनमधून असेच घराकडे येत जा. (क्रियाविशेषणे)

(६) शत्रूंची सैन्ये समोरासमोर तळ ठोकून होती. (शब्दयोगी)

(७) वा! वा! केव्हा आलात तुम्ही! (केवलप्रयोगी)

वरील वाक्यांत शब्दांच्या निरनिराळ्या जातींचा एकच शब्द द्विरुक्त झालेला दिसून येतो. अशा प्रकारे एक पूर्ण शब्द जेव्हा पुनःपुन्हा येऊन एक जोडशब्द बनतो, तेव्हा त्याला **पूर्णाभ्यस्त शब्द** म्हणतात. आणखी काही उदाहरणे - तिळतिळ, हालहाल, तुकडेतुकडे, कोणीकोणी, एकेक, हळूहळू, पुढेपुढे, मागोमाग, हायहाय.

पुनरुक्त व अभ्यस्त यांमधील अंतर यांच्या उच्चारण पद्धतीत दिसून येते. जसे-

(पुनरुक्त) तो हळू हळू चालतो. (इथे कर्त्याची भावना व्यक्त होते.)

(अभ्यस्त) तो हळूहळू चालतो. (इथे क्रियेचा विशेष दर्शविला जातो.)

कित्येक वेळा या द्विरुक्त शब्दांच्या मागे च, चे, च्या, ल्या अशांसारखे प्रत्यय येऊन अतिशयत्व, साकल्य सूचित केलेले असते. उदा. पैसाचपैसा, लांबचलांब, वरचेवर, वरच्यावर, वरल्यावर, मधल्यामधे, खालच्याखाली, आतल्याआत.

**(२) अंशाभ्यस्त शब्द**

काही वेळा हा शब्द तसाच पुन्हा न येता त्यातील एखादे अक्षर बदलून येते. या अक्षर बदलून आलेल्या शब्दाला वेगळा अर्थ नसतो. स्वतंत्रपणे तो वापरला जात नाही. केवळ निरर्थक अक्षरे वापरून यमक साधण्याचा प्रयत्न असतो. उदा. शेजारीपाजारी, झाडबीड, बारीकसारीक, उरलासुरला, आडवातिडवा, अर्धामुर्धा, अघळपघळ, दगडबिगड, गोडधोड, किडूकमिडूक, घरबीर, उद्याबिद्या इत्यादी.

कधी-कधी पहिल्या नामाच्या अर्थाचेच नाम जोडून द्विरुक्ती होते. उदा. कागदपत्र, कामकाज, कपडालत्ता, बाजारहाट, साजशृंगार, बाडबिस्तरा अशा शब्दांत समानार्थक शब्दांचा समास साधलेला असतो. जसे-

| | |
|---|---|
| **(१) (फारसी + फारसी)** | अक्कलहुशारी, डावपेच, जुलूमजबरी. |
| **(२) (फारसी + मराठी)** | अंमलबजावणी, कागदपत्र, खर्चवेच, मेवामिठाई, बाजारहाट इत्यादी. |
| **(३) (मराठी + फारसी)** | दंगामस्ती, थट्टामस्करी, धनदौलत, मानमरातब, रीतरिवाज इत्यादी. |

**(३) अनुकरणवाचक शब्द**

काही शब्दांत एखाद्या ध्वनिवाचक शब्दाची पुनरुक्ती साधलेली असते. उदा. बडबड, किरकीर, गुटगुटीत, कडकडाट, गडगडाट, फडफड, खदखदून, तुरूतुरू, लुटूलुटू, चुटचुट, गडगड, वटवट अशा शब्दांना **अनुकरणवाचक शब्द** म्हणतात.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) खालील शब्दांपैकी तद्भव शब्द ओळखा. ①②③④
1) अडकित्ता 2) भाई
3) कन्या 4) गाव

2) 'तथापि' शब्दाचा प्रकार ओळखा. ①②③④
1) तद्भव 2) तत्सम
3) परभाषीय 4) कानडी

3) 'सार' हा शब्द .............. या भाषेतील आहे. ①②③④
1) तमिळी 2) हिंदी 3) कानडी 4) तेलगू

4) पुढीलपैकी तत्सम शब्द ओळखा. ①②③④
1) गृह 2) घाण 3) बटाटा 4) अर्ज

5) पुढीलपैकी तद्भव शब्द ओळखा. ①②③④
1) नर्स 2) आग 3) पुष्प 4) मंजूर

6) पुढीलपैकी तद्भव शब्द ओळखा. ①②③④
1) किडूकमिडूक 2) कर्म
3) मिलाप 4) काम

7) पुढीलपैकी देशी शब्द ओळखा. ①②③④
1) अत्तर 2) पेशवा 3) झोप 4) इनाम

8) पुढीलपैकी देशी शब्द ओळखा. ①②③④
1) कंबर 2) सौदागर
3) फणस 4) ट्रेन

9) पुढीलपैकी परकीय शब्दाचा पर्याय निवडा. ①②③④
1) झाड 2) बिजागरे
3) रेडा 4) भाई

10) पुढीलपैकी स्वदेशी शब्दाचा पर्याय निवडा. ①②③④
1) गुढघा 2) कलश 3) लुगडे 4) करोड

11) पुढीलपैकी सिद्ध शब्द पर्याय निवडा. ①②③④
1) टेबल 2) कर 3) करून 4) पोशाख

12) पुढीलपैकी साधित शब्दाचा पर्याय निवडा. ①②③④
1) दादर 2) पेपर
3) ये 4) करणारा

13) पुढीलपैकी उपसर्गघटित शब्द पर्याय निवडा. ①②③④
1) अपकार 2) खोदाई
3) शिलाई 4) बोली

14) पुढीलपैकी प्रत्ययघटित शब्द पर्याय निवडा. ①②③④
1) कामकाज 2) घाण
3) नापसंत 4) रसिक

15) पुढीलपैकी साधित शब्दाचा पोटप्रकार ओळखा.
दारोदार ①②③④
1) सामासिक शब्द 2) उपसर्गघटित शब्द
3) प्रत्ययघटित शब्द 4) अभ्यस्त शब्द

16) पुढीलपैकी साधित शब्दाचा पोटप्रकार ओळखा.
बाडबिस्तरा ①②③④
1) अंशाभ्यस्त शब्द 2) पूर्णाभ्यस्त शब्द
3) सामासिक शब्द 4) प्रत्ययघटित शब्द

17) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④
1) अरण्य 2) ओठ 3) दूध 4) सासरा

18) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④
1) दलाल 2) भाकरी
3) विळी 4) खलबत्ता

19) गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④
1) अवगुण 2) उडून
3) कमजोर 4) सुग्रास

20) अर्ज, इनाम, मेहनत, मालक, इ. शब्दांची परकीय भाषा कोणती? ①②③④
1) पोर्तुगीज 2) अरबी
3) इंग्रजी 4) फारसी

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 28 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 4 | 2) 2 | 3) 1 | 4) 1 | 5) 2 |
| 6) 4 | 7) 3 | 8) 1 | 9) 2 | 10) 4 |
| 11) 2 | 12) 4 | 13) 1 | 14) 4 | 15) 1 |
| 16) 1 | 17) 1 | 18) 1 | 19) 2 | 20) 2 |

# २१. वाक्यपृथक्करण

## वाक्यांचे विभाग

आपल्या बोलण्यातून अनेक वाक्ये एकामागून एक येत असतात. त्यांतील प्रत्येक वाक्य हे एक संपूर्ण विधान असते. प्रत्येक वाक्यात आपण कोणाबद्दल काहीतरी बोलतो; म्हणजे विधान करतो. बोलण्यात ज्याच्याविषयी बोलतो त्याला **उद्देश्य** असे म्हणतात व उद्देश्याविषयी तो जे बोलतो त्याला **विधेय** असे म्हणतात. प्रत्येक वाक्यात उद्देश्य व विधेय या गोष्टी असतात.

पुढील वाक्य पाहा.

- त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला.

हे एक वाक्य आहे. यात कोणते विधान केले आहे? 'खेळला' हे. हे विधान कोणाला उद्देशून केले आहे? 'मुलगा' याच्याबद्दल म्हणजे या वाक्यात 'मुलगा' उद्देश्य व खेळला हे विधेय. पण या वाक्यात एवढे दोनच शब्द नाहीत. 'त्याचा धाकटा' या दोन शब्दांनी 'उद्देश्यविस्तार' केला आहे. 'आज, क्रिकेटच्या सामन्यात चांगला' या शब्दांनी तो केव्हा, कोठे व कसा खेळला हे सांगितले आहे. विधेयाचा विस्तार या चार शब्दांनी केलेला आहे. याचा अर्थ असा की, वाक्यात उद्देश्य व विधेय एवढेच शब्द न येता त्यांचा विस्तार करणारे शब्दही येतात, म्हणून वाक्याचे दोन भाग पडतात. (१) उद्देश्य विभाग व (२) विधेय विभाग यांना **(१) उद्देश्यांग व (२) विधेयांग** असेही म्हणतात.

वरील वाक्य उद्देश्य विभाग व विधेय विभाग या कोष्टकात असे मांडता येईल.

| उद्देश्य विभाग | | विधेय विभाग | |
|---|---|---|---|
| उद्देश्य विस्तार | उद्देश्य | विधेय विस्तार | क्रियापद |
| त्याचा धाकटा | मुलगा | आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला | खेळला |

## वाक्यांचे प्रकार

वाक्यांचे त्यांच्या अर्थानुरोधाने विविध प्रकार होतात, ते पुढीलप्रमाणे -

(१) ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते, त्यास **विधानार्थी** वाक्य म्हणतात. उदा. माझे वडील आज परगावी गेले.

(२) ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो, त्यास **प्रश्नार्थी** वाक्य म्हणतात. उदा. तू मुंबईस केव्हा जाणार आहेस?

(३) ज्या वाक्यात भावनेचा उद्‌गार काढलेला असतो, त्यास **उद्‌गारार्थी** वाक्य म्हणतात. उदा. अबब! केवढी प्रचंड आग ही!

(४) वाक्यातील विधाने ही कधी-कधी **होकारार्थी** असतात. जसे - गोविंदा अभ्यास करतो. पण कधी-

कधी विधानात नकार असतो. जसे - त्याचा मुलगा मुळीच अभ्यास करत नाही. अशा वाक्यांना **नकारार्थी** वाक्य म्हणतात. या होकारार्थी व नकारार्थी वाक्यांनाच अनुक्रमे **करणरूपी** व **अकरणरूपी** वाक्ये म्हणतात.

**क्रियापदाच्या रूपावरूनही वाक्याचे प्रकार पडतात.**

(१) वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून नुसताच काळाचा बोध होत असेल, तर त्यास **स्वार्थी** वाक्य म्हणतात. उदा. मुले घरी गेली - जातात - गेली - जातील.

(२) वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, आशीर्वाद, प्रार्थना, विनंती किंवा उपदेश या गोष्टींचा बोध होत असेल, तर त्यास **आज्ञार्थी** वाक्य म्हणतात. उदा.

मुलांनो, चांगला अभ्यास करा.

परमेश्वरा, मला चांगली बुद्धी दे.

(३) वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून विधी म्हणजे कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होत असेल, तर त्यास **विध्यर्थी** वाक्य म्हणतात. उदा. मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी. मला परीक्षेत पहिला वर्ग मिळावा.

(४) वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमुक केले असते, तर अमुक झाले असते अशी अट किंवा संकेत असा अर्थ निघत असेल, तर त्यास **संकेतार्थी** वाक्य म्हणतात. उदा. पाऊस पडला असता तर हवेत गारवा आला असता.

याशिवाय एका वाक्यात किती विधाने असतात, त्यावरून वाक्यांचे आणखी तीन प्रकार मानले जातात-

**(१) केवल (२) मिश्र (३) संयुक्त**

### (१) केवलवाक्य

पुढील वाक्ये वाचा.

(१) आम्ही जातो आमुच्या गावा. (२) तानाजी लढता-लढता मेला.

वरील प्रत्येक वाक्यात एकेकच विधान आहे म्हणजे प्रत्येकात एकच उद्देश्य व एकच विधेय आहे. पहिल्या वाक्यात 'आम्ही' व दुसऱ्या वाक्यात 'तानाजी' ही उद्देश्ये आहेत. तसेच पहिल्या वाक्यात 'जातो' व दुसऱ्या वाक्यात 'मेला' ही विधेये आहेत.

**ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते, त्यास केवल किंवा शुद्ध वाक्य म्हणतात.**

हे केवलवाक्य साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी वा नकारार्थी कोणत्याही प्रकारचे असू शकेल.

### (२) मिश्रवाक्य

पुढील वाक्ये वाचा.

(१) जे चकाकते, ते सोने नसते.

(२) गुरुजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.

(३) आकाशात जेव्हा ढग जमतात, तेव्हा मोर नाचू लागतो.

यातील पहिल्या वाक्यात 'जे चकाकते' हे एक केवलवाक्य आहे व 'ते सोने नसते.' हे दुसरे केवलवाक्य आहे. त्यातील 'जे चकाकते' हे अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र वाक्य नाही; 'ते सोने नसते.' या स्वतंत्र वाक्यावर ते अवलंबून आहे. जे वाक्य स्वतंत्र असते, त्यास 'मुख्य' किंवा **प्रधानवाक्य** म्हणतात व अवलंबून असणाऱ्या वाक्याला **गौणवाक्य** किंवा **पोटवाक्य** असे म्हणतात. दुसऱ्या वाक्यात 'गुरुजी म्हणाले' हे मुख्य वाक्य असून 'प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.' हे गौणवाक्य 'की' या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडले आहे. तिसऱ्या वाक्यात 'आकाशात जेव्हा ढग जमतात' हे गौण वाक्य आहे. ते 'तेव्हा मोर नाचू लागतो.' या प्रधानवाक्यास

'जेव्हा' या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडलेले आहे. अशा रीतीने **एक प्रधानवाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक संमिश्र वाक्य तयार होते, त्यास मिश्र वाक्य असे म्हणतात.**

**(३) संयुक्तवाक्य**

पुढील वाक्ये वाचा.

(१) मी रोज सकाळी पहाटे उठतो **व** एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.

(२) सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो **किंवा** मित्रांबरोबर फिरावयास जातो.

वर दोन वाक्ये दिली आहेत. यातील प्रत्येक वाक्यात एकच विधान नसून प्रत्येकात दोन विधाने आहेत. प्रत्येक विधान हे स्वतंत्र केवलवाक्य आहे. पहिल्या वाक्यात दोन स्वतंत्र केवलवाक्ये **'व'** या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत व दुसऱ्या वाक्यातही दोन स्वतंत्र वाक्ये **'किंवा'** या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत. 'व', 'किंवा' ही प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्यये आहेत. अशी अव्यये दोन वाक्यांना जोडतात व ही जोडलेली वाक्ये अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात म्हणजेच एकमेकांवर अवलंबून नसतात. अशा रीतीने **दोन किंवा अधिक केवलवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता जे एक जोडवाक्य तयार होते, त्यास संयुक्त वाक्य म्हणतात.**

संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक केवलवाक्येच असतात असे नाही. दोन किंवा अधिक मिश्रवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली गेली असतील किंवा एक केवलवाक्य मिश्र वाक्याशी प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडले गेले असेल, तर त्यासही **संयुक्त वाक्य** म्हणतात.

संयुक्त वाक्याचे प्रकार तीन - **(१) केवल संयुक्त (केवल + केवल), (२) मिश्रसंयुक्त (मिश्र + मिश्र) व (३) केवलमिश्र संयुक्त (केवल + मिश्र).**

मिश्रवाक्य व संयुक्त वाक्य यांत फरक असा- **मिश्रवाक्यात एकच वाक्य प्रधान असते, बाकीची सर्व गौण असतात. संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक प्रधानवाक्ये असतात.**

## वाक्यपृथक्करण म्हणजे काय?

पुढील वाक्य पाहा : त्याच्या हुशार मुलाने यंदा पहिली शिष्यवृत्ती सहज मिळविली.

हे एक केवलवाक्य आहे. या वाक्याचे प्रथम दोन विभाग पाडू : (१) 'त्याच्या हुशार मुलाने' हा उद्देश्यविभाग असून (२) 'यंदा पहिली शिष्यवृत्ती सहज मिळविली' हा विधेयविभाग आहे.

अशा प्रकारच्या वाक्यातील मूळ उद्देश्य कोणता, त्याचा विस्तार करणारे शब्द कोणते हे वेगळे करून सांगता आले पाहिजे. तसेच, विधेयविभागात मुख्य क्रियापद कोणते? ते सकर्मक असल्यास त्याचे कर्म व त्या कर्माबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द कोणते? विधानपूरके असतील तर ती कोणती? व विधेयाबद्दल अधिक माहिती सांगणारे म्हणजे विधेयाचा विस्तार करणारे शब्द कोणते? - हे उलगडून सांगता आले पाहिजे.

अशा रीतीने वाक्यातील विविध शब्दांचा किंवा वाक्यांतील विविध घटकांचा परस्परांशी कोणता संबंध आहे हे विशद करून सांगणे यालाच 'वाक्यपृथक्करण' असे म्हणतात.

(पृथक् म्हणजे वेगळे व पृथक्करण म्हणजे वाक्यातील घटक वेगळे करून दाखविणे.)

केवलवाक्यात कोणकोणते घटक असू शकतात ते पुढे दिलेल्या तक्त्यात पाहा :

## केवलवाक्याचे घटक

| उद्देश्यविभाग | | विधेयविभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म व कर्मविस्तार | विधानपूरक | विधेयविस्तार | क्रियापद |

## केवलवाक्याचे पृथक्करण

वाक्यपृथक्करणासाठी केवलवाक्य दिल्यानंतर त्या वाक्यातील मुख्य शब्द म्हणजे क्रियापद आपण प्रथम शोधून काढावे व ती क्रिया करणारा कोण? असा प्रश्न करून कर्ता शोधावा. हा कर्ता तक्त्यातील 'उद्देश्य' या सदरात ठेवावा. या उद्देश्याबद्दल विशेष माहिती सांगणारे जर काही शब्द असतील तर ते 'उद्देश्यविस्तार' या सदरात ठेवावेत. हे सदर मराठी तक्त्यात उद्देश्याच्या अगोदर असणे बरे. क्रियापद सकर्मक असेल तर त्याचे कर्म शोधून ते 'कर्म' या सदरात ठेवावे. कर्माबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द असल्यास ते याच रकान्यात ठेवावेत. क्रियापद अकर्मक असल्यास 'कर्म' हे सदर कोरे ठेवावे. हे अकर्मक क्रियापद अपुऱ्या अर्थाचे असल्यास तो अर्थ पुरा करणारे शब्द 'विधानपूरक' या सदरात घालावेत. शेवटी क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणारे जे काही शब्द असतील ते 'विधेयविस्तार' या सदरात घालावेत.

पुढे पाच केवलवाक्ये दिली आहेत. अशा केवलवाक्यांचे पृथक्करण कोणत्या पद्धतीने करतात हे पुढील तक्त्यात सोडवून दाखविले आहे. त्याचा नीट अभ्यास करा :

१) अलीकडे मी तुम्हाला एकही पत्र लिहिले नाही.

२) एकदा बागेत खेळताना आमचा कुत्रा काळूराम हौदात पडला.

३) पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात.

४) शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.

५) एके दिवशी युद्ध बंद झाल्याची बातमी येऊन थडकली.

| क्र. | उद्देश्यविभाग | | विधेयविभाग | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म व कर्मविस्तार | विधान पूरक | विधेयविस्तार | क्रियापद |
| १) | - | मी | तुम्हाला एकही पत्र | - | अलीकडे | लिहिले नाही |
| २) | आमचा कुत्रा | काळूराम | - | - | बागेत खेळताना हौदात एकदा | पडला |
| ३) | पांढरे स्वच्छ | दात | मुखास शोभा | - | - | देतात |
| ४) | - | गुलमोहर | - | मोहक | शरदाच्या चांद-ण्यात | दिसतो |
| ५) | युद्ध बंद झाल्याची | बातमी | - | - | येऊन, एके दिवशी | थडकली |

## सरावासाठी

**पुढील केवलवाक्यांचे पृथक्करण तक्त्यात करा :**

१) गांधीजींना सुताच्या माळा अधिक आवडत.

२) पावसाळ्यात सगळीच झाडे हिरवी होतात.

३) जुन्या काळच्या आजीचे चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभे राहिले.

४) शत्रूंच्या सैन्याचा धुव्वा उडवीत आपले जवान एकएक ठाणे जिंकत होते.

५) शिकारी लोकांना आपल्या बंदुकीचा भारी अभिमान असतो.

आता मिश्रवाक्याचे पृथक्करण कसे करतात ते पाहू :

## मिश्रवाक्याचे विभाग

मिश्रवाक्यात एक मुख्य किंवा प्रधानवाक्य असते व इतर वाक्ये अर्थाच्या दृष्टीने त्या मुख्यवाक्यावर अवलंबून असलेली अशी अवलंबी किंवा गौणवाक्ये असतात. ही गौणवाक्ये मुख्यवाक्याशी गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. या गौणवाक्यातही तीन प्रकार आढळतात.

## गौणवाक्यांचे प्रकार

पुढील वाक्ये पाहा :

१) गुरुजी म्हणाले की **एकी हेच बळ**.

२) **जे चकाकते** ते सारे सोने नसते.

३) **दिव्यत्वाची** जेथ **प्रचीती**, तेथे कर माझे जुळती.

यांतील पहिल्या वाक्यात 'गुरुजी म्हणाले' हे प्रधानवाक्य आहे, व 'एकी हेच बळ' हे गौणवाक्य आहे. 'गुरुजी म्हणाले' यातील 'म्हणाले, या क्रियापदाचे कर्म कोणते? 'एकी हेच बळ', हे गौणवाक्य कर्माच्या जागी आले आहे; म्हणजे हे गौणवाक्य या वाक्यात कर्माचे कार्य करते. कर्माच्या जागी नाम येत असते, म्हणजे 'एकी हेच बळ' हे गौणवाक्य येथे नामाचे कार्य करते. नामाचे कार्य करणाऱ्या गौणवाक्याला **'नामवाक्य'** म्हणतात.

दुसऱ्या वाक्यात 'ते सारे सोने नसते' हे प्रधानवाक्य आहे; व 'जे चकाकते' हे गौणवाक्य आहे. या मिश्रवाक्यात 'जे चकाकते' याचे कार्य कोणते? मुख्य वाक्यातील 'ते' या सर्वनामाबद्दल ते विशेष माहिती सांगते. नाम किंवा सर्वनाम यांच्याबद्दल विशेष अशी माहिती देणाऱ्या शब्दाला आपण 'विशेषण' म्हणतो. म्हणजे 'जे चकाकते' हे गौणवाक्य विशेषणाचे कार्य करते. याला **'विशेषणवाक्य'** म्हणतात.

तिसऱ्या वाक्यात 'तेथे कर माझे जुळती' हे प्रधानवाक्य आहे, तर 'दिव्यत्वाची जेथ प्रचीती' हे गौणवाक्य. 'तेथे' माझे कर जुळती, म्हणजे कोठे? जेथे दिव्यत्वाची प्रचीती येते तेथे. म्हणजे 'जुळती' या क्रियापदाचे ते स्थळ दाखविते. क्रियापदाचे स्थळ दाखविण्याचे काम हे क्रियाविशेषणाचे. म्हणून 'दिव्यत्वाची जेथ प्रचीती' हे गौणवाक्य या मिश्रवाक्यात क्रियाविशेषणाचे कार्य करते. अशा वाक्याला **'क्रियाविशेषणवाक्य'** म्हणतात.

अशा प्रकारे गौणवाक्याचे तीन प्रकार आहेत : (१) नामवाक्य, (२) विशेषणवाक्य, (३) क्रियाविशेषणवाक्य. यांचेही विविध पोटप्रकार आढळतात. त्यांचा क्रमाने विचार करू.

**नामवाक्ये** : मिश्रवाक्यात जेथे नाम यावयास हवे त्या ठिकाणी एखादे वाक्य आल्यास त्यास 'नाम वाक्य' म्हणतात. केवलवाक्यात, नाम कोठेकोठे येते? कर्ता, कर्म, विधानपूरक व समानाधिकरण या चार जागी. मिश्रवाक्यात या चार जागी जर गौणवाक्ये आली तर त्यांना नामवाक्ये म्हणतात. खालील उदाहरणे पाहा :

१) **तो उत्तीर्ण झाला,** फार चांगले झाले. (कर्ता, उद्देश्य)

२) गुरुजी म्हणाले की **मुलांनी नेहमी खरे बोलावे.** (कर्म)

३) **प्रश्न असा आहे की** त्याच्याजवळ पुरेसे पैसे नाहीत. (पूरक)

४) **आम्ही स्पर्धेत हरलो** ही वार्ता खरी आहे. (समानाधिकरण)

ठळक अक्षरातील गौणवाक्ये ही नामवाक्ये असून ती त्या त्या वाक्यात कर्ता, कर्म, पूरक व समानाधिकरण यांची कार्ये करतात.

**विशेषणवाक्ये** : जे गौणवाक्य मिश्रवाक्यात विशेषणाचे कार्य करते त्यास 'विशेषणवाक्य' म्हणतात. विशेषणवाक्याचा संबंध प्रधानवाक्यातील एखाद्या नामाशी किंवा सर्वनामाशी असतो. विशेषणाप्रमाणे हे गौणवाक्यही नाम किंवा सर्वनाम याबद्दल विशेष माहिती सांगून त्याची व्याप्ती मर्यादित करते. पुढील वाक्ये पाहा :

१) **जो आवडतो सर्वांना** तोची आवडे देवाला.

२) **जी आपणांला काही शिकवतात** अशी पुस्तके मुलांनी वाचावी.

ठळक अक्षरातील वाक्ये विशेषणवाक्ये असून ती 'तो' व 'पुस्तके' यांबद्दल विशेष माहिती सांगतात.

**क्रियाविशेषणवाक्ये** : जे गौणवाक्य प्रधानवाक्यातील क्रियापद, विशेषण किंवा क्रियाविशेषण यांच्याबद्दल विशेष माहिती सांगते म्हणजे त्यांच्या बाबतीत स्थल, काल, रीत, संकेत, कारण, परिणाम वगैरेविषयी अधिक भर घालते त्यास '**क्रियाविशेषणवाक्य**' म्हणतात. जसे -

१) **जेव्हा घाम गाळावा** तेव्हाच खायला भाकरी मिळते. (कालदर्शक)

२) **जेथे जातो** तेथे तू माझा सांगाती . (स्थलदर्शक)

३) **तुला जसे वाटेल** तसे वाग. (रीतिदर्शक)

४) **जर प्रामाणिकपणे अभ्यास केला असशील** तर उत्तीर्ण होशील. (संकेतदर्शक)

५) **पावसाळा असला** तरी मुले अलीकडे छत्र्या वापरत नाहीत. (विरोधदर्शक)

६) **तो इतका मोठ्याने बोलला** की त्याचा आवाज बसला. (कारणदर्शक)

७) **शरीर घाटदार व्हावे** म्हणून आम्ही व्यायाम करतो. (उद्देशदर्शक)

ठळक अक्षरातील वाक्ये ही क्रियाविशेषणवाक्ये असून ती त्यांच्यापुढे कंसांत दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या क्रियाविशेषणांची कार्ये करतात.

## मिश्रवाक्याचे पृथक्करण

मिश्रवाक्यात एक प्रधानवाक्य असते व इतर गौणवाक्ये असतात. या गौणवाक्यांतील काही नाम वाक्ये, विशेषणवाक्ये किंवा क्रियाविशेषणवाक्ये असतात. मिश्रवाक्याचे पृथक्करण करताना प्रथम त्या वाक्यात

प्रधान व गौण अशी एकूण किती पोट वाक्ये आहेत हे शोधण्यासाठी क्रियापदे किंवा विधेये पाहावीत. प्रथम प्रधानवाक्य शोधून ते मांडावे. त्यानंतर एकेक गौणवाक्य त्याखाली लिहून प्रधानवाक्याशी असलेला संबंध क्रमाने त्यापुढे लिहावा. त्यानंतर या प्रत्येक वाक्यातील उभयान्वयी अव्यय वेगळे केले म्हणजे उरणारी सारी वाक्ये केवलवाक्येच राहतात. केवलवाक्याचे पृथक्करण करताना जो तक्ता वापरला त्याच तक्त्यात सर्व वाक्यांचे पृथक्करण करून दाखवावे. (पृ. १४१ वरील तक्ता पहा.)

## संयुक्तवाक्याचे पृथक्करण

संयुक्तवाक्यात दोन केवलवाक्ये, दोन मिश्रवाक्ये किंवा केवल-मिश्रवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. संपूर्ण संयुक्तवाक्यातील ही पोटवाक्ये वेगळी करून त्यांचा प्रधानवाक्याशी असलेला संबंध सांगावा व त्यांना जोडणारी उभयान्वयी अव्यये वेगळी केली की सर्व पोटवाक्ये ही केवलवाक्येच राहतात. त्यांचे पृथक्करण पुढील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे करावे.

**मिश्रवाक्याच्या पृथक्करणाचा तक्ता**

१) वाक्य : देशी वर्तमानपत्रांस हल्ली जर काही महत्त्व आले असेल तर ते बऱ्याच अंशी रा.रा. आगरकर यांच्या बुद्धिमत्तेचे व मार्मिक लेखांचे फल होय, हे कोणीही कबूल करील.

| क्र. | वाक्यांश | वाक्यांशाचे प्रकार | उभयान्वयी अव्यय | उद्देश्यविभाग | | | विधेयविभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म व कर्मविस्तार | विधानपूरक | विधेयविस्तार | क्रियापद |
| १) | हे कोणीही कबूल करील | प्रधानवाक्य | | | कोणीही | हे कबूल | | | करील |
| २) | देशी वर्तमानपत्रांस हल्ली जर काही महत्त्व आले असेल | संकेतदर्शक क्रियाविशेषण वाक्य | जर | देशी वर्तमानपत्रांस काही | महत्त्व | | | हल्ली | आले असेल |
| ३) | तर ते बऱ्याच अंशी रा.रा. आगरकर यांच्या बुद्धिमत्तेचे व मार्मिक लेखांचे फल होय. | नामवाक्य समानाधिकरण (प्रधानवाक्यातील 'हे' या शब्दाचे) | तर | | ते | | रा. आगरकर यांच्या ... लेखांचे फल | बऱ्याच अंशी | होय |

**संयुक्तवाक्याच्या पृथक्करणाचा तक्ता**

२) वाक्य : विजयनगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला, ते स्थल सूर्यनारायण रोज असे संधिप्रकाशाने सारवतो आणि मग त्यावर आकाशातल्या पणत्या तेवत असतात.

| क्र. | वाक्यांश | वाक्यांशाचे प्रकार | उभयान्वयी अव्यय | उद्देश्यविभाग | | | विधेयविभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म व कर्मविस्तार | विधान पूरक | विधेयविस्तार | क्रियापद |
| १) | ते स्थल सूर्यनारायण रोज असे संधिप्रकाशाने सारवतो | प्रधानवाक्य | | | सूर्यनारायण | ते स्थल | | रोज, असे संधिप्रकाशाने | सारवतो |
| २) | विजयनगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला | विशेषण - वाक्य. 'स्थल' या प्रधान-वाक्यातील विशेष्याचे | जेथे | विजय-नगरच्या साम्राज्याचा | अंत | | | | झाला |
| ३) | आणि मग त्यावर आकाशातल्या पणत्या असतात. | प्रधानवाक्य समानाधिकरण | आणि | आकाशातल्या | पणत्या | | | मग, त्यावर | तेवत असतात |

## सरावासाठी

**पुढील मिश्र व संयुक्तवाक्यांचे पृथक्करण तक्त्यात करा :**

१) बटाट्याच्या चाळीच्या भ्रमणमंडळाचे हे चार सभासद ज्या दिवशी पुण्याच्या प्रवासाला निघाले, तो दिवस सोन्याचा अक्षरांत लिहिणे महागात लागले तरी कसल्यातरी अक्षरांत लिहिणे अत्यावश्यक होते.

२) बी पेरल्यानंतर कोंब फुटतो नि हिरवीगार वेल डोळ्यांसमोर गरगरा वाढत जाते, हे पाहताना होणारा आनंद अलौकिक आहे, असे नाही तुम्हांस वाटत?

३) तो देव हाती सापडता किनई, तर तुमच्यापुढे उभा करून चांगला कान पिळून त्याला हडसून खडसून विचारलं असतं, की या माऊलीकडे नीट एकदाचा डोळे फोडून पाहा अन् मग सांग, की पोराबाळांनी भरल्या घरात अशी ओतायला का दारू केली आहेस?

४) तैलचित्र जवळून पाहण्यापेक्षा दूर अंतरावरून पाहावे तेव्हा चांगले दिसते; पण मानवी स्वभावाची जी विविध चित्रे संसारात मांडलेली आहेत ती यथार्थतेने पाहायची असतील तर त्यांच्याशी एकजीव झाले पाहिजे.

५) लेखणीपेक्षा वाणी श्रेष्ठ आहे किंवा काय या वादात मी या ठिकाणी पडू इच्छित नाही; तथापि लिहिण्याच्या नादापेक्षा व्याख्यानाची नशा मात्र अधिक आहे यात शंका नाही.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) केवल/शुद्ध वाक्यात एकच ............ व एकच ............ असते. ①②③④

1) उद्देश्य, विधेय 2) लिंग, वचन

3) विभक्ती, कारकार्थ 4) सर्व पर्याय

2) विशेषणाचे कार्य करणाऱ्या गौण वाक्याला .............. असे म्हणतात. ①②③④

1) गौण वाक्य 2) विशेषणवाक्य

3) गौणविशेषण वाक्य 4) कोणतेही नाही

3) अलीकडे मी तुम्हांला एकही पत्र लिहिले नाही. (विधानपूरक ओळखा) ①②③④

1) मी 2) अलीकडे

3) लिहिले नाही 4) विधानपूरक नाही

4) चाचा नेहरूंना गुलाबाची फुले फार आवडत. (उद्देश्य ओळखा) ①②③④

1) चाचा नेहरूंना 2) गुलाबाची फुले

3) फार 4) आवडत

5) माधुरीने सुरेख गाणे गायले. (कर्म विस्तार ओळखा) ①②③④

1) गायले 2) गाणे 3) माधुरीने 4) सुरेख

6) आमचा कुत्रा काळूराम शेतात खेळताना विहिरीत पडला. (विधेय विस्तार ओळखा) ①②③④

1) शेतात खेळताना विहिरीत

2) कुत्रा 3) काळूराम

4) आमचा

7) आम्ही घराची खिडकी उघडली. (कर्ता ओळखा) ①②③④

1) आम्ही 2) खिडकी

3) घराची 4) उघडली

8) 'भारतीय संघातील खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. (उद्देश्य विस्तार ओळखा) ①②③④

1) भारतीय संघातील 2) खेळाडूंनी

3) चांगली 4) कामगिरी

9) तू आता घरी जा. (कर्ता ओळखा) ①②③④

1) घरी 2) तू 3) आता 4) जा

10) आज करायचे काम उद्यावर ढकलू नका. (उद्देश्य विस्तार ओळखा) ①②③④

1) उद्यावर ढकलू 2) आज

3) आज करायचे 4) काम

11) 'हवा कोंदट असल्यास मनुष्याची प्रकृती बिघडते.' (विधेय ओळखा) ①②③④

1) प्रकृती 2) बिघडते 3) हवा 4) मनुष्य

12) 'महात्मा गांधी सत्यागह करू लागले.' (विधेय ओळखा). ①②③④

1) सत्याग्रह 2) करू लागले

3) गांधी 4) महात्मा

13) 'एके दिवशी युद्ध बंद झाल्याची बातमी येऊन धडकली.' (विधेय विस्तार ओळखा). ①②③④

1) येऊन, एके दिवशी 2) धडकली

3) बातमी 4) युद्ध बंद झाल्याची

14) 'अद्यापीही आपण लोकांना जुन्या चाकोरीच्या बाहेर काढू शकलेलो नाही.' (विधेय विस्तार ओळखा). ①②③④

1) अद्यापीही

2) जुन्या लोकांना

3) लोकांना जुन्या चाकोरीच्या बाहेर

4) काढू शकलेलो नाही

15) 'पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात.' (कर्म व कर्मविस्तार ओळखा). ①②③④

1) मुखास शोभा 2) देतात

3) पांढरे स्वच्छ 4) दात

16) 'रोज आपला सूर्य पूर्वेला उगवतो.' (विधेय विस्तार ओळखा) ①②③④

1) उगवतो 2) सूर्य

3) आपला 4) रोज पूर्वेला

17) 'या वर्षी आमचा सुरेश नाटकात राजा होणार आहे.' (उद्देश्य ओळखा) ①②③④

1) यावर्षी 2) सुरेश

3) नाटकात 4) आहे

18) 'शिवाजींचे भाऊ व्यंकोजी तंजावरास गेले.' (उद्देश्य विस्तार ओळखा.) ①②③④

1) तंजावरास 2) शिवाजींचे भाऊ

3) व्यंकोजी 4) गेले

**⏩ सराव प्रश्नसंग्रह 29 – उत्तरसूची**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 1 | 2) 2 | 3) 4 | 4) 2 | 5) 4 |
| 6) 1 | 7) 2 | 8) 1 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 2 | 12) 2 | 13) 1 | 14) 3 | 15) 1 |
| 16) 4 | 17) 2 | 18) 2 | | |

# ३०. वाक्यसंश्लेषण

## वाक्यसंश्लेषण किंवा वाक्यसंकलन

**वाक्यसंश्लेषण** यालाच **वाक्यसंकलन** असेही म्हणतात. **एकमेकांशी संबंध असलेली दोन किंवा अधिक केवलवाक्ये दिली असता, ती एकत्र करून त्यांचे एक वाक्य बनविणे यालाच वाक्यसंश्लेषण असे म्हणतात.**

वाक्यरचनेवर प्रभुत्व संपादन करणे, निर्दोष वाक्यरचना करणे यासाठी व्याकरणाचा अभ्यास उपयोगी पडतो. त्याचप्रमाणे आपल्या मनातील आशय नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी विविध प्रकारची वाक्ये तयार करण्याचे कौशल्य या अभ्यासानेच प्राप्त होते; म्हणून केवलवाक्य, मिश्रवाक्य व संयुक्त वाक्य या वाक्यांचे प्रकार ओळखणेही आवश्यक आहे. अशी वाक्ये ओळखणे हा अभ्यासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**पुढील वाक्ये पाहा.**

'सकाळी आठ वाजण्याचा सुमार असावा.' मी बाहेर जाण्याच्या तयारीत होतो. इतक्यात मला तार मिळाली. तारेत लिहिले होते, मुंबईस ताबडतोब निघून या.'

वरील पाच वाक्ये एकत्रित करून हेच वृत्त पुढीलप्रमाणे लिहिता येईल.

'सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मी बाहेर जाण्याच्या तयारीत असताना मला ताबडतोब मुंबईस निघून येण्याबद्दल एक तार आली.'

सुटी-सुटी वाक्ये विस्कळीतपणे मांडण्याऐवजी ती एकत्रित करून मांडल्याने विचारात सुसूत्रता येते व वाक्य आटोपशीर वाटते; म्हणून आपले विचार व्यक्त करताना ते एकत्रित करून मांडल्याने त्यात व्यवस्थितपणा येत असेल, तर वाक्य संकलनाची कला प्रत्येकाला अवगत असणे आवश्यक आहे.

वाक्यसंकलनाच्या वेळी दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र केल्यानंतर जे एक जोडवाक्य तयार होते; ते केवल, मिश्र किंवा संयुक्त यांपैकी एखादे असते; म्हणजेच वाक्यसंकलन तीन प्रकारचे असते.

(१) दोन किंवा अनेक केवलवाक्यांचे एक केवलवाक्य बनविणे.

(२) दोन किंवा अनेक केवलवाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनविणे.

(३) दोन किंवा अनेक केवलवाक्यांचे एक मिश्र वाक्य बनविणे.

### (१) दोन किंवा अनेक केवलवाक्यांचे एक केवलवाक्य बनविणे.

केवलवाक्यात एकच मुख्य क्रियापद असावे लागते म्हणजे दिलेल्या वाक्यांपैकी एका वाक्यातील क्रियापद मुख्य ठेवून वाक्यांतील क्रियापदांची धातुसाधिते, नामे, विशेषणे किंवा क्रियाविशेषणे आपणांस बनवावी लागतात.

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) तो फरशीवरून चालत होता. त्याचा पाय घसरला. तो पडला.

(२) फरशीवरून चालत असताना पाय घसरून तो पडला.

वरील वाक्य क्र. १ मध्ये तीन छोटी वाक्ये आहेत. वाक्य क्र. २ मध्ये त्या तीन केवलवाक्यांचे आपण

एक केवलवाक्य बनविले आहे. हे करताना आपण काय केले? तिसऱ्या वाक्यातील 'पडला' ही मुख्य क्रिया असल्यामुळे ते क्रियापद आहे तसे ठेवले व उरलेल्या दोन वाक्यांचे शब्दसमूह बनवावे लागले. हे करताना पहिल्या वाक्यातील 'होता' या क्रियापदाचे 'असताना' हे 'ताना' प्रत्ययान्त धातुसाधित किंवा कृदन्त ठेवले व दुसऱ्या वाक्यातील 'घसरला' या क्रियापदाचे 'घसरून' असे 'ऊन' प्रत्ययान्त धातुसाधित ठेवले. 'असताना' व 'घसरून' ही दोन्ही कृदन्ते क्रियाविशेषणाचे कार्य करतात. पडण्याची क्रिया केव्हा घडली व कशी घडली हे सांगताना क्रियेचा काळ व रीत ती दाखवितात म्हणजे वरील तीन वाक्यांचे एक वाक्य बनविताना आपण तिसरे वाक्य आहे तसेच ठेवले व पहिल्या दोन वाक्यांतील क्रियापदांची धातुसाधिते बनवून त्यांचे क्रियाविशेषणदर्शक शब्दसमूह बनविले. शेवटी तयार झालेल्या वाक्यात 'पडला' हे एकच मुख्य क्रियापद असल्यामुळे ते एक केवलवाक्य बनले.

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला. त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(२) माझ्या आजीने मला गोड खाऊचा एक डबा पाठविला.

प्रारंभी दिलेल्या दोन वाक्यांचे एक केवलवाक्य बनविताना पहिले वाक्य आहे तसेच ठेवले व दुसऱ्या वाक्यातील 'त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.' या वाक्याऐवजी 'गोड खाऊचा' असा शब्दसमूह बनविला. हे बनविताना 'खा' या धातूला 'ऊ' हा प्रत्यय लावून 'खाऊ' हे कृदन्त नाम बनविले व नंतर 'खाऊचा' असे त्याचे विशेषण तयार केले. त्यामुळे वाक्य क्र.२ हे केवलवाक्य तयार झाले. या वाक्यात धातुसाधित विशेषणाचा वापर केला आहे.

**पुढील वाक्ये पाहा.**

(१) मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

(२) माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आवडत नाही.

वाक्य क्र. १ मधील दोन वाक्यांचे संकलन करताना दुसरे वाक्य आहे तसेच ठेवून पहिल्या वाक्यातील 'पितो' या क्रियापदाचे 'पिणे' हे 'णे' प्रत्ययान्त कृदन्त नाम बनविले व 'मी चहा पितो.' या वाक्याऐवजी 'माझे चहा पिणे' हा धातुसाधित नामदर्शक शब्दसमूह तयार केला. ('चहा पिणे' याऐवजी 'चहापान' असा शब्दही ठेवता येतो.)

वरील तीन वाक्यांत आपण केवलवाक्ये बदलून त्याऐवजी कृदन्त नामे, कृदन्त विशेषणे किंवा क्रियाविशेषणे वापरून शब्दसमूह तयार केले व त्यांचा वापर करून वाक्यसंकलनाने केवलवाक्येच तयार केली.

**केवलवाक्य बनविण्याचा आणखी एक प्रकार पाहा.**

(१) रवींद्रनाथ टागोर हे थोर कवी होते. रवींद्रनाथांनी 'गीतांजली' हे काव्य लिहिले.

(२) गीतांजलीचे लेखक, रवींद्रनाथ टागोर, हे थोर कवी होते.

वाक्य क्र. १ मधील 'रवींद्रनाथांनी गीतांजली हे काव्य लिहिले.' या वाक्याऐवजी वाक्य क्र. २ मध्ये 'गीतांजलीचे लेखक' हा शब्दसमूह घातला आहे. 'गीतांजलीचे लेखक' म्हणजेच रवींद्रनाथ टागोर. एखाद्या नामाचे स्पष्टीकरण करणाऱ्या त्याच अर्थाच्या शब्दास **समानाधिकरण (Noun in apposition)** म्हणतात. या दोन्ही शब्दांची विभक्ती एकच असते.

अशा रीतीने दोन किंवा अधिक वाक्यांचे संकलन एका केवलवाक्यात करताना वाक्यांच्याऐवजी धातुसाधित नामे, विशेषणे किंवा समानाधिकरणात्मक शब्द किंवा शब्दसमूह वापरावेत व नवीन वाक्यात एकच क्रियापद असल्याची खात्री करून घ्यावी.

**केवलवाक्य बनविणे - उदाहरणे**

अनेक केवलवाक्यांचे एक केवलवाक्य कसे करावे, याची काही उदाहरणे खाली दिली आहेत. वरीलपैकी कोणत्या प्रकाराने ती बनविली आहेत, ते सूक्ष्मपणाने पाहा.

(१) पुष्कळ वर्षे झाली. मी कॅशियाचे रोप आणले. बागेत एका कोपऱ्यात ते लावले. याची मला मोठी आवड होती.

- (पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी ते बागेत एका कोपऱ्यात लावले.)

(२) हिवाळ्याचे दिवस असावेत. पहाटेची वेळ असावी. अगस्त्याचा तारा नजरेस येतो. तो मोठा ठळक तारा आहे. तो आकाशात दक्षिणेकडे राहणारा तारा आहे.

- (हिवाळ्यात पहाटे आकाशात दक्षिणेकडे एक मोठा चमकणारा अगस्त्याचा ठळक तारा नजरेस येतो.)

(३) मी नोकरीतून निवृत्त झालो. मला थोडी फुरसत मिळाली. सुताराकडून एक छानदार झोपाळा तयार करवला. त्याची बागेत स्थापना केली.

- (नोकरीतून निवृत्त झाल्यावर फुरसत मिळताच सुताराकडून एक छानदार झोपाळा तयार करवून घेऊन त्याची मी बागेत स्थापना केली.)

(४) बाबांनी मला तिथल्या एका माणसाची ओळख करून दिली. त्याने हे कोहळे पिकवले. एकेक कोहळा किती किलोचा म्हणता? - चाळीस.

- (चाळीस किलोचा एकेक कोहळा पिकविणाऱ्या तिथल्या एका माणसाची बाबांनी मला ओळख करून दिली.)

## (२) संयुक्त वाक्य बनविणे

दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनविताना त्यांना जोडणारी योग्य अशीच उभयान्वयी अव्यये वापरावयास हवीत. उभयान्वयी अव्यये ही दोन प्रकारची आहेत. **(१) प्रधानत्वबोधक व (२) गौणत्वबोधक**. केवळ प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्यये योजल्याने बनणारे वाक्य केवळ - **संयुक्त वाक्य** होते. प्रधानत्वबोधक व गौणत्वबोधक अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरल्यास ते **मिश्र संयुक्त वाक्य** होते. या दोन्ही प्रकारांना संयुक्त वाक्यच म्हणतात. मात्र दोन वाक्ये जोडताना त्या दोन वाक्यांतील संबंध सूचित करणारी योग्य अशी उभयान्वयी अव्यये योजिली पाहिजेत. प्रधानत्वबोधकात चार प्रकार आपण पाहिले.

**(१) समुच्चयबोधक** - 'आणि, व' यांसारखे.

(१) विजा चमकू लागल्या. पावसाला सुरुवात झाली.

(२) विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.

**(२) विकल्पबोधक** - 'अथवा, किंवा' यांसारखे.

(१) लोक आपली स्तुती करोत. लोक आपली निंदा करोत.

(२) लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा करोत.

**(३) न्यूनत्व (विरोध) बोधक** - 'पण, परंतु, परी' यांसारखे.

(१) आपण मरावयास हरकत नाही. आपण कीर्तिरूपाने उरावे.

(२) मरावे परी कीर्तिरूपे उरावे.

**(४) परिणामबोधक** - 'म्हणून, सबब' यांसारखे.

(१) वाटेत मोटार नादुरूस्त झाली. मला यावयास उशीर झाला.

(२) वाटेत मोटार नादुरूस्त झाली म्हणून मला यावयास उशीर झाला.

## (३) मिश्र वाक्य बनविणे

जर दोन वाक्ये गौणत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असतील, तर **मिश्रवाक्य** तयार होते. गौणत्वबोधक उभयान्वयी अव्यये चार प्रकारची आहेत.

**(१) स्वरूपबोधक** - 'की, म्हणून, म्हणजे' यांसारखे.

(१) गुरुजी म्हणाले. पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

(२) गुरुजी म्हणाले की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते. (मिश्रवाक्य)

**(२) कारणबोधक** - 'कारण, का, की, कारण की' यांसारखे.

(१) विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला. त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला होता.

(२) विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला कारण त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला होता. (मिश्रवाक्य)

**(३) उद्देशबोधक** - 'म्हणून, सबब, यास्तव' यांसारखे.

(१) आमचे शरीर सुदृढ व्हावे. आम्ही योगासने करतो.

(२) आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो. (मिश्रवाक्य)

**(४) संकेतबोधक** - 'जर-तर, जरी-तरी' यांसारखे.

(१) उद्या सुटी मिळेल. मी तुझ्या घरी येईन.

(२) उद्या सुटी मिळाली, तर मी तुझ्या घरी येईन. (मिश्रवाक्य)

केवळ मिश्रवाक्य बनवायचे असल्यास उपयोजिले जाणारे उभयान्वयी अव्यय हे गौणत्वबोधकच असावयास हवे, पण **प्रधानत्वबोधक व गौणत्वबोधक** अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरून बनविलेल्या वाक्यास मराठीत **संयुक्त वाक्य** असेच म्हणतात.

अशा प्रकारची काही वाक्ये व त्यांचे संकलन खाली दिले आहे. त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास करा.

(१) एकंदर किती भाजी मिळाली? असे माझ्या मित्रांनी विचारले. चवळीच्या चार शेंगा आल्या. मी हे वृत्त उत्साहाने सांगितले. **संकलन** - 'एकंदर किती भाजी मिळाली?' असे माझ्या मित्रांनी विचारले, तेव्हा चवळीच्या चार शेंगा आल्याचे वृत्त मी उत्साहाने सांगितले. (मिश्रवाक्य)

(२) अडीच रुपयांचे मी बी पेरले. दोन पैशांचीही भाजी मिळाली नाही. हे त्यांनी ऐकले. त्यांना हसू आवरेना. माझी मुळी निराशा झालेली नव्हती.

**संकलन** - अडीच रुपयाचे बी पेरून दोन पैशांचीही भाजी मिळाली नाही हे ऐकून त्यांना हसू आवरेना, पण माझी मुळी निराशा झालेली नव्हती. (मिश्रवाक्य + केवलवाक्य)

(३) आपण बी पेरतो. नंतर कोंब फुटतो. हिरवीगार वेल डोळ्यांसमोर गरगरा वाढत जाते. हे आपण पाहतो. आपल्याला आनंद होतो. हा आनंद अलौकिक असतो.

**संकलन** - बी पेरल्यानंतर कोंब फुटतो नि हिरवीगार वेल डोळ्यांसमोर गरगरा वाढत जाते, हे पाहताना होणारा आनंद अलौकिक असतो. (केवलवाक्य + मिश्रवाक्य)

(४) हे तत्त्व साधं आहे. त्याचा अर्थ समजला पाहिजे. ते दुधारी तलवारीसारखं आहे. ते कापत जातं.

**संकलन** - हे तत्त्व साधं आहे, पण त्याचा अर्थ समजला, तर ते दुधारी तलवारीसारखं कापत जातं. (केवलवाक्य + मिश्रवाक्य)

(५) तू अशक्त आहेस का? भरपूर खेळ, व्यायाम कर.

**संकलन** - तू अशक्त असशील, तर भरपूर खेळ आणि व्यायाम कर. (मिश्रवाक्य + केवलवाक्य)

(६) मी बोलत होतो. त्यांना ते आवडते का? माझी ते थट्टा करतात का? मला हे प्रथम कळेना.

**संकलन** - मी बोलतो आहे हे त्यांना आवडते आहे की ते माझी थट्टा करताहेत, हेच प्रथम मला कळेना. (मिश्रवाक्य + मिश्रवाक्य)

**अभ्यासासाठी काही वाक्ये पाहू या.**

(१) (१) अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरला.

(२) अर्जुनाने बाण मारला.

वरील दोन वाक्यांचे एक केवलवाक्य पुढीलप्रमाणे होईल.

अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरून बाण मारला.

(२) (१) हे आधुनिक लोकशाहीचे युग आहे.

(२) या युगात समाजाने वेळीच जागृत व्हावे.

(३) समाजाने आपला योग्य मार्ग सुधारावा.

वरील वाक्यांचे एका केवलवाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर करता येईल.

या आधुनिक लोकशाहीच्या युगात समाजाने जागृत होऊन आपला योग्य मार्ग सुधारावा.

(३) (१) हा श्रीमंताचा पोर आहे. (२) तो आहे खुळा.

(३) आमची स्थिती तशीच आहे.

या वाक्यांचे एका केवलवाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर करता येईल.

आमची स्थिती ह्या श्रीमंताच्या खुळ्या पोरासारखीच आहे.

(४) (१) एकाने माणसे मोजून पाहिली. (२) ती नऊच भरली.

वरील वाक्यांचे एका संयुक्त वाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर करता येईल.

एकाने माणसे मोजून पाहिली, पण ती नऊच भरली.

(५) (१) आम्हाला नेण्यासाठी जहाज आले.

(२) आम्ही बचावलो.

वरील वाक्यांचे एका संयुक्त वाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर करता येईल.

आम्हाला नेण्यासाठी जहाज आले म्हणून आम्ही बचावलो.

(६) (१) भगवान विष्णू ध्रुवाला म्हणाले.

(२) "मी तुझ्यावर प्रसन्न आहे."

वरील वाक्यांचे एका मिश्र वाक्यात पुढीलप्रमाणे रूपांतर करता येईल.

भगवान विष्णू ध्रुवाला म्हणाले की, मी तुझ्यावर प्रसन्न आहे.

(७) (१) आरती सुरू झाली. (२) घंटानाद सुरू झाला.

वरील वाक्यांची केवल, संयुक्त व मिश्र वाक्ये पुढीलप्रमाणे होतील.

(१) **केवलवाक्य** - आरती सुरू झाल्यावर घंटानाद सुरू झाला.

(२) **संयुक्तवाक्य** - आरती सुरू झाली आणि घंटानाद सुरू झाला.

(३) **मिश्रवाक्य** - जेव्हा आरती सुरू झाली, तेव्हा घंटानाद सुरू झाला.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

1) **मी गावाला गेल्याने माझे खूप नुकसान झाले.** ①②③④

1) संयुक्त वाक्य 2) केवल वाक्य

3) मिश्र वाक्य 4) उद्‌गारार्थी वाक्य

2) **जेव्हा मी सायकलवरून गेलो, तेव्हा तो अपघात घडला.** ①②③④

1) प्रश्नार्थी वाक्य 2) केवल वाक्य

3) संयुक्त वाक्य 4) मिश्र वाक्य

3) **तो हसत असल्यामुळे आम्हाला आनंद झाला.** ①②③④

1) मिश्र वाक्य 2) केवल वाक्य

3) संयुक्त वाक्य 4) प्रश्नार्थी वाक्य

4) **खालीलपैकी केवलवाक्याचा पर्याय निवडा.** ①②③④

1) माधुरी चहा किंवा कॉफी घेते.

2) गुरुजी म्हणाले की, न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला.

3) आई घरातच असल्यामुळे छान जेवण मिळाले.

4) जर अभ्यास केला तर उत्तीर्ण होणार.

5) **खालीलपैकी केवलवाक्याचा पर्याय निवडा.** ①②③④

1) जेव्हा गाडी आली तेव्हा आम्ही घरी गेलो.

2) जे जे चमकते ते ते सोने नसते.

3) घराबाहेर पडल्याने फायदा झाला.

4) आम्ही मुंबईला गेलो आणि खूप मजा केली.

6) **खालीलपैकी संयुक्त वाक्याचा पर्याय निवडा?** ①②③④

1) पाऊस आला, तर शेतकरी आनंदी होईल.

2) मरावे परी कीर्तीरूपे उरावे.

3) बागेत खेळल्यामुळे मुले दमली होती.

4) तो आल्यामुळे वर्गात गोंधळ सुरू झाला.

7) **खालीलपैकी मिश्र वाक्याचा पर्याय ओळखा.** ①②③④

1) जर तुम्ही याल, तर आपण जाऊ

2) आरती सुरू झाल्यावर मुले डोलायला लागली.

3) मुले डोलायला लागली आणि हसायला लागली

4) तो गरीब असल्यामुळे त्याने खर्च केला नाही.

8) **राम म्हणाला की, आपण पाहून घेऊ. वाक्याचा प्रकार ओळखा** ①②③④

1) केवल वाक्य 2) संयुक्त वाक्य

3) मिश्र वाक्य 4) उद्‌गारार्थी वाक्य

9) **तो घरी आला आणि वादळाला सुरुवात झाली. वाक्याचा प्रकार ओळखा.** ①②③④

1) संयुक्त वाक्य 2) मिश्र वाक्य

3) प्रश्नार्थी वाक्य 4) केवल वाक्य

10) **1) तो घरात आला. 2) सर्वांना आनंद झाला. केवलवाक्य करा.** ①②③④

1) तो घरात आला, सर्वांना आनंद झाला.

2) तो घरात आल्यावर सर्वांना आनंद झाला.

3) तो घरात आला म्हणून सर्वांना आनंद झाला.

4) तो घरात आला आणि सर्वांना आनंद झाला.

11) 1) अंगणात गुलाब आहे. 2) त्याला काटे आहेत. केवलवाक्य करा. ①②③④

1) अंगणात गुलाब आणि त्याला काटे आहेत.

2) गुलाबाला काटे आहेत.

3) अंगणातील गुलाबाला काटे आहेत.

4) जर अंगणात गुलाब तर त्याला काटे

12) 1) गोठ्यात गाय आहे. 2) ती हंबरते आहे. केवलवाक्य करा. ①②③④

1) गोठ्यातील गाय हंबरते आहे.

2) गोठ्यात गाय आणि ती हंबरते.

3) गोठ्यात जर गाय तर ती हंबरते.

4) गोठ्यात गाय आहे कारण ती हंबरते आहे.

13) 1) वीज गेली. 2) घरात दिवा लावला. संयुक्त वाक्य करा. ①②③④

1) वीज गेली म्हणून घरात दिवा लावला.

2) वीज गेल्याने घरात दिवा लावला.

3) जर वीज गेली तर घरात दिवा लावला.

4) जेव्हा वीज गेली तेव्हा घरात दिवा लावला.

14) 1) आम्ही समुद्रावर गेलो. 2) खेळायला मिळाले नाही. संयुक्त वाक्य करा. ①②③④

1) आम्ही समुद्रावर गेल्यावर खेळायला मिळाले नाही.

2) आम्ही समुद्रावर गेलो आणि खेळायला मिळाले नाही.

3) आम्ही समुद्रावर गेलो, पण खेळायला मिळाले नाही.

4) जरी समुद्रावर गेलो तरी खेळायला मिळाले नाही.

15) 1) आम्ही मुंबईला जाऊ. 2) पुण्याला जाऊ. संयुक्त वाक्य करा. ①②③④

1) आम्ही मुंबईला किंवा पुण्याला जाऊ

2) आम्ही मुंबईला जाऊ नाहीतर पुण्याला जाऊ.

3) जर मुंबईला जाऊ तर पुण्याला न जाऊ.

4) आम्ही मुंबई, पुण्याला जाऊ.

16) 1) गुरुजी म्हणाले. 2) सूर्य हा तेजस्वी तारा आहे. (मिश्र वाक्य बनवा) ①②③④

1) गुरुजींच्या म्हणण्यानुसार सूर्य हा तेजस्वी तारा आहे.

2) गुरुजी म्हणाले की, सूर्य हा तेजस्वी तारा आहे.

3) गुरुजी म्हणाले असल्याने सूर्य हा तेजस्वी तारा आहे.

4) सूर्य हा तेजस्वी तारा असल्याचे गुरुजींनी सांगितले.

### ▶▶ सराव प्रश्नसंग्रह 31 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 4 | 3) 2 | 4) 3 | 5) 3 |
| 6) 2 | 7) 1 | 8) 3 | 9) 1 | 10) 2 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 1 | 14) 3 | 15) 1 |
| 16) 1 | | | | |

# ३१. वाक्यरूपांतर

**वाक्यरूपांतर** या प्रक्रियेला **वाक्यपरिवर्तन** असेही नाव आहे. वाक्यरूपांतर म्हणजे दिलेल्या वाक्याच्या रूपात किंवा रचनेत केलेला बदल. आपण बोलतो किंवा लिहितो म्हणजे आपण आपले विचार क्रमाने व्यक्त करतो. आपला संपूर्ण विचार म्हणजे एकेक वाक्य. ही वाक्ये जर एकाच स्वरूपाची असतील, तर एक संपूर्ण विचार म्हणजे एकेक वाक्ये. ही वाक्ये जर एकाच स्वरूपाची असतील तर ऐकणाऱ्याला किंवा वाचणाऱ्याला ती कंटाळवाणी वाटतील. आपले बोलणे किंवा लिहिणे एकसुरी होऊ नये, म्हणून वाक्यरचनेत बदल करणे आवश्यक ठरते. आपली सर्वच वाक्ये केवळ विधानार्थी न ठेवता अधूनमधून ती प्रश्नार्थक किंवा उद्‌गारार्थी करावीत. होकारार्थी वाक्याबरोबरच मधूनच एखादे नकारार्थी विधान असावे. छोटी-छोटी वाक्ये कधी एकत्र करून आटोपशीरपणे मांडावीत, तर एका मोठ्या वाक्यातून क्लिष्ट विचार मांडण्याऐवजी तो सुगम करून सांगण्यासाठी कधी छोटी-छोटी वाक्ये योजावीत. वाक्यांतील अशा विविधतेमुळे आपली भाषा डौलदार आणि परिणामकारक होते.

आपल्या बोलण्यातून, लिहिण्यातून भाषेचा डौल, भाषेचे सौंदर्य व्यक्त व्हावे. भाषा अशा रीतीने वापरण्याची ओढ, भाषा सुंदर असावी अशा जाणिवेतून तिचा वापर करण्याची इच्छा माणसात जन्मजात असते. तिचा विकास घडवून आणण्यासाठी, परिणामकारकपणे भाषेचा वापर करण्यासाठी व्याकरणाच्या अभ्यासाचा खूपच उपयोग होतो. आपल्या अशा प्रयत्नांना त्यामुळे डोळसपणा येतो. भाषा सुंदर रीतीने वापरणे ही माणसाची गरजही आहे, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. त्या दृष्टीने व्याकरणाचा अभ्यास आपल्याला उपयुक्त, मार्गदर्शक ठरू शकतो. निसर्गाने एखाद्याला प्रतिभेचे वरदान दिलेले असते. त्यामुळे त्याला नवनव्या कल्पना सुचतात, स्फुरतात. त्यांचा आविष्कार करण्यासाठीही भाषा हेच माध्यम आवश्यक असते. अशा प्रतिभावंतांनाही व्याकरणाच्या अभ्यासाने आपल्या अभिव्यक्तीमध्ये डोळसपणा आणता येईल.

वाक्यरूपांतर म्हणजे वाक्यरचनेत करावा लागणारा बदल. हा बदल करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी. ती म्हणजे वाक्याचे रूपांतर करताना रचनेत बदल होत असला, तरी वाक्याच्या अर्थात बदल होता कामा नये.

**वाक्यार्थाला बाधा न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे वाक्यरूपांतर होय.** उदा. 'तो घरी खात्रीने येईल.' असे आपणांस म्हणावयाचे आहे. हे वाक्य होकारार्थी आहे. ते नकारार्थी करावयाचे झाल्यास 'तो घरी खात्रीने येणार नाही.' असे करून चालणार नाही. हे वाक्य नकारार्थी होईल, पण त्यामुळे मूळ वाक्याचा अर्थ पूर्णपणे बदलेल. इतकेच नव्हे तर ते विरुद्धार्थी होईल; म्हणून वाक्याच्या रूपात बदल तर करावयाचा मात्र अर्थ तोच कायम ठेवायचा. या पद्धतीने वरील वाक्याचे रूपांतर 'तो घरी आल्याशिवाय राहायचा नाही.' असे होईल. वाक्यरूपांतरात मूळ अर्थ कायम तर ठेवायचा. शिवाय वाक्य डौलदार व परिणामकारक झाले पाहिजे. जसे - 'माझा आळस तुला माहीत आहे.' या विधानार्थी वाक्याचे रूपांतर 'माझा आळस तुला नव्याने का सांगायला हवा?' असे प्रश्नार्थक केल्याने मूळ वाक्य अधिक खुलून दिसते. आपले विचार अधिक आकर्षक रीतीने जर मांडायचे, तर वाक्याचे रूपांतर विविध तऱ्हेने करता येणे आवश्यक आहे. त्यातील काही प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

(१) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(२) उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(३) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(४) कर्तरी व कर्मणी प्रयोगांचे परस्पर रूपांतर

(५) मुख्य व गौण वाक्यांचे परस्पर रूपांतर

(६) केवल, संयुक्त व मिश्र वाक्यांचे परस्पर रूपांतर

(७) शब्दांचा प्रकार बदलून वाक्यरचना करणे.

(८) अनेक शब्दांऐवजी एक शब्द योजणे.

असे कितीतरी प्रकार संभवतात. त्यांचे क्रमाने विवेचन पुढे दिले आहे.

**(१) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर**

- जगी सर्वसूखी असा कोण आहे? (प्रश्नार्थी)
- जगात सर्वसुखी असा कोणी नाही. (विधानार्थी)

नेहमीच्या व्यवहारात आपण अनेक प्रश्न विचारतो : तू कोठे चाललास? तुला किती गुण मिळाले? प्रकृती आता कशी आहे? वगैरे. प्रश्न विचारल्यानंतर आपणाला त्यांची काही उत्तरे हवी असतात म्हणजे उत्तराच्या अपेक्षेने असे प्रश्न विचारले जातात. 'जगी सर्वसूखी असा कोण आहे?' या प्रश्नाचे उत्तर 'मी आहे.' असे द्यायचे नसते. हा प्रश्न उत्तराच्या अपेक्षेने विचारण्यात आला नसून त्या प्रश्नातच त्याचे उत्तर दडलेले असते. 'जगात कोणीच सुखी नाही.' असे लेखकाला स्पष्ट म्हणायचे आहे. पण प्रश्न विचारल्यामुळे मूळचे साधे विधान किती जोरदार झाले आहे पाहा! वरील वाक्यात होकारार्थी प्रश्न विचारला आहे; मात्र त्याने सूचित केलेले उत्तर नकारार्थी आहे. दुसरे उदाहरण पाहू.

- अपमान केल्यास कुणाला राग येत नाही? (नकारार्थी प्रश्न)
- अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतोच. (होकारार्थी विधान)

अशा तऱ्हेचा प्रश्न नकारार्थी असला, तर त्याचे विधानार्थी उत्तर होकारार्थी असते. हा 'प्रश्न' अलंकार म्हणून भाषेत ओळखला जातो. पुढील वाक्ये पाहा.

(१) फुकट दिले तर कोण नको म्हणेल? (... कोणी नको म्हणणार नाही.)

(२) आम्ही तुमचे उपकार कसे विसरू? (... मुळी विसरणार नाही.)

(३) कुणी कोडे माझे उकलील का? (... कुणी उकलणार नाही.)

(४) आपण त्यांच्याकडे जायला नको का? (... अवश्य जायला हवे.)

(५) मुलांच्या अभ्यासाची काळजी नको का? (... जरूर काळजी घ्यायला हवी.)

प्रश्नार्थक वाक्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करायचे असल्यास प्रश्न होकारार्थी असेल, तर विधानार्थी वाक्य नकारार्थी ठेवावे व प्रश्न नकारार्थी असल्यास त्याचे उत्तर म्हणून विधानार्थी वाक्य होकारार्थी ठेवावे.

**(२) उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर**

पुढील वाक्ये पाहा.

(१) केवढी उंच इमारत ही! (ही इमारत खूप उंच आहे.)

(२) काय उकडले हो काल रात्री! (काल रात्री खूपच उकडले.)

(३) आज गाडीत कोण गर्दी! (आज गाडीत अतोनात गर्दी होती.)

(४) काय अक्षर आहे त्याचे! (त्याचे अक्षर अतिशय सुंदर आहे.)

वरील वाक्यांतील विधाने उद्गारार्थी आहेत. तीच कंसात विधानार्थी केलेली आहेत. कंसातील विधानार्थी वाक्ये उद्गारार्थी केल्यामुळे कशी परिणामकारक वाटतात. पाहा. 'अरेरे! फार वाईट गोष्ट झाली!' अशासारख्या उद्गारार्थी वाक्यात केवळ भावना व्यक्त केलेल्या असतात. पण वर दिलेल्या वाक्यांत भावनेपेक्षा वैपुल्य, अतिशयता, मोठी संख्या, परिमाण किंवा आधिक्य परिणामकारक रीतीने व्यक्त झालेले आहे. कधी-कधी मनातील तीव्र इच्छा व्यक्त करण्यासाठी उद्गारार्थी वाक्य वापरलेले असते. उदा.

- मला लॉटरीत लाख रुपये मिळाले तर! (... मिळावेत अशी तीव्र इच्छा आहे.)
- मी राज्याचा मुख्यमंत्री असतो तर! (... होण्याची फार फार इच्छा आहे.)

एखाद्या गोष्टीतील अतिशयता किंवा 'खूप, अतोनात, मनस्वी, फार' अशा अर्थांच्या भावना किंवा तीव्र इच्छा व्यक्त करण्यासाठी उद्गारार्थी वाक्य वापरतात. अशा उद्गारार्थी वाक्याचे साधे विधानार्थी वाक्य ठेवताना कोणत्या गोष्टीची विपुलता व्यक्त करायची आहे, ते स्पष्ट करावे.

**(३) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर**

- पाचशे रुपये हीदेखील मोठी रक्कम आहे. (होकारार्थी)
- पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नव्हे. (नकारार्थी)

दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे, पण दुसरे वाक्य अधिक परिणामकारक वाटते. हे करताना आपण पहिल्या वाक्यातील 'मोठी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द 'लहान' हा वापरला व वाक्याचा अर्थ बदलू नये म्हणून 'नव्हे' हा नकारार्थी बदल शब्द घातला. दुसरे उदाहरण पाहा.

- ही काही वाईट कल्पना नाही. (नकारार्थी)
- ही कल्पना बऱ्यापैकी आहे. (होकारार्थी)

इथे नकारार्थी वाक्याचे होकारार्थी करताना 'वाईट'चा विरुद्धार्थी शब्द 'बरा' वापरून पहिल्या वाक्यातील नकार काढून टाकून दुसऱ्या वाक्यातील विधान होकारार्थी केले आहे म्हणजे विरुद्धार्थी शब्दाच्या मागे नकारदर्शक शब्द ठेवला, तर मूळच्या होकारार्थी विधानाचा अर्थ कायम राहतो.

**विरुद्धार्थी शब्द बनविण्याचे दोन प्रकार आहेत.**

**(१) शब्दाच्या मागे 'अ, अन्, न, ना, बे, गैर, विना' यांसारखे उपसर्ग जोडून पुढील शब्दांसारखे शब्द तयार होतात.**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मंगल - अमंगल | (२) | आदर - अनादर |
| (३) | कळत - नकळत | (४) | लायक - नालायक |
| (५) | जबाबदार - बेजबाबदार | (६) | वापर - गैरवापर |
| (७) | सायास - विनासायास | (८) | तक्रार - बिनतक्रार |

**(२) विरुद्ध अर्थाचा दुसरा शब्द वापरून पाहू.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीमंत - दरिद्री | (२) | जलद - सावकाश | (३) | सुरुवात - शेवट |
| (४) | स्वीकारणे - नाकारणे | (५) | ज्येष्ठ - कनिष्ठ | (६) | नफा - तोटा |

पुढील वाक्ये पाहा.

(१) हे आम्हाला सोयीचे नाही. (... गैरसोयीचे आहे.)

(२) तो कोठे न थांबता बोलला. (... तो अस्खलित बोलला.)

(३) त्याला इथे थांबवा. (... पुढे जाऊ देऊ नका.)

(४) त्याचा अर्ज फेटाळण्यात आला. (... स्वीकारण्यात आला नाही.)

**(४) प्रयोगांचे परस्पर रूपांतर**

मराठीत मुख्य प्रयोग तीन- **(१) कर्तरी (२) कर्मणी व (३) भावे.** या प्रयोगांचे परस्पर रूपांतर करता येईल. उदा. 'रामा पुस्तक वाचतो.' या कर्तरी प्रयोगातील वाक्याचे रूपांतर कर्मणी प्रयोगात करावयाचे, तर 'रामाने पुस्तक वाचले.' असे होईल म्हणजे काळात बदल हा करावाच लागतो. त्यामुळे तोच मूळ अर्थ कायम राहत नाही. मात्र ज्याला आपण कर्मकर्तरी प्रयोग म्हणतो. तो करताना काळ बदलावा लागत नसला, तरी मराठीला अपरिचित अशी वाक्यरचना करावी लागते. उदा.

(१) मांजर उंदीर पकडते. (कर्तरी)
उंदीर मांजराकडून पकडला जातो. (कर्मकर्तरी)

(२) मी चहा घेतला. (कर्मणी)
माझ्याकडून चहा घेतला गेला. (कर्मकर्तरी)

(३) रामाने रावणास मारले. (भावे)
रावण रामाकडून मारला गेला. (कर्मकर्तरी)

(५) मुख्य व गौण वाक्यांचे परस्पर रूपांतर

मुख्य वाक्य व गौणवाक्य कशास म्हणतात, हे वाक्यपृथक्करणाच्या पाठात आपण शिकलो. वाक्याचा अर्थ न बदलता त्याचे परस्पर रूपांतर करता येणे शक्य आहे. उदा.

(१) जेव्हा शाळेची घंटा झाली, तेव्हा मी वर्गात जाऊन पोहोचलो होतो.
जेव्हा मी वर्गात जाऊन पोहोचलो, तेव्हा शाळेची घंटा अद्याप व्हायची होती.
(पहिल्या वाक्यातील गौणवाक्य दुसऱ्या वाक्यात मुख्य वाक्य झाले आहे.)

(२) घड्याळात नऊ वाजतात, तोच नळाचे पाणी गेले.
जेव्हा नळाचे पाणी गेले, तेव्हा घड्याळात बरोबर नऊ वाजले होते.

(३) जे-जे चकाकते ते-ते सोने नव्हे.
जे-जे सोने नसते तेदेखील कधी-कधी चकाकते.

**(६) केवल, संयुक्त व मिश्र वाक्यांचे परस्पर रूपांतर**

केवल वाक्ये दिली म्हणजे त्यांचे एक संयुक्त किंवा मिश्र वाक्य कसे करावे, हे आपण 'वाक्यसंश्लेषण' या मागील पाठात शिकलो. त्याचे पुन्हा विवेचन करण्याची जरुरी नाही. **वाक्यसंश्लेषण** किंवा **वाक्यसंकलन** हा वाक्यरूपांतराचाच एक भाग होय.

जसे-

**सुटी वाक्ये** - (१) मला ताप आला आहे. (२) मी शाळेस येणार नाही.

**केवल वाक्य** - मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही.

**संयुक्त वाक्य** - मला ताप आला आहे; म्हणून मी शाळेस जाणार नाही.

मिश्रवाक्य - मी शाळेस जाणार नाही, कारण मला ताप आला आहे.

**(७) शब्दांची जात बदलून वाक्यरचना करणे**

शब्दांच्या जाती आठ म्हणजे त्यांची कार्ये आठ. एकच शब्द निरनिराळ्या वाक्यांत निरनिराळी कार्ये करताना आढळतो म्हणजे त्या-त्या वेळी त्या शब्दाची जात बदलते, पण अर्थामध्ये बदल होत असतो. शब्दाच्या अर्थात बदल न करता शब्दाची जात बदलता येणे शक्य आहे. उदा.

(१) श्रीमंत माणसांना गर्व असतो. (विशेषण)
श्रीमंतांना गर्व असतो. (नाम)

(२) त्याच्या डोळ्यांत पाणी आले. (नाम)
त्याचे डोळे पाणावले. (क्रियापद)

(३) मी कागद टरकावून फेकून दिला. (क्रियाविशेषण)
मी कागद टरकावला व फेकून दिला. (क्रियापद)

(४) हा मुलगा हुशार आहे. (विशेषण)
हा हुशार मुलगा आहे. (सर्वनाम)

**(८) अनेक शब्दांऐवजी एक शब्द योजणे**

अनेक शब्दांऐवजी एक शब्द किंवा सामासिक शब्द वापरून शब्दांच्या काटकसरीने भाषा डौलदार किंवा अर्थवाही बनविता येते. उगाच शब्दांचा पाल्हाळ न करता एका शब्दात सारा अर्थ सामावता आल्यास भाषेत सुटसुटीपणाबरोबरच एक प्रकारची ऐट येते. खालील उदाहरणे पाहा.

(१) पंधरा दिवसांतून एकदा भरणारी अशी आमची बैठक असते.
(आमची पाक्षिक बैठक असते.)

(२) त्याच्यासारखा दुसरा कोणीच नाही असा तो योद्धा होता.
(तो **अद्वितीय** योद्धा होता.)

(३) निराश्रित मुलांना आश्रय देणारी अशी एक संस्था त्यांनी काढली.
(त्यांनी एक **अनाथालय** काढले.)

(४) जिचा नवरा वारला आहे अशी ती स्त्री आहे
(ती **विधवा** आहे.)

अशा तऱ्हेची वाक्यरचना करावयास सांगून विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती आजमावता येते. शब्दसमूहाऐवजी एक शब्द वापरल्याने वाक्याच्या रचनेत फरक पडतो. उदा.

- त्या बाईला आता कोणती इच्छा राहिली नाही. (ती बाई **निरिच्छ** आहे.) या वाक्यात मूळचे नकारार्थी वाक्य होकारार्थी बनले आहे. दुसरे उदाहरण पाहा.
- या पुस्तकाच्या छपाईत कोणत्याच प्रकारचे दोष नाहीत (या पुस्तकाची छपाई **निर्दोष** आहे.)

**खाली आणखी काही शब्द व ते ज्यांच्याबद्दल वापरले आहेत असे शब्दसमूह दिले आहेत.**

| | | |
|---|---|---|
| (१) | निपुत्रिक | ज्याला मुलेबाळे नाहीत असा. |
| (२) | कृतघ्न | केलेले उपकार जो जाणत नाही असा. |
| (३) | हुतात्मा | देशासाठी प्राणार्पण करणारा मनुष्य. |
| (४) | सहोदर | एकाच आईच्या पोटी ज्यांचा जन्म झाला आहे असे. |
| (५) | अवर्णनीय | ज्याचे वर्णन करता येणे शक्य नाही असे. |

| | | |
|---|---|---|
| (६) | सनातनी | जुन्या रूढी व चालीरीती यांना अनुसरून वागणारा. |
| (७) | समकालीन | एकाच काळात हयात असलेले. |
| (८) | निरक्षर | ज्याला लिहिता व वाचता मुळी येत नाही असा. |
| (९) | बहुश्रुत | ज्याने पुष्कळ ऐकले व वाचले आहे असा. |
| (१०) | शेजारधर्म | शेजाऱ्यांशी चांगल्या तऱ्हेने वागण्याची पद्धत. |

(वाक्यरूपांतर, वाक्यसंश्लेषण व वाक्यपृथक्करण ही सदरे अस्सल मराठी भाषेतील नव्हेत, इंग्रजी व्याकरणावरून मराठीत ही सदरे घेण्यात आली आहेत. मराठीची मांडणी व धाटणी ही काहीशी वेगळी असल्यामुळे इंग्रजी भाषेशी मिळतेजुळते घेऊन या प्रकरणातील विवेचन मराठीत करावे लागले आहे. तरीपण वाक्यरचनेच्या अभ्यासाच्या दृष्टीने ही सदरे महत्त्वाची असून विद्यार्थ्यांना लेखनप्रसंगी ही तीनही प्रकरणे निःसंशय उपयुक्त ठरतील.)

**सरावासाठी काही उदाहरणे**

'वाक्यरूपांतर' या प्रकाराची काही अधिक उदाहरणे पाहू या.

(१) (अ) ताजमहाल खूप सुंदर आहे. (विधानार्थी)
(आ) किती सुंदर आहे ताजमहाल! (उद्गारार्थी)

(२) (अ) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. (विधानार्थी)
(आ) तुझ्या भेटीने किती आनंद झाला! (उद्गारार्थी)

(३) (अ) पांढरा रंग सर्वांना आवडतो. (विधानार्थी)
(आ) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? (प्रश्नार्थक)

(४) (अ) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी सारे काही केले. (विधानार्थी)
(आ) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही? (प्रश्नार्थक)
(इ) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही करायचे बाकी ठेवले नाही. (नकारार्थी)

(५) (अ) तुझे असे खराब अक्षर पाहून डोळे मिटावेसे वाटतात. (होकारार्थी)
(आ) तुझे असे खराब अक्षर अगदी बघवत नाही. (नकारार्थी)

(६) (अ) सहलीत खूप मजा आली. (होकारार्थी)
(आ) काय मजा आली सहलीत! (उद्गारार्थी)

(७) (अ) किती सुंदर मूर्ती आहे ही! (उद्गारार्थी)
(आ) ही मूर्ती खूप सुंदर आहे. (होकारार्थी)

(८) (अ) गुणेशाचे हे चित्र खराब आहे. (होकारार्थी)
(आ) गुणेशाचे हे चित्र चांगले नाही. (नकारार्थी)

(९) (अ) फक्त भारतीय संघच अजिंक्य आहे. (होकारार्थी)
(आ) भारतीय संघाशिवाय दुसरा कोणता संघ अजिंक्य आहे? (प्रश्नार्थक)

(१०) (अ) लोकांचे अज्ञान पाहून महात्म्याला दुःख होते. (होकारार्थी)
(आ) लोकांचे दुःख पाहून महात्म्याला सुख होत नाही. (नकारार्थी)

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**पुढील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा.**

1) **प्रवासात भरभरून बोलावे. (आज्ञार्थी)** ①②③④

1) प्रवासात भरपूर बोलावे.
2) प्रवासात भरपूर बोलावे का?
3) प्रवासात भरभरून बोला.
4) किती बोलाल प्रवासात!

2) **जीव खूप वेडा होऊन जायचा. (उद्गारार्थी)** ①②③④

1) जीव असाच वेडा व्हायचा.
2) किती वेडा होऊन जायचा जीव!
3) जीव वेडा व्हायचा का?
4) जीव वेडा होऊ द्या.

3) **ही इमारत उंच आहे. (वाक्याचा प्रकार ओळखा)** ①②③④

1) विधानार्थी 2) प्रश्नार्थी
3) आज्ञार्थी 4) उद्गारार्थी

4) **ही काही चांगली कल्पना नाही. (होकारार्थी करा)** ①②③④

1) ही कल्पना वाईट आहे.
2) ही कल्पना चांगली आहे.
3) ही कल्पना वाईटात चांगली आहे.
4) ही कल्पना भारी आहे.

5) **ते काम खूप मोठे आहे. (नकारार्थी करा)** ①②③④

1) ते काम मोठे आहे का?
2) ते काम काही छोटे नाही.
3) किती मोठे आहे हे काम!
4) काम मोठे असावे.

6) **तो मुलगा बेजबाबदार आहे. (विरुद्धार्थी शब्द वापरा)** ①②③④

1) तो मुलगा भोळा आहे.
2) तो मुलगा अबेजबाबदार आहे.
3) तो मुलगा जबाबदार नाही.
4) तो मुलगा शिस्तप्रिय आहे.

7) **साप उंदीर पकडतो. (कर्मकर्तरी)** ①②③④

1) साप उंदीर पकडतो का?
2) सापाने उंदराला पकडावे
3) साप उंदराला पकडत होता
4) उंदीर सापाकडून पकडला जातो.

8) **१) आज पाऊस आला आहे.**
**२) मी शाळेत येणार नाही. (केवलवाक्य करा)** ①②③④

1) आज पाऊस आला म्हणून मी शाळेत येणार नाही.
2) आज पाऊस पडतो व मी शाळेत येत नाही.
3) आज पाऊस पडत असल्यामुळे मी शाळेत येणार नाही.
4) आज पाऊस पडतो आहे सबब मी शाळेत येणार नाही.

9) **पाऊस आल्यामुळे मोर नाचत आहे. (संयुक्त वाक्य करा)** ①②③④

1) पाऊस आल्याकारणाने मोर नाचत आहे.
2) पाऊस आला आहे; म्हणून मोर नाचत आहे.
3) पाऊस येताच मोर नाचतो.
4) पाऊस येणार आहे बघून मोर नाचायला लागला आहे.

10) **सुरेशच्या डोळ्यांत पाणी आले.**
**(नामापासून क्रियापद करून वापरा)** ①②③④

1) सुरेशच्या डोळ्यात पाणी.

2) सुरेशचे डोळे पाण्याने भरले.

3) सुरेशचे डोळे पाणावले.

4) सुरेशच्या डोळ्यात पाणी आहे का?

**11) मी गाडी विकत घेतली. (कर्मणीचे कर्मकर्तरी करा)** ①②③④

1) मी घेतली विकत गाडी.

2) गाडी विकत मी घेतली.

3) माझ्याकडून गाडी विकत घेतली गेली

4) मी गाडी विकत घेतली का?

**12) रामरावांना व्यवहारात तोटा झाला. (विरुद्धार्थी शब्द वापरा)** ①②③④

1) रामरावांना व्यवहारात नुकसान झाले.

2) रामरावांना व्यवहारात तोटा झाला नाही.

3) रामरावांना व्यवहारात फटका बसला.

4) रामरावांना व्यवहारात फायदा झाला नाही.

**पुढीलपैकी वाक्याचा प्रकार ओळखा.**

**13) तुम्ही लवकर घरी जा.** ①②③④

1) नकारार्थी वाक्य  2) विधानार्थी वाक्य

3) आज्ञार्थी वाक्य  4) उद्‌गारार्थी वाक्य

**14) मी वकिली करणार नाही.** ①②③④

1) नकारार्थी वाक्य  2) होकारार्थी वाक्य

3) प्रश्नार्थी वाक्य  4) नकारार्थी वाक्य

**15) निसर्गाला कुठला आला आहे धर्म? (विधानार्थी वाक्य करा)** ①②③④

1) निसर्गाचा धर्म आहे.

2) निसर्गाचा धर्म कोणता?

3) निसर्गाला कुठलाही धर्म नाही.

4) कुठला धर्म आहे निसर्गाला!

**16) तुम्ही डोळे मिटा. (प्रश्नार्थी करा)** ①②③④

1) तुम्ही डोळे मिटता का?

2) तुम्ही डोळे मिटावे.

3) तुम्ही मिटा डोळे

4) तुम्ही डोळे मिटा, बरे होईल.

**17) बागेत फेरफटका मारावा. (आज्ञार्थी करा)** ①②③④

1) बागेत फेरफटका मारावा का?

2) बागेत फेरफटका मारा.

3) बागेत फेरफटका मारल्यास बरे

4) किती फेरफटका मारावा बागेत!

**18) आपल्याकडे कुणी तरी येतंय. (प्रश्नार्थी करा)** ①②③④

1) आपल्याकडे कुणी तरी येणार आहे.

2) कोण येणार आपल्याकडे

3) आपल्याकडे येणारे कोण तरी आहे.

4) आपल्याकडे कुणी तरी येतंय का?

### ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 31 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 2 | 3) 1 | 4) 1 | 5) 2 |
| 6) 3 | 7) 4 | 8) 3 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 3 | 12) 4 | 13) 3 | 14) 1 | 15) 3 |
| 16) 1 | 17) 2 | 18) 4 | | |

# ३२. वृत्ते

## गद्य व पद्य यातील फरक

आपल्या मनात येणारे विचार आपण भाषेद्वारे व्यक्त करतो. विचार व्यक्त करण्याची ही पद्धती दोन प्रकारची आहे.

(१) आपल्या मनात जसे विचार येत जातात, ते जसेच्या तसे बोलून दाखविणे. आपल्या या स्वाभाविक बोलण्याला **गद्य** असे म्हणतात. (गद् = बोलणे) उदा. 'पंढरीला दिंडी चालली पाहा.' हे वाक्य गद्य आहे.

(२) हे विचार किंवा याच वाक्यातील शब्द काही ठरावीक क्रमाने लिहून ते सुरावर म्हणता येतील. अशा पद्धतीने त्यांची रचना केली, तर त्याला **पद्य** असे म्हणतात. वरील गद्यातील वाक्याची रचना पद्यात करावयाची झाल्यास ती अशी होईल.

**'पाहा दिंडी चालली पंढरीला.'**

गद्यामध्ये एकामागून एक वाक्ये येतात, तर पद्यात ओळी किंवा चरण येतात. (पाद = चरण). जे पादयुक्त चरण असतात, त्यांना **पद्य** असे म्हणतात. पद्याचा चरण म्हणताना सारख्या अंतराने टाळी वाजवत राहावे, असे वाटते. यालाच 'लय' असे म्हणतात. पद्य लयबद्ध असते किंवा **लयबद्ध शब्दरचनेला पद्य असे म्हणतात.** पद्यात ही जी विशिष्ट शब्दरचना आपण करतो, तिला **वृत्त** किंवा **छंद** असे म्हणतात.

**खालील पद्यरचना पाहा.**

सदा सर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गूणवंता अनंता ।
रघूनायका मागणे हेचि आता ।।

U - - | U - - | U - - | U - -

या पद्यरचनेकडे सूक्ष्मपणे पाहा. कवितेचे चार चरण (ओळी) आहेत. प्रत्येक चरणात सारखीच म्हणजे प्रत्येकात बारा-बारा अक्षरे आहेत. शिवाय प्रत्येक चरणातील अक्षरांचा ऱ्हस्व स्वर व दीर्घ स्वर यांचा क्रम सारखा आहे. (लघुगुरुचा क्रम सारखा आहे.) म्हणजे पहिले अक्षर ऱ्हस्व व पुढील दोन अक्षरे दीर्घ अशा क्रमाने त्यांची रचना केली आहे. या वृत्तातील प्रत्येक चरणातील अक्षरे सारखी व त्यांचा लघुगुरुक्रम (गण) सारखा आहे. या रचनेला **अक्षरगणवृत्त** असे म्हणतात.

**पुढील पद्यरचना पाहा.**

पोर खाटेवर मृत्युच्याच दारा
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा
दूर आई राहिली कोकणात
सेविकेच्या आधार एक हात

या पद्याचेही चार चरण आहेत, पण यातील प्रत्येक चरणातील अक्षरांची संख्या सारखी नाही. पहिल्या

चरणातील अक्षरांची संख्या १२ आहे, तर दुसऱ्या चरणातील अक्षरांची संख्या १३ आहे. तिसऱ्या व चौथ्या चरणांत प्रत्येकी ११ अक्षरे आहेत. प्रत्येक चरणातील लघुगुरुक्रम सारखा नाही म्हणजे हे अक्षरगणवृत्त नाही. मात्र याच्या प्रत्येक चरणातील अक्षरांच्या एकूण मात्रा मोजल्या तर त्या सारख्याच म्हणजे १९ भरतील. ('मात्रा' कशास म्हणतात, ते पुढे पाहू या.) या पद्यरचनेत अक्षरांपेक्षा मात्रांचे बंधन आहे. अशा पद्यरचनेला **मात्रावृत्त** किंवा **जाती** असे म्हणतात.

आता तिसऱ्या प्रकारची पद्यरचना पाहू या.

चंद्राच्या गालावरी । देव लावी गालबोट ।
भिरकिते आई । माझ्या गाली तुझे ओठ ।

या पद्यरचनेत छोटे चार-चार चरण आहेत. यातील चरणांची अक्षरे ७, ८, ६ व ८ अशी आहेत. त्यांतील अक्षरे ऱ्हस्व असली, तरी ती दीर्घ उच्चारली जातात. अशा प्रकारची जी सैल रचना आहे, तिला **छंद** असे म्हणतात.

पद्यरचनेचे असे तीन प्रकार आपण पाहिले. पद्यरचनेत मात्रा, गण, लघू, गुरू, यती या ज्या संज्ञा वारंवार येतात त्यांची आपण ओळख करून घेऊ.

**मात्रा - एखाद्या अक्षराचा उच्चार करण्यास जो कालावधी किंवा वेळ लागतो त्यास मात्रा असे म्हणतात.** अक्षरांत ऱ्हस्व व दीर्घ असे दोन प्रकारचे उच्चार आहेत. सामान्य भाषेत ज्यांना ऱ्हस्व-दीर्घ असे म्हणतात, त्यांना पद्याच्या भाषेत **लघू-गुरू** असे म्हणतात. अ, इ, उ, ऋ या ऱ्हस्व उच्चारल्या जाणाऱ्या स्वरांस किंवा क, कि, कु, कृ यांसारख्या स्वरयुक्त अक्षरांस **लघू अक्षरे** असे म्हणतात. आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ या दीर्घ उच्चारल्या जाणाऱ्या स्वरांस किंवा का, की, कू, के, कै, को, कौ यांसारख्या स्वरयुक्त अक्षरांस **गुरू अक्षरे** असे म्हणतात. लघू अक्षराची एक मात्रा व गुरू अक्षराच्या दोन मात्रा मोजतात. लघू अक्षर (U) अशा अर्धचंद्राकृतीने व गुरू अक्षर (-) अशा छोट्या आडव्या रेषेने दाखवितात. पुढील शब्दांतील लघुगुरुक्रम व त्यांची मात्रासंख्या खाली दाखविली आहे.

| शब्द | यशोदा | राधिका | सुमन | मालन | सरला | मीनाक्षी |
|---|---|---|---|---|---|---|
| लघुगुरूक्रम | U - - | - U - | U U U | - U U | U U - | - - - |
| मात्रासंख्या | १,२,२ / ५ | २,१,२ / ५ | १,१,१ / ३ | २,१,१ / ४ | ११२ / ४ | २,२,२ / ६ |

'पुस्तक' या शब्दातील लघुगुरुक्रम (-U U) असा आहे. कारण प्रारंभीचे 'पु' अक्षर लघू असते, तरी पुढे 'स्त' हे जोडाक्षर येत असून त्याचा आघात किंवा जोर त्यामागील लघू स्वरावर (म्हणजे 'उ' वर) येत आहे, म्हणून 'पु'च्या दोन मात्रा मोजावयाच्या आहेत. 'ज्ञानप्रकाश' या शब्दातील लघुगुरुक्रम (-UU-U) असा आहे. यातील 'न'ची मात्रा एकच आहे. त्याच्या पुढे 'प्र' हे जोडाक्षर आले असते, तरी त्याचा आघात मागील अक्षरावर (म्हणजे 'न' वर) येत नाही. जोडाक्षरातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल, तर ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे. उदा. भास्कर (U-U) व दीर्घ असेल, तर दीर्घ मानावे. उदा. इच्छा (--). तसेच लघू अक्षरावर अनुस्वार येत असेल किंवा विसर्ग येत असेल, तर ते गुरू मानावे. कवितेतील चरणाच्या शेवटी येणारे लघू अक्षर दीर्घ उच्चारले जाते, म्हणून ते दीर्घ मानावे व त्यास गुरू (-) अशी खूण करावी.

पुढील शब्दांचे लघुगुरुक्रम व मात्रा कशा मांडतात ते पाहा.

| शब्द<br>लघुगुरुक्रम | पुस्तक<br>– ∪ ∪ | अंगण<br>– ∪ ∪ | स्वतःचा<br>∪ – – | दुःखाने<br>– – – | उन्हात<br>∪ – ∪ |
|---|---|---|---|---|---|
| मात्रासंख्या | २,१,१<br>४ | २,१,१<br>४ | १,२,२<br>५ | २,२,२<br>६ | १,२,१<br>४ |

वरील सर्व माहिती लक्षात ठेवण्याच्या दृष्टीने परशुराम पंत तात्या गोडबोले यांच्या 'वृत्तदर्पण' या ग्रंथातील पुढील श्लोक उपयुक्त ठरेल.

न्हस्व स्वराते लघू बोलताती ।
दीर्घ स्वराते गुरू नाम देती ।।
पुढे अनुस्वार विसर्ग येतो ।
संयोग न्हस्वास गुरूत्व देतो ।।

**गण** - पद्याच्या चरणातील अक्षरांचा लघुगुरुक्रम मांडून वृत्ताची लक्षणे ठरविताना त्यातील तीन अक्षरांचा एकेक गट करून तो मांडण्याची पद्धत आहे. यांनाच **गण** असे म्हणतात. गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप. या तीन अक्षरांच्या गटात काही अक्षरे लघू, तर काही अक्षरे गुरू असणार, म्हणून तीन अक्षरी शब्दांचे लघुगुरुक्रमाने एकंदर आठ गण पडतात.

**यमाताराजभानसलगं**

या एका सूत्रात सर्व गणांची लक्षणे एकत्र गोविलेली आहेत. यातील प्रत्येकी तीन अक्षरांचे पुढीलप्रमाणे आठ गण पडतात.

| यमाता | मातारा | ताराज | राजभा | जभान | भानस | नसल | सलगं |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ∪ – – | – – – | – – ∪ | – ∪ – | ∪ – ∪ | – ∪ ∪ | ∪ ∪ ∪ | ∪ ∪ – |

या प्रत्येक गणाच्या प्रारंभीचे अक्षर त्या गणाचे नाव आहे. याप्रमाणे या आठ गणांना य गण, म गण याप्रमाणे य, म, त, र, ज, भ, न, स अशी आठ नावे दिलेली आहेत. पण लघू किंवा गुरू अक्षर गणाच्या आरंभी किंवा शेवटी येण्याचा क्रम लक्षात ठेवल्यास गण ओळखणे सोपे जाते. त्या दृष्टीने पुढील मांडणी पाहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) आरंभीचे | अक्षर | लघू | यमाचा | य | गण | (आद्य लघू) | ∪ – – |
| (२) मधले | अक्षर | लघू | राधिका | र | गण | (मध्य लघू) | – ∪ – |
| (३) शेवटचे | अक्षर | लघू | ताराप | त | गण | (अंत्य लघू) | – – ∪ |
| (४) प्रत्येक | अक्षर | लघू | नमन | न | गण | (सर्व लघू) | ∪ ∪ ∪ |
| (५) आरंभीचे | अक्षर | गुरू | भास्कर | भ | गण | (आद्य गुरू) | – ∪ ∪ |
| (६) मधले | अक्षर | गुरू | जनास | ज | गण | (मध्य गुरू) | ∪ – ∪ |
| (७) शेवटचे | अक्षर | गुरू | समरा | स | गण | (अंत्य गुरू) | ∪ ∪ – |
| (८) प्रत्येक | अक्षर | गुरू | मानावा | म | गण | (सर्व गुरू) | – – – |

य, र, त, न, भ, ज, स, म ही गणांची नावे अशी आहेत की, त्यांच्या लघुगुरुच्या चिन्हांनी त्यांची ओळख लक्षात राहते. ती पुढीलप्रमाणे-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | य | यमाचा<br>U – – | (२) | र | राधिका<br>– U – |
| (३) | त | ताराप<br>– – U | (४) | न | नमन<br>U U U |
| (५) | भ | भास्कर<br>– U U | (६) | ज | जनास<br>U – U |
| (७) | स | समरा<br>U U – | (८) | म | मानावा<br>– – – |

पहिल्या गटातील क्रमाने चार गणांची रचना आद्य लघू, मध्य लघू, अंत्य लघू व सर्व लघू अशी असून दुसऱ्या गटातील क्रमाने चार गणांची रचना (अनुक्रमे ५, ६, ७, ८) आद्य गुरू, मध्य गुरू, अंत्य गुरू व सर्व गुरू अशी आहे. हेच सांगणारा पुढील श्लोक व त्यातील रंगीत ठशातील शब्द लक्षात ठेवण्यासारखे आहेत. हा श्लोक असा-

आदिमध्यावसानी ये / यरता लघू अक्षर ।।
भजसा तेवि गुरू ये / मन सर्व गुरू लघू ।।

गणात आदि (आरंभी), मध्ये व अवसानी (शेवटी) लघू अक्षर येत असेल, तर त्या वेळी य-र-त हे गण असतात. त्याचप्रमाणे गुरू अक्षर प्रारंभी, मध्ये व शेवटी आल्यास भ-ज-स हे गण असतात. सर्व गुरू असले, तर 'म' गण व सर्व लघू अक्षरे असल्यास 'न' गण असतो. यरत, भजस, मन या तीन शब्दांवरून गण सहज ओळखता येतो.

काव्यपंक्तीमध्ये एखादे अक्षर 'लघू' असूनही गुरू मानावे लागते. त्यासंबंधीचे नियम एकत्रितपणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) जर लघू अक्षराच्या पुढे जोडाक्षर आले व त्याचा आघात जर त्या लघू स्वरावर होत असेल, तर तो लघू स्वर दीर्घ (गुरू) मानावा.

उदा. पुस्तक.
– U U

पण जर लघू स्वराच्यापुढे जोडाक्षर आले आणि त्याचा आघात लघू स्वरावर होत नसेल, तर तो लघू स्वर कायम ठेवावा.

(२) जर अनुस्वारयुक्त स्वर आला, तर ज्या स्वरावर अनुस्वार असेल तो स्वर गुरू मानावा. उदा. नंतर.
–UU

(३) जर विसर्गयुक्त स्वर आला, तर ज्या स्वरानंतर विसर्ग आला असेल तो स्वर दीर्घ मानावा. उदा. दुःखी.

(४) जर काव्यपंक्तीच्या अखेरीस लघुस्वरयुक्त अक्षर आले व जर ते दीर्घ उच्चारले जात असेल, तर ते गुरू मानावे.

उदा. 'पखरण बघ घाली भूवरी पारिजात'

या काव्यपंक्तीमध्ये 'पारिजात' या शब्दातील शेवटचे अक्षर 'त' हे 'त+अ' म्हणजे लघू स्वर असलेले आहे. परंतु इथे ते दीर्घ उच्चारले जाते म्हणून 'त' हे लघू न मानता 'गुरू' मानावे लागेल व पारिजात याचे

गण पाडताना पारिजात असे पाडावे लागतील.
-U--

## गणलेखनाची पद्धत

(१) कवितेच्या ओळीतील शब्दांचे तीन अक्षरांचे गट पाडून त्यांना लघू व गुरूच्या खुणा करून त्याप्रमाणे गणांची नावे देतात. उदा.

'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे' या ओळीचे गणलेखन पुढीलप्रमाणे होईल.

('ल, ग क्रम' म्हणजे लघू व गुरू अशा खुणा होत.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लगक्रम | U-- | U-- | U-- | U-- |
| काव्यपंक्ती | मनास | ज्जनाभ | क्तिपंथे | चिजावे |
| गण | य, | य, | य, | य |

**स्पष्टीकरण**

(अ) वरील काव्यपंक्तीमध्ये 'स' हे अक्षर (स्+अ) लघू असूनही आपण त्याला गुरू मानून (-) अशी खूण केली आहे. कारण पुढे 'ज्ज' हे जोडाक्षर येत असून त्याचा आघात 'स' वर होत आहे. तसेच भक्तीच्या बाबतीतही आहे.

(आ) 'पंथेचि'मध्ये 'प' हे अक्षर (प्+अ) लघू असूनही आपण गुरू मानून गुरू (-) अशी खूण केलेली आहे. कारण 'पंथेचि' या शब्दातील 'पं' या अक्षरात अ या लघू स्वरानंतर अनुस्वार आला आहे. (प्+अ+अनुस्वार)

(२) काव्यपंक्तीमध्ये तीनचे गट करून शेवटी एक किंवा दोन अक्षरे शिल्लक राहिली, तर त्यांच्या उच्चाराप्रमाणे 'ल' 'ग' असे गण मानून लघू (U) व गुरू (-) अशा खुणा कराव्यात.

उदा - 'महाराष्ट्री सृष्टी स्वविभव चतुर्मास मिरवी' या काव्यपंक्तीचे तीन अक्षरांचे गट पाडून अखेरील दोन अक्षरे शिल्लक राहतात.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम | U-- | --- | UUU | UU- | -UU | U- |
| काव्यपंक्ती | महारा | ष्ट्रीसृष्टी | स्वविभ | वचतु | र्मासमि | रवी |
| गण | य | म | न | स | भ | ल, ग |

**स्पष्टीकरण**

वरील काव्यपंक्तीमध्ये १७ अक्षरे आहेत. त्यामुळे तीन अक्षरांचे पाच गट पाडले व दोन अक्षरे शिल्लक राहिली. त्यांना उच्चाराप्रमाणे लघू व गुरू (U -) अशा खुणा करून 'ल' 'ग' अशी गणांची नावे दिली आहेत.

**यती -** कवितेचा चरण म्हणत असताना आपण मध्येच काही अक्षरांनंतर थांबतो. (खरेतर नैसर्गिक रीतीने थांबतो.) या थांबण्याच्या जागेला किंवा विरामाला यती असे म्हणतात. ज्या क्रमांकाच्या अक्षरानंतर आपण थांबतो, त्या क्रमांकाच्या अक्षरावर 'यती' आहे, असे वर्णन करतात. उदा. 'मना सज्जना तू कडेनेच जावे' ही काव्यपंक्ती म्हणताना आपण 'तू' या अक्षरानंतर थांबतो ते अक्षर सहावे आहे, म्हणून 'सहाव्या अक्षरावर यती' असे वर्णन केले जाते.

**यतिभंग -** यतीच्या जागी शब्द पूर्ण व्हावा. तो शक्यतो तोडला जाऊ नये. यतीमुळे शब्द तोडला जात असेल, तर त्या ठिकाणी 'यतिभंग' हा दोष झाला असे मानले जाते.

उदा. बहु असोत सुंदर सं-पन्न की महा

प्रिय अमुचा एक महा-राष्ट्र देश हा

वरील काव्यपंक्तींमध्ये 'सं-पन्न' व 'महा-राष्ट्र' असे शब्द तोडावे लागले आहेत.

**उदाहरण व लक्षण :-** आपल्याला अक्षरगणवृत्त, मात्रावृत्त व छंद यांचा अभ्यास करावयाचा आहे. त्या प्रत्येकात उदाहरण व लक्षण असे भाग आहेत. त्या वृत्ताचे 'उदाहरण' म्हणजे त्या वृत्तातील कवितेचे कडवे होय. सामान्यतः चार चरणांचे एक कडवे होते. ते बिनचूक लिहावे. 'चरण' म्हणजे कवितेची ओळ. कवितेचा चरण लिहून ल - ग क्रम (लघू-गुरू) द्यावेत. गण पाडून दाखवावेत. लक्षणामध्ये पुढील मुद्दे असावेत.

(१) वृत्ताचा प्रकार - उदा. अक्षरगणवृत्त, मात्रावृत्त, छंद.

(२) गण किंवा मात्रासंख्या, मात्रारचना, छंद असल्यास अक्षर संख्या.

(३) चरणातील अक्षरांची संख्या (अक्षरगणवृत्ताच्या बाबतीत).

(४) कोणत्या अक्षरांवर यती येतात, त्याची माहिती.

(५) लक्षणाची ओळ (सामान्यपणे अक्षरगणवृत्ताच्या बाबतीत)

पुढील वृत्तांची माहिती देताना पुष्कळशी कै. मा. त्रि. पटवर्धन रचित उदाहरणे आहेत.

## वृत्ते

**(१) इंद्रवज्रा -**

दुःखी जगा देखुनिया द्रवे ते
सच्चित्त माते नवनीत वाटे
अन्याय कोठे दिसता परी ते
त्या इंद्रवज्रासहि लाजवीते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** | - | – –U | – –U | U – U | – – |
| **गण** | - | त | त | ज | ग ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात ११ अक्षरे असतात.

**गण** - त - त - ज - ग - ग यती ५व्या अक्षरावर

**ता - ता - ज - गा - गा गणि इंद्रवज्रा ।**

**(२) उपेंद्रवज्रा -**

करी कसूनी नित भूमिसेवा
तयास खायास असे नसे वा
परी तया जो अळशी विलासी
उपेंद्रवज्रासन दे मिराशी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** | - | U–U | – –U | U – U | – – |
| **गण** | - | ज | त | ज | ग ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात ११ अक्षरे असतात.

**गण** - ज - त - ज - ग - ग यती ५व्या अक्षरावर

**ज - ता - ज - गा गीच उपेंद्रवज्रा ।**

**(३) उपजाती -** हे नाव दोन वृत्तांच्या मिश्रणास देतात. पुढील उदाहरणात एक चरण इंद्रवज्रेचा व दुसरा चरण उपेंद्रवज्रेचा असल्याचे आढळून येईल. कधी-कधी पहिले दोन चरण इंद्रवज्रेचे व त्याच्यापुढील दोन चरण उपेंद्रवज्रेचेही असतात.

उदा. - 
हा जातिविध्वंसन काल आला
समानतेच्या उभवा ध्वजाला
राष्ट्रीय जो सर्व जनाभिमानी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** - | – – U | – – U | U – U | – – | **(इंद्रवज्रा)** |
| **गण** - | त | त | ज | ग ग | |

न जाति तो वा उपजाति मानी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** - | U – U | – – U | U – U | – – | |
| **गण** - | ज | त | ज | ग ग | **(उपेंद्रवज्रा)** |

**(४) भुजंगप्रयात -** मना सज्जना तू कडेनेच जावे
न होऊन कोणासही दूखवावे
कुणी दुष्ट अंगास लावील हात
तरी दाखवावा भुजंगप्रयात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **लगक्रम** - | U – – | U – – | U – – | U – – |
| **गण** - | य | य | य | य |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात १२ अक्षरे असतात.
**गण** - य - य - य - य  यती ६व्या अक्षरावर.
**भुजंगप्रयाती 'य' ये चार वेळा।**

**(५) द्रुतविलंबित -** सवड सापडता न करी मजा,
नित हळूहळु कष्ट करीत जा.
गहन कर्मगती तुज बोलते,
द्रुतविलंबित जे श्रम फोल ते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **लगक्रम** - | UUU | – U U | – UU | – U – |
| **गण** - | न | भ | भ | र |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात १२ अक्षरे असतात.
**गण** - न - भ - भ - र  यती चरणाच्या शेवटी.
**द्रुतविलंबित वृत्त न - भा - भ - री।**

**(६) वसंततिलका** - आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश
फेकी रसाल तरुही मधुगंधपाश
ऐकू न ये तुज पिकस्वर मंजुळे का?
वृत्ती वसंततिलका न तुझी खुले का?

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** | - | -- U | -UU | U - U | U - U | - - |
| **गण** | - | त | भ | ज | ज | ग ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १४ अक्षरे असतात.

**गण** - त - भ - ज - ज - ग - ग यती ८व्या अक्षरावर.

**येती वसंततिलकी त - भ - जा - ज - गा - गा ।**

**(७) मालिनी** - पखरण बघ घाली भूवरी पारिजात,
परिमल उधळी हा सोनचाफा दिशात;
गवतहि सुमभूषा दाखवी आज देही,
धरणि हरितवस्त्रा मालिनी साजते ही.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** | - | UUU | UUU | - - - | U - - | U - - |
| **गण** | - | न | न | म | य | य |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १५ अक्षरे.

**गण** - न - न - म - य - य यती ८व्या अक्षरावर.

**न - न - म - य - य गणांनी मालिनी वृत्त होते ।**

**(८) शिखरिणी** - महाराष्ट्री सृष्टी स्वविभव चतुर्मास मिरवी,
अहा ती मैदाने चिररुचिर येथे न हिरवी,
वहाती येथे न स्थिर गहन विस्तीर्ण तटिनी,
पहा सह्याचीच प्रखर गिरिराजी शिखरिणी.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम** | - | U - - | - - - | UUU | UU - | - U U | U - |
| **गण** | - | य | म | न | स | भ | ल ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १७ अक्षरे असतात.

**गण** - य - म - न - स - भ - ल - ग यती ६व्या व १२व्या अक्षरांवर.

**जयामध्ये येती, य - म - न - स - भ - ला - गा शिखरिणी।**

**(९) मंदाक्रांता** - मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी
होई पर्युत्सुक विकल तो कांत एकांतवासी
तन्निःश्वास श्रवुन रिझवी कोण त्याच्या जिवासी?

मंदाक्रांता सरस कविता कालिदासी विलासी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम - | – – – | – UU | U UU | – – U | – – U | – – |
| गण - | म | भ | न | त | त | ग ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १७ अक्षरे असतात.
**गण** - म - भ - न - त - त - ग - ग यती चौथ्या व ६व्या अक्षरांवर.
मंदाक्रांता म - भ - न - त - त - गा - गा गणी मंद चाले ।

**(१०) पृथ्वी -** कुठे भटकशी घना? वळुनि ऐक केकावली
न हाक हृदयी तुझ्या जननिची कशी पावली?
सुकूनि विरहानले मलिन दीन साध्वी पडे,
विलंबित गति त्यजी, द्रवुनि धाव पृथ्वीकडे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम - | U–U | U U– | U – U | U U – | U – – | U – |
| गण - | ज | स | ज | स | य | ल ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १७ अक्षरे असतात.
**गण** - ज - स - ज - स - य - ल - ग यती ८व्या अक्षरावर.
सदैव धरिते ज - सा - ज - स - य - ल - ग पृथ्वी पदी ।

**(११) हरिणी -** दचकुनि बघे व्याधाला जो सवत्स कुणी मृगी
चपल चरणी घे उड्डाणे, स्थिरेल कशी उगी?
जव चिमुकल्या वत्साला तो धरी, उचलूनि घे
परतुनि तया मागे मागे पहा हरिणी निघे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम - | UUU | U U– | – – – | – U – | U U – | U – |
| गण - | न | स | म | र | स | ल ग |

**लक्षण** - हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात १७ अक्षरे असतात.
**गण** - न - स - म - र - स - ल - ग यती ६व्या व १०व्या अक्षरावर.
न - स - म - र - स त्या पुढती येती, ल-गा, हरिणीच ती ।

**(१२) शार्दूलविक्रीडित -**

भाषा संस्कृति थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे
नाना धर्म असंख्य जाति असती अद्यापि सारे खरे
भेदांनी परि या कितीं दिन तुवा व्हावे त्रिधा पीडित
जाणूनी अपुले स्वरूप कर तू शार्दूलविक्रीडित

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम - | – – – | U U – | U – U | UU – | – – U | – – U | – |
| गण - | म | स | ज | स | त | त | ग |

**लक्षण -** हे अक्षरगणवृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात १९ अक्षरे असतात.

**गण -** म - स - ज - स - त - त - ग यती १२व्या अक्षरावर.

**मा - सा - जा - स - त - ता - ग येति गण ते शार्दूलविक्रीडित ।**

**(१३) स्रग्धरा -**

ही का आकाशगंगा? अवतरण न का? दीसती का न वीची?
का घे शामा नभःश्री स्रज विमल शिरी दिव्य ही माधवीची?
स्वर्गीचे हे बघूनी विभव मन कसे होउनी मुग्ध राही!
तेजोराशी प्रभूची चिररुचिर वधू प्रकृति **स्रग्धरा** ही।

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम -** | – – – | – U – | – U U | U U U | U – – | U – – | U – – |
| **गण -** | म | र | भ | न | य | य | य |

**लक्षण -** हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात अक्षरे २१.

**गण -** म - र - भ - न - य - य - य यती ७व्या व १४व्या अक्षरांवर.

**डौलाने चालते जी म -र - भ - न - य - य - यी, स्रग्धरा सुंदरा ती ।**

**(१४) मंदारमाला -**

शोभे सभोवार **मंदारमाला** मुदे वाहते मंद मंदाकिनी
वीणा करी मंजु झंकार हाती, असे शारदा ही जगन्मोहिनी

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम -** | – – U | – – U | – – U | – – U | – – U | – – U | – – U | – |
| **गण -** | त | त | त | त | त | त | त | ग |

**लक्षण -** हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात अक्षरे २२.

**गण -** त - त - त - त - त - त - त - ग यती चौथ्या, दहाव्या, सोळाव्या अक्षरांवर.

**साता 'त' कारीच मंदारमाला गुरू एक त्याच्याही अंती वसे ।**

**(१५) सुमंदारमाला -**

(मंदारमालेच्या आरंभी एक लघू अक्षर आले की, हे वृत्त होते.)

मराठी असे आमुची मायबोली, जरी भिन्न धर्मानुयायी असू
पुरी बाणली बंधुता अंतरंगी, हिच्या एक ताटात आम्ही बसू

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लगक्रम -** | U – – | U – – | U – – | U – – | U – – | U – – | U – – | U – |
| **गण -** | य | य | य | य | य | य | य | ल ग |

**लक्षण -** हे अक्षरगणवृत्त आहे. प्रत्येक चरणात अक्षरे २३.

**गण -** य - य - य - य - य - य - य - ल - ग यती पाचव्या, अकराव्या, सतराव्या अक्षरांवर.

**सुमंदारमालेत मंदारमालेहुनी एक ये आदि लघ्वक्षर ।**

## मात्रावृत्ते (जाती)

अक्षरगणवृत्तांतील काही महत्त्वाची वृत्ते आपण पाहिली. आता काही महत्त्वाच्या मात्रावृत्तांचा परिचय

करून घेऊ. **मात्रा** कशास म्हणतात व त्या कशा मोजतात हे या पाठाच्या प्रारंभी आपण पाहिले. ज्या कवितेच्या चरणात अक्षराचे व गणांचे बंधन नसून केवळ मात्रांचे बंधन असते, त्यास **मात्रावृत्त** किंवा **जाती** असे म्हणतात. मराठीत ज्यांना आपण 'पदे' म्हणतो त्यांचा समावेश मात्रावृत्तांत होतो. मात्रावृत्तांत पदांशिवाय अनेक प्रकारच्या पद्यरचना आढळतात. सलग वर्णन करताना म्हटले जाणारे **कटाव**, उपदेशाचे घोट पाजणारे **फटके**, परमेश्वराला आळविण्यासाठी म्हटल्या जाणाऱ्या **भूपाळ्या व आरत्या**, तान्ह्या मुलांसाठी रचलेली **अंगाई-गीते व पाळणे**, शूरवीरांची कीर्ती गाणारे पोवाडे व **समरगीते**, तरुणांच्या प्रेमांची चित्रणे करणाऱ्या **लावण्या** अशांचा समावेश मात्रावृत्तांतच होतो.

मात्रावृत्तांत ठरावीक मात्रांचे सर्व चरण असतात असे नाही. निरनिराळ्या मात्रावलींचे भाग एकत्र केलेले असतात. प्रारंभी ध्रुवपद, मग कडवे व कधी-कधी कडव्यात चाल बदलून येणारा अंतरा व कडव्याच्या शेवटी पुनःपुन्हा म्हणावयाच्या प्रारंभीच्या ओळी म्हणजे ध्रुवपद अशी ही रचना असते. पदे म्हणताना आपण ताल धरतो, म्हणजे ठरावीक अंतरावर आपण थांबतो व टाळी वाजवितो.

चरणातील मात्रा मोजताना कधी-कधी आठ मात्रांचा किंवा सहा मात्रांचा असे गट किंवा गण पडतात. आठ मात्रांच्या गटाला **पद्म** असे म्हणतात (पद्म = कमळ. कमळाला आठ पाकळ्या असतात) व ते 'प' या अक्षराने दाखविले जाते. सहा मात्रांच्या गटाला **भृंग** म्हणतात. (भृंग = भुंगा. भुंग्याला सहा पाय असतात.) हा गट 'भृ' या अक्षराने दाखवितात. चार किंवा पाच मात्रांच्या गटांना 'क' (कवळलिंब) म्हणतात. मात्रावृत्ताच्या चरणात पद्माचा किंवा भृंगाचा एकच गट न येता अनेक गट येतात. त्यांना **आवर्तन** म्हणतात. मात्रावृत्ताच्या चरणातील मात्रा कशा मोजतात व त्यांतील गटांचे लेखन कसे करतात ते पाहा.

| | | | |
|---|---|---|---|
| प ती त पा व न | ना म ऐ कु नी | आ लो मी दा | रा |
| १ २ १ २ १ १ | २ १ २ १ २ | २ २ २ २ | २ |
| ८ | ८ | ८ | २ |
| प | प | प | + |

चरणाच्या शेवटी दोन मात्रांचे एक अक्षर असेल, तर ते + चिन्हाने दाखवतात. जसे दोन मात्रा (+), तीन मात्रा (U +), चार मात्रा (- +), सहा मात्रा (- - +).

वरील 'पतितपावन' मात्रावृत्तात पद्माची तीन आवर्तने व शेवटी एक गुरू येतो. त्याच्या लक्षणाचे लेखन (प। प। प। +) असे केले जाते.

मात्रावृत्तात चार मात्रांचा एक गण मानतात. असे मात्रागण पाच आहेत.

म – –, स U U –, ज U – U, भ – U U, न U U U U.

मात्रावृत्तात सगळ्याच चरणांतील मात्रा सारख्या असल्या, तर त्यास **समजाती** म्हणतात. दोन भिन्न मात्रावलींचे चरण असल्यास **विषमजाती** म्हणतात.

पुढील मात्रावृत्तांची लक्षणे पाहा.

(१) **दिंडी** -  घोष होता 'ग्यानबा तुकाराम'
(मात्रा १९)  राउळाची ही वाट सुखाराम
९+१०  करी भक्ती चित्तात नृत्यलीला
पहा दिंडी चालली पंढरीला

१२ २ २ २ | १२ २१२२
=९ | =१०

यातील चारही चरणांतील मात्रासंख्या मोजली, तर प्रत्येकात १९ भरते. म्हणून हे मात्रावृत्त आहे. प्रत्येक चरणात दोन स्पष्ट भाग पडतात. पहिल्यात ९ मात्रा व दुसऱ्यात १० मात्रा असतात व यांचेदेखील पूर्वार्धात ३-२-२-२ व उत्तरार्धात ३-३-२-२ असे मात्रागणांचे भाग पडतात. गण संपला की, अक्षर संपावयास हवे. ही कविता चालीवर म्हणून पाहा म्हणजे याची स्पष्ट कल्पना येईल.

**(२) आर्या** - संस्कृतात ज्याला गीती म्हणतात त्या पद्य प्रकाराला मराठीत आर्या म्हणतात. मोरोपंतांच्या आर्या प्रसिद्ध आहेत. आर्येचे एक उदाहरण पाहा.

मात्रा ३०
१२+१८ } सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
१२+१८ } ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ।।
मात्रा - २ २ २ २ २ २ | २ २ २ २ १२१२२ २
= १२ | = १८

**लक्षण** - आर्या हे अर्धसम मात्रावृत्त आहे. त्याचे दोन मोठे चरण दिसत असले, तरी प्रत्येक चरणाचे पूर्वार्ध (१२ मात्रांचा) व उत्तरार्ध (१८ मात्रांचा) असे दोन भाग पडतात; पण सामान्यतः आर्येचे चार चरण मानतात. त्यांतील पहिल्या व तिसऱ्या चरणांत प्रत्येकी १२ मात्रा असून दुसऱ्या व चौथ्या चरणांत १८ मात्रा असतात.

## मात्रावृत्ते (जाती) उदाहरणे व लक्षणे

### पद्मावर्तनी समजाती

**(३) पादाकुलक** - हिरवे हिरवे गार गालिचे
मात्रा १६ } हरित तृणाच्या मखमालीचे
८+८ } त्या सुंदर मखमालीवरती
प । प } **फु ल रा णी ही | खे ळ त हो ती**
U U – – – | – U U – –
१ १ २ २ २ | २ १ १ २ २
प | प

**लक्षण** - हे मात्रावृत्त आहे. ह्याच्या प्रत्येक चरणात १६ मात्रा असून ८ व ८ मात्रांची अशी पद्याची दोन आवर्तने येतात. ही पद्मावर्तनी समजाती आहे.

**(४) उद्धव** - मध्वमुनीश्वरांच्या प्रसिद्ध पद्यावरून हे नाव देण्यात आले आहे. त्यांचे प्रारंभीचे दोन चरण पुढीलप्रमाणे-

मात्रा १४ } उद्धवा शांतवन कर जा । त्या गोकुलवासि जनांचे ।। ध्रु. ।।
- । प । - + } – | U– – UUU | UU –
२+८+४ } २ | १२ २१११ | ११ २
- | प | - +

उद्धवाच्या प्रत्येक चरणातील मात्रा १४ असल्या, तरी त्याचे २+८+४ असे गट पडतात. दोन चरण मिळून ध्रुवपद होते. याला अंतरादेखील १४ मात्रांचा असतो.

(५) **बालानंद** - आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चोहिकडे

(अचलगती) वरती खाली मोद भरे । वायूसंगे मोद फिरे

| | | |
|---|---|---|
| मात्रा १४ | आ नं दी आ | नं द ग डे |
| ८+६ | - - - - | - U U - |
| प । - - + | २ २ २ २ | २ १ १ २ |
| | ८ | ६ |
| | प | - - + |

प्रत्येक चरणात ८ व ६ असे मात्रांचे दोन गट असतात. अंतरा पद्याचा म्हणजे कधी ८ मात्रांचा असतो, कधी नसतो. बालकवींच्या 'आनंदी आनंद गडे' या कवितेवरून याला **बालानंद** असे नाव देण्यात आले आहे. या वृत्ताला **अचलगती** असे नाव डॉ. माधवराव पटवर्धन यांनी दिले आहे.

(६) **भूपतिवैभव** - नाटककार गो. ब. देवल यांच्या एका पदावरून या वृत्ताला हे नाव देण्यात आले. त्याचा प्रारंभीचा चरण पुढीलप्रमाणे-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मात्रा २२ | भू | पती खरे ते | वैभवसुख से | वीती |
| २+८+८+४ | २ | १२ १२ २ | २११११ २ | २ २ |
| -। प ।प ।- + | २ | ८ | ८ | ४ |
| | - | प | प | - + |

याच्या प्रत्येक चरणात (२+८+८+४) असे २२ मात्रांचे गट असतात व याला (१४+५) = १९ मात्रांचा अंतरा असतो.

(७) **चंद्रकांत** - (पतितपावन) देवलांच्या 'झुंझारराव' नाटकातील सुप्रसिद्ध अशा पद्यावरून या मात्रावृत्ताला **चंद्रकांत** हे नाव पडले. त्याचे प्रारंभीचे चरण पुढीलप्रमाणे आहेत.

मात्रा २६ चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूपखाणी

८+८+८+२ पतिव्रता सद्‌गुणी शहाणी, पतिही वाखाणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प ।प ।प ।+ | U- U- - | U- U- - | UU- -- | - |
| | १२ १२ २ | १२ १२ २ | १ १ २ २ २ | २ |
| | ८ | ८ | ८ | २ |
| | प | प | प | + |

**लक्षण** - हे मात्रावृत्त आहे. याच्या प्रत्येक चरणात २६ मात्रा असून त्यात प्रारंभी ८+८+८ अशी पद्याची तीन आवर्तने असतात. या वृत्ताला डॉ. माधवराव पटवर्धनांनी **पतितपावन** असे नाव दिले आहे.

(८) **सूर्यकांत** - बालकवींची 'औदुंबर' ही कविता 'सूर्यकांत' वृत्तात (समुदितमदना) आहे. या कवितेचे शेवटचे दोन चरण पाहा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मात्रा २७ | झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर | | | |
| ८+८+८+३ | पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर | | | |
| प।प।प।U + | –U –U– | U–U UU– | UU– –– | U– |
| | २१ २१ २ | १२ १ ११२ | १ १ २२२ | १२ |
| | ८ | ८ | ८ | ३ |
| | प | प | प | U+ |

**(९) साकी** - (लवंगलता) नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मात्रा २८ | कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे | | | |
| ८+८+८+४ | –U U– UU | –– –– | UU– – – | –– |
| प।प।प। –+ | २१ १२ ११ | २ २ २२ | १ १२ २ २ | २ २ |
| | ८ | ८ | ८ | ४ |
| | प | प | प | –+ |

या वृत्ताला पटवर्धनांनी **लवंगलता** हे नाव दिले आहे. जुन्या साकी वृत्तात तिसरा एक चरण आहे.

**(१०) फटका (हरिभगिनी)** - लोकांनी जगात कसे वागावे हे सांगण्यासाठी अनंतफंदी या कवीने जे उपदेशाचे फटके मारले त्यावरून या वृत्ताला **फटका** हे नाव मिळाले. याला माधवराव पटवर्धनांनी **हरिभगिनी** हे नाव दिले. अनंतफंदीच्या कवितेचे पहिले दोन चरण पुढीलप्रमाणे-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मात्रा ३० | बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडु नको | | | |
| ८+८+८+६ | संसारामधि ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको. | | | |
| प।प।प।– – | –––UU | –U –U– | U–U UUUU | U – U– |
| | २२२११ | २१ २१ २ | १२१ ११११ | १ २ १२ |
| | ८ | ८ | ८ | ६ |
| | प | प | प | – – + |

या वृत्ताला कधी-कधी बालानंद जातीचा १४ मात्रांचा अंतरा असतो.

## पद्मावर्तनी अर्ध समजाती

**(११) अक्रूर** - 'अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला' या जुन्या पद्यावरून हे नाव पडले. या वृत्ताच्या पुढील उदाहरणातील पहिले दोन चरण पाहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बा नीज गडे | नीज गडे लडि | वाळा | नीज नीज माझ्या | बाळा |
| (मात्रा २० व १४) | – –UU– | –UU– UU | – – | –U –U – – | – – |
| | २ २ १ १ | २२११२ ११ | २ २ | २१ २१ २ २ | २ २ |
| | ८ | ८ | ४ | १० | ४ |

पहिल्या चरणात २० मात्रा व दुसऱ्या चरणात १४ मात्रा असतात. अंतरा 'खडबड हे उंदिर करिती' अशा प्रत्येकी १५ मात्रांच्या तीन चरणांचा असतो.

**(१२) केशवकरणी -** रामजोशींच्या प्रसिद्ध पद्यावरून या वृत्ताला हे नाव पडले. त्याचे पहिले दोन चरण पुढीलप्रमाणे आहेत.

मात्रा २७ व १६
प।प।प।U += २७
क।प।U + = १६

केशवकरणी अद्‌भुतलीला नारायण तो कसा

| –UUUU– | –U U–– | ––UU – | U – |
|---|---|---|---|
| ८ | ८ | ८ | ३ |

तयाचा सकल जनांवर ठसा

| U – – | UUU U–UU | U– |
|---|---|---|
| ५ | ८ | ३ |

याच्या पहिल्या चरणात ८+८+८+३ = २७ मात्रा असतात व दुसऱ्या चरणात ५+८+३ = १६ मात्रा असतात. कधी-कधी १४+७ = २१ मात्रांचा अंतरा असतो.

**(१३) मुद्रिका -** 'मुद्रिके, राम टाकुनी आलिस तू कशी' या जुन्या पद्यावरून या वृत्ताला हे नाव पडले. माधव जूलियन यांची 'वृद्ध कवी' ही कविता या वृत्तातली आहे. त्याचे पहिले दोन चरण पुढीलप्रमाणे-

(मात्रा २१ व २७)
-।प।प।U + = २१
-।प।--।-।प।U+ = २७

का उठता खाली बसा तरुण मंडळी

| २ | ११२ २ २ | १ २ १११ २ | १ २ |
|---|---|---|---|
| | १० | ११ | |

उप चार ठेविता का हा? समताच योग्य या स्थळी

| ११ | २१ २ १ २ २ | २ | ११ २१ | २ १ | २ | १ २ |
|---|---|---|---|---|---|---|
| | १४ | | | १३ | | |

यातील पहिला चरण २१ मात्रांचा असतो. त्यांचे १० व ११ मात्रांचे दोन भाग पडतात. दुसरा चरण मोठा २७ मात्रांचा असून त्याचे १४ व १३ मात्रांचे दोन भाग पडतात.

## पद्यावर्तनी विषमजाती

**(१४) नववधू :-** कविवर्य तांबे यांच्या 'नववधू प्रिया मी बावरते' या पद्यावरून हे नाव पडले. त्याच्या पहिल्या कडव्यातील ओळी पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| नववधू प्रिया, मी बावरते | २+८+६ = १६ मात्रा |
| लाजते, पुढे सरते, फिरते।। ध्रु. ।। | २+८+६ = १६ मात्रा |
| कळे मला तू प्राणसखा जरि | ८+८ = १६ मात्रा |
| कळे तूच आधार सुखा जरि | ८+८ = १६ मात्रा |
| तुजवाचुनि संसार फुका जरि | ८+८ = १६ मात्रा |
| मन जवळ यावया गांगरते ।। | २+८+६ = १६ मात्रा |

यातील प्रत्येक चरणात १६ मात्रा असल्या, तरी ध्रुवपदाच्या पहिल्या दोन ओळींत २+८+६ असे मात्रांचे गट पडतात. अंतऱ्यामधील तीन ओळींत ८+८ अशी पदाची दोन आवर्तने येतात व चौथा मेळाचा चरण, त्यात ध्रुवपदासारखेच २+८+६ असे मात्रागट येतात. प्रत्येक चरणात सारख्या मात्रा असल्या, तरी मोडणी भिन्न असल्यामुळेही विषमजाती होय.

**(१५) प्रणयप्रभा :-** नववधू व प्रणयप्रभा ही दोन वृत्ते जवळजवळ सारखीच आहेत. प्रणयप्रभेतील कडव्याच्या शेवटच्या चरणात १६ऐवजी १४ मात्रा असतात.

| | |
|---|---|
| उदा. किति मौज दिसे ही पहा तरी | २+८+६ = १६ मात्रा |
| हे विमान फिरते अधांतरी ।। ध्रु. ।। | २+८+६ = १६ मात्रा |
| खोल नदीतुन कापित पाणी | ८+८ = १६ मात्रा |
| मत्स्य धावतो चहु बाजूंनी | ८+८ = १६ मात्रा |
| घारच अथवा फिरते गगनी | ८+८ = १६ मात्रा |
| हुबेहूब हे त्याचपरी । | ८+६ = १४ मात्रा |

प्रणयप्रभेत ध्रुवपद व अंतरा यातील मात्रा अनुक्रमे (२+८+६) = १६ मात्रा व (८+८) = १६ मात्रा, अशा सारख्याच आहेत; पण चौथा मेळाचा जो चरण आहे, त्यात ८+६ अशा १४ च मात्रा येतात. एवढाच काय तो फरक!

## भृंगावर्तनी समजाती

**(१६) जीवनलहरी :-** आतापर्यंत आपण जी मात्रावृत्ते पाहिली, तीत ८ मात्रांचा एक गट येई. पण काही मात्रावृत्ते अशी आहेत की, त्यांच्या चरणांत ६।६ मात्रांचे गट पडतात. सहा मात्रांच्या एका गटाला **भृंग** असे नाव आहे. कवी कुसुमाग्रजांनी या प्रकारची विशिष्ट पद्यरचना केली व तिला **जीवनलहरी** असे नाव दिले. त्यावरूनच या पद्यप्रकाराला **जीवनलहरी** हे नाव मिळाले. याचे उदाहरण पाहा.

नगरातिल सदनांतुनि
लखलखती लाख दिवे
क्षणभर की स्थिर झाले
उत्कांचे | दिव्य थवे
२ २ २ | २१ १२
= ६ | = ६

या कवितेच्या प्रत्येक चरणात १२ मात्रा असून त्यात ६+६ मात्रांचे (भृंगाचे) दोन मात्रागट असतात. ही भृंगावर्तनी समजाती आहे.

## छंद

**ओवी व अभंग** हे मराठीतील सर्वांत जुने व परंपरेने चालत आलेले असे लोकप्रिय **छंद** आहेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास इत्यादी संतांनी आपली कविता मुख्यतः ओवी छंदातच लिहिली आहे. सर्वच संतांनी अभंग लिहिले असले, तरी नामदेवांस अभंगाचा प्रणेता मानतात. मात्र तुकारामांनी ते लोकप्रिय केले. तुकारामांच्या पोथ्या इंद्रायणीत बुडविल्या, तरी त्या अ-भंग राहिल्या म्हणून तुकारामांच्या रचनेला **अभंग** मानतात. या दोन्ही छंदांत पुष्कळसे साम्य आहे. रचनेच्या बाबतीत अभंग हा अधिक काटेकोर असून ओवीची रचना अतिशय शिथिल आहे.

(१) अभंग

**अभंगाचे मुख्य प्रकार दोन :- (१) मोठा अभंग व (२) लहान अभंग.**

**मोठा अभंग** - मोठ्या अभंगात चार चरण असून पहिल्या तीन चरणांत प्रत्येकी सहा अक्षरे व चौथ्या चरणात चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणांच्या शेवटी यमक असते. उदा.

लक्ष्मण भावोजी । मागे, पुढे स्वामी । मज आहे धामी । ऐसे वाटे ।।

कधी-कधी मोठ्या अभंगाच्या चार चरणांतील पहिल्या तीन चरणांत यमक असते.

उदा. - रामदासांचा अभंग पाहा.

जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।।

**लहान अभंग :-** लहान अभंगाला दोन चरण असतात व प्रत्येक चरणात सामान्यतः आठ अक्षरे असतात. क्वचित पहिल्या चरणात सहा किंवा सात अक्षरे असतात. दुसऱ्या चरणात कधी-कधी नऊ किंवा दहा अक्षरेही येतात. दोन्ही चरणांत यमक असते. एकनाथ व तुकाराम यांचे अभंग या प्रकारचे आहेत.

जे-जे बोले तैसा चाले । तो चि वहिले निवांत ।
अंगी असोनि जाणपण । सदा सर्वदा तो लीन ।।

**- एकनाथ (८।८।९।८)**

अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।
तुका म्हणे नाव । जनासाठी उदकी ठाव ।।

**- तुकाराम (६।९।६।९)**

(२) ओवी

ओवीला चार चरण असतात. पहिल्या तीन चरणांच्या शेवटी यमक असते. आधुनिक ओवीला तीनच चरण असतात. चौथा चरण लहान असेल, तर साडेतीन चरणी ओवी म्हणतात. चरणांतील अक्षरांचे बंधन फारच शिथिल असते. ओवीच्या पहिल्या तीन चरणांतील प्रत्येकात पाचपासून पंधरापर्यंत अक्षरे असतात व चौथ्या चरणात पहिल्या तीन चरणांतील अक्षरांपेक्षा अधिक अक्षरे नसतात. अलीकडच्या ओव्यांत प्रत्येकी आठ अक्षरांचे चार चरण असून दुसऱ्या व चौथ्या चरणांचे यमक जुळविलेले असते. बहिणाबाई चौधरी यांच्या 'मन' कवितेतील ओव्या या प्रकारच्या आहेत.

(१) मन वढाय वढाय । उभ्या पिकातलं ढोर ।।
किती हाकला हाकला । फिरी येतं पिकांवर ।।

**- बहिणाबाई चौधरी (८।८।८।८)**

**ओव्यांचे इतर प्रकार पाहा.**

(२) आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।

**- ज्ञानेश्वर (८।८।७।६)**

(३) भक्तीस विकला भगवंत । भक्तांचें उच्छिष्ट काढित ।
रणांगणीं घोडे धूत । शेखी होत द्वारपाळ ।।

**- एकनाथ (१०।९।८।८)**

(४) ग्रंथा नाम दासबोध । गुरूशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।

**- रामदास (८।८।८।४)**

### स्त्रीगीत ओवी

(५) पहिली माझी ओवी । पहिला माझा नेम
तुळशीखाली राम । पोथी वाची ।। (७।७।७।४)

### आधुनिक ओव्या

(६) बाळ जातो दूर देशा । मन गेले वेडावून ।
आज सकाळपासून ।। - गोपीनाथ (८।८।८)

(७) भ्रताराच्या राज्यी । उणे ठेवीना रे देव ।
बहिणीच्या मनी । चोळीची आशा ठेव ।।- भा. रा. तांबे (६।८।६।७)

ओवी आणि अभंग हे दोन्ही छंद बहुतेक सारखेच आहेत. अभंगाच्या तीनही चरणांत बहुतेक सारखी अक्षरे असतात. ओवीच्या तीनही चरणांत कमीअधिक अक्षरे चालतात. अभंगाच्या चार चरणांचा एक खंड किंवा चौक होतो. अशा चार ते सहा खंडांचा एक संपूर्ण अभंग होतो व त्यात एखादे तत्त्व सांगितलेले असते. शेवटच्या पंक्तीत कवीचे नाव आढळते. उदा. नामा म्हणे, तुका म्हणे, दास म्हणे. अभंगात उपान्त्य अक्षर, तर ओवीत अंत्य अक्षर हेल काढून म्हटले जाते. अभंग व ओवी यांच्या म्हणण्याच्या चालीत फरक आहे. अभंग हे बहुशः भजनाच्या वेळी म्हटले जातात, तर ओव्या विशेषतः घरकाम करताना किंवा निवांत वेळी म्हटल्या जातात.

**(३) अनुष्टुभ्**

गीताई माउली माझी । तिचा मी बाळ नेणता ।
पडता| रडता| घेई। उ|चलूनि |कडे|वरी ।।
UU – | UU – | – – U|U – U | U – U| –

याच्या प्रत्येक चरणात आठ अक्षरे असतात व प्रत्येक चरणातील पाचवे अक्षर लघू असते. याच्या चरणांतील संख्या निश्चित ठरली असल्यामुळे हे मात्रावृत्त नव्हे. चरणातील लघुगुरूक्रम निश्चित नसल्यामुळे हे अक्षरगणवृत्त नव्हे. यातील प्रत्येक अक्षर दीर्घ उच्चारले जात नसल्यामुळे याला पूर्णपणे छंदही म्हणता येत नाही. अशी याची स्थिती आहे. हा छंद प्रथम वाल्मीकीऋषींच्या मुखातून क्रौंचवधाच्या प्रसंगी बाहेर पडला असे म्हणतात.

## मुक्तछंद

आपण आत्तापर्यंत असे पाहिले, की अक्षरगणवृत्तात रचना करताना कवीला अक्षरे, गण व यती यांचे बंधन पाळावे लागते. मात्रावृत्तांत किंवा जातींत रचना करताना मात्रांचे बंधन पाळावे लागते. छंदामध्ये थोड्या सैलपणाने का होईना, अक्षरांचे व यमकाचे बंधन तो पाळतो. पण वरील प्रकारचे कोणतेच बंधन न स्वीकारता कवी आपल्या भावना किंवा विचार वेगळ्या पद्धतीने मांडू शकतो. अशा प्रकारची रचना छंदोरचनेच्या अनेक बंधनातून मुक्त असते, म्हणून या रचनाप्रकाराला **मुक्तछंद** असे नाव देण्यात आले आहे.

मुक्तछंदात छोटे-छोटे चरण असतात. त्यांना **उपचरण** किंवा **चरणक** असेही म्हणतात. हा चरणक सामान्यतः पाच किंवा सहा अक्षरांचा असतो. क्वचित तो चार किंवा सात अक्षरांचाही असतो. एका चरणात असे चरणक किती असावेत याचे बंधन नाही. कधी एक, कधी दोन, तर कधी एका ओळीत चार चरणकही असू शकतात. अशा किती ओळींचे कडवे असावे याचेही बंधन नसते. कल्पना, विचार आणि भावना पुरी झाली की कडवे संपते. मुक्तछंद हा लयबद्ध रीतीने व संथपणाने वाचावयाचा असतो. याचे वाचन आघातप्रधान असते. छंदातल्याप्रमाणे प्रत्येक अक्षराचा उच्चार दीर्घ करावयाचा असतो. अनेक आधुनिक कवी, विशेषतः नवकवी, आपली पद्यरचना या वृत्तात करतात. प्रौढ किंवा गंभीर भावना व विचार व्यक्त करण्यास हा छंद उपयुक्त वाटतो.

**कवी नारायण सुर्वे यांची मुक्तछंदातील 'दोन दिवस' ही कविता पाहा.**

दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले ८
हिशोब करतो आहे किती राहिले आहेत डोईवर उन्हाळे ७
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली ९
भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली ६

## मुक्तछंद - आणखी काही उदाहरणे

(१) ''वेगानं निघून जाताना निदान वळून तरी बघायचे होते
वस्ती जळत होती आणि आमचे हात वर होते.''

- लोकनाथ यशवंत

(२) ''आपणच आपल्याला लिहिलेली
पत्रे वाचता वाचता
ओले होणारे डोळे पुसून
फडफडू द्यावीत वाऱ्यावर पाने''

- अनुराधा पाटील

**प्रश्न १) खाली काही पद्यपंक्ती दिल्या आहेत. त्यांची वृत्ते ओळखून, लक्षणे सांगा.**

(१) वीण्याला लागे वीणा । दिंडीला भेटे दिंडी ।
यात्रेला येती झुंडी । पंढरीस ।

(२) टाकी उपानह पदे अतिमंद ठेवी ।
केली विजार वरी डौरहि मौन सेवी ।।

(३) काळोखाची रजनी होती ।
हृदयी भरल्या होत्या खंती ।।

(४) हेचि दान दे गा देवा ।
तुझा विसर न व्हावा ।।

(५) दुकानावरी लाविल्या लांब पाट्या ।
मना थांबुनी वाच रे वाच बा त्या ।।

(६) मधु घटचि रिकामे पडति घरी ।
मधु मागशि माझ्या सख्या परी ।।

(७) पोटासाठी भटकत जरी दूर देशी फिरेन ।

(८) क्षणभंगुर जीवित हे ।
क्षणभंगुर या जगती ।।

(९) जे एक सत्यासच नित्य सेवी ।
ते चित्त लोकोत्तर होय केवी? ।।

(१०) आकाशात फुले, धरेवर फुले, वाऱ्यावरीही फुले ।

(११) माझा शब्द - एक गोणपाट कोनाड्यात पडलेले

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) 'पुस्तक' शब्दातील लघुगुरुक्रम .............. असा आहे. ①②③④
   1) UUU  2) - - U
   3) - U U  4) U - U

2) 'आपणच आपल्याला लिहिलेली पत्रे वाचता वाचता ओले होणारे डोळे पुसून फडफडू द्यावीत वाऱ्यावर पाने' हे .......... प्रकारचे उदाहरण आहे? ①②③④
   1) मुक्तछंद  2) ओवी
   3) अभंग  4) फटका

3) पुढीलपैकी मात्रावृत्त ओळखा. ①②③④
   1) पृथ्वी  2) प्रणयप्रभा
   3) मंदाक्रांता  4) हरिणी

4) 'आर्या' हे ................ मात्रावृत्त आहे. ①②③④
   1) अक्षरगण  2) विषमजाती
   3) अर्धसम  4) समजाती

5) गण 'न' मधील सर्व अक्षरे ............... आहेत. ①②③④
   1) लघू  2) गुरू
   3) लघू-गुरू  4) कोणतेच नाही

6) 'भाषा संस्कृती थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे' हे उदाहरण कोणत्या वृत्ताचे आहे. ①②③④
   1) स्रग्धरा  2) शार्दूलविक्रीडित
   3) हरिणी  4) शिखरिणी

7) पुढीलपैकी 'वसंततिलका' वृत्ताचे उदाहरण ओळख. ①②③④
   1) महाराष्ट्री सृष्टी स्वविभव चतुर्मास मिरवी
   2) मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी
   3) पखरण बघ घाली भूवरी पारिजात
   4) आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश

8) सहा मात्रांच्या गटाला .............. म्हणतात. ①②③④
   1) भृंग  2) पद्य
   3) विषमजाती  4) अक्षरगणवृत्त

9) 'चंद्रकांत' हे .............. वृत्त आहे. ①②③④
   1) अक्षरगण  2) मात्रा
   3) विषम  4) सम

10) 'संसारामधि ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको' यातील वृत्त ओळखा. ①②③④
   1) साकी मात्रावृत्त  2) मालिनी अक्षरगणवृत्त
   3) फटका मात्रावृत्त  4) सूर्यकांत मात्रावृत्त

11) 'कुठे भटकशी घना? वळुनि ऐक केकावली' या वृत्तातील गण ओळखा. ①②③④
   1) म थ न त त ग ग  2) ज स ज स य ल ग
   3) य म न स भ ल ग  4) त भ जा ज गा गा

12) 'पृथ्वी' या अक्षरगणवृत्तात यती कोठे येते? ①②③④
   1) ५व्या अक्षरावर  2) ४थ्या अक्षरावर
   3) ८व्या अक्षरावर  4) ६व्या अक्षरावर

13) 'किति मौज दिसे ही पहा तरी, हे विमान फिरते अधांतरी' हे .............. वृत्ताचे उदाहरण आहे. ①②③④
   1) प्रणयप्रभा  2) जीवनलहरी
   3) पृथ्वी  4) मालिनी

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 32 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 1 | 3) 2 | 4) 3 | 5) 1 |
| 6) 2 | 7) 4 | 8) 1 | 9) 2 | 10) 3 |
| 11) 2 | 12) 3 | 13) 1 | | |

# ३३. भाषेचे अलंकार

आपण बोलताना किंवा लिहिताना आपले म्हणणे इतरांना प्रभावी रीतीने सांगतो. तसेच ते सुंदर रीतीनेही सांगावे असा आपला प्रयत्न असतो. आपले म्हणणे सुंदर रीतीने सांगताना अलंकारांची सहज रचना होते. तेव्हा भाषा सुंदर होते. कवी आपली अभिव्यक्ती सुंदर व्हावी म्हणून असे अनेक अलंकार वापरतात.

'अलंकार' या शब्दाचा अर्थ 'दागिना' असा आहे. दागिने घातल्यावर माणसाच्या शरीराला शोभा येते. त्याच्या सौंदर्यात भर पडते. दागिन्याप्रमाणे तलम, रंगीबेरंगी कपड्यांनी कोणाच्या शरीराला शोभा येते, तर कोणाचा चेहरा चष्म्यामुळे शोभून दिसतो. सुंदर कपडे, चष्मा हेदेखील एक अर्थाने अलंकारच आहेत. अलंकारात शरीराला शोभा आणण्याचा धर्म असतो.

जी गोष्ट व्यक्तीची तीच भाषेची. आपली भाषा अधिक परिणामकारक किंवा चांगली दिसावी म्हणून आपली नेहमीची साधी भाषा न वापरता आपण वेगळ्याच पद्धतीने सांगून ती अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करतो. 'तुझे चालणे मोहक आहे.' असे न म्हणता, **'चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले'** अशी शब्दरचना कवीने केल्यामुळे तीच कल्पना अधिक उठावदार वाटते व या चरणातील 'च' हे अक्षर वारंवार आल्यामुळे हे वाक्यही कानाला गोड वाटते.

बाळाला निजविताना आईला म्हणावयाचे असते, 'डोळे मिटून घे व झोप'; पण ही साधी कल्पना कवी कशा शब्दांत मांडतो पाहा.

**'पापणिच्या पंखात झोपु दे डोळ्यांची पाखरे'**

डोळ्यांना पाखरे मानल्यामुळे साधा विचार कसा शोभून दिसतो, नाही?

माणसांच्या आयुष्यात सुखापेक्षा दुःखच अधिक असते ही साधी कल्पना कवीने कशा चमत्कृतिपूर्ण रीतीने मांडली आहे पाहा.

**एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे ।**
**जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे ।।**

आयुष्याला वस्त्र कल्पिल्यामुळे एक साधी कल्पना किती मोहक व अर्थपूर्ण वाटते, नाही? अशा चमत्कृतिपूर्ण रचनेमुळे मनाला आल्हाद वाटतो. भाषेला ज्याच्या-ज्याच्यामुळे शोभा येते त्या गुणधर्मांना **भाषेचे अलंकार** असे म्हणतात. कधी दोन वस्तूंतील साम्य दाखवून, तर कधी विरोध दाखवून, कधी नाद निर्माण करणारे शब्द वापरून, तर कधी एखादी कल्पना वाजवीपेक्षा अधिक फुगवून सांगून आपण आपली भाषा अधिक सुंदर किंवा पारिणामकारक करण्याचा प्रयत्न करतो. कधी शब्दांतील अक्षररचनेमुळे नाद निर्माण होऊन भाषेला शोभा येते, तर कधी योजिलेल्या शब्दांमुळे अर्थाचे सौंदर्य खुलून दिसते. त्यामुळे भाषेच्या अलंकारांचे दोन प्रकार होतात -

(१) शब्दालंकार (२) अर्थालंकार.

यातील काही अलंकारांची ओळख क्रमाने करून घेऊ.

## शब्दालंकार

**(१) अनुप्रास -** पुढील कवितेच्या ओळी वाचा.

१) गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले,
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले.

२) रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल पल सलील
हिरव्या तटि नावांचा कृष्ण मेळ खेळे.

वरील ओळी वाचताना 'ल' हे अक्षर पुनःपुन्हा आल्यामुळे जो नाद निर्माण होतो, त्यामुळे या काव्यपंक्तीला शोभा आली आहे. अशा रीतीने **एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनुप्रास हा अलंकार होतो.**
आणखी काही उदाहरणे -

(१) पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी ।
गळ्यामध्ये गरिबाच्या गाजे संतांची वाणी ।

(२) संत म्हणति, 'सप्त पदें सहवासें सख्य साधूशी घडतें' ।

**(२) यमक** - खालील चरण वाचा.

(१) जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।।

यातील पहिल्या तीन चरणांच्या शेवटी 'नी' हे अक्षर आलेले आहे. तसेच

(२) राज्य गादीवरी । काढी तुझ्या आठवणी ।
फळा आली माय । मायेची पाठवणी ।।

यातील दुसऱ्या व चवथ्या चरणांच्या शेवटी 'आठवणी' ही चार अक्षरे क्रमाने आल्यामुळे ऐकताना गंमत वाटते. अशा प्रकारे, **कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास यमक हा अलंकार होतो.**

यमकाची आणखी काही उदाहरणे -

**पुष्पयमक** - (१) सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ।

**दामयमक** - (२) आला वसंत कविकोकिल हाही आला ।
आलापितो सुचवितो अरुणोदयाला ।

अनुप्रासात जशी अक्षरांची पुनरावृत्ती असते, तशी यमकातही असते. अनुप्रासात वर्णाची आवृत्ती कोठेही असू शकते; पण यमकात ही आवृत्ती ठरावीक ठिकाणीच होत असते. यातील चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी ती होते.

**(३) श्लेष** - पुढील वाक्ये वाचा.

**गोविंदराव** :- काय वसंतराव, तुम्हांला सुपारी लागते का?

**वसंतराव** :- हो, हो लागते ना!

**गोविंदराव** :- जर लागते, तर का खाता?

या संवादात **'लागते'** या शब्दाच्या दोन अर्थांनी दोघेही बोलत असल्यामुळे थोडी गंमत घडते. 'लागते'

या शब्दाचे दोन अर्थ होतात- (१) हवी असणे. (२) खाल्ल्याने भोवळ किंवा चक्कर येणे.

अशा रीतीने **एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते, तेव्हा श्लेष हा अलंकार होतो.** 'श्लिष्' या शब्दाचा अर्थ आलिंगणे, एकमेकांत मिसळणे, असा आहे. (श्लेष -आलिंगन-मिठी) एकाच शब्दाला दोन अर्थांची मिठी बसलेली असते म्हणजे दोन अर्थ चिकटलेले असतात. त्यामुळे एका शब्दाचे दोन अर्थ निघतात. श्लेष हा शब्दालंकार आहे व अर्थालंकारही आहे. पुढील वाक्ये पाहा.

(१) मित्राच्या उदयानं कोणाला आनंद होत नाही?

(२) हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस.

या उदाहरणांत 'मित्र' व 'जीवन' या शब्दांना दोनदोन अर्थ आहेत - (मित्र = सूर्य, स्नेही. जीवन = पाणी, जगण्याची शक्ती) यांतील कोणताही अर्थ घेतला, तरी चालतो. जर मित्रऐवजी त्याच अर्थाचे 'दोस्त', 'सखा' हे शब्द ठेवले किंवा जीवनऐवजी 'पाणी', 'जल' हे शब्द ठेवले, तर त्यातील श्लेष नाहीसा होतो; म्हणून वाक्यात ज्या शब्दाला दोन अर्थ असतात तो शब्द काढून त्या ठिकाणी त्याच अर्थाचा दुसरा शब्द ठेवल्यामुळे श्लेष नाहीसा झाला, तर तो **शब्दश्लेष** व समानार्थक शब्दाने श्लेष कायम राहिला, तर तो **अर्थश्लेष**.

'तू मलिन, कुटिल, नीरस जडहि पुनर्भवपणेहि कच साच'

या मोरोपंताच्या आर्येतील 'मलिन, कुटिल, नीरस, जड' हे शब्द बदलून त्याच अर्थाचे दुसरे शब्द वापरले, तरी श्लिष्ट अर्थ नाहीसा होत नाही. पुढील उदाहरणे पाहा.

(१) श्रीकृष्ण नवरा मी नवरी ।
शिशुपाल नवरा मी न-वरी ।

(२) कुस्करू नका ही सुमने ।
जरी वास नसे तिळ यांस, तरी तुम्हांस अर्पिली सु-मने ।।

(३) ते शीतलोपचारे जागी झाली हळूच मग बोले ।
औषध नलगे मजला, परिसुनि माता 'बरें' म्हणुनि डोले ।।

वरील पद्यपंक्तींतील (१) नवरी, न-वरी (२) सुमने, सु-मने (३) नलगे, न-लगे अशा रीतीने त्या-त्या शब्दांची फोड केल्यानंतर दोन अर्थ कळून येतात. या प्रकारच्या श्लेषाला **सभंग श्लेष** व एकच शब्द जसाच्या तसा ठेवून त्याचे जेव्हा दोन अर्थ संभवतात, त्यास **अभंग श्लेष** म्हणतात.

## अर्थालंकार

आता आपण 'अर्थालंकारांचा' अभ्यास करू या. अनेकदा शब्दांच्या अर्थामुळे काव्यात किंवा गद्यरचनेत सौंदर्य निर्माण होत असते. अर्थालंकाराच्या संदर्भात आपल्या एक गोष्ट लक्षात येईल की, आपल्याला जे सांगावयाचे आहे ते प्रभावी रीतीने सांगण्यासाठी त्यासारख्याच दुसऱ्या गोष्टीची आपण मदत घेतो. त्याची तुलना करतो.

उदा. 'सुरेशचे अक्षर चांगले आहे.' हे आपल्याला सांगावयाचे आहे, म्हणून आपण 'अक्षराची तुलना मोत्याशी' करतो आणि वाक्य तयार करतो. 'सुरेशचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.' इथे 'अक्षर' व 'मोती' यांच्यातील साम्य आपल्यासमोर येते. आणखी काही उदाहरणे पाहा.

(१) शाळा मातेप्रमाणे आहे.

(२) आमच्या गावातील पाटील हे कर्णासारखे दानशूर आहेत.

(३) आमच्या वर्गातील समीर प्रा. शिवाजीराव भोसले यांच्यासारखा चांगला वक्ता आहे.

वरील वाक्यांसारखी वाक्ये तयार करताना त्यात सहजपणा आहे. त्याचप्रमाणे आपल्याला जे सांगावयाचे आहे; ते परिणामकारकपणे, सुंदर रीतीने सांगावे अशी भावना आहे.

**अलंकाराच्या संदर्भातील महत्त्वाचे शब्द किंवा अलंकारात येणारे घटक पुढीलप्रमाणे** (अर्थात ते सर्वच अलंकारात असतात असे नव्हे) -

(१) **उपमेय** - ज्याची तुलना करावयाची आहे, ते किंवा ज्याचे वर्णन करावयाचे आहे, तो घटक.

(२) **उपमान** - ज्याच्याशी तुलना करावयाची आहे किंवा ज्याची उपमा दिली जाते, तो घटक.

(३) **साधारण धर्म** - दोन वस्तूंत असणारा सारखेपणा किंवा दोन वस्तूंत असणारा समान गुणधर्म.

(४) **साम्यवाचक शब्द** - वरील सारखेपणा दाखविण्यासाठी वापरला जाणारा शब्द.

उपमेय आणि उपमान या शब्दांसाठी 'प्रकृत-अप्रकृत' किंवा 'प्रस्तुत-अप्रस्तुत' अशा शब्दांचाही उपयोग केला जातो.

वरील घटकांचा अर्थ समजून घेण्यासाठी वरीलपैकी एक वाक्य उदाहरण म्हणून घेऊ.

'सुरेशचे अक्षर मोत्यांप्रमाणे सुंदर आहे.'

वरील वाक्यात सुरेशचे अक्षर हे उपमेय आहे.

सुरेशच्या अक्षराची तुलना 'मोत्याशी' केली आहे. 'मोती' हे उपमान आहे. अक्षर व मोती यांतील सारखेपणा 'सुंदर' या शब्दाने दाखविला आहे. 'सुंदर' हे साम्य आहे किंवा 'सुंदरता' हा साधारण धर्म आहे. 'सारखा' हा शब्द साम्यवाचक शब्द आहे.

गद्य किंवा काव्यातील सौंदर्य समजून घेण्यासाठी आणि त्याचा आनंद घेण्यासाठी व तो व्यक्त करण्यासाठी अलंकारांचा अभ्यास आवश्यक आहे. तसेच आपल्या लेखनात परिणामकारकता व सौंदर्य निर्माण करण्यासाठीही आपण अलंकारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

विद्यार्थिदशेत आपले निबंधलेखन प्रभावी होण्यासाठी अलंकाराच्या अशा अभ्यासाचा उपयोग होतोच. पण काही विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभेची दैवदत्त देणगी असते. त्यांनी डोळसपणाने अलंकारांचा अभ्यास केल्यास एक चांगली दिशा मिळू शकते. याचा अर्थ वृत्ते आणि अलंकार यांचा अभ्यास करून कवी निर्माण होतात असा नाही. मात्र रसिकतेला डोळसपणाची जोड देण्यासाठी अलंकारांच्या अभ्यासाची मदत अवश्य होते.

वृत्तांप्रमाणेच अलंकारांचा अभ्यास करतानाही लक्षण व उदाहरण (किंवा उदाहरणे) अशा दोन मुद्द्यांचा समावेश होतो.

**(१) उपमा** - पुढील वाक्ये वाचा.

(१) मुंबईची 'घरे' मात्र लहान! कबुतराच्या खुराड्यांसारखी।

(२) सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरी।

(३) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे।

वरील वाक्यांतून दोन वस्तूंतील सारखेपणा कसा सुंदर रीतीने वर्णिलेला आहे पाहा. अशा प्रकारे **दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने जिथे वर्णन केलेले असते, तिथे 'उपमा' हा अलंकार होतो.** उपमेत एक वस्तू दुसऱ्या वस्तूसारखी आहे असे वर्णन असते.

**उपमेचे चार घटक असतात -** (१) उपमेय (ज्याची तुलना करावयाची ते), (२) उपमान (ज्याच्याशी तुलना करावयाची ते), (३) साधारणधर्म (दोन वस्तूंत असलेला सारखेपणा), (४) साम्यवाचक शब्द (सारखेपणा दाखविणारे शब्द).

सारखेपणा दाखविल्याखेरीज उपमा होत नाही म्हणून उपमा अलंकारात 'सारखा, जसा, जेवि, सम, सदृश, गत, परी, समान' यांसारखे साम्यवाचक शब्द येतात.

**(२) उत्प्रेक्षा - उत्प्रेक्षा म्हणजे कल्पना. ज्या दोन वस्तूंची आपण तुलना करतो त्यांतील एक (उपमेय) ही जणू काही दुसरी वस्तूच (उपमानच) आहे, अशी कल्पना करणे याला उत्प्रेक्षा म्हणतात.**

पुढील वाक्ये वाचा.

(१) ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू.

(२) अत्रीच्या आश्रमी। नेलें मज वाटें । माहेरची वाटे । खरेखुरें ।

(३) किती माझा कोंबडा मजेदार । मान त्याची कितीतरी बाकदार ।
शिरोभागी तांबडा तुरा हाले । जणू जास्वंदी फूल उमललेले ।।
अर्धपायी पांढरीशी विजार । गमे विहगांतिल बडा फौजदार ।।

कोंबड्याचा तुरा हे कवीला जणू उमललेले जास्वंदीचे फूल वाटले किंवा पांढऱ्या, अर्ध्या विजारीमुळे तो पक्ष्यांतला बडा फौजदार भासला, ही कल्पना म्हणजेच उत्प्रेक्षा. **उपमेय हे जणू उपमानच आहे असे जिथे वर्णिलेले असते, तिथे उत्प्रेक्षा अलंकार असतो.** (उत्प्रेक्षा अलंकारात 'जणू, जणूकाय, गमे, वाटे, भासे, की' यांसारखे साम्यवाचक शब्द येतात.)

**(३) अपन्हुती -** पुढील काव्यपंक्ती वाचा.

न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातिल ।
न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ ।।

पहिल्या ओळीत कवीला डोळ्यांचे वर्णन करावयाचे आहे. हे करताना त्यांची तुलना तो कमळाच्या पाकळ्यांशी करतो. या वाक्यांत 'नयन' हे उपमेय आहे. 'कमळातल्या पाकळ्या' हे उपमान. इथे डोळे हे डोळे नसून त्या कमळाच्या पाकळ्या आहेत, असे सांगताना त्याने उपमेयाला दूर सारून म्हणजे उपमेयाचा निषेध करून त्याच्या जागी उपमानाची स्थापना केली. दुसऱ्या ओळीत वदन (= तोंड) याबद्दल सांगायचे असूनही त्याचा निषेध करून तो शरदऋतूचा चंद्र आहे असे म्हणून उपमानाची स्थापना केली. 'अपन्हुती' याचा अर्थ 'झाकणे, लपविणे' असा आहे. या अलंकारात उपमान हे **उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे, असे जेव्हा सांगते, तेव्हा 'अपन्हुती' हा अलंकार होतो.**

**आणखी काही उदाहरणे -**

(१) आई म्हणोनि कोणी । आईस हाक मारी ।।
ती हाक येई कानी । मज होय शोककारी ।।
नोहेच हाक माते । मारी कुणी कुठारी ।।

(२) ओठ कशाचे? देठचि फुलल्या पारिजातकाचे ।

(३) हे हृदय नसे, परी स्थंडिल धगधगलेले ।

(४) मानेला उचलीतो, बाळ मानेला उचलीतो ।
नाहि ग बाई, फणा काढुनि नाग हा डोलतो ।।

**(४) रूपक** - पुढील पद्यपंक्ती किंवा वाक्ये पाहा.

(१) बाई काय सांगो । स्वामीची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ।।

(२) ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाहे रमा ।
दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ।।

(३) लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. आकार द्यावा तशी मूर्ती घडते.

यातील पहिल्या उदाहरणात स्वामीची दृष्टी व अमृताची वृष्टी ही दोन्ही एकरूपच मानली आहेत. दुसऱ्या वाक्यातील उपमेय (मुख) व उपमान (चंद्र) ही एकरूप मानून 'मुखचंद्रमा' असा शब्दप्रयोग केला आहे. तिसऱ्या वाक्यात लहान मूल हे मातीच्या गोळ्यासारखे आहे, असे नुसते उपमेय व उपमान यांतील केवळ सादृश्य न दाखविता त्यांच्यातील अभेद वर्णिलेला आहे. अशा प्रकारे **उपमेय व उपमान यांत एकरूपता आहे, ती भिन्न नाहीत. असे वर्णन जिथे असते, तिथे रूपक हा अलंकार असतो.**

**उपमेत एक वस्तू दुसऱ्यासारखी** आहे, असे (सादृश्य) वर्णन केलेले असते. उपमेच्या थोडे पुढे जाऊन उत्प्रेक्षेत त्या दोन वस्तू जवळजवळ सारख्या (एकच) असल्याची कल्पना केलेली असते. रूपकात आणखी थोडे पुढे जाऊन त्या दोन वस्तू (उपमेय व उपमान) एकरूप असल्याचे स्पष्टपणाने सांगितलेले असते. उत्प्रेक्षेप्रमाणे त्यात गुळमुळीतपणा नसतो.

**(५) व्यतिरेक** - त्याहीपुढे जाऊन उपमेय हे एखाद्या गुणाच्या बाबतीत उपमानापेक्षाही सरस असल्याचे वर्णन केले जाते. पुढील वाक्य पाहा.

**अमृताहुनी गोड । नाम तुझे देवा ।।**

या वाक्यात परमेश्वराचे नाव हे उपमेय. त्याची तुलना अमृताच्या गोडीशी केली आहे. इतकेच नव्हे, तर परमेश्वराचे नाव हे गोडीच्या बाबतीत अमृतापेक्षाही वरचढ असल्याचे वर्णिले आहे; म्हणून **उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन केले असेल, तर 'व्यतिरेक' हा अलंकार होतो.** व्यतिरेक = आधिक्य. उपमेयाचे उपमानावर आधिक्य म्हणजे व्यतिरेक. हे आधिक्य दोन प्रकारांनी दाखविता येते - (१) उपमेयाच्या उत्कर्षाने व (२) उपमानाच्या अपकर्षाने.

या अलंकाराची आणखी काही उदाहरणे -

(१) कामधेनुच्या दुग्धाहुनिही ओज हिचे बलवान ।

(२) तू माऊलीहून मयाळ । चंद्राहूनि शीतळ ।
पाणीयाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ।।

(३) सावळा ग रामचंद्र । रत्नमंचकी झोपतो ।
त्याला पाहता लाजून । चंद्र आभाळी लोपतो ।।

**(६) अनन्वय** - आतापर्यंत एखाद्या वस्तूची दुसऱ्याशी तुलना करून आपण वर्णन करीत होतो, पण उपमेय हे कधी-कधी एखाद्या गुणाच्या बाबतीत इतके अद्वितीय असते की, त्याला योग्य असे उपमान मिळू शकत नाही. उपमेयाची तुलना त्याच्याशी करावी लागते म्हणजे अशा वाक्यात उपमेय हेच उपमान असते. उदा. अर्जुनाचे वर्णन करताना कवी मोरोपंत म्हणतात.

**झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा ।**

अशा रीतीने **उपमेयाला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल म्हणजे जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते, तेव्हा 'अनन्वय' अलंकार होतो.** (अन्वय = संबंध) ज्या वाक्यात तुलना

करण्याचा संबंधच येत नाही तो अनन्वय. आणखी काही उदाहरणे -

(१) आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी ।

(२) या दानासी या दानाहुन अन्य नसे उपमान ।

**(७) भ्रान्तिमान -** रूपक अलंकारात उपमेय व उपमान यांत भेद नसून ती एकरूप आहेत, असे आपण मानतो. पण उपमानाच्या जागी **उपमेयच आहे असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती घडली, तर तिथे भ्रांतिमान अलंकार असतो.** उदाहरणे पाहा.

हंसा विलोकुनि सुधाकर अष्टमीचा ।
म्यां मानिला निटिलदेश तिचाच साचा ।
शंख-द्रुयी धरुनि कुंकुम कीरवाणी ।
लावावया तिलक लांबविला स्वपाणि ।।

अष्टमीचा चंद्र हा दमयंतीचा भालप्रदेश असावा अशी समजूत करून घेऊन तिच्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावण्यासाठी नळराजाने आपला हात लांब केला. या अलंकाराचे दुसरे उदाहरण पाहा.

भृंगे विराजित नवी अरविंदपत्रें ।
पाहूनि मानुनि तिचीच विशाल नेत्रें ।
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं ।
कांते वृथा उतरलो, भिजलो विलोकी ।।

भुंग्यांनी सुशोभित झालेली कमलपत्रे हे दमयंतीचे नेत्रच असे समजून तिच्या डोळ्यांत अंजन घालावयास नलराजा पुढे सरसावला व पाण्यामुळे भिजला.

**(८) ससंदेह -** भ्रान्तिमान अलंकारात उपमान हे उपमेय आहे असा जो भ्रम होतो तो निश्चित असतो. पण **उपमेय कोणते व उपमान कोणते असा संदेह किंवा संशय निर्माण होऊन मनाची जी द्विधा अवस्था होते, त्या वेळी 'ससंदेह' हा अलंकार असतो.** ससंदेह अलंकारात अभेदाची कल्पना नसून ती विकल्पाची (हा की तो, अशी) असते. उदा. पाहा.

(१) चंद्र काय असे, किंवा पद्म या संशयान्तरी ।
वाणी मधुर ऐकोनी कळले मुख ते असे ।।

(२) चांदण्या रात्री गच्चीवर पत्नीच्या मुखाकडे पाहताना पतीला वाटले -
कोणता मानू चंद्रमा? भूवरीचा की नभीचा?
चंद्र कोणता? वदन कोणते?
शशांक-मुख की मुख-शशांक ते?
निवडतील निवडोत जाणते
मानी परि मन सुखद संभ्रमा-मानू चंद्रमा, कोणता?

**(९) अतिशयोक्ती :-** प्रत्येक गोष्टीचे चमत्कृतिपूर्ण वर्णन करायचे म्हणजे त्यात थोडी **अतिशयोक्ती** आलीच. तिचे मुख चंद्रासारखे आहे किंवा डोळे कमळासारखे आहेत, हे म्हणताना खुलवून सांगायचे असते. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, व्यतिरेक या अलंकारांत थोडी अतिशयोक्ती असतेच. पण केवळ अतिशयोक्तीच जिथे प्रामुख्याने केलेली असते, तिथे तो एक स्वतंत्र 'अतिशयोक्ती' अलंकार मानला जातो. **कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्या वेळी अतिशयोक्ती हा अलंकार होतो.**

मुलींच्या भोंडल्यातील एक गीत पाहा.

**दमडिचं तेल आणलं,**

**सासूबाईचं न्हाणं झालं,**

**मामंजीची दाढी झाली,**

**भावोजींची शेंडी झाली,**

**उरलं तेल झाकून ठेवलं,**

**लांडोरीचा पाय लागला,**

**वेशीपर्यंत ओघळ गेला,**

**त्यात उंट पोहून गेला.**

दमडीच्या तेलात कोणकोणत्या गोष्टी उरकल्या हे सांगताना त्या वस्तुस्थितीपेक्षा किती फुगवून सांगितल्या आहेत पाहा.

नळराजाच्या घोड्याच्या दौडीचे वर्णन करताना कवी म्हणतो -

**जो अंबरी उफळता खुर लागलाहे ।**

**तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे ।।**

चंद्रावरचा डाग म्हणजे नलराजाच्या घोड्याच्या उफाळण्यामुळे त्याच्या खुराचा लागलेला डाग. हे म्हणणे जरी असंभवनीय असले, तरी तसे घडल्याचे वर्णन केल्यामुळे अतिशयोक्ती झाली.

कोणत्याही गोष्टीचे कारण घडल्यानंतर कार्य घडत असते; पण याच्या उलट प्रकार घडल्याचेही कवी कधी-कधी सांगून मोकळा होतो. उदा.

**काव्य अगोदर झाले नंतर जग झाले सुंदर ।**

**रामायण आधी मग झाला राम जानकीवर ।।**

जगाच्या अगोदर काव्य निर्माण झाले व रामाच्या अगोदर रामायण घडले असे सांगणे यात असंभाव्यतेची परमावधी आहे. हाही अतिशयोक्तीचा एक प्रकार होय. असंभाव्य किंवा अशक्य गोष्टी शक्य झाल्याचे वर्णन जिथे असते, तिथे अतिशयोक्ती हा अलंकार होतो.

**(१०) दृष्टान्त** - पुढील पद्यपंक्ती वाचा.

**लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।**

**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।**

तुकाराममहाराज परमेश्वराजवळ लहानपण मागतात. मोठेपणात यातना सहन कराव्या लागतात, हे पटवून देण्यासाठी क्षुद्र अशा मुंगीला साखरेचा कणसुद्धा रवा (ढेप) प्रमाणे भासतो व खायला मिळतो. हा ऐरावताला अंकुशाचा मार खावा लागतो, ही उदाहरणे दिली आहेत. दुसरे उदाहरण पाहा.

**न कळता पद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधी घडे ।**

**अजित नाम वदो भलत्या मिसे । सकल पातक भस्म करीतसे ।।**

कोणत्याही निमित्ताने परमेश्वराचे नाव तोंडातून आले की ते सगळी पापे नाहीशी करून टाकते, हे कवीला सांगावयाचे आहे. हीच गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच्याशेजारी त्याच अर्थाचे दुसरे एक उदाहरण दिले आहे. न कळत जरी पाय विस्तवावर पडला, तरी तो भाजल्याशिवाय राहत नाही. अशा रीतीने **एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण**

**दिल्यास दृष्टान्त अलंकार होतो.**

उपमेमध्ये सादृश्य दाखविताना 'जसे, जेवी, सम, सारखा' यांसारखे शब्द येतात. दृष्टान्तात सादृश्य असते, पण ते दाखविणारे साम्यवाचक शब्द नसतात. हा या दोन अलंकारांतील फरक लक्षात ठेवावा.

**(११) अर्थान्तरन्यास -** पुढील ओळी वाचा.

**बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल ।**
**श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ ।।**

(खल = दुष्ट, अहि = साप, गरल = विष)

दुष्ट माणसाला कितीही चांगला उपदेश केला, तरी तो आवडत नाही. सापाला पाजलेल्या दुधाचे विषातच रूपांतर होते. हे सांगून झाल्यानंतर जीवनात येणारा हा अनुभव 'कुत्र्याची शेपटी नळीत घातली, तरी ती वाकडीच राहणार.' या अर्थाच्या वरील वाक्याने सर्वसामान्य सिद्धान्ताच्या स्वरूपात मांडला आहे. दुसरे उदाहरण पाहा.

**तदितर खग भेणे वेगळाले पळाले ।**
**उपवन-जल-केली जे कराया मिळाले ।।**
**स्वजन, गवसला जो, त्याजपाशी नसे तो ।**
**कठीण समय येता कोण कामास येतो ? ।**

**(भेणे - भीतीने, जल केली = जलक्रीडा)**

नलाने हंसाला पकडल्यानंतर बागेत जलक्रीडेसाठी जमलेले इतर सर्व पक्षी घाबरून पळाले. त्याच्याजवळ कोणीच राहिले नाही. एवढी हकीकत सांगून झाल्यावर कवीने यावरून एक सामान्य सिद्धान्त सांगितला की, कठीण प्रसंगी कोणीच आपल्या उपयोगी पडत नाही. विशेष गोष्टीच्या समर्थनार्थ इथे एक सामान्य सिद्धान्त सांगितला. त्याच्या उलटही प्रकार असतो.

'मरणात खरोखर जग जगते' किंवा 'जन पळभर म्हणतिल हायहाय' या कविवर्य तांब्यांच्या कवितांत प्रथम सामान्य सिद्धान्त सांगून त्याच्या समर्थनार्थ विशेष दाखले दिलेले आढळतात. यावरून **एखाद्या सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे किंवा विशेष उदाहरणांवरून शेवटी एखादा सामान्य सिद्धान्त काढला, तर अर्थान्तरन्यास हा अलंकार होतो.** (अर्थान्तर = दुसरा अर्थ. न्यास = शेजारी ठेवणे.) अर्थान्तरन्यास - एका अर्थाचा समर्थक असा दुसरा अर्थ त्याच्या शेजारी ठेवणे असा या अलंकाराचा अर्थ आहे. काही कवींनी आपल्या कवितांत काढलेले काही सामान्य सिद्धान्त खाली दिलेले आहेत.

(१) एका हाते कधितरि मुली वाजते काय टाळी ?
(२) सावळा वर बरा गौर वधूला ।
(३) जातीच्या सुंदरांना काहीही शोभते ।
(४) मूळ स्वभाव जाईना ।
(५) का मरणि अमरता ही न खरी ?
(६) अत्युच्ची पदि थोरही बिघडतो हा बोल आहे खरा ।

**(१२) स्वभावोक्ती -** अलंकारात कोणत्याही गोष्टीचे वर्णन करताना नेहमीची साधी भाषा न वापरता ती परिणामकारक व सुंदर करण्यासाठी थोडी कृत्रिम किंवा चमत्कृतिपूर्ण अशी भाषा आपण वापरतोच. अलंकार म्हटले की थोडी कृत्रिमता आलीच, पण साधेपणात व सहजतेतही सौंदर्य असते, ही गोष्ट लक्षात घेता

**एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे, त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ (हुबेहूब) पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन हाही भाषेचा एक अलंकार ठरतो, याला स्वभावोक्ती अलंकार असे म्हणतात.**

कवी मर्ढेकरांनी गणपत वाण्याचे कसे वेधक चित्र काढले आहे पाहा.

गणपत वाणी विडी पिताना,
चावायाचा नुसतिच काडी;
म्हणायचा अन् मनाशीच की,
ह्या जागेवर बांधिन माडी.
मिचकावुनी मग उजवा डोळा,
आणि उडवुनी डावी भिवई;
भिरकावुनि ती तशिच द्यायचा,
लकेर बेचव जैशी गवई.

दुसरे उदाहरण- बागेतील तळ्याच्या काठी शांत झोपलेल्या हंसाचे वर्णन रघुनाथपंडितांनी कसे केले आहे पाहा.

**पोटींच एक पद लांबविला दुजा तो ।**
**पक्षी तनू लपवि, भूप तया पाहतो ।।**

त्याला पकडण्यासाठी तयारी करणाऱ्या नळराजाचे पुढील वर्णन पाहा.

टाकी उपानह, पदें अतिमंद ठेवी । केली विजार वरि, डौरहि, मौन सेवी ।।

(उपानह = जोडे, डौर = झगा)

तसेच, 'केवढे हे क्रौर्य' या कवितेच्या अखेरी गतप्राण झालेल्या पक्षिणीचे रे. टिळकांनी केलेले वर्णन पाहा.

**मातीत ते पसरले अतिरम्य पंख ।**
**केले वरी उदर पांडुर निष्कलंक ।।**
**चंचू तशीच उघडी पद लांबवीले ।**
**निष्प्राण देह पडला श्रमही निमाले ।।**

अशा प्रकारच्या हुबेहूब व वेधक वर्णनाला स्वभावोक्ती अलंकार म्हणतात.

**(१३) अन्योक्ती** - अन्योक्ती म्हणजे अन्याला (= दुसऱ्याला उद्देशून केलेली उक्ती (किंवा बोलणे). कित्येक वेळा स्पष्टपणे एखाद्या व्यक्तीला बोलता येत नाही. अशा वेळी **ज्याच्याबद्दल बोलायचे, त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुसऱ्याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत तिलाच अन्योक्ती असे म्हणतात.** उदा.

**येथे समस्त बहिरे बसतात लोक । का भाषणे मधुर तू करिशी अनेक ।।**
**हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक । रंगावरून तुजला गणतील काक ।।**

कवी या कवितेत कोकिळ पक्ष्याला उद्देशून बोलत आहे. कोकिळ पक्ष्याचे निमित्त करून कवी जरी काही म्हणत असला, तरी अरसिक जगापुढे आपल्या कलेचे प्रदर्शन करणाऱ्या रसिकाला उद्देशून त्याला बोलायचे आहे. जग कलेचे चीज न करता बाह्य स्वरूपावरून त्याची किंमत करत असते. हे इथे मोठ्या खुबीने व्यक्त केले आहे. अशाच पद्धतीने पारतंत्र्यातच आनंद मानणाऱ्याला न बोलता, कोकिळेला उद्देशून तो बोलतो. चंदन, आम्र, गज, सूर्य, श्वान, विंचू वगैरेंना उद्देशून त्यांच्यातील उणेपणावर टीका करून आपले मनोगत व्यक्त करण्याची पद्धत म्हणजे 'लेकी बोले सुने लागे' या प्रकारची आहे. सुनेला काही बोलायचे असल्यास स्पष्टपणे तिला न बोलता आडपडद्याने सासू आपल्या मुलीला बोलते. मात्र तिचा सारा रोख सुनेवरच असतो. 'दुसऱ्याला उद्देशून बोलून आपले मनोगत व्यक्त' करण्याच्या पद्धतीला **अन्योक्ती** असे म्हणतात. या अलंकारात कवी प्रस्तुताबद्दल (ज्याला बोलायचे त्याच्याबद्दल) न बोलता अप्रस्तुतांना (इतरांना) उद्देशून बोलत असतो, म्हणून अन्योक्तीला **अप्रस्तुत प्रशंसा** असेही म्हणतात.

**(१४) पर्यायोक्त** - पुढील वाक्ये पाहा.

(१) त्याचे वडील सरकारचा पाहुणचार घेत आहेत. (तुरुंगात आहेत).

(२) काळाने त्याला आमच्यातून हिरावून नेले. (तो मेला)

(३) तू जे सांगतोस ती कल्पित कथा वाटते. (तू खोटे बोलतोस).

वरील प्रत्येक वाक्यासमोर कंसात जे विधान केले आहे ते बोलणाऱ्याला सांगायचे आहे. पण एखादी गोष्ट सरळ शब्दांत न सांगता वळणे घेत-घेत तो आपले विचार पर्यायाने म्हणजे वेगळ्या रीतीने व्यक्त करतो. विशेषतः एखादी अप्रिय, अशुभ, बीभत्स किंवा अमंगल गोष्ट व्यक्त करायची असल्यास असेच वळणावळणाचे बोलणे योग्य ठरते; म्हणून पर्यायोक्त हा अलंकार मानला जातो. **एखादी गोष्ट सरळ शब्दांत न सांगता ती अप्रत्यक्ष रीतीने (आडवळणाने) सांगणे यास 'पर्यायोक्त' असे म्हणतात.**

**(१५) विरोध किंवा विरोधाभास** - पुढील उदाहरण पाहा.

**कठोर वज्रापेक्षाही मृदू पुष्पाहुनी अधी ।**
**लोकोत्तरांची हृदये कळती न कुणासही ।।**

इथे लोकोत्तर माणसांची अंतःकरणे वज्रापेक्षाही कठोर व फुलापेक्षाही मृदू असतात, असे सांगून दोन विरुद्ध गुण एकत्र असल्याचे दाखवून वरवर विरोध दर्शविला आहे; पण ही कठोरता व मृदुता एकाच विषयाबद्दल नसते. गरिबांबद्दल ही अंतःकरणे मृदू होत असली, तरी दुष्टांच्या बाबतीत ती कठोर झाल्याप्रमाणे वाटतात. यात खरोखर विरोध नसून विरोधाचा आभास निर्माण केलेला आहे. 'मरणात खरोखर जग जगते' या कवी तांबे यांच्या ओळीत 'मरण' व 'जगते' या विरुद्ध गोष्टी एकत्र आल्याने विरोधाचा आभास निर्माण होतो. अशा रीतीने **एखाद्या विधानात वरवर दिसायला विरोध आहे असे वाटते; पण वास्तविक तसा विरोध नसतो. अशा ठिकाणी 'विरोधाभास' हा अलंकार असतो. या विरोधाचा परिहार** (निराकरण) करता येतो. आणखी काही उदाहरणे -

(१) वियोगार्थ मिलन होते नेम हा जगाचा ।

(२) जरी आंधळी मी तुला पाहते ।

(३) स्वतःसाठी जगलास तर मेलास. दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास.

(४) सर्वच लोक बोलू लागले की कोणीच ऐकत नाही.

**(१६) असंगती** - विरोधाभासात दोन विरुद्ध गोष्टी एकत्र असल्याचा भास होतो. पण याउलट ज्या गोष्टी एकत्र असायला हव्यात, त्या भिन्न ठिकाणी असल्याचे वर्णन पाहावयास मिळते. जिथे कारण तिथेच कार्य घडावयास हवे; पण **कारण एका ठिकाणी आणि त्याचे कार्य दुसऱ्या ठिकाणी असे जिथे वर्णन असते त्यास असंगती अलंकार म्हणतात.** कविवर्य तांबे यांची पुढील कविता या अलंकाराचे उत्कृष्ट उदाहरण होय.

कुणि कोडे माझे उकलिल का? ।
कुणि शास्त्री रहस्य कळविल का? ।
हृदयि तुझ्या सखि, दीप पाजळे ।
प्रभा मुखावरि माझ्या उजळे ।।
नवरत्ने तू तुज भूषविले ।
मन्मन खुलले आतिल का? ।।
गुलाब माझ्या हृदयी फुलला ।
रंग तुझ्या गालावर खुलला ।।
काटा माझ्या पायी रुतला ।
शूल तुझ्या उरि कोमल का? ।।
माझ्या शिरि ढग निळा डवरला ।
तुझ्या नयनि पाउस खळखळला ।।
शरच्चंद्र या हृदयि उगवला ।
प्रभा तुझ्या उरि शीतल का? ।।

**(१७) सार** - पुढील उदाहरण पाहा.

**आधीच मर्कट तशातही मद्य प्याला । झाला तशात जरि वृश्चिक दंश त्याला ।**

**झाली तयास तदनंतर भूतबाधा । चेष्टा वदू मग किती कपिच्या अगाधा ।।**

आधीच माकड, त्याचे दारू पिणे, त्यात त्याला विंचू चावणे व मग भूतबाधा होणे या माकडाच्या चेष्टा क्रमाक्रमाने इथे वाढत गेल्याचे दाखविले आहे. अशा रीतीने **एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपकर्ष साधलेला असतो. तेव्हा सार हा अलंकार असतो.** इंग्रजीत याला climax असे म्हणतात. याचा अर्थ शिडी. शिडीप्रमाणे एखादी कल्पना चढत्या किंवा उतरत्या क्रमाने इथे मांडलेली असते. पुढील उदाहरण पाहा.

(१) काव्यात नाटके रम्य, नाटकांत 'शकुंतला' ।

त्यामध्ये चवथा अंक, त्यातही चार श्लोक ते ।।

(२) वाट तरी सरळ कुठे पांदीतिल सारी । त्यातुन तर आज रात्र अंधारी भारी ।

आणि बैल कसल्याही बुजती आवाजा । किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हिसांजा ।।

**(१८) व्याजस्तुती** - (व्याज = खोटे, कपट, ढोंग)

'विद्वान आहात झालं!' किंवा 'केवढा उदार रे तू!' असे जेव्हा आपण बोलतो, तेव्हा बाह्यतः आपण स्तुती केल्याचा भास होतो, पण ती निंदा असते. 'अरे चोरा!' असे जेव्हा आई कौतुकाने मुलाला म्हणते त्या वेळी वरून ती निंदा करते, पण आतून ती स्तुती असते. अशा प्रकारे **बाह्यतः स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यतः निंदा पण आतून स्तुती असे जिथे वर्णन असते, तिथे व्याजस्तुती हा अलंकार असतो.** पुढील उदाहरणे पाहा.

(१) होती वदनचंद्राच्या दर्शनाचीच आस ती ।

अर्धचंद्रच तू द्यावा, कृपा याहून कोणती? ।।

(२) सर्वास सर्व देशी मिथ्या ही तव स्तुती महीपाला ।

न परस्त्रिया दिले त्वा वक्ष, न वा पृष्ठ तव विपक्षाला ।।

(३) म्हणूनिया आलो तेव्हा परतुनी घराला

काव्य ऐकविले ते सहधर्मचारिणीला

गानलुब्ध तीही होई झोप ये तियेला

काव्यरसिक तिजसम कोणी जगामधि असेल?

**(१९) व्याजोक्ती** - (व्याज + उक्ती = खोटे बोलणे) **एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा जिथे प्रयत्न होतो, तिथे 'व्याजोक्ती' हा अलंकार असतो.** उदा.

(१) येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रांमध्ये दिसे ।

'डोळ्यांत काय गेले हे?' म्हणुनी नयना पुसे ।।

(२) 'काय गे बघशी मागे वळुनि वळुनि अशी?' ।

विचारिता म्हणे, 'माझी राहिली पिशवी कशी?' ।।

**(२०) चेतनगुणोक्ती** - निसर्गातील एका दृश्याचे पुढील वर्णन पाहा.

'ती पाहा, सर्वांत मागे आपली मान उंचावून पाहणारी टेकडी, तिच्या पायाजवळून उड्या मारीत व गात

जाणारा तो अवखळ झरा, त्याच्या दोन्ही हातांना पसरलेली, हसणारी व वाऱ्याने डुलणारी शेते, सायंकाळच्या अशा प्रशांत वातावरणात तिथे ध्यानस्थ बसलेली एकच एक झोपडी व तिच्यावर आपल्या मायेचे छत्र धरून उभा असलेला वृक्ष!' कल्पना किती रम्य वाटते, नाही? **निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून त्या मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात, असे जिथे वर्णन असते, तिथे चेतनगुणोक्ती हा अलंकार असतो.** आणखी उदाहरणे पाहा.

(१) आला हा दारि उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरि सौद्याचे, देईल ज्याचे त्याला

(२) कुटुंबवत्सल इथे फणस हा । कटिखांद्यावर घेउनि बाळे
कथिते त्याला कुशल मुलांचे । गंगाजळिचे बेत आगळे

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) **'तृण हे सर्व विश्वात गुरुस्थानी शोभण्यासारखे आहे.'**
**अलंकार ओळखा.** ①②③④
1) यमक 2) अनन्वय 3) उपमा 4) रुपक

2) **'कापू नको, नको रे कापू, मला तुम्ही नका ना कापू'**
**(अलंकार ओळखा)** ①②③④
1) अनुप्रास 2) यमक
3) दृष्टान्त 4) ससंदेह

3) **'त्या मोकळ्या रस्त्यावर हत्तीसारखे धोंडे पडलेले होते'**
**(अलंकार ओळखा)** ①②③④
1) रुपक 2) उपमा
3) यमक 4) अनुप्रास

4) **'ती सत्यवती नसून, ती सत्याचीच मूर्ती आहे'** ①②③④
1) अपन्हुती 2) अन्योक्ती
3) पर्यायोक्ती 4) विरोधाभास

5) **'ही न दिसे युद्धभूमी हा तर नरक असे' (अलंकार ओळखा)** ①②③④
1) व्याजोक्ती 2) सार
3) व्यतिरेक 4) अपन्हुती

6) **'आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी' (अलंकार ओळखा)** ①②③④
1) व्याजोक्ती 2) असंगती
3) विरोधाभास 4) रुपक

7) **आधीच तो काळा । त्यात कपडेही त्याले त्याने काळेच फार ।।**
**त्यात नाक असे नकटे । गाल असे सुकटे । त्या कहर रात्री फिरत असे स्मशानातून तो एकटा ।।** ①②③④
1) असंगती 2) सार
3) रुपक 4) दृष्टान्त

8) **'त्या पावसाच्या धारा, म्हणजे वरुणाची कृपादृष्टीच जणू'**
**(अलंकार ओळखा)** ①②③④
1) उत्प्रेक्षा 2) विरोधाभास
3) चेतनगुणाक्ती 4) असंगती

9) **'कमळ फुले ती मुलगी हसे, असेच मला वाटे'**
**(अलंकार ओळखा)** ①②③④
1) विरोधाभास 2) चेतनगुणोक्ती
3) उत्प्रेक्षा 4) अर्थान्तरन्यास

10) 'त्या समुद्राने आपला जबडा उघडला आणि अनेक जहाजे गिळंकृत केली.' (अलंकार ओळखा) ①②③④

1) श्लेष  2) चेतनगुणोक्ती
3) अतिशयोक्ती  4) स्वभावोक्ती

11) 'ती मुलगी बिरबलापेक्षा हुशार आहे.' (अलंकार ओळखा) ①②③④

1) असंगती  2) श्लेष
3) व्यतिरेक  4) पर्यायोक्ती

12) 'लहान मूल म्हणजे आनंदसागर, पाहिजे तेवढा आनंद मिळतो.'
(अलंकार ओळखा) ①②③④

1) रुपक  2) अनन्वय
3) चेतनगुणोक्ती  4) दृष्टान्त

13) 'एक तीळ सात जणांनी वाटून खाल्ला व लगेच सर्वांचे पोटही भरले.'
(अलंकार ओळखा) ①②③④

1) उपमा  2) अनन्वय
3) अतिशयोक्ती  4) अर्थान्तरन्यास

14) 'आपल्याकडे नसले की, जगाकडेही नसते.'
(अलंकार ओळखा) ①②③④

1) अनन्वय  2) अर्थान्तरन्यास
3) ससंदेह  4) चेतनगुणोक्ती

15) 'खल पुरुष कधीही न होय सुपुरुष' (अलंकार ओळखा) ①②③④

1) अर्थान्तरन्यास  2) रुपक
3) अनन्वय  4) सार

16) देखिता प्रियकरा डोळा अश्रू गळे झराझरा ।
पुसता हे काय तर म्हणे कचरा गेला जरा-जरा ॥
(अलंकार ओळखा) ①②③④

1) पर्यायोक्ती  2) व्याजोक्ती
3) विरोधाभास  4) सार

17) 'जरी बहिरी मी सर्व ऐकते' (अलंकार ओळखा) ①②③④

1) व्याजोक्ती  2) अन्योक्ती
3) उपमा  4) विरोधाभास

18) 'तू म्हणजे राजा हरिश्चंद्राचा अवतारच आहेस.' (अलंकार ओळखा) ①②③④

1) सार  2) अनन्वय
3) व्याजस्तुती  4) अन्योक्ती

19) 'परवा मी एका कपात माशीला व हत्तीला एका पोहताना पाहिले.' या वाक्यातील अलंकार ओळखा. ①②③④

1) असंगती  2) अतिशयोक्ती
3) उपमा  4) रुपक

20) ते बाळाचे पाय नसून देवाचेच पाय आहेत.
(अलंकार ओळखा) ①②③④

1) व्यतिरेक  2) उपमा
3) अपन्हुती  4) असंगती

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 33 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 1 | 3) 2 | 4) 1 | 5) 4 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 1 | 9) 3 | 10) 2 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 3 | 14) 2 | 15) 1 |
| 16) 2 | 17) 4 | 18) 3 | 19) 2 | 20) 3 |

# ३४. शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण

भाषा हे आपले विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. भाषा ही विविध शब्द, वाक्य यांनी तयार होते. केवळ अनेक शब्द एकापुढे एक ठेवून वाक्य तयार होईल. परंतु आपल्याला द्यावयाचा संदेश, व्यक्त करावयाची भावना, विचार प्रभावी होण्याकरिता योग्य, सूचक आणि पोषक शब्दांची योजना करावयास हवी. अनेक शब्दांतून योग्य शब्दांची निवड आपल्याला करता आली पाहिजे. प्रत्येक शब्दामध्ये प्रकट होण्याची अंगभूत शक्ती असते. ही शब्दशक्ती वापर करणाऱ्यास अचूक माहिती हवी. शब्दांच्या अंगी तीन प्रकारची शक्ती असते. हे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**अभिधा-व्यंजना-लक्षणा**

एखादा शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा एक शब्दशः, शब्दकोशगत सरळ व रूढ अर्थ समजतो. लोकांनी संकेताने तो ठरविलेला असतो. पुढील वाक्य पाहा.

'साप मारायला हवा.'

'साप' हा शब्द उच्चारल्याबरोबर किंवा वाचल्याबरोबर 'एक सरपटणारा प्राणी' एवढे आपल्याला कळते. हा **अर्थ व्यक्त करण्याची या शब्दातली ही जी शक्ती, तिला अभिधा असे म्हणतात.** या अभिधा शक्तीच्या साहाय्याने प्रगट होणारा जो अर्थ त्यास **वाच्यार्थ** म्हणतात.

आता पुढील वाक्य पाहा.

'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत.'

या वाक्यात लेखकाला किंवा हे उच्चारणाऱ्या व्यक्तीला 'साप' या शब्दाचा वाच्यार्थच केवळ अभिप्रेत नाही. 'साप' या शब्दातून 'दुष्ट' माणसे असा त्यातून ध्वनित होणारा दुसरा एक अर्थ सुचवायचा आहे म्हणजे **मूळ अर्थाला बाधा न आणता दुसरा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती आहे, तिला व्यंजना शक्ती असे म्हणतात.** या शक्तीने प्रकट होणाऱ्या अर्थाला **व्यंग्यार्थ** असे म्हणतात. उदा. पाच वाजले. या वाक्याचा वाच्यार्थ म्हणजे 'घड्याळाने पाच वाजल्याचे दर्शविले.' पण या वाक्यावरून निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळे इतर अर्थ कळतात. शाळेतल्या मुलांना वाटते, 'शाळा सुटण्याची वेळ झाली.', बाबांना वाटते, 'चहा घेण्याची वेळ झाली.' आजीला वाटते, 'देवळात जायची वेळ झाली.', शाळेच्या शिपायाला वाटते, 'शाळा बंद करण्याची वेळ झाली.' वगैरे. मूळ अर्थ आहे तसा राहून त्यातून जो दुसरा अर्थ सूचित होतो त्यास **व्यंग्यार्थ** म्हणतात. काव्यात या व्यंग्यार्थाला विशेष महत्त्व असते.

आपल्या नेहमीच्या बोलण्यात असे काही शब्द वा वाक्ये येतात, की त्यांचा शब्दशः अर्थ घेतला, तर भलताच अर्थ निर्माण होतो. अशा वेळी शब्दशः अर्थ न घेता त्याच्याशी सुसंगत असलेला असा दुसराच अर्थ घ्यावा लागतो. उदा. जेवणाची पाने वाढून तयार झाली की आपण म्हणतो, 'चला, पानावर बसा.' या ठिकाणी 'पानावर' याचा शब्दशः अर्थ घेतला, तर अनर्थ होईल म्हणून त्याचा अर्थ 'पानाशेजारी' किंवा 'पाटावर' असा घेणे इष्ट ठरते. तसेच 'आम्ही गहू खातो.' याचा अर्थ 'गहू' हे धान्य असा न करता 'गव्हापासून तयार केलेले पदार्थ' असाच करायला हवा म्हणजे **शब्दाच्या मूळ अर्थाला बाधा येत असेल, तर त्याला जुळेलसा दुसरा अर्थ घ्यावा लागतो. शब्दाच्या या शक्तीस लक्षणा शक्ती असे म्हणतात** व या शक्तीमुळे प्रगट होणाऱ्या अर्थास **लक्ष्यार्थ** असे म्हणतात.

अभिधा, लक्षणा व व्यंजना या शब्दांच्या तीन शक्ती असून त्यांच्या साहाय्याने प्रगट होणारे अनुक्रमे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ असे तीन अर्थ आहेत. विशेषतः व्यंग्यार्थामुळे काव्यात सूचकता येते व काव्य अधिक परिणामकारक होते.

## रस

'रस' याचा शब्दशः अर्थ 'चव' किंवा 'रुची' असा आहे. व्यवहारात सहा रस आहेत- **गोड, कडू, आंबट, तिखट, तुरट व खारट.** एखाद्या वस्तूत असलेली चव जशी आपण घेतो, तशीच एखाद्या उत्कृष्ट काव्यातून त्यातील चव वा गोडी आपण अनुभवतो; यालाच आपण **रसास्वाद** म्हणतो. वाङ्मयातील हा रस म्हणजे काय हे आपण पाहू.

प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात काही **भावना कायमच्या वास** करीत असतात. माणसाच्या अंतःकरणात जशी प्रेम करण्याची भावना आहे, तशी रागवण्याची, हसण्याची, दुःखाची, पराक्रमाची अशा विविध प्रकारच्या भावना आहेत. या स्थिर व शाश्वत भावनांना **स्थायीभाव** असे म्हणतात. या स्थायीभावांची नावे पुढीलप्रमाणे आहेत -**(१) रती, (२) उत्साह, (३) शोक, (४) क्रोध, (५) हास, (६) भय, (७) जुगुप्सा (कंटाळा), (८) विस्मय, (९) शम (शांती)** इत्यादी.

प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात हे स्थायीभाव कमीअधिक प्रमाणात सुप्त अवस्थेत असतात. लेखकाने लिहिलेले वाङ्मय वाचत असताना वाचकांच्या किंवा नाटक पाहताना प्रेक्षकांच्या अंतःकरणातील या भावना जागृत होतात, तेव्हा रस निर्माण झाला असे म्हटले जाते. आपल्या अंतःकरणातील स्थायीभाव हे वाचनाने वा कलाकृतीच्या दर्शनाने चाळवले जातात. जेव्हा जी भावना चाळविली जाते, तेव्हा तो रस निर्माण झाला असे समजावे. हे रस नऊ असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे-

**(१) शृंगार, (२) वीर, (३) करूण, (४) रौद्र, (५) हास्य,**
**(६) भयानक, (७) बीभत्स, (८) अद्भुत, (९) शांत.**

संस्कृत साहित्यकारांनी रसाची मीमांसा मोठी मार्मिक केली आहे. वर सांगितलेले स्थायीभाव ज्यांच्या आश्रयाने राहतात व ज्यांच्यामुळे ते प्रदीप्त होतात, त्यांना **विभाव** असे म्हणतात. ललित वाङ्मयातील नायक, नायिका व इतर व्यक्ती यांना **आलंबन विभाव** म्हणतात. एकलेपणा, चांदणे, उद्यान, भ्रूलीला यांमुळे हे स्थायी भाव उद्दीपित होतात, म्हणून त्यांना **उद्दीपन विभाव** म्हणतात. या स्थायी भावामुळे अंगावर रोमांच उभे राहणे, घाम फुटणे, कंठ दाटून येणे, रडू येणे हे जे परिणाम दिसतात, त्यांना **अनुभाव** म्हणतात. आपल्याला हवी असलेली वस्तू मिळाली नाही म्हणजे वाटणारा खेद, असूया, हेवा, राग या तात्कालिक वृत्तींना **संचारी (किंवा व्यभिचारी)** भाव म्हणतात. विभाव, अनुभाव, संचारी भाव यांच्या साहाय्याने जेव्हा हे स्थायी भाव उत्कट स्थितीला पोहोचतात, तेव्हा त्यांना **रस** असे म्हणतात.

या नवरसांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

**(१) शृंगार** - (शृंग = कामवासना) स्त्रीपुरुषांना एकमेकांबद्दल वाटणाऱ्या प्रेमातून, आकर्षणातून या रसाचा उगम होतो. पुढील चरण पाहा.

(१) डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहु नका. (२) सहज सख्या एकदाच येई सांजवेळी.
(३) या कातरवेळी पाहिजेस तू जवळी.

यासारखे चरण ऐकताना जी वैषयिक भावना जागृत होते, जो शृंगाररस निर्माण होतो, त्याला **उत्तान शृंगार** म्हणतात. 'सहज तुझी हालचाल मंत्रे जणु मोहिते' यासारख्या चरणातून सोज्ज्वळ पत्नीप्रेमाने निर्माण होणारा तो **सात्त्विक शृंगार**; प्रेमाच्या विफलतेतून निर्माण होणारा तो **विप्रलंभ शृंगार**. बहुधा लावणी हा प्रकार शृंगार रस परिपोषक असतो.

**(२) वीर** - उत्साह हा या रसाचा स्थायीभाव. पराक्रम, शौर्य, धीरोदात्त प्रसंग यांच्या वर्णनांतून हा रस निर्माण होतो. उदा.

(१) गर्जा जयजयकार, क्रांतिचा, गर्जा जयजयकार.

(२) उठा राष्ट्रवीर हो, सज्ज व्हा उठा चला.

(३) जिंकू किंवा मरू, भारतभूच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू.

यासारखी समरगीते व पोवाडे ह्यांत हा वीररस पाहावयास मिळतो.

**(३) करूण** - शोक किंवा दुःख, वियोग, संकट यांतून हा रस निर्माण होतो. हृदयद्रावक अशा गोष्टींच्या वर्णनांत हा रस आढळतो. उदा.

(१) हे कोण बोलले बोला? राजहंस माझा निजला. (२) आई म्हणोनि कोणी, आईस हाक मारी.

(३) पोर खाटेवर मृत्युच्याच दारा....

**(४) हास्य** - विसंगती, असंबद्ध भाषण, व्यंगदर्शन, विडंबन, चेष्टा यांच्या वर्णनातून हा रस निर्माण होतो. उदा.

(१) परटा, येशिल कधि परतून? (२) उपास मज लागला, सखेबाई, उपास मज लागला.

यांसारख्या कवितांतून किंवा सुदाम्याचे पोहे, चिमणरावाचे चऱ्हाट, साष्टांग नमस्कार, संपूर्ण बाळकराम, गुदगुल्या यांसारख्या विनोदी लेखनातून व नाटकांतून हा रस आढळतो.

**(५) रौद्र** - अतिशय क्रोध वा चीड या भावनेतून हा रस निर्माण होतो. उदा.

पाड सिंहासने दुष्ट ती पालथी
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती
मुकुट रंकासि दे, करटि भूपाप्रती
झाड खट्खट् तुझे खड्ग रुद्रा.

**(६) भयानक** - भीती या भावनेतून हा रस निर्माण होतो. युद्ध, मृत्यू, सूड, राक्षस, स्मशान इत्यादींच्या वर्णनांतून हा रस आढळतो. गोविंदाग्रजांचे 'स्मशानातले गाणे', भीतिकथा, रहस्यकथांतील खून व सूड यांची वर्णने, युद्धकथा यातून हा रस आढळतो.

**(७) बीभत्स** - किळस, वीट, तिटकारा वर्णन करणाऱ्या कवितांतून वा वर्णनातून हा रस आढळतो. याचा स्थायीभाव जुगुप्सा. उदा.

ही बोटे चघळीत काय बसले - हे राम रे -लाळ ही ।
काळी काय गळ्यातुनी जळमटे आहेत पत्रास ही;
शी! शी! तोंड अती अमंगळ असे आधीच हे शेंबडे,
आणी काजळ ओघळे वरुनि हे, त्यातूनि ही हे रडे!

**(८) अद्‌भुत** - विस्मय हा या रसाचा स्थायीभाव. पऱ्यांच्या कथा, अरेबियन नाइट्स, अलिबाबा व चाळीस चोर, जादूची अंगठी यांसारख्या आश्चर्यकारक गोष्टींच्या वर्णनांतून हा रस आढळतो. पुढील ओळी पाहा.

आटपाट नगरात दुधाचे तळे
तळ्याच्या काठी पेढ्यांचे मळे

नगरातले लोक फारच वेडे
पेढ्यांनी बांधतात बर्फीचे वाडे

आंघोळीला पाणी घेतात दुधाचे
डोक्याला तेल लावतात मधाचे

फणसपोळीचे कपडे घालतात
सारे वेडे उलटे चालतात.

**(९) शांत** - परमेश्वरविषयक भक्ती, सत्पुरुषांची संगती, देवालय वा आश्रम यांच्या परिसरातील वातावरण यांच्या वर्णनातून हा रस आढळतो. याचा स्थायीभाव शम. उदा.

(१) घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला.

(२) उठि गोपालजी, जाइ धेनूकडे, पाहती सौंगडे वाट तुझी.

(३) आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।

यांसारख्या चरणांतून व भूपाळ्यांतून शांतरसाचा प्रत्यय येतो.

वाङ्मयातील नऊ रसांची ओळख आपण करून घेतली. एखाद्या कवितेत एकच रस असतो असे नाही. निरनिराळे रसही आढळतात.

## काव्य

**वाक्यात रस असला, तरी ते वाक्य अंतःकरणाला जाऊन भिडते. त्यालाच काव्य म्हणतात. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे संस्कृत वचन प्रसिद्ध आहे.**

## काव्याचे गुण

काव्यात रस असावा लागतो व या रसाला पोषक असे जर शब्द त्यात योजलेले असले, तर काव्याची शोभा वाढते. काव्याची शोभा वाढवणारे प्रमुख तीन गुण **प्रसाद, माधुर्य, ओज** हे आहेत.

**(१) प्रसाद - प्रसाद म्हणजे सोपेपणा.** काव्य वाचल्यानंतर त्यातील अर्थ सहज समजला पाहिजे. अवघड, पांडित्यपूर्ण, मोठमोठे समास असलेले शब्द वापरून केलेली रचना रसाला हानिकारक असते. सोपी, सुबोध व चटकन अर्थ समजणारी रचना म्हणजे प्रासादिक रचना. या गुणाला कवितेत फार मोठे स्थान आहे. तांब्यांची 'माहेरची आठवण', बालकवींची 'फुलराणी', 'औदुंबर', 'यशवंतांची आई'.

ग. दि. माडगूळकरांच्या कविता म्हणजे प्रासादिक काव्यांचे नमुने होत.

**(२) माधुर्य** - काव्यात जसे सोपे शब्द हवेत, तसेच कोमल व मृदुवर्णांच्या योजनेने ते कानाला मधुर व सुखद आणि नादामुळे ते गुणगुणावेसे वाटावेत. **माधुर्य म्हणजे गोडवा.** कोमल, अनुनासिक वर्ण व अनुप्रासात्मक रचना यांमुळे काव्याला माधुर्य प्राप्त होते. उदा.

(१) राधाधरमधुमिलिंद जयजय, रमारमण गोविंद
कालिंदी तट पुलिंद लांछित सुरनुतपादारविंद.

(२) हे मंदमंद पद सुंदर कुंददंती । चाले जसा मद-धुरंधर इंद्रदंती ।।

**(३) ओज - ओज म्हणजे आवेश किंवा जोरदारपणा.** कठोर वर्ण, दीर्घ समास, संयुक्त व्यंजने यांचा अधिक वापर करून कवी रचनेत उत्साह व जोरदारपणा निर्माण करतो. अशा प्रकारची रचना वीर व रौद्र रसांना पोषक ठरते. उदा.

कडकडा फोड नभ, उडव उडु मक्षिका,
खडबडवि दिग्गजा तुडव रविमालिका,
मांड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका,
खवळवी चहुकडे या समुद्रा!

शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण समजले म्हणजे काव्याच्या रसग्रहणाला मदत होते. आता काव्याचे रसग्रहण म्हणजे काय ते पुढील पाठात पाहू.

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) एखाद्या शब्दाचा संकेताने ठरवलेला सरळ, रुढ अर्थ म्हणजे ............. शब्दशक्ती होय. ①②③④

1) लक्षणा 2) व्यंजना
3) अभिधा 4) स्थायीभाव

2) शब्दाच्या मूळ अर्थाला बाधा न आणता दुसरा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती आहे, तिला ............. शब्दशक्ती म्हणतात. ①②③④

1) व्यंजना 2) अभिधा 3) निरुढा 4) लक्षणा

3) शब्दाच्या मूळ अर्थाला बाधा येऊन, त्याला जुळेलसा दुसरा अर्थ घ्यावा लागणारी शब्दशक्ती कोणती? ①②③④

1) अभिधा 2) लक्षणा 3) व्यंजना 4) निरुढा

4) प्रसाद या काव्यगुणाचा अर्थ होतो ............. ①②③④

1) गोडवा 2) सोपेपणा
3) आवेश 4) कठीणता

5) बीभत्स या रसाचा स्थायीभाव कोणता? ①②③④

1) करूण 2) भीती 3) जुगुप्सा 4) वीर

6) 'विस्मय' हा स्थायीभाव कोणत्या रसाचा आहे? ①②③④

1) भयानक रस 2) अद्‌भुत रस
3) करूण रस 4) वीर रस

7) 'वीर' रसाचा स्थायीभाव कोणता? ①②③④

1) कंटाळा 2) हास्य
3) उत्साह 4) भीती

8) स्थायीभावांना प्रदीप्त करणारे ............. असतात. ①②③④

1) विभाव 2) रस
3) शब्दशक्ती 4) ओज

9) प्रेमाच्या विफलतेतून निर्माण होणारा शृंगार ............. होय. ①②③④

1) विप्रलंभ 2) सात्विक
3) तात्विक 4) शाश्वत

10) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांची शक्ती ओळखा.

आमच्या घरावरून विमान गेले. ①②③④

1) अभिधा 2) लक्षणा 3) व्यंजना 4) समिधा

11) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांची शक्ती ओळखा.

पक्षी आकाशात उडाला. ①②③④

1) व्यंजना 2) लक्षणा 3) समिधा 4) अभिधा

12) पुढील वाक्यातील लक्ष्यार्थ ओळखा.

तो भात खाऊन टाक. ①②③④

1) खाऊन फेक 2) खाऊन घे
3) खाताना फेक 4) टाकून घे

13) रामराव शेतात बैलासारखे राबतात. (शब्दशक्ती ओळखा) ①②③④

1) लक्षणा 2) अभिधा
3) व्यंजना 4) समिधा

14) 'तो मुलगा म्हणजे नुसता हत्तीच आहे.' शब्दशक्ती ओळखा. ①②③④

1) लक्षणा 2) अभिधा 3) व्यंजना 4) निरुढा

15) 'हे मंदमंद पद सुंदर कुंददंती । चाले जसा मद -धुरंधर इंद्रदंती ।।' या काव्यातील काव्यगुण ओळखा. ①②③④

1) माधुर्य 2) ओज 3) प्रसाद 4) आवेग

16) बालकवींचे 'फुलराणी' हे काव्य ............ काव्याचे उदाहरण आहे. ①②③④

1) मधुर काव्य 2) प्रासादिक काव्य
3) ओजपूर्ण काव्य 4) आवेशकाव्य

17) 'केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा' या भजनातून निर्माण होणारा रस कोणता? ①②③④

1) रौद्र 2) शांत 3) हास्य 4) शृंगार

18) 'तुझ्या स्पर्शाने गुलाबाची कळी फुलते.' या वाक्यातून निर्माण होणारा रस कोणता? ①②③④

1) वीर 2) बीभत्स
3) रौद्र 4) शृंगार

19) 'तू इतकी काव्यप्रेमी की, काव्य ऐकतानाच गाढ झोपतेस आणि हे तू अनेक वेळा करतेस.' निर्माण होणाऱ्या रसाचा स्थायीभाव सांगा? ①②③④

1) उत्साह 2) जुगुप्सा 3) हास्य 4) शम

20) चीड, राग, संताप या भावनांमधून कोणता रस निर्माण होतो? ①②③④

1) हास्य 2) करूण
3) शांती 4) रौद्र

21) पुढील वाक्यातील लक्ष्यार्थ ओळखा. ①②③④
आम्ही बाजरी खातो.

1) बाजरीची भाकरी 2) कच्ची बाजरी
3) बाजरीचे दाणे 4) बाजरीचे पीक

22) 'मी आहार नियंत्रण करते आहे म्हणूनच रोज दोन डझन केळी, एक लीटर दूध, चार वेळचे जेवणच फक्त घेते.' या वाक्यातून ............ रसाची निर्मिती होते. ①②③④

1) हास्य 2) अद्‌भुत
3) भयानक 4) करूण

23) 'ओंकार प्रधान रूप गणेशाचे' या ओळीतून निर्माण होणारा रस कोणता? ①②③④

1) शांत 2) अद्‌भुत
3) भयानक 4) हास्य

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 34 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 3 | 2) 1 | 3) 2 | 4) 2 | 5) 3 |
| 6) 2 | 7) 3 | 8) 1 | 9) 1 | 10) 2 |
| 11) 4 | 12) 2 | 13) 3 | 14) 3 | 15) 1 |
| 16) 2 | 17) 2 | 18) 4 | 19) 3 | 20) 4 |
| 21) 1 | 22) 1 | 23) 1 | | |

# ३५. कवितेचे रसग्रहण

एखादी कथा आपण वाचतो. ती आपल्याला अतिशय आवडते. एखादी कविता वाचली किंवा ऐकली की मनाला अतिशय आनंद होतो. आपण एखादा चित्रपट पाहून आल्यानंतर कुणीतरी आपल्याला विचारते, 'कसा काय वाटला चित्रपट?' आपण उत्तर देतो, 'एकंदरीत आपल्याला आवडला.' चित्रपट आवडला म्हणजे काय? त्यात आवडणाऱ्या गोष्टी कोणकोणत्या होत्या? चित्रपटाचे कथानक पटण्यासारखे असेल, त्यातील संवाद खटकेबाज असतील, त्यातील नटांनी अभिनय समजून घेऊन हुबेहूब वठविला असेल, गाण्यांची रचना चांगली असेल, ती गोड आवाजात म्हटली गेली असतील, छायाचित्रण स्पष्ट असेल, पार्श्वसंगीत वातावरणाला साजेसे असेल, देखावे नयनरम्य असतील, निवडलेले प्रसंग मार्मिक असतील, दिग्दर्शनात सूचकता असेल- एक ना दोन! अनेक गोष्टींचा ठसा आपल्या मनावर उमटतो व एकदम आपण बोलून जातो, 'आपल्याला चित्रपट आवडला बुवा!'

जी गोष्ट चित्रपटाची, तीच कवितेची. कविता वाचल्यानंतर आपल्याला तिच्यातील अनेक गोष्टी आवडलेल्या असतात. कदाचित त्या कवितेची चाल मधुर असेल, तिच्यातल्या भावना अंतःकरणाला भिडणाऱ्या असतील, कल्पना चमत्कृतिपूर्ण असेल, मांडलेला विचार प्रभावी असेल, रचना सोपी पण अर्थपूर्ण असेल, शब्दांत नादमाधुर्य असेल, भाषा विषयाला साजेशी असेल- अशा अनेक गोष्टींनी आपल्यावर त्या काव्याची मोहिनी पडते. त्यातील सौंदर्याने आपण भारून जातो व एकदम आपल्या तोंडातून उद्‌गार निघतात, 'फार छान आहे ही कविता. आपल्याला तरी आवडली.' ती का आवडली असे विचारले की तुम्ही म्हणता, 'चांगली आहे म्हणून!' 'कविता चांगली का?' तर 'ती आवडली म्हणून!' याहून अधिक काही सांगता येत नाही. ते सांगता आले पाहिजे. एखादा पदार्थ रुचकर झालेला असतो. तो आपण आवडीने मिटक्या मारीत खातो; पण तो रुचकर कशामुळे झाला याची फोड करून सांगणे सर्वांना जमत नाही.

समजा, घरात आईने तयार केलेला चिवडा अतिशय खमंग झालेला आहे. 'हा खमंग चिवडा चविष्ट का लागतो?' याचे उत्तर आपल्याला असे देता येईल- 'या चिवड्यासाठी वापरलेले पोहे पातळ आहेत. ते तुपात खुसखुशीतपणे तळले आहेत. त्यात हळद, मीठ अन् तिखट हे योग्य प्रमाणात पडले आहे. त्यात खोबऱ्याचे पातळ काप, बेदाणे, काजूगर, तीळ व शेंगदाणे घातले आहेत व थोडा दाण्याचा कूटही मिसळला आहे. त्यावर लसणाची खमंग फोडणी दिली आहे अन् शेवटी चव येण्यासाठी चिमूटभर साखर पेरलेली आहे- म्हणून चिवडा चविष्ट झाला आहे,' असे सांगणे हेच त्याचे रसग्रहण. हे जसे चिवड्याचे, तसेच काव्याचे. काव्याचा खमंग पदार्थ तयार करताना त्यात कवीने कोणता मसाला घातला आहे, त्याला खमंगपणा का आला आहे हे स्पष्ट करून सांगणे यालाच कवितेचे रसग्रहण म्हणायचे!

काव्याचे रसग्रहण कसे करायचे हे समजून घेण्यापूर्वी गद्य, पद्य व काव्य यांतील फरक प्रथम समजून घेऊ. आपल्या मनातले विचार आपण दोन तऱ्हांनी व्यक्त करतो-

(१) गद्यातून व (२) पद्यातून. शब्द तेच, अर्थ तोच. पण रचना मात्र वेगळी! आपल्या मनात येणारे हे विचार जसेच्या तसे बोलून दाखविणे म्हणजे गद्य अथवा असे म्हणू की, गद्य म्हणजे व्यवहारातले स्वाभाविक बोलणे. पण तेच वाक्य सुरावर किंवा चालीवर म्हणून दाखविता आले की ते पद्य होते. आपण रस्त्यातून जात

असताना ठिकठिकाणी म्युनिसिपालिटीने पाट्या लावलेल्या असतात - 'येथे घाण करू नये।' हे गद्य का पद्य? अर्थात गद्य! पण हेच वाक्य सुरावर म्हणून दाखविले की ते पद्य होते- 'इथे घाण करू नये' (अनुष्टुभ वृत्तात म्हणून पाहा.) बंगल्याच्या फाटकावर कोठेकोठे लिहिलेले असते - 'जाता येता दार लावून घ्यावे' पण हेच वाक्य शालिनी वृत्तात सुरावर म्हणून पाहा. वर्गात गुरुजी रोज हजेरी घेताना म्हणतात, 'गोविंद नारायण देशपांडे?' विद्यार्थी उत्तर देतो, 'हजर !' पण हेच नाव इंद्रवज्रा वृत्तात म्हणता येते. म्हणून पाहा. गद्य व पद्य यांत हा फरक आहे. आता काव्य कशास म्हणतात ते पाहू.

काव्याच्या व्याख्या आजवर अनेक संस्कृत, इंग्रजी, मराठी साहित्यशास्त्रकारांनी केल्या आहेत. 'वाक्यं रसात्मकं काव्यम् ।' (ज्यात रस आहे अशा वाक्याला काव्य म्हणावे.) जगन्नाथपंडित म्हणतात, 'रमणीय अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दाला **काव्य** म्हणतात. कोणी तालबद्ध शब्दरचनेला काव्य म्हणतो, तर कोलरिजच्या मते, 'उत्कृष्ट रचना म्हणजे काव्य.' वर्डस्वर्थ म्हणतो, 'उत्कट भावनेचा सहजोद्रेक म्हणजे काव्य.' कोणी म्हणतो, 'काव्य म्हणजे जीवनावर केलेले भाष्य.' तर कोणाच्या मते, 'जे हृदयाला भिडते, हलविते, फुलविते ते काव्य.' काव्याची व्याख्या करण्याच्या या सर्वांचा खटाटोप पाहिला की हत्तीचे वर्णन करणाऱ्या सहा जन्मांधांची आठवण होते. हत्तीच्या शरीराचा जो भाग ज्याच्या हाताला लागला त्याचे त्याने वर्णन केले. कोणी हत्ती खांबासारखा म्हणतो, तर कोणी सुपासारखा आहे असे म्हणतो. कोणी भिंतीसारखा म्हणतो, तर कोणी सापासारखा म्हणतो. सर्वांचे म्हणणे त्यांच्या दृष्टिकोनांतून चुकीचे नसले, तरी तंतोतंत बरोबरही नाही. त्याचप्रमाणे विविध लेखकांनी काव्याच्या विविध व्याख्या केल्या असल्या व त्या चुकीच्या नसल्या, तरी पूर्णपणे बरोबर नाहीत.

कधी-कधी आपण म्हणतो, 'मूल म्हणजे फूल, फूल म्हणजे काव्य!' याचा अर्थ काय? काही गोंडस मुले व सुंदर फुले पाहून मन मोहून जाते. ती पाहतच राहावी असे वाटते. 'ताजमहाल म्हणजे मूर्तिमंत काव्य!' याचा अर्थ असा, की ताजमहालाचे सौंदर्य मनाला मोहून टाकते. मोहून टाकणारे गुण या विविध वस्तूंत जसे आहेत, तसेच ते काव्यातही आहेत. गडकऱ्यांची 'चिमुकली बाला' ही कविता पाहा. एका मुलीच्या कपाळावर गोंदवलेले असते. कपाळावरील तो हिरवा ठिपका पाहून कवी म्हणतात -

तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे ।
शुभ्र मुखनभी तुषार कुठल्या दिव्य तरंगाचे ।।

गोंदवणामुळे त्या मुलीच्या सौंदर्यात जी भर पडलेली आहे, तिचे वर्णन करून कवी शेवटी म्हणतात -

हिचा उद्याचा धनी कोण हे ठरवावे म्हणुनी ।
पुण्याईचे गणित करित विधि दशांश चिन्हांनी ।।

विधि (= ब्रह्मदेव) ललाटावर एक टिंब टाकून तिच्या भवितव्याचे गणित करीत असावा ही कल्पना किती सुंदर आहे, नाही? यालाच म्हणतात काव्य! अशा काव्यामुळे कविता वाचताना आनंद होतो. हा आनंद का झाला, कशामुळे झाला, हे उलगडून सांगणे म्हणजेच **रसग्रहण** करणे. कवितेतील सौंदर्यदर्शन म्हणजेच रसग्रहण!

याच वेळी एक गोष्ट स्पष्ट करावयास हवी. ती म्हणजे, काव्य हे केवळ पद्यातच असते असे नाही. तर ते गद्यातही असते. गडकऱ्यांनी भावबंधन नाटकात लतिकेच्या गालावरील तिळाचे वर्णन केले आहे -

''नेत्राची शुभ्र किरणं अधोमुखानं उतरताना गालाच्या गुलाबी रंगाच्या किरणांशी जिथं एकरूप होतात त्या सीमारेषेवर असलेला एकच काळसर तीळ, सौंदर्याचं हे चालतंबोलतं काव्य सर्वांगपरिपूर्ण केल्यावर काव्यरसाची सीमा झाली हे दाखविण्यासाठी विधात्यानं त्या तिळाचा गालावर हा सुंदर पूर्णविरामच देऊन ठेवला आहे.''

किती सुंदर कल्पना आहे, नाही? कवी कुसुमाग्रजांनी आपल्या 'समिधा' या गद्यकाव्यसंग्रहात प्रारंभीच 'जीवन' म्हणजे काय, हे थोडक्यात कसे सांगितले आहे पाहा.

'आकाशाच्या सरोवरात पृथ्वीचं हे विराट कमलपुष्प उमललं आहे
आणि तो भ्रमरचंद्र आपले रुपेरी पंख पालवून
त्या कमलाभोवती अखंड गुंजारव करीत आहे.
त्या कमलाच्या पाकळीवर एक सुंदर दवबिंदू पडला आहे.
त्याचं नाव जीवन !'

हे उतारे गद्याचे आहेत खरे, पण यात काव्य कसे आहे ते तुम्ही पाहिले. काव्याची अगदी थोडक्यात एखादी व्याख्या कुणी मला करायला सांगितली, तर मी म्हणेन - **'जे-जे मनाला मोहून टाकतं ते काव्य.'** काव्याची जी मोहिनी मनावर पडते ती दोन प्रकारची असते. काव्याला स्त्रीची उपमा दिली जाते. काव्यरूपी स्त्रीच्या रूपाची जशी मोहिनी पडते, तशी तिच्या बाह्यसौंदर्याची मोहिनी पडते, तशीच तिच्या गुणांची किंवा अंतरंगाचीही मोहिनी पडते. काव्याच्या बाह्यसौंदर्यात तिची रचना किंवा चाल, शब्दांतील नादमाधुर्य, भाषा, तिला घातलेले अलंकार येतात. आंतरसौंदर्यात भावनांचे सौंदर्य, कल्पनांचा विलास, विचारांचे सामर्थ्य यांचा समावेश होतो. काव्याची ही जी मोहिनी पडते, ती कशाकशाने पडते ते पाहू.

कविता ऐकताना पहिली मोहिनी जी मनावर पडते, ती त्या कवितेला दिलेल्या सुंदर चालीची. कवितेतील रसाला म्हणजे तिच्यातील भावनेला पोषक चाल दिली असेल, तर ती कविता मनावर ठसते. मुलाला झोपवावे म्हणून आई जे गीत म्हणते त्याला 'अंगाईगीत' असे आपण म्हणतो. या वेळी शांत वातावरण निर्माण व्हावे लागते म्हणून संथ व हलक्या सुरात आई म्हणते, 'बाळा, अंगाई, अंगाई, निज रे झोपी जाई ।।'

अंगाईगीताची चाल शांतरसाला अनुकूल अशीच असल्यामुळे ही कविता ऐकता-ऐकता मुलाला झोप लागते.

अभंग कसा म्हणतात हे तुम्हाला माहीत आहे.

**उठि गोपालजी, जाई धेनूकडे । पाहती सौंगडे, वाट तूझी ।।**

**१) रसानुकूल चाल** - हा अभंगच आहे. पण सकाळच्या प्रशांत प्रहरी आजीच्या तोंडून भूपाळीच्या सुरात तो म्हटला जात असताना ज्यांनी हा ऐकला असेल, त्यांना हा भूप राग त्यातील रसाला कसा पोषक आहे हे समजेल. **रसानुकूल चाल** हे कवितेतील एक सौंदर्यस्थळ.

कवितेतील काही शब्द त्यातील नाद सुचवितात. जसे-

**रुणुझुणु ये रुणुझुणु ये झंकारित वाळा ।**
**लुदलुदलुद दुडदुडदुड ठुमकत ये बाळा ।।**

**२) नादानुकारी शब्दरचना** - या ओळीत नादानुकारी शब्द असल्यामुळे कविता कानाला गोड लागते. **नादानुकारी शब्दरचना** हे कवितेतील दुसरे सौंदर्यस्थळ.

कवितेतील भाषा तिच्यातील विषयाला अनुरूप अशी असावी लागते. लहान मुलांच्या गीतातील भाषा त्यांना साजेशी असायला हवी. ती प्रौढांची भाषा असून चालणार नाही. मायदेवांची दोन शिशुगीते पाहा.

| | |
|---|---|
| येग येग चिऊ, | चिऊ म्हणते येऊ |
| मोत्या करतो गुर्रर, | चिऊ उडते भुर्रर ।। |
| विठू विठू पोपट | आहे मोठा चावट |
| डाळ खातो कच्ची | मला म्हणतो लुच्ची ।। |

त्याचप्रमाणे खेड्यातल्या जीवनावरील कविता खेडुतांच्या बोलीतच असली, तर अधिक खुलून दिसते. खेड्यातल्या पाहुणचाराचे वर्णन श्री. ठोकळ यांनी कसे केले आहे पाहा.

**या बसा पाव्हनं असं रामराम घ्या ।**

**कोनच्या तुमी गावाचं गाठुडं तिठं राहु द्या ।।**

ग्रामीण भाषेतील गीताला खेडुतांना आवडणारी जर चाल दिली, तर दुधात साखर पडल्यासारखे होईल. 'पाटलाची सून' या कवितेला 'या बाई, जेजुरी नगरात' या गीताची चाल कशी शोभते पाहा.

**पाटलाचि व्हनार ही सून । पगा झोक हिचा एव्हापून**

**३) विषयानुरुप भाषा - विषयानुरुप भाषा** हे कवितेतील तिसरे सौंदर्यस्थळ.

कवितेला शोभा देणारे आणखी गुण म्हणजे भाषेचे विविध अलंकार. या विविध अलंकारांची ओळख आपण २७व्या पाठात करून घेतली. कवितेत पेरलेले अलंकार चटकन ओळखता आले पाहिजेत-

**हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशी का शिरी?**

**मठाची उठाठेव का तरी? ।।**

या ओळीत 'ट, ठ' या अक्षरांच्या पुनरावृत्तीने अनुप्रास साधला आहे.

**कोठेतरी रानात बसू या नि हसू या । जिथे न असूया ।**

या चरणात सहज साधलेला यमक पाहा. तसेच पुढील चरणातील विविध अलंकार पाहा.

(१) चंद्र भाऊराया माझा । तू ग चांदणी वहिनी ।
नांदा सुखाने प्रांगणी । संसाराच्या । (रूपक)

(२) कैलासाहुनि थोर मन हे माझ्या बाबांचे । (व्यतिरेक)

(३) ज्योतिने तेजाची आरती । (दृष्टान्त)

(४) पापणीत गोठविली मी नदी आसवांची । (अतिशयोक्ती)

(५) एक्या हाते कधितरी मुली वाजते काय टाळी? (अर्थान्तरन्यास)

**अशा विविध अलंकारांमुळे कवितेत सौंदर्य आढळते.**

एका श्रीमंत बाईला मूलबाळ नसते. तांबे यांच्या कवितेतील एक तेकुरवाळी गरीब बाई तिला सूचकतेने कशी हिणवते पाहा.

वेल फोफावली । तिला ये ना बाई फळ ।
दारी हत्ती घोडे । घरी नाही बाई मूल ।।
हत्ती घोडे दारी । चोपदारांच्या ललकारी
नाही मंगलवाद्य । तोरण नाही दारी ।। **(सूचकता)**

'इतिहाससंशोधन' या कवितेत श्री. सोपानदेव चौधरी म्हणतात,

आजा घोरतसे, तसाच मुलगा, ती सूनही घोरते,
नातू आणि तशीच नात शयनी घुर्घूर घुंकारिते.
झोपेचे मम जाहले खवटसे त्या रात्रिला खोबरे,
आले मात्र हसू, मला गवसले, घोरी घराणे खरे.

या कवितेत **अतिशयोक्ती** आहे, **विनोद** आहे आणि शेवटी सुंदर **कलाटणी देऊन विस्मय** निर्माण केला आहे.

'तारांगण' या श्री. शांताराम आठवले यांच्या कवितेतील कल्पनाचमत्कृती पाहा-

**अनंताच्या सरोवरी धरणीने केले स्नान**
**निळे पातळ आपुले । स्वच्छ टाकिले धुऊन ।।**
**वाऱ्यावर वाळणारे । वस्त्र जावे न उडून**
**छोटे मोठे गोल गोटे । दिले त्यावर ठेवून ।।**

काही कवितांत अशा काही ओळी भेटतात की, त्या अंतःकरणाची पकड घेतात. गोपीनाथ तळवलकरांच्या 'बाळ जातो दूर देशा' या कवितेतील आई मुलाला निरोप देताना म्हणते,

**पत्र धाड वेळोवेळी । जप आपुल्या जीवास**
**नाही मायेचं माणूस ।।**

कवी यशवंतांच्या 'आई' या कवितेतील,

**स्वामी तिन्ही जगांचा । आईविना भिकारी ।**

किंवा माधव जूलियन यांच्या 'आईची आठवण' या कवितेतील,

**सारे मिळे परंतु आई पुन्हा न भेटे ।**

या ओळी मनाला स्पर्शून जातात. या कवितांतील सौंदर्य अशा ओळींतच साठलेले असते. काही कविता वाचकाला विचार करायला लावतात.

श्री. गोखले यांची 'खैबर खिंड' ही चारच ओळींची कविता पाहा.

**हिमालयाच्या छातीचा फोडून हा कोट,**
**गुलाम केले याने लोक तीस कोट,**
**भूगोलाच्या विद्यार्थ्या, बघ ही खैबर खिंड.**
**इतिहासाच्या विद्यार्थ्या, बघ ही अपुली धिंड ।**

शेवटची ओळ वाचून वाचक अस्वस्थ होतो. यातील विचारसौंदर्याने तो भारावून जातो.

श्री. गो. ल. आपटे यांनी 'देवाचिये द्वारी' या अभंगात केलेला मार्मिक उपहास पाहा.

**देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी ।**
**हात जोडियेले । नयन मिटले ।**
**हळूच पायांत । वहाणा घालोनी । त्वरेने निघोनी । चाललासे !**
**अनवाणी होता । येताना बिचारा । देवावरी सारा । भार त्याचा !**

अशीच श्री. पाटणकरांची मराठीतील एक शायरी पाहा.

**वैतागुनी या जीवनाला आलो तुला भेटावया**
**हाय! मृत्यो, दारी तुझ्या केवढा 'क्यू' लागला!**

कवितेत भावनांची उत्कटता, कल्पनाविलास, विचारसौंदर्य, प्रसाद, माधुर्य, ओज या गुणांबरोबर निसर्गवर्णने, शब्दचित्रे, विडंबने, व्यक्तिचित्रे, विनोद हीदेखील आढळतात. रसिकतेने या गोष्टी टिपायला आपण शिकले पाहिजे व रसग्रहण करताना हे सारे सौंदर्य उलगडून दाखविता आले पाहिजे.

**एखाद्या कवितेचे रसग्रहण करताना पुढील गोष्टी नीट लक्षात ठेवाव्यात.**

कविता प्रथम दोनदा-तीनदा वाचून ती संपूर्णपणे समजून घ्यावी. कवीला कवितेत काय सांगायचे

आहे म्हणजेच तिची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात विशद करून सांगावी. कवितेतील भावना, कल्पना, विचार, नादमाधुर्य, चाल, अलंकार, काव्यगुण, कवितेचा प्रकार, कलाटणी, सूचकता, विडंबन यांपैकी जे-जे गुण आढळतात, त्यांची नोंद करावी. आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी शक्य तिथे कवितेतील ओळी उद्धृत कराव्यात. शेवटी आपल्या मनावर त्या कवितेचा कोणता परिणाम झाला, हेही सांगावे. कवितेत कवीला काय सांगायचे आहे अन् ते त्याने कसे सांगितले आहे, याचे विवेचन रसग्रहणात असावे. दोषदिग्दर्शन शक्यतो टाळावे. रसग्रहणात कवितेवर टीका करू नये. **कवितेतील सौंदर्यदर्शन म्हणजेच रसग्रहण** हे मात्र विसरू नये.

खाली काही कवितांची रसग्रहणे मार्गदर्शनार्थ थोडक्यात लिहून दाखविली आहेत. त्यांचे अवलोकन करा व त्याप्रमाणे स्वतःची रसग्रहणे लिहून पाहा.

**औदुंबर**

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.
चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.
पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे
हिरव्या कुरणांमधुनि चालली काळ्या डोहाकडे.
झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर.

– बालकवी

## रसग्रहण

एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या अवघ्या चार-सहा फटकाऱ्यांसरशी एखादे सुरेख चित्र निर्माण करावे तद्वत अवघ्या आठ ओळींत बालकवींनी एक सुंदर निसर्गचित्र शब्दांच्या कुंचल्याने या कवितेत रेखाटलेले आहे. हे चित्र रंगविताना कवीने विविध रंग वापरलेले आढळतील. निळासावळा झरा, शेतमळ्यांची हिरवी गरदी, पांढरी पायवाट व काळा डोह - मोजक्या रंगांनी शब्दांच्या चौकटीत बसविलेले हे एक साधे व जिवंत चित्र आहे. बालकवींची रंगदृष्टी इथे आपल्या प्रत्ययास येते.

पहिल्या चार ओळींत टेकड्या, गाव, शेतमळे व झरा यांनी व्यापलेले विहंगम दृश्य दिसते.

शेतमळ्यांच्या हिरव्या गर्दीतून वाहणाऱ्या निळ्यासावळ्या झऱ्यावरून जी नजर मागे जाते, ती चार घरांचे चिमुकले गाव ओलांडून पैल टेकडीपर्यंत पोहोचते. केवढा विस्तीर्ण पट कवीने पार्श्वभूमीसाठी घेतलेला आहे! पुढील दोन ओळींत हिरव्या कुरणामधून काळ्या डोहापर्यंत आडवी तिडवी जाणारी पांढरी पायवाट दिसते. शेवटच्या दोन ओळींत त्या काळ्या डोहाच्या लाटांवर गोड काळिमा पसरून जळात पाय टाकून बसलेला औदुंबर दाखविला आहे.

केवळ निसर्गाचे एक सुरम्य चित्र रंगविण्याचा कवींचा हेतू दिसत नाही. पहिल्या चार ओळींतील आनंदी व खेळकर वृत्तीच्या पार्श्वभूमीवर नैराश्याची छटा पसरविणारे, काळ्या डोहाकडे सरळ चाललेल्या पांढऱ्या पायवाटेचे चित्र पाहून वाचकांची वृत्तीही पार बदलते. जगातील सुखदुःखांकडे विरक्त वृत्तीने पाहणाऱ्या स्थितप्रज्ञासारखा हा औदुंबर वाटतो. विरक्त वृत्तीच्या दत्त या देवतेशी औदुंबराचा निकट संबंध असल्यामुळे या वृक्षाची इथे केलेली निवड औचित्यपूर्ण वाटते.

'ऐल तटावर पैल तटावर, अडवीतिडवी, झाकळुनी जळ गोड काळिमा, जळात बसला असला

औदुंबर' या गोड शब्दांत सुंदर अनुप्रास साधला आहे. चिमुकले गाव, निळासावळा झरा, दाट हिरवी गर्दी, गोड काळिमा, आडवीतिडवी पायवाट अशी अर्थवाही व समर्पक विशेषणे वापरून मूळचे चित्र अधिक स्पष्ट केले आहे. औदुंबराला मनुष्य कल्पून इथे 'चेतनगुणोक्ती' हा अलंकार साधला आहे. शब्दमाधुर्य व पदलालित्य यांनी ओथंबलेली ही एक प्रासादिक कविता आहे.

**लक्ष्मी**

हे गच्च दाटलं पीक वावरामधी
फुलवरा असा कणसांना तरतरला नव्हता कधी
हंतरली भुइवर जशी छरळ तसलशी
ओगुनी डुबकण्या धेती खाचरात गाईम्हशी
लागला फुटू जोसात गहू-हरभरा
हा मुबलक दाणागोटा सरणार न वरसाभरा
करवलिचा धरूनी हात भारोसरी
चढलीस घरची माझ्या तू प्रेमानं पायरी
उंबऱ्यावरी तू पाय टाकल्यावर
साजरं गोजरं सारं लागलं दिसाया घर
उतरला जवा विहिरीत तुझा पोहरा
लगि तुडुंब भरलं पाणी, लागतो निमा कासरा ।
शेतात हळदिचा हात खूप लागला
लागलीच त्याला आली सोन्याची पिवळी कळा
मातीत तुझ्या अंगाची टिपं ठिबकली
ही कणसं बघ मोत्यांच्या ओझ्यानं भारावली
तू आल्यापून काइबी न पडलं कमी
संपलं दळिंदर माझं, उतरली घरी लक्ष्मी ।

ग. ल. ठोकळ

## रसग्रहण

कवि ग. ल. ठोकळ यांचे हे साधे व सोज्ज्वळ असे एक जानपद गीत आहे. एका शेतकऱ्याचे मार्गशीर्ष महिन्यात लग्न झाले. त्याची नववधू करवलीचा हात धरून त्याच्या घरी मोठ्या प्रेमाने आली. तेव्हापासून सर्वच गोष्टींत त्याला समृद्धी आढळून आली. तिच्या येण्याने त्याचे घर सुरेख व आकर्षक दिसू लागले. त्याच वर्षी पाऊस भरपूर पडला. विहीर तुडुंब भरली. जनावरांना खायला भरपूर गवत मिळाले. ते पोटभर खाऊन ती पुष्ट होऊन डबक्यात मनसोक्त डुंबून आनंद लुटू लागली. शेतात भरघोस पीक आले. मोत्यांच्या ओझ्याने कणसे भारावली. या साऱ्या गोष्टी आपल्या पत्नीच्या पायगुणामुळे लाभल्या, अशी त्या शेतकऱ्याची भोळी श्रद्धा आहे. या साऱ्या समृद्धीचे श्रेय तो आपल्या पत्नीला देतो. तिच्यामुळे आपले दारिद्र्य पार नाहीसे झाले व पत्नीच्या रूपाने मूर्तिमंत लक्ष्मीने आपल्या संसारात पदार्पण केले, असे त्याला वाटते.

या कवितेत पत्नीबद्दलच्या आदराच्या भावनेचा सुंदर आविष्कार पाहायला मिळतो. या भावना शेतकऱ्याच्या तोंडून ग्रामीण भाषेत वदविल्यामुळे हे एक जानपद (ग्रामीण) नाट्यगीत झाले आहे. घरधनिणीने विहिरीत पोहरा सोडल्यावर पाणी तुडुंब भरून येणे, शेतात हळदीचा हात फिरू लागताच पिकांना सोन्याची कळा येणे, मातीत घामाची टिपे ठिबकताच कणसे मोत्यांच्या ओझ्याने भारावणे, हा सारा चमत्कार काव्यात्मक आहे. 'वावर, जोसात, मारोसरी, जवा, आत्यापुन, काइबी, दळिंदर, लक्षुमी' खेडुतांच्या भाषेतील या शब्दांच्या पेरणीने मूळचा जानपद थाट अधिकच उठून दिसतो. कवितेतील रस शृंगार असला, तरी तो सात्त्विक आहे. कवितेची रचना प्रासादिक आहे.

'साजरं गोजरं सारं लागलं दिसाया घर' या चरणात सहज साधलेला प्रास, 'हळदीचा हात, सोन्याची कळा, मोत्याचे ओझे' यांसारखी सुंदर व अर्थपूर्ण रूपके इथे आढळतात. पत्नीबद्दलची उत्कट भावना चमत्कृतिपूर्ण कल्पनांमुळे विशेष शोभून दिसते. कवितेचा समारोप तर अतिशय हृद्य असा साधला आहे.

तू आल्यापुन काइबी न पडलं कमी
संपलं दळिंदर माझं, उतरली घरी लक्षुमी !

पत्नीला 'लक्षुमी' असे संबोधल्यामुळे पत्नीबद्दलच्या भावनेचा उत्कर्ष शिगेला जाऊन पोहोचला आहे. ही कविता म्हणजे एका साध्याभोळ्या शेतकऱ्याच्या पत्नीविषयक प्रेमाचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

### माहेरची आठवण

चंद्राच्या गालावरी    देव लावी गालबोट
मिरविते आई,    माझ्या गाली तुझे बोट । १
जडली हिरकणी    सोन्याच्या ग कोंदणी
मोला झाला दुणी    आई, तुझी ग करणी । २
सासू-सासऱ्याचं    घर दिरा-नणंदांचं
पृथ्वीच्या मोलाचं ग    लेणं दिलं भ्रताराचं । ३
मायेची माझ्या माय,    जोडिली तू ग जोडी
सुरी सूर लावू,    लाविली तू ग गोडी । ४
सूर-सुरी झालं,    संसाराचं गोड गीत
मायेची माझ्या माय,    तुला लाविली ग रीत । ५
फळा आली भाळी    तीट मायेच्या हाताची
भरलं घर माय,    किलबिल पाखरांची । ६
भरलं घर माय,    अंगण झालं थोडं
दुडदुड धावे    लेकराचं खेळघोडं । ७
राज्यगादीवरी    काढी तुझ्या आठवणी
फळा आली माय    मायेची पाठवणी । ८
उचकी लागे माय    काही केल्यानं राहीना;
काढिशी आठवणी?    सुखी माय, तुझी मैना । ९

- भा. रा. तांबे

## रसग्रहण

कवी भा. रा. तांबे यांनी या कवितेत आईची कृतज्ञतेने आठवण काढणाऱ्या एका सासुरवाशिणीचे भावपूर्ण चित्र रेखाटले आहे. सामान्यतः नुकत्याच सासरी गेलेल्या मुलींना आपल्या माहेरची आठवण वारंवार येत असते. याचे कारण आईवडील व भावंडे यांच्या बालपणापासूनच्या प्रेमळ सहवासाला मुकून एका अपरिचित वातावरणात त्यांना वावरावे लागते. पण या कवितेतील मुलीला माहेरची आठवण येते ती वेगळ्याच कारणांमुळे.

आपल्याला चांगले सासर मिळाले, पतिपत्नींची मने जुळली, संसारवेलीला फुलेही आली, अशा वैभवाच्या वातावरणातही या मुलीला आईची सतत आठवण येते. आपल्या जीवनात हे जे सारे लाभले त्याचे श्रेय आपल्या आईला व तिच्या प्रेमळ शिकवणुकीला आहे अशी तिची श्रद्धा आहे.

आपल्याला साजेसे सासर मिळाले हे ती रूपकात्मक भाषेत कशी सुचवते पाहा.

**जडली हिरकणी । सोन्याच्या ग कोंदणी ।।**

आईच्या चांगल्या शिकवणुकीमुळे या हिरकणीचे मोल दुप्पट झाले आहे, असे सांगून आपल्या यशस्वी जीवनाची प्रसन्न ग्वाही ती देते. माणसांची आवड असलेल्या या मुलीला सासू-सासरा, दीर-नणंदा असलेले घर मिळाले. संसाराचा साथीदार इतका चांगला मिळाला, की त्याचा उल्लेख 'पृथ्वीच्या मोलाचं लेणं' या शब्दांनी ती करते. असे सासर व असा पती लाभला हे स्वतःचे कर्तृत्व न मानता 'हे लेणं तू दिलंस' व 'ही जोडी तू जोडलीस' असे म्हणून ते श्रेय ती आपल्या आईलाच देते. संसारात उभयतांची मने जुळली हे सांगताना ती म्हणते -

**सूर सूरी झालं । संसाराचं गोड गीत ।।**

हेदेखील आईच्या शिकवणुकीचेच फळ आहे, हे 'तुवा लाविली ग रीत' या वाक्याने व्यक्त करते. संसाराची सार्थकता मूल होण्यात असून तेही भाग्य आपल्याला मिळाले हे सांगताना ती म्हणते -

**भरलं घर माय । अंगण झालं थोडं ।**

**दुडूदुडू धावे । लेकराचं खेळघोडं ।।**

सुखी संसाराच्या राज्यगादीवरही ती आईची आठवण काढते. आपली आईदेखील अशीच आपली आठवण काढीत असेल, या कल्पनेने जुन्या भ्रामक समजुतीचा आधार घेऊन ती म्हणते -

**उचकी लागे माय । काही केल्यानं राहीना ।**

'आई, तू मुळी आठवण काढू नकोस. मी इथे सुखात आहे.' हे सांगण्यासाठी ती म्हणते -

**काढिशी आठवणी ? सुखी माय तुझी मैना ।।**

आपल्या आईबद्दल तिला वाटणारा अभिमान कवितेच्या प्रारंभीच एका सुंदर उपमेने ती व्यक्त करते -

**चंद्राच्या गालावरी । देव लावी गालबोट ।**

**मिरविते आई । माझ्या गाली तुझे ओठ ।।**

दृष्ट लागू नये म्हणून देवाने लावलेले गालबोट चंद्र जितक्या अभिमानाने गालावर घेऊन आकाशात मिरवीत असेल, तितक्याच अभिमानाने आईच्या ओठांचा आपल्या गालावरील ठसा मिरविण्यात तिला धन्यता वाटते.

या कवितेची भाषा स्त्रीहृदयाचे नाजूक भाव व्यक्त करणारी असून इथे योजिलेला ओवी हा छंद स्त्रीगीताला अनुकूल असाच आहे. 'सोन्याचं कोंदण, सूर सूरी लावणं, संसाराचं गोड गीत, पाखरांची किलबिल,

राज्यगादी' वगैरे शब्दांतील रूपकात्मक भाषा काव्याची गोडी वाढविते. 'हिरकणी' व 'मैना' हे दोन शब्द आईची ही लेक अतिशय लाडकी असल्याचे सुचवितात. उपमा, रूपक, चेतनगुणोक्ती हे काव्याचे अलंकार, सूचकता, प्रसाद व माधुर्य हे काव्यगुण यांमुळे कवितेच्या भावसौंदर्यात भरच पडली आहे. या साऱ्या कवितेतून आईबद्दलची कृतज्ञतेची व सुखी संसारातील कृतार्थतेची भावना ओळी-ओळींतून ओथंबून राहिलेली आढळून येते. ही कविता वाचून हातावेगळी करताना आपल्याही आईबद्दलचा आदर जागृत होतो व स्त्रीमनातील हळुवार भावनांचे चित्रण कौशल्याने करणाऱ्या कै. तांबे यांच्या काव्यशक्तीबद्दलचा आदर दुणावतो.

✦✦✦

# ३६. वाक्प्रचार व म्हणी

## वाक्प्रचार

**पुढील वाक्ये वाचा.**

(१) घर घेण्याचे निश्चित ठरताच आजच मी रामभाऊंना सुपारी दिली.

(२) गेली चार वर्षे तो एस. एस. सी.ची वारी करीत आहे.

(३) आज घरात साखर औषधालादेखील नाही.

(४) अलीकडे आपली गाठ पडणे हा कपिलाषष्ठीचाच योग.

वरील वाक्यांतील काही शब्द रंगीत शाईमध्ये छापलेले आहेत. त्यांच्या अर्थाकडे जरा सूक्ष्म नजरेने पाहा. त्यांचा शब्दशः जो अर्थ (वाच्यार्थ) आहे, तो आपण या वाक्यात घेत नाही. आपल्या बोलण्याच्या प्रचारात या शब्दसमूहांना एक वेगळाच अर्थ प्राप्त झालेला आहे. कसा तो पाहा.

पहिल्या वाक्यातील रामभाऊंना मी 'सुपारी दिली' याचा अर्थ सुपारी ही वस्तू त्यांना खाण्यासाठी दिली, असा आपण इथे करत नाही, तर रामभाऊंशी मी 'करार केला.' असा करतो. एखादी गोष्ट ठरविताना पुष्कळ घासाघीस होते, चर्चा होते व शेवटी काही निश्चित ठरते हे सुचविण्यासाठी सुपारी देण्याची पद्धत आहे. वाजंत्री, गोंधळी, आचारी यांच्याशी काही ठरून करार झाला याचे प्रतीक (खूण, चिन्ह) म्हणून सुपारी देण्याची प्रथा आहे. यावरून सुपारी देणे = सौदा ठरणे, करार करणे असा अर्थ त्याला प्राप्त झाला.

दुसऱ्या वाक्यात 'वारी करत आहे' असा शब्दप्रयोग आहे. हा शब्दप्रयोग आपण केव्हा करतो? दरवर्षी किंवा प्रत्येक एकादशीला पंढरीस नेमाने जाऊन येणाऱ्या व्यक्तीस आपण 'वारकरी' म्हणतो. वारी करणे = नेमाने जाऊन येणे, फेरी मारणे. पण दरवर्षी परीक्षेस बसून नापास होणाऱ्यास 'वारकरी' असे उपहासाने म्हटले जाते. इथे **वारी करणे = सतत नापास होणे** असा अर्थ घ्यावयास हवा.

तिसऱ्या वाक्यातील 'साखर औषधालादेखील नाही.' याचा अर्थ औषध घेतल्यानंतर त्याचा कडूपणा घालविण्यासाठी खावयाला साखर नाही, असा आपण घेत नाही. औषधासाठी एखादी वस्तू फारच थोडी लागते. तितक्या प्रमाणातदेखील एखादा पदार्थ नसला, तर हा शब्दप्रयोग करतात. एखाद्या गोष्टीचा आत्यंतिक अभाव हा याचा अर्थ.

चौथ्या वाक्यात 'कपिलाषष्ठी'चा योग असा शब्दप्रयोग आहे. ज्योतिषशास्त्राच्या मते कपिलाषष्ठी हा विलक्षण योगायोगाचा दिवस मानला जातो. भाद्रपद महिना, कृष्णपक्षातील षष्ठी ही तिथी, मंगळवार, रोहिणी दिवसनक्षत्र व महानक्षत्र हस्त इतक्या गोष्टी जमून आल्या म्हणजे 'कपिलाषष्ठी' असे म्हणतात. असा योग क्वचित म्हणजे साठ वर्षांनी येतो, असे म्हणतात यावरून 'फारच दुर्मीळ, पुष्कळ काळाने येणारी संधी किंवा अपूर्व घटना' असा अर्थ याला प्राप्त झाला आहे.

यावरून असे आढळून येईल, की भाषेत असे काही शब्द वा शब्दसमूह येतात की त्यांचा शब्दशः अर्थ घेऊन चालत नाही. रूढीने किंवा परंपरेने त्यांना मूळ अर्थापेक्षा वेगळाच अर्थ प्राप्त झालेला असतो व तोच भाषेत रूढ होऊन बसतो. अशा रीतीने **शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला वाक्प्रचार असे म्हणतात. यालाच कोणी वाक्संप्रदाय असेही म्हणतात.**

नमुन्यादाखल काही **वाक्प्रचार** त्यांना प्राप्त झालेल्या अर्थासह पुढे दिले आहेत.

**अकलेचा खंदक** - मूर्ख मनुष्य
**अंग धरणे** - लठ्ठ होणे
**अंग काढून घेणे** - संबंध तोडणे/जबाबदारी टाळणे
**अंगाची लाही होणे** - रागाने बेफाम होणे
**अर्धचंद्र** - गचांडी/हकालपट्टी करणे
**आकाशाला गवसणी घालणे** - शक्तीबाहेरची गोष्ट करून पाहणे
**आकाशपाताळ एक करणे** - नाहक आरडाओरडा करणे
**आकाशाची कुऱ्हाड होणे** - सर्व बाजूंनी संकटे येणे
**आभाळ फाटणे** - सर्व बाजूंनी संकटे येणे
**इतिश्री** - शेवट
**इतिश्री करणे** - शेवट करणे
**उजेड पाडणे** - मोठे काम करणे
**उखळ पांढरे होणे** - पुष्कळ द्रव्य मिळणे
**उंटावरचा शहाणा** - मूर्खपणाचा सल्ला देणारा
**उंबराचे फूल** - क्वचित भेटणारी व्यक्ती
**एरंडाचे गुऱ्हाळ** - कंटाळवाणे भाषण करणे
**ओनामा** - प्रारंभ
**कणीक तिंबणे** - मार देणे
**कळीचा नारद** - भांडणे लावणारा
**काखा वर करणे** - जवळ काही नसणे
**काणाडोळा करणे** - लक्ष न देणे
**कागदी घोडे नाचविणे** - फक्त लेखनात शूरपणा दाखविणे
**काकदृष्टीने पाहणे** - बारकाईने न्याहाळणे
**कानावर पडणे**- सहजपणे ऐकू येणे
**कानउघडणी करणे** - चुकीची कडक शब्दांत जाणीव देणे
**कोंडमारा होणे** - निरुपाय होणे
**खडे फोडणे** - दोष देणे
**खसखस पिकणे** - मोठ्याने हसणे
**खूणगाठ बांधणे** - निश्चय करणे
**गळ्यातला ताईत** - अतिशय प्रिय वस्तू
**गाशा गुंडाळणे** - निघून जाणे
**ग्वाही देणे** - साक्ष देणे
**गुण उधळणे/पाजळणे** - दुर्गुण दाखविणे
**घर डोक्यावर घेणे** - घरात आरडाओरडा करणे
**घागरगडाचा सुभेदार** - पाणक्या
**चतुर्भुज होणे** - कैद होणे, लग्न होणे
**चहा करणे** - स्तुती करणे
**चुरमुरे खात बसणे** - खजील होणे/पदरी न पडणे
**चेहरा काळवंडणे** - मन खिन्न होणे
**चोरावर मोर बसणे** - मात करणे/वरचढ होणे
**छत्तीसचा आकडा** - वैर, विरोध
**जमदग्नी** - अतिशय रागीट मनुष्य
**जोडे फाटणे** - खेटे घालणे/नाहक ये-जा करणे
**जीव टांगणीला लागणे** - चिंताग्रस्त होणे
**जिवाचे रान करणे** - खूप कष्ट करणे
**जखमेवर मीठ चोळणे** - उणिवेवर प्रहार करणे
**जिवाची उलघाल होणे** - खूप भीती वाटणे
**जिवापाड जपणे** - मायेने सांभाळणे
**झाकले माणिक** - साधा पण गुणी मनुष्य
**तळहाताचा फोड** - अतिशय काळजीने केलेली जपणूक
**ताटाखालचे मांजर होणे** - अंकित होऊन राहणे
**तारे तोडणे** - वेड्यासारखे बोलणे
**तोंड टाकणे** - अद्वातद्वा बोलणे/बरळणे
**तोंडात बोट घालणे** - नवल करणे
**तोंडावर येणे** - फार जवळ येणे
**त्राटिका** - कजाग बायको
**त्रेधा उडणे** - फजिती होणे

तिलांजली देणे - त्याग करणे
धंडा फराळ करणे - उपाशी राहणे
थुंकी झेलणे - खुशामतीची सीमा गाठणे
दगडावरची रेघ - खोटे न ठरणारे शब्द
दातओठ खाणे - चरफडणे
दाद देणे - मन व्यक्त करणे/प्रशंसा
जीव मुठीत धरणे - मन घट्ट करणे
दीड शहाणा - मूर्ख
धूळ चारणे - पूर्ण पराभव करणे
धूळभेट - उभ्याउभ्या झालेली भेट
धाबे दणाणणे - खूप भीती वाटणे
न भूतो न भविष्यति होणे - पूर्वी न झालेली व पुढे न होणारी गोष्ट घडणे
नाकी नऊ येणे - बेजार होणे
टक लावून पाहणे - बारीक नजरेने पाहणे
ठणठणपाळ - द्रव्य व विद्या दोन्ही नसलेला
डोके खाजविणे - आठवण्याचा प्रयत्न करणे
डोळे उघडणे - पश्चात्ताप होणे
पड खाणे - माघार घेणे
पदरात घालणे - स्वाधीन करणे
पाणी पडणे - उत्साहभंग होणे
पाणी पाजणे - पराभव करणे
पाया घालणे - प्रारंभ करणे
पारा चढणे - खूप रागावणे
पाणउतारा करणे - अपमान करणे
पायमल्ली करणे - धुडकावणे
पांघरूण घालणे - दोष झाकणे
पांढऱ्यावर काळे करणे - लिहिणे
पालथ्या घागरीवर पाणी - निष्फळ श्रम
पोटास चिमटा घेणे - अर्धपोटी राहणे
पोबारा करणे - पळून जाणे
फडशा पाडणे - संपविणे
ब्रह्मांड आठवणे - भीती वाटणे
बोल लावणे - दोष देणे
बांगडी फुटणे - वैधव्य येणे
बिनभाड्याचे घर - तुरुंग
बोटे मोडणे - व्यर्थ चरफडणे
भागूबाई - भित्रा माणूस
मनात मांडे खाणे - मनोराज्य करणे
माशा मारणे - निरुद्योगी असणे
मुभा असणे - मोकळीक असणे
मुलाहिजा बाळगणे - पर्वा करणे
मेतकूट जमणे - दृढ मैत्री होणे
रसातळाला जाणे - नाश होणे
राम राम ठोकणे - निरोप देणे
राम नसणे - अर्थ नसणे
राम म्हणणे - मरणे
लंकेची पार्वती - अंगावर दागिने नसलेली स्त्री
वर्ज्य करणे - टाळणे
वाकडे पाऊल पडणे - दुर्वर्तन करणे
वाट लावणे - नाश करणे
वाखाणणी करणे - स्तुती करणे
वाऱ्यावर सोडणे - दुर्लक्ष करणे
विडा उचलणे - प्रतिज्ञा करणे
षट्कर्णी होणे - गुप्त गोष्ट तिसऱ्यास सांगणे
शहानिशा करणे - खात्री करणे
शेणसडा होणे - परिस्थिती वाईट होणे/वाया जाणे
सद्गदित होणे - गहिवरणे
सळो की पळो करणे - त्रास देणे
सव्यापसव्य करणे - यातायात करणे
सारवासारव करणे - नीटनेटके करणे/ संपादणे
सूतोवाच करणे - प्रारंभ करणे
सूंबाल्या करणे - पळून जाणे
हरताळ फासणे - नाश पावणे/विफल करणे
हतबल होणे - असमर्थ ठरणे
हळद लावणे - विवाह होणे

हस्तक्षेप करणे - ढवळाढवळ करणे

हात ओला करणे - पैसा किंवा भोजन मिळणे

हायसे वाटणे - सुटकेचे समाधान होणे

हातपाय गाळणे - धीर सोडणे

हात टेकणे - निरुपाय होणे

हातखंडा असणे - कुशलता असणे

हाडाची काडे करणे - खूप श्रमणे/कष्ट करणे

हातचा मळ - सहज घडणारी गोष्ट

हात धरणे - वरचढ ठरणे

हातातोंडाशी गाठ पडणे - जेमतेम खाण्यास मिळणे

हातावर तुरी देणे - फसवून जाणे

हंबरडा फोडणे - ओक्साबोक्शी रडणे/अनावर शोक होणे

## समानार्थी शब्द

अनल - विस्तव, पावक, अग्नी, वन्ही

अमृत - सुधा, पीयूष

अरण्य - रान, कानन, वन, विपिन, जंगल

अश्व - घोडा, हय, तुरंग, वारु, वाजी

अही - साप, सर्प, भुजंग

आई - माता, जननी, माय, माउली

आकाश - गगन, अंबर, नभ, ख, आभाळ

आनंद - हर्ष, मोद, संतोष

आश्चर्य - नवल, अचंबा, विस्मय

कमळ - राजीव, अंबुज, पंकज, सरोज, पद्म

कावळा - काक, वायस, एकाक्ष

काळजी - चिंता, विवंचना, फिकीर

काळोख - अंधार, तिमिर, तम

खल - दुष्ट, नीच, दुर्जन

घर - सदन, भवन, गृह, आलय, निकेतन

चंद्र - इंदु, सुधाकर, हिमांशू, रजनीनाथ, शशी

चांदणे - कौमुदी, ज्योत्स्ना, चंद्रिका

जमीन - भू, भुई, भूमी

झाड - तरू, वृक्ष, पादप, द्रुम

तलाव - तडाग, सरोवर, कासार

तोंड - आनन, मुख, वदन

दिवस - वार, वासर, अहन

दूध - पय, क्षीर, दुग्ध

देऊळ - मंदिर, देवालय, राऊळ

देव - सुर, ईश्वर, अमर, निर्मिक

दैत्य - दानव, राक्षस, असुर

धनुष्य - धनू, चाप, कोदंड, कार्मुक

नदी - सरिता, तटिनी, तरंगिणी

नमस्कार - वंदन, अभिवादन, नमन, प्रणिपात

नवरा - पती, कांत, भर्ता, धव, भ्रतार

पत्नी - भार्या, बायको, कांता, दारा, जाया

पर्वत - नग, अभ्री, शैल, गिरी

पक्षी - खग, विहग, द्विज, अंडज

पाणी - जल, अंबू, पय, उदक, जीवन, सलिल, वारी

पान - पर्ण, पत्र, पल्लव

पाय - पद, पाद, चरण

पृथ्वी - धरणी, अवनी, भूमी, धरती, वसुंधरा, क्षमा

पोपट - राघू, रावा, शुक

फूल - पुष्प, सुमन, कुमुद, सुम

बाग - बगीचा, उद्यान, उपवन

बाप - पिता, वडील, जनक

भाऊ - भ्राता, बंधू, सहोदर

भुंगा - भ्रमर, अली, मिलिंद, मधुप

मित्र - दोस्त, सखा, सोबती

मुलगा - पुत्र, सुत, नंदन, तनुज

मुलगी - सुता, तनया, आत्मजा, नंदिनी

डोके - शिर, मस्तक, माथा

डोळा - नयन, लोचन, चक्षू, नेत्र

डौल - ऐट, दिमाख, रुबाब
ढग - जलद, पयोधर, घन, मेघ, अभ्र
युद्ध - रण, समर, संगर, संग्राम, लढाई
रस्ता - वाट, पथ, पंथ, मार्ग
राजा - भूप, नृप, नरेश, भूपाल, पृथ्वीपती
रात्र - रजनी, यामिनी, निशा
लक्ष्मी - श्री, रमा, कमला, इंदिरा, वैष्णवी
वस्त्र - पट, अंबर, वसन, कपडा
वानर - कपी, मर्कट, शाखामृग
वारा - अनिल, पवन, वायू, समीरण
वीज - चपला, तडित, बिजली, सौदामिनी
शत्रू - अरी, रिपू, वैरी, दुष्मन
समुद्र - सागर, सिंधू, अर्णव, रत्नाकर
सिंह - केसरी, पंचानन, मृगेंद्र, वनराज
स्त्री - ललना, महिला, वनिता, नारी, अबला
सूर्य - मित्र, रवी, आदित्य, सविता, भानू, भास्कर
सोने - कनक, सुवर्ण, हेम, कांचन
हत्ती - गज, कुंजर, सारंग, नाग
हात - कर, हस्त, पाणि, भुज, बाहू
क्षय - क्षीण, नाश, ऱ्हास
ज्ञानी - शहाणा, डोळस, जाणकार,सुज्ञ

## विरुद्धार्थी शब्द

| | | |
|---|---|---|
| अमृत × विष | अनुज × अग्रज | अतिवृष्टी × अनावृष्टी |
| अधोगती × प्रगती | अनाथ × सनाथ | अपेक्षित × अनपेक्षित |
| अब्रू × बेअब्रू | अमावास्या × पौर्णिमा | अवजड × हलके |
| अवघड × सोपे | आघाडी × पिछाडी | आदर × अनादर |
| आदी × अंत | आगंतुक × आमंत्रित | आवक × जावक |
| आशा × निराशा | आस्तिक × नास्तिक | इमानी × बेइमान |
| इलाज × नाइलाज | इष्ट × अनिष्ट | इहलोक × परलोक |
| उंच × ठेंगू/सखल | उत्तीर्ण × अनुत्तीर्ण | उन्नती × अवनती |
| उपकार × अपकार | उष्ण × शीतल/थंड | उचित × अनुचित |
| उच्च × नीच | उत्कर्ष × अपकर्ष | उघड × गुप्त |
| उदय × अस्त | उद्योगी × आळशी | एकमत × दुमत |
| ऐच्छिक × अपरिहार्य | कठोर × मृदू | कर्णमधूर × कर्णकटू |
| काळा × गोरा | किमान × कमाल | कृतज्ञ × कृतघ्न |
| कृत्रिम × नैसर्गिक | कृपा × अवकृपा | कृपण × उदार |
| कृश × स्थूल | खंडन × मंडन | गुण × दोष |
| ग्राह्य × त्याज्य | घाऊक × किरकोळ | चढाई × माघार |
| चल × अचल | जमा × खर्च | जहाल × मवाळ |

| | | |
|---|---|---|
| तारक × मारक | तीक्ष्ण × बोथट | तेजी × मंदी |
| थोरला × धाकटा | दीर्घ × ऱ्हस्व | दुष्ट × सुष्ट |
| देशभक्त × देशद्रोही | निःशस्त्र × सशस्त्र | प्रश्न × उत्तर |
| प्रसरण × आकुंचन | प्राचीन × अर्वाचीन | पुढारी × अनुयायी |
| पुण्य × पाप | पुरोगामी × प्रतिगामी | भरती × ओहोटी |
| माजी × आजी, विद्यमान | माहेर × सासर | राजमार्ग × आडमार्ग |
| लघू × गुरू | वंद्य × निंद्य | विधायक × विध्वंसक |
| विसंवाद × सुसंवाद | वैयक्तिक × सामूहिक | शाप × वर, आशीर्वाद |
| शुद्धपक्ष × वद्यपक्ष | सगुण × निर्गुण | सजातीय × विजातीय |
| समता × विषमता | साम्य × भेद | सावध × बेसावध |
| स्वकीय × परकीय | स्वार्थ × परमार्थ | साधार × निराधार |
| साक्षर × निरक्षर | सुकाळ × दुष्काळ | सुचिन्ह × दुश्चिन्ह |
| सुंदर × कुरूप | सुपीक × नापीक | सुरस × नीरस |
| सुलक्षणी × कुलक्षणी | सुसंगत × विसंगत | सुर × असुर |
| सुज्ञ × अज्ञ | सूर्योदय × सूर्यास्त | सोय × गैरसोय |
| स्तुती × निंदा | स्वतंत्र × परतंत्र | स्वस्त × महाग |
| स्वदेशी × विदेशी | स्वर्ग × नरक | स्वस्ताई × महागाई |
| स्वस्थ × अस्वस्थ | हर्ष × खेद | हानी × लाभ |
| हार × जीत | होकार × नकार | ज्ञात × अज्ञात |
| ज्ञानी × अज्ञानी | | |

## जोडशब्द

शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा म्हणून काही शब्दांची पुनरावृत्ती केली जाते. त्यामुळे बोलणे-लिहिणे डौलदार वाटते. एकाच अर्थाने दोन शब्द जोडून हे तयार होणारे जोडशब्द मराठी भाषेत आगळीच गंमत आणतात. नमुना म्हणून पुढील जोडशब्द पाहा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अक्कलहुशारी | अचकटविचकट | अदलाबदल | अवतीभवती | अक्राळविक्राळ |
| आरडाओरडा | इडापिडा | उपासतापास | उधारउसनवार | ऐषाराम |
| ओबडधोबड | कडीकोयंडा | कज्जेखटले | करारमदार | कायदेकानून |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कामधंदा | केरकचरा | कोडकौतुक | खबरबात | खाचखळगे |
| खेळखंडोबा | गाठभेट | गोडीगुलाबी | गोरागोमटा | गोळाबेरीज |
| गौडबंगाल | चारचौघे | चीजवस्तू | चेष्टामस्करी | जमीनजुमला |
| जाडाभरडा | जीर्णशीर्ण | जीवजंतू | जुनापुराणा | झाडेझुडपे |
| टंगळमंगळ | ठाकठीक | डामडौल | तोळामासा | थांगपत्ता |
| दयामाया | दंगामस्ती | दागदागिने | दाणागोटा | दाणापाणी |
| दिवाबत्ती | धनदौलत | धागादोरा | ध्यानीमनी | नवाकोरा |
| नोकरचाकर | न्यायनिवाडा | पालापाचोळा | पाऊसपाणी | पूजाअर्चा |
| पैसाअडका | पोरेबाळे | बागबगीचा | भांडणतंटा | भांडीकुंडी |
| मनोमनी | मानमरातब | मेवामिठाई | मोडतोड | मोलमजुरी |
| राजेमहाराजे | रीतिरिवाज | लग्नकार्य | लुळापांगळा | वजनमापे |
| व्रतवैकल्य | व्यापारउदीम | शेतीभाती | शेजारीपाजारी | सगेसोयरे |
| सडासारवण | संगतसोबत | सल्लामसलत | साजशृंगार | साफसफाई |
| साधासुधा | स्थिरस्थावर | सोक्षमोक्ष | सोनेनाणे | हवापाणी |
| हीनदीन | होमहवन | | | |

## शब्दसमूहाबद्दल एक शब्द

| | |
|---|---|
| आधी जन्मलेला | - अग्रज |
| मागून जन्मलेला | - अनुज |
| पूर्वी कधी न पाहिले/ऐकले असे | - अपूर्व |
| ज्यास कोणीही शत्रू नाही असा | - अजातशत्रू |
| तिथी, वार न ठरवता आलेला | - अतिथी/आगंतुक |
| थोडक्यात समाधान मानणारा | - अल्पसंतुष्ट |
| अनेक गोष्टींत एकाच वेळी लक्ष देणारा | - अष्टावधानी |
| पायापासून डोक्यापर्यंत | - आपादमस्तक |
| बालांपासून वृद्धांपर्यंत | - आबालवृद्ध |
| देव आहे असे मानणारा | - आस्तिक |
| अगदी पूर्वीपासून राहणारे | - आदिवासी |
| उदयाला येत असलेला | - उदयोन्मुख |
| श्रम न करता खाणारा | - ऐतोबा/ऐतखाऊ |
| लहानग्यांना झोपविण्यासाठीचे गाणे | - अंगाईगीत |

| | |
|---|---|
| राष्ट्राराष्ट्रांतील | - आंतरराष्ट्रीय |
| धान्यादी साठविण्याची बंदिस्त जागा | - गोदाम/कोठार/वखार |
| केलेले उपकार जाणणारा | - कृतज्ञ |
| केलेले उपकार न जाणणारा | - कृतघ्न |
| कर्तव्याकडे पाठ फिरविणारा | - कर्तव्यपराङ्मुख |
| इच्छिलेली वस्तू देणारे झाड | - कल्पवृक्ष |
| इच्छिलेली वस्तू देणारी गाय | - कामधेनू |
| कवितेची रचना करणारी | - कवयित्री |
| आकाशात गमन करणारा | - खग |
| मूर्ती जिथे असते तो देवालयातील भाग | - गाभारा |
| सैन्याची चक्राकार केलेली रचना | - चक्रव्यूह |
| जाणून घेण्याची इच्छा असणारा | - जिज्ञासू |
| चार रस्ते एकत्र येतात ती जागा | - चव्हाटा/चौक |
| जिवाला जीव देणारा | - जिवलग |
| नाणी पाडण्याची जागा | - टाकसाळ |
| शेतकऱ्यांना मिळणारे सरकारी कर्ज | - तगाई |
| किल्ल्याच्या भोवतीची भिंत | - तट |
| हालअपेष्टा सहन करण्याचा गुण | - तितिक्षा |
| तीन रस्ते एकवटतात ती जागा | - तिठा |
| खूप दानधर्म करणारा | - दानशूर |
| दोनदा जन्मलेला | - द्विज |
| दररोज प्रसिद्ध होणारे | - दैनिक |
| अस्वलाचा खेळ करणारा | - दरवेशी |
| तोंडातोंडी चालत आलेली गोष्ट | - दंतकथा |
| तिन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश | - द्वीपकल्प |
| दोन नद्यांमधील जागा | - दुआब/दोआब |
| दैवावर भरवसा ठेवून राहणारा | - दैववादी |
| उंचावरून पडणारा पाणलोट | - धबधबा |
| एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे | - धर्मान्तर |
| देव नाही असे मानणारा | - नास्तिक |

| | |
|---|---|
| कुणाचाही आधार नसलेला | - निराधार |
| घरादारास व देशास पारखा झालेला | - निर्वासित |
| पायाच्या नखापासून शेंडीपर्यंत | - नखशिखान्त |
| नाटकात भूमिका करणारा पुरुष | - नट |
| एकमेकांवर अवलंबून असणारे | - परस्परावलंबी |
| पुरामुळे नुकसान झालेले लोक | - पूरग्रस्त |
| पाहण्यासाठी जमलेले लोक | - प्रेक्षक |
| पंधरवड्याने प्रसिद्ध होणारे | - पाक्षिक |
| मोफत पाणी मिळण्याची सोय | - पाणपोई |
| गावातील एकत्र पाणी भरण्याची जागा | - पाणवठा |
| तिथी, वार, नक्षत्र, योग, करण यांची पुस्तिका | - पंचांग |
| शत्रूला सामील झालेला | - घरभेदी |
| डोंगर पोखरून आरपार केलेला रस्ता | - बोगदा |
| निरपेक्ष कामाबद्दल दिलेले सन्मानाचे धन | - मानधन |
| मोजके असे बोलणारा | - मितभाषी |
| लग्न झालेल्या मुलींच्या आईबापाचे घर | - माहेर |
| दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा | - मनकवडा |
| अचूक गुणकारी असणारे | - रामबाण |
| लिहिण्याची हातोटी | - लेखनशैली |
| भाषण करण्याची जागा | - व्यासपीठ |
| भाषण करण्याची कला | - वक्तृत्व |
| दुपारच्या जेवणानंतरची अल्प झोप | - वामकुक्षी |
| पती मरण पावला आहे अशी स्त्री | - विधवा |
| ज्याची पत्नी मरण पावली आहे असा पुरुष | - विधुर |
| दगडावर केलेले कोरीव काम | - शिल्प |
| दगडावर कोरलेला लेख | - शिलालेख |
| शंकराची उपासना करणारा | - शैव |
| दोन नद्या एकत्र मिळण्याची जागा | - संगम |
| स्वतःशी केलेले भाषण | - स्वगत |
| स्वतःच्याच फायद्याचे पाहणारा | - अप्पलपोटा |
| समाजात समता नांदावी असे म्हणणारा | - साम्यवादी |

| | |
|---|---|
| नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन गीत | - नांदी |
| दुःखामुळे सोडलेला दीर्घ श्वास | - सुस्कारा |
| देशासाठी प्राणार्पण केलेला | - हुतात्मा |
| शत्रूकडील बातमी काढून आणणारा | - हेर/खबऱ्या |
| हृदयाला भिडणारे | - हृदयस्पर्शी |
| जिथे आकाश जमिनीला टेकल्यासारखे दिसते ती जागा | - क्षितिज |

वाक्प्रचारांचे काही नमुने वर दिले आहेत. वाच्यार्थापेक्षा रूढीने त्यांना वेगळाच अर्थ कसा प्राप्त झाला आहे हे जाणून घेणे मनोरंजक ठरते. वाक्संप्रदाय कोशात यामागील संदर्भ किंवा गोष्टी दिलेल्या असतात. विद्यार्थ्यांनी या वाक्प्रचारामागील भूमिका स्वतः कोशातून शोधून समजून घ्यावी.

वाक्प्रचार कशास म्हणतात ते आपण पाहिले. वाक्प्रचार हा एक शब्दसमूह असतो. ते संपूर्ण वाक्य नसते. वाक्याचा तो एक भाग असतो. आपल्या बोलण्यात व लिहिण्यात वाक्प्रचाराखेरीज कधी-कधी छोटी, चटकदार व बोधप्रद अशी वाक्ये वारंवार येतात. वाक्प्रचारापेक्षा त्यांचे स्वरूप वेगळे असते.

## म्हणी

पुढील वाक्ये पाहा.

(१) उथळ पाण्याला खळखळाट फार. (२) गुळाचा गणपती, गुळाचा नैवेद्य.

(३) घर पाहावे बांधून व लग्न पाहावे करून. (४) नावडतीचे मीठ अळणी.

वरील वाक्ये छोटी, लयबद्ध व आटोपशीर अशी आहेत. त्यांना वरवरचा स्वतःचा अर्थ असला, तरी त्यांत कितीतरी खोल अर्थ दडलेला आहे, असे आढळून येते. कसे ते पाहा.

**(१) उथळ पाण्याला खळखळाट फार** - नदी किंवा ओढा यांत पाणी अगदीच कमी असले की त्यातील दगडगोट्यांवरून पाणी वाहताना पाण्याचा खळखळ असा आवाज होतो. याउलट पाणी विपुल असले की हा खळखळाट थांबतो व तेच पाणी संथपणाने वाहताना आढळते. हीच गोष्ट माणसांच्या बाबतीतही खरी आहे. ज्या माणसाजवळ विद्वत्ता बेताचीच असते तो खूप बढाया मारताना आढळतो. पण ज्याला त्याच्या विषयाबद्दलचे सखोल ज्ञान असते तो शांत असतो. उगाच बडबड करीत नाही. हा नेहमी व्यवहारात येणारा अनुभव पाण्याच्या उदाहरणावरून या छोट्या वाक्यात कसा चटकदारपणे मांडला आहे पाहा.

**(२) घर पाहावे बांधून व लग्न पाहावे करून** - घर बांधायला काढण्यापूर्वी आपण खर्चाचा काही अंदाज करतो व त्याप्रमाणे कामाला सुरुवात होते. पुढे अनपेक्षित अशा काही अडचणी निर्माण होतात. अनेक गोष्टी मागाहून सुचत जातात व त्यामुळे खर्च वाढतो. जी गोष्ट घराची तीच लग्नाची. त्यामुळे अंदाजापेक्षा खर्च कितीतरी वाढतो. घर बांधल्याशिवाय किंवा लग्न केल्याशिवाय त्याच्या खर्चाची कल्पना येत नाही. अनुभवाने मनुष्य शहाणा होतो हा विचार इथे मार्मिकपणे मांडला आहे.

**(३) गुळाचा गणपती, गुळाचा नैवेद्य** - गणपती गुळाचा बनविला, त्यातच सारा गूळ संपून गेला. नैवेद्याला गूळ काही शिल्लक राहिला नाही. अशा वेळी त्या तयार केलेल्या गणपतीच्या अंगातलाच थोडा गूळ काढून घेऊन त्याचा नैवेद्य दाखविला व तो गूळ जिथल्या तिथे चिकटवून टाकला. एखाद्याची वस्तू घेऊन त्यालाच अर्पण करण्याचा प्रसंग किती गमतीदार पद्धतीने इथे सांगितला आहे पाहा. गंगेचे पाणी घेऊन गंगेलाच अर्घ्य देण्यातला हा प्रकार.

**(४) नावडतीचे मीठ अळणी** - एखादी व्यक्ती आपल्याला आवडेनाशी झाली की तिची कोणतीच

गोष्ट, कितीही चांगली केली असली, तरी ती पसंत पडत नाही. नावडत्या व्यक्तीने वाढलेले प्रत्यक्ष मीठदेखील अळणी वाटू लागते. मीठ हे कोणीही वाढले, तरी ते खारटच लागायला हवे. नावडत्या व्यक्तीबद्दल वाटणारा तिटकारा केवळ तीन शब्दांत कसा चटकदारपणे सांगितला आहे पाहा.

अशा रीतीने मनुष्याला येणारा अनुभव एखाद्या छोट्या वाक्यात मांडून दाखविलेला असतो. अशी वाक्ये लोकांच्या सतत वापरात असतात. लोकांच्या सतत म्हणण्यात येणारी म्हणून त्यांना 'म्हण' असे म्हणतात. **सर्वांच्या बोलण्यात सतत येणारे चिमुकले, चटकदार, बोधप्रद, व सर्वमान्य वचन म्हणजे म्हण.** अनेकांना येणारा अनुभव एक जण आपल्या शहाणपणाने छोट्या सिद्धान्तस्वरूप सूत्रमय वाक्यात मांडून दाखवितो. सर्वांकडून त्याला मान्यता मिळते व लोकांच्या सतत वापरात त्या राहतात, म्हणून म्हणींना **'तोंडचे वाङ्मय'** किंवा **'अनुभवाच्या खाणी'** असेही म्हणतात.

नमुन्यादाखल काही निवडक म्हणी त्यांतून व्यक्त होणाऱ्या विचारासह खाली दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांचा अवश्य अभ्यास करावा.

- **अति तिथे माती -** कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो.
- **अति शहाणा त्याचा बैल रिकामा -** वाजवीपेक्षा जास्त शहाणपण नुकसानकारक ठरते.
- **अंथरूण पाहून पाय पसरावे -** आपल्या ऐपतीप्रमाणे खर्च ठेवावा.
- **इकडे आड तिकडे विहीर -** दोन्हीकडून सारख्याच अडचणीत सापडणे.
- **उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग -** अतिशय उतावळेपणाने होणारे मूर्खपणाचे वर्तन.
- **उथळ पाण्याला खळखळाट फार -** ज्याच्या अंगी गुण थोडा, तो फार बढाई मारतो.
- **एका हाताने टाळी वाजत नाही -** भांडणाचा दोष एका पक्षाकडेच असत नाही.
- **ऐकावे जनाचे, करावे मनाचे -** सर्वांचा विचार घ्यावा व आपणांस योग्य वाटेल ते करावे.
- **कर नाही त्याला डर नाही -** ज्याने वाईट कृत्य केले नाही, त्याला भीती बाळगण्याचे कारण नाही.
- **करावे तसे भरावे -** जसे बरेवाईट कृत्य करावे तसे त्याचे बरेवाईट परिणाम भोगायला तयार व्हावे.
- **कावळ्याच्या शापाने गाई मरत नसतात -** क्षुद्र माणसाच्या निंदेने थोर माणसाचे काही नुकसान होत नाही.
- **कोल्हा काकडीला राजी -** क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूंना भाळतात.
- **कोळसा उगाळावा तितका काळाच -** वाईट गोष्ट ही शेवटपर्यंत वाईटच असते.
- **खाई त्याला खवखवे -** वाईट कृत्य करणाऱ्याच्या मनात डाचत असते.
- **खाण तशी माती -** आईबापाप्रमाणेच मुले.
- **गर्जेल तो पडेल काय -** बडबड करणाऱ्याच्या हातून काही कार्य होत नाही.
- **गर्वाचे घर खाली -** गर्विष्ठ माणसाला शेवटी अपमानित होण्याची पाळी येते.
- **घरोघर मातीच्या चुली -** सर्वत्र परिस्थिती एकसारखी असते.
- **पडेल तो पडेल -** उत्कर्षासाठी धडपडणाऱ्याला अपयश आले, तर त्यात कमीपणा नाही.
- **चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे -** प्रत्येकाला अधिकार गाजवण्याची संधी आयुष्यात मिळतेच.
- **चोराच्या मनात चांदणे -** वाईट कृत्य करणाऱ्याला ते उघडकीस येईल की काय याची सतत भीती वाटते.
- **ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी -** आपल्या अन्नदात्याशी कृतज्ञतेने वागावे, उपकार घेतले की तावारी.

- **झाकली मूठ सव्वा लाखाची** - आपले गुणावगुण झाकून ठेवावेत, तोंडाने त्यांचा उच्चार करू नये.
- **टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपण येत नाही** - अपरंपार कष्ट केल्यावाचून वैभव प्राप्त होत नाही.
- **तळे राखील तो पाणी चाखील** - आपल्याकडे सोपविलेल्या कामाचा प्रत्येक मनुष्य थोडातरी फायदा करून घेतोच.
- **थेंबेथेंबे तळे साचे** - थोडे-थोडे जमवीत राहिले म्हणजे कालांतराने मोठा संचय होतो.
- **दाम करी काम** - पैशाने सर्व कामे साध्य होतात.
- **दिव्याखाली अंधार** - मोठ्या माणसाच्या ठिकाणी दोष हे असतातच.
- **दुरून डोंगर साजरे** - कोणतीही गोष्ट लांबूनच चांगली दिसते, जवळून तिचे खरे स्वरूप कळून येते.
- **नाचता येईना अंगण वाकडे** - आपल्यातील उणेपणा झाकण्यासाठी दुसऱ्या वस्तूला नावे ठेवणे.
- **नावडतीचे मीठ अळणी** - नावडत्या माणसाने काहीही केले, तरी ते वाईटच लागते.
- **पळसाला पाने तीनच** - कोठेही गेले, तरी मनुष्यस्वभाव सारखाच.
- **पाचा मुखी परमेश्वर** - पुष्कळ लोक जे बोलतात ते खरे.
- **पुढच्यास ठेच मागचा शहाणा** - दुसऱ्याचा अनुभव पाहून मनुष्य शहाणा होतो.
- **पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा** - द्यावयाचे थोडे आणि त्याबद्दल काम मात्र चोपून घ्यावयाचे.
- **बळी तो कान पिळी** - ज्याच्या अंगात सामर्थ्य तो इतरांवर अंमल गाजवतो.
- **बुडत्याचा पाय खोलात** - अवनती होऊ लागली म्हणजे अनेक बाजूंनी होऊ लागते.
- **भित्या पाठी ब्रह्मराक्षस** - भित्र्या माणसावरच संकटे कोसळतात.
- **मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची?** - धोक्याची कामे करायला कोणी पुढे येत नाही.
- **मुलाचे पाय पाळण्यात दिसतात** - मुलगा मोठेपणी कसा निघेल याचा अंदाज लहानपणाच्या कृत्यावरून करता येतो.
- **वासरात लंगडी गाय शहाणी** - अडाणी लोकांत अर्धवट शहाण्यालाही मोठेपण लाभते.
- **शहाण्याला मार शब्दाचा** - शहाण्याला शब्दाने सांगितले की तो उमजतो पण मूर्खाला छडीशिवाय भागत नाही.
- **शितावरून भाताची परीक्षा** - एखाद्या अंशावरून सगळ्या पदार्थाची परीक्षा करता येते.
- **साखरेचे खाणार त्याला देव देणार** - भाग्यवान माणसाला देवही अनुकूल होतो. त्याच्या मनाप्रमाणे गोष्टी घडतात.
- **हजीर तो वजीर** - जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो.

### सारखाच आशय व्यक्त करणाऱ्या मराठी आणि इंग्रजी म्हणी.

निबंधलेखनात किंवा वक्तृत्वात आशय खुलविण्यासाठी म्हणी उपयुक्त ठरतात. त्यांचा तारतम्याने वापर करणे कौशल्याचे असते. त्या दृष्टीने पुढील म्हणी आणि त्यांना पर्यायी इंग्रजी म्हणी पाहा.

(१) नाचता येईना अंगण वाकडे. - A bad workman blames his tools.

(२) बुडत्याला काडीचा आधार. - A drowning man will clutch at a straw.

(३) चकाकते ते सारेच सोने नसते. - All that glitters is not gold.

(४) अंथरूण पाहून पाय पसरावे. - As you made your bed so you must lie in it.

(५) अन्नछत्रात जाऊन मिरपूड मागू नये. - Beggars must not be choosers.
(६) केव्हाच नाही त्यापेक्षा उशीर बरा. - Better late than never.
(७) गरज सरो नि वैद्य मरो. - A fig for the doctor when cured.
(८) वासरात लंगडी गाय शहाणी. - A figure among ciphers.
(९) उथळ पाण्याला खळखळाट फार. - Empty vessels make the most noise.
(१०) चार दिवस सासूचे चार सुनेचे. - Every dog has his days.
(११) दिव्याखाली अंधार. - Every light has its shadow.
(१२) आरोग्य हेच ऐश्वर्य. - Health is wealth.
(१३) लवकर निजे, लवकर उठे; तया ज्ञान, संपत्ती, आरोग्य लाभे. - Early to bed and early to rise makes a man healthy, wealthy and wise.
(१४) ऐकावे जनाचे पण करावे मनाचे. - Listen to people, but obey your conscious.
(१५) दाम करी काम. - Money makes the mare go.
(१६) नवी विटी नवे राज्य. - New lords, new laws.
(१७) गरज ही शोधाची जननी आहे. - Necessity is the mother of invention.
(१८) काट्यावाचून गुलाब नाही. - No rose without a thorn.
(१९) दृष्टीआड सृष्टी. - Out of sight, out of mind.
(२०) पेरावे तसे उगवते. - Reap as you sow.
(२१) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. - The child is father of a man
(२२) चुकणे हा मानवाचा धर्म आहे. - To error is human.
(२३) वरातीमागून घोडे. - Doctor after death.
(२४) एकी हेच बळ. - Union is Strength.
(२५) आपण चिंतितो एक, पण देवाच्या मनात भलतेच. - Man proposes, God disposes.
(२६) बोलण्यापेक्षा मौन श्रेष्ठ. - Speech is silver, silence is Golden
(२७) बळी तो कान पिळी. - Might is right.
(२८) गतं न शोच्यम् ! - It is no use crying over spilt milk.
(२९) घी देखा लेकिन बडगा नहीं देखा. - Honey is sweet, but the bee stings.
(३०) चांगल्या कामाचा प्रारंभ स्वतःच्या घरापासून व्हावा. - Charity begins at home.

या वाक्प्रचारांना व म्हणींना हा वेगळा अर्थ कसा प्राप्त झाला, हे जाणून घेणे मनोरंजक ठरते. वाक्संप्रदायकोशात यांचे काही उगम दिलेले असतात. विद्यार्थ्यांनी या वाक्प्रचारांमागील भूमिका स्वतः कोशातून शोधून समजून घ्यावी. वाक्प्रचार किंवा म्हणी यांच्या अर्थांचा मागोवा घेत त्यांना परंपरेने तसा अर्थ कसा प्राप्त झाला, हे जाणून घेण्यातही केवढा आनंद साठलेला असतो।

वाक्प्रचार व म्हणी यांमुळे भाषा संपन्न होते व त्यांचा अभ्यास केल्यामुळे भाषेतील सौंदर्य समजण्याला मदत होते. कोणतीही कल्पना साध्या, सरळ पद्धतीने न मांडता ती वाक्संप्रदाय किंवा म्हण या स्वरूपात मांडल्यामुळे भाषा किती सुंदर व प्रभावी होते, हे लक्षपूर्वक पाहा व आपल्या लेखनात त्यांचा वापर करीत जा.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

**पुढील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा.**

1) **आर्जवे करणे.** ①②③④
1) विनंती करणे 2) अर्ज पाठविणे
3) बेगमी करणे 4) सामना करणे

2) **चढाओढ असणे** ①②③④
1) चढा व ओढ असणे 2) चुरस असणे
3) चढणे 4) सामना करणे

3) **सूर जुळणे** ①②③④
1) चांगले गाणे म्हणणे 2) खूप गप्पा मारणे
3) विचार पटणे 4) मुद्दाम बोलणे

4) **कहर करणे** ①②③④
1) एखाद्या गोष्टीचा अतिरेक करणे
2) भांडण करणे
3) मारामारी करणे
4) हातोडा मारणे

5) **न्यूनगंड असणे** ①②③④
1) शहाणपणा असणे
2) खूप आदर असणे
3) मनात चांगल्या भावना असणे
4) कमीपणाची भावना असणे

6) **निगा राखणे -** ①②③④
1) काळजी घेणे 2) देखभाल करणे
3) पर्याय १, २ 4) कोणताच नाही

7) **महात्मा गांधीजींच्या आश्रमात खूप लोकांची ये-जा असायची म्हणजेच तेथे लोकांचा ..........** ①②③④
1) श्री गणेशा होता 2) राबता होता
3) सहभाग होता 4) वाटचाल होती

8) **कर्कश आवाज करून आपण शांततेचा ..........** ①②③④
1) विपर्यास करतो 2) भांडवल करतो
3) सुत्र करतो 4) भंग करतो

9) **श्रीमंत रामरावांना गरीब शामराव भेटायला गेले तेव्हा रामराव म्हणाले तुमच्यात नि माझ्यात ............** ①②③④
1) जमीन - अस्मानाचा फरक आहे
2) जीव वेडावून जाणे
3) कहर होणे
4) मन मोहून जाणे

10) **निवृत्तीनंतर समाजकार्यासाठी अप्पांनी घरादारावर ............** ①②③④
1) पाणी सोडले 2) चा त्याग केला
3) तुळशीपत्र ठेवले 4) सर्व

11) **'बावळी मुद्रा देवळी निद्रा'** ①②③④
1) चेहरा वेडा आणि मंदिरात झोपणारा
2) साधा पण व्यवहारात चतुर मनुष्य
3) चेहऱ्याने वेडा माणूस
4) अतिशय झोपाळू मनुष्य

12) **'काप गेले पण भोके राहिली.'** ①②③④
1) भोके कापून राहिली
2) वैभव गेले पण खुणा राहिल्या
3) दैवाने वैभव नेले
4) भोकांमुळे वैभव गेले

13) 'चोराची पावले चोरास ठाऊक' ①②③④

1) वाईट माणसांनाच वाईट माणसाच्या युक्त्या कळणे
2) चोरांनाच चोरांची माहिती नसणे
3) चोरपावलांनी चोरी करणे
4) चोरांसारखे राहणे

14) माकडाच्या हातात ①②③④

1) साखर 2) पोळी
3) कोलीत 4) फळ

15) हलवायाच्या घरावर ...... ①②③④

1) गोड-धोड थाट 2) जिलेबी
3) गूळ 4) तुळशीपत्र

16) 'मोठेपण प्राप्त करण्यासाठी खूप त्रास होतो.' ①②③④

1) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही
2) वासरात लंगडी गाय शहाणी
3) दिव्याखाली अंधार
4) नाव मोठे लक्षण खोटे

17) 'फायद्यासाठी अपमान सहन करण्याची तयारी असणे' ①②③④

1) पालथ्या घड्यावर पाणी
2) आयत्या बिळात नागोबा
3) दुभत्या गाईच्या लाथा गोड
4) कोल्हा काकडीला राजी

18) 'रोग एक आणि उपाय भलताच' ①②③④

1) डोळ्यात कुसळ असते
2) डोळ्यात केर आणि कानात फुंकर
3) एक रोगी बाकी निरोगी
4) वैद्याचे पोर पांगळे

19) आपलेच दात, आपलेच ........ म्हण पूर्ण करा. ①②③④

1) ओठ 2) गाल 3) तोंड 4) हात

20) 'घेता दिवाळी, देता शिमगा' या म्हणीचा अर्थ आहे... ①②③④

1) घेता व देता दुःख होणे
2) घ्यायला आनंद वाटणे, पण द्यायची वेळ आली की दुःख वाटणे
3) दुसऱ्याला वाटत फिरणे
4) दिवाळी व होळी साजरी करणे

▸▸ सराव प्रश्नसंग्रह 36 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 1 | 2) 2 | 3) 3 | 4) 1 | 5) 4 |
| 6) 3 | 7) 2 | 8) 4 | 9) 1 | 10) 4 |
| 11) 2 | 12) 2 | 13) 1 | 14) 3 | 15) 4 |
| 16) 1 | 17) 3 | 18) 2 | 19) 1 | 20) 2 |

# ३७. विरामचिन्हे

## विरामचिन्हांचे महत्त्व

आपले विचार, भावना आपण लिहून व्यक्त करतो. तसेच आपण अन्य व्यक्तींनी व्यक्त केलेल्या भावना, विचार वाचतो. हे वाचन कधी मनातल्या मनात असते, तर कधी कधी आपण हे वाचन प्रकटपणानेही करतो. कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांत अनेकदा संवाद, संभाषणे यांचा समावेश असतो. या व अशा सर्व ठिकाणी आपल्याला विरामचिन्हांचा खूप उपयोग होतो. आपल्या लेखनात वाक्यरचनेचे जसे महत्त्व आहे, तसेच विरामचिन्हांचे महत्त्व आहे.

आपल्या प्रकट वाचनात विरामचिन्हांचे महत्त्व लक्षात घेऊन वाचन करणे, हे एक महत्त्वपूर्ण कौशल्य आहे. **वाचत असताना अर्थ लक्षात घेऊन आपण थांबतो. या थांबण्याला विराम घेणे असे म्हणतात.** हा विराम आपण कधी 'अगदी कमी' वेळ घेतो, तर कधी 'थोडा वेळ' तर कधी 'अधिक वेळ' घेतो. हे दाखविण्यासाठी आपण विरामचिन्हांचा वापर करतो. केव्हातरी प्रश्न विचारणे, आश्चर्य, आनंद व्यक्त करणे यांसाठी आपण विरामचिन्हांचा उपयोग करतो. त्या-त्या वेळी भिन्न-भिन्न चिन्हे आपण वापरतो. अशा विराम चिन्हांचे महत्त्व आपल्या प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी व वाचनाच्या वेळी लक्षात घेणे महत्त्वाचे असते.

**पुढील उतारा वाचा -** आवडले का तुला हे पुस्तक हो जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे जयंत म्हणाला वडील म्हणाले रामायण कुणी लिहिले आहे का तुला ठाऊक रामायणाचा लेखक हा एक अडाणी कोळी होता पुढे तो मोठा ऋषी झाला कोळी होता जयंताने मध्येच विचारले हो वडील पुढे सांगू लागले फार वर्षांपूर्वीची गोष्ट

वाचलात हा उतारा ? यात जयंत व त्याचे वडील यांचा संवाद दिला आहे. हा उतारा वाचताना वडिलांचे भाषण कोणते? जयंताचे कोणते? ते कोठून सुरू होते? ते कोठे संपते? हे काहीच समजत नाही.

मनुष्य बोलत असला म्हणजे त्याच्या आवाजाच्या चढउतारावरून त्याला काय म्हणायचे ते समजते. पण हेच लिहून दाखविले की कोणता उद्गार कोणाचा? त्याचे वाक्य कोठे संपले? दुसऱ्याचे कोठून सुरू झाले? हे समजत नाही. शिवाय बोलणारा प्रश्न विचारतो का उद्गार काढतो? का साधे विधान करतो? हेही समजत नाही. बोलणाऱ्याच्या मनातला आशय केवळ लिहून दाखविल्याने कळत नाही. हा आशय पूर्णपणे कळावा व कोठे किती थांबावे हे समजण्यासाठी काही खुणा किंवा चिन्हे ठरविण्यात आली आहेत. ती चिन्हे वापरली म्हणजे तोच उतारा कसा स्पष्ट होतो पाहा.

''आवडले का तुला हे पुस्तक? ''

''हो! जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे.'' जयंत म्हणाला.

वडील म्हणाले, ''रामायण कुणी लिहिले, आहे का तुला ठाऊक? रामायणाचा लेखक हा एक अडाणी कोळी होता. पुढे तो मोठा ऋषी झाला.''

''कोळी होता?'' जयंताने मध्येच विचारले.

''हो!'' वडील सांगू लागले, ''फार वर्षांपूर्वीची गोष्ट....''

वरील उताऱ्यात दिलेल्या काही चिन्हांमुळे आपण वाचताना कोठे व किती थांबावे, हे समजते व बोलणाऱ्या व्यक्तीच्या मनातले भावही समजतात. त्यामुळे उतारा सहज समजण्यास मदत होते.

विरामचिन्हे आपल्या लेखनात नसती, तर वाक्य कोठे संपले, कोठे सुरू झाले, ते कसे उच्चारावयाचे हेच मुळी समजणार नाही; म्हणून योग्य विरामचिन्हांचा वापर कोठे व केव्हा करावा याची कल्पना आपणांस अवश्य हवी.

**विरामचिन्हे दोन प्रकारची आहेत :- (१) विराम दर्शविणारी (२) अर्थबोध करणारी.**

विरामचिन्हे म्हणजे केवळ तांत्रिक बाब नाही. मजकुरातील आशय, अर्थ, भावना, बोलणाऱ्याचा आविर्भाव हे लक्षात घेऊन लिहिताना व वाचताना त्याचा उपयोग करावा लागतो. प्रसिद्ध साहित्यिक कै. पु. ल. देशपांडे यांनी केलेली 'अभिवाचने' या संदर्भात विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत. 'म्हैस', 'नारायण', 'चितळे मास्तर' ही अभिवाचने उदाहरणादाखल घेता येतील. असा अभ्यास करताना मूळ साहित्यकृती वाचावी, अभ्यासावी, त्यातील विरामचिन्हांच्या जागा लक्षात घ्याव्यात आणि नंतर त्यांच्या ध्वनिचित्रफिती काळजीपूर्वक ऐकाव्यात. मराठी भाषेतील अशा ध्वनिचित्रफिती हा फार मोठा ठेवा आहे. मान्यवर साहित्यिकांची अशी अभिवाचने अभ्यासून, विरामचिन्हांचा अभ्यास करण्यासाठी ती अवश्य ऐकावीत. त्यामुळे **विराम दर्शविणारी व अर्थबोध करणारी** विरामचिन्हे आपणही आपल्या लेखनात परिणामकारक रीतीने वापरू शकू.

लेखनात वारंवार येणारी प्रमुख विरामचिन्हे कोणती व ती केव्हा वापरतात ती तक्त्याच्या स्वरूपात पुढे दिली आहेत. त्यांचा नीट अभ्यास करा.

**विरामचिन्हांचा उपयोग दाखविणारा तक्ता**

| क्र. | चिन्हाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात? | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| (१) | पूर्णविराम | . | (१) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी.<br>(२) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरापुढे. | (१) तो घरी गेला.<br>(२) ता. क. (ताजा कलम)<br>पु. ल. = (पुरुषोत्तम लक्ष्मण) |
| (२) | अर्धविराम | ; | दोन छोटी वाक्ये, उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असताना. | ढग खूप गर्जत होते; पण पाऊस नाही. |
| (३) | स्वल्पविराम | , | (१) एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास.<br>(२) संबोधन दर्शविताना | (१) हुशार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात.<br>(२) मधू, इकडे ये. |
| (४) | अपूर्ण विराम (उपपूर्णविराम) | : | वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास. | पुढील क्रमांकाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले: १, ८, १४, २७, ४० |
| (५) | प्रश्नचिन्ह | ? | प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी | तू केव्हा आलास? |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (६) | उद्गारचिन्ह | ! | उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी. | (१) अरेरे ! तो नापास झाला. (२) शाबास ! छान खेळलास. |
| क्र. | चिन्हाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात? | उदाहरण |
| (७) | अवतरण चिन्ह (दुहेरी) | " " | १) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्याकरता. | तो म्हणाला, "मी येईन." |
| | (एकेरी) | ' ' | १) एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता, तसेच मुख्य गोष्ट सूचित करण्यासाठी. | मूलध्वनींना 'वर्ण' असे म्हणतात. |
| | | | २) दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगताना. | 'व्याकरणाचा अभ्यास महत्त्वाचा' असं त्यांनी सांगितलं. |
| (८) | संयोगचिन्हे | - | १) दोन शब्द जोडताना. | विद्यार्थी-भांडार, प्रेम-विवाह. |
| | | | २) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास | आजचा कार्यक्रम शाळे-पुढील पटांगणावर होईल. |
| (९) | अपसारण चिन्ह | | १) बोलता-बोलता विचारमालिका तुटल्यास. | (१) मी तिथे गेलो, पण – |
| | (स्पष्टीकरण चिन्ह) | – | २) स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास. | (२) तो मुलगा – ज्याने बक्षीस मिळविले – आपल्या शाळेत आहे. |

✦ ✦ ✦

## स्वयंअध्ययन

1) विरामचिन्हे मराठीत कोणत्या भाषेतून आलेली आहेत? ①②③④

1) हिंदी 2) इंग्रजी 3) उर्दू 4) बंगाली

2) पुढील विरामचिन्ह ओळखा.
दुहेरी अवतरण चिन्ह ①②③④

1) : 2) ' '
3) " " 4) !

3) केवलप्रयोगी अव्ययानंतर कोणते विरामचिन्ह वापराल? ①②③④

1) अपूर्णविराम 2) उद्गारचिन्ह
3) कंस 4) विकल्पचिन्ह

4) प्रश्नार्थी वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येते? ①②③④

1) उद्गारचिन्ह 2) विकल्पचिन्ह
3) पूर्णविराम 4) प्रश्नचिन्ह

5) कोणते विरामचिन्ह विसर्ग या (स्वरादी) सारखे आहे? ①②③④

1) अर्धविराम 2) अपूर्णविराम
3) पूर्णविराम 4) स्वल्पविराम

6) 'मो. रा. वाळंबे' या नावामध्ये कोणते विरामचिन्ह वापरले आहे? ①②③④

1) अपूर्णविराम 2) पूर्णविराम
3) स्वल्पविराम 4) अर्धविराम

7) उभयान्वयी अव्यय असणाऱ्या वाक्यात .................. हे विरामचिन्ह येते. ①②③④

1) , 2) ; 3) ? 4) /

8) बोलणाऱ्याच्या तोंडचे वाक्य/शब्द दाखविताना हे विरामचिन्ह वापरावे. ①②③④

1) एकेरी अवतरण चिन्ह 2) प्रश्नचिन्ह
3) उद्गारचिन्ह 4) दुहेरी अवतरण चिन्ह

9) शब्दांचा संक्षेप दाखवताना .................. हे विरामचिन्ह वापरावे. ①②③④

1) अपसारणचिन्ह 2) उद्गारचिन्ह
3) पूर्णविराम 4) विकल्पचिन्ह

10) योग्य विरामचिन्हे वापरलेले वाक्य ओळखा.
वा वा किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू ①②③④

1) वा. वा. किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू !
2) वा! वा! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू.
3) "वा! वा! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू!"
4) वा. वा ! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू ?

11) योग्य विरामचिन्हे वापरलेले वाक्य ओळखा.
व्यक्ति तितक्या प्रकृती अशी म्हण आहे ①②③④

1) 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे.
2) "व्यक्ती तितक्या प्रकृती" अशी म्हण आहे.
3) व्यक्ती तितक्या प्रकृती! अशी म्हण आहे.
4) व्यक्ती, तितक्या प्रकृती अशी म्हण आहे!

12) योग्य विरामचिन्हे वापरलेले वाक्य ओळखा.
सायंकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी भाकरी बनायची ①②③④

1) सायंकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी! भाकरी! बनायची?
2) सायंकाळी जमलेल्या मजुरीतून, भाजी, भाकरी, बनायची!
3) सायंकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी-भाकरी बनायची.
4) सायंकाळी जमलेल्या मजुरीतून 'भाजी-भाकरी' बनायची.

13) चुकीचे विरामचिन्ह ओळखा.
आम्ही घरात येऊ का ! "अरे, या की." ①②③④

1) दुहेरी अवतरण चिन्ह 2) पूर्णविराम
3) उद्गारवाचकचिन्ह 4) स्वल्पविराम

14) चुकीचे विरामचिन्ह ओळखा.

"गावात माळी; साळी, कोष्टी, शिंपी यांसारखे बलुतेदार असत." ①②③④

1) पूर्णविराम 2) स्वल्पविराम

3) अवतरणचिन्ह, अर्धविराम

4) सर्व

15) पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा.

जणू काही तो ओलावा अजूनही टिकून आहे ! ①②③④

1) प्रश्नचिन्ह 2) उद्गारचिन्ह

3) पूर्णविराम 4) स्वल्पविराम

16) पुढील वाक्यात कोणते विरामचिन्ह वापराल ते सांगा.

तो विद्यार्थी जो आपल्या शाळेत होता ①②③④

1) अपसारण चिन्ह 2) स्वल्पविराम

3) पूर्णविराम 4) पर्याय १ व ३

17) पुढीलपैकी विराम दाखविणारे विरामचिन्ह ओळखा. ①②③④

1) पूर्णविराम 2) अर्धविराम

3) स्वल्पविराम 4) सर्व

18) वाक्याच्या शेवटी तपशील द्यायचा असल्यास ........... या चिन्हाचा वापर करू. ①②③④

1) . 2) :- 3) ; 4) !

19) योग्य विरामचिन्हे वापरलेले वाक्य ओळखा.
वडील म्हणाले खरा हुशार तर मीच आहे. ①②③④

1) वडील म्हणाले 'खरा' हुशार तर मीच आहे?

2) "वडील म्हणाले" खरा हुशार तर मीच आहे!

3) वडील म्हणाले, "खरा हुशार तर मीच आहे."

4) वडील म्हणाले, "खरा हुशार तर मीच आहे?"

## ▸▸ सराव प्रश्नसंग्रह 37 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 3 | 3) 2 | 4) 4 | 5) 2 |
| 6) 2 | 7) 2 | 8) 4 | 9) 3 | 10) 3 |
| 11) 1 | 12) 3 | 13) 3 | 14) 3 | 15) 2 |
| 16) 4 | 17) 4 | 18) 2 | 19) 3 | |

# ३८. लेखनविषयक नियमावली

आपले मराठीतील लेखन काही नियमांनी निश्चित केलेले आहेत. वाचणारे, लिहिणारे, ऐकणारे, बोलणारे असे आपण सर्व भाषेचा उपयोग करीत असतो. आपण आपल्या मनातील आशय, विचार, कल्पना, भावना लिहून व्यक्त करतो. त्यात वस्तुनिष्ठ रीतीने समानता असावी, असे सर्वांनाच वाटते. त्यासाठी आपल्या लेखनासाठी काही नियम तयार करण्यात आले. त्यांना **लेखनविषयक नियमावली** असे म्हणतात. 'लेखनविषयक नियमावली' शब्दप्रयोगाऐवजी **शुद्धलेखन** असेही म्हणतात.

शुद्धलेखन किंवा लेखनविषयक नियमावलीचे पालन अत्यंत आवश्यक आहे. व्याकरणाच्या अभ्यासाचा तो एक भाग आहे. अशा प्रकारचे नियम 'महाराष्ट्र साहित्य महामंडळाने' तयार केलेले आहेत. अशा लेखनविषयक नियमांची चर्चा नित्य चालू असते. आपले लेखन बिनचूक व्हावे, यासाठी आपण काळजी घेतली पाहिजे. शुद्ध शब्द, शब्दांचे सामान्यरूप यांबाबतीत आद्य काळजी घेतली पाहिजे. जेव्हा शंका येईल, तेव्हा योग्य संदर्भसाहित्याचा आधार घेतला पाहिजे. लेखनात बिनचूकपणा असायला हवा. हा आपल्या मराठी भाषेच्या अभिमानाचाही विषय असावा. आपली भाषा बोलताना, लिहिताना तिच्यात बिनचूकपणा यावा यासाठी **शुद्धलेखन** या विषयाचा अभ्यास आवश्यक आहे.

**शुद्धलेखन** हा वेगळा असा विषय नाहीच. व्याकरणाचा तो एक भाग आहे. आपण लिहितो त्या शब्दाचे शुद्ध स्वरूप कोणते व अशुद्ध स्वरूप कोणते यांबाबत भाषेत काही नियम ठरविण्यात आले आहेत. ते नियम हाच व्याकरणाचा विषय; व व्याकरणातील नियमांना अनुसरून केलेले निर्दोष लेखन म्हणजेच शुद्धलेखन. शुद्धलेखनविषयक नियमांत भाषेच्या लिहिण्याबाबतचा सर्वांगीण विचार न करता आपण ऱ्हस्व, दीर्घ व अनुस्वार यांचाच प्रामुख्याने विचार करतो. भाषेचे शुद्धलेखनविषयक ठरविलेले नियम कायमचे राहू शकत नाहीत. कालपरत्वे भाषेत बदल होत जातो. भाषा प्रवाही आहे. कालान्तराने भाषेत बदल होत जाणार म्हणजे तिच्या लेखनपद्धतीतही बदल होणे साहजिक आहे. यास अनुसरून पूर्वीच्या लेखनपद्धतीत व आजच्या लेखनपद्धतीत खूपच फरक झालेला आढळेल. पूर्वीच्या पुस्तकांतून छापलेल्या मजकुरात खूपच ठिकाणी अनुस्वार देण्याची पद्धत होती. आता त्यात बदल झाला आहे. आज लेखनविषयक जे सरकारमान्य नियम आहेत ते मराठी साहित्य महामंडळाने पुरस्कृत केलेले नियम आहेत. त्यांनाच 'म. सा. महामंडळाचे नियम' असे म्हटले जाते. तेच नियम थोड्या विस्ताराने सुगम करून व अधिक उदाहरणे देऊन पुढे दिले आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांचा नीट अभ्यास करावा व आपले लेखन जास्तीत जास्त निर्दोष करण्याचा प्रयत्न करावा. या लेखनविषयक नियमांचे चार भाग केले आहेत.

(१) अनुस्वार कोठे द्यावेत?

(२) शब्दाच्या शेवटी येणारे इकार व उकार केव्हा ऱ्हस्व वा दीर्घ लिहावेत?

(३) उपान्त्य अक्षरातील इकार व उकार कसा लिहावा?

(४) इतर नियम.

**हे नियम क्रमाने पुढे दिले आहेत.**

## अनुस्वार

(१) **ज्या अक्षराचा उच्चार नाकातून स्पष्टपणे होतो; त्या अक्षरावर अनुस्वार द्यावा.**
(स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.)
आंबा, तंतू, घंटा, हिंग, सुंठ, गंमत, करंजी, गुलकंद,
गंगा, कुंकू, तंटा, चिंच, उंट, कंकण, निबंध, अलंकार.

(२) **संस्कृतमधून मराठीत जसेच्या तसे आलेल्या (तत्सम) शब्दांतील अनुस्वार पर-सवर्णाने (म्हणजे पुढे येणाऱ्या व्यंजनाच्या वर्गातील पंचमवर्णाने) लिहिण्यास हरकत नाही.**
गंगा-गङ्गा, कुंज-कुञ्ज, घंटा-घण्टा, अंत-अन्त, चंपक-चम्पक,
शंख-शङ्ख, पंचम-पञ्च, चंड-चण्ड, छंद-छन्द, अंबुज-अम्बुज.

(३) य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् **यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल संस्कृतप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा.**
संयम, संरक्षण, संलग्न, संवाद, संशय, संसार, सिंह, अंश, संस्कार, मांस, संस्था, संहार, संयुक्त, कंस इत्यादी.

(४) **नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.**
(एकवचन) - मुलास, घरात, त्याचा, त्यासाठी, देशासाठी.
(अनेकवचन) - मुलांस, घरांत, त्यांचा, त्यांसाठी, देशांसाठी.

(५) **वरील नियमांव्यतिरिक्त शुद्धलेखनाच्या पूर्वीच्या नियमांनुसार जे अनुस्वार आपण देत होतो, ते आता देऊ नयेत.** उदा.
(रूढी म्हणून) - पहांट, कैंस, झोंप, एकदां, लांकूड, धांव, टोंक, नाहीं, कांहीं इत्यादी.
(व्युत्पत्तीमुळे) - नांव, पांच, घांट, गांव, कांटा, कीं, सांवळा, कोंवळा, गहूं इत्यादी.
(व्याकरणिक) - केळें-केळीं, वासरुं, तिनें, घरांत, जेथें, तेव्हां, यामुळें, यासाठीं इत्यादी.
तीं मुलें घरीं गेलीं, मीं कामें केलीं, मी आहे-जातों-गेलों-जाऊं-जातां-जातांना इत्यादी.

वरील कारणांसाठी दिले जाणारे अनुस्वार आता देण्याची आवश्यकता नाही.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे **स्पष्ट उच्चारल्या जाणाऱ्या अनुनासिकांवर व नामे आणि सर्वनामे यांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर येणाऱ्या अनुस्वारांखेरीज आता कोठेही अनुस्वार देण्याची गरज नाही.**

## ऱ्हस्व-दीर्घ

**१. ऱ्हस्व-दीर्घ (अन्त्य अक्षरे)**

(१) **एकाक्षरी शब्दातील इकार किंवा उकार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो दीर्घ लिहावा.**
मी, ही, तू, धू, जू, ऊ, ती, जी, पी, बी, पू, रू इत्यादी.

(२) **मराठी शब्दाच्या शेवटी येणारा इकार किंवा उकार उच्चारानुसार दीर्घ लिहावा.**
आई, वाटी, टोपी, चेंडू, बाळू, खेळू, पिशवी, चुलती,
वही, काठी, पेटी, दांडू, वाळू, बोरू, गिरणी, सुपारी इत्यादी.

(३) **कवि, हरि, गुरू, वायु, प्रीति यासारखे तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द मराठीच्या स्वभावानुरूप दीर्घान्त उच्चारले जातात म्हणून तेही दीर्घान्त लिहावेत.**

गडकरी हे कवी होते. हरी व मधू घरी गेले.

ग्रंथ हेच खरे गुरू होत. प्राण्यांवर प्रीती करावी.

(४) **व्यक्तिनामे, ग्रंथनामे, शीर्षके, व सुटे शब्द (संस्कृतातून मराठीत जसेच्या तसे आलेले) जरी मुळात ऱ्हस्वान्त असले, तरी ते मराठीत दीर्घान्त लिहावेत.**

उदा. - हरी, अन्योक्ती, अतिथी, विभक्ती, संधी, कुलगुरू इत्यादी.

(५) **मात्र सामासिक व साधित शब्दांतील पहिले पद (ऱ्हस्व) इकारान्त किंवा उकारान्त तत्सम शब्द असेल, तर ते ऱ्हस्वान्तच लिहावेत.**

कविराज, लघुकथा, वायुपुत्र, मृत्युलेख, गुरुदक्षिणा, भक्तिपर,

हरिकृपा, शत्रुपक्ष, पशुपक्षी, रविवार, भानुविलास, गतिमान.

(६) **सामासिक व साधित शब्दांतील पहिले पद (दीर्घ) इकारान्त किंवा ऊकारान्त तत्सम शब्द असेल, तर ते दीर्घान्तच लिहावे.**

लक्ष्मीपुत्र, महीपाल, पृथ्वीतल, भूगोल, वधूपरीक्षा, वाणीवैभव,

गौरीहर, दासीजन, वधूवर, श्रीधर, नदीतीर, भगिनीमंडळ.

(७) विद्यार्थिन्, प्राणिन्, पक्षिन् यासारखे इन्-अन्त शब्द मराठीत येताना त्यांच्या शेवटच्या 'न्'चा लोप होतो व उपान्त्य ऱ्हस्व अक्षर दीर्घ होते.

उदा. - विद्यार्थी, प्राणी, पक्षी, मंत्री, गुणी, धनी, योगी, स्वामी.

परंतु हे शब्द समासातील पहिल्या पदाच्या जागी आले, तर ते ऱ्हस्वान्तच ठेवावेत.

उदा. विद्यार्थिगृह, प्राणिसंग्रह, पक्षिगण, मंत्रिमंडळ, स्वामिभक्त, योगिराज.

(८) पुढील तत्सम अव्यये व 'नि', 'आणि' ही दोन मराठी अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावीत.

परंतु, अद्यापि, तथापि, अति, इति, प्रभृति, यद्यपि, यथामति इत्यादी.

('इत्यादी' हा शब्द अव्यय नसल्यामुळे तो दीर्घान्त लिहावा.)

**२. ऱ्हस्व-दीर्घ (उपान्त्य अक्षरे)**

(१) **मराठी शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार दीर्घ असतात.**

खीर, पीठ, फूल, सून, गरीब, कठीण, नाईक, हुरूप, विहीर, दीर, नीट, मूल, ऊस, बहीण, जमीन, ठाऊक, घेऊन, वसूल.

(२) **पण, तत्सम शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार मूळ संस्कृतप्रमाणे ऱ्हस्वच राहतात.**

गुण, युग, विष, प्रिय, मधुर, बहुत, मंदिर, अनिल, परिचित, स्थानिक, बुध, सुख, हिम, शिव, कुसुम, तरुण, रसिक, चतुर, नागरिक, सामाजिक.

(३) **मराठी शब्दांतील अन्त्य अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर उपान्त्य इ-कार वा उ-कार ऱ्हस्व असतो.**

किडा, गुणी, पिसू, मेहुणा, सरिता, वकिली, पाहिजे, मिळवितो, दिवा, सुरी, सुरू, तालुका, गरिबी, महिना, ठेविले, फसविले.

**(४) पण तत्सम शब्दांतील उपान्त्य अक्षरे दीर्घ असतील, तर ती मूळ संस्कृतातल्याप्रमाणे दीर्घ ठेवावीत. वरील नियमाप्रमाणे ती ऱ्हस्व ठेवू नयेत-**

पूजा, भीती, प्रीती, पूर्व, दीप, पीडा, नवीन, संगीत,

लीला, नीती, कीर्ती, चूर्ण, नीच, क्रीडा, शरीर, परीक्षा.

**सामान्यरूप**

(१) इकारान्त व उकारान्त तत्सम शब्दाचे सामान्यरूप करताना अन्त्य स्वर दीर्घ होतो.

कवि - कवीला - कवीसाठी; गुरु - गुरूचा - गुरूपेक्षा

(२) मराठी शब्दाचे उपान्त्य अक्षर (दीर्घ) ई किंवा ऊ-युक्त असेल, तर त्याचे सामान्यरूप करताना ते उपान्त्य अक्षर ऱ्हस्व उच्चारले जाते, म्हणून ते ऱ्हस्वच लिहावे.

सू - सुनेला, चूल - चुलीपुढे, बहीण - बहिणीचा, नागपूर - नागपुरास.

**(३) पण तत्सम शब्दाचे उपान्त्य अक्षर (दीर्घ) ई किंवा ऊ-युक्त असेल, तर त्याचे सामान्यरूप करताना ते दीर्घच लिहावे.**

गीता - गीतेचा - गीतेप्रमाणे, पूर्व - पूर्वेला - पूर्वेकडे, परीक्षा - परीक्षेत - परीक्षेसाठी.

**इतर**

**(१) एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे.**

करणे - करण्यासाठी, पाहणे - पाहण्यास, भावे - भाव्यांचा, फडके - फडक्यांना.

(करणेसाठी, पाहणेस, भावेंचा, फडकेंना अशी रूपे लिहू नयेत.)

**(२) पुढील विशिष्ट शब्द खालीलप्रमाणे लिहावेत.**

नागपूर, एखादा, कोणता, हळूहळू, तसूतसू, मुळूमुळू.

(हे शब्द नागपुर, एकादा, कोणचा, हळुहळू, तसुतसू, मुळुमुळू असे लिहू नयेत.)

**(३) लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्या वेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे.**

उदा. तो म्हणाला, ''मला असं वाटतं, की त्याचं म्हणणं खरं असावं.'' अशी भाषा एरवी लिहू नये. नाटक-कथा-कादंबरी आदी वाङ्मयप्रकारांत संवादाच्या वेळी अशा अनुस्वारयुक्त अकारान्त रूपे लिहिण्यास हरकत नाही. लेखनात बोल भाषा वापरण्याची गरज पडल्यास त्या वेळी बोल भाषेची रूपे वापरावीत.

**(४) पुढील तत्सम शब्द मुळातल्याप्रमाणे व्यंजनान्त (म्हणजे शेवटच्या अक्षराचा पाय मोडून) लिहिण्याची प्रथा होती. असे शब्द आता पुढीलप्रमाणे अकारान्त लिहावेत.**

अर्थात, क्वचित, तस्मात, साक्षात, विद्वान, कदाचित, परिषद, पश्चात, किंचित, विद्युत, सम्राट, श्रीमान, भगवान, संसद.

**(५) परकीय भाषेतील शब्द मराठीत लिहिताना ते त्या भाषेतील उच्चाराप्रमाणे लिहावेत.**

(६) कवितेमध्ये ऱ्हस्व-दीर्घाचे बंधन पाळता येत नसल्यामुळे वृत्तानुसार ऱ्हस्व-दीर्घ लिहावेत.

**(७) राहणे, पाहणे, वाहणे अशी रूपे लिहावीत. रहाणे-राहाणे, पहाणे-पाहणे, वहाणे-वाहाणे अशी रूपे लिहू नयेत. मात्र आज्ञार्थी रूपे लिहिताना 'राहा, पाहा, वाहा' यांबरोबरच 'रहा, पाहा, वहा' ही रूपे लिहिण्यास हरकत नाही.**

**(८) 'ही' हे शब्दयोगी अव्यय दीर्घान्त लिहावे. 'अन्' हा शब्द व्यंजनान्त लिहावा.**

## लेखनातील सामान्य चुका

शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन न केल्यामुळे चुका होतात, ही गोष्ट खरी. शिवाय जे शब्द आपण वापरतो त्या शब्दांच्या लेखनातही अशुद्धता बरीच असते. त्याला विविध कारणे आहेत.

(१) संस्कृत भाषेचे अज्ञान (२) हिंदी भाषेचा परिचय (३) विसर्गाचा घोटाळा (४) वर्णांचा उच्चार करताना होणाऱ्या चुका (५) वर्णांच्या अनुक्रमातील बदल. अशा अनेक कारणांमुळे आपल्या लेखनात चुका होतात. त्या शक्यतो टाळता याव्यात, म्हणून नेहमीच्या प्रचारातील काही शुद्ध शब्द नमुन्यादाखल खाली दिले आहेत. प्रत्येक वाचकाने त्यांचा नीट अभ्यास करावा.

| वर्णांचा चुकीचा क्रम | | वर्णांचा चुकीचा उच्चार | |
|---|---|---|---|
| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
| क्प्लना | कल्पना | अश्या | अशा |
| चमत्त्कार | चमत्कार | उधारण | उदाहरण |
| तप्तर | तत्पर | ज्यास्त | जास्त |
| दत्पर | दप्तर | भुगोल | भूगोल |
| शद्ब | शब्द | सिंव्ह | सिंह |
| शुध्द | शुद्ध | सौंसार | संसार |

**संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळे होणाऱ्या चुका**

| वर्णांचा चुकीचा क्रम | | वर्णांचा चुकीचा उच्चार | |
|---|---|---|---|
| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
| अध्यात्मिक | आध्यात्मिक | परिक्षा | परीक्षा |
| अथिती | अतिथी | पाश्चात्य | पाश्चात्त्य |
| अनुसया | अनसूया | प्रतिक्षा | प्रतीक्षा |
| आशिर्वाद | आशीर्वाद | प्राविण्य | प्रावीण्य |
| उज्वल | उज्ज्वल | मतितार्थ | मथितार्थ |
| उर्मी | ऊर्मी | मंदीर | मंदिर |
| उहापोह | ऊहापोह | महत्व | महत्त्व |
| ऊष्ण | उष्ण | महात्म्य | माहात्म्य |
| कोट्याधीश | कोट्यधीश | रविंद्र | रवींद्र |
| ग्रहपाठ | गृहपाठ | विद्यार्थ | विध्यर्थ |
| तत्व | तत्त्व | सहाय्य | साहाय्य, साह्य |
| नाविन्य | नावीन्य | सहाय्यक | सहायक |
| निर्भत्सना | निर्भर्त्सना | सुशिला | सुशीला |
| नैऋत्य | नैर्ऋत्य | सूज्ञ | सुज्ञ |

| हिंदीच्या परिचयामुळे होणाऱ्या चुका | | विसर्गाच्या घोटाळ्यामुळे होणाऱ्या चुका | |
|---|---|---|---|
| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
| ज्यादा | जादा | अधप्पात | अधःपात |
| तीसरा | तिसरा | अंधःकार | अंधकार |
| दूकान | दुकान | घनःशाम | घनश्याम |
| दूसरा | दुसरा | धिःकार | धिक्कार |
| पहला | पहिला | निस्पृह | निःस्पृह |
| पानी | पाणी | पृथःकरण | पृथक्करण |
| पुलिस | पोलीस | दुख्ख | दुःख |
| मदद | मदत | मनस्थिती | मनःस्थिती |
| सफेद | सफेत | हाहाःकार | हाहाकार |

इष्ट - इष्ठचा घोटाळा

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| अंगुष्ट | अंगुष्ठ | ज्येष्ट | ज्येष्ठ |
| बलिष्ट | बलिष्ठ | वरिष्ट | वरिष्ठ |
| कनिष्ट | कनिष्ठ | विशिष्ठ | विशिष्ट |
| सुष्ठ | सुष्ट | उत्कृष्ठ | उत्कृष्ट |

श-ष-सचा गोंधळ

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| इषारा | इशारा | विषद | विशद |
| दुष्य | दृश्य | विशाद | विषाद |
| लेष | लेश | विषेश | विशेष |
| | | सुश्रुषा | शुश्रूषा |

इतर शब्द

| अशुद्ध | शुद्ध | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| अलिकडे | अलीकडे | औद्योगीकरण | उद्योगीकरण |
| अवश्यक | आवश्यक | खावून | खाऊन |
| आधीन | अधीन | जेऊन | जेवून |
| आंग | अंग | ससाचा | सशाचा |
| ईस्त्री | इस्त्री | दक्षणा | दक्षिणा |
| ईयत्ता | इयत्ता | दुर्वा | दूर्वा |
| उच्य | उच्च | वांग्मय | वाङ्मय |
| ऊग्र | उग्र | विनंति | विनंती |

## अनुलेखन व श्रुतलेखन

**अनुलेखन** - 'दिसामाजि काहीतरी ते लिहावे' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनीही दररोज लिहिण्याचा सराव करावा. निबंध, पत्र, कथा यांसारख्या लेखनप्रकारांत विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते व त्याला स्फुरलेले विचार तो लिहून दाखविण्याचा प्रयत्न करतो. याशिवाय सतत लिहीण्याच्या सरावाने अक्षर चांगले घटते व सुधारते, म्हणून छापलेला उतारा पाहून तो वहीत उतरविणे याला **अनुलेखन** असे म्हणतात. शिक्षक विद्यार्थ्यांना दररोज काही ओळी पुस्तकात पाहून लिहून आणायला सांगतात. त्याचा हेतू तोच असतो. असाच सराव व्हावा म्हणून विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील उतारे निवडून आपल्या वहीत दररोज लिहिण्याचा सराव ठेवावा.

**श्रुतलेखन** - पुस्तकात पाहून उतारा लिहिण्याबरोबरच ऐकलेला मजकूर जशाच्या तसा योग्य विरामचिन्हांसह सुवाच्य अक्षरात बिनचूक लिहून दाखविणे याला **श्रुतलेखन** असे म्हणतात. अनुलेखनात उतारा डोळ्यांसमोर असतो. अक्षरांची वळणे, विरामचिन्हे, परिच्छेदरचना ही नजरेसमोर असल्यामुळे उताऱ्याप्रमाणे सुवाच्य लिहिणे हे काम थोडे सोपे आहे. पण ऐकलेला मजकूर ठरावीक कालावधीत सुवाच्य व शुद्ध लिहिणे हे त्यापेक्षा थोडे अवघड असते. याचाही सराव व्हावा म्हणून शिक्षकांनी वर्गात विद्यार्थ्यांना मधूनमधून श्रुतलेखन द्यावे. यासाठी योग्य प्रकारचे उतारे शिक्षकांनी आपल्या पाठ्यपुस्तकांतून निवडावेत.

विद्यार्थ्यांचे लेखन सुवाच्य, सुंदर, शुद्ध, टपोरे व वळणदार असावे व लेखनात योग्य ठिकाणी विरामचिन्हे असावीत, यासाठी विरामचिन्हे, शुद्धलेखन, अनुलेखन व श्रुतलेखन या सदरांकडे शिक्षक व विद्यार्थी या दोघांनी विशेष लक्ष पुरवावयास हवे.

✦✦✦

## स्वयंअध्ययन

1) लेखनविषयक नियम हे काळानुसार ................ ①②③④
1) कायम तसेच राहतात 2) बदलतात
3) स्थिर असतात 4) माहीत नाही

2) स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल ................ द्यावा. ①②③④
1) शीर्षबिंदू 2) अनुस्वार
3) टिंब 4) सर्व

3) एकाक्षरी शब्द नेहमी ........... लिहावा. ①②③④
1) दीर्घ 2) ऱ्हस्व
3) एकवचनी 4) स्त्रीलिंगी

4) मराठी भाषेत शब्दाच्या शेवटी येणारा इकार किंवा उकार नेहमी ............... लिहावा. ①②③④
1) ऱ्हस्व 2) ऱ्हस्व किंवा दीर्घ
3) यापैकी नाही 4) दीर्घ

5) मराठी शब्दांतील अन्त्य अक्षर दीर्घ स्वरान्त असेल तर उपान्त इ-कार वा उ-कार ................ असतो. ①②③④
1) दीर्घ 2) ऱ्हस्व
3) ऱ्हस्व किंवा दीर्घ 4) यापैकी नाही

6) 'अन्' हा शब्द ............... लिहावा.①②③④
1) व्यंजनान्त 2) दीर्घ
3) ऱ्हस्व 4) स्वरान्त

7) छापलेला उतारा पाहून तो जसाच्या तसा वहीत उतरविणे याला ............... म्हणतात. ①②③④
1) श्रुतलेखन 2) सारांश लेखन
3) अनुलेखन 4) भावार्थ लेखन

8) ऐकलेला मजकूर जसाचा तसा विरामचिन्हांसह सुवाच्य अक्षरात बिनचूक लिहून दाखविणे यालाच ........... म्हणतात. ①②③④
1) सारांश लेखन 2) श्रुतलेखन
3) अनुलेखन 4) भावार्थ लेखन

9) पुढीलपैकी लेखन नियमानुसार शब्द ओळखा. ①②③④
1) सिंह 2) सिंव्ह 3) सिव्हं 4) सिव्ह

10) पुढीलपैकी लेखन नियमानुसार शब्द ओळखा. ①②③④
1) शुषुश्रा 2) शुषूशा 3) सुश्रुषा 4) शुश्रूषा

11) खालील शब्दांमधून लेखन नियमानुसार योग्य पर्याय निवडा. ①②③④
1) परिक्षा 2) मंदीर 3) बलिष्ठ 4) ज्येष्ट

12) खालील शब्दांमधून लेखन नियमानुसार योग्य पर्याय निवडा. ①②③④
1) सुज्ञ 2) विशिष्ठ 3) वरिष्ट 4) कनिष्ट

13) खालील शब्दांमधून लेखन नियमानुसार योग्य पर्याय निवडा. ①②③④
1) कप्लना 2) सौंसार 3) शुद्द 4) दप्तर

14) खालील शब्दांमधून लेखन नियमानुसार योग्य पर्याय निवडा. ①②③④
1) उधारण 2) जास्त
3) भुगोल 4) इतीहास

15) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④
1) प्रतिक्षा 2) मथितार्थ
3) महत्त्व 4) उष्ण

16) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④
1) घनश्याम 2) कोट्याधीश
3) उज्ज्वल 4) आशीर्वाद

17) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④
1) पुण्य 2) स्मृतिदिन
3) हीमालय 4) तीर्थस्थान

18) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④

1) सूर्योदय 2) जोडिदार
3) अभिमान 4) प्रतिष्ठा

19) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④

1) पुष्प 2) स्मृती 3) अपुर्व 4) निर्भय

20) खालील शब्दांपैकी लेखन नियमानुसार अयोग्य पर्याय निवडा. ①②③④

1) शीळ 2) म्हणून
3) संस्कार 4) निती

21) पुढील शब्दांचे पर-सवर्ण रूप ओळखा.
गंगा ①②③④

1) गङ्गा 2) गञ्गा
3) गडगा 4) गंङ्गा

22) खालील शब्दांमधून लेखन नियमानुसार योग्य पर्याय निवडा. ①②③④

1) लेष 2) विषाद
3) सुश्रुषा 4) खावून

23) खालील शब्दांपैकी अशुद्ध शब्दाचा पर्याय निवडा. ①②③④

1) नैर्ऋत्य 2) विध्यर्थ
3) रवींद्र 4) ग्रहपाठ

▶▶ सराव प्रश्नसंग्रह 38 – उत्तरसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) 2 | 2) 4 | 3) 1 | 4) 4 | 5) 2 |
| 6) 1 | 7) 3 | 8) 2 | 9) 1 | 10) 4 |
| 11) 3 | 12) 1 | 13) 3 | 14) 2 | 15) 1 |
| 16) 2 | 17) 3 | 18) 2 | 19) 3 | 20) 4 |
| 21) 4 | 22) 2 | 23) 4 | | |

# ३९. भाषाविषयक कौशल्ये

व्याकरणाचा अभ्यास करण्याचा उद्देश आपली भाषा आपल्याला प्रभावी रीतीने, बिनचूकपणाने वापरता यावी असा असतो. आपल्याला भाषेचा उपयोग करताना काही कौशल्यांचाही अभ्यास करावा लागतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. अनेकदा मातृभाषा - मराठी ही आपली परिचित भाषा असते, तिचा आपण सारखाच वापर करीत असतो. त्यामुळे तिचे महत्त्व आपल्या लक्षात येत नाही. कोणतीही दुसरी भाषा शिकण्यासाठी आपण आपल्या मातृभाषेचा चांगला अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी भाषविषयक कौशल्ये कोणती, त्या कौशल्यांचे महत्त्व काय आहे, त्यावर आपल्याला प्रभुत्व कसे मिळविता येईल याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

भाषेच्या अभ्यासात भाषा लिहिता येणे, निबंध, पत्र इत्यादी लिहिता येणे, त्यांतील आशयाचा विचार करणे, तो आशय सुंदर रीतीने लिहिणे, तो बिनचूकपणे लिहिणे अशी अपेक्षा असते. ही लेखनाची कौशल्ये आत्मसात करण्यापूर्वी अन्य भाषाकौशल्येही आपल्याला आत्मसात करावी लागतात, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आपण भाषा कशी शिकतो? स्थूलमानाने विचार केला, तर काही बाबी डोळ्यांसमोर येतात. आपल्या कानावर अनेक शब्द, ध्वनी पडतात. आपले आई, बाबा, घरातील माणसे लहान बाळाशी बोलताना छोटे-छोटे शब्द, छोटी-छोटी वाक्ये वापरतात. आपण ते शब्द, ती वाक्ये काळजीपूर्वक 'ऐकतो.' त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्या शब्दांना, वाक्यांना आपण प्रतिसाद देतो, अनुकरण करून त्या शब्दांचा आपण तसाच उच्चार करू लागतो. आई, वडील, घरातील माणसे अनेक वस्तूंबद्दल, क्रियांबद्दल बोलतात. त्याबद्दलचे शब्द 'ऐकून' आपण आत्मसात करतो. 'ऐकलेल्या' शब्दांचे अनुकरण करून आपण 'बोलू लागतो' ही 'बोलण्याची क्रिया' आणि 'ऐकण्याची क्रिया' बरोबरच चालू असते. आपण 'ऐकताना' फक्त 'कानांनी' ऐकत नाही, तर बोलणाऱ्याचे डोळे, त्याच्या चेहऱ्यावरचे भाव, हातवारे यांकडेही आपले लक्ष असते. शब्दांचे उच्चार, त्यातील आवाजाचे चढउतार, अक्षरे, शब्द यांवर भर देण्याची पद्धती याकडेही आपण 'लक्ष देतो.' 'ऐकणे' आणि 'बोलणे' अशा बरोबर चालणाऱ्या क्रिया आहेत. पण त्याचबरोबर त्या शब्दांच्या उच्चारावरून आपल्याला वस्तू समजू लागतात, क्रिया समजू लागतात. त्या क्रियाही आपण करू लागतो. त्याच वेळी आपल्या मनात अनेक अनुकूल, प्रतिकूल भाव उमटतात. आपण विचारही करू लागतो म्हणजे भाषेचा आपल्या मनावर होणारा संस्कार असा भावना, विचार, संवेदना, कल्पना इत्यादी बहुविध प्रकारचा असतो. लेखनाच्या दिशेने विकास करताना आपण अक्षरांची ओळख प्रथम डोळ्यांनी करतो. अक्षरांची वळणे, घाट आपण डोळ्यांनी पाहतो. अक्षरांचे अर्थपूर्ण समूह म्हणजे आद्य शब्द पाहतो. आपल्या अनुभवांप्रमाणे, गरजांप्रमाणे शब्द आपल्याला ओळखीचे वाटू लागतात. ते शब्द वाचत असताना आपण 'लिहू' लागतो. लिहिण्यासाठी ऐकणे, बोलणे, पाहणे, निरीक्षण करणे या क्रियांवर खरेतर आपले प्रभुत्व येणे आवश्यक आहे. लिहिण्याची प्रत्यक्ष क्रिया करण्यासाठी डोळ्यांचा योग्य विकास, हाताची बोटे, हाताचे स्नायू, बोटांचे स्नायू, बोटांची पकड इत्यादी शारीरिक विकासाची पूर्वतयारीही व्हावी लागते. नंतरच लेखनाची पूर्वतयारी होते, ही पायरी म्हणजे 'लेखन शिकण्याची पायरी' किंवा 'अक्षरे लिहिण्याचा टप्पा' होय. 'लेखन ही एक काळजीपूर्वक आत्मसात' करण्याची बाब असते.

वरील गोष्टींवरून आपल्याला महत्त्वपूर्ण अशा **भाषाकौशल्यांची** ओळख होऊ शकेल. ती कौशल्ये म्हणजे **(१) श्रवण (२) संभाषण-भाषण (३) वाचन व (४) लेखन** होत. हा कौशल्यांचा क्रम आहे. त्याच बरोबर ही कौशल्ये आत्मसात करण्याचा सहेतुक प्रयत्न करणेही आवश्यक आहे. हे लक्षात घेऊ या. आपल्या सर्वच विद्यार्थिजीवनात या चारही प्रक्रियांकडे व कौशल्यांकडे काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे.

भाषिक कौशल्यांचा विकास हा भाषेवरील प्रभुत्व संपादनासाठी उपयुक्त ठरतो. हे खरे आहे. भाषेचे महत्वही लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्याला कोणत्याही ज्ञानशाखेकडे जायचे असले, तरी भाषेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या कौशल्यांचा थोडक्यात विचार करू.

## श्रवण कौशल्य

**श्रवण म्हणजे ऐकणे.** चांगले बोलता येण्यासाठी चांगले ऐकता येणे महत्त्वाचे आहे. ऐकताना एकाग्रता आवश्यक आहे. शब्दांचे उच्चार बारकाईने ऐकणे, वाक्य ऐकणे, वाक्यांचे भाग ऐकणे, त्यांचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे असते. ऐकताना आपल्या कानांबरोबरच डोळेही काम करतात हे लक्षात घ्यावे. डोळ्यांनी ओठांच्या हालचाली, चेहऱ्यावरचे भाव, हातवारे इत्यादी गोष्टी टिपल्या जातात. श्रवण-कौशल्याचा विकास साधण्यासाठी विद्यार्थिजीवनाच्या विविध टप्प्यांवर विविध माध्यमांचा व साधनांचा उपयोग करणेही आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या कानावर स्वच्छ, स्पष्ट व बिनचूक उच्चार पडणे, त्यांचा अर्थ लक्षात येईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाचा उपयोगही करायला हवा. भाषणे, संभाषणे ऐकण्यासाठी ध्वनिचित्रफिती, चित्रफिती यांचा उपयोग करणेही शक्य आहे.

मुलांमध्ये 'श्रवणदोष' नाही ना, याकडे योग्य वयात लक्ष देणे महत्वाचे. कानावर पडणे म्हणजे ऐकणे नव्हे, म्हणून जे ऐकले आहे त्याचा उच्चार करून घेणे, ही श्रवणाची चाचणी आहे. अशी चाचणीही आवश्यक आहे.

श्रवणाची सवय विकसित होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक पातळीवरही प्रयत्न आवश्यक असतात. व्यक्तिगत पातळीवर मुलाने ऐकण्यासाठी त्याचे लक्ष वेधणे, शक्यतो स्वच्छ, स्पष्ट उच्चारांची सवय ठेवणे आवश्यक आहे. सामूहिक स्तरावरील प्रयत्न म्हणजे वर्गात, समूहात शांतता ठेवणे, शांत वातावरण आपण स्वतः बिघडवू न देणे, समूहातील सर्वांना ऐकण्याची संधी मिळेल याची काळजी घेणे आवश्यक आहे.

'ऐकणे' ही महत्त्वपूर्ण सवय आहे. मुलांमध्ये त्यासाठी मनाची एकाग्रता, स्थिरता विकसित होईल; यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे.

## भाषण-संभाषण कौशल्य

भाषाविषयक कौशल्यांमध्ये 'बोलणे' हे संवादातील महत्त्वपूर्ण कौशल्य आहे. 'ऐकणे' या कौशल्याचा व 'बोलणे' या कौशल्याचा निकट संबंध आहे हे आपण पाहिले आहेच.

'संभाषण' म्हणजे परस्परांशी बोलणे. एका वेळी दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांशी बोलत असतात. हे बोलणे अनौपचारिक असू शकते, तर कधी एखाद्या विषयावर आधारलेले औपचारिकही असू शकते. एखाद्या विषयाची किंवा बाबीची माहिती मिळविणे, चौकशी करणे, परिचय करून घेणे (व्यक्तीचा किंवा संस्थेचा) इत्यादी प्रसंगी सामान्यपणे परस्परांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपण संभाषण करतो संवाद साधतो. हीसुद्धा कौशल्येच आहेत.

अन्य व्यक्तींचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्यावर विचार करणे व त्यावर प्रतिसाद देणे, प्रतिसाद देताना आशय निश्चित करणे यासाठी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण महत्त्वाची ठरते. प्रतिसाद देताना शब्दांची

निवड करणे, वाक्यांची रचना करणे, शब्द व वाक्यांचा योग्य उच्चार करणे या भाषाविषयक कौशल्याच्या बाबी ठरतात. यासाठी भाषेचे योग्य संस्कार बालपणी, किशोरावस्थेत होणे आवश्यक असते.

संभाषणात शिष्टाचारांना महत्त्व असते. अन्य व्यक्तीला महत्त्व देणे, त्यांच्याबद्दल आदरभावना व्यक्त करणे, स्वागत करणे, कृतज्ञता व्यक्त करणे, आभार मानणे, निरोप देणे, इत्यादी बाबींसाठी शब्दांची रचना व मनापासून केलेले त्यांचे उच्चारण यांना खूपच महत्त्व असते. नाहीतर शिष्टाचार म्हणजे एक यांत्रिक निर्जीव क्रिया बनते. अशा शिष्टाचारांची सवय विकसित करणे याला महत्त्व येते.

## संभाषण व भाषण कौशल्य

संभाषण व भाषण कौशल्ये ही 'श्रवण' कौशल्यावर आधारित असतात, हे आपण पाहिले. श्रवण व संभाषण साधण्यासाठी एकाग्रताही आवश्यक आहे. शब्दांचे उच्चार एकाग्रतेने ऐकणे एवढेच पुरेसे नसते, तर बोलणाऱ्याचे विचार, त्याचे म्हणणे, त्याच्या बोलण्याचा हेतू समजून घेणेही श्रवणात अभिप्रेत असते. त्यातून संभाषण कौशल्य विकसित होते. बोलताना अनेकदा आपण ''मला म्हणायचे नव्हते.'' ''माझ्या बोलण्याचा तो हेतू नव्हता.'' इत्यादी वाक्ये उच्चारतो, तेव्हा आपल्या बोलण्यातील किंवा संभाषणातील त्रुटीच आपण मान्य करीत असतो.

संभाषण व भाषण यांतील फरक आपल्याला त्या शब्दांवरूनच कळतो. संभाषण हे दोन (किंवा तीन) माणसांचे आपआपसांतील बोलणे असते. 'भाषण' हे एखाद्या गटासमोर किंवा मोठ्या समूहासमोर आपल्या विचारांचे प्रकटीकरण असते. आपले विचार समूहाला समजावून सांगणे हे भाषणाचे सर्वसाधारण स्वरूप असते. विचारांची निश्चिती, त्यासाठी प्रमुख मुद्दे, त्यांचा क्रम, उपमुद्दे, त्यांचा परस्परसंबंध, यांची तर्कशुद्ध मांडणी करणे आवश्यक असते. आपले मत पटवून देण्यासाठी आधार, प्रमाण, पुरावे यांची आपण मांडणी करतो. आपल्या विचारांबरोबरच अन्य विचारांची दखल आपण घेतो. आपल्याविरोधी असलेले विचार आपण समजून घेतो. तो विरोध तर्काच्या आधारे आपण व्यक्त करतो. आवाजातील चढउतार, शब्दांची निवड, शब्दांचे बिनचूक उच्चार, बोलण्याचा ओघ, आवश्यक तेवढ्याच हालचाली, सर्व समूहाला विश्वासात घेऊन बोलणे ही कौशल्ये आत्मसात करावी लागतात. भाषेची साधना करणाऱ्याला संभाषण व भाषणाची कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहेच.

## वाचन कौशल्य

आपण डोळ्यांनी अक्षरे, शब्द यांचे आकार, घाट पाहायला शिकतो. आपले उच्चार आणि अक्षरे यांचे सहसंबंध मनात पक्के करतो. शब्दांचे अर्थ व कृती यांचे शब्दांशी असलेले नाते आपल्या मनात निश्चित होते. त्यासाठी अनेकदा शब्दांची आद्याक्षरे व विविध वस्तू यांचा संबंध आपण प्रस्थापित करतो. उदा. 'अ' - अननस, 'आ' - आगगाडी, 'इ' - इमारत इत्यादी वाचनाची पहिली पायरी. त्या अक्षरांची ओळख, 'शब्द' म्हणून 'अक्षरसमूहाची ओळख', 'शब्द' व 'शब्दांचा अर्थ' यांचा संबंध प्रस्थापित होणे, जोडाक्षरांची ओळख अशा क्रमाने आपण वाचन शिकत जातो. वाचनाच्या प्राथमिक पायऱ्यांची ओळख झाल्यानंतर लेखन कौशल्याकडे वळणे केव्हाही योग्य.

वाचन ही ज्ञानभांडाराची किल्ली आहे. त्याचप्रमाणे अत्युच्च आनंद देणाऱ्या साहित्य, कला, शास्त्रे यांचे निधान वाचनानेच आपल्याला प्राप्त होते. अशा वाचनाची कौशल्ये पहिली ते चौथी या प्रारंभीच्या कालखंडात प्राप्त होतात. पाचवी ते सातवी या कालखंडात प्रकट वाचनाकडून मूक वाचनाकडे प्रगती होत जाते, तर आठवी ते दहावीमध्ये वाचनकौशल्याची परिपूर्णता गाठली जाते. अशी अपेक्षा असली, तरी अनेकदा विद्यार्थी

आठवीत आला, तरी नीटपणे वाचू शकत नाही अशा बाबी ऐकू येतात, तेव्हा वाचनकौशल्याच्या विकासासाठी प्रयत्न कमी पडतात की काय असे वाटते.

वाचताना प्रकटवाचन व मूकवाचन या दोन्ही कौशल्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. प्रारंभीच्या काळात प्रकटवाचन महत्त्वाचे आहे. अक्षरांच्या क्रमाने वाचन, जोडाक्षरांचे वाचन, अक्षरसमूह लक्षात घेऊन वाचन, अर्थ लक्षात घेऊन वाचन, विरामचिन्हे व परिच्छेदरचना लक्षात घेऊन वाचन, सलग परिच्छेदांचे वाचन अशा क्रमाने ही कौशल्ये विकसित व्हावीत. प्रकटवाचनाच्या कौशल्यांवर प्रभुत्व मिळविणे आवश्यक आहे. त्यातील दोष दूर करून नंतर मूकवाचनाच्या दिशेने वाटचाल होईल.

मूकवाचनात एकाग्रतेने वाचन करणे, वाचन करताना आशय लक्षात घेणे, टिपणे काढणे, वाचलेले लक्षात राहिले की नाही, याची स्वतःच स्वतःची चाचणी घेणे या बाबीही महत्त्वाच्या ठरतात.

वाचनात अक्षरांचे, शब्दांचे निरीक्षण करणे, तो शब्द मनात स्थिर राहणे आवश्यक असते. त्यासाठी एकाग्रतेने, स्थिर मनाने वाचणे, वाचनाबद्दल प्रेम व आस्था निर्माण होणे आवश्यक असते.

सर्वच ज्ञानशाखांशी आपला परिचय वाढत जातो तो वाचनाने. त्यामुळे वाचनाचे महत्त्व लक्षात घ्यावे. गणित विषयातील 'उदाहरण' कसे वाचावे, 'भूमिती' विषयातील 'प्रमेय' कसे वाचावे, एखादा वस्तुनिष्ठ, माहितीपूर्ण विज्ञानाचा पाठ कसा वाचावा, एखाद्या भावपूर्ण गद्य उताऱ्याचे वाचन कसे करावे, विचारप्रवर्तक गद्य उताऱ्याचे वाचन कसे करावे, गेय कवितेचे लयबद्ध वाचन कसे करावे, मुक्तछंदातील कवितेचे वाचन कसे करावे इत्यादी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सहेतुक, योजनाबद्ध प्रयत्नांचा सातत्यपूर्ण अभ्यास आवश्यक आहे.


वाचनासाठी पुस्तके व वह्या कशा हाताळाव्यात, ग्रंथमैत्री कशी विकसित व्हावी, ग्रंथालय संपर्क कसा वाढवावा, यासाठीही नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत.

वाचनाचा वेग क्रमाने वाढवीत नेणेही आवश्यक आहे.

## लेखन कौशल्य

लेखनकौशल्याला शिखरीभूत कौशल्य असे म्हणता येईल. 'लेखन-कौशल्य' ही भाषिक कौशल्यातील पाचवी पायरी आहे. या पाच पायऱ्या पुढील आकृतीवरून लक्षात येतील.

**भाषाविषयक कौशल्यांच्या पायऱ्या**




'पायरी' या शब्दावरून आपल्याला विकासाचा क्रम सुचवावयाचा आहे. ज्याप्रमाणे एक पायरी चढल्याशिवाय पुढील पायरी आपण चढू शकत नाही, त्याचप्रमाणे एक कौशल्य पूर्ण झाल्याशिवाय दुसरे कौशल्य आत्मसात करता येत नाही किंवा एक कौशल्य हे पुढील कौशल्याचा आधार असतो. आपण भाषाविकास साधत असताना या प्रत्येक पायरीचा विचार त्या-त्या स्तरावर करणे आवश्यक आहे. पाचव्या

पायरीवर आपण असलो, तरी पहिल्या पायरीचे महत्त्व संपत नाही. याप्रमाणे, आपण 'लेखनाच्या' पाचव्या पायरीवर असलो, तरी 'श्रवणाचे' महत्त्व संपत नाही. पाचव्या पायरीवर असताना पहिली ते पाचवी पायरी या पायऱ्यांवरील कौशल्ये बरोबर असतात. वेगळ्या शब्दांत सांगायचे, तर या पाचही पायऱ्यांचे व त्यावरील मुद्द्यांचे महत्त्व भाषासाधनेत अबाधितच आहे.

## लेखनकौशल्याची पूर्वतयारी

बाल्यावस्थेमध्ये भाषा शिकत असताना शब्द, वाक्ये यांचे श्रवण करणे, त्यांचा अर्थ समजून घेणे, त्याप्रमाणे उच्चार करणे, याकडे मूल अत्यंत जिज्ञासेने अगदी नकळत आपले लक्ष केंद्रित करते. वाचनाच्या पायरीवर अक्षरांचे आकार, वळणे, अक्षर व शब्द यांचा परस्परसंबंध समजून घेते. वस्तू व शब्द यांचे साहचर्यसंबंध समजून घेऊन मूल शब्दज्ञानाकडे वाटचाल करीत असते. त्याच वेळी लेखनासाठी आवश्यक अशी शारीरिक व मानसिक विकासाची प्रक्रियाही चालू असते. डोळे, कान, हात, बोटांचे स्नायू, बोटांची पकड यांचा विकास होऊ लागतो. तसेच डोळ्यांनी समजून घेतलेले वस्तूंचे व शब्दांचे आकार, कानांनी समजून घेतलेले त्यांचे उच्चार, विविध वस्तू व क्रिया, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे लिखित आकार (म्हणजे अक्षर, शब्द) यांचे साहचर्यसंबंध मनाने समजून घेणे या प्रक्रियांचे ग्रहण व त्यांचा सराव मुलांना आनंददायक वाटत असतो. त्यांतूनच उत्स्फूर्तपणे व सहजपणे लेखनप्रक्रियेचा प्रारंभ होऊन विकास सुलभ होऊ लागतो.

अनेकदा 'केव्हा एकदा मूल लिहायला शिकते?' असे अनेक पालकांना वाटते. कारण 'शिकणे म्हणजे लिहायला शिकणे' असाच त्यांचा समज असतो. पण वय वर्षे तीन ते चारपर्यंत मुलांवर अशी लेखनाची सक्ती अयोग्य असते. लेखनपूर्व तयारी डोळसपणे, पुरेसा वेळ देऊन होणेही आवश्यक असते. कारण ती केवळ हाताच्या बोटांनी केलेली क्रिया नसते, तर मुलाची समजही त्यासाठी विकसित व्हावी लागते.

## प्राथमिक लिपिज्ञान, अंकज्ञान, अक्षरसौंदर्य

लेखन कौशल्यातील लिपिज्ञानास महत्त्व आहे. उभ्या रेघा, आडव्या रेघा, अर्धवर्तुळ, अक्षरांची वळणे, वळणांचे क्रम, अंकज्ञान, अंकलेखन, यांचे ज्ञान होणे; त्यांचा भरपूर व सहज सराव होणे आवश्यक आहे. आपल्या देवनागरी लिपीचे सौंदर्य लक्षात घेऊन प्राथमिक स्तरावरच अक्षरलेखनाचा सराव करून घेतला पाहिजे. अक्षरसौंदर्य ही मुळातच व्यक्तिमत्त्वाशी निगडित बाब आहे, म्हणून मुलांवर अशा प्राथमिक स्तरावरच अक्षरसौंदर्याचे संस्कार केले पाहिजेत. लेखनकौशल्यामध्ये जोडाक्षरांचे लेखन, बिनचूक लेखन, विरामचिन्हांचे भान ठेवून लेखन, विचार किंवा मुद्दे लक्षात घेऊन केलेले परिच्छेदलेखन या कौशल्यांचा विकास होणे आवश्यक आहे.

## अन्य महत्त्वपूर्ण कौशल्ये

वाचनाचा वेग वाढवीत जाणे जसे महत्त्वाचे, तसेच लेखनाचा वेग वाढवीत जाणेही महत्त्वाचे आहे. सामान्यपणे सहावी, सातवी, आठवी या कालखंडात यासाठी सहेतुक प्रयत्न व्हावेत. तसेच टिपणे काढणे, टिपणांवरून (केवळ संक्षिप्त मुद्द्यांवरून) सविस्तर लेख तयार करणे, एखादा उतारा पाहून बिनचूक लिहिणे, उतारा ऐकून बिनचूक लिहिणे ही कौशल्ये आत्मसात करण्यातून लेखनकौशल्याच्या परिपूर्णतेकडे वाटचाल करता येते.

## अन्य भाषा - परिचय व लेखन

जेव्हा विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक भाषांचे ज्ञान घेण्याची वेळ येते, तेव्हा लेखनकौशल्याकडे सूक्ष्मतेने पाहणे आवश्यक ठरते. उदा. इयत्ता पाचवीपासून मुलांना इंग्रजी व हिंदी या नवीन भाषांचा परिचय होतो (जरी, इयत्ता पहिलीपासून इंग्रजी सुरू झाले असले, तरी) जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात इयत्ता पाचवीपासूनच लेखन सुरू होते. अशा प्रत्येक भाषेची लिपी समजून घेणे, त्यांचा सराव करणे, प्रत्येक लिपी, त्यांचे उच्चार, लेखन त्यातील फरक समजून घेणे, त्याचा सराव करणे आवश्यक ठरते. मराठी व हिंदी यांची जरी देवनागरी हीच समानलिपी असली, तरी त्या भाषांच्या लेखनपद्धती, व्याकरण, लेखनविषयक नियम यांतील फरक समजून लिहिणे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

दुसरी भाषा (किंवा अन्य दुसऱ्या भाषा) शिकताना मातृभाषेचे ज्ञान चांगले असेल, तर ते साहाय्यभूत ठरते हे लक्षात घेऊन भाषाशिक्षणाचे समायोजन करण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा विचार करणे, त्यांच्या भाषाशिक्षणाचे नियोजन करणे आवश्यक ठरते.

## अनुभवग्रहणाचे महत्त्व

मुलाने अनुभवग्रहण करणे हा त्याच्या बालजीवनाचा अविभाज्य असा भाग असतो. अनुभवग्रहण करणे; त्यांचा आपल्या भाषेतून, संभाषणातून, भाषणातून व लेखनातून आविष्कार करणे यांना मुलांच्या भाषाविकासात महत्त्वाचे स्थान आहे. रंग, रूप, आकार, घाट, चव, स्पर्श, गंध, ध्वनी, आवाजाच्या भिन्न छटा, ताल यांनी मन समृद्ध होते. ते अनुभव व्यक्त करण्यासाठी मनाचा आवश्यक विकास, भाषा साधना आणि भाषाविषयक कौशल्यांचा विकास साधण्यासाठी पालक व भाषाशिक्षक यांनी डोळस प्रयत्न केले पाहिजेत.

## वाचनाचे महत्त्व

भाषासौंदर्याचे आकलन व सुंदर भाषेत आपले विश्व लिपिबद्ध करणे हा लेखनकौशल्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. केवळ 'लिहिणे'पासून परिणामकारक लिहिणे, प्रभावी लेखन करणे असा हा प्रवास आहे. त्यासाठी वाचनसंस्कृतीचे संवर्धन होणे गरजेचे आहे. मुलांना त्यांच्या जाणिवेच्या काळात साहित्याचे उत्तमोत्तम नमुने वाचण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यांना हवे ते वाचण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांनी 'काय काय वाचावे व ते कसे वाचावे' याविषयी डोळस मार्गदर्शन उपलब्ध व्हावे.

## लेखनप्रकार परिचय

मुलांनी उत्स्फूर्तपणे विविध लेखनप्रकारात लेखन करणे ही लेखनकौशल्याची एक कसोटी आहे. निसर्गवर्णन करणे, प्रसंगवर्णन करणे, व्यक्तिवर्णन करणे, आपल्या अनुभवांचे कथन करणे, आपण केलेल्या कल्पनांचे कथन करणे, एखाद्या विचार व कल्पनेचा विस्तार करणे, विचारांची साखळी अनुभवणे व ती 'मुद्देसूद विचारप्रधान निबंध' या स्वरूपात व्यक्त करणे इत्यादी प्रकारांनी हे लेखनकौशल्य विकसित करता येईल. यालाच आपण रूढ भाषेत वर्णनात्मक निबंध, कल्पनाप्रधान निबंध, कल्पनाविस्तार, व्यक्तिचित्रण, ललितनिबंध, विचारप्रधान निबंध, प्रवासवर्णन, आत्मवृत्त, मुलाखत अशी निबंधप्रकारांची नावे दिली आहेत. (याशिवाय सारांशलेखन, भाषांतर ही कौशल्येही विकसित होण्याची आवश्यकता आहे.)

## पत्रलेखनाचे महत्त्व

जरी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात दूरध्वनी, ई-मेल यामुळे पारंपरिक पत्रलेखनावर मर्यादा आलेली असली, तरी त्याचे महत्त्व कमी झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळेच अभिनंदनपर पत्र, गौरवपर पत्र, आभारपत्र, एखाद्या समारंभासाठी निमंत्रणाचे पत्र, वस्तूंची मागणी करण्यासाठी पत्र, चौकशी करण्यासाठी पत्र, नोकरीसाठी अर्ज, निमंत्रणपत्रिकेचा नमुना, वृत्तान्तलेखन इत्यादी पत्रांच्या लेखनाची कौशल्ये व्यवहारात उपयुक्त ठरतात. त्यांच्याही सरावासाठी अभ्यास आवश्यक आहे.

✦✦✦

# लेखन विभाग

## १. निबंधलेखन

कुठल्याही स्तरावर भाषा शिकताना, प्रश्नपत्रिका सोडवताना कमी-अधिक लांबीचा निबंध लिहिणे अनिवार्य असते. एखादा विषय कितपत समजला आहे, स्वतःच्या भाषेत त्यावर मुद्देसूद विचार मांडता येत आहेत का, गोंधळून न जाता विषयानुरूप विचार, मते, प्रसंग, भावना यांचे वर्गीकरण करून ते क्रमवार, सुसूत्रपणे उलगडता येत आहेत ना; हेच निबंधातून पाहिले जाते.

स्पर्धा परीक्षांसाठी निबंध लिहिताना अर्थातच निबंधलेखनाची काठिण्यपातळी वाढत जाते; वाढत जायला हवी. शिक्षणामुळे अनुभवाकडे पाहण्याची आपली दृष्टी प्रगल्भ बनत असते, जाणिवा समृद्ध होत असतात, वृत्ती डोळस बनत असतात, विचारांनाही नवी झळाळी मिळत असते. त्यामुळे या सगळ्याचे प्रतिबिंब आपल्या निबंधातूनही उमटायला हवे. त्यामुळेच एकाच विषयावरचा शालेय पातळीवरचा निबंध आणि स्पर्धा परीक्षांमधला निबंध यात जमीन-अस्मानाचा फरक असायलाच हवा. शिवाय, स्पर्धापरीक्षांमधून उत्तीर्ण होऊन पुढे तुम्हाला प्रशासकीय सेवेत रूजू व्हायचे असते. अशावेळी परिस्थितीचे नेमके आकलन, समस्येचे गांभीर्य, त्याबद्दलची मतमतांतरे, उपाययोजना, त्यावरचे स्वतःचे स्पष्ट मत, याविषयीचे चौफेर भान असायला हवे असते. निबंध लेखनातून टप्प्याटप्प्याने, तर्कसंगत मांडणीतून एखाद्या निर्णयापर्यंत का आणि कसे जायचे याचेही भान तुम्हाला यानिमित्ताने यावे, ही अपेक्षा असते.

निबंधलेखनामध्ये आत्माविष्काराला मोठा वाव असतो. विचारांतील तर्कशुद्धता, शब्दांवरची हुकमत, कमी वेळात सुव्यवस्थितपणे मांडलेले विचार, वाचन, बहुश्रुतता अशा अनेक पैलूंचे दर्शन घडविण्याची संधी निबंधातून मिळते. जणू आपले व्यक्तिमत्त्वच निबंधातून प्रकट होते. विचार सुचण्यासाठी अनुभव उत्कटपणे घेण्याची आवश्यकता असते. तीच गोष्ट सूक्ष्म निरीक्षणाची. आपल्या पंचेंद्रियांचा उपयोग जागरूकपणे करायला हवा.

काही अनुभव आपण प्रत्यक्ष घेतो, तर काही वाचनातून मिळवता येतील. विविध प्रकारच्या वाचनातून आपल्याला विचारांचा, कल्पनांचा खजिनाच हाती लागतो. त्याचा निबंधलेखनासाठी कसा उपयोग करता येईल, याचा थोडा विचार करूया. कोणत्याही प्रकारच्या निबंधाचे मुख्यतः दोन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे त्या निबंधाचे मुद्दे किंवा त्याचा आशय आणि दुसरा भाग म्हणजे त्या आशयाची मांडणी म्हणजेच निबंधशैली. निबंधाचा आशय आणि शैली या दोन्ही दृष्टीने जो निबंध उंची गाठू शकतो, तो उत्तम ठरतो. मुद्दे चांगले आहेत; पण मांडणी ढिसाळ, अनाकर्षक असेल, तर निबंध सकस पण बेचव, कंटाळवाणा होईल आणि नुसताच भाषेने, अलंकारांनी सजवलेला पण ठोस आशय नसलेला निबंध खमंग, पण निःसत्त्व ठरेल.

जेव्हा आपण निबंधाचा विषय वाचतो, तेव्हा त्या विषयाशी संबंधित अनेक विचार, कल्पना, अनुभव, आठवणी, प्रसंग आपल्या मनात गोळा होतात. या सगळ्यातून निबंधासाठी कोणते मुद्दे महत्त्वाचे आहेत व कोणते गाळले तरी चालतील, हे निबंधाची शब्दमर्यादा लक्षात घेऊन ठरवायला हवे; कारण निबंधासाठी असलेली शब्दमर्यादा पाळणे आवश्यक असते. त्यामुळे कोणत्या मुद्द्याचा सविस्तर विचार करायचा व कोणते थोडक्यात मांडायचे, ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करायला हवीत. अर्थात, त्यासाठी सराव महत्त्वाचा. निबंध लिहिताना निवडलेल्या मुद्द्यांचा क्रम

डोळ्यांपुढे आणून एकातून एक विचार, कल्पना उलगडत जातील, या पद्धतीने या मुद्द्यांची संगती लावायला हवी. निबंध वाचताना त्यातील सलगता जाणवायला हवी. म्हणूनच या पुस्तकात दिलेल्या निबंधांचे मुद्दे सुरुवातीलाच दिले आहेत. त्यामुळे निबंधाचा विषय, त्याचे नेमके मुद्दे कसे असावेत आणि त्यावरून निबंधलेखन कसे करावे, निबंधविषय वाचून सुरुवातीला सुचलेल्या कल्पना; विचार निबंधात मुद्द्यांना अनुसरून कसे मांडावेत याचा तुम्हाला अभ्यास करता येईल. मात्र, परीक्षेतील निबंधलेखनामध्ये तुम्ही असे मुद्दे लिहिणे अपेक्षित नाही.

निबंधाचा दुसरा भाग म्हणजे निबंधाची मांडणी, शैली! आपले विचार, भावना, समर्पक व मोजक्या शब्दांत व्यक्त करता यायला हव्यात. उचित अशी शब्दरचना व वाक्यरचना जमण्यासाठी विशेषणे, क्रियाविशेषणे, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते, सुविचार यांचे भांडार आपल्याजवळ भरलेले हवे. अवांतर वाचन केलेले असले की, आपल्या निबंधातील आशय ची समृद्धी तर वाढतेच; पण वेगवेगळे लेखक कसे शब्द वापरतात, कशी मांडणी करतात, याच्या परिचयातून आपली स्वतःची शैली विकसित होत जाते. आवश्यक असे शब्द सहजपणे कागदावर उमटू लागतात. यासाठी वाचनाची साधना हवीच! अवांतर वाचनामध्येही सातत्य व विविधता असायला हवी. दैनंदिन वृत्तपत्रांमधील बातम्यांबरोबरच माहितीपूर्ण, वैचारिक लेख, पुस्तकांमधील चरित्रे, प्रवासवर्णने, ललित निबंध, इतिहास, वैचारिक साहित्य असे विविध प्रकारचे साहित्य वाचायला हवे.

समस्याप्रधान निबंध लिहायचे असतील तर, आपल्या देशाच्या, समाजाच्या स्थितीचा अभ्यास वृत्तपत्र वाचनातून व्हायला हवा. त्याचबरोबर जे वाचले त्याची नोंद करून ठेवायला हवी. निबंधाच्या विषयाशी संबंधित नुकत्याच घडलेल्या घटनांचे संदर्भ देता यायला हवेत. आपले विचार, आपल्याला सुचलेल्या कल्पना टिपून ठेवायला हव्यात. वाचलेली सुभाषिते, काव्यपंक्ती यांचा वापर योग्य प्रमाणात करायला हवा. अन्यथा विषयाला कृत्रिमता येते. विषयाच्या संदर्भात सर्वसामान्य विचारांबरोबरच आपला खास वेगळा ठसा उमटवणारा मजकूर त्यात आला, तर असा निबंध खूप परिणामकारक ठरू शकतो.

निबंधाच्या मांडणीशी संबंधित अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे निबंधाची आकर्षक, योग्य सुरुवात आणि सकारात्मक समारोप! एखाद्या प्रसंगातून नुकत्याच घडलेल्या एखाद्या घटनेचा संदर्भ घेत; निबंध विषयासंबंधात कुतूहल जागे होईल, निबंध वाचायची उत्कंठा निर्माण होईल, अशी निबंधाची सुरुवात असावी. पण 'नमनालाच घडाभर तेल' अशी अवस्था होत नाही ना, याबद्दल जागरूक असावे. सुरुवातीची चांगली कल्पना किती तपशीलवार मांडायची, ते निबंधाची शब्दमर्यादा लक्षात घेऊन ठरवावे. निबंधाचा शेवट करतानाही आशादायी, समस्या निवारणाच्या दिशेने जाणारा, उपाययोजना सुचवणारा, भविष्याबद्दल मंगल चित्र रंगवणारा असावा. समस्या किती का उग्र असेना, ती निवारण्याचे बळ तुम्हा तरुणाईच्या मनगटात नक्कीच आहे, हे निबंधातून जाणवायला हवे.

या विभागाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्तावना. निबंधलेखनाच्या या दीर्घ प्रस्तावनेबरोबरच प्रत्येक विभागाच्या सुरुवातीला तो निबंध प्रकार कसा लिहावा याचे विवेचन केले आहे. या निबंधलेखनाच्या विभागात वैचारिक/समस्याप्रधान निबंध, आत्मवृत्त, कल्पनाविस्तारात्मक निबंध, चरित्रात्मक निबंध, वर्णनात्मक निबंध व कल्पनाप्रधानात्मक निबंध अशा सहा प्रकारच्या निबंध प्रकारांचा विचार केला आहे. प्रस्तावनेत प्रत्येक निबंध प्रकाराची गुण-वैशिष्ट्ये, तो निबंध कसा लिहायचा, त्याचे तंत्र, काही महत्त्वाच्या बाबी, तो निबंध प्रकार लिहिताना घ्यायची काळजी यावर भाष्य केले आहे. या सर्व विवेचनावरून त्या त्या निबंध प्रकाराचे लेखन कसे करायचे, याची तुम्हाला स्पष्ट कल्पना येईल. स्पर्धापरीक्षांना वैचारिक किंवा समस्याप्रधान, चालू घडामोडींशी निगडित असे विषय तुलनेने जास्त विचारले जातात. त्यामुळे या प्रकारच्या निबंधांचे नमुना निबंध तुलनेने जास्त दिले आहेत. त्या त्या प्रकारानंतर सरावासाठी काही विषय, विषयाला अनुसरून मुद्दे दिले आहेत. मुद्द्यांवरून निबंधलेखनाचा भरपूर सराव करा. शिवाय सरावासाठी अधिक निबंधविषयही दिले आहेत. विषयानुरूप मुद्दे काढायची सवय ठेवा. विषय - मुद्दे - विस्तार अशाप्रकारे लेखनाचा सराव करायला हवा. निबंधाला किती गुण आहेत त्याप्रमाणे वेळेचे नियोजन आणि विस्तार या गोष्टी ठरवाव्यात. मात्र, पुस्तकातल्या निबंधांचे अनुकरण करू नका. प्रत्येक व्यक्तीनुसार, स्वभावानुसार, अभ्यास-चिंतनानुसार निबंध वेगळा होत असतो, म्हणून आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निबंधांतून प्रकट करा व यशस्वी व्हा.

# अ) समस्या प्रधान / वैचारिक निबंध

एखादे गणितातील प्रमेय सोडवावे, अशी तर्कशुद्ध मांडणी वैचारिक निबंधात आवश्यक असते. केवळ 'पानांवर काळे करणे' एवढाच मर्यादित उद्देश न बाळगता दिलेला विषय नीट समजून घेऊन मनात असलेल्या मुद्द्यांची क्रमवार मांडणी येथे आवश्यक असते. ही मांडणी करताना विषयाच्या संदर्भातील सकारात्मक-नकारात्मक बाजू, आनुषंगिक साधक-बाधक विचार होणे आवश्यक ठरते. वैचारिक निबंधात कल्पनाशक्तीला मुक्त वाव नसतो; कारण हे विषय वर्तमान काळातील एखाद्या समस्येविषयीचे तुमचे आकलन किती आहे, याची चाचपणी करण्याकरता असतात. चौफेर वाचन, अचूक निरीक्षण, परिस्थितीचे सम्यक आकलन, विचार प्रभावीपणे मांडण्याची हातोटी हे उत्तम वैचारिक निबंधाचे निकष असतात.

स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी भविष्यात शासकीय व्यवस्थेचा एक भाग बनणार असतात. आपापल्या कार्यक्षेत्रात जाऊन त्यांना प्रत्यक्ष समस्येला तोंड द्यावे लागते, समस्येला भिडावे लागते. सद्यकालीन देशप्रश्नांचा त्यांचा समग्र अभ्यास व्हावा, या हेतूनेच देशातील ज्वलंत प्रश्नांवर आधारित वैचारिक निबंधाचे विषय असतात. वैचारिक निबंधात विद्यार्थ्यांनी त्या विषयाची सविस्तर मांडणी करावी ही अपेक्षा असते. समस्येचे सर्व बाजूंनी आकलन, कारणमीमांसा, समस्या परिहार यासाठी आवश्यक ती विचारांची दिशा या प्रकारच्या निबंधातून विकसित होत असते.

यासाठी कुठलीही घटना किंवा ज्वलंत समस्या वर्तमानपत्रे, मासिके इ. तून जाणून घ्यायची, जागरुकपणे त्याकडे पाहण्याची वृत्ती हवी. त्या त्या वेळी प्रसिद्ध होणारा वर्तमानपत्रातील मजकूर, दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील चर्चा, मतमतांतरे याचे टिपण आपल्यापाशी हवे. म्हणजे त्या समस्येच्या/घटनेच्या कुठल्याही पैलूवरील निबंधविषय असला तरी त्याची यथोचित, सविस्तर मांडणी करता येऊ शकेल. उदाहरणार्थ, दर पाच वर्षांनी येणाऱ्या देशातील वेगवेगळ्या पातळ्यांवरील निवडणुका. ही प्रक्रिया सतत चालूच असते. आपण सजग नागरिक म्हणून या निवडणुकांना सामोरे जातच असतो; पण याचवेळी या घटनेच्या संदर्भात अनेकविध विषयांचा जागरूकपणे विचार करायला हवा. निवडणुकांचे वारे, निवडणुका आणि सत्ता परिवर्तन, निवडणूक आणि प्रसारमाध्यमे, निवडणुकांचे अर्थकारण, निवडणूक आणि 'नोटा'चा अधिकार, निवडणुका आणि आचारसंहिता इ. वैचारिक प्रकारातील उपविषयांचेही मुद्दे आपल्याकडे तयार हवेत. शिवाय मतपेटीचे आत्मवृत्त (आत्मवृत्त), मी मुख्यमंत्री/प्रधानमंत्री झालो तर (कल्पनाप्रधान निबंध) असे विषयही परीक्षेत विचारले जाऊ शकतात, याचे भान हवे.

मात्र वैचारिक निबंध म्हणजे रूक्षता, कोरडेपणा, 'आम्हा काय त्याचे' अशी तटस्थ वृत्ती नव्हे. विचारातही सौंदर्य असते. ते खुलवता यायला हवे. त्यासाठी अभ्यास हवा, चिंतन हवे. अर्थवाही शब्दयोजना, विचारातील लय साधता यायला हवी. एखादी समस्या, घटना, विचार थेटपणे आपल्याशी संबंधित नसेलही कदाचित, पण त्याचा संवेदनशीलतेने घेतलेला वेध, उत्स्फूर्तपणे निबंधाला मिळालेला भावनिकतेचा स्पर्श यामुळे निबंध एका वेगळ्याच उंचीवर जाऊ शकतो, हे लक्षात घ्यावे.

## १) लोकशाहीत प्रसारमाध्यमांचे महत्त्व

**मुद्दे :** ● प्रसारमाध्यमे कोणकोणती? ● वृत्तपत्रे - वृत्तपत्रांनी समाजजागृती, विविध लढे, संघर्ष, अशावेळी केलेले जनजागरणाचे काम (उदाहरणांसह) ● रेडिओ - स्वातंत्र्यलढ्यामध्ये भूमिगत रेडिओस्टेशन्सचा वापर, नंतर मनोरंजन, बातम्या, जनजागृतीचे विविध कार्यक्रम. ● दूरदर्शन, विविध वाहिन्या - आजचे प्रभावी माध्यम. निखळ मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन हवे. ● जागरूक लोकमत घडवणे हे काम ● प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य ● शासन, भांडवलदार यांचा दबाव नको ● तटस्थ, निर्भय भूमिका ● नागरिक म्हणून आपली भूमिका.

ज्या चौखंब्यावर लोकशाही उभारलेली आहे त्यापैकी एक म्हणजे प्रसारमाध्यमे. त्याचे आजचे विस्तृत रूप आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहे. स्वतंत्र बाण्याच्या, सत्यनिष्ठ आणि जागरूक

प्रसारमाध्यमांच्या अभावी निकोप आणि सुदृढ लोकशाहीची वाढ होऊ शकत नाही. कारण लोकशाहीचा प्राण असलेल्या व्यक्ति स्वातंत्र्याच्या हक्काची प्रसारमाध्यमे ही रखवालदार असतात.

प्रसारमाध्यमांसाठी 'मिडिया' हा शब्द आपण फार ढोबळमानाने वापरतो. आजच्या काळात हा शब्द वापरत असताना आपल्या मनात सर्वप्रथम येतात त्या इलेक्ट्रॉनिक वृत्तवाहिन्या. पण वृत्तपत्रे, रेडिओ, मनोरंजन वाहिन्या, इंटरनेट (यात फेसबुक, ट्विटर, ब्लॉगिंग, यू-ट्यूब, वगैरेही आलेच) हे ही त्यात येतेच. आपला संदेश, आशय समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी जे जे उपलब्ध मार्ग ते ते सारे म्हणजे प्रसारमाध्यमे. आज रूढार्थाने ज्याला 'मिडिया' म्हणतात, ते मिडियाचे दिखाऊ/भपकेबाज रूप आहे. कारण विविध प्रसिद्ध व्यक्ती, त्यांच्याविषयीच्या खळबळजनक बातम्या, स्टिंग ऑपरेशन्स, ब्रेकिंग न्यूज देण्याची स्पर्धा यामुळे विविध वाहिन्यांची चलती आहे.

या नवमाध्यमांचा उदय होण्यापूर्वी वृत्तपत्र हे एकमेव प्रसारमाध्यम म्हणून उपलब्ध होते. इतिहासाकडे नजर टाकली तर, सर्वच राष्ट्रांमध्ये तत्कालिन वृत्तपत्रांनी जनजागृतीसाठी, जनमत घडवण्यासाठी फार मोठी कामगिरी बजावलेली दिसते. आपण केवळ मराठी वृत्तपत्रांचा इतिहास बघितला तर स्वातंत्र्यपूर्व काळात शि. म. परांजपे यांचा 'काळ', लो. टिळकांचा 'मराठा', 'केसरी' या वृत्तपत्रांच्या माध्यमातून, त्यातील स्फोटक अग्रलेखांतून निद्रिस्त समाजाच्या मनात पारतंत्र्याविषयीची चीड जागी करणे, असंतोषाला तोंड फोडणे आणि पर्यायाने ब्रिटिश सत्तेच्या मनात दहशत निर्माण करणे, ही महत्त्वाची भूमिका वृत्तपत्रांनी घेतलेली दिसते. अगदी नजीकच्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी आचार्य अत्रे यांनी 'मराठा' चा प्रभावी वापर केला होता. अजूनही जुन्या जाणत्या पिढीची सकाळ ही चहाबरोबर वृत्तपत्रे वाचूनच होत असते तर तरुण पिढी ई-वृत्तपत्रे इंटरनेटवरून वाचते. ही गोष्ट 'वृत्तपत्रे हे समाजजीवनाचे एक प्रभावी अंग आहे.' हेच दर्शविते. वेगवेगळ्या आंदोलनांच्या काळातही वृत्तपत्रांनी सजग भूमिका बजावलेली दिसते.

त्यानंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांची सुरुवात झाली ती रेडिओपासून. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी भूमिगत रेडिओ स्टेशन्सचा वापर केला गेला तर स्वातंत्र्योत्तर काळात मनोरंजन, बातम्या, जनजागृतीचे विविध कार्यक्रम यांमुळे वृत्तपत्रांपेक्षा रेडिओ अधिक जलद गतीने लोकांपर्यंत पोहोचू लागला. १९६५ साली 'दूरदर्शन'चे नियमित प्रक्षेपण सुरू झाले. त्यावेळी दूरदर्शनचा सगळा उपक्रम 'ऑल इंडिया रेडिओ'चाच एक भाग होता. १९७६ साली मात्र दूरदर्शनच्या सेवेला रेडिओच्या आधिपत्यापासून वेगळे केले गेले. त्यानंतर विविध वाहिन्या आल्या आणि आज त्यांनी इतर प्रसारमाध्यमांना पूर्णत: निष्प्रभ करून टाकले आहे असे दिसते.

मनोरंजन, बातम्या, सद्य:स्थितीचे वास्तव दर्शन घडविणे व त्याचे विश्लेषण करणे हे प्रसारमाध्यमांचे महत्त्वाचे उद्दिष्ट असायला हवे. मनोरंजनाच्या नावाखाली दाखवल्या जाणाऱ्या मालिका आज फारच कमी प्रमाणात निखळ मनोरंजन वा समाजप्रबोधन करताना दिसतात. साधे उदाहरण बघा - 'विनोदी' म्हणून सादर केले जाणारे कार्यक्रम प्रेक्षकांची विनोदाची जाण खरोखरच समृद्ध करतात का? उत्तम साहित्यकृती, उत्तम संगीत, उत्तम नृत्य-नाट्यादी कलांचे दर्शन या कार्यक्रमातून होते का?

इंटरनेटच्या सर्वव्यापी जाळ्यामुळे आज सर्वसामान्यांच्या हातीही फेसबुक, ब्लॉग, ट्विटर, यू ट्यूब किंवा व्हॉट्स ॲपसारखी प्रसारमाध्यमे आली आहेत. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात घडलेल्या एखाद्या घटनेची माहिती किंवा प्रतिक्रिया कोणीही या माध्यमांद्वारे लाखो लोकांपर्यंत क्षणार्धात पाठवू शकतो. जनमत बनविण्यासाठी याचा सकारात्मक तसेच नकारात्मक वापर केला जाऊ शकतो. म्हणूनच ही माध्यमे जितकी उपयुक्त तितकीच विघातकही ठरू शकतात.

खरेतर प्रसारमाध्यम हे आपल्या सामाजिक जीवनाचे प्रभावी अंग असायला हवे. जागरूक लोकमत निर्माण करण्याची प्रक्रिया त्यांच्यामुळे घडत गेली तर त्यांचा प्रभाव, दबाव शासनसंस्थेवरही पडू शकतो. देशातील शासनव्यवस्था लोकशाही किंवा हुकूमशाही अशी कोणत्याही प्रकारची असली तरी जनमताची उपेक्षा करणे तिला परवडणारे नसते.

लोकशाहीमध्ये तर नागरिकाला वस्तुस्थिती समजून घेण्याचा हक्क असतो. एखाद्या घटनेच्या सर्व बाजू समजून घ्याव्या, त्यासंबंधी आपले मत बनवावे, जरूर वाटले तर ते व्यक्त करावे, हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. प्रसारमाध्यमांनी हे काम करावे अशी अपेक्षा आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या मतप्रदर्शनाचा हक्क

म्हणजेच प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य होय. विरोधी मतालाही जास्तीत जास्त अवकाश देणे, हा प्रसारमाध्यमांच्या कामातील सर्वसामान्य रिवाज असायला हवा. अर्थातच ते मत सुसंगतपणे आणि समंजसपणे मांडलेले असले पाहिजे.

आज प्रसारमाध्यमांच्या संदर्भात महत्त्वाची समस्या म्हणजे, केवळ करमणुकीचे साधन म्हणून बहुसंख्य लोक या माध्यमांकडे पाहतात. आपल्याभोवती घडणाऱ्या घटनांसंबंधी जाणून घेण्याची उत्सुकता लोकांच्या मनात असतेच असे नाही. त्याविषयी तीव्र भावना, संवेदनशीलता, सुप्त कर्तृत्वाला आव्हान करणारे उदात्त ध्येय आपल्या मनात नाही. तर माध्यमांच्या बाजूने करमणुकीबरोबर सद्य घडामोडींचे विश्लेषण करून जनतेला डोळस बनविणे हे आद्य कर्तव्य आहे, याची जाणीव दिसत नाही. कुठलीही टोकाची भूमिका न घेता, घटना गोळा करून बातम्यांच्या स्वरूपात त्यांचा अन्वयार्थ वाचकांना, प्रेक्षकांना तटस्थपणे समजावून सांगणे, हे प्रसारमाध्यमांचे काम आहे; पण तसे होताना दिसत नाही. बातम्यांचे स्वरूप वस्तुनिष्ठ नसते. भडक दर्शन, प्रतिक्रिया, तीच तीच दृश्ये पुन्हा पुन्हा दाखवणे, संवेदनशीलतेपेक्षा सरकारविरुद्ध, प्रशासकीय यंत्रणेविरुद्ध आरडाओरडा करण्याची प्रवृत्ती दिसते. अर्थात, काहीवेळा त्याचा फायदाही होतो. आपद्ग्रस्तांना मदत, अत्याचारांना-भ्रष्टाचाराला वाचा फोडणे यासाठी अशा कार्यक्रमांचा उपयोग होतो.

विविध विषयांवरच्या विविध चर्चांमधून वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक आपली बाजू मांडत असतात. त्यामुळे सामान्य नागरिकांना त्या प्रश्नांची सर्वांगाने माहिती होते. अर्थात सादरीकरणात त्या त्या वाहिनीच्या संपादकांच्या भूमिकेचा प्रभाव असतो. सुज्ञ नागरिक त्याचा योग्य अर्थ लावू शकतात; पण असमंजस माणसाच्या मनात चुकीचे विचार रुजू शकतात.

व्यापारी जाहिराती हा प्रसारमाध्यमांच्या अर्थकारणाचा प्रमुख आधार असल्याने स्वाभाविकच त्यांच्यावरील भांडवलदारांच्या वर्चस्वाचा मुद्दा नजरेआड करता येत नाही. आर्थिक हितसंबंधांच्या प्रभुत्वाखाली काम करावे लागण्यात लोकशाहीला मोठा धोका आहे, कारण पैशाच्या जोरावर अभिव्यक्तीस्वातंत्र्य विकत घेतले जाऊ शकते. एक काळ असा होता की, जाहिरातींमध्ये एक हवाहवासा लोभसपणा होता. 'यही है राईट चॉईस बेबी...!' ही जाहिरात असो वा 'हमारा कल, हमारा आज, हमारा बजाज........'ही गाडीची जाहिरात असो, या जाहिरातींमधून वस्तूंच्या जाहिरातीबरोबर शब्दांपलीकडची आपुलकी होती. आज परफ्युम्स, चॉक्लेट्सच्या हिडीस जाहिराती, उत्पादनाशी फारसा संबंध नसताना स्त्रीदेहाचे प्रदर्शन या प्रवृत्ती बळावलेल्या दिसतात. एकूणच सरकारच्या, राजकारणी शक्तींच्या व आर्थिक मदतीमुळे भांडवलदारांच्या, अशा कुणाच्याही दबावाला बळी न पडता प्रसारमाध्यमांनी तटस्थपणे, निर्भयपणे समतोल मते मांडणे, बातम्या देणे आवश्यक आहे. असे झाले तरच लोकशाहीचा खांब म्हणून त्यांचे कार्य होईल. सुप्रसिद्ध पत्रकार एस्. नटराजन यांनी म्हटले आहे,''प्रसारमाध्यमांचे आरोग्य निकोप राहण्याच्या दृष्टीने सरकार आणि माध्यमे यांच्यात कायम थोडा संघर्ष असावा. सरकारच्या काबूत न राहता सडेतोड टीका करण्याचे स्वातंत्र्य माध्यमांना हवे; कारण प्रसारमाध्यमे ही अधिकृत सरकारी धोरणांचे प्रतिबिंब नव्हे.'' दुसरी बाजू मांडताना ते बजावून सांगतात,''प्रसंगी माध्यमांनाही गैरव्यवहाराबद्दल जाब विचारला गेला पाहिजे.''

प्रसारमाध्यमे आणि लोकशाही यांचा एकत्रित विचार करताना नागरिक म्हणून तरुण पिढीची भूमिकाही खूप महत्त्वाची आहे. कारण आपण जर या जगताचे ग्राहक असू; आपल्यातील काहीजण या माध्यमांमध्ये कामही करतील; आपल्यासमोर आलेले सगळेच आपण जसेच्या तसे स्वीकारता कामा नये. अभिव्यक्तीची असंख्य माध्यमे खुली झाल्याने आणि सगळेच सगळ्यांपर्यंत सहज पोहोचत असल्याने कोलाहल वाढला आहे. माहिती, मनोरंजनाचा स्फोट आहे. पण ज्ञानाचे काही सूक्ष्म कणच त्यातून आपल्यापर्यंत पोहोचतात. त्यासाठी आपण डोळस व्हायला हवे. वृत्तपत्रे, नियतकालिके हीही उत्तम माध्यमे आहेत. वाचक प्रेक्षकांचा एक दबावगट तयार होऊन माध्यमांवरील कार्यक्रमांच्या दर्जासाठी आग्रही राहायला हवे. जे आवडतेय त्याला प्रतिसाद देणे एवढ्यावरच न थांबता दर्जेदार गोष्टींना प्रतिसाद द्यायला हवा. जे आवडत नाही ते बदलण्यासाठी कृतिशील व्हायला हवे. डोळे उघडून बघायला हवे. तरच प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा एक सबल खांब बनू शकतील.

## २) पर्यावरण आणि विकास

**मुद्दे :** ● पर्यावरण म्हणजे काय? ● विकास म्हणजे काय? ● विकासाचा इतिहास ● उपभोगवादाचे दुष्परिणाम ● पर्यावरण आणि विकास यांची परस्परपूरकता ● आपली भूमिका व कृती.

गंगा नदीचे भारतातले महत्त्व वादातीत आहे. भारताचा सांस्कृतिक वारसा जपणारी, पवित्रतेची कसोटी ठरलेली गंगा नदी.... तिचे गुणगान किती करावे? अलीकडेच 'गंगा नदी स्वच्छता अभियान' हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी २ वर्षे लागतील की २० याविषयी जोरदार चर्चाही सुरू आहे. एकीकडे चकचकीत रस्त्यांचे देशव्यापी जाळे, लखलखीत टोलेजंग इमारती उभारून विकास साधताना निसर्गाकडे, पर्यावरणाकडे मात्र दुर्लक्ष होत आहे, हे वास्तव नाकारून चालणार नाही. मोठमोठे कारखाने, जमिनीच्या पोटातून होत असणारा खनिज तेलांचा प्रचंड उपसा, ऊर्जेसाठी आण्विक भट्ट्यांची निर्मिती या सगळ्या आजच्या विकासाच्या मोजपट्ट्या आहेत. या मोजपट्ट्यांमुळे पर्यावरणाची हेळसांड सोयीस्करपणे नजरेआड होते आहे. प्रमाणाबाहेर चाललेली अनियंत्रित, अवाजवी वृक्षतोड; अनुषंगाने तेथील अधिवासाचा झपाट्याने होत चाललेला विनाश, प्लॅस्टिकचा हजारो टन कचरा निर्माण करणारी शहरे हीच या गतिमान युगाची ओळख बनली आहे. भोपाळ दुर्घटना, माळीण दुर्घटना असे अपघात झाले की, तेवढ्यापुरते जागे व्हायचे, ही आता नित्याचीच बाब झाली आहे.

पर्यावरण आणि विकास हे शब्द परस्परपूरक हवेत खरेतर; पण सध्या ते एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. 'जिथे विकास तिथे पर्यावरणाचा ऱ्हास' अशीच परिस्थिती आज दिसते आहे. पर्यावरणपूरक विकासनीतीकडे वळण्याअगोदर या दोन्ही संकल्पना समजून घेणे औचित्याचे होईल.

**पर्यावरण म्हणजे काय?**

पर्यावरण म्हणजे या पृथ्वीच्या आत, पृष्ठभागावर आणि वर वातावरणात जे जे काही आहे ते सर्व. यात हवा, पाणी, जमीन, हवेतील वेगवेगळे वायू, अब्जावधी प्रकारचे जीवजंतू, सजीव-निर्जिव या सर्वच गोष्टींचा समावेश होतो. या सगळ्याची मिळून जी एक संरचना/व्यवस्था ती म्हणजे पर्यावरण. या पर्यावरण व्यवस्थेचे काही नियम, वैशिष्ट्ये, तत्त्वे आहेत. ती समजून घेतली तरच आपल्याला पर्यावरणाचे आकलन होऊ शकेल. चक्रीयता, विकेंद्रितता, विघटनक्षमता, परस्परावलंबन, वाढ आणि मर्यादा इ. पर्यावरणाची वैशिष्ट्ये एकमेकांत गुंतलेली, गुंतागुंतीची (कदाचित मानवी आकलनाच्या पलीकडची) आहेत. या सगळ्याची सुसूत्र अशी जी रचना ती म्हणजे पर्यावरण.

**विकास म्हणजे काय?**

विकास या शब्दाचा ढोबळमानाने अर्थ आहे - पुढे जाणे, वाढ होणे, प्रगती होणे, आहे त्यावरून वरच्या उन्नत स्थितीला जाणे. सध्या विकास हा परवलीचा शब्द झाला आहे. माणसाचे जीवन कमीतकमी कष्टाचे असावे, त्याला अधिकाधिक सुख-सुविधा, भौतिक समृद्धी मिळावी, अशा अपेक्षेतून मानवाने विकासाचा ध्यास घेतला आणि ते योग्यच आहे.

व्यक्ती, समाज आणि पर्यावरण या तिन्ही पातळ्यांवर ही विकासाची प्रक्रिया सतत सुरू राहिली पाहिजे. पण सध्या विकास फक्त व्यक्तींचाच, तेही काही मूठभर व्यक्तींचाच, असे स्वरूप या प्रक्रियेला आले आहे. समाज, पर्यावरण यांचा विकासच या प्रक्रियेमध्ये नाही. आज ज्या सुख-सोयी माणूस उपभोगतो आहे, त्यामुळे तो खरंच सुखी-समाधानी आहे का? उत्तर नकारार्थीच येते. त्यामुळेच सध्याची आपली वाटचाल विकासाकडे की विनाशाकडे असे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. असे का झाले असावे, हे जाणून घेतले तरच व्यक्ती, समष्टी आणि प्रकृती यांचा एकत्रितपणे विकास साधण्याच्या दृष्टीने पावले उचलता येतील.

**विकासाचा इतिहास**

सुरुवातीला स्वबळावर आणि पाळीव पशूंच्या मदतीने माणूस किती, किती वेळात आणि काय उत्पादित करेल, यावर एक अपरिहार्य मर्यादा होती. पण ऊर्जा (जेम्स वॅटचा वाफेचा शोध) आणि तंत्र (यंत्र) यांच्या जोरावर घडलेल्या औद्योगिक क्रांतीने या मर्यादा धुडकावून लावल्या. माणसाच्या सततच्या वाढत्या इच्छांची पूर्तता होऊ लागली. इच्छा-तंत्रज्ञान-ऊर्जा-इच्छापूर्ती-नव्या वाढीव इच्छा; ही विकास प्रक्रिया गतिमान झाली. माणसाच्या आंतरिक, पाप-पुण्याच्या मर्यादा धुडकावून लावण्याचे बळही माणसाला विज्ञानामुळे-देकार्तेच्या इहवादी, जडवादी

विचारसरणीमुळे मिळाले. उपभोग कितीही वाढवा-त्यात गैर काहीच नाही, हा दिलासा त्याला मिळाला. उपभोगवाद बोकाळला. उत्पादनासाठी लागणारे श्रम, ऊर्जा, वेग आणि प्रमाण कशावरच नियंत्रण राहिले नाही.

सध्याचा आपला विकास मोजण्याची मोजपट्टीही याच तत्त्वावर आधारलेली आहे. कुठल्याही देशाचा विकास हा त्या देशातील दरडोई उत्पादन, दरडोई उपभोग यावरून घेतलेल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नावर (जी डी पी) किंवा याच्या अमर्याद वाढीवर अवलंबून आहे. त्यामुळेच 'उपभोग घ्या- उत्पादन वाढवा' या मंत्राचीच रणधुमाळी सध्या सुरू आहे. गेली तीन शतके माणसाचा विकास आपण असाच मोजतो आहोत. सुरुवातीला जाणवले नसेल तरी त्याचे गंभीर दुष्परिणाम आज सगळ्यांनाच भोगावे लागत आहेत.

### उपभोगवादाचे दुष्परिणाम

भौतिक सुविधांचा लाभ समाजातल्या विशिष्ट गटालाच मिळाला. भारताच्या बाबतीत बोलायचे तर भारत आणि 'इंडिया'तली दरी वाढतच आहे. यांत्रिकीकरणामुळे बेकारीची समस्या वाढली, उपभोग वाढले, भौतिक सुविधा वाढल्या, तरी माणूस असमाधानीच राहिला. आंतरिक पातळीवरचा विकास साधलाच नाही. उपभोगवादाच्या या रेट्यात माणसाला नको इतके महत्त्व आले. निसर्गाचा तो स्वयंघोषित स्वामी बनला. निसर्गातला प्रत्येक घटक समान हे तत्त्व तो विसरला. अमर्याद उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, नैसर्गिक/अनवीनीकरणक्षम संसाधने यासाठी तो निसर्गावर अगदी शब्दशः तुटून पडला. देवाण-घेवाणीचे तत्त्व विसरून निसर्गाला फक्त ओरबाडतच राहिला. 'स्टोरी ऑफ स्टफ' या माहितीपटामध्ये अशाप्रकारच्या मागणी-उत्पादन-निसर्गाचे शोषण या दुष्टचक्रावर सडेतोड भाष्य केले आहे.

इतके दिवस माणसाने पर्यावरणाच्या ऱ्हासाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. पण आता खडबडून जागे व्हायची वेळ आली आहे. सभोवतालच्या वातावरणाला सजीव कसा प्रतिसाद देतात, त्याचा फ्रान्सच्या विद्यार्थ्यांनी केलेला हा प्रयोग. एका काचपात्रातले पाणी उकळेपर्यंत तापवले. त्या उकळत्या पाण्यात एक बेडूक टाकला. प्रतिक्षिप्त क्रियेसारखा टुणकन उडी मारून बेडूक बाहेर आला. आता काचपात्रात पाणी घेऊन त्या सामान्य तापमानातल्या पाण्यात त्यांनी बेडूक सोडला आणि हळूहळू पाण्याचे तापमान वाढवत नेले. वाढत असलेले तापमान बेडकाला जाणवतही नव्हते. हळूहळू पाणी उकळू लागले......... बेडूक पाण्याबाहेर आला नाही, त्याने असे प्रयत्नही केले नाहीत. परिणामी, तो पाण्यात उकडून मेला. त्यामुळे पर्यावरणाच्या बाबतीत सावध होण्याची हीच ती निर्णायक वेळ। नाहीतर आपली गतही 'त्या बेडका' सारखी होईल, यात शंका नाही.

### पर्यावरण आणि विकास

पर्यावरण साधत योग्य तो विकास साधणे, ही खरोखरच तारेवरची कसरत आहे. रेल्वे-रस्त्यांचे जाळे पूर्ण देशात पाहिजे; ही काळाची गरज आहेच. तिला छेद देऊन चालणार नाहीच. पण प्रश्न हा आहे, की त्यामुळे होणारी स्थानिक वृक्षतोड, त्यासाठी लागणारी ऊर्जा, कच्चा माल यापायी पर्यावरणाचा होणारा ऱ्हास याचा पुरेशा गांभीर्याने विचार होतो का, त्यादृष्टीने त्वरित काही पावले उचलली जातात का? त्याप्रमाणात नवीन झाडे लावली जातात का?

महात्मा गांधी म्हणतात,''निसर्ग हा माणसाच्या 'नीड'साठी पुरेसा आहे, 'ग्रीड'साठी नव्हे''. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला केलेले हे विधान त्यांचे दूरगामी आणि मूलगामी विचार स्पष्ट करतात. पर्यावरणावर गांधीजी कुठेही थेट भाष्य करत नाहीत. पण त्यांचा 'खेड्याकडे चला', हा युवकांना दिलेला मंत्र असो किंवा 'स्वदेशी', 'चरखा' यांसारखी तत्त्वे, त्यांचा पर्यावरणाबाबत दृष्टिकोनच अधोरेखित करतात.

सद्य सरकारमध्ये आता पर्यावरण आणि विकास हे खाते एक झाल्यानेही त्यादृष्टीने काही पावले उचलली जातील, अशी आशा आहे. सरकारी पातळीवर निर्णय जेव्हा व्हायचे तेव्हा होतीलच, पण तोपर्यंत स्थानिक पातळीवर विचार होऊन कृतिकार्यक्रम राबविण्याची नितांत गरज आहे. कारण 'पर्यावरणाचा विचार वैश्विक आणि कृती स्थानिक' पातळीवर करण्याची गरज आहे.

पर्यावरणाची समस्या जगड्व्याळ आहे म्हणून घाबरून/गोंधळून न जाता किंवा माझ्या एकट्याच्या प्रयत्नाने काय होणार म्हणून निष्क्रियही न होता, पर्यावरणाची चतुःसूत्री पाळणे म्हणजे एखाद्या वस्तूचा वापर पूर्णपणे टाळणे, कमीतकमी वापर करणे, पूर्णपणे वापर करणे, पुनर्वापर करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

उपभोगवाद पूर्णपणे नष्ट करणे आपल्या हातात नाही; पण आपल्या गरजा कमीतकमी ठेवणे, त्यासाठी जनजागृती करणे, लोकचळवळ उभी करणे महत्त्वाचे. शिक्षकदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वीज आणि पाणी बचती' चा मंत्र दिला. अशाच काही स्थानिक/वैयक्तिक प्रयत्नांनी लोकमानस तयार होईल. १४ हजार कोटी लोकांची मानसिकता बदलण्याच्या, पर्यावरण-पूरक करण्याच्या भगीरथ प्रयत्नांमध्ये असे छोटे-छोटे प्रयत्न खारीचा वाटा उचलतील, यात शंका नाही.

## ३) वाढती लोकसंख्या- समस्येकडून समस्यापरिहाराकडे

**मुद्दे :** • लोकसंख्या वाढीचे भारतातले प्रमाण • लोकसंख्या वाढ नक्की कुठे? (ग्रामीण भागात की शहरात) • लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या • उपाययोजना • लोकसंख्या ही शक्ती म्हणून तिचा वापर करणे.

संध्याकाळी ६ वाजताची वेळ. शिक्षण संपवून नोकरीसाठी मुंबईत धडकलेला किरण बावरून दादरच्या प्लॅटफॉर्मवर उभा होता. मिनिटामिनिटाला गाड्या भरभरून येत होत्या. कार्यालयांमधून घरी परतण्याची घाई असलेली माणसे गाडीत चढत होती, उतरत होती, अक्षरशः मुंग्यांसारखी हजारोंच्या संख्येने. कसे घुसायचे या गर्दीत? शेवटी एकदाचा आसपासच्या जमावाच्या रेट्याच्या बळावर किरण गाडीत ढकलला गेला. मुंबईत राहायचे कुठे, घरात लागणारे पैसे कुठून आणायचे, महिन्याचा खर्च कसा भागवायचा अशा एक ना अनेक समस्या त्याच्या मनाला भेडसावत होत्या. धावत्या गाडीतून अफाट पसरलेल्या झोपडपट्ट्या दिसत होत्या. आपणही या शहरातील अफाट जनसमुदायाचा एक बिंदू ही भावना मनाला अस्वस्थ करत होती. कॉलेजमध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात देशाच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाचा केलेला पुस्तकी अभ्यास आज प्रत्यक्ष जीवनात या समस्येला भिडताना नव्याने कळत होता.

आज भारत जगामध्ये लोकसंख्येच्या उच्चांकाबाबत क्रमांक दोनवर आहे. खरोखरच ही स्थिती पहिल्यापासून होती का? ही समस्या विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून सुरू झाली आणि आज तिने हळूहळू उग्र रूप धारण केले आहे. जेव्हा जन्म-मृत्यू यांचे प्रमाण व्यस्त होत गेले तेव्हापासून लोकसंख्या वेगाने वाढू लागली व तिच्या जोडीने अपरिहार्यपणे येणाऱ्या अनेक समस्या आपल्याला भेडसावू लागल्या. लोकसंख्या वाढल्यावर जीवनोपयोगी वस्तूंची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याप्रमाणात उत्पादन न वाढल्याने भडकल्या महागाईला तोंड देणे सामान्य माणसाला कठीण होत चालले आहे.

शहरात उद्योगधंद्यांची वाढ झाल्याने स्वाभाविकच लोकांची तिकडे धाव वाढली. राहायला जागा नाही म्हणून आसपासची झाडे तोडली जात आहेत, टेकड्या फोडल्या जात आहेत. जमिनीची धूप होते आहे. पाऊस अनियमित झाला आहे. मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्या वाढत आहेत. मुंबईसारख्या शहरात अक्षरशः किडे-मुंग्यांसारखी माणसांची गर्दी! तिथल्या मिठी नदीची काय अवस्था करून ठेवली आहे माणसांनी? कधीतरी पावसात साठलेल्या पाण्याने हजारो माणसांचा बळी घेतला जातो. अमाप कचरा साठतो, त्यातून अस्वच्छता, अपरिमित कचरा - त्याची विल्हेवाट लावणे अवघड झाले आहे. यातून आरोग्यास हानिकारक असे वातावरण आपणच निर्माण करत आहोत. सांडपाण्याच्या विल्हेवाटीची व्यवस्था नाही, यामुळे प्रदूषणाची धोकादायक पातळी शहरांतून कधीच ओलांडली गेली आहे.

त्यामुळे निर्माण होणाऱ्या अर्थव्यस्थेमध्ये गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. समाजातील विषमतेमुळे असंतोष, गुन्हेगारी, चोऱ्या यांचे प्रमाण वाढते आहे. विज्ञानातील प्रगतीमुळे नानाप्रकारची सुख-साधने उपलब्ध आहेत. ती मिळविण्याची लालसा वाढते आहे. मग या गरजा पूर्ण करायच्या तर भरपूर पैसा हवा. तो सन्मार्गाने मिळत नाही मग संपत्ती मिळवण्याचे झटपट अवैध मार्ग शोधले जातात. रोजगारासाठी घरदार, आपली माणसे सोडून शहरात राहणारी निम्न आर्थिक स्तरातील माणसे संसारसुखापासून वंचित राहतात. कारण शहरात राहण्यासाठी जागा नाही. मग स्त्रियांवरील अत्याचारासारख्या गंभीर समस्या उद्‌भवतात. यातून कुठलाही कायदा राबविणे, शिस्त पाळणे, गुन्हेगारीला आळा घालणे या गोष्टी प्रचंड लोकसंख्येमुळे प्रशासनाच्या हाताबाहेर जाताना दिसतात. त्यामुळे अशा अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. माणसाचे सरासरी आयुर्मान वाढल्यामुळे वृद्धांचे प्रश्न वाढत आहेत. शिक्षणामुळे संततीनियमनाचा विचार सुशिक्षितांमध्ये रूजतो आहे; पण गरीब, अशिक्षित समाजात हा विचार रुजलेला नाही. अभ्यासकांनी २०२५ पर्यंत भारताची लोकसंख्या वाढत वाढत जाऊन ती क्रमांक एकवर जाण्याची शक्यता वर्तविली आहे.

संतती नियमनाचा कायदा करून लोकसंख्येला आळा घालणे हा एक उपाय होऊ शकतो. पण विविध धर्म, जाती

यांनी बनलेल्या आपल्या देशात अशा प्रकारच्या कायद्याची अंमलबजावणी करणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. त्यासाठी सम जनप्रबोधनाचा मार्गच अवलंबायला हवा. थोर समाजसेवक र. धो. कर्वे यांनी सन १९२१ मध्ये हा विचार समाजात रुजवण्यासाठी एकांड्या शिलेदाराप्रमाणे आयुष्य खर्ची घातले. आता असे अनेक कृतिवीर या चळवळीसाठी उभे राहायला हवेत.

यावर उपाय काय? या प्रश्नाची एक आश्वासक बाजू म्हणजे एका राष्ट्राचे नागरिक म्हणून लोकसंख्याबळाचा उपयोग रचनात्मक कामासाठी करून घेतला, तर आपले राष्ट्र विकसित होऊ शकते. प्रबळ राजकीय इच्छाशक्ती असेल, तर विखुरलेला, गरीब, असहाय जनसमुदाय विलक्षण प्रगती घडवून आणू शकतो, याचे चीन हे एक चांगले उदाहरण आहे. इस्त्राईलसारख्या देशात जगभर विखुरलेल्या यहुद्यांच्या देशप्रेमामुळे उजाड वाळवंटाचे नंदनवन झालेले दिसते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील भारतीयांसमोर मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे हाच विचार अत्यंत सोप्या शब्दांत मांडला. आपल्या देशातील ६५% जनता ३५ वर्षे खालील तरुण आहेत. याचा प्रभावी वापर करून आपण बरेच काही करू शकतो. 'मेक इन इंडिया' हा संदेश त्यांनी दिला. म्हणजेच उत्पादनासाठी या जनशक्तीचा वापर केला, तर आपला देश विकासाच्या दिशेने जाईल, अशी प्रबळ आशा त्यांनी व्यक्त केली.

अर्थशास्त्रज्ञ माल्थस लोकसंख्येला 'भयावह भस्मासूर' असे म्हणतो, त्याच्या अगदी उलट आजचे अर्थतज्ज्ञ त्याकडे एक संधी म्हणून बघतात.

वाढणारी लोकसंख्या तोंडाबरोबर दोन हात घेऊन येते. त्या हातांचा योग्य तो वापर केला तर उत्पादन व्यवस्था, त्याबरोबर जीवनमान व राष्ट्रीय संपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात भर घालू शकते. उत्पादन व्यवस्थेमध्ये - कार्य करणारे हात आणि उत्पादन व्यवस्था राबविणारे व्यवस्थापन अथवा उद्योजक या लोकसंख्येचाच एक हिस्सा असतो. त्यातल्या त्यात तरुण हात व धडाडीचे उद्योजक कमालीचे काम करून राष्ट्राला प्रगतीपथावर आणू शकतात. याचे चीन हे ज्वलंत उदाहरण आहे आणि त्याच मार्गावर जाणारा भारत आहे.

जागतिकीकरणानंतर अर्थव्यस्थेमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली, ती म्हणजे जागतिक मागणी. वाढणारी लोकसंख्या फार मोठ्या मागणीची बाजू असते. त्यामुळे उत्पादकास अहर्निश कामात गुंतून राहून आपली उत्पादनाची बाजू अधिक सरसपणे जागतिक बाजारात आणता येते. याचे पडसाद आपल्याला आज दिसतात. युरोप अमेरिकेतील उत्पादक आपल्या बाजारात रांगा लावून आहेत, याचे कारण हेच आहे.

थोडक्यात जर शासनव्यवस्था या संधीचा योग्य वापर करणार असेल, तर वाढती लोकसंख्या ही प्रगतीशील राष्ट्रांचा शाप न बनता त्यांचा आधार बनेल.

प्रगतीशील राष्ट्रांमध्ये नेहमीच फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या खेड्यातून शहरांकडे वळत असते. यास मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत असतात.

देश शेतीकडून औद्योगिकीकरणाकडे वळतो. त्यामुळे उत्पादनाची साधने शहराकडे एकवटलेली असतात. शेतीवरील भार कमी करणे आवश्यक असते, कारण फार मोठ्या प्रमाणात बेकारी आपल्याला शेतीतच आढळते, कारण ती छुपी असते. त्याचाच परिणाम म्हणून पोट भरण्यासाठी शेतकरी शहरांचा आसरा घेतो. बऱ्याचदा सेवाक्षेत्राची फार मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यावेळी त्या उपलब्ध करून देण्यासाठी लोकसंख्या शहराकडे वळते. उदा. राज्याबरोबर परराज्यांमधूनही अनेकजण इस्त्री, भाजी विकणे, दूध घालणे, टॅक्सी चालवणे वगैरे व्यवसायांसाठी मुंबईत येतात.

या सर्वांमुळे शहरे वाढताहेत. त्यांचे वेगळे प्रश्न लक्षात घेऊन लोकसंख्येचा प्रश्न वेगळ्याप्रकारे आपल्याला सोडवावा लागणार आहे.

थोडक्यात काय, माणसे ही शक्ती म्हणून उभी राहिली, तर हा लोकसंख्येचा प्रश्न ही समस्या वाटणार नाही. त्यासाठी आपल्यासारख्या लोकशाही असलेल्या देशात शिक्षण, रोजगार आणि समानता यांची कास धरली, तर निश्चितच या प्रश्नाला आपण तोंड देऊ शकू. लोकसंख्या ही दुधारी तलवार आहे. एकीकडे ती देशाची अर्थव्यवस्था कापत जाते. त्याचवेळी मनुष्यबळाच्या आधारावर नव्यानव्या संधी निर्माणसुद्धा करून देते. गरिबी, उपासमारीबरोबरच नव्यानव्या उत्पादनाच्या संधीही लोकसंख्येमुळे शक्य होतात.

एकूणच, महागाई, अनारोग्य, भ्रष्टाचार, अस्वच्छता, अनाचार, आर्थिक विषमता, पर्यावरणाचा ऱ्हास अशा देशातील अनेकविध समस्यांचे मूळ वाढती लोकसंख्या या प्रश्नातच दडलेले आहे. याचे भान देशातील सामान्य जनतेला येण्यासाठी लोकशिक्षणाचे माध्यम प्रभावीपणे वापरले, तरच त्यावर थोडीफार मात करता येईल.

## ४) अंधश्रद्धेची मानसिकता बदलण्यासाठी केवळ कायदा पुरेसा आहे का?

**मुद्दे :** • विषयाची प्रस्तावना • श्रद्धा - अंधश्रद्धा संकल्पनांची चिकित्सा • सुशिक्षित, अशिक्षित समाजात रुजलेल्या अंधश्रद्धा • त्यामागील कारणे - कमकुवत मानसिकता, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, अज्ञान इ. • परिणाम - निष्क्रियता, अन्याय, अमानुष अत्याचार, दैववाद, विकासाला अडथळा • दूर करण्यासाठी उपाय - कायदा-त्याचा उपयोग, मर्यादा, समस्यांची चिकित्सा, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, शिक्षणपद्धतीत समावेश, विचारपद्धतीत आमूलाग्र बदल घडवणे. • तरुणांचा सहभाग कसा असावा.

दि. २० ऑगस्ट, २०१३ ची सकाळ उजाडली ती डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येची भीषण वार्ता घेऊनच. प्रत्येक सुजाण महाराष्ट्रीय त्याक्षणी हळहळला. कारण डॉ. दाभोळकरांचे विचार पूर्णतः पटोत वा न पटोत, त्यांच्या विचारांच्या प्रामाणिकपणाविषयी कुणाच्याही मनात शंका नव्हती. ही हत्या कोणत्याही वैयक्तिक वैमनस्यातून, पैशासाठी, राजकारणापोटी झाली नसावी, तर दुर्दैवाने, 'विचारांचा प्रतिवार विचारांनीच करायचा' ही टिळक-आगरकरांची परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रात विचारांचीच हत्या करण्याचा हा प्रयत्न होता.

त्यानंतर काही दिवसातच 'जादूटोणा विरोधी कायद्या'ला मान्यता मिळाली. पण समाजात वर्षानुवर्षे रुजलेल्या अंधश्रद्धा केवळ कायद्याने दूर होणार नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर जेव्हा समाजाभिसरण होऊन लोकांची मानसिकता जेव्हा बदलेल, तेव्हाच हे घडू शकेल. अंधश्रद्धा हा समाजाच्या विकासातील एक मोठा अडथळा आहे, तो केवळ कायद्याने दूर होईल का? हा विचार करण्यापूर्वी श्रद्धा-अंधश्रद्धा म्हणजे नेमके काय? याची थोडी शास्त्रीय चिकित्सा करणे आवश्यक आहे. श्रद्धा-अंधश्रद्धा यातील फरक समजावून घेणे, ही प्रक्रिया थोडी अवघड आहे. कारण, या दोन्ही गोष्टी कालसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष असतात. उदा. एखाद्या आध्यात्मिक बाबांचे हवेत हात फिरवून अंगठी काढणे, विभूती देणे यासारखे 'महान' चमत्कार अनेकांचे श्रद्धास्थान बनतात, तर काहींना ते निव्वळ अंधश्रद्धा वाढविणारे बुवाबाजीचे प्रकार वाटतात. ही झाली व्यक्तिसापेक्षता! कारण श्रद्धा ही बरेचदा धार्मिक विचारांशी, भावनेशी निगडित असते. मात्र ज्ञानाच्या, अनुभवाच्या साहाय्याने ती तपासून पाहिली पाहिजे. या चिकित्सेच्या आड येणारी दोन प्रमुख कारणे म्हणजे शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य. विज्ञानाच्या क्षेत्रातही हे अडथळे आड आलेले दिसतात. गॅलिलिओने दुर्बीण शोधली. 'गुरुचे तीन उपग्रह आहेत, हे प्रत्यक्ष पाहून तुम्ही मान्य करा.' असे त्याने कळकळीने सांगितले. तरीही त्या काळात ॲरिस्टॉटलने जे सांगून ठेवले आहे त्यापलीकडे काही असू शकते हे कुणीही मान्य करेना. हे झाले शब्दप्रामाण्य! बायबलचा आधार घेऊन ख्रिश्चन धर्मपीठाने त्याला सजा दिली हे ग्रंथप्रामाण्य! अंधश्रद्धा या एखाद्या विशिष्ट धर्मात, समाजात आहेत असे नाही. तसेच त्या सर्व काळात होत्या व आहेत.

मात्र, माणसाच्या संस्कृतीचा सारा इतिहास पाहिला, तर अशा श्रद्धा तपासण्याच्या प्रक्रियेतूनच सर्व क्षेत्रात संशोधन, प्रगती होत गेली असे दिसते. तसे नसते तर शोध लागलेच नसते. श्रद्धा बदलत गेल्या तसे समाजधारणेतही बदल होत गेले. उदा. पूर्वी राजेशाही सर्रास रूढ होती. आता जगात बऱ्याच देशात लोकशाही रुजलेली दिसते. अस्पृश्यता, सतीची चाल, स्त्रीला दिले जाणारे दुय्यम स्थान यासारख्या कल्पना, गतिमान समाजाशी विसंगत अंधश्रद्धा समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी गळून पडल्या.

असे झाले तरी सुशिक्षित असो वा अशिक्षित, अनेकांच्या मनात किती साध्या अंधश्रद्धा दडलेल्या असतात. तिघेजण महत्त्वाच्या कामाला निघाले तर म्हणे काम होत नाही! घरात कुणी आजारी पडले तर देवाला नवस, धंद्यात फटका बसला का तर शनीची साडेसाती होती म्हणून! आकाशातील ग्रहतारे आपल्या जीवनावर प्रभाव टाकतात म्हणून काही प्रयत्न न करता राशीभविष्यावर अवलंबून असणारेही लाखो लोक असतात. सुशिक्षित तरुणही पत्रिका पाहून, मुहूर्त पाहून विवाह करतात. एवढे सगळे करूनही मोडणारे शेकडो विवाह आपण पाहतो, या वास्तवाकडे आपण डोळेझाक करतो. भविष्यावर अवलंबून राहणे इ. कल्पनांतून येणारा नियतीवाद माणसाला निष्क्रिय बनवतो. माणसे अज्ञानाच्या हातातील बाहुले बनतात. स्वतःच्या कर्तृत्वावरील विश्वास हरवून बसतात. अशावेळी

'सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्,
दैवायत्तं कुले जन्मं मदायत्तं तु पौरुषम्'

असे म्हणणाऱ्या महाभारतातील कर्णाचे उदाहरण आपण डोळ्यांसमोर ठेवायला हवे.

शहरातील सुशिक्षितांची ही स्थिती तर खेड्यापाड्यांतील अशिक्षित लोकांबद्दल काय म्हणावे? भोंदू बुवा, महाराज यांच्या चमत्कारांना भुलून ही मंडळी त्यांच्या नादी लागतात आणि घोर फसवणुकीला बळी पडतात. त्यासाठी आपल्या कुवतीपलीकडे पैसा खर्च करतात, तो वेगळाच. भानामती, जादूटोणा, भूतचेष्टा इ. घटनांवर त्यांचा विश्वास असतो. कधीकधी मारझोडीसारख्या मांत्रिक-तांत्रिकांच्या अघोरी उपायांमुळे रुग्णांवर जीव गमावण्याचीही वेळ येते. गुप्तधनासाठी, अपत्यप्राप्तीसाठी लहान मुलांचे बळी दिले जातात. देवीला कोंबडे-बकरे बळी देणे, हा प्रकार तर खेड्यांमध्ये सर्रास चालतो. देवदासींची प्रथा, जोगतिणी, भाविणी या प्रथांमधून अनेक स्त्रियांवर अन्याय होतो. खरेतर अंगात भूत येणे, देवी येणे हे प्रकार एक प्रकारचा मानसिक आजार आहे. अनेकदा मानसिक ताणतणावातून, वास्तवातील त्रासांपासून स्वतःला बचावण्यासाठी अशा मानसिक आभासांचा माणसे, विशेषतः स्त्रिया आधार घेताना दिसतात. यासाठी खंबीर बनून घरातील अन्यायांना तोंड देण्यासाठी स्त्रियांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

मध्यंतरी ऐन दुष्काळाच्या काळात लोकांना पिण्यासाठीही पुरेसे पाणी मिळत नव्हते. तेव्हा आपण कुठल्यातरी देवाचा अवतार आहोत, असे सांगून हजारो लिटर पाण्याची रंगपंचमी खेळून भक्तांचे आजार बरे करणाऱ्या महाराजांची बातमी आपण सर्वांनी ऐकली असेल, दूरचित्रवाणीवर पाहिली असेल. काही वर्षांपूर्वी 'गणपती सोंडेने दूध प्यायला' ही अफवा सर्वत्र पसरली होती. देवळादेवळांतून हा चमत्कार पाहण्यासाठी एकच गर्दी उसळली. 'निर्जीव मूर्ती दूध कशी पिऊ शकेल?' अशी शंकाही या भक्तांच्या मनाला शिवली नाही. तर्काला धरून विचार करावा, कार्यकारणभाव शोधावा, असे यांपैकी कोणालाही वाटले नाही. परंतु शास्त्रज्ञांनी हे का घडले? कसे घडले हे सप्रमाण सिद्ध करून दाखविले तेव्हाच या चमत्काराला आळा बसला.

या सर्व अंधश्रद्धांच्या मागे बऱ्याचदा दैवी प्रकोपाची भीती असते. आलेल्या संकटांना, आव्हानांना सामोरे जाताना अशा उपायांचा आधार घेण्यामागे मनाचा कमकुवतपणा असतो. जीवनातील ताणतणाव सहन करण्याची क्षमता नसली की माणूस अंधश्रद्धांचा आधार घेतो. त्यासाठी व्यक्तिमत्व कणखर बनविणे गरजेचे असते.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव हेही एक महत्त्वाचे कारण अंधश्रद्धेच्या मागे असते. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे नेमके काय? तर शास्त्रीय पद्धतीने विचार करणे, बुद्धीला, तर्काला पटेल तेव्हाच एखादी गोष्ट किंवा विचार स्वीकारणे! कुठलाही विचार, सिद्धांत स्वीकारण्यापूर्वी त्यासंबंधी वारंवार प्रयोग करून त्याची सत्यासत्यता पडताळून पाहणे. त्यासाठी भोवतालच्या घटनांचे निरीक्षण करणे, घटनेमागील कारणांचा, परिणामांचा शोध घेणे. केवळ विज्ञानापुरता हा विचार मर्यादित नसून सर्वच क्षेत्रात 'हे असे का?' हे जाणून घेण्याची जिज्ञासा, तर्कशुद्ध विचार आणि प्रयोगाद्वारे पडताळणी यांच्याद्वारा सत्यशोधन करण्याची क्षमता आपल्यात आली, तरच अंधश्रद्धांच्या पगड्यातून आपली सुटका होईल.

समस्येचा असा डोळसपणे शोध घेण्यासाठी सम्यक विचारशक्ती असावी लागते. तसेच, आपल्याला बुद्धीने पटणारे विचार, अनुभव मांडण्यासाठी निर्भयता असावी लागते. ती सॉक्रेटिसने दाखविली, राजा राममोहन रॉय, म. फुले या समाजसुधारकांनी दाखवली. उदा. कुटुंबनियोजन, संततिनियमन हे शब्द ज्या काळात अश्लील मानले जात होते. त्या काळात र. धों. कर्वे यांनी असे धाडसी विचार मांडले. वाढत्या लोकसंख्येने आपले अवघे राष्ट्र धोक्यात येईल, या तळमळीतून त्यांनी आयुष्यभर असे क्रांतिकारी विचार धाडसाने, विरोधाला तोंड देत मांडले.

अज्ञान जाऊन ज्ञान आले, तर अज्ञानाबरोबर येणारी अंधश्रद्धाही जाते. त्यासाठी शालेय वयापासूनच आपल्या संस्कारांमध्ये, शिक्षणपद्धतीमध्ये असा डोळस दृष्टिकोन देणारा अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. एखादा विचार रुजणे ही हळूहळू होणारी प्रक्रिया असते, हे ध्यानात ठेवून समाजप्रबोधनाच्या कामात आजच्या तरुणांनी सामील व्हायला हवे. सुरुवात स्वतःपासून करायला हवी. घरच्यांच्या, समाजाच्या दबावाला बळी न पडता आपल्या सर्वच आचार-विचारांची योग्य चिकित्सा करून निर्णय घेताना आपण निर्भय बनायला हवे. आपल्या भक्तांना जादूने, चमत्काराने फसविणाऱ्या भोंदूंच्या कृतीमागील 'अविज्ञान' आपण आसपासच्या निरक्षर लोकांना पटवून द्यायला हवे. काहीवेळा त्यामागे असलेला विज्ञानाचा नियम लोकांना सांगायला हवा.

आपल्या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन का नाही, याचा विचार केला तर काही गोष्टी समोर येतात. आपल्याकडे कुटुंबात, शाळेत, समाजात मोकळेपणाने एकत्र बसून विचारविनिमय करण्याची पद्धत नाही. आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये, समाजव्यवस्थेमध्ये मुलांनी 'प्रश्न विचारावेत' याची मुभा नाही. महापुरुषांच्या दैवतीकरणातून, रुढीप्रामाण्यातून, संशोधनातून बाहेर येणारे नवे सत्य स्वीकारण्याची सहिष्णुता, नम्रता नाही. तरुणांमध्ये, लहान मुलांमध्ये ही वृत्ती जोपासली, तरच उद्याच्या आपल्या राष्ट्रात पुरोगामी वृत्ती रुजेल. खरी श्रद्धा ही अहिंसक, कृतिशील, मूल्यविवेक उन्नत करणारी असते, हा विचार तरुणांच्या मनात रुजायला हवा.

जादूटोणाविरोधी कायद्यातील कलमे पाहिली, तर त्यामुळे समाजातील अमानुष प्रथा, बुवाबाजी, रुग्णांवर होणारे शारीरिक अत्याचार, पशुबळी, मानवबळी इ. सारख्या कृतींना काही प्रमाणात निश्चित आळा बसेल. त्यातून अशिक्षित माणसांच्या अंधश्रद्धा कमी व्हायला काही प्रमाणात मदत होईल; पण कायदा हे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी टाकले गेलेले पहिले ठोस पाऊल असले, तरी समाजाची मानसिकता बदलण्याच्या मूळ गाभ्याला त्यामुळे अजिबात स्पर्श झालेला नाही.

त्यासाठी अंधश्रद्धेची मानसिकता आपल्या विकासाच्या विरोधी असल्याने ती दूर व्हायलाच हवी, हा विचार रुजायला हवा. व्यापक परिवर्तनाचे भान ठेवून आपल्या कृतींमध्ये या विचारांचे प्रतिबिंब दिसायला हवे. प्रारब्ध, नियती यांच्या आहारी न जाता मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न आपण करायला हवा.

'ठेविले अनंते तैसेचि राहावे' ही निष्क्रिय वृत्ती सोडून द्यायला हवी. आपल्या मनातील देवकल्पना तपासून घ्यायला हवी. गाडगेमहाराज सांगत, ''समाजसुधारणेसाठी जो झटतो त्याच्याठायी देव असतो. अडाण्याला शिक्षण द्यावे, बेघराला घर द्यावे, रंजल्यागांजल्यांची सेवा करावी, मुक्या प्राण्यांवर दया करावी, बाप हो, देव यांच्यामध्ये राहतो, देवळात नाही, देव आपल्या मनात राहतो.''

आपले आपण अंतर्मुख होऊन आपल्या मनात कुठल्या देवाची कल्पना गृहीत धरायची, हे प्रत्येकाने सारासार विचार करून ठरवावे. आपला देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षे लोटली. शिक्षणाचा प्रसार झाला, तरी अंधश्रद्धांचा फास अजूनही समाजाला विळखा घालून आहे. आपल्या परीने आपण अंधश्रद्धानिर्मूलनाच्या कामात स्वत:पासून सुरुवात करून समाजापर्यंत पोहोचलो, तर प्रगतीच्या अनेक वाटा आपल्या स्वागताला सिद्ध आहेत.

## सरावासाठी विषय व मुद्दे

### १. स्त्री-भ्रूणहत्या - एक सामाजिक समस्या

- स्त्री-भ्रूणहत्या समस्येचे स्वरुप-आजकालच्या घटनांचे संदर्भ
- स्त्री-भ्रूणहत्येसंदर्भात समाजाची मानसिकता
- पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये असलेले स्त्रीचे दुय्यम स्थान - कारणमीमांसा
- 'मुलगा हाच वंशाचा दिवा' अशी समाजाची मानसिकता- पुत्रजन्मासाठी अंधश्रद्धांचा घेतलेला आधार
- स्त्री-पुरुषांच्या संख्यात्मक असमतोलामुळे निर्माण होणारे प्रश्न-संख्यात्मक विश्लेषण
- उपाययोजना - शिक्षण, लोकजागृती, सामाजिक दबाव, कायद्याचे कठोर पालन
- स्त्रियांची खंबीर भूमिका आवश्यक

### २. भ्रष्टाचाराचा भस्मासूर रोखणार कसा?

- या शीर्षकातून जाणवणारी समस्येची भीषणता
- भ्रष्टाचार म्हणजे काय, विविध क्षेत्रातील भ्रष्टाचार (वैयक्तिक, सामाजिक, राजकीय इ.)
- आर्थिक भ्रष्टाचार (भौतिक सुखाची वाढती लालसा, सामाजिक - राजकीय दबाव, पैसा वाढविण्याचा झटपट मार्ग).
- नैतिक भ्रष्टाचार-काम करून घेण्यासाठी, नोकरी मिळवण्यासाठी, प्रवेश मिळवण्यासाठी इ. (लाच घेणारा-देणारा दोघेही जबाबदार) मानसिक कमकुवतता.

- सामान्य माणूस-कळत-नकळत होणारा भ्रष्टाचार
- कारणमीमांसा
- भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपाययोजना
    - ❒ जागरूक नागरिक म्हणून करावयाच्या कृती
    - ❒ निर्भयपणे भ्रष्टाचाराच्या विरोधात उभे राहणे
    - ❒ शिक्षण प्रक्रियेत नैतिक अधिष्ठान
    - ❒ भौतिक सुखे/पैसा यापलीकडचे मानसिक समाधान मिळवण्याची वृत्ती

**३. मी माझ्या देशाचा नागरिक**

- लहानपणापासून पाठ्यपुस्तकातील वाचलेल्या प्रतिज्ञेचा संदर्भ
- देशप्रेम आणि राष्ट्रीयत्वाची जाणीव, त्यासाठी इतिहासाचा अभ्यास
- देशाचा नागरिक म्हणून व्यक्तिगत हक्क-कर्तव्यांची जाणीव
- देशाच्या सद्यस्थितीचे भान
- अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार करण्याची आवश्यकता आणि क्षमता
- सामाजिक प्रश्नांविषयीची संवेदनशीलता, त्यातील सक्रिय सहभाग
- स्वतःचे काम, वर्तन यात नीतिमत्तेची केलेली जपणूक

**४. तंत्रज्ञानाची मायानगरी**

- विज्ञानामुळे तंत्रज्ञानात झालेली प्रगती
- तंत्रज्ञानामुळे उपलब्ध झालेल्या सुखसोयी
- 'अधिक उत्तम, जलद आणि वेगवान' याचे तंत्रज्ञानाने दाखविलेले गाजर
- तंत्रज्ञानाची विविध क्षेत्रे (संगणक, मोबाईल, दूरदर्शन, इंटरनेट, यंत्रे इ.)
- आजच्या काळातील तंत्रज्ञानाची अपरिहार्यता
- तंत्रज्ञान - व्यवसाय आणि नोकरीच्या संधी
- तंत्रज्ञानामुळे वाढत चाललेली भारत आणि इंडिया यातील दरी
- तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे होणारे दुष्परिणाम
- विचारपूर्वक, डोळसपणे केलेला तंत्रज्ञानाचा वापर

**५. जागतिकीकरणाचे वास्तव आणि आभास**

**मुद्दे -**

- जागतिकीकरण म्हणजे काय?-मुक्त अर्थव्यवस्था
- त्याचा इतिहास - स्वरूप
- परिणाम-जग लहान झाले
- फायदे - समृद्धी, वस्तु-सेवा यांची सहज उपलब्धी, वेगवान अर्थव्यवस्था, नवे तंत्रज्ञान येत राहाते, शिक्षण उपलब्ध
- तोटे - स्वयंपूर्णता जाते. संवेदनशीलता वाढते - अर्थकारणावर चटकन परिणाम, छोट्या कारखानदारीचा विलय, मोठ्या-समृद्ध अर्थव्यवस्थेलाच लाभ, गरीब अधिक गरीब, मंदीचा वेळोवेळी फटका, पर्यावरणाचा

नाश, अनावश्यक वस्तूंचा खप इ.
- जागतिकीकरणाची अपरिहार्यता-विकासासाठी आवश्यक, त्यासाठी मानसिकता बदलणे आवश्यक
- आवश्यक काळजी - जागतिकीकरणाचा विचार करताना देशाची अंतर्गत अर्थव्यवस्था आपल्या नियंत्रणात हवी. बाह्यतः खुल्या स्वरूपात असले तरी अंतर्गत नियंत्रित अर्थव्यवस्था हवी (चीनचे उदा.)

## सरावासाठी विषय

- पाणीटंचाई - एक ज्वलंत समस्या
- स्त्री-पुरुष समानता : काळाची गरज
- स्थिर सरकार आणि देशाचा विकास
- शिक्षण - विकासाचा पाया
- अणुशक्ती आणि भारत
- विद्यार्थी आणि राजकारण
- राष्ट्रीय एकात्मतेचे अधिष्ठान
- आपले सण, आपले उत्सव
- चला खेड्याकडे
- न्यायव्यवस्था - लोकशाहीचा आधारस्तंभ

## आ) आत्मवृत्त

'वनस्पतींना भावना असतात', हे शास्त्रीय सत्य प्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बसू यांनी मांडले. त्याविषयी वाचताना नकळत आपल्या मनात झाडे आपली कथा आपल्याला सांगत आहेत, असे चित्र डोळ्यासमोर येते. घरातले पाळीव प्राणी, दिसणारे पशु-पक्षी, एवढेच काय घरातील निर्जीव वस्तू स्वतःविषयी सांगू लागल्या, तर काय काय सांगू शकतील याची कल्पना करून ते आपण परिणामकारकपणे लिहू शकलो, तर ते होईल आत्मवृत्तपर लेखन! स्वतःबद्दलचे हे निवेदन प्रथमपुरुषी एकवचनी कर्ता वापरून लिहिणे अपेक्षित असते. हा निबंधप्रकार संवादस्वरूपात असल्याने या लेखनासाठी ''मला असं वाटतं'' अशी अनुस्वारयुक्त अकारान्त रूपे म्हणजेच बोलण्यातील भाषा (बोलभाषा) वापरण्यास हरकत नाही.

प्राणी-पक्षी हे आपल्याशी बोलू शकत नसले तरी त्यांचे जगणे आपण पाहात असतो. त्यांचे मुक्त जीवन, त्यातला आनंद, त्यांचा अधिवास, परिसंस्थेतील/अन्नचक्रातील स्थान, मानवामुळे त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांची दुःखे, मर्यादा, त्यांचे बाह्यरूप या सगळ्यांविषयी कल्पना करून त्यांचे आत्मवृत्त लिहावे लागते. त्यामुळे तुमच्या कल्पनाशक्तीला येथे मुक्त वाव असतो.

तीच गोष्ट निर्जीव वस्तूंबाबत! त्या सजीव आहेत व आपल्याशी बोलत आहेत, अशी कल्पना करताना त्या वस्तूच्या निर्मितीचा इतिहास, होत गेलेले बदल, तिची विविध रूपे, जेथे ती वस्तू वापरली जाते ती वास्तू, याविषयीची वस्तुस्थिती व त्यांच्या संबंधित भाव-भावना, सुख-दुःख, इतरांशी नाते, याविषयीची तुमची कल्पना याची बेमालूम सरमिसळ करता यावी लागते. हे सर्व मांडताना तुम्ही वेगवेगळ्या कल्पना नाट्यपूर्ण रीतीने मांडू शकता, तसे पाहिले तर आत्मवृत्त हे चेतनगुणोक्ती अलंकाराचेच विस्तृत रूप होय.

एखाद्या माणसाचे आत्मवृत्त लिहिणे हे तुलनेने सोपे असते. कारण मानवी जीवनाचा परिचय आपल्याला या ना

त्या रूपात सभोवताली होत असतो. त्या व्यक्तीचा दिनक्रम, कराची लागणारी कामे, सामाजिक स्थान, आर्थिक स्तर, त्यामुळे होणारे फायदे-तोटे, त्याच्या जीवनातील सुख-दु:खे, अविस्मरणीय क्षण, त्याचं एक व्यक्ती म्हणून जगणे व समाजातील इतरांशी असलेले नातेसंबंध, समाजाचे घटक म्हणून जगणे इ. मुद्द्यांचा विचार करून त्या व्यक्तीच्या मनात येणारे विचार-भावना यांचे चित्रण आत्मवृत्तात यायला हवे.

आत्मवृत्त लिहिण्यासाठी परकाया प्रवेश करता येणे, त्या व्यक्तीच्या, वस्तूंच्या जागी आपण आहोत, असे कल्पून विचार करणे जमायला हवे। त्यासाठी तुमच्या संवेदना तीव्र हव्यात; तुमच्या कल्पनाशक्तीला वाव द्यायला हवा. स्वत:ला ओळखून जितके आत्मनिरीक्षण तुम्ही सखोलपणे करायला लागाल, भोवतालची माणसे 'वाचायला' शिकाल, तेव्हाच दुसऱ्याच्या भावना, विचार जाणण्याची संवेदनशीलता तुमच्यात जागी होईल, दुसऱ्याच्या भूमिकेतून विचार करण्याची सवय लागेल. आपल्या व्यक्तिमत्त्वातील हा नकळत होणारा बदल आपली जीवनशैली, कार्यशैलीही निश्चित समृद्ध करून जाईल.

## १) मी रस्ता बोलतोय

**मुद्दे :** ● रस्त्याची निर्मिती आणि आजपर्यंतचा इतिहास ● रस्त्याचे प्रकार, वैशिष्ट्ये ● रस्त्याचे माणसाच्या आयुष्यातले स्थान, महत्त्व ● रस्त्यासंदर्भात भाषिक संदर्भ (कवितेच्या ओळी, वाक्प्रचार, म्हणी इ.) ● रस्त्यासंदर्भात - राजकारण, समाजकारण, अर्थकारण, भ्रष्टाचार इ. ● रस्त्याची कैफियत.

नमस्कार दोस्त, मी रस्ता! एका गावाहून दुसऱ्या, दुसऱ्या गावाहून तिसऱ्या गावाकडे जाणारा, आणि हो; येणारासुद्धा! गंमत बघा, माझ्यावरून तुम्ही प्रवास करता, येता-जाता आणि म्हणता, 'बघ, हा रस्ताच जातोय इकडून तिकडे!'

थोडं बोलायचं होतं; थोडा संवाद साधायचा प्रयत्न करायचा होता. जेव्हा आत खूप साठून येतं तेव्हा त्याला मोकळं करणं अत्यावश्यकच. हो ना? थोडं वडिलकीच्या नात्यानं, थोडं मित्रत्वाच्या आणि काहीशा माणुसकीच्या नात्यानंही. सुरुवात माझी, माझ्या कुटुंबापासूनच करतो, म्हणजे कसं सगळं मुद्देसूद, रीतसर तुमच्यापर्यंत पोचेल माझं म्हणणं. तसं आमचं कुटुंब भलं दांडगं-मोठ्ठंच्या मोठ्ठं! पण प्रत्येकाचा स्वभाव-विभाव वेगळा, रचना-प्रयोजन वेगळं, रूपही निराळं! कुणी जाड, कुणी नाजूक, कुणी थोराड तर कुणी खडबडीत. वाट, पायवाट, मार्ग, महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, सडक, हमरस्ता, वळणाचा रस्ता, घाट, पूल, उड्डाणपूल ही माझी सख्खी भावंडं. आमचं एकत्र कुटुंब आहे हं. अगदी मावस, चुलत, आत्ये एवढंच कशाला मानलेल्या भावंडांसकट! आमचा नाही विभक्त कुटुंबावर विश्वास! लोहमार्ग, सागरी मार्ग, हवाई मार्ग (याला तर आम्ही प्रत्यक्षात पाहिलंच नाहीये अजून!) आडवळण, खुष्कीचा मार्ग, भुयार हे त्यांपैकीच काही. आमच्यापैकी काही कच्चे, काही पक्के, काही डांबरी, काही मातीचे तर काही चक्क सिमेंटचेही! काही एकपदरी तर काही आठ-आठ पदरी!

तसं आपलं नातं खूप खूप जुनं. पहिला माणूस या पृथ्वीवर आला. अन्नासाठी-पाण्यासाठी तो जंगलात भटकला. तसाच दुसरा-तिसराही गेला. त्यांच्या सततच्या त्याच जागेवरून जाण्यानं तयार झाली ती पायवाट! मग माणसं या पायवाटेवरून गुरं-ढोरंही नेऊ लागली, वाट रुंदावून त्यावरून बैलगाडीही नेऊ लागली. अशा तऱ्हेने दोन वस्त्या एकमेकांना जोडल्या गेल्या. भेटीगाठी वाढल्या. व्यापार-दळणवळण वाढलं. माणसा-माणसांत संवाद वाढला. दोन माणसांना, दोन मनांनाही जोडणारा म्हणून मी ओळखला जाऊ लागलो.

वाट लागणे, वाट लावणे, वाट मारणे, वाटेस जाणे, वाट पाहणे, वाटेवर पडणे असे शब्दप्रयोग तुम्ही वापरू लागलात.

'बिकट वाट वहिवाट नसावी
धोपट मार्गा सोडू नको ।
संसारामध्ये ऐस आपुला
उगाच भटकत फिरू नको ।।'

कवी अनंत फंदी यांनी माझ्यावर कविता रचून तुम्हाला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. ज्याला स्वत:चा

'मार्ग' सापडत नाही तो तुमच्यातला 'भरकटलेला' असाही कुणी ओळखला जातो. हा तुमच्या मनातला 'मी' ज्याचा त्यालाच शोधायचा असतो. हा 'मी' प्रत्यक्षात नसतोच कधी. 'हा माझा मार्ग एकला' म्हणत जाणारा आणि गाणाराही चिमुरडा सचिन आठवतोय ना? चित्रपटसृष्टीतही मला भलतंच मानाचे स्थान आहे. बालकलाकाराची २-४ पावलं माझ्यावरून धावताना दाखवली, की झालं काळाचं गणित मांडून। आता माझ्या व्यापकतेची आणि व्यामिश्रतेची कल्पना तुम्हाला खचितच आलीच असेल.

जिथं माणूस असेल तिथं मी असतोच असतो. माझ्याशिवाय तुम्ही जाणार तरी कुठे आणि येणार तरी कुठून? पोचणार तरी कुठे? माझं महत्त्व वाढत गेलं, तसं माझं कुटुंबही विस्तारलं. आज तर या इंटरनेटच्या 'महाजाला' प्रमाणे माझंही महाजाल तयार झालं आहे आणि मला वाटतंय, की या महाजालात तुम्ही दिवसेंदिवस अडकत चालला आहात. आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून दळणवळणासाठी प्रचंड/शेकडो पर्याय उपलब्ध करताना अतिपरिचयात अवज्ञा झाली आहे.

पूर्वी लोक कष्ट करून प्रेमाने मला तयार करायचे. त्यांची पोरं-सोरं माझ्या अंगावर खेळायची. एखाद्या गावचा रस्ता हा अख्ख्या गावाचा अभिमानाचा, कुतूहलाचा विषय असायचा. त्यात भावनिक गुंतवणूक असायची. तुमची म्हणून माझीही. आल्या-गेल्याची मीही काळजी घ्यायचो. पण आजच्या या स्पर्धेच्या युगात आम्हीही नाहक ओढले जात आहोत. आम्हाला जराही उसंत न देताच रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली सारखं आम्हाला छिन्नविछिन्न करता आहात. सिमेंट - काँक्रिटचे आमचे भाऊबंद डांबरी सडकेला तुच्छ समजू लागले आहेत. मोठाले उड्डाणपूल, द्रुतगती महामार्ग तर स्वत:ला कोण समजतात कोण जाणे! सततची धावपळ, दगदग वाढतीय. बुलडोझर, कंटेनर, पोकलेन, क्रेन यांचे कर्कश्श आवाज सहनशक्तीच्या पलीकडे गेले आहेत. त्यांची, इतर वाहनांची अहोरात्र चालू असलेली घरघर, तो वेग आमच्याच छातीत धडकी भरवतो. रात्रीची शांत- निवांत झोप तर कित्येक दिवसांत मिळालीच नाहीये आम्हाला.

त्याशिवाय वाहनातून निघणाऱ्या प्रचंड धुराने आमचीही छाताडं प्रदूषित झाली आहेत. छाती दडपवणारा वाहनांचा वेग आणि त्यांच्या मजबूत, जाड रबरी टायर्सच्या घर्षणामुळे आमची जणू सालटी सोलवटून निघते आहे. दारू पिऊन बेदरकारपणे आमच्या शरीरावरून आमच्या शक्तीच्या पलीकडे तुम्ही आमचा वापर करताय आणि वाढलेल्या अपघातांचं खापर मात्र आमच्याच माथ्यावर फोडताय. प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, गुटख्याची-गोळ्या-चॉकलेटची वेष्टनं यांनी तर ऊत आणलाय. आम्हाला अगदी विद्रूप करून टाकलंय.

आताच्या या स्पर्धेच्या, गतिमान युगात आपल्या-तुपल्यातलं पूर्वीचं सहकार्याचं, जिव्हाळ्याचं नातंच हरवलंय की काय, अशी शंका येते. पूर्वी तर माणूस अनवाणी चालायचा माझ्यावरून. आमचा थेट संवाद होता. बैलगाडीची चाकंही नजाकतीनं जायची माझ्यावरून. माणूस सहज विसावायचा माझ्यावर चालतांना. विसावा घेताना 'माणूसपणाचा', 'माणुसकीचा' जो स्पर्श मला व्हायचा तो दिवसेंदिवस दुर्लभ होत चाललाय. वेळच नाही तुमच्याकडे आता. माझ्यामुळे दळण-वळण सोपं झालं, वेळ वाचतो म्हणता; पण तो वेळ स्वत:साठी, कुटुंबासाठी देण्याचं सोडून सतत धावताय आहात - बेदरकारपणे, अविचाराने. इतके धावताय की दूरदूर जाताय; माझ्यापासून तर जाताच आहात. पण एकमेकांपासूनही!

'रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता' अशी माझी निर्भर्त्सना करता. माझ्याकडून सेवा करवून घेता भरपूर पण माझ्या देखभालीचं काय? परवाचीच गोष्ट... 'उड्डाणपूल कोसळून ५ जण ठार' बातमी कळायचा अवकाश, की तुम्ही लोक माझ्या नावाने खडे फोडायला तयार. मला तयार करताना भेसळयुक्त साधनं वापरून स्वत:च्या तुंबड्या भरता, एकमेकांचे हितसंबंध जोपासता, त्याचं काय? मला तयार करायला घेता, पण कामं अर्ध्यावर सोडून दिली जातात; गरज नसताना रखडवली जातात. यात काय आनंद मिळतो तुम्हाला हे मला न उलगडलेलं कोडंच आहे. बरं, मला पूर्ण केल्यावरही कुणी बडी आसामी उद्‌घाटनाला येईपर्यंत माझ्या वापरावर बंदी आणता. मला तयार करण्यासाठी तुम्ही बेसुमार वृक्षतोडही करणार, डोंगरही पोखरणार, भेसळयुक्त कच्चा मालही वापरणार... आणि दरड कोसळून अपघात झाले, पूल कोसळले तर त्याचाही ठपका माझ्यावरच. अजबच आहे न्याय तुमचा. चोर सोडून 'रस्त्याला' फाशी, अशी गत झालीय तुमची.

पण आता बास. अशी मुस्कटदाबी आम्ही आता सहन करणार नाही. या शोषणाविरुद्ध बंड पुकारायला, असहकार करायलाही आता आम्ही मागे-पुढे पाहणार नाही. कल्पना करा-आम्ही संपावर गेलो तर। आमच्याशिवाय तुमचं अस्तित्व नाही. त्यामुळे वेळीच थोडं थांबा. ऐकून घ्या. विचारानं, विवेकानं वागा. पायी चालायची चळवळ उभी करा. या धावण्याच्या वेडापायी तुमचं काय नुकसान होतंय, तिकडेही लक्ष द्या. 'माणसा-माणसांतली दरी वाढवणारा' अशी माझी स्वत:ची ओळख मला अजिबातच बनवायची नाहीये. 'दोन गावांप्रमाणे दोन मनांना जोडणारा' अशीही मला माझी ओळख हवी आहे. नावलौकिक हवा आहे. कराल ना मला मदत?

## २) शेतकऱ्याचे मनोगत

**मुद्दे :** • शेतकऱ्याचं रोजचे जीवन • शेतकऱ्याची सामान्य सुख दु:खं • नैसर्गिक आपत्तींमुळे येणारी संकटं • शेतकऱ्याचे प्रश्न • शेतीशी निगडित राजकारण, अर्थकारण, समाजकारण इ. • शेतीची, खेड्यांची परिस्थिती सुधारावी यासाठीची तळमळ.

पहाटेच्या वेळी घरच्या कोंबड्याची बांग ऐकू येते. घरात मायचा आणि माझ्या बायकोचा-रंजीचा वावर केव्हाच सुरू झालेला असतो. अजून थोडा वेळ वाकळ पांघरून पडून राहावंसं वाटत असतं; पण डोळ्यांसमोर शेतातली कामं नाचत असतात. लवकरच पाऊस सुरू होईल. त्याआधी पेरणीची तयारी करायचीय. मन आवरून उठतो. म्हशीचं दूध काढून चा-पाणी, गरम भाकरीचा नाश्ता उरकून, शेताकडे निघतो. आसपासच्या घरांतून हेच दृश्य दिसत असतं. एकमेकांची विचारपूस करत आम्ही शेतावर पोहोचतो आणि कामाला सुरुवात होते.

उन्हाळा, पावसाळा, थंडी... ऋतू बदलतात तशी कामं वेगवेगळी. कधी नांगरणी, पेरणी, कोळपणी, खुरपणी, कापणी, मळणी... एक ना दोन! दुपार होते. कारभारीण जेवण घेऊन पोहोचते. बांधावरच्या झाडाच्या सावलीत जेवून थोडावेळ गपगार विश्रांती होते. पुन्हा कामाला सुरुवात! संध्याकाळी दिवेलागणीला घरी परतायचं. पारावर सगळे मैतर जमतात. थोड्या गप्पा, मग रातचं जेवण. दिवसभराच्या कामानं आता डोळे गपागपा मिटायला लागतात.

शहरात राहणाऱ्या तुम्हा माणसांना हे ऐकून आमचं जिणं किती छान आहे असंच वाटलं ना! पण हे म्हणजे कसं 'दुरून डोंगर साजिरे' असं! अहो, सगळेच दिवस सारखे नसतात. त्यातून शेती तर निसर्गाच्या इशाऱ्यावर चालणारी. एखाद्या वर्षी पाऊस रुसतो. मग तीच चिंता, तेच दु:ख, तेच पावसाच्या लहरीकडे अगतिकपणे पाहाणं. कर्जाची, नुकसानीची चिंता, राबराब राबायचं, कष्ट करीत जगायचं, फायदा तोट्याचं गणित दरवेळी वेगळं! यंदाचंच बघा ना! दुष्काळानं इतकं थैमान घातलं की, पाण्यावाचून तळमळण्याची वेळ आली. शहरात नळाचं पाणी धबाबा वापरणाऱ्या तुम्हाला कसे कळणार आमचे हाल? पिण्याच्या पाण्यासाठीसुद्धा उन्हाळ्यात रानोमाळ भटकायची वेळ येते. तळ गाठलेल्या विहिरीच्या डबक्यातून ओंजळ-ओंजळ पाणी उपसून आणायला लागतं. जनावरांना चारा नाही. पोराबाळांच्या पोटी पोटभर चार घास अन्न नाही. अशी अवस्था होते. अशी काही संकटं आली की, सरकारचे डोळे तात्पुरते उघडतात. टी.व्ही.वाली माणसं गावात भेट देतात. गावची काहीबाही दृश्यं टी.व्ही. वर दाखवतात. थोडीफार मदत मिळते. पण त्यातही पैसे खाणारे अधिकारी, राजकारणी असतातच. आमच्यासारख्या लहान, गरीब शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचतच नाही. जमीन उन्हाच्या कहाराने तडकलेली तर शेतकऱ्याचं मन काळजीने काळवंडलेलं. रोपं जळून गेलेली. गेल्या वर्षी काढलेलं कर्ज कसं फेडायचं, काय खायचं, गाई-गुरांना काय खाऊ घालायचं, असे नाना प्रश्न मनात थैमान घालतात. पाण्याचे टँकर, सरकारकडून मिळणारी मदत इतकी कमी आहे, की गाव सोडून जाण्यावाचून पर्याय नाही. अशा तणावग्रस्त वातावरणात होणारी घुसमट तुम्हाला कशी कळणार?

परवाच माझ्या एका मित्राने - रघूने झाडाला फास लावून घेतला. सुटला बिचारा। पण त्याच्या कारभारणीचं आणि मुलांचं भविष्य काय? आजकाल अशा घटना तर सर्रास घडतायत. मन मेल्यासारखं झालंय. पण स्वत:च्याच विवंचना इतक्या आहेत ना की, दुसऱ्यासाठी दोन टिपं गाळायलाही सवड नाही.

बरं, ही दु:खं केवळ संकटकाळातलीच आहेत असं नाही. कधीकाळी पीक बरं आलं तरी ते रास्त भावात

विकलं जाण्याचा जिवाला घोर। कारण निश्चिंतपणे आपल्या मालाला योग्य भाव मिळेल, अशी यंत्रणाच नाही. भाज्यांसारखा नाशिवंत माल साठवण्याची कोणतीही यंत्रणा गावात नसते. मग मिळेल त्या भावांला माल विकायचा. कष्ट आम्ही करायचे आणि आमच्या जिवावर व्यापाऱ्यांनी वारेमाप पैसा मिळवायचा. आमची स्थिती आहे तशीच! गावाजवळ मोठा कारखाना झालाय. त्यातलं विषारी रसायनं असणारं पाणी गावच्या नदीत सोडलंय. त्या बड्या कारखानदाराचे हात वरपर्यंत पोहोचलेले मग आमच्या तक्रारींची दखल कोण घेणार? कालव्याचं पाणी बड्या शेतकऱ्यांना मिळणार! सरकारी योजनांचा लाभही मिळवणारे उपटसुंभ तेच. आम्ही आपले तसेच कोरडे. कुणाच्या मदतीशिवाय ऊर फुटेस्तोवर राबणारे. नाही म्हणायला मालाला योग्य भाव मिळावा म्हणून आंदोलनंही होतात. अशावेळी आम्ही त्यात सामीलही होतो. पण ती आंदोलनं कधी तर कधी कधी उगवणाऱ्या बांधावरल्या छत्र्यांसारखी! त्यातही नेत्यांचं राजकारणावरच लक्ष!

आता तुम्हाला वाटेल की, खेडीही झपाट्याने सुधारतायत. पण ती सुधारणा कसली, वरवर सूज यावी ना तशी. आमच्यातले अनेकजण रस्त्यालगतची जमीन विकून गब्बर होतायत. पण त्यांना कळत नाही, की ही श्रीमंती केवळ क्षणाची आहे. अफाट पैसा हाती आला, की आमची मुलं मोबाईल, टी. व्ही., झकपक कपडे, महागड्या मोटारसायकली यांच्या भुलभुलैयात फसतायत. शिक्षणाच्या नावानं बोंब! ना धड शिक्षण, ना धड शेतीत मन रमतंय अशा पेचात सापडलीयत आमची मुलं.

पण या सगळ्याचा दोष इतरांनाच का द्यायचा? मी आणि माझ्या काही मित्रांनी हार मानलेली नाही. परवा एका सेवाभावी संस्थेची माणसं गावात आली होती. त्यांनी गावात बंधारे घालून पाणी अडवणं, पावसाची शेती की काय अशा अनेक गोष्टी समजावून सांगितल्या. आम्ही त्यावर का करायचं ठरवलंय. आमचा गाव, आमची शेती आम्हाला हवी आहे. दुसऱ्याच्या, सरकारच्या मदतीकडे निष्क्रियपणे डोळे लावून स्वस्थ बसायचं नाही. आम्ही स्वावलंबनानेच उभे राहू. पाण्याचं नियोजन करू. सहकाराचा वापर करून स्वतःच्या मालाला आपली आपणच बाजारपेठ मिळवू. खूप स्वप्नं आहेत समोर.

पण आज गावातली जवान मंडळी शेतापासून दूर पळतायत. खूप वाईट वाटतं याचं। त्यांना थोपवायला हवं. जुनी शेतीची पद्धत त्यांना आवडत नाही तर त्यांना शेतीचं आधुनिक शिक्षण मिळायला हवं. गावात चांगला दवाखाना, शाळा, कॉलेज हवं. रस्ते सुधारायला हवेत, गावात विहिरी खोदायच्या, बंधारे घालायचे, सहकारी सोसायटी स्थापन करायची, तिचं काम आपणच गावकऱ्यांनी सचोटीनं पाहायचं, अशी एक ना दोन, अनेक स्वप्नं आम्ही बघतोय.

माझा बाबा सांगतो, पूर्वी गावाजवळची नदी झुळूझुळू वाहात होती शेतामध्ये हिरवीगार रोपं झुलायची. अवर्षण, अतिवृष्टी ही संकटं यायची मधूनच कधीतरी! माणसामाणसांत कुरबुरी व्हायच्या नाहीत असंही नव्हतं, पण माणुसकी होती. आता गावात वीज आहे. वरवरच्या सुधारणा आहेत. पण तेव्हाच्या गावच्या संस्कृतीतला ताजेपणा हरवलाय कुठेतरी! ना धड सुधारणा, ना धड परंपरेतलं समाधान. ही परिस्थिती बदलायला हवी. स्वतःच्या शेतात पिकलेलं धान्य मुलाबाळांच्या तोंडी पोटभर पडावं. गाई-गुरांनी गोठा भरलेला असावा. घरात म्हातारा-म्हातारीचा प्रेमळ वावर असावा. शेतात ट्रॅक्टर यावा, मुलांनी नवी शेती शिकावी .... अशी एक ना दोन ... अनेक स्वप्नं.

तुमचीही मदत आम्हाला हवीय. कराल ना? माझं शिक्षण थोडं फार झालंय. सगळं आयुष्य घरापासून गावच्या वावरापर्यंत! बैलगाडीच्या, गावाच्या आकाभोवतीच मर्यादित! सगळी हयात शेतात राबण्यात गेली. तक्रार नाही याबद्दल... पण माझा मुलगा शेती शिकेल. कुणी डॉक्टर होईल, मास्तर होईल, ....... पण ही मुलं गावात परत यायला हवीत. कारण आमच्या गावांचं गावपण टिकवत, नवीन सुधारणा आणणं या नव्या पिढीच्याच हातात आहे ना? गावाचा रस्ता काट्याकुट्यांनी भरलेला आहे आज. पण तो सुधारून हिरवागार करायचाय मला! कारण शेवटी हाडाचा शेतकरी आहे मी!

शेतात डुलणाऱ्या पिकाबरोबर आम्हा शेतकऱ्यांची मनं आशेच्या हिंदोळ्यावर झुलतात. खूप धान्य पिकावं, कर्ज फेडता यावं, उरलेल्या पैशात वर्षभराची बेगमी करावी, सणावाराला मुलाबाळांच्या अंगावर नवा कपडा असावा, तोंडी गोड घास जावा, इतकी छोटी स्वप्नं आम्ही पाहात असतो. ती तर पुरी व्हावीतच, पण आमच्या मुलांनी गावाचं नंदनवन करायचं स्वप्न पाहायला हवं, यासाठी काय करता येईल याचाच विचार करतोय आम्ही आजकाल!

## सरावासाठी विषय व मुद्दे

### १. आरशाचे मनोगत

- आरशाची निर्मिती - शोध
- आरशाचे घटक, प्रकार, शास्त्रीय तत्त्व, त्यानुसार होणारे उपयोग
- आरशातील वेगवेगळ्या प्रतिमा, त्यामागचे शास्त्र
- माणसाला आरसा का हवा! स्त्री-पुरुष, लहान-मोठे यांचा आरशाकडे बघण्याचा दृष्टिकोन.
- माणसाचं बाह्यरूप आणि आरसा यांचा संबंध
- माणसाच्या चेहऱ्यावरील भाव हाच त्याच्या मनाचा आरसा
  (माणसाचा चेहरा हाच त्याच्या मनाचा आरसा)

### २. कचरा कामगाराचे आत्मकथन

- दिनक्रम
- करावे लागणारे शारीरिक कष्ट, कामाचे स्वरूप
- कामाला प्रतिष्ठा नसल्याबद्दलचे दु:ख
- आत्मसन्मानाला बसणारी ठेच
- आर्थिक अडचणी
- घरगुती/कौटुंबिक अडचणी
- स्वच्छतेचे दूत म्हणून सन्मान

### ३. मी गंगा नदी बोलतेय

- गंगा नदीची उगमापासून समुद्राला मिळेपर्यंतची वाटचाल
- भारतीयांच्या मनातील गंगा नदी विषयीचे धार्मिक महत्त्व
- अंधश्रद्धेतून केला जाणारा व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी होणारा गंगा नदीचा गैरवापर
- पर्यावरणाचा समतोल ढळल्याने होणारा प्रकोप
- आपल्या ठिकाणी असणाऱ्या शक्तीचा मानवकल्याणासाठी उपयोग व्हावा ही तळमळ
  (नद्याजोड प्रकल्प, ऊर्जानिर्मिती केंद्रे इ.)
- पंतप्रधानांचे 'गंगा नदी स्वच्छता अभियान'
- माणसाकडून अपेक्षा

### ४. कारागृहाचे मनोगत

- इमारतीची रचना, स्थान, एकाकीपण (कारागृहाच्या भिंती, दगडी थंडपणा)
- कारागृह - बंदिवान - यांच्याविषयीच्या भावना.
- गुन्हेगार - दुष्प्रवृत्त माणसे यांचा वास- त्यामुळे वाट्याला येणारी उपेक्षा/अवहेलना
- अभिमान वाटावा अशा माणसांचा सहवास.
- इतिहासातील दाखले (स्वा. सावरकर, लो. टिळक, क्रांतिकारक, आणीबाणीतील कार्यकर्ते, नेल्सन मंडेला इ.), कारागृहातील वाङ्मयनिर्मिती
- कैद्यांविषयी कधी येणारा राग, कधी वाटणारी करुणा.
- कैदी, कर्मचारी, जेलर - त्यांचे संबंध, एकंदर वातावरण, व्यवस्था इ.

**५. महाविद्यालयीन तरुणाईचे मनोगत**

- महाविद्यालयातील वातावरण
- तेथील स्वातंत्र्य, बंडखोरी, हक्क-कर्तव्यांची होणारी जाणीव, येणारी प्रगल्भता
- मित्रमंडळ-प्रभाव
- उमेद, जिद्द काहीतरी करण्याच्या/बनण्याच्या प्रवासाची सुरुवात
- स्वप्न पाहणे व त्यासाठी कष्ट करणे अशी मानसिकता
- वेगवेगळी आकर्षणे, होणारी दिशाभूल
- घरच्यांकडून, समाजाकडून आणि स्वत:कडूनही असणाऱ्या अपेक्षा, त्यांची पूर्तता
- वेगवेगळे प्रश्न, संवेदनशीलतेने केलेला विचार, विचारपूर्वक केलेली कृती

## सरावासाठी विषय

- मातृभूमीचे मनोगत
- किल्ल्याचे आत्मकथन
- मी पंतप्रधान बोलतोय
- मी वसुंधरा बोलतेय
- अनाथ मुलाचे मनोगत
- सामाजिक कार्यकर्त्याचे मनोगत
- साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे मनोगत
- एका अभयारण्याचे मनोगत
- पिंजऱ्यातील सिंहाची कैफियत
- खुर्चीचे आत्मवृत्त

## इ) चरित्रात्मक निबंध

चरित्रात्मक निबंधात सामान्यत: कोणत्यातरी क्षेत्रात असामान्य, लोकोत्तर कार्य केलेल्या व्यक्तीचे जीवन, व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, तिचे कार्य, समाजमनावरील प्रभाव यांचा परिचय समग्र तरीही नेमक्या शब्दांत करून देणे अपेक्षित असते. व्यक्तिचित्र व चरित्रलेखन यात फरक आहे. व्यक्तिचित्रात व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू नाट्यपूर्ण शब्दांत मांडता येतात. मात्र चरित्रात चरित्रनायकाचा जन्म-मृत्यू, त्याची बालपण-तारुण्यातील जडणघडण, तेव्हाची सामाजिक स्थिती, प्रत्यक्ष कार्य, त्याचे गुणविशेष, कामाचे वेगळेपण, आयुष्यातील महत्त्वाच्या घटना इ. चे निवेदन असते.

चरित्रात्मक निबंध लिहिताना तारीखवार क्रमानेच मांडणी केली पाहिजे असे नाही. त्या व्यक्तीच्या जीवनातील एखाद्या प्रभावी प्रसंगाने, एखाद्या वचनाने, तत्कालीन समाजपरिस्थितीचे वर्णन इ. कोणत्याही पद्धतीचा अवलंब आपण करू शकतो. त्या त्या चरित्रनायकाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, कार्य यांचे तपशील पूर्वतयारीशिवाय, अभ्यासाशिवाय लक्षात राहणे शक्य नसते. यासाठी थोर लोकांची चरित्रे वाचताना नोंदी करणे आवश्यक असते. प्रत्येक क्षेत्रातील एका तरी व्यक्तीच्या चरित्रलेखनाचा सराव करायला हवा. त्यात राजकीय नेत्याचे राजकीय कार्य, समाजसेवकाचे सामाजिक काम, त्यासाठी करावा लागलेला संघर्ष, संशोधकाच्या संशोधनाचे तपशील, लेखकाचे साहित्य

इ त्याची वैशिष्ट्ये, उद्योजकाची यशस्वितेकडे होत गेलेली वाटचाल, इ. गोष्टींवर आपल्या लेखनात भर द्यायला हवा.

चरित्रात्मक निबंध हा त्या व्यक्तीच्या जीवनातील वास्तव घटनांवर अवलंबून असल्याने दोन व्यक्तींच्या एकाच चरित्रनायकावरील लेखनाचा आशय बहुतांश सारखाच असेल. चरित्रनायकाच्या जीवनकार्याविषयी तपशील काटेकोर व बिनचूकपणे गोळा करायला हवा. मात्र, त्याचे विश्लेषण, अन्वयार्थ, मांडणी यामध्ये लालित्याचा व प्रतिभेचा कुशल वापर केला गेला, तर आपला निबंध इतरांपेक्षा वेगळा व रोचक होऊ शकतो.

## आनंदवनाचा योगी - बाबा आमटे

**मुद्दे :** • बालपणापासूनची जडणघडण • जीवितकार्याची दिशा सापडण्याचा नेमका क्षण • कुष्ठरुग्णांसाठी 'आनंदवना'ची स्थापना • उपचारांबरोबरच ताठ मानेने जगण्याची प्रेरणा • उद्योगधंद्यांतून स्वावलंबन • युवाग्राम प्रकल्प, अंधशाळा, संधिनिकेतन असे विविध प्रयोग • दुर्गम भागातील रुग्णांपर्यंत पोहोचण्यासाठी सोमनाथ प्रकल्प • युवाशक्तीचा रचनात्मक कामासाठी उपयोग - श्रमसंस्कार छावण्या • हेमलकसा प्रकल्प • अवघ्या कुटुंबाचा सहभाग • भारत जोडो अभियान • पुरस्कार, सन्मान • लेखन - 'ज्वाला आणि फुले', 'उज्ज्वल उद्यासाठी' • प्रेरणेचे सामर्थ्य

१९६८ सालची गोष्ट. सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे बाबा आमटे यांच्या आनंदवनात पोहोचले, ते एका आगळ्यावेगळ्या विवाहसोहळ्यासाठी. कुष्ठरोगमुक्त झालेली आठ जोडपी तेथे विवाहबद्ध होत होती. त्यांचे धर्मपिता होते बाबा आमटे आणि माता साधनाताई! भारावलेल्या मन:स्थितीत हा सोहळा अनुभवणाऱ्या पु. लं. ना बाबा म्हणाले, ''वेरूळची भग्न शिल्पं पाहताना फुटलेली नाकं, तुटलेले हात मनाने भरून काढता ना? मग ह्या जिवंत भग्नावशेषांतील मूळचे शिल्प तुम्हाला दिसत नाही?''

त्या क्षणी पु. लं. च्या मनात दाटून आलेल्या भावना त्यांनी पुढील थरारक शब्दांत व्यक्त केल्या आहेत - '... क्रूर काळाने घाव घातला नसता, तर त्यातल्या वधूच्या नाकात नथ चमकली असती; तुटलेल्या हातांत हिरवा चुडा खळखळला असता; पायांत तोरड्या रुमझुमल्या असत्या. काळाने शरीरावर घाव घातले; पण बाबांनी त्यांची जगण्याची इच्छा तेवत ठेवली; शरीरांची डागडुजी केली. प्रश्न होता तो त्यांना माणसात आणण्याचा. त्यासाठी त्यांनी विज्ञानाला राबवले आणि जीवनाचे नवे दर्शन या कुष्ठरोग्यांना घडवले.'

बाबांच्याच शब्दांत -

इथे रुद्र झाले दु:ख, गळे निढळ गंगा
आणि निर्मितीचा पेटे अखंड दंगा
आता येथे ज्ञानाचीही उजाडे पहाट
नव्या माणसाची इथुनी निघे पायवाट...

या अदम्य उत्साहाने बाबा आमटे यांच्या कामाचा जो अखंड यज्ञ सुरू झाला, तो ९ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या त्यांच्या मृत्यूपर्यंत अखंड धगधगत राहिला; पुढेही राहील.

अतिशय श्रीमंत घरात जन्मलेल्या मुरलीधर आमटे उर्फ बाबांमध्ये बंडखोर वृत्ती लहानपणापासूनच होती. वकिलीची पदवी घेतली त्याकाळात म. गांधीजींच्या विचारसरणीने त्यांच्या मनाला भुरळ घातली होती. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये वकिलांची संघटना उभारून त्यांनी सक्रिय योगदान दिले. वास्तविक, उच्च पदवी, उत्तम वक्तृत्व, भरभक्कम कमावलेले शरीर, निर्भय वृत्ती असे संपन्न व्यक्तिमत्त्व त्यांना आरामदायी जीवन द्यायला पुरेसे होते. पण बाबांनी सारी सुखं सोडली आणि ध्येयधुंद मनोवस्थेत ते वनवासाला निघाले. त्यांचे भाग्य असे, की त्यांच्या स्वप्नांमध्ये समरसून सहभागी होणारी पत्नी त्यांना साधनाताईंच्या रूपात भेटली आणि सुरू झाली एक आनंदयात्रा... आत्यंतिक कष्टांनी, काट्याकुट्यांनी भरलेली तरीही अनिर्वचनीय समाधान देणारी.

अनेक प्रयोग चालू होते; पण जीवितकार्याची निश्चित दिशा सापडली नव्हती. ती त्यांना लख्खपणे दिसली

रस्त्याच्या कडेला पडलेल्या एका कुष्ठरोग्याच्या रूपात. एक क्षण मनात किळस, घृणा दाटून आली. दुसऱ्या क्षणी मनात विचार आला; 'परमेश्वराची कृपा नसती, तर याच्या जागी मीही असू शकलो असतो'. साक्षात्काराचा हा क्षण बाबांनी घट्ट पकडला. त्या रुग्णाला घेऊन ते घरी आले. 'तो रुग्ण मरण पावला; पण कुष्ठरोगसेवेचे यज्ञकुंड पेटवून', अशा सार्थ शब्दांत साधनाताईंनी या प्रसंगांचे वर्णन केले आहे. यातूनच मग 'आनंदवन' जन्माला आले. सरकारने या प्रकल्पासाठी जमीन दिली ती अगदी जंगलातली. बाबा आपली पत्नी, दोन मुले, सहा कुष्ठरोगी बांधव आणि एक लंगडी गाय घेऊन १९५१ साली तिथे पोचले. वाघ, साप, विंचू यांचे निवासस्थान ते; पण बाबा हटले नाहीत. आपल्या मनीचे स्वप्न फुलवण्यासाठी त्यांना इतकेही पुरेसे होते; कारण मनातली जिद्द, वेड त्याहून अनेक पटींनी मोठे होते कुष्ठरोग्यांवर उपचार करून त्यांना पुन्हा चांगले जीवन मिळवून देण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले.

आनंदवनामध्ये बाबांनी कुष्ठरोग्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवले. राहण्यासाठी झोपड्या बांधणे, अन्नधान्यासाठी शेती करणे यापासून अनेक पूरक उद्योग त्यांनी सुरू केले. अर्थात ही प्रक्रिया सोपी नव्हती. अनेक अडचणी होत्या. पण त्यावर मात करत बाबांनी भंगलेल्या शरीरांना, खचलेल्या मनांना जगण्याची उभारी दिली; ताठ मानेने जगण्याची प्रेरणा दिली. आनंदवनातील विविध उद्योगांतून, उपक्रमांमधून साक्षात कर्मयोगाचे आचरण त्यांना शिकवले. आनंदवनात सर्वार्थाने कुष्ठरोग्यांना स्वत:च्या पायावर उभे केले जाते; उपचार केले जातात, निवास उपलब्ध करून दिला जातो; वेगवेगळी साधने उपलब्ध करून देऊन कष्टाची भाकरी मिळवण्याची संधी दिली जाते; त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. आणि मग दैवाने मोडतोड केलेल्या चेहऱ्यांवर उमलते हास्य... समाधानाचे... आत्मविश्वासाचे....

आनंदवनातील दिवस पहाटे चार वाजताच सुरू होतो. बोटं झडलेल्या थिट्या हातांना कामाची सवय लागावी आणि स्वाभिमानाचा ताठ कणा लाभावा, यासाठी इथे सारी धडपड असते. 'मी महारोगी, मी अपंग, मी अंध, मी काहीच करू शकत नाही', ही खंत किंवा 'मला हे जमेल का?' हा प्रश्न येथील कष्टकऱ्यांच्या मनात येऊ नये, याची काळजी आनंदवनात घेतली जाते. त्यामुळेच गेली सहा दशके तिथे महारोगाने, अंधत्वाने, अपंगत्वाने झाकोळून गेलेली जीवने उजळून निघाली. जन्माला येतानाच उपेक्षा घेऊन आलेल्या जिवांमध्ये 'सुंदर मी होणार' यासोबत 'सुंदर मी करणार' हा मंत्रही तिथे जोपासला जातो.

आनंदवनाची व्याप्ती जशी वाढत गेली तशी बाबांना नवी आव्हाने सामोरी आली. त्यातून विविध उपक्रम उदयाला आले. तेथील रोगमुक्त रुग्णांची मुले व आसपासच्या खेड्यातील गरीब, अशिक्षित, बेरोजगार तरुणांच्या प्रशिक्षणासाठी 'युवाग्राम प्रकल्प' उभारला गेला. 'अंधशाळा', 'संधिनिकेतन', 'कृत्रिम अवयव निर्मिती' प्रकल्प असे विविध प्रकल्प आज तिथे राबवले जातात. पर्यावरण जपणारी बांधकामे, जलसंधारण, कम्यून पद्धती (सामूहिक निवास) इ. नवनवीन प्रयोग इथे चालू असतात.

आनंदवनाच्या स्थापनेनंतर अधिक दुर्गम भागांतील रुग्णांपर्यंत पोहोचण्यासाठी १९६७ साली सोमनाथ प्रकल्पाची सुरुवात झाली. आनंदवन, हेमलकसा आणि इतर प्रकल्पांमधील अन्नधान्याचा प्रश्न सोडवण्यासाठी या प्रकल्पांचा उपयोग झाला. सोमनाथच्या निबिड अरण्यात १० महारोगी रुग्णांसह बाबांनी काम सुरू केले. स्वत: बाबा, त्यांची मुले आणि सोबती रुग्ण यांच्यासह बाबांनी कष्टपूर्वक सोमनाथ कृषिक्षेत्र उभारले. त्याद्वारे आजूबाजूच्या खेड्यांचा विकास हाही हेतू होता. शेतीचे आधुनिक प्रयोग, बंधारे बांधणी, धरणे, जलव्यवस्थापन, नैसर्गिक खतांचा आग्रह त्यातून या आडरानात एक अनौपचारिक कृषिविद्यापीठच उभे राहिले. सुरुवातीच्या श्रमसंस्कार छावण्यांतून बाबांनी युवाशक्तीचा रचनात्मक कामासाठी उपयोग करून घेतला. आजही हजारो युवक दरवर्षी इथे श्रमदानासाठी जमा होतात.

आनंदवन उभारताना घाम व अश्रू यांचा अभिषेक करावा लागला; तर हेमलकसातील लोकबिरादरी प्रकल्प उभारताना नैसर्गिक आपत्ती, अज्ञान, अंधश्रद्धा यांना सामोरे जावे लागले. १९७३ साली गडचिरोली जिल्ह्यात हेमलकसा इथे हा प्रकल्प सुरू झाला. येथील माडिया, गोंड हा आदिवासी समाज अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य यांच्या अंधारात चाचपडत होता. डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाताई या जोडप्याने

भामरागडच्या जंगलात मुक्काम ठोकला. प्रथम आरोग्याचे प्रश्न सोडवायचे ठरले. कुपोषण, वैद्यकीय उपचारांचा अभाव, साथीचे रोग, अंधश्रद्धा या सगळ्यांना तोंड देण्यासाठी तिथे दवाखाना उभा राहिला. अज्ञानावर मात करण्यासाठी शाळा सुरू झाली. अखेर आदिवासींनी त्यांना स्वीकारले.

हेमलकसा येथील अनाथ प्राणिसंग्रहालयही खूप लक्षवेधी आहे. एकदा एका आदिवासींच्या टोळक्याने एका माकडिणीची शिकार केली. त्या मृत आईला बिलगून तिचे पिल्लू दूध पिऊ पाहत होते. डॉ. प्रकाश आणि मंदाताई यांच्या मनात करुणा जागी झाली. ते त्या पिलाला घेऊन घरी आले. त्यानंतर सिंह, वाघ, बिबट्या, मोर, साप, अजगर अशा अनेक प्राण्यांची देखभाल इथे केली जाऊ लागली.

ही सर्व कामे चालू असताना देशाच्या इतर प्रश्नांपासूनही बाबा दूर राहिले नव्हते. १९८५ साली त्यांनी 'भारत जोडो' अभियानाच्या माध्यमातून देशभर भ्रमंती करून राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रयत्न केले. तसेच, जीवनाच्या उत्तरार्धात 'नर्मदा बचाओ' आंदोलनातही सक्रिय सहभाग घेऊन आपले वास्तव्यच नर्मदेकाठी नेले.

पद्मश्री (१९७१), पद्मविभूषण (१९८६) यांसारखे अनेक राष्ट्रीय पुरस्कार तर मॅगसेसे पुरस्कार (१९८५), युनायटेड नेशन्स मानवी हक्क पुरस्कार (१९८८), दी टेम्पलटन पुरस्कार (१९९०), गांधी शांतता पुरस्कार (१९९९) यांसारख्या अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी बाबांना सन्मानित केले. पण त्याहीपेक्षा देशविदेशातील अनेक व्यक्ती, संस्था आज स्वेच्छेने त्यांच्या कार्यामध्ये मुक्तहस्ते योगदान करतात; समाजसेवेचा आदर्श म्हणून त्यांच्याकडे पाहतात हाच त्यांचा सर्वांत मोठा बहुमान आहे. बाबांच्याच शब्दांत सांगायचे तर -

**...... जेव्हा वेदनांचे नाते जुळते**
**तेव्हा माणसामाणसांतल्या भिंती**
**आणि राष्ट्राराष्ट्रांतल्या तटबंदी कोसळून पडतात.....**

हेच खरे!

आज बाबांचे कार्य त्यांची दोन मुले डॉ. प्रकाश, डॉ. विकास, दोन्ही सुना, नातवंडे, नातसुना तितक्याच समर्थपणे पुढे चालवत आहेत. समाजसेवेच्या संदर्भात अशी भाग्याची घटना जगात क्वचितच पाहायला मिळते.

बाबांच्या उत्कट वृत्तीची स्पंदने म्हणजे त्यांचे कवितासंग्रह...... 'ज्वाला आणि फुले', 'करुणेचा कलाम'! तर बाबांनी तरुण मनांशी केलेले मुक्त हितगुज म्हणजे 'उज्ज्वल उद्यासाठी' हा लेखसंग्रह!

त्यांनी एका सुंदर जगाचे स्वप्न पाहिले -

**'येथे नांदतात श्रमर्षी या भूमीला क्षरण नाही**
**येथे ज्ञान गाळते घाम, विज्ञान दानवशरण नाही**
**येथे कला जीवनमय, अर्थाला अपहरण नाही**
**येथे भविष्य जन्मत आहे, या सीमांना मरण नाही'**

मात्र त्यासाठी तरुणांनी सर्जनशील साहसांसाठी तयार व्हायला हवे. भान ठेवून योजना आखायला हव्यात अन् बेभान होऊन त्या अमलात आणायला हव्यात, असे कळकळीचे आवाहन बाबांनी तरुणांना उद्देशून केले आहे.

दि. १० फेब्रुवारी, २००८ रोजी, वयाच्या ९४व्या वर्षी बाबांचे देहावसान झाले. जीवनात भरती ओहोटीच्या लाटांवर आरूढ होऊन सतत आव्हाने झेलत बेहोशपणे प्रवास करणारी 'बाबा आमटे' नावाची प्रेरणा आज शरीराने आपल्यात नसली तरी कार्यरूपाने, शब्दरूपाने आपल्याला सतत सोबत करत राहील.

## सरावासाठी विषय व मुद्दे

### १) लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

- जीवनक्रम
- जडण- घडणीत म. गांधी यांच्या विचारांचा प्रभाव
- स्वातंत्र्यलढ्यातील योगदान
- महत्त्वाचे लढे (खेडा सत्याग्रह, बारडोलीचा लढा - महत्त्वाचे काम - सरदार ही उपाधी प्राप्त, मिठाचा सत्याग्रह)
- कार्य - गुजरात विद्यापीठाची स्थापना, संस्थानांच्या विलीनीकरणाचे कार्य, काँग्रेसच्या घटनात्मक कार्यात सिंहाचा वाटा.
- नेहरूंशी झालेले तात्त्विक मतभेद, नेहरू-पटेल यांच्यातील म. गांधी हा दुवा
- संपूर्ण राष्ट्रवादी भूमिका - देश बलवान, श्रमवान व स्वावलंबी व्हावा हे सूत्र
- सद्यकालीन परिस्थितीतले महत्त्व
- गुण/स्वभाव वैशिष्ट्ये - स्पष्टवक्तेपणा, अन्यायाबद्दलची चीड, जिद्द, मुत्सद्देगिरी, कठोर शिस्त, वास्तववादी भूमिका

**२) स्त्रीमुक्तीच्या आद्य प्रणेत्या - सावित्रीबाई फुले**

- १९ व्या शतकातील सामाजिक स्थिती, स्त्रियांची अवस्था
- म. फुले यांच्या साथीने होत गेलेला सावित्रीबाईंचा विकास
- स्वत: कष्टाने घेतलेले शिक्षण
- कार्य- स्त्री-शिक्षणाच्या कार्याची मुहूर्तमेढ-१८४८ साली महाराष्ट्रातील पहिल्या मुलींच्या शाळेची स्थापना
- तेथे अध्यापनाचे काम
- स्त्रियांसाठी प्रसूतिगृह व बालहत्या प्रतिबंधक गृहाची निर्मिती
- अस्पृश्यांसाठी पाणी खुले.
- शूद्रातिशूद्रांसाठी वसतिगृहाची स्थापना
- केशवपनाविरुद्ध न्हाव्यांचा संप घडवून आणला
- १८९७ च्या प्लेगच्या साथीत पतीच्या पश्चातही कार्य
- स्त्रीशक्ती जागृत केल्याशिवाय स्त्रीमुक्ती नाही - हे आयुष्यभराचे ब्रीद
- स्वभाव, गुणवैशिष्ट्ये - मुळात हुशार, जिज्ञासू वृत्ती, धाडसी, करारी, द्रष्ट्या, जिद्दी, कर्तबगार, प्रसिद्धीचा हव्यास नाही.

**३) श्वेतक्रांतीचे जनक - डॉ. वर्गीस कुरियन**

- जीवनक्रम
- परदेशात दुग्धव्यवसायातील अभियांत्रिकी पदवी मिळवली.
- कार्य - 'कैरा जिल्हा दूध उत्पादक संघा'तील कार्य - अल्पवेतनावर काम, शेतकरी सहकारी संघाचे नेते त्रिभुवनदासजी पटेल यांच्या समवेत कार्य.
- म्हशीच्या दुधापासून भुकटी करण्याचा जगातला पहिला कारखाना काढला
- १९५५ मध्ये 'आणंद' येथे 'अमूल' डेअरीची स्थापना
- 'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' (एन. डी. डी. बी) ची स्थापना

- १९७५ पर्यंत देश दुधाच्या बाबतीत स्वयंपूर्ण - श्वेतक्रांतीचे जनक
- इतर महत्त्वाचे - केवळ 'दूध' केंद्रबिंदू नाही - ग्रामीण व्यवस्थेत सामाजिक - आर्थिक बदलाचे साधन
- निरक्षर लोकांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देऊन त्यांना विकास प्रक्रियेत सामील करून घेतले. लोकांच्या भागभांडवलावर डेअरीची उभारणी.
- सहकारी तत्त्वावर उभी असलेली अशिया खंडातील सर्वात मोठी डेअरी
- 'माणसे' हे भारताचे सगळ्यात मोठे भांडवल याची नेमकी जाणीव
- संघटनेतून सहकाराकडे
- धर्म- जात - लिंग कुठलेच भेद न मानता राष्ट्रीय एकात्मतेचे पुरस्कर्ते
- ग्रामीण भागातील स्त्रीचा दर्जा उंचावला
- स्वाभिमानाची प्रेरणा
- स्वभाव - गुणवैशिष्ट्ये - प्रखर देशाभिमानी, दांडगा आत्मविश्वास कीर्ती/पैसा यांचा हव्यास नाही. जिद्द, चिकाटी, सामान्य शेतकऱ्यांविषयी आस्था, कुशल व्यवस्थापक.

**४) राज्यघटनेचे शिल्पकार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

- जीवनक्रम
- प्रतिकूल परिस्थितीत घेतलेले शिक्षण
- शाहूमहाराजांच्या मदतीने परदेशात शिक्षण
- दलित समाजाची तत्कालीन परिस्थिती, वाट्याला येणारी अवहेलना
- कार्य - दलित चळवळीचे उद्‌गाते (१९१४ सालचा महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह)
- दलित समाजाला एकत्र करून आत्मसन्मानाची जाणीव दिली.
- 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.' हा मंत्र दिला.
- निर्भीड झुंजार पत्रकार/लेखन/ग्रंथ
- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार.
- इतर सामाजिक - शैक्षणिक योगदान
- मानवतावादी भूमिका - न्याय न मिळाल्याने बौद्ध धर्माचा केलेला स्वीकार
- दलित लेखकांचे/चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान
- आज आंबेडकरांचे विचार विस्मृतीत जाऊन होणारे विभूतीपूजन- त्याबद्दलचे चिंतन.
- स्वभाव - गुणवैशिष्ट्ये - करारी, जिद्दी, बंडखोर, बेडर वृत्ती
- प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करण्याची तयारी.
- अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची क्षमता.
- नेतृत्वगुण, संघटन कौशल्य इ.

**५) डॉ. मेघनाद साहा - एक भविष्यदर्शी वैज्ञानिक**

- जीवनक्रम - बालपणापासून गणितात रुची - शिक्षण संपल्यावर उपयोजित गणित - विभागात अधिव्याख्याता, नंतर भौतिकशास्त्रात मौलिक संशोधन.

- खगोल विज्ञान, स्टॅटिस्टिकल मशिन्स, स्पेक्ट्रोस्कोपी, डिसोसिएशन, रेडिओलहरींचे प्रसारण इ. विषयात मोलाचे संशोधन
- १९३५ साली 'इंडियन सायन्स न्यूज असोसिएशन' संस्थेची स्थापना, अणुऊर्जेचा उद्योगक्षेत्रासाठी वापर, नद्यांच्या खोऱ्यांचा विकास, राष्ट्रीय अर्थकारणाचे नियोजन इ. विषयांवर लेखन
- 'आण्विक ऊर्जेचा वापर सदैव शांततेसाठी' - या विचाराचे प्रवर्तक
- राष्ट्रीय सौर दिनदर्शिकेची निर्मिती
- सामाजिक बांधिलकी - राष्ट्रीय नियोजनातील सहभाग, विद्यापीठीय शिक्षण, बहुउद्देशीय नदीप्रकल्प, औद्योगिकीकरण इ. विषयांवर लोकसभेत आवाज.
- परमाणू भौतिकी संस्थेचा विकास.
- आजच्या काळात त्यांच्या विचारांचा, कार्याचा संदर्भ
- स्वभाव - गुणवैशिष्ट्ये - ज्ञानलालसा, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, लोकहिताची तळमळ, स्फूर्ती व क्रियाप्रवणतेचा अखंड स्रोत

### सरावासाठी विषय

- स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते - महर्षी धोंडो केशव कर्वे
- राष्ट्रपिता महात्मा गांधी
- तेजशलाका झाशीची राणी
- माझा आवडता कवी
- प्रखर राष्ट्रप्रेमी स्वातंत्र्यवीर सावरकर
- भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी
- माझा आवडता पुढारी/नेता
- कर्मयोगी गाडगेबाबा
- माझा आवडता संत
- मला भावलेला उद्योजक

## ई) कल्पनाविस्तारात्मक निबंध

नावाप्रमाणे कल्पनेचा विस्तारच या निबंधात करायचा असतो. निबंधविषयाच्या शीर्षकातून सांगितलेले शाश्वत सत्य, स्थलकालातीत सत्य आपल्याला उलगडून दाखवायचे असते. स्वत:च्या शब्दांत मनोरंजक पद्धतीने सांगायचे असते.

त्यासाठी सर्वप्रथम शीर्षकात दडलेला विचार, अर्थ, कल्पना, सांगितलेले सत्य समजून घ्यायला हवे. आपला दैनंदिन अनुभव, आपले वाचन, अभ्यास यातून माहीत झालेली, इतिहासातील विविध क्षेत्रातील उदाहरणे यातून निबंध - शीर्षकातील आशय अधिक खुलवता येईल व आशयातील सौंदर्य अधिक स्पष्ट होईल.

शीर्षकातील अर्थ उलगडून सांगितल्यावर, आनुषंगिक अर्थ उदाहरणांतून, अनुभवांतून, नेमकी,

प्रभावी शब्दयोजना साधत लिहावा. काही वेळा दिलेल्या वचनातील गर्भितार्थ वेगळा असतो. वापरलेले शब्द रूपकात्मक असतात. तेही स्पष्ट करून सांगावेत. दिलेल्या विषयाशी सुसंगत अशा काही काव्यपंक्ती, सुप्रसिद्ध वचने माहीत असतील, तर तीही निबंधात पेरावी. कवी-कवयित्रीला, संतांना त्यातून काय सांगायचे आहे हे शोधताना, आपल्याला त्याचा काय अर्थ गवसलाय तेही जरूर मांडावे. तो अर्थ आपल्याला दैनंदिन जीवनात कुठे कुठे जाणवतो तेही सांगावे.

थोडक्यात, शीर्षकातील विचार दुसऱ्याला पटवून द्यायचे आहेत, अशा आकर्षक पद्धतीने मांडावेत. एकच मुद्दा असला तरी त्याच्या स्पष्टीकरणासाठी वेगवेगळे पैलू, अर्थच्छटा, अनुषंगाने येणारे वेगळे विचार यामुळे निबंधाला विशिष्ट आकृतीबंध गवसेल.

## १) आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे

**मुद्दे :** • स्वप्नपूर्तीसाठी, ध्येयप्राप्तीसाठी आकांक्षेची गरज • आकांक्षा आणि इतर गुणांचा संबंध • रोजच्या जीवनातील, तसेच असामान्य व्यक्तींची उदाहरणे • समारोप.

नुकताच दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. परीक्षेत उत्तुंग यश मिळविलेल्या मुलांचे फोटो वृत्तपत्रांमध्ये झळकले. त्याचबरोबर काही अपंग मुलांच्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवणाऱ्या मुलांच्या यशोगाथाही रोज प्रसिद्ध होऊ लागल्या. त्या वाचत असताना मनात आले, सुस्थितीत असणारी, सर्व अनुकूलता असणारी अनेक मुले आहेत; पण त्यांना म्हणावे तसे यश मात्र मिळवता येत नाही. काय असावे यामागचे कारण?

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी तीव्र इच्छा-आकांक्षा बाळगत उत्तुंग यश मिळवण्याचे स्वप्न उरात जपले आहे. विविध पाकळ्यांनी उमलण्याची तीव्र आस-आकांक्षा मनात बाळगली आहे. चिवट जिद्दीने, स्वकर्तृत्वाने प्रतिकूल परिस्थितीवर ठसा उमटवला आहे. त्यासाठी एकाग्रतेने, उत्साहाने, आनंदाने कष्ट करत, प्रचंड मेहनत करत आपल्या स्वप्नाकडे झेप घेतली आहे. कुठून येतात हे गुण? कराव्या लागणाऱ्या संघर्षाने जगावर चिडावे, बंड करावे, त्यात आपली शक्ती खर्च करावी, असे वाटत नसेल का त्यांना? पण नाही. जिद्द, चिकाटी, परिश्रम, प्रखर आत्मविश्वास, प्रचंड आशावाद आणि मुख्य म्हणजे हवे ते मिळवण्याची प्रखर इच्छाशक्तीच त्यांना गगनाला भिडण्याइतके मोठेपण देऊन जाते. धडधाकट शरीर, अनुकूल परिस्थिती असून जर काही करण्याची इच्छाच नसेल, तर अशा माणसाच्या हातून काही भव्यदिव्य घडण्याची शक्यता शून्यच असते!

अर्थात, यशस्वी होण्यासाठी दरवेळी अशी प्रतिकूल परिस्थिती असावीच लागते असे नाही. एखाद्या ध्येयाने प्रेरित होऊन डोळसपणे स्वप्न पाहणाऱ्या व्यक्तींच्या मनातील आकांक्षाही तीव्र असते. इतिहासाकडे नजर टाकली, तर दिसेल की मूठभर मावळ्यांना संघटित करून, सामर्थ्यशाली मुघलांना नामोहरम करून स्वराज्य स्थापण्याची आकांक्षा शिवरायांनी कुमार वयातच मनात बाळगली होती. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहिला, तर विविध मार्गांनी ते मिळवण्यासाठी अवघे आयुष्य पणाला लावणाऱ्या देशभक्तांची तीव्र तळमळ चकित करून जाते. या लढ्यात शिरीषकुमार, नानी गोपाळ यांच्यासारखे कोवळ्या वयाचे कुमारही होते. अंदमानच्या तुरुंगात अंधारकोठडीची सजा भोगणाऱ्या सावरकरांच्या मनातील देशप्रेमाची ज्योत प्रतिकूल परिस्थितीतही तेजाने तेवत राहिली. महात्मा गांधींनी सामान्य भारतीयांच्या मनातील देशप्रेम जागवून असहकारातून अहिंसेचा अवलंब करून जनआंदोलन यशस्वी केले. कारण एकच, 'जिथे जायचे ठरले तेथे जाऊच जाऊ,' हा विश्वास त्यांच्या मनात होता.

सामाजिक क्षेत्रात भव्य-दिव्य काम करणारे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर यांनी आपले काम सुरू केले, त्यावेळची सामाजिक स्थिती त्यांच्या आकांक्षा कधीच पूर्ण होणार नाहीत असे वाटायला लावणारी होती. स्त्री शिक्षणासाठी धडपडणाऱ्या सावित्रीबाईंना समाजाची किती अवहेलना सहन करावी लागली, हे आपल्याला माहीत आहेच. आज विविध क्षेत्रांत आत्मविश्वासाने शिक्षण घेणाऱ्या, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या स्त्रिया ही जणू सावित्रीबाईंच्या आकांक्षांची पूर्तीच होय. स्वत:च्या अपंगत्वावर मात करून अपंगांसाठी संस्था उभ्या करणाऱ्या नसीमा हुरजूक, आपल्या पतीसमवेत खांद्याला खांदा भिडवून दुर्गम भागात आयुष्य घालवून

समाजासाठी कार्यरत असणाऱ्या डॉ. स्मिता कोल्हे, डॉ. मंदा आमटे, डॉ. राणी बंग अशी किती उदाहरणे आठवावीत? अशक्य वाटणारी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या जिद्दीची, प्रयत्नांच्या शिकस्तीची ही मूर्तिमंत उदाहरणे।

अफाट सागरातून जलयात्रेला निघालेल्या कोलंबसाला अमेरिकेचा शोध लागला, तो या इच्छाशक्तीच्या बळावरच। त्याच्या या मनोवृत्तीचे वर्णन कवी कुसुमाग्रजांनी किती परिणामकारक शब्दात केले आहे -

'अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला.......'

विविध प्रकारचे संशोधन करणारे शास्त्रज्ञही कशाच्या बळावर देहभान विसरून संशोधन करतात? कोणत्याही संशोधनाचा इतिहास पाहिला तर एकेकाळी अशक्य, असाध्य वाटणारी गोष्ट केवळ इच्छाशक्तीच्या बळावर अथक प्रयत्नांनी साध्य झालेली दिसते. माणूस पक्ष्याप्रमाणे उडू शकेल, ही एकेकाळी केवळ कल्पनेत असलेली गोष्ट। पण राईट बंधूंनी लावलेल्या विमानाच्या शोधाने अक्षरश: गगनाला गवसणी घातली. आज माणूस मंगळावर पोहोचला आहे, तिथे वसाहतीची स्वप्ने पाहातो आहे.

शास्त्रज्ञ एखादा सिद्धांत मांडताना सततचे प्रयोग, सर्व शक्याशक्यता पडताळून पाहणे, अशा अनेक विविध पायऱ्यांतून जाताना तहानभूक हरपून प्रयत्न करतात. शारीरिक, बौद्धिक कष्ट तर असतातच; पण कधी समाजाच्या विरोधालाही तोंड द्यावे लागते. कधी आर्थिक हलाखीच्या स्थितीला सामोरे जावे लागते. यश समोर आले असे वाटत असतानाच धाडकन कधीतरी अपयशाला सामोरे जावे लागते.

पण अशक्य वाटणाऱ्या गोष्टी त्यांना प्रयत्नांनी शक्य करता येतात. एव्हरेस्टसारख्या उच्चतम शिखरांवर चढाई करणारे गिर्यारोहक प्राणांची बाजी लावूनच या मोहिमा सर करतात. कोणत्याही क्षणी मृत्यूच्या दरीत भिरकावले जाऊ, ही भीती त्यांच्या मनाला शिवतही नाही.

ही सगळी असामान्य माणसांची उदाहरणे आहेत; आकाशातल्या चंद्रासारखी। चंद्र खूप उंच आहे, दूरचा आहे. त्यामुळे आपण असामान्य माणसांसारखे होणे शक्यच नाही, असे वाटू न देता तीव्र इच्छाशक्ती मनात जागी केली पाहिजे. असाध्य वाटणाऱ्या गोष्टींची स्वप्ने पाहिली की, आकाशही ठेंगणे वाटावे, असे कर्तृत्व आपल्या हातून घडू शकेल. त्यासाठी सुरुवात लहान गोष्टींपासून करूया. आपल्या परीक्षेतील यश, स्पर्धेतील यश यांचा ध्यास घेऊया. मग हळूहळू मोठी स्वप्ने आपल्या मनात रुजतील. अर्थात नुसते स्वप्नरंजन म्हणजे आकांक्षा नव्हे. स्वप्ने जेव्हा क्रियाशील बनतात, प्रेरणा देणारी, मार्गदर्शन करणारी, नवे सामर्थ्य प्रदान करणारी बनतात, तेव्हा बाबा आमटे यांच्या शब्दात 'पंखांना क्षितिज नसते'. 'विकास-सतत विकास' हा ध्यास मनात असेल तरच गगनाला भिडण्याचे सामर्थ्य येते. उत्कट, दिव्य, भव्य गोष्टींचा ध्यास धरला, महान आकांक्षा मनात बाळगून त्या प्रकाशात चालत राहिले तरच 'गगन ठेंगणे' वाटू शकते. मी जीवनात काहीतरी श्रेष्ठ, भव्य दिव्य मिळवलेच पाहिजे, ही प्रबळ इच्छा आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनामध्ये निर्माण व्हायला हवी.

आपले आजचे जीवन स्पर्धामय झाले आहे. पण आपण स्पर्धा कशासाठी करीत आहोत, आपले अंतिम उद्दिष्ट काय आहे, हे सतत मनात वागवणे अतिशय महत्त्वाचे आहे. वैयक्तिक, भौतिक सुखापलीकडच्या भव्य आकांक्षा मनात ठेवल्या, तरच काही भव्य-दिव्य काम आपल्या हातून घडेल. आज भारतात वाढती लोकसंख्या, अज्ञान, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा अशा अनेक समस्या सोडविणे अशक्यप्राय वाटत आहे. पण योग्य नियोजन, अथक संघटित प्रयत्न, विकासाचा ध्यास, नीतिमत्तेचे अधिष्ठान यांच्या बळावर आपण हे चित्र नक्कीच बदलू शकू. भारत हा जगातील एक अग्रगण्य देश बनावा, हे स्वप्न नक्की पुरे होईल. गरज आहे ती फक्त तीव्र आकांक्षा मनात बाळगून गगनाकडे झेप घेण्याची!

ही स्वप्ने साकार करण्यासाठी आपल्या सर्व क्षमता पणाला लावायची, लढायची तयारी ठेवायची. जिद्द, चिकाटी, अभ्यास यांच्या साहाय्याने संकटांशी दोस्ती करायची. अडथळे येणारच, अपयशही शक्य आहे. तरी आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत राहण्याची जिद्द बाळगायची. मग आपण उत्साहाने म्हणू, 'Sky is the limit.'

'जोनाथन सीगल' नावाच्या एका कादंबरीत हाच विचार प्रभावीपणाने मांडला आहे. 'सीगल' हा फारसे उडता न येणारा एक समुद्रपक्षी। खूप उंचीवर त्याला उडता येत नाही. तो किनाऱ्यावरच राहतो. थोडेसे उडतो. समुद्रातल्या

काठावरचे छोटे मासे खाऊन जगतो. त्यांच्यातील जोनाथन नावाचा एक तरुण पक्षी गरुडाप्रमाणे भरारी घेण्याचे स्वप्न पाहतो. आपल्या बरोबराच्या इतर पक्ष्यांकडून होणारी अवहेलना झेलत, अपयश आले तरी चिकाटीने सतत उंच, आणखी उंच उडण्याचा सराव करत राहतो. एक दिवस समुद्रापारची स्वर्गवत भूमी पाहण्याचे स्वप्न पुरे करतो. सुरुवातीला एकाकी असणाऱ्या जोनाथनला मग अनेक सहप्रवासी मिळतात.

आपल्या मनातल्या 'जोनाथन'ला जागे करता आले, तर आपले पंखही क्षितिज ओलांडतील. त्यासाठी भव्य, दिव्य स्वप्नांची आकांक्षा तेवढी मनात तेवती ठेवायला हवी।

## २) ग्रंथ आमुचे साथी । ग्रंथ आमुच्या हाती ।

**मुद्दे :** ● ग्रंथांचे आपल्या जीवनातील स्थान - प्रेरणा देणे, संवेदना जागवणे. ● शब्दशक्ती ● लहानपणापासून पुस्तकांनी दिलेला आनंद, केलेली जडणघडण ● ग्रंथ ही महाशक्ती-वैचारिक वाङ्मयाचे काम ● मराठी वाङ्मयाचा विचार ● भावना, विचार यांचे ग्रंथांनी केलेले पोषण ● समाजमन घडवण्यात पुस्तकांचा वाटा.

कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या या किती सार्थ ओळी! खरोखरच पुस्तकासारखा उत्तम मित्र नाही. आमच्या सुखदुःखात, एकटेपणात, अस्वस्थतेत, हतबलतेत, निराधार, द्विधा मनस्थितीत आम्हाला समजून घेणारा, पाठीवर हात ठेवणारा, आम्हाला 'लढ' म्हणून उभारी देणारा, ग्रंथाशिवाय दुसरा कोण? हे अनुभवाने ओथंबलेले, प्रेरणेने भारलेले, जगाची आणि जगण्याचीही समज-भान वाढवणारे, माझ्यापासून समष्टीपर्यंत पोहोचवणारे, जाणिवा प्रगल्भ करणारे, जीवनाचे अमर्यादपण, त्यातले सौंदर्य, प्रवाहीपण उलगडून दाखवणारे, ज्ञानाची-माहितीची खिडकी खुली करणारे ग्रंथ जोपर्यंत आमच्या हातात आहेत तोपर्यंत आम्हाला कसली वंचना? कसले भय? कुठली निराशा? कसली अस्वस्थता? आज आमच्या हातात प्रेरणादायी इतिहास, लाखमोलाचे पूर्वसंचित ग्रंथरूपाने उपलब्ध आहे. इतिहासातले द्रष्टे विचारवंत, मनगटात जोर आणि जोम असलेले लढवय्ये, बुद्धीने जगाला दिपवून टाकणारे शास्त्रज्ञ-संशोधक, कवी-कलावंत-प्रतिभावंत या ग्रंथांतून आमच्या पाठीशी उभे आहेत. हे ग्रंथ आमच्या हातात कधी शस्त्र म्हणून कधी अस्त्र म्हणून आहेत. ते कधी मार्गदर्शक-गुरु-दिशादर्शक म्हणून आम्हाला लाभलेले आहेत... कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या या छोट्याशा ५-६ शब्दांच्या ओळीत केवढे सामर्थ्य आहे. सकारात्मकता आहे। अशा आशय - अनुभवसंपन्न साहित्यावरच तर पिढ्यान् पिढ्यांचा समाज पोसला आहे.

लहानपणी जादूच्या गोष्टी, पऱ्यांच्या कथा, साहसकथा वाचता वाचता आपण कधी मोठे होतो, हे समजतही नाही. 'श्रीमान योगी' 'ययाति' 'स्वामी' 'मृत्युंजय' यांतल्या झुंजार नायकांचा संघर्ष, त्यांची तत्त्वे, त्यांचा 'आपुलाच वाद आपुल्याशी' या धर्तीवर चाललेला संघर्ष आपल्यालाही मोठ्ठे करतो. धनंजय कीर हे चरित्रलेखक आपल्याला एका टप्प्यावर भेटतात. त्यांनी साकारलेली थोरांची चरित्रे वाचून या महापुरुषांचे जीवनसंघर्ष, त्यांच्या ध्यासातील सातत्य, संशोधनातील मर्म उलगडत जाते. घरामध्ये छान उबदार, सुरक्षित जीवन जगत असतानाच हळूहळू पुस्तकांच्या माध्यमातून समाजातील विविध दुःखे समजायला लागतात. मनाच्या कक्षा रुंदावायला लागतात. जीवनात सगळेच अनुभव आपण प्रत्यक्ष घेऊ शकत नाही. त्यामुळे वाङ्मयात भेटणाऱ्या विविध व्यक्तिरेखा आपले अनुभवविश्व समृद्ध करत जातात. पारध्यांचा दिशाहीन झालेला समाज आपल्याला 'पारध' मधून भेटतो. 'झाडाझडती', 'ब्र' अशा ग्रंथांतून आपल्याच समाजाचे वास्तव चित्रण आपल्या डोक्यात लख्ख प्रकाश टाकते.

'दिक्कालातुनी आरपार आमुची दृष्टी पहाया शके'

असे केशवसुतांनी म्हटले आहे. आपण सामान्य माणसे जे पाहू शकत नाही, ते प्रतिभावान लेखक त्याच्या दिव्यदृष्टीने पाहतो व आपल्यापर्यंत तो अनुभव पोहोचवतो. जणू प्रत्येक पुस्तक हे बनते एक निमंत्रण- कधी हिरव्या हिरव्या गार गालिचाचे, कधी झपूर्झाचे, कधी झपतालाचे तर कधी लंपनच्या भाबड्या भावजीवनाचे। जीवनात रंग भरण्याचे काम ग्रंथ करतात. आचार्य अत्र्यांची 'झेंडूची फुले' वाचताना आपण मनापासून हसतो. 'उपरा' सारखे आत्मचरित्र वाचताना आपण अंतर्मुख होतो. अपूर्वाई, पूर्वरंग लिहिणाऱ्या

पु. लं. सारख्या सिद्धहस्त लेखकाबरोबर जगभराचा प्रवास करून येतो. 'डॉ. श्वाईट्झर' सारखे पुस्तक वाचताना जीवनाचा अर्थ गवसल्यासारखा वाटतो. खरोखरच जगण्यासाठी केवळ भाजी-भाकरीचीच गरज नसते, तर आणखीही काही हवे असते, ते आपल्याला पुस्तके देतात. म्हणून तर 'ग्रंथ आमुचे साथी' हे शब्द यथार्थ वाटतात.

पुस्तके नसतील तर जगात ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात जी नवनवीन भर पडते आहे, त्याच्याशी आपली ओळखच होणार नाही. आयुष्यातला फावला वेळ निरपेक्ष आनंदात घालवायचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे वाचन! मनाचा, बुद्धीचा ताजेपणा टिकवून ठेवायचा असेल, तर वाचनाला पर्याय नाही.

हे केवळ ललित ग्रंथांच्याच बाबतीत नाही हं. तर, कोणतेही ज्ञान-माहिती मिळवायला ग्रंथ हवेतच. 'ज्ञानेश्वरी' पासून 'भारतीय राज्यघटनेपर्यंत', शालेय पाठ्यपुस्तकांपासून विश्वकोश-कोश वाङ्मयापर्यंत, वैद्यक, वकिली, शिक्षणशास्त्र, व्यवस्थापन, अर्थकारण-राजकारण, संगणक अशा ग्रंथांपासून आहार-आरोग्य-पाककृतींपर्यंत ... ग्रंथांच्या साह्यानेच तर एक-एक पायरी चढत जीवन 'अर्थ' पूर्ण होत असते.

'ग्रंथ कोंडून ठेवू नका कपाटात सुरक्षित
नको पहाऱ्यावर तुसड्या चेहऱ्याचे रखवालदार
जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते
कपाटाच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुडदे'

'वाचाल तर वाचाल' हे केवळ व्यक्तीच्या अस्तित्वाच्या संदर्भातच नव्हे, तर राष्ट्राच्या अस्तित्वासंदर्भातही खरे आहे; हा विचार कवीने या ओळींमध्ये मांडला आहे. मानवी जीवन क्षणभंगुर असले, तरी त्यातले काही क्षण चिरंजीव करण्याचे काम ग्रंथ करीत असतात.

ग्रंथ ही महाशक्ती आहे, हा विचार स्पष्ट करताना पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'ग्रंथसत्ता' या शब्दाचा समर्पक वापर केला आहे. अनेक राष्ट्रांच्या आर्थिक जीवनावर ग्रंथांनी सत्ता गाजवली, असे दिसून येते. कौटिल्याचे 'अर्थशास्त्र', ॲडम स्मिथचा 'वेल्थ ऑफ नेशन्स' मार्क्सचा 'कॅपिटल' या ग्रंथांनी तर जगच हादरवून टाकले. जगात झालेल्या विविध क्रांत्यांचा इतिहास पाहिला, तर त्यामागे प्रभावी असे ग्रंथच होते असे लक्षात येईल. रुसोचा 'सोशल कॉन्ट्रॅक्ट', थॉमस पेनचा 'रॉईट्स ऑफ मॅन' या ग्रंथांनी ग्रंथसत्तेचे सामर्थ्य सिद्ध केले.

ग्रंथांचं माहात्म्य सांगताना कवी मंगेश पाडगावकर म्हणतात,

'जेव्हा हुकूमशाही आवळते गळ्याभोवती फास
तेव्हा ग्रंथच पेरतात तिच्या ठिकऱ्या करणारे सुरुंग
शोषणाच्या अंधारात ग्रंथच होतात नवे सूर्य'

सूर्य म्हणजे जीवनदाता. म्हणूनच 'ग्रंथ आमुचे साथी' हे वचन अर्थपूर्ण वाटते.

मराठी वाङ्मयातील ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम आदी संतांच्या रचनांनी मराठी मनांना आकार दिला. मरगळलेल्या मराठी मनांना रामदासांच्या वचनांनी चैतन्य दिले. विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक या त्रयीने महाराष्ट्राला पुनरुज्जीवित केले. कविता, कथा, नाटक, कादंबरी इ. वाङ्मय प्रकारांनी मानवी भावनांना शब्दरूप दिले.

संस्कृतीचा, सद्‌विचारांचा वारसा पुढील पिढीच्या हातात सोपविणारे हे ग्रंथच असतात. विविध सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींना ग्रंथच प्रेरणा देतात. आज कुठल्याही क्षेत्रामध्ये एकदा केलेले अध्ययन पुरेसे ठरत नाही. त्या-त्या विषयात नवीन विचारांची, तंत्रांची भर पडत असते. त्याच्याशी आपण सतत परिचित राहायला हवे. त्यासाठी स्वाध्याय हवा, वाचन हवे. तेच आपल्याला या जीवनप्रवासात तरून नेते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याबद्दल एक प्रसंग सांगतात. सैन्यात असताना त्यांना एकदा निराशेने ग्रासले. आत्महत्येचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. रेल्वे फलाटावर विमनस्क अवस्थेत बसले असताना अपघातानेच त्यांच्या हातात स्वामी विवेकानंदांचे छोटेखानी पुस्तक आले. आपल्याला 'त्या पुस्तकामुळे प्रेरणा मिळाली, हिंमत, उभारी मिळाली.' असे ते आवर्जून सांगतात. पुस्तकांच्या बाबतीतली पु. लं. नी सांगितलेली अजून एक आठवण.

युद्धात जखमी अवस्थेत एक सैनिक प्रतिकूल परिस्थितीत जगण्याशीच जणू झुंज देत होता. वारंवार घायाळ होत होता. त्या भीषण अवस्थेत खाद्यपदार्थ गुंडाळलेला कागद अचानकच त्याच्या हातात आला आणि त्या पठ्ठ्याने 'माझे खाद्यजीवन' हा पुलंचा त्यावरचा लेख चक्क वाचला. आणि हे सगळे खाण्यासाठी का होईना जगलेच पाहिजे, ही तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली.

इंग्रजी राजवटीमुळे शिक्षण आले. शिक्षणामुळे जग बदलले, क्षितिज विस्तारले. पाश्चात्य अनेकविध-अभिजात साहित्याची रूपांतरे-भाषांतरे होऊ लागली. 'भाषांतर युग' अवतरले. लोक आपल्या समाजाकडे वेगळ्या दृष्टीने पाहू लागले. सामाजिक सुधारणा हवी, असे वारे वाहू लागले. भारताच्या बाबतीत बोलायचे झाले, तर सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात महाराष्ट्र आणि प. बंगाल हे प्रांत आघाडीवर होते. याचे कारण असेही सांगतात, की त्यावेळी या दोन प्रांतात पुष्कळ साहित्यही निर्माण झाले. ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो' अशांसारख्या साहित्यकृतींनी समाजमन घडवण्याचे मोठे काम केले. सामाजिक सुधारणांबद्दलचे विचारमंथन, चर्वितचर्वण सुरू झाले. या दोन राज्यांमध्ये सामाजिक सुधारणांसाठी, त्यांच्या स्वागतासाठी आवश्यक पार्श्वभूमी ग्रंथांमुळेच तयार झाली.

१९६० नंतरच्या दलित-ग्रामीण साहित्य प्रवाहांनीही जाती-पातीतले अंतर कमी करून समाजाला एकत्रित करण्याचे काम केले. त्या-त्या समाजातील दारिद्र्य-दुःखे, अवहेलना, अपमान, राग-द्वेष, बंड सर्वांसाठी खुले केले. एका वेगळ्या-अनभिज्ञ जगाची 'ओळख' निर्माण झाली. यातूनही समाज सुधारणेच्या कामाला वेग आला. जातीपातीच्या बेड्यांतून महाराष्ट्राला मुक्त करण्याकडे वेगाने वाटचाल सुरू झाली.

वाचन माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करते. खऱ्या अर्थाने जीवनाचे दर्शन घडवते. वाचनाने नव्यानव्या जाणिवांची मोकळी हवा मिळते. मन विशाल बनते. वाचनाने संकुचितपणाच्या बेड्या गळून पडतात. शब्दांच्या जादूने जीवनातले दुःख आपण विसरतो. कधी सुरुंग बनून हेच शब्द अंधाराचा पहाड फोडतात. कधी हेच शब्द मनावर हळुवार फुंकर घालतात.

आणि म्हणून कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात-

**ग्रंथ आमुचे साथी । ग्रंथ आमुच्या हाती ।।**

## सरावासाठी विषय व मुद्दे

**१) अरे मानसा मानसा कधी व्हशीन मानूस**

- माणसातल्या अमानुषपणाचे दर्शन घडवणारे प्रसंग
- त्या अनुषंगाने बहिणाबाईंच्या उक्तीचे स्पष्टीकरण
- माणसाची भौतिक प्रगती - हरवलेले माणूसपण
- माणूसपण हरवण्यामागची कारणमीमांसा
- माणूसपण जपणाऱ्या व्यक्तींची उदाहरणे/दाखले
- त्या दृष्टीने आपण काय केले पाहिजे? समारोपात्मक विवेचन

**२) रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले?**

- काव्यपंक्तीचा अर्थ
- स्वातंत्र्य म्हणजे काय? कोणकोणत्या बाबतीतले स्वातंत्र्य?
- स्वातंत्र्याची ऊर्मी, त्यासाठीची जागरूकता
- इतिहासातील संदर्भ - आपल्या देशातील आणि इतर देशातील स्वातंत्र्यलढे
- सामाजिक स्वातंत्र्यलढे - महात्मा फुले, महर्षी कर्वे, डॉ. आंबेडकर, नेल्सन मंडेला, इ. ची धडपड

- आपल्या रोजच्या जीवनातील तत्त्वांसाठीचा लढा
- स्वातंत्र्याचा योग्य आग्रह - त्यासाठी लढा करण्याचा निर्भयपणा

**३) मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।**

- प्रत्येक कृतीचा मनाशी असलेला संबंध, कुठल्याही कृतीमागची प्रेरणा (लादलेले काम की मनापासून स्वीकारलेले?)
- प्रसन्नचित्ताने काम केले की काम सहजसाध्य होते.
- कितीही कष्टप्रद, यातनामय कामातूनही आनंद प्राप्त होतो.
- उदाहरणे
- मनाच्या प्रसन्नतेच्या आड येणाऱ्या गोष्टींवर मात करणे. (स्पर्धा, अतिमहत्त्वाकांक्षा, स्वार्थी वृत्ती इ.)
- रोजच्या जीवनालाही प्रसन्नपणे सामोरे जाणे.

**४) जिथे राबती हात तेथे हरी**

- काव्यपंक्तीचा अर्थ
- शेतकरी, कामगार, कष्टकरी यांची होणारी उपेक्षा
- श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व
- सामाजिक सन्मान मिळणे आवश्यक
- पुरेसा आर्थिक लाभही हवा
- शारीरिक कष्टांबरोबरच वैचारिक, बौद्धिक कष्टांची प्रतिष्ठा

**५) विद्येविना मती गेली...**

- काव्यपंक्तीचा अर्थ - म. ज्योतिबा फुले यांनी ज्या काळात हे लिहिले तो सामाजिक संदर्भ
- मती, नीती, गती, वित्त... हे विद्येशिवाय मिळत नाही, याचे स्पष्टीकरण व परिणाम
- आजच्या काळातील संदर्भ घेऊन या काव्यपंक्तीचा अर्थ
- शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया
- माणूस म्हणून जगण्याशी या विचाराचा असलेला संबंध
- समारोप

(मूळ पंक्ती - विद्येविना मती गेली । मती विना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।।
वित्ताविना शूद्र खचले । एवढे सारे एका अविद्येने झाले ।।)

## सरावासाठी विषय

- ग्रामकाल हा विशाल भूधर । सुंदर लेणे तयात खोदा
- एकमेका साह्य करू अवघे धरु सुपंथ
- वेदना जाणावया जागवू संवेदना
- आळसे कार्यभाग नासतो
- वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
- सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो

- दिव्यत्वाची जेथ प्रचीती
- दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो
- अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
- लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
- संघटना हे सूत्र बनावे

## उ) वर्णनात्मक निबंध

एखादे वेगळे दृश्य पाहिले, वेगळा अनुभव घेतला तर तो कुणाला तरी सांगावा, असे सामान्यतः आपल्याला वाटते. तो प्रसंग आपण जर रसाळ भाषेत तरीही नेमकेपणाने कथन केला, वर्णन केला तरच दुसऱ्याला ऐकावासा वाटेल. नेमके हेच तत्त्व वर्णनात्मक - दिलेल्या प्रसंगावरून लिहिलेल्या निबंधात अभिप्रेत असते.

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, प्रसंगाचे, अनुभवाचे शब्दचित्र रेखाटणे या प्रकारच्या निबंधात अभिप्रेत असते. अशा प्रकारच्या लेखनासाठी सूक्ष्म निरीक्षणशक्ती आवश्यक असते. या प्रकारच्या निबंधात तुम्ही अनुभवलेल्या प्रसंगाचे वर्णन करणे आणि त्याला कल्पकतेची जोड देणेही अपेक्षित असते.

त्यासाठी प्रसंगाचे, दृश्याचे तपशील अत्यंत महत्त्वाचे असतात. या तपशीलात आवश्यक ती काटछाट करून वा भर घालून निबंधाचा आराखडा मनात तयार करायला हवा. प्रसंग कसा घडला, याचे केवळ तटस्थ वर्णन न करता (केवळ नोंदी न मांडता) त्या क्षणी बघणाऱ्याच्या मनात कोणत्या भावना निर्माण झाल्या, कोणते विचार आले याचेही वर्णन करायला हवे.

निबंध वाचणाऱ्याच्या डोळ्यांसमोर तो प्रसंग साक्षात उभा राहावा, यासाठी आपण करत असलेले वर्णन जिवंत व प्रत्ययकारी वाटायला हवे. तसेच त्या विशिष्ट प्रसंगाचा बघणाऱ्याच्या मनावर नंतरही काय परिणाम झाला, अनुषंगाने व्यक्तिगत, सामाजिक अंगाने केलेला विचार इ. याचा समावेश झाल्याशिवाय निबंधाला खोली प्राप्त होत नाही.

अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्या प्रसंगाचे वर्णन करावयाचे असेल, तो प्रसंग तुम्ही प्रत्यक्ष अनुभवला असेलच असे नाही. परंतु कधी तशा प्रकारच्या घटनेचे वृत्त आपण कुठेतरी वाचलेले असते; दुसऱ्या व्यक्तीच्या अनुभवाचे वर्णन ऐकलेले असते. त्याचा उपयोग करून तुम्ही तो प्रसंग प्रत्यक्ष अनुभवता आहात, अशी कल्पना करून तुम्ही तो स्वतःच्या शब्दात मांडू शकता. तसेच एखाद्या लेखकाने केलेल्या प्रसंगवर्णनाच्या भागाचा अभ्यास करून ते आपल्याला का आवडले, याचा विचार करून स्वतःची लेखनशैली विकसित करता येते. सरावाने वाचकाला जणू ही घटना आपल्या डोळ्यांसमोर घडते आहे, असा अनुभव देण्याचे सामर्थ्य तुमच्या चित्रदर्शी प्रसंगवर्णनात नक्कीच येईल.

एकूण वर्णनात्मक निबंध लिहिताना आपल्या निरीक्षणातून, विषयाच्या चिंतनातून प्रत्यक्ष अनुभवातून सुचणारे मुद्दे जितके महत्त्वाचे असतात, तितकीच तुमची कल्पनाशक्ती, वर्णनशैलीही खूप महत्त्वाची ठरते. कारण सर्वसाधारण ढोबळ अनुभव तर त्या विषयाच्या संदर्भात सर्वचजण वापरतील; पण कल्पनेने तुम्ही आपल्या निबंधात वेगळे रंग भरू शकाल.

### एका वृद्धाश्रमाला भेट

**मुद्दे :** ● वृद्धाश्रमाचे दृश्यवर्णन ● निरीक्षणांतून जाणवलेल्या गोष्टी ● अनुभवाचे, प्रसंगाचे वर्णन ● परिस्थितीबाबत चिंतन, स्वतःचे मत ● व्यवस्था सुधारण्यासाठी कोणते प्रयत्न.

'प्रत्येक वसाहतीला एक चेहरामोहरा असतो. स्वतःची भाषा असते, संस्कृती असते. माणसं बदलतात. काही दिवसांसाठी तिथलीच होऊन राहतात. स्वतःचं अस्तित्व जपताना भोवतालच्या वातावरणाचा एक भाग बनून जातात'. अशाच एका थोड्या वेगळ्या वसाहतीत - एका वृद्धाश्रमात जाण्याचा प्रसंग मी अनुभवला, जो मनात खूप सारे प्रश्न निर्माण करून गेला.

आमच्या लांबच्या नात्यातील एक मावशी पुण्याजवळच एका वृद्धाश्रमात गेली ५-६ वर्षे राहतात. त्या खूप आग्रहाने नेहमी आमंत्रण द्यायच्या तिथे येण्याचे. या दिवाळीच्या सुट्टीत जायचेच तिकडे, असे ठरवले अन् पोहोचलोसुद्धा। गावापासून थोडीशी दूर, शांत वातावरणातील वृद्धाश्रमाची इमारत तशी नजरेत भरण्यासारखी होती. तिथल्या अंगणात दोन-चार वृद्ध स्त्रिया फिरताना दिसल्या. आम्ही जाताच कुणाकडचे पाहुणे ही उत्सुकता प्रत्येकीच्या नजरेत दिसत होती. वृद्धाश्रम तसा मध्यमवर्गीयांसाठी असल्याने ना दीनवाणी अवस्था होती, ना खूप ऐषारामाचीही। थोडे जास्त पैसे देऊन स्वतंत्र खोली किंवा एका खोलीत दोन वृद्ध अशी सोय होती. पलंग, टेबल, खुर्ची, कपाट, खोलीत दूरचित्रवाणीचीही सोय, प्रत्येक खोलीत स्वच्छतागृह अशी रचना होती.

मावशींचे यजमान गेल्यानंतर सून-मुलाचे आपल्याकडे होणारे दुर्लक्ष पाहून त्यांनी वृद्धाश्रमात येण्याचा मार्ग स्वेच्छेने निवडला होता. तिथल्या वास्तव्यात त्या खुशही असाव्यात असे वाटत होते. गप्पांमध्ये 'हे आमचं घर' असे उल्लेख येत होते. काही मैत्रिणी मिळाल्या होत्या. फावल्या वेळात कॅरम-पत्ते खेळणे, संध्याकाळी फिरायला जाणे, आपल्या खोलीत हवे तर एखादा पदार्थ बनवणे, हवा तेव्हा टी. व्ही. पाहाणे या दिनक्रमात मावशी चांगल्या रुळल्या होत्या. येणाऱ्या पाहुण्यांसाठी जेवणाची सोयही होती. आश्रमाची बांधणी विचारपूर्वक केलेली होती. व्हरांड्यात कडेने पकडण्यासाठी लोखंडी दांड्या होत्या. जेवणगृहाच्या वेळा ठरलेल्या. चहा, नाश्ता, दोन वेळा व्यवस्थित जेवण, सर्व सणवार साजरे करणे. प्रत्येकाची जेवणाची जागा ठरलेली! एखादा वृद्ध येऊ शकला नाही, तर ते चटकन समजावे म्हणून असावे बहुतेक! कुणाची तब्येत बरी नसेल, तर खोलीत जेवण मिळण्याची व्यवस्था होती.

दररोज खोली, बेड, बाथरूम स्वच्छ करण्यासाठी सेवक होते. व्यवस्थापकांची सर्व खोल्यांतून फेरी होत असल्याने खुशाली कळणे नकळत होत असे. वैद्यकीय मदत लागल्यास डॉक्टरही उपलब्ध होते. शेजारीच आजारी वृद्धांसाठी स्वतंत्र इमारत होती. तिथे वैद्यकीय मदत लागल्यास वैद्यकीय सेवा, नर्सेस, सेवकही उपलब्ध होते. तसे म्हटले तर खूपच सुविधायुक्त वातावरण होते. तरीही काहीतरी उणीव भासत होती.

कदाचित सर्व वृद्ध माणसेच दिसत असल्याने वातावरणात चैतन्य जाणवत नव्हते. दिनक्रमात फारसे वैविध्यही नसावे. लहान मुलांचे बागडणे, तरुणाईची लगबग, घरातले रुसवे-फुगवे काहीच नाही. एक विचित्र समंजसपणा सर्वत्र भरून राहिलेला. मावशी गप्पिष्ट असल्याने खूप भरभरून बोलत होत्या. त्यातून नकळत काही वृद्धांच्या कहाण्या उलगडत होत्या. कुणी मुले विचारत नाहीत, त्यांना अडचण होते म्हणून इथे आलेले, कुणाची मुले परदेशात त्यामुळे एकटे म्हणून तर काही स्वखुशीने मुलांच्या संसारातून विरक्त होऊन आलेले! संध्याकाळी आम्ही परत निघालो, तेव्हा मावशींच्या डोळ्यातही उदास छटा दिसल्याचा भास झाला.

खरोखरच, किती झपाट्याने आपली समाजव्यवस्था बदलताना दिसते आहे. पंचवीस - तीस वर्षांपूर्वी वृद्धाश्रम ही कल्पना आपल्याकडे नवीन होती. आज शहराशहरात, गावातही वृद्धाश्रम आहेत. आम्ही गेलो होतो, त्या वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापिका बाईंशी गप्पा मारताना समजले, की त्यांच्याकडे मोठी प्रतीक्षा यादी आहे. कितीतरी वृद्ध आपल्याला प्रवेश मिळण्याची वाट पाहत आहेत. कुणाचा मृत्यू झाला की एखादी जागा रिकामी होणे, ही गोष्ट किती भयंकर होती!

आज माणसाचे सरासरी आयुर्मान वाढले आहे. पण हे वाढीव आयुष्य सुखासमाधानात जगण्याची वृत्ती आपल्याकडे आहे का? एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये वृद्धांना सहज आधार मिळायचा. कुटुंब विभक्त झाली; स्त्रिया शिकून नोकऱ्या करू लागल्या, शहरात राहत्या घरांचा प्रश्न निर्माण झाला. झपाट्याने जीवन गतिमान होऊ लागले - त्या वेगाशी जुळवून घेणे वृद्धांना कठीण होत चालले आहे. भौतिक सुखाच्या मागे लागणारे तरुण नात्यांतली जवळीक, प्रेम, माया विसरताहेत की काय अशी भीती वाटावी अशी अवस्था अनेक घरी दिसते आहे.

ज्यांना आर्थिक पाठबळ आहे, अशा वृद्धांना स्वतःची सोय करणे तरी शक्य होते. पण गरीब, निराधार, आयुष्यभर अर्थार्जन करूनही ज्यांच्या म्हातारपणाची सोय नाही अशा वृद्धांची अवस्था खूपच कठीण होते. गरिबांसाठी असणाऱ्या वृद्धाश्रमांची अवस्था तर खूपच दयनीय दिसते.

तरुण आणि वृद्ध यांच्यातील सामंजस्य हा एक उपाय असला, तरी बदलत्या समाजव्यवस्थेत वृद्धाश्रम ही काळाची गरज आहे, हे मान्य करावेच लागते. मात्र, वृद्धांचे तेथील आयुष्य जास्तीत जास्त सुखाचे कसे होईल हे पाहणे; आपण

घरापासून दूर-वेगळे फेकले गेल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ नये असे वागणे, काही निमित्ताने एकत्र येणे, या गोष्टी करणे ही तरी फार अवघड गोष्ट नाही. मुला-नातवंडात रमण्याचा आनंद मिळाला, तर तो आनंद आजी-आजोबांना किती सुखावणारा असतो याची जाण मुलांनी ठेवायला हवी.

समाज आणि शासन या दोघांचा या व्यवस्थेमध्ये समान वाटा असायला हवा. वृद्धांसाठी पुरेशा आर्थिक सवलती, वैद्यकीय मदत, निर्वाहनिधी यासारख्या अनेक गोष्टीत सरकार काय करू शकेल, याचा विचार व्हायला हवा. दुसरा प्रश्न आहे तो आपल्या सामाजिक जाणिवेचा. वृद्धाश्रम ही आज काळाची गरज असल्याने तिथे राहावे लागणे, म्हणजे काहीशी उणीव आहे, अशा जाणिवेने पाहू नये. 'परदेशात असणारी मुले पैसे पाठवले की आपले कर्तव्य संपले असे मानतात. आजारपणात आईवडिलांची दखल घेणे नाही, की मृत्यूनंतर अंत्यसंस्काराची जबाबदारीही घेणे नाही,' आश्रमाच्या व्यवस्थापकांनी सांगितलेला हा अनुभव खूप विदारक वाटला. याउलट काही तरुणांचे गट आश्रमात आजी-आजोबांशी गप्पा मारण्यासाठी आवर्जून येतात. त्यांच्यासाठी काही मनोरंजनाचे कार्यक्रम करतात, ही चांगली बाजूही त्यांनी सांगितली.

नुकताच एका दिवाळी अंकात अमेरिकास्थित लेखिका शोभा चित्रे यांचा लेख वाचला. नोकरीतून निवृत्तीची वेळ जवळ आल्यावर फ्लोरिडामधील ज्येष्ठांसाठी असलेल्या वसाहतीत घर घेऊन राहण्याचा अनुभव त्यांनी मांडला होता. तिथले प्रफुल्लित वातावरण, म्हाताऱ्या वयातही जगण्याचा उत्साह टिकवून ठेवणारी तिथली माणसे, आयुष्यभर करायचे राहिलेले छंद जोपासण्यासाठी, पूर्वीच्या धावत्या आयुष्यात निसटून गेलेल्या गोष्टी एकमेकांना शिकवणारे, शिकणारे उत्साही मनाने तरुण असणारे वृद्ध यांचे त्यांनी केलेले वर्णन इतके छान वाटले वाचताना! म्हातारपणी प्रकृती चांगली राहावी, म्हणून फिटनेस सेंटर, स्विमिंगपूल्स, क्लब जणू हवाहवासा वाटावा असा वृद्धाश्रम! वाटले स्वप्नवत वाटणारे असे वृद्धाश्रम सहजगत्या आपल्याकडे उपलब्ध झाले तर... निदान म्हातारपणच्या एकाकीपणाला एक प्रसन्नतेची किनार तर लाभेल...

अर्थात, त्यामुळे वृद्धांचे प्रश्न पूर्णतः सुटणार नाहीत हे नक्की! शक्य असेल तोपर्यंत आपल्या मुलामाणसात राहाणे, रमणे हा आपल्या भारतीयांच्या रक्तात रुजलेला धर्म आहे, हे तरुणांनीही लक्षात घ्यायला हवे. घरातल्या लहानग्यांना आजी-आजोबांची माया, प्रेमाची सावली मिळणे, हे किती मोलाचे असते, हे आपल्याला कदाचित खूप उशिरा समजेल. पैसे देऊन पाळणाघरात मुलांना ठेवून हे प्रेम, माया, संस्कार विकत घेता येत नाहीत नक्कीच!

वृद्धाश्रमाच्या भेटीने नेमके काय झाले? एका समाजवास्तवाची, एक प्रश्नाची, नात्यातल्या भावबंधांची नव्याने जाणीव झाली. त्याचबरोबर परिस्थितीमुळे आजच्या काळातील वृद्धाश्रमांची अपरिहार्यताही जाणवली. अनेक गरीब, निराधार वृद्धांसाठी आपण जमेल ती आर्थिक मदत करणे, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचे काही क्षण आनंदाचे करणे, हे किती गरजेचे आहे हे जाणवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरातल्या आजी - आजोबांची किंमत कळली.

## सरावासाठी विषय व मुद्दे

**१) तुमच्या गावातील सार्वजनिक गणपती विसर्जन मिरवणूक**

- गणपतीच्या दिवसातील गावातील वातावरण
- विसर्जन मिरवणुकीचे नियोजन
- प्रत्यक्ष त्या दिवसाचे वर्णन
- मिरवणुकीच्या निमित्ताने गावाचे एकत्र येणे
- तरुणाईचा सहभाग
- प्रत्यक्ष विसर्जन सोहळा
- गणरायाला निरोप देताना लोकांच्या भावना, वाटणारी हुरहुर

२) मॉलला लागलेली आग

- आग कोठे, कधी, कशी
- प्रत्यक्ष दृश्याचे वर्णन
- लोकांवर, रहदारीवर झालेला परिणाम
- आग आटोक्यात आणण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यातून घडलेले माणुसकीचे, हीन प्रवृत्तीचे दर्शन
- आगीमुळे झालेल्या हानीचा अंदाज
- भविष्यातील खबरदारी
- मनावर उमटलेला ठसा

३) अकस्मात पडलेला पाऊस

- अकस्मात आलेल्या पावसापूर्वीचे वातावरण
- प्रत्यक्ष पावसाचे/वातावरणाचे/निसर्गाचे वर्णन
- जनजीवनावर झालेला परिणाम (विद्यार्थी, फेरीवाले, पादचारी, नोकरदार इ.)
- सृष्टीतल्या इतर सजीवांना जाणवलेला पाऊस
- आपली स्वत:ची मनोवस्था

४) अभयारण्यातील फेरफटका

- अभयारण्य कोणते? त्याचे भौगोलिक स्थान, वैशिष्ट्ये
- अभयारण्य निवडीमागचे कारण, तिथे कसे गेलात
- तिथल्या कार्यक्रमाचे/दिनक्रमाचे स्वरूप
- तेथील निसर्ग, वातावरण यांचे वर्णन
- तेथील पशु-पक्षी इ. चे वर्णन
- पर्यावरणाबद्दल निरीक्षण, पर्यावरणाचे जतन/हानी
- तुमच्या मनातील भावना

५) महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी शिबिर

- शिबिराचे उद्दिष्ट, नियोजन
- शिबिराचा दिनक्रम
- शिबिरातील निरनिराळे कार्यक्रम, व्याख्याने, गटचर्चा इ.
- श्रमदानाचा अनुभव
- एकत्र राहण्याचा अनुभव, गटात काम करण्याचा अनुभव
- किमान साधनांमध्ये राहण्याची सवय
- वेगळेपण/काय नवीन शिकलात
- राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना

## सरावासाठी विषय

१) ऐतिहासिक स्थळाला दिलेली भेट

२) तुम्ही पहिलेले चित्रप्रदर्शन

३) माझे पहिले भाषण

४) खेळाचा अविस्मरणीय सामना

५) ट्रेकिंगचा पहिला अनुभव

## ऊ) कल्पनाप्रधानात्मक निबंध

वास्तवात जे घडत नाही ते अनुभवण्यासाठी कल्पनेत रमण्याचा आनंद आपण लहानपणापासून घेत असतो. प्रतिभावंत आपल्यातल्या कल्पनाशक्तीच्या जोरावरच आपल्या साहित्यातूनच वेगळी प्रतिसृष्टी निर्माण करत असतात. कल्पनाप्रधानात्मक निबंधातून असाच कल्पनेत रमण्याचा, त्यातून वेगळे विश्व धुंडाळण्याचा प्रयत्न आपल्याला करायचा असतो. इतर निबंध प्रकारांच्या तुलनेत या प्रकारच्या निबंधात आपल्या कल्पनाशक्तीला मुक्त वाव असतो.

दिलेल्या विषयाच्या संदर्भात आपले विचार, भावना, व्यक्तिमत्त्व, व्यासंग, कल्पनाशक्ती यांच्या आधारे अनेकविध रंग भरून आपण हा निबंधप्रकार लिहू शकतो.

कल्पनाप्रधान निबंधाच्या विषयात सामान्यतः २ प्रकारचे विषय असतात. 'असे झाले तर' (पक्षी बोलू लागला तर, वर्तमानपत्रे बंद पडली तर) हा एक प्रकार आणि दुसरा म्हणजे 'मी अमुक झालो तर' या प्रकारच्या विषयांमध्ये आपल्याला माहिती असणाऱ्या साधारण माहितीच्या आधारे आपण कल्पना रचू शकतो. मात्र 'मी अमुक झालो तर' यासारख्या विषयात त्या पदावरील व्यक्तीची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, कामाची व्याप्ती, सद्यस्थिती याविषयी सखोल ज्ञान असावे लागते. त्या व्यक्तीची सामाजिक स्थिती, दिनक्रम, अधिकार याबद्दलचीही माहिती असावी लागते. तरच, आपण विस्ताराने कल्पनाप्रधान निबंध लिहू शकतो.

कल्पना एकातून एक सुचत गेल्याप्रमाणे निबंधाची मांडणी असावी. अन्यथा, निबंधाला विस्कळित रूप येऊ शकते. निबंधाची भाषा ही विषयानुरूप बदलावी लागते. त्यानुसार कधी सहज, कधी काव्यात्मक तर कधी गंभीर स्वरूप भाषेला लाभते.

सचेतन, अचेतन सर्वांचे अंतरंग जाणून घेण्याची संवेदनशीलता, भाषेच्या वेगवेगळ्या स्वरूपाची जाण जितकी अधिक तितका हा निबंध अधिक परिणामकारक होईल.

### १) मी मुख्यमंत्री झालो तर ...

**मुद्दे :** • राज्यातील समस्या जाणणे • स्वच्छ प्रशासन देण्याचा प्रयत्न • सामान्यांसाठी आश्वासक वातावरण • भ्रष्टाचाराला आळा • ठोस कृतीच्या दिशेने पावले • मनातील भावना • प्राधान्यक्रम ठरवून कामांचे नियोजन • दूरदृष्टीने घेतलेले निर्णय

नुकतेच महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकांसाठी मतदान संपले होते. गेला आठवडाभर कोणता पक्ष निवडून येणार, बहुमत मिळणार की नाही, कुणाकुणाची 'युती', 'आघाडी' होऊ शकते याची गणिते मांडली जात होती. या पक्षाला बहुमत मिळाले तर हा उमेदवार मुख्यमंत्री होणार, अशीही चर्चा प्रत्येक वृत्तपत्रात, दूरदर्शनच्या प्रत्येक

वाहिनीवर चालू होती. गेले चार महिने प्रत्येक पक्षाचा पुढील कार्यक्रम, दुसऱ्या पक्षावर घणाघाती टीका करणाऱ्या जाहिराती सतत डोळ्यांसमोर होत्या. कुणीही निवडून आले तरी विकासाचे राजकारण कसे गती घेणार, याविषयी प्रत्येक सामान्य नागरिकाच्या मनात कुतूहल दाटले होते. मीही त्याला अपवाद नव्हतो. त्यात भर म्हणून की काय मी संध्याकाळी एका वाहिनीवर अनिल कपूरचा 'नायक' हा चित्रपट बघितला. एक दिवस मुख्यमंत्री झाल्यावर तो काय किमया घडवतो याची दृश्ये पाहाता पाहाता मनात एक गमतीशीर विचार घोळू लागला. 'आपण मुख्यमंत्री झालो तर'- बघता बघता जागेपणीच मी स्वप्न पाहू लागलो.

मध्यंतरी एका अपक्ष उमेदवाराची मुलाखत ऐकली होती. तो म्हणत होता, ''मी ज्या भागात निवडणूक लढवतो त्या भागाच्या विकासाच्या कार्यक्रमाचे निश्चित मुद्दे माझ्यासमोर आहेत. ते मान्य होणार असतील तर त्या पक्षाबरोबर जायला मला कोणतीच अडचण नाही. मला आमदार म्हणून निवडून देणाऱ्या लोकांचा विश्वासघात होणार नाही, असं काम करायचंय मला.'' पक्षीय लोकशाहीच्या तत्त्वानुसार त्याच्या म्हणण्याला पाया नसला तरी त्याचा मुद्दा मनाला भिडणारा, अंतर्मुख करणारा होता. खरोखरच, मी मुख्यमंत्री झालो तर राज्याचा सर्वांगीण विकास हेच माझे महत्त्वाचे एकमेव उद्दिष्ट असायला हवे, नाही का? मग शिक्षण, पर्यावरण, ऊर्जा, पाणी, रस्ते, अर्थकारण इ. प्रत्येक क्षेत्रात आपण काय काम करायला हवे, याची एक भली मोठी यादी माझ्या डोळ्यांसमोर येऊ लागली.

शिक्षणाच्या क्षेत्रात आज आपल्या राज्यात नेमकी काय स्थिती आहे? प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सर्वांना मोफत मिळावे हा कायदा असला तरी शाळांची अवस्था खेडोपाडी कशी आहे? कुठे इमारत नाही, कुठे शैक्षणिक साधने नाहीत, कुठे अध्यापक नाहीत, तर कुठे विद्यार्थीच नाहीत. त्या त्या मुलांची गरज ओळखून, उपलब्ध सामग्रीचा, परिस्थितीचा उपयोग करून परिणामकारक शिक्षणपद्धती कशी विकसित करता येईल, याचा विचारही होत नाही. अनेक खाजगी शिक्षणसंस्थांनी नफेखोरीच्या उद्देशाने शिक्षणाचा बाजार मांडला आहे. शिवाय शिक्षणाची गुणवत्ताही नाहीच. मी मुख्यमंत्री झालो तर - शिक्षण क्षेत्रातला भ्रष्टाचार दूर करून गुणवंत, हुशार, गरीब मुलांनाही पुरेशी संधी मिळावी अशी यंत्रणा उभी करण्याचा नक्की प्रयत्न करीन. शिक्षकांना आर्थिक स्थैर्य असेल तर त्यांच्या कामाची गुणवत्ता नक्कीच वाढेल. एकूणच शिक्षण व त्यामुळे होणारी समाजजागृती हा विकासाचा पाया आहे, याचे भान ठेवून शिक्षणतज्ज्ञांच्या मदतीने शिक्षणविषयक धोरण तयार करण्यासाठी मी नक्कीच प्रयत्नशील राहीन.

भारत हा खेड्यांचा देश आहे. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी अजून चांगले रस्ते नाहीत; शिक्षणाची सोय नाही, अद्ययावत वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही, तरुणांना रोजगार नाही. त्यामुळे खेड्यातील तरुण शहरांकडे धाव घेताहेत. उद्योगधंद्यांची वाढ शहरातच झाल्याने स्वाभाविक लोकांची तिकडे धाव आहे. शहरात राहायला जागा नाही. अमर्याद लोकसंख्या - त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक समस्या भेडसावतातच. उत्तम शिक्षण, उत्तम आरोग्यसेवा, रोजगार, कारखाने, रस्ते, पुरेसे पाणी, वीज या गोष्टी ५-१० कि.मी. च्या परिसरात उपलब्ध असतील तर छोट्या गावाचे नकळत शहरीकरण होईल. त्यासाठी गावे स्वावलंबनाने उभी करण्यासाठी लोकांना प्रेरणा द्यायला हवी. पाण्याचे नियोजन करणे, सहकाराचा वापर करून व्यापार उद्योगात खेड्यांतील लोकांना सहभागी करून घेणे; शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान गावातील तरुण आत्मसात करतील याकडे लक्ष देणे यांसारख्या गोष्टींनी गावे स्वयंपूर्ण तर होतीलच व शहरातील समस्याही कमी होतील.

वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारे पर्यावरण प्रदूषण, कचऱ्याची समस्या, अस्वच्छता हा आपल्याला भेडसावणारा खूप मोठा प्रश्न आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेणे व समाजप्रबोधन करणे या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. घरे बांधण्यासाठी डोंगर, टेकड्या, झाडे तोडणे यामुळे निसर्गाचा समतोल बिघडतो आहे. मध्यंतरी 'माळीण' येथे झालेल्या दुर्घटनेत अख्खे गावच्या गाव जमीनदोस्त झाले, अशा नैसर्गिक आपत्तींना आपणच आमंत्रण देतो हे सिद्ध झाले आहे. यासाठी कडक योजना, कायदा अंमलात आणणे आवश्यक आहे. अनेकदा राजकारणी लोक, काही धनदांडगे यांचा यात हात असतो. माझ्या सरकारचा स्वच्छ प्रशासन आणण्यासाठी प्रयत्न राहील. कायदा मोडणाऱ्या कोणाची गय केली जाणार नाही याची काळजी मी मुख्यमंत्री झालो तर घेईन. नैसर्गिक आपत्ती येऊ नये यासाठी खबरदारी घेणे आणि आलीच तर त्यावर नियोजन करून मात करणे हे माझ्या सरकारसाठी महत्त्वाचे असेल.

लहान मुले, वृद्ध माणसे यांच्या आरोग्यासाठी काही ठोस योजना कशा बनवता येतील, याचा मी नक्कीच विचार करेन. शहरातील वाहतूक समस्या, होणारी कोंडी यावर मेट्रो, रिंगरोड्स, बी.आर.टी सारख्या योजना तत्परतेने व

प्रभावीपणे कशा अंमलात येतील, हा विचारही प्रामुख्याने करायला हवा. गरिबांसाठी स्वस्त गृहयोजना करता आली तर झोपडपट्ट्यांचे प्रमाण नक्कीच कमी होऊ शकेल.

खरेतर आपल्याकडे नैसर्गिक ऊर्जानिर्मितीसाठी अनेक स्रोत उपलब्ध आहेत. आपण त्यांचा पुरेसा उपयोग करून घेत नाही. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही योजना प्रयत्नपूर्वक प्रत्येक गावात आणली, छोटे बंधारे घातले तर दुष्काळ, अवर्षण या समस्यांना तोंड देऊ शकू. विद्युतनिर्मितीसाठी पाण्याबरोबरच, सौरऊर्जेचा वापर, वाऱ्याचा वापर, खेड्यांमध्ये 'गोबर गॅस'चा वापर या सर्वांचे नियोजन केले तर ऊर्जेचा तुटवडा व खर्च या दोन्ही समस्यांवर आपण मात करू शकू.

अर्थात या सर्वांसाठी मुख्यतः गरज असते ती पैशाची. आपल्या राज्याची अर्थव्यवस्था सक्षम असेल तरच या सुधारणा करता येणे शक्य होईल. त्यासाठी करवसुली व करप्रणाली या दोन्हींचा विचार करायला हवा. एल.बी.टी सारखे स्थानिक कर रद्द करून सर्वत्र सारखी सोपी करप्रणाली, ज्यातून पळवाटा शोधता येणार नाहीत अशी करव्यवस्था राज्यात आणण्याचा प्रयत्न मी करेन. तसेच शिक्षण, आरोग्य, विकास यासाठी जास्तीत जास्त खर्च कसा करता येईल याचाही विचार मी नक्कीच करेन. आपला महाराष्ट्र हा खरेतर सुंदर समुद्रकिनारे, सह्याद्रीतील जंगले, वनस्पती, प्राणी, पक्षी यांच्या वैविध्यामुळे समृद्ध असलेले राज्य आहे. पण गोवा, केरळ, राजस्थान, गुजरात इ. राज्यांसारखा पर्यटनविकास येथे झालेला नाही. त्यावर लक्ष पुरवले; येथील साधनसामुग्रीचा उपयोग करून व्यवसायांना, कारखान्यांना प्रोत्साहन मिळाले तर आपली अर्थव्यवस्था मजबूत व्हायला उपयोग होईल. मी मुख्यमंत्री झालो, तर यासाठी नक्कीच प्रयत्न करीन.

आज आपणा सर्वांना भेडसावणारी खूप मोठी समस्या म्हणजे सर्वच क्षेत्रात बोकाळलेला भ्रष्टाचार! त्यासाठी कडक कायदा, स्वच्छ प्रशासन, मुख्य म्हणजे लोकांची मानसिकता बदलणे यासाठी प्रयत्न केला तर भ्रष्टाचाराशी निगडित अनेक समस्या आपोआपच कमी होतील असे मला वाटते.

यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा महामंडळातून समावेश करणे मला खूप महत्त्वाचे वाटते. त्यात राजकारण येऊ न देता त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग आपल्या राज्याच्या विकासासाठी कसा करून घेता येईल याकडे मी लक्ष देईन. शेजारी राज्यांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून नद्यांच्या पाणी वाटपाचे प्रश्न सामंजस्याने सोडवायला हवे. विरोधी पक्षांनाही विकासाच्या कार्यक्रमात सौहार्दाने समाविष्ट करून घेता येणे शक्य आहे हा माझा विश्वास आहे. सर्वात महत्त्वाचे, लोकांच्या मनातील एकात्मतेची भावना जागी करून ती संकुचितपणे विघातक गोष्टींसाठी न वापरता रचनात्मक कार्यासाठी वळवणे खूप महत्त्वाचे आहे. माझा तरुणाईच्या शक्तीवर खूप भरवसा आहे. या शक्तीचा वापर चांगल्या कामासाठी करण्याची त्यांना प्रेरणा कशी मिळेल, यावर महाविद्यालयीन शिक्षणात भर असावा यासाठी मी प्रयत्नशील राहीन.

खरंच 'मी मुख्यमंत्री झालो तर'... हे माझे स्वप्न वरवर बघता हास्यास्पद वाटेल. पण माझ्या मनातले हे विचार आपल्यातील कुणाही संवेदनशील तरुणाचे असू शकतात. मी नाही तर माझ्यासारखा कुणीतरी सामान्य तरुण उद्या मुख्यमंत्री होईलही आणि त्यावेळी हे स्वप्न वास्तवात येईलही पुढेमागे।

## सरावासाठी विषय व मुद्दे

**१) जगातील पेट्रोल संपले तर ...**

- वाहनांची गर्दी कमी, प्रदूषणाला आळा
- पेट्रोलवर आधारित उद्योगधंद्यांना खीळ (प्लॅस्टिक, पॉलिएस्टर)
- रस्त्यांच्या डांबरीकरणाला अडचण
- कीटकनाशके - जंतुनाशके - निर्मिती बंद - शेतीवर परिणाम
- पेट्रोल उत्पादक देशांची आर्थिक स्थिती कोलमडेल

- युद्धसामुग्रीचे कारखाने चालवण्यास अडचण (रणगाडे, बोटी इ.)
- तेलावरून होणारी युद्धे, स्पर्धा कमी
- जागतिक दळणवळणाचा प्रश्न
- पर्यायी इंधन शोधावे लागेल

२) मंगळावर मानवी वसाहत झाली तर ...

- वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न कमी
- मंगळावर जाण्यासाठी चढाओढ/स्पर्धा
- पृथ्वी-मंगळ दळणवळण
- मंगळावर सजीव असतील तर?
- तिथल्या पर्यावरणाशी जुळवून घेणे, प्रयत्न करणे
- पर्यावरणाचे फायदे-तोटे (वेगळेच आजार, रोग इ.)
- मूलभूत गरजा भागवण्यासाठी अधिक संशोधनाची गरज
- पृथ्वीपेक्षा राहणीमान वेगळे

३) झाडे बोलू लागली तर ...

- सुंदर भूतकाळाचे स्मरण, भविष्याबद्दल चिंता
- आपापसातले संबंध
- झाडे-पक्षी, झाडे-प्राणी यातले संबंध
- स्वत: अन्ननिर्मिती करू शकत असल्याबद्दल अभिमान
- इतर पंचमहाभूतांबद्दल (जमीन, वारा, सूर्य, पाणी इ.) वाटणारी कृतज्ञता
- मानवाशी बदलत असलेला संबंध
- मानवाने केलेल्या अन्यायाला वाचा
- झाडे आणि कवी यांचे जिव्हाळ्याचे नाते

४) घड्याळे बंद पडली तर ...

- आबाल-वृद्धांच्या भावना
- दैनंदिन जीवनातील बारीक - सारीक गोष्टींवर होणारा परिणाम
  (बस, लोकल, कार्यालये, शाळा यांना वेळेचे बंधन नाही)
- दिवसाचे वेळापत्रकच कोलमडून जाईल
  (आकाशवाणी - दूरदर्शन यांच्या कार्यक्रमांनाही हे बंधन नाही)
- तास, मिनिटे, सेकंद ही कालगणनाच उरणार नाही
- कालमापनाच्या अचूकतेला मर्यादा, संशोधनात अडचणी
- परत एकदा माणूस सूर्यावर, सूर्याच्या स्थितीवर अवलंबून
- कालमापनाची नवीन पद्धत शोधावी लागेल.

## सरावासाठी विषय

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज असते तर ...
२) आभाळ बोलू लागले तर ...
३) मी पंतप्रधान झालो तर ...
४) दुसऱ्याचे मन वाचता आले तर ...
५) मी पक्षी झालो तर ...

✦✦✦

# २. पत्रलेखन

आपल्या मनातील भावना, विचार, मते अभिव्यक्त करायचे माध्यम म्हणजे बोलणे हे आपण सगळे जाणतोच. पण ही अभिव्यक्ती अधिक मुद्देसूदपणे, सुसंबद्ध पद्धतीने अपेक्षित व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे पत्रलेखन! प्रत्यक्ष बोलताना कधीतरी विषयासंदर्भात एखादा मुद्दा राहून जाण्याची शक्यता असते. परंतु पत्रलेखन करताना ते लिहिण्याआधी वैचारिक पातळीवर आपली पूर्वतयारी होत असते; त्यासाठी वेळ मिळत असतो, आणि त्यामुळेच पत्रलेखन हे अधिक मुद्देसूद, सुसंगत, नेमके, परिणामकारक होत असते.

पत्रलेखनाचे प्रामुख्याने औपचारिक (व्यावहारिक) आणि अनौपचारिक (घरगुती, कौटुंबिक इ.) असे प्रकार पडतात.

## अ) औपचारिक पत्रे

(निमंत्रण, आभार, चौकशी, तक्रार, मागणी, विनंती इ.)

औपचारिक पत्रे ही बहुतेक वेळा आपण काहीशा त्रयस्थ, अपरिचित व्यक्तीला लिहीत असतो. या पत्रातून आपण आपले काम करून घेण्याच्या, काही माहिती मिळवण्याच्या भूमिकेत असतो. त्यामुळे या पत्रांचे लेखन ठरलेल्या संकेतांनुसारच होणे आवश्यक असते.

**मागणीपत्राद्वारे** आपल्याला आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची विनंतीच आपण करत असतो. **तक्रारपत्रातून** आपल्याला होणारा त्रास, अपेक्षा आपण संबंधित व्यक्तीला कळवत असतो आणि तो त्रास दूर व्हावा, आपल्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून विनंतीच करत असतो. **चौकशी पत्रातही** आपल्याला काही माहिती जाणून घ्यायची असते. ती कळवण्यासाठीची विनंतीच आपण पत्रातून करत असतो. त्यामुळे हे सगळे **विनंतीपत्राचेच** प्रकार होऊ शकतील. त्यातले भेद खूपच पुसट आहेत.

औपचारिक पत्रे लिहिताना त्यातील भाषा म्हणूनच साधी, सोपी, सरळ असावी. जास्त पाल्हाळ न लावता आपले म्हणणे योग्य त्या शब्दात सांगणारी असावी. जेवढ्यास तेवढी भाषा असली तरी नम्र व संयत असावी.

### औपचारिक पत्रांची मांडणी :

- पत्राच्या सुरुवातीला उजव्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचे नाव, हुद्दा (पत्र कोणत्या नात्याने लिहीत आहोत त्याचा उल्लेख, उदा.- विद्यार्थिप्रमुख, सजग नागरिक इ.) व पत्ता असावा.
- पत्त्यानंतर योग्य तो दिनांक, ई-पत्ताही लिहावा.
- त्यानंतर डावीकडे योग्य तो मायना असावा. संबंधित व्यक्तीचे नाव, हुद्दा व थोडक्यात पत्ता असावा.
- विशेषनाम पत्रात असेल तरच ते लिहावे. अन्यथा प्रति, प्रेषक या ठिकाणी अ ब क असाच उल्लेख करावा.
- विषय - औपचारिक पत्रात 'विषय' लिहिणे आवश्यक ठरते. 'विषया'वरून पत्राचा हेतू संबंधित त्रयस्थ व्यक्तीच्या पटकन लक्षात येतो. त्यामुळे विषय नेमका व थोडक्यात लिहावा.
- महोदय/महोदया असे लिहून पत्रलेखनाला सुरुवात करावी.
- पाल्हाळिकपणा न करता तरीही सविस्तरपणे नेमक्या शब्दात विषयविस्तार करावा.

- २ ते ३ परिच्छेदात मुद्देसूद लेखन असावे.
- शेवटी आपला/ली कृपाभिलाषी/आज्ञाधारी यांपैकी योग्य ते संबोधन वापरून समारोप करावा.

## १) तक्रारपत्र

**विषय : ऑनलाईन खरेदी केलेला चलभाष सदोष निघाला आहे. ग्राहक पंचायतीकडे योग्य ती तक्रार नोंदवा. (प्रेषक : सलील शंकर पाटील)**

सलील शंकर पाटील
नवा मारुती चौक, पारिजात कॉलनी,
बार्शी - ४१३४११. जि. सोलापूर
salilspatil@gmail.com
चलभाष क्र. ९७९७९०१११२
दि. १८/११/२०१४

प्रति,
मा. अध्यक्ष,
ग्राहक पंचायत, पुणे

**विषय :** ऑनलाईन खरेदी केलेला चलभाष संच सदोष निघाल्याबाबत

महोदय,

मी, शनिवार, दि. १८ ऑक्टोबर, २०१४ रोजी 'खरेदी' (www.kharedee.com) या संकेतस्थळावरून 'बोलाबोला' कंपनीचा 'बोलो-ई' (Bolo -E) हा चलभाष संच खरेदी केला आहे. याची खरेदी रक्कम रु. ६,९९९/- मी माझ्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यातून अंतरित केली आहे. त्यानुसार मला 'बोलाबोला' कंपनीकडून बुधवार, दि. २२ ऑक्टोबर, २०१४ ला 'मेघदूत' या कुरियर कंपनीमार्फत सदर संच मिळाला.

कंपनीच्या नियमानुसार कुठलाही संच वापरण्यास योग्य नसल्यास ८ दिवसांच्या आत तक्रार करता येते. सदोष संच तुम्हाला बदलून मिळतो किंवा त्यासाठी भरलेले पैसे परत मिळतात. मी खरेदी कलेला हा संच सुरू केल्यापासून अधून-मधून कधीही बंद पडतो आणि कधीही चालू होतो. त्याप्रमाणे तशी तक्रार मी रविवार, दि. २६ ऑक्टोबर, २०१४ ला ई-पत्राद्वारे कंपनीकडे केली आहे.

मात्र मला कंपनीकडून आलेल्या ऑनलाईन खरेदीचा दिनांक १८ ऑक्टोबर, २०१४ गृहीत धरून माझी तक्रार निकाली काढण्यात आली आहे. या विषयात पुरेसा खुलासा करणारे पत्र सोमवार, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ ला मी कंपनीला पाठविले आहे. यात मला चलभाष मिळालेल्या दिनांकापासून ८ दिवसात मी तक्रार नोंदवलेली आहे, हा खुलासा केला आहे. मात्र त्या पत्राला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कंपनीच्या भारतातील दिल्ली येथील मुख्य कार्यालयाला मी पत्र लिहिले. त्यात उपरोक्त दोन्ही पत्रे सोबत जोडली आहेत. हा व्यवहार स्पीडपोस्टने केला असून त्याची पोहोचपावती देखील मला मिळाली आहे.

मात्र तक्रार करून १ महिना होऊन गेला तरी मला कंपनीकडून काहीही कळविले गेले नाही. या एकंदर व्यवहारात माझी फसवणूक झाल्याचे माझ्या लक्षात आले आहे, मला मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे मला न्याय मिळावा, अशी माझी इच्छा आहे. आपली संस्था ग्राहकांच्या अशा तक्रारींचा पाठपुरावा करते आणि ग्राहकाला

न्याय मिळवून देते, याची जाणीव असल्याने हे पत्र आपल्याला पाठवित आहे. तरी माझ्या या तक्रारीचा अभ्यास करून आपण मला मार्गदर्शन करावे, ही विनंती.

आपला,

(सलील शंकर पाटील)

सोबत : १) कंपनीशी झालेला आवक-जावक ई-पत्रव्यवहार

२) टपालाने केलेल्या व्यवहाराची छायाप्रत

३) खरेदी पावती-छायाप्रत

४) चलभाष संच मिळाल्याची दि. २२ ऑक्टोबर, २०१४ ची कुरियर पावती.

## २) चौकशीपत्र

**एका व्यवसाय मार्गदर्शकाकडे पदव्युत्तर अभ्यासक्रमांची चौकशी करणारे पत्र लिहा. (प्रेषक - मनोज कारभारी)**

मनोज कारभारी

मु. पो. ता. जत

जिल्हा - सांगली

१२/१२/२०१४

प्रति,

मा. द. वा. अंबुलकर,

सादर नमस्कार

**विषय :** पदव्युत्तर अभ्यासक्रमाची चौकशी करण्याबाबत

महोदय,

मी, मनोज कारभारी, 'जत कला व वाणिज्य महाविद्यालया'मध्ये वाणिज्य शाखेच्या शेवटच्या वर्षात शिकतो आहे. प्रथम आणि द्वितीय वर्षांत मी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो आहे. यावर्षीही प्रथम श्रेणीने उत्तीर्ण होण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत.

आपण व्यवसाय मार्गदर्शक आहात. आपले वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणारे लेख माझ्या वाचनात आले. त्याच ओळखीवर आपल्याला पत्र पाठवितो आहे. वाणिज्य शाखेतील पदवी मिळाल्यानंतर पुढे कोणकोणते अभ्यासक्रम आहेत, याची चौकशी करण्यासाठीच हे पत्र लिहितो आहे.

जत तालुक्यातच आमची पाच एकर जिरायती जमीन आहे. शेतीकडे सध्या वडील लक्ष देतात. परंतु वृद्ध आई-वडील आणि शेती यासाठी मी इथे गावीच राहण्याच्या निर्णयापर्यंत आलो आहे. शेतीतील समस्या आपल्याला माहीत असतीलच. बेभरवशाच्या पावसापासून शेतीमालाची योग्य भावात विक्री होईपर्यंत मार्गात अनंत अडचणी येतात. त्यामुळे, केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतीपूरक छोटा-मोठा व्यवसाय मी करू इच्छितो.

यासाठी पदवी परीक्षेनंतर अल्पमुदतीचे कोणते अभ्यासक्रम मला करता येतील, याबद्दल कृपया मला मार्गदर्शन करावे, ही विनंती. अभ्यासक्रम, त्याचा कालावधी, तो अभ्यासक्रम कुठे उपलब्ध आहे व त्याचे अंदाजे शुल्क याबद्दलही मार्गदर्शन करावे.

यासंदर्भात मी १-२ संकेतस्थळांवरून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु, विजेचे भारनियमन व इंटरनेटचा वेग पाहता मला त्यात काही फारसे यश मिळू शकले नाही.

मी हे पत्र सविस्तर लिहिले असून माझी वैयक्तिक माहितीही तुम्हाला कळविली आहे. ज्यायोगे, तुम्हाला माझ्या

परिस्थितीचा योग्य तो अंदाज येऊ शकेल. तरी वाणिज्य शाखेतील पदवीनंतर शेतीपूरक व्यवसायासाठीचे अभ्यासक्रम कोणकोणते आहेत, याबद्दल आपण मार्गदर्शन करावे ही विनंती.

आपल्याकडून प्रतिसादाच्या प्रतीक्षेत

(मनोज कारभारी)

## ३) मागणीपत्र

**तुमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ग्रंथालयासाठी ललित पुस्तकांची मागणी करा.**

अ. ब. क.
गटप्रमुख
राष्ट्रीय सेवा योजना
स्वा. विवेकानंद महाविद्यालय,
जळगाव.
rnmk.mk19@hotmail.com
दिनांक १५ जून, २०१४

प्रति,
मा. व्यवस्थापक,
विद्या एजन्सीज, पुणे

**विषय :** स्वा. विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ग्रंथालयासाठी पुस्तके पाठवण्याबाबत.

महोदय,

मी, अबक, विवेकानंद महाविद्यालय, जळगाव या संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा गटप्रमुख या नात्याने आपल्याला पत्र लिहितो आहे.

आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य केवळ एका शिबिरापुरते, गावात केलेल्या ४ दिवसांच्या श्रमदानापुरतेच मर्यादित राहू नये, अशी आम्हा विद्यार्थ्यांची चर्चा झाली. आमच्या प्राध्यापकांनीही याला सहर्ष पाठिंबा दर्शविला. वर्षभर छोटे-मोठे उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबवावेत अशीही पुस्ती त्यांनी जोडली. वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींचा राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयात नेहमीच राबता असतो. या युवक-युवतींना संघटित ठेवावे, त्यांचा कार्यालयातील वेळ सत्कारणी लागावा, यानिमित्ताने काही चांगले वाचन घडावे, त्यावर चर्चा व्हाव्यात असे वाटले. त्यातूनच कार्यालयात एक ग्रंथालयही असावे असे ठरले. ग्रंथालयाचे कामकाज कसे चालते, पुस्तकांची व्यवस्था कशी केली जाते, हे ही यानिमित्ताने आमच्या लक्षात येईल. या सर्व उद्देशाने आमच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यालयात आम्ही एक ग्रंथालय सुरू केले आहे. यासाठी बाजारात आलेली काही नवीन पुस्तके आणि काही इतरांनी सुचवलेली पुस्तके आम्हाला हवी आहेत. त्याची यादी खाली देत आहे.

| पुस्तकाचे नाव | प्रकार | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| मुसाफिर | (स्वतःच्या जडणघडणीविषयी) | अच्युत गोडबोले | २ |
| नाव ग घुमा | (आत्मचरित्रात्मक आठवणी) | माधवी देसाई | २ |
| राष्ट्रद्रष्टे विवेकानंद | (चरित्र) | डॉ. वि. वि. पेंडसे | २ |
| आपले विचारविश्व | (वैचारिक लेख) | के. रं. शिरवाडकर | २ |
| दृष्टी | (कादंबरी) | अनंत सामंत | ४ |
| रणांगण | (कादंबरी) | विश्राम बेडेकर | ४ |
| तराळ - अंतराळ | (आत्मचरित्र) | शंकरराव खरात | २ |
| सावित्री | (कादंबरी) | पु. शि. रेगे | ४ |

आपण महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठीही पुस्तके योग्य त्या सवलतीत उपलब्ध करून देता. राष्ट्रीय सेवा योजनेचे ग्रंथालय आम्ही मुले व प्राध्यापक चालवणार आहोत. त्यामुळे आम्हालाही तुम्ही भरघोस सवलत द्याल, अशी आशा आहे.

सोबत बिलही पाठवावे. म्हणजे त्यानुसार लवकरात लवकर पैसे पाठवता येतील. पैसे धनादेशाद्वारे पाठवलेले चालतील की मनिऑर्डरने पाठवायला हवेत? तेही कळवावे. पुस्तके लवकरात लवकर पाठवावीत ही विनंती.

कळावे

आपला,
अ.ब.क
गटप्रमुख
स्वा. विवेकानंद महाविद्यालय
जळगाव

## ४) विनंतीपत्र

**विषय : तुम्ही राहता त्या भागात बसथांबा नाही. परिवहन मंडळाच्या वरिष्ठ व्यवस्थापकांना तुमच्या भागात नवीन बसथांबा करावा, याबाबत विनंतीपत्र लिहा.**

अ ब क
१८, प्रगती सहनिवास,
आनंदनगर, सिंहगड रस्ता,
पुणे - ५१.
anandi4590@gmail.com
दि. २५ जून, २०१४

प्रति,
वरिष्ठ व्यवस्थापक,
परिवहन मंडळ,
स्वारगेट बस आगार,
पुणे.

**विषय** : आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे - ५१ या भागात नवीन बसथांबा सुरू करण्याबाबत.

महोदय,

मी, अ.ब.क. सिंहगड रस्त्यावरील आनंदनगर भागात गेली चार वर्षे राहते आहे. रोज बसने प्रवास करणाऱ्यांपैकी मी एक नागरिक आहे. या नात्यानेच आनंदनगर भागातली परिस्थिती तुमच्यासमोर मांडते आहे.

आनंदनगर हा भाग सिंहगड रस्त्यावरील हिंगणे आणि माणिकबाग या भागांच्या मध्ये येतो. हिंगणे व माणिकबाग येथे बसथांबे आहेत. या दोन बसथांब्यांतील अंतर साधारण २.५ किमी ते ३ किमी आहे. पण या दोन भागांच्या मध्ये असणाऱ्या आनंदनगर भागात मात्र बसथांबा नाही. सिंहगड रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आनंदनगरचा विस्तार मोठा आहे. मुख्य रस्त्यापर्यंत येण्यासाठीसुद्धा बरेच अंतर पायी चालत यावे लागते.

आनंदनगर भागात राहणाऱ्या रहिवाशांना बससाठी दीड ते दोन कि.मी. अंतर पायी जावे लागते. या भागात

लोकसंख्येची घनताही जास्त आहे. आणि म्हणूनच या भागातून बसने जाणाऱ्या शाळकरी मुलांचे, नोकरदार महिला वर्गाचे, तसेच ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाणही मोठ्या संख्येने आहे. त्यामुळे घाई-गडबडीच्या वेळी पायी हे अंतर धावत-पळत गाठणे गैरसोयीचे होते.

आनंदनगरमधील नेहमी बसस्टॉपवर येणाऱ्या विविध वयोगटांतील व्यक्तींशी बोलताना, आनंदनगरमध्ये बसथांबा असण्याची निकड लक्षात आली. शिवाय आधी या भागात बसथांबा असल्याचेही काही व्यक्तींनी सांगितले. मध्यंतरीच्या काळात हा बसथांबा का काढण्यात आला, याचे कारण समजत नाही. परंतु आता नागरिकांची वाढती मागणी, आग्रह लक्षात घ्यावा ही विनंती.

तरी आपण या प्रकरणी लक्ष घालून आनंदनगर भागात लवकरात लवकर बसथांबा होईल असे पाहावे, ही विनंती.

कळावे.

आपली

अ ब क

बससेवेचा लाभ घेणारी एक ग्राहक

## ५) अभिनंदनपर पत्र, शुभेच्छापत्र

कोणाचेही अभिनंदन आपण का करतो? केव्हा करतो? आपल्या मित्राने, अगदी जवळच्या व्यक्तीने छोटसे जरी चांगले काम केले किंवा कुठल्याही परीक्षेत यश मिळविले की, आपण त्याबद्दल त्याचे अभिनंदन करतो-कौतुक करतो, पाठीवर शाबासकीची थाप देतो. त्याच्या कामाची, यशाची दखल घेतो, त्याच्या कामाला आपला सहर्ष पाठिंबा दर्शवितो, पुढचे काम अधिक चांगले/दर्जेदार करण्यासाठी त्याला उद्युक्त करतो, प्रेरणा देतो, शुभेच्छा देतो. पण हे सगळे झाले अनौपचारिक अभिनंदन पत्रांबद्दल. औपचारिक अभिनंदनपर पत्रांमध्येही आपल्या भावना थोड्या-फार फरकाने अशाच असतात. मात्र, औपचारिक पत्रे अधिक जागरुकतेने, विचारपूर्वक लिहावी लागतात.

आपली फारशी ओळख नसलेल्या समाजप्रतिष्ठित, मान्यवर व्यक्तीपर्यंत आपण आपल्या भावना, आपल्याला झालेला आनंद, शुभेच्छा पोहोचविण्यासाठी अभिनंदन/शुभेच्छापत्र ही एक उत्तम संधी असते. उद्योग-व्यवसाय क्षेत्र, कला- क्रीडा - साहित्य क्षेत्र, व्यवस्थापन क्षेत्र, सामाजिक, राजकारण इ. विविध क्षेत्रांतील मान्यवरांना अभिनंदन/शुभेच्छापत्र लिहा असे विषय परीक्षेत दिले जाऊ शकतात. एखादा पुरस्कार मिळणे, मानाच्या पदावर नियुक्ती होणे, निवडणूक जिंकणे, खेळात-स्पर्धेत यश मिळविणे, पदोन्नती इ. विविध कारणांनी आपण शुभेच्छा-अभिनंदन करत असतोच.

## अभिनंदन/शुभेच्छापत्र लिहिताना

- ज्या व्यक्तीला पत्र लिहायचे, त्या व्यक्तीबद्दल, त्याच्या कामाबद्दल पुरेशी माहिती असावी.
- पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्र लिहायचे असल्यास पुरस्काराचे त्या त्या क्षेत्रातले महत्त्व, तो नेमका कशासाठी दिला जातो, त्याचे स्वरूप इ. तपशीलही माहिती असावेत.
- विशिष्ट जागेवर झालेली निवड/नेमणूक इ. अशावेळी ते मानाचे पद, त्याचे अधिकार, निवडणुकीची माहिती (किती उमेदवार उभे होते इ.) जबाबदाऱ्या याबद्दल कल्पना असावी.
- कुठल्या नात्याने आपण पत्र लिहित आहात, याचे भान असावे. (एक नागरिक, मंडळाचा अध्यक्ष, साहित्य मंडळाचा कार्याध्यक्ष, सचिव, क्रीडा मंडळाचा व्यवस्थापक इ.) प्रश्नाच्या स्वरूपानुसार, तसा स्पष्ट उल्लेख पत्रात असावा.
- प्रेषकाला मनापासून आनंद झाला आहे, समाधान-अभिमान वाटतो आहे, हे या अभिनंदन/शुभेच्छापत्रातून स्पष्ट व्हावे.

- पत्र पाठवणाऱ्याचे त्या व्यक्तीबद्दलचे मत, भावना तसेच त्या व्यक्तीची कामगिरी नेमक्या व प्रभावी शब्दांत मांडता आली पाहिजे.
- एकंदर समाजातील-जनमानसातील भावना, मत, प्रभाव, परिणाम यांचाही थोडक्यात उल्लेख पत्रात असावा.

अनेक क्षेत्रांतील समाजमान्य जागतिक दर्जाच्या पुरस्कारांच्या बातम्या वर्तमानपत्रात येतच असतात. बातमीच्या जोडीलाच चौकटीत त्या पुरस्कारासंदर्भात काही नोंदीही येत असतात. (उदा. पुरस्काराचे महत्त्व, आतापर्यंत कोणाला पुरस्कार मिळाला, अनेकविध तक्ते इ.) त्यांचाही कात्रणसंग्रह तयार करण्याची सवय लावली, तर आयत्यावेळी संदर्भ उपलब्ध होऊ शकतात.

## अभिनंदन पत्र

**मा. माधुरी पुरंदरे यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांचे अभिनंदन सायली वझे, नागपूर या करत आहेत अशा आशयाचे पत्र लिहा.**

सायली वझे
सी- १२४/८ अनन्वय पार्क,
म. गांधी रस्ता
नागपूर - ४७
दि. २८/१२/२०१४

प्रति,
मा. माधुरीताई पुरंदरे,
सादर नमस्कार

बालसाहित्यातील कार्याबद्दल आपल्याला साहित्य विश्वातील अत्यंत मानाचा समजला जाणारा 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला. त्यासाठी सर्वप्रथम आपलं मन:पूर्वक अभिनंदन! या घटनेमुळे उचित व्यक्तीला पुरस्कार मिळाल्याचं समाधान माझ्याप्रमाणेच अनेकांना मिळालं असणार, यात शंका नाही.

'कोणे एके काळी' किंवा 'एकदा काय झाले' अशी सुरुवात आणि 'ते गुण्यागोविंदाने नांदू लागले' असा शेवट असणाऱ्या साच्यातून तुम्ही मराठी बालविश्वाला बाहेर आणलंत. परी, राक्षस, जादूई दिवा यांच्या गोष्टी मुलांना आवडत असल्या, तरी आपल्या आजूबाजूला असलेल्या आताच्या जगाबद्दल, त्यातील घटनांबद्दल-माणसांबद्दल, त्यांच्यातील परस्पर संबंधांबद्दलही मुलांना जबरदस्त कुतूहल असतं, हे तुम्ही अचूक ओळखलंत. त्यातही मुलांच्या चष्म्यातून या गोष्टींचा अन्वयार्थ लावण्यात, या गोष्टी समजून घेण्यातही तुम्ही यशस्वी झालात. सहज-सोप्या-नेमक्या शब्दांनी हे अनुभव लहान वाक्यांतून-गोष्टींतून गुंफत तुम्ही मुलांसमोर ठेवले आणि म्हणूनच मुलांनाही या गोष्टी भावल्या, आपल्या वाटल्या. राधा, यश, परग्रहावरून आलेला किकीनाक, अकू ही पात्रं लहानांमध्ये लोकप्रिय ठरली. जादूगार किंवा सुपरबाबामधले 'बाबा' मुलांना जवळचे वाटतात. 'मासोळी आणि पक्षी', 'माझी शाळा', 'राजा शहाणा झाला' अशी कितीतरी पुस्तकं मराठीप्रमाणेच इंग्रजीमध्येही आपण लिहिलीत. भाषेचा अडसर मुलांना येऊ नये, ती वाचती व्हावीत, हाच आपला त्यामागील हेतू.

आपण संपादित केलेला 'वाचू आनंदे हा ४ पुस्तकांचा संच आपल्या चोखंदळ, अभिरुचीसंपन्न व्यक्तित्वाची जणू साक्षच आहे. मुलांना काय वाचायला द्यावं, या प्रश्नाला समर्पक उत्तर देणारं हे कार्य

आहे. 'लिहावे नेटके' (भाग १ व २) हे ग्रंथ मुलांप्रमाणेच पालक, शिक्षक, अभ्यासक अशा कुणालाही मार्गदर्शक असेच आहेत. या ग्रंथांतून आपल्यातील व्यासंग, व्युत्पन्नता, कल्पकता, प्रतिभा; त्यासाठी आपण घेतलेले परिश्रम, केलेले संशोधन या सगळ्याचीच ठायीठायी प्रचीती येते. या कामाबद्दल आपल्याला 'डी. लिट' मिळावी असेच कार्य आपण केले आहे.

या सगळ्यावर कळस म्हणजे पुस्तकांतील आपणच चितारलेली जिवंत चित्रं. यामुळे मजकूर आणि चित्रं एकमेकांच्या साथीनं पुढे जातात. अत्यंत जाणकारीनं केलेलं लेखन आणि तितक्याच प्रभावीपणे, विचारपूर्वक केलेलं चित्रण यामुळे ही पुस्तकं एक वेगळीच उंची गाठतात. भाषेबरोबरच कलेचं, पुस्तकाकडे 'बघण्याचं' भानही मुलांच्यात आपसूक निर्माण होतं.

दर्जेदार, समाजमान्य व अत्यंत मानाचे समजले जाणारे पुरस्कार मिळाले, की आपल्यालाही उत्साह येतो, आनंद वाटतो, आपलाही मान वाढतो हे खरं आहे. पण काही पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या बाबतीत, त्यांचं कार्य एवढं मोठं असतं की; त्या पुरस्काराचाही सन्मान त्यांच्यामुळे वाढतो. आपल्याबाबतीतही हे निश्चितच म्हणावंसं वाटतं.

पुन्हा एकदा मनापासून अभिनंदन! आणि तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

आपली शुभेच्छुक,

**सायली वझे**

## ६) मानपत्र

मानपत्रातूनही आपण शुभेच्छा/अभिनंदनपत्राप्रमाणेच आपल्या भावना, आनंद, वाटलेले समाधान व्यक्त करतो. मान्यवर व्यक्तीच्या कार्याचा गौरव करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. अभिनंदन/शुभेच्छापत्र यातून एकास एक असा संवाद असतो. तर, मानपत्राचे मात्र जाहीरपणे वाचन होते. कलाकार, विचारवंत, शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक-गुरू अशा मान्यवरांचा गौरव विविध निमित्ताने करण्यात येतो. अशावेळी 'मानपत्र' देऊनही त्यांचा यथोचित गौरव केला जातो. 'मानपत्रा'तून मान्यवरांच्या कार्यातील ठळक घडामोडी, त्यांचे वेगळेपण जाहीररीत्या उपस्थितांपर्यंत पोहोचविले जाते. आपल्या, समाजाच्या या मान्यवरांप्रती असणाऱ्या भावना, आदर, प्रेम, विश्वास, कृतज्ञता त्या मान्यवरांपर्यंत पोहोचविण्याचे 'मानपत्र' हे उत्तम माध्यम असते. मानपत्राच्या प्रभावी वाचनामुळे मान्यवरांच्या कार्याची माहिती/महती उपस्थितांना कळतेच, त्याचबरोबर हे मानपत्र उपस्थितांसाठी प्रेरणादायीही ठरत असते.

### मानपत्र लिहिताना

- **प्रभावी शब्द, आशयसंपन्नता, अर्थवाहीपणा ही वैशिष्ट्ये.**
- **नेमक्या शब्दांत समग्र जीवनकार्याचा साक्षेपाने आढावा.**
- **मान्यवरांना उद्देशून द्वितीय पुरुषी अनेकवचनी (आदरार्थी-'आपण' या शब्दाचा वापर) भाषा असावी.**
- **कोणत्या समारंभात हे मानपत्र दिले जाणार त्याचा उल्लेख मानपत्राच्या वरील बाजूस असावा. शेवटी कोणाच्या हस्ते पुरस्कार दिला, अध्यक्ष इ. माहिती असावी.**

नातू फाउंडेशन, पुणे
डॉ. रवींद्र कोल्हे यांना मानपत्र

'नातू फाउंडेशन, पुणे' या संस्थेतर्फे डॉ. रवींद्र कोल्हे यांना २०१३ सालचा सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देताना आम्हाला विशेष आनंद होतो आहे.

आदरणीय डॉ. कोल्हे, वैद्यकीय क्षेत्रातील शिक्षण उत्तमप्रकारे पूर्ण केल्यानंतर देशाच्या दुर्गम भागांत जिथे डॉक्टर पोहोचलेला नाही, अशा भागात जाऊन काम करण्याचे आपण ठरवलेत. संपत्ती, कीर्ती, समृद्धी यांच्या मोहपाशात न अडकता विशिष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेवून, ध्येयासक्त मनोवस्थेत आपण अक्षरश: वनवास स्वीकारलात.

'गरिबातल्या गरीब माणसाला वैद्यकीय सेवा द्यायची,' या निश्चयाने मेळघाटातील सातपुडा पर्वतामध्ये वसलेल्या बैरागड गावात आपण गेलात. आपल्या या स्वप्नाला सुरुवातीपासून साथ होती ती आपल्या सुविद्य पत्नी डॉ. स्मिता कोल्हे यांची! पुरेशी औषधे नाहीत, साधने नाहीत, दवाखान्याला जागा नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीत तेथील आदिवासींवर आपण निष्ठेने उपचार करीत आहात.

'ज्या लोकांच्यात आपण राहतो, त्यांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक समस्याही आपण सोडविल्या पाहिजेत.' या जाणिवेतून आपल्या कामाला विविध आयाम येत गेले. स्त्री-अत्याचार, कुपोषण, बालमृत्यू, सरकारी कामकाजातील भ्रष्टाचार, वनतस्करी अशा एक ना अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत मेळघाटातील आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सतत कार्यरत आहात. त्यात कधी अपयश आले, लोकांचा रोष पत्करावा लागला, तरी तुम्ही अवलंबिलेला ध्येयवाद आणि सत्यावरची निष्ठा यामुळे अंगीकृत कामापासून विचलित झाला नाहीत. बळीची प्रथा बंद व्हावी, अज्ञानातून- आर्थिक विवंचनेतून धर्मांतर होऊ नये, यासाठी जनजागृती हाच उपाय आहे, हे जाणून तुम्ही लोकांशी संपर्क साधत राहिलात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतकी वर्षे झाली, तरी मेळघाटामध्ये कुपोषणाचा महाभयंकर प्रश्न तसाच आहे. हे तुम्ही सर्वांच्या लक्षात आणून दिले. या दुर्गम भागाला सर्वांशी जोडण्यासाठी प्रयत्न केलेत.

अचल निष्ठेने आपण करत असलेले हे भव्य रचनात्मक कार्य तरुणांना प्रेरणादायी ठरावे असेच आहे! आपणा उभयतांच्या कामात अनेकांचे सामाजिकतेने भारलेले हात लागावेत ही सदिच्छा! आज समाजसेवेचा आदर्श दीपस्तंभ म्हणून आपल्याकडे आशेने पाहिले जाते; याहून मोठा सन्मान तो काय असू शकतो? तरीही या पुरस्काराच्या निमित्ताने आम्ही सर्वांच्या वतीने आपल्या कार्यास सलाम करतो व आपणाप्रती कृतज्ञता व्यक्त करतो।

**हस्ते - मा. अनिल अवचट**

**अध्यक्ष - मा. गिरीश प्रभुणे**

## ७) निमंत्रणपत्र आणि आभारपत्र

निमंत्रणपत्र आणि आभारपत्र बरेचदा हातात हात घालूनच येतात. **निमंत्रणपत्रातून** आपण एखाद्या मान्यवर व्यक्तीला कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबद्दल आग्रहाची/आपलेपणाची विनंती करत असतो. तर **आभारपत्रातून** कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन केल्याबद्दल, बहुमूल्य वेळ दिल्याबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता असते. निमंत्रण आणि आभारपत्रे ही प्रामुख्याने एकाच व्यक्तीला उद्देशून लिहिलेली असतात.

## निमंत्रणपत्र

शाळा-महाविद्यालये, गृहसंस्था, मंडळे, परिषदा यांच्या एखाद्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणेपद किंवा अध्यक्षपद भूषवावे, अशी मान्यवरांना केलेली विनंती असे निमंत्रणपत्राचे स्वरूप असते. मान्यवरांची केवळ उपस्थिती येथे अपेक्षित नसते, तर कार्यक्रमात येऊन त्यांनी एखादी छोटीशी कृती करावी, अशी इच्छा असते.

अथी ते बक्षीस वितरण असेल, साहित्यवाटप असेल, पुस्तकाचे प्रकाशन असेल किंवा फीत कापून केलेले उद्घाटन असेल. याप्रसंगी, त्यांनी मार्गदर्शनपर दोन शब्द बोलावे, उपस्थितांशी संवाद साधावा, अशीही अपेक्षा असते. बरेचदा चर्चासत्रे, व्याख्याने यामध्ये मान्यवरांनी सक्रिय सहभाग घ्यावा, अशी आपली इच्छा असते. या मान्यवरांच्या व्यासंगाचा, अभ्यासाचा लाभ उपस्थितांना व्हावा, यासाठी त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचन करणे अगत्याचे असते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचा दर्जा वाढणार असतो आणि मान्यवरांनाही उपस्थितांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार असते. मान्यवर व्यक्तीने त्यांचा बहुमूल्य वेळ आपल्याला द्यावा, अशी आपली अपेक्षा असते. या सर्व गोष्टींची जाणीव आपल्याला आहे, हे त्या व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचे निमंत्रणपत्र एक उत्तम माध्यम असते.

## निमंत्रणपत्र लिहिताना :

- आपण कोणत्या नात्याने पत्र लिहितो आहे, त्याची स्पष्टता आपल्याला आणि समोरच्या व्यक्तीलाही यायला हवी
- आपण ज्या संस्थेतर्फे/मंडळातर्फे पत्र लिहितो आहोत, त्याची माहिती
- कार्यक्रम कशासाठी, त्याचा उद्देश, कार्यक्रमाचे स्वरूप इ
- ज्या मान्यवर व्यक्तीला बोलवायचे त्याच्या कार्याबद्दलची माहिती
- त्या व्यक्तीच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला होणारा फायदा
- कार्यक्रमाचा दिनांक-वार-वेळ
- कार्यक्रमाचे मानधन, येण्या-जाण्याची-राहण्याची सोय इ. बद्दल
- समारोप

## आभारपत्र :

आभारपत्रामध्ये वर सांगितलेल्या कार्यक्रमाच्या नंतरच्या प्रवासाचे प्रतिबिंब उमटत असते. या पत्रातून वेळ दिल्याबद्दल, मार्गदर्शन केल्याबद्दल मान्यवरांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता असते. कार्यक्रम कसा झाला, याविषयी मान्यवरांनाही उत्सुकता असतेच. त्यामुळे कार्यक्रम कसा झाला, उपस्थितांना काही लाभ झाला, आपले व्याख्यान सर्वांनी मनापासून ऐकले आहे, हे कळल्यावर कोणाला आनंद वाटणार नाही?

## आभारपत्र लिहिताना :

- आपण कोणत्या नात्याने पत्र लिहितोय
- कार्यक्रमाचा मूळ उद्देश सफल झाला का
- कार्यक्रम कसा झाला
- उपस्थितांवर त्याचा परिणाम किती/कसा झाला
- उपस्थितांच्या निवडक प्रतिक्रिया
- मान्यवरांच्या भाषणातील महत्त्वाच्या नोंदी
- समारोप

या ठिकाणी जाणीवपूर्वक एकाच कार्यक्रमाचे निमंत्रणपत्र आणि आभारपत्र देत आहोत. दोन्हीतील साम्यभेद कळण्यासाठी या पत्रांचा निश्चितच उपयोग होईल असे वाटते.

## निमंत्रणपत्र

**विषय : भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे यांच्या 'इतिहास-जाणीव-जागृती' विषयासंबंधी होणाऱ्या व्याख्यानमालेत इतिहास अभ्यासक राजा दीक्षित यांना बोलाविण्यासाठी निमंत्रणपत्र लिहा.**

अ. ब. क.
कार्यवाह,
भारत इतिहास संशोधन मंडळ,
पुणे
दि. १०/४/२०१४

प्रति,
मा. राजा दीक्षित,
प्राध्यापक,
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय** : भारत इतिहास संशोधन मंडळातर्फे आयोजित केलेल्या 'इतिहास जाणीव जागृती' व्याख्यानमालेत व्याख्यान देण्याबाबत.

महोदय,

मी, अ ब क, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे या संस्थेचा कार्यवाह या नात्याने आपल्याला पत्र लिहितो आहे. भारत इतिहास संशोधन मंडळ गेली अनेक दशके 'इतिहास' विषयासंदर्भात संशोधन, नानाविध प्रशिक्षणे तसेच, ऐतिहासिक दस्तऐवज जतन करणे या विषयात भरीव काम करते, हे आपण जाणताच. इतिहासाकडे बघण्याचा योग्य तो दृष्टिकोन लोकांमध्ये निर्माण व्हावा यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून पुढील महिन्यामध्ये 'इतिहास-जाणीव-जागृती' ही व्याख्यानमाला मंडळातर्फे आयोजित करण्यात येणार आहे.

सामान्य नागरिकांसाठी 'इतिहास' हा केवळ सनावळ्या आणि वंशावळ्या यातच बंदिस्त असतो. शाळा-महाविद्यालयातही 'इतिहास' केवळ परीक्षार्थी म्हणूनच शिकला-शिकवला जातो. परंतु 'इतिहास' हा एवढ्यापुरताच मर्यादित निश्चितच नव्हे. आपला आजचा वर्तमान आणि उद्याचा भविष्यकाळही याच इतिहासावर आधारलेला असतो. 'इतिहासाची' व्याप्ती जनसामान्यांपर्यंत पोचावी, हा या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश आहे.

आपण गेली अनेक वर्षे विद्यापीठ पातळीवर इतिहासाचे अध्यापन करता आहात. प्राथमिक आणि पदव्युत्तर पाठ्यपुस्तकाच्या अभ्यास मंडळावरही आपण अनेक वर्षे सक्रिय आहात. 'आधुनिक काळातील महाराष्ट्र'. हा आपल्या खास अभ्यासाचा विषय. आजवर वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून आपले लेखन आणि वेगवेगळे शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. समाजाभिमुख अभ्यासक-संशोधक म्हणून आपण सुपरिचित आहात. त्यामुळेच मंडळाच्या 'इतिहास-जाणीव-जागृती' या व्याख्यानमालेमध्ये 'इतिहास का व कशासाठी शिकावा' याबद्दल आपण मार्गदर्शन करावे, ही आग्रहाची विनंती. यानिमित्ताने उपस्थित नागरिकांना, मंडळाच्या सभासदांनाही आपले विचार जाणून घेण्याची संधी मिळेल. इतिहासाच्या ठरावीक कल्पना लोकांच्या मनात असतात. पण इतिहास म्हणजे नेमके काय, इतिहास आपल्या जगण्याचाच भाग कसा असतो, याबद्दलचे मार्गदर्शन आपण आपल्या व्याख्यानातून करावे, ही विनंती.

ही व्याख्यानमाला दि. २० मे ते २३ मे, २०१४ या ४ दिवसांत संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत मंडळाच्या सभागृहात होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असणार आहे. व्याख्यानमालेची वेळ २ तास असणार आहे. यामध्ये आपले व्याख्यान साधारण दीड तास आणि मग प्रश्नोत्तरांसाठीचा वेळ असे कार्यक्रमाचे ढोबळ स्वरूप ठरविले आहे.

आपला विषय, विषय मांडणीसाठीचा वेळ, कार्यक्रमाची वेळ इ. बाबत आपल्या काही सूचना असतील, तर अवश्य कळवाव्यात. त्यांचे स्वागतच आहे. व्याख्यानाचे मानधन आणि प्रवासखर्च याबाबत आम्ही लवकरच संपर्क साधू.

आपण आपल्या कामात/संशोधनात व्यग्र असता, याची जाणीव आहेच. तरी वेळात वेळ काढून व्याख्यानाचे आमंत्रण आपण स्वीकारावे, ही आग्रहाची विनंती.

कळावे.

आपल्या सकारात्मक प्रतिसादाच्या अपेक्षेत,
अ. ब. क.
कार्यवाह, भारत इतिहास संशोधन मंडळ,
पुणे

## आभारपत्र

**विषय : भारत इतिहास संशोधन मंडळातर्फे आयोजित 'इतिहास - जाणीव जागृती' या व्याख्यानमालेमध्ये व्याख्यान दिल्याबद्दल इतिहास अभ्यासक राजा दीक्षित यांना कार्यवाह या नात्याने आभारपत्र लिहा.**

अ. ब. क.
कार्यवाह
भारत इतिहास संशोधन मंडळ
पुणे
दि. ३०/५/२०१४

प्रति,
मा. राजा दीक्षित,
प्राध्यापक,
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय :** भारत इतिहास संशोधन मंडळातर्फे आयोजित केलेल्या 'इतिहास जाणीव जागृती' व्याख्यानमालेतील व्याख्यानाबाबत आभार.

महोदय,

भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे आयोजित 'इतिहास-जाणीव-जागृती' या व्याख्यानमालेमध्ये आपण सहभागी झालात व उपस्थितांना अत्यंत अभ्यासपूर्वक मार्गदर्शन केले; त्यासाठी मनापासून आभार आणि धन्यवाद.

इतिहासाला बरेचदा वंशावळी आणि सनावळी यांच्या चष्म्यातूनच पाहिले जाते. पण केवळ परीक्षार्थी ही भूमिका सोडली, तर इतिहासासारखा रंजक व रसपूर्ण विषय दुसरा कुठला नाही. आपल्या दैनंदिन आयुष्यालाही इतिहासाचा स्पर्श असतो; या दृष्टीने 'इतिहासा'ची व्याप्ती खूपच व्यापक आहे. याबद्दलची जाण समाजात वाढावी, यासाठीच आपण ही व्याख्यानमाला आयोजित केली होती.

या व्याख्यानमालेतील 'इतिहास का व कशासाठी' याविषयावर आपले व्याख्यान अत्यंत नेमके आणि विचारप्रवर्तक झाले. इतिहास हा जीवन व्यापून टाकणारा विषय कसा आहे, याबद्दलची आपली मांडणी आखीव-रेखीव होती. 'इतिहास म्हणजे माणसांची गोष्ट, माणूस जिथे राहतो त्या समाजाची गोष्ट,' इतिहासाची इतकी सहज-साधी व्याख्या तुम्ही केली. 'माणूस परिवर्तनशील आहे आणि म्हणूनच इतिहासही परिवर्तनशील आहे' अशा सोप्या शब्दांमध्ये इतिहास कसा व का बदलतो याची दृष्टी आपण उपस्थितांना दिली. इतिहास आणि समाजशास्त्र, इतिहास आणि मानसशास्त्र, इतिहास आणि भाषा अशी तुलनाही आपण श्रोतृवर्गासमोर मांडली.

साध्या-सोप्या भाषेमध्ये, श्रोत्यांशी संवाद साधत आपण दिलेले व्याख्यान प्रभावी आणि रंगतदारही झाले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांच्या वेळीही श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले. त्यावेळच्या उत्तरांमध्येही आपल्याकडून नवनवीन माहिती मिळत गेली व शंकांचे निरसन होत गेले. मनामनांतल्या इतिहासावर जी पुटे चढली होती, ती पुसली जायला आपल्या व्याख्यानाची निश्चितच मदत होईल, याविषयी शंका नाही. व्याख्यानमाला संपल्यावरही आपल्या व्याख्यानाची मोहिनी कमी झाली नाही. परत एकदा आपल्याला संवाद साधण्यासाठी अवश्य बोलवावे, अशाही सूचना आमच्यापर्यंत येत आहेत.

आपण आपल्या व्यग्र दिनक्रमातून वेळ काढून आलात, त्यासाठी परत एकदा मनापासून धन्यवाद. भविष्यातही आम्हाला आपले मोलाचे मार्गदर्शन असेच मिळत राहील, याबद्दल खात्री आहेच.

कळावे.
आपला,
अ. ब. क.
कार्यवाह,
भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे

## ८) अर्ज लेखन

रजेचा अर्ज, सुट्टीचा अर्ज, नोकरी संदर्भात करायचा अर्ज इ. अर्जलेखनाचे विषय असू शकतात. बरेचदा या अर्जांचा विहित नमुना तयार असतो. त्यानुसारच अर्ज करायचा असतो. अन्यथा हे सुद्धा एकप्रकारे विनंतीपत्रच असते. त्यामुळे त्याचे लेखन विनंतीपत्राप्रमाणे करावे. मात्र त्यात 'विषय' लिहिल्यावर योग्य तो संदर्भ देणे आवश्यक आहे. नोकरीसाठी अर्ज करताना जाहिरातीचा संदर्भ, रजेच्या अर्जात रजेचा प्रकार इ. नोंदीही आवश्यक ठरतात.

**नोकरीसाठी अर्ज करताना :-**

● स्वतःची थोडक्यात ओळख (पूर्णनाव, शिक्षण, कामाचा अनुभव) लिहावी ● या पदासाठी योग्य उमेदवार असल्याची पात्रता लिहावी ● शेवटी आवश्यक ती कागदपत्रे जोडत असल्याची नोंद ● कागदपत्रे - व्यक्तिगत माहिती, पदवी प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इ. ● व्यक्तिगत माहिती (नाव, पूर्ण पत्ता, पत्रव्यवहाराचा पत्ता, शिक्षण इ., इतर महत्त्वाच्या नोंदी, कामाचा अनुभव, मिळालेले पुरस्कार इ.)

**विषय:- वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनुसार जनसंपर्क अधिकारी या पदासाठी अर्जलेखन करा.**

अ. ब. क.
१/१, रामदास पेठ, अकोला
चलभाष क्र. ९९९९९९९९९९
दि. २०/२/२०१५

प्रति,
मा. व्यवस्थापक,
दीप इंडस्ट्रिज, अकोला.

**विषय - दि. २० फेब्रुवारी, २०१५ रोजी दै. लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झालेल्या जनसंपर्क अधिकारी या पदासाठी आपण दिलेल्या जाहिरातीनुसार.**

महोदय,

श्री अ ब क अकोला येथील स्थानिक रहिवासी असून पुणे विद्यापीठातून पत्रकारिता व जनसंपर्कविषयक पदव्युत्तर पदवी उत्तम गुणांसह प्राप्त केली आहे. मला पुणे तसेच अकोला येथील वृत्तपत्र कार्यालये तसेच औद्योगिक संस्थांमध्ये काम करण्याचा सुमारे १० वर्षांचा अनुभव आहे. यासंबंधी सर्व कागदपत्रे, प्रमाणपत्रे मी सोबत जोडली आहेत. आपल्यासारख्या नामवंत औद्योगिक संस्थेमध्ये काम करण्याची संधी माझ्यासाठी अतिशय मोलाची आहे. संस्थेचा जनसंपर्क विभाग अधिक बळकट करण्यासाठी सर्वतोपरी कष्ट घेण्याची माझी तयारी आहे.

कृपया या पदासाठी माझी निवड करण्याचा प्राधान्याने विचार करावा.

आपला

अ. ब. क.

**सोबत :** १) शैक्षणिक प्रमाणपत्रे

२) अनुभवाची प्रमाणपत्रे

३) माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे व पुरस्कार

## आ) अनौपचारिक पत्रे :

अनौपचारिक पत्रे म्हणजे घरगुती, कौटुंबिक, मित्र-मैत्रिणींना लिहिलेली पत्रे. या पत्रातून आपण आपल्या भावभावना, ख्याली, खुशाली दुसऱ्यापर्यंत पोहोचवत असतो.

**अनौपचारिक पत्र लिहिताना :**

- अनौपचारिक पत्र लिहिण्याचे विशिष्ट असे नियम-संकेत नाहीत.
- उजवीकडच्या कोपऱ्यात दिनांक, वार, गावाचे नाव लिहावे
- मध्यभागी ॐ/श्री असेही लिहिण्याची प्रथा आहे.
- डावीकडे प्रिय/तीर्थरूप/आदरणीय इ. योग्य भावना लिहून पुढे व्यक्तीचे नाव लिहून पत्र लेखनाला सुरुवात करता येते
- शेवटी व्यक्तीनुरूप नमस्कार, आशीर्वाद लिहून तुझा/तुझी/तुमचा इ. लिहून समारोप करावा
- पत्रातील भाषा संवाद केल्यासारखी, गप्पा मारल्यासारखी साधी-सोपी, मनमोकळी असावी. वर्णनात्मक, खेळकर, दिलखुलास, आपलेपणाची असावी

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजिलेल्या शिबिरात सहभागी झालेली मुलगी आपल्या आईला आपले अनुभव कळवत आहे, असे पत्र लिहा.**

प्रिय आई,

खूप दिवसांनी असं पत्र लिहिण्याची वेळ येतेय. रोज तुझ्याजवळच असते ना, त्यामुळे कॉलेजमध्ये काही घडलं, की संध्याकाळी सगळं बडबडून सांगता येतं तुला. घरापासून दूर आलं, की आपलं घर, आपली माणसं यांची किंमत कळते. पण याचा अर्थ असं नाही हं, की मी इथे कंटाळलेय. उलट खूप नवे, खूप वेगळे अनुभव घेतेय सध्या.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कॉलेजतर्फे आयोजित केलेल्या शिबिरासाठी शहरापासून दूर या आडगावी यायला

निघालो, तेव्हा आमचा उत्साह अगदी ओसंडून वाहात होता; पण ही काही आपली नेहमीची ऐषारामाची सहल नाही, याची जाणीव इथल्या खाच-खळग्याच्या वाटेने लगेच करून दिली. मग इथल्या शाळेत आमची पलटण उतरली. शाळा कसली म्हणायची तिला. ना फरशी, ना पंखे, ना धड स्वच्छतागृह। पटांगण मात्र मस्त आहे आणि आसपास शेतं, पलीकडे नदी आणि जवळच डोंगर। आम्ही अगदी खुश झालो त्या मोकळ्या वाऱ्यात हुंदडताना।

रात्री आमटी-भात, भाजी-भाकरीचं जेवणही मस्त वाटलं. पण एकदाच हं। अजून ५-६ दिवस असंच जेवायचंय, या कल्पनेने मन धास्तावलंच. त्यादिवशी रात्री चांदण्यात बसून सरांनी शिबिराच्या कार्यक्रमाची कल्पना दिली.

सरांनी पहाटे शिट्टी वाजवली अन् खऱ्या अर्थाने शिबिर सुरू झालं. चरित्रकथन, गटचर्चा, गाणी, व्याख्यान, खेळ यात दिवस कसा संपायचा ते समजलंच नाही. त्याचबरोबर आम्ही गावात जाऊन लोकांशी बोलत होतो, त्यांच्या अडचणी जाणून घेत होतो, त्यांचं रोजचं हलाखीचं, कष्टाचं जीवन बघत होतो. त्यातून आम्ही अधिकच शहाणे होतोय असं जाणवतंय.

आई, रोज सकाळी गावकऱ्यांच्या साहाय्यानं श्रमदानानं स्वच्छता अभियान राबवायचं, अशी योजना आहे. प्रथम गावातील रस्ता-त्यातील खाचखळगे भरून सपाट करायचा, गटार तुंबू नये म्हणून पाणी वाहातं ठेवण्यासाठी लोकांना पटवायचं, एक ना दोन!

रोज रात्री गटागटानं आम्ही पहारा देतो, तेव्हा जबाबदारीची जाणीव होते. सगळ्यांच्यात मिळून-मिसळून जमवून घेणं, म्हणजे काय हे कळायला लागलंय आता. आई गं, सगळंच शब्दांत वर्णन करून नाही सांगता येणार; पण खूप काही समजतंय नवीन नवीन. भेटू तेव्हा बोलूच.

आजी, बाबांना नमस्कार, मिकीची खूप आठवण येतेय.

तुझी,

स्नेहा

## इ) निमंत्रण पत्रिका :

निमंत्रणपत्रं आणि निमंत्रण पत्रिका यात थोडा फरक आहे. निमंत्रण पत्रिका ही एखाद्या कार्यक्रमाचे आमंत्रण जाहीरपणे सगळ्यांना देण्यासाठी असते. ती कुणाही एखाद्या व्यक्तीला उद्देशून लिहिलेली नसते. निमंत्रण पत्रिका जनसंपर्काचे प्रभावी माध्यम असते. विविध क्षेत्रातील सभा, परिषदा, चर्चासत्रे, शिबिरे, स्नेहसंमेलने, स्पर्धा, प्रकाशन सोहळे इ. वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी निमंत्रण पत्रिकेतून जाहीरपणे निमंत्रण देण्यात येते. एखादा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याचे त्यातून निर्देशित होत असते. घरगुती, कौटुंबिक कार्यक्रमासाठी ज्या निमंत्रण पत्रिका असतात; त्याचे स्वरूप, उद्देश थोडा वेगळा असतो. या ठिकाणी आपण केवळ औपचारिक निमंत्रण पत्रिकांचाच विचार करत आहोत.

**निमंत्रण पत्रिका लिहिताना :**

- सुरुवातीला संस्थेचे/मंडळाचे नाव, घोषवाक्य, लोगो इ. माहिती असावी
- कार्यक्रमाचे शीर्षक ठळक अक्षरात असावे
- योग्य तो आग्रह, आदर, मान राखत कार्यक्रमासाठीचे निमंत्रण असावे

- यामध्ये कार्यक्रमाचा हेतू - उद्देश यांबरोबरच कार्यक्रमाचे ठिकाण, वेळ, वार, साधारण रूपरेषा याचा स्पष्ट उल्लेख असावा
- समारंभाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, वक्ते इ. चा त्यांच्या पदांसह उल्लेख निमंत्रण पत्रिकेत असावा
- शेवटी आयोजकांबद्दलही तपशील असायला हवा
- निमंत्रण पत्रिकेची मांडणीही आकर्षक असावी
- कार्यक्रमाला उचित अशा काव्यपंक्ती, सुविचार लिहून कार्यक्रम पत्रिका अधिक प्रभावी, परिणामकारक करता येते (महिलादिनाचा कार्यक्रम, शिक्षकदिन, गुरुपौर्णिमा इ.)
- एखाद्या संस्थेची/मंडळाची माहितीही अशा निमंत्रणातून लोकांपर्यंत पोचत असते. त्यामुळे जाहिरातीचे उत्तम माध्यम म्हणूनही निमंत्रण पत्रिकांकडे बघितले जाते

## ई) कार्यक्रम पत्रिका :

कार्यक्रम पत्रिका ही अर्थातच कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट व्हावे; यासाठी असते. एखाद्या कार्यक्रमात व्यासपीठावर असणाऱ्या मान्यवरांसाठी कार्यक्रमाचं स्वरूप उलगडून दाखवणारी आकर्षक कार्यक्रम पत्रिका असते तर कधी निमंत्रण पत्रिकेच्या शेवटी/मागील बाजूसही छापील कार्यक्रम पत्रिका असते. कार्यक्रमाचे आयोजन कशाप्रकारे केले आहे; त्याचीही कल्पना कार्यक्रम पत्रिका पाहून येते. कार्यक्रमाला येणाऱ्यांनाही कार्यक्रमाची नेमकी रूपरेषा कळल्यामुळे नेमक्या वेळी कार्यक्रमाला उपस्थित राहणे सोयीचे होते.

**कार्यक्रम पत्रिका तयार करताना :**

- कार्यक्रमाला पूर्णत्व यावे अशा पद्धतीने वेळेनुसार टप्पाटप्याने कार्यक्रमांची नोंद पत्रिकेत असावी
- कार्यक्रमांच्या संकेतानुसार त्याची मांडणी असावी. (उदा. अध्यक्षीय भाषण हे कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी असते, पाहुण्यांचे स्वागत सुरुवातीला असते, याप्रमाणे) ईशस्तवन/दीपप्रज्वलन/सरस्वती पूजन, प्रास्ताविक, परिचय, स्वागत, मुख्य कार्यक्रम, प्रमुख पाहुण्यांचे भाषण, अध्यक्षीय समारोप, आभारप्रदर्शन, पसायदान/राष्ट्रगीत इ. याप्रमाणे कार्यक्रमांचे संकेत ठरले आहेत. (यात अर्थातच आयोजक बदल करू शकतात)
- कार्यक्रमाचे नाव ठळक अक्षरात असावे. वार, दिनांक, स्थळ, वेळ यांचा स्पष्ट उल्लेख पत्रिकेत असावा
- साधारण कशासाठी किती वेळ राखून ठेवला आहे, याचेही भान वाचणाऱ्याला यावे
- कार्यक्रम पत्रिकेत मांडणीलाही महत्त्व आहे. चित्र, अवतरणे, वेगवेगळ्या अक्षरांचा उपयोग करून ही पत्रिका आकर्षक करण्याचा प्रयत्न असतो

**पुढे एकाच विषयाची निमंत्रण आणि कार्यक्रम पत्रिका करून दाखविली आहे -**

**विषय :- विद्यावर्धिनी महाविद्यालय, बीड या संस्थेच्या २५व्या वार्षिक पारितोषिक वितरणाची व मुलाखतीची निमंत्रण पत्रिका व कार्यक्रम पत्रिका तयार करा.**

## निमंत्रण पत्रिका

### विद्यावर्धिनी महाविद्यालय, बीड

स. न. वि. वि.

विद्यावर्धिनी महाविद्यालय, बीड या संस्थेचा **२५वा पारितोषिक वितरण समारंभ** व **डॉ. अनिल अवचट,** (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते) **यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम** संयुक्तपणे **शनिवार, १५ मार्च, २०१५** यादिवशी आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळ, साहित्य परिवार, आविष्कार, वक्तृत्व परिषद इ. नानाविध मंडळांतर्फे वर्षभर वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात. त्यातील विजेत्या विद्यार्थ्यांना काही व्यक्तिगत तर काही सांघिक बक्षिसे देऊन त्यांच्या भावी कामगिरीसाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाते. यावेळी या विद्यार्थ्यांचे कौतुक **ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत सरदेसाई** करणार आहेत. तरी या पारितोषिक वितरण सोहळ्यास व त्यानंतर लगेचच होणाऱ्या मुलाखतीच्या कार्यक्रमास आपण जरूर उपस्थित राहावे, यासाठी हे आग्रहाचे आपलेपणाचे निमंत्रण.

आपले

**डॉ. सुरेश वाघ**
(प्राचार्य, विद्यावर्धिनी महाविद्यालय)

**राहुल नगरकर**
(विद्यार्थी प्रतिनिधी)

**स्थळ :** रमाकांत ठाकूर सभागृह, विद्यावर्धिनी महाविद्यालय.
१८-२०/२८, राणी लक्ष्मीबाई मार्ग, बीड - ५.

**दूरध्वनी :** २५१२३८५, www.vidyavardhinico.co.in

**कार्यक्रमाची वेळ :** शनिवार, दि. १५ मार्च, २०१५, दु. ४ ते ६.३०

## कार्यक्रम पत्रिका

### 'विद्यावर्धिनी महाविद्यालय, बीड

१८-२०/२८, विद्यावर्धिनी महाविद्यालय, बीड - ५

दूरध्वनी : २५१२३८५, www.vidyavardhini.co.in

✻

२५वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम

शनिवार दि. १५ मार्च, २०१५, वेळ : दु: ४.०० ते ६.३०

स्थळ : रमाकांत ठाकूर सभागृह, विद्यावर्धिनी महाविद्यालय

✻

**पारितोषिक वितरण समारंभ, दु. ४.००**

- दीपप्रज्वलन
- पाहुण्यांचे स्वागत - हस्ते श्री. किसन पाटील
- प्रास्ताविक - प्राचार्य, डॉ. सुरेश वाघ
- पारितोषिक वितरण सोहळा - हस्ते - ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत सरदेसाई
- मनोगत - विद्यार्थी प्रतिनिधी
- प्रमुख पाहुण्यांचे भाषण - डॉ. हेमंत सरदेसाई
- आभार - श्रीमती कृष्णा गोडांबे
- पसायदान

**सूत्रसंचालन** - श्रीमती अदिती अडसूळ

**प्रकट मुलाखत**, दु. ५.००

- स्वागत - मा. प्राचार्य डॉ. सुरेश वाघ
- परिचय - विद्यार्थी प्रतिनिधी
- प्रकट मुलाखत - **डॉ. अनिल अवचट**
  मुलाखतकार - प्रावीण्या डोंगरे
- समारोप.

## सरावासाठी विषय

**तक्रार पत्र :**

- तुम्ही ज्या भागात राहता, तेथे जवळच असलेल्या नदीमध्ये जलपर्णी साठली आहे. त्यासंबंधीचे तक्रारपत्र महापालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांना लिहा.
- तुमच्या महाविद्यालयाच्या पटांगणाचा वापर खेळाव्यतिरिक्त वेगवेगळ्या कारणांसाठी केला जात आहे. त्यासंबंधी प्राचार्यांकडे योग्य ती तक्रार नोंदवा.

**चौकशी पत्र :**

- तुमच्या महाविद्यालयाची सहल जाणार आहे. त्यासाठी तुम्हाला राज्य परिवहन मंडळाच्या दोन बसेस हव्या आहेत. त्या बसची, व्यवस्थेची चौकशी करणारे पत्र स्थानकप्रमुखांना लिहा.
- महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सभागृह तुमच्या मंडळाच्या कविसंमेलनासाठी हवे आहे. या सभागृहाबद्दल माहितीची चौकशी करणारे पत्र लिहा.
- 'आयुका' पाहण्यासाठी तुम्ही सहल आयोजित केली आहे. त्यासंबंधी चौकशी करणारे पत्र केंद्र संचालिकांना लिहा.

**मागणी पत्र :**

- सार्वजनिक गणेशोत्सवासाठी सजावटीचे साहित्य व बक्षीस वितरणासाठी वस्तूंची मागणी करणारे पत्र दुकानदाराला लिहा.
- प्रयोगशाळेतील साहित्य मागणीपत्राद्वारे मागवा.

**विनंतीपत्र :**

- व्यायामशाळेतील नादुरुस्त उपकरणे दुरुस्त करण्यासाठी तंत्रज्ञ पाठवण्याविषयी विनंतीपत्र लिहा.
- तुमच्या भागात एक रुग्णालय व एक शाळा आहे. तो भाग 'शांतता क्षेत्र' करण्याबाबत महापालिकेतील अधिकाऱ्याला विनंतीपत्र लिहा.

**अनौपचारिक पत्र :**

- शिकण्यासाठी शहरात आलेल्या मुलीचे गावात राहणाऱ्या आईला पत्र.
- आजोबांच्या पंच्याहत्तरीनिमित्त आजोबांना पत्र लिहा.
- १२ वी विज्ञान शाखेतला विद्यार्थी आपल्या वडिलांना पत्र लिहून आपल्या भावी अभ्यासाचे नियोजन, करिअर यासंबंधीच्या भावना कळवत आहे.

**निमंत्रण/कार्यक्रम पत्रिका :**

- महाविद्यालयातील १९९५ सालच्या माजी विद्यार्थ्यांचा 'स्नेहमेळावा' आयोजित केला आहे. त्या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका व कार्यक्रम पत्रिका तयार करा.

**निमंत्रणपत्र व आभारपत्र :**

- आपल्या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या साहित्यमेळ्याच्या उद्घाटनासाठी ज्येष्ठ लेखिका डॉ. विजया वाड यांच्यासाठी निमंत्रणपत्र व आभारपत्र लिहा.

- आपण काम करीत असलेल्या स्वयंसेवी संस्थेतर्फे आयोजित शालेय साहित्य वाटपासाठी आपल्या भागातील नगरसेवकांसाठी निमंत्रणपत्र व आभारपत्राचा नमुना तयार करा

**अभिनंदन व शुभेच्छा :**

- आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पर्यावरणमित्र पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा
- एका आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रबंध सादर करण्यासाठी निवड झालेल्या आपल्या शिक्षिकांचे अभिनंदन करणारे व शुभेच्छा देणारे पत्र लिहा

**मानपत्र :**

- ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ वा. ना. दांडेकर यांच्या सत्कारप्रसंगी त्यांना देण्यासाठी मानपत्राचा मजकूर तयार करा

**अर्जलेखन :**

- एका जाहिरातसंस्थेमधील कमर्शिअल आर्टिस्ट या पदासाठी अर्जाचा नमुना तयार करा

✦✦✦

# ३. भाषांतर विभाग

## भाषांतर करताना :

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या जगात माहितीचा विस्फोट हे आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहे. विज्ञान, साहित्य, तंत्रज्ञान, राजकारण, समाजकारण, माहिती तंत्रज्ञान, व्यापार, व्यवस्थापन.... कोणतेही क्षेत्र विचारात घेतले, तरी त्या क्षेत्रातील ज्ञानाचा, माहितीचा खूप भाग भाषांतरित असतो, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

जागतिकीकरणामुळे आज विविध देशात नोकरी, व्यवसाय यांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या साऱ्याचा परिणाम म्हणून भिन्न-भिन्न भाषा बोलणारी, भिन्न संस्कृतीची माणसे एकत्र काम करू लागली आहेत. अशा काळात एकमेकांच्या भाषा शिकणे गरजेचे झाले आहे. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी माणसे बहुभाषिक होऊ लागली आहेत. ज्ञानसंपादनासाठी इतर भाषा शिकण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे भाषांतरकारांच्या कामाची व्याप्ती अफाट वाढली आहे. एकमेकांचे म्हणणे एकमेकांना समजण्यासाठी भाषांतराला पर्याय नाही. सर्व जगाची भाषा एकच नसल्याने ही देवघेव आणि दळणवळण अनेक भाषांबरोबरच प्रामुख्याने इंग्रजीतून खूप मोठ्या प्रमाणात होते. त्यासाठी भाषांतर हा विषय खूप महत्त्वाचा ठरतो. भाषांतराच्या विषयाची व्याप्ती खूप मोठी असली तरी आपण त्याचा विचार इंग्रजी व मराठी या दोन भाषांपुरता मर्यादित करणार आहोत.

एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे अनेकजणांपर्यंत पोहोचणार असते आणि कायमची उपलब्ध राहणार असते. याशिवाय, भाषांतरामुळे पुनर्निर्मितीचा आनंद मिळतो तो वेगळाच! माहितीपर किंवा विज्ञानक्षेत्रातील भाषांतरे करणे व साहित्यकृतींची भाषांतरे करणे, यात फार मोठा फरक आहे. माहितीपर भाषांतरामध्ये वस्तुनिष्ठ आणि सुबोध असे भाषांतर करण्याला महत्त्व आहे. मात्र साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक परिस्थितीचा, ऐतिहासिक काळाचा, परकीय भाषेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे, त्या भाषेची उपजत समज आणि अभ्यासपूर्ण ज्ञान असावे लागते.

साहित्यकृतीचे भाषांतर करताना शब्द हे माध्यम आहे, शब्दाला प्रतिशब्द देणे हे अंतिम उद्दिष्ट नाही, हे कायम लक्षात ठेवावे. भाषांतर करताना विचार, भाव, त्या विचाराची-भावनेची तीव्रता, सौम्यता, जात, पोत जाणून घेणे, महत्त्वाचे ठरते.

मूळ लेखकाचे म्हणणे सर्व बाजूंनी नीट समजावून घेऊन आपल्यासाठी, आपल्या वाचकांसाठी त्याचा एक निश्चित अर्थ लावून तो सुसंगतपणे भाषांतरातून व्यक्त होण्यावर भाषांतराचे यश अवलंबून असते. इंग्रजीतून मराठीत भाषांतर करायचे असेल, तर भाषांतरित मराठी हे मराठी वाटले पाहिजे. म्हणजे आपण मुळातून मराठीतूनच वाचतो आहोत, असे वाचकाला वाटले पाहिजे. अर्थातच, असे भाषांतर हे आदर्श भाषांतर होय. मूळ अनुभवाशी पूर्ण प्रामाणिक राहणे आणि मराठी भाषेचे मराठीपण अबाधित ठेवणे, या दोन्ही गोष्टी एकत्र जुळवून आणणे, हे भाषांतरकाराच्या कौशल्यावर अवलंबून असते. कारण प्रत्येक भाषेला त्या प्रदेशाच्या मातीचा गंध असतो, तिथल्या समाजजीवनाशी त्या भाषेचे घट्ट नाते असते, ती भाषा तिथल्या शतकानुशतकांच्या संस्कृतीतून उमललेली असते.

त्यासाठी भाषांतरकाराला आपल्या प्रतिभेवर, व्यासंगावर, समांतर वाक्प्रचारांवर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी एक उदाहरण घेऊ. इंग्रजीमध्ये 'लाईक फादर लाईक सन' (जसा बाप तसा मुलगा) अशी म्हण आहे; तर मराठीत अगदी त्याच अर्थाची 'खाण तशी माती' ही म्हण आहे. अशावेळी शब्दशः भाषांतराचा प्रश्नच येत नाही. इंग्रजीचे मराठीत भाषांतर करताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या दोन्ही भाषा आपल्याला चांगल्या अवगत हव्यात. मराठी आपली मातृभाषा असल्याने ती आपल्याला सहज जमते; पण भाषांतर करताना आपल्याला भाषेची

प्रगत नैपुण्ये अवगत हवीत. मराठी भाषेतील शब्दसंपदा, शब्दांच्या बदलत्या छटा, वाक्प्रचार, म्हणी इ. गोष्टींचे चांगले ज्ञान हवे. इंग्रजी ही परकीय भाषा त्यामुळे तिची वैशिष्ट्ये आपल्याला प्रयत्नपूर्वक अभ्यासाने समजून घ्यायला हवीत. रचना, व्याकरण यातील फरक जाणून घ्यायला हवा.

इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांची उत्तम जाण असेल, तरच आपले भाषांतर दर्जेदार ठरेल. चांगले भाषांतर करण्याची पूर्वतयारी म्हणून पुढील गोष्टी जरूर करा.

१) इंग्रजी वृत्तपत्र वाचणे. (शक्य झाल्यास काही साहित्यकृतींची पुस्तकेही।)

२) नवीन शब्दांचे अर्थ पाहताना त्याची अर्थच्छटा जाणून घ्या.

३) इंग्रजी बातम्या ऐका.

४) त्या त्या भाषेच्या व्याकरणानुसार वाक्यरचना असते. भाषांतर करताना याचे भान ठेवा.

**उदा.** He said to his brother. याचे भाषांतर - 'तो आपल्या भावाला म्हणाला' असे होईल. (तो त्याच्या भावाला म्हणाला, असे नाही.)

५) शब्दसंग्रह - अ) हुद्दे, पदनामे इ. शब्द भाषांतर करताना तसेच ठेवावेत.
उदा. मेजर, ब्रिगेडियर इ.

आ) मराठीत रुळलेले इंग्रजी शब्द तसेच वापरले तरी चालतील.
उदा. टेबल, पेन, गॅस इ.

इ) शब्दाची छटा ओळखा.
उदा. To laugh - मोठ्याने हसणे, To smile - स्मितहास्य करणे, To titter - कुत्सितपणे हसणे.

ई) वाक्प्रचाराला पर्यायी चपखल वाक्प्रचार, म्हण वापरा.

उ) त्या त्या भाषेतील वाङ्मयीन संकेत, सामाजिक संकेत, आध्यात्मिक संकेत (उदा. ब्रह्म, माया इ.) संकल्पना लक्षात घ्या.

एकूण इंग्रजीचे मराठीत वा मराठीचे इंग्रजीत भाषांतर करताना दोन्ही भाषांची मर्मस्थळे लक्षात घेऊन त्या त्या भाषेच्या सौंदर्याशी सुसंगत असे अर्थपूर्ण अचूक भाषांतर करणे आवश्यक असते. असे भाषांतर अर्थवाही व ज्ञान पोहोचवणारे तर असतेच; पण त्याबरोबर पुनर्निर्मितीचा आनंदही देऊन जाते.

## मराठी उताऱ्याचे इंग्रजी भाषांतर

जरा शेतकऱ्यांच्या जीवनाकडे तर नजर टाका. घरात भले फाके पडत असोत. शेतकऱ्याची बायको आपले काळीज कठोर करते. घरात असलेले थोडेसेच धान्याचे दाणे ती बियाणं म्हणून वापरते. तुम्ही म्हणाल-कशी वेडी बाई ही। मुलांना उपाशी टाकून धान्य मातीत मिसळते। पण याच दाण्यातून हजारो दाणे उगवणार असतात. ही पुनरुत्थानाची प्रक्रिया असते. अशीच हिंमत आणि फळाची वाट पाहण्याचा धीर तरुणाईला असायला हवा.

समाजाचा रथ रचना आणि संघर्ष या दोन चाकांवर चालतो. तुम्ही आमच्या रथावर पाहिजे तो ध्वज उभारा. लाल, निळा, हिरवा, केशरी. पण रथ चालणार तो या दोन चाकांवरच। बुद्धी आणि प्रयत्न यांचे सामरस्य झाले नाही, तर काहीच घडत नाही. चीनमध्ये माओने बुद्धी आणि श्रम यांचे मजबूत संघटन केले. त्याचा कार्यक्रम सुदीर्घ होता. आवाज बुलंद होता.

संकल्प आणि सिद्धी यांचे सतत स्मरण ठेवणे हाच खरा धर्म। तुम्ही पाहिजे तर शेतात काम करा, कारखान्यात करा, पाहिजे तर शुश्रूषा करा, अध्यापन करा. त्यातूनच तुमचा धर्म प्रकट होत असतो. आपल्या कर्मातून धर्माचा आविष्कार होत असतो. केवळ गप्पा, प्रवचनं, धर्मग्रंथ यातून नव्हे।

प्रत्येक कार्यक्रमाला तीन चरण असतात अध्ययन, संशोधन व विस्तार। त्यातला कोणताही पाय लहान असून चालत नाही. आणखी एक तिपाई आहे - स्नेह, विश्वास व शक्ती यांची। युवा तो जो आपल्या कर्तृत्वाचा ठसा आपल्या कर्मावर उमटवतो.

मला माहीत आहे, माझे शब्द चामडी उधडणारे रक्तबंबाळ करणारे आहेत. पण पाहा, ते चाबकाचे फटकारे पाठीवर उमटून माझीच पाठ कशी रक्ताळली आहे। मी जेव्हा बोलतो, तेव्हा मी बोलत नसतो, माझी वेदना बोलत असते. मी कोणी उपदेश देणारा संत नाही. माझ्यातही अनेक दोष आहेत. पण घामातून मी जीवनाला माधुर्य आणले आहे. जेव्हा प्रेम, विश्वास आणि सामर्थ्य यांचा; जेव्हा दर्शन, तळमळ आणि करुणा यांचा; शिक्षण, संशोधन आणि विस्तार यांचा रस्ता आपण धराल आणि एकेक पाऊल पुढे टाकाल, तेव्हा विजय निश्चित आहे.

**भाषांतर :**

Have a glance at the life of a farmer. Let hunger strike their children, the wife of the farmer, keeping stone on her heart, preserves the leftover grains for sowing. You may say, "How mad she is!" She is laying the precious grains into the soil, instead of feeding her children. But she knows that those grains are going to multiply in thousands. This is the process of rising again. Our youth should have daring spirit and patience like her.

The chariot of society runs on the two wheels of constructive work and battle against evils. Whatever may be the colour of the flag on your chariot- red, blue, green or saffron. It runs on these wheels only. Without integration of wisdom and work, nothing happens. In China, Mao united wisdom and work strongly. His programmes were long enough and loud enough.

Always remembering our future plans and bringing them in reality means following the true religion. You may work in fields, factories, hospitals or schools; working devotedly means following the religion you proclaim your religion through your deeds; not through your words, sermons or religious books.

Every programme has three coloumns - studies, research and extention. All these coloumns must be of the same height. There is one more tripod - It is of love, faith and strength. Youth puts his signature on every action of his life.

I know, my words serve as a cracking whip, but believe me, the whip is on my own back and you can see the bleeding on it. When I speak, it is a version of a man who has suffered a lot. It is not serman of a sage or priest. I am not a saint. I am also a man with many pores. Through sweat I have sweetened my life. You can never sweeten your life without sweat. The moment you follow the path of love, faith and strength; of vision, passion and compassion; of education, research and extention; friends, you are condemned to succeed.

## सरावासाठी उतारे

### पुढील उताऱ्यांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करा.

### १) जगासाठी धैर्यशालिनी, स्वदेशात अवहेलना!

वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी मलाला युसूफजाई जगाच्या नजरेत आली. मुलींना शिकता यावे, या उद्देशाने पछाडलेल्या मलालावर तालिबानी अतिरेक्यांनी जीवघेणा हल्ला केला. ती जवळपास मृत्यूच्या दरवाजात जाऊन परत आली. मात्र तेव्हापासून ती सगळ्यांच्या कौतुकाचा विषय बनली.

स्वात खोरे म्हणजे पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या शीमावर्ती परिसरातील प्रदेश. टोळीवाले, पश्तुन, तालिबानी यांचा वावर असलेला हा प्रदेश. अगदी कट्टर इस्लामी वातावरण. अशा ठिकाणी मुलींनी शिकण्याची कल्पनाही धर्मबाह्य मानली जाणारी. तिथे ही एवढीशी चिमुरडी मुलींनी शिकावे म्हणून प्रयत्न करीत होती. बीबीसीच्या उर्दू भाषेतील प्रसारणासाठी ब्लॉग लिहीत होती. पहिल्यांदा पोरवय म्हणून मोठ्यांनी दुर्लक्ष केले. परंतु सांगूनही ती ऐकेना, तेव्हा दटावणी, धमकावणी आदी प्रकार सुरू झाले. तरीही ऐकेना, तेव्हा मात्र थेट तिला संपविण्याचाच प्रयत्न झाला. तिच्या डोक्यात गोळी लागली. ती वाचली हे आश्चर्यच होते. अनेक महिने ब्रिटनमध्ये तिच्यावर उपचार करण्यात आले. जगाने तिला डोक्यावर घेतले. तिच्या आरोग्यासाठी प्रार्थना केल्या. परंतु स्वात व्हॅलीमध्ये मात्र तिला सहानुभूती तर दूरच; उलट अवहेलना आणि तिरस्कारच पदरी पडला.

संयुक्त राष्ट्रांमध्ये शेकडो प्रतिनिधींसमोर मलालाने केलेले आत्मविश्वासपूर्ण भाषण आजही अनेकांच्या पक्के स्मरणात आहे. अतिरेक्यांना वाटले, आपण हिचे उद्दिष्ट आणि महत्त्वाकांक्षा संपवून टाकू. प्रत्यक्षात 'अतिरेक्यांच्या हल्ल्यामुळे आमच्यातील भीती, अगतिकता आणि दुर्बलता संपली आणि शक्ती व धैर्याचा जन्म झाला', असे वास्तववादी विचार मलालाने मांडले, तेव्हा सगळ्यांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात तिला मानवंदना दिली.

इतकी खंबीर आणि कणखर मलाला जीवघेण्या हल्ल्यानंतरही अगदी तालिबानचाही द्वेष मात्र करीत नाही. ''मला ज्याने गोळी घातली, तो माझ्यापुढे आला आणि माझ्या हातात बंदूक असली तरीसुद्धा मी त्याच्यावर गोळी चालवणार नाही,'' या तिच्या उद्‌गारांनी तर अवघे जगच जिंकून घेतले होते.

दुसरीकडे मलालाला आपल्या घरी, गावी परतणे आता मुश्कील होऊन बसले आहे. ती आणि तिचे कुटुंबीय आता ब्रिटनमध्येच स्थायिक झाले आहेत. ती परत गेली, तर अतिरेकी तिला आणि कुटुंबियांनाही मारून टाकतील, हे नक्की आहे.

या सगळ्या परस्परविरोधी वातावरणात मलालाला ठाम आधार आहे तो वडिलांचा. किंबहुना, त्यांच्यामुळेच ती एवढे धाडस करू शकली आहे.

शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक मिळवून मलालानेही एक इतिहास रचला आहे.

## २) खरं धैर्य कशात आहे?

धैर्य म्हणजे टीका सहन करण्याचं सामर्थ्य. सदोष वर्तनाचं समर्थन करणं तसं सोपं असतं. आपल्यावरच बंधन घालणारे, आपल्याला संकुचित करणारे आपलेच विचार, आपल्यावर होणारे खोटे आरोप, आपल्याला तुच्छ लेखलं जाणं, आपला अहंगंड आणि आपला कामचुकारपणा या सर्व गोष्टींना आव्हान देणं, त्यांचा सामना करणं, यासाठी मात्र धैर्य लागतं.

खरंच, सन्मानानं जगण्यासाठी एखाद्या योद्ध्याचं धैर्य लागतं. तुम्ही काहीही करत असा, तुमच्यावर टीका होणारच. आणि हे टीकाकार कधी कधी तुम्हालाही पटेल असं बोलतात. आपण जेव्हा एकटे पडतो तेव्हा ठामपणे, न डगमगता उभं राहणं यात खरं धैर्य आहे. अल्पमतात असतानाही गुलामांच्या मुक्तीच्या जाहीरनाम्यावर सही करून अब्राहम लिंकननं धैर्याचा आदर्शच घालून दिला.

स्वतःशी आणि समाजाशी प्रामाणिक असणं, सत्यनिष्ठ असणं म्हणजे धैर्य. आपल्या मूल्यांशी बांधिलकी ठेवून कुठं लढायचं आणि कुठं माघार घ्यायची हे ठरवणं म्हणजे धैर्य. पण एक सावधगिरीची सूचना - भंपकपणातून आलेल्या धैर्यापासून स्वतःचा बचाव करा. खरं धैर्य कृतीतून दिसतं. बडबड करण्यातून नाही. उघड-उघड मतभेद व्यक्त करणारे लोक धोकादायक नसतातच. पण तुमच्याशी असलेले मतभेद जे लोक तुम्हाला कधी कळूच देत नाहीत, ते खरे धोकादायक. नैतिक धैर्य मूल्यांपासून जन्म घेतं आणि या मूल्यांवरच निष्ठा ठेवतं.

विश्वास सामर्थ्य देतो; पण शंकेखोर मन मात्र दुबळं बनत जातं. धैर्यशील लोक कठीण परिस्थितीचा सामना बुद्धिसामर्थ्य पणाला लावून करतात. भित्रे लोक मात्र नेहमीच आडमार्गाचा, चोरटेपणाचा आणि विपर्यस्त असा मार्ग आपलासा करतात.

## इंग्रजी उताऱ्याचे मराठी भाषांतर

I was in town recently and took a ride in a taxi with a friend. When we got out of the cab, my friend said to the driver, "Thank you for the ride. You did a superb job of driving."

The taxi driver was stunned for a second. Then he said, "Are you a wise guy or something ?"

"No my dear man and I'm not putting you on. I admire the way you keep yourself cool in heavy traffic."

"Yeh", the driver said and drove off. "What was that all about?" I asked.

"I am trying to bring love back," he said. "It's the only thing that can save the city." "How can one man save this city ?"

"It's not one man. I believe I have made that taxi driver's day. Suppose he has twenty fares. He's going to be nice to those fares because someone was nice to him. Those fares in turn will be kinder to their employees or shopkeepers or waiters or even their own families. They, in turn, will be nicer to other people. Eventually the goodwill could spread to at least a thousand people. Now that isn't bad, is it?"

"But you're depending on the taxi driver to pass your goodwill to others."

"I'm not depending on it." My friend said, "I'm aware that the system isn't foolproof. I might deal with ten different people today. If, out of ten, I can make three happy, then eventually I can indirectly influence the attitudes of three thousand more."

### भाषांतर

अलीकडे एका गावाला गेलो असता, मी माझ्या एका मित्राबरोबर टॅक्सीने गावातून चक्कर मारली. आम्ही त्या टॅक्सीतून खाली उतरलो, तेव्हा माझा मित्र त्या टॅक्सीचालकाला म्हणाला,''वा! फारच छान! अगदी अलगद फिरवून आणलंत तुम्ही आम्हाला. मजा आली.'' क्षणभर तो टॅक्सीचालक स्तंभित झाला. मग म्हणाला,

''तुम्ही कोणी थोर विभूती वगैरे आहात की काय?''

''नाही रे बाबा, तसं नाही. मी उगीच तुझ्यापुढे जास्त शहाणपणा दाखवत नाहीये. या रहदारीत तू आपलं डोकं कसं थंड ठेवू शकतोस, त्याची मला कमाल वाटली. म्हणून तसं म्हटलं मी.''

'हं!' म्हणून तो चालक निघून गेला.

मी माझ्या मित्राला विचारलं,''हा काय प्रकार सुरू केलास तू?''

तो म्हणाला,''मी माणसातली प्रेमभावना जागृत करायचा प्रयत्न करतोय. तोच एक मार्ग आहे, नाहीतर हे शहर वाचणं अशक्य आहे.''

''एकटा माणूस हे आख्खं शहर कसं वाचवू शकेल?''

''एकटा कसा? मला खात्री आहे की, मी त्या टॅक्सीचालकाच्या आजच्या दिवसाच्या चांगुलपणाला चालना दिली. समजा, आज दिवसभरात त्याला वीस प्रवासी मिळाले; तर त्या वीस लोकांशी तो चांगुलपणाने वागेल; कारण आज त्याच्याशी एकजण चांगुलपणाने वागला आहे. आज त्याच्या टॅक्सीतून फिरलेले प्रवासीही त्याच चांगुलपणाच्या बदल्यात इतरांशी, त्यांच्या नोकरांशी, दुकानदारांशी, वेटर्सशी किंवा स्वतःच्या कुटुंबीयांशीही तसंच चांगलं वागतील. याच पद्धतीने हे सगळे लोक दिवसभरात त्यांच्या संपर्कात येणाऱ्या इतर सर्वांशी चांगुलपणाने वागत राहतील. अशा रीतीने हे चांगुलपणाचं लोण हजारेक लोकांपर्यंत पोचू शकेल. ही गोष्ट चांगली झाली की नाही?''

''पण तुझी चांगुलपणाची भावना इतरांजवळ पोहोचवणं न पोहोचवणं हे सर्वस्वी त्या टॅक्सीचालकावर अवलंबून आहे.''

त्यावर माझा मित्र म्हणाला, ''असं बोलण्या-वागण्याने हमखास यश मिळेलच, याची हमी देता यायची नाही, हे मलाही माहीत आहे. म्हणून, मी केवळ एका माणसावर सगळं सोडून देत नाही. आजच्या दिवसात माझी दहाजणांशी गाठ पडली आणि या दहांपैकी तिघांपर्यंत जरी मी चांगुलपणा दाखविण्यातला आनंद पोहोचवू शकलो, तरी अप्रत्यक्षपणे आणखी तीन हजारजणांच्या मनात तो ठसवला जाईल.''

## सरावासाठी उतारे

**पुढील उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा.**

1) Society has given us many things. It is high time to give something back to society in whatever way possible. If every individual thinks "I am doing only my job" – if everything is "I" – then where will society go? There are many people who have sacrified their carrier to serve society. You may not be in such position.

It does not have to be 'fulltime' for everybody. Do it alongside your job. You have time for movies, parties, music, going on long drives, weekends with your family, chatting on the net. Why can't you have one hour to volunteer for some cause? Even one hour makes a difference.

There are people who are spending their lives on these issues; you just need to flow with them. Start to think about this in the beginning of your carrier. The conditioning in college is that everybody has to do CAT and join the corporate sector. Nothing wrong if that suits you, but don't do it if it doesn't feel right. Take some time off, do some introspection. Find out what your true calling is, then go to follow that path.

2) The most important aspect of a leader is building trust and credibility. Trust is not necessarily nice and soft. It may be harsh. The important point being consistency is an essential attribute. Therefore, as a leader, one of the things – that one needs to do is to constantly watch oneself. If an employer punishes an employee very harshly in one case and another mildly in a better mood, people would start wondering and attributing motives to the employer's behavior. You have to be seen as being consistent in the way you reward or punish in relation to the performance and values of the employee. Performance and values are both important. The point is, leadership really lies in creating credibility for yourself first.

The second aspect of leadership is 'transparency' in the organisation. A leader of an outstanding organisation will cut through the maze of bureaucracy and let fresh air and light in. Everybody is afraid of being found out and, therefore, people build their own cozy corner where they hide certain things. You have to break through all those things. We have to create a transparent and open culture.

One should build a company that will survive for a long time. It may not necessarily be the best at any point of time, but it will always be a 'robust' company. A robust company is a company that does everything well enough and does a few things extremely well. Those few things are the key factors for success and that is how the company goes on and on.

✦ ✦ ✦

# ४. गद्य आकलन (उताऱ्यावरील प्रश्न), सारांशलेखन

भाषाभ्यासात वाचन कौशल्य हे महत्त्वाचेच असते. स्पष्ट वाचन, वाचनवेग या वाचनाच्या संदर्भातील बाह्य गोष्टी झाल्या. तर आपण जे वाचतो, त्याच्या आशयाचे आकलन होणे, हा वाचन कौशल्याचा आत्मा असतो. म्हणून सर्वच परीक्षांमध्ये गद्य उताऱ्यांचे आकलन व सारांशलेखन हा भाग समाविष्ट असतो.

## सारांशलेखन

सारांशलेखन करणे हे एक महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे, याचा गांभीर्याने विचार न करता अनेक विद्यार्थी केवळ सारांशाची शब्दसंख्या $^{१}/_{३}$ व्हावी, याकडे जास्त लक्ष देतात. उताऱ्यात काय सांगितले आहे, त्याचा गाभा काय आहे हे समजून न घेता अधले मधले शब्द, वाक्य गाळून सारांशलेखन उरकण्याकडेच बहुतांश विद्यार्थ्यांचा कल असतो. सारांशलेखनाच्या मूळ हेतूलाच त्यामुळे धक्का पोहोचतो. एखादी गोष्ट थोडक्यात सांगताना किंवा लिहिताना उगीच पाल्हाळ न लावता, आवश्यक तेवढ्या गोष्टीच प्रभावीपणे आणि परिणामकारकतेने मांडाव्या लागतात. हा जो संक्षेप, त्यालाच सारांश म्हणतात. मूळ उताऱ्यातील विचार काय आहेत, ते समजून घेऊन संक्षेपाने, सहजपणे, नेमक्या शब्दात मांडता यायला हवेत. हाच खरेतर सारांशलेखनाचा हेतू आहे.

उताऱ्याचा सारांश लिहिताना, उताऱ्याच्या लांबीच्या $^{१}/_{३}$ प्रमाणात लेखकाचे विचार आपल्या भाषेत सहजपणे लिहिता यावेत, ही अपेक्षा असते. उताऱ्यातील शब्दसंख्या मोजून त्याच्या $^{१}/_{३}$ सारांशलेखन करावे. सारांशलेखनाची शब्दसंख्या कमी-जास्त झाल्यास गुण कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे या नियमाचे काटेकोरपणे पालन करावे.

## सारांशलेखन करताना

- प्रथम उतारा नीट वाचावा
- उताऱ्यातील विषय, मुद्दे कच्च्या कागदावर क्रमवारीने मांडावेत किंवा अधोरेखित करावेत
- उताऱ्यातील विचार मांडताना वापरलेली उदाहरणे, अलंकार, विशेषणे, वर्णने सारांशाच्या दृष्टीने अनावश्यक वाटल्यास कमी करावीत
- उताऱ्यातील क्रमवारीने एकत्र केलेले मुद्दे आपल्या भाषेत सुसूत्रतेने जोडणी करून मांडावेत
- सारांश लिहिताना त्यात परिच्छेद करू नयेत
- उताऱ्यातील निवडक वाक्ये जशीच्या तशी सारांशलेखनात मांडणे अभिप्रेत नाही, हे लक्षात ठेवावे
- उताऱ्याला न विसरता योग्य शीर्षक द्यावे
- सरतेशेवटी उताऱ्यातील व सारांशातील शब्दसंख्या न विसरता लिहावी

लेखकाने मांडलेले विचार प्रभावीपणे, नेमकेपणाने मांडण्याचा सराव तुम्हाला सारांशलेखनातून होईलच. परंतु तुमच्या व्यक्तिमत्त्व घडणीतही याचा दूरगामी परिणाम होईल आणि तो म्हणजे - तुम्ही तुमचे विचारही अशाच नेमकेपणाने, प्रभावीपणाने अभिव्यक्त करू शकाल.

## गद्य आकलन

सारांश लेखनाप्रमाणेच उतारा काळजीपूर्वक वाचून त्याचे आकलन होणे महत्त्वाचे. उताऱ्यातून कोणता विचार, संकल्पना मांडली आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे असते. लेखकाची शैली कशी आहे, भाषा कशी आहे, कुठले अलंकार, शब्दप्रयोग त्याने आपल्या विचारांच्या स्पष्टीकरणासाठी वापरले आहेत हे जाणणेही मनोरंजक असते. या सर्व गोष्टी समजून-उमजून मग प्रश्नांच्या उत्तराकडे वळावे. मात्र उत्तरे लिहिताना ती प्रमाणभाषेतच लिहावीत.

## उत्तरे लिहिताना

- उतारा काळजीपूर्वक वाचावा.
- उताऱ्यात काही अपरिचित शब्द आल्यास गोंधळून न जाता संदर्भाने अर्थ जाणून घ्यावा.
- प्रश्न वाचून त्याची उत्तरे उताऱ्याच्या कोणत्या भागावर आहेत हे जाणून घेण्यासाठी उतारा परत एकदा वाचावा.
- प्रश्नांची उत्तरे लिहिताना लेखकाने मांडलेले विचारच उत्तरात लिहायचे आहेत, हे लक्षात ठेवावे. आपले विचार, दृष्टिकोन, मत आपल्या उत्तरांतून प्रकट करू नये.
- लेखकाच्याच विचारांना प्राधान्य द्यावे.
- मात्र, लेखकाचे उताऱ्यातील विचार आपल्या शब्दांत परिणामकारकपणे मांडावेत.

पुढे दोन उतारे दिले आहेत. दोन्ही उताऱ्यांवरील प्रश्न आणि त्यांचे सारांशलेखनही दिले आहे. त्याचा अभ्यास करावा. नंतर दिलेल्या उताऱ्यांचा सारांश आणि गद्य आकलनासाठी असलेले प्रश्न काळजीपूर्वक सोडवावेत.

**खालील परिच्छेदाचे १/३ सारांशलेखन करा. तसेच विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

एका मराठी सिनेमात 'फूल आहे गंध आहे । भाव आहे अंतरी । देव नाही मंदिरी।' असे एक गाणे होते. विविध उपासनांच्या नावाने जे काही व्यवहार चालताना दिसतात, त्यात बऱ्याच वेळा बाह्य औपचारिकता कशाबशा पार पाडल्या जात असतात. पण उपासनेच्या कार्यपद्धतीमध्ये गर्भित असणारे 'सार' हरवलेले दिसते. मार्गांविषयी मतभेद असोत वा नसोत, सच्चेपणा नसला तर फारच खेद वाटतो. अशा प्रकारच्या, सार (इसेन्स) विसरून संभारात (पराफर्नेलियात) रमणाऱ्या, उपासना पाहून वरील गाणे उलटे म्हणावेसे वाटते. फूल आहे, गंध आहे । देव आहे मंदिरी। भाव नाही अंतरी । 'देखल्या देवा दंडवत' असा वाक्प्रचारही याच अर्थाचा आहे; पण दंडवत ही क्रिया पुरेशी अवघड तरी आहे. कामाच्या घाईत कुठेतरी निघालेले असताना, वाटेत चुकून एखादे देऊळ लागलेच, तर काही मंडळी थोडेसे थांबल्यासारखे करून, चपला पायांतून अर्धवट काढून व लगेच पाय अडकवत, ओळख दाखवल्यापुरते स्मित करावे तसा नमस्कार करून, मूळ ओघातच पुढे निघून जातात. हा खोटेपणा नसतो; पण औपचारिकता किंवा आन्हिकच उरकलेले असते.

तुम्ही नाही नमस्कार केलात तरी देवाचे काही बिघडणार नसते. इतकेच काय, रस्त्यात असताना पायांत चपला असणे, हेही काही अपवित्र वगैरे नसते. चपला काढण्यापेक्षा 'चापल्य' काढून ठेवून शांत होणे, हे नमस्काराला खरे आवश्यक असते. एका आजींना जप करायचा होता; पण माळ सापडत नव्हती, म्हणून त्या अस्वस्थ होत्या. माळ नसली तर अडचण काय आहे? नामस्मरण म्हणजे नामाच्या निमित्ताने 'त्या'चे स्मरण, तो सोडून काहीच मनात नको. प्रत्येक नाम हे पहिल्यांदाच घेतल्याइतके उत्कटतेने आणि शेवटचे असल्याइतके निर्धास्तपणे घेतले जावे. 'आताचे हे कितव्यांदाचे' ही चिंता अप्रस्तुत ठरायला हवी. मोजून द्यावे लागते ते व्यवहारात। परमार्थात मोजून काय देणार? संख्येने भले मोठे असे काहीतरी उद्दिष्ट ठेवायचे आणि ते यशस्वीरीत्या पार पाडायचे, ही प्रक्रिया नमुनेदारपणे 'प्रापंचिक' आहे; पारमार्थिक नव्हे. त्यात संचय वाढवत नेणे व विक्रम करणे येते. अपरिग्रह या अगदी प्राथमिक व्रताच्या विपरीत

असे हे जपाचे संख्यात्मक उद्दिष्ट आहे. निदानपक्षी मोजणे, साठवणे, इतरांच्या नजरेत कमाई सिद्ध करणे, हे प्रकारच काही काळ सोडून कसे देता येतील, हा उपासनेपुढचा खरा प्रश्न. पण प्रत्यक्षात जप, तप, या गोष्टींकडे पुण्य 'अर्न' करण्यासाठी मोजावयाची 'कॉस्ट' असे पाहिले जाते. भजन या प्रकाराचा महिमा सांगणाऱ्या पुढील पदात हा जमाखर्च स्पष्ट दिसतो......

जप तप साधन । कछु नहिं लागत ।
खर्चत नहिं गठरी ।
भजो रे भय्याऽऽ राम गोविंद हरी ।।

उप-वास म्हणजे जवळ राहणे, अर्थात देवाच्या. कोणताही खराखुरा ध्यास असतो, तेव्हा तहानभूक 'हरपते' हे खरेच, पण तहानभूक 'मारण्याने' ध्यास सिद्ध होत नसतो. एक जण म्हणाला, ''अहाहा! काय सुंदर वास सुटलाय! पण नेमका आजच माझा उपास आहे.'' तिथेच अध्यात्माचे एक जाणकार उभे होते. ते म्हणाले,''अरे, ज्या क्षणी इच्छा झाली, त्या क्षणीच उपास मोडला. आता खाल्लंस तरी काही बिघडत नाही. उल्लंघनाच्या भीतीखाली चालतं ते कसलं लंघन?'' पण 'संयम' शिकण्यासाठी आम्ही लंघन करतो, असाही युक्तिवाद असतो. कोणतेच आन्हिक नसताना जीवनाच्या धकाधकीत संयम शिकण्याच्या/पाळण्याच्या प्रचंड संधी उपलब्ध असतात. त्यातली एकही न घेता एक कृत्रिम नेपथ्य, पथ्य आणि पात्रयोजना करण्याची काय गरज? जे उपास करतात ते एरवी संयमी असतात, असेही दिसत नाही आणि जे उपास करत नाहीत ते संयमी नसतात, असेही दिसत नाही. मुळात 'इबादत को फर्ज न समझो बल्कि फर्ज को इबादत समझो' म्हणजेच उपासना हे कर्तव्य नसून कर्तव्य ही उपासना, हीच उपासनेची सर्वोत्कृष्ट कल्पना. पण त्यातूनही, कर्तव्ये नसलेल्या प्रतीकात्मक गोष्टीसुद्धा केवळ उपासना म्हणून करायच्या झाल्यास, त्यांच्याद्वारा मनात कोणते 'भाव' निर्माण होणे अभिप्रेत आहे, हे महत्त्वाचे. भाव तोचि देव! इतरांच्या नजरेत स्वत:ला निष्ठावान म्हणून सिद्ध करणे, हे कधीच आत्मिक असू शकत नाही.

उपासना ही गोष्ट खाजगीरीत्या चालते तेव्हाच अस्सल असू शकते. निदान निरुपद्रवी तरी नक्कीच असते. याउलट सार्वजनिक उत्सव म्हणून जे कानठळ्या बसविण्याचे व्रत चालू आहे, ते इतरांवर अतिक्रमण करून गाजवेगिरी आणि कोणाच्या तरी पैशावर फुकटात उंडगेगिरी, या दुष्प्रवृत्तींनी कलुषित झाले आहे. या सगळ्या गोष्टींमुळे 'भाव नाही अंतरी' ही स्थिती आणली आहे.

**(उताऱ्यातील एकूण शब्द ५५५)**

**- राजीव साने**

## उताऱ्याचा सारांश

भाव नाही अंतरी!

विविध उपासनांच्या नावाने चालणाऱ्या व्यवहारात बाह्य उपचार पाळले जातात; पण उपासनेतील गर्भित सार हरवलेले दिसते. हे 'भाव आहे अंतरी' या गीताच्या संदर्भात लेखकाने स्पष्ट केले आहे. 'देखल्या देवा दंडवत' या वाक्प्रचारानुसार अनेकजण वाटेत दिसणाऱ्या देवळातील देवाला चपला काढून 'धावता' नमस्कार करतात. असा नमस्कार करण्यापेक्षा मनाचा चंचलपणा दूर करून शांत होणे, हे नमस्काराला आवश्यक असते. जपाच्या वेळी माळ ओढण्यात लक्ष असण्यापेक्षा नामस्मरण उत्कटपणे, निर्धास्तपणे व्हावे. नामस्मरण संख्येने किती वेळा केले, याचा हिशेब प्रापंचिक वृत्तीत मोडतो; पारमार्थिक नाही. उपासनेत आपण किती जप केला, याचे इतरांसमोर प्रदर्शन करणे सोडून देता यायला हवे. जप-तपात पुण्याचा हिशेब नसावा. उप-वास म्हणजे देवाच्या जवळ राहणे. उपवास करताना खाण्याची इच्छा झाली तरी उपास मोडला असे मानावे. उपास आणि संयम याचा तसा संबंध नसतो. 'उपासना हे कर्तव्य नसून कर्तव्य ही उपासना' ही सर्वोत्कृष्ट कल्पना! उपासना म्हणून जी कृती आपण करू तिच्यातून मनात भक्तिभाव जागा व्हायला हवा. कारण 'भाव तोचि देव!' उपासना इतरांच्या नजरेत येण्यासाठी केली तर ती कधीच मनाला समाधान देणारी नसते. उपासना खाजगीरित्या केली तरच अस्सल असते. याउलट सार्वजनिक उत्सवातून कानठळ्या बसवणारे आवाज करणे, इतरांवर आपल्या कृती लादणे, कुणाच्या तरी पैशावर फुकटात उत्सव साजरा करणे या दुष्प्रवृत्ती निर्माण होतात, 'भाव नाही अंतरी' ही स्थिती येते.

**(सारांश लेखन - १८५ शब्दसंख्या)**

**उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

**प्रश्न १) 'विविध उपासनांच्या नावाने बाह्य औपचारिकता कशाबशा पार पाडल्या जातात.' हा विचार लेखकाने कसा स्पष्ट केला आहे?**

**उत्तर :** फुले, गंध, उदबत्त्या, दीप, नैवेद्य इ. सामग्री वापरून देवाची पूजा करण्याचा उपचार अनेकजण करतात. इतर धर्मातही डोक्यावर वस्त्र ठेवून विशिष्ट मंत्र म्हणणे, चादर चढवणे यासारखे विधी केले जातात. पण हे सर्व उपचार करताना त्यात फक्त देखावा असेल, भक्तिभाव नसेल, वेगळेच विचार मनामध्ये असतील तर अशी पूजा म्हणजे केवळ बाह्य उपचारांचे अवडंबर होय, असे स्पष्ट विचार लेखकाने वरील उताऱ्यात मांडले आहेत. मराठीत 'देखल्या देवा दंडवत' असा वाक्प्रचार याअर्थीच रूढ आहे. आज रस्त्याने जाता जाता अनेक जण देऊळ दिसले की धावता नमस्कार करताना दिसतात. त्यावेळी वाहन चालवण्यात आपले लक्ष असते, तर इच्छित ठिकाणी लवकर पोहोचण्याचे व कामाचे विचार मनात असतात. अर्थात, या नमस्कारात खोटेपणा नसतो पण औपचारिकता मात्र असते.

**प्रश्न २) देवाला केलेला खरा नमस्कार व जप याविषयी लेखकाची मते स्पष्ट करा.**

**उत्तर :** खरा नमस्कार हा शांत चित्ताने, मनातील इतर विचार दूर सारून, मनाचे चांचल्य दूर करून भक्तिभावाने केलेला असावा. त्यात शरण्याची भावना असायला हवी. तो निरपेक्ष असावा, असे लेखकाला वाटते. जप करताना माळ हवी, जप किती वेळा करतो आहोत, तो पूर्ण कधी होतो आहे, ह्याकडे जर आपले लक्ष असेल, तर तो केवळ उपचार होय. प्रत्येक वेळी देवाचे नाव घेताना मनात उत्कटता हवी, निर्धास्तपणा हवा. नुसते संख्यात्मक उद्दिष्ट काय कामाचे? 'मी एक हजार वेळा जप केला, लाख वेळा करणार आहे' अशी उद्दिष्टे पार पाडण्यासाठी जप करणे म्हणजे त्याचा जमाखर्च ठेवणे, हे चुकीचे आहे. काही तरी मिळवण्यासाठी, इतरांना दाखवण्यासाठी नमस्कार, जपतप ही आन्हिके करू नये, स्वत:च्या मन:शांतीसाठी करावी, असे लेखकाला वाटते.

**प्रश्न ३) लेखकाच्या मते खरा उपवास कोणता?**

**उत्तर :** उप-वास याचा अर्थ देवाच्या जवळ राहणे. देवाची आराधना करताना देहभान, तहान-भूक हरपणे, मनाला ध्यास लागणे महत्त्वाचे. उपास असताना खाण्याची इच्छा झाली तर असे दडपण काय कामाचे! हा बळजबरीचा संयम उपयोगाचा नाही. कोणताच उपचार न पाळता जीवनात संयम पाळण्याच्या अनेक संधी उपलब्ध असतात. मग उपासाला अमूक पदार्थ चालत नाहीत. उपास मोडला तर पाप लागेल इ. विचार हे परिपक्वतेचे नाहीत. त्यामुळे उपवासामागे मनाचा खरा संयम असायला हवा, असे लेखक म्हणतात.

**प्रश्न ४) उपासनेची खरी कल्पना कोणती?**

**उत्तर :** उपासना केवळ कर्तव्य म्हणून करू नये. उलट आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडणे, हीसुद्धा एक प्रकारची उपासनाच आहे. उपासना म्हणून देवाची पूजा करायची असल्यास ती दुसऱ्यांना आपण किती भाविक आहोत, हे दाखवण्यासाठी नसावी. आपल्या मनात उत्कट भक्तिभाव निर्माण व्हायला हवा.

उपासनेला उपद्रवी, सार्वजनिक रूप न देता ती प्रत्येकाने खाजगी पातळीवर स्वत:साठी करावी. सार्वजनिक धार्मिक उत्सवांना आज आलेले दिखाऊ रूप लेखकाला मान्य नाही. ढोल-ताशे, कानठळ्या बसवणारे संगीत, बळजबरीने वर्गणी वसूल करणे, पैसा गोळा करून त्यावर मजा करणे या आज रूढ झालेल्या दुष्प्रवृत्ती उपासनेच्या मूळ कल्पनेवरच घाव घालतात. मनात असलेल्या भक्तिभावनेला बाजारू रूप येते, या गोष्टीविषयी लेखकाने तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे.

**प्रश्न ५) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.**

**उत्तर :** 'खरी उपासना' किंवा 'भाव नाही अंतरी'

**खालील परिच्छेदाचे १/३ सारांशलेखन करा. तसेच विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

महत्त्वाकांक्षा म्हणजे महत्त्वपूर्ण इच्छा; वाढण्याची, मोठे बनण्याची, थोर विशाल होण्याची तीव्र इच्छा म्हणजे महत्त्वाकांक्षा. महत्त्वाकांक्षा म्हणजे, असाधारण व उत्कृष्ट कर्तृत्व करण्याची प्रबळ वासना. पवनपुत्र हनुमंताने आपल्या वयाची तमा न बाळगता, सूर्यमंडलाचा ग्रास करण्याची इच्छा धरून अनंत आकाशात जसे उड्डाण केले, त्याप्रमाणे उच्च ध्येयासाठी अखंड आणि अविरत झटणे याचेच नाव महत्त्वाकांक्षा होय. आपल्या मातेला दास्यमुक्त करण्यासाठी वैनतेय

गरुडाने सर्व संकटांना धैर्याने तोंड दिले, प्रत्यक्ष वज्रपाणी इंद्राशीही त्याने युद्ध केले आणि शेवटी अमृतकुंभ हस्तगत केला. त्याप्रमाणे सर्व आपत्ती पार करून व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील विविध क्षेत्रात यश मिळविण्याची इच्छा धरणे हीच महत्त्वाकांक्षा होय.

महत्त्वाकांक्षा ही मानवाची फार मोठी विशेषता होय. कारण विकासाची इच्छा मानवांव्यतिरिक्त अन्य प्राण्यात आढळत नाही. बैल गवत खातो, तो शेवटपर्यंत गवतच खात राहतो. शेवटपर्यंत तो झाडाखालीच झोपतो आणि जमिनीवरच उठतो बसतो. मधमाशा सुंदर पोळे तयार करतात. त्या पोळ्याच्या रचनेची अनेक शास्त्रज्ञांनी मोठी प्रशंसा केली आहे. पण त्या तऱ्हेची पोळे त्या मधमाशा वर्षानुवर्ष, पिढ्यानुपिढ्या तयार करीत आहेत. त्यात परिवर्तन, सुधारणा काहीएक नाही. यात काही सुखसोयी वाढवाव्यात. अशी इच्छाही त्यांच्या ठायी विद्यमान नाही. सुगरण पक्षी अतिशय सुंदर घरटे बांधतो. पण हजारो वर्षे झाली, तो ते तसेच बांधतो आहे. कोकिळ निःसंशय अतिशय गोड गातो, पण निरनिराळे राग गावेत, ताना घ्याव्यात, विविध आलाप काढावेत, ख्याल, टप्पा, ध्रुपद, लावणी, नाट्यसंगीत, सिनेसंगीत असे काहीतरी/नवेनवे प्रकार शिकावेत, असे त्याला मुळीच वाटत नाही. एका कूऽच्या पलीकडे दुसरे अवाक्षरसुद्धा तो कधी तोंडातून काढीत नाही.

मी चांगले अन्न खाईन, अधिक चांगले खाईन, मी चांगली वस्त्रे नेसेन, अधिक चांगली नेसेन, मी माझे घर बांधीन, मोठा वाडा बांधीन, मी राजवाड्यात राहीन, असे काहीतरी नवे करण्याची आणि उत्तरोत्तर अधिकाधिक उन्नत होण्याची आकांक्षा फक्त मनुष्याच्याच ठिकाणी आढळते. मी नव्या देशात जाईन, नवे उद्योग करीन; नवे प्रदेश शोधीन, चंद्रावर आणि मंगळावर जाईन अशा इच्छा मनुष्याच्या मनात सतत उत्पन्न होत असतात. म्हणूनच असे म्हणता येईल की, ज्याला काही ना काही महत्त्वाकांक्षा आहे तो मनुष्य, आणि ज्याला ती नाही तो पशू.

नुसती स्वप्ने पाहत बसणे जसे वाईट आहे, तशीच आपल्या ध्येयाबद्दल एकसारखी चर्चा करणेही वाईट असते. माझी अशी महत्त्वाकांक्षा आहे, तशी महत्त्वाकांक्षा आहे, त्यासाठी मी असा प्रयत्न करणार आहे, तशी योजना मी आखली आहे, असे ज्याला त्याला सांगत सुटण्याची सवय काही लोकांना असते. त्यामुळे त्याची शक्ती नुसती चर्चा करण्यात अधिक खर्च होते, आणि प्रत्यक्ष ध्येयानुकूल कृती त्यांच्या हातून काहीच घडत नाही. 'बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो वर्षेल काय' ही म्हण प्रसिद्धच आहे.

जो अल्पस्वल्प प्रगतीमध्ये इतिकर्तव्यता मानतो तो काही खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. आळस, अज्ञान, भीती, शारीरिक दुर्बलता मानसिक चंचलता, या गोष्टींच्या आहारी जाऊन अनेकदा अनेक माणसे म्हणतात, "जाऊ द्या; पुरे झाले एवढेच; माणसाने समाधानी वृत्तीने राहावे; जशी ईश्वराची इच्छा असेल तसे होईल" इत्यादी. खऱ्या अर्थाने ते समाधानी नसतात किंवा ईश्वरावर त्यांची मोठीशी श्रद्धाही नसते. आपला आळस किंवा अकर्मण्यता लपविण्याकरिता ते या मोठ्या शब्दांचा आश्रय घेतात आणि स्वतःचे नुकसान करतात.

जो पुढे जात नाही तो मागे लोटला जातो, हा सृष्टीचा नियम आहे. जो प्रगती करीत नाही त्याला परागती पत्करावी लागते. जो उन्नती करीत नाही त्याला अधोगती प्राप्त होते. विकास - विकास - सतत विकास हा ज्याला ध्यास लागतो तो ऐश्वर्याने जगतो. जो विकासाची कधी इच्छाच बाळगत नाही तो लवकरच कोमेजतो, मरतो आणि मातीत मिळतो. महत्त्वाकांक्षा म्हणजे सतत पुढे पाऊल टाकणे.

**(उताऱ्यातील एकूण शब्द ४९५)**

**- प्रा. प्र. ग. सहस्रबुद्धे**

## सारांश लेखन

**महत्त्वाकांक्षा**

महत्त्वाकांक्षा म्हणजे महत्वाची इच्छा. ज्या इच्छेने मनुष्याचा विकास होतो, त्याच्या आयुष्याला गती मिळते, ध्येय मिळते, उत्तुंग कर्तृत्व करण्यासाठी प्रेरणा मिळते. आपल्यातल्या उणिवा, प्रतिकूल परिस्थिती यावर मात करत व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात यश मिळविण्याची इच्छा म्हणजेच महत्त्वाकांक्षा होय. मानव आणि मानवेतर प्राणी यांच्यातील 'महत्त्वाकांक्षा असणे आणि नसणे' हेही एक व्यवच्छेदक

लक्षण आहे. मधमाशांचे निगुतीने, सुबक पद्धतीने पोळे तयार करणे असो किंवा कोकिळ पक्षाचे मधुर संगीत. अधिक काही वेगळं, भव्यदिव्य करण्याची महत्त्वाकांक्षा नसल्याने हजारो वर्ष हे सजीव आहेत तिथेच आहेत. त्यामुळेच नवीन काही करण्याची महत्त्वाकांक्षा ज्याला आहे तो माणूस आणि ज्याला नाही तो पशू. 'बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो वर्षेल काय' या प्रसिद्ध उक्तीनुसार महत्त्वाकांक्षी माणसाने आपल्या महत्त्वाकांक्षेचा सतत नुसता उच्चार करणे परंतु त्यानुसार पूरक कृती काहीच न करणे हे काही बरोबर नाही. थोड्याश्या प्रगतीमुळे जो समाधानी होतो; आळस, भीती, शारीरिक-मानसिक दुर्बलता यामुळे जो दैवावर विसंबून राहायला लागतो, तो खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. महत्त्वाकांक्षा बाळगणे ही सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. सतत विकास - हा ध्यास ज्याला लागतो; त्याचीच प्रगती होते. महत्त्वाकांक्षा म्हणजे सतत पुढेच जात राहणे.

**(सारांश लेखन - शब्दसंख्या - १६५)**

**उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

**प्रश्न १. मानव आणि पशू यांच्यातला कोणता महत्त्वाचा भेद लेखकाने उताऱ्यातून मांडला आहे?**

**उत्तर :** महत्त्वाकांक्षी असणे आणि नसणे हे मानव आणि पशू यांच्यातले व्यवच्छेदक लक्षण आहे असे मत लेखकाने या उताऱ्यात मांडले आहे. त्यासाठी मधमाशी, कोकीळ, सुगरण इ. पक्ष्यांचे दाखले लेखकाने दिले आहेत. मधमाशी सुंदर, सुबक पोळे तयार करते. सुगरण पक्षी अतिशय सुंदर घरटे तयार करतो. पण यात पिढ्यानपिढ्या झाल्या तरी सुधारणा काहीच नाहीत. सुखसोयींमध्ये वाढही नाहीच. कोकीळपक्षीही अतिशय सुरेल गात असला तरी गाण्यात बदल नाही. वेगळ्या ताना, आलाप, आरोह-अवरोह नाहीत. म्हणजेच काही नवीन, वेगळे करण्याची या सजीवांना इच्छा नाही. या उलट माणसाचे आहे. वेगळे, नवीन काही करण्याच्या इच्छेनेच त्याने सुधारणा घडवली, नवीन शोध लावले. म्हणून लेखक म्हणतात, त्याला काही करण्याची महत्त्वाकांक्षा आहे तो मनुष्य आणि ज्याला नाही तो पशू.

**प्रश्न २. महत्त्वाकांक्षेचे कोणकोणते पैलू लेखकाने उताऱ्यातून स्पष्ट केले आहेत?**

**उत्तर :** महत्त्वाकांक्षा म्हणजे काय, याचे सविस्तर वर्णन लेखकांनी या उताऱ्यातून केले आहे. महत्त्वाकांक्षा या शब्दाच्या अर्थापासून आनुषंगिक मानवी वृत्तींपर्यंत या उताऱ्यात प्रकाश टाकला आहे.

लेखकाच्या मते महत्त्वाकांक्षा म्हणजे महत्त्वाची इच्छा. ज्या इच्छेमुळे मनुष्याचा विकास होतो, त्याच्या आयुष्याला गती मिळते, उच्च ध्येयासाठी एक प्रकारची प्रेरणा मिळते. महत्त्वाकांक्षा म्हणजे आपल्या व्यक्तिगत मर्यादा आणि प्रतिकूल परिस्थिती यावर मात करत व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात यश मिळविण्याची इच्छा होय. लेखकांच्या मते पुढे जायची इच्छा ज्याला असत नाही, त्याची अधोगती ठरलेली असते. त्यामुळे महत्त्वाकांक्षा म्हणजे सतत पुढे जात राहणे. विकास करणे.

**प्रश्न ३. महत्त्वाकांक्षी नसलेल्या माणसाची कोणती लक्षणे उताऱ्यातून समजतात?**

**उत्तर :** लेखकाच्या मते जो नुसतीच स्वप्ने पाहतो, महत्त्वाकांक्षी असल्याचे नुसतेच तोंडाने सांगतो; पण त्या अनुषंगाने जो कृती करत नाही; कष्ट करत नाही तो मनुष्य खरा महत्त्वाकांक्षी नव्हे अशी नुसतीच बडबड करणाऱ्या माणसांचे वर्णन करताना 'बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो वर्षेल काय' ही उक्ती वापरली आहे.

शिवाय आहे त्यात किंवा थोड्याशा प्रगतीमध्येच जो इतिकर्तव्यता, समाधान मानतो तोही खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. आळस, अज्ञान, भीती, मानसिक - शारीरिक दौर्बल्य या कारणांनी जो कष्ट करण्याचे टाळतो, दैवावर अवलंबून राहतो तो महत्त्वाकांक्षी माणूस असूच शकत नाही. अशा माणसांचे त्यामुळे नुकसानच होते असेही लेखक उताऱ्यातून सांगू इच्छितात.

**प्रश्न ४. पवनपुत्र हनुमान आणि गरुड यांची उदाहरणे लेखकाने कोणत्या संदर्भात दिली आहेत?**

**उत्तर :** महत्त्वाकांक्षा म्हणजे असाधारण, उत्तुंग कर्तृत्व करण्याची प्रबळ वासना हे स्पष्ट करताना लेखकांनी पवनपुत्र हनुमान आणि गरुड यांची उदाहरणे दिली आहेत.

पवनपुत्र हनुमंताने आपल्या वयाची तमा न बाळगता, जन्मतःच तो सूर्याचा तेजस्वी गोळा ग्रासण्याची इच्छा केली. आपल्या सर्व शक्ती, इच्छाशक्ती एकवटून त्याने अनंत आकाशात झेप घेतली. आपल्या उच्च ध्येयासाठी अखंडपणे, अविरत कष्ट करण्याची तयारी दर्शविली. वैनतेय गरुडानेही आपल्या मातेला दास्यमुक्त करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. अनेकानेक संकटांशी दोन हात करत प्रत्यक्ष वज्रपाणी इंद्राशीही त्याने युद्ध केले. सरतेशेवटी अपेक्षित अमृतकुंभ त्याने हस्तगत केलाच.

ही उदाहरणे देऊन लेखक प्र. ग. सहस्त्रबुद्धे महत्त्वाकांक्षेचे स्वरूप आपल्यापुढे अधिक स्पष्ट करतात. ते म्हणतात, पवनपुत्र हनुमान आणि वैनतेय गरुड यांचे उदाहरण समोर ठेवून आपल्या वैयक्तिक मर्यादांवर मात करावी, प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करावेत. अशा रीतीने व्यक्तिगत वा सामाजिक जीवनातील विविध क्षेत्रात यश मिळविण्याची इच्छा धरणे म्हणजे महत्त्वाकांक्षा होय.

**प्रश्न ५. उताऱ्याला योग्य शीर्षक**

**उत्तर :** महत्त्वाकांक्षा

**सरावासाठी खालील उतारे वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भोवताली स्पर्धेच्या युगात सगळीकडे शर्यती चालल्या आहेत. भांडवल देऊ शकत नसल्याने आईवडिलांवर राग धरणारे महान सुपुत्र दिसतात, तर माझ्या शिक्षणाला भारतात वाव नाही, म्हणत परदेशी पळणारे देशभक्तही सापडतात. या जीवघेण्या स्पर्धांमध्ये स्वतःच्या क्षमतांच्या पलीकडची स्वप्ने पाहणे, कष्टाशिवायच्या यशाची आशा धरणे, स्वतः पुढे येण्यासाठी इतरांना मागे खेचणे, प्रसंगी चुकीची साधने, मार्ग वापरणे हे सर्व आपल्याला पदोपदी दिसत असते.

शिक्षणपद्धतीवरही आपण मनसोक्त टीका करतो, वाचतो, ऐकतो; पण तरीही आपली सगळी तडफड त्याच शिक्षणप्रणालीतील ठरावीक अभ्यासक्रम पूर्ण करणे यासाठी चालते. नंतरचे आयुष्य, त्यात सामोरी येणारी परिस्थिती आणि आपल्याला मिळणारे शिक्षण यांची सांगड खूपच कमी असते. त्यात स्वतःची आवड, क्षमता आणि विद्यापीठाचे शिक्षण यांचीही परस्पर संगत जमली नाही, तर नक्कीच आयुष्यभर पदोपदी ठेचा लागण्याचा संभव असतो.

एखादी विद्याशाखा अभ्यासाला निवडणे, त्यात पारंगत होणे आणि त्या विद्याशाखेत व्यवसाय करणे, नोकरी करणे यात खूपच फरक आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणचे वातावरण व परिस्थिती याचा आधी कधीच अनुभव नसतो आणि मग कामाच्या ठिकाणी कंटाळा, निराशा, न्यूनगंड जाणवू लागतो.

स्वतःच्या क्षमतांचा दहावी-बारावीत नीट अंदाज येत नाही. सभोवतालचे अभ्यासाचे वातावरण व दडपण, परीक्षेचा ठरावीकपणा व त्यांना अनुसरून क्लासेसमधून मिळालेले प्रशिक्षण यांचाच आपल्या कामगिरीमध्ये जास्त वाटा असेल, तर दहावी, बारावीचे यश नंतर टिकवणे खूप अवघड जाते आणि त्यातून न्यूनगंड, निराशा, समाजाबद्दलची एक उगीचच चीड मनामध्ये भरून राहू शकते.

या चक्रातून सुटकेचा काही मार्ग आहे का? मला वाटते आहे आणि तो म्हणजे जीवनाकडे बघण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन. असा एखादा विषय शोधून काढा की, ज्यात तुम्हाला फक्त काम यशस्वी झाल्यावरच नाही, तर प्रत्यक्ष काम चालू असतानाही आनंद वाटेल; आव्हान वाटेल. मग ती एखादी शस्त्रक्रिया असो, शिकविणे असो, गणित असो किंवा माहितीचे अन्वयार्थ लावणे असो. असे काही कलाकार असतात की त्या चित्राच्या, शिल्पाच्या किंवा कवितेच्या निर्मितीमध्येच त्यांना पराकोटीचे समाधान लाभते. नंतर त्यांच्या कृतीचे कौतुक कसे होते किंवा कौतुक होत नाही, याबद्दल त्यांना काही सोयरसुतक नसते. सध्याच्या जगात याला व्यावसायिक समाधान म्हणतात की, जे पगार, प्रतिष्ठा, सुरक्षितता या सर्वांच्या पलीकडील काहीतरी असते. आपल्या आवडीच्या विषयातच आपल्या चौकस बुद्धीला आणि प्रतिभाशक्तीला वाव मिळू शकतो; म्हणून पैसा, प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या पदव्यांपेक्षा आपल्या आवडत्या विषयातील पदवी व त्याच्या संगतीतील काम याची निवड करा.

ज्या क्षेत्रात तुमच्यातील अनेक सुप्त गुणांच्या प्रकटीकरणाला वाव आहे आणि त्यात तुमच्या स्वतंत्र वृत्तीला व माणूसपणाला वाव आहे अशी काही क्षेत्रे मी सुचवू शकेन. शिक्षण, प्रसारमाध्यमे आणि प्रशासन (सरकारी यंत्रणा, पोलीस इत्यादी) यांमध्ये चांगल्या कामात आनंद घेणाऱ्या व स्वतःच्या आवडीने येणाऱ्या माणसांची खूप गरज आहे. या क्षेत्रांसाठी तुमची पदवी कोणत्याही विषयातली चालते. तसेच तुमच्या मनातील सामाजिक जाणिवेलाही या क्षेत्रात खूप संधी मिळू शकते. शास्त्र-तंत्रज्ञान क्षेत्रामध्येही समुचित तंत्रज्ञान, ते लोकांपर्यंत पोहोचविणे आणि रोजगार निर्मिती... या दृष्टीने स्वतःचे असे छोटे छोटे; पण स्वतंत्र उपक्रम चालवावेत.

आयुष्याच्या वाटचालीत चाकोरी-पैसा-प्रतिष्ठा यापेक्षा नावीन्य-आवडते कार्यक्षेत्र-मित्रपरिवार यांची साथ जास्त विश्वासार्ह व मोलाची, समाधानकारक असणार हे समजून निर्णय घेऊया.

- वा. विवेक कुलकर्णी

**प्रश्न**

प्र. १) आपल्या देशातील आजच्या शिक्षणप्रणालीविषयी कोणते मत लेखकाने या उताऱ्यातून व्यक्त केले आहे?

प्र. २) विद्याशाखा निवडताना विद्यार्थ्यांचा होणारा गोंधळ लेखकाने कसा मांडला आहे?

प्र. ३) चुकीच्या निवडीतून निर्माण होणाऱ्या गोंधळाच्या चक्रातून सुटण्यासाठी लेखकाने कोणता मार्ग सांगितला आहे?

प्र. ४) वैद्यक आणि अभियांत्रिकी विद्याशाखांव्यतिरिक्त अभ्यासाची इतर कोणती क्षेत्रे लेखकाने सुचविलेली आहेत?

प्र. ५) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

२) ललितलेखांसाठी विषय कसे सुचतात? मला वाटते डोळे उघडे ठेवून वावरणाऱ्याला विषयाचा तुटवडा पडू नये. आपल्याभोवती इतके घडत असते, दिसत असते, कानांवर पडत असते, हवेतून आपल्या संज्ञेवर आघात करत असते की, त्यातूनच अनंत विषय लिहिण्यासाठी मिळतात. माझ्या कितीतरी ललित लेखांचे विषय मला रस्त्यावर, बसमध्ये, टॅक्सीतून जाताना भेटले आहेत. अवचित दिसलेले एखादे दृश्य, कानांवर पडलेले एखादे वाक्य, नजरेसमोर आलेला एखादा चेहरा, झाडावरून सुटून पुढ्यात टपकन पडलेले पान, अचानक जाणवलेली ऊनसावल्यांची ऐंद्रजालिक कूटे या साऱ्यांनी माझ्या ललितलेखांना विषय पुरवले आहेत. माणसामाणसांतले गुंतागुंतीचे नातेसंबंध, त्यांच्या वागण्यातल्या सुसंगतीविसंगती, माणसाचे अपार एकाकीपण, नियतीच्या संदर्भातली त्याची संपूर्ण अगतिकता - हे सारे मला फार कुतूहलजनक, करुण वाटते. त्यांतूनही ललितलेखांचे विषय सुचतात.

माणसाखालोखाल निसर्ग मला प्रिय आहे. तशाच आवडत्या आहेत माझ्या बाळपणाच्या आठवणी. त्यांतूनही मला विषय मिळत गेले. माझ्या वाचनाला काही शिस्त नाही. लहानमोठे, बरेवाईट, भव्यक्षुद्र सारे मला वाचायला आवडते. या वाचनातून काहीतरी अवचित डोळ्यांना दिसते. मनात घुसते आणि हो... माझ्या आवडत्या मांजरांनी तर अनेकदा मला लेखनाला विषय दिले आहेत. राजकारण आणि समाजकारण यात मला फारसा रस नाही. त्यामुळे त्या विषयाचा मात्र माझ्या लेखनात अभाव आहे.

माझे बरेचसे ललितलेख वृत्तपत्रांतून सदर चालवताना लिहिले गेले आहेत. वृत्तपत्रात सदर चालवणे ही गोष्ट काही लेखकांना कमीपणाची वाटते. हे लेखन शाश्वत नसते, त्यात फक्त तात्कालिक घटनाप्रसंगांवरच लिहिले जाते, त्याला एक चुरचुरीत उथळपणा असतो, जीवनाचा सखोल तळ गाठण्याची त्या लेखनात कुवत नसते, आजचे वृत्तपत्र ही उद्याची रद्दी असते, हे आणि तसेच कितीतरी आक्षेप वृत्तपत्रांतल्या सदरांवर घेतले जातात. त्यांतल्या काहींमध्ये सत्याचा अंश असू शकेल. तरीही वृत्तपत्रात एखादे सदर नियमितपणे चालवणे, यात लेखकाला कमीपणा आणणारे काही आहे, असे मला वाटत नाही. निदान माझा तरी असा अनुभव नाही. वाहत्या प्रवाहात अंग झोकून पाण्यावर तरंगताना पोहणाऱ्याला जो अनुभव मिळतो, तोच आनंद असे मुक्त लेखन सातत्याने करताना मला लाभला आहे. ललितलेख लिहिण्यासाठी कोणते गुण आवश्यक असतात? पूर्वग्रहरहितता, मनाचे डोळसपण, जीवनाबद्दलचे उदंड कुतूहल आणि कोणत्याही लहानमोठ्या गोष्टींना चटकन प्रतिसाद देणारी संवेदनाक्षम वृत्ती यांची या लेखनाला फार आवश्यकता आहे असे मला वाटते. शिवाय लिहिण्याची हौस हवी आणि कष्टांची तयारी हवी. अशा प्रकारच्या लेखनाची पहिली प्रेरणा पैसा मिळवणे, ही असेल-नव्हे असतेच. पण तो काही त्याचा शेवट नव्हे. निर्मितीचा आनंद, आत्माविष्काराने लाभणारी तृप्ती, इतरांशी संवाद साधण्याची निकड हीच अशा लेखनाची खरी प्रेरणा, खरे पारितोषिक आहे. कवितेच्या खालोखाल ललितलेख हा माझा आवडता वाङ्मयप्रकार आहे. त्याचेही कारण हेच असावे. कारण कविता लिहिताना जे समाधान मला मिळते तीच तृप्ती या ललित लेखनानेही अनेकदा मला दिली आहे.

**- शान्ता ज. शेळके**

**प्रश्न**

प्र. १) माणसांमध्ये वावरताना लेखिकेला लेखनविषय कसे सुचतात?

प्र. २) लेखनविषयाचे सामर्थ्य कोणकोणत्या गोष्टींत लेखिकेला जाणवते?

प्र. ३) ललितलेखनासाठी कोणते गुण आवश्यक असतात?

प्र. ४) ललित लेखनाच्या खऱ्या प्रेरणा कोणत्या?

प्र. ५) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

**खालील उताऱ्यांचे एकतृतीयांश सारांश लिहा.**

१) नॅशनल जिऑग्राफिक, डिस्कव्हरी, ॲनिमल प्लॅनेट या वाहिन्यांवरून प्रसारित होणारे कार्यक्रम खरोखरच उच्च दर्जाचे असतात, यात वादच नाही. विषयांचं वैविध्य, त्यांची अभ्यासपूर्ण आणि नियोजनपूर्वक हाताळणी, परिश्रम आणि कौशल्यपूर्ण प्रकाशचित्रण, समजावून सांगण्याची आकर्षक धाटणी, सगळंच काही छान असतं. जगाच्या कानाकोपऱ्यात कुठं-काय-कसं आहे, हे आपण घरबसल्या बघू शकतो. इकडे आफ्रिकेच्या घनदाट जंगलात काय आहे; तिकडे बर्फाळ ध्रुवावर कोण, कसं राहतं; इकडे ॲमेझॉनच्या खोऱ्यातलं जीवन कसं आहे; तिकडे अरबस्तानातल्या वाळवंटात वाळूखाली काय दडलंय; सागरी वनस्पतीसृष्टी आणि प्राणिसृष्टी कशी आहे..... ही सगळी माहिती आपल्याला मिळते. पण या माहितीचा नेमका उपयोग काय?

इतकी माहिती आपण नीटपणे ग्रहण करू शकत नाही. सुसंगतपणे त्यावर प्रक्रिया करू शकत नाही. योग्य प्रकारे साठवून ठेवू शकत नाही आणि संगतवार पुन्हा आठवून वापरू शकत नाही; कारण - स्पष्टपणे सांगायचं तर-ती निरुपयोगी असते.

मला असं नाही म्हणायचं की, माहिती मिळवूच नये. असं म्हणणं चुकीचं होईल. व्यवहारात असंख्य गोष्टी करायच्या असतात, त्यासाठी जगातल्या अनेक बाबींची माहिती आपल्याला हवीच. आपल्या मेंदूची एक विशिष्ट कार्यपद्धती आहे. आत आलेल्या माहितीवर तो प्रक्रिया करतो. तिचं वर्गीकरण करतो. योग्य त्या कप्प्यांत ती साठवून ठेवतो, अन् याचबरोबर, विशिष्ट काळात वापरली न गेलेली माहिती तो पुसूनही टाकतो. आपण आज विविध माध्यमांद्वारे जी माहिती मिळवतो, त्यापैकी बऱ्याचशा माहितीचं हेच होतं. मेंदू ती अनावश्यक रद्दी फेकून देतो.

असं जर आहे, तर मुळात माहितीमागे इतकं उरीपोटी धावायचं कशाला? आवश्यक तेवढीच किमान माहिती आणि तीही योग्य तऱ्हेनं मिळवली तर मेंदूचंच काम हलकं होईल, नाही का?

अगदी 'डिस्कव्हरी' बघतानाही आपलं हेच होतं. आपण टी.व्ही.चे गुलाम बनून तो जे दाखवील ते बघत राहतो. ते आपल्याला आवश्यक आहे का, याचा विचार करत नाही. तिथं जे आणि जसं दाखवलं जातं ते आणि तसं बघत बसायचं. मग ते बघत असताना आपण किती आणि काय खातोय याकडे आपलं लक्ष नसतं. हरणाचा पाठलाग करणारा तिथला चपळ चित्ता नि अंतश्चित्रात त्याच्या लवचीक कण्याचं क्ष-चित्र पाहताना सतत कुबड काढून वा लोळत टी.व्ही. बघणाऱ्या आपल्या कण्याची मात्र पार वाट लागते आहे, हे आपण विसरतो.

दुसरं, आपण टी.व्ही. पाहून अशी जी माहिती मिळवतो, ती परिपूर्ण असते का? विश्वाची माहिती मिळवण्यासाठी माणसापाशी पाच ज्ञानेंद्रियं आहेत. कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक. या इंद्रियांमार्फत आपल्याला अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्यांची जाणीव होते. एखाद्या वस्तूचा ह्या पाच किंवा जास्तीत जास्त इंद्रियांमार्फत जेव्हा अनुभव घेतला जातो, तेव्हा तिचं अधिकाधिक परिपूर्ण ज्ञान आपल्याला होतं. दूरदर्शन हे 'दृक्श्राव्य' माध्यम आहे. म्हणजे पाचांपैकी फक्त दोन इंद्रियांचा उपयोग करावा लागणार, डोळे आणि कान. बाकी तीन इंद्रियांचं काय? त्यामुळेच निसर्गाची ही माहिती अत्यंत अपुरी आहे.

आपण जेव्हा प्रत्यक्ष निसर्गाकडे जातो, तेव्हा आपली पाचही ज्ञानेंद्रियं काम करतात. टी.व्ही. वर मृगाचा किडा नुसता दिसेल; पण त्याचा मखमली स्पर्श कसा जाणवेल? भाद्रपदात बकुल-प्राजक्ताच्या झाडाखालून जाताना सुवासाची जी मखमली पखरण होते; उन्हाची आग चहूकडे पेटलेली असताना बाभळी-कडूनिंबाच्या सावलीत जो

थंडावा जाणवतो; हे सगळं पंचेंद्रियांनी अनुभवायला हवं, म्हणजे मग तो अनुभव परिपूर्ण होतो. ती माहिती संपूर्ण असते. ही प्रक्रिया केवळ मेंदूसाठी नाही, तर मनासाठीही आवश्यक आहे.

कार्व्हर, जगदीशचंद्र बसू, डॉ. जेन गुडाल यांनी निसर्गाशी दोस्ती करून ही साधना केली.

आपल्या अगदी जवळ असे अभ्यासक आजही आहेत.

आपण अशा प्रकारांनी निसर्गाचा अभ्यास करू तेव्हा आपल्याला त्याची खरीखुरी 'डिस्कव्हरी' होईल. त्याच्याशी पंचेंद्रियांनी एकरूप झाल्याशिवाय तो त्याची गुपितं आपल्याला सांगत नाही.

**- दिलीप कुलकर्णी**

२) इथे विद्याभ्यासाचा हा सुंदर खुला रंगमंच होता. किती तरी पात्रे आणि ती घडविणारे ते 'कुंभार'. नामदेवाचे डोके थापटून गोरोबांनी ते कच्चे आहे म्हटल्याची कथा मला फार आवडते. गुरूंनी ती चिमुकली मने प्रेमाने भिजवावी, चांगल्या संस्कारांनी हळुवारपणाने थापटाथोपटावी आणि ज्या क्षेत्रात ती कामी लावण्यात येणार आहेत त्या क्षेत्राला आवश्यक अशा साधनेच्या तपात ती भाजली जावी, तेव्हाच ती इष्ट आकार असलेली 'सत्पात्रे' होणार. खुल्या वातावरणातल्या त्या शाळेत, नुसती मजा करावी हा गुरुदेवांचा हेतू नव्हता, तिथे अभ्यासाची तपःसाधना होती. फक्त घाऊक प्रमाणात एकाच छापाच्या विटा भाजून काढायचा तो 'शाळा' नामक कारखाना होऊ नये यासाठी त्यांची धडपड होती. प्रत्येक शिल्प होता होईल तितके स्वतंत्र रीतीने घडावे या हेतूने त्यांनी ही आश्रमीय शिक्षणपद्धती स्वीकारली होती. मुकुल डे यांच्यासारखा आज जागतिक कीर्ती मिळविलेला चित्रकार शाळेतल्या गणित, व्याकरण वगैरे विषयांत अजिबात रमत नसे. गुरुदेवांनी त्याच्या हाती रंग, कागद आणि ब्रश दिले आणि सांगितले, ''ह्यात तुला मुक्ती लाभतेय ना, मग चित्रे काढ.'' शांतिदेव घोषांना सुरांचे आणि नृत्याचे प्रेम. त्यांना तंबोरा आणि घुंगरू दिले. निसर्गात वृक्षवल्ली जशा स्वधर्माने वाढतात तसे मानवी जीवन वाढले पाहिजे. नारळाच्या झाडाकडून आंब्याची अपेक्षा केली नाही, भेंडीच्या रोपाला केळी का लटकत नाहीत याची चिंता केली नाही. एकदा रोप कसले आहे हे ओळखल्यावर मग त्याला योग्य ते खतपाणी देऊन ते कसे फुलेल आणि फळ धरील ते मात्र पाहिले. त्याप्रमाणे जोपासले. सगळ्या झाडांना पाणी, ऊन आणि माती हवीच; त्याप्रमाणे किमान आवश्यक शिक्षण देऊन ज्याची जिथे गती त्या क्षेत्रात त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ कशी होईल ते पाहिले. म्हणूनच शांतिनिकेतनात मुलामुलींची भरती प्राथमिक शाळेपासून करण्याचा गुरुदेवांचा आग्रह असे. एकदा ते बालक किंवा बालिका शांतिनिकेतनाच्या शिशुभवनात दाखल झाले की मॅट्रिक होईपर्यंत आश्रम सोडायला तयार होत नसे. आजही होत नाही.

**- पु. ल. देशपांडे**

✦✦✦

# ५. संकीर्ण

बोलणे ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. बोलून स्वतःला अभिव्यक्त करणे हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. आपल्या मनातील भावना, विचार दुसऱ्याला सांगणे या आंतरिक ऊर्मीनेच माणूस आपोआप बोलू लागतो. म्हणूनच 'बोलतो' तो माणूस अशीही माणसाची एक व्याख्या होऊ शकेल.

नुसते बोलणे वेगळे आणि मुद्देसूद, नेमकी शब्दयोजना करून प्रभावीपणे बोलणे वेगळे. असे प्रभावी बोलता येणे हे एक कौशल्यच आहे. सरावाने, अभ्यासाने हे कौशल्य आत्मसात करावे लागेल. भाषण, संभाषण, संवाद, चर्चा, गटचर्चा, मुलाखत, वक्तृत्व इ. बोलण्याच्या कौशल्यालाही बरेच पैलू आहेत. यापैकी काहींची आपण इथे माहिती घेऊ. १००-१५० शब्दांत यांचे लेखन करणे अपेक्षित असते. परंतु इथे थोडे विस्ताराने लेखन करण्याचे स्वातंत्र्य घेतले आहे.

## १) भाषण

**प्रसार माध्यमांसाठीचे भाषण करताना**

- एखाद्या विषयावर श्रोत्यांपुढे केलेले अभ्यासपूर्ण विवेचन म्हणजे भाषण होय.
- भाषण लिहिताना ते कोणत्या गटासमोर सादर करायचे आहे त्याचा विचार करणे आवश्यक असते.
- दिलेल्या विषयाची सूत्रबद्ध मांडणी करताना ती एकसुरी होऊ नये याची काळजी घ्यावी.
- श्रोत्यांना अप्रत्यक्षपणे त्यात सहभागी करून घेतल्याची जाणीव व्हावी. श्रोत्यांना उद्देशून संवादी भाषा हवी, आवाहन हवे.
- भाषणाच्या वेळाचा विचार करून आशय नेमकेपणाने व प्रभावीपणे श्रोत्यांपर्यंत पोचावा याची काळजी घ्यावी.
- भाषण हे वाचिक अभिनयाने सादर करण्याची कला असल्याने भाषण लिहिताना याचा विचार हवा.

**२८ फेब्रुवारी या विज्ञान दिनाच्या निमित्ताने डॉ. सी. व्ही. रामन यांच्या संशोधन कार्याचा परिचय करून देणारे आकाशवाणीवरील 'युववाणी' साठीचे भाषण.**

सर सी. व्ही. रामन हे १९३० साली भौतिकशास्त्रातील 'नोबेल पारितोषिक' मिळविणारे पहिले भारतीय! 'रामन परिणाम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शोधासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. दि. २८ फेब्रुवारी, १९२८ रोजी त्यांनी लावलेल्या शोधाची आठवण म्हणून वर्ष १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून दरवर्षी भारतात साजरा केला जातो.

रामन यांच्या कार्याचे महत्त्व केवळ त्यांच्या शोधापुरतेच मर्यादित नाही. त्यांनी भारतातील विज्ञानविकासातही महत्त्वाचा वाटा उचलला आहे. 'विकसित देशातून उपकरणे आयात करून आपण उच्च प्रतीचे संशोधन करू शकणार

नाही' असे त्यांचे म्हणणे होते. मूलभूत संशोधनासाठी इतरांकडे न पाहता आपणच असे विषय शोधले पाहिजेत. आपल्या भोवतालच्या प्रश्नांकडे डोळसपणे पाहिले पाहिजे, तसेच संशोधन पद्धती कशी विकसित करावी, याबद्दलचे विचारही त्यांनी परखडपणे मांडले आहेत.

विशाखापट्टणमला शिक्षण पूर्ण झाल्यावर 'भारतीय विज्ञान वर्धिनी' या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी भरपूर संशोधन केले. अनेक शोधनिबंध लिहिले. १९२१ साली ऑक्सफर्ड विद्यापीठांला भेट देणाऱ्या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून ते इंग्लंडला गेले. प्रवासाचाही वेळ वाया जाऊ नये म्हणून प्रवासात समुद्राच्या पाण्याचा त्यांनी अभ्यास केला. 'समुद्राचे पाणी निळे का?'- तर त्याचा उगम पाण्याच्या रेणूंमुळे होणाऱ्या प्रकाशाच्या विकिरणातच आहे, हे निरीक्षण त्यांनी प्रयोगसिद्ध करून दाखवले. द्रवपदार्थांमुळे होणाऱ्या प्रकाशाच्या विकिरणावर अधिक संशोधन करून त्यांनी सुप्रसिद्ध 'रामन परिणाम' हा शोध लावला. या शोधानंतर वर्षभराने त्यांच्या नावाची नोबेल पुरस्कारासाठी शिफारस केली गेली. नोबेल पुरस्कारामुळे रामन यांनी भारताचे नाव उज्ज्वल केले.

'परदेशी संशोधकांकडे अत्याधुनिक साधनसामग्री असली तरी आपल्याकडे असलेल्या मेंदूचा वापर केला तर आपण त्यांच्या तोडीचे संशोधन करू शकतो,' यावर त्यांचा विश्वास होता. आपल्या देशातील होतकरू संशोधकांनी आपल्या देशातच राहावे, असा त्यांचा आग्रह असे. तसेच सामान्य वाचकांपर्यंत पोचायला हवे, असे ते म्हणत.

आज बुद्धिमान विद्यार्थ्यांची परदेशी जाण्याची ओढ, तिथल्या सुविधांचे आकर्षण या पार्श्वभूमीवर मित्रमैत्रिणींनो, सर सी. व्ही. रामन यांचा स्वदेशात राहण्यावर असलेला भर, पुरेशा सुविधा उपलब्ध नसताना, याच भूमीवर नोबेल पारितोषिक मिळण्याच्या योग्यतेचे त्यांचे संशोधन आपल्याला खूप काही सांगून जाते.

## २) संवाद

### दोन व्यक्तींमधला संवाद

सहज मारलेल्या गप्पा आणि एखादा विशिष्ट विषय घेऊन त्यावर साधलेला संवाद यात फरक असतो. त्या विशिष्ट विषयावर व्यक्त केलेली मतमतांतरे, त्याविषयावरचे चिंतन, त्यावरचे सुसंगत असे संभाषण म्हणजे संवाद होय.

**संवाद लिहिताना :**

- विषयावरच्या मत-मतांतरांनी सुरुवात करण्यापेक्षा सुरुवातीला विषयाची प्रस्तावना कोणाच्या तरी तोंडी असावी.
- संवाद कोणा-कोणात चालू आहे, याचे स्पष्ट भान आपल्याला असावे. शिवाय आपल्या लेखनातून त्याची कल्पना वाचणाऱ्यालाही यावी.
- संवाद साधणाऱ्या २ व्यक्ती एकाच पातळीवरच्या असतील तर व्यक्ती १, व्यक्ती २ असे लिहून संवाद लिहावा.
- संवादातल्या २ व्यक्ती भिन्न पातळ्यांवरच्या असतील (वय, व्यवसाय, लिंग, सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी इ.) तर त्या पातळीप्रमाणे त्यांची भाषा बदलती असावी.
- विषयावर संवाद साधताना विषयाबद्दलचा भिन्न दृष्टिकोन मांडता आला तर संवाद जास्त रंगतदार होऊ शकतो. नाण्याच्या दोन्ही बाजू उजेडात आणता येतात.
- संवादातील वाक्ये सोपी, सुटसुटीत, नेहमीच्या बोलण्यातील अनौपचारिक असावीत. ओढून ताणून केलेला संवाद असे त्याचे स्वरूप असू नये.

- संवादात केवळ प्रश्नोत्तरे, हो-नाही स्वरूपाचे संवाद नसावेत.
- एकाच व्यक्तीचे बोलणे लांबलचक नसावे. बोलण्याला, संवादाला लय असावी.
- एखादा मुद्दा बोलून संपला की मग पुढच्या मुद्द्याला सुरुवात करावी.
- संवादालाही योग्य समारोप हवा. विषयावरची चर्चा पूर्ण झाल्याचे समाधान असावे. संवादात काहीतरी राहून गेल्याची, मध्येच बोलणे थांबल्याची भावना नसावी.
- लिहिलेला संवाद वाचल्यावर विषयाबद्दलचा सर्वांगीण विचार या संवादातून प्रभावीपणे वाचकांपर्यंत पोहोचायला हवा.

**'इंटरनेट - एक मायाजाल' या विषयावर दोन व्यक्तींमधील संवाद लिहा.**

**व्यक्ती - सौरभ व त्याचे बाबा**

**बाबा :** अरे सौरभ, केव्हाचा हाका मारतोय, एकदा इंटरनेट उघडून बसलं, की भान नाही राहात तुला आजकाल.

**सौरभ :** सॉरी बाबा, पण काय झालंय, दोन दिवसांत प्रोजेक्ट पूर्ण करायचाय ना! आणि तुम्हाला माहिती आहे की इंटरनेटशिवाय पर्याय नाही ना माहिती मिळवायला.

**बाबा :** सौरभ, जरा इकडे लक्ष दे. मला इंटरनेटचे उपयोग माहीत नाहीत, असं नाही. तुमची पिढी खरंच भाग्यवान आहे. माहितीचा अफाट खजिना तुमच्यासाठी खुला आहे; पण म्हणून तुम्ही त्या त्या विषयाच्या संदर्भातील सखोल माहिती मिळवायचा प्रयत्नच करत नाही. वरवरची माहिती एक बटन दाबलं की उपलब्ध आहे ना तुम्हाला! आणि सौरभ, खरं सांग बरं, अभ्यासाव्यतिरिक्त किती वेळ घालवतोस फेसबुक, ट्विटर वगैरे सोशल नेटवर्किंगमध्ये!

**सौरभ :** पण बाबा, त्यामधून आम्ही कितीतरी मित्र नव्या बातम्या, आमची मतं एकमेकांना कळवत असतो. मित्रांचे लाईक्स येतात, त्यांची मतं कळतात.

**बाबा :** हे बघ, सतत दुसऱ्याचं मत जाणण्यात तुम्हाला रस! स्वतःला खरंच काय आवडतंय याचा गंभीरपणे विचार करता का रे कधीतरी? सतत इतरांच्या ई-संपर्कात राहण्याची धडपड. आजकाल तर आमच्याशीही मोकळेपणाने बोलायला वेळ नसतो तुला; मग बाकीचे नातेवाईक तर दूरच राहिले.

**सौरभ :** बाबा, खरंच असं काही मनात नसतं हो; पण होतं काय, की वेळ कसा जातो कळतच नाही.

**बाबा :** हाच टाइमपास रे बाबा, इंटरनेटचं जणू व्यसनच लागलं आहे तरुणांना आजकाल. तू तरी कसा अपवाद असणार? चांगल्याबरोबर अनेक वाईट गोष्टीही प्रसारित होतात इंटरनेटवरून; तू आता मोठा झालायस म्हणून थोडं स्पष्टच बोलतो. कधी मित्रांबरोबर फिरायला जाणं नाही, ग्राउंडवर खेळणं तर दूरच. नातेवाईकांशीही फारसा संबंध नाही. सतत या आभासी जगात जगता तुम्ही. जगात खूप छान गोष्टी आहेत अनुभवायला. एकदा या इंटरनेटच्या भूल-भुलैयातून बाहेर येऊन बघा तर खरं.

**सौरभ :** बाबा, मला तुमच्या सगळ्याच गोष्टी पटल्या असं नाही. पण नक्की विचार करीन.

## ३) वृत्तान्त लेखन

वर्तमानपत्रातील बातमी आणि वृत्तान्त लेखन यात फरक आहे. एखादी घटना/प्रसंग/समारंभ घडल्यानंतर ताबडतोब दिले जाणारे वृत्त म्हणजे बातमी. पण ते घडून गेल्यानंतर नजीकच्या काळात त्यासंबंधी स्वतंत्र असा वृत्तान्त तपशीलाने लिहिला जातो. वृत्तान्त लिहितानाचे क्रमवार तपशील.

**वृत्तान्त लेखन करताना :**

- विषयानुरूप त्या त्या प्रसंगाचे स्वरूप, उद्दिष्ट, माहिती.
- प्रसंगाशी निगडित वा कार्यक्रमात सहभागी झालेल्या व्यक्ती यांचा ओझरता परिचय.
- आवश्यकतेप्रमाणे वक्त्याच्या भाषणातील काही अंश
- वृत्तलेखकाचा स्वतःचा अभिप्राय/प्रतिक्रिया
- वृत्तलेखनातून लिहिणाऱ्याचा त्याविषयाचा अभ्यास, विचार नकळत प्रगट होतात.
- त्यामुळे वृत्तान्त लिहिताना औपचारिक तरीही परिणामकारक शैली अपेक्षित आहे.
- घडलेली घटना, कधी, कोठे, का, कशी, कोणाच्या संदर्भात घडली त्याचे सम्यक चित्र वृत्तान्त वाचणाऱ्याच्या नजरेसमोर उभे राहिले पाहिजे.

**विषय : दि. २ ऑक्टोबर-गांधी जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान घेण्यात आले. त्याचा वृत्तान्त १०० ते १५० शब्दांत लिहा.**

दि. २ ऑक्टोबर, २०१४ या दिवशी महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने शाहू कॉलेज, पुणे येथील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी एकत्रित येऊन स्वच्छता अभियानाचा एक आगळावेगळा कार्यक्रम साजरा केला. पंतप्रधानांच्या 'स्वच्छ भारत' या आवाहनाला प्रत्यक्ष कृतीतून प्रतिसाद देण्याची कल्पना यामागे होती.

सकाळी ७ वाजता सर्व विद्यार्थी सभागृहात जमले. सहकारनगर भागातील ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते आबासाहेब लेले यांनी गांधीजींची स्वच्छतेची कल्पना, त्यांचा कृतिकार्यक्रम, त्यामागील उदात्त विचार यांचा परिचय आपल्या व्याख्यानातून करून दिला. स्वतःची शारीरिक स्वच्छता, आपल्या परिसराची स्वच्छता, त्यातून आपला गाव-आपला देश यांची स्वच्छता याबरोबरच स्वच्छ मन, स्वच्छ प्रशासन, विचारशुचिता येथपर्यंत पोहोचणे म्हणजे खरे 'स्वच्छता अभियान' हा विद्यार्थ्यांना अंतर्मुख करणारा प्रेरणादायी विचार त्यांनी मांडला.

त्यानंतर विद्यार्थ्यांचे गट करण्यात आले. एका गटाने महाविद्यालयाच्या आवारातील स्वच्छता केली. एका गटाने महाविद्यालयाजवळून वाहणाऱ्या नाल्यातील प्रवाहात साठलेला कचरा काढण्याचे काम केले. जवळच असलेल्या वस्तीमध्ये एक पथनाट्य सादर करून कलाकार विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व लोकांना सांगण्याचा अभिनव प्रयत्न केला व तेथील लोकांना आपल्या उपक्रमात सामील करून घेऊन वस्तीतील रस्ता स्वच्छ केला.

चित्रकला उत्तम येणाऱ्या एका गटाने उत्तम चित्रफलक तयार करून आपला परिसर साफ ठेवण्याची आठवण लोकांच्या मनात सतत राहावी, यासाठी जागोजाग फलक लावले. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांबरोबर सर्व प्राध्यापकांचाही समावेश होता. या भागातील नगरसेवकांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमात सामील होत त्यांचे कौतुक केले.

## ४) मुलाखत

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवन कार्य लोकांपर्यंत पोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे मुलाखत होय. मुलाखतीचे प्रामुख्याने प्रत्यक्ष मुलाखत घेणे आणि नंतर ती शब्दबद्ध करणे हे दोन भाग पडतात. मुलाखत घेताना स्वतः कमीतकमी बोलून समोरच्या व्यक्तीला बोलते करण्याची आवश्यकता असते. मुलाखतीचा हेतू, त्या व्यक्तीविषयीची सर्व माहिती, काम इ. बद्दलचे पूर्वज्ञान मुलाखत घेणाऱ्याला अवश्य असायला हवे. मुलाखत घेणाऱ्या

व्यक्तीबद्दलचा योग्य तो आदर, आब राखत योग्य त्या शब्दात जवळिकीने सुसंवाद साधता आला पाहिजे. प्रश्नांमधील कृत्रिमता टाळत सहज संवादी पद्धत वापरून त्यातील ओघ जपला तर मुलाखत प्रभावी ठरते, उत्तरोत्तर रंगत जाते.

**मुलाखत संवादरूपात लिहिताना :**

- थेट प्रश्नोत्तराला सुरुवात न करता सुरुवातीला प्रास्ताविक परिच्छेद असावा. यातून त्या व्यक्तीची थोडक्यात ओळख, मुलाखतीचा उद्देश वाचकांपर्यंत पोचावा.
- मुलाखत प्रश्नोत्तर स्वरूपात असावी. प्रश्न थोडक्यात, नेमके असावेत. उत्तरे मात्र सविस्तर असावीत.
- प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत लिहायची असल्यास ती आकर्षक पद्धतीने संपादित करून लिहू शकता.
- थेट मुलाखत लिहिताना विषय नेमका काय आहे, हे समजून घ्यावे मुलाखत ज्याची घ्यायची आहे त्याचा हुद्दा, नाव दिले असेल तर यात व्यक्तीबद्दल आपल्याला जास्त माहिती आहे की हुद्द्याबद्दल हे लक्षात घेऊन मुलाखत लिहिण्याचा प्रयत्न करावा.

**विषय :- पर्यावरणदिनानिमित्त पर्यावरणविषयक विचारवंत श्री. दिलीप कुलकर्णी यांची मुलाखत सुमारे शंभर ते दीडशे शब्दांत लिहा.**

नमस्कार, आज ५ जून-जागतिक पर्यावरण दिन. यानिमित्ताने पर्यावरणाचे अभ्यासक, 'दैनंदिन पर्यावरण', 'निसर्गायण', 'हसरे पर्यावरण', 'वेगळ्या विकासाचे वाटाडे' या पर्यावरणविषयक पुस्तकांचे लेखक आणि 'गतिमान संतुलन' या मासिकाचे संपादक श्री. दिलीप कुलकर्णी आपल्याशी संवाद साधायला आले आहेत. अभियांत्रिकीचं शिक्षण घेतलेले, पूर्वी टेल्कोमध्ये नोकरी करणारे कुलकर्णी सर आता कुडावळे, ता. दापोली येथे पर्यावरणस्नेही जीवनाचा पुरस्कार करत तसं जीवन प्रत्यक्ष जगत आहेत. आज आपण त्यांच्याशी संवाद साधून 'दैनंदिन पर्यावरण' या पुस्तकाबद्दल अधिक जाणून घेऊया-

⇨ सर नमस्कार, 'निसर्गायण' हे पर्यावरणावरचं तुमचं पहिलं पुस्तक. 'निसर्गायण' ते 'दैनंदिन पर्यावरण' हा प्रवास कसा झाला?

- 'निसर्गायण' या पुस्तकात पर्यावरणाचा केलेला तात्त्विक विचार अनेकांना आवडला; वेगळा वाटला. पण दैनंदिन जीवनात हा विचार कृतीत उतरवायचा कसा, ही अनेकांपुढची समस्या होती. व्यवहारात पर्यावरण विचार आणायचा उद्देश या पुस्तकामागे होता.

⇨ 'रोजच्या जगण्यातलं पर्यावरण' हा विषय अगदी महत्त्वाचा. या पुस्तकाच्या स्वरूपाबद्दल सगळ्यांनाच उत्सुकता आहे. त्याबद्दल...

- पर्यावरणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनतेय. त्यामुळे प्रत्येकजण अस्वस्थ आहे. काहीतरी केलं पाहिजे; हे सगळ्यांनाच जाणवतं. पण 'काहीतरी' म्हणजे काय हे कळावं, त्याची स्पष्टता यावी यासाठी 'आपण नेमकं काय काय करू शकतो' हे सांगणारं हे पुस्तक आहे. घरात, स्वयंपाकघरात, न्हाणीघरात, प्रवासात, शाळेत, शेतात कार्यालयात 'पर्यावरणीय दृष्टिकोनातून' आपण काय करू शकतो हे सांगणाऱ्या १०१ कृतींचा समावेश या पुस्तकात आहे.

⇨ सगळ्यांना उपयोगी पडेल असंच हे पुस्तक आहे. या पुस्तकात उपाय सुचवताना आपण एक चतुःसूत्री मांडली आहे.

- हो. पर्यावरणपूरक अमूक गोष्टी करा असं सांगताना, तिचे निकष ठरविताना, तुम्ही-आम्ही जीवन जगताना ही चतुःसूत्री समोर ठेवावी असं वाटतं -

१) एखाद्या वस्तूचा वापर पूर्णपणे टाळणं.

२) वस्तूचा कमीत कमी वापर करणं.

३) वस्तूचा वापर पूर्णपणे करणं.

४) पुनर्वापर करणं.

➪ सर या व्यक्तिगत उपायांबरोबरच कोणते सामूहिक प्रयत्न सुचवाल?

- प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरुद्ध आंदोलन करणं, उत्पादनांवर सामूहिक बहिष्कार घालणं.
- पर्यावरणपूरक कायद्यांसाठी आग्रह धरणं.
- व्यापक प्रमाणात या विषयासंदर्भात जाणीव जागृती करणं इ.

➪ सर, आजच्या तरुण पिढीला काय सुचवाल?

- पर्यावरणाची समस्या जगड्व्याळ आहे म्हणून घाबरून जाऊ नका आणि निष्क्रियही बनू नका. छोट्या-मोठ्या पर्यावरणपूरक कृतींनी सुरुवात करा. त्यात सातत्य ठेवा. दिव्यानं दिवा प्रज्वलित होईल आणि त्यात पर्यावरणाचं भवितव्य उजळून निघेल.

## ५) गटचर्चा

एखाद्या निश्चित विषयावर गटातील सर्व सदस्यांनी मिळून औपचारिकपणे केलेले प्रकटचिंतन म्हणजे गटचर्चा! गटचर्चा व्यवस्थित, योग्य दिशेने व्हावी; सर्वांचा समावेश असावा, यावर नियंत्रण करण्यासाठी एखादा गटप्रमुख असणे आवश्यक असते. दिलेल्या विषयाच्या संदर्भात गटातील व्यक्ती आपले वेगवेगळे विचार मांडत आहेत, अशी गटचर्चा लेखनाची रचना असावी.

**गटचर्चा लिहिताना :**

- गटचर्चेची सुरुवात गटप्रमुख प्रस्तावनेने करतो आहे अशी असावी.
- गटचर्चेत गटसदस्य संख्या किमान ५-६ तरी असावी.
- विषयावरच्या चर्चेत विषयाची साधक-बाधक चर्चा, खंडन-मंडन पद्धतीने गटसदस्य करीत आहेत अशी रचना असावी.
- त्याप्रमाणे नेमके शब्दप्रयोग असणारे चटपटीत संवाद गटचर्चेत असावेत.
- गटचर्चा एकांगी न होता त्याविषयावरचे सर्व पैलू गटचर्चेतून पुढे यावेत.
- चर्चेतून विषयाबद्दल काही एक निष्कर्ष निघाला, की त्या विषयावरचे नानाविध अन्य पैलू चर्चेतून समोर आले याचा उलगडा गटप्रमुखाने समारोपात करावा.

**'शिक्षणाचे माध्यम मातृभाषा की इंग्रजी?' या विषयावरील गटचर्चा संवादरूपात लिहा.**

**गटप्रमुख :** मित्रांनो, महाविद्यालय सुरू होऊन ४ महिने झाले. मला कल्पना आहे की, तुम्ही सर्व जण वेगवेगळ्या गावांतून इथे आला आहात. काहींनी आपलं शालेय शिक्षण मराठी माध्यमातून घेतलंय तर काहींनी इंग्रजी माध्यमातून. त्यामुळे अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, प्रश्न हे वेगवेगळे असतील. त्यातून शिक्षणाचं माध्यम कोणतं असावं, याविषयी तुमच्या मनात

संभ्रमही असेल. आज आपण त्याविषयीचे आपले प्रत्यक्ष अनुभव, विचार एकमेकांना सांगण्याचा प्रयत्न करूया. मात्र प्रत्येकानं मोकळेपणानं बोलायचं बरं का।

**संदीप :** सर, मी गावाला असताना मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो. इथे आल्यावर गणिताचा अभ्यास करताना अडचण आली नाही. कारण लहानपणी मराठीत शिकल्याने मूळ संकल्पना पक्क्या झाल्या आहेत. गणितामध्ये भाषेचा प्रश्न खूप येत नाही ना। पण फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजीच्या अभ्यासात मात्र खूपच अडचण येतेय. अर्धी अधिक शक्ती भाषा समजून घेण्यातच खर्च होते.

**मकरंद :** आणखी एक गोष्ट मला सांगायचीय. मराठी माध्यमात शिकल्यामुळे इतर मुलं इंग्रजीत फाडफाड बोलतात, तेव्हा 'आपल्यात काहीतरी कमी आहे' असं वाटतं.

**सुभाग्या :** अरे, पण असं कशाला वाटून घ्यायचं? परीक्षेत तर तुला उत्तम गुण मिळतात ना? त्या दिवशी आपल्या कॉलेजमध्ये जपानी प्राध्यापकांचं एक मंडळ आलं होतं. त्यांना कुणालाही फारसं इंग्रजी येत नव्हतं. तरी किती आत्मविश्वासाने वावरत होते ते. जपान, चीनसारख्या देशांमध्ये शिक्षणासाठी इंग्रजी माध्यम नसूनही ते देश किती प्रगत आहेत. सगळे शिक्षणतज्ज्ञही म्हणतात की, शिक्षणाचं माध्यम मातृभाषा असावं म्हणून।

**राजू :** हे सगळं खरं असलं तरी आज जग किती जवळ आलंय. परदेशात जाण्याची वेळ आली, तर इंग्रजी उत्तम यायला हवंच ना?

**मधुरा :** अरे, नको कोण म्हणतोय? इंग्रजी आपण शिकूयाच ना! पण ती आपली ज्ञानभाषा असायला हवी, असं मात्र मुळीच नाही. एक मात्र खरं, त्यासाठी आपल्या भाषेत परिभाषा, नवे शब्दकोश निर्माण व्हायला हवेत. सुरुवातीला थोडं क्लिष्ट वाटेल. पण सरावाने सगळं सोपं होईल.

**सुनील :** आपल्या भाषेतही किती समृद्ध वाङ्मय आहे. ते वाचून आपलं व्यक्तिमत्त्वही अधिक समृद्ध होतं, असं मला वाटतं. इंग्रजी भाषेतही भरपूर वाङ्मय आहे. पण इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलं म्हणून आपण ते साहित्यही फारसं वाचत नाही. ना धड इंग्रजी, ना धड मराठी अशी अवस्था होते.

**अनिरुद्ध :** हो ना, आणि आपलं म्हणणंही मातृभाषेत आपण किती सहजपणे मांडू शकतो. मगाशी राजू म्हणाला की, केवळ इंग्रजी चांगलं येत असेल तर सहज कुठेही नोकरी मिळेल. पण मला नाही तसं वाटत. आपल्या शिक्षणाचा दर्जा उत्तम असेल, आत्मविश्वास असेल तर नक्की नोकरी मिळेल.

**सुनिता :** आज आपल्याकडे स्वतः अशिक्षित असलेले अनेक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. पण, होतं काय, की त्यांना आपल्या मुलांच्या अभ्यासाविषयी काहीच समजू शकत नाही.

**गटप्रमुख :** मित्रांनो, हा विषय असा एका चर्चेत संपणारा नाही. कुठल्याही प्रश्नाच्या दोन्ही बाजू नीट अभ्यास करून समजून घ्यायला हव्यात. एक मात्र नक्की... आपली अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी, एकात्मतेची भावना जागी करण्यासाठी आपली भाषा, आपला प्रांत, आपला देश याविषयीचं प्रेम आपल्या मनात हवंच, जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी। आतापुरतं आपण थांबूया. पण प्रत्येकाने या प्रश्नाचा गंभीर विचार करून कृती करायला हवी.

## ६) प्रसारमाध्यमांसाठी निवेदन

**विषय : मधुमेह दिनानिमित्त 'डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया' तर्फे राबवण्यात येणाऱ्या मोफत तपासणीबद्दलचे निवेदन आकाशवाणी या माध्यमासाठी तयार करा.**

प्रति,

मा. संपादक

आकाशवाणी, पुणे.

कृपया सोबत जोडलेले निवेदन आकाशवाणीवरून दि. ११, १२ व १३ नोव्हेंबर, २०१४ या दिवशी 'निवेदनां' मध्ये प्रसिद्ध करावे ही विनंती.

द्वारा - कार्यवाह

डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे.

**मधुमेह दिनानिमित्त मधुमेह तपासणी शिबिर**

'वर्ल्ड डायबेटिस डे' अर्थात 'जागतिक मधुमेह दिना'च्या निमित्ताने गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर या दिवशी डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने धोंडूमामा साठे महाविद्यालयाच्या सभागृहात मधुमेह तपासणी शिबिर होणार आहे.

या शिबिरामध्ये वेगवेगळ्या रक्ततपासण्यांबरोबरच रक्तदाब तपासणी, नेत्र तपासणी, पावलांची तपासणी इ. तपासण्या करण्याची सोयही सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिबिरात डॉ. सुचेता अय्यर, डॉ. रमेश गोडबोले, डॉ. जयदेव डोळे, डॉ. कल्पना जोग इ. तज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. 'डायबेटिक असोसिएशन' तर्फे प्रसिद्ध होणारे 'मधुमित्र' हे मासिक, तसेच अन्य प्रकाशनेही सवलतीच्या दरात यावेळी विक्रीसाठी उपलब्ध असतील. शिबिर गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर, सकाळी ९ ते संध्या. ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे.

नामवंत तज्ज्ञांकडून मधुमेहाविषयीच्या आपल्या मनातल्या शंकांचे निरसन करून घेण्याची उत्तम संधी या मधुमेहदिनाच्या निमित्ताने उपलब्ध झाली आहे. या संधीचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे कार्यवाह श्री. अरविंद कुलकर्णी यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : कार्यालय (०२०-२४५८४०५५)

**विद्यार्थ्यांसाठी टीप :- अशाच प्रकारचे निवेदन आपण वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या अशा प्रसारमाध्यमांकडे पाठवू शकता.**

## ७) अहवाल/इतिवृत्त लेखन

वेगवेगळ्या संस्था, सहकारी रचना, विद्यापीठे, महाविद्यालये यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या सभा, बैठका आयोजित करण्यात येतात. त्यातील काही नियमित तर काही प्रासंगिक असतात. या सभा - बैठकांच्या तपशीलाची नोंद करून ठेवणे म्हणजे अहवाल लेखन करणे होय. हा एक प्रकारचा दस्तैवजच असतो. काही ठिकाणी कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठीही अहवाल लेखन करण्याची पद्धत आहे. या अहवालांचा उपयोग भविष्यातील धोरणे ठरवण्यासाठी होत असतो. अहवाल लेखनाचीही विशिष्ट अशी पद्धत असते, मांडणी असते.

**अहवाल लिहिताना :**

- सभेचे नाव, दिनांक, वार, वेळ, स्थळ
- सभेच्या अध्यक्षांचे नाव
- सभेला उपस्थित सभासदांची संख्या
- सभेतील कामकाजाची माहिती क्रमाने लिहावी
- श्रद्धांजली (त्या वर्षात कालवश झालेल्या मान्यवरांची नावे)
- विषय/प्रस्ताव (सूचक/अनुमोदक)
- ठराव, त्याचा तपशील
- ठराव मान्य, अमान्य
- निर्णय घेण्यात आलेल्या विषयांची यादी
- अहवालाच्या शेवटी अध्यक्षांची सही व दिनांक
- डाव्या बाजूस कार्यवृत्त लिहिणाऱ्याची सही व दिनांक
- अहवालाचे लेखन तटस्थवृत्तीने व समतोलपणे करावे.
- आपली व्यक्तिगत मते त्यात प्रतिबिंबित होऊ नयेत.

**'साहित्यरंग प्रतिष्ठान', नांदेड या वाङ्मयीन कार्य करणाऱ्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल/इतिवृत्त १०० शब्दांत लिहा.**

'साहित्यरंग प्रतिष्ठान' या संस्थेची २०१३-१४ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ४ मे, २०१४ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वाजता संस्थेच्या अध्यक्ष प्रा. डॉ. मधुरा वेलवणकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. शिक्षक भवन, जुनी पेठ, नांदेड येथील सभागृह-२ येथे घेण्यात आलेल्या या सभेला ५० जण उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला २०१३-१४ या आर्थिक वर्षात कालवश झालेल्या मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर मागील वर्षाच्या २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कार्यवाह प्रा. सुनील कोरडे यांनी वाचून दाखविले. या इतिवृत्ताला मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रा. सुशीला विरणकर यांनी मांडला तर डॉ. कपिल सुलाखे यांनी त्याला अनुमोदन दिले.

संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा. नीरजा लाडले यांनी लेखापरीक्षकांनी तपासलेला २०१२-१३ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडून तो संमत करण्याचा प्रस्ताव मांडला. त्याला डॉ. सुनील सुखदेव व प्रा. वैखरी दांडेकर यांनी अनुमोदन दिले.

यानंतर आगामी २०१४-१५ या काळातल्या 'संभाव्य कार्यक्रमांचे नियोजन' याविषयावर खुली चर्चा झाली. महाविद्यालयीन गटासाठी 'साहित्यरंग प्रतिष्ठान'तर्फे गटचर्चा, प्रश्नमंजुषा असे कार्यक्रम साहित्याभिरुची वाढवण्यासाठी घेतले जातील, याविषयी सगळ्यांचे एकमत झाले. नांदेड शहरातील ३ तर

उपनगरातील ५ महाविद्यालयांमध्ये हे कार्यक्रम डिसेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांमध्ये आयोजित केले जावेत, याबाबत चर्चा झाली. त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असावे, यासंबंधी अहवाल पुढच्या बैठकीत सादर करावा असेही ठरले.

**कार्यवाह**

प्रा. सुनील कोरडे

दि.१५ मे, २०१४

**अध्यक्ष**

प्रा. डॉ. मधुरा बेलवणकर

## व्याकरण विभागातील घटकांनुसार

# सरावासाठी प्रश्नसंच

(२०१४, १५ व १६ च्या स्पर्धा परीक्षा प्रश्नपत्रिकांसहित)

## आदर्श उत्तरांसह

# वर्णविचार १ व २

**प्रश्न १. स्वरांच्या प्रकारानुसार योग्य उत्तरे लिहा.**

**१. संयुक्त स्वर - ऐ** ①②③④

१) अ + इ २) अ + ऊ

३) आ + ई ४) आ + उ

**२. ऱ्हस्व स्वर** ①②③④

१) अ २) ऐ ३) ऊ ४) आम्

**३. सजातीय स्वर** ①②③④

१) इ + ई २) उ + अ

३) ऐ + आ ४) इ + ऊ

**४. विजातीय स्वर** ①②③④

१) अ + ऋ २) इ + ई

३) उ + ऊ ४) अ + आ

**५. अर्धस्वर** ①②③④

१) ऋ + आ = श् + अ २) इ + अ = य् + अ

३) ग + घ ४) ब + भा

**प्रश्न २. खालील अक्षरांची ओळख सांगा.**

**१. 'ह'** ①②③④

१) महाप्राण २) स्वरादी

३) अनुनासिक ४) मृदू व्यंजन

**२. 'श्, ष्'** ①②③④

१) अल्पप्राण २) घर्षक

३) मृदू व्यंजन ४) महाप्राण

**३. 'क्ष, ज्ञ'** ①②③④

१) अर्धस्वर २) महाप्राण

३) जोडाक्षरे ४) स्वर

**४. क्, ख् ........ भ्, म्** ①②③④

१) उष्मे २) अर्धस्वर

३) स्पर्श व्यंजने ४) अल्पप्राण

**५. ञ, ण, न, म्** ①②③④

१) घर्षक २) महाप्राण

३) व्यंजन ४) अनुनासिक

**प्रश्न ३. खालील पर्यायांतून योग्य पर्याय निवडून वर्तुळ रंगवा.** ①②③④

| 'अ' (व्यंजने) | | 'ब' (वर्णाचे नाव) | |
|---|---|---|---|
| अ) | प्, फ्, ब्, भ्, म् | १) | मूर्धन्य |
| ब) | च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् | २) | कंठ्य |
| क) | त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् | ३) | ओष्ठ्य |
| ड) | क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् | ४) | दंत्य |

१) अ(२) २) ब(३)

३) क(४) ४) ड(३)

**प्रश्न ४. खालील व्यंजनांच्या प्रकारानुसार अक्षरे ओळखा.**

**१. अनुनासिक** ①②③④

१) क, स २) ङ्, ण्, न्, म् ३) क्ष, ज्ञ ४) ळ

**२. कठोर व मृदू व्यंजन** ①②③④

१) क्, ख्, ग्, घ् २) ण ३) ह ४) ष, स

**३. अर्धस्वर** ①②③④

१) ट, ठ, ड २) य्, र्, ल्, व्

३) म ४) इ, उ, ऋ, ऌ

**४. उष्मे** ①②③④

१) श्, ष्, स् २) म, त, न ३) ण, ङ्, ४) क, म

**५. अल्पप्राण व्यंजने** ①②③④

१) श २) ख ३) व् ४) ह्

**६. जोडाक्षरे** ①②③④

१) ख व छ २) क्ष् व ज्ञ् ३) अ.....अः ४) ळ

**७. स्पर्श व्यंजने** ①②③④

१) क, ख.....भ, म २) स, र......ज्ञ

३) ळ ४) क्ष

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. ठरावीक क्रमाने येणाऱ्या अक्षरांच्या समूहाला अर्थ प्राप्त झाल्यास काय म्हणतात?** ①②③④

१) वर्ण २) व्यंजने ३) शब्द ४) बाराखडी

**२. तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण काय म्हणतो?** ①②③④

१) अनुनासिक २) वर्ण ३) शब्द ४) व्यंजन

**३. आपल्या ध्वनीच्या किंवा आवाजाच्या खुणांना काय म्हणतात?** ①②③④

१) मूळाक्षरे २) स्वर ३) वर्ण ४) अक्षरे

**४. कोशातील शब्दांचा शोध घेण्यासाठी कशाचा उपयोग होतो?** ①②③④

१) शब्द २) वर्णमाला ३) प्रकरण ४) निबंध

**५. मराठी वर्णमालेत एकूण किती वर्ण आहेत?** ①②③④

१) ८४ २) १२ ३) ४८ ४) ३२

**६. एकाच उच्चारस्थानातून निघणाऱ्या स्वरांना काय म्हणतात?** ①②③④

१) विजातीय २) अभेद्य ३) सजातीय ४) दीर्घ

**७. मराठी वर्णमालेत एकूण किती स्वरादी आहेत?** ①②③④

१) १२ २) २ ३) ३४ ४) १

प्रश्न ६. क्ष व ज्ञ यांचा समावेश वर्णमालेच्या तक्त्यात काय म्हणून केला जातो? ①②③④

१) मूलध्वनी २) संयुक्त व्यंजन

३) महाप्राण ४) स्वर

प्रश्न ७. खालीलपैकी कोणता वर्ण मूर्धन्य आहे? ①②③④

१) प २) त ३) च ४) ष्

प्रश्न ८. फ् हे कोणत्या प्रकारचे व्यंजन आहे? ①②③④

१) कंठ्य २) तालव्य ३) दंत्य ४) ओष्ठ्य

प्रश्न ९. च्, छ्, ज्, झ् या वर्णांना 'अ' लावून जो उच्चार होतो त्याला ......... म्हणतात. ①②③④

१) कंठ्य २) तालव्य ३) दंततालव्य ४) मूर्धन्य

प्रश्न १०. शब्दकोशातील शब्दांचा क्रम ......... यानुसार ठरलेला असतो. ①②③④

१) वर्णाचे आद्याक्षर २) स्वर

३) शब्द ४) अक्षर

प्रश्न ११. खालीलपैकी मृदू व्यंजन कोणते? ①②③④

१) क् २) छ् ३) ग् ४) म्

प्रश्न १२. जावई या शब्दातील 'ज' हा वर्ण कोणत्या प्रकारचा आहे. ①②③④

१) दंत्य २) ओष्ठ्य ३) दंततालव्य ४) तालव्य

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न १३. पुढे दिलेल्या वर्णातील महाप्राण वर्ण ओळखा क, र, थ, म ①②③④

१) क २) थ ३) र ४) म

प्रश्न १४. खालील स्वर कोणत्या प्रकारचा आहे? 'ए' ①②③④

१) ऱ्हस्व स्वर २) दीर्घ स्वर

३) संयुक्त स्वर ४) स्वरादी

प्रश्न १५. 'ळ' हा ध्वनी खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे? ①②③④

१) मूर्धन्य २) ओष्ठ्य

३) कंपनयुक्त ४) दंततालव्य

प्रश्न १६. खालील पर्यायातून अनुनासिकांचा अचूक गट ओळखा. ①②③④

१) ङ्, ण, न, म, ज्ञ २) ङ्, ञ, ण, म, क्ष

३) ङ्, ञ, ण, न, म ४) ङ्, ञ, म, सं, ज्ञ

प्रश्न १७. 'क्ष' व 'ज्ञ' या वर्णांना वर्णमालेत स्थान देणारे कोण? ①②③④

१) दादोबा २) दामले ३) सबनीस ४) चिपळूणकर

प्रश्न १८. खालीलपैकी महाप्राण व्यंजने ओळखा. ①②③④

१) ख, फ, ध २) क, ट, प

३) च, र, व ४) ज, च, न

प्रश्न १९. 'ञ' हे अनुनासिक कोणत्या उच्चारण प्रकारातील आहे? ①②③④

१) दंत्य २) मूर्धन्य ३) तालव्य ४) कंठ्य

प्रश्न २०. 'ळ' वर्ण कोणत्या प्रकारचा आहे? ①②③④

१) उष्मे २) स्पर्श ३) महाप्राण ४) स्वतंत्र

❖ ❖ ❖

## जोडाक्षरांचे लेखन

प्रश्न १. खालील जोड्यांमध्ये एक जोडी विसंगत आहे, ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | स्वर | १) | अपूर्ण उच्चार वर्ण |
| ब) | संयुक्त व्यंजन | २) | दोन व्यंजने एकत्र |
| क) | संयुक्त स्वर | ३) | दोन विजातीय स्वर एकत्र |
| ड) | द्वित्त | ४) | क्क |

१) अ(१) २) ब(२) ३) क(३) ४) ड(४)

प्रश्न २. ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने प्रथम एकत्र येऊन शेवटी त्यात एक स्वर मिसळतो त्यास ........ म्हणतात. ①②③④

१) संयुक्त व्यंजन २) जोडाक्षर ३) द्वित्त ४) वर्ण

प्रश्न ३. खालील पर्यायातून आडवी जोडणी पद्धतीने लिहिलेले जोडाक्षर शोधा. ①②③④

१) बक्कल २) बक्षत ३) पक्व ४) अक्कल

प्रश्न ४. खालील जोडाक्षरांमधून उभी जोडणी पद्धतीने लिहिलेले जोडाक्षर शोधा. ①②③④

१) क्वचित २) पक्व ३) गल्ली ४) पक्क

प्रश्न ५. विसंगत घटक ओळखा. ①②③④

१) क्क २) क्व ३) क्ष ४) ल्ल

प्रश्न ६. ........ लेखन पद्धतीनुसार जोडाक्षरांचे प्रकार दिसून येतात. ①②③④

१) व्यंजनांच्या २) शुद्ध शब्दांच्या

३) अशुद्ध शब्दांच्या ४) संधीविग्रहांच्या

प्रश्न ७. मध्ये उभा दंड असणारे व्यंजन शोधा. ①②③④
१) वाघ्या २) ज्येष्ठ ३) चाफ्याचे ४) प्रयत्न

प्रश्न ८. शेवटी उभा दंड असणारे व्यंजन शोधा. ①②③④
१) माझ्या २) क्लेश ३) चाफ्याचे ४) फ्लॉवर

प्रश्न ९. शेवटी स्वतंत्र उभा दंड नसणारे व्यंजन शोधा. ①②③④
१) ऋण २) गणेश ३) मृण्मयी ४) क्लेश

प्रश्न १०. अर्धा दंड असणारे पण अर्धे होऊ न शकणारे व्यंजन कोणते? ①②③④
१) कोट्यवधी २) अल्प ३) स्वच्छ ४) भैय्या

प्रश्न ११. दंड नसलेले व्यंजन शोधा. ①②③④
१) अस्त २) अर्पण ३) अल्प ४) शय्या

प्रश्न १२. 'र' व्यंजनानंतर दुसरे एखादे व्यंजन येते, तेव्हा 'र' या व्यंजनाचा उच्चार अपूर्ण असतो. तो पुढील व्यंजनावर ....... देऊन त्याचे लेखन केले जाते. ①②③④
१) (र्) रफार २) वेलांटी ३) अर्धाक्षर ४) अनुस्वार

प्रश्न १३. वेगळा शब्द ओळखा.

१. १) अर्क २) स्पर्श
३) कैऱ्या ४) कार्ड ①②③④

२. १) फ्रान्स २) फ्रेंच
३) स्वर्ग ४) तक्रार ①②③④

३. १) ख्रिस्त २) वज्र
३) ध्रुव ४) गुन्हाळ ①②③④

४. १) ट्रक २) क्रोध
३) राष्ट्र ४) ड्रम ①②③④

५. १) अग्रज २) ग्रंथ
३) द्रुत ४) अर्ज ①②③④

प्रश्न १४. रिकाम्या जागा भरा.

१. ग् + ऋ = .... ①②③④
१) गृ २) नृ ३) तृ ४) सृ

२. प् + .... = पृ ①②③④
१) ऋ २) ऌ ३) श्र ४) क्ष

प्रश्न १५. 'ऌ' या स्वराने युक्त असा एकच शब्द मराठीत आहे, तो ........ होय. ①②③④
१) क्ऌप्ती २) तृप्ती ३) युक्ती ४) शक्ती

प्रश्न १६. 'अ' ची उच्चारपद्धती लक्षात घेऊन खालील गटातील वेगळा शब्द ओळखा. ①②③④

१. १) कपाट २) जवळ
३) पान ४) द्रोह ①②③④

२. १) नकटा २) पोचले
३) द्रुम ४) बोलणी ①②③④

३. १) करवत २) चालवत
३) सरकार ४) द्वितीय ①②③④

४. १) मेघ २) म्हैस
३) कौल ४) कुहू ①②③④

५. १) मुळा २) खेडी
३) पैसा ४) विष ①②③④

६. १) मन २) नृप
३) गृह ४) निर्झर ①②③④

प्रश्न १७. अनुस्वाराची उच्चारपद्धती लक्षात घेऊन गटातील वेगळा शब्द ओळखा.

१. १) घंटा २) तंटा
३) आंबा ४) संयम ①②③④

२. १) शंकर २) चंचल
३) संलग्न ४) शिंपला ①②③④

३. १) संयम २) संरक्षण
३) संवाद ४) संशय ①②③④

प्रश्न १८. ऱ्हस्व स्वराऐवजी दीर्घ स्वराचा उच्चार केल्यास ......... फरक पडण्याचा संभव असतो. ①②③④
१) वाक्प्रचारात २) ऐकण्यात
३) शब्दांच्या अर्थात ४) बोलण्यात

प्रश्न १९. जोडाक्षरापूर्वी ऱ्हस्व स्वरावर आघात आल्यास तो स्वर ........ उच्चारला जातो. ①②③④
१) दीर्घ २) अनुनासिक
३) ऱ्हस्व ४) तांबट

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न २०. खालील जोडशब्दातील पर्यायी उत्तरांतील कोणत्या पोटशब्दाचे उत्तर बरोबर आहे? 'वाक्पती' ①②③④
१) वाज् + पती २) वाङ् + पती
३) वाक् + पती ४) वाग् + पती

प्रश्न २१. खालील शब्दातील योग्य वर्णरचना कोणती? 'वृद्ध्यादेश' ①②③④
१) व् + ऋ + द् + ध + ई + आ + द् + ए + श् + अ
२) व् + ऋ + द् + ध् + य् + आ + द् + ए + श् + अ
३) व् + ऋ + द् + ध + ई + अ + द + ए + श + अ
४) व् + ऋ + द + ध + इ + अ + द + ए + श् + अ

प्रश्न २२. मनःपटल हा जोडशब्द खालीलपैकी कोणत्या जोडशब्दातून बनला आहे? ①②③④
१) मन + पटल २) मनहा + पटल
३) मनस् + पटल ४) मनो + पटल

❖ ❖ ❖

# संधी - स्वरसंधी

## स्वरसंधी

**प्रश्न १. संधी सोडवा**

**१. पुरुषोत्तम** ①②③④
१) पुरुषा + त्तम  २) पुरुष + उत्तम
३) पुरुषात् + उत्तम  ४) पुरुषो + त्तम

**२. सहाध्यायी** ①②③④
१) सह + अध्यायी  २) सहा + अध्यायी
३) सह + ध्यायी  ४) सहा + ध्यायी

**३. सहोदर** ①②③④
१) सह + उदर  २) सह + ऊदर
३) सहो + उदर  ४) सहो + दर

**४. वृक्षौदार्य** ①②③④
१) वृक्ष + औदार्य  २) वृक्षात् + औदार्य
३) वृक्षाद + और्य  ३) वृक्षौ + दार्य

**५. महर्षी** ①②③④
१) महा + ऋषी  २) महान + ऋषी
३) महातपस्वी + ऋषी ४) मह + र्षी

**प्रश्न २ संधी करा**

**१. महा + उत्सव** ①②③④
१) महोत्सव २) महात्सव ३) महौत्सव ४) महीत्सव

**२. प्रति + अक्ष** ①②③④
१) प्रत्यैक्ष  २) प्रत्यक्ष  ३) प्रत्याक्ष  ४) प्रत्यक्षा

**३. स्वभाव + अनुसार** ①②③④
१) स्वभाविनुसार  २) स्वभानुसार
३) स्वभावानुसार  ४) स्वाभावानुसार

**४. विद्या + अमृत** ①②③④
१) विद्यैमृत  २) विद्यातमृत
३) विद्यामृत  ४) विद्येमृत

**५. प्रश्न + उत्तर** ①②③④
१) प्रश्नात्तर  २) प्रश्नौत्तर  ३) प्राश्नातार  ४) प्रश्नोत्तर

**प्रश्न ३. 'निष्फळ' या शब्दाचा अचूक विग्रह कोणता?** ①②③④
१) नि + फळ  २) नी + फळ
३) नि: + फळ  ४) निश + फळ

**प्रश्न ४. 'चित् + आनंद' या विग्रह केलेल्या शब्दाचा एकच सामासिक शब्द कोणता?** ①②③④
१) चिद्नानंद  २) चितानंद
३) चिदानंद  ४) चिन्मयानंद

**प्रश्न ५. 'सदाचार' या शब्दाचा संधी प्रकार कोणता?** ①②③④
१) स्वरसंधी  २) व्यंजनसंधी
३) विसर्गसंधी  ४) यापैकी नाही

**प्रश्न ६. खालीलपैकी 'व्यंजनसंधी' चा सामासिक शब्द कोणता?** ①②③④
१) तेजोनिधी  २) दिगंबर  ३) उमेश  ४) देवालय

**प्रश्न ७. योग्य विग्रह केलेला पर्याय निवडा 'सदाचार'** ①②③④
१) सत् + आचार  २) सदा + आचार
३) सद् + आचार  ४) सदा + चार

**प्रश्न ८. अन्य + उक्ती - ......** ①②③④
१) अन्योक्ती  २) अन्यक्ती
३) अन्यूक्ती  ४) अन्यउक्ती

**प्रश्न ९. 'देवर्षी' या सामासिक शब्दाचा संधी प्रकार कोणता?** ①②③④
१) विसर्गसंधी  २) व्यंजनसंधी
३) स्वरसंधी  ४) यापैकी नाही

**प्रश्न १०. स्वर संधीचा शब्द ओळखा.** ①②③④
१) मतैक्य  २) उच्छेद
३) षट्शास्त्र  ४) दुष्परिणाम

**प्रश्न ११. 'विद्यार्थी' या शब्दाचा संधी प्रकार कोणता?** ①②③④
१) स्वरसंधी  २) व्यंजनसंधी
३) विसर्गसंधी  ४) यापैकी नाही

**प्रश्न १२. सन्मती या सामासिक शब्दाचा संधी प्रकार कोणता?** ①②③④
१) विसर्गसंधी  २) व्यंजनसंधी
३) स्वरसंधी  ४) यापैकी नाही

**प्रश्न १३. खालीलपैकी स्वरसंधीचा सामासिक शब्द कोणता?** ①②③④
१) मुनीच्छा  २) षड्रिपू  ३) उच्छेद  ४) सच्चरित्र

**प्रश्न १४. 'गिरीश' या शब्दाचा अचूक विग्रह कोणता?** ①②③④
१) गिरी + इश  २) गीरी + ईश
३) गिरि + ईश  ४) गिर + इश

प्रश्न १५. वय + कर - ........ ①②③④

१) वय:कर २) वयस्कर ३) वयाष्कर ४) वयष्कार

प्रश्न १६. लंका + ईश्वर - ....... ①②③④

१) लंकोश्वर २) लंकेश्वर ३) लंकाश्वर ४) लकेश्वर

प्रश्न १७. यशः + धन - ......... ①②③④

१) यशोधन २) यशोधीन ३) यशोधान ४) यशाधन

प्रश्न १८. वाचन + आलय - ........ ①②③④

१) वाचनलय २) वाचनालय

३) वाचनलाय ४) वाचनआलय

प्रश्न १९. एक + एक - ........ ①②③④

१) एकक २) एकैक ३) इकैक ४) एकके

प्रश्न २०. हृत + पटल - ........ ①②③④

१) हृदयपटल २) हृत्पटल ३) हृदपटल ४) हृद्यपटल

प्रश्न २१. मत + ऐक्य - ........ ①②③④

१) मतैक्य २) मतेक ३) मतेक्य ४) मत्यैक्य

प्रश्न २२. उत् + ज्ज्वल - ........ ①②③④

१) ऊज्वल २) उज्ज्वल ३) उज्जल ४) उतज्वल

प्रश्न २३. अनु + अर्थ - ........ ①②③④

१) अनर्थ २) अनुर्थ ३) अन्वर्थ ४) अ:नर्थ

प्रश्न २४ नौ + इक - ........ ①②③④

१) नौविक २) नाविक ३) नौईक ४) ना:विक

प्रश्न २५. दिक् + मूढ - ........ ①②③④

१) दिकमूढ २) दिंगमूढ ३) दिग्मूढ ४) दिवमूढ

प्रश्न २६. धन + आदेश - ........ ①②③④

१) धनआदेश २) धनादेश

३) धनोदेश ४) धन:देश

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न २७. दिलेल्या पर्यायातील स्वरसंधी असणारा पर्याय निवडा. ①②③④

१) वाक्पती २) सदाचार ३) सन्मती ४) गुरुपदेश

प्रश्न २८. पुढील शब्दाची संधी फोड करा. ①②③④

'निरिच्छ'

१) नि: + च्छ २) निर: + इच्छ

३) नि: + इच्छ ४) निरी + च्छ

प्रश्न २९. 'अंत:करण' या शब्दाच्या संधीचा खालील योग्य पर्याय निवडा. ①②③④

१) अंत: + करण २) अंतस्+ करण

३) अत:स् + करण ४) अंतर् + करण

प्रश्न ३०. खालील जोडशब्दातील योग्य पोटशब्द कोणते?

'वाग्विहार' ①②③④

१) वाग् + विहार २) वाङ् + विहार

३) वाक् + विहार ४) वाच् + विहार

❖ ❖ ❖

## संधी - व्यंजनसंधी, विसर्गसंधी

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. वर्णांच्या एकत्र होण्याच्या प्रकारास काय म्हणतात? ①②③④

१) विसंधी २) समानता ३) संधी ४) विसंवाद

२. एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असेल तेव्हा त्यास काय म्हणतात? ①②③④

१) स्वरात्संधी २) विसर्गसंधी

३) स्वरसंधी ४) संधी

३. य्, व्, र् या अक्षरांबद्दल अनुक्रमे इ, उ, ऋ आल्यास काय होईल? ①②③④

१) यणादेश २) संप्रसारण ३) प्रचीती ४) आदेश

४. 'म' अक्षरापुढे 'म' आल्यास तो स्वरात मिसळतो पण 'म' बद्दल व्यंजन आल्यावर मागील अक्षरावर काय येतो? ①②③④

१) पूर्णविराम २) शीर्षबिंदू

३) प्रश्नचिन्ह ४) अपसरण चिन्ह

५. वाक्यात येणाऱ्या शब्दाशब्दात संधी करण्याकडे कोणत्या भाषेची प्रवृत्ती अधिक आहे? ①②③④

१) प्राकृत २) पैशाची ३) अर्धमागधी ४) संस्कृत

प्रश्न २. संधी सोडवा

१. चतु:सूत्री ①②③④

१) चतु: + सूत्री २) चतुर् + सूत्री

३) चतुरा + सूत्री ४) चतूर + सूत्री

२. नीरस ①②③④

१) नि: + रस २) नि + र + स

३) नि + रास ४) निस + रस

३. बहिरंग ①②③④

१) बहिर् + अंग २) बहि: + अंग

३) बहि: + आंग ४) बहिर् + आंग

४. सूर्योदय ①②③④

१) सूर्य + उदय २) सूर्य + उद्य

३) सूर्यो + दय ४) सूर्य + उत्दय

५. मनुष्येतर ①②③④

१) मनुष्य + ईतर २) मनूष्य + इतर

३) मनुष्य + इतर ४) मनुष्यात् + इतर

प्रश्न ३. खालीलपैकी ज्या नियमांनी संधी पूर्ण झाली तो नियम ओळखा.

१. ईश्वरेच्छा ①②③④

१) ईश्वर + ईच्छा २) इश्वर + इच्छा

३) ईश्वर + इच्छा ४) ईश्वरात् + इच्छा

२. आयुर्वेद ①②③④

१) आयु: + वेद २) आयुर् + वेद

३) आयूर् + वद ४) आयू: + वद

३. धारोष्ण ①②③④

१) धारात् + ऊष्ण २) धारात् + आष्ण

३) धारा + उष्ण ४) धारो + उष्ण

४. अयोध्येश ①②③④

१) अयोध्यात् + इश २) अयोध्या + ईश

४) अयोध्या: + इश ४) अयो:ध्या + इश

५. पुनर्जन्म ①②③④

१) पुन: + जन्म २) पुनर् + जन्म

३) पुन: + आजन्म ४) पुन्हा + जन्म

६. मनोरंजन ①②③④

१) मन: + रंजन २) मनात् + रंजन

३) मनी + रंजन ४) मन् + ओ + रंजन

७. शब्दच्छल ①②③④

१) शब्द: + छल २) शब्द + छल

३) शब्दात् + छल ४) शब्दा + छल

८. जगन्नाथ ①②③④

१) जगात + नाथ २) जगत् + अनाथ

३) जग + नाथ ४) जगत् + नाथ

९. भाषांतर ①②③④

१) भाषा + तंर २) भाषा + अंतर

३) भाष + अंतर ४) भाष: + अंतर

प्रश्न ४. खालीलपैकी पररूप संधी उदाहरण ओळखा. ①②③④

१) एकेक २) नाहीसा ३) काहीसा ४) झाडीत

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ५. 'पुनरावृत्ती' हा संधी कसा सोडवला जाईल? ①②③④

१) पुन: + आवृत्ती २) पुनर् + आवृत्ती

३) पुन: + वृत्ती ३) पुनर् + वृत्ती

प्रश्न ६. खाली दिलेल्या पर्यायी उत्तरांतील 'पररूप संधी' असलेले योग्य पर्यायी उत्तर कोणते? ①②③④

१) करून २) जाऊन ३) घेईल ४) होऊ

❖ ❖ ❖

## शब्दविचार

प्रश्न १. रिकाम्या जागा भरा

१. तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण ........ असे म्हणतो. ①②③④

१) अक्षरे २) चिन्हे ३) वर्ण ४) वाक्य

२. ध्वनींच्या चिन्हांना ........ म्हणतात. ①②③④

१) अक्षरे २) चिन्हे ३) वर्ण ४) वाक्य

३. एखाद्या शब्दाला किंवा शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाला, तर त्याला आपण ........ असे म्हणतो. ①②③④

१) अक्षरे २) चिन्हे ३) वर्ण ४) वाक्य

४. वाक्य हे ........ चे बनलेले असते. ①②③④

१) क्रियापदांचे २) शब्दांचे किंवा पदांचे

३) नामाचे ४) विशेषणांचे

५. शब्दांच्या जाती म्हणजे शब्दांचे ........ ①②③④

१) खेळ २) प्रकार ३) अर्थ ४) वैशिष्ट्य

प्रश्न २. खालील वाक्यांत दिलेला शब्द कोणते कार्य करतो ते सांगा.

१. दशरथाने कैकयीला दोन <u>वर</u> दिले. ①②③④

१) नाम २) क्रियापद ३) शब्दयोगी ४) विशेषण

२. तू त्या राजपुत्राला <u>वर</u> . ①②③④

१) नाम २) क्रियापद ३) शब्दयोगी ४) विशेषण

३. पक्षी झाडा<u>वर</u> बसतो. ①②③④

१) नाम २) क्रियापद ३) शब्दयोगी ४) विशेषण

४. <u>वर</u>पिता मुलाच्या लग्नात तोऱ्यात वावरत होता. ①②③④

१) नाम २) क्रियापद ३) शब्दयोगी ४) विशेषण

प्रश्न ३. शब्दांच्या आठ जातींपैकी 'विकारी' नसलेली जात ओळखा. ①②③④

१) नाम २) क्रियाविशेषण

३) विशेषण ४) सर्वनाम

प्रश्न ४. शब्दांच्या आठ जातींपैकी 'अविकारी' नसलेली जात ओळखा. ①②③④

१) क्रियाविशेषण २) विशेषण

३) शब्दयोगी ४) उभयान्वयी

प्रश्न ५. वाक्य पूर्ण करा.

१. शब्दाच्या अविकारी जातीत लिंग, वचन किंवा विभक्ती यामुळे ........ ①②③④

१) बदल होतो २) बदल होत नाही

३) सतत बदल होतो ४) यापैकी काहीही नाही

२. विकारी व अविकारी यांना अनुक्रमे ........ म्हणतात. ①②③④

१) सव्यय व अव्यय

२) नाम व सर्वनाम

३) विशेषण व क्रियाविशेषण

४) शब्दयोगी व उभयान्वयी

३. वाक्यात येणाऱ्या शब्दांपैकी जे शब्द प्रत्यक्षात असलेल्या किंवा काल्पनिक वस्तूंची किंवा त्यांच्या गुणांची नावे असतात त्यांना .......... म्हणतात. ①②③④

१) नामे २) सर्वनामे ३) विशेषणे ४) क्रियापदे

४. जे शब्द कोणत्याही प्रकारच्या नामांच्या ऐवजी येतात, त्यांना ......... म्हणतात. ①②③④

१) विशेषणे २) सर्वनामे

३) क्रियाविशेषणे ४) क्रियापद

५. जे शब्द नामाबद्दल अधिक माहिती सांगतात व त्यांचे क्षेत्र मर्यादित करतात त्यांना .......... म्हणतात. ①②③④

१) क्रियाविशेषणे २) केवलप्रयोगी

३) विशेषणे ४) शब्दयोगी

६. जे शब्द क्रिया दाखवून वाक्याचा अर्थ पूर्ण करतात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) क्रियाविशेषणे २) क्रियापदे

३) विशेषणे ४) उभयान्वयी

७. जे शब्द क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगतात त्यांना .......... म्हणतात. ①②③④

१) क्रियाविशेषणे २) विशेषणे

३) सर्वनामे ४) शब्दयोगी

८. जे शब्द नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात व वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवितात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) क्रियाविशेषणे २) विशेषणे

३) सर्वनामे ४) शब्दयोगी

९. जे शब्द दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडतात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) शब्दयोगी २) उभयान्वयी

३) केवलप्रयोगी ४) नामे

१०. जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) शब्दयोगी २) उभयान्वयी

३) केवलप्रयोगी ४) सर्वनामे

प्रश्न ६. खालील शब्दातील क्रियाविशेषणे ओळखा.

१. १) आता २) कडू
३) मागे ४) आणि ①②③④

२. १) गोड २) उदईक
३) करिता ४) व ①②③④

३. १) दहा २) परंतु
३) इथे ४) साठी ①②③④

४. १) पुढे २) त्याचा
३) ओहो ४) इकडे ①②③④

प्रश्न ७. खालील शब्दातील शब्दयोगी अव्यय ओळखा.

१. १) मागे २) आता
३) आज ४) जे ①②③④

२. १) मग २) करिता
३) जो ४) तिथे ①②③④

३. १) पुढे २) फार
३) त्यांना ४) दहा ①②③④

४. १) काल २) परंतु
३) अरेरे ४) साठी ①②③④

प्रश्न ८. खालील शब्दातील उभयान्वयी अव्यय ओळखा.

१. १) राम व सीता २) त्यासाठी
३) तिथे ४) जाईल ①②③④

२. १) तिच्याकरिता २) झाडाखाली
३) परंतु ४) त्यासाठी ①②③④
३. १) तू आणि मी २) आज
३) अरेरे ४) पुढे ①②③④
४. १) त्याकरिता २) फार
३) काल ४) अथवा ①②③④

**प्रश्न ९. खालील शब्दातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा.**

१. १) अरेरे २) वर
३) म्हणून ४) कशाला ①②③④
२. १) झाडाखाली २) शाब्बास
३) गोडी ४) आहे ①②③④
३. १) अबब २) आणि
३) कारण ४) जाईल ①②③④
४. १) बसतो २) किंवा
३) त्याने ४) ओहो ①②③④

**प्रश्न १०. मी कोण ओळखा.**

१. **मी क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगतो** ①②③④
१) विशेषण २) क्रियाविशेषण
३) केवलप्रयोगी ४) शब्दयोगी
२. **मी नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतो आणि वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवितो.** ①②③④
१) विशेषण २) केवलप्रयोगी
३) शब्दयोगी ४) उभयान्वयी
३. **मी दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडतो.** ①②③④
१) विशेषण २) केवलप्रयोगी
३) शब्दयोगी ४) उभयान्वयी

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

**प्रश्न ११. खालील शब्दातील वर्णरचना कशी आहे? पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तर शोधा.** ①②③④

'कृष्णार्पण'

१) क + ऋ + ष् + ण् + आ + अ + र् + प् + अ + ण् + अ
२) क्+ ऋ + ष् + ण् + अ + अ + र् + प् + अ + ण् + अ
३) क् + ऋ + श् + न् + अ + र् + प् + अ + ण् + अ
४) क् + ऋ + ष् + ण् + अ + र् + प् + अ + ण्+ अ

❖ ❖ ❖

# नामे

**प्रश्न १. पुस्तक, चेंडू, कागद, मुलगा या सर्वांना व्याकरणात काय म्हणतात.** ①②③④
१) विशेषनाम २) नामे ३) सर्वनाम ४) भाववाचक

**प्रश्न २. नामांचे मुख्य प्रकार किती आहेत?** ①②③④
१) तीन २) चार ३) पाच ४) दोन

**प्रश्न ३. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद या शब्दांच्या प्रकारांना काय म्हणतात?** ①②③④
१) अविकारी शब्द २) प्रत्ययकारी शब्द
३) विकारी शब्द ४) क्रियाविशेषण शब्द

**प्रश्न ४. एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला सर्वसामान्य नाव दिले जाते, ते नाम कोणते?** ①②③④
१) भाववाचक नाम २) विशेषनाम
३) सामान्यनाम ४) स्थलवाचक नाम

**प्रश्न ५. ज्या नामाने जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो. त्यास ............ असे म्हणतात.** ①②③④
१) विशेषनाम २) सामान्यनाम
३) भाववाचक नाम ४) सर्वनाम

**प्रश्न ६. धैर्य, कीर्ती, चांगुलपणा, वात्सल्य, गुलामगिरी, आनंद या नामांचा समावेश पुढीलपैकी कोणत्या नामांच्या प्रकारात होतो?** ①②③④
१) सामान्यनाम २) विशेषनाम
३) भाववाचक नाम ४) सर्वनाम

**प्रश्न ७. विशेषनामे व भाववाचक नामे नेहमी कोणत्या वचनात वापरली जातात?** ①②③④
१) एकवचनी २) अनेकवचनी
३) बहुवचनी ४) यापैकी नाही

**प्रश्न ८. सामान्यनामे व विशेषनामे यांना कोणते प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार होतात?** ①②③④
१) कर-करून २) गिरी, ता
३) कडे-पासून ४) केव्हा-कोठे

**प्रश्न ९. पुढील चार विधानांपैकी एका विधानातील मूळची विशेषणे सामान्यनामासारखी वापरली आहेत ते विधान ओळखा.** ①②③④
१) मुलांनी वर्गात दंगा करू नये
२) सध्या उन्हाळा जाणवत आहे

३) आमच्या क्रिकेटपटूंची वाहवा झाली
४) सुंदर जग नकाशातच दिसते

प्रश्न १०. पुढील चार शब्दांपैकी तीन विशेषणे आहेत व एक विशेषनाम आहे. तर विशेषनाम ओळखा. ①②③④
१) दुर्वास २) पांढरा ३) आळशी ४) नकटी

प्रश्न ११. विशेषनामाचे ............ होत नाही. ①②③④
१) एकवचन २) अनेकवचन
३) बहुवचन ४) सामान्यनाम

प्रश्न १२. आमचे वडील म्हणजे जमदग्नी आहेत. या वाक्यातील अधोरेखित शब्द येथे नामाच्या कोणत्या प्रकारात येतो? ①②③④
१) भाववाचक नाम २) सामान्यनाम
३) विशेषण ४) क्रियाविशेषण

प्रश्न १३. 'गाणे सर्वांना आवडते' या वाक्यातील गाणे हा शब्द वाक्यात कोणते कार्य करतो? ①②③④
१) नामाचे २) सर्वनामाचे
३) क्रियापदाचे ४) धातुसाधित नामाचे

प्रश्न १४. भाववाचक नामे ही कधी कधी ............ कार्य करतात. ①②③④
१) सर्वनामाचे २) क्रियापदाचे
३) विशेषनामाचे ४) धातुसाधिताचे

प्रश्न १५. श्रीमंती, शांतता, सौंदर्य, शहर या चार शब्दांपैकी सामान्यनाम असलेला शब्द ओळखा. ①②③④
१) शांतता २) श्रीमंती ३) शहर ४) सौंदर्य

प्रश्न १६. सामान्यनाम हे ............ असते. ①②③④
१) जातिवाचक २) समूहवाचक
३) समुदायवाचक ४) यापैकी नाही

प्रश्न १७. सामान्यनामे व विशेषनामे यांना काय म्हणतात? ①②③④
१) काल्पनिक नामे २) भाववाचक नामे
३) धर्मिवाचक नामे ४) समूहवाचक नामे

प्रश्न १८. पुढील चार विधानांपैकी एका विधानात विशेषनाम सामान्यनामासारखे वापरले आहे, ते कोणते? ①②③④
१) त्याच्या बोलण्यात परंतुचा वापर फार होतो.
२) विचारा तुम्हाला काही प्रश्न असेल तर!
३) श्रीमंताना गर्व असतो.
४) या गावात बरेच नारद आहेत.

प्रश्न १९. धातूला णे, ऊ, अ, ण हे प्रत्यय लावून ............ तयार होतात. ①②③④
१) सर्वनाम २) नामे
३) क्रियापद ४) भाववाचक नाम

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न २०. पुढीलपैकी कोणत्या उदाहरणात भाववाचक नामांचा विशेषनामासारखा उपयोग केला आहे? ①②③④
१) मी आत्ताच नगरहून आलो
२) आमची वेबी आता कॉलेजात जाते
३) माधुरी उद्या मुंबईला जाईल
४) शेजारची तारा यंदा बी.ए. झाली

प्रश्न २१. 'एस. डी. बर्मन यांच्या गाण्यांमधील माधुरी अवीट आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे? ①②③④
१) भाववाचक नाम २) विशेषनाम
३) विशेषण ४) क्रियाविशेषण

❖ ❖ ❖

## लिंगविचार

प्रश्न १. 'विधुर' या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द कोणता? ①②③④
१) विदुषी २) विधवा ३) विधुरीण ४) सधवा

प्रश्न २. खालील शब्दातून भिन्नलिंगी शब्द ओळखा? ①②③④
१) सांडणी २) सिंहीण ३) कोकीळ ४) लांडोर

प्रश्न ३. 'विद्वान' चे स्त्रीलिंगी रूप कोणते? ①②③④
१) विद्वत्ता २) विद्वानीण
३) विद्या ४) विदुषी

प्रश्न ४. 'सुत' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप कोणते? ①②③④
१) पुत्र २) सुती ३) तनय ४) सुता

प्रश्न ५. खालीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता? ①②③④
१) नेता २) देवता ३) भ्राता ४) पिता

प्रश्न ६. खालीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता? ①②③④
१) श्रीमती २) श्रीयुक्त
३) श्रीमान ४) राजमान्य राजश्री

प्रश्न ७. 'मीठभाकरी' या शब्दाचे लिंग कोणते? ①②③④

१) पुल्लिंग २) स्त्रीलिंग

३) नपुंसकलिंग ४) अकारान्त पुल्लिंग

प्रश्न ८. संस्कृतमधून मराठीत आलेल्या नामाचे स्त्रीलिंगी रूप असलेला शब्द ओळखा. ①②③④

१) युवती २) तरुणी ३) माळीण ४) गवळण

प्रश्न ९. खाली लिंगाचे प्रकार दिलेले असून त्याखाली चार शब्द दिलेले आहेत, त्यापैकी जो शब्द त्या लिंग प्रकारात आहे तो पर्याय क्रमांक लिहा.

१) पुल्लिंग ①②③④

१) जनक २) विहीण ३) लेखणी ४) पुस्तक

२) स्त्रीलिंग ①②③④

१) वृक्ष २) मूल ३) पणती ४) शरीर

३) नपुंसकलिंग ①②③④

१) वेल २) भोपळा ३) कपाट ४) माता

प्रश्न १०. काही 'आकारान्त' पुल्लिंगी पदार्थवाचक नामांना 'ई' प्रत्यय लागून त्यांची लघुत्वदर्शक स्त्रीलिंगी रूपे बनतात. तो शब्द ओळखा. ①②③④

१) पेटी २) शिक्षिका ३) दांडी ४) देवघर

प्रश्न ११. परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून ठरवितात खाली दिलेल्या शब्दांतून ते शब्द ओळखा व योग्य पर्याय क्रमांक लिहा.

१. १) गोप २) बुक

३) मोर ४) देव ①②③④

२. १) काया २) हंसी

३) क्लास ४) पुत्र ①②③④

३. १) काठी २) कंपनी

३) खुर्ची ४) संधी ①②③④

प्रश्न १२. 'ईण' प्रत्यय लागून तयार झालेले स्त्रीलिंगी प्राणीवाचक शब्द ओळखा. ①②③④

१) वानर २) माळी ३) सुतारीण ४) वेडकी

प्रश्न १३. खालीलपैकी कोणत्या पर्यायाचे स्त्रीलिंगी रूप 'ईण' प्रत्यय लागून तयार होते. ①②③④

१) दास २) तरुण ३) तेली ४) गोपी

प्रश्न १४. 'ई' प्रत्यय लागून तयार झालेले स्त्रीलिंगी पदार्थवाचक शब्द ओळखा. ①②③④

१) लोटी २) आरसा ३) खडा ४) सून

प्रश्न १५. अ व ब गटातील विसंगत जोडी ओळखा ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | शिक्षक | १) | ताई |
| ब) | दादा | २) | नात |
| क) | नातू | ३) | शिक्षिका |
| ड) | राजपुत्र | ४) | कन्या |

१) अ (३) २) ब (१) ३) क (२) ४) ड (४)

प्रश्न १६. गुराखीण या शब्दाचे ......... पुल्लिंगी नाम येईल. ①②③④

१) गुराखी २) गायक

३) शेतकरी ४) सेवक

प्रश्न १७. 'बैल' शब्दाचे लिंग बदला ①②③④

१) वासरू २) गाय ३) खोंड ४) यापैकी नाही

प्रश्न १८. पुल्लिंगी शब्द ओळखा ①②③④

१) महेश २) गिरिजा ३) देऊळ ४) अंबिका

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न १९. पुढीलपैकी लिंग वचनाप्रमाणे विकार होणारा शब्द कोणता? ①②③④

१) सुंदर २) कडू ३) रानटी ४) शहाणा

प्रश्न २०. मराठीतील 'लिंग विचार' पुढीलप्रमाणे करता येईल. ①②③④

अ) प्राणिमात्रांचे लिंग हे वास्तविक असे असते.

ब) लिंग ओळखण्यासाठी नामाच्या रूपाचा विचार केला जातो.

क) मराठीतील लिंग व्यवस्था ही अत्यंत अनियमित आहे.

ड) पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा.

१) (अ), (ब) २) (ब), (क)

३) (अ), (क), ४) (अ), (ब), (क)

❖ ❖ ❖

## वचनविचार

प्रश्न १. मराठीत किती वचने मानतात? ①②③④

१) तीन २) चार ३) दोन ४) एक

प्रश्न २. संस्कृतमध्ये ........ वचने मानतात. ①②③④

१) तीन २) दोन ३) चार ४) एक

प्रश्न ३. चुकीच्या पद्धतीने केलेले अनेकवचन ओळखा. ①②③④

१) तोंडले-तोंडल्या २) गोपी-गोपी

३) रावा-रावे ४) भूत-भुते

प्रश्न ४. खालीलपैकी अनेकवचनी शब्द कोणता? ①②③④

१) नदी २) वेली ३) रोपटे ४) झाड

प्रश्न ५. खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता? ①②③④

१) वाघ २) चित्ता ३) हत्ती ४) सिंह

प्रश्न ६. खालीलपैकी अनेकवचनी शब्द कोणता? ①②③④

१) पाखरू २) अश्रू ३) पिसू ४) सासू

प्रश्न ७. खालीलपैकी कोणता शब्द एकवचनी आहे? ①②③④

१) भाऊ २) कागद ३) दिवस ४) रात्र

प्रश्न ८. निश्चितपणे एकवचनी असलेला शब्द कोणता? ①②③④

१) गवई २) पपई ३) सोई ४) भोई

❖ ❖ ❖

## विभक्तीविचार

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवण्यासाठी नाम/सर्वनामात जो बदल होतो त्यास काय संबोधतात. ①②③④

१) कारकार्थ २) विकरण ३) विभक्ती ४) संप्रदान

२. विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी नाम/सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो त्यास काय म्हणतात? ①②③④

१) सामान्यरूप २) प्रत्यय ३) विभक्ती ४) वाक्य

३. 'प्रत्येक वाक्य म्हणजे एक विधान असते' हे विधान ओळखा. ①②③④

१) खरे २) खोटे

३) अर्धसत्य ४) यापैकी नाही

४. विभक्तीचे एकूण किती प्रकार आहेत? ①②③④

१) सहा २) आठ ३) सात ४) दहा

प्रश्न २. पुढील वाक्यातील नामे किंवा सर्वनामे कोणत्या विभक्तीत आहेत ते लिहा.

१. <u>मुलांनी</u> आज्ञा पाळावी. ①②③④

१) तृतीया एकवचन २) षष्ठी एकवचन

३) द्वितीया बहुवचन ४) तृतीया अनेकवचन

२. <u>बाबांना</u> दुसरीकडे जेवायला जाण्याचा फार कंटाळा असे. ①②③④

१) चतुर्थी अनेकवचन २) सप्तमी अनेकवचन

३) चतुर्थी एकवचन ४) तृतीया एकवचन

३. <u>जपानचे</u> आणि जपान्यांचे बाबांना अपरंपार कौतुक होते. ①②③④

१) षष्ठी एकवचन २) सप्तमी एकवचन

३) तृतीया एकवचन ४) संबोधन

४. शेजारच्या मधूने रस्त्यात <u>कुत्र्याला</u> काठीने मारले. ①②③④

१) प्रथमा अनेकवचन २) तृतीया एकवचन

३) पंचमी एकवचन ४) चतुर्थी एकवचन

५. ही वस्तू मी <u>इंग्लंडहून</u> आणली. ①②③④

१) पंचमी एकवचन २) षष्ठी एकवचन

३) संबोधन ४) चतुर्थी एकवचन

६. शिक्षकांनी <u>मुलांना</u> शाबासकी दिली. ①②③④

१) प्रथमा एकवचन २) द्वितीया अनेकवचन

३) तृतीया अनेकवचन ४) चतुर्थी अनेकवचन

प्रश्न ३. खालील जोड्यांपैकी विसंगत जोडी ओळखा. ①②③④

| 'अ' (विभक्ती) | | 'ब' (प्रत्यय) | |
|---|---|---|---|
| अ) | द्वितीया | १) | चा, ची, चे |
| ब) | षष्ठी | २) | स, ला, ना, ते |
| क) | चतुर्थी | ३) | ऊन, हून |
| ड) | तृतीया | ४) | स, ला, ते |

१) अ(२) २) ब(१) ३) क(४) ४) ड(३)

प्रश्न ४. खालील शब्दांमधून प्रत्ययुक्त शब्द ओळखा.

१. फुलाहून, दार, तो, फूल ①②③④

१) दार २) तो ३) फुलाहून ४) फूल

२. घर, खिडकी, बघ, घरात ①②③④

१) घर २) खिडकी ३) बघ ४) घरात

३. तळ्यामध्ये, तळ्या, त्या, तळे ①②③④

१) तळ्यामध्ये २) त्या ३) तळे ४) यापैकी नाही

४. भामनगर, विटांचा, विटा, माय ①②③④

१) भामनगर २) विटांचा ३) विटा ४) माय

५. त्याने, मी, आपण, आम्ही ①②③④

१) आपण २) आम्ही ३) मी ४) त्याने

प्रश्न ५. खालील विशेषणांचे सामान्यरूप ओळखा.

१. भला ①②③④

१) भाला २) भेल्या ३) भाल ४) भल्या

२. वेडी ①②③④

१) विडी २) वेड्या ३) वाडी ४) वडे

३. खरी ①②③④

१) खार २) खीर ३) खऱ्या ४) खरा

४. हा ①②③④

१) ह्या २) हि ३) ह या ४) या

५. आनंदी ①②③④

१) अनंद २) आनंदात ३) आनंद ४) अनांद

प्रश्न ६. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. नामांची व सर्वनामांची विभक्ती ......... ओळखतात. ①②③④

१) आकारावरून २) शब्दावरून

३) प्रत्ययावरून ४) अक्षरावरून

२. प्रत्येक वाक्य हे एका ............ सारखे आहे. ①②③④

१) रेघे २) कुटुंब ३) मर्मभेदी ४) पेटी

३. वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दांशी असणारा संबंध म्हणजे .......... होय. ①②③④

१) क्रियापद २) कारक

३) पूर्णविराम ४) विभक्ती

४. विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी नाम किंवा सर्वनामाच्या स्वरूपात बदल होतो. त्याला .......... म्हणतात. ①②③④

१) सामान्यरूप २) विभक्तीरूप

३) प्रत्यय ४) यापैकी नाही

५. नाम किंवा सर्वनामाचे रूप तयार करण्यास जी अक्षरे जोडतात त्यांना .......... म्हणतात. ①②③④

१) शब्द २) कृदन्त ३) तद्धित ४) प्रत्यय

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ७. विभक्ती प्रत्यय लागल्याने शब्दाच्या अंत्य अक्षरात विकार होण्याच्या क्रियेला काय म्हणतात? ①②③④

१) सामान्यरूप २) संधी

३) कारकार्थ ४) उपपदार्थ

प्रश्न ८. पर्यायी उत्तरात 'चतुर्थी विभक्तीचे संप्रदान कारकार्थ' असलेले वाक्य कोणते? ①②③④

१) मी नदीच्या काठाने गेलो.

२) तो घरातून बाहेर पडला.

३) तू रामाला पुस्तक दे.

४) तो दिवसाचा चालतो.

❖ ❖ ❖

## सामान्यरूप

प्रश्न १. अधोरेखित शब्दातील नामाचे सामान्यरूप ओळखा.

सिंहाला चार पाय असतात. ①②③④

१) सिंह २) सिंहा ३) सिंहाला ४) सिंहास

प्रश्न २. 'झाडाला सुंदर फूल आले आहे' या वाक्यातील सामान्यरूप ओळखा. ①②③④

१) सुंदर २) झाडाला ३) आले ४) फूल

प्रश्न ३. 'नदी' या शब्दाचे सामान्यरूप खालीलपैकी कोणता प्रत्यय लागून होते? ①②③④

१) या २) आ ३) ए ४) चा

प्रश्न ४. 'तळ्यात कमळे उमलली होती.' या वाक्यातील अधोरेखित शब्दातील सामान्यरूप ओळखा. ①②③④

१) तळे २) तळ्या ३) तळी ४) तळ

प्रश्न ५. सामान्यरूप असलेली शब्दजोडी ओळखा. ①②③④

१) ससा-ससे २) लिंबू-लिंबाचे

३) सरसर-सरासरा ४) साठा-साठ्याचे

प्रश्न ६. विभक्ती प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाच्या मूळ रूपात होणाऱ्या बदलाला काय म्हणतात? ①②③④

१) प्रत्यय २) सामान्यरूप
३) अव्यय ४) शब्दसिद्धी

प्रश्न ७. खालील शब्दांचे सामान्यरूप होताना कोणता प्रत्यय लागतो?

भिंत ①②③④

१) स २) ई ३) वा ४) ए

प्रश्न ८. (तुळस) रोज पाणी घालावे. कंसातील शब्दाचे सामान्यरूप तयार करून चतुर्थी विभक्ती एकवचन प्रत्यय लावा. ①②③④

१) तुळशीस २) तुळसला
३) तुळशीला ४) तुळसा

प्रश्न ९. खालील पुल्लिंगी नामाचे योग्य सामान्यरूप ओळखा. ①②③④

खांब

१) खांबा २) खांब ३) खांबास ४) यापैकी नाही

प्रश्न १०. खालील स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप ओळखा. ①②③④

भक्ती

१) भक्ती २) भक्त ३) भक्तीने ४) भाक्त

प्रश्न ११. खालील पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप ओळखा. ①②③④

मोती

१) मोत्याचा २) मौक्तिक ३) माती ४) मी तो

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न १२. 'पिंजारी' या शब्दात पुढीलपैकी कोणता प्रत्यय आहे? ①②③④

१) 'री' हा कर्तुवाचक प्रत्यय
२) 'आरी' हा कर्तुवाचक प्रत्यय
३) 'ई' हा कर्तुवाचक प्रत्यय
४) 'आर' हा कर्तुवाचक व 'ई' हा लिंगदर्शक प्रत्यय

प्रश्न १३. ऊ-कारांत नपुसकलिंगी नामाचे सामान्यरूप आ- कारांत होते या नियमाला खालीलपैकी कोणता पर्याय अपूक आहे? ①②③④

१) वधू-वधूचा २) नातू-नातवाचा
३) कोकरू-कोकराने ४) आसू-आसवाने

❖ ❖ ❖

## सर्वनामे

प्रश्न १. खालीलपैकी योग्य जोडी जुळवून पर्याय रंगवा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | पुरुषवाचक सर्वनामे | १) | जो, जी, जे |
| ब) | दर्शक सर्वनामे | २) | कोणी, कोणास |
| क) | संबंधी सर्वनामे | ३) | हा, ही, हे |
| ड) | प्रश्नार्थक सर्वनामे | ४) | कोण, काय |

१) अ(४) २) ब(३) ३) क(२) ४) ड(१)

प्रश्न २. खालील वाक्यातील सर्वनामे ओळखा.

१. हा कोकणी गडी आहे. ①②③④
१) आहे २) गडी ३) कोकणी ४) हा

२. "येता का आपण शिकारीला?" ①②③④
१) शिकारीला २) का ३) आपण ४) येता

प्रश्न ३. सर्वनामांचे पर्याय ओळखा.

१. जो, जी, जे ①②③④
१) दर्शक २) संबंधी ३) प्रश्नार्थक ४) सामान्य

२. हा, ही, हे ①②③④
१) अनिश्चित २) प्रश्नार्थक
३) पुरुषवाचक ४) दर्शक

प्रश्न ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. मराठीत मूळ सर्वनामे किती आहेत? ①②③④
१) दहा २) नऊ ३) पाच ४) पंधरा

२. नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला काय म्हणतात? ①②③④
१) सामान्यनाम २) विशेषण
३) सर्वनाम ४) क्रिया

३. ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्तीचा उल्लेख करताना काय वापरतात? ①②③④
१) तृतीय पुरुषवाचक सर्वनाम २) पुरुषवाचक सर्वनाम
३) द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम ४) यांपैकी नाही

४. खालीलपैकी कोणते पुरुषवाचक सर्वनाम अनेकवचनात येते? ①②③④
१) स्वत: २) मज ३) आपण ४) आम्ही

५. खालीलपैकी किती सर्वनामे वचनभेदाप्रमाणे बदलतात.
मी, आपण, तू, काय, तो, हा, कोण, जो, स्वत: ①②③④
१) सात २) पाच ३) आठ ४) नऊ

६. नामाचा वापर नंतर व सर्वनामांचा वापर अगोदर होतो, हे विधान योग्य आहे का? ①②③④
१) बरोबर २) चूक
३) अर्धसत्य ४) यापैकी नाही

७. सर्वनामाला स्वतःची वेगळी लिंग, वचन अशी ओळख नाही, हे विधान योग्य आहे. ①②③④
१) बरोबर २) चूक
३) यापैकी नाही ४) कधीच नाही

८. ....... हे आत्मवाचक सर्वनाम नामाच्या किंवा सर्वनामाच्या सोबतीशिवाय सहसा वापरले जात नाही. ①②③④
१) मी २) तू ३) स्वतः ४) कोण

९. तुझ्याहून, तुमच्याहून ही कोणती रूपे आहेत? ①②③④
१) सर्वनाम २) विभक्ती ३) प्रत्यय ४) विकरण

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ५. 'कोण काय करणार आहे माझे?' या विधानातील कोण हे सर्वनाम कोणती भावना व्यक्त करणारे आहे? ①②③④
१) आश्चर्य २) तुच्छता
३) अगतिकता ४) विलक्षणपणा

प्रश्न ६. 'जो, जी, जे; जे, ज्या, जी' ही सर्वनामांची रूपे कोणत्या प्रकारातील आहेत? ①②③④
१) दर्शक सर्वनामे २) प्रश्नार्थक सर्वनामे
३) संबंधी सर्वनामे ४) आत्मवाचक सर्वनामे

प्रश्न ७. 'मंदा तू पुढे जा, हा मी आलोच' या वाक्यातील 'हा' हे सर्वनाम असून, त्याचा वापर क्रियाविशेषणासारखा केला आहे. या विधानाबाबत उत्तराचा खालील योग्य पर्याय निवडा. ①②③④
१) या विधानाचा पूर्वार्ध चूक आहे.
२) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.
३) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.
४) हे संपूर्ण विधान चूक आहे.

❖ ❖ ❖

# विशेषणे

## विशेषण आणि विशेष्य

प्रश्न १. नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दास ........ म्हणतात. ①②③④
१) विशेष्य २) विशेषण
३) सर्वनामसाधित ४) गुणविशेष

प्रश्न २. 'आम्ही देशाचे शूर शिपाई आहोत.' या वाक्यातील विशेषण ओळखा. ①②③④
१) शूर २) शिपाई ३) देश ४) आम्ही

प्रश्न ३. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④
१) कणसे २) देखावे ३) वाहने ४) दोन

## विशेषणांचे प्रकार

प्रश्न ४. खाली विशेषणांचे प्रकार दिलेले असून त्याखाली चार पर्याय दिलेले आहेत त्यापैकी ज्या शब्दात ते विशेषण आहे तो पर्याय क्रमांक लिहा.

१. गुणविशेषण ①②③④
१) निळासावळा २) फळभाजी ३) इतरलोक ४) दसपट

२. गणनावाचक संख्याविशेषण ①②③④
१) सहस्र २) द्विगुणित ३) थोडी ४) जास्त

३. क्रमवाचक संख्याविशेषण ①②③④
१) $\frac{१}{४}$ २) १० ३) चौथा ४) अर्धा

प्रश्न ५. अ व ब गटातील एक जोडी विसंगत आहे ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | क्रमवाचक संख्याविशेषण | १) | पहिला, चौथा, आठवी ही विशेषणे वस्तूंचा क्रम दाखवितात. |
| ब) | आवृत्तिवाचक संख्याविशेषणे | २) | चौपट, दसपट, दुहेरी ही विशेषणे संख्येची किती वेळा आवृत्ती झाली दाखवितात. |
| क) | पृथकत्ववाचक संख्याविशेषण | ३) | एकेक, दहा-दहा ही विशेषणे वेगवेगळा बोध करून देतात. |
| ड) | गणनावाचक संख्याविशेषण | ४) | सर्व, थोडी, इतर ही संख्याविशेषणे निश्चित संख्या दाखवितात. |

१) अ(१) २) ब(२) ३) क(३) ४) ड(४)

प्रश्न ६. चा, व, ई, ल, प्रत्ययांचा समावेश कोणत्या विशेषण प्रकारात होतो. ①②③④
१) अव्ययसाधित २) सार्वनामिक
३) धातुसाधित ४) नामसाधित

प्रश्न ७. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दासाठी विशेषणाचा प्रकार ओळखा. ①②③④

मी आज साखर-काकडी खाल्ली.

१) धातुसाधित विशेषण २) सार्वनामिक विशेषण
३) नामसाधित विशेषण ४) अव्ययसाधित विशेषण

प्रश्न ८. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) पिकलेला २) रांगणारे ३) हसरी ४) वरचा

### विधिविशेषण

प्रश्न ९. नामापूर्वी येणाऱ्या विशेषणाला ........ म्हणतात. ①②③④

१) क्रियाविशेषण २) अधिविशेषण
३) विधिविशेषण ४) पूर्वविशेषण

प्रश्न १०. नामानंतर येणारे विशेषण म्हणजे ........ ①②③④

१) पूर्वविशेषण २) सार्वनामिक विशेषण
३) विधिविशेषण ४) अधिविशेषण

प्रश्न ११. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) हुशार २) सुंदर ३) चांगले ४) उद्या

### क्रियाविशेषण

प्रश्न १२. खालील वाक्यातील अयोग्य वाक्य कोणते? ①②③④

१) क्रियाविशेषण हे विकारी असते.
२) क्रियाविशेषणे अव्यये आहेत.
३) क्रियाविशेषणे अव्यये नाहीत.
४) कोणतेही नाही.

प्रश्न १३. गटात न बसणारा शब्द कोणता? ①②③④

१) मोठा ग्रंथ २) अकरा मुलगे
३) बारा स्त्रिया ४) तेरा मुले

प्रश्न १४. क्रियाविशेषणे ही अव्यये नाहीत, हे विधान ........... आहे. ①②③④

१) चूक २) बरोबर ३) अयोग्य ४) यापैकी नाही

प्रश्न १५. खालील वाक्यातील विशेषणाचे प्रकार ओळखा.

१. श्रीमंतांना गर्व असतो. ①②③④

१) दर्शक विशेषण २) संबंधी विशेषण
३) नामसदृश विशेषण ४) प्रश्नार्थक विशेषण

२. ही मुलगी चलाख आहे. ①②③④

१) दर्शक विशेषण २) संबंधी विशेषण
३) सार्वनामिक विशेषण ४) प्रश्नार्थक विशेषण

३. त्याने काय पदार्थ आणले? ①②③④

१) सार्वनामिक विशेषण २) प्रश्नार्थक विशेषण
३) दर्शक विशेषण ४) संबंधी विशेषण

४. आम्हा मुलांना कोण विचारतो? ①②③④

१) सार्वनामिक विशेषण २) प्रश्नार्थक विशेषण
३) नामसदृश विशेषण ४) दर्शक विशेषण

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न १६. 'अव्ययसाधित विशेषण' असलेले विधान पर्यायी उत्तरात कोणते आहे? ①②③④

१) बोलक्या बाहुल्यांचा खेळ सर्वांनाच आवडतो.
२) आज तुम्ही कोणत्या गावाला जाणार?
३) बनारसी बोरे रसाळ असतात.
४) ते गव्हाचे पोते पुढच्या माळीत ठेव.

प्रश्न १७. 'काल मी मावळणारा सूर्य पाहिला.' या वाक्यातील 'मावळणारा' या विशेषणाचा प्रकार कोणता ? ①②③④

१) सिद्ध विशेषण २) क्रमवाचक विशेषण
३) गुण विशेषण ४) साधित विशेषण

❖ ❖ ❖

## क्रियापदविचार

(सुगम मराठी व्याकरण व लेखन या पुस्तकातील घटक क्र. १६ व त्यासंबंधातील घटक क्र. १७, १८ व १९ यातील प्रश्न क्रियापदविचार या घटकामध्ये एकत्रित देण्यात आलेले आहेत.)

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. धातुसाधित व सहायक क्रियापद यांच्या संयोगाने काय बनते? ①②③④

१) शक्य क्रियापद २) संयुक्त क्रियापद
३) अधिकरण ४) यांपैकी नाही

२. धातूला काळ व अर्थ दाखवणारे प्रत्यय लावून काय बनतात? ①②③④

१) प्रकरण २) शक्यता ३) रूपे ४) तद्धित

३. ना, नये, नाही, नको या शब्दांनी क्रियापदाचे कोणते रूप स्पष्ट होते? ①②③④

१) करणरूप २) संप्रदान
३) अकरणरूप ४) साशंक

४. खालीलपैकी कोणत्या क्रियापद प्रकारास रीतिकाळ म्हणतात? ①②③④

१) साधित २) प्रयोजक ३) सहायक ४) संयुक्त

५. संस्कृतमध्ये क्रियापदाला ........ म्हणतात. ①②③④

१) आगम २) क्रिया ३) कर्मणी ४) आख्यात

६. स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ हे काय आहेत? ①②③④

१) क्रियापदाचे अर्थ २) क्रियाविशेषण

३) काही नाही ४) क्रियापदाचे रूप

७. संकेत म्हणजे ........ ①②③④

१) शक्यता २) संभ्रम ३) खूण ४) अट

**प्रश्न २. खालील उदाहरणावरून क्रियापदाचे प्रकार ओळखा.**

१. मुलांनो सर्वजण रांगेत उभे राहा. ①②③④

१) स्वार्थ २) आज्ञार्थ ३) संकेतार्थ ४) विध्यर्थ

२. अंगी धैर्य असणाऱ्यांनीच हे कार्य करावे. ①②③④

१) विध्यर्थ २) आज्ञार्थ ३) स्वार्थ ४) संकेतार्थ

३. पाऊस आला तरी सहल जाणारच. ①②③④

१) स्वार्थ २) आज्ञार्थ ३) विध्यर्थ ४) संकेतार्थ

४. तो बहुधा घरी असावा. ①②③④

१) स्वार्थ २) आज्ञार्थ ३) विध्यर्थ ४) संकेतार्थ

५. देवा, सर्वांना सुखी ठेव. ①②③④

१) आज्ञार्थ २) विध्यर्थ ३) संकेतार्थ ४) स्वार्थ

६. मी निबंध लिहिला. ①②③④

१) रीति भूतकाळ २) पूर्ण भूतकाळ

३) अपूर्ण भूतकाळ ४) साधा भूतकाळ

७. मी निबंध लिहीत असे. ①②③④

१) साधा भूतकाळ २) अपूर्ण भूतकाळ

३) पूर्ण भूतकाळ ४) रीति भूतकाळ

८. मी वाचन करीत होतो. ①②③④

१) अपूर्ण भूतकाळ २) साधा भूतकाळ

३) रीति भूतकाळ ४) पूर्ण भूतकाळ

९. मी किल्ला पाहिला होता. ①②③④

१) साधा भूतकाळ २) रीति भूतकाळ

३) अपूर्ण भूतकाळ ४) पूर्ण भूतकाळ

**प्रश्न ३. क्रियापदाच्या प्रकारानुसार वाक्य ओळखा.**

१. सिद्ध क्रियापद ①②③④

१) बाई वही आणतील. २) बाईंनी वह्या आणल्या.

३) बाईंनी वह्या आणल्या होत्या. ४) बाई वह्या आणतात.

२. प्रयोजक क्रियापद ①②③④

१) आई मुलाला चालवणार

२) आईने मुलाला चालवले होते

३) आई मुलाला चालविते

४) आई मूल चालवते

३. शक्य क्रियापद ①②③④

१) मी आजारी आहे, मी खेळणार नाही.

२) मी खेळणार नाही.

३) आजारानंतर मी खेळत नाही.

४) आजारानंतर मला आता खेळवते.

४. गौण क्रियापदे ①②③④

१) सुज्ञा अधिक सांग.

२) सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

३) सुज्ञाला अधिक चांगले सांगावे.

४) सुज्ञास सांगणे जास्त लागे.

५. भावकर्तृक क्रियापदे ①②③④

१) उजाडल्यावर सकाळ अधिकच प्रखर होणार.

२) उजाडले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते.

३) उजाडल्यावर सकाळ झाली.

४) उजाडणार तेव्हा सकाळ होणार.

**प्रश्न ४. भविष्यकाळ दर्शविणारी खालील पर्यायातील योग्य जोडी निवडा.** ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | संकेतार्थ असल्यास | १) | मी हे काम करू? |
| ब) | अशक्यता दर्शविताना | २) | मला दोन रूपये हवे होते. |
| क) | संभव असताना | ३) | सगळेच मूर्ख कसे असतील. |
| ड) | इच्छा व्यक्त करताना | ४) | गुरुजी आत शाळेतअसतील. |
| | | ५) | तू मदत देशील तर मी आभारी होईन. |

१) अ(५) २) ब(१) ३) क(२) ४) ड(३)

## क्रियापदविचार काळ व अर्थ

**प्रश्न ५. मराठी भाषेत मुख्य काळ किती आहेत?** ①②③④

१) चार २) नऊ ३) तीन ४) पाच

प्रश्न ६. वाक्यातील क्रियापदावरून क्रियेचा बोध होतो, तसेच ती क्रिया कोणत्या वेळी घडत आहे, याचा बोध होतो त्याला काय म्हणतात? ①②③④

१) काळ व अर्थ २) काळ
३) भविष्यकाळ ४) काळ व कारकार्थ

प्रश्न ७. प्रत्येक काळात क्रियापदाचे किती उपप्रकार आहेत? ①②③④

१) तीन २) दोन ३) सहा ४) चार

प्रश्न ८. पुढील चार विधानांपैकी वर्तमानकाळी विधान कोणते ते ओळखा? ①②③④

१) संदीप क्रिकेट खेळतो.
२) संदीप क्रिकेट खेळ.
३) संदीप उद्या क्रिकेट खेळेल.
४) संदीप काल क्रिकेट खेळला.

प्रश्न ९. 'मी पुस्तक वाचले.' या वाक्यातील काळ ओळखा? ①②③④

१) साधा वर्तमानकाळ २) साधा भूतकाळ
३) साधा भविष्यकाळ ४) पूर्ण भूतकाळ

प्रश्न १०. 'माधवीने पेरू खाल्ला.' या वाक्यातील अधोरेखित शब्दावरून काळ ओळखा? ①②③④

१) भविष्यकाळ २) वर्तमानकाळ
३) भूतकाळ ४) साधा वर्तमानकाळ

प्रश्न ११. पुढील चार वाक्यांपैकी रीतिवर्तमानकाळाचे वाक्य ओळखा. ①②③④

१) मी प्रयोग करतो. २) मी प्रयोग करीत असतो.
३) मी प्रयोग केला आहे. ४) मी प्रयोग करीत आहे.

प्रश्न १२. 'तो मुलगा खेळत आहे .' या वाक्यातील काळ ओळखा. ①②③④

१) पूर्णकाळ २) अपूर्ण वर्तमानकाळ
३) रीतिकाळ ४) भविष्यकाळ

प्रश्न १३. 'मी निबंध लिहिला आहे.' या वाक्याचे पूर्ण भूतकाळी वाक्य कोणते आहे? ①②③④

१) मी निबंध लिहीत आहे.
२) मी निबंध लिहिला.
३) मी निबंध लिहिला होता.
४) मी निबंध लिहीत होतो.

प्रश्न १४. 'अ' गटात काळ व 'ब' गटात विधाने दिली आहेत. पर्यायी उत्तरातील योग्य पर्यायाचे वर्तुळ रंगवा. ①②③④

| 'अ' (काळ) | | 'ब' (विधाने) | |
|---|---|---|---|
| अ) | रीति भूतकाळ | १) | मी व्यायाम केला होता. |
| ब) | साधा भूतकाळ | २) | मी व्यायाम करीत असे. |
| क) | अपूर्ण भूतकाळ | ३) | मी व्यायाम करीत होतो. |
| ड) | पूर्ण भूतकाळ | ४) | मी व्यायाम केला. |

१) अ(१) २) ब(२) ३) क(३) ४) ड(४)

प्रश्न १५. 'मी नेहमीच लवकर येत असतो.' या वाक्यातील काळ ओळखा. ①②③④

१) साधा वर्तमानकाळ २) रीति भूतकाळ
३) रीति वर्तमानकाळ ४) रीति भविष्यकाळ

प्रश्न १६. पुढील चार विधानांपैकी एक विधान भविष्यकाळी आहे, ते ओळखा. ①②③④

१) पुढच्या आठवड्यात मी गोव्याला जाईन.
२) आजी स्वयंपाक करत होती.
३) 'मे' महिन्यानंतर 'जून' महिना येतो.
४) सौरभ थांब, बाबा जेवत आहेत.

प्रश्न १७. पुढीलपैकी एक वाक्य साधा वर्तमानकाळाचे आहे ते ओळखा. ①②③④

१) मी पुस्तक वाचत आहे. २) मी पुस्तक वाचतो.
३) मी पुस्तक वाचले आहे. ४) मी पुस्तक वाचत असतो.

प्रश्न १८. क्रियापदाच्या रुपावरून क्रिया पूर्वी घडली हे कळते तेव्हा तो काळ कोणता असतो? ①②③④

१) वर्तमानकाळ २) भूतकाळ
३) भविष्यकाळ ४) रीति भविष्यकाळ

प्रश्न १९. 'त्याने अभ्यास केला.' या विधानाचे साधा वर्तमानकाळाचे वाक्य पुढीलपैकी कोणते आहे? ①②③④

१) तो अभ्यास करेल २) तो अभ्यास करत असेल
३) तो अभ्यास करतो ४) तो अभ्यास करत जाईल

प्रश्न २०. पुढील वाक्याचा काळ ओळखा - 'आई मुलांना जेवायला वाढत होती.' ①②③④

१) अपूर्ण भूतकाळ २) पूर्ण वर्तमानकाळ
३) साधा भूतकाळ ४) चालू वर्तमानकाळ

प्रश्न २१. पुढील चार वाक्यांपैकी एक वाक्य पूर्ण वर्तमानकाळाचे आहे ते ओळखा? ①②③④

१) सौरभ कॅरम खेळत आहे.

२) माधवी पेपर वाचत आहे.

३) बाबांनी झाडांना पाणी दिले आहे.

४) दादा पुस्तक वाचत असतो.

प्रश्न २२. 'आत्या निघून जाईल' या वाक्यात कोणता काळ आला आहे? ①②③④

१) वर्तमानकाळ २) रीति वर्तमानकाळ

३) भूतकाळ ४) भविष्यकाळ

प्रश्न २३. 'मी पोळीभाजी खाईन.' या वाक्याचे भूतकाळी वाक्य पुढील वाक्यांपैकी कोणते आहे? ①②③④

१) मी पोळी भाजी खाते.

२) मी पोळी भाजी खाल्ली.

३) मी पोळी भाजी खात असेन.

४) मी पोळी भाजी खात जाईन.

प्रश्न २४. 'सध्या तरी मला अभ्यास करावा असे वाटत आहे.' या वाक्याचा काळ ओळखा. ①②③④

१) साधा वर्तमानकाळ २) पूर्ण वर्तमानकाळ

३) अपूर्ण वर्तमानकाळ ४) रीति वर्तमानकाळ

प्रश्न २५. पुढील वाक्यांपैकी 'भूतकाळीवाक्य' ओळखा? ①②③④

१) तुम्ही थांबा, मी आलोच.

२) तुम्ही थांबा, मी येतो.

३) तुम्ही थांबा, मी येईन.

४) तुम्ही थांबा, मी आहे.

प्रश्न २६. वर्तमानकाळातील क्रियापद पुढीलपैकी कोणते? ①②③④

१) पळवा २) पळता ३) पळाला ४) पळतो

प्रश्न २७. 'सर्व काही तुझ्या मनाप्रमाणे घडत जाईल.' या वाक्यातील काळ ओळखा? ①②③④

१) साधा भूतकाळ २) रीति भविष्यकाळ

३) साधा भविष्यकाळ ४) अपूर्ण भविष्यकाळ

प्रश्न २८. 'संकटात सापडलेली मी देवाची प्रार्थना करीत होते.' या वाक्यातील काळ ओळखा. ①②③④

१) साधा भूतकाळ २) पूर्ण भूतकाळ

३) अपूर्ण भूतकाळ ४) रीति भूतकाळ

प्रश्न २९. 'सगळेच श्रीमंत कसे असतील?' या वाक्यातील काळ ओळखा. ①②③④

१) वर्तमानकाळ २) भविष्यकाळ

३) भूतकाळ ४) साधा भविष्यकाळ

प्रश्न ३०. खालील चार वाक्यांपैकी एक वाक्य पूर्ण वर्तमानकाळी आहे. ते ओळखा. ①②③④

१) मी पत्र लिहितो. २) मी पत्र लिहिले.

३) मी पत्र लिहिले आहे. ४) मी पत्र लिहीत असेन.

## २०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न ३१. 'लढाऊ' या धातुसाधिताची रचना पुढीलपैकी कोणता प्रत्यय जोडून झालेली आहे? ①②③④

१) 'ऊ' - योग्यतादर्शक

२) 'आऊ' - योग्यतादर्शक

३) प्रत्यय जोडलेला नाही

४) शून्य प्रत्यय

प्रश्न ३२. पुढे मराठी प्रत्यय व त्यापासून बनलेली धातुसाधिते दिली आहेत. योग्य पर्याय ओळखा. ①②③④

१) घडाई, झगडा, विसराळू, पाळीव

२) लेखक, वदन, रमणीय, पथिक

३) पाचक, तुलना, श्रवणीय, श्रोता

४) भवितव्य, रसिक, पालन, गायक

प्रश्न ३३. 'शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात'. या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. ①②③④

१) शक्य क्रियापद २) द्विकर्मक क्रियापद

३) प्रयोजक क्रियापद ४) अकर्तृक क्रियापद

प्रश्न ३४. 'तो घोड्यास पळवतो' या वाक्यातील पळवतो या क्रियापदाचा उपप्रकार कोणता? ①②③④

१) शक्य क्रियापद २) प्रयोजक क्रियापद

३) सिद्ध क्रियापद ४) सहाय धातू

प्रश्न ३५. 'मी ग्रंथ वाचत जाईन' या वाक्याचा काळ ओळखा. ①②③④

१) रीतिभूतकाळ २) रीतिवर्तमानकाळ

३) रीतिभविष्यकाळ ४) पूर्णरीतिभविष्यकाळ

❖ ❖ ❖

# क्रियाविशेषण अव्यय

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. क्रियाविशेषण हे क्रियापदाचे ....... असते. ①②③④

१) नाम २) सर्वनाम ३) विशेष्य ४) विशेषण

२. क्रियाविशेषण अव्ययांचे वर्गीकरण किती प्रकारांनी करतात? ①②③④

१) एक २) दोन ३) तीन ४) चार

३. कालदर्शक, आवृत्तिदर्शक, सातत्यदर्शक हे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार आहेत? ①②③④

१) रीतिवाचक २) स्थलवाचक
३) कालवाचक ४) विशेषण

४. वाक्यातील क्रिया घडण्याचे स्थळ खालीलपैकी कोणत्या प्रकारात दर्शवता येईल. ①②③④

१) स्थलवाचक २) प्रकारदर्शक
३) सातत्यदर्शक ४) अनुकरण

५. क्रियेचे परिमाण दर्शविण्यासाठी ........ हे अव्यय वापरतात. ①②③④

१) निश्चयार्थक २) परिमाणवाचक
३) प्रश्नार्थक ४) स्थलवाचक

६. इथे, आज, पुढे, मागे ही कोणती क्रियाविशेषण अव्यये आहेत? ①②③④

१) स्थानिक २) साधित ३) सिद्ध ४) प्रकारदर्शक

७. सामासिक शब्द कोणाचे कार्य करीत असतात? ①②③④

१) क्रियाविशेषण २) शब्दयोगी अव्यय
३) सर्वनाम ४) धातुसाधित

८. मूळ शब्दांना प्रत्यय लागून कोणते अव्यय तयार होते? ①②③④

१) सिद्ध २) साधित ३) स्थानिक ४) निषेधार्थक

९. खालीलपैकी अविकारी शब्द प्रकार कोणता? ①②③④

१) नाम २) सर्वनाम
३) विशेषण ४) क्रियाविशेषण अव्यय

प्रश्न २. खालील प्रत्ययसाधित अव्ययांपैकी एक विसंगत जोडी शोधा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | नामसाधित | १) | दिवसा, रात्री, वस्तुतः, अर्थात |
| ब) | सर्वनामसाधित | २) | त्यामुळे, ह्यावरून, कित्येकदा |
| क) | विशेषणसाधित | ३) | हसू, हसत, हसताना, हसून |
| ड) | अव्ययसाधित | ४) | कोठून, इकडून, खालून, वरून |

१) अ(१) २) क(३) ३) ब(२) ४) ड(४)

प्रश्न ३. शब्दांच्या उदाहणावरून क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार ओळखा.

१. काल, पूर्वी, दररोज, वारंवार ①②③④

१) कालवाचक २) अर्थमूलक
३) स्वरूपमूलक ४) रीतिवाचक

२. क्षणोक्षणी, सालोसाल, फिरून, पुनः पुन्हा ①②③④

१) कालदर्शक २) सातत्यदर्शक
३) आवृत्तीदर्शक ४) वारंवारिता

३. नित्य, सदा, सर्वदा, दिवसभर ①②③④

१) स्थितिदर्शक २) सातत्यदर्शक
३) गतिदर्शक ४) प्रकारदर्शक

४. खाली, वर, कोठे, पुढे ①②③④

१) प्रश्नार्थक २) गतिदर्शक
३) स्थितिदर्शक ४) कालदर्शक

५. मागून, पुढून, इकडून, तिकडून ①②③④

१) रीतिवाचक २) स्थितिदर्शक
३) सातत्यदर्शक ४) गतिदर्शक

६. असे, जसे, कसे, आपोआप ①②③④

१) स्थितिदर्शक २) अनुकरणदर्शक
३) प्रकारदर्शक ४) परिमाणवाचक

७. झटकन, पटकन, चमचम, पटपट ①②③④

१) प्रकारदर्शक २) निश्चयार्थक
३) अनुकरणदर्शक ४) स्थितिदर्शक

८. खचित, खरोखर ①②③④

१) प्रकारदर्शक २) निश्चयार्थक
३) निषेधार्थक ४) अनुकरणदर्शक

९. किंचित, जरा, मुळीच, मोजके, पूर्ण ①②③④

१) निषेधार्थक २) गतिदर्शक
३) सिद्ध ४) संख्यावाचक

१०. अ) तो <u>न</u> चुकता येतो , ब) तो तोंड उघडेल तर <u>ना</u>. ①②③④

१) प्रश्नार्थक २) निषेधार्थक

३) साधित ४) कालदर्शक

११. इथे, तिथे, आज, पुढे, मागे ①②③④

१) सिद्ध २) साधित ३) स्थानिक ४) सातत्यदर्शक

१२. मोठ्याने, वस्तुतः, एकदा, हसताना ①②③④

१) सामासिक २) साधित ३) सिद्ध ४) स्थानिक

**प्रश्न ४. खालील वाक्यातील क्रियाविशेषणे ओळखा.**

१. कासव फार हळू चालते. ①②③④

१) कासव २) फार ३) हळू ४) चालते

२. परमेश्वर सर्वत्र असतो. ①②③④

१) परमेश्वर २) सर्वत्र ३) असतो ४) यांपैकी नाही

३. तुम्ही आमच्याकडे याल का? ①②③④

१) तुम्ही २) याल ३) का? ४) आमच्याकडे

४. पूर्वी शिक्षक पागोटे घालत. ①②③④

१) शिक्षक २) पागोटे ३) घालत ४) पूर्वी

५. काल शाळेला सुट्टी होती. ①②③④

१) शाळेला २) सुट्टी ३) काल ४) होती

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

**प्रश्न ५. 'काही क्रियाविशेषणे विकारी तर काही क्रियाविशेषणे अविकारी असतात' या विधानाबाबत खालील कोणता पर्याय योग्य आहे?** ①②③④

१) या विधानाचा पूर्वार्ध चूक आहे.

२) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.

३) हे संपूर्ण विधान चूक आहे.

४) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.

**प्रश्न ६. 'तिने सारे धान्य <u>निवडून</u> ठेवले.' यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे?** ①②③④

१) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

२) अव्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

३) प्रत्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

४) धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय

**प्रश्न ७. 'प्रकारदर्शक रीतीवाचक क्रियाविशेषण' पर्यायी उत्तरातील कोणते?**

१) आपोआप २) खचित

३) चमचम ४) खरोखर

❖ ❖ ❖

# शब्दयोगी अव्यये

**शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये**

**प्रश्न १. वर, खाली, मागे, पुढे, बाहेर हे शब्द ........ आहेत.** ①②③④

१) अव्यये २) अविकारी

३) क्रियाविशेषण अव्यये ४) संबंधवाचक

**प्रश्न २. ''जाईच्या मांडवा<u>वर</u> सूर्याची सोनेरी किरणे पसरली. या वाक्यातील 'वर' हा शब्द ........ आहे.** ①②③④

१) शब्दयोगी अव्यय २) अविकारी

३) अव्यय ४) संबंधवाचक

**शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यातील फरक**

**प्रश्न ३. खालील वाक्यातील गटात न बसणारे वाक्य (वेगळे वाक्य) ओळखा.** ①②③④

१) पतंग झाडावर अडकला.

२) पतंग वर जात होता.

३) सूर्य ढगामागे लपला.

४) टेबलाखाली पुस्तक पडले.

**प्रश्न ४. गटात न बसणारा शब्द ओळखा.** ①②③④

१) यंदापेक्षा २) थोडासुद्धा

३) खाली बसणे ४) जाण्यापेक्षा

**शब्दयोगी अव्ययांचे प्रकार**

**प्रश्न ५. खालील चार शब्दांपैकी एकच शब्द डावीकडील शब्दयोगी अव्यय प्रकारात मोडतो तो शब्द कोणता?**

१. कालवाचक ①②③④

१) मधून २) पावेतो ३) आतून ४) मागे

२. स्थलवाचक ①②③④

१) जवळ २) खालून ३) बदली ४) नंतर

३. हेतुवाचक ①②③④

१) आता २) पूर्वी ३) आधी ४) प्रीत्यर्थ

४. व्यतिरेकवाचक ①②③④

१) खेरीज २) साठी ३) कारणे ४) पाशी

**प्रश्न ६. खालील शब्दयोगी अव्ययांचा प्रकार ओळखा.**

१. परीस ①②③④

१) दिक्वाचक २) तुलनावाचक

३) परिमाणवाचक ४) विरोधवाचक

२. सारखा ①②③④

१) योग्यतावाचक २) संग्रहवाचक

३) कालवाचक ४) हेतुवाचक

३. मात्र ①②③④

१) कालवाचक २) तुलनावाचक

३) कैवल्यवाचक ४) संबंधवाचक

४. केवळ ①②③④

१) संग्रहवाचक २) भागवाचक

३) परिमाणवाचक ३) हेतुवाचक

प्रश्न ७. अ व ब गटातील एक जोडी विसंगत आहे. ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | संबंधवाचक | १) | विशी, विषयी, संबंधी |
| ब) | साहचर्यवाचक | २) | बरोबर, सह, सकट, सहित |
| क) | भागवाचक | ३) | विरुद्ध, उलटे, उलट |
| ड) | विनिमयवाचक | ४) | बदल, ऐवजी, जागी |

१) अ(१) २) ब(२) ३) क(३) ४) ड(४)

सामान्यरूपांचा विचार

प्रश्न ८. गटात न बसणारी जोडी ओळखा. ①②③④

१) मांडव-मांडवाखाली २) घरटे-घरट्याबाहेर

३) देख-देखील ४) घर-घरापुढे

शुद्ध शब्दयोगी अव्यये

प्रश्न ९. आईमात्र, आम्हीदेखील, तुम्हीपण, तोना ही कोणत्या प्रकारची अव्यये आहेत? ①②③④

१) शब्दयोगी २) शुद्ध शब्दयोगी

३) क्रियाविशेषणसाधित ४) परिमाणवाचक

विभक्ती प्रतिरूपक शब्दयोगी अव्यये

प्रश्न १०. विभक्ती प्रतिरूपक अव्यये कोणत्या विभक्तीतील आहेत ते ओळखा.

१. भोवती ①②③④

१) सप्तमी २) षष्ठी

३) पंचमी ४) यांपैकी नाही

२. तृतीया ①②③④

१) विषयी २) प्रमाणे

३) साठी ४) वाचून

प्रश्न ११. खाली 'अ' व 'ब' गटात विभक्ती प्रतिरूपक अव्यये दिलेली आहेत. त्यातील विसंगत जोडी ओळखा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | द्वितीया | १) | प्रत, लागी |
| ब) | पंचमी | २) | पासून, पेक्षा, शिवाय |
| क) | तृतीया | ३) | करिता, ऐवजी, प्रीत्यर्थ |
| ड) | षष्ठी | ४) | संबंधी, विषयी |

१) अ(१) २) ब(२) ३) क(३) ४) ड(४)

प्रश्न १२. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) विषयी २) समोर ३) प्रत ४) ऐवजी

प्रश्न १३. पैकी, पोटी, आतून ही ...... शब्दयोगी अव्यय आहेत. ①②③④

१) विरोधवाचक २) भागवाचक

३) संबंधवाचक ४) कोणतेही नाही

प्रश्न १४. 'च', देखील, ना, पण, मात्र ही ....... अव्यये आहेत. ①②③④

१) शुद्ध शब्दयोगी अव्यय २) विभक्ती प्रतिरूपक

३) शब्दयोगी अव्यय ४) क्रियाविशेषण

प्रश्न १५. 'सूर्य ढगामागे लपला.' या वाक्यातील शब्दयोगी अव्यय कोणते? ①②③④

१) ला २) ढग ३) मागे ४) कोणतेही नाही

प्रश्न १६. 'पतंग वर जात होता.' वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळखा? ①②③④

१) होता २) वर ३) जात ४) जात होता.

प्रश्न १७. अव्ययांसंदर्भात दिलेल्या वाक्यांतील विसंगत वाक्य शोधा. ①②③④

अ) पक्षी फांदीवर बसला.

ब) चंदू कपाटामागे लपला.

क) पुस्तकाखाली वही आहे.

ड) मागे या ठिकाणी विहीर होती.

१) अ २) ब ३) क ४) ड

प्रश्न १८. सरला माधुरीपेक्षा उंच आहे. वाक्यातील विभक्ती प्रतिरूपक अव्यय कोणते? ①②③④

१) आहे २) उंच ३) पेक्षा ४) ला

प्रश्न १९. देशासाठी महात्माजींनी प्राणार्पण केले. वाक्यातील विभक्ती ओळखा. ①②③④

१) द्वितीया २) चतुर्थी ३) पंचमी ४) षष्ठी

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न २०. दिलेल्या शब्दातील शब्दयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.

'आज्ञेबरहुकूम' ①②③④

१) हेतुवाचक २) योग्यतावाचक
३) संबंधवाचक ४) भागवाचक

प्रश्न २१. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा. ①②③④

अ) शब्दयोगी अव्यये नामांना जोडून येत नाहीत.
ब) शब्दयोगी अव्यये विकारी शब्द आहेत.

१) (अ) बरोबर २) (ब) बरोबर
३) (अ) आणि (ब) बरोबर ४) (अ) आणि (ब) चूक

❖ ❖ ❖

## उभयान्वयी अव्यये

प्रश्न १. प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. दोहोंतील एकाची निवड म्हणजे ........ ①②③④
१) विकल्प २) समास ३) संधी ४) अव्यय

२. समुच्चय म्हणजे ........ ①②③④
१) वजाबाकी २) बेरीज
३) गुणाकार ४) भागाकार

३. विकल्पबोधक, स्वरूपदर्शक, परिमाणबोधक, संकेतबोधक या प्रकारात खालीलपैकी कोणते शब्द/अक्षर येऊ शकते? ①②③④
१) आणि २) की ३) जरी ४) परंतु

प्रश्न २. खालील शब्दावरून प्रकार ओळखा.

१. आणि, व, शिवाय, नि, आणखी ①②③④
१) विकल्पबोधक २) स्वरूपदर्शक
३) समुच्चयबोधक ४) गौणत्व

२. अथवा, किंवा, अगर, की ①②③④
१) समुच्चयबोधक २) विकल्पबोधक
३) उद्देशबोधक ४) यांपैकी नाही

३. यास्तव, कारण, सबब ①②③④
१) संकेतबोधक २) कारणबोधक
३) उद्देशबोधक ४) स्वरूपबोधक

४. जर-तर, की, तर, जरी-तरी ①②③④
१) स्वरूपबोधक २) कारणबोधक
३) उद्देशबोधक ४) संकेतबोधक

प्रश्न ३. खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यये ओळखा.

१. त्याला बढती मिळाली, कारण त्याने चोख कामगिरी बजावली. ①②③④
१) बढती २) कारण
३) कामगिरी ४) यांपैकी नाही

२. पिलाने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला. ①②③④
१) व २) मान
३) किलबिलाट ४) यांपैकी नाही

३. देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।। ①②③④
१) अथवा २) देह ३) भावो ४) यांपैकी नाही

४. शेतकऱ्यांनी शेते नांगरली, पण पाऊस पडलाच नाही. ①②③④
१) शेते २) पाऊस ३) पण ४) यांपैकी नाही

५. विजेतेपद मिळावे यास्तव त्यांनी खूप प्रयत्न केले. ①②③④
१) प्रयत्न २) विजेतेपद
३) यास्तव ४) यांपैकी नाही

६. प्रयत्न केला तर फायदाच होईल. ①②③④
१) यांपैकी नाही २) प्रयत्न
३) तर ४) फायदाच

७. सरांनी आम्हाला शिकवले, शिवाय गोष्टीही सांगितल्या. ①②③④
१) गोष्टीही २) शिवाय
३) सरांनी ४) यांपैकी नाही

८. यश मिळो की न मिळो, आम्ही प्रयत्न करणार. ①②③④
१) यश २) की ३) प्रयत्न ४) आम्ही

९. एक रुपया म्हणजे शंभर पैसे ①②③④
१) म्हणजे २) रुपया ३) पैसे ४) यांपैकी नाही

प्रश्न ४. खालील वाक्यातील उभयान्वयी (त्यांच्या प्रकारानुसार) अव्यये ओळखा.

१. भिकाऱ्याला मी एक सदरा दिला, शिवाय त्याला जेवू घातले.
(समुच्चयबोधक अव्यय) ①②③④
१) सदरा २) शिवाय ३) एक ४) जेवू घातले

२. तुला ज्ञान हवे की धन हवे? (विकल्पबोधक अव्यय) ①②③④
१) ज्ञान २) धन ३) की ४) तुला
३. पाऊस पडला म्हणून रस्त्यात पाणी साचले. (उद्देशबोधक अव्यय) ①②③④
१) रस्त्यात २) पडला ३) पाऊस ४) म्हणून
४. आईला थोडे बरे नाही. बाकी सर्व ठीक. (न्यूनत्वबोधक अव्यय) ①②③④
१) थोडे २) ठीक ३) बरे नाही ४) बाकी
५. प्रयत्न केला तर फायदाच होईल. (संकेतबोधक अव्यय) ①②③④
१) फायदा २) तर ३) प्रयत्न ४) होईल
६. त्याचे भाषण उत्तम झाले म्हणून त्याला बक्षीस मिळाले.
(परिमाणबोधक अव्यय) ①②③④
१) भाषण २) त्याचे ३) म्हणून ४) उत्तम

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ५. परिणामबोधक संयुक्तवाक्य बनविताना कोणत्या उभयान्वयी अव्ययांचा वापर होतो? ①②③④

१) म्हणून, सबब २) अथवा, किंवा
३) परी, पण ४) व, आणि

प्रश्न ६. खालील उभयान्वयी अव्यये व त्यांचे उपप्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा. ①②③④

| 'अव्यये' | | 'उपप्रकार' | |
|---|---|---|---|
| (a) | स्वरूपदर्शक | (i) | म्हणून |
| (b) | समुच्चय बोधक | (ii) | पण |
| (c) | उद्देश दर्शक | (iii) | आणि |
| (d) | न्यूनत्वबोधक | (iv) | म्हणजे |

वरील जोड्यांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| 2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| 3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| 4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

प्रश्न ७. खालील गट क्रमांक १ व गट क्रमांक २ मधील एक जोडी चुकीची आहे. ती पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| | | | |
|---|---|---|---|
| a | म. गांधी म्हणत, की सर्वांनी सत्याने वागावे. | i | विकल्प बोधक |
| b | तो इतका रडला, की त्याचे तोंड सुजले. | ii | न्यूनत्व बोधक |
| c | यश मिळो, की न मिळो मी प्रयत्न करणार. | iii | परिणाम बोधक |
| d | माझा पहिला नंबर आला, की मी पेढे वाटीन. | iv | स्वरूप दर्श |

(1) (a) - (iv) 2) (b) - (iii)
3) (c) - (i) 4) (d) - (ii)

❖ ❖ ❖

## केवलप्रयोगी अव्यये

प्रश्न १. केवलप्रयोगी अव्ययांच्या वर्गीकरणानुसार विसंगत जोडी ओळखा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | हर्षदर्शक | १) | ओहो, अबब, बापरे, अहाहा |
| ब) | शोकदर्शक | २) | शाबास, छान, ठीक, फक्कड |
| क) | आश्चर्यकारक | ३) | वा, वावा, आहा, ओहो |
| ड) | विरोधीदर्शक | ४) | अरेरे, अयाई, अगाई, हाय हाय. |

१) अ(३) २) ब(४) ३) क(१) ४) ड(२)

प्रश्न २. पुढील वाक्याच्या आरंभी कोणते केवलप्रयोगी अव्यय वापरावे?

१. ........! काय अवस्था झाली तुझी! ①②③④
१) छान २) अरेरे ३) हो ४) फुस
२. ........! खूप दुखतय गं! ①②③④
१) हाय हाय २) शाब्बास ३) अगाई ४) छी
३. ........! केवढा महाकाय प्राणी? ①②③④
१) छट् २) छे ३) ठीक ४) अबब
४. ........ चहा झाला आहे आज. ①②③④
१) अगे २) अहाहा ३) फक्कड ४) बापरे
५. ........! किती उंच इमारत आहे ही? ①②③④
१) अहं २) हाय-हाय ३) अहाहा ४) ठीक
६. ........! मी असं कधीच म्हटल नसतं. ①②③④
१) छे २) अरे ३) बापरे ४) अगाई
७. ........! काम फत्ते केलेस तू! ①②③④
१) गप २) छे ३) शाब्बास ४) यापैकी नाही

प्रश्न ३. खालील वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा.

१. अरेरे! तेंडुलकर बाद झाला. ①②③④
१) बाद २) अरेरे ३) तेंडुलकर ४) झाला

२. बापरे! तो पाहा वाघ! ①②③④
१) पाहा २) वाघ ३) बापरे! ४) तो

३. शाब्बास! फार चांगले केलेस. ①②③④
१) शाब्बास! २) फार ३) चांगले ४) केलेस

४. येणार असेल तर येईल बापडा! ①②③④
१) असेल २) तर ३) बापडा ४) येणार

५. जळलं मेलं ते लक्षण. ①②③④
१) ते २) लक्षण
३) यापैकी नाही ४) जळलं मेलं

६. अहो, ऐकलंत का? ①②③④
१) ऐकलंत २) का
३) अहो ४) यांपैकी नाही

७. अबब! केवढा फणस आई? ①②③④
१) केवढा २) आई ३) अबब ४) फणस

८. अरेच्या! आलास पण तू? ①②③④
१) आलास २) पण ३) अरेच्या ४) तू

९. गप! एक शब्द बोलू नकोस. ①②③④
१) शब्द २) गप ३) नकोस ४) एक

१०. छे!छे! मी मुळीच येणार नाही. ①②③④
१) मुळीच २) येणार ३) मी ४) छे! छे!

११. छी! किती गलिच्छपणा आहे हा? ①②③④
१) गलिच्छपणा २) छी! ३) हा ४) किती

१२. वाहवा! काय सुंदर गाणे झाले. ①②③④
१) सुंदर २) काय ३) वाहवा ४) गाणे

प्रश्न ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. मनातील भावनांचा स्फोट होऊन एखादा ........ तोंडावाटे बाहेर पडतो. ①②③④
१) श्वास २) ओंकार ३) उद्गार ४) एल्गार

२. उद्गार व्यक्त करणाऱ्या शब्दांना .......... शब्द म्हणतात. ①②③④
१) प्रश्नवाची २) उद्गारवाची
३) सार्वनामिक ५) कृदन्त

३. वाक्याच्या अर्थाच्या दृष्टीने केवलप्रयोगी अव्यये ........ असतात. ①②③④
१) निरर्थक २) अर्थपूर्ण
३) उदारमतवादी ४) जहाल

४. उद्गारवाची शब्द वाक्याचा भाग नसल्यामुळे त्यांना .......... नसतो. ①②③④
१) कृदन्त २) तद्धित
३) तरतमभाव ४) विभक्ती प्रत्यय

५. एकेक उद्गार म्हणजे एक ......... वाक्य असते. ①②③④
१) मिश्र २) संयुक्त ३) स्वतंत्र ४) केवल

प्रश्न ५. खालील वाक्यात योग्य केवलप्रयोगी अव्यय वापरा.

१. ........... धरण तर फुटलं. ①②③④
१) आई गं! २) शी! ३) बापरे! ४) व्वा!

२. .......... फार वाईट गोष्ट झाली ही. ①②③④
१) अरेरे! २) अय्या ३) हुश्श ४) फुस!

३. पण मन ........ स्वस्थ राहीना. ①②③④
१) मन २) स्वस्थ ३) बेटे ४) पण

४. ..........! आरोही चांगले यश मिळवलेस! ①②③④
१) अरेरे २) शी! ३) आपला ४) शाब्बास

५. ........... बाई हे काय केलेस? ①②③④
१) अरे २) अगो ३) अगी ४) अगा

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न ६. 'पादपूरणार्थक केवल प्रयोगी अव्यय' असलेले विधान पर्यायी उत्तरातील कोणते आहे? ①②③④
१) रामराम काय हा प्रसंग
२) छे मी तसं कुठं काय म्हटले
३) आणखीन काय बरे ते
४) वाहवा तू पैज जिंकलिस तर

❖ ❖ ❖

## वाक्यविचार-विभक्तींचे अर्थ

१. प्रथमा विभक्तीचा कारकार्थ कोणता? ①②③④
१) संप्रदान २) कर्म
३) कर्ता ४) अपादान

२. वाक्यात नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला कारकार्थ असे, तर त्या विभक्तीला ........ असे म्हणतात. ①②③④

१) कारकार्थ २) उपपदार्थ
३) कारकविभक्ती ४) उपपद

३. विभक्तीच्या रूपांमुळे वाक्यातील शब्दा-शब्दांमधील जे संबंध किंवा नाती जोडली जातात त्यांना ........ म्हणतात. ①②③④
१) उपपदसंबंध २) उपपदविभक्ती
३) विभक्तीचे अर्थ ४) विभक्तींचे संदर्भ

४. वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात, त्यांना ......... म्हणतात. ①②③④
१) कारकार्थ २) विभक्तीचे अर्थ
३) उपपदार्थ ४) विभक्तींचे संदर्भ

५. क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेले जे संबंध असतात त्या संबंधांना ........ म्हणतात. ①②③④
१) विभक्तींचे अर्थ २) उपपदसंबंध
३) उपपदार्थ ४) कारकार्थ

प्रश्न २. मी कोण ते ओळखा.

१. वाक्यातील क्रिया माझ्या साधनाने घडते. ①②③④
१) कर्ता २) करण ३) क्रियापद ४) कर्म

२. माझा उपयोग हाक मारताना करतात, जे नाम माझे म्हणून वापरले जाते, त्याला विकार होतो व प्रत्ययही लागतात. ①②③④
१) कर्ता २) कर्म ३) संबोधन ४) अधिकरण

३. मी निरनिराळ्या विभक्तीच्या अर्थाने निरनिराळ्या ठिकाणी नामास लागतो व ते लागण्यापूर्वी माझे बहुधा सामान्यरूप होते. ①②③④
१) संबोधन २) विभक्ती प्रतिरूपक अव्यये
३) कारकार्थ ४) उपपदार्थ

४. क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणारा वाक्यातला मी कोण? ①②③④
१) कर्म २) कर्ता ३) करण ४) अधिकरण

५. मी सांगतो की, कर्त्याने केलेली क्रिया कोणावर घडली. ①②③④
१) विभक्ती २) करण ३) कर्म ४) अधिकरण

प्रश्न ३. खालील विभक्तींचे योग्य व प्रमुख कारकार्थ सांगा.

१. प्रथमा ①②③④
१) कर्ता २) हाक ३) अपादान ४) अधिकरण

२. द्वितीया ①②③④
१) अधिकरण २) कर्ता ३) कर्म ४) अपादान

३. तृतीया ①②③④
१) करण २) कर्म ३) कर्ता ४) हाक

४. चतुर्थी ①②③④
१) करण २) कर्म ३) संप्रदान ४) संबंध

५. पंचमी ①②③④
१) करण २) संप्रदान ३) संबंध ४) अपादान

६. षष्ठी ①②③④
१) संबंध २) करण ३) अपादान ४) संप्रदान

७. सप्तमी ①②③④
१) संप्रदान २) संबंध ३) हाक ४) अधिकरण

८. संबोधन ①②③④
१) हाक २) संप्रदान ३) अधिकरण ४) संबंध

प्रश्न ४. खालील वाक्यातील उपपदार्थ सांगा

१. त्याने पाच तोळे सोने घेतले. ①②③④
१) परिणाम २) परिमाण ३) अंतर ४) मूल्य

२. तो कानाने बहिरा आहे. ①②③④
१) सान्निध्य २) न्यूनत्व ३) निमित्त ४) योग्यता

३. तो रागाने बोलला. ①②③④
१) नौविका २) निमित्त ३) हेतू ४) विषय

४. तो नोकरीस मुकला. ①②③④
१) नौविका २) निमित्त ३) वियोग ४) योग्यता

५. संत मेणाहून मऊ असतात. ①②③④
१) भेद २) तुलना ३) सहितत्व ४) योग्यता

६. काळ्याचे पांढरे झाले. ①②③④
१) भेद २) स्थित्यंतर ३) संबंध ४) साकल्य

७. योग्यतेचा माणूस ①②③④
१) साकल्य २) धर्माधर्मी ३) योग्यता ४) हेतू

८. टाळ्यांच्या गजरात ठराव मान्य झाला. ①②③④
१) सर्वोत्तमत्व २) सहितत्व
३) साकल्य ४) संबंध

९. शहाण्यात शहाणा ①②③④
१) सर्वोत्तमत्व २) सहितत्व
३) साकल्य ४) संबंध

१०. जांबाहून पेरू वेगळा आहे. ①②③④
१) तुलना २) हेतू ३) प्रयोजन ४) भेद

प्रश्न ५. खालील वाक्यातील कारकार्थ सांगा.

१. रामा इकडे ये. ①②③④
१) कर्ता २) कर्म ३) संबोधन ४) क्रियापद

२. तो दिवसाचा झोपतो. ①②③④

१) कर्ता २) करण

३) अपादान ४) अधिकरण

३. शिंक्याचे सुटले. ①②③④

१) कर्ता २) करण ३) अपादान ४) अधिकरण

४. त्याने मला ओळखले. ①②③④

१) कर्ता २) कर्म ३) करण ४) संप्रदान

५. मी एका घावात दोन तुकडे केले. ①②③④

१) कर्ता २) कर्म ३) करण ४) संप्रदान

६. तू रामाला पुस्तक दे. ①②③④

१) कर्ता २) कर्म ३) करण ४) संप्रदान

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ६. 'या कृत्याबद्दल आम्ही येथे जमलेले सर्व लोक आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो.' या वाक्यातील कर्म ओळखा. ①②③④

१) येथे जमलेले सर्व लोक २) आपले अभिनंदन

३) या कृत्याबद्दल मनःपूर्वक ४) आम्ही येथे जमलेले

❖ ❖ ❖

## प्रयोग

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. वाक्यात कर्ता/कर्म यांना प्राधान्य दिल्याने कशाचे रूप बदलते? ①②③④

१) कर्ता २) कर्म ३) नाम ४) क्रियापद

२. पूर्ण विधान करणाऱ्या एक किंवा अनेक शब्दांच्या समूहास काय म्हणतात? ①②③④

१) वाक्य २) प्रयोग ३) क्रिया ४) संबोधन

३. वाक्यातील सर्वप्रधान शब्द कोणता? ①②③④

१) मी २) कर्ता ३) क्रियापद ४) अक्षरे

४. कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्मापाशी थांबते तेव्हा ते काय होते? ①②③④

१) सकर्मक क्रियापद २) अकर्मक क्रियापद

३) भावे प्रयोग ४) वाक्य

५. स्थितिवाचक व स्थित्यंतरवाचक धातू ........ असतात. ①②③④

१) सकर्मक २) कर्म

३) अकर्मक ४) यापैकी नाही

६. कर्तरी प्रयोगात कर्ता हा नेहमी ........ असतो. ①②③④

१) संबोधनवाचक २) विभक्तीरूप

३) प्रथमान्त ४) अपूर्ण

७. कर्मणी प्रयोगात कर्म हा ........ आहे. ①②③④

१) क्रियापद २) धातुरुपेश

३) संबंधित ४) रूपकात्मक

८. इंग्रजी भाषेतील पद्धतीप्रमाणे रचना करण्याच्या नवीन प्रकारास काय म्हणतात? ①②③④

१) पुरुष कर्मणी २) समापन कर्मणी

३) कर्मकर्तरी ४) कर्म-भाव

९. सकर्मक प्रयोगात धातू कसे असतात? ①②③④

१) वाचक २) कृमीवाचक

३) कृतिवाचक ४) मनोवेधक

प्रश्न २. खालील उदाहरणावरून प्रयोग निश्चित करा.

१. तू घरी जायचे होतेस. ①②③④

१) कर्तरी-भावे २) भावे

३) कर्मणी-भावे ४) संकर

२. आज सारखे गडगडते. ①②③④

१) सकर्तृक भावे २) कर्मणी

३) कर्तरी ४) अकर्तृक भावे

३. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे. ①②③④

१) कर्मणी २) कर्तरी

३) भावे ४) यापैकी नाही

४. न्यायाधीशाकडून दंड आकारण्यात आला. ①②③④

१) कर्तृ-भावे २) कर्तृ-कर्म

३) कर्मकर्तरी ४) कर्तरी

५. त्याची गोष्ट लिहून झाली. ①②③④

१) प्रधानकर्तृक कर्मणी २) शक्य कर्मणी

३) पुरुष कर्मणी ४) समापन कर्मणी

६. त्वां काय कर्म करिजे लघू लेकराने। ①②③④

१) समापन २) प्रधानकर्तृक

३) शक्य ४) पुरुष कर्मणी

७. रामाच्याने काम करवते. ①②③④

१) प्राचीन २) शक्य कर्मणी

३) समापन ४) प्रधानकर्तृक

८. मांजराकडून उंदीर मारला गेला. ①②③④

१) प्रधानकर्तृक २) शक्य

३) प्राचीन ४) समापन

९. ती गाणे गाते. ①②③④

१) अकर्मक कर्तरी २) सकर्मक कर्तरी

३) कर्मणी ४) भावे

१०. ती घरी जाते. ①②③④

१) कर्मणी २) प्रधानकर्तृक

३) अकर्मक कर्तरी ४) सकर्मक

प्रश्न ३. खालील वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

१. शिक्षक ........... शिकवतात. (कर्तरी प्रयोग) ①②③④

१) मुलीस २) मुलांना ३) मुलास ४) मुला

२. मुलाने आंबे ........... (कर्मणी प्रयोग) ①②③④

१) खाल्ही २) खातील ३) खातो ४) खाल्ले

३. रामाने ........... मारले. (सकर्मक भावे) ①②③④

१) रावणाला २) रावणांसाठी

३) रावणास ४) रावणासाठी

४. त्याला घरी ........... (अकर्मक भावे) ①②③④

१) जाणार २) जाववते

३) नेणार ४) जाणार नाही

५. आज सारखे .......... (भावकर्तरी प्रयोग) ①②③④

१) गडगडणार नाही २) गडगडणार

३) गडगडते ४) गडगडत नाही.

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न ४. दिलेल्या वाक्यातील प्रयोगाचा प्रकार ओळखा. ①②③④

'तिचे गाणे गाऊन झाले'

१) समापन कर्मणी २) नवीन कर्मणी

३) शक्य कर्मणी ३) पुरुष कर्मणी

प्रश्न ५. 'तू मला खूप मदत केलीस.' या वाक्यातील प्रयोग कोणता? ①②③④

१) कर्तु-कर्म संकर २) कर्म-भाव संकर

३) कर्तु-भाव संकर ४) कर्मणी

प्रश्न ६. 'शंकर महादेवन् अप्रतिम गाणी गातात.' या वाक्याचे कर्मणी प्रयोगात रूपांतर कशा प्रकारे होईल? ①②③④

१) शंकर महादेवन् अप्रतिम गायले.

२) शंकर महादेवन् यांनी अप्रतिम गाणी गायली.

३) शंकर महादेवन् अप्रतिम गाणी गात आहेत.

४) वरीलपैकी एकही नाही

प्रश्न ७. 'तू कुत्र्याला मारलेस' या वाक्याचा प्रयोग ओळखा. ①②③④

१) कर्तुकर्मसंकर प्रयोग

२) कर्मभाव संकर प्रयोग

३) कर्तुभाव संकर प्रयोग

४) कर्मणी प्रयोग

प्रश्न ८. 'कोळ्याने नदीत टाकलेल्या जाळ्यामध्ये भरपूर मासे आले.' या वाक्यातील कर्ता कोणता? ①②③④

१) कोळी २) जाळे ३) मासे ४) नदी

प्रश्न ९. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा - ①②③④

'तू गाईला घालविलेस.'

१) कर्म-भाव संकर प्रयोग

२) कर्तु-कर्म संकर प्रयोग

३) कर्तु-भाव संकर प्रयोग

४) पुराण कर्मणी प्रयोग

प्रश्न १०. 'तू घरी जायचे होतेस' या वाक्याचा प्रयोग ओळखा. ①②③④

१) भावे प्रयोग

२) कर्तु-भाव संकर प्रयोग

३) कर्म-भाव संकर प्रयोग

४) कर्तु-कर्म संकर प्रयोग

प्रश्न ११. भावे प्रयोगाचे लक्षण नसलेले उदाहरण कोणत्या पर्यायी उत्तरात आहे? ①②③④

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे

२) त्याने आता घरी जावे

३) ती शाळेला जाते

४) आज सारखे गडगडते

❖ ❖ ❖

# समास

प्रश्न १. 'अ' व 'ब' गटातील एक जोडी बरोबर आहे ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'अ' (समास) | | 'ब' (पद) | |
|---|---|---|---|
| अ) | कर्मधारय समास | १) | पहिले पद प्रधान असते. |
| ब) | उपपद तत्पुरुष समास | २) | दोन्ही पदे महत्त्वाची नसतात. |
| क) | इतरेतर द्वंद्व समास | ३) | दोन्ही पदे विशेषणे असतात. |
| ड) | मध्यमपदलोपी समास | ४) | दोन्ही पदे एकाच विभक्तीत |

१) अ(४) २) ब(१) ३) क(२) ४) ड(३)

प्रश्न २. 'क्ष' व 'ज्ञ' गटातील एक जोडी विसंगत आहे. ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'क्ष' (समास) | | 'ज्ञ' (पद) | |
|---|---|---|---|
| अ) | द्वंद्व समास | १) | शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडली जातात. |
| ब) | बहुव्रीही समास | २) | पहिले पद महत्त्वाचे. |
| क) | विभक्ती तत्पुरुष समास | ३) | 'किंवा' 'अथवा' या उभयान्वयी अव्ययाचा उपयोग होतो. |
| ड) | वैकल्पिक द्वंद्व समास | ४) | दोन्ही पदे महत्त्वाची नसून तिसऱ्याच पदाचा बोध होतो. |

१) अ(२) २) ब(४) ३) क(१) ४) ड(३)

प्रश्न ३. 'अ' गटात समासाचे नाव दिले आहे. 'ब' गटात उदाहरण दिले आहे. त्यापैकी योग्य जोडी ओळखा ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | अव्ययीभाव | १) | राजवाडा, गायरान |
| ब) | बहुव्रीही | २) | आजन्म, पदोपदी |
| क) | द्वंद्व | ३) | पितापुत्र, बरेवाईट |
| ड) | तत्पुरुष | ४) | चंद्रमौळी, गजमुख |

१) अ(३) २) ब(४) ३) क(१) ४) ड(२)

प्रश्न ४. कर्मधारय समास कोणत्या समासाचा उपप्रकार आहे? ①②③④

१) अव्ययीभाव २) तत्पुरुष
३) द्विगू ४) बहुव्रीही

प्रश्न ५. समासात किमान किती शब्द व पदे एकत्र येतात? ①②③④

१) अनेक शब्द, पदे
२) एक शब्द व अनेक पदे
३) दोन शब्द किंवा पदे
४) ठरावीक शब्दच असतात.

प्रश्न ६. अव्ययीभाव समासातील सामासिक शब्दाचा वापर कशासारखा केलेला असतो? ①②③④

१) क्रियापद २) शब्दयोगी
३) केवलप्रयोगी ४) क्रियाविशेषण

प्रश्न ७. ज्या तत्पुरुष समासाच्या सामासिक शब्दातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतात, त्या समासाचे नाव कोणते आहे? ①②③④

१) कर्मधारय २) अव्ययीभाव
३) समाहारद्वंद्व ४) विभक्ती तत्पुरुष

प्रश्न ८. द्विगू समास हा पुढीलपैकी कोणत्या समासाचा उपप्रकार म्हणून ओळखला जातो? ①②③④

१) अव्ययीभाव २) इतरेतर द्वंद्व
३) कर्मधारय ४) तत्पुरुष

प्रश्न ९. अनाचार, अन्याय, नाउमेद, अहिंसा हे चार शब्द कोणत्या समासात येतात? ①②③④

१) कर्मधारय २) उपपद तत्पुरुष
३) मध्यमपदलोपी ४) नञ तत्पुरुष

प्रश्न १०. गैरहजर या शब्दाचा विग्रह करा. ①②③④

१) गैर+हजेरी २) गैर+हजर
३) गेर+हजर ४) गैर+हजेर

प्रश्न ११. रात्रंदिवस या शब्दाचा विग्रह करा. ①②③④

१) रात्र+दिवस २) रात्र+दिवसा
३) रात्री+दिवस ४) रात्र+दिवशी

प्रश्न १२. पुढील शब्दातील मूळ सामासिक शब्द कोणता ते ओळखा. ①②③④

१) दारोदारी २) सुयशी
३) प्रत्येक साली ४) प्रतिक्षण

प्रश्न १३. पुढे सामासिक शब्दांचे विग्रह दिले आहेत. त्यातून समाहार द्वंद्व समास ओळखा. ①②③④

१) तप हेच धन २) रक्ता सारखे चंदन
३) पानपत्रावळ वगैरे ४) देव आणि दानव

२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न १४. 'गावजेवण' हा पुढीलपैकी कोणता समास आहे? ①②③④

१) षष्ठी तत्पुरुष २) सप्तमी तत्पुरुष

३) चतुर्थी तत्पुरुष ४) पंचमी तत्पुरुष

प्रश्न १५. 'पाणक्या', 'गळेकापू' हे शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहेत? ①②③④

१) उपपद तत्पुरुष २) मध्यमपदलोपी

३) बहुव्रीही ४) अव्ययीभाव

प्रश्न १६. खालीलपैकी कोणता शब्द अरबी - फारसी उपसर्ग लागून तयार झाला आहे? ①②③④

१) दररोज २) प्रगल्भ ३) आडकाठी ४) उपभेद

❖ ❖ ❖

## शब्दसिद्धी

### आपल्या भाषेतील शब्दसंपत्ती

प्रश्न १. शब्द कसा बनतो म्हणजेच सिद्ध होतो, त्याला .......... म्हणतात. ①②③④

१) तद्भव शब्द २) शब्द साधिते

३) शब्दसिद्धी ४) तत्सम शब्द

प्रश्न २. खालील शब्दातील तद्भव असणारा शब्द ओळखा. ①②③④

१) क्लेश - कष्ट

२) कळस - देवळाच्या वरचा भाग

३) कलश - तांब्या ४) पृथ्वी

प्रश्न ३. अ व ब गटातील एक जोडी विसंगत आहे ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | तत्सम शब्द | १) | संस्कृत भाषेतले शब्द काही फरक न होता मराठी भाषेत आले आहेत. |
| ब) | तद्भव शब्द | २) | संस्कृत शब्दांच्या मूळ रूपात बदल होऊन मराठीत आलेले आहेत. |
| क) | शब्दसिद्धी | ३) | शब्द कसा बनतो म्हणजेच सिद्ध होतो. |
| ड) | परभाषीय शब्द | ४) | ज्या शब्दांना सरळ व्युत्पत्ती मिळत नाही. |

१) अ-१ २) ब-२ ३) क-३ ४) ड-४

प्रश्न ४. खालील उदाहरणे कोणत्या शब्दसिद्धीच्या प्रकारात मोडतात ते ओळखा.

१. तामिळी - चिह्नीपिह्नी, सार, मठ्ठा ①②③④

१) विदेशी शब्द २) स्वदेशी शब्द

३) तत्सम शब्द ४) तद्भव शब्द

प्रश्न ५. मराठी भाषेच्या शब्द संपत्तीत भर घालणाऱ्या परकीय शब्दांचे किती प्रकार आहेत. ①②③④

१) दोन २) तीन ३) सहा ४) चार

प्रश्न ६. चिमणी, ढेकूण, बोका, झोप या शब्दांना ......... शब्द म्हणतात. ①②③④

१) परभाषीय २) तत्सम ३) विदेशी ४) देशज

प्रश्न ७. खालील शब्दातील तद्भव शब्द शोधा. ①②③④

१) कर्म २) भ्रातृ ३) मस्तक ४) कोवळा

प्रश्न ८. गटात न बसणारा शब्द लिहा. ①②③④

१) कवि २) गुरू ३) घर ४) मधु

प्रश्न ९. क्लेश = ①②③④

१) त्रास २) संकट ३) कष्ट ४) यांपैकी नाही

प्रश्न १०. संस्कृत प्रत्यय लागून तयार झालेला तद्धित शब्द ....... आहे. ①②③④

१) हसरा २) गुरूत्व ३) भांडखोर ४) धावरा

प्रश्न ११. 'आ' हे प्रत्यय लागून बनलेले धातुसाधित ......... आहे. ①②③④

१) चिंता २) चरण ३) भर्ता ४) श्रोता

प्रश्न १२. 'ईव' प्रत्यय लागून बनलेले धातुसाधित ......... आहे. ①②③④

१) सडीक २) जाणीव ३) उडी ४) पडीक

प्रश्न १३. दळणावळ, लिहिणावळ या शब्दांना ........ प्रत्यय लागलेला आहे. ①②③④

१) वळ २) अ ३) णावळ ४) आ

प्रश्न १४. एक पूर्ण शब्द जेव्हा पुन:पुन्हा येऊन एक जोडशब्द बनतो, तेव्हा त्याला ............ शब्द म्हणतात. ①②③④

१) अंशाभ्यस्त २) अनुकरणवाचक

३) पूर्णाभ्यस्त ४) अभ्यस्त

प्रश्न १५. गटात न बसणारा शब्द ओळखा ①②③④

१) तिळतिळ २) एकेक

३) मागोमाग ४) गोडधोड

प्रश्न १६. हळू शब्दांपासून अभ्यस्त शब्द .......... होईल. ①②③④

१) हळू २) भरभर

३) हळूहळू ४) कोणताही नाही

प्रश्न १७. नवीस = ........... हा तद्धित शब्द येईल. ①②③④

१) फडणीस २) चिटणीस

३) फडनवीस ४) यांपैकी नाही

प्रश्न १८. गटात न बसणारा शब्द ओळखा ①②③④

१) पोळपाट २) नीळकंठ ३) धनवान ४) देवघर

**सिद्ध, साधित, उपसर्ग, प्रत्यय**

प्रश्न १९. जा, ये, कर, बस, पी या शब्दाचा समावेश कशात होतो? ①②③④

१) साधित शब्द २) प्रत्ययघटित शब्द

३) सिद्ध शब्द ४) देशी शब्द

प्रश्न २०. होकार, प्रतिकार, करू, करून यांसारखे शब्द बनवितात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) तत्सम शब्द २) प्रत्यय

३) सिद्ध शब्द ४) साधित शब्द

प्रश्न २१. 'उपाहार' या शब्दात उपसर्ग कोणता आहे. ①②③④

१) परि २) उप ३) अप ४) प्र

प्रश्न २२. अप + हार = ........ ①②③④

१) उपाहार २) उपहार ३) अपहार ४) आहार

प्रश्न २३. उपसर्गघटित शब्द ओळखा. ①②③④

१) विशेष २) विनंती ३) विनय ४) विभावरी

प्रश्न २४. प्रत्ययघटित शब्द ओळखा. ①②③④

१) निर्मम २) अभ्युदय ३) आनंद ४) चराऊ

**उपसर्गघटित शब्द**

प्रश्न २५. खालीलपैकी कोणता उपसर्ग संस्कृतमधील आहे. ①②③④

१) उप २) नि ३) गैर ४) यापैकी नाही

प्रश्न २६. गैर हा ........ उपसर्ग आहे. ①②③④

१) मराठी २) फारसी

३) संस्कृत ४) वरीलपैकी सर्व

प्रश्न २७. खालील उपसर्ग कोणत्या प्रकारात मोडतात ते लिहा.

१. प्रति - उलट फिरून ①②③④

१) संस्कृत २) मराठी

३) फारसी व अरबी ४) यापैकी नाही

२. बे - वाचून, शिवाय ①②③④

१) मराठी २) संस्कृत

३) फारसी व अरबी ४) वरीलपैकी सर्व

३. फट - फार, उघड ①②③④

१) फारसी २) मराठी

३) संस्कृत ४) यांपैकी नाही

**प्रत्ययघटित शब्द**

प्रश्न २८. 'कर्तव्य' या शब्दाला कोणता प्रत्यय जोडला आहे. ①②③④

१) तृ २) तव्य ३) अव्य ४) य

प्रश्न २९. मराठी प्रत्यय लावून बनलेला शब्द ओळखा. ①②③④

१) लिहिणार २) रमणीय

३) परकीय ४) शिलाई

प्रश्न ३०. 'कृत' प्रत्यय जोडल्याने जे शब्द तयार होतात त्यांना ....... म्हणतात. ①②③④

१) प्रत्ययघटित शब्द २) नामसाधित

३) कृदन्त ४) तद्धित

प्रश्न ३१. 'खोदाई' या शब्दाला खालीलपैकी कोणता प्रत्यय लागला आहे. ①②③④

१) आ २) ई ३) ई-इ ४) आई

प्रश्न ३२. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) श्रवणीय २) रमणीय ३) कोरीव ४) वंदनीय

**शब्दसाधिते/तद्धिते**

प्रश्न ३३. धातूखेरीज इतर शब्दांना प्रत्यय लागून जे नवीन शब्द तयार होतात त्यांना ........ म्हणतात. ①②③④

१) कृदन्त २) तद्धिते

३) धातुसाधिते ४) प्रत्यय घटित

प्रश्न ३४. 'बुद्धिमान' शब्दाला कोणता प्रत्यय लावलेला आहे. ①②③④

१) वान २) अ ३) मान ४) यांपैकी नाही

प्रश्न ३५. फारसी प्रत्यय लागून तयार झालेला तद्धित शब्द कोणता? ①②③④

१) वाईक - तन्हेवाईक २) नामा - पंचनामा

३) आ - ओढा ४) इत - आनंदित

प्रश्न ३६. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) कमलदान २) अहमदाबाद

३) धारदार ४) धनवान

प्रश्न ३७. अभ्यस्त म्हणजे ........ करणे. ①②③④

१) दुप्पट २) तिप्पट

३) चौपट ४)वरीलपैकी नाही

प्रश्न ३८. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) तिळतिळ २) तुकडेतुकडे

३) मागोमाग ४) खर्चवेच

प्रश्न ३९. खालील शब्दात फारसी+फारसी असणारा शब्द ओळखा. ①②③④

१) जुलूमजबरी २) कागदपत्र

३) धनदौलत ४) यांपैकी नाही

प्रश्न ४०. ध्वनिवाचक शब्दाची पुनरूक्ती साधलेल्या शब्दांना काय म्हणतात? ①②③④

१) अंशाभ्यस्त शब्द २) अनुकरणवाचक शब्द

३) अभ्यस्त शब्द ४) पूर्णाभ्यस्त शब्द

प्रश्न ४१. खालील शब्दातील अनुकरणवाचक शब्द ओळखा. ①②③④

१) किरकीर २) रीतरिवाज

३) मागोमाग ४) घरघर

प्रश्न ४२. खालील चार शब्दांपैकी एकच शब्द डावीकडील अभ्यस्त शब्दांच्या प्रकारात मोडतो तो शब्द कोणता?

१. अनुकरणवाचक शब्द ①②③④

१) घेईघेई २) हळूहळू ३) बाजारहाट ४) तुरूतुरू

२. अंशाभ्यस्त शब्द ①②③④

१) दगडबिगड २) गडगड

३) तिळतिळ ४) यांपैकी नाही

३. पूर्णाभ्यस्त शब्द ①②③④

१) दंगामस्ती २) वा ! वा !

३) थट्टामस्करी ४) यांपैकी नाही

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

प्रश्न ४३. दिलेल्या पर्यायातील तत्सम शब्द निवडा. ①②③④

१) पिता २) सासू ३) खुळा ४) रेडा

प्रश्न ४४. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत? ①②③④

१) ओसरी, डोंगर, उतरंड २) मठ, शेत, तेल

३) आंगण, देऊळ, कणिक ४) हाट, गुंडा, गुढघा

प्रश्न ४५. आजन्म, आमरण, आकर्ण या शब्दांमध्ये आलेला उपसर्ग पुढीलपैकी कोणत्या अर्थासाठी उपयोगात येत नाही? ①②③④

१) पूर्वी २) पासून ३) पर्यंत ४) पलीकडे

प्रश्न ४६. 'धडाधड' हा शब्द, शब्दसिद्धीच्या कोणत्या उपप्रकारातील आहे? ①②③④

१) प्रत्यय घटित २) उपसर्ग घटित

३) अभ्यस्त ४) सामासिक

प्रश्न ४७. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत? ①②③④

१) इलाखा, खुशाल, मजूर २) घोडा, डाहळी, पोट

३) वहाण, रक्त, तूप ४) कोठार, शेत, सोने

प्रश्न ४८. खालील शब्दातील देशी शब्द ओळखा ①②③④

१) ढेकूण २) सामना ३) जाहीर ४) डबा

प्रश्न ४९. पर्यायी उत्तरातील गटाबाहेरचा 'साधित शब्द' कोणता? ①②③④

१) कायिक २) आनंदित ३) स्वकीय ४) नातेवाईक

प्रश्न ५०. पर्यायी उत्तरातील - अंशाभ्यस्त शब्दांतील गटाबाहेरच्या अंशाभ्यस्त शब्द कोणता? ①②③④

१) कागदपत्र २) साजशृंगार

३) बाजारहाट ४) अर्धामुर्धा

प्रश्न ५१. खालील परप्रांतीय भारतीय शब्द कोणत्या प्रांतातून आले आहेत ते सांगा? ①②③④

'चिल्ली पिल्ली, सार, मठ्ठा'

१) कानडी २) गुजराती ३) तामिळी ४) तेलगू

प्रश्न ५२. 'ऐवजी' या शब्दयोगी अव्ययाचा उपप्रकार ओळखा. ①②③④

१) तुलनावाचक २) विरोधवाचक

३) कैवल्यवाचक ४) विनिमयवाचक

प्रश्न ५३. 'तात्कालिक' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या उपप्रकारातील आहे? ①②③④

१) उपसर्ग घटित २) शब्दसाधित

३) धातुसाधित ४) अभ्यस्त

प्रश्न ५४. खालील शब्द कोणत्या 'शब्दसिद्धी' प्रकारचा आहे? ①②③④

'मस्तक'

१) तत्सम २) तद्भव ३) देशी ४) परकीय

प्रश्न ५५. खालीलपैकी कोणता शब्द अरबी भाषेतून आला आहे? ①②③④

१) करोड २) गाजर ३) अत्तर ४) मेहनत

प्रश्न ५६. पुढीलपैकी मराठी प्रत्यय लागून झालेला तद्धित शब्द कोणता? ①②③④

१) धार्मिक २) जडत्व ३) उत्कंठित ४) शिष्टाई

प्रश्न ५७. 'भगिनीमंडळ' हा शब्द खालीलपैकी कोणत्या शब्दप्रकारातील आहे? ①②③④

१) हिंदी २) देशी ३) तत्सम ४) तद्भव

प्रश्न ५८. पुढीलपैकी सिद्ध शब्दांचा गट कोणता? ①②③④

१) कर, पाह, आपण

२) करा, पाहणी, ने-आण

३) बोलाचाली, जाऊन, येथून

४) चाल, आणणावळ, सुकर

प्रश्न ५९. पुढीलपैकी मराठी प्रत्यय लागून झालेली शब्द-साधिते कोणती, ते ओळखा. ①②③④

१) राघव, सौभद्र, कायिक, उत्कंठित

२) नवीन, राजकीय, जडत्व, श्रीमान

३) लौकिक, आनंदित, कुलीन, महत्त्व

४) भरडा, मातकट, शेतकी, भोळसर

❖ ❖ ❖

## वाक्यसंश्लेषण

प्रश्न १. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायाने नोंदवा.

१. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांना काय म्हणतात? ①②③④

१) करणरुपी - अकरणरुपी २) आज्ञार्थी

३) नकारार्थी ४) प्रश्नार्थी

२. ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते ते ........ होय. ①②③④

१) प्रश्नार्थी २) नकारार्थी

३) विधानार्थी ४) होकारार्थी

३. ज्या वाक्यात भावनेचा उद्‌गार काढतात. ते ........ वाक्य होय. ①②③④

१) अकरणरुपी २) उद्‌गारार्थी ३) स्वार्थी ४) आज्ञार्थी

४. वाक्यसंश्लेषण म्हणजे ........ होय. ①②③④

१) वाक्यविचार २) संमिश्र वाक्य

३) वाक्य ४) वाक्यसंकलन

५. एकच उद्देश्य व एकच विधेय असणारे ........ वाक्य होय. ①②③④

१) केवल २) मिश्र ३) करणरूप ४) संयुक्त

६. जे वाक्य स्वतंत्र असते त्यास ........ वाक्य म्हणतात. ①②③④

१) गौण २) मिश्र ३) प्रधान ४) संयुक्त

७. निर्दोष वाक्यरचनेसाठी कशाचा अभ्यास उपयोगी पडतो? ①②③④

१) व्याकरण २) बाराखडी ३) वाचन ४) लेखन

८. एखाद्या नामाचे स्पष्टीकरण करणाऱ्या त्याच अर्थाच्या शब्दास काय म्हणतात? ①②③④

१) भाववाचक नाम २) विशेषनाम

३) समानाधिकरण ४) धातुसाधित

९. शेवटी प्रश्नचिन्ह असेल तर ते वाक्य कोणते समजावे? ①②③④

१) विधानार्थी २) उद्‌गारार्थी

३) नकारार्थी ४) प्रश्नार्थक

१०. अर्थावरुन वाक्याचे किती प्रकार पडतात? ①②③④

१) पाच २) चार ३) एक ४) यांपैकी नाही

११. वाक्यातील विधानावरून वाक्याचे किती प्रकार होतात? ①②③④

१) चार २) तीन ३) पाच ४) दोन

१२. अकरणरूपी हे कोणते वाक्य असते? ①②③④

१) होकारार्थी २) प्रश्नार्थक

३) उद्‌गारार्थी ४) नकारार्थी

प्रश्न २. अर्थावरून पडणारे प्रकार आणि वाक्य यांची एक योग्य जोडी खालील पर्यायातून निवडून पर्याय रंगवा. ①②③④

| | 'अ' | | 'ब' |
|---|---|---|---|
| अ) | विधानार्थी वाक्य | १) | दुसऱ्याची निंदा करू नये. |
| ब) | प्रश्नार्थक वाक्य | २) | नेहमी खरे बोलावे. |
| क) | उद्गारार्थी वाक्य | ३) | मी इयत्ता दहावीत शिकतो. |
| ड) | नकारार्थी वाक्य | ४) | शीऽ! काय हे अक्षर तुझे! |

१) क(४) २) अ(१) ३) ब(२) ४) ड(३)

प्रश्न ३. खालील विधानावरून वाक्याचे प्रकार ओळखा.

१. देह जावो अथवा राहो. ①②③④

१) होकारदर्शक २) विकल्परहित
३) संयुक्तवाक्य ४) मिश्रवाक्य

२. सूर्य रोज पूर्वेला उगवतो. ①②③④

१) संयुक्तवाक्य २) मिश्रवाक्य
३) साधेवाक्य ४) केवलवाक्य

३. 'गर्जेल तो पडेल काय!' हे वाक्य कोणत्या प्रकारात मोडते? ①②③④

१) विधानार्थी २) प्रश्नार्थी
३) केवलवाक्य ४) मिश्रवाक्य

४. 'रंगरंगोटीशिवाय घर सुंदर दिसत नाही' या वाक्याचे होकारार्थी वाक्य करा. ①②③④

१) केवळ रंगरंगोटीने घर सुंदर दिसते.
२) रंगरंगोटीशिवाय घर सुंदर दिसते.
३) रंगरंगोटी केल्यावर घर सुंदर दिसते.
४) रंगरंगोटीने घर खराब दिसते.

प्रश्न ४. 'समाजात परिवर्तन घडवून आणणे हे सामूहिक स्वरूपाचे कार्य आहे.' या वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांतर कसे होईल? ①②③④

१) समाजात परिवर्तन घडवून आणणे हे सामूहिक स्वरूपाचे कार्य नाही.
२) समाजात परिवर्तन घडवून आणणे हे वैयक्तिक स्वरूपाचे कार्य नाही.
३) समाजात परिवर्तन न घडवणे हे सामूहिक स्वरूपाचे कार्य आहे.
४) समाजात परिवर्तन घडू न देणे हे सामूहिक स्वरूपाचे कार्य आहे.

## २०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न ५. खालील विधानातील अधोरेखित शब्दसमूहाचे पर्यायी उत्तरातील योग्य पर्यायी उत्तर कोणते? ①②③④

'तो चोर गाडी भरधाव घेऊन पळाला.'

१) मुख्य उद्देश्य २) उद्देश्य विस्तार
३) मुख्य विधेय ४) विधेय विस्तार

प्रश्न ६. खालील वाक्यातील 'नकारार्थी वाक्य' कोणते? ①②③④

१) तो घरी आल्याशिवाय राहाणार नाही.
२) काय म्हणता तो घरी खात्रीने येणार.
३) अरेच्चा ,शेवटी तो घरी आलाच.
४) तो घरी येणारच नाही.

प्रश्न ७. खालील पर्यायी उत्तरातील 'प्रश्नार्थक वाक्य' कोणते? ①②③④

१) कालची किती ती गर्दी
२) कालची गर्दी नव्याने का सांगायला हवी.
३) काल खूपच गर्दी होती.
४) काल गर्दी नव्हती असे नाही.

प्रश्न ८. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक अतिशय गुंतागुंतीचे गणित सोडविण्यास दिले.' अधोरेखिताचे वाक्यातील स्थान पुढीलपैकी कोणते? ①②③④

१) विधेयपूरकाचा विस्तार २) विधिपूरकाचा विस्तार
३) कर्मपूरकाचा विस्तार ४) उद्देश्य विस्तार

प्रश्न ९. 'यात्रेकरूंना मंदिरात प्रवेश मिळावा' या विधानाचा उपप्रकार ओळखा. ①②③④

१) विधानार्थी वाक्य २) आज्ञार्थी वाक्य
३) विध्यर्थी वाक्य ४) संकेतार्थी वाक्य

प्रश्न १०. 'मी तिला पाहिले, ती बाजारात भाजी घेत होती.' या वाक्यांचे मिश्र वाक्य कशाप्रकारे होईल? ①②③④

१) बाजारात भाजी घेताना मी तिला पाहिले.
२) मी तिला बाजारात भाजी घेत असलेली पाहिली.
३) मी तिला पाहिले पण ती बाजारात भाजी घेत होती.
४) जेव्हा मी तिला पाहिले, तेव्हा ती बाजारात भाजी घेत होती.

❖ ❖ ❖

# वृत्ते

**गद्य व पद्य यातील फरक**

**प्रश्न १. ........... शब्दरचनेला पद्य म्हणतात.** ①②③④

१) लयबद्ध  २) चरण  ३) पद्य  ४) ओळी

**प्रश्न २. 'वृत्त' किंवा 'छंद' =** ①②③④

१) पद्यात जी विशिष्ट शब्दरचना आपण करतो.
२) स्वाभाविक बोलण्याला.
३) गद्यामध्ये एकामागून एक वाक्ये येतात.
४) विचार व्यक्त करण्याची पद्धत.

**प्रश्न ३. सदा सर्वदा योग तूझा घडावा।**
**तुझे कारणी देह माझा पडावा।**
**उपेक्षू नको गूणवंता अनंता।**
**रघूनायका मागणे हेचि आता।।**
**अशा प्रकारच्या रचनेला ........ असे म्हणतात.** ①②③④

१) मात्रावृत्त  २) अक्षरगणवृत्त
३) छंद  ४) वृत्त

**प्रश्न ४. 'मात्रा' कशास म्हणतात?** ①②③④

१) पद्यरचनेत अक्षरांपेक्षा मात्रांचे बंधन आहे.
२) लघुगुरूंचा क्रम सारखा आहे.
३) एखाद्या अक्षराचा उच्चार करण्यास जो कालावधी किंवा वेळ लागतो.
४) यांपैकी नाही

**प्रश्न ५. क, कि, कु, कृ यांसारख्या स्वरयुक्त अक्षरांस ........ म्हणतात.** ①②③④

१) गुरू अक्षरे  २) लघु-गुरू अक्षरे
३) गुरूक्रम  ४) लघू अक्षरे

**प्रश्न ६. लघू अक्षर = ......... असे दाखवितात.** ①②③④

१) ●  २) U  ३) ,  ४) ।

**प्रश्न ७. गुरू अक्षर ........ ने दाखवितात.** ①②③④

१) –  २) O  ३) U  ४) \

**प्रश्न ८. खालील शब्दांचे लघुगुरूक्रम लिहा.** ①②③④

**१. यशोदा =**
१) – – –  २) – U –
३) U – –  ४) U U U

①②③④
**२. सुमन =**
१) – U U  २) U U U
३) – U –  ४) – – –

①②③④
**३. मीनाक्षी =**
१) – – –  २) U U U
३) – U –  ४) – U U

**प्रश्न ९. खालील शब्दांच्या मात्रासंख्या लिहा.** ①②③④

**१. सरला**
१) ३  २) ४  ३) २  ४) ५

①②③④
**२. मालन**
१) १, १, २  २) २, २, २
३) २, १, १  ४) २, १, २

①②③④
**३. राधिका**
१) ५  २) ४  ३) ६  ४) ३

**प्रश्न १०. खालील जोड्यांतील अयोग्य जोडी ओळखा.** ①②③④

१) पुस्तक = – U U  २) अंगण = – U U
३) दु:खाने = – – –  ४) उन्हात = U – U

**प्रश्न ११. तीन अक्षरी लघुगुरूक्रमाने एकंदर ........ गण पडतात.** ①②③④

१) आठ  २) सात  ३) सहा  ४) पाच

**प्रश्न १२. कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप ........** ①②③④

१) मात्रा  २) गण  ३) लघुगुरूक्रम  ४) यती

**प्रश्न १३. 'अ' व 'ब' गटातील एक जोडी विसंगत आहे ती कोणती ते पर्यायी उत्तरातून शोधा.** ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | शेवटचे अक्षर गुरू | १) | मध्य लघू |
| ब) | मधले अक्षर लघू | २) | अंत्य गुरू |
| क) | आरंभीचे अक्षर लघू | ३) | सर्व गुरू |
| ड) | प्रत्येक अक्षर गुरू | ४) | आद्य गुरू |

१) अ(२)  २) ब(१)  ३) क(४)  ड(३)

**प्रश्न १४. म, स, ज, भ, न, ....,र, य (रिकाम्या जागी गणाचे नाव लिहा.)** ①②③④

१) क  २) त  ३) ट  ४) ल

**प्रश्न १५. जनास = ........ येईल?** ①②③④

१) U U –  २) – – –
३) U – U  ४) U U U

**प्रश्न १६. 'पखरण बघ घाली भूवरी पारिजात' या काव्यपंक्तीमधील परिजात शब्दाचे गण कसे पाडता येतील ते शोधा.** ①②③④

१) – U – –  २) – U U –
३) U – – –  ४) U U – –

**गणलेखनाची पद्धत**

**प्रश्न १७. 'महाराष्ट्री सृष्टी स्वविभव चतुर्मास मिरवी' या काव्यपंक्तीचे तीन अक्षरांचे गट पाडून कोणती अक्षरे शिल्लक राहतील. ते पर्यायातून शोधा.** ①②③④

१) समि  २) रवी  ३) मिरवी  ४) समिरवी

प्रश्न १८. 'मना सज्जना तू कडेनेच जावे' ही काव्यपंक्ती म्हणताना 'यती' कितव्या अक्षरावर येते ते ओळखा. ①②③④

१) सहाव्या　　२) पाचव्या
३) तिसऱ्या　　४) दुसऱ्या

प्रश्न १९. कवितेचा चरण म्हणत असताना आपण मध्येच थांबतो या थांबण्याच्या विरामाला ........ म्हणतात. ①②③④

१) गण　　२) यतिभंग　　३) यती　　४) लगक्रम

वृत्ते

प्रश्न २०. हा जातिविध्वंसन काल आला
समानतेच्या उभवा ध्वजाला
राष्ट्रीय जो सर्व जनाभिमानी
न जाति तो वा उपजाति मानी

वरील वृत्तांच्या मिश्रणास ........ हे नाव देता येईल. ①②③④

१) उपेंद्रवज्रा　　२) उपजाती
३) इंद्रवज्रा　　४) मालिनी

प्रश्न २१. 'मंदाक्रांता सरस कविता कालिदासी विलासी' या चरणात ........ अक्षरे आहेत. ①②③④

१) १२　　२) १५　　३) १७　　४) १४

प्रश्न २२. दुःखी जगा देखुनिया द्रवे ते
सच्चित माते नवनीत वाटे
अन्याय कोठे दिसता परी ते
त्या इंद्रवज्रासहि लाजवीते
येथे कोणते वृत्त आहे? ①②③④

१) इंद्रवज्रा　　२) मात्रावृत्त
३) द्रुतविलंबितवृत्त　　४) पृथ्वी

प्रश्न २३. 'कुणी दुष्ट अंगास लावील हात
तरी दाखवावा भुजंगप्रयात'
यामध्ये यती कितव्या अक्षरावर आहे. ①②③④

१) चौथ्या व सहाव्या　　२) सहाव्या
३) चरणाच्या शेवटी　　४) आठव्या

प्रश्न २४. 'द्रुतविलंबति जे श्रम फोल ते. याचे गण पर्यायातून ओळखा.' ①②③④

१) य-य-य-य　　२) न-न-म-य-य
३) ज-त-ज-त-ग-ग　　४) न-भ-भ-र

प्रश्न २५. 'वृत्ती वसंततिलका न तुझी खुले का?' याचा लगक्रम ①②③④

१) U U U | – U U | – U U | – U –
२) U – – | U – – | U – – | U – –
३) – – U | – U U | U – U | U – U | – –
४) – – – | – U U | U U U | – – U | – – U | – –

प्रश्न २६. 'न-न-म-य-य' या अक्षरगणवृत्तांनी ........ तयार होते. ①②③④

१) वसंततिलका　　२) मालिनी
३) भुजंगप्रयात　　४) यापैकी नाही

प्रश्न २७. त-भ-ज-ज-ग-ग हे ........ या वृत्ताचे गणलेखन आहे. ①②③④

१) वसंततिलका　　२) मालिनी
३) भुजंगप्रयात　　४) यापैकी नाही

मात्रावृत्ते (जाती) उदाहरणे व लक्षणे

प्रश्न २८. खालील ओळीतून बालानंद वृत्त कोणते ते ओळखा. ①②③④

१) हिरवे हिरवे गार गालिचे
२) उद्धवा शांतवन कर जा। त्या गोकुलवासि जनांचे।।
३) आनंदी आनंदी गडे। इकडे तिकडे चोहिकडे
४) चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूपखाणी

प्रश्न २९. खाली मात्रावृत्ताचे नाव दिले असून चार पर्यायी ओळी दिलेल्या आहेत त्यापैकी ती ओळ कोणत्या मात्रावृत्ताचे उदाहरण आहे, तो पर्याय क्रमांक लिहा.

१. सूर्यकांत - ①②③④

१) पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर
२) पतिव्रता सद्गुणी शहाणी, पतिही वाखाणी
३) भूपती खरे ते वैभवसुख सेवीती
४) चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूपखाणी

२. लवंगलता - ①②③④

१) ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची
२) कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे
३) पतीतपावन नाम ऐकुनी आलो मी दारा
४) पाहा दिंडी चालली पंढरीला

३. फटका - ①②③④

१) का उठता खाली बसा तरुण मंडळी
२) केशवकरणी अद्भुतलीला नारायण तो कसा
३) तयाचा सकल जनांवर ठसा
४) संसारामधि ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको

प्रश्न ३०. फटका या वृत्ताला माधवराव पटवर्धनांनी ........ नाव दिले. ①②③④

१) लवंगलता　　२) सूर्यकांत
३) हरिभगिनी　　४) पतितपावन

प्रश्न ३१. 'मुद्रिकेराम टाकुनी आलिस तू कशी' या जुन्या पद्यावरून ........ या वृत्ताला हे नाव पडले. ①②③④

१) साकी　　२) मुद्रिका　　३) अक्रूर　　४) फटका

प्रश्न ३२. नववधू प्रिया, मी बावरते यात ........ मात्रा आहेत. ①②③④

१) १८　　२) १६　　३) १४　　४) १३

प्रश्न ३३. जीवनलहरी वृत्ताचे उदाहरण खालील पर्यायातून शोधून लिहा. ①②③④

१) फुलराणी ही खेळत होती
२) हुबेहुब हे त्याच परी
३) उल्कांचे दिव्य थवे
४) आनंदी आनंद गडे। इकडे तिकडे चोहिकडे

**प्रश्न ३४. 'अ' व 'ब' गटातील विसंगत जोडी ओळखा.** ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | मालिनी | १) | परतुनि तया मागे मागे पाहा हरिणी निघे. |
| ब) | शिखरिणी | २) | धरणि हरितवस्त्रा मालिनी साजते ही. |
| क) | मंदाक्रांता | ३) | मंदाक्रांता सरस कविता कालिदासी विलासी. |
| ड) | पृथ्वी | ४) | पाहा सह्याचीच प्रखर गिरिराजी शिखरिणी. |

१) अ(२) २) ब(४) ३) क(३) ४) ड(१)

**प्रश्न ३५. खालील चरण कोणत्या वृत्ताचे उदाहरण आहे. हे पर्यायांतून शोधा.**
**भाषा संस्कृति थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे** ①②③④

१) सुमंदारमाला २) शार्दुलविक्रीडित
३) मंदारमाला ४) स्रग्धरा

**प्रश्न ३६. सुमंदारमाला -** ①②③④

१) तेजोराशी प्रभूची चिररूचिर वधू प्रकृति स्रग्धरा ही!
२) वीणा करी मंजु झंकार हाती, असे शारदा ही जगन्मोहिनी
३) पुरी बाणली बंधुता अंतरंगी, हिच्या एक ताटात आम्ही बसू
४) विलंबित गति त्यजी, द्रवुनि धाव पृथ्वीकडे

**प्रश्न ३७. सहा मात्रांच्या गटाला ......... म्हणतात.** ①②③④

१) पद्य २) कवळलिंब ३) भृंग ४) समजाती

**प्रश्न ३८. 'पाहा दिंडी चालली पंढरीला' यातील मात्रांची संख्या किती आहे?** ①②③④

१) ३० २) १५ ३) १८ ४) १९

**प्रश्न ३९. 'ओवी ज्ञानेशाची' मात्रा लिहा.** ①②③④

१) २ २ १ २ २ २ २) १ २ २ २ २ १
३) २ २ २ २ २ २ ४) १ २ १ २ १ १

**छंद**

**प्रश्न ४०. अभंगाचे मुख्य प्रकार ........ आहेत.** ①②③④

१) तीन २) चार ३) दोन ४) पाच

**प्रश्न ४१. जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।। प्रकार ओळखा.** ①②③④

१) लहान अभंग २) ओवी
३) अभंग ४) मोठा अभंग

**प्रश्न ४२. खालील पर्यायातून ओवीचा पर्याय शोधा.** ①②③④

१) भ्रताराच्या राज्यी । उणे ठेवीना रे देव ।
२) अंगी असोनि जाणपण । सदा सर्वदा तो लीन ।।
३) हुबेहुब हे त्याचपरी
४) क्षणभंगुर जीवित हे । क्षणभंगुर या जगती ।।

**प्रश्न ४३. खालील ओव्यांच्या प्रकारातील स्त्रीगीत ओवी ओळखा.** ①②③④

१) ग्रंथा नाम दासबोध । गुरूशिष्यांचा संवाद ।
२) बाळ जातो दूर देशा। मन गेले वेडावून।
३) भ्रताराच्या राज्यी। उणे ठेवीना रे देव।
४) पहिली माझी ओवी। पहिला माझा नेम।

**मुक्तछंद**

**प्रश्न ४४. मुक्तछंदात छोटे-छोटे चरण असतात त्यांना ........ म्हणतात.** ①②③④

१) मुक्तछंद २) चरण
३) उपचरणक ४) चरणक/उपचरण

**प्रश्न ४५. "वेगानं निघून जाताना निदान वळून तरी बघायचे होते, वस्ती जळत होती आणि आमचे हात वर होते." हे ........ प्रकारचे उदाहरण आहे.** ①②③④

१) ओवी २) अभंग ३) मुक्तछंद ४) अनुष्टुभ्

**प्रश्न ४६. 'दोन दिवस' ही कविता ........ यांची आहे.** ①②③④

१) नारायण सुर्वे २) लोकनाथ यशवंत
३) बहिणाबाई चौधरी ४) अनुराधा पाटील

**प्रश्न ४७. अर्भकाचेसाठी। पंते हाती धरिली पाटी। हा अभंग ......... आहे.** ①②③④

१) एकनाथ २) तुकाराम
३) रामदास ४) ज्ञानेश्वर

❖ ❖ ❖

## भाषेचे अलंकार

**प्रश्न १. भाषेला ज्यामुळे शोभा येते, त्या गुणधर्मांना ........ असे म्हणतात.** ①②③④

१) भाषेचे दागिने २) भाषेची समृद्धी
३) भाषेचे अलंकार ४) शब्दसिद्धी

**प्रश्न २. गडद निळे, गडद निळे जलद भरूनि आले शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले रजतनील, ताम्रनील**

स्थिर पल जल पल सलील
हिरव्या तटि नावांचा कृष्ण मेळ खेळे
या काव्यपंक्तीत कोणता अलंकार निर्माण झाला आहे. ①②③④

१) श्लेष २) शब्दश्लेष
३) अर्थालंकार ४) अनुप्रास

प्रश्न ३. सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ।।
या काव्यपंक्तीत कोणता अलंकार तयार झाला आहे. ①②③④

१) पुष्पयमक २) शब्दश्लेष ३) रूपक ४) दृष्टान्त

प्रश्न ४. पद्यपंक्तीतील त्या त्या शब्दांची फोड केल्यानंतर दोन अर्थ कळून येतात. या प्रकारच्या श्लेषाला ........ व एकच शब्द जसाच्या तसा ठेवून त्यांचे जेव्हा दोन अर्थ संभवतात त्यास ........ असे म्हणतात. ①②③④

१) सभंगश्लेष, अभंगश्लेष
२) शब्दश्लेष, अर्थश्लेष
३) उपमेय, उपमान
४) साधारणधर्म, साम्यवाचक शब्द

प्रश्न ५. 'वीणाचे नाक चाफेकळीप्रमाणे सुंदर आहे' या वाक्यात नाक हे ........ आहे. ①②③④

१) साम्यवाचक शब्द २) उपमान
३) उपमेय ४) साधारण धर्म

प्रश्न ६. दोन वस्तूंमधील साम्य चमत्कृतिपूर्ण रितीने जिथे वर्णन केलेले असते, तिथे ........ अलंकार होतो. ①②③④

१) यमक २) अनुप्रास ३) शब्दश्लेष ४) उपमा

प्रश्न ७. आला हा दारि उभा वसंत फेरीवाला ।
पोते खांद्यावरि सौद्याचे, देईन ज्याचे त्याला ।।
यामध्ये असलेला अलंकार कोणता? ①②③④

१) उपमा २) चेतनगुणोक्ती
३) व्याजस्तुती ४) रूपक

प्रश्न ८. निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहे, अशी कल्पना करून त्या मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात, असे जिथे वर्णन असते, तिथे ........ हा अलंकार असतो. ①②③④

१) व्याजोक्ती २) चेतनगुणोक्ती
३) श्लेष ४) सार

प्रश्न ९. आला वसंत कविकोकिल हाही आला।
आलापितो सुचवितो अरुणोदयला।।
यातील अलंकार कोणता? ①②③④

१) श्लेष २) दामयमक
३) शब्दश्लेष ४) अर्थालंकार

प्रश्न १०. सुकन्याचे नेत्र कमलदलांप्रमाणे सुंदर आहेत. या वाक्यात कमलदल हे ........ आहे. ①②③④

१) साम्यवाचक शब्द २) उपमान
३) उपमेय ४) साधारण धर्म

प्रश्न ११. पुढील पद्यपंक्तीतील अलंकार ओळखा.

१. कुटुंबवत्सल इथे फणस हा । कटिखांद्यावर घेऊनि बाळे ।
कथिते त्याला कुशल मुलांचे । गंगाजळिचे बेत आगळे ।। ①②③④

१) चेतनगुणोक्ती २) व्याजोक्ती
३) विरोधाभास ४) सार

२. पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी ।
गळ्यामध्ये गरिबाच्या गाजे संतांची वाणी ।। ①②③④

१) चेतनगुणोक्ती २) अनुप्रास
३) विरोधाभास ४) दृष्टान्त

३. 'काय गे बघशी मागे वळुनि वळुनि अशी?' ।
विचारिता म्हणे, 'माझी राहिली पिशवी कशी?' ।।
यातील अलंकार कोणता? ①②③④

१) व्याजोक्ती २) चेतनगुणोक्ती
३) सार ४) विरोधाभास

४. श्रीकृष्ण नवरा मी नवरी ।
शिशुपाल नवरा मी न-वरी । ①②③④

१) श्लेष २) यमक ३) अनुप्रास ४) व्याजोक्ती

५. होती वदनचंद्राच्या दर्शनाचीच आस ती ।
अर्धचंद्रच तू द्यावा, कृपा याहून कोणती? ।। ①②③④

१) व्याजस्तुती २) व्याजोक्ती
३) चेतनगुणोक्ती ४) विरोधाभास

६. अत्रींच्या आश्रमीं । नेलें मज वाटे ।
माहेरची वाटे । खरेखुरें । ①②③④

१) अपन्हुती २) रूपक
३) उत्प्रेक्षा ४) व्याजोक्ती

७. कठोर वज्रापेक्षाही, मृदू पुष्पाहुनी अशी ।
लोकोत्तरांची ह्रदये कळती न कुणासही ।। ①②③④

१) अपन्हुती २) विरोधाभास ३) असंगती ४) सार

८. न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातिल ।
न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ ॥
①②③④
१) अपन्हुती २) विरोधाभास ३) सार ४) व्याजोक्ती

९. तू माउलीहून मयाळ । चंद्राहूनि शीतळ ।
पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥
①②③④
१) विरोधाभास २) व्यतिरेक
३) सार ४) व्याजोक्ती

१०. लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥
①②③④
१) विरोधाभास २) दृष्टान्त
३) अतिरेक ४) व्यतिरेक

प्रश्न १२. कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास ......... हा अलंकार होतो. ①②③④
१) अनुप्रास २) यमक
३) विरोधाभास ४) अतिरेक

प्रश्न १३. भाषेच्या अलंकाराचे प्रामुख्याने ........ प्रकार होतात. ①②③④
१) चार २) वीस ३) दोन ४) पाच

प्रश्न १४. एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा ........ अलंकार होतो. ①②③④
१) यमक २) अनुप्रास ३) श्लेष ४) रूपक

प्रश्न १५. खालील कडवी काळजीपूर्वक वाचून त्यात असलेला अलंकार ओळखा.

१. किती माझा कोंबडा मजेदार । मान त्याची कितीतरी बाकदार ।
शिरोभागी तांबडा तुरा हाले । जणू जास्वंदी फूल उमलले ॥
अर्धपायी पांढरीशी विजार । गमे विहगांतिल बडा फौजदार ॥ ①②③④
१) यमक २) उत्प्रेक्षा ३) अनुप्रास ४) श्लेष

२. आई म्हणोनि कोणी । आईस हाक मारी ॥
ती हाक येई कानी,। मज होय शोककारी ॥
नोहेच हाक माते । मारी कुणी कुठारी ॥
①②③④
१) यमक २) अनुप्रास ३) अपन्हुती ४) रूपक

३. हंसा विलोकुनि सुधाकर अष्टमीचा ।
म्यां मानिला निटिलदेश तिचाच साचा ।
शंख-द्वयी धरुनि कुंकुम कीरवाणी ।
लावावया तिलक लांबविला स्वपाणि ॥ ①②③④
१) भ्रान्तिमान २) यमक
३) अनुप्रास ४) ससंदेह

प्रश्न १६. संत म्हणति, 'सप्त पदें सहवासें सख्य साधूशीं घडते ।
या काव्यपंक्तीतील अलंकार कोणता? ①②③④
१) यमक २) अनुप्रास ३) दृष्टांत ४) श्लेष

प्रश्न १७. जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी
निःसंदेह मनी । सर्वकाळ
या चरणामध्ये कोणता अलंकार आहे?
①②③④
१) यमक २) श्लेष ३) उपमा ४) चेतनगुणोक्ती

प्रश्न १८. एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यावर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास ........ अलंकार होईल. ①②③④
१) अर्थान्तरन्यास २) अतिशयोक्ती
३) दृष्टान्त ४) श्लेष

प्रश्न १९. येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रांमध्ये दिसे ।
'डोळ्यांत काय गेले हे?' म्हणुनी नयना पुसे ॥
यात कोणता अलंकार आला आहे. ①②③④
१) दृष्टान्त २) व्याजोक्ती
३) रूपक ४) अर्थान्तरन्यास

प्रश्न २०. सर्वास सर्व देशी मिथ्या ही तव स्तुती महीपाला ।
न परस्त्रिया दिले त्वा वक्ष, न वा पृष्ठ तव विपक्षाला ॥
यातील अलंकार ओळखा. ①②③④
१) व्याजस्तुती २) व्याजोक्ती
३) अर्थान्तरन्यास ४) चेतनगुणोक्ती

प्रश्न २१. शिडीप्रमाणे एखादी कल्पना चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडलेली ........ या अलंकारात आढळून येते. ①②③④
१) सार २) विरोधाभास
३) पर्यायोक्त ४) रूपक

प्रश्न २२. खालील वाक्ये वाचा आणि त्यातील अलंकार ओळखा.

१. मित्राच्या उदयानं कोणाला आनंद होत नाही?
①②③④

१) सार  २) श्लेष  ३) उपमा  ४) अनन्वय

२. मुंबईची 'घरे' मात्र लहान! कबुतराच्या खुराड्यासारखी! ①②③④

१) उपमा  २) श्लेष  ३) अनन्वय  ४) यमक

३. ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेमच जणू. ①②③④

१) उपमा  २) उत्प्रेक्षा  ३) श्लेष  ४) रूपक

४. एका हाते कधितरी मुली वाजते काय टाळी? ①②③④

१) अर्थान्तरन्यास  २) अन्योक्ती
३) रूपक  ४) श्लेष

५. हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस. ①②③④

१) श्लेष  २) यमक  ३) रूपक  ४) अनुप्रास

६. आमच्या गावातील पाटील हे कर्णासारखे दानशूर आहेत. ①②③④

१) उपमा  २) उत्प्रेक्षा  ३) दृष्टान्त  ४) रूपक

७. त्याचे वडील सरकारचा पाहुणचार घेत आहेत. ①②③④

१) स्वभावोक्ती  २) अन्योक्ती
३) पर्यायोक्त  ४) विरोधाभास

८. सावळा वर बरा गौर वधुला। ①②③④

१) स्वभावोक्ती  २) अर्थान्तरन्यास
३) पर्यायोक्त  ४) अन्योक्ती

९. वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा। ①②③④

१) पर्यायोक्त  २) विरोधाभास
३) व्याजोक्ती  ४) सार

१०. मरणात खरोखर जग जगते. ①②③④

१) अर्थान्तरन्यास  २) विरोधाभास
३) व्याजोक्ती  ४) सार

११. काळाने त्याला आमच्यातून हिरावून नेले. ①②③④

१) अर्थान्तरन्यास  २) पर्यायोक्त
३) विरोधाभास  ४) सार

१२. जरी आंधळी मी तुला पाहते. ①②③④

१) विरोधाभास  २) अर्थान्तरन्यास
३) पर्यायोक्त  ४) सार

१३. जन पळभर म्हणतील हाय हाय. ①②③④

१) अर्थान्तरन्यास  २) सार
३) विरोधाभास  ४) व्याजोक्ती

१४. सर्वच लोक बोलू लागले की कोणीच ऐकत नाही. ①②③④

१) विरोधाभास  २) सार
३) व्याजोक्ती  ४) असंगती

१५. तू जे सांगतोस ती कल्पित कथा वाटते. ①②③④

१) पर्यायोक्त  २) विरोधाभास
३) असंगती  ४) सार

**प्रश्न २३. मी कोण ते ओळखा.**

१. एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा जिथे प्रयत्न होतो तिथे मी असतो. ①②③④

१) चेतनगुणोक्ती अलंकार
२) व्याजस्तुती अलंकार
३) व्याजोक्ती अलंकार
४) दृष्टान्त अलंकार

२. एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपकर्ष साधलेला असतो तेव्हा तेथे मी असतो. ①②③④

१) असंगती अलंकार  २) विरोधाभास अलंकार
३) सार अलंकार  ४) अतिशयोक्ती अलंकार

३. उपमेय जणू उपमान आहे, असे जिथे वर्णिलेले असते, तिथे मी असतो. ①②③④

१) उपमा अलंकार  २) उत्प्रेक्षा अलंकार
३) रूपक अलंकार  ४) असंगती अलंकार

४. एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृति साधते, तेव्हा मी निर्माण होतो. ①②③④

१) यमक अलंकार  २) अनुप्रास अलंकार
३) श्लेष अलंकार  ४) उपमा अलंकार

५. दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने जिथे वर्णन केलेले असते, तेथे माझी निर्मिती होते. ①②③④

१) यमक  २) उत्प्रेक्षा अलंकार
३) उपमा अलंकार  ४) अनुप्रास अलंकार

६. बाह्यतः स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यतः निंदा पण आतून स्तुती, असे जिथे वर्णन असते, तिथे मी असतो. ①②③④

१) व्याजोक्ती अलंकार  २) व्याजस्तुती अलंकार
३) रूपक अलंकार  ४) चेतनगुणोक्ती अलंकार

७. उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा मी तयार होतो. ①②③④

१) उपमा अलंकार  २) उत्प्रेक्षा अलंकार

३) अपन्हुती अलंकार ४) रूपक अलंकार

८. उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन असेल, तर तो मी असतो. ①②③④

१) उपमा अलंकार २) उत्प्रेक्षा अलंकार

३) रूपक अलंकार ४) व्यतिरेक अलंकार

९. जिथे कारण तिथेच कार्य घडावयास हवे, पण कारण एका ठिकाणी आणि त्याचे कार्य दुसऱ्या ठिकाणी असे जिथे वर्णन असते, तेथे माझे अस्तित्व असते. ①②③④

१) असंगती अलंकार २) विरोधाभास अलंकार

३) पर्यायोक्त अलंकार ४) व्याजस्तुती अलंकार

१०. उपमेयाला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल म्हणजे जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते, तेव्हा मी तयार होतो. ①②③④

१) अनन्वय अलंकार २) भ्रान्तिमान अलंकार

३) असंगती अलंकार ४) व्याजस्तुती अलंकार

११. उपमेय व उपमान यात एकरूपता आहे, ती भिन्न नाहीत असे जिथे वर्णन असते तिथे मी असतो. ①②③④

१) उपमा अलंकार २) उत्प्रेक्षा अलंकार

३) अपन्हुती अलंकार ४) रूपक अलंकार

१२. उपमेयच आहे असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती घडली, तर तिथे मी निर्माण होतो. ①②③④

१) अनन्वय अलंकार २) भ्रान्तिमान अलंकार

३) असंगती अलंकार ४) अपन्हुती अलंकार

१३. एखादी गोष्ट सरळ शब्दांत न सांगता ती अप्रत्यक्षरितीने किंवा आडवळणाने सांगावयाची असल्यास माझा आधार घेतला जातो. ①②③④

१) असंगती अलंकार २) पर्यायोक्त अलंकार

३) विरोधाभास अलंकार ४) अनन्वय अलंकार

१४. उपमेय कोणते व उपमान कोणते असा संदेह किंवा संशय निर्माण होऊन मनाची जी द्विधा अवस्था होते, त्यावेळी तेथे मी असतो. ①②③④

१) असंगती अलंकार २) भ्रान्तिमान अलंकार

३) ससंदेह अलंकार ४) व्यतिरेक अलंकार

१५. एखाद्या विधानात वरवर दिसायला विरोध आहे असे वाटते पण वास्तविक तसा विरोध नसतो, तेथे माझी निर्मिती झालेली असते. ①②③④

१) पर्यायोक्त २) विरोधाभास

३) असंगती ४) सार

प्रश्न २४. माझ्या उत्तरपत्रिकेवर खूश होऊन परीक्षकांनी मला वन्समोअर दिला आहे. यातील अलंकार कोणता? ①②③④

१) पर्यायोक्त २) विरोधाभास

३) रूपक ४) सार

प्रश्न २५. लेकी बोले सुने लागे या पद्धतीने मनोगत व्यक्त करणाऱ्या अलंकाराला ........ अलंकार म्हणतात. ①②③④

१) अन्योक्ती २) स्वभावोक्ती

३) अतिशयोक्ती ४) पर्यायोक्त

प्रश्न २६. चंद्र काय असे, किंवा पद्म या संशयान्तरी ।
वाणी मधुर ऐकोनी कळले मुख ते असे ॥
याठिकाणी निर्माण झालेला अलंकार ओळखा. ①②③④

१) अनन्वय २) भ्रान्तिमान

३) ससंदेह ४) सार

प्रश्न २७. जो अंबरी उफळता खुर लागलाहे ।
तो चंद्रमा निज तनूवरि डाग वाहे ॥
या पद्यपंक्तीतील अलंकार ओळखा. ①②③④

१) अतिशयोक्ती २) दृष्टान्त

३) स्वभावोक्ती ४) ससंदेह

प्रश्न २८. उपमेमध्ये सादृश्य दाखविताना 'जसे, जेवी, सम, सारखा' यासारखे शब्द येतात. दृष्टान्तात सादृश्य असते पण ते दाखविणारे ........ नसतात. ①②③④

१) उपमान २) उपमेय

३) साम्यवाचक शब्द ४) लक्षणे

प्रश्न २९. खालील कडवी काळजीपूर्वक वाचून त्यातील अलंकार ओळखा.

१. म्हणूनिया आलो तेव्हा परतुनी घराला
काव्य ऐकविले ते सहधर्मचारिणीला
गानलुब्ध तीही होई झोप ये तियेला
काव्यरसिक तिजसम कोणी जगामधि असेल? ①②③④

१) व्याजस्तुती २) व्याजोक्ती

३) अर्थान्तरन्यास ४) श्लेष

२. वाट तरी सरळ कुठे पांदीतिल सारी ।
त्यातुन तर आज रात्र अंधारी भारी ॥
आणि बैल कसल्याही बुजती आवाजा ।
किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हिसांजा ॥ ①②③④

१) व्याजस्तुती २) सार ३) असंगती ४) व्याजोक्ती

३. कुणि कोडे माझे उकलिल का? कुणि शास्त्री रहस्य कळविल का?
हृदयि तुझ्या सखि, दीप पाजळे । प्रभा मुखावरि माझ्या उजळे ।।
नवरत्ने तू तुज भूषविले । मन्मन खुलले आतिल का? ①②③④

१) असंगती २) विरोधाभास
३) पर्यायोक्त ४) सार

४. भृंगे विराजित नवीं अरविंदपत्रें ।
पाहूनि मानुनि तिचीच विशाल नेत्रें ।
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं ।
कांते वृथा उतरलो, भिजलो विलोकी ।।①②③④

१) ससंदेह २) भ्रान्तिमान
३) अनन्वय ४) सार

५. कोणता मानू चंद्रमा? भूवरीचा की नभीचा?
चंद्र कोणता? वदन कोणते?
शशांक-मुख की मुख-शशांक ते?
निवडतील निवडोत जाणते
मानी परि मन सुखद संभ्रमा-मानू चंद्रमा, कोणता? ①②③④

१) भ्रान्तिमान २) उत्प्रेक्षा ३) ससंदेह ४) उपमा

६. दमडिचं तेल आणलं, सासूबाईचं न्हाणं झालं,
मामंजींची दाढी झाली, भावोजींची शेंडी झाली,
उरलं तेल झाकून ठेवलं, लांडोरीचा पाय लागला,
वेशीपर्यंत ओघळ गेला, त्यात उंट पोहून गेला. ①②③④

१) अर्थान्तरन्यास २) स्वभावोक्ती
३) दृष्टान्त ४) अतिशयोक्ती

७. तदितर खग भेणे वेगळाले पळाले ।
उपवन-जल-केली जे कराया मिळाले ।।
स्वजन, गवसला जो, त्याजपाशीं नसे तो ।
कठीण समय येता कोण कामास येतो? । ①②③④

१) अतिशयोक्ती २) दृष्टान्त
३) अर्थान्तरन्यास ४) सार

प्रश्न ३०. काव्यात नाटके रम्य, नाटकांत 'शकुंतला' ।
त्यामध्ये चवथा अंक, त्यातही चार श्लोक ते ।।
यात ........ हा अलंकार आला आहे. ①②③④

१) पर्यायोक्त २) शब्दश्लेष ३) सार ४) अन्योक्ती

प्रश्न ३१. ........ अलंकार हा जणू, गमे, वाटे, भासे की यासारखे साम्यवाचक शब्द येतात. ①②③④

१) रूपक २) उत्प्रेक्षा ३) उपमा ४) अपन्हुती

प्रश्न ३२. राज्य गादीवरी । काढी तुझ्या आठवणी ।
फळा आली माय । मायेची पाठवणी ।
या पद्यपंक्तीतील अलंकार ओळखा. ①②③④

१) रूपक २) उत्प्रेक्षा ३) यमक ४) श्लेष

प्रश्न ३३. वाक्यात ज्या शब्दाला दोन अर्थ असतात तो शब्द काढून त्या ठिकाणी त्याच अर्थाचा दुसरा शब्द ठेवल्यामुळे श्लेष नाहीसा झाला तर तो ........ अलंकार होतो. ①②③④

१) शब्दश्लेष २) अर्थश्लेष
३) सभंगश्लेष ४) अभंगश्लेष

प्रश्न ३४. कुस्करु नका ही सुमने ।
जरी वास नसे तिळ यांस, तरी तुम्हांस अर्पिती सु-मने ।।
या पद्यपंक्तीत निर्माण झालेला अलंकार कोणता? ①②③④

१) सभंगश्लेष २) अभंगश्लेष ३) यमक ४) अनुप्रास

प्रश्न ३५. आमच्या वर्गातील समीर प्रा. शिवाजीराव भोसले यांच्यासारखा चांगला वक्ता आहे. या वाक्यात कोणता अलंकार आला आहे. ①②③④

१) उत्प्रेक्षा २) दृष्टान्त ३) उपमा ४) असंगती

प्रश्न ३६. ओठ कशाचे? देठचि फुलल्या पारिजातकाचे ।
या ओळीतील अलंकार कोणता? ①②③④

१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) अपन्हुती ४) रूपक

प्रश्न ३७. मानेला उचलीतो, बाळ मानेला उचलीतो ।
नाहि ग बाई, फणा काढुनि नाग हा डोलतो ।।
यातील अलंकार ओळखा. ①②③④

१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) अपन्हुती ४) रूपक

प्रश्न ३८. सावळा ग रामचंद्र । रत्नमंचकी झोपतो ।
त्याला पाहता लाजून । चंद्र आभाळी लोपतो ।।
या ओळीतील अलंकार ओळखा. ①②③④

१) उपमा २) व्यतिरेक ३) अनन्वय ४) भ्रान्तिमान

प्रश्न ३९. अन्योक्ती अलंकाराला ........ असेही म्हणतात. ①②③④

१) प्रस्तुत प्रशंसा २) अप्रस्तुत प्रशंसा
३) आडवळणाने सांगणे ४) व्याजस्तुती

प्रश्न ४०. पोटींच एक पद लांबविला वुजा तो ।
पक्षी तनू लपवि, भूप तया पाहतो ।।

टाकी उपानह, पदें अतिमंद ठेवी ।
केली विजार वरि, डौरहि, मौन सेवी ॥
यातील अलंकार कोणता? ①②③④

१) अतिशयोक्ती २) अन्योक्ती
३) स्वभावोक्ती ४) सार

प्रश्न ४१. आधीच मर्कट तशातही मद्य प्याला ।
झाला तशात जरि वृश्चिक दंश त्याला ।
झाली तयास तदनंतर भूतबाधा ।
चेष्टा वदू मग किती कपिच्या अगाधा ॥
या कडव्यामध्ये ........ अलंकार झाला आहे. ①②③④

१) असंगती २) अतिशयोक्ती
३) पर्यायोक्त ४) सार

प्रश्न ४२. पुढील संवाद वाचा व त्यातील अलंकार ओळखा.
गोविंदराव - काय वसंतराव, तुम्हाला सुपारी लागते का?
वसंतराव - हो, हो लागते ना!
गोविंदराव - जर लागते, तर का खाता? ①②③④

१) असंगती २) श्लेष ३) अनुप्रास ४) यमक

प्रश्न ४३. 'तू मलिन, कुटिल, नीरस, जडहि पुनर्भवपणेहि कच साच या पद्यपंक्तीत ........ हा अलंकार निर्माण झाला आहे. ①②③④

१) शब्दश्लेष २) अर्थश्लेष
३) सभंगश्लेष ४) अभंगश्लेष

प्रश्न ४४. बाई काय सांगो । स्वामीची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ॥
यामध्ये ........ हा अलंकार आलेला आहे. ①②③④

१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) अपन्हुती ४) रूपक

प्रश्न ४५. या दानासी या दानाहुन अन्य नसे उपमान ।
यात कोणता अलंकार आहे? ①②③④

१) व्यतिरेक २) अनन्वय
३) भ्रान्तिमान ४) अपन्हुती

प्रश्न ४६. कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्यावेळी ........ हा अलंकार होतो. ①②③④

१) स्वभावोक्ती २) भ्रान्तिमान
३) अतिशयोक्ती ४) ससंदेह

प्रश्न ४७. न कळता पद अग्नीवरी पडे ।
न करि दाह असे न कधी घडे ।
अजित नाम वदो भलत्या मिसे ।
सकल पातक भस्म करीतसे
यामध्ये आलेला अलंकार कोणता? ①②③④

१) दृष्टान्त २) अर्थान्तरन्यास
३) भ्रान्तिमान ४) ससंदेह

प्रश्न ४८. खालील वर्णनामधील अलंकार ओळखा.
काव्य अगोदर झाले नंतर जग झाले सुंदर ।
रामायण आधी मग झाला राम जानकीवर ॥ ①②③④

१) दृष्टान्त २) भ्रान्तिमान
३) ससंदेह ४) अतिशयोक्ती

प्रश्न ४९ अलंकार ओळखा ①②③④
बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल ।
श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ ॥

१) अतिशयोक्ती २) ससंदेह
३) भ्रान्तिमान ४) अर्थान्तरन्यास

प्रश्न ५०. ते शीतलोपचारे जागी झाली हळूच मग बोले ।
औषध नलगे मजला, परिसुनि माता 'बरें' म्हणुनि डोले
यातील अलंकार ओळखा. ①②③④

१) श्लेष २) यमक
३) अनुप्रास ४) रूपक

प्रश्न ५१. खाली दिलेले वर्णन वाचा व तो अलंकाराचा कोणता घटक आहे ते सांगा.

१. ज्याची तुलना करावयाची आहे ते किंवा ज्याचे वर्णन करावयाचे आहे तो घटक. ①②③④

१) उपमेय २) उपमान
३) साधारण धर्म ४) साम्यवाचक शब्द

२. ज्याच्याशी तुलना करावयाची आहे किंवा ज्याची उपमा दिली जाते, तो घटक. ①②③④

१) उपमेय २) उपमान
३) साधारण धर्म ४) साम्यवाचक शब्द

३. दोन वस्तूंत असणारा सारखेपणा किंवा दोन वस्तूंत असणारा समान गुणधर्म. ①②③④

१) उपमेय २) उपमान
३) साधारण धर्म ४) साम्यवाचक शब्द

४. सारखेपणा किंवा समान गुणधर्म दाखविण्यासाठी वापरला जाणारा शब्द. ①②③④

१) उपमेय २) उपमान

३) साधारण धर्म ४) साम्यवाचक शब्द

प्रश्न ५२. सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरि ।
या पद्यपंक्तीतील अलंकार कोणता? ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा
३) श्लेष ४) रूपक

प्रश्न ५३. ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाहे रमा ।
दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ।
यामध्ये ........ या अलंकाराची निर्मिती झाली आहे. ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) श्लेष ४) रूपक

प्रश्न ५४. एखाद्या सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे किंवा विशेष उदाहरणांवरून शेवटी एखादा सामान्य सिद्धांत काढला तर ........ हा अलंकार होतो. ①②③④
१) उपमा २) भ्रान्तिमान
३) अर्थान्तरन्यास ४) दृष्टान्त

प्रश्न ५५. अत्युच्ची पदी थोरही बिघडतो हा बोल खरा ।
हे .......... या अलंकाराचे उदाहरण म्हणता येईल. ①②③④
१) अर्थान्तरन्यास २) असंगती
३) विरोधाभास ४) श्लेष

प्रश्न ५६. एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे, त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ (हुबेहुब) पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन हाही भाषेचा एक अलंकार ठरतो. त्याला ........ अलंकार म्हणतात. ①②③④
१) विरोधाभास २) अतिशयोक्ती
३) अन्योक्ती ४) स्वभावोक्ती

प्रश्न ५७. खालील वाक्ये काळजीपूर्वक वाचा व त्यातील अलंकार शोधा.

१. शाळा मातेप्रमाणे आहे. ①②③④
१) उपमा २) श्लेष ३) उत्प्रेक्षा ४) अपन्हुती

२. हे हृदय नसे, परी स्थंडिल धगधगलेले । ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) अपन्हुती ४) श्लेष

३. लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) श्लेष ४) रूपक

४. अमृताहुनी गोड । नाम तुझे देवा ।। ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) रूपक ४) व्यतिरेक

५. आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी । ①②③④
१) उपमा २) उत्प्रेक्षा ३) अनन्वय ४) व्यतिरेक

६. स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास. ①②③④
१) पर्यायोक्त २) विरोधाभास
३) असंगती ४) सार

७. जातीच्या सुंदरांना काहीही शोभते. ①②③④
१) पर्यायोक्त २) विरोधाभास
३) अर्थान्तरन्यास ४) असंगती

८. मूळ स्वभाव जाईना । ①②③④
१) अर्थान्तरन्यास २) असंगती
३) विरोधाभास ४) सार

९. कामधेनुच्या दुग्धाहुनिही ओज हिचे बलवान । ①②③④
१) व्यतिरेक २) अनन्वय
३) उपमा ४) उत्प्रेक्षा

१०. का मरणि अमरता ही न खरी? ①②③④
१) व्यतिरेक २) अर्थान्तरन्यास
३) अनन्वय ४) स्वभावोक्ती

प्रश्न ५८. खालील कविता वाचून त्यातील अलंकार ओळखा.
गणपत वाणी विडी पिताना, चावायाचा नुसतिच काडी;
म्हणायचा अन् मनाशीच की, ह्या जागेवर बांधिन माडी.
मिचकावुनी मग उजवा डोळा, आणि उडवुनि डावी भिवई;
भिरकावुनि ती तशिच द्यायचा, लकेर बेचव जैशी गवई. ①②③④
१) अतिशयोक्ती २) अन्योक्ती
३) स्वभावोक्ती ४) पर्यायोक्त

प्रश्न ५९. कित्येक वेळा स्पष्टपणे एखाद्या व्यक्तीला बोलता येत नाही. अशावेळी ज्याच्याबद्दल बोलायचे, त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुसऱ्याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत असते तिलाच ........ अलंकार असे म्हणतात. ①②③④
१) अतिशयोक्ती २) अन्योक्ती
३) स्वभावोक्ती ४) पर्यायोक्त

प्रश्न ६०. खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे?
मातीत पसरले अतिरम्य पंख ।
केले वरी उदर पांडुर निष्कलंक ।।
चंचू तशीच उघडी पद लांबवीले ।
निष्प्राण देह पडला श्रमही निमाले ।।
①②③④

१) अतिशयोक्ती　　२) अन्योक्ती
३) स्वभावोक्ती　　४) पर्यायोक्त

प्रश्न ६१. येथे समस्त बहिरे बसतात लोक ।
का भाषणे मधुर तू करिशी अनेक ।।
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक ।
रंगावरून तुजला गणतील काक ।।
यातील अलंकार कोणता? ①②③④
१) अतिशयोक्ती　　२) अन्योक्ती
३) स्वभावोक्ती　　४) पर्यायोक्त

प्रश्न ६२. एका अर्थाचा समर्थक असा दुसरा अर्थ त्याच्या शेजारी ठेवणे असा ......... या अलंकाराचा अर्थ आहे. ①②③④
१) अर्थान्तरन्यास　　२) अन्योक्ती
३) सार　　४) व्याजस्तुती

❖ ❖ ❖

## शब्दांच्या शक्ती रस व काव्यगुण

प्रश्न १. प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. 'मी कुसुमाग्रज वाचले' यातील लक्ष्यार्थ शोधा. ①②③④
१) कुसुमाग्रजांना पाहिले
२) व्यंगार्थ
३) कुसुमाग्रजांशी बोललो
४) कुसुमाग्रजांचे साहित्य वाचले

२. 'पानिपतावर सव्वा लाख बांगड्या फुटल्या' हे विधान कोणत्या प्रकारात आहे? ①②③④
१) अभिधा　　२) लक्षणा
३) व्यंजना　　४) यांपैकी नाही

३. 'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत' शब्दशक्ती ओळखा. ①②③④
१) लक्ष्यार्थ　२) वाच्यार्थ　३) संकेतार्थ　४) व्यंगार्थ

४. पर्यायी उत्तरातून लक्ष्यार्थ ओळखा.
वाक्य - 'तो कप पिऊन टाक' ①②③④
१) भाकरी खा　　२) भात देऊन टाक
३) चहा पी　　४) रोटी दे

५. 'गरज ही कल्पकतेची जननी होय' या वाक्यातील जननी शब्दाचा लक्ष्यार्थ कोणता? ①②③④
१) माता　　२) उत्पत्तीचे कारण
३) माऊली　　४) जन्मदात्री

६. काव्याला सूचकता आणणारी व काव्य अधिक परिणामकारक ठरवणारी शब्दशक्ती कोणती? ①②③④
१) अभिधा　२) लक्षणा　३) व्यंजना　४) वीररस

७. 'आम्ही गहू खातो' या वाक्यातून कोणत्या शब्द-शक्तीचा अर्थ व्यक्त होतो? ①②③④
१) वाच्यार्थ　२) व्यंगार्थ　३) लक्ष्यार्थ　४) भावार्थ

८. आणखी आठ सहकाऱ्यांना महामंत्री अर्धचंद्र देणार - लक्ष्यार्थ योजक शब्द ओळखा. ①②③④
१) आठ　　२) महामंत्री
३) अर्धचंद्र　　४) सहकाऱ्यांना

९. 'माझ्या ग घरावरून कुण्या ग राजाचा हत्ती गेला' -शब्दशक्ती ओळखा. ①②③④
१) अभिधा　२) लक्षणा　३) व्यंजना　४) अन्योक्ती

### काव्यरस

प्रश्न २. खालील उदाहरणातून काव्यरस ओळखा.

१. उपास मज लागला, सखेबाई उपास मज लागला. ①②③④
१) बीभत्स　　२) हास्य
३) यांपैकी नाही　　४) अद्‌भुत

२. म्यानातून उसळे तलवारीची पात ........ ①②③④
१) हास्य　२) भयानक　३) शांत　४) वीर

३. डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहू नका. ①②③④
१) हास्य　२) अद्‌भुत　३) करुण　४) शृंगार

४. 'कैलास सोडूनी ये, उल्केसमान वेगे' ①②③④
१) रौद्र　२) करुण　३) शृंगार　४) वीर

५. डमडमत डमरू ये, खणखणत शूल ये, शंख फुंकीत ये येई रुद्रा ①②③④
१) भयानक　　२) हास्य
३) रौद्र　　४) यांपैकी नाही

६. शी! शी! तोंड अति अमंगळ असे आधीच हे शेंबडे, आणि काजळ ओघळे वरुनि हे, त्यातूनि ही हे रडे! ①②③④
१) बीभत्स　२) शांत　३) हास्य　४) भयानक

७. आटपाट नगरात होती एक परीराणी. ①②③④
१) अद्‌भुत　२) शांत　३) नवल　४) श्रृंगार

८. पानोपानी अमृत शिंपीत उषा हासते. ①②③④
१) शृंगारीक　　२) शांत
३) बीभत्स　　४) हास्य

९. घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला. ①②③④
१) शांत　　२) रौद्र
३) भयानक　　४) यांपैकी नाही

प्रश्न ३. प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. व्यवहारातले रस किती? ①②③④
१) सहा　२) नऊ　३) तीन　४) आठ

२. एखाद्या उत्कृष्ट काव्यातून त्याची गोडी आपण अनुभवतो, त्यास काय म्हणतात? ①②③④

१) ग्रहण २) रसास्वाद ३) आमरस ४) सरस

३. स्थिर व शाश्वत अशा मानवी भावनांना ........ म्हणतात. ①②③④

१) भाव २) अंगविक्षेप
३) स्थायीभाव ४) अनुकरण

४. ललित वाङ्मयातील नायक, नायिका व इतर व्यक्ती यांना काय म्हणतात? ①②③④

१) स्थायी भाव २) उद्दीपन विभाव
३) आलंबन विभाव ४) यांपैकी नाही

५. विभाव, अनुभाव, संचारी भाव यांच्या मदतीने स्थायीभाव उत्कट पोहोचतात तेव्हा त्यास ........ म्हणतात. ①②③④

१) ग्रहण २) आकलन ३) विस्तार ४) रस

६. युद्ध, मृत्यू, सूड, राक्षस, स्मशान इ. वर्णनातून ........ हा रस आढळतो. ①②③④

१) रौद्र २) बीभत्स ३) अदभुत ४) भयानक

७. खालीलपैकी कोणता प्रकार शृंगार रसाकरिता पोषक असतो? ①②③④

१) मधुर गीत २) फटका
३) कोळीनृत्य ४) लावणी

**काव्यगुण**

**प्रश्न ४. प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. काव्यातील रसाला पोषक शब्दांमुळे ....... येते. ①②③④

१) शोभा २) वीरश्री ३) सौंदर्य ४) सात्विकता

२. सोपी, सुबोध, चटकन अर्थ समजणारी रचना ........ होय. ①②③④

१) प्रासाद २) शांत
३) प्रासादिक रचना ४) यांपैकी नाही

३. कोमल अनुनासिक वर्ण व अनुप्रासात्मक रचनेमुळे काव्याला ........ प्राप्त होते. ①②③④

१) गती २) माधुर्य ३) नाद ४) शोभा

४. माधुर्य म्हणजे ........ ①②③④

१) मधुरता २) गुळाची गोडी
३) गोडवा ४) नाद

५. वीर व रौद्र रसांना पोषक ठरणारा काव्य गुण म्हणजे ........ ①②③④

१) प्रसाद २) माधुर्य ३) शांत ४) ओज

६. कठोर वर्ण, दीर्घ समास, संयुक्त व्यंजने यांच्या वापराने ........ हा काव्य गुण परिपूर्ण होतो. ①②③④

१) ओज २) सरलता
३) मधुरता ४) सोपेपणा

७. शब्दशक्ती, रस, काव्यगुण समजले म्हणजे काव्याचे ........ करणे सोपे जाते. ①②③④

१) आकलन २) गती
३) रसग्रहण ४) यांपैकी नाही

**प्रश्न ५. खालील उदाहरणांवरुन काव्याचे गुण ओळखा.**

१. 'गोड निळ्या वातावरणात अव्याज मने होती डोलत' (फुलराणी) ①②③④

१) प्रसाद २) शृंगार ३) माधुर्य ४) आवेश

२. 'एक अनामिक सुगंध येतो ओल्या अंधारात' ①②③④

१) सोपेपणा २) माधुर्य ३) वीर ४) रौद्र

३. कडकडा फोड नभ, उडव उडू मक्षिका खडबडवि दिग्गजा, तुडव रविमालिका, मांड वादळ उधळ गिरि जशी मृत्तिका खवळवी चहुकडे या समुद्रा! ①②③④

१) प्रासाद २) मधुरता ३) वीर ४) ओज

४. हे मंदमंद पद सुंदर कुंददंती।
चाले जसा मद-धुरंधर इंद्रदंती।। ①②③④

१) माधुर्य २) ओज ३) वीर ४) प्रसाद

५. 'नववधू प्रिया मी बावरते, लाजते पुढे सरते।' ①②③④

१) यांपैकी नाही २) प्रसाद
३) ओज ४) शांत

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

**प्रश्न ६. ध्वन्यर्थ म्हणजे ..............** ①②③④

१) 'अभिधा' शक्तीमुळे जाणवणारा अर्थ
२) 'व्यंजना' शब्दशक्तीमुळे सूचित होणारा अर्थ
३) 'लक्षणा' शब्दशक्तीमुळे जाणवणारा अर्थ
४) भाषेतील मूलध्वनींचा अर्थ

❖ ❖ ❖

# वाक्प्रचार व म्हणी

**वाक्प्रचार**

**प्रश्न १. 'सूतोवाच करणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा :** ①②③④

१) चर्चा करणे २) संपविणे
३) प्रारंभ करणे ४) दोष देणे

**प्रश्न २. वाक्प्रचाराच्या अर्थावरून योग्य वाक्प्रचार शोधा.**

जेमतेम खाण्यास मिळणे. ①②③④

१) हात टेकणे २) हात धरणे
३) हातातोंडाशी गाठ पडणे ४) हाडाची काडे करणे

प्रश्न ३. 'अकलेचा खंदक' या वाक्प्रचाराचा अर्थ - ①②③④

१) जबाबदारी टाळणे २) लठ्ठ होणे
३) मूर्ख मनुष्य ४) शेवट करणे

प्रश्न ४. वाऱ्यावर सोडणे - ............ ①②③④

१) नेमाने जाऊन येणे २) सतत नापास होणे
३) दुर्लक्ष करणे ४) यांपैकी नाही

प्रश्न ५. अ व ब गटातील विसंगत जोडी ओळखा. ①②③④

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | तोंडावर येणे | १) | माघार घेणे |
| ब) | त्रेधा उडणे | २) | खूप रागावणे |
| क) | पड खाणे | ३) | फार जवळ येणे |
| ड) | पाया घालणे | ४) | फजिती होणे |

१) अ (३) २) ब (४) ३) क (१) ४) ड (२)

प्रश्न ६. वाक्प्रचारांचे योग्य रूप रिकाम्या जागी भरा. ①②③④

अंगाची लाही होणे -

१) रागाने बेफाम होणे २) सज्ज होणे
३) हुतात्मा होणे ४) सूड घेणे

प्रश्न ७. अंग धरणे - ①②③④

१) स्नान करणे २) अंगाशी येणे
३) अशक्त होणे ४) लठ्ठ होणे

प्रश्न ८. केसाने गळा कापणे - ①②③④

१) मोठी चूक होणे
२) दुर्दैव पुढे येणे
३) विश्वासघात करणे
४) छोट्या साधनाने मोठे काम करणे

प्रश्न ९. धाबे दणाणणे - ①②③④

१) धाब्यावर बसवणे २) अतिशय घाबरणे
३) खूष होणे ४) पळून जाणे

प्रश्न १०. तुणतुणे वाजवणे - ①②③④

१) निंदा करणे २) तेचतेच पुन्हा सांगणे
३) गाणे म्हणणे ४) स्तुती करणे

प्रश्न ११. मात्रा चालणे - ①②③④

१) इलाज चालणे २) फायदा होणे
३) उपयोग न होणे ४) परिणाम होणे

प्रश्न १२. गटात न बसणारे वाक्य ओळखा ①②③④

१) यातायात करणे
२) धाब्यावर बसवणे
३) अंगाचा तिळपापड होणे
४) एखादे दिवशी व्यायाम करणे

प्रश्न १३. चतुर्भुज होणे = ①②③④

१) मतभेद होणे २) लग्न होणे
३) भांडण होणे ४) गर्व होणे

प्रश्न १४. रुद्रावतार धारण करणे - ①②③④

१) फटके २) काम पूर्ण होणे
३) अतिशय रागवणे ४) नसती उठाठेव करणे

प्रश्न १५. समानार्थी शब्द

१. समानार्थी शब्दांची योग्य जोडी ओळखा. ①②③④

१) ढग - जलद २) वर्ण - कर्ण
३) मर्म - धर्म ४) अंगीकृत - अस्वीकृत

२. 'मिलिंद' या शब्दाला समानार्थी नसणारा शब्द कोणता? ①②③④

१) भ्रमर २) अली ३) भुंगा ४) अभी

३. 'वीज' या शब्दाला समानार्थी असणारा शब्द ओळखा? ①②③④

१) रवी २) भानू ३) चपला ४) वसन

४. समानार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा. ①②③④

१) वानर - कपी २) सिंह - केसरी
३) राजा - नृप ४) सोने - अर्णव

५. गटात न बसणारा शब्द ओळखा. ①②③④

१) राजीव २) पल्लव ३) सरोज ४) पंकज

६. दिलेल्या शब्दाला विसंगत शब्द ओळखा.
धनुष्य ①②③④

१) कोदंड २) धनु ३) सायक ४) कार्मुक

७. पक्षी ①②③④

१) खग २) चंडांशु ३) विहग ४) द्विज

प्रश्न १६. विरुद्धार्थी शब्द

१. विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी ओळखा. ①②③④

१) तटिनी × सरिता २) साधार × निराधार
३) कलंक × कालिमा ४) विरह × दुरावा

२. 'कर्णमधुर' याचा विरुद्धार्थी शब्द ①②③④

१) कर्णकटू २) कमाल ३) कृपण ४) कृश

३. खाली दिलेल्या विरुद्धार्थी शब्दातील अयोग्य जोडी ओळखा. ①②③④

१) स्वस्त × महाग २) होकार × नकार
३) सुश × यश ४) ज्ञात × अज्ञात

४. अनुज × ...... ①②③④

१) प्रगती २) अग्रज ३) अनपेक्षित ४) अधोगती

५. रणशूर × ....... ①②③④

१) रणभिरू २) रणवीर ३) रणधीर ४) रणशार्दूल

प्रश्न १७. जोडशब्द

१. खालील शब्दातील अयोग्य जोडशब्द ओळखा. ①②③④

१) दाणापाणी २) पाऊसपाणी
३) जुनापुराणा ४) नरक

२. खालील शब्दातील योग्य जोडशब्द कोणता ते ओळखा. ①②③④

१) ऐषाराम २) ऐशाराम
३) ऐशाआराम ४) ऐषआराम

३. .......... योग्य जोडशब्द लिहा. ①②③④

१) जीरणशीर्ण २) जीर्णशीर्ण
३) जीरणशीरण ४) जीर्णशीअण

४. खालील शब्दातील योग्य जोडशब्द ओळखा. ①②③④

१) हिनदीन २) हीनदिन ३) हीन-दीन ४) हीनदीन

प्रश्न १८. समूहदर्शक शब्द

१. केलेले उपकार न जाणणारा .... ①②③④

१) कृतज्ञ २) कृतघ्न ३) कल्पवृक्ष ४) कामधेनू

२. खालील जोड्यांपैकी विसंगत जोडी ओळखा. ①②③④

१) हृदयाला भिडणारे - हृदयस्पर्शी
२) स्वत:शी केलेले भाषण - स्वगत
३) दोनदा जन्मलेला - दानशूर
४) मोजके असे बोलणारा - मितभाषी

३. पंधरवड्याने प्रसिद्ध होणारे ....... ①②③④

१) साप्ताहिक २) मासिक ३) अंक ४) पाक्षिक

४. पुढील समूहदर्शक शब्दाला योग्य शब्द सुचवा.
अनेक गोष्टींत एकाचवेळी लक्ष देणारा ... ①②③④

१) आगंतुक २) अष्टावधानी
३) तितिक्षा ४) दानशूर

प्रश्न १९. मडक्यांची - ①②③④

१) घड २) थप्पी ३) उतरंड ४) अढी

प्रश्न २०. जहाजांचा - ①②③④

१) काफिला २) मंडळ ३) जमाव ४) घोळका

प्रश्न २१. वाद्याचा - ①②③④

१) ताफा २) वृंद ३) रांग ४) यापैकी नाही

प्रश्न २२. नोटांचे - ①②③④

१) पुडके २) थप्पी ३) जुडी ४) ढीग

प्रश्न २३. पिकत घातलेल्या आंब्याची ①②③④

१) घड २) आढी ३) राई ४) जाळी

प्रश्न २४. शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. ①②③④
कल्पना नसताना आलेले संकट -

१) चक्रव्यूह २) पूरग्रस्त ३) घाला ४) दैववादी

प्रश्न २५. थोडक्यात समाधान मानणारा ①②③④

१) अतिथी २) अष्टावधानी
३) अपूर्व ४) अल्पसंतुष्ट

प्रश्न २६. डोंगर कपारीत राहणारे लोक - ①②③④

१) दानशूर २) गिरिजन
३) निर्वासित ४) यापैकी नाही

प्रश्न २७. तीन रस्ते एकवटतात ती जागा - ①②③④

१) तट २) तगाई ३) तिठा ४) मचाण

प्रश्न २८. अस्वलाचा खेळ करणारा - ①②③④

१) दरवेशी २) मनकवडा
३) नखशिखान्त ४) यापैकी नाही

प्रश्न २९. घड - ①②③④

१) करवंद २) तारे ३) द्राक्षे ४) मुले

प्रश्न ३०. गटात न बसणारा शब्द ओळखा ①②③④

१) दुर्वांची - जुडी २) माणसांचा - जमाव
३) विटांचा - गट ४) साधूंचा - जथा

प्रश्न ३१. कविता गाऊन दाखविणारा - ①②③④

१) प्रेक्षक २) गायक
३) काव्यगायक ४) यांपैकी नाही

प्रश्न ३२. तट - ①②③④

१) तीन रस्ते एकवटतात
२) दोन नद्या एकत्र मिळतात
३) किल्ल्याच्या भोवतीची भिंत
४) दगडावर केलेले कोरीव काम

प्रश्न ३३. हुतात्मा - ①②③④

१) देशासाठी प्राणार्पण केलेला
२) शत्रूकडील बातम्या काढून आणणारा
३) शत्रूला सामील झालेला
४) वरीलपैकी नाही

प्रश्न ३४. गटात न बसणारा शब्द ओळखा ①②③④

१) आधी जन्मलेला २) मागून जन्मलेला
३) देव आहे असे मानणारा ४) कर्तव्य पराङ्मुख

प्रश्न ३५. म्हणी

१. तळे राखील तो पाणी चाखील म्हणजे ... ①②③④

१) तळे राखणाऱ्यालाच त्याचे पाणी मिळेल.
२) पाणी मिळविण्यासाठी काम केले पाहिजे.
३) आपल्याकडे सोपविलेल्या कामाचा प्रत्येक मनुष्य थोडातरी फायदा करून घेतोच.
४) प्रत्येकाने काही मिळविण्यासाठी काम केले पाहिजे.

२. 'क्षुद्र माणसाच्या निंदेने थोर माणसाचे काही नुकसान होत नाही.' हा अर्थ कोणत्या म्हणीचा आहे ते ओळखा. ①②③④

१) कोल्हा काकडीला राजी
२) कोळसा उगाळावा तितका काळाच
३) करावे तसे भरावे
४) कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते

३. चुकीच्या पद्धतीने केलेली म्हण ओळखा①②③④

१) गुळाचा गणपती, साखरेचा नैवेद्य.
२) अति तेथे माती
३) पाचा मुखी परमेश्वर
४) चढेल तो पडेल

प्रश्न ३६. खालील दिलेल्या चार पर्यायांपैकी एक म्हण कोणती ते ओळखा. ①②③④
१) अतिराग भीक माग
२) जिभेला हाड नसणे
३) खूप संतापणे
४) मालकापेक्षा नोकराचीच मिजास अधिक

प्रश्न ३७. संकटकाळी मिळालेली थोडीशी मदत महत्त्वाची ठरते ... ①②③④
१) बळी तो कान पिळी
२) दुरून डोंगर साजरे
३) बुडत्याला काडीचा आधार
४) यांपैकी नाही

प्रश्न ३८. अति तेथे माती - ①②③④
१) पुन्हा पुन्हा एकच गोष्ट करणे
२) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट
३) एकाचवेळी अनेक गोष्टी करणे
४) विचार न करता बोलणे

प्रश्न ३९. म्हणी पूर्ण करा
१. ............ लक्षण खोटं ①②③④
१) चार दिवस २) भित्या पाठी
३) नाव मोठं ४) झाकली मूठ
२. ............ कोणी बांधायची? ①②③④
१) वासरात लंगडी गाय २) मांजराच्या गळ्यात घंटा
३) घरोघरी मातीच्या चुली ४) यापैकी नाही
३. म्हणींना ............ म्हणतात. ①②③④
१) वचन २) अर्थ
३) अनुभवाच्या खाणी ४) बोधप्रद

## २०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न

प्रश्न ४०. पुढीलपैकी कोणता शब्द 'पृथ्वी' या शब्दास समानार्थी नाही? ①②③④
१) अवनी २) क्षमा ३) दारा ४) वसुंधरा

प्रश्न ४१. योग्य जोड्या जुळवा. ①②③④

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | वाट धरणे | १) | लुटणे |
| ब) | वाट मारणे | २) | निकालात निघणे |
| क) | वाट लागणे | ३) | रहदारी असणे |
| ड) | वाट वाहणे | ४) | प्रतिबंध करणे |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | III | IV | II | I |
| 2) | IV | I | II | III |
| 3) | I | IV | III | II |
| 4) | III | IV | I | II |

प्रश्न ४२. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द कोणता? ①②③④
१) खुळा २) कोवळा ३) काम ४) घाम

प्रश्न ४३. पुढे 'अनल' या शब्दाचे समानार्थी शब्द दिले आहे. अचूक पर्याय निवडा ①②③④
१) विस्तव, पादप, अग्नी, वन्ही
२) पावक, तडाग, विस्तव, अग्नी
३) अग्नी, वायस, वन्ही, विस्तव
४) विस्तव, पावक, अग्नी, वन्ही

प्रश्न ४४. 'जगाचे नियंत्रण करणारा' या शब्दसमूहासाठी पुढीलपैकी कोणता पर्याय उपयोगात येतो? ①②③④
१) जगन्नायक २) जगन्नियंता
३) जगन्नाथ ४) जगत्कर्ता

प्रश्न ४५. जोड्यांचा योग्य पर्याय निवडा. ①②③④

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | अश्व | I | दुर्जन |
| ब) | खल | II | भुजंग |
| क) | अहन | III | हय |
| ड) | अही | IV | दिवस |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | IV | I | III | II |
| 2) | II | III | I | IV |
| 3) | III | I | IV | II |
| 4) | I | III | II | IV |

प्रश्न ४६. पुढीलपैकी कोणता गट समानार्थी शब्दांचा आहे? ①②③④
१) कावळा, काक, पायस २) नग, खग, विहग
३) पय, उदक, सलिल ४) सुर, असुर, दानव

प्रश्न ४७. खालील म्हण पूर्ण करा. ①②③④
'उधार तेल .........'.
१) जळकट २) कळकट ३) खवट ४) मळकट

प्रश्न ४८. 'तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार' - या ओळीतील 'तडिताघाते' याचा अर्थ. ①②③④
१) तडाखेदार वाराने २) विजेच्या आघाताने
३) आसूडाच्या वाराने ४) तलवारीच्या वाराने

प्रश्न ४९. 'हात दाखवणे' या वाक्प्रचाराचा अर्थ ①②③④
१) विजयाची खूण करणे २) अभिवादन करणे
३) निरोप घेणे ४) चोप देणे

प्रश्न ५०. 'समुद्र' या शब्दाला खालीलपैकी समानार्थी शब्द कोणता? ①②③④
१) अर्णव २) वडवानळ ३) खग ४) सागरवेळा

प्रश्न ५१. 'कमळ आणि बेडूक दोघेही चिखलात उत्पन्न

झालेले म्हणजे ......... असतात'. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडा. ①②③④

१) बंधू २) समानशील ३) पंकज ४) अंबुज

प्रश्न ५२. खालील पर्याय उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द असलेले पर्यायी उत्तर कोणते? ①②③④

१) च २) ना ३) सुद्धा ४) पुढे

प्रश्न ५३. 'सरदार व जमीनदार यांचे वर्चस्व असणारे राज्यशासन' या शब्दसमूहाला खालील योग्य शब्द सांगा. ①②③④

१) सावकारशाही २) राजेशाही
३) सामंतशाही ४) जमीनदारशाही

प्रश्न ५४. 'आवश्यक तेथे मदत न करता, ज्याला गरज नाही त्याला मदत करणे' या अर्थाची खालील म्हण ओळखा. ①②③④

१) भाताला तांदुळ नि पाण्याला उधाण
२) मनसुबे केले नि दिवस निघून गेले.
३) भरवशाच्या म्हशीला टोणगा.
४) मानेवर गळू नि पायाला जळू.

प्रश्न ५५. 'जन्मा आला हेला आणि पाणी वाहून मेला' या म्हणीची विरुद्धार्थी म्हण ओळखा. ①②③④

१) ज्ञान तिथे मान
२) जेवीन तर तुपाशी नायतर उपाशी
३) जने ती जाणे वांझ काय जाणे
४) आयत्या बिळात नागोबा

प्रश्न ५६. 'पाठ चोरणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखा. ①②③④

१) मुळीच न दिसणे २) कुचरपणा करणे
३) मदत न करणे ४) मदत करणे

प्रश्न ५७. खालील पर्यायी उत्तरांतील 'विरुद्धार्थी शब्द' असलेले पर्यायी उत्तर कोणते? ①②③④

| | | |
|---|---|---|
| (१) | मित्र | रवि |
| (२) | अनुज | अग्रज |
| (३) | आदित्य | सविता |
| (४) | भानू | भास्कर |

प्रश्न ५८. 'लवण' या शब्दाला खालील कोणता शब्द समानार्थी आहे? ①②③④

१) लावण्य २) लावणी ३) मीठ ४) पीठ

प्रश्न ५९. 'मेषपात्र' या शब्दाचा अर्थ सांगा. ①②③④

१) निरुद्योगी माणूस २) श्रीमंत माणूस
३) बावळट माणूस ४) कर्तबगार माणूस

प्रश्न ६०. खालील म्हण पूर्ण करा. पर्यायी उत्तरांतील योग्य पर्यायी उत्तर सांगा. ①②③④

'अडाण्याची मोळी .............'.

१) भलत्यासच जाळी २) भलत्यासच मारी
३) भलत्यासच गिळी ४) भलत्यासच टाळी

प्रश्न ६१. 'भद्रजन' या शब्दाचा खालीलपैकी कोणता शब्द विरुद्धार्थी आहे? ①②③④

१) सज्जन २) दुर्जन ३) प्रेमीजन ४) विद्वत्जन

प्रश्न ६२. पर्यायी उत्तरांतून योग्य ते पर्यायी उत्तर शोधा.

'भाषा नदीच्या प्रवाहाप्रमाणे असते.' कारण -

१) भाषेच्या प्रवाहात वळणे असतात.
२) भाषेमध्ये बदल होत जातात.
३) भाषेच्या व्याकरणाच्या नियमांना मुरड घालावी लागत नाही.
४) भाषेचा प्रवाह अखंड चालू नसतो.

प्रश्न ६३. खालील शब्दसमूहाकरिता पर्यायी उत्तरातील कोणता वाक्प्रचार योग्य आहे? ①②③④

'फार जवळ येणे.'

१) तोंड टाकणे. २) तोंडात बोट घालणे.
३) तोंडावर हात ठेवणे ४) तोंडावर येणे.

प्रश्न ६४. पुढे दिलेल्या म्हणींच्या गटातून अधिकांश साम्य असणारी जोडी पर्यायी उत्तरातून शोधा. ①②③④

| | | | |
|---|---|---|---|
| a | मनच राजा मनच प्रजा | i | मनात एक अन जनात एक |
| b | मनात मनोरे पुढे ताट कोरे | ii | मनाला मानवेल तोच सौदा |
| c | मना एवढी ग्वाही त्रिभुवनात नाही | iii | मन चिंती ते वैरी न चिंती |
| d | मनच जाणे पाप | iv | मनात मांडे नि पदरात धोंडे |

1) (a) - (ii) 2) (b) - (iv)
3) (c) - (i) 4) (d) - (iii)

❖ ❖ ❖

# विरामचिन्हे

**प्रश्न १. प्रश्नांची उत्तरे लिहा**

**१. विरामचिन्हे घालून पुढील वाक्ये लिहिली आहेत. योग्य पर्याय शोधा.** ①②③④

**वाक्य - आई म्हणाली, तुझा पहिला नंबर आला का शाब्बास.**

१) आई म्हणाली, "तुझा पहिला नंबर आला का!"
२) आई म्हणाली, " तुझा पहिला नंबर आला का? शाब्बास!"
३) आई म्हणाली - तुझा पहिला नंबर आला शाब्बास!
४) आई म्हणाली, "तुझा पहिला नंबर आला का शाब्बास

**२. दोन शब्द जोडताना कोणते विरामचिन्ह वापरतात?** ①②③④

१) योग्य चिन्ह २) संयोग चिन्ह
३) योग चिन्ह ४) अर्धविराम

**३. 'केवढी शुभवार्ता आणलीस तू' योग्य विरामचिन्ह निवडा.** ①②③④

१) , २) . ३) ? ४) !

**४. आश्चर्य, क्रोध वगैरे भावना दर्शवणारे चिन्ह ओळखा.** ①②③④

१) उद्‌गारवाचक चिन्ह (!)
२) प्रश्न चिन्ह (?)
३) दुहेरी अवतरण चिन्ह ("-")
४) अपसरण चिन्ह (-)

**५. हरि-हर या शब्दात कोणते चिन्ह वापरले?** ①②③④

१) प्रश्नचिन्ह २) उद्‌गारवाचक चिन्ह
३) संयोग चिन्ह ४) अवतरण चिन्ह

**६. वाक्य व त्याचा अर्थ पूर्ण झाला म्हणजे ....... येतो.** ①②③④

१) अर्धविराम २) अपूर्ण विराम
३) स्वल्पविराम ४) पूर्णविराम

**७. बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द आहेत तसेच लिहिण्याला कोणते शब्द वापरतात?** ①②③④

१) उद्‌गारवाचक २) संयोग चिन्ह
३) प्रश्न चिन्ह ४) अवतरण चिन्ह

**८. एखाद्या शब्दासाठी असणारा पर्याय दर्शविण्यासाठी दोघांच्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या चिन्हास काय म्हणतात?** ①②③④

१) संयोग चिन्ह २) लोप चिन्ह
३) अवतरण चिन्ह ४) विकल्प चिन्ह

**९. योग्य विरामचिन्हे दिलेले वाक्य ओळखा.** ①②③④

१) सोड मला! तो जोराने ओरडला.
२) "सोड मला!", तो जोराने ओरडला.
३) "सोड मला?" तो जोराने ओरडला.
४) सोड मला, तो जोराने ओरडला.

**प्रश्न २. योग्य विरामचिन्हे वापरून लिहिलेले वाक्य शोधा.**

**१. वाक्य - त्याने विचारले आवडले का तुला हे पुस्तक** ①②③④

१) त्याने विचारले, आवडले का तुला हे पुस्तक?
२) त्याने विचारले, "आवडले का तुला हे पुस्तक?"
३) त्याने विचारले, "आवडले का तुला हे पुस्तक"
४) त्याने विचारले, आवडले का तुला पुस्तक

**२. अरेच्या देवीचा वाढदिवस झाला परवा** ①②③④

१) "अरेच्या! देवीचा, वाढदिवस झाला परवा?"
२) "अरेच्या! देवीचा वाढदिवस झाला परवा?
३) "अरेच्या देवीचा वाढदिवस झाला परवा?"
४) "अरेच्या! देवीचा वाढदिवस झाला परवा?"

**२०१५ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले गेलेले प्रश्न**

**प्रश्न ३. पर्यायी उत्तरांतील 'उद्‌गारवाचक वाक्य' ओळखा.** ①②③④

१) ही मूर्ती खूप सुंदर आहे.
२) कोण म्हणतो ही मूर्ती सुंदर नाही.
३) किती सुंदर आहे ही मूर्ती.
४) ही मूर्ती सुंदर नाही असे नाही.

**प्रश्न ४. 'एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती' या विधानार्थी वाक्याचे पुढीलपैकी योग्य उद्‌गारार्थी वाक्य ओळखा.** ①②③④

१) वाः वाः! एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती.
२) बाप रे! एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती.
३) छेः छेः! कधी नव्हती पाहिली एवढी यात्रा.
४) हत्! कधी नव्हती पाहिली एवढी यात्रा.

**प्रश्न ५. विरामचिन्हांचा वापर करताना 'संयोगचिन्हाचा वापर करण्यात येतो'-**

**अ) दोन शब्द जोडताना.**
**ब) संबोधनाकरिता वापर केला जातो.**
**क) दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगण्यासाठी.**
**ड) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.**

१) (ब) बरोबर २) (ब), (ड) बरोबर
३) (अ), (क) बरोबर ४) (अ), (ड) बरोबर

❖ ❖ ❖

## पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा (सप्टेंबर २०१४)

१. कर्णपासून कान यासारख्या शब्दांना काय म्हणतात?

१) तत्सम शब्द २) देशी शब्द

३) तद्भव शब्द ४) परभाषीय शब्द

२. 'हलाहल' या शब्दाचा अर्थ काय?

१) अमृत २) विष

३) हाल ४) नांगर

३. पुढील वाक्यातील विधेय विस्तार ओळखा.

'आमचा छोटा मुलगा काल विकत घेतलेले पुस्तक अगदी तन्मयतेने वाचीत बसला आहे.'

१) वाचीत बसला आहे २) विकत घेतलेले

३) अगदी तन्मयतेने ४) छोटा मुलगा

४. पुढीलपैकी कानडी शब्द कोणते?

१) दादर, डबा, रिकामटेकडा

२) ताई, भाकरी, तूप

३) ताळा, अनरसा, शिकेकाई

४) तपास, दाम, करोड

५. एकाच आईच्या पोटी ज्यांचा जन्म झाला आहे असे -

१) सहोदर २) आप्तेष्ट

३) गणगोत ४) आप्तस्वकीय

६. पुढीलपैकी व्याकरणदृष्ट्या चुकीचा शब्द ओळखा.

१) उत्स्फूर्त २) उन्मूलन

३) उत्तूंग ४) उत्सृष्ट

७. पुढीलपैकी तद्भव शब्द ओळखा.

१) कर २) जल

३) घाम ४) हस्त

८. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | आज्ञार्थी | I | मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी. |
| ब) | विध्यर्थी | II | मुलांनो, चांगला अभ्यास करा. |
| क) | संकेतार्थी | III | अबब! केवढी प्रचंड आग ही! |
| ड) | उद्गारार्थी | IV | पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता. |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | II | I | IV | III |
| 2) | II | I | III | IV |
| 3) | II | III | I | IV |
| 4) | I | II | III | IV |

९. ताळा, अनरसा, किडूकमिडूक, शिकेकाई हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत?

१) मराठी २) हिंदी

३) गुजराती ४) तेलुगू

१०. पुढीलपैकी 'करणरूपी' वाक्य कोणते?

१) अबब! केवढी प्रचंड आग ही!

२) माझे वडील आज परगावी गेले.

३) गोविंदा अभ्यास करतो.

४) जे चकाकते, ते सोने नसते.

११. खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा. (*)

१) तुटपुटू २) तुटपुटु

३) तूटपूटू ४) तुटपूटू

१२. 'मागून जन्मलेला' या शब्दसमूहासाठी एक शब्द निवडा.

१) अग्रज २) अपूर्व

३) अनुज ४) अष्टावधानी

१३. खालीलपैकी कोणता शब्द पोर्तुगीज भाषेतून आला आहे?

१) हापूस २) अर्ज

३) सामान ४) अण्णा

१४. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | दात दाखवणे | I | फजिती होणे. |
| ब) | दात वासणे | II | एखाद्याची टिंगल करून हसणे. |
| क) | दात विचकणे | III | नुकसानीमुळे खिन्न होऊन बसणे. |
| ड) | दात पडणे | IV | एखाद्याला वेडावणे |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | II | III | IV | I |
| 2) | II | III | I | IV |
| 3) | II | IV | I | III |
| 4) | I | II | III | IV |

१५. खालीलपैकी उपसर्गघटित शब्द ओळखा.

१) लेखक २) टाकाऊ

३) अतिशय ४) आनंदित

१६. 'पाणि' या शब्दाचा अर्थ-

१) पेय पदार्थ २) हात

३) पाणिनी ४) जल

१७. अयोग्य जोडी निवडा.

१) अनल-अग्नी २) कमाल-किमान

३) मित्र-शत्रू ४) क्षर-अक्षर

१८. सरदार, बिनचूक, वेदना, भरजरी या चार शब्दांपैकी कोणता शब्द उपसर्गघटित शब्द नाही?

१) सरदार २) बिनचूक

३) वेदना ४) भरजरी

१९. मधूनमधून असेच घराकडे येत जा. या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारात मोडतो?

१) पूर्णाभ्यस्त शब्द २) अंशाभ्यस्त शब्द

३) अनुकरणवाचक शब्द ४) यापैकी नाही

२०. खालील वाक्याचे केवल वाक्य करा.

'जे लोक बुद्धिमंत असतात ते यशस्वी होतात.'

१) बुद्धिमान लोक यशस्वी होतातच असे नाही.

२) बुद्धिमंत लोक यशस्वी होतात.

३) बुद्धिमान असतात म्हणून लोक यशस्वी होतात.

४) बुद्धिमंत यशस्वी होतातच असे नाही.

२१. 'शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.' या वाक्यातील विधेय विस्तार ...... हा आहे.

१) शरदाच्या चांदण्यात २) गुलमोहर

३) मोहक ४) दिसतो

२२. पुढीलपैकी उष्म वर्ण ओळखा.

१) अ, आ २) ह

३) श, ष, स ४) क, ख, ग

२३. त्या आजारी माणसाला आता थोडे बसवते. या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणते क्रियापद आहे?

१) प्रयोजक क्रियापद २) शक्य क्रियापद

३) अनियमित क्रियापद ४) गौण क्रियापद

२४. पुढीलपैकी फारसी व अरबी उपसर्ग असणारे शब्द कोणते?

१) पहसाद, फटकाळ, भरजरी

२) कमजोर, गैरसोय, दरमहा

३) उपवास, उद्योग, आकर्ष

४) प्रबल, विज्ञान, संगम

२५. योग्य शब्दार्थांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | नदी | I | शैल |
| ब) | पर्वत | II | अंबू |
| क) | पाणी | III | तरंगिणी |
| ड) | पृथ्वी | IV | क्षमा |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | II | III | IV | I |
| 2) | IV | II | III | I |
| 3) | III | IV | I | II |
| 4) | III | I | II | IV |

२६. पुढीलपैकी फारसी प्रत्यय लागून तयार झालेला तद्धित शब्द कोणता?

१) सावकारी २) पहारेकरी

३) मजुरी ४) मासलेवाईक

२७. 'तो गाणे गातो' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

१) भावे २) कर्मणी

३) कोणताही नाही ४) कर्तरी

२८. पुढीलपैकी कंठाजवळ उच्चार कोणत्या वर्गाचा होतो?

१) प-वर्ग २) क-वर्ग

३) त-गर्व ४) ट-वर्ग

२९. पुढीलपैकी विध्यर्थी वाक्य ओळखा.

१) मुले घरी गेली

२) पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता.

३) मुलांनो, चांगला अभ्यास करा.

४) मला परीक्षेत पहिला वर्ग मिळावा.

३०.

I) तानाजी लढता लढता मेला.

II) आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो.

III) मी रोज सकाळी पहाटे उठतो व एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.

IV) मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी.

a) विधान क्र. I) केवल वाक्याचे उदाहरण आहे.

b) विधान क्र. II) संयुक्त वाक्याचे उदाहरण आहे.

c) विधान क्र. III) मिश्र वाक्याचे उदाहरण आहे.
d) विधान क्र. IV) आज्ञार्थी वाक्याचे उदाहरण आहे.
१) फक्त (b) बरोबर २) फक्त (c) बरोबर
३) फक्त (a) बरोबर ४) फक्त (d) चूक

३१. खालीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा.
१) फटफजिती २) सरकार
३) हररोज ४) रमणीय

३२. खालीलपैकी कानडी शब्द ओळखा.
१) सार २) चिलीपिली
३) किल्ली ४) रिकामटेकडा

३३. खालील शब्द कोणत्या शब्दसिद्धीतील आहे?
'भरदिवसा'
१) उपसर्गघटित शब्द २) प्रत्ययघटित शब्द
३) सामासिक शब्द ४) अभ्यस्त शब्द

३४. जा, ये, कर, बस, बोल, पी यांसारख्या मूळ धातूंना काय म्हणतात?
१) सिद्ध शब्द २) साधित शब्द
३) उपसर्गघटित ४) प्रत्ययघटित

३५. पुढील पर्यायातून शुद्ध शब्द ओळखा.
१) मिस्किल २) मिश्किल
३) मिश्कील ४) मिष्किल
(हा प्रश्न आयोगाने रद्द केला आहे.)

३६. पुढील वाक्यांतून 'केवल वाक्य' शोधा.
१) मला ताप आला आहे. मी शाळेस जाणार नाही.
२) मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही.
३) मला ताप आला आहे, म्हणून मी शाळेस जाणार नाही.
४) मी शाळेस जाणार नाही, कारण मला ताप आहे.

३७. पुढीलपैकी तत्सम शब्द ओळखा.
१) वृक्ष २) घर
३) गाव ४) काम

३८. पुढील वाक्याचा प्रकार ओळखा.
'जे चकाकते ते सोने नसते'
१) केवल वाक्य २) मिश्र वाक्य
३) संयुक्त वाक्य ४) प्रधान वाक्य

३९. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे' या वाक्यातील प्रयोग ओळखा.
१) अकर्मक भावे प्रयोग २) सकर्मक भावे प्रयोग
३) भावकर्तरी प्रयोग ४) संकर प्रयोग

४०. पुढील पर्यायांतून अचूक शब्द लिहा.
१) साहायक २) साह्यक
३) सहायक ४) सहाय्यक

४१. खालील विधानातील क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा.
'तो इतका मोठ्याने बोलला, की त्याचा आवाज बसला.'
१) उद्देशदर्शक २) कारणदर्शक
३) रीतिदर्शक ४) कालदर्शक

४२. शेजारीपाजारी, उरलासुरला, बारीकसारीक, हे शब्द शब्दांच्या कोणत्या प्रकारात मोडतात?
१) पूर्णाभ्यस्त शब्द २) अंशाभ्यस्त शब्द
३) अनुकरणवाचक ४) यांपैकी नाही

४३. 'घोडा' या शब्दाचे योग्य सामान्यरूप कोणते?
१) घोड २) घोडे
३) घोड्या ४) घोडी

४४. खालील साधित शब्दाचा प्रकार ओळखा.
'प्रतिक्रिया'
१) प्रत्ययघटित शब्द २) उपसर्गघटित शब्द
३) सामासिक शब्द ४) अभ्यस्त शब्द

४५. 'त्याची गोष्ट लिहून झाली' या विधानातील प्रयोग ओळखा.
१) समापन कर्मणी २) नवीन कर्मणी
३) पुराण कर्मणी ४) शक्य कर्मणी

४६. 'हत्ती' या शब्दाला समानार्थी शब्द निवडा.
१) रवी २) मधुप
३) सारंग ४) नंदन

४७. 'भारूड' हा रचनाप्रकार कोणी रूढ केला?
१) संत ज्ञानेश्वर २) संत तुकाराम
३) संत एकनाथ ४) संत जनाबाई

४८.
I) पतंग झाडावर अडकला होता.
II) पतंग वर जात होता.
a) विधान क्र. I) शब्दयोगी अव्ययाचे उदाहरण आहे.
b) विधान क्र. I) क्रियाविशेषण अव्ययाचे उदाहरण आहे.
c) विधान क्र. II) क्रियाविशेषण अव्ययाचे उदाहरण

d) विधान क्र. II) शब्दयोगी अव्ययाचे उदाहरण आहे.

१) फक्त (d) बरोबर २) फक्त (b) बरोबर

३) फक्त (a) व (c) बरोबर ४) फक्त (d) चूक

४९. पुढील शब्दसिद्धीचा प्रकार ओळखा.

'धडपड'

१) पूर्णाभ्यस्त २) अंशाभ्यस्त

३) अनुकरणवाचक

४) यांपैकी कोणताही नाही

५०. 'त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला' या वाक्यातील उद्देश्य ओळखा.

१) मुलगा २) आज

३) चांगला ४) खेळला

❖ ❖ ❖

## राज्यसेवा मुख्य परीक्षा, २०१५

१. 'जळू' या शब्दाचे अनेकवचन लिहा.

२. '<u>एकेक</u> मुलगा शक्तिमान आहे'. अधोरेखित शब्दाच्या विशेषणाचा प्रकार ओळखा.

३. पुढील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.
'गुरुजी विद्यार्थ्यांना व्याकरण शिकवितात'.

४. 'मरावे <u>परी</u> कीर्तिरुपे उरावे' या विधानातील अधोरेखित शब्दाच्या अव्ययाचा प्रकार ओळखा.

५. 'पुण्यामृत' या सामासिक शब्दाचा समास कोणता ते ओळखा.

६. जेव्हा कोणत्याही काव्यात वा वाक्यात उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ दाखविले जाते तेव्हा कोणता अलंकार होतो?

७. 'पोर' या शब्दाचे लिंग कोणते?

८. खालीलपैकी शुद्ध वाक्य कोणते ते ओळखा. ①②③④

१) बुगडी माझी सांडली गं

२) बुगडि माझी सांडलि ग

३) बूगडि माझी सांडली गं

४) बूगडि माझि सांडली गं

९. मराठीत 'पगार' हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे?

१०. पुढील शब्दांबाबत उत्तराच्या अचूक पर्यायाची निवड करा. ①②③④

कवि, मती, गती, सृष्टी, गुरु

अ) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात दीर्घ लिहिले जातात त्यानुसार पहिले चार शब्द बरोबर आहेत. परंतु 'गुरु' हा शब्द चूक आहे.

ब) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात दीर्घ लिहिले जातात त्यानुसार वरील सर्व शब्द बरोबर आहेत.

क) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात ऱ्हस्व लिहिले जातात त्यानुसार वरील सर्व शब्द चूक आहेत.

ड) वरील एकही पर्याय योग्य नाही.

❖ ❖ ❖

## विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा, २०१५

१. 'ळ' हा ध्वनी खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे?

१) मूर्धन्य २) ओष्ठ्य

३) कंपनयुक्त ४) दंततालव्य

२. पुढीलपैकी कोणता गट समानार्थी शब्दांचा आहे ?

१) कावळा, काक, पायस २) नग, खग, विहग

३) पय, उदक, सलिल ४) सुर, असुर, दानव

३. पर्यायी उत्तरातील 'संयुक्त वाक्य' कोणते?

१) मी चहा पितो म्हणून माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

२) मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

३) माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आवडत नाही.

४) मी चहा पितो पण माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

४. 'मी ग्रंथ वाचत जाईन' या वाक्याचा काळ ओळखा.

१) रीति भूतकाळ २) रीति वर्तमानकाळ

३) रीति भविष्यकाळ ४) पूर्णरीति भविष्यकाळ

५. 'तू कुत्र्याला मारलेस' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

१) कर्तृकर्मसंकर प्रयोग २) कर्मभाव संकर प्रयोग

३) कर्तृभाव संकर प्रयोग ४) कर्मणी प्रयोग

६. पुढे दिलेल्या म्हणींच्या गटातून अधिकांश साम्य असणारी जोडी पर्यायी उत्तरांतून शोधा.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| अ) मनच राजा मनच प्रजा | १) मनात एक अन् जनात एक |
| ब) मनात मनोरे पुढे ताट कोरे | २) मनाला मानवेल तोच सौदा |
| क) मनाएवढी ग्वाही त्रिभुवनात नाही | ३) मन. चिंती ते वैरी न चिंती |
| ड) मनच जाणे पाप | ४) मनात मांडे नि पदरात धोंडे |

१) अ - २ २) ब - ४
३) क - १ ४) ड - ३

७. **'गावजेवण' हा पुढीलपैकी कोणता समास आहे?**
१) षष्ठी तत्पुरुष २) सप्तमी तत्पुरुष
३) चतुर्थी तत्पुरुष ४) पंचमी तत्पुरुष

८. **पुढीलपैकी सिद्ध शब्दांचा गट कोणता?**
१) कर, पाह, आण
२) करा, पाहणी, ने-आण
३) बोलाचाली, जाऊन, येथून
४) चाल, आणणावळ, सुकर

९. **'काही क्रियाविशेषणे विकारी तर काही क्रियाविशेषणे अविकारी असतात' या विधानाबाबत खालील कोणता पर्याय योग्य आहे?**
१) या विधानाचा पूर्वार्ध चूक आहे.
२) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.
३) हे संपूर्ण विधान चूक आहे.
४) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.

१०. **खालील विधानातील अधोरेखित शब्द समूहाचे पर्यायी उत्तरांतील योग्य पर्यायी उत्तर कोणते?**
**'तो चोर गाडी भरभाव घेऊन पळाला.'**
१) मुख्य उद्देश्य २) उद्देश्य विस्तार
३) मुख्य विधेय ४) विधेय विस्तार

११. **'कोळ्याने नदीत टाकलेल्या जाळ्यामध्ये भरपूर मासे आले.' या वाक्यातील कर्ता कोणता ?**
१) कोळी २) जाळे
३) मासे ४) नदी

१२. **खालील पर्यायी उत्तरातील 'संकेतार्थी वाक्य' ओळखा.**
१) आजच्या जगात एकमेकांवर दया करणे महत्त्वाचे आहे.
२) सर्वांनी दया करावी, असे मला वाटते.
३) जर सगळेच दया दाखवतील तर जग सुखी होईल.
४) जग सुखी होण्यासाठी थोड्या थोड्याच लोकांनी दया दाखवून चालणार नाही.

१३. **विभक्ती प्रत्यय लागल्याने शब्दाच्या अंत्य अक्षरात विकार होण्याच्या क्रियेला काय म्हणतात?**
१) सामान्यरूप २) संधी
३) कारकार्थ ४) उपपदार्थ

१४. **'प्रकारदर्शक रीतिवाचक क्रियाविशेषण' पर्यायी उत्तरातील कोणते?**
१) आपोआप २) खचित
३) चमचम ४) खरोखर

१५. **पर्यायी उत्तरातील गटाबाहेरचा 'शब्द साधित' शब्द कोणता?**
१) कायिक २) आनंदित
३) स्वकीय ४) नातेवाईक

१६. **खालील म्हण पूर्ण करा.**
**'उधार तेल .......'**
१) जळकट २) कळकट
३) खवट ४) मळकट

१७. **'प्रवासभाड्यातील वाढीचा निषेध करण्यासाठी लोक रस्त्यावर उतरले'. अधोरेखित शब्दाचे वाक्यातील स्थान पुढीलप्रमाणे आहे?**
१) कर्मपूरक २) आधारपूरक
३) विधिपूरक ४) विधेय

१८. **'पाणक्या', 'गळेकापू' हे शब्द खालीलपैकी समासाच्या कोणत्या प्रकारातील आहे?**
१) उपपद तत्पुरुष २) मध्यमपदलोपी
३) बहुव्रीही ४) अव्ययीभाव

१९. **'पिंजारी' या शब्दात पुढीलपैकी कोणता प्रत्यय आहे?**
१) 'री' हा कर्तृवाचक प्रत्यय
२) 'आरी' हा कर्तृवाचक प्रत्यय
३) 'ई' हा कर्तृवाचक प्रत्यय
४) 'आर' हा कर्तृवाचक व 'ई' ला लिंगदर्शक प्रत्यय

२०. **'एस डी बर्मन यांच्या गाण्यांमधील माधुरी अवीट आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे?**

१) भाववाचक नाम २) विशेषनाम
३) विशेषण ४) क्रियाविशेषण

**२१. खालील शब्दातील योग्य वर्णरचना कोणती?**

**'वृद्ध्यादेश'**

१) व् + ऋ + द् + ध + ई + आ + द् + ए + श + अ

२) व् + ऋ + द् + ध् + य + आ + द् + ए + श् + अ

३) व् + ऋ + द् + ध् + ई + अ + द + ए + श + अ

४) व् + ऋ + द + ध + ई + अ + द + ए + श् + अ

**२२. 'तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार' - या ओळीतील 'तडिताघाते' याचा अर्थ.**

१) तडाखेदार वाराने २) विजेच्या आघाताने
३) आसूडाच्या वाराने ४) तलवारीच्या वाराने

**२३. 'सानियाने स्पर्धाआधी खूप सराव केला. प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.' यांचे केवलवाक्य पुढीलपैकी कशा प्रकारचे होईल?**

१) सानियाने स्पर्धाआधी खूप सराव व्हावा, म्हणून प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.

२) सानियाने स्पर्धाआधी खूप सराव व्हावा, म्हणून प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.

३) जेव्हा सानियाने स्पर्धाआधी सराव केला, तेव्हा प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्सास केला.

४) सानियाने स्पर्धाआधी प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास करून खूप सराव केला.

**२४. पर्यायी उत्तरातील व्याकरणदृष्ट्या योग्य शब्द कोणता?**

१) अभीनिवेश २) अभीनीवेश
३) अभिनीवेश ४) अभिनिवेश

**२५. 'त्यांना शक्ती प्राप्त होवो' या वाक्यातील आख्यात ओळखा.**

१) विध्यर्थ २) आज्ञार्थ
३) वाख्यात ४) ताख्यात

**२६. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.**

**'तू गाईला धालविलेस.'**

१) कर्म - भाव संकर प्रयोग

२) कर्तृ - कर्म संकर प्रयोग

३) कर्तृ - भाव संकर प्रयोग

४) पुराण कर्मणी प्रयोग

**२७. 'मी तिला पाहिले. ती बाजारात भाजी घेती होती.' या वाक्याचे मिश्र वाक्य कशा प्रकारे होईल?**

१) बाजारात भाजी घेताना मी तिला पहिले.

२) मी तिला बाजारात भाजी घेत असलेली पाहिली.

३) मी तिला पाहिले पण ती बाजारात भाजी घेत होती.

४) जेव्हा मी तिला पाहिले, तेव्हा ती बाजारात भाजी घेत होती.

**२८. 'पादपूरणार्थक केवल प्रयोगी अव्यय' असलेले विधान पर्यायी उत्तरातील कोणते आहे?**

१) रामराम काय हा प्रसंग

२) छे मी तसं कुठं काय म्हटले?

३) आणखीन काय बरे ते

४) वाहवा तू पैज जिंकलीस तर

**२९. खालीलपैकी कोणता शब्द लेखननियमानुसार अचूक आहे?**

१) परिवर्तननियता २) परीवर्तनियता
३) परिवर्तनीयता ४) परिवर्तनियता

**३०. 'धडाधड' हा शब्द, शब्दसिद्धीच्या कोणत्या उपप्रकारातील आहे?**

१) प्रत्यय घटित २) उपसर्ग घटित
३) अभ्यस्त ४) सामासिक

**३१. खालील वाक्यातील 'नकारार्थी वाक्य' कोणते?**

१) तो घरी आल्याशिवाय राहणार नाही.

२) काय म्हणता, तो घरी खात्रीने येणार.

३) अरेव्वा, शेवटी तो घरी आलाच.

४) तो घरी येणारच नाही

**३२. 'कोण काय करणार आहे माझे?' या विधानातील कोण हे सर्वनाम कोणती भावना व्यक्त करणारे आहे?**

१) आश्चर्य २) तुच्छता
३) अगतिकता ४) विलक्षणपणा

**३३. खालील पर्यायी उत्तरातील 'प्रश्नार्थक वाक्य' कोणते?**

१) कालची किती ती गर्दी.

२) कालची गर्दी नव्याने का सांगायला हवी.

३) काल खूपच गर्दी होती.

४) काल गर्दी नव्हती असे नाही.

**३४. 'तिने सारे धान्य निवडून ठेवले' यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे?**

१) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

२) अव्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

३) प्रत्ययसाधित क्रियाविशेषण

४) धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय

**३५. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक अतिशय गुंतागुंतीचे गणित सोडविण्यास दिले.' अधोरेखित वाक्यातील स्थान पुढीलपैकी कोणते?**

१) विधेयपूरकाचा विस्तार

२) विधिपूरकाचा विस्तार

३) कर्मपूरकाचा विस्तार

४) उद्देश्य विस्तार

**३६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात सांगा.**

**'त्यांच्या बोलण्यात परंतुचा वापर फार होतो.'**

१) केवलप्रयोगी अव्यय २) नाम

३) सर्वनाम ४) विशेषण

**३७. '........ वास उन्हाळ्यात थंडावा देतो.' गाळलेल्या शब्दाच्या जागी पुढीलपैकी कोणता पर्याय योग्य आहे?**

१) कापुराचा २) कापराचा

३) कापऱ्याचा ४) कापुरीचा

**३८. खालील शब्द समूहाकरीता पर्यायी उत्तरातील कोणता वाक्यप्रचार योग्य आहे?**

**'फार जवळ येणे.'**

१) तोंड टाकणे. २) तोंडात बोट घालणे.

३) तोंडावर हात ठेवणे. ४) तोंडावर येणे.

**३९. खालील पर्यायांतून अनुनासिकांचा अचूक गट ओळखा.**

१) ङ, ण, न, म, ञ २) ङ, ञ, ण, म, क्ष

३) ङ, ञ, ण, न, म ४) ङ, ञ, म, सं, ञ

**४०. पुढीलपैकी एक शब्द विसंगत आहे / गटाबाहेरचा आहे, पर्यायी उत्तरातून तो शब्द शोधा.**

१) संधला २) सनला

३) संदला ४) संदिसा

**४१. 'अव्ययसाधित विशेषण' असलेले विधान पर्यायी उत्तरात कोणते आहे?**

१) बोलक्या बाहुल्यांचा खेळ सर्वांनाच आवडतो.

२) आज तुम्ही कोणत्या गावाला जाणार?

३) बनारसी बोरे रसाळ असतात.

४) ते गव्हाचे पोते पुढच्या माळीत ठेव

**४२. 'हात दाखवणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ -**

१) विजयाची खूण करणे.

२) अभिवादन करणे.

३) निरोप घेणे. ४) चोप देणे.

**४३. लेखननियमांनुसार खालील कोणता शब्द अचूक आहे?**

१) उपरोल्लिखित २) ऊपोल्लिखित

३) उपरोल्लिखीत ४) उपरोलिखित

**४४. खालील गट अ व गट ब मधील एक जोडी चुकीची आहे, ती पर्यायी उत्तरांतून शोधा.**

| 'अ' (उदाहरणे) | 'ब' (उभयान्वयी अव्यये) |
|---|---|
| अ) म. गांधी म्हणत, की सर्वांनी सत्याने वागावे | १) विकल्प बोधक |
| ब) तो इतका रडला, की त्याचे तोंड सुजले. | २) न्यूनत्व बोधक |
| क) यश मिळो, की न मिळो मी प्रयत्न करणार. | ३) परिणाम बोधक |
| ड) माझा पहिला नंबर आला, की मी पेढे वाटीन. | ४) स्वरूप दर्शक |

१) अ - ४ २) ब - ३

३) क - १ ४) ड - २

**४५. 'समुद्र' या शब्दाला खालीलपैकी समानार्थी शब्द कोणता?**

१) अर्णव २) वडवानळ

३) खग ४) सागरवेळा

**४६. 'शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.**

१) शक्य क्रियापद २) द्विकर्मक क्रियापद

३) प्रयोजक क्रियापद ४) अकर्तृक क्रियापद

**४७. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्दांचे लेखन अचूक आहे?**

१) ज्यादा, सफेत, अंधःकार

२) महत्व, धिःकार, उत्कृष्ठ

३) तत्व, दूसरा, ज्येष्ट

४) कोट्यधीश, घनश्याम, मदत

**४८. 'कमळ आणि बेडूक दोघेही चिखलात उत्पन्न झालेले म्हणजे ....... असतात.' रिकाम्या जागी**

योग्य पर्याय निवडा.

१) बंधू　　२) समानशील

३) पंकज　　४) अंबुज

४९. पर्यायी उत्तरांतील 'उद्गारवाचक वाक्य' ओळखा.

१) ही मूर्ती खूप सुंदर आहे.

२) कोण म्हणतो ती मूर्ती सुंदर नाही.

३) किती सुंदर आहे ही मूर्ती

४) ही मूर्ती सुंदर नाही असे नाही.

५०. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत?

१) इलाखा, खुशाल, मजूर

२) घोडा, डाहळी, पोट

३) वहाण, रक्त, तूप

४) कोठार, शेत, सोने

५१. मनःपटल हा जोडशब्द खालीलपैकी कोणत्या जोडशब्दातून बनला आहे?

१) मन + पटल　　२) मनहा + पटल

३) मनस् + पटल　　४) मनो + पटल

५२. जी कर्मे क्रियापदावर अधिकार गाजवणारी असतात, त्यांना कोणत्या प्रकारची कर्मे म्हणतात?

१) अप्रत्यक्ष कर्मे　　२) प्रभावी कर्मे

३) प्रत्यक्ष कर्मे　　४) पूरक

५३. पुढील शब्दांची संधी फोड करा.

'निरिच्छ'

१) निः + च्छ　　२) निरः + इच्छ

३) निः + इच्छ　　४) निरी + च्छ

५४. 'जो, जी, जे; ज्या, जी' ही सर्वनामांची रूपे कोणत्या प्रकारातील आहेत?

१) दर्शक सर्वनामे　　२) प्रश्नार्थक सर्वनामे

३) संबंधी सर्वनामे　　४) आत्मवाचक सर्वनामे

५५. खालील शब्दांतील देशी शब्द ओळखा.

१) ढेकूण　　२) सामना

३) जाहीर　　४) डबा

❖ ❖ ❖

## राज्यसेवा मुख्य परीक्षा (२०१६)

१. खालील शब्द व त्यांचे अर्थ यांच्या योग्य त्या जोड्या जुळवा. ①②③④

a) प्रतीची　　i) संकेत

b) प्रतीती　　ii) पश्चिम दिशा

c) प्रत्यही　　iii) अनुभव

d) प्रतीक　　iv) नेहमी

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| 2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| 3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| 4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

२. उभी जोडणी आणि आडवी जोडणी असलेले कोणते शब्द बरोबर आहेत ते लिहा? ①②③④

a) अन्न　　c) फत्रा

b) मुद्दा　　d) मुद्‌दा

1) (a) आणि (c) बरोबर (b),(d) चूक

2) (b) आणि (d) बरोबर (a), (c) चूक

3) सर्व बरोबर

4) सर्व चूक

३. योग्य जोड्या जुळवा. ①②③④

a) मांजराने उंदीर खाऊन टाकला　　i) अकर्तृक क्रियापद

b) शिंक्याचे तुटले　　ii) द्विकर्मक क्रियापद

c) विदूषक मुलांना हसवितो.　　iii) सहायक क्रियापद

d) मुलांनी चावऱ्या कुत्र्याला खडे मारले　　iv) प्रयोजक क्रियापद

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| 2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| 3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| 4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

४. 'एका हाताने टाळी वाजत नाही.' या वाक्यातील 'नाही' या क्रियापदास काय म्हणतात? ①②③④

1) अनियमित क्रियापद　　2) शक्य क्रियापद

3) प्रयोजक क्रियापद　　4) सिद्ध क्रियापद

५. 'चांगला औषधोपचार लाभावा म्हणून तो मुंबईस गेला.' या वाक्यातील 'म्हणून' या अव्ययास काय म्हणतात? ①②③④

1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
2) संकेतबोधक, उभयान्वयी अव्यय
3) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय
4) कारकबोधक उभयान्वयी अव्यय

६. खालील 'म्हण' अचूक शब्दाने पूर्ण करा.
'सारा चोरांचाच ..............' ①②③④

1) मामला 2) कारभार
3) बाजार 4) गोंधळ

७. 'घोडा घोडा खेळू चला। मौज घडीभर करू चला' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा. ①②③④

1) अभ्यस्त शब्द 2) सामासिक शब्द
3) पूर्णाभ्यस्त शब्द 4) अंशाभ्यस्त शब्द

८. 'हिरवे हिरवे गार गालिचे' या ओळीतील विशेषणाचा प्रकार कोणता? ①②③④

1) क्रमवाचक चिन्ह 2) आवृत्तिवाचक विशेषण
3) गुणवाचक चिन्ह 4) गणनावाचक विशेषण

९. अधोरेखित शब्द समूहाचे योग्य उत्तर कोणते?
त्याचा धाकटा मुलगा आज फुटबॉलच्या सामन्यात चांगला खेळला. ①②③④

1) उद्देश्य विस्तार 2) उद्देश्य
3) विधेय विस्तार 4) विधेय

१०. 'ती नियमितपणे वर्तमानपत्र वाचीत असे' या वाक्यातील काळ ओळखा. ①②③④

1) अपूर्ण वर्तमानकाळ 2) पूर्ण वर्तमानकाळ
3) रीतिवर्तमानकाळ 4) रीतिभूतकाळ

११. वाक्यप्रचार व त्याचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.

a) ओटी भरणे i) सुखरूप प्रसूत होऊन बाळासह
b) ओटीत घालणे ii) दत्तक देणे
c) ओटीत देणे iii) आश्रयाखाली देणे, सांभाळायला देणे
d) भरल्या ओटीने iv) सुवासिनीच्या पदरात तांदूळ, सुपारी, नारळ, हळकुंड इ. पदार्थ घालणे

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| 2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| 3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| 4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

१२. 'सर्वांना समज दिली जाईल' या वाक्याचा प्रयोग ओळखा. ①②③④

1) शक्यकर्मणी 2) कर्मकर्तरी
3) पुराणकर्मणी 4) भावकर्तरी

१३. काळ आणि त्यांच्या व्याख्या यांच्या जोड्या लावा. ①②③④

| व्याख्या | काळ |
|---|---|
| a) वाक्यातील क्रिया पुढे होईल असा बोध होतो तेव्हा | i) भूतकाळ |
| b) वाक्यातील क्रिया पूर्ण झाली, की, | ii) वर्तमानकाळ |
| c) वाक्यातील क्रिया चालू असल्याचे दर्शविते तेव्हा | iii) रीति भूतकाळ |
| d) वाक्यातील क्रिया भूतकाळी तरीही, वरचेवर होत असे; असा बोध | iv) भविष्यकाळ |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| 2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| 3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| 4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

१४. शब्द व समास यांच्या योग्य जोड्या जुळवा. ①②③④

a) क्रीडांगण i) कर्मधारय तत्पुरुष समास
b) पीतांबर ii) नञ् तत्पुरुष समास
c) जलद iii) विभक्ती तत्पुरुष समास
d) अयोग्य iv) उपपद तत्पुरुष समास

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| 2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| 3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| 4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

१५. खाली मराठी व्याकरणातील संधीचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे दिलेली आहेत. ①②③④

| संधी | उदाहरण |
|---|---|
| a) सजातीय स्वरसंधी | i) भेटून |
| b) विजातीय स्वरसंधी | ii) नाहीसा |
| c) पूर्वरूप स्वरसंधी | iii) गोलाकार |
| d) पररूप स्वरसंधी | iv) रामेश्वर |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| 2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| 3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| 4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

१६. 'अलीकडे मी तुम्हाला एकही पत्र लिहिले नाही' या वाक्याच्या वाक्यपृथक्करणाच्या जोड्या लावा. ①②③④

| | |
|---|---|
| a) अलीकडे | i) क्रियापद |
| b) मी | ii) विधेयविस्तार |
| c) तुम्हाला एकही पत्र | iii) कर्म व कर्मविस्तार |
| d) लिहिले नाही | iv) उद्देश्य |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| 2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| 3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| 4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

१७. पुढील विधाने वाचून योग्य उत्तर लिहा. ①②③④

a) क्रियापदांना काळ व अर्थ यांचे विकार होतात.

b) कधी कधी वर्तमानकाळाच्या किंवा भूतकाळाच्या क्रियापदावरून भविष्यकाळाचा आशय व्यक्त होतो.

c) संकेतार्थी क्रियापदे भूतकाळी असतात.

1) फक्त (b) व (c) चूक

2) फक्त (b) बरोबर

3) फक्त (c) चूक

4) फक्त (a) व (c) बरोबर

१८. पुढीलपैकी शब्दसाधित वा तद्धित ओळखा : ①②③④

अ) यादव ब) खडकाळ क) माय ड) कर्ण

1) (a) आणि (b) बरोबर (c), (d) चूक

2) (c) आणि (d) बरोबर (a), (b) चूक

3) (c) आणि (d) बरोबर (a), (b) चूक

4) सर्व बरोबर

१९. व्यंजनांच्या लेखाकाराच्या जोड्या लावा : ①②③④

| | |
|---|---|
| a) दंड नसलेले व्यंजन | i) ळ् |
| b) मध्ये दंड असलेले व्यंजन | ii) प् |
| c) जोडलेला दंड असलेले व्यंजन | iii) फ् |
| d) अर्ध दंड असलेले व्यंजन | iv) ऱ् |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| 2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| 3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| 4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

२०. 'अ' गटात सर्वनामांचे प्रकार व 'ब' गटात ती सर्वनामे वापरलेली वाक्ये दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवा. ①②③④

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| a) दर्शक सर्वनाम | i) जो करेल तो भरेल |
| b) प्रश्नार्थक सर्वनाम | ii) हे पुस्तक कोणी फाडले? |
| c) सामान्य सर्वनाम | iii) तो हत्ती पाहा. |
| d) संबंधी सर्वनाम | iv) कोणी कोणास हसू नये. |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| 2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| 3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| 4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

२१. खालील व्यंजनगटातील 'महाप्राण' व्यंजनाचा गट ओळखा. ①②③④

१) य्, र्, ल्, व्	२) ख्, घ्, छ्, झ्
३) अ, आ, ई, ऊ	४) त्, ट्, प्, च्

२२. गटाबाहेरचा शब्द कोणता? ①②③④

1) अपुरा	2) नास्तिक

3) बेडर	4) जलद

२३. प्रतिक्षण, कष्टसाध्य, घरोघरी, अन्याय यापैकी अव्ययीभाव समासाचे शब्द ओळखा : ①②③④

1) प्रतिक्षण ; घरोघरी	2) कष्टसाध्य ; अन्याय

3) कष्टसाध्य ; घरोघरी	4) घरोघरी ; अन्याय

२४. a) अर्णवाने आपले रूप दाखवले. ①②③④

b) रत्नाकर दिमाखदार दिसत होता.

c) सिंधू कधी नमतं घेत नाही.

d) मृगेंद्राचे अस्तित्वच वेगळे आहे.

यापैकी 'समुद्र' या शब्दाशी समांतर असणाऱ्या अर्थाची विधाने असणारा पर्याय ओळखा :

1) (a), (b), (c)	2) (b), (c), (d)

3) (a), (c), (d)	4) (a), (b), (d)

२५. पुढील वाक्प्रचाराचा अर्थ कोणता ते लिहा? ①②③④

अंत पाहणे

a) एखाद्याकडून निघेल तितके काम करून घेणे.

b) एखाद्याच्या कर्तृत्वशक्तीचा, सहनशक्तीचा पूर्णपणे उपयोग करून घेणे.

c) एखाद्याला पुरतेपणी कसास लावणे.

d) एखाद्याला छळणे.

1) (a) आणि (d) बरोबर, बाकी सर्व चूक

2) (c) आणि (b) बरोबर, बाकी सर्व चूक

3) सर्व चूक

4) सर्व बरोबर

२६. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा. ①②③④

a) शब्दांच्या पाठीमागे उपसर्ग लागून उपसर्गघटित शब्द बनतात.

b) सर्वनामांना तद्धित प्रत्यय लागून नवीन शब्द तयार होतात.

c) तद्धित आणि कृत् असे साधित प्रत्ययांचे दोन प्रकार आहेत.

1) फक्त (a) बरोबर

2) फक्त (b) चूक

3) फक्त (a) व (b) बरोबर

4) फक्त (b) व (c) बरोबर

२७. खालील शब्दांची बरोबर संधी ओळखा. ①②③④

a) वाक्ताडन = वाग् + ताडन

b) क्षुत्पिपासा = क्षुध् + पिपासा

c) षण्मास = षट् + मास

1) केवळ (a) बरोबर

2) (a) आणि (b) बरोबर

3) केवळ (c) बरोबर

4) (a), (b), (c) बरोबर

२८. खालील वाक्याचा प्रकार सांगा. ①②③④

'वडिलधारी माणसे म्हणतात, की प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडावे'.

1) प्रधान वाक्य	2) केवल वाक्य

3) मिश्र वाक्य	4) संयुक्त वाक्य

२९. पुढील वाक्ये वाचा. ①②③④

a) संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र जोडलेली असतात.

b) मिश्रवाक्यात प्रधानवाक्यावर गौण वाक्य अवलंबून असते.

c) 'तुला कांदा आवडतो तर लसूण का आवडू नये' हे संयुक्त वाक्य होय.

1) सर्व विधाने बरोबर	2) फक्त (a) व (c) बरोबर

3) फक्त (c) चूक	4) फक्त (a) बरोबर

३०. पुढीलपैकी कोणता शब्द व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे? ①②③④

a) सहस्त्ररश्मि	b) सहस्त्ररश्मी

c) सहसरश्मी	d) सहस्त्रर्श्मी

1) (a) बरोबर (b), (c), (d) चूक

2) (d) बरोबर (a), (c), (d) चूक

3) (b) बरोबर (a), (b), (c) चूक

4) (c) बरोबर (a), (b), (d) चूक

**३१. खालीलपैकी कोणत्या गटातील शब्द 'भृंगा' या अर्थी वापरले जातात?** ①②③④

**a) तनुज, पादप** **b) मिलिंद, भ्रमर**

**c) सारंग, समीरण** **d) अली, मधुप**

1) फक्त (a) बरोबर

2) फक्त (b) व (d) बरोबर

3) फक्त (c) व (d) बरोबर

4) फक्त (c) चूक

**३२. खालील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.** ①②③④

**a) जो विकारी शब्द नामाची व्याप्ती मर्यादित करतो त्यास विशेषण म्हणतात.**

**b) ज्या शब्दांपासून कालगत क्रियेचा बोध होतो त्या शब्दांस क्रियापदे असे म्हणतात.**

**c) सर्वनाम ही नामाप्रमाणे लिंग, वचन व विभक्ती विकार धारण करणारी शब्दजाती नाही तर ती स्वतंत्र आहे.**

1) (a) व (b) बरोबर

2) (b) व (c) बरोबर

3) (a) व (c) बरोबर

4) (a), (b), (c) बरोबर

**३३. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.** ①②③④

**वडिलांनी मुलाला शाळेत घातले.**

**a) कर्तृकर्मसंकर** **b) कर्तृभावसंकर**

**c) कर्मभावसंकर** **d) यापैकी कोणताही नाही**

1) फक्त (a) बरोबर बाकी सर्व चूक

2) फक्त (b) बरोबर बाकी सर्व चूक

3) फक्त (d) बरोबर बाकी सर्व चूक

4) फक्त (c) बरोबर बाकी सर्व चूक

**३४. खालील विधानांचे एक केवलवाक्य करा :** ①②③④

**'पुष्कळ वर्षे झाली. मी कॅशियाचे रोप आणले. बागेत एका कोपऱ्यात ते लावले. याची मला मोठी आवड होती'.**

1) पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी ते बागेत एका कोपऱ्यात लावले.

2) पुष्कळ वर्षांपूर्वी मी कॅशियाचे रोप आणून ते बागेत एका कोपऱ्यात आवडीने लावले.

3) पुष्कळ वर्षांपूर्वी मी कॅशियाचे रोप आणून बागेत कोपऱ्यात लावले ज्याची मला मोठी आवड होती.

4) पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी बागेत ते एका कोपऱ्यात आवडीने लावले.

**३५. पुढीलपैकी कोणते विधान व्याकरण नियमानुसार अचूक आहे?** ①②③④

**a) कर्मणी वाक्यात कर्मे एकापेक्षा अधिक असतील; व ती भिन्नलिंगी आणि भिन्नवचनात असतील; तर वाक्यात शेवटी येणाऱ्या कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप होईल.**

**b) कर्मणी वाक्यात कर्मे एकापेक्षा अधिक असतील; व ती भिन्नलिंगी आणि भिन्नवचनात असतील; तर वाक्यात प्रथम येणाऱ्या कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप होईल.**

1) (a) आणि (b) दोन्ही बरोबर

2) (a) आणि (b) दोन्ही चूक

3) (a) बरोबर (b) चूक

4) (b) बरोबर (a) चूक

**३६. मराठी उपसर्ग लागून तयार न झालेला शब्द कोणता?** ①②③④

1) बिनचूक 2) अबोल

3) पडछाया 4) अवघड

**३७. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे ते लिहा :** ①②③④

**a) द्वर्थी b) द्विर्थी c) द्व्यर्थी d) द्विअर्थी**

1) (a) बरोबर (b), (c), (d) चूक

2) (a) बरोबर (a), (b), (c) चूक

3) (c) बरोबर (a), (b), (d) चूक

4) (b) बरोबर (a), (c), (d) चूक

**३८. खाली दिलेल्या शब्दांमधील शुद्ध शब्दांचा पर्याय निवडा :** ①②③④

**a) आशीर्वाद, क्षितीज** **b) आशिर्वाद, क्षितिज**

**c) क्षितिज, आशीर्वाद** **d) आर्शीवाद, क्षितिज**

1) फक्त (a) बरोबर 2) फक्त (c) बरोबर

3) (a) आणि (c) बरोबर 4) फक्त (d) बरोबर

३९. पुढील कर्मणी प्रयोगांच्या जोड्या लावा. ①②③④

a) त्याला काम करवते — i) समापन कर्मणी
b) त्याचे पत्र लिहून झाले — ii) जुना कर्मणी
c) शिपायाकडून चोर पकडला जातो. — iii) नवीन कर्मणी
d) नळे इंद्रासी असे बोलिजेले — iv) शक्य कर्मणी

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| 2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| 3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| 4) | (i) | (iv) | (ii) | (iii) |

४०. पुढील विधाने वाचा. ①②③④

a) च्, छ्, ज्, झ् हे तालव्य वर्ण आहेत.
b) ए, ऐ हे कंठ तालव्य वर्ण आहेत.
c) ट्, ठ्, ड्, ढ् हे मूर्धन्य वर्ण आहेत.

1) केवळ (a) व (b) बरोबर
2) केवळ (a) व (c) बरोबर
3) केवळ (b) व (c) बरोबर
4) (a), (b), (c) तिन्हीही विधाने बरोबर

४१. क्रियाविशेषणांचे प्रकार व उदाहरणे यातील विसंगत जोडी ओळखा. ①②③④

a) स्थलवाचक - लांबून, समोरून, मधून
b) कालवाचक - काही, कधीही, क्रमशः
c) संख्यावाचक - अतिशय, दोनदा, पुष्कळ
d) रीतिवाचक - चटकन, आपोआप, भरभर

1) फक्त (a) बरोबर 2) फक्त (b) बरोबर
3) फक्त (c) चूक 4) फक्त (d) बरोबर

४२. म्हणी आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा. ①②③④

| म्हणी | अर्थ |
|---|---|
| a) डोळ्यात केर अन् कानात फुंकर | i) तजवीज केल्यास ते हास्यास्पद ठरते |
| b) द्राविडी प्राणायाम | ii) विनाकारण आटापिटा |
| c) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ | iii) सामान्य गोष्ट ओळखण्यास अपात्र |
| d) गाजरपारखी | iv) देशद्रोही |

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| 2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| 3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| 4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

४३. जोड्या जुळवा. ①②③④

a) प्रत्ययघटित शब्द — i) कोणीकोणी
b) उपसर्गघटित शब्द — ii) भाजीविक्या
c) सामासिक शब्द — iii) भवितव्य
d) अभ्यस्त शब्द — iv) सरचिटणीस

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| 2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| 3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| 4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

४४. पुढील विधाने वाचा व योग्य उत्तर लिहा. ①②③④

a) अकारान्त, ईकारान्त व उकारान्त विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.
b) ई-कारान्त नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप आकारान्त होते.
c) अकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ई-कारान्त होते.

1) फक्त (a) चूक
2) फक्त (b) व (c) चूक
3) फक्त (a) व (b) बरोबर
4) फक्त (a) व (b) चूक

४५. पुढील विधाने वाचा. ①②③④

a) ढ्, फ् ही महाप्राण व्यंजने आहेत.
b) स्, ख् ही अल्पप्राण व्यंजने आहेत.
c) त्, थ् ही कठोर व्यंजने आहेत.

1) फक्त (a) बरोबर
2) फक्त (b) चूक
3) फक्त (b) व (c) चूक
4) फक्त (a) व (b) बरोबर

❖ ❖ ❖

## विक्रीकर निरीक्षक (मुख्य परीक्षा)२०१६

**१. खाली दिलेल्या चार वाक्यातून व्याकरणिकदृष्ट्या अयोग्य असलेल्या वाक्याचा पर्याय लिहा.**

१) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द नामे किंवा विशेषणे असतात.

२) अव्ययीभाव समास असलेला शब्द क्रियाविशेषण असतो.

३) बहुव्रीही असलेला शब्द विशेषण असतो.

४) एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येत नाही.

**२. विरुद्ध अर्थी जोड्या ओळखा.**

**अ) कृपा × अवकृपा   ब) कृत्रिम × नैसर्गिक**

**क) कृपण × उदार   ड) प्रसरण × अप्रसरण**

१) अ, ब, ड बरोबर, क चूक

२) ब, क, ड बरोबर, अ चूक

३) अ, ब, क बरोबर, ड चूक

४) सर्व बरोबर

**३. पुढील विधाने पहा.**

**अ) नामाच्या तीन प्रकारांपैकी फक्त सामान्य नामाचेच अनेकवचन होते.**

**ब) विशेषनाम हे एकाच व्यक्तीचे नाव असल्यामुळे त्याचे अनेकवचन होत नाही.**

१) अ बरोबर ब चूक   २) अ चूक ब बरोबर

३) दोन्ही चूक   ४) दोन्ही बरोबर

**४. पुढील विधाने वाचा.**

**अ) मराठीतील तत्सम इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्द न्हस्वान्त लिहावेत.**

**ब) तत्सम क्रियाविशेषणे दीर्घान्त लिहावी.**

१) फक्त अ चूक   २) फक्त ब चूक

३) अ आणि ब दोन्ही बरोबर

४) अ आणि ब दोन्ही चूक

**५. 'तेजोनिधी' या शब्दाची संधी खालीलपैकी कोणत्या पोटशब्दांनी केली जाते?**

१) तेज + निधी   २) तेजो + निधी

३) तेजः + निधी   ४) तेजः + नीधी

**६. कमीत कमी शब्दात सामासिक शब्दाचे केलेले स्पष्टीकरण म्हणजे ......... होय.**

१) दुराग्रह   २) विग्रह

३) आग्रह   ४) परग्रह

**७. 'जा, ये, कर, बस, बोल, पी' यासारख्या मराठी भाषेतील मूळ धातूंना .......... म्हणतात.**

१) साधित शब्द   २) सिद्ध शब्द

३) देशी शब्द   ४) तत्सम शब्द

**८. योग्य जोड्या जुळवा.**

**अ) पाणउतारा करणे   १) दमछाक होणे**

**ब) पायरीने राहणे   २) अपमान करणे**

**क) नाकी नऊ येणे   ३) योग्यतेप्रमाणे राहणे**

१) अ - (३), ब- (२), क - (१)

२) अ - (२), ब- (३), क - (१)

३) अ - (१), ब- (३), क - (२)

४) अ - (२), ब- (१), क - (३)

**९. विभक्तीप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागून तयार झालेल्या नामाच्या रूपाला ............ म्हणतात.**

१) साधित शब्द   २) संयुक्त व्यंजन

३) सामान्यरूप   ४) संधी

**१०. पुढील विधाने वाचा.**

**अ) विशेषण ही विकारी शब्दजाती आहे; तथापि काही विशेषणे विशेष्याच्या लिंगवचनानुसार बदलत नाहीत.**

**ब) नामापूर्वी येणाऱ्या विशेषणाला विधीविशेषण, तर नामानंतर येणाऱ्या विशेषणाला अधिविशेषण म्हणतात.**

**क) वाक्यात नाम नसते तेव्हा विशेषणही नसते.**

१) फक्त अ बरोबर   २) फक्त अ व क बरोबर

३) फक्त क बरोबर ४) फक्त ब व क बरोबर

११. खालीलपैकी कठोर व्यंजने कोणती?

अ) च ब) फ क) द ड) थ

१) फक्त अ, ब २) फक्त ब, क

३) फक्त क, ड ४) फक्त ब, ड

(हा प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)

१२. 'सर्व बाजूंनी संकट येणे' हा अर्थ नसलेले वाक्प्रचार कोणते?

अ) आकाशाची कुऱ्हाड होणे

ब) आभाळ फाटणे

क) आभाळ भरून येणे

ड) आभाळ दिसणे

१) फक्त अ, ब २) फक्त क, ड

३) फक्त अ, क ४) फक्त अ, क, ड

१३. 'चहा करणे' या वाक्प्रचाराचा पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार विरुद्धार्थी आहे?

१) कोंडमारा होणे २) खडे फोडणे

३) काखा वर करणे ४) कणीक तिंबणे

१४. व्यंजनसंधी म्हणजे ............

१) एकत्र येणाऱ्या दोन वर्णांपैकी एक स्वर व दुसरा व्यंजन जोडणे.

२) एकमेकांशेजारी येणारे दोन स्वर जोडले जाणे.

३) एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन जोडला जाणे.

४) एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण स्वर जोडला जाणे.

(हा प्रश्न आयोगाने रद्द केला आहे.)

१५. 'पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता' या वाक्याचा प्रकार निवडा.

१) स्वार्थी वाक्य २) आज्ञार्थी वाक्य

३) विध्यर्थी वाक्य ४) संकेतार्थी वाक्य

१६. 'धर्मराज हा पहिला पांडव होता' वाक्यातील उद्देश्य ओळखा.

अ) पहिला ब) पांडव

क) धर्मराज ड) हा

१) ब आणि क बरोबर बाकी सर्व चूक

२) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

३) फक्त ड बरोबर

४) फक्त क बरोबर बाकी चूक

१७. सामान्यनामे व विशेषनामे यांना 'आई', 'ई', 'की', 'गिरी', 'ता', 'त्व', 'पण', 'पणा', 'य', 'व' - यासारखे प्रत्यय लावून .......... नामे तयार करता येतात.

१) भाववाचक २) समुदायवाचक

३) धर्मिवाचक ४) काल्पनिक

१८. पुढील पर्यायांतून बरोबर की चूक ते ओळखा.

अ) मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपान्त्य इकार किंवा उकार ऱ्हस्व लिहावा.

ब) अ-कारान्तापूर्वीचे इकार किंवा उकार ऱ्हस्व लिहितात.

१) केवळ अ बरोबर २) केवळ ब बरोबर

३) अ आणि ब बरोबर ४) अ आणि ब चूक

१९. 'मी उशिरा उठतो ते बाबांना आवडत नाही' दोन केवल वाक्यांचे वाक्य संकलन करा.

अ) मी उशिरा उठतो म्हणून बाबांना आवडत नाही.

ब) माझी उशिरा उठण्याची वृत्ती बाबांना मुळीच आवडत नाही.

क) माझ्या बाबांना उशिरा उठणे आवडत नाही.

ड) माझे उशिरा उठणे माझ्या बाबांना आवडत नाही.

१) फक्त ड चूक बाकी सर्व बरोबर

२) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

३) फक्त अ आणि ब बरोबर बाकी सर्व चूक

४) फक्त क आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

२०. जोडशब्द नसलेला पर्याय ओळखा.

अ) टेबलखुर्ची	ब) अदलाबदल

क) सल्लामसलत	ड) सोनेचांदी

१) अ, ब, क बरोबर बाकी चूक

२) ब, क बरोबर बाकी चूक

३) क, ड बरोबर बाकी चूक

४) अ, ड बरोबर बाकी चूक

२१. 'राजेशने मनीषावर जिवापाड प्रेम केल्याचे नाटक करून तिच्याशी लग्न केले. लग्नानंतर काही महिन्यांतच गोड बोलून तिची सारी संपत्ती आपल्या नावावर केली. एके रात्री राजेश दारू पिऊन घरी आला. तिच्याशी भांड-भांड भांडला. तिच्यावर नाही नाही ते आरोप केले आणि तिचा खून केला.' या घटनेसाठी खाली दिलेल्या वाक्प्रचारातून योग्य वाक्प्रचाराची निवड करून त्याचा पर्याय लिहा.

१) काट्याने काटा काढणे	२) कंठस्नान घालणे

३) केसाने गळा कापणे	४) कुंपणाने शेत खाणे

२२. 'दक्षिण समुद्राजवळच्या सेतुपासून हिमालयापर्यंत' शब्दसमूहाबद्दल एक शब्द सांगा.

१) समुद्रमंथन	२) परिक्रमा

३) आसेतुहिमाचल	४) हिमसरोवर

२३. जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| अ) अव्ययीभाव समास | १) गर्भश्रीमंत |
| ब) पंचमी तत्पुरुष समास | २) मानधन |
| क) मध्यमपदलोपी समास | ३) दिवसेंदिवस |
| ड) बहुव्रीही समास | ४) साखरभात |

१) अ- २, ब- ४, क- ३, ड - १

२) अ- ४, ब- १, क- ३, ड - २

३) अ- ३, ब- १, क- ४, ड - २

४) अ- ३, ब- १, क- २, ड - ४

२४. 'त्याला पहिला वर्ग मिळावा म्हणून तो खूप अभ्यास करतो आहे' या वाक्याचा प्रकार ओळखा.

१) केवल वाक्य	२) मिश्र वाक्य

३) आज्ञार्थी वाक्य	४) संयुक्त वाक्य

२५. 'विध्वंसक' या शब्दाचा विरोधार्थी आशय व्यक्त करणारा शब्द ओळखा.

अ) पुरोगामी	ब) विधायक

क) मवाळ	ड) सुलक्षणी

१) ब व ड बरोबर	२) फक्त ब बरोबर

३) फक्त क बरोबर	४) फक्त अ बरोबर

२६. 'धर्म करता कर्म उभे राहते' या म्हणीचा योग्य अर्थ ओळखा.

१) धर्माचे पालन करताना कर्म करावे लागते.

२) दानधर्म केला तर पुण्य मिळते.

३) धर्मपालन केल्यावर कर्मबंधनातून मुक्ती मिळते.

४) एखाद्याला साह्य करायला गेल्यास भलतेच संकट मागे लागते.

२७. 'वाक्यात दर्शविलेल्या क्रियेला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असणाऱ्या नामपदबंधास काय म्हणतात?

१) कर्ता	२) कर्म

३) क्रियापद	४) कर्मपूरक

२८. 'ताजमहल' शारदीय पौर्णिमेत अधिकच देखणा दिसतो. या वाक्यातील विधेयविस्तार कोणते?

अ) ताजमहल	ब) शारदीय पौर्णिमेत

क) अधिकच देखणा	ड) दिसतो

१) अ, ड बरोबर बाकी सर्व चूक

२) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

३) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

४) ब, क बरोबर बाकी सर्व चूक

२९. खालील वाक्यातील प्रयोग अनुक्रमे ओळखा.

अ) शिक्षक मुलांना शिकवतात

ब) रामाच्याने काम करवते

१) कर्तरी-कर्तरी	२) कर्मणी-कर्मणी

३) कर्तरी-कर्मणी	४) कर्मणी - कर्तरी

१) फक्त १ बरोबर	२) फक्त ३ बरोबर

३) फक्त ४ बरोबर ४) फक्त २ बरोबर

**३०. जी उपवाक्ये 'अथवा', 'किंवा' या अव्ययांनी जोडलेली असतात तेव्हा त्या वाक्यांना काय म्हणतात?**

१) विकल्प बोधक २) समुच्चय बोधक

३) न्यूनत्व बोधक ४) परिणाम बोधक

**३१. 'या आधुनिक लोकशाहीच्या युगात समाजाने जागृत होऊन आपला योग्य तो मार्ग निवडणे गरजेचे आहे.' व्याकरणिकदृष्ट्या या वाक्याचा प्रकार सांगा.**

१) केवल वाक्य २) मिश्रवाक्य

३) संयुक्त वाक्य ४) संकेतार्थी वाक्य

**३२. 'वाक्यार्थाला बाधा न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे :**

१) वाक्य रूपांतर २) वाक्य पृथक्करण

३) वाक्य संकलन ४) संयुक्त वाक्य

**३३. 'प्रतिकार, पडजीभ, दरमजल, हरवख्त' - हे शब्द मराठी व्याकरणात ..... ओळखले जातात.**

१) उपसर्गसाधित शब्द २) प्रत्ययसाधित शब्द

३) अभ्यस्त शब्द ४) अनुकरणवाचक शब्द

**३४. पुढील विधान वाचा.**

**अ) ईकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप याकारान्त होतो.**

**ब) ऊ-कारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ओकारान्तच राहते.**

**क) ओकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ओकारान्तच राहते.**

१) अ व ब बरोबर २) ब व क बरोबर

३) फक्त अ बरोबर ४) सर्व बरोबर

**३५. लेखन नियमानुसार शुद्ध शब्द ओळखा.**

१) अभिष्ठचिंतन २) अभिष्टचिंतन

३) अभीष्टचिंतन ४) अभीश्टचिंतन

**३६. मराठी भाषेसंदर्भातील पुढील कोणते वाक्य अयोग्य आहे?**

१) 'मराठी असे आमुची मायबोली' असे प्रत्येक मराठी भाषकाने अभिमानाने म्हटले पाहिजे.

२) मराठी महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे.

३) हिंदी ही मराठी भाषेची जननी आहे.

४) आज मराठी भाषेच्या लेखनासाठी देवनागरी लिपीचा वापर होतो.

**३७. 'अरविंद, जलज, राजीव, पद्म' या शब्दांना समानार्थी शब्द कोणता?**

१) अमृत २) गुलाब

३) कमळ ४) चंद्रिका

**३८. पुढे दिलेल्या जोड्या जुळवा.**

| अव्यय | शब्द |
|---|---|
| अ) शोकदर्शक | १) शाब्बास, वाहवा |
| ब) प्रशंसादर्शक | २) अबब, बापरे, अरेच्या |
| क) संमतीदर्शक | ३) अरेरे, अगाई, आई गं |
| ड) आश्चर्यदर्शक | ४) हां, जी, ठीक |

१) अ-४, ब-३, क-२, ड-१

२) अ-२, ब-४, क-३, ड-१

३) अ-१, ब-२, क-३, ड-४

४) अ-३, ब-१, क-४, ड-२

**३९. पुढीलपैकी कोणत्या विभक्तीला अनेक वचनासाठी प्रत्यय आहे परंतु एकवचनास प्रत्यय नाही?**

१) प्रथमा २) तृतीया

३) संबोधन ४) सप्तमी

**४०. 'रामाने पुस्तकावर नाव घातले' या वाक्यातील आधारपूरक कोणते?**

१) रामाने २) पुस्तकावर

३) नाव ४) पुस्तकावर नाव

**४१. पुढील विधाने वाचा.**

**अ) च, ही, ना, फक्त ही शुद्ध शब्दयोगी अव्यये आहेत.**

ब) काही शब्दयोगी अव्यये विभक्तीप्रत्ययांचे कार्य करतात.

क) शब्दयोगी अव्यय जोडले जाताना मूळ शब्दांचे सामान्यरूप होत नाही

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब, क बरोबर

३) अ, ब, क बरोबर ४) फक्त अ, क बरोबर

(हा प्रश्न आयोगाने रद्द केला आहे.)

४२. भावकर्तृक क्रियापद असलेल्या वाक्याचा पर्याय लिहा.

१) पित्त झाल्यामुळे प्रमोदला आज मळमळते आहे.

२) सुज्ञास अधिक सांगणे न लगे।

३) आम्ही काही पुस्तके पुण्याहून मागविली.

४) बाळू, एवढे काम कर बरं !

४३. पुढील विधाने वाचा.

अ) अलका आणि सुनील विजूच्या घरी गेले. - हे संयुक्त वाक्य आहे.

ब) संयुक्त वाक्यात दोन वा अधिक स्वतंत्र वाक्ये जोडलेली असतात.

क) संयुक्त वाक्यात प्रधानत्व बोधक उभयान्वयी अव्यये वापरली जातात.

१) फक्त अ चूक २) फक्त अ, ब चूक

३) फक्त अ, क चूक ४) फक्त ब, क चूक

४४. 'तो नेहमीच उशिरा येतो' या वाक्याचा काळ ओळखा.

१) रीति वर्तमानमाळ २) संनिहित भविष्यकाळ

३) रीति भविष्यकाळ ४) संनिहित वर्तमानकाळ

४५. वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.

'डोळ्यांवर कातडे ओढणे'

१) डोळ्यावर चामड्याची पट्टी बांधणे

२) डोळे मिटून घेणे

३) जाणूनबुजून दुर्लक्ष करणे

४) लक्ष देऊन पाहणे

४६. 'आकांक्षाने सुरेल गीत म्हटले.' या वाक्यातील 'सुरेल' हे ....... आहे.

१) विधेय २) विधेय पूरक

३) विधेय विस्तार ४) कर्म विस्तार

४७. पुढील वाक्यातील न्यूनत्वबोधक अव्यय ओळखा.

'मरावे परी कीर्तिरूपे उरावे'

१) उरावे २) कीर्तिरूपे

३) परी ४) मरावे

४८. खाली दिलेल्या समूहदर्शक शब्दांच्या जोड्या जुळवा.

| अ - गट | ब- गट |
|---|---|
| अ) मडके | १) संघ |
| ब) खेळाडू | २) चळत |
| क) विद्यार्थी | ३) उतरंड |
| ड) नाणी | ४) गट |

१) अ-३, ब-४, क-१, ड-२

२) अ-३, ब-१, क-४, ड-२

३) अ-३, ब-२, क-४, ड-१

४) अ-४, ब-३, क- १, ड-२

४९. खालीलपैकी संकेतार्थ वाक्य कोणते?

अ) जर उद्या सुट्टी मिळाली तर तुझ्या घरी येईन.

ब) उद्या सुट्टी मिळाल्यावर तुझ्या घरी येईन.

क) तुझ्या घरी येण्यास सुट्टी हवी.

ड) सुट्टी मिळाल्यानंतर तुझ्या घरी येईन.

१) फक्त अ बरोबर, बाकी सर्व चूक

२) अ, ब बरोबर, क, ड चूक

३) ब, क बरोबर, बाकी सर्व चूक

४) फक्त ड बरोबर, बाकी सर्व चूक

५०. 'माझे <u>गाव</u> मला फार आवडते' या वाक्यातील अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा.

१) पुल्लिंगी २) नपुंसकलिंगी

३) स्त्रीलिंगी ४) यापैकी नाही

५१. वाक्यसमूहासाठी योग्य वाक्प्रचार ओळखा.

'नारायण हा खूप गुंड वृत्तीचा, व्यसनी आणि साऱ्या गावात बदनाम माणूस होता. मात्र त्याचा मुलगा हा सदाचारी, प्रेमळ व गुणी होता.'

१) कर्णाचा अवतार २) गावमामा असणे

३) भांगेत तुळस असणे ४) महादेवापुढचा असणे

५२. मराठीत प्रमुख सर्वनामे किती?

१) सात २) नऊ

३) दहा ४) आठ

५३. मूळ शब्दाच्या मागे, पूर्वी एक वा अधिक अक्षरे जोडतात त्यांना ...... म्हणतात.

१) सिद्ध शब्द २) साधित शब्द

३) उपसर्ग ४) प्रत्ययघटित शब्द

५४. खाली दिलेल्या पर्यायांतून अकर्मक धातू असलेल्या शब्दांचा पर्याय लिहा.

१) सळसळ, खळखळ, थरथर, कूडकूड

२) नासका, सडका, कुजका, खराब

३) हुशार, चलाख, तरबेज, पारंगत

४) मोडले, उघडले, तोडले, बांधले

५५. खालीलपैकी अचूक विधाने कोणती?

अ) एकाक्षरी शब्दांचे सामान्यरूप होत नाही.

ब) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप होत नाही.

१) अ बरोबर ब चूक २) अ चूक ब बरोबर

३) दोन्ही चूक ४) दोन्ही बरोबर

❖ ❖ ❖

# प्रश्नसंग्रह उत्तरपत्रिका

## वर्णविचार १ व २

प्रश्न १.
१. ①②●④
२. ●②③④
३. ●②③④
४. ●②③④
५. ①●③④
प्रश्न २.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②●④
५. ①②③●
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①●③④
४. ●②③④
५. ①②●④
६. ①●③④
७. ●②③④
प्रश्न ५.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①②③●
४. ①●③④
५. ①②●④
६. ①②●④
७. ①●③④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ①②③●
प्रश्न ८. ①②③●
प्रश्न ९. ①②●④
प्रश्न १०. ●②③④
प्रश्न ११. ①②●④
प्रश्न १२. ①②●④
प्रश्न १३. ①●③④
प्रश्न १४. ①②●④
प्रश्न १५. ●②③④
प्रश्न १६. ①②●④
प्रश्न १७. ①②③●
प्रश्न १८. ●②③④
प्रश्न १९. ①②●④
प्रश्न २०. ①②③●

## जोडाक्षरांचे लेखन

प्रश्न १. ●②③④
प्रश्न २. ①●③④
प्रश्न ३. ●②③④
प्रश्न ४. ①②③●
प्रश्न ५. ①②●④
प्रश्न ६. ●②③④
प्रश्न ७. ①②●④
प्रश्न ८. ●②③④
प्रश्न ९. ①②●④
प्रश्न १०. ●②③④
प्रश्न ११. ①●③④
प्रश्न १२. ●②③④
प्रश्न १३.
१. ①②●④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①●③④
५. ①②③●
प्रश्न १४.
१. ●②③④
२. ●②③④
प्रश्न १५. ●②③④
प्रश्न १६.
१. ①②③●
२. ①②●④
३. ①②③●
४. ①②③●
५. ①②③●
६. ●②③④
प्रश्न १७.
१. ①②③●
२. ①②●④
३. ●②③④
प्रश्न १८. ①②●④
प्रश्न १९. ●②③④
प्रश्न २०. ①②③●
प्रश्न २१. ①●③④
प्रश्न २२. ①②●④

## स्वरसंधी

प्रश्न १.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①●③④
४. ●②③④
५. ●②③④
प्रश्न २.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②●④
५. ①②③●
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①②●④
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ●②③④
प्रश्न ८. ●②③④
प्रश्न ९. ①②●④
प्रश्न १०. ●②③④
प्रश्न ११. ●②③④
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ●②③④
प्रश्न १४. ①②●④
प्रश्न १५. ①●③④
प्रश्न १६. ①●③④
प्रश्न १७. ●②③④
प्रश्न १८. ①●③④
प्रश्न १९. ①●③④
प्रश्न २०. ①②●④
प्रश्न २१. ●②③④
प्रश्न २२. ①●③④
प्रश्न २३. ●②③④
प्रश्न २४. ①●③④
प्रश्न २५. ①②●④
प्रश्न २६. ①●③④
प्रश्न २७. ①②③●
प्रश्न २८. ①②●④
प्रश्न २९. ①②③●
प्रश्न ३०. ①②●④

## संधी- व्यंजनसंधी-विसर्गसंधी

प्रश्न १.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①●③④
४. ①●③④
५. ●②③④
प्रश्न २.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①●③④
४. ●②③④
५. ①②●④
प्रश्न ३.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①●③④
५. ①●③④
६. ●②③④
७. ①●③④
८. ①②③●
९. ①●③④
प्रश्न ४. ●②③④
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ●②③④

## शब्दविचार

प्रश्न १.
१. ①②●④
२. ●②③④
३. ①②③●
४. ①●③④
५. ①●③④
प्रश्न २.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②③●
प्रश्न ३. ①●③④
प्रश्न ४. ①●③④
प्रश्न ५.
१. ①●③④
२. ●②③④
३. ●②③④
४. ①●③④
५. ①②●④
६. ①●③④
७. ●②③④
८. ①②③●
९. ①●③④
१०. ①②●④
प्रश्न ६.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②③●
प्रश्न ७.
१. ●②③④
२. ①●③④
३. ●②③④
४. ①②③●
प्रश्न ८.
१. ●②③④
२. ①②●④
३. ●②③④
४. ①②③●
प्रश्न ९.
१. ●②③④
२. ①●③④
३. ●②③④
४. ①②③●
प्रश्न १०.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②③●
प्रश्न ११. ①●③④

## नामे

प्रश्न १. ①●③④
प्रश्न २. ●②③④
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①②●④
प्रश्न ५. ●②③④
प्रश्न ६. ①②●④
प्रश्न ७. ●②③④
प्रश्न ८. ①●③④
प्रश्न ९. ①②③●
प्रश्न १०. ●②③④
प्रश्न ११. ①●③④
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ①②③●
प्रश्न १४. ①②●④
प्रश्न १५. ①②●④
प्रश्न १६. ●②③④
प्रश्न १७. ①②●④
प्रश्न १८. ①②③●
प्रश्न १९. ①●③④
प्रश्न २०. ①②●④
प्रश्न २१. ●②③④

## लिंगविचार

प्रश्न १. ①●③④
प्रश्न २. ①②●④
प्रश्न ३. ①②③●
प्रश्न ४. ①②③●
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ●②③④
प्रश्न ७. ①●③④
प्रश्न ८. ●②③④
प्रश्न ९.
१. ●②③④
२. ①②●④
३. ①②●④
प्रश्न १०. ①②●④
प्रश्न ११.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①●③④
प्रश्न १२. ①②●④
प्रश्न १३. ①②●④
प्रश्न १४. ●②③④
प्रश्न १५. ①②③●
प्रश्न १६. ●②③④
प्रश्न १७. ①●③④
प्रश्न १८. ●②③④
प्रश्न १९. ①②③●
प्रश्न २०. ①②③●

## वचनविचार

प्रश्न १. ①②●④
प्रश्न २. ●②③④
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①●③④
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ①②③●
प्रश्न ८. ①●③④

## विभक्तीविचार

प्रश्न १.
१. ①②●④
२. ●②③④
३. ●②③④
४. ①●③④
प्रश्न २.
१. ①②③●
२. ●②③④
३. ●②③④
४. ①②③●
५. ●②③④
६. ①②③●
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४.
१. ①②●④
२. ①②③●
३. ●②③④
४. ①●③④
५. ①②③●
प्रश्न ५.
१. ①②③●
२. ①●③④
३. ①②●④
४. ●②③④
५. ①●③④
प्रश्न ६.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①●③④
४. ●②③④
५. ①②③●
प्रश्न ७. ●②③④
प्रश्न ८. ①②●④

## सामान्यरूप

प्रश्न १. ①●③④
प्रश्न २. ①●③④
प्रश्न ३. ①②③●
प्रश्न ४. ①●③④
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ①●③④
प्रश्न ८. ①②●④
प्रश्न ९. ●②③④
प्रश्न १०. ●②③④
प्रश्न ११. ●②③④
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ①②③●

## सर्वनामे

प्रश्न १. ①●③④
प्रश्न २.
१. ①②③●
२. ①②●④
प्रश्न ३.
१. ①●③④
२. ①②③●
प्रश्न ४.
१. ①●③④
२. ①②●④
३. ●②③④
४. ①②●④
५. ①●③④
६. ①●③④
७. ●②③④
८. ①②●④
९. ①②③●
प्रश्न ५. ①●③④
प्रश्न ६. ①②●④
प्रश्न ७. ①●③④

## विशेषणे

प्रश्न १. ①●③④
प्रश्न २. ●②③④
प्रश्न ३. ①②③●
प्रश्न ४.
१. ●②③④
२. ●②③④
३. ①②●④
प्रश्न ५. ①②③●
प्रश्न ६. ●②③④
प्रश्न ७. ①②●④
प्रश्न ८. ①②③●
प्रश्न ९. ①●③④
प्रश्न १०. ①②●④
प्रश्न ११. ①②③●
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ●②③④
प्रश्न १४. ①●③④
प्रश्न १५.
१. ①②●④
२. ●②③④
३. ①●③④
४. ●②③④
प्रश्न १६. ①②③●
प्रश्न १७. ①②③●

## क्रियापदविचार

प्रश्न १.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②●④
४. ①②③●
५. ①②③●
६. ●②③④
७. ①②③●
प्रश्न २.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①②③●
४. ①②●④
५. ●②③④
६. ①②③●
७. ①②③●
८. ●②③④
९. ①②③●
प्रश्न ३.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①●③④
५. ①●③④
प्रश्न ४. ●②③④
प्रश्न ५. ①②●④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ①②③●
प्रश्न ८. ●②③④
प्रश्न ९. ①●③④
प्रश्न १०. ①②●④
प्रश्न ११. ①●③④
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ①②●④
प्रश्न १४. ①②●④
प्रश्न १५. ①②●④
प्रश्न १६. ●②③④
प्रश्न १७. ①●③④
प्रश्न १८. ①●③④
प्रश्न १९. ①②●④
प्रश्न २०. ●②③④
प्रश्न २१. ①②●④
प्रश्न २२. ①②③●
प्रश्न २३. ①●③④
प्रश्न २४. ①②●④
प्रश्न २५. ①●③④
प्रश्न २६. ①②③●
प्रश्न २७. ①●③④
प्रश्न २८. ①②●④
प्रश्न २९. ①●③④
प्रश्न ३०. ①②●④
प्रश्न ३१. ①●③④
प्रश्न ३२. ●②③④
प्रश्न ३३. ①●③④
प्रश्न ३४. ①●③④
प्रश्न ३५. ①②●④

## क्रियाविशेषण अव्यये

प्रश्न १.
१. ①②③●
२. ①●③④
३. ①②●④
४. ●②③④
५. ①●③④
६. ①②●④
७. ●②③④
८. ①●③④
९. ①②③●
प्रश्न २. ①●③④
प्रश्न ३.
१. ●②③④
२. ①②●④
३. ①●③④
४. ①②●④
५. ①②③●
६. ①②●④
७. ①②●④
८. ①●③④
९. ①②③●
१०. ①●③④
११. ●②③④
१२. ①●③④
प्रश्न ४.
१. ①●③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②③●
५. ①②●④
प्रश्न ५. ①②③●
प्रश्न ६. ①②③●
प्रश्न ७. ●②③④

## शब्दयोगी अव्यये

प्रश्न १. ①②●④
प्रश्न २. ●②③④
प्रश्न ३. ①●③④
प्रश्न ४. ①②●④
प्रश्न ५.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①②③●
४. ●②③④
प्रश्न ६.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①②●④
४. ●②③④
प्रश्न ७. ①②●④
प्रश्न ८. ①②●④
प्रश्न ९. ①●③④

प्रश्न १०.
१. ●②③④
२. ①●③④

प्रश्न ११. ①②●④
प्रश्न १२. ①②●④
प्रश्न १३. ①●③④

प्रश्न १४. ●②③④
प्रश्न १५. ①②●④
प्रश्न १६. ①●③④

प्रश्न १७. ①②③●
प्रश्न १८. ①②●④
प्रश्न १९. ①●③④

प्रश्न २०. ①●③④
प्रश्न २१. ①②③●

## उभयान्वयी अव्यये

प्रश्न १.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①●③④

प्रश्न २.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②③●

प्रश्न ३.
१. ①●③④
२. ●②③④
३. ●②③④
४. ①②●④
५. ①②●④
६. ①②●④
७. ①●③④
८. ①●③④
९. ●②③④

प्रश्न ४.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①②③●
५. ①●③④
६. ①②●④

प्रश्न ५. ●②③④
प्रश्न ६. ●②③④
प्रश्न ७. ①②③●

## केवलप्रयोगी अव्यये

प्रश्न १. ①②③●

प्रश्न २.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①②●④
५. ①②●④
६. ●②③④
७. ①②●④

प्रश्न ३.
१. ①●③④
२. ①②●④
३. ●②③④
४. ①②●④
५. ①②③●
६. ①②●④
७. ①②●④
८. ①②●④
९. ①●③④
१०. ①②③●
११. ①●③④
१२. ①②●④

प्रश्न ४.
१. ①②●④
२. ①●③④
३. ●②③④
४. ①②③●
५. ①②●④

प्रश्न ५.
१. ①②●④
२. ●②③④
३. ①②●④
४. ①②③●
५. ①●③④

प्रश्न ६. ①②●④

## वाक्यविचार विभक्तींचे अर्थ

प्रश्न १.
१. ①②●④
२. ①②●④
३. ①②●④
४. ●②③④
५. ①②●④

प्रश्न २.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①●③④
४. ①●③④
५. ①②●④

प्रश्न ३.
१. ●②③④
२. ①②●④
३. ●②③④
४. ①②●④
५. ①②③●
६. ●②③④
७. ①②③●
८. ●②③④

प्रश्न ४.
१. ①●③④
२. ①●③④
३. ●②③④
४. ①②●④
५. ①●③④
६. ①●③④
७. ①●③④
८. ①●③④
९. ●②③④
१०. ①②③●

प्रश्न ५.
१. ①②●④
२. ①②③●
३. ①②●④
४. ①●③④
५. ①②●④
६. ①②③●

प्रश्न ६. ①●③④

## प्रयोग

प्रश्न १.
१. ①②③●
२. ●②③④
३. ①②●④
४. ●②③④
५. ①②●④
६. ①②●④
७. ①●③④
८. ①②●④
९. ①②●④

प्रश्न २.
१. ●②③④
२. ①②③●
३. ①②●④
४. ①②●④
५. ①②③●
६. ①②③●
७. ①●③④
८. ●②③④
९. ①●③④
१०. ①②●④

प्रश्न ३.
१. ①●③④
२. ①②③●
३. ①②●④
४. ①●③④
५. ①②●④

प्रश्न ४. ●②③④
प्रश्न ५. ●②③④
प्रश्न ६. ①●③④
प्रश्न ७. ①②●④
प्रश्न ८. ①②●④
प्रश्न ९. ①②●④
प्रश्न १०. ①●③④
प्रश्न ११. ①②●④

## समास

- प्रश्न १. ●②③④
- प्रश्न २. ①●③④
- प्रश्न ३. ①●③④
- प्रश्न ४. ①●③④
- प्रश्न ५. ①②●④
- प्रश्न ६. ①②③●
- प्रश्न ७. ●②③④
- प्रश्न ८. ①②●④
- प्रश्न ९. ①②③●
- प्रश्न १०. ①●③④
- प्रश्न ११. ●②③④
- प्रश्न १२. ①②③●
- प्रश्न १३. ①②●④
- प्रश्न १४. ①②●④
- प्रश्न १५. ●②③④
- प्रश्न १६. ●②③④

## शब्दसिद्धी

- प्रश्न १. ①②●④
- प्रश्न २. ①●③④
- प्रश्न ३. ①②③●
- प्रश्न ४.
  - १. ①●③④
- प्रश्न ५. ①②③●
- प्रश्न ६. ①②③●
- प्रश्न ७. ①②③●
- प्रश्न ८. ①②●④
- प्रश्न ९. ①②●④
- प्रश्न १०. ①●③④
- प्रश्न ११. ●②③④
- प्रश्न १२. ①●③④
- प्रश्न १३. ①②●④
- प्रश्न १४. ①②●④
- प्रश्न १५. ①②③●
- प्रश्न १६. ①②●④
- प्रश्न १७. ①②●④
- प्रश्न १८. ①②●④
- प्रश्न १९. ①②●④
- प्रश्न २०. ①②③●
- प्रश्न २१. ①●③④
- प्रश्न २२. ①②●④
- प्रश्न २३. ●②③④
- प्रश्न २४. ①②③●
- प्रश्न २५. ●②③④
- प्रश्न २६. ①●③④
- प्रश्न २७.
  - १. ●②③④
  - २. ①②●④
  - ३. ①●③④
- प्रश्न २८. ①●③④
- प्रश्न २९. ●②③④
- प्रश्न ३०. ①②●④
- प्रश्न ३१. ①②③●
- प्रश्न ३२. ①②●④
- प्रश्न ३३. ①●③④
- प्रश्न ३४. ①②●④
- प्रश्न ३५. ①●③④
- प्रश्न ३६. ①②③●
- प्रश्न ३७. ●②③④
- प्रश्न ३८. ①②③●
- प्रश्न ३९. ●②③④
- प्रश्न ४०. ①●③④
- प्रश्न ४१. ●②③④
- प्रश्न ४२.
  - १. ①②③●
  - २. ●②③④
  - ३. ①●③④
- प्रश्न ४३. ●②③④
- प्रश्न ४४. ①②③●
- प्रश्न ४५. ●②③④
- प्रश्न ४६. ①②●④
- प्रश्न ४७. ①●③④
- प्रश्न ४८. ●②③④
- प्रश्न ४९. ①②③●
- प्रश्न ५०. ①②③●
- प्रश्न ५१. ①②●④
- प्रश्न ५२. ①②③●
- प्रश्न ५३. ①●③④
- प्रश्न ५४. ●②③④
- प्रश्न ५५. ①②③●
- प्रश्न ५६. ①②③●
- प्रश्न ५७. ①②③●
- प्रश्न ५८. ●②③④
- प्रश्न ५९. ①②③●

## वाक्यसंश्लेषण

- प्रश्न १.
  - १. ●②③④
  - २. ①②●④
  - ३. ①●③④
  - ४. ①②③●
  - ५. ●②③④
  - ६. ①②●④
  - ७. ●②③④
  - ८. ①②●④
  - ९. ①②③●
  - १०. ●②③④
  - ११. ①●③④
  - १२. ①②③●
- प्रश्न २. ●②③④
- प्रश्न ३.
  - १. ①②●④
  - २. ①②③●
  - ३. ①②③●
  - ४. ①②●④
- प्रश्न ४. ①●③④
- प्रश्न ५. ①②③●
- प्रश्न ६. ①②③●
- प्रश्न ७. ①●③④
- प्रश्न ८. ①②●④
- प्रश्न ९. ①②●④
- प्रश्न १०. ①②③●

## वृत्ते

- प्रश्न १. ●②③④
- प्रश्न २. ●②③④
- प्रश्न ३. ①●③④
- प्रश्न ४. ①②●④
- प्रश्न ५. ①②③●
- प्रश्न ६. ①●③④
- प्रश्न ७. ●②③④
- प्रश्न ८.
  - १. ①②●④
  - २. ①●③④
  - ३. ●②③④
- प्रश्न ९.
  - १. ①●③④
  - २. ①②●④
  - ३. ●②③④
- प्रश्न १०. ①②③●
- प्रश्न ११. ●②③④
- प्रश्न १२. ①●③④
- प्रश्न १३. ①②●④
- प्रश्न १४. ①●③④
- प्रश्न १५. ①②●④
- प्रश्न १६. ●②③④
- प्रश्न १७. ①●③④
- प्रश्न १८. ●②③④
- प्रश्न १९. ①②●④
- प्रश्न २०. ①●③④
- प्रश्न २१. ①②●④
- प्रश्न २२. ●②③④
- प्रश्न २३. ①●③④
- प्रश्न २४. ①②③●
- प्रश्न २५. ①②●④
- प्रश्न २६. ①●③④
- प्रश्न २७. ●②③④
- प्रश्न २८. ①②●④
- प्रश्न २९.
  - १. ●②③④
  - २. ①●③④
  - ३. ①②③●
- प्रश्न ३०. ①②●④
- प्रश्न ३१. ①●③④
- प्रश्न ३२. ①●③④
- प्रश्न ३३. ①②●④
- प्रश्न ३४. ①②③●
- प्रश्न ३५. ①●③④
- प्रश्न ३६. ①②●④
- प्रश्न ३७. ①②●④
- प्रश्न ३८. ①②③●
- प्रश्न ३९. ①②●④
- प्रश्न ४०. ①②●④
- प्रश्न ४१. ①②③●

प्रश्न ४२. ●②③④
प्रश्न ४३. ①②③●
प्रश्न ४४. ①②③●
प्रश्न ४५. ①②●④
प्रश्न ४६. ●②③④
प्रश्न ४७. ①●③④

## भाषेचे अलंकार

प्रश्न १. ①②●④
प्रश्न २. ①②③●
प्रश्न ३. ●②③④
प्रश्न ४. ●②③④
प्रश्न ५. ①②●④
प्रश्न ६. ①②③●
प्रश्न ७. ①●③④
प्रश्न ८. ①●③④
प्रश्न ९. ①●③④
प्रश्न १०. ①●③④
प्रश्न ११.
१. ●②③④
२. ①●③④
३. ●②③④
४. ●②③④
५. ●②③④
६. ①②●④
७. ①●③④
८. ●②③④
९. ①●③④
१०. ①●③④
प्रश्न १२. ①●③④
प्रश्न १३. ①②●④
प्रश्न १४. ①●③④
प्रश्न १५.
१. ①●③④
२. ①②●④
३. ●②③④
प्रश्न १६. ①●③④
प्रश्न १७. ●②③④
प्रश्न १८. ①②●④
प्रश्न १९. ①●③④
प्रश्न २०. ●②③④
प्रश्न २१. ●②③④
प्रश्न २२.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①●③④
४. ●②③④
५. ●②③④
६. ●②③④
७. ①②●④
८. ①●③④
९. ①●③④
१०. ●②③④
११. ①●③④
१२. ●②③④
१३. ●②③④
१४. ●②③④
१५. ●②③④
प्रश्न २३.
१. ①②●④
२. ①②●④
३. ①●③④
४. ①②●④
५. ①②●④
६. ①●③④
७. ①②●④
८. ①②③●
९. ●②③④
१०. ●②③④
११. ①②③●
१२. ①●③④
१३. ①●③④
१४. ①②●④
१५. ①●③④
प्रश्न २४. ●②③④
प्रश्न २५. ●②③④
प्रश्न २६. ①②●④
प्रश्न २७. ●②③④
प्रश्न २८. ①②●④
प्रश्न २९.
१. ●②③④
२. ①●③④
३. ●②③④
४. ①●③④
५. ①②●④
६. ①②③●
७. ①②●④
प्रश्न ३०. ①②●④
प्रश्न ३१. ①●③④
प्रश्न ३२. ①②●④
प्रश्न ३३. ●②③④
प्रश्न ३४. ●②③④
प्रश्न ३५. ①②●④
प्रश्न ३६. ①②●④
प्रश्न ३७. ①②●④
प्रश्न ३८. ①●③④
प्रश्न ३९. ①●③④
प्रश्न ४०. ①②●④
प्रश्न ४१. ①②③●
प्रश्न ४२. ①●③④
प्रश्न ४३. ①●③④
प्रश्न ४४. ①②③●
प्रश्न ४५. ①●③④
प्रश्न ४६. ①②●④
प्रश्न ४७. ●②③④
प्रश्न ४८. ①②③●
प्रश्न ४९. ①②③●
प्रश्न ५०. ●②③④
प्रश्न ५१.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②③●
प्रश्न ५२. ●②③④
प्रश्न ५३. ①②③●
प्रश्न ५४. ①②●④
प्रश्न ५५. ●②③④
प्रश्न ५६. ①②③●
प्रश्न ५७.
१. ●②③④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①②③●
५. ①②●④
६. ①●③④
७. ①②●④
८. ●②③④
९. ●②③④
१०. ①●③④
प्रश्न ५८. ①②●④
प्रश्न ५९. ①●③④
प्रश्न ६०. ①②●④
प्रश्न ६१. ①●③④
प्रश्न ६२. ●②③④

## शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण

प्रश्न १.
१. ①②③●
२. ①●③④
३. ①②③●
४. ①②●④
५. ①●③④
६. ①②●④
७. ①②●④
८. ①②●④
९. ①●③④
प्रश्न २.
१. ①●③④
२. ①②③●
३. ①②③●
४. ①●③④
५. ①②●④
६. ●②③④
७. ●②③④
८. ①●③④
९. ●②③④
प्रश्न ३.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②●④
४. ①②●④
५. ①②③●
६. ①②③●
७. ①②③●
प्रश्न ४.
१. ●②③④
२. ①②●④
३. ①●③④
४. ①②●④
५. ①②③●
६. ●②③④
७. ①②●④
प्रश्न ५.
१. ●②③④
२. ①●③④
३. ①②③●
४. ●②③④
५. ①●③④
प्रश्न ६. ①●③④

# वाक्प्रचार व म्हणी

प्रश्न १. ①②●④
प्रश्न २. ①②●④
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①②●④
प्रश्न ५. ①②③●
प्रश्न ६. ●②③④
प्रश्न ७. ①②③●
प्रश्न ८. ①②●④
प्रश्न ९. ①●③④
प्रश्न १०. ①●③④
प्रश्न ११. ●②③④
प्रश्न १२. ①②③●
प्रश्न १३. ①●③④
प्रश्न १४. ①②●④
प्रश्न १५.
१. ●②③④
२. ①②③●
३. ①②●④
४. ①②③●
५. ①●③④
६. ①②●④
७. ①●③④
प्रश्न १६.
१. ①●③④
२. ●②③④
३. ①②●④
४. ①●③④
५. ●②③④
प्रश्न १७.
१. ①②③●
२. ●②③④
३. ①●③④
४. ①②③●
प्रश्न १८.
१. ①●③④
२. ①②●④
३. ①②③●
४. ①●③④
प्रश्न १९. ①②●④
प्रश्न २०. ●②③④
प्रश्न २१. ①●③④
प्रश्न २२. ●②③④
प्रश्न २३. ①●③④
प्रश्न २४. ①②●④
प्रश्न २५. ①②③●
प्रश्न २६. ①●③④
प्रश्न २७. ①②●④
प्रश्न २८. ●②③④
प्रश्न २९. ①②●④
प्रश्न ३०. ①②●④
प्रश्न ३१. ①②●④
प्रश्न ३२. ①②●④
प्रश्न ३३. ●②③④
प्रश्न ३४. ①②③●
प्रश्न ३५.
१. ①②●④
२. ①②③●
३. ●②③④
प्रश्न ३६. ①●③④
प्रश्न ३७. ①②●④
प्रश्न ३८. ①●③④
प्रश्न ३९.
१. ①②●④
२. ①●③④
३. ①②●④
प्रश्न ४०. ①②●④
प्रश्न ४१. ①●③④
प्रश्न ४२. ①●③④
प्रश्न ४३. ①②③●
प्रश्न ४४. ①●③④
प्रश्न ४५. ①②●④
प्रश्न ४६. ①②●④
प्रश्न ४७. ①②●④
प्रश्न ४८. ①●③④
प्रश्न ४९. ①②③●
प्रश्न ५०. ●②③④
प्रश्न ५१. ①②●④
प्रश्न ५२. ●②③④
प्रश्न ५३. ①②●④
प्रश्न ५४. ①②●④
प्रश्न ५५. ●②③④
प्रश्न ५६. ①●③④
प्रश्न ५७. ①●③④
प्रश्न ५८. ①②●④
प्रश्न ५९. ①②●④
प्रश्न ६०. ●②③④
प्रश्न ६१. ①●③④
प्रश्न ६२. ①●③④
प्रश्न ६३. ①②③●
प्रश्न ६४. ①●③④

# विरामचिन्हे

प्रश्न १.
१. ①●③④
२. ①●③④
३. ①②③●
४. ①●③④
५. ①②③●
६. ①②③●
७. ①②③●
८. ①②③●
९. ①●③④
प्रश्न २.
१. ①●③④
२. ①②③●
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①●③④
प्रश्न ५. ①②③●

# पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा सप्टेंबर २०१४

प्रश्न १. ①②●④
प्रश्न २. ①●③④
प्रश्न ३. ①②●④
प्रश्न ४. ①●③④
प्रश्न ५. ●②③④
प्रश्न ६. ①②●④
प्रश्न ७. ①②●④
प्रश्न ८. ●②③④
प्रश्न ९. ①②③●
प्रश्न १०. ①②●④
प्रश्न ११. ①●③④
प्रश्न १२. ①②●④
प्रश्न १३. ●②③④
प्रश्न १४. ●②③④
प्रश्न १५. ①②●④
प्रश्न १६. ①●③④
प्रश्न १७. ●②③④
प्रश्न १८. ①②●④
प्रश्न १९. ●②③④
प्रश्न २०. ①●③④
प्रश्न २१. ●②③④
प्रश्न २२. ①②●④
प्रश्न २३. ①●③④
प्रश्न २४. ①●③④
प्रश्न २५. ①②③●
प्रश्न २६. ①②●④
प्रश्न २७. ①②③●
प्रश्न २८. ①●③④
प्रश्न २९. ①②③●
प्रश्न ३०. ①②●④
प्रश्न ३१. ①②③●
प्रश्न ३२. ①②●④
प्रश्न ३३. ●②③④
प्रश्न ३४. ●②③④
प्रश्न ३५. ----
प्रश्न ३६. ①●③④
प्रश्न ३७. ●②③④
प्रश्न ३८. ①●③④
प्रश्न ३९. ①●③④
प्रश्न ४०. ①②●④
प्रश्न ४१. ①●③④
प्रश्न ४२. ①●③④
प्रश्न ४३. ①②●④
प्रश्न ४४. ①●③④
प्रश्न ४५. ●②③④
प्रश्न ४६. ①②●④
प्रश्न ४७. ①②●④
प्रश्न ४८. ①②●④
प्रश्न ४९. ①●③④
प्रश्न ५०. ●②③④

# राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. जळवा<br>२. पृथकत्ववाचक | ३. द्विकर्मक क्रियापद<br>४. न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय | ५. कर्मधारय<br>६. व्यतिरेक अलंकार | ७. तीनही<br>८. बुगडी माझी सांडली गं | ९. पोर्तुगीज<br>१०. (अ) |

## विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षा २०१५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रश्न १. ●②③④ | प्रश्न १२. ①②●④ | प्रश्न २३. ①②③● | प्रश्न ३४. ①②③● | प्रश्न ४५. ●②③④ |
| प्रश्न २. ①②●④ | प्रश्न १३. ●②③④ | प्रश्न २४. ①②③● | प्रश्न ३५. ①②●④ | प्रश्न ४६. ①●③④ |
| प्रश्न ३. ①②③● | प्रश्न १४. ●②③④ | प्रश्न २५. ●②③④ | प्रश्न ३६. ①●③④ | प्रश्न ४७. ①②③● |
| प्रश्न ४. ①②●④ | प्रश्न १५. ①②③● | प्रश्न २६. ①②●④ | प्रश्न ३७. ①●③④ | प्रश्न ४८. ①②●④ |
| प्रश्न ५. ①②●④ | प्रश्न १६. ①②●④ | प्रश्न २७. ①②③● | प्रश्न ३८. ①②③● | प्रश्न ४९. ①②●④ |
| प्रश्न ६. ①●③④ | प्रश्न १७. ①●③④ | प्रश्न २८. ①②●④ | प्रश्न ३९. ①②●④ | प्रश्न ५०. ①●③④ |
| प्रश्न ७. ①②●④ | प्रश्न १८. ●②③④ | प्रश्न २९. ①②●④ | प्रश्न ४०. ①②③● | प्रश्न ५१. ①②●④ |
| प्रश्न ८. ●②③④ | प्रश्न १९. ①●③④ | प्रश्न ३०. ①②●④ | प्रश्न ४१. ①②③● | प्रश्न ५२. ①②●④ |
| प्रश्न ९. ①②③● | प्रश्न २०. ●②③④ | प्रश्न ३१. ①②③● | प्रश्न ४२. ①②③● | प्रश्न ५३. ①②●④ |
| प्रश्न १०. ①②③● | प्रश्न २१. ①●③④ | प्रश्न ३२. ①●③④ | प्रश्न ४३. ●②③④ | प्रश्न ५४. ①②●④ |
| प्रश्न ११. ①②●④ | प्रश्न २२. ①●③④ | प्रश्न ३३. ①●③④ | प्रश्न ४४. ①②③● | प्रश्न ५५. ●②③④ |

## राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रश्न १. ①●③④ | प्रश्न १२. ①●③④ | प्रश्न २३. ●②③④ | प्रश्न ३४. ●②③④ | प्रश्न ४५. ①●③④ |
| प्रश्न २. ①②●④ | प्रश्न १३. ●②③④ | प्रश्न २४. ●②③④ | प्रश्न ३५. ①②●④ | |
| प्रश्न ३. ①②③● | प्रश्न १४. ①●③④ | प्रश्न २५. ①②③● | प्रश्न ३६. ●②③④ | |
| प्रश्न ४. ●②③④ | प्रश्न १५. ●②③④ | प्रश्न २६. ①●③④ | प्रश्न ३७. ①②●④ | |
| प्रश्न ५. ①②●④ | प्रश्न १६. ①②●④ | प्रश्न २७. ①②③● | प्रश्न ३८. ●②③④ | |
| प्रश्न ६. ①②●④ | प्रश्न १७. ①②●④ | प्रश्न २८. ①②●④ | प्रश्न ३९. ●②③④ | |
| प्रश्न ७. ①②●④ | प्रश्न १८. ①②③● | प्रश्न २९. ①②●④ | प्रश्न ४०. ①②③● | |
| प्रश्न ८. ①②●④ | प्रश्न १९. ●②③④ | प्रश्न ३०. ①②③● | प्रश्न ४१. ①②③● | |
| प्रश्न ९. ●②③④ | प्रश्न २०. ①②●④ | प्रश्न ३१. ①●③④ | प्रश्न ४२. ●②③④ | |
| प्रश्न १०. ①②③● | प्रश्न २१. ①●③④ | प्रश्न ३२. ●②③④ | प्रश्न ४३. ●②③④ | |
| प्रश्न ११. ①②●④ | प्रश्न २२. ①②③● | प्रश्न ३३. ①②③● | प्रश्न ४४. ①●③④ | |

## विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षा २०१६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रश्न १. ①②③● | प्रश्न १२. ①●③④ | प्रश्न २३. ①②●④ | प्रश्न ३४. ①②③● | प्रश्न ४५. ①②●④ |
| प्रश्न २. ①②●④ | प्रश्न १३. ①●③④ | प्रश्न २४. ①●③④ | प्रश्न ३५. ①②●④ | प्रश्न ४६. ①②③● |
| प्रश्न ३. ①②③● | प्रश्न १४. ------- | प्रश्न २५. ①●③④ | प्रश्न ३६. ①②●④ | प्रश्न ४७. ①②●④ |
| प्रश्न ४. ①②③● | प्रश्न १५. ①②③● | प्रश्न २६. ①②③● | प्रश्न ३७. ①②●④ | प्रश्न ४८. ①●③④ |
| प्रश्न ५. ①②●④ | प्रश्न १६. ①②③● | प्रश्न २७. ●②③④ | प्रश्न ३८. ①②③● | प्रश्न ४९. ●②③④ |
| प्रश्न ६. ①●③④ | प्रश्न १७. ●②③④ | प्रश्न २८. ①②●④ | प्रश्न ३९. ①②●④ | प्रश्न ५०. ①●③④ |
| प्रश्न ७. ①●③④ | प्रश्न १८. ●②③④ | प्रश्न २९. ①●③④ | प्रश्न ४०. ①●③④ | प्रश्न ५१. ①②●④ |
| प्रश्न ८. ①●③④ | प्रश्न १९. ①●③④ | प्रश्न ३०. ●②③④ | प्रश्न ४१. ------- | प्रश्न ५२. ①●③④ |
| प्रश्न ९. ①②●④ | प्रश्न २०. ①②③● | प्रश्न ३१. ●②③④ | प्रश्न ४२. ●②③④ | प्रश्न ५३. ①②●④ |
| प्रश्न १०. ①●③④ | प्रश्न २१. ①②●④ | प्रश्न ३२. ●②③④ | प्रश्न ४३. ●②③④ | प्रश्न ५४. ●②③④ |
| प्रश्न ११. ------ | प्रश्न २२. ①②●④ | प्रश्न ३३. ●②③④ | प्रश्न ४४. ●②③④ | प्रश्न ५५. ●②③④ |

## मराठी व्याकरणातील अंतिम शब्द

### सुगम मराठी व्याकरण व लेखन

- संधी, समास यासह संपूर्ण व्याकरण, वृत्ते, अलंकार, नियमानुसार लेखन यांचे सोप्या भाषेत सोदाहरण स्पष्टीकरण
- महाराष्ट्र व केंद्रीय लोकसेवा आयोगासह इतर स्पर्धापरीक्षांच्या अभ्यासक्रमानुसार अद्ययावत केलेल्या लेखनविभागामध्ये निबंधलेखन, पत्रलेखन, सारांशलेखन, गद्य आकलन, भाषांतर, मुलाखत अशा उपयोजित लेखनाचे सविस्तर मार्गदर्शन

MPSC-मित्र
Powered By Nitin Prakashan
Knowledge to Inspire Success

NITIN PRAKASHAN
Shop online at **www.nitinprakashan.com** & get free home delivery
**Contact No. 7744001144**

किंमत: ₹ 200/-

(२ पुस्तकांचा संच – मुख्य पुस्तक + शब्दरत्न)